
# हादेश बेरीथ सेफेर

# नवीन करार पुस्तक

.



आमचा अदोनाई आणि यशाह (तारणारा) येशुवाह मशीहा याचा, हादेश (नवा) बेरीथ (करार)

.खाजगी वितरण.

| | हादेश | बेरीथ | सेफेर |
|---|---|---|---|
| . | ( नवीन ) | ( करारातील ) | ( पुस्तके ) |

१. मतिया उर्फ लेवी याने लिहिलेले शुभवर्तमान. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६६ ते ७०.

२. मार्क उर्फ योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६४.

३. लूकाने लिहिलेले शुभवर्तमान. (सर्वात पहिले हिब्रू भाषेतून लॅटिन भाषेमध्ये भाषांतर) लेखण काळ ६० ते ७०.

४. योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान. (मूळ हिब्रू लेख) अनिश्चित.

५. थालमीद ची (प्रेषितांची) कार्य. (लेखक लूक) हिब्रू चे लॅटिन भाषेत भाषांतर. लेखण काळ. अनिश्चितता.

५. पौलाचे रोमकरांस लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५८ मध्ये अंदाजे.

६. पौलाचे करिंथकरास लिहिलेले पहिले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५६ मध्ये.

७. पौलाचे करिंथकरास लिहिलेले दुसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५७ मध्ये.

८. पौलाचे गलतीकरास लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५८ ते ६१.

९. पौलाचे इफिसकरास लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६१.

१०. पौलाचे फिलिप्पैकरास लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६२.

११. पौलाचे कलस्सैकरास लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६१ ते ६२.

१२. पौलाचे थेस्सलनीकाकरास लिहिलेले पहिले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५० ते ५१.

१३. पौलाचे थेस्सलनीकाकरास लिहिलेले दुसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ५० ते ५१.

१४. पौलाचे तीमथ्याला लिहिलेले पहिले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६४ मध्ये.

१५. पौलाचे तीमथ्याला लिहिलेले दुसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६६ ते ६७.

१६. पौलाचे तीताला लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६४ ते ६६.

१७. पौलाचे फिलेमोनाला लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६१.

१८. इब्री लोकास लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६९.

१९. याकोबा ने लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ४५ ते ४८.

२०. शिमोन उर्फ केफाने लिहिलेले पहिले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६३ ते ६४.

२१. शिमोन उर्फ केफाने लिहिलेले दुसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६३ ते ६७.

२२. योहानान ने लिहिलेले पहिले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६५.

२३. योहानान ने लिहिलेले दुसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ६५.

२४. योहानान ने लिहिलेले तिसरे पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६० ते ९५.

२५. यहूदाने लिहिलेले पत्र. (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ६५ ते ७०.

२६. योहानान ला झालेली ह्याजोन (प्रगटीकरण). (मूळ हिब्रू लेख) लेखण काळ ९० ते १००.

## .प्रस्तावना.

मुळ पवित्र वचनाचे ज्ञान व जाहिररित्या प्रसारण. अर्थात ओ. बी. एच. डब्ल्यू तर्फे, हा **नवीन करार** विषेश करून पवित्र शास्त्राचा सखोल अभ्यास जे करतात. त्याच प्रमाने जे वचनाचे शिक्षण व संदेश देतात. त्याच प्रमाणे सध्याच्या सर्व मशीही (ख्रिस्ती) म्हणवून घेणा-या मंडळयांना, मूळ दस्तावेज मधील वचनाची सत्यता काय होती? हे ह्या पुस्तकात दिलेले आहे. भाषांतर करणा-यांनी व ईश्वर विज्ञान कॉलेजने, व पाळकांनी, आणि पवित्र शास्त्राच्या शिक्षकांनी, अनेक वर्षापासून चुकीचे विधान करून, नवीन करार हा मूळ ग्रीक भाषेतील आहे. हे चुकीचे शिक्षण दिलेले असल्याने, मूळ दस्तावेज बावत सर्वांना अज्ञानामध्ये ठेवीले. आणि मंडळया व पाळक आणि शिक्षक अज्ञानामध्ये राहीले.

ज्या प्रमाणे जुना करार मूळ हिब्रू भाषेमध्ये आहे. त्याच प्रमाणे त्याची परिपूर्णता करणारा नवीन करार हा देखील मूळ हिब्रू व अरामीक भाषेमध्येच दस्तावेज असल्याचे स्पष्ट दिसून येते. फक्त अपवाद म्हणून १. लूकाचे शुभवर्तमान व २. प्रेषितांची कृत्ये ही दोन्ही पुस्तके अन्य म्हणजे लॅटिन भाषेमध्ये लिहिलेले आहेत हे निश्चित करते.( लूक १ः १ ते ४ वचनावरून.) कारण ती लॅटिन भाषा ही ख्रिस्तापूर्वी ५०० वर्षापासून अस्तित्वात होती हे इतिहास स्पष्ट दाखवितो.

याव्हे अदोनाईची, व येशूवाह मशीहाची, आणि इस्त्राएल लोकांची मूळ बोली भाषा ही फक्त हिब्रू होती, व आहे. ज्या प्रमाणे जुन्या कराराचे लेखक हे हिब्रू भाषा बोलणारे होते व त्यांचे दस्तावेज मूळ हिब्रू भाषेमध्ये होता, त्याच पमाणे नवीन कराराचे जवळ जवळ सर्व लेखक हे हिब्रू भाषा बोलणारे व लिखान करणारे होते. हे त्याच्या लेखामध्ये काही हिब्रू शब्दाचे अवशेष स्वतः ते पुरावे देत आहेत. इसवी सन ९०० च्या दरम्यांन जे संपूर्ण जुन्या व नवीन कराराचे भाषांतर ग्रीक लोकांनी केले.

जुन्या करारामध्ये जरी थोडया शब्दांचे अयोग्य व चुकिचे भाषांतर शब्दाचा वापर त्यांनी केला, पण मूळ दस्तावेज उपलब्ध असल्याने ह्यामधील काही चुका स्पष्ट समजून येतात. परंतु नवीन कराराचे मूळ दस्तावेज त्यांनी नष्ट केल्यामुळे, शब्दांचे पडताळे करण्यास कठीण जाते. परंतु मशीहाच्या क्वादोश रूहुव्वा व्दारे ह्या सर्व चुका व अयोग्य शब्दांचा केलेला वापर, हे फक्त सत्य शोधक व सखोल अभ्यास करणा-यांना स्पष्ट समजून येतो.

ह्या नवीन करारामध्ये आम्ही हा मोठा प्रयत्न केलेला आहे की, जे अयोग्य व चुकीचे ग्रीक भाषेतील शब्दांचा वापर करण्यात आलेला आहे. ते शब्द पूर्णपणे काढून, त्यांच्या जागेवर त्या मूळ दस्तावेज मधील हिब्रू व अरामीक शब्दांचा वापर करून, हे मूळ हिब्रू दस्तावेजला अनुरूप असे मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तयार केलेले आहे.

आणि हीच मूळ सत्यता नवीन कराराची होती.जो अज्ञान काळापासून ते आज पर्यंत ग्रीक भाषांतर करणा-या लोकांनी नवीन कराराच्या बाबतीत अज्ञानाच्या अंधकारामध्ये, सर्व जगातील मंडळयांना ठेवलेआहे.आणि ग्रीक भाषेची प्रसिद्धी, फसवून, संपूर्ण जगभर करून घेतली आहे.इसवी सन ९00 च्या दरम्यान असलेल्या अज्ञान युगाचा व लोकांचा गैरफायदा ग्रीक भाषांतरकारांनी घेतला. येथपर्यंत की, ज्या याव्हे अदोनाईने त्याचे नाव स्पष्ट लिहून दिलेले, ते विशेष नाव, व व्यक्तीवाचक नाव, आणि परमपवित्र स्वतःची नावे, व स्थळांची नावे, एलोहिमचे आणि त्याचा मुलगा येशूवाह मशीहा नावे, जी अनधिकृतपणे पूर्ण ते शब्द गाळून ती नष्ट केली. आणि त्यांच्याच इतर दुस-या देवतांची नावांची आदलाबदली करून टाकली.

परंतु ह्या ज्ञानवृद्धी झालेल्या काळात, जे वचनामध्ये अयोग्य व असत्य शब्द आहेत ते प्रगट झालेले आहे.ज्यांना हे योग्य व सत्य स्विकारवयाचे असेल त्यांनी ते स्विकारून इतरांना देखील हे सत्याचे ज्ञान द्यावे. ज्यांना हे स्विकारावयाचे नाही त्यांनी ते सोडून टाकावे.ह्या बाबत आम्हीं कोणाही कडून आपले मत किंवा निर्णय मागवित नाही. शेवटी याव्हे अदोनाई अब्बाच्या गौरवाकरिता हे समर्पित करातो. मूळ शब्द याव्हे एलोहिमचे व मशीहाचे नाव लाल रंगाच्या शब्दात दिलेले असून मूळ हिब्रू नावे व मूळ स्थानांची नावे फिक्क्या जांभळया रंगाच्या शब्दात दिलेले आहे.

सदर हा नवीन करार भारतीय ख्रिस्ती सुवार्ता मंडळी संस्था व त्यांच्या मंडळया आणि सर्व इतर सहका-यांच्या व ओ. बी. एच. डब्ल्यू च्या मदतीने येशूवाह मशीहा मध्ये याव्हे अदोनाई च्या गौरवाकरिता समर्पित करून प्रकाशन करीत आहोत.

मॉडरेटर. पास्टर. निलेश शमुवेल गायकवाड. पुणे .

© भारतीय ख्रिस्ती सुवार्ता मंडळी संस्था, बोपोडी पुणे. महाराष्ट्र , इंडिया.

एप्रिल २०२१.

## मतियाह् उर्फ लेवी ह्याने लिहिलेले शुभवर्तमान.

प्रस्तावना ः मतियाह हा मूळ हिब्रू असून, त्याला लेवी देखील म्हंटले जात होते.त्याने हे शुभर्वमान इसवी सन ६६ ते ७० या कालावधीमध्ये लिहिले होते. तो जकातदाराचे काम करीत असताना, येशूवाह मशीहाने त्याला आपल्या बरोबर बोलविले. आणि तो सर्व सोडून त्याच्या मागे गेला. हे आपणास मार्क २ः १४ व लूक ५ः २७ वचनामध्ये पहावयास मिळते.तो लेवी असल्याने हे निश्चित सांगता येते की, तो इस्त्राएली असून त्याची मातृभाषा ही हिब्रू व अरामीक ही होती. त्याने त्याच्या शुभवर्तमानाचा मूळ लेख हा हिब्रू भाषेमध्ये लिहिला होता. ह्यासाठी की, यहुदी व इस्त्राएल लोकांना येशूवाह हाच मशीहा आहे हे समजावे, म्हणून त्याने त्याच्या शुभवर्तमानाच्या लेखामध्ये जुन्या करारातील अनेक वचनाचा पुरावा देऊन, त्याने ते सिद्ध करून दाखविलेले आहे.ह्या देखील शुभवर्तमानामध्ये काही हिब्रू भाषेचे शब्द उच्चार मराठी भाषेमध्ये घेतलेले आहे. प्रत्येक शभवर्तमानमध्ये वेगवेगळी हिब्रू शब्द उच्चार ठेविलेले आहेत. काही हिब्रू शब्द दुस-या शुभवर्तमानामध्ये, किंवा मंडळयांच्या पत्रामध्ये आपणास पहावयास मिळतील.सत्य शोधक व अभ्यास करणा-यां करिता ही सर्व पुस्तके अधिक महत्वाची आहे. ह्या पुस्तकामुळे अनेकांच्या सत्याच्या ज्ञानामध्ये वाढ होऊन, इतरांना देण्याकरिता ह्या पुस्तकांचा उपयोग होईल.

## मतियाह् उर्फ लेवी ह्याने लिहिलेले शुभवर्तमान.

**१.**१ येशूवाह मशीहाची वंशावळी येणे प्रमाणे ः तो दाविदाच्या कुळात जन्माला. दाविद अब्राहामाच्या कुळातील होता. २ अब्राहाम
इसाहाकाचा अब्बा होता. इसाहाक याकोबाचा अब्बा होता. याकोब यहूदा व त्यांच्या भावांचा अब्बा होता. ३ यहूदा पेरेस व
जेरहाचा अब्बा होता. (त्यांची अम्मी तामार होती.) पेरेस हेम्रोनाचा अब्बा होता.हेम्रोन अरामाचा अब्बा होता. ४ अरामा
अम्मीनादाबाचा अब्बा होता. अम्मीनादाब नहशोन सल्मोनाचा अब्बा होता. ५ सल्मोन बवाजाचा अब्बा होता. (बवाजाची अम्मी
रहाब होती.) बवाज ओबेदचा अब्बा होता.(ओबेदची अम्मी रूथ होती.) ओबेद इशायचा अब्बा होता. ६ इशाय दाविद राजाचा
अब्बा होता. दाविद शलमोनाचा अब्बा होता. (शलमोनाची अम्मी पूर्वी उरीयाची बयको होती.) ७ शलमोन रहबामचा अब्बा
होता. रहबाम अबीयाचा अब्बा होता. अबीया असाचा अब्बा होता. ८ आसा यहोशाफाटाचा अब्बा होता.यहोशाफाट योरामाचा
अब्बा होता. योराम उज्जीयाचा अब्बा होता. ९ उज्जीया योथामचा अब्बा होता. योथाम आहाजचा अब्बा होता. आहाज
हिज्कीयाचा अब्बा होता. १० हिज्कीया मनश्शेचा अब्बा होता. मनश्शे आमोनचा अब्बा होता. आमोन योशीयाचा अब्बा होता. ११
योशीया यखन्या व त्याचे भाऊ यांचा अब्बा होता.( जेंव्हा यहूदी लोकांना गुलाम म्हणून बाबेलास नेण्यात आले तेंव्हा हे झाले.) १२
त्यांना बाबेलला नेण्यात आल्यानंतरची वंशावळी येणे प्रमाणे. यखन्या शल्तीएलचा अब्बा होता. शल्तीएल जरूब्बाबेलचा अब्बा
होता. १३ जरूब्बाबेल अबीहूदचा अब्बा होता. अबीहूद एल्याकीमचा अब्बा होता. एल्याकीम अज्जुराचा अब्बा होता. १४ अज्जुर
सादोकचा अब्बा होता. सादोक याखीमचा अब्बा होता. याखीम एलीहूदचा अब्बा होता .१५ एलीहूद एलाजारचा अब्बा होता.
एलाजार मत्तानचा अब्बा होता. मत्तान याकोबाचा अब्बा होता. १६ याकोब योसेफाचा अब्बा होता. योसेफ मरीयेचा पती होता.
मरीया येशूवाहची अम्मी होती. **येशूवाहला मशीहा** (अभिषिक्त किंवा याव्हे एलोहिमने निवडलेला.) म्हंटले आहे. १७ याप्रमाणे
अब्राहामापासून दाविदापर्यंत चौदा पिढया झाल्या आणि दाविदापासून बाबेलच्या बंदिवासापर्यंत चौदा पिढया झाल्या. बाबेलच्या
बंदिवासापासून मशीहाच्या जन्मापर्यंत चौदा पिढया झाल्या.

१८ येशुवाह मशीहाच्या अम्मीचे नाव मरीया होते आणि येशूवाह मशीहाचा जन्म अशा प्रकारे झाला. मरीयेचे योसेफाशी लग्न ठरले
होते.परंतु त्या अगोदरच ती कादोश रूहुवाच्या (पवित्र आत्म्याच्या) सामर्थ्याने गर्भवती आहे असे दिसून आले. १९ तिचा भावी पती
योसेफ न्यायी मनुष्य होता. तिची लोकांमध्ये बदनामी होऊ नये म्हणून त्याने तिला गुप्तपणे सोडून द्यावे असे त्याने मनात आणले.
२० परंतु तो त्या गोष्टीविषयी विचार करीत असता पाहा, याव्हे एलोहिमचा मालाक ने (दूताने) स्वप्नात त्याला दर्शन दिले, आणि
सांगितले. “दाविदाच्या वंशातील योसेफा, मरीयेशी लग्न करण्यास अनमान करू नकोस. कारण तिला होणारे बेन (मूल) क्वाादोश
रूहुव्वा (पवित्र आत्म्या) पासून होणार आहे.२१ त्याचे शेम (नाव) तू येशूवाह (हे हिब्रू मुळ विषेश नाव असून त्याचा अर्थ तारणारा
हा आहे.) ठेव. कारण तो त्याच्या लोकांची पापापासून सुटका करील.” २२ हे सर्व यासाठी घडले की, अदोनाईने

नवीईमच्या (संदेष्टयांच्या) व्दारे जे सांगितले होते, त्याची पूर्णता व्हावी.२३ कुमारी गर्भवती होईल ती एका बेन (मुला) ला जन्म देईल, आणि ते त्याला 'इम्मानुएल' म्हणजे, 'आमच्या बरोबर याव्हे एलोहिम आहे,' असे म्हणतील." २४ जेंव्हा योसेफ जागा झाला. तेंव्हा याव्हे एलोहिमच्या मालाक ने (दूताने) जशी त्याला आज्ञा केली होती, तसेच त्याने केले.आणि त्याने मरीयेचा अंगीकार केला.२५ पण तिने मुलाला जन्म देई पर्यंत त्याने तिला जाणले नाही, आणि योसेफाने त्याचे नाव येशूवाह ठेवले.

२.१ यहूदीयातील बेथलहेम गावात येशूवाहचा जन्म झाला. त्यावेळी हेरोद राजा राज्य करीत होता. येशूवाहच्या जन्मानंतर पूर्वे कडून काही ज्ञानी लोक यरूशलेमाला आले. २ आणि त्यांनी विचारले, " यहूद्यांचा नुकताच जन्मलेला मेलेख (राजा) कोठे आहे? कारण त्याचा जन्म सूचित करणारा कोकाव (तारा) आम्ही क्वेदेम (पूर्व) दिशेस पाहिला, म्हणून त्याला शाचाह (नमन) करण्यास आलो आहोत." ३ हे ऐकून हेरोद राजा, तसेच यरूशलेम नगराचे रहिवाशी घाबरून गेले. ४ मग त्याने यहूदी लोकांचे सर्व एलयोवन कोहेन (मुख्य याजक) व तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांना बोलाविले आणि विचारले की, मशीहाचा जन्म कोठे होणार होता?" ५ त्यांनी उत्तर दिले, "यहूदीयातील बेथलहेम गावात. कारण याव्हे एलोहिमच्या नबीईमनी (संदेष्टयांनी) त्याविषयी असे लिहिले आहे की, ६ हे बेथलहेमा, यहूद्यांच्या भूमिप्रदेशा, तू यहूद्यांच्या राज्यकर्त्यामध्ये कनिष्ठ आहेस, असे मुळीच नाही. कारण माझ्या इस्त्राएल लोकांचा सांभाळ करील, असा राज्यकर्ता तुझ्यातून येईल." ७ मग हेरोदाने पूर्वेकडील ज्ञानी लोकांची गुप्तपणे भेट घेतली. आणि कोकाव (तारा) दिसल्याची नक्की वेळ माहीत करून घेतली. ८ नंतर त्याने त्यांना बेथलहेमला पाठविले. हेरोद त्यांना म्हणाला, " तुम्ही जाऊन त्या बालकाचा नीट शोध करा. आणि तुम्हांला ते सापडल्यावर, मला सांगायला या. म्हणजे मी सुद्धा जाऊन त्याला नमन करील." ९ हाखाम (ज्ञानी) लोकांनी मेलेक (राजा) चे म्हणणे ऐकले, व ते निघाले. त्यांनी जो कोकाव क्वेदेम (तारा पूर्वे) ला पाहिला होता, तोच त्यांना परत दिसला. हाखाम (ज्ञानी) लोक त्या ता-याच्या मागे गेले. तेथे बाळ होते ते ठिकाण येईपर्यंत, तारा त्यांच्यासमोर जात होता. मग त्या ठिकाणावर तो थांबला. १० ज्ञानी लोकांना ते पाहून फार आनंद झाला. ११ ज्ञानी लोक बाळ होते त्या गोठयात आले. त्यांनी बाळ व त्याची अम्मी मरीया हिला पाहिले. त्यांनी लवून त्या बालकाला शाचाह (नमन) केले.नंतर त्यांनी बाळासाठी आणलेल्या भेटवस्तु काढल्या. त्यांनी बाळाला झाहाव (सोने), क्वेतोरेथ (ऊद), व मओर (गंधरस किंवा बोळ) ह्या बहुमोल वस्तु दिल्या.१२ पण याव्हे एलोहिमने स्वप्नाव्दारे त्या ज्ञानी लोकांना सावध केले, आणि हेरोदाकडे परत जाऊ नका, असे सांगितले. तेंव्हा ते ज्ञानी लोक वेगळया मार्गाने आपल्या देशास परतले.

१३ ज्ञानी लोक गेल्यानंतर अदोनाईचा मालाक (दूत) स्वप्नात येऊन योसेफाला म्हणाला "ऊठ बालकाला आणि त्याच्या अम्मीला घेऊन मिसर (इजिप्त) देशात पळून जा. कारण बाळाचा घात करण्यासाठी हेरोद त्याचा शोध घेणार आहे. आणि मी तुला सांगे पर्यंत मिसर मध्येच राहा.१४ तेंव्हा तो उठला व रात्रीच बाळाला व त्याच्या अम्मीला घेऊन मिसर देशात गेला. १५ आणि हेरोद मरे पर्यंत तेथेच राहिला. अदोनाई याव्हे एलोहिमने नबीईमच्या (संदेष्टयांच्या) व्दारे सांगितले होते की, 'मी माझ्या बेनला (मुलाला) मिसर देशातून बोलाविले आहे,' ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.

१६ तेंव्हा ज्ञानी लोकांनी आपल्याला फसविले, हे पाहून हेरोद अतिशय रागावला. त्याने ज्ञानी लोकांकडून त्या बालकाच्या जन्माची वेळ नीट समजून घेतली होती. त्यानुसार बालक जन्माल्याला आता दोन वर्षे उलटलेली होती. म्हणून त्याने माणसे पाठवून बेथलहेम, व त्याच्या आसपासच्या प्रदेशातील दोन वर्षाच्या व त्याहून कमी वयाच्या मुलांची कत्तल करण्यासाठी आज्ञा केली. १७ यिर्मया नबीईमच्या (संदेष्टयांच्या) व्दारे याव्हे एलोहिमने जे सांगितले होते, ते अशा प्रकारे पूर्ण झाले. ते वचन असे होतेः १८ "रामा येथे मोठा आकांत ऐकू आला, दुःखदायक रडण्याचा हा आकांत होता. राहेल आपल्या बेन (मुला) साठी रडत आहे. पण तिचे सांत्वन करणे अशक्य झाले, कारण तिचे बेन (मुले) मरण पावली आहेत."

१९ हेरोद मेल्यानंतर अदोनाईचा मालाक (दूत) स्वप्नात योसेफाकडे आला. योसेफ जेंव्हा मिसरामध्ये होता, तेंव्हा हे घडले.२० मालाक (दूत) म्हणाला, "ऊठ बाळाला आणि त्याच्या अम्मीला घेऊन इस्त्राएल देशात जा. जे लोक बाळाला मारू पाहत होते ते

आता मेले आहेत." २१ मग योसेफ बाळाला आणि त्याच्या अम्मीला घेऊन इस्त्राएल देशात गेला.२२ हेरोदाच्या मृत्यूनंतर त्याच्या जागी त्याचा मुलगा अर्खेलाव यहूदाचा राजा झाला आहे, असे जेंव्हा योसेफाला समजले. तेंव्हा तो तेथे जाण्यास घाबरला. पण स्वप्नात त्याला सुचना मिळाल्याने तो तेथून निघाला, आणि गालील प्रदेशात आला. २३ योसेफ नात्सेरोथ (नाझरेथ) नावाचा गावात गेला, आणि तेथे राहिला. मशीहा नात्सेरोथ (नाझरेथकर) म्हंटला जाईल, असे जे याव्हे एलोहिमने नबीईमच्या (संदेष्टयांच्या) व्दारे सांगितले होते, ते पूर्ण व्हावे म्हणून हे झाले.

**३**.१ त्या दिवसांत बाप्तिस्मा करणारा योहानान आला आणि यहूदीयाच्या वैराण प्रदेशात उपदेश करू लागला. तो म्हणाला, २ " तुमची अंतःकरणे व जीवने वाईटपणाकडून चांगुलपणामध्ये बदला. कारण आकाशाचे राज्य जवळ येत आहे." ३ यशया हा नबी (संदेष्टा) ज्याच्याविषयी बोलत होता, तो हाच बाप्तिस्मा करणारा योहानान त्याविषयीचे यशयाचे भविष्य असे होते." वैराण प्रदेशात एक मनुष्य ओरडून सांगत आहे. "अदोनाई याव्हे एलोहिमसाठी मार्ग तयार करा, त्याच्या वाटा सरळ करा." ४ योहानानचे कपडे उंटाच्या केसांपासून बनविलेले होते. कातडयाचा कमरपट्टा त्याच्या कमरेभोवती होता. अन्न म्हणून योहानान टोळ आणि रानमध खात असे. ५ लोक योहानानचा उपदेश ऐकण्यास जात होते. यरूशलेम, सर्व यहूदीया प्रांत, आणि यार्देन नदीच्या परीसरातील प्रदेशातून लोक येत होते. ६ आपण केलेली पापे लोक त्याला सांगत होते, आणि योहानान त्यांना यार्देन नदीत बाप्तिस्मा देत होता. ७ योहानान जेथे लोकांना बाप्तिस्मा देत होता तेथे अनेक परूशी आणि सदूकी आले.जेंव्हा योहानान ने त्यांना पाहिले तेंव्हा तो म्हणाला, "अहो सापाच्या पिल्लांनो, याव्हे एलोहिमचा जो क्रोध ओढवणार आहे. त्याच्यापासून दूर पळण्याचे तुम्हांला कोणी सुचविले? ८ म्हणून पश्चात्तापास योग्य अशी फळे द्या. ९ आणि 'अब्राहाम माझा अव्वा आहे' अशी फुशारकी तुम्हांला मरता येईल, असे समजू नका. मी तुम्हांस सांगतो की, याव्हे एलोहिम अब्राहामासाठी या दगडापासून मुले निर्माण करू शकतो. १० झाडे तोडण्यासाठी कु-हाड तयार आहे. चांगले फळ न देणारे प्रत्येक झाड कापून अग्नीत टाकले जाईल. ११ तुम्ही तुमची अंतःकरणे, आणि जीवने वाईटाकडून चांगल्याकडे बदलली आहेत. हे दाखविण्यासाठी मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो. पण माझ्यानंतर, माझ्यापेक्षाही महान असा एक येत आहे. ज्याच्या वहाणा उचलण्याची सुद्धा माझी पात्रता नाही. तो क्वादोश रूहुव्वा ने (पवित्र आत्म्याने) आणि अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करील.१२ तो धान्य निवडायला येईल. तो भुसा बाजूला काढील व धान्य वेगळे करील. तो चांगले धान्य कोठारात साठविल. व जे चांगले नाही, ते जाळून टाकील.तो भुसा कधीही न विझणा-या आग्नीमध्ये जाळून टाकील."

१३ तेंव्हा येशूवाह गालीलाहून यार्देन नदीकडे आला. त्याला योहानानच्या हातून बाप्तिस्मा घ्यायचा होता. १४ पण त्याला थोपवीत योहानान म्हणाला, "खरे तर मी आपल्या हातून बाप्तिस्मा घ्यायचा असे असता. आपण माझ्याकडे बाप्तिस्मा घ्यायला आलास हे कसे?" १५ येशूवाहने त्याला उत्तर दिले, "आता असेच होऊ दे.याव्हे एलोहिमची इच्छा हीच आहे म्हणून आपण असेच केले पाहिजे." तेंव्हा योहानान येशूवाहचा बाप्तिस्मा करण्यास तयार झाला.१६ येशूवाहचा बाप्तिस्मा झाला, आणि तो पाण्यातून वर आला.तेंव्हा आकाश उघडले, आणि याव्हे एलोहिमचा पवित्र आत्मा एखाद्या कबुतराप्रमाणे आपणावर उतरताना त्याला दिसला. १७ त्याच वेळी आकाशातून वाणी झाली की, "हा माझा वेन (मुलगा) मला परमप्रिय आहे, त्याच्याविषयी मी संतुष्ट आहे."

**४**.१ मग पवित्र आत्म्याने येशूवाहला रानात नेले. मोहात पाडून सैतानाने त्याची परीक्षा घ्यावी म्हणून त्याला तेथे नेण्यात आले. २ चाळीस दिवस आणि चाळीस रात्र येशूवाहने काहीच खाल्ले नाही. त्यानंतर त्याला खूप भूक लागली. ३ तेंव्हा सैतान येशूवाहची परीक्षा घेण्यासाठी त्याच्याकडे आला व म्हणाला, " जर तू याव्हे एलोहिमचा वेन (मुलगा)आहेस तर ह्या दगडांना भाकरी होण्याची आज्ञा दे." ४ येशूवाहने उत्तर दिले, "असे लिहिले आहे की, मनुष्य केवळ भाकरीने जगेल असे नाही, तर याव्हे एलोहिमच्या तोंडून निघणा-या प्रत्येक शब्दाने जगेल." ५ मग सैतानाने त्याला पवित्र नगर यरूशलेमात नेले. सैतानाने येशूवाह ला मंदिराच्या कंगो-यावर उभे केले. ६ आणि त्याला म्हंटले, " जर तू याव्हे एलोहिमचा वेन (मुलगा) आहेस, तर खाली उडी टाक. कारण असे लिहिले आहे की, " याव्हे एलोहिम त्याच्या मालाक ला (दूतांना) तुझ्यासाठी आज्ञा करील. आणि तुझे पाय खडकावर आपटू

नयेत, म्हणून ते तुला हातांवर झेलतील." ७ येशूवाहने त्याला उत्तर दिले, "असे सुद्धा लिहिले आहे की, "याव्हे एलोहिम जो तुझा
अदोनाई याची परीक्षा पाहू नको." ८ मग सैतानाने येशूवाहला एका खूप उंच पर्वतावर नेले. त्याने येशूवाहला जगातील राज्ये
आणि त्यातील सर्व वैभव दाखविले. ९ सैतान म्हणाला, " जर तू पाया पडून मला नमन करशील, तर मी हे सारे तुला देईन." १०
तेंव्हा येशूवाह त्याला म्हणाला, " अरे सैताना माझ्यापासून दूर हो! कारण असे लिहिले आहे की, याव्हे एलोहिम जो तुझा अदोनाई
त्याचीच उपासना कर, आणि केवळ त्याचीच सेवा कर." ११ मग सैतान येशूवाहला सोडून निघून गेला. आणि याव्हे एलोहिमच्या
मालाक ने (देवदूतांनी) येऊन त्याची सेवा केली.

१२ नंतर योहानानला तुरूंगात टाकले आहे, हे ऐकून येशूवाह गालीलास परतला. १३ परंतु तो नात्सेरेथ (नासरेथ) येथे राहिला
नाही. तर गालील सरोवराजवळील कफर्णहूम नगरात जाऊन राहिला. जबुलून व नफताली ह्या प्रदेशांना लागूनच कफर्णहूम नगर
आहे.१४ यशया ह्या नवी ने (संदेष्टयाने) पूर्वी जे सांगितले होते, ते पूर्ण व्हावे यासाठी हे झाले. यशयाने सांगितलेल्या भविष्य
असे होते.१५ जबुलून आणि नफताली प्रांत समुद्राकडे येणारे मार्ग यार्देन नदीपलीकडचा प्रदेश व यहूदीतरांचा गालील यामधील, १६
अंधारात असणा-या लोकांनी मोठा ओर (प्रकाश) पाहिला.मरणाचे छायेत असलेल्या प्रदेशात राहणा-या लोकांसाठी ओर (प्रकाश)
अवतरला आहे.१७ त्यावेळेपासून येशूवाह उपदेश करू लागला. व म्हणू लागला की, "पश्चात्ताप करा, कारण आकाशांचे राज्य
जवळ आले आहे." १८ नंतर तो गालीलाच्या सरोवराजवळून जात असता, त्याने केफाला म्हंटलेला शिमोन, व त्याचा भाऊ अंद्रिया
या दोघांना पाहिले, ते मासे पकडणारे होते. ते जाळे टाकून मासे धरीत होते.१९ तो त्यांना म्हणाला, " तुम्हीं माझ्यामागे या, म्हणजे
मी तुम्हांला माणसे धरणारे करीन." २० मग ते मागेपुढे न पाहता लगेच जाळे टाकून देऊन, ते त्याच्या मागे चालू लागले. २१ तेथून
पुढे चालत जात असता, त्याने दुसरे दोघे भाऊ म्हणजे जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहानान यांना त्यांचे अब्बा जब्दी
याच्यावरोबर नावेत आपली जाळी नीट करताना पाहिले. आणि त्याने त्यांना बोलावले. २२ तेंव्हा ते आपली नाव, व आपले अब्बा
यांना सोडून त्याच्या मागे गेले.

२३ येशूवाह गालील प्रांतात सगळीकडे गेला. येशूवाहने सभास्थानात जाऊन शिकविले, व आकाशाच्या राज्याची सुवार्ता सांगितली.
येशूवाहने लोकांचे सर्व रोग व दुःखणी बरी केली. २४ येशूवाह विषयीची बातमी सर्व सूरीया देशभर पसरली. मग जे दुःखणेकरी
होते, ज्यांना नाना प्रकारचे रोग व आजार होते.ज्यांना अशुद्ध आत्म्यांची बाधा झाली होती. जे फेफरेकरी व पक्षाघाती होते, अशा
सर्वांना त्याच्याकडे आणले. आणि त्याने त्यांना बरे केले.२५ मग गालील व दकापलीस, यरूशलेम, व यहूदीया येथून व यार्देनेच्या
पलीकडून आलेल्या लोकांचे मोठे समुदाय त्याच्या मागे चालले.

**५**.१ येशूवाहने पुष्कळ लोक पाहिले, म्हणून येशूवाह डोंगरावर गेला, आणि खाली बसला. मग त्याचे थालमीद (शिष्य)
त्याच्याजवळ आले.२ आणि त्याने त्यांना तोंड उघडून शिकविण्यास सुरूवात केली. तो म्हणाला, ३ "जे आत्म्याने दीन ते
आशिर्वादीत आहेत. कारण आकाशाचे राज्य त्यांचे आहे. ४ जे शोक करतात ते आशिर्वादीत आहेत. कारण त्यांचे सांत्वन
करण्यात येईल. ५ जे नम्र ते आशिर्वादीत आहेत. कारण त्यांना वचनदत्त भूमीचे वतन मिळेल.६ ज्यांना नीतीने वागण्याची तहान
व भूक लागली आहे, ते आशिर्वादीत आहेत. कारण ते तृप्त होतील. ७ जे दयाळू ते आशिर्वादीत आहेत. कारण त्यांच्यावर दया
करण्यात येईल. ८ जे आत्म्याचे शुद्ध ते आशिर्वादीत आहेत. कारण ते अदोनाई याव्हे एलोहिमला पाहतील.९ जे शालोम (शांति)
करणारे ते आशिर्वादीत आहेत. कारण त्यांना अदोनाई याव्हे एलोहिमचे बेन (मुले) म्हंटले जाईल.१० नीतिमत्वासाठी ज्यांचा छळ
झाला आहे ते आशिर्वादीत आहेत. कारण आकाशांचे राज्य त्यांचे आहे.११ जेंव्हा माझ्यामुळे लोक तुमची निंदा, व छळ करतील व
लबाडीने तुमच्या विरूद्ध सर्व प्रकारचे वाईट बोलतील, तेंव्हा तुम्हीं आशिर्वादीत आहात. १२ आनंद व उल्लास करा. कारण
आकाशात तुमचे प्रतिफळ मोठे आहे. कारण जे नवीईम (संदेष्टे) तुमच्या पूर्वी होऊन गेले, त्यांचा त्यांनी तसाच छळ केला.

१३ तुम्ही पृथ्वीचे मीठ आहात, पण जर मिठाचा खारटपणा गेला, तर त्याला तो खारटपणा पुन्हा येणार नाही. त्यानंतर ते बाहेर

टाकले जाऊन, माणसाच्या पायांखाली तुडवले जावे, या शिवाय कशाच्याही उपयोगाचे नाही. १४ तुम्हीं जगाचा ओर (प्रकाश) आहात, डोंगरावर बसलेले नगर लपत नाही. १५ आणि दिवा लावून तो कोणी भांडया खाली लपवून ठेवीत नाही, उलट तो दिवठणीवर ठेवतात. म्हणजे तो दिवा घरातील सर्वांना ओर (प्रकाश) देतो.१६ तशाच प्रकारे तुम्हीं सुद्धा इतरांच्यासाठी प्रकाश असले पाहिजे. यासाठी की, त्यांनी तुमची चांगली कामे पाहावी. आणि तुमच्या अब्बा जो आकाशात आहे, त्याचे गौरव करावे.

१७ मी तोराह (नियमशास्त्र) किंवा नवीईमचे (संदेष्टयाचे) लिखाण रद्द करावयास आलो आहे, असे समजू नका. मी ते रद्द करावयास नाही, तर ती परिपूर्ण करावयास आलो आहे. १८ मी तुम्हांला सत्य तेच सांगतो की, आकाश आणि पृथ्वीचा शेवट होईपर्यंत तोराह तील (नियमशास्त्रातील) एका शब्दात देखील फरक होणार नाही. १९ म्हणून प्रत्येक व्यक्तीने लहानातील लहानाने सुद्धा आज्ञा पाळावी.व जर त्याने पाळली नाही, व इतरांनाही तसे करण्यास शिकविले नाही, तर तो आकाशाच्या राज्यात सर्वात लहान गणला जाईल. पण जो आज्ञा पाळील, व इतरांना तसे करण्यास शिकविल, त्याला आकाशाच्या राज्यात मोठे गणले जाईल.२० कारण मी तुम्हांस सांगतो की, परूशी आणि तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांच्या नीतिमत्वापेक्षा, तुमचे नीतिमत्व अधिक चांगले असल्याशिवाय तुम्हीं आकाशाच्या राज्यात जाणारच नाही.

२१ असे प्राचीन काळाच्या लोकांना सांगितले होते, हे तुम्हीं ऐकले आहे. तू खून करू नको, व जो कोणी खून करतो तो न्यायदंडास पात्र ठरेल. २२ पण मी तुम्हांस सांगतो की, जर एखादा आपल्या भावावर रागावला असेल. तर तो न्यायदंडास पात्र ठरेल. पुन्हा जो आपल्या भावाला अरे वेडया असे म्हणेल, तो न्यायसभेच्या दंडास पात्र ठरेल. आणि जो त्याला मूर्खा म्हणेल, तो सर्वकालाच्या अग्निच्या शिक्षेस पात्र ठरेल. २३ म्हणून तू आपले दान अर्पण करण्यासाठी वेदीजवळ आणले असता, जर तुझ्या भावाच्या मनात तुझ्याविरूद्ध काही आहे. असे तुला तेथे आठवले, २४ तर याव्हे एलोहिमला देण्यासाठी आणलेले दान तेथेच वेदीपुढे ठेव. प्रथम जाऊन आपल्या भावाबरोबर समेट कर, आणि नंतर येऊन आपले दान दे. २५ वाटेत तुझा वादी तुझ्याबरोबर आहे, तोच त्याच्याशी लगेच सलोखा कर. नाहीतर कदाचित वादी तुला न्यायाधीशाकडे नेईल, व न्यायाधीश अधिका-यांकडे नेईल. आणि अधिकारी तुला तुरूंगात टाकील. २६ मी तुला खरे सांगतो, तू शेवटचा पैसा देईपर्यंत तुझी सुटका मुळीच होणार नाही.

२७ व्यभिचार करू नको, असे पूर्वी सांगितल्याचे तुम्हीं ऐकले आहे. २८ परंतु मी तुम्हांस सांगतो की, जो कोणी एखाद्या स्त्रीकडे वाकडया नजरेने पाहतो, त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे. २९ जर तुझा उजवा डोळा तुला पाप करावयास प्रवृत्त करतो, तर तो काढून टाक व फेकून दे. संपूर्ण शरीर सर्वकाळच्या अग्नीत जाण्यापेक्षा, शरीराचा एकाच अवयव गमवलेला बरा. ३० जर तुझा उजवा हात तुला पापास प्रवृत्त करतो, तर तो तोडून फेकून दे. कारण संपूर्ण शरीर सर्वकाळच्या अग्नीत जाण्यापेक्षा, शरीराचा एक अवयव गमवलेला बरा.३१ जर एखादा मनुष्य आपल्या पत्नीला घटस्फोट देतो. तर त्याने तिला घटस्फोटाची लेखी सूचना द्यावी, असे सांगितल्याचे तुम्हीं जाणता. ३२ पण मी तुम्हांला सांगतो की, जो कोणी आपल्या पत्नीला व्यभिचाराच्या कारणाशिवाय इतर कारणामुळे टाकून देतो, तो तिला व्यभिचार करण्यास प्रवृत्त करतो. आणि जो कोणी अशा घटस्फोटित स्त्रीशी विवाह करतो, तो व्यभिचार करतो.

३३ जेंव्हा तू शपथ घेतोस तेंव्हा ती तोडू नको. जी शपथ याव्हे एलोहिमला वाहिली आहे, ती खरी कर. असे सांगितल्याचे तुम्हीं ऐकले आहे. ३४ परंतु मी तुम्हांला सांगतो की, शपथ वाहूच नका. आकाशांची शपथ वाहू नका, कारण ते याव्हे एलोहिमचे आसन आहे. ३५ पृथ्वीचीही शपथ वाहू नका, कारण ती त्याच्या पायाचे आसन आहे; आणि यरूशलेमाचीही शपथ वाहू नका, कारण त्या नगरीचा राजा याव्हे एलोहिम आहे. ३६ आपल्या मस्तकाचीही शपथ वाहू नका, कारण एखादा केसही पांढरा किंवा काळा होणे तुमच्या हाती नाही. ३७ म्हणून तुमचे बोलणे होय तर होय किंवा नाही एवढेच असावे.त्यापेक्षा जास्त जर असेल तर ते सैतानापासून आहे.

३८ तुम्हीं ऐकले आहे की असे सांगितले होते, डोळयाबद्दल डोळा आणि दाताबद्दल दात.३९ पण मी तुम्हांला सांगतो, जो दुष्ट आहे त्याला अडवू नका. जर कोणी तुमच्या उजव्या गालावर तुम्हांला मारील त्याच्यासमोर दुसराही गल पुढे करा. ४० आणि जो कोणी फिर्याद करून तुमचा अंगरखा घेऊ पाहतो, त्याला तुमचा झगाही द्या.४१ जर कोणी तुम्हांला सक्तीने त्याच्याबरोबर काही अंतर घेऊन जाऊ इच्छीतो तर त्याच्याबरोबर त्याच्या दुप्पट अंतर जा. ४२ जो तुमच्याजवळ मागतो त्याला द्या. आणि जो तुमच्याकडून उसने घेऊ इच्छीतो, त्याला नकार देऊ नका.

४३ असे सांगितले होते की, आपल्या शेजा-यावर प्रीति करा. आणि आपल्या शत्रूचा व्देष करा. असे तुम्हीं ऐकले आहे. ४४ पण मी तुम्हांला सांगतो, तुमच्या शत्रूवर प्रीति करा. तुमचे जे वाईट करतात, त्यांच्यासाठी प्रार्थना करा. ४५ जर तुम्हीं असे कराल, तर तुम्हीं तुमच्या आकाशातील अब्वाचे खरे मुले व्हाल.तुमचा अब्वा चांगल्यावर आणि वाईटावर अशा दोघांवरही सूर्य उगवितो. चांगल्यावरही आणि वाईटावरही पाऊस पाडतो.४६ कारण जे तुमच्यावर प्रीति करतात त्यांच्यावर तुम्हीं प्रीति करीत असाल, तर तुम्हांला प्रतिफळ मिळणार नाही. जकातदारही असेच करतात.४७ आणि जर तुम्हीं तुमच्या मित्रांशी चांगले वागत असाल, तर तुम्हीं इतरांपेक्षा फार चांगले आहात, असे समजू नका. याव्हे एलोहिमला न मानणारे लोकही असेच करतात. ४८ म्हणून जसा तुमचा आकाशातील अब्वा परिपूर्ण आहे तसे तुम्हींही परिपूर्ण व्हा.

**६.**१ जेंव्हा तुम्हीं चांगली कृत्ये करता, तेंव्हा ती गाजावाजा न करता करा. लोकांच्या नजरेत भरावी म्हणून जर तुम्हीं सत्कृत्ये करणार असाल, तर लक्षात ठेवा तुमच्या आकाशातील अब्वा कडून तुम्हांला तुमचे प्रतिफळ मिळणार नाही.२ जेंव्हा तुम्हीं गरीबांना देता, तेंव्हा त्याचा गाजावाजा करू नका. मी खरे तेच सांगतो, ढोंगी लोक तसेच करतात. दान देण्यापूर्वी कर्णा फुंकून लोकांचे लक्ष वेधून घेतात. सभास्थानात व रस्त्यावर ते जाहीरपणे अशी कामे करतात. कारण इतर लोकांनी त्यांना मोठेपणा द्यावा, अशी त्यांची इच्छा असते. मी तुम्हांस सांगतो की, ते आपले प्रतिफळ भरून पावले आहेत. ३ म्हणून जेंव्हा तुम्हीं गरीबाला द्याल, तेंव्हा गुपचुप द्या. तुमचा उजव हात काय करतो, हे तुमच्या डाव्या हाताला कळू नये. ४ दान गुप्त असावे, कारण तुमच्या अब्वाला ते कळते. व तो त्याचे फळ देतो.५ जेंव्हा तुम्हीं प्रार्थना करता, तेंव्हा ढोंग्यांसारखे होऊ नका. कारण आपण लोकांस दिसावे, म्हणून सभास्थानामध्ये व रस्त्याच्या कोप-यांवर उभे राहून प्रार्थना करणे त्यांना आवडते. मी तुम्हांला खरे सांगतो की, त्यांना आपले प्रतिफळ मिळाले आहे. ६ पण तुम्हीं जेंव्हा प्रार्थना करता, तेंव्हा आतल्या खोलीत जा, दार लावून घ्या. व जो तुमचा अब्वा गुप्त आहे, त्याची प्रार्थना करा. मग तुमचा अब्वा ज्याला कोणी पाहू शकत नाही, तो तुम्हांला प्रतिफळ देईल. ७ आणि जेंव्हा तुम्हीं प्रार्थना करता, तेंव्हा ज्यांना देव माहीत नाही, अशासारखे होऊ नका. ते निरर्थक बडबड करतात. कारण आपण फार बोलल्याने, आपले म्हणणे ऐकले जाईल असे त्यांना वाटते. ८ त्यांच्यासारखे होऊ नका. तुम्हांला कशाची गरज आहे, हे तुम्हीं सांगण्यापूर्वी तुमच्या अब्वाला ठाऊक असते. ९ म्हणून जेंव्हा तुम्हीं प्रार्थना करता, तुेंव्हा तुम्हीं अशी प्रार्थना करावी.

‘हे आमच्या आकाशातील याव्हे अदोनाय अब्वा, तुझे नाव परम पवित्र मानले जावो.१० तुझे राज्य येवो. जसे आकाशात, तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. ११ आमची रोजची भाकर आज आम्हांला दे. १२ जसे आमच्या विरूद्ध केलेल्या वाईटाची आम्ही क्षमा करतो, तसे आम्हीं केलेल्या पापांची आम्हांला क्षमा कर. १३ आम्हांला परीक्षेत आणू नकोस, तर आम्हांला त्या दुष्टापासून सोडीव. १४ कारण जर तुम्हीं इतरांच्या चुकांची क्षमा कराल, तर तुमचा आकाशातील अब्वाही तुम्हांला क्षमा करील. १५ पण जर तुम्हीं इतरांच्या चुकांची क्षमा करणार नाही, तर तुमचा अब्वाही तुम्हांला क्षमा करणार नाही.

१६ जेंव्हा तुम्हीं उपास करता, तेंव्हा तुम्हीं ढोंग्यासारखे चेहरा उदास करू नका. कारण आपण उपास करीत आहोत, हे लोकांना दिसावे, म्हणून ते आपली मुखे उदास करतात. मी तुम्हांला खरे सांगतो, त्यांना त्यांचे प्रतिफळ मिळाले आहे. १७ तुम्हीं जेंव्हा उपास करता, तेंव्हा आपल्या डोक्याला तेल लावा.आणि आपले तोंड धुवा. १८ यासाठी की, तुम्हीं उपास करता हे लोकांना दिसू नये, तर तुमच्या गुप्त अब्वाला दिसावे. मग तुमचा गुप्त अब्वा तुम्हांला प्रतिफळ देईल. १९ येथे पृथ्वीवर स्वतःसाठी संपत्ती साठवू नका.

येथे कसर व जंग लागून तिचा नाश होईल. आणि चोर घर फोडून ती चोरून नेतील. २० म्हणून आकाशात आपणासाठी संपत्ती साठवा. २१ जेथे तुमचे धन आहे, तेथे तुमचे मनही लागेल. २२ डोळा शरीराचा दिवा आहे. म्हणून जर तुमचे डोळे चांगले असतील, तर तुमचे सर्व शरीर प्रकाशमय होईल. २३ पण जर तुमचे डोळे वाईट असतील, तर तुमचे सर्व शरीर पापाने अंधकारमय होईल. जर तुंम्हाठायी असणारा अंधकार वास्तविक अंधकार आहे. तर खरोखरचा अंधार किती तरी अंधकारमय असेल. २४ कोणालाही दोन धन्यांची चाकरी एकावेळी करणे शक्य नाही.तो एकाचा तिरस्कार करील, तर दुस-याशी निष्ठा राखील. किंवा तो एका धन्याचे ऐकेल, व दुस-याचे ऐकणार नाही. तसेच तुम्हांला याव्हे एलोहिमची आणि पैशाची (धनाची) सेवा एकाच वेळी करता येणार नाही.

२५ म्हणून मी तुम्हांला सांगतो की, काय खावे आणि काय प्यावे, अशी आपल्या जीवाविषयी किंवा काय पांघरावे, अशी आपल्या शरीराविषयी चिंता करू नका. जीव अन्नापेक्षा अधिक महत्वाचा आहे, आणि शरीर वस्त्रापेक्षा अधिक महत्वाचे आहे. २६ आकासातील पाखरांकडे पाहा, ती पेरीत नाहीत किंवा कापणी करीत नाही. किंवा गोदामात साठवून ठेवीत नाहीत. तरी तुमचा आकाशातील अव्बा त्यांना खावयास देतो. आणि तुम्हीं त्यांच्यापेक्षा अधिक मौल्यवान आहात, हे तुम्हांला माहीत आहे. २७ आणि चिंता करून, आपले आयुष्य थोडे देखील वाढवणे कोणाला शक्य आहे का? २८ आणि तुम्हीं वस्त्राविषयी का काळजी करता? रानातील फुले पाहा, ती कशी वाढतात? ती कष्ट करीत नाहीत, आणि ती कातीतही नाहीत. २९ तरी मी तुम्हांला सांगतो की, शलमोन राजा देखील त्याच्या भर ऐश्वर्याच्या काळात यातील एखाद्या प्रमाणेही सजू शकला नव्हता. ३० तर अहो अल्पविश्वासी लोकांनो, आज आहे तर उद्या भट्टीत पडते, अशा रानफुलांना जर याव्हे एलोहिम असा पोशाख घालतो, तर त्या ही पेक्षा विशेष असा पोशाख तुम्हांला घालणार नाही काय? ३१ चिंता करू नका, आणि असे म्हणू नका की, आम्हीं काय खावे? किंवा आम्हीं काय प्यावे, किंवा आम्हीं काय पांघरावे. ३२ सर्व लोक ज्यांना याव्हे एलोहिम माहीत नाही, ते सुद्धा या गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करतात, काळजी करू नका. कारण तुमच्या आकाशातील अव्बाला तुम्हांला या गोष्टीची गरज आहे, हे माहीत आहे. ३३ तर पहिल्यांदा तुम्हीं याव्हे एलोहिमचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळविण्याचा प्रयत्न करा म्हणजे त्याबरोबर या सर्व गोष्टीही तुम्हांला मिळतील.३४ म्हणून उद्याची चिंता करू नका. कारण प्रत्येक दिवस काही ना काही घेऊनच उगवतो, म्हणून उद्याची चिंता उद्यासाठी दूर ठेवा.

**७**.१ तुमचा न्याय करण्यात येऊ नये म्हणून तुम्हीं इतरांचा न्याय करू नका. २ कारण ज्या न्यायाने तुम्हीं इतरांचा न्याय करता, त्याच न्यायाने तुमचा न्याय केला जाईल. आणि ज्या मापाने तुम्हीं माप घालता त्याच मापाने तुम्हांला परत माप घालतील.३ तू आपल्या डोळयातील मुसळ लक्षात न घेता, आपल्या भावाच्या डोळयातील कुसळ का पाहतोस? ४ किंवा तुझ्या डोळयातील कुसळ मला काढू दे, असे तुझ्या भावाला कसे म्हणू शकतोस? कारण पाहा, तुझ्या डोळयात तर मुसळ आहे.५ अरे ढोंग्या, प्रथम तू आपल्या डोळयातील मुसळ काढ. म्हणजे तुझ्या भावाच्या डोळयातील कुसळ काढावयास तुला स्पष्ट दिसेल.६ जे पवित्र ते कुत्राला टाकू नका, ती उलटून तुम्हांला फाडतील आणि आपले मोती डुकरांपुढे टाकू नका; टाकाल तर ती त्यांना पायाखाली तुडवतील.

७ माग म्हणजे तुम्हांला ते देण्यात येईल, शोधा आणि तुम्हांला सापडेल.ठोका आणि तुमच्यासाठी दार उघडले जाईल.८ कारण प्रत्येकजण जो मागतो त्याला मिळते, जो शोधतो त्याला सापडते, आणि जो ठोकावतो त्याच्यासाठी दार उघडले जाते.९ तुमच्यापैकी असा कोण मनुष्य आहे की, जो आपल्या मुलाने भाकर मागितली, तर त्याला दगड देईल. १० किंवा मासा मागितला, तर त्याला साप देईल ११ वाईट असूनही जर तुम्हांला आपल्या मुलांना चांगल्या गोष्टी देण्याचे कळते, तर तुमच्या आकाशातील अव्बाकडे जे मागतात, त्यांच्या गरजा तो किती चांगल्या प्रकारे भागवील? १२ यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या, असे तुम्हांला वाटते. त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा. कारण तोराह च्या (नियमशास्त्राच्या) व नवीईम च्या (संदेष्टयांच्या) शिकवणीचे सार हेच आहे. १३ अरूंद दरवाजाने आत जा. कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रूंद आहे, व मार्ग पसरट आहे. आणि त्यातून आत जाणारे पुष्कळ आहेत. १४ पण जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरूंद व मार्ग अडचणीचा आहे, आणि फारच थोडक्यांन तो

सापडतो.१५ खोटया नबीईम (संदेष्टया) विषयी सावध असा. ते गरीब मेंढराचे रूप घेऊन तुमच्याकडे येतात. पण प्रत्येक्षात ते क्रूर लांडग्यासारखे आहेत.१६ त्यांच्या करणीवरून तुम्हीं त्यास ओळखाल. ज्या प्रमाणे काटेरी झाडाला द्राक्षे लागत नाहीत, किंवा रिंगणीच्या झाडाला अंजिरे येत नाहीत. त्याच प्रमाणे, वाईटाला चांगले फळ येत नाही. १७ प्रत्येक चांगले झाड चांगली फळे देते, पण वाईट झाड वाईट फळे देते. १८ चांगल्या झाडाला वाईट फळे येणार नाही, आणि वाईट झाडाला चांगली फळे येणार नाहीत. १९ जे झाड चांगले फळ देत नाही ते तोडण्यात येते, व अग्नीत टाकले जाते. २० म्हणून अशा धोकेबाज लोकांना तुम्हीं त्यांच्या फळांवरून ओळखाल. २१ जो कोणी मला वरवर अदोनाई, अदोनाई म्हणतो, तो प्रत्येक जण आकाशाच्या राज्यात जाईलच असे नाही, तर माझ्या आकाशातील अव्बाच्या इच्छेप्रमाणे जो वागेल तोच आकाशाच्या राज्यात जाईल. २२ त्या दिवशी मला अनेक जण म्हणतील, हे अदोनाई आम्हीं तुझ्या नावाने अशुद्ध आत्मे काढली व तुझ्या नावाने पुष्कळ चमत्कार केले.२३ तेंव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, मी तुम्हांला ओळखत नाही. अहो दुराचार करणा-यांनो माझ्यापासून चालते व्हा.

२४ जो कोणी माझ्या सांगण्याप्रमाणे आचरण करतो, तो शहाण्या माणसासारखा आहे. अशा सुज्ञ माणसाने आपले घर खडकावर बांधले.२५ मग जोराचा पाऊस झाला, आणि पूर आला, जोराचा वारा आला.वादळात घर सापडले, पण ते पडले नाही. कारण त्याचा पाया खडकावर बांधला होता.२६ जो कोणी माझे हे शब्द ऐकून त्याप्रमाणे आचरण करीत नाही, तो कोणा एका मूर्ख माणसासारखा आहे. त्याने आपले घर वाळूवर बांधले. २७ मग जोराचा पाऊस आला आणि पूर आला जोराचा वारा सुटला वादळवा-यात ते घर सापडले आणि कोसळून पडले. २८ तेंव्हा ह्या बोधकथा सांगण्याचे येशूवाहने संपविले, तेंव्हा लोकांचा समुदाय त्याच्या शिकवण्याने थक्क झाला.२९ कारण येशूवाह त्यांना त्यांच्या धर्म रव्बूनी (शिक्षकां) प्रमाणे नव्हे, तर अधिकार वाणीने शिकवीत होता.

८.१ येशूवाह डोंगरावरून खाली आला, पुष्कळ लोक त्याच्याप्रमाणे चालत होते. २ तेंव्हा एक कुष्ठरोग झालेला मनुष्य त्याच्याकडे येऊन वाकून त्याच्या पाया पडून म्हणाला, "अदोनाई तुमची इच्छा असेल तर तुम्हीं मला शुद्ध करण्यास समर्थ आहात." ३ मग येशूवाहने आपला हात पुढे करून त्याला स्पर्श केला व म्हंटले, "तू शुद्ध व्हावेस अशी माझी इच्छा आहे." आणि तावडतोब तो कुष्ठरोगी बरा झाला. ४ हे जे घडले ते कुणाला सांगू नकोस, तर जाऊन स्वतःला कोहेन (याजकां) ना दाखव आणि तू कुष्ठरोग मुक्त झालास ह्याचे प्रमाण म्हणून मोशेने ठरवून दिलेले अर्पण वाहून टाक. ह्यामुळे तू शुद्ध झाल्याचे लोकांना कळेल.

५ येशूवाह कफर्णहूम नगरात गेला. जेंव्हा त्याने नगरात प्रवेश केला, तेंव्हा एक सेनाधिकारी त्याच्याकडे आला.६ आणि विनंती करू लागला की, "अदोनाई माझा नोकर पक्षाघाताने खूपच त्रासलेला आहे. व तो माझ्या घरात पडून आहे." ७ येशूवाह त्याला म्हणाला, "मी येऊन त्याला बरे करीन." ८ तेंव्हा सेनाधिकारी म्हणाला, " अदोनाई आपण माझ्या घरी यावे इतकी माझी योग्यता नाही. आपण फक्त शब्द बोला म्हणजे माझा नोकर बरा होईल. ९ कारण मी स्वतः दुस-या अधिका-यांच्या हाताखाली काम करतो आणि माझ्या हाताखाली देखील अनेक शिपाई आहेत. मी एखाद्याला 'जा' म्हणतो आणि तो जातो आणि दुस-याला 'ये' म्हंटल्यावर तो येतो. मी माझ्या नोकराला अमूक कर असे सांगतो आणि तो ते करतो." १० येशूवाहने जेंव्हा हे ऐकले तेंव्हा त्याला नवल वाटले. आणि जे त्याच्यामागून चालत होते त्यांना तो म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो इस्त्राएलात इतका मोठा विश्वास असलेला एकही मनुष्य मला आढळला नाही. ११ मी तुम्हांला सांगतो, पुष्कळ जण पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून येतील आणि अव्राहाम, इसाहक, व याकोव यांच्यासह आकाशाच्या राज्यात मेजासभोवती बसतील.१२ परंतु जे खरे वारस आहेत, ते बाहेरच्या अंधारात टाकले जातील. तेथे रडणे व दात खाणे चालेल."१३ मग येशूवाह सेनाधिका याला म्हणाला, " जा! तू जसा विश्वास धरलास तसे होईल." आणि त्याच क्षणी त्याचा नोकर बरा झाला. १४ मग येशूवाह शिमोन केफाच्या घरी आला. तेथे केफाची सासू तापाने आजारी पडली आहे, असे येशूवाहने पाहिले. १५ त्याने तिच्या हाताला स्पर्श केला, तेंव्हा तिचा ताप निघाला. मग ती उठून त्याची

सेवा करू लागली. १६ त्या संध्याकाळी लोकांनी अशुद्ध आत्म्याची बाधा झालेल्या पुष्कळ लोकांना त्याच्याकडे आणले. येशूवाहने शब्द बोलून ती अशुद्ध आत्मे घालविली व सर्व प्रकारच्या रोग्यांना बरे केले. १७ यशया नबीच्या (संदेष्टयांच्या) व्दारे जे सांगितले होते, ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले. यशयाने असे म्हंटले होते " त्याने आमच्या व्याधी स्वतःवर घेतल्या त्याने आमचे रोग वाहिले."

१८ आपल्या भोवती खूप लोक आहेत हे येशूवाहने पाहिले, तेंव्हा त्याने त्यांना सरोवराच्या पलीकडे जाण्याची आज्ञा केली. १९ मग एक तोराहचे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) त्याच्याकडे आला आणि म्हणाला, " रब्बुनी (गुरूजी) आपण जेथे जाल तेथे मी आपल्या मागे येईन." २० येशूवाह त्याला म्हणाला " कोल्ह्यांना राहायला बिळे आणि आकाशातील पाखरांना घरटी आहेत, परंतु मनुष्याच्या मुलाला डोके सुद्धा टेकावयास जागा नाही." २१ मग येशूवाहच्या थालमीद (शिष्यां) पैकी आणखी एक जण येशूवाहला म्हणाला, " अदोनाई पहिल्यांदा मला जाऊ द्या, व माझ्या वडिलांना पुरून येऊ द्या." २२ पण येशूवाह त्याला म्हणाला, " तू माझ्या मागे ये. जे मेलेले आहेत त्यांना त्यांच्या मेलेल्यांना पुरू दे."

२३ मग येशूवाह नावेत गेल्यावर त्याच्यामागून त्याचे थालमीद (शिष्य) नावेत गेले. २४ अचानक समुद्रात इतके मोठे वादळ आले की, नाव लाटांमध्ये पूर्णपणे गुरफटून गेली. आणि येशूवाह तर नावेत झोपला होता. २५ तेंव्हा थालमीद (शिष्य) त्याच्याकडे गेले आणि त्यांनी त्याला जागे केले व म्हंटले, " अदोनाई आम्हांला वाचवा, आपण बुडत आहोत." २६ येशूवाहने उत्तर दिले, " तुम्हीं विश्वासात किती कमी आहात? तुम्हीं का घाबरता? मग त्याने उठून वारा, व लाटा यांना अधिकारवाणीने शांत होण्यास सांगितले. वारा थांबला, समुद्र अगदी शांत झाला. २७ तेंव्हा लोकांना मोठे नवल वाटले. ते म्हणाले, " हा कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे, वारा व समुद्र देखील त्याचे ऐकतात."

२८ मग येशूवाह समुद्राच्या पलीकडे असलेल्या गदरेकरांच्या देशात आला. तेंव्हा दोन अशुद्ध आत्म्याची बाधा झालेली माणसे कबरस्थानातून येशूवाह कडे आली. ही माणसे कबरस्थानातील थडग्यांमध्ये राहत होती. ती फार विकराळ होती. त्यामुळे कोणीही त्यांच्या वाटेला जात नसे. २९ ती दोघे येशूवाह कडे आली व म्हणाली, "याव्हे एलोहिमच्या बेन (मुला) तुला आमच्याकडून काय पाहिजे? नेमलेल्या वेळेपूर्वीच, तू आम्हांला शिक्षा करायला आलास काय? ३० त्या ठिकाणापासून थोडया अंतरावर डुकरांचा एक कळप चरत होता. ३१ ती अशुद्ध आत्मे त्याला विनंती करून लागली ती म्हणाली, " जर तू आम्हांला ह्यांच्यामधून काढून टाकणार असशील, तर आम्हांला त्या डुकरांच्या कळपात जाऊ दे. ३२ तेंव्हा तो त्यांना म्हणाला, "जा" मग ती त्यांच्यामधून निघून डुकरांमध्ये गेली. तेंव्हा तो संपूर्ण कळप कडयावरून खाली जाऊन समुद्राच्या पाण्यामध्ये बुडाला. ३३ मग त्यांना चारणारे पळाले, व त्यांनी नगरात जाऊन सर्वांना हे वर्तमान, तसेच अशुद्ध आत्मा बाधीत झालेल्यांचे काय झाले, तेही सांगितले. ३४ तेंव्हा सर्व नगर येशूवाहला भेटायला निघाले; आणि जेंव्हा त्यांनी त्याला पाहिले तेंव्हा येशूवाहने त्यांच्या नगरातून निघून जावे अशी विनंती त्यांनी त्याला केली.

९.१ येशूवाह नावेत चढला व परत आपल्या नगरात गेला.२ तेंव्हा काही लोकांनी पक्षघात झालेल्या मनुष्याला येशूवाह कडे आणले. तो मनुष्य बाजेवर पडून होता. येशूवाहने त्यांचा विश्वास पाहून त्या पक्षघाती मनुष्याला म्हंटले, " तरूण मुला, काळजी करू नकोस. तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." ३ तोराहच्या काही रब्बुनी (नियमशास्त्राच्या काही शिक्षकांनी) हे ऐकले आणि ते आपसात म्हणाले, " हा मनुष्य तर याव्हे एलोहिमची निंदा करीत आहे." ४ त्यांचे विचार ओळखून येशूवाह म्हणाला, " तुमच्या अंतःकरणात तुम्हीं वाईट विचार का करता? ५ कारण तुझ्या पापांची क्षमा झाली आहे असे म्हणणे किंवा उठून चालू लाग, असे म्हणणे यातून कोणते सोपे आहे? ६ परंतु तुम्हीं हे समजून घ्यावे की, मनुष्याच्या मुलाला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे." मग येशूवाह त्या पक्षघाती मनुष्याला म्हणाला, "ऊठ! आपली खाट उचल आणि घरी जा." ७ मग तो उठून आपल्या घरी गेला. ८ लोकांनी हे पाहिले व ते थक्क झाले, आणि ज्या याव्हे एलोहिमने मनुष्यास असा अधिकार दिला त्याचे त्यांनी गौरव केले.

९ मग येशूवाह तेथून पुढे निघाला, तेंव्हा त्याने मतिया नावाच्या माणसाला जकातीच्या नाक्यावर बसलेले पाहिले. तेंव्हा येशूवाह त्याला म्हणाला, " माझ्या मागे ये." तेंव्हा तो उठून त्याच्या मागे गेला. १० येशूवाह मतियाच्या घरी जेवत असता पुष्कळ जकातदार व पापी आले, आणि येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) यांच्या बरोबर जेवायला बसले. ११ परूशांनी ते पाहिले, त्यांनी येशूवाहच्या थालमीद स (शिष्यांस) विचारले, " तुमचा रब्बुनी (गुरू) जकातदार व पापी यांच्या बरोबर का जेवतो?" १२ येशूवाहने त्यांना हे बोलताना ऐकले, तो त्यांना म्हणाला, "जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज नाही, तर जे आजारी आहेत त्यांना आहे. १३ मी तुम्हांला सांगतो, जा आणि याचा अर्थ काय ते शिका; 'मला यज्ञपशूंची अर्पणे नकोत, तर दया हवी.' मी नीतिमान लोकांना नव्हे, तर पापी लोकांना बोलावण्यास आलो आहे."

१४ मग योहानानचे थालमीद ( शिष्य) त्याच्याकडे आले, आणि त्यांनी त्याला विचारले, " आम्ही व परूशी पुष्कळ वेळा उपास करतो. पण तुझे शिष्य उपास करीत नाहीत. ते का? " १५ येशूवाहने त्यांना उत्तर दिले, "नवरा मुलगा सोबत असताना, त्याचे व-हाडी दुःखी कसे राहतील? अशी वेळ येईल, जेंव्हा नव-या मुलाला त्यांच्या पासून दूर केले जाईल, तेंव्हा ते उपास करतील. १६ कोणी नव्या कापडाचे ठिगळ, जुन्या कापडाला लावीत नाही. कारण ते ठिगळ त्या कापडापासून निघून जाईल, व छिद्र अधिक मोठे होईल. १७ तसेच नवा द्राक्षारस, जुन्या बुधलीत कोणी घालीत नाहीत. घातला तर बुधलीत फुटतात व त्यांचा नाश होतो. म्हणून लोक नवा द्राक्षारस नव्या बुधलीत घालतात, तेंव्हा दोन्हीही चांगले राहतात.

१८ येशूवाह या दाखल्या सांगत असता, यहूद्यांच्या सभास्थानाचा एक अधिकारी त्याच्याकडे आला, व येशूवाहच्या पाया पडून म्हणाला, " माझी मुलगी आताच मेली आहे. परंतु आपण येऊन आपल्या हाताचा स्पर्श केला, तर ती पुन्हा जिवंत होईल." १९ तेंव्हा येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) त्या सेनाधिका-याबरोबर निघाले. २० वाटेत बारा वर्षापासून रक्तस्त्राव असलेली एक स्त्री मागून येऊन येशूवाहच्या जवळ पोहोंचली, व त्याच्या वस्त्राला शिवली. २१ कारण तिने आपल्या मनात म्हंटले, "मी केवळ त्याच्या वस्त्राला शिवले तरी बरी होईल." २२ तेंव्हा येशूवाह मागे वळून तिला पाहून म्हणाला, "बाई काळजी करू नकोस तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." आणि ती स्त्री त्याच क्षणी बरी झाली. २३ मग येशूवाह त्या यहूदी सभास्थानाच्या अधिका-याच्या घरात आला. तेंव्हा त्याने बासरी वाजविणा-या व गोंधळ करणा-या जमावाला पाहिले. २४ येशूवाह म्हणाला, " जा मुलगी मेलेली नाही, ती झोपेत आहे." तेंव्हा लोक येशूवाहला हसले. २५ मग त्या जमावाला बाहेर पाठविल्यावर, त्याने आत जाऊन तिचा हात आपल्या हातात घेतला, आणि ती मुलगी उठली. २६ आणि ही बातमी त्या प्रांतात पसरली.

२७ तेंव्हा येशूवाह तेथून जात असता दोन आंधळे त्याच्यामागे ओरडत चालले. व म्हणू लागले, "दाविदाच्या मुला आम्हांवर दया करा." २८ येशूवाह आत गेला तेंव्हा ते आंधळेही आत गेले. त्याने त्यांना विचारले, " मी तुम्हांला दृष्टि देऊ शकेन असा तुमचा विश्वास आहे काय?" 'होय अदोनाई, ' त्यांनी उत्तर दिले. २९ मग त्याने त्यांच्या डोळयांना स्पर्श केला, आणि म्हणाला, "तुमच्या विश्वासाप्रमाणे तुम्हांस प्राप्त होवो." ३० आणि त्यांना पुन्हा दृष्टि आली. येशूवाहने त्यांना सक्त ताकीद दिली, "पाहा हे कोणाला कळू देऊ नका." ३१ परंतु ते बाहेर गेले, आणि त्यांनी त्या प्रदेशात सगळीकडे ही बातमी पसरविली. ३२ मग ते दोघे निघून जात असताना, लोकांनी एका अशुद्ध आत्म्याची बाधा झालेल्या माणसाला येशूवाह कडे आणले. ३३ जेंव्हा येशूवाहने त्यामधून अशुद्ध आत्मा काढून टाकले, तेंव्हा पूर्वी मुका असलेला तो मनुष्य बोलू लागला. लोकांना ह्याचे नवल वाटले व ते म्हणाले, "इस्त्राएल मध्ये या आधी असे कधीही झालेले पाहण्यात आले नाही." ३४ परंतु परूशी म्हणाले, "हा अशुद्ध आत्म्याच्या अधिपतीच्या साहाय्याने अशुध्द आत्मे काढतो."

३५ येशूवाह त्यांच्या सभास्थानांमध्ये शिक्षण देत, व राज्याचे शुभवर्तमान गाजवीत, आणि सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारचे आजार बरे करीत, सर्व नगरातून व सर्व गावातून फिरला. ३६ आणि जेंव्हा त्याने त्रासलेल्या असहाय लोकांचे समुदाय पाहिले, तेंव्हा त्याला त्यांचा कळवळा आला. कारण मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे ते कष्टी, व पांगलेले होते. ३७ तो आपल्या थालमीद स (शिष्यांस)

म्हणाला, “पीक खरोखर फार आहे पण कामकरी थोडे आहेत. ३८ म्हणून तुम्हीं पिकाच्या अदोनाईची प्रार्थना करा यासाठी की, त्याने आपल्या पिकाची कापणी करायला कामकरी पाठवावेत.”

**१०.**१ येशूवाहने आपल्या बारा थालमीद (शिष्यां) ना आपल्या जवळ बोलविले, आणि त्याने त्यांना अशुद्ध आत्मे घालविण्याचा
अधिकार दिला. तसेच प्रत्येक आजार व दुःखणी बरे करण्याचा अधिकार दिला. २ बारा थालमीद (प्रेषितां) ची नावे अशी
आहेत. केफा (ज्याला शिमोन म्हणत), आणि त्याचा भाऊ अंद्रिया, जब्दीचा मुलगा याकोब, व त्याचा भाऊ योहानान, ३ फिलीप्प,
व बर्थलमय, थोमा, आणि जकातदार मतिया, अल्फीचा मुलगा याकोब, व तद्दय. ४ शिमोन कनानी, व पुढे ज्याने विश्वासघात
केला तो यहूदा इस्कार्योत. ५ या बारा जणांना पुढील सूचना देऊन पाठविण्यात आले ः “यहूदीतर लोकांमध्ये जाऊ नका, व
शोमरोनी लोकांच्या कोणत्याही नगरात प्रवेश करू नका. ६ तर त्या ऐवजी इस्त्राएलच्या हरवलेल्या मेंढरांकडे जा. ७ तुम्हीं जाल
तेंव्हा हा संदेश जाहीर करा, ‘आकाशाचे राज्य जवळ आले आहे. ८ रोग्यांना बरे करा, मृतांना उठवा, कुष्ठरोग्यांना शुद्ध करा,
अशुद्ध आत्मे काढा, तुम्हांला फुकट मिळाले आहे, म्हणून फुकट द्या. ९ तुमच्या कमरेला सोने, चांदी, किंवा तांबे घेऊ नका. १०
सोबत झोळी घेऊ नका, तुमच्या प्रवासासाठी फक्त तुमचे अंगावरचा झगा असू द्या, व पायातील वहाणा असू द्या. अधिक झगे
किंवा वहाणा घेऊ नका, काठी घेऊ नका. कारण काम करणा-यांच्या गरजा भागणे आवश्यक आहे. ११ ज्या कोणत्याही नगरात,
किंवा गावात तुम्हीं जाल, तेथे कोण योग्य व्यक्ति आहे, याचा शोध करा. आणि तेथून निघे पर्यंत त्या व्यक्तीच्या घरी राहा. १२
त्या घरात प्रवेश करते वेळी, ‘तेथे शालोम (शांती) असो’ असे म्हणा. १३ जर ते घर खरोखर योग्य असेल तर तुमची शांती तेथे
राहील, पण जर ते घर योग्य नसेल, तर तुमची शांती तुमच्याकडे परत येईल. १४ आणि जो कोणी तुम्हांला स्विकारणार नाही,
किंवा तुमचे शब्द ऐकणार नाही, तेंव्हा त्यांच्या घरातून, किंवा नगरातून बाहेर पडताना तुम्हीं आपल्या पायाची धूळ झटकून टाका.
१५ मी तुम्हांला खरे सांगतो, न्यायाच्या दिवशी त्या नगरापेक्षा सदोम व गमोराला अधिक सोपे जाईल.

१६ लांडग्यामध्ये जसे मेंढरांस पाठवावे, तसे मी तुम्हांस पाठवीत आहे. म्हणून तुम्हीं सापांसारखे धूर्त, आणि कबुतरासारखे सरळ
स्वभावी असा. १७ माणसांविषयी सावध असा, कारण ते तुम्हांला न्यायसभेच्या स्वाधीन करतील, आणि त्यांच्या सभास्थानांमध्ये ते
तुम्हांला फटके मारतील. १८ माझ्यामुळे ते तुम्हांला अधिकारी, व राजे यांच्यासमोर आणतील. तुम्हीं त्यांच्यापुढे व यहूदीतर
लोकांसमोर माझ्याविषयी सांगाल. १९ जेंव्हा तुम्हांला अटक करतील, तेंव्हा काय बोलावे किंवा कसे बोलावे, याविषयी काळजी
करू नका. त्यावेळेस तुम्हीं काय बोलायचे ते सांगितले जाईल.२० कारण बोलणारे तुम्हीं नसून, तुमच्या अब्बाचा क्वादोश रूहुव्वा
(पवित्र आत्मा) तुमच्याव्दारे बोलेल. २१ भाऊ आपल्या भावाविरूद्ध व बाप आपल्या मुलाविरूद्ध उठेल, आणि त्याला
विश्वासघाताने मारण्यास सोपवून देईल. मुले आईवडिलांविरूद्ध उठून त्यांना जिवे मारण्यास देतील. २२ माझ्यामुळे सर्व तुमचा व्देष
करतील, पण शेवटपर्यंत जो टिकेल तोच तरेल. २३ एका ठिकाणी जर तुम्हांला त्रास दिला जाईल, तर दुसरीकडे जा. मी तुम्हांला
खरे सांगतो, मनुष्याचा मुलगा येईपर्यंत इस्त्राएलाच्या सर्व गावांमध्ये, तुमचे असे फिरणे संपणार नाही. २४ थालमीद (शिष्य)
आपल्या रब्बुनी (गुरू) पेक्षा वरचढ नाही. किंवा नोकर मालकापेक्षा वरचढ नाही. २५ थालमीद (शिष्य) आपल्या रब्बुनी (गुरू)
सारखा, व नोकर आपल्या मालकासारखा होणे, इतके पुरे. जर घराच्या धन्याला त्यांनी बालजबूल (सैतान) म्हंटले, तर घरातील
इतर माणसांना ते किती वाईट नावे ठेवतील!”

२६ म्हणून त्यांना भिऊ नका. कारण उघडे होणार नाही असे काही झाकलेले नाही, आणि कळणार नाही, असे काही गुप्त नाही.
२७ जे तुम्हांला अंधारात सांगतो, ते तुम्हीं प्रकाशात बोला. आणि कानात सांगितलेले, जे तुम्हीं ऐकता ते तुम्हीं छपरावरून गाजवा.
२८ जे शरीराला वधतात पण आत्म्याचा वध करू शकत नाहीत, त्यांना भिऊ नका. तर त्यापेक्षा आत्म्याला व शरीराला जो मारू
शकतो व अग्नी गंधकाच्या सरोवरात टाकू शकतो त्याला भ्या. २९ दोन चिमण्या, एका पैशाला विकत नाहीत का? तरी ही तुमच्या
अब्बाच्या इच्छेशिवाय, त्यातील एकही जमिनीवर पडणार नाही. ३० आणि तुमच्या डोक्यावरचे केससुद्धा त्याने मोजलेले आहेत. ३१
म्हणून घाबरू नका, पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुम्हीं अधिक मौल्यवान आहात.

३२ जो कोणी मनुष्यांसमोर मला स्विकारील, त्याला मी सुद्धा माझ्या अव्वाच्या समोर स्विकारीन. ३३ पण जो कोणी मनुष्यासमोर मला
नाकारील, त्याला मी सुद्धा माझ्या शाम्माईम (आकाशा) तील अव्बा समोर नाकारीन. ३४ असे समजू नका की, मी पृथ्वीवर शांती
प्रस्थापीत करण्यास आलो आहे. मी शांती स्थापित करायला आलो नाही, तर तलवार चालवायला आलो आहे. ३५ मी फूट
पाडायला आलो आहे. 'म्हणजे मुलाला त्याच्या वडिलांविरूद्ध, आणि मुलीला तिच्या आईविरूद्ध, सुनेला तिच्या सासूविरूद्ध, उभे
करायला आलो आहे. ३६ सारांश मनुष्याच्या घरचेच माणसे, त्याचे शत्रू होतील.' ३७ जो माझ्यापेक्षा स्वतःच्या बापावर किंवा आई
वर अधिक प्रीति करतो, तो मला योग्य नाही.जो माझ्यापेक्षा आपल्या मुलावर व मुलीवर अधिक प्रीति करतो, तो मला योग्य
नाही. ३८ जो आपला वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येण्याचे नाकारतो, तो मला योग्य नाही. ३९ जो आपला जीव मिळवितो, तो
त्याला गमवील. पण जो माझ्याकरिता आपला जीव गमवतो, तो त्याला मिळवील. ४० जी व्यक्ती तुम्हांला स्विकारते, ती व्यक्ती
मला स्विकारते. आणि ज्या अव्वाने मला पाठविले, त्यालाही स्विकारते. ४१ जो कोणी नव्वीईम (संदेष्टयां) चा स्विकार त्याच्या
संदेशाच्या सेवेमुळे करतो, त्याला नव्वीईम (संदेष्टया) चे प्रतिफळ मिळेल. आणि जो धार्मिकाचा स्विकार त्याच्या धार्मिकतेसाठी
करतो, त्याला धार्मिकाचे प्रतिफळ मिळेल. ४२ मी तुम्हांला खरे सांगतो की, जो कोणी थालमीद (शिष्यां) च्या नावाने या लहानातील
एकाला केवळ प्यालाभर थंड पाणी प्यायला देईल, तो आपल्या प्रतिफळाला मुळीच मुकणार नाही."

११.१ येशूवाहने त्याच्या बारा थालमीद (शिष्यां) ना ह्या गोष्टी सांगण्याचे संपविल्यावर तो तेथून निघाला, आणि गालील प्रांतातील
गावांमध्ये फिरून शिकवू आणि उपदेश करू लागला.२ बाप्तिस्मा करणारा योहानान (एलीया नवी) तुरूंगात होता. त्याने मशीहा
करीत असलेल्या गोष्टीविषयी ऐकले. तेंव्हा योहानान ने काही थालमीद (शिष्यां) ना येशूवाह कडे पाठविले. ३ आणि त्याला
विचारले, "जो येणार होता तो तूच आहेस? किंवा आम्हीं दुस-याची वाट पाहावी?" ४ येशूवाहने उत्तर दिले, "जे तुम्हीं ऐकता व
पाहता ते योहानानला जाऊन सांगा. ५ आंधळे पाहू शकतात, पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध केले जातात, बहिरे ऐकताता,
मेलेले उठविले जातात, व गरीबांना सुवार्ता सांगण्यात येते. ६ आशिर्वादीत तो पुरूष जो माझ्यामुळे अडखळत नाही." ७ मग ते
जात असता येशूवाह योहानान विषयी लोकांशी बोलू लागला, " तुम्हीं वैराण प्रदेशात काय पाहायला गेला होता? वा-याने
हलविलेला वोरू काय? ८ तुम्हीं काय पाहायला गेला होता, तलम वस्त्र घातलेल्या माणसाला पाहायला गेला होता काय? तलम वस्त्र
घालणारे राजांच्या राजवाडयात असतात. ९ तर मग तुम्हीं बाहेर कशाला गेला होतात? नवीला (संदेष्टयाला) पाहायला काय?
होय, मी तुम्हांला सांगतो, आणि नव्वीईम (संदेष्टयां) पेक्षा अधिक असा योहानान होता. १० त्याच्याविषयी असे लिहिण्यात आले
आहे. 'पाहा, मी माझ्या दूताला तुझ्यापुढे पाठवितो तो तुझ्यासाठी मार्ग तयार करील.' ११ मी तुम्हांला खरे सांगतो की, स्त्रियांपासून
जन्मलेल्यांमध्ये बाप्तिस्मा करणारा योहानान, याच्या पेक्षा मोठा असा कोणी झाला नाही. तरीही आकाशातील राज्यात जो अगदी
लहान आहे, तो त्याच्यापेक्षा मोठा आहे. १२ बाप्तिस्मा करणा-या योहानानच्या काळापासून, आतापर्यंत लोक आकाशाच्या राज्याचा
स्विकार व प्रसार प्रभावीपणे करीत आहेत. १३ कारण योहानानपर्यंत सर्व नव्वीईम (संदेष्टे) व तोराह (नियमशास्त्र) यांनी संदेश
दिले. १४ आणि जर तुम्हीं ते स्विकारण्यास तयार असाल, तर येणारा एलीया तो हाच आहे. १५ ज्याला ऐकायला कान आहेत,
तो ऐका.

१६ या पिढीला मी कोणती उपमा देऊ? जी मुले बाजारात बसून आपल्या सोबत्यांना हाक मारतात, त्यांच्यासारखी ही पिढी आहे. १७
ती म्हणतात, 'आम्ही तुमच्यासाठी संगीत वाजविले, तरी तुम्हीं नाचला नाहीत. आम्हीं विलाप केला, तरी तुम्हीं ऊर बडवून घेतले
नाही. १८ योहानान काही न खाता व पीता आला, पण ते म्हणतात त्याला अशुद्ध आत्मा लागला आहे.१९ इतरांप्रमाणेच मनुष्याचा
मुलगा खात पीत आला, लोक म्हणतात, 'पाहा हा किती खातो? किती पीतो? जकातदार व पापी लोकांचा मित्र, ' परंतु ज्ञानाची
योग्यता त्याच्याव्दारे घडणा-या योग्य गोष्टींमुळे ठरते."

२० तेंव्हा ज्या नगरांमध्ये त्याने सर्वात जास्त चमत्कार केले होते त्या नगरांतील लोकांनी पश्चात्ताप केला नाही. म्हणून येशूवाहने

त्यांना दोष दिला. २१ " हे खोराजिना, तुझा धिक्कार असो! हे बेथसैदा तुझा धिक्कार असो! कारण तुमच्यामध्ये जी पराक्रमाची कृत्ये करण्यात आली, ती जर सोर व सिदोन यांच्यामध्ये केली असती, तर त्यांनी त्वरेने पूर्वीच गोणपाट नेसून, व अंगाला राख फासून पश्चात्ताप केला असता. २२ पण मी तुम्हांला सांगतो की, न्यायाच्या दिवशी सोर व सिदोन यांना तुमच्यापेक्षा अधिक सोपे जाईल. २३ आणि तू कफर्णहूमा, तू आकाशापर्यंत उंच होशील काय? तू शेओल (मृतलोकां ) पर्यंत खाली जाशील, कारण जे चमत्कार तुझ्यामध्ये करण्यात आले ते जर सदोमात करण्यात आले असते, तर ते नगर आतापर्यंत टिकले असते. २४ पण मी तुम्हांला सांगतो की, न्यायाच्या दिवशी तुमच्यापेक्षा सदोम नगराला सोपे जाईल."

२५ मग येशूवाह म्हणाला, " हे अब्बा आकाशाच्या व पृथ्वीच्या अदोनाई, मी तुझे उपकार मानतो. कारण तू या गोष्टी ज्ञानी, व बुद्धिमान लोकांपासून गुप्त ठेवून, बालकांना प्रकट केल्या. २६ होय अब्बा, तू हे केलेस कारण खरोखर तुला असेच करायचे होते. २७ माझ्या अब्बाने मला सर्व काही दिले आहे. आणि अब्बावाचून कोणी बेन ला (मुलाला) ओळखीत नाही, आणि बेन वाचून (मुलावाचून) व ज्याला प्रगट करायची मुलाची इच्छा आहे, त्याच्या शिवाय कोणीही अब्बाला ओळखीत नाही. २८ जे थकलेले, व ओझ्याने लादलेले असे सर्व तुम्हीं मजकडे या, आणि मी तुम्हांला विश्रांती देईन. २९ माझे जू आपणावर घ्या, माझ्यापासून शिका, म्हणजे तुमच्या आत्म्यास विश्रांती मिळेल. ३० कारण माझे जू सोपे आहे, आणि माझे ओझे हलके आहे."

**१२**.१ त्या दिवशी, म्हणजे शब्बाथ दिवशी येशूवाह शेतातून चालला होता. शेतात पीक तयार होते. येशूवाहच्या थालमीद (शिष्यां) ना भूक लागली होती, म्हणून ते कणसे तोडून खाऊ लागले. २ जेंव्हा परूष्यांनी हे पाहिले, तेंव्हा ते येशूवाहला म्हणाले, " पाहा, तुमचे थालमीद (शिष्य) शब्बाथ दिवशी जे करू नये, ते करीत आहेत." ३ तेंव्हा त्याने त्यांना म्हंटले, "दाविदाला व त्याच्या बरोबरच्या माणसांना भूक लागली, तेंव्हा त्याने काय केले हे तुम्हीं वाचले आहे काय? ४ याव्हे एलोहिमच्या मंदिरात तो गेला, आणि त्याने व त्याच्या बरोबर असलेल्या लोकांनी समर्पित केलेल्या भाकरी खाल्ल्या, असे करणे तोराह च्या (नियमशास्त्राच्या) विरूद्ध होते. फक्त याजकांनाच ती भाकर खाण्याची परवानगी होती. ५ आणि तुम्हीं तोराह (नियमशास्त्र) वाचले आहे की, प्रत्येक शब्बाथाच्या दिवशी मंदिरातील कोहेन (याजक) क्वाादोश (पवित्र) पाळण्याविषयीचा नियम मोडीत असत, परंतु ते तसे करू शकत असत. ६ मी तुम्हांला सांगतो की ,मंदिरापेक्षा महान असा कोणीतरी येथे आहे. ७ शास्त्र लेख म्हणते, "मला यज्ञपशुंची अर्पणे नकोत, तर दया पाहिजे.याचा खरा अर्थ तुम्हांला समजला असता, तर तुम्हीं या निर्दोष लोकांना दोष लावला नसता. ८ कारण मनुष्याचा बेन (मुलगा) शब्बाथाचा अदोनाई आहे."

९ येशूवाहने ते ठिकाण सोडले, व यहूद्यांच्या सभास्थानात तो गेला. १० सभास्थानात हात वाळलेला एक मनुष्य होता. काही यहूद्यांनी येशूवाह वर काही दोषारोप करता यावा या हेतूने त्याला विचारले, " शब्बाथ दिवशी रोग बरे करणे योग्य आहे काय?" ११ येशूवाहने त्यांना उत्तर दिले, " जर तुमच्यापैकी एखाद्याकडे मेंढरू असेल, व शब्बाथ दिवशी ते खडयात पडले, तर तो त्याला वर काढणार नाही काय? १२ तर मग मनुष्य मेंढरापेक्षा कितीतरी अधिक मौल्यवान आहे. म्हणून तोराह (नियमशास्त्र) लोकांना शब्बाथ दिवशी चांगले करण्याची मोकळीक देते." १३ मग येशूवाह त्या वाळलेल्या हाताच्या मनुष्याला म्हणाला, " तुझा हात पुढे सरळ कर." त्या मनुष्याने हात लांब केला, व तो हात बरा झाला. आणि दुस-या हातासारखाच चांगला झाला.१४ नंतर परूश्यांनी बाहेर जाऊन त्याला कसे मारावे याविषयी मसलत केली.१५ परूशी काय करीत आहेत, ते येशूवाहला माहीत होते, म्हणून येशूवाह तेथून गेला. पुष्कळ लोक येशूवाहच्या मागे निघाले, व त्याने जे कोणी रोगी होते, त्या सर्वांना बरे केले.१६ आणि त्याने त्यांना निक्षून सांगितले की, 'तो कोण आहे हे इतरांना सांगू नका. १७ यशया नब्वीच्या (संदेष्टयाच्या) व्दारे जे सांगितले होते, ते पूर्ण होण्यासाठी त्याने असे म्हंटले. १८ हा माझा सेवक याला मी निवडले आहे, मी त्याजवर प्रीति करतो. आणि त्याच्याविषयी मला संतोष वाटतो. मी आपला आत्मा त्याच्यावर ठेवीन, आणि तो यहूदीतरांसाठी योग्य न्यायाची घोषणा करील.१९ तो वाद घालणार नाही, किंवा ओरडणार नाही. रस्त्यावर लोक त्याचा आवाज ऐकणार नाहीत.२० वाकलेला बोरू तो मोडणार नाही, आणि मंदावलेली वात तो

विझविणार नाही. योग्य निर्णयाचा विजय होईपर्यंत, तो असे करील. २१ सर्व लोक त्याच्यावर आशा ठेवतील."

२२ मग काही माणसांनी एकाला येशूवाह कडे आणले, तो मनुष्य आंधळा व मुका होता. व त्याच्यामध्ये अशुद्ध आत्मा होते. येशूवाहने त्या माणसाला बरे केले, व तो बोलू लागला व पाहू लागला. २३ सर्व लोक चकित झाले ते म्हणाले, "हा दाविदाचा बेन (मुलगा) असेल काय?" २४ परूष्यांनी लोकांना हे बोलताना ऐकले. परूशी म्हणाले, "अशुद्ध आत्मा काढण्यासाठी येशूवाह बालजबूल सैतानाच्या सामर्थ्य वापरतो. आणि बालजबूल हा तर अशुद्ध आत्म्यांचा प्रमुख आहे." २५ परूशी कसला विचार करीत आहेत ते येशूवाहला जाणवत होते. म्हणून येशूवाह त्यांना म्हणाला, "आपसात लढणारी राज्ये नाश पावतात, व फूट पडलेले नगर, किंवा घर टिकत नाही. २६ आणि सैतानच सैतानाला काढतो, तर त्यांच्यात मतभेद आहे. त्यांच्यात फूट आहे, मग त्याचे राज्ये कसे टिकेल? २७ आणि मी जर बालजबूलाच्या सहाय्याने अशुद्ध आत्मे काढतो, तर तुमची मुले कोणाच्या सामर्थ्याने अशुद्ध आत्मे काढतात. म्हणून तुमचे स्वतःचे लोक तुम्हांला चूक ठरवितील. २८ परंतु मी जर याव्हे एलोहिमच्या साहाय्याने अशुद्ध आत्मे काढतो, तर याव्हे एलोहिमचे राज्य तुमच्यापर्यंत आले आहे, हे निश्चित समजा. २९ किंवा एखाद्या बलवान मनुष्याच्या घरात शिरून त्याच्या घरातील सर्व वस्तुंची चोरी जर कोणाला करायची असेल, तर प्रथम त्या बलवान मनुष्याला तो बांधून टाकील, व मग तो चोरी करील. ३० एखादा मनुष्य जर माझे समर्थन करीत नसेल, तर तो माझ्या विरूद्ध आहे. जो मनुष्य माझ्याबरोबर काम करीत नाही, तो माझ्या विरूद्ध काम करीत आहे. ३१ म्हणून मी तुम्हांला सांगतो, मनुष्यांना ते करीत असलेल्या सर्व पापांची क्षमा करण्यात येईल. ते जे काही वाईट बोलतील त्यावद्दलही क्षमा करण्यात येईल, पण जर कोणी पवित्र आत्म्या विरूद्ध बोलेल, तर त्याला क्षमा कराण्यात येणार नाही. ३२ एखादा मनुष्य जर मनुष्याच्या मुला विरूद्ध काही बोलेल, तर त्याला क्षमा करण्यात येईल. पण जो पवित्र आत्म्या विरूद्ध बोलेल, त्याला क्षमा होणार नाही. त्याला या काळातही क्षमा होणार नाही, व भविष्यातही होणार नाही.

३३ जर तुम्हांला चांगले फळ हवे असेल, तर झाड चांगले करा. जर तुम्हीं झाड चांगले करणार नाही, तर फळही चांगले येणार नाही. कारण झाड त्याच्या फळावरून ओळखले जाते. ३४ अहो सापाच्या पिल्लांनो, तुम्हीं वाईट असता तुम्हांला चांगल्या गोष्टी कशा बोलता येतील? जे अंतःकरणात (आत्म्यात) आहे तेच तोंडावाटे बाहेर पडते. ३५ चांगला मनुष्य आपल्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो. आणि वाईट माणूस आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टी काढतो. ३६ आणखी मी तुम्हांस सांगतो की, जो प्रत्येक व्यर्थ शब्द लोक बोलतील त्याचा हिशेब ते न्यायाच्या दिवशी देतील. ३७ कारण तू आपल्या बोलण्यावरून न्यायी ठरशील, आणि आपल्या बोलण्या वरूनच दोषी ठरशील."

३८ काही तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) , व परूशी यांच्यापैकी काही जणांनी येशूवाहला म्हंटले, " रब्बुनी (गुरूजी) तुमच्या हातून एखादे चिन्ह पहावे, अशी आमची इच्छा आहे." ३९ येशूवाहने उत्तर दिले, " जे लोक याव्हे एलोहिमशी प्रामाणिक नाहीत पापी आहोत, असे लोक पुराव्यासाठी चमत्कार पाहू इच्छितात. पण योना नब्वी (संदेष्टया) शिवाय दुसरे चिन्ह तुम्हांला मिळणार नाही. ४० कारण योना जसा तीन दिवस व तीन रात्री माशाच्या पोटात राहीला. ४१ जेंव्हा तुमच्या पिढीचा न्याय होईल, तेंव्हा निनवेचे लोक उभे राहतील. तुमच्या विरूद्ध साक्ष देतील, आणि तुम्हांला दोषी देतील. कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला. आणि आता तर तुमच्या मध्ये योनापेक्षा महान असा कोणी एक येथे आहे. ४२ न्यायाच्या दिवशी दक्षिणेची राणी (शबाची राणी) या पिढी बरोबर उभी राहून, हिला दोषी ठरवील. कारण शलमोनचे ज्ञान ऐकायला ती पृथ्वीच्या शेवटच्या सीमेपासून आली. आणि शलमोनापेक्षा महान असा कोणी येथे आहे!

४३ जेंव्हा अशुद्ध आत्मा माणसाला सोडून बाहेर निघून जातो, तेंव्हा तो पाणी नसलेल्या ठिकाणाहून विसावा शोधीत फिरतो, पण तो त्याला मिळत नाही. ४४ तेंव्हा तो म्हणाला, "जेथून मी आलो त्या माझ्या घरात मी परत जाईन. आणि जेंव्हा तो परत येतो, तेंव्हा ते घर रिकामे असलेले तसेच स्वच्छ व नीटनेटके असे त्याला दिसते. ४५ नंतर तो जाऊन आपल्या पेक्षा असे दुसरे सात आणखी आत्मे आपल्या बरोबर घेतो, व ते आत शिरून त्याला झपटतात, व त्याच्यात राहतात. मग त्या माणसाची शेवटची स्थिती, पहिल्या

पेक्षा वाईट होते. तसेच आजच्या ह्या पापी पिढीचे होईल."

४६ तो लोकांशी बोलत असता, त्याची आई व त्याचे भाऊ त्याच्याशी बोलण्यासाठी, बाहेर वाट पाहत उभे होते.४७ तेंव्हा कोणी तरी त्याला म्हणाले, " तुमची आई व भाऊ बाहेर उभे आहेत. ते तुमच्याशी बोलण्याची वाट पाहत आहेत." ४८ त्याच्याशी बोलणा-याला त्याने उत्तर दिले, "कोण माझी आई? कोण माझा भाऊ? ४९ मग तो आपल्या थालमीद (शिष्या) कडे हात करून म्हणाला, "पाहा हे माझे आई, व माझे भाऊ आहेत.५० कारण माझ्या आकाशातील अव्बाच्या इच्छेनुसार जे वागतात, तेच माझे भाऊ, वहीण, आणि आई आहेत."

**१३**.१ त्याच दिवशी येशूवाह घराबाहेर पडून सरोवराच्या काठी जाऊन बसला. २ पुष्कळ लोक त्याच्या भोवती जमले म्हणून येशूवाह नावेत जाऊन बसला, व सर्व लोकसमुदाय किना-यावर उभा राहिला. ३ तेंव्हा त्याने त्यांना गोष्टीरूपाने बोध केला. तो म्हणाला, " एक शेतकरी बी पेरायला निघाला. ४ तो पेरीत असता, काही बी रस्त्यावर पडले. पक्षी आले, व त्यांनी ते खाऊन टाकले. ५ काही बी खडकाळ जमिनीवर पडले तेथे पुरेशी माती नव्हती. तेथे बी फार झपाटयाने वाढले. पण जमीन खोलवर नव्हती, ६ म्हणून जेंव्हा सूर्य उगवला तेंव्हा वाळून गेले, कारण खोलवर मुळे नव्हती. ७ काही बी काटेरी झूडपात पडले, काटेरी झुडूप वाढले, आणि त्याने रोपाची वाढ खूंटविली. ८ काही बी चांगल्या जमिनीत पडले, ते रोप वाढले व त्याला धान्य आले.आणि कोठे शंभरपट, कोठे साठपट, कोठे तीसपट, असे त्याने पीक दिले.९ ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको."

१० मग थालमीद (शिष्य) त्याच्याजवळ आले आणि त्यांनी विचारले, " तुम्हीं त्यांना गोष्टीरूपाने बोध का करता." ११ तेंव्हा त्याने उत्तर दिले, "आकाशाच्या राज्याची रहस्ये तुम्हीं समजू शकता, पण त्यांना ते समजणार नाही. १२ कारण ज्या कोणाजवळ आहे त्याला दिले जाईल, व ते त्याला पुष्कळ होईल. परंतु ज्या कोणाकडे नाही, त्याच्या जवळ जे असेल, ते देखील त्याकडून काढून घेतले जाईल. १३ म्हणून मी त्यांना गोष्टीरूपाने बोध करतो, कारण ते पाहत असताना ही त्यांना दिसत नाही. आणि ऐकत असतांनाही, त्यांना समजत नाही. १४ तेंव्हा हे लोक दाखवून देत आहेत की, त्यांच्यासंबंधी यशयाने पूर्वी जे लिहून ठेवले, ते खरे आहे. ते असे ः "तुम्हीं लक्ष द्याल ऐकाल पण तुम्हांला समजणार नाही. तुम्हीं पाहाल आणि निरीक्षण कराल, पण तुम्हांला काहीच दिसणार नाही. १५ कारण या लोकांचे आत्मे कठीण झाले आहे.त्यांना कान आहेत, पण ऐकू येत नाही. त्यांनी आपले डोळे मिटले आहेत. यासाठी की, या लोकांनी आपल्या डोळयांनी पाहू नये. आपल्या कानांनी ऐकू नये, आपल्या आत्म्याने समजू नये, व मागे फिरू नये, आणि मी त्यांना बरे करू नये."

१६ पण तुमचे डोळे आशिर्वादीत आहेत, कारण ते पाहतात. तुमचे कान आशिर्वादीत आहेत, कारण ते ऐकतात. १७ मी तुम्हांला खरे सांगतो, तुम्हीं ज्या गोष्टी पाहत आहा, त्या पहाण्यासाठी अनेक नव्वीईम (संदेष्टे) , व नीतिमान लोक आतुरतेने वाट पाहत होते.तरी त्यांना पाहता आल्या नाहीत. आणि तुम्हीं ज्या गोष्टी ऐकत आहात, त्या ऐकण्याची त्यांची खूप इच्छा होती, तरी त्यांनी त्या ऐकल्या नाहीत.

१८ पेरणा-याच्या बोधकथेचा अर्थ काय हे समजून घ्या. १९ कोणी राज्याची गोष्ट ऐकतो, पण ती त्याला समजत नाही. तेंव्हा तो दुष्ट सैतान येतो, व त्याच्या आत्म्यात पेरलेले ते घेतो. वाटेवर पेरलेले तो हाच आहे.२० खडकाळ जागेवर पेरलेला तो असा आहे की, तो वचन ऐकतो व लगेच आनंदाने स्विकारतो.२१ तरी त्याच्यामध्ये मूळ नसल्याने तो थोडा काळच टिकतो, आणि वचनामुळे संकट आले, किंवा कोणी छळ केला, व त्रास झाला, म्हणजे तो लगेच अडखळतो. २२ आणि काटेरी झाडांमध्ये पेरलेला असा आहे की, तो वचन ऐकतो पण जगिक गोष्टीविषयीचा ओढा, संपतीचा मोह, ही वचनाला वाढू देत नाहीत, आणि तो निष्फळ होतो. २३ चांगल्या जमिनीवर पेरलेला असा आहे की, तो वचन ऐकतो ते समजतो, व तो निश्चितपणे पीक देतो. कोणी शंभरपट, कोणी साठपट, कोणी तीसपट, असे पीक देतो.

२४ नंतर येशूवाहने त्यांना दुसरी बोधकथा सांगितली. तो म्हणाला, " आकाशाचे राज्य हे एखाद्या मनुष्याने आपल्या शेतात चांगले बी पेरण्यासारखे आहे. २५ पण लोक झोपेत असता, त्या मनुष्याचा शत्रू आला, व गव्हामध्ये निदण पेरून गेला. २६ पण जेंव्हा रोपे वाढली, व दाणे आले, तेंव्हा निदणही दिसू लागले. २७ मग त्या माणसाचे नोकर त्याच्याकडे आले व म्हणाले, "मालक आपण आपल्या शेतात चांगले बी पेरले ना? मग त्यात निदण कोठून आले?" २८ तो त्यांना म्हणाला, 'कोणीतरी शत्रूने हे केले आहे.' त्याच्या नोकरांनी विचारले, 'आम्हीं जाऊन ते उपटून टाकावे अशी आपली इच्छा आहे काय?' २९ पण तो मनुष्य म्हणाला, 'नको, तुम्हीं निदण जमा करीत असताना त्याच्या बरोबर कदाचित गहूही उपटाल. ३० कापणी पर्यंत दोन्ही बरोबर वाढू द्या. मग कापणीच्या वेळेस मी कापणा-यास सांगेन की, पहिल्याने निदण जमा करा, व जाळण्यासाठी त्याच्या पेंढया बांधा. पण गहू माझ्या गोदामात साठवा."

३१ मग येशूवाहने त्यांना आणखी एक बोधकथा सांगितली. तो म्हणाला, " आकाशाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे. तो एका माणसाने घेऊन आपल्या शेतात पेरला.३२ मोहरीचा दाणा सर्व दाण्यांहून लहान आहे. पण तो त्याचे झाड मात्र खूप मोठे येते. इतके की, आकाशातील पाखरे येऊन त्याच्या फांद्यांवर राहतात." ३३ मग येशूवाहने लोकांना आणखी एक दाखला सांगितला. " आकाशाचे राज्य खमिरासारखे आहे. ते एका स्त्रीने घेतले व तीन मापे पिठामध्ये ठेवले तेंव्हा ते सर्व पीठ फुगले." ३४ लोकांना बोध करण्यासाठी येशूवाहने नेहमीच गोष्टींचा उपयोग केला. ३५ ते यासाठी की, नव्वीईम (संदेष्टयां) नी जे सांगितले होते, ते पूर्ण व्हावे.ते असे की : " गोष्टी सांगायला मी आपले तोंड उघडीन, जगाच्या स्थापनेपासून गुप्त राहिलेल्या गोष्टी मी बोलेन."

३६ मग येशूवाह लोकांना सोडून घरात गेला. त्याच्याकडे त्याचे थालमीद (शिष्य) आले आणि म्हणाला, " शेतातील निदणाची बोधकथा आम्हांला नीट समजावून सांगा." ३७ येशूवाहने उत्तर दिले, " शेतामध्ये चांगले बी पेरणारा हा मनुष्याचा मुलगा आहे. ३८ आणि शेत हे जग आहे. चांगले बी हे याव्हे एलोहिमच्या राज्यातील मुले आहेत, आणि निदण हे दुष्टाचे (सैतानाचे) मुले आहेत. ३९ हे निदण पेरणारा शत्रू हा सैतान आहे. आणि कापणी या काळाची समाप्ती आहे, व कापणी करणारे याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) आहेत. ४० म्हणून जसे निदण गोळा करून अग्नीत टाकतात, त्याप्रमाणे या काळाच्या शेवटी होईल. ४१ मनुष्याचा मुलगा आपल्या मालाक ना (दूतांना) पाठवील, आणि ते त्याच्या राज्यातून अडखळण करणा-या सर्व गोष्टी, आणि अन्याय करणारे यांना बाजूला काढतील. ४२ आणि त्यांना अग्नीच्या भट्टीत टाकतील, तेथे रडणे व दात खाणे चालेल. ४३ तेंव्हा नीतिमान लोक आपल्या अव्वाच्या राज्यात सूर्यासारखे प्रकाशतील. ज्याला ऐकायला कान आहे तो ऐको

४४ आकाशाचे राज्य हे जणू काय शेतामध्ये लपवून ठेवलेल्या ठेवीसारखे आहे. एके दिवशी एका मनुष्याला ती ठेव सापडली, त्यामुळे मनुष्याला खूप आनंद झाला. तो ती गुप्त ठेव पुन्हा त्याच शेतात लपवून ठेवतो, व आपले सर्व काही विकून ते शेत विकत घेतो. ४५ आणखी आकाशाचे राज्य चांगल्या मोत्याचा शोध घेणा-या व्यापा-यासारखे आहे. ४६ एक दिवस त्याला एक अत्यंत सुंदर मोती सापडतो. तेंव्हा तो जाऊन आपले सर्व काही विकतो, आणि तो मोती विकत घेतो.४७ तसेच आकाशाचे राज्य पाण्यात टाकलेल्या जाळयासारखे आहे.जाळयात सर्व प्रकारचे मासे सापडतात. ४८ ते भरल्यावर माणसांनी ते ओढून किना-यावर आणले, व बसून जे चांगले ते भांडयात व जे वाईट ते फेकून दिले.४९ या काळाच्या शेवटी असेच होईल. याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) येतील, आणि वाईटांना नीतिमान लोकांतून वेगळे करतील. ५० वाईट लोकांना अग्नीत फेकून देण्यात येईल, तेथे रडणे व दात खाणे चालेल. ५१ येशूवाहने थालमीद ना (शिष्यांना) विचारले, " तुम्हांला या सर्व गोष्टी समजल्या काय?" तेंव्हा ते म्हणाले "होय." ५२ तेंव्हा त्याने त्यांना म्हंटले, " प्रत्येक ताराहचे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) ज्याला आकाशाच्या राज्याविषयी शिकविण्यात आले आहे, तो घरमालकासारखा आहे. त्याच्याकडे अनेक जुन्या व नवीन गोष्टी घरातील तिजोरीत ठेवलेल्या आहेत."

५३ येशूवाहने लोकांना बोध करण्याचे, व गोष्टी सांगून शिकविण्याचे संपल्यानंतर, तो निघून गेला. ५४ त्याने आपल्या गावी येऊन त्यांच्या सभास्थानामध्ये असे शिकविले की, ते चकित होऊन म्हणाले, "हे ज्ञान, व ही सामर्थ्याची कृत्ये याला कशी आली? ५५ हा त्या सुताराचा मुलगा ना? याच्या आईला मरीया म्हणतात ना? आणि याकोब, व योसेफ, आणि शिमोन, व यहूदा याचे भाऊ आहेत ना? ५६ याच्या सर्व बहिणी आपल्यात आहेत ना? मग याला या सर्व गोष्टी कशा आल्या असे ते त्याच्याविषयी गोंधळात पडले." ५७ त्यांनी त्याला मानण्याचे नाकारले, पण येशूवाह त्यांना म्हणाला, " इतर लोक नव्वीईमचा (संदेष्टयाचा) सन्मान करतात. पण त्याच्या स्वतःच्या गावात, किंवा घरात त्याचा सन्मान होत नाही." ५८ तेथील लोकांच्या अविश्वासामुळे, त्याने तेथे जास्त चमत्कार केले नाहीत.

**१४** .१ त्या वेळी हेरोदाने येशूवाह विषयी बातमी ऐकली. २ तेंव्हा त्याने आपल्या सेवकांना म्हंटले, "येशूवाह हा बाप्तिस्मा करणारा योहानान आहे, तो मेलेल्यातून उठला आहे. त्यामुळेच तो हे चमत्कार करीत आहे." ३ हेरोदाने आपला भाऊ फिलिप्प याची पत्नी हेरोदिया हिच्यामुळे, योहानानला अटक करून तुरूंगात टाकले होते. ४ कारण योहानान त्याला सांगत होता, " तू हेरोदिला ठेवणे योग्य नाही." ५ हेरोद त्याला मारावयास पाहत होता, पण त्याला लोकांच्या भीत होती. कारण लोकांना असा विश्वास होता की, योहानान नबी (संदेष्टा) आहे.६ हेरोदाला वाढदिवशी हेरोदियाच्या मुलीने दरबारात नाच करून हेरोदाला संतुष्ट केले. ७ त्यामुळे त्याने शपथ वाहून ती जे काही मागील, ते देण्याचे अभिवचन तिला दिले. ८ तिच्या आईच्या सांगण्यावरून ती म्हणाली, " मला येथे तवकात बाप्तिस्मा करणारा योहानान याचे शीर द्या." ९ हेरोद राजाला फार वाईट वाटले, तरी त्याने आपल्या शपथपूर्वक दिलेल्या वचनामुळे व आमंत्रित लोकांमुळे ते द्यावे अशी आज्ञा केली.१० आणि त्याने तुरूंगत माणसे पाठवून, योहानानचे शीर तोडले. ११ मग त्यांनी त्याचे शीर तबकात घालून त्या मुलीला आणून दिले. तिने ते आपल्या आईकडे आणले. १२ मग त्याच्या थालमीद नी (शिष्यांनी) येऊन त्याचे प्रेत उचलून नेले, व त्याला पुरले.आणि त्यांनी जाऊन जे घडले ते येशूवाहला सांगितले.

१३ मग ते ऐकून येशूवाह तेथून नावेत बसून निघून गेला, व नंतर नावेतून उतरून माळरानावर एका निवांत व एकाकी जागी गेला. लोकांनी हे ऐकले, तेंव्हा ते पायी त्याच्याकडे गेले. १४ मग तो किना-यावर आला, जेंव्हा त्याने मोठा लोकसमुदाय पाहिला. तेंव्हा त्याला त्यांच्याबद्दल कळवळा वाटला. म्हणून जे आजारी होते, त्यांना त्याने बरे केले. १५ मग संध्याकाळ झाल्यावर त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्याकडे आले आणि म्हणाले, " ही माळरानावरची उजाड जागा आहे, आणि भोजन वेळ होऊन गेली आहे.लोकांनी गावामध्ये जाऊन स्वतःकरिता अन्न विकत घ्यावे म्हणून त्यांना पाठवून द्या." १६ परंतु येशूवाह त्यांना म्हणाला, "त्यांना जाण्याची गरज नाही. तुम्हीच त्यांना खायला द्या." १७ तेंव्हा ते त्याला म्हणाले, "पाच भाकरी व दोन मासे याशिवाय येथे आमच्या जवळ काहीच नाही." १८ तो म्हणाला, " त्या इकडे आणा." १९ मग लोकांना गवतावर बसण्याची आज्ञा केल्यावर, त्याने त्या पाच भाकरी व दोन मासे घेऊन वर आकाशाकडे पाहून, त्यावर आशिर्वाद मागितला. नंतर त्याने भाकरी मोडून थालमीद (शिष्यां) ना दिल्या, व थालमीद नी (शिष्यांनी) लोकास दिल्या. २० ते सर्व जेवून तृप्त झाले. मग त्या उरलेल्या तुकडयांच्या त्यांनी बारा टोपल्या भरून घेतल्या. २१ जेवणा-यांमध्ये स्त्रिया, व मुले मोजली नाहीत, पुरूष मात्र पाच हजार होते.

२२ मग तो स्वतः लोकसमुदयास निरोप देईपर्यंत, त्याने थालमीद (शिष्यां) ना नावेत बसून लगेच, आपल्यापुढे पलीकडे जाण्यास सामगितले.२३ लोकांना पाठवून दिल्यावर तो प्रार्थना करण्यास एकांत ठिकाणी डोंगरावर गेला. रात्र झाली तेंव्हा तो तेथे एकटाच होता. २४ पण त्यावेळी नाव किना-यापासून ब-याच अंतरावर होती, व ती लाटांनी हेलकावत होती. कारण वारा समोरून वाहत होता. २५ मग पहाटेच्या वेळी तो पाण्यावरून चालत थालमीद (शिष्यां) कडे आला. २६ थालमीद त्याला पाण्यावरून चालताना पाहून घाबरून गेले.त्यांना वाटले अशुद्ध आत्मा आहे की काय? म्हणून ते "अशुद्ध आत्मा अशद्ध आत्मा"" असे ओरडू लागले. २७ पण येशूवाह लगेच त्यांना म्हणाला, "काळजी करू नका! मी आहे! भिऊ नका." २८ शिमोन केफा म्हणाला, " अदोनाई जर तो तूच आहेस, तर मला पाण्यावरून तुझ्याकडे यायला सांग." २९ येशूवाह म्हणाला, 'ये' मग केफा नावेतून पाण्यात उतरला व पाण्यावरून चालत येशूवाह कडे जाऊ लागला. ३० पण तो पाण्यावरून चालत असताना, वारा व लाटा पाहून तो भ्याला, आणि

बुडू लागला. बुडताना ओरडला, "अदोनाई मला वाचवा." ३१ आणि लगेच येशूवाहने आपला हात पुढे करून त्याला धरले व
म्हंटले, " अरे अल्पविश्वासू माणसा, तू संशय का धरलास." ३२ मग ते नावेत बसल्यावर वारा थांबला. ३३ तेंव्हा जे नावेत होते, ते
त्याला नमन करून म्हणाले, "तुम्हीं खरोखर याव्हे एलोहिमचे बेन (मुलगा) आहात." ३४ नंतर ते पलीकडे गनेसरेत येथे पोहोचले.
३५ तेथील लोकांनी येशूवाहला पाहिले, व सभोवतालच्या सर्व प्रदेशात निरोप पाठविला, व त्यांनी सर्व प्रकारच्या आजा-यांस
त्याच्याकडे आणले. ३६ आणि आम्हांला आपल्या वस्त्राच्या काठाला स्पर्श करू द्यावा, अशी विनंती केली. तेंव्हा जितक्यांनी स्पर्श
केला, तितके बरे झाले.

**१५**.१ तेंव्हा यरूशलेमाहून काही परूशी व तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) येशूवाह कडे आले. व म्हणाले, २ तुमचे
थालमीद (शिष्य) पूर्वजांनी घालून दिलेले नियम का पाळत नाहीत? कारण तुमचे थालमीद (शिष्य) जेवण्यापूर्वी हात धूत नाहीत."
३ येशूवाहने उत्तर दिले, " आणि तुम्हीं तुमच्या परंपरा चालविण्यासाठी याव्हे एलोहिमची आज्ञा का मोडता? ४ कारण याव्हे
एलोहिमने सांगितले आहे की, "तुझ्या आईवडिलांचा मान राख. आणि जो कोणी आपल्या आईवडिलांबद्दल वाईट बोलतो, त्याला
जिवे मारावे." ५ पण तुम्हीं म्हणता, जो कोणी बापाला किंवा आईला म्हणेल की, 'तुला जे काही दिल्याने तुझा जो फायदा झाला
असता, ते मी याव्हे एलोहिमला अर्पण केले आहे. ६ ते याव्हे एलोहिमचे नियम मोडीत आहेत.' आपल्या वडिलांचा व आईचा
सन्मान करू नये, याप्रकारे तुम्हीं आपल्या अशा परंपरेचे, याव्हे एलोहिमचे वचन रद्द केले आहे.७ अहो ढोंग्यांनो, तुम्हांविषयी
यशया नवीने (संदेष्टयांने) योग्य सांगितले आहे. तो म्हणतो, ८ हे लोक ओठांनी माझा सन्मान करतात, पण त्यांचे हृदय (आत्मे)
माझ्यापासून दूर आहे.९ आणि ते माणसांचे नियम आपली धर्मतत्वे म्हणून शिकवितात, आणि व्यर्थच माझी उपासना करतात.१०
तेंव्हा लोकांना जवळ बोलावून त्याने म्हंटले, "ऐका व समजून घ्या. ११ जे तोंडाव्दारे आत जाते, ते माणसाला अशुद्ध करीत नाही,
पण जे तोंडातून बाहेर निघते तेच माणसाला अशुद्ध करते." १२ नंतर थालमीद (शिष्य) जवळ येऊन त्याला म्हणाले, "परूश्यांनी
जेंव्हा हे ऐकले. तेंव्हा ते रागावले हे आपणांला कळले काय?" १३ पण त्याने उत्तर देऊन म्हंटले, " प्रत्येक रोपटे जे माझ्या
आकाशातील अब्बाने लावले नाही, ते उपटले जाईल.१४ त्यांना जाऊ द्या, ते आंधळे वाटडे आहेत. जर एका आंधळयाला वाट
दाखवण्याचा प्रयत्न केला, तर दोघेही खडयात पडतील." १५ शिमोन केफा म्हणाला, " आमच्या साठी या बोधकथेचा स्पष्टीकरण
करा." १६ "तुम्हीं अजूनही बुद्धिमंदच आहात काय?" येशूवाहने त्यांना विचारले. १७ जे काही तोंडात जाते ते सर्व पोटात जाते, व
मग बाहेर टाकले जाते. हे तुम्हांला अजून समजत नाही काय? १८ परंतु ज्या गोष्टी तोंडातून बाहेर निघतात, त्या आत्म्यातून येतात,
व त्याच माणसाला अशुद्ध करतात. १९ कारण वाईट विचार, खुन, व्यभिचार, जारकर्मे, खोटया साक्षी, निंदा, ही आत्म्यातून बाहेर
निघतात. २० माणसाला अशुद्ध करणा-या याच गोष्टी आहेत, न धुतलेल्या हाताने खाण्याने माणसाला अशुद्ध होत नाही."

२१ नंतर येशूवाह तेथून निघून सोर व सिदोन या भागात गेला. २२ तेंव्हा एक कनानी स्त्री त्या भागातून येशूवाह कडे आली. ती
स्त्री ओरडून म्हणाली, "अदोनाई, दाविदाच्या मुला, माझ्यावर दया करा.माझी मुलगी अशुद्ध आत्म्याने पछाडली आहे." २३ पण
येशूवाहने तिला एका शब्दानेही उत्तर दिले नाही. तेंव्हा त्याच्या थालमीद नी (शिष्यांनी) येऊन त्याला विनंती केली, 'तिला पाठवून
द्या, कारण ती आमच्या मागे ओरडत येत आहे.' २४ पण येशूवाहने उत्तर दिले " मला याव्हे एलोहिमने फक्त इस्त्राएलाच्या
हरवलेल्या मेंढरांकडे पाठविले आहे." २५ मग ती स्त्री पुन्हा येशूवाह कडे आली, ती येशूवाहच्या पाया पडली व म्हणाली,
"अदोनाई, माझे साहाय्य करा." २६ परंतु त्याने म्हंटले, "मुलाची भाकर घेऊन कुत्राला टाकणे बरे नाही." २७ ती स्त्री म्हणाली,
"होय अदोनाई, परंतु कुत्रीही आपल्या धन्याच्या मेजावरून पडलेले उष्टे चूर खातात. २८ तेंव्हा येशूवाहने तिला म्हंटले, "बाई,
तुझ्या विश्वास मोठा आहे! तुझ्या इच्छेप्रमाणे तुला होवो." आणि तिची मुलगी बरी झाली.

२९ नंतर येशूवाह तेथून निघून, गालील सरोवराकडे गेला. येशूवाह डोंगरावर गेला, आणि तेथे बसला. ३० मग पुष्कळ लोक
त्याच्याकडे आले, त्यांनी आपल्याबरोबर लुळे, पांगळे, आंधळे, बहिरे, व इतर अनेक लोकांना आणले होते.आणि त्यांनी त्या

आजा-यांना येशूवाहच्या पायावर ठेवले, तेंव्हा त्यांने त्यांना बरे केले. ३१ मुके बोलू लागले, लुळे सशक्त झाले, व्यंग असलेले चांगले झाले, लंगडे चालू लागले, आंधळे पाहू लागले हे पाहून लोक थक्क झाले. आणि त्यांनी इस्त्राएलाच्या याव्हे एलोहिमचे गौरव केले.

३२ मग येशूवाहने आपल्या थालमीद (शिष्यां) स आपल्याजवळ बोलवून म्हंटले, "मला लोकांचा कळवळा येतो, कारण ते आज तीन दिवस झाले माझ्याजवळ राहिले आहेत. आणि त्यांच्याकडे खायला काही नाही, आणि त्यांना उपाशी पाठवावे अशी माझी इच्छा नाही. कारण ते वाटेत कदाचित मूर्च्छित होतील." ३३ थालमिद (शिष्य) त्याला म्हणाले, "एवढया मोठया लोकसमुदायाला तृप्त करावे, इतक्या भाकरी ह्या दूर रानात आमच्याजवळ कोठून असणार?" ३४ तेंव्हा येशूवाह म्हणाला, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?" ते म्हणाले, "आमच्याजवळ सात भाकरी आहेत, व काही मासे आहेत." ३५ मग त्याने लोकांना जमिनीवर बसविण्याची आज्ञा केली. ३६ मग त्या सात भाकरी व मासे घेऊन त्याने याव्हे एलोहिमचे उपकार मानले, व त्या भाकरी मोडल्या व थालमीद दिल्या, व थालमीदांनी लोकांना दिल्या. ३७ तेंव्हा ते सर्व जेवून तृप्त झाले, आणि त्यांनी उरलेल्या तुकडयांनी भरलेल्या सात पाटया गोळा केल्या. ३८ आणि जेवणारे स्त्रिया, व लेकरे सोडून चार हजार पुरूष होते. ३९ मग समुदायास निरोप दिल्यावर, तो नावेत बसून मगदानाच्या हद्दीत गेला.

**१६.** १ परूशी आणि सदूकी येशूवाह कडे आले. त्यांना येशूवाहची परीक्षा पाहायची होती. आम्हांला आकाशातून चिन्ह दाखवा, अशी मागणी त्यांनी केली. २ त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हीं संध्याकाळ झाली असता, म्हणता आजचे हवामान चांगले असेल, कारण आभाळ तांबूस आहे. ३ आणि तुम्ही सकाळी म्हणता आज वादळ होईल, कारण आभाळ तांबूस व गडद आहे. तुम्हांला आभाळाचे स्वरूप ओळखता येते, पण काळाची लक्षणे ओळखता येत नाहीत ४ दुष्ट व व्यभिचार पिढी चिन्ह शोधते, पण तिला योना नवी (संदेष्टया) शिवाय दुसरे चिन्ह दिले जाणार नाही." मग तो त्यांना सोडून गेला. ५ येशूवाह आणि त्याचे थालमीद सरोवराच्या पलीकडे गेले ,तेंव्हा भाकरी घ्यायला विसरले. ६ तेंव्हा येशूवाह त्यांना म्हणाला, " परूशी व सदूकी यांच्या खमिराविषयी सावध असा." ७ तेंव्हा ते आपापसात विचार करून म्हणाले, "आपण भाकरी घेतल्या नाहीत, म्हणून ते असे म्हणत आहे. ८ पण येशूवाहने हे ओळखून म्हंटले, " अहो अल्पविश्वासू आपण भाकरी घेतल्या नाहीत, असा विचार तुम्हीं आपापसामध्ये का करता? ९ तुम्हांला अजून आठवत नाही काय? पाच भाकरीने पाच हजार लोकांना जेवू घातले, ते आणि त्यानंतर तुम्हीं किती टोपल्या उचलून घेतल्या, ते तुम्हांला आठवत नाही काय? १० तसेच चार हजारांच्या जेवणाला सात भाकरी, आणि तुम्हीं किती टोपल्या उचलून घेतल्या, हे तुम्हांला आठवत नाही काय? ११ मी भाकरी विषयी तुम्हांला बोललो नाही, तर परूशी व सदूकी यांच्या खमिराविषयी सावध राहा असे म्हणालो, हे तुम्हांला कसे समजत नाही?" १२ तेंव्हा त्यांना समजले की, त्याने त्यांना भाकरीच्या खमिराविषयी सावध राहण्यास सांगितले नव्हते, तर परूशी आणि सदूकी यांच्या शिकवणुकी विषयी सावध राहायला सांगितले होते.

१३ येशूवाह फिलिप्पाच्या कैसरिया या भागाकडे गेला. तो त्याच्या थालमीद (शिष्या) ना म्हणाला, "मनुष्याच्या मुलाला लोक कोण म्हणून म्हणतात?" १४ आणि ते म्हणाले, " काही बाप्तिस्मा करणारा योहानान, तर कित्येक एलीया, तर दुसरे काही यिर्मया, किंवा नव्वीईम (संदेष्टयां) पैकी एक असे म्हणतात." १५ मग येशूवाह त्यांना म्हणाला, " पण तुम्हीं मला कोण म्हणून म्हणता?" १६ शिमोनाने उत्तर दिले, " तू मशीहा, जिवंत याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहेस." १७ येशूवाह म्हणाला, " शिमोना योनाच्या मुला, तू आशिर्वादीत आहेस. कारण रक्त, व मांस यांनी तुला हे प्रगट केले नाही. तर माझा अव्वा, जो आकाशांनमध्ये आहे, त्याने तुला हे प्रगट केले. १८ आणखी मी तुला असे सांगतो की, तू केफा आहेस. आणि या खडकावर, मी आपली मंडळी रचीन. आणि मृत्युलोकाचा यावर अधिकार चालणार नाही. १९ मी तुला आकाशाच्या राज्याच्या किल्ल्या देईन, आणि पृथ्वीवर जे काही तू बांधून ठेवशील, ते आकाशात बांधले जाईल. आणि पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील, ते आकाशात मोकळे केले जाईल. २० तेंव्हा त्याने थालमीद (शिष्यां) ना निक्षून सांगितले की, मी मशीहा आहे, हे तुम्हीं कोणालाही सांगू नका."

२१ तेंव्हा पासून येशूवाह मशीहा आपल्या थालमीद (शिष्या) स दाखवू लागला की, आपण यरूशलेमला जावे. आणि वडील, यहूदी नेते, व एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांच्याकडून पुष्कळ दुःखे सोसावी, व जिवे मारले जावे, व तिस-या दिवशी मेलेल्यातून पुन्हा उठविले जावे, याचे अगत्य आहे. २२ तेंव्हा केफाने त्याच्या जवळ जाऊन निषेध करून म्हंटले, " अदोनाई, या गोष्टीपासून याव्हे एलोहिम तुमची सुटका करो. या गोष्टी तुमच्या बाबतीत कधीही घडणार नाहीत!" २३ परंतु तो वळून केफाला म्हणाला, " अरे सैताना माझ्यामागे हो, तू मला अडखळण आहेस. कारण तू एलोहिमच्या गोष्टीकडे लक्ष लावीत नाहीत, तर मनुष्यांच्या गोष्टीकडे लक्ष लावतोस." २४ तेंव्हा येशूवाहने आपल्या थालमीद (शिष्यां) स म्हंटले, " जर कोणी माझ्या मागे येऊ इच्छित असेल त्याने स्वतःला नाकारावे, आणि आपला वधस्तंभ उचलून घ्यावा, व माझ्यामागे यावे. २५ कारण जो कोणी आपला जीव वाचवू इच्छितो, तो त्याला गमवील. पण जो माझ्याकरिता आपला जीव गमावील, तो त्याला मिळवील. २६ जर मनुष्याने सर्व जग मिळविले, आणि अनंतकालिक जीवन गमावले तर त्याला काय लाभ? किंवा मनुष्य आपल्या जिवाचा काय मोबदला देईल? २७ कारण मनुष्याचा मुलगा आपल्या अब्वाच्या वैभवात आपल्या मालाक (दूता) सहित येणार आहे, आणि तेंव्हा तो प्रत्येकाल ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणे मोबदला देईल. २८ मी तुम्हांला खरे सांगतो की, येथे उभे राहणायातले काही जण असे आहेत की, ते मनुष्याच्या मुलाला त्याच्या राज्यात येताना पाहतील, तोपर्यंत त्यांना मरणाचा अनुभव येणार नाही."

**१७.** १ सहा दिवसांनंतर येशूवाहने केफा, याकोब, व त्यांचा भाऊ योहानान यांना आपल्याबरोबर घेतले, व त्यांना उंच डोंगरावर एकांती नेले. २ त्याचे थालमीद (शिष्य) पाहत असतानाच येशूवाहचे स्वरूप पालटले. त्याचे तोंड सूर्यासारखे प्रकाशले, आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी पांढरी शुभ्र झाली. ३ तेंव्हा मोशे व एलीया हे त्याच्याशी संभाषण करीत असलेले त्यांना दिसले. ४ केफा येशूवाहला म्हणाला, "अदोनाई, येथे असणे हे आपणांसाठी बरे आहे. आपली इच्छा असेल तर, मी येथे तीन मंडप करतो. एक आपल्यासाठी, एक मोशेसाठी, व एक एलीया साठी." ५ केफा बोलत आहे इतक्यात, एका तेजस्वी ढगाने त्यांच्यावर सावली केली. आणि ढगातून वाणी झाली, "हा माझा परमप्रिय बेन (मुलगा) आहे. याजविषयी मी संतुष्ट आहे, याचे तुम्हीं ऐका." ६ येशूवाह बरोबर असलेल्या थालमीद (शिष्यां) नी ही वाणी ऐकली, तेंव्हा ते जमिनीवर पालथे पडले. कारण ते फार भ्याले होते. ७ तेंव्हा येशूवाह जवळ येऊन त्यांना स्पर्श करून म्हणाला, " उठा घाबरू नका" ८ मग त्यांनी आपले डोळे उघडले आणि वर पाहिले, तेंव्हा त्यांना येशूवाह शिवाय दुसरे कोणीही दिसले नाही. ९ येशूवाह आणि त्याचे थालमीद (शिष्य) डोंगरावरून खाली उतरत असताना, येशूवाहने त्यांना आज्ञा केली की, डोंगरावर त्यांनी जे पाहिले ते कोणालाही सांगू नका. मनुष्याचा मुलगा मरणातून पुन्हा उठेपर्यंत वाट पाहा. १० मग त्याच्या थालमीद (शिष्यां) नी म्हंटले, " तोराह् चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) असे का म्हणतात की, एलीया प्रथम आला पाहिजे!" ११ तेंव्हा त्याने उत्तर दिले, "एलीया येऊन सर्व काही पूर्ववत करील हे खरे, १२ पण मी तुम्हांला सांगतो की, एलीया आलाच आहे. आणि त्यांनी त्याला ओळखले नाही, पण त्यांना वाटले तसे त्यांनी त्याला केले. मनुष्याचा मुलगा ही त्यांच्या कडून असेच सहन करणार आहे." १३ तेंव्हा त्यांना समजले की, त्याने बाप्तिस्मा करणा-या योहानान विषयी सांगितले आहे.

१४ नंतर येशूवाह व थालमीद लोकसमुदया जवळ आल्यावर, एक मनुष्य त्याच्याकडे आला. आणि त्याच्यापुढे गुढघे टेकून म्हणाला, " १५ अदोनाई, माझ्या मुलावर दया करा. त्याला फेफरे येतात, व त्याचे फार हाल होतात. कारण तो सारखा विस्तवात आणि पाण्यात पडतो.१६ मी त्याला आपल्या थालमीद (शिष्यां) कडे आणले, पण त्यांना त्याला बरे करता येईना." १७ येशूवाहने उत्तर दिले, " अहो अविश्वासू व विपरीत पिढीच्या लोकांनो, मी तुमच्या बरोबर आणखी कोठवर राहू? मी तुमचे किती सहन करू? त्याला माझ्याकडे आणा." १८ येशूवाने त्या मुलामध्ये असलेल्या अशुद्ध आत्म्याला कडक रीतीने धमकावले, तेंव्हा तो अशुद्ध आत्मा त्याच्यातून निघून गेले, आणि त्याच घटकेला तो मुलगा बरा झाला.१९ नंतर थालमीद एकांती येशूवाह जवळ येऊन म्हणाले, " आम्हांला त्यातील अशुद्ध आत्मा का काढता आले नाही,?" २० तेंव्हा तो म्हणाला, "तुमच्या अविश्वासामुळे, मी तुम्हांला खरे

सांगतो, तुमच्यात जर मोहरीच्या दाण्या एवढा विश्वास असेल, तर तुम्हीं या डोंगराला म्हणू शकता येथून तेथे जा, तर तो डोंगर जाईल. तुमच्यासाठी काहीही अशक्य असणार नाही." ( २१ वे वचन काही ग्रीक प्रतीमध्ये समाविष्ट ः तरी पण प्रार्थना व उपास यावाचून असल्या जातीचे अशुद्ध आत्मा निघत नाही.)

२२ जेंव्हा ते एकत्र गालीलात आले तेंव्हा तो त्यांना म्हणाला " मनुष्याचा मुलगा माणसांच्या हाती विश्वासघाताने धरून दिला जाणार आहे. २३ ते त्याला जिवे मारतील, आणि तिस-या दिवशी तो पुन्हा मेलेल्यातून उठविला जाईल." तेंव्हा थालमीद (शिष्य) फार दुःखी झाले.२४ येशूवाह आणि त्याचे थालमीद (शिष्य) कफर्णहूमास आले, तेंव्हा मंदिराचा कर वसूल करणारे आले. ते केफाकडे येऊन म्हणाले, " तुमचा रब्बुनी (गुरूजी) कराचा रूपया देत नाही काय?" २५ त्याने म्हंटले, " होय देतो," मग तो घरात आल्यावरोबर तो बोलण्या अगोदर येशूवाह म्हणाला, "शिमोना, तुला काय वाटते? पृथ्वीवरील राजे, जकात किंवा कर कोणाकडून घेतात, आपल्या मुलांकडून की परक्या कडून?" २६ जेंव्हा तो म्हणाला, "परक्याकडून" तेंव्हा येशूवाहने त्याला म्हंटले, "तर मग मुले मोकळी आहेत. २७ तरी आपण त्यांना अडखळण आणू नये, म्हणून पाण्यात जाऊन गळ टाक, आणि पहिल्याने वर येईल तो मासा धरून त्याचे तोंड उघड, म्हणजे तुला दोन रूपयांचे एक नाणे सापडेल. ते घेऊन माझ्याबद्दल व तुझ्याबद्दल दे."

**१८.** १ त्या वेळेस थालमीद (शिष्य) आले आणि त्यांनी विचारले, आकाशाच्या राज्यात सर्वात महान कोण?" २ तेंव्हा त्याने एका लहान बालकाला आपल्याजवळ बोलावून त्यांच्यामध्ये उभे केले.३ आणि म्हंटले, "मी तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यात बदल होऊन तुम्हीं बालकासारखे झाल्याशिवाय आकाशाच्या राज्यात जाणारच नाही. ४ म्हणून जो कोणी आपणांला या बालकासारखे लीन करतो, तोच आकाशाच्या राज्यात सर्वाहून महान आहे. ५ आणि जो कोणी अशा एका लहान बालकाला माझ्या नावाने स्विकारतो, तो मला स्विकारतो. ६ परंतु जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवणा-या ह्या लहानातील एकाला अडखळण आणील, त्याच्या गळयात जात्याची मोठी तळी बांधून त्याला समुद्रात खोल पाण्यात बुडविणे हे त्याच्या फायद्याचे आहे.

७ जगाचा धिक्कार असो, कारण त्याच्यातील काही गोष्टीमुळे ते लोकांना पापात पाडते, तरी अशा काही गोष्टी होत राहणारच, पण जे लोक या गोष्टींना कारणीभूत होतात, त्यांना फार अहिताचे ठरेल. ८ जर तुमचा उजवा हात किंवा पाय तुम्हांला पापात पाडीत असेल, तर तो कापून टाका व फेकून द्या. तुम्हीं एखाद्या अवयव गमावला, परंतु अनंतकाळचे जीवन मिळविले, तर त्यात तुमचे जास्त हित आहे. दोन हात व दोन पाय यांच्यासह कधीही न विझणा-या अग्नीत सरोवरात तुम्हीं टाकले जाण्यापेक्षा ते जास्त बरे होईल.९ जर तुमचा डोळा तुम्हांला पापात पाडीत असेल, तर तो उपटून फेकूनच द्या. कारण एकच डोळा असला, आणि तुम्हांला अनंतकाळचे जीवन मिळाले, तर ते जास्त बरे आहे. दोन डोळयांसह तुम्ही अग्नीच्या सरोवरात टाकले जाण्यापेक्षा ते जास्त बरे आहे.

१० सावध असा ही लहान मुले कुचकामी आहेत असे समजू नका, मी तुम्हांला सांगतो की, या लहान मुलांचे याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) आकाशात असतात.आणि ते याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) माझ्या आकाशातील अब्बा बरोबर नेहमी असतात.१२ जर एखाद्या मनुष्याजवळ शंभर मेंढरे आहेत, आणि त्यांच्यापैकी एक मेंढरू हरवले. तर तो नव्याण्णव मेंढरे टेकडीवर सोडून देईल, आणि ते हरवलेले एक मेंढरू शोधावयास जाईल की नाही? १३ आणि जर त्या मनुष्याला हरवलेले मेंढरू सापडले, तर त्याला कधीही न हरवलेल्या नव्याण्णव मेंढरांबद्दल वाटणा-या आनंदापेक्षा त्या एकासाठी जास्त आनंद होईल. मी तुम्हांला खरे सांगतो, १४ तशाच प्रकारे या लहान मुलांपैकी एकाचा अगदी लहानातील लहानाचा ही नाश व्हावा, अशी तुमच्या आकाशातील अब्बाची इच्छा नाही.

१५ जर तुझा भाऊ अगर तुझी बहीण तुझ्यावर अन्याय करील, तर जा आणि त्याला किंवा तिला तुझ्यावर काय अन्याय झाला ते सांग. आणि तोही एकांतात सांग जर त्याने किंवा तिने तुझे ऐकले, तर तू त्याला किंवा तिला आपल्या बंधु किंवा बहीण म्हणून परत मिळविले आहेत.१६ पण जर तो किंवा ती तुझे ऐकले नसेल, तर एकाला किंवा दोघांना तुझ्याबरोबर घे. यासाठी की, जे काही झाले त्याविषयी साक्ष द्यायला, दोन किंवा तीन जण तेथे असतील. १७ जर तो मनुष्य लोकांपैकी ऐकणार नाही, तर

मंडळीसमोर ही गोष्ट मांड. जर तो मनुष्य मंडळीचेही एकणार नाही, तर मग तो याव्हे एलोहिमचा नाही, असे समज किंवा एखाद्या जकातदारासारखा समज. १८ मी तुम्हांला खरे सांगतो, जेंव्हा तुम्ही जगात न्याय कराल, तेंव्हा तो याव्हे एलोहिम कडून झालेला न्याय असेल. जेंव्हा तुम्हीं एखाद्याला क्षमा कराल, तेंव्हा ती याव्हे एलोहिम कडून झालेली क्षमा असेल.१९ "तसेच मी तुम्हांला सांगतो की, जर तुमच्यापैकी दोघांचे एखाद्या गोष्टीविषयी एकमत झाले, तर त्याकरिता प्रार्थना करा. म्हणजे तुम्हीं जी गोष्ट मागाल, तुमचा आकाशातील अब्बा तिची पूर्तता करील. २० हे खरे आहे, कारण तुमच्यापैकी जर दोघे किंवा तिघे माझ्या नावात एकत्र जमले असतील, तेथे त्यांच्यामध्ये मी आहे."

२१ नंतर केफा येशूवाह कडे आला आणि त्याने विचारले, "जर माझा भाऊ माझ्यावर अन्याय करीत राहिला तर मी त्याला किती वेळा क्षमा करावी? मी त्याला सात वेळा क्षमा करावी काय?" २२ येशूवाहने उत्तर दिले, "मी तुला सांगतो, फक्त सातच वेळा नाही तर उलट त्याने तुझ्यावर सत्ताहत्यर वेळा अन्याय केला, तरी तू त्याला क्षमा करीत राहा." २३ म्हणून आकाशाच्या राज्याची तुलना एका राजाशी करता येईल. आपले जे नोकर आपले देणे लागत होते, त्यांच्याकडून त्या राजाने पैसे परत घेण्याचे ठरविले. २४ जेंव्हा त्याने पैसे जमा करायला सुरूवात केली, तेंव्हा एक देणेकरी ज्याच्याकडे दहा हजार चांदीच्या नाण्याचे (पाच कोटी रूपये) कर्ज होते, त्याला त्याच्याकडे आणण्यात आले. २५ त्या देणे क-याकडे राजाचे पैसे परत करण्यासाठी काहीच नव्हते, तेंव्हा मालकाने आज्ञा केली की, त्याला त्याच्या बायको, त्याच्या मुलांना, आणि जे काही त्याच्याकडे आहे ते सर्व विकले जावे, आणि जे पैसे येतील त्यातून कर्जाची परत फेड व्हावी. २६ परंतु त्या नोकराने पाया पडून गयावया करीत म्हंटले, "मला थोडी सवलत द्या. जे काही मी तुमचे देणे लागते, ते तुम्हांला परत करीन." २७ त्या मालकाला आपल्या नोकराबद्दल वाईट वाटले. म्हणून त्याने त्या नोकराचे सर्व कार्ज माफ केले आणि त्याला सोडले.२८ नंतर त्याच नोकराचे काही शंभर रूपय देणे लागत असलेला, दुसरा एक नोकर पहिल्या नोकराला भेटला.त्याने त्या दुस-या नोकराचा गळा पकडला, आणि तो त्याला म्हणाला, 'तू माझे जे काही पैसे देणे लागतोस ते सर्व आताच्या आता दे.' २९ परंतु दुसरा नोकर गुडघे टेकून गयावया करीत म्हणाला, ' मला थोडी सवलत द्या. जे काही पैसे मी तुम्हांला देणे लागते, ते परत करीन.' ३० पण पहिल्या नोकराने दुस-या नोकराला सांभाळून घेण्यास साफ नकार दिला. उलट तो गेला आणि त्याने त्याला तुरूंगात टाकले. तेथे त्याला त्याचे कर्ज फिटेपर्यंत रहावे लागणार होते.' ३१ घडलेला हा प्रकार जेंव्हा दुस-या नोकरांनी पाहिला, तेंव्हा ते फार दुःखी झाले. तेंव्हा ते गेले आणि त्यांनी जे सर्व घडले होते, ते मालकाला सांगितले. ३२ तेंव्हा पहिल्या नोकराच्या मालकाने त्याला बोलाविले व तो त्याला म्हणाला, 'दुष्टा, तू माझे कितीतरी देणे लागत होतास. परंतु मी तुझे देणे माफ करावे, अशी विनंती तू मला केलीस. तेंव्हा मी तुझे सर्व कर्ज माफ केले.३३ म्हणून तू तुझ्याबरोबरच्या नोकरालही तशीच दया दाखवायाची होतीस.' ३४ मालक फार संतापला, शिक्षा म्हणून मालकाने पहिल्या नोकराला तुरूंगात टाकले. आणि त्याने सर्व कर्ज फेडीपर्यंत, त्याला तुरूंगातून सोडले नाही. ३५ "जसे या राजाने केले, तसेच माझा आकाशातील अब्बा तुमचे करील. तुम्हीं आपला भाऊ अगर बहीण यांना क्षमा केली नाही, तर तुमचा आकाशातील अब्बाही तुम्हांला क्षमा करणार नाही."

**१९.** १ येशूवाह या सर्व गोष्टी सांगितल्या नंतर तो गालीलातून निघून गेला, आणि यार्देन नदीच्या दुस-या किना-या कडील यहूदा प्रांतात गेला. २ तेंव्हा मोठा लोकसमुदाय त्याच्या मागे गेला आणि तेथील अनेक आजारी लोकांना येशूवाहने बरे केले.३ काही परूशी येशूवाह कडे आले. येशूवाहने चुकिचे काही बोलावे असा प्रयत्न त्यांनी चालविला. त्यांनी येशूवाहला विचारले, "कोणत्याही कारणास्तव एखाद्या मनुष्याने आपल्या पत्नीला सोडचिट्टी द्यावी काय?" ४ येशूवाहने उत्तर दिले, "शास्त्रलेखात असे लिहिलेले. तुमच्या वाचनात निश्चितच आले असेल की, 'जेंव्हा याव्हे एलोहिमने जग उत्पन्न केले," ५ आणि याव्हे एलोहिम म्हणाला, 'म्हणून पुरूष आपल्या आईवडिलांना सोडील, व आपल्या बायकोशी जडून राहील.ती दोघे एकदेह होतील.६ म्हणून दोन व्यक्ति या दोन नाहीत, तर एक आहेत. त्या दोघांना एकत्र जोडले आहे, म्हणून कोणाही व्यक्तिने त्यांना वेगळे करू नये." ७ परूश्यांनी विचारले, "असे जर आहे तर मग पुरूषाने सोडचिट्टी लिहून देण्याची, आणि आपल्या बायकोला सोडून देण्याची, मोकळीक देणारी आज्ञा मोशेने का दिली?" ८ येशूवाहने उत्तर दिले, " तुम्हीं याव्हे एलोहिमची शिकवण मानण्यास नकार दिल्याने ,तुमच्या बायकोला सोडून

देण्याची मोकळीक दिली. पण सुरूवातीला सोडचिट्टी देण्याची मोकळीक नव्हती. ९ मी तुम्हांस सांगतो, जो मनुष्य आपली बायको सोडून देतो, आणि दुसरीशी लग्न करतो तो व्यभिचार करतो. आपल्या बायकोला सोडचिट्टी देण्याचे एकच कारण आहे. ते म्हणजे पहिल्या बायकोने परपुरूषांशी व्यभिचार करणे होय!" १० मग त्याचे थालमीद (शिष्य) त्याला म्हणाले, "जर नवरा व बायकोमधील परिस्थिती अशी असेल, तर मग लग्न न करणे जास्त योग्य ठरेल." ११ येशूवाहने उत्तर दिले, " लग्नाविषयीची अशी शिकवण स्विकारणे प्रत्येक मनुष्याला शक्य होणार नाही. परंतु काही जणांना याव्हे एलोहिमने ही शिकवण ग्रहण करण्यास संमति दिली आहे. १२ काही लोकांची लग्न न करण्याची कारणे निराळी असू शकतील. जन्मापासूनच काही माणसे अशी असतात की, ती मुलांना जन्म देऊ शकत नाहीत. इतर काही माणसांनी काही जणांना तसे बनविलेले असते, तर आणखी काही माणसांनी आकाशाच्या राज्याकरिता लग्न करणे सोडून दिले आहे. परंतु ज्याला लग्न करणे शक्य होईल, त्या मनुष्याने लग्नाविषयी ही शिकवण मान्य करावी."

१३ नंतर येशूवाहने आपल्या मुलांवर हात ठेवून प्रार्थना करावी, यासाठी काही लोकांनी आपली मुले त्याच्याकडे आणली. येशूवाहच्या थालमीद (शिष्यां) नी त्यांना पाहिल्यावर, ते बालकांना घेऊन येशूवाह कडे येण्यास मना करू लागले. १४ परंतु येशूवाह म्हणाला, "लहान मुलांना मजकडे येऊ द्या, त्यांना मना करू नका. कारण आकाशाचे राज्य या लहान मुलांसारख्या लोकांचेच आहे." १५ मुलांवर हात ठेवल्यावर येशूवाह तेथून निघून गेला.

१६ एक मनुष्य येशूवाह कडे आला आणि त्याने विचारले, "रब्बुनी (गुरूजी) अनंतकाळचे जीवन मिळावे म्हणून मी कोणत्या चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत?" १७ येशूवाहने उत्तर दिले, "काय चांगले आहे असे मला का विचारतोस, फक्त याव्हे एलोहिम एकच चांगला आहे. पण जर तुला अनंतकाळचे जीवन पाहिजे, तर सर्व आज्ञा पाळ." १८ त्याने विचारले, " कोणत्या आज्ञा?" येशूवाहने उत्तर दिले, "खुन करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, १९ आपल्या आईवडिलांना मान दे, आणि जशी स्वतःवर प्रीति करतोस, तशी इतरांवर प्रीति कर." २० तो तरूण म्हणाला, " या सर्व आज्ञा मी पाळत आलो आहे. मी आणखी काय करावे?" २१ येशूवाहने उत्तर दिले, " तुला जर परिपूर्ण व्हायचे असेल, तर जा आणि तुझे जे काही ते विकून टाक. आणि ते पैसे गरीबांना वाटून दे. म्हणजे आकाशात तुला मोठी संपत्ती मिळेल, मग ये आणि माझ्यामागे चालू लाग." २२ पण जेंव्हा त्या तरूणाने हे ऐकले तेंव्हा त्याला फार दुःख झाले, कारण तो खूप श्रीमंत होता. म्हणून तो येशूवाहला सोडून निघून गेला. २३ तेंव्हा येशूवाह आपल्या थालमीद ना म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, धनवान माणसाला आकाशाच्या राज्यात प्रवेश करणे फार कठीण जाईल. २४ मी तुम्हांला सांगतो की, धनवानाचा आकाशाच्या राज्यात प्रवेश होणे, यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणे जास्त सोपे आहे." २५ जेंव्हा थालमीद नी हे ऐकले, तेंव्हा ते फार आश्चर्यचकित झाले. त्यांनी येशूवाहला विचारले, "मग कोणाचे तारण होईल?" २६ येशूवाहने आपल्या थालमीद कडे पाहिले आणि तो म्हणाला, "मनुष्यांना हे अशक्य आहे, पण याव्हे एलोहिम साठी सर्व गोष्टी शक्य आहेत." २७ केफा येशूवाहला म्हणाला, " पाहा आम्हीं सर्व काही सोडले, आणि तुमच्या मागे आलो आहोत. मग आम्हांला काय मिळेल?" २८ येशूवाह म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, नव्या युगात जेंव्हा मनुष्याचा मुलगा गौरवी सिंहासनावर बसेल. तेंव्हा तुम्हीं जे सर्व माझ्यामागे आलात ते सर्व बारा असनांवर बसाल, आणि इस्त्राएलाच्या बारा वंशाचा न्याय कराल. २९ ज्याने ज्याने माझ्या मागे येण्याकरिता, आपले घर, भाऊ, बहीण, आईवडील, मुले, शेतीवाडी सोडली असेल, तर त्याला त्यापेक्षा किती तरी जास्त पटीने लाभ होईल, व त्याला अनंतकाळचे जीवन मिळेल. ३० पण पुष्कळसे जे आता पहिले आहेत ते शेवटचे होतील, आणि जे शेवटचे आहेत ते पहिले होतील."

**२०.** १ आकाशाचे राज्य हे कोणा एका शेत मालकासारखे आहे. जो अगदी पहाटे त्याच्या द्राक्षमळयासाठी मोलाने मजूर आणण्यासाठी गेला. २ त्या मनुष्याने एक दिवसाच्या मजुरीकरिता प्रत्येकाला चांदीचे एक नाणे (मूळात एक देनार ,एक रूपया, एका दिवसाची मजूरी), देण्याचे कबूल केले. आणि त्याने त्यांना द्राक्षाच्या मळयात कामास पाठविले.३ सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास तो मनुष्य बाजारात गेला. तेंव्हा तेथे काही माणसे उभी असलेली त्याला दिसली. त्या लोकांना काहीच काम नव्हते. ४

मग तो त्यांना म्हणाला, 'तुम्ही सुद्धा माझ्या द्राक्षमळयात कामाला जा, आणि जी योग्य मजुरी आहे ती मी तुम्हांला देईन.' ५ मग ते काम करण्यास मळयात गेले. तो मनुष्य बारा वाजता आणि तीन वाजता बाजारात गेला. आणि त्या मनुष्याने आपल्या मळयात काम करण्यासाठी काही लोकांना दोन वेळा जाऊन मजुरीवर घेतले.६ पाच वाजता तो मनुष्य परत एकदा बाजारात गेला. तेंव्हा आणखी काही लोक उभे असलेले त्याला आढळले. त्याने त्यांना विचारले, " तुम्हीं काही काम न करता दिवसभर येथे का बरे उभे राहिला आहात?" ७ त्या लोकांनी उत्तर दिले, 'आम्हांला कोणी काम दिले नाही.' तो मनुष्य त्यांना म्हणाला, 'तर मग तुम्हीं जाऊन माझ्या मळयात काम करा.' ८ संध्याकाळी मळयाचा मालक मुकादमाला म्हणाला, 'मजुरांना बोलवा आणि त्यांना त्यांची मजुरी देऊन टाका! मी ज्यांना अगदी शेवटी कामावर आणले त्यांना अगोदर मजुरी द्या. नंतर बाकीच्या सर्वांना मजुरी द्या. मी कामावर रोजगारीने पहिल्याने बोलाविलेल्यांना सर्वात शेवटी मजुरी द्या.' ९ जे मजुर संध्याकाळी साधारण पाच वाजता कामावर घेतले होते, ते आपली मजुरी घेण्यासाठी आले. प्रत्येकाला एक चांदीचे नाणे मजुरी मिळाली. १० मग ज्यांना सुरूवातीला कामावर घेण्यात आले होते, ते आपली मजुरी घेण्यासाठी आले. त्यांना वाटत होते की, इतरांपेक्षा त्यांना जास्त पैसे मिळतील. पण त्या सर्वांना एकच चांदीचे नाणे मजुरी मिळाली. ११ त्यांनी ते घेतले व मालकाकडे तक्रार करू लागले. १२ ते म्हणाला, 'ज्यांना शेवटी कामावर घेतले त्यांना केवळ एक तासच काम केले, परंतु तुम्हीं त्यांना आमच्या बरोबरीने मजुरी दिली. आम्हीं मात्र दिवसभर उन्हात राबलो.' १३ परंतु मळयाचा मालक त्यांच्यातील एकाला म्हणाला, 'मित्रा, मी तुझ्याबाबतीत अन्याय करीत नाही. आपण यावर सहमत झालो नाही का? की, तुला एक चांदीचे नाणे मजुरी देईन? १४ जे तुझे ते घे आणि घरी जा. तुम्हांला दिली तितकीच मजुरी मला या शेवटच्या माणसाला द्यायची आहे. १५ मी माझ्या पैशाचा वापर मला पाहिजे तसा करू शकत नाही का? मी लोकांशी चांगला आहे, म्हणून तुला हेवा वाटतो का?' १६ म्हणून आता जे शेवटचे आहेत ते पहिले होतील, आणि पहिले जे शेवटचे होतील."

१७ येशूवाह यरूशलेमला चालला होता. ते चालत असता त्याने त्याच्या थालमीद (शिष्यां) ना बाजूला घेतले, आणि त्यांना म्हणाला,
१८ ऐका आपण यरूशलेमकडे जात आहोत, मनुष्याच्या मुलाला धरून एलयोवन कोहेन (मुख्य याजक) व तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांच्या हाती धरून देण्यात येईल. त्याने मेलेच पाहिजे, असे ते म्हणतील. १९ ते मनुष्याच्या मुलाला यहूदीतरांच्या हाती देतील, ते लोक त्याची थट्टा करतील, त्याला चाबकाने मारतील, नंतर ते त्याला वधस्तंभावर खिळून जिवे मारतील. परंतु मरणानंतर तिस-या दिवशी त्याला पुन्हा उठविले जाईन."

२० त्यानंतर जव्दीच्या मुलांची अम्मी आपल्या मुलांसह त्याच्याकडे आली. ती त्याच्या पाया पडली, आणि तिने त्याला एक विनंती केली. २१ त्याने तिला विचारले, " तुला काय पाहिजे?" ती म्हणाली "माझा एक मुलगा तुमच्या राज्यात तुमच्या उजवीकडे बसेल, आणि दुसरा डावीकडे बसेल असे वचन द्या." २२ येशूवाहने तिला म्हणाला, " तू काय मागत आहेस, ते तुला माहीत नाही! जे दुःख मला सोसावे लागणार आहे, ते तुमच्याने सोसवेल काय?" ते म्हणाले, "होय, आम्हीं ते सोसू शकू!" २३ येशूवाह त्यांना म्हणाला, " तुम्हीं खरोखर माझ्या प्यालातून प्याल खरे, पण माझ्या उजव्या आणि डाव्या हाताला बसण्याचा मान देणे हे ठरविणारा मी नाही, तर माझ्या अव्बाने तो मान कोणाला द्यायचा हे ठरविले आहे." २४ जेंव्हा इतर दहा थालमीद (शिष्यां) नी हे ऐकले, तेंव्हा ते त्या दोघांवर रागावले. २५ मग येशूवाहने बोलावून त्यांना म्हंटले, " यहूदीतर लोकांच्या राजांना लोकांवर आपली सत्ता आहे हे दाखविणे आवडते, आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांना आपले अधिकार वाटेल तसे वापरणे आवडते. २६ पण तुमचे वागणे तसे नसावे! जर तुमच्यातील कोणाला मोठे व्हायचे असेल, तर त्याने तुमचा दासच झाले पाहिजे. २७ आणि ज्याला पहिला व्हावयाचे आहे, त्याने कनिष्ट झाले पाहिजे. २८ म्हणजे तुम्हीं मनुष्याच्या मुलासारखे असले पाहिजे, जो इतरांकडून सेवा करून घ्यायला आला नाही. तर इतरांची सेवा करायला, आणि अनेकांचे यशाह (तारण) व्हावे यासाठी आपला जीव खंडणी म्हणून देण्यासाठी आला."

२९ ते यरीहो नगर सोडत असताना, मोठा लोकसमुदाय त्याच्या मागे आला. ३० रस्त्याच्या कडेला दोन आंधळे बसले होते, आणि जेंव्हा त्यांनी ऐकले की, येशूवाह तेथून जात आहे. तेंव्हा ते मोठयाने ओरडले, "अदोनाई येशूवाह दाविदाच्या मुला आमच्यावर दया करा!" ३१ जमावाने त्यांना दटावले, व त्यांना शांत राहण्यास सांगितले. पण ते अधिकच मोठयाने ओरडू लागले, " अदोनाई

दाविदाच्या मुला आमच्यावर दया करा!" ३२ मग येशूवाह थांबला आणि त्यांच्याशी बोलला त्याने विचारले, "मी तुमच्यासाठी काय करावे अशी तुमची इच्छा आहे?" ३३ त्या आंधळया मनूष्यांनी उत्तर दिले, "अदोनाई आम्हांला दिसावे अशी आमची इच्छा आहे." ३४ येशूवाहला त्यांच्याबद्दल कळवळा आला, आणि त्याने त्यांच्या डोळयांना स्पर्श केला. त्याच क्षणी त्यांना दिसू लागले, आणि ते त्याच्या मागे गेले.

२१. १ येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) यरूशलेमजवळ आले असता, ते जैतूनाच्या डोंगर म्हंटलेल्या टेकडीजवळ बेथफगे या जागी थांवले. येशूवाह त्याच्या दोन थालमीद (शिष्यां) ना २ असे सांगून पाठविले की, "तुमच्या समोर असलेल्या गावात जा. तुम्हीं गावात शिराल तेंव्हा एक गाढवी बांधून ठेवलेली, व तिच्या जवळ एक शिंगरू असलेले तुम्हांला आढळेल. ती दोन्ही गाढवे सोडून माझ्याकडे या. ३ जर कोणी तुम्हांला विचारले की, ही गाढवे कशासाठी नेत आहात. तर त्याला सांगा की, "येशूवाहला यांची गरज आहे. तो ती लगेच माझ्याकडे पाठवील." ४ हे यासाठी घडले की, नव्वीईम (संदेष्टयां) पैकी एक जण जे बोलला होता ते पूर्ण व्हावे.५ त्सिय्योनेच्या कन्येला सांगः 'पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे! तो लीन आहे आणि नम्र होऊन गाढवावर बसून येत आहे. होय, शिंगरावर कष्ट करणा-या प्राण्याच्या शिंगरावर." ६ त्याचे थालमीद (शिष्य) गेले, आणि जसे येशूवाहने सांगितले होते तसे त्यांनी केले. ७ थालमीद नी (शिष्यांनी) गाढवी व शिंगरू येशूवाह कडे आणले. त्या गाढवावर त्यांनी आपले आंगरखे घातले, आणि येशूवाह त्यावर बसला. ८ पुष्कळ लोकांनी आपले आंगरखे येशूवाह साठी वाटेवर अंथरले. दुस-या काही लोकांनी झाडाच्या फांद्या तोडल्या, आणि त्या रस्त्यावर पसरल्या. ९ काही लोक येशूवाहच्या पुढे चालू लागले, काही लोक येशूवाहच्या मागून चालू लागले. ते लोक मोठयाने जयघोष करू लागले. "होसान्ना दाविदाच्या मुलाला अदोनाईच्या नावाने येणारा धन्यवादित असो. आकाशातील याव्हे एलोहिमला होसान्ना!" १० जेंव्हा येशूवाहने यरूशलेमेमध्ये प्रवेश केला. तेंव्हा संपूर्ण नगर गजबजून गेले, व लोक विचारत होते, "हा कोण आहे?" ११ जमाव उत्तर देत होता, "हा येशूवाह नबी (संदेष्टा) आहे. तो गालील प्रांतातील नात्सेरोथ (नासरेथचा) आहे." ( होसान्ना हा हिब्रू शब्द आहे याचा अर्थ 'याव्हे एलोहिम आम्हांला वाचव पण या ठिकाणी याचा अर्थ आनंदाने याव्हे एलोहिमची स्तुति करणे असा होतो.)

१२ मग येशूवाहने मंदिराच्या आवारात प्रवेश केला. तेंव्हा तेथे जे लोक विक्री करीत होते, व खरेदी करीत होते, तसेच पैशांची आपसात देवाण घेवाण करीत होते. त्यांची मेजे त्याने उलथून टाकली, आणि जे लोक कबुतरे विकत होते, त्यांची बसण्याची बाके उलथून टाकली. १३ येशूवाह त्यांना म्हणाला, "शास्त्रलेखात असे म्हंटले आहे, 'माझे घर प्रार्थनेचे घर म्हंटले जाईल. पण तुम्ही त्याला लुटारूंची गुहा केले आहे.१४ काही आंधळे आणि पांगळे लोक मंदिरात येशूवाह कडे आले, येशूवाहने त्यांना बरे केले. १५ जेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) व तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) येशूवाहने केलेल्या अश्चर्यकारक गोष्टी, आणि मंदिराच्या आवारात लहान मुलांना, 'दाविदाच्या वेन ला होसान्ना" अशी घोषणा देताना पाहिले, तेंव्हा या सर्व गोष्टीमुळे त्यांना राग आला. १६ त्यांनी त्याला विचारले, "ही मुले काय म्हणत आहेत हे तुम्हीं ऐकता ना?" येशूवाहने त्यांना उत्तर दिले, "होय, शास्त्रलेखात काय लिहिले आहे ते तुम्हीं ऐकले नाही का?" 'तू बालके व तान्हुली यांना स्तुति करायला शिकविले आहेस.' १७ नंतर येशूवाह तेथून निघाला, व बेथानीला गेला तेथे तो रात्रभर राहिला.

१८ दुस-या दिवशी पहाटे तो यरूशलेमकडे पुन्हा येत असता त्याला भूक लागली. १९ रस्त्याच्या कडेला त्याला अंजिराचे एक झाड दिसले. अंजिर खायला मिळेल या आशेने तो झाडाजवळ गेला. पण झाडावर त्याला एकही अंजिर दिसले नाही. त्याला फक्त पाने होती. येशूवाह त्या झाडाला म्हणाला, "यापुढे तुला कधीही फळ न येवो!" आणि ते झाड लगेच वाळून गेले, आणि मेले. २० थालमीद (शिष्यां) नी हे पाहिले, तेंव्हा त्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले, "हे अंजिराचे झाड इतक्या लवकर वाळून कसे गेले, आणि मेले?" २१ येशूवाह त्यांना म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, जर तुम्हांला विश्वास असेल आणि जर तुम्हीं संशय धरला नाही तर मी जे अंजिराच्या झाडाबाबतीत केले, तेच नव्हे तर या डोंगराला उठून समुद्रात पड असे म्हणालात, तरी ते घडेल. २२ जर तुमचा विश्वास असेल, तर जे काही तुम्हीं प्रार्थनेत मागाल ते तुम्हांला मिळेल."

२३ येशूवाह मंदिरात गेला. येशूवाह तेथे शिक्षण देत असताना एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व वडीलजन येशूवाह कडे आले. ते येशूवाह म्हणाले, "तुम्हीं कोणत्या अधिकाराने या गोष्टी करता? हा अधिकार तुम्हांला कोणी दिला?" २४ येशूवाह म्हणाला, "मी सुद्धा तुम्हांला एक प्रश्न विचारतो. जर तुम्हीं मला उत्तर दिले, तर मी कोणत्या अधिकाराने या गोष्टी करतो, हे मी तुम्हांला सांगेन. २५ तुम्हीं मला सांगा, योहानान लोकांना बाप्तिस्मा देत असे तेंव्हा त्याला तो देण्याचा अधिकार कोठून आला. याव्हे एलोहिम कडून की, मनुष्यांकडून?" येशूवाहच्या या प्रश्नावर ते चर्चा करू लागले. ते म्हणाले, "योहानानचा बाप्तिस्मा याव्हे एलोहिम कडून होता असे म्हणावे, तर येशूवाह म्हणेल मग तुम्हीं त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही? २६ पण जर तो मनुष्यांकडून होता, असे आपण म्हणालो तर सर्व लोक आपल्यावर रागावतील. आपल्याला लोकांची भीति आहे. कारण योहानान हा एक नबी (संदेष्टा) होता, असे ते सर्व जण मानतात." २७ म्हणून त्यांनी येशूवाहला उत्तर दिले, "योहानानचा अधिकार कोठून होता, हे आम्हांला माहीत नाही. तेंव्हा येशूवाह म्हणाला, "मग मी कोणत्या अधिकाराने या गोष्टी करतो, हे मी ही तुम्हांला सांगणार नाही."

२८ याविषयी तुम्हांला काय वाटते ते मला सांगा, एका मनुष्याला दोन मुले होतो. तो मनुष्य आपल्या पहिल्या मुलाकडे गेला आणि म्हणाला, 'माझ्या मुला आज तू माझ्या द्राक्षाच्या मळयात जा, आणि काम कर. २९ मुलाने उत्तर दिले मी जाणार नाही. परंतु नंतर त्या मुलाने जायचे ठरविले, व तो गेला. ३० नंतर वडील आपल्या दुस-या मुलाकडे गेले आणि म्हणाले, 'माझ्या मुला आज तू जाऊन माझ्या द्राक्षाच्या मळयात काम कर. त्या मुलाने उत्तर दिले, होय बाबा, मी जातो. पण तो गेला नाही.' ३१ त्या दोघांपैकी कोणत्या मुलाने वडीलांची आज्ञा पाळली? ते म्हणाले, "पहिल्या मुलाने." येशूवाह त्यांना म्हणाला, "मी खरे सांगतो, जकातदार, व वेश्या हे वाईट लोक आहेत असे तुम्हांला वाटते . पण ते तुमच्या अगोदर आकाशाच्या राज्यात जातील. ३२ जीवनाचा खरा मार्ग कोणता हे तुम्हांला दाखवावे, म्हणून योहानान आला आणि तुम्हीं योहानानला मानले नाही, जकातदार व वेश्या यांनी योहानानवर विश्वास ठेवला, हे तुम्हीं पाहिले. पण तरी देखील तुम्हीं आपले मन बदलण्यास आणि योहानानवर विश्वास ठेवण्यास तयार झाला नाही.

३३ हा दाखल ऐका. एक मनुष्य होता, त्याचे शेत होते, त्याने आपल्या शेतात द्राक्षे लावली. शेताच्या भोवती त्याने एक भिंत बांधली, आणि द्राक्षे कुस्करून रस गाळण्याकरिता खड्डा करून, एक घाणा तयार केला. आणि टेहळणी करण्यासाठी एक मनोरा (माळा) बांधला. मग त्याने आपला मळा काही शेतक-यांना करायला खंडाने दिला, मग परत गेला. ३४ जेंव्हा द्राक्षे तोडणीचा हंगाम जवळ आला, तेंव्हा त्या मनुष्याने आपला वाटा आणण्याकरिता काही नोकर शेतक-याकडे पाठविले. ३५ परंतु शेतक-यांनी त्यांच्यावर हल्ला केला. एकाला मार दिला तर दुस-या नोकराला जिवे मारले. नंतर तिस-याला दगडमार करून ठार केले. ३६ मग शेतक-यांकडे त्या मनुष्याने आणखी एकदा नोकर पाठविले. पहिल्यापेक्षा त्याने जास्त पाठविले, पण त्या शेतक-यांनी त्यांना तशीच वागणूक दिली. ३७ नंतर त्याने त्याच्या स्वतःच्या मुलाला त्यांच्याकडे पाठविले. तो म्हणाला निश्चितच ते माझ्या मुलाचा मान राखतील. ३८ पण जेंव्हा शेतक-यांनी त्याच्या मुलाला पाहिले, तेंव्हा ते एकमेकास म्हणू लागले. "हा तर मालकाचा मुलगा वारस आहे, चला, आपण त्याला ठार करू, व त्याचे वतन घेऊ. ३९ त्यांनी त्याला धरले व मळयाच्या बाहेर ठार मारले, व त्याला फेकूण दिले. ४० मग द्राक्षमळयाचा मालक परत येईल, तेंव्हा या शेतकयांचे काय करील ? ४१ यहूदी एलयोवन कोहेन (मुख्य याजक) आणि पुढारी म्हणाले, "तो त्या लोकांना खात्रीने मरणदंड देईल, कारण ते दुष्ट होते. नंतर तो आपला मळा दुस-यास खंडाने देईल. हंगामाच्या दिवसात जे त्याच्या पिकाची वाटणी देतील अशांना ते देईन." ४२ येशूवाह त्यांना म्हणाला, " तुम्हीं शास्त्रलेखात वाचले असेलच की बांधणा-यांनी नापसंत केलेला दगड कोनशिला झाला आहे, हे अदोनाईने केले, आणि आमच्यासाठी हे अदभुत आहे.

४३ म्हणून मी तुम्हांला सांगतो की, याव्हे एलोहिमचे राज्य तुमच्याकडून काढून घेण्यात येईल. याव्हे एलोहिमला आपल्या राज्यात पाहिजेत अशा गोष्टी जे लोक करतील, त्यांना ते देण्यास येईल. ४४ जो कोणी या दगडावर पडेल त्याचे तुकडे तुकडे होतील, आणि जर हा दगड एकाद्या मनुष्यावर पडेल, तर त्या मनुष्याचा चक्काचूर होईल." ४५ येशूवाहने सांगितलेला हा दाखला एलयोवन

कोहेन (मुख्य याजकांनी), आणि परूश्यांनी ऐकला. येशूवाह त्यांच्याविषयी बोलत आहे, हे त्यांनी ओळखले. ४६ त्यांना येशूवाहला अटक करायचे होते, पण त्यांना लोकांचे भय वाटत होते. कारण लोक येशूवाहला नवी (संदेष्टा) मानीत होते.

२२. १ येशूवाहने त्यांच्याशी बोलण्यास सुरूवात करून पुन्हा एकदा बोधकथेचा वापर केला. तो म्हणाला, २ आकाशाचे राज्य एका राजासारखे आहे. त्याने त्याच्या मुलाच्या लग्नानिमित भोजनाचे आमंत्रण दिले. ३ त्याने त्याच्या नोकरांना पाठवून ज्यांना लग्नाचे आमंत्रण होते, अशांना बोलविण्यास सांगितले. पण लोकांनी राज्याच्या मेजवानीस येण्यास नकार दिला.४ नंतर राजाने आणखी काही नोकरांना पाठवून दिले.राजा नोकरांना म्हणाला, "मी त्या लोकांना अगोदरच आमंत्रण दिले आहे, म्हणून आता जा आणि त्यांना सांगा. पाहा मेजवानी तयार आहे, मी चांगल्यातील चांगले बैल आणि वासरे कापली आहेत, आणि सगळे तयार आहे. लग्नाच्या मेजवानीस या!" ५ नोकर गेले आणि त्यांनी लोकांस येण्यास सांगितले, पण त्यांनी नोकरांच्याकडे लक्ष दिले नाही. ते आपापल्या कामास निघून गेले, एक शेतात काम करायला गेला, तर दुसरा व्यापार करायला गेला. ६ काहीनी मालकाच्या उरलेल्या नोकरांना पकडून मार दिला, व जिवे मारले. ७ राजा फार रागावला, त्याने त्याचे सैन्य पाठविले, आणि त्यांनी त्या खुन्यांना ठार मारले, त्यांनी त्यांचे नगर जाळले. ८ मग राजा त्याच्या नोकरांना म्हणाला, 'मेजवानी तयार आहे पण ज्यांना बोलविले होते, ते पात्र नव्हते. ९ म्हणून रस्त्यांच्या कोप-यांवर जा, आणि तेथे तुम्हांला जे भेटतील त्यांना लग्नाच्या मेजवानीला बोलवा. १० मग ते नोकर रस्त्यावर गेले, जे जे लोक भेटले त्यांना जमा केले. ज्या ठिकाणी लग्नाची मेजवानी तयार होती, तेथे नोकरांनी चांगल्या आणि वाईट लोकांना जमा केले, आणि ती जागा भरून गेली. ११ मग त्या सर्वांना भेटण्यास राजा तेथे आला. मेजवानीसाठी शोभेल असा पोषाख न घातलेला, एक मनुष्य राजाला तेथे आढळला. १२ राजा त्याला म्हणाला, 'मित्रा तुला येथे कोणी व कसे येऊ दिले? मेजवानीस शोभते असा पोषाख न घालता येथे कसा आलास? पण तो गप्प राहिला. १३ तेंव्हा राजाने नोकरांना सांगितले, 'या मनुष्याचे हात व पाय बांधा, आणि त्याला बाहेर अंधारात टाका. तेथे रडणे आणि दातखाणे चालेल.' १४ कारण बोलविलेले पुष्कळ आहेत, पण निवडलेले थोडे आहेत."

१५ मग परूशी गेले आणि येशूवाहला कसे पकडावे याचा कट करू लागले. त्याला शब्दात पकडण्याचा प्रयत्न करू लागले. १६ परूश्यांनी येशूवाहला फसविण्याच्या हेतूने काही माणसे त्याच्याकडे पाठविली. त्यांनी आपली काही माणसे आणि हेरोद गटाच्या काही लोकांना येशूवाह कडे पाठविले. ते म्हणाले, रब्बुनी (गुरूजी) आम्हांला माहीत आहे की, आपण सत्यवचनी आहात. आणि तुम्हीं याव्हे एलोहिमचा मार्ग प्रामाणिकपणे शिकविता. व दुसरे काय विचार करतात याची तुम्हीं पर्वा करीत नाही, तुम्हीं सर्वांना समान मानता. १७ म्हणून तुमचे मत आम्हांला सांगा, कैसराला कर देणे योग्य आहे की नाही." १८ येशूवाहला त्यांचा दुष्ट उद्देश माहीत होता. म्हणून तो म्हणाला, "ढोंग्यानो तुम्हीं माझी परीक्षा का घेत आहात, १९ कर भरण्यासाठी जे नाणे वापरले जाते ते मला दाखवा." त्या लोकांनी येशूवाहला चांदीचे एक नाणे दाखविले. २० तेंव्हा येशूवाहने विचारले, "या नाण्यावर कोणाचे चित्र आहे? आणि ह्या नाण्यावर कोणाचे नाव लिहिलेले आहे?" २१ त्या लोकांनी उत्तर दिल , "त्यावर कैसराचे चित्र व नाव दिले आहे." यावर येशूवाह त्यांना म्हणाला, "जे कैसराचे आहे ते कैसराला द्या. आणि जे याव्हे एलोहिमचे आहे, ते याव्हे एलोहिमला द्या." २२ येशूवाह जे म्हणाला ते त्या लोकांनी ऐकले, तेंव्हा ते आश्चर्यचकित झाले आणि तेथून निघून गेले.

२३ त्याच दिवशी काही सदूकी लोक त्याच्याकडे आले. ( हे लोक असे समजतात की पुनरूत्थान नाही) त्यांनी येशूवाहला एक प्रश्न विचारला. २४ ते म्हणाले, "रब्बूनी (गुरूजी) मोशेने शिकविले की, जर एखादा मनुष्य मेला आणि त्याला मूलबाळ नसेल, तर त्याच्या भावाने किंवा जवळच्या नातेवाईकाने त्याच्या बायकोशी लग्न करावे. म्हणजे मेलेल्या भावासाठी त्यांना मुले होतील. २५ आता आमच्यामध्ये सात भाऊ होते. पहिल्याने लग्न केले आणि नंतर तो मेला. आणि त्याला मुल नसल्याने त्याच्या भावाने त्याच्या बायकोशी लग्न केले. २६ असेच दुस-या व तिस-या भावाच्या बाबतीतही घडले, व सातही भावांनी तिच्याशी लग्न केले आणि मेले. २७ शेवटी ती स्त्री मेली. २८ आता प्रश्न असा आहे की, पुनरूत्थानाच्या वेळेस ती कोणाची बायको असेल. कारण सर्व सातही भावांनी तिच्याशी लग्न केले होते." २९ उत्तर देताना येशूवाह त्यांना म्हणाला, "तुम्हीं चुकीची समजूत करून घेत आहात.

कारण तुम्हांला याव्हे एलोहिमचे वचन किंवा सामर्थ्य माहीत नाही. ३० तुम्हांला समजले पाहिजे की, पुनरूत्थानानंतरच्या जीवनात
लोक लग्न करणार नाहीत, किंवा लग्न करून देणार नाहीत. उलट ते आकाशात याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) सारखे
असतील. ३१ तरी मृतांच्या पुनरूत्थानाच्या संदर्भात एलोहिम तुमच्या फायद्यासाठी जे बोलला, ते तुम्हीं अजूनपर्यंत वाचले नाही
काय? ३२ तो म्हणाला, “मी अब्राहाम, इसहाक, आणि याकोबाचा याव्हे एलोहिम आहे. हा याव्हे एलोहिम मेलेल्यांचा याव्हे
एलोहिम नाही, तर जिवंत लोकांचा याव्हे एलोहिम आहे.” ३३ जेंव्हा जमावाने हे ऐकले, तेंव्हा ते आश्चर्यचकित झाले.

३४ येशूवाहने सदूकी लोकांना अशा बोधकथा सांगितल्या की, त्यांना वाद घालता येईना. हे परूश्यांनी ऐकले. म्हणून परूश्यांनी
एकत्र येऊन मसलत केली. ३५ एक परूशी तोराह (नियमशास्त्रा) चा जाणकार होता. त्या परूश्याने येशूवाहची परीक्षा पाहावी
म्हणून प्रश्न केला. ३६ त्याने विचारले “रब्बुनी (गुरूजी) तोराह तील (नियमशास्त्रातील) कोणती आज्ञा सर्वात महत्वाची आहे?” ३७
येशूवाहने उत्तर दिले, “अदोनाई, तुमचा याव्हे एलोहिम याजवर प्रीति करा. तुम्हीं त्याजवर पूर्ण हदयाने (आत्म्याने) , पूर्ण जिवाने,
पूर्ण मनाने प्रीति करा.’ ३८ ही पहिली आणि मोठी आज्ञा आहे. ३९ हिच्यासारखी दुसरी एक आहे. ‘जशी आपणावर तशी
इतरांवर प्रीति करा.’ ४० सर्व तोराह (नियमशास्त्र) आणि नव्वीईमचे (संदेष्टयांचे) लेख या दोन आज्ञांवरच अवलंबून आहे.”

४१ म्हणून परूशी एकत्र उभे असताना, येशूवाहने त्यांना प्रश्न केला. ४२ येशूवाह म्हणाला, “मशीहा विषयी तुमचे काय मत आहे?
तो कोणाचा बेन (मुलगा) आहे?” परूश्यांनी उत्तर दिले, “मशीहा हा दाविदाचा मुलगा आहे.” ४३ त्यावर येशूवाह त्यांना म्हणाला,
“मग दाविदाने त्याला अदोनाई असे का म्हंटले? दाविदाच्यामध्ये क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) आला असता तो म्हणाला, ४४
“अदोनाई माझ्या मशीहाला म्हणाला, ‘मी तुझे वैरी तुझे पादासन करीपर्यंत माझ्या उजव्या बाजूला बैस.’ ४५ आता मग जर दाविद
त्याला अदोनाई म्हणतो, तर तो दाविदाचा मुलगा कसा होऊ शकतो?” ४६ पण परूश्यांपैकी कोणीही त्याच्या प्रश्नाचे उत्तर देऊ
शकला नाही. त्या दिवसानंतर त्याला आणखी प्रश्न विचारण्याचे धाडस कोणीही केले नाही.

**२३.** १ मग येशूवाह लोकांशी व त्याच्या थालमीद (शिष्यां) शी बोलला. तो म्हणाला, २ “तोराहचे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक)
व परूशी, यांना मोशेच्या तोराहचे (नियमशास्त्राचे) स्पष्टीकरण करण्याचे अधिकार आहेत. ३ म्हणून ते जसे सांगतात, तसे तुम्हीं
करा. पण ते जसे करतात तसे करू नका. मी असे म्हणतो, याचे कारण ते बोलतात पण त्या प्रमाणे करत नाहीत. ४ वाहावयास
अवघड असे ओझे ते बांधतात, व ते ओझे लोकांच्या खांद्यावर देतात, व ते स्वतः ते ओझे उचलायला एक बोट देखील लावत
नाहीत. ५ ते त्यांचे सर्व चांगले काम लोकांनी पाहावे म्हणून करतात. ते शास्त्रलेख लिहिलेल्या लहान पेटया (ज्यात महत्वाची
पवित्र वचने लिहिलेली असतात. काही यहूदी ते आपल्या कपाळावर, व हातावर बांधून आपण फार धार्मिक आहोत हे
दाखवितात.) मोठमोठया बनवितात आणि लोकांनी पाहावे म्हणून लांब झगे घालतात. ६ मेजवानीच्या ठिकाणी आपल्याला विशेष
मानची जागा मिळावी, असे त्यांना वाटते.तसेच यहूद्यांचे सभास्थानात महत्वाच्या जागी बसायला त्यांना फार आवडते. ७
बाजारातील मुख्य रस्त्याने जाता येता लोकांनी आपल्याला मान द्यावा याची त्यांना फार आवड असते. आणि लोकांनी त्यांना रब्बुनी
(गुरूजी) म्हणावे असे त्यांना वाटते.८ परंतु तुम्हीं स्वतःला रब्बुनी (गुरूजी) म्हणवून घेऊ नका. तुम्हीं सर्व एकमेकांचे बहीण
भाऊ आहात. तुमचा रब्बुनी (गुरू) आणि मशीहा एकच आहे. ९ आणि जगातील कोणालाही अव्बा म्हणू नका, कारण तुमचा
अव्बा एकच आहे व तो आकाशात आहे. १० तुम्हीं स्वतःला ‘अदोनाई (मालक) म्हणवून घेऊ नका, तुमचा अदोनाई (मालक)
मशीहा आहे. ११ तुमच्यातील जो सेवक बनून तुमची सेवा करतो तो तुमच्यात सर्वात मोठा होय. १२ जे स्वतःला मोठा समजेल
त्याला कमी लेखले जाईल. स्वतःला लहान समजणारा प्रत्येक जण मोठा गणला जाईल. १३ अहो परूश्यांनो आणि तोराहचे
रब्बुनीनो (नियमशास्त्राचे शिक्षकांनो) हाय, हाय, तुम्हीं ढोंगी आहात! तुम्हीं आकाशाच्या राज्याचा रस्ता लोकांसाठी खुला ठेवीत
नाहीत. तुम्हीं स्वतः तर आत जात नाहीच पण जे आत जाण्याचा प्रयत्न करतात त्यांनाही आत जाऊ देत नाहीत.

* १४ परूश्यांनो आणि तोराह च्या रब्बुनी नो (नियमशास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल. तुम्हीं ढोंगी आहात तुम्हीं विधवांची

घरे लुटता, आणि लोकांनी पाहावे म्हणून लांबलचक प्रार्थना करता. म्हणून तुम्हांला फार कडक शिक्षा होईल.१५ परूश्यांनो आणि तोराह च्या रब्बुनीनो (नियमशास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल. तुम्हीं ढोंगी आहात.तुम्ही समुद्र, व जमिनीवरून प्रवास करून एक तरी थालमीद (शिष्य) मिळतो का ते पाहता, आणि तुम्हांला तो मिळतो. तेंव्हा तुम्हीं त्याला तुमच्याप्रमाणे अग्नी गंधकाच्या सरोवरातील मुलांसारखे करून टाकता.१६ तुम्हांला दुःख होईल. आंधळया वाटाडयांनो जे तुम्हीं म्हणता, 'जर एखादा मंदिराच्या नावाने शपथ घेतो, तर त्याने ती पाळलीच पाहिजे याचे बंधन त्याच्यावर नाही. पण जर एखादा मंदिरातील सोन्याची शपथ घेऊन बोलतो, तर त्याने ती शपथ पाळलीच पाहिजे. १७ तुम्हीं मूर्ख आंधळे आहात, सोने आणि मंदिर यापैकी कोणते अधिक महत्वाचे? मंदिर त्या सोन्याला क्वादोश (पवित्र) बनविते. १८ आणि तुम्हीं असे म्हणता, 'जर एकादा वेदीची शपथ घेतो, तर त्यात काही वावगे नाही.पण जर एखादा वेदीवरील अर्पणाची शपथ घेतो, तर त्याने ती शपथ पाळलीच पाहिजे.' १९ तुम्हीं आंधळे आहात, तुम्हांला काही दिसत नाही, व कळत नाही! अर्पण मोठे की वेदी मोठी? वेदीमुळे अर्पण पवित्र होते म्हणून वेदी मोठी. २० म्हणून जो वेदीची शपथ घेतो तो त्या वेदीबरोबर त्यावरच्या सर्वांची शपथ घेतो. २१ तसेच जो मंदिराची शपथ घेतो, तो मंदिर व त्यात राहणा-या याव्हे एलोहिमची देखील शपथ घेता.२२ जो आकाशांची शपथ घेतो, तो याव्हे एलोहिमच्या आसनाची व त्यावर बसणा-याचीही शपथ घेतो. २३ परूश्यांनो आणि तोराह च्या रब्बुनी नो (नियमशास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल. तुम्हीं ढोंगी आहात. तुमचे जे काही आहे त्याचा दशांश तुम्हीं याव्हे एलोहिमला देता.पुदिना, शेप, जिरे यांचा देखील दशांश देता. पण तोराहच्या (नियमशास्त्राच्या) महत्वाच्या गोष्टी म्हणजे, न्यायाने वागणे, दया दाखविणे, व प्रामाणिकपणे वागणे हे तुम्हीं पाळत नाही. या गोष्टी तुम्हीं केल्या पाहिजेत व तसेच इतरही केल्या पाहिजेत.

२४ तुम्हीं आंधळे वाटडे आहात, जो पाण्याने भरलेल्या प्याल्यातून माशी बाजूला करतो, व उंटासह पाणी पिऊन टाकतो त्याच्यासारखे तुम्हीं आहात. २५ परूश्यांनो आणि तोराह च्या रब्बुनी नो (नियमशास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल, तुम्हीं ढोंगी आहात. तुम्हीं आपल्या ताटवाटया बाहेरून घासता पुसता पण लोकांना फसवून कमावलेला फायदा आणि असंयम यानी त्या आतून भरल्या आहेत. २६ अहो परूश्यांनो, तुम्हीं आंधळे आहात! अगोदर तुमची वाटी आतून घासा व धुवा म्हणजे ती बाहेरून देखील खरोखर साफ होईल. २७ अहो परूश्यांनो, आणि तोराह च्या रब्बुनी नो (नियमसास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल, तुम्हीं ढोंगी आहात. रंगसफेदी केलेल्या कबरांसारखे तुम्हीं आहात. त्या बरून चांगल्या दिसतात, पण आतून मेलेल्या माणसांच्या हाडांनी भरल्या आहेत. तसेच सर्व प्रकारच्या अशुद्ध गोष्टींनी त्या भरल्या आहेत. २८ तुमचेही तसेच आहे. लोक तुमच्याकडे पाहतात, आणि तुम्हीं चांगले आहात असे त्यांना वाटते. पण तुम्हीं आतून ढोंग, व दुष्टपणा यांनी भरला आहात. २९ अहो परूश्यांनो, आणि तोराह च्या रब्बुनी नो ( नियमशास्त्राच्या शिक्षकांनो) तुम्हीं दुःखी व्हाल. तुम्हीं ढोंगी आहात, तुम्हीं नव्वीईम (संदेष्टयां) साठी कबरा बांधता. आणि जे लोक धार्मिक जीवन जगले, त्यांची थडगी सजवता.

३० आणि तुम्हीं म्हणाता, 'जर आम्हीं आमच्या वाडवडिलांच्या काळात जिवंत असतो, तर त्यांना या नव्वीईम ना (संदेष्टयांना) जिवे मारण्यास मदत केली नसती.' ३१ पण ज्यांनी ज्यांनी त्यांना जिवे मारले, त्यांचेच तुम्हीं वंशज आहात, याचा पुरावा तुम्हीं देता. ३२ पुढे व्हा, आणि तुमच्या वाडवडिलांनी सुरू केलेली पापी कामे पूर्ण करा! ३३ तुम्हीं साप आहात, विषारी सापाची पिल्ले आहात! तुम्हीं याव्हे एलोहिमच्या हातून सुटू शकणार नाही. तुम्हा सर्वांना दोषी ठरविण्यात येईल. तुम्हीं अग्नी गंधकाच्या सरोवरात जाल! ३४ मी तुम्हांला सांगतो की, मी तुमच्याकडे नव्वीईम (संदेष्टे), ज्ञानी लोक, आणि रब्बुनी (शिक्षक) पाठवीत आहे. त्यांच्यातील काहींना तुम्हीं जिवे माराल. त्यापैकी काहीना वधस्तंभावर खिळाल. त्यांच्यातील काहींना तुमच्या सभास्थानात मारहाण कराल, त्यांचा नगरानगरातून पाठलाग कराल. ३५ म्हणून ज्या चांगल्या लोकांचा वध या पृथ्वीवर झाला, त्या सर्वांसाठी तुम्हीं दोषी ठराल. हावेल या चांगल्या मनुष्याच्या वधासाठी तुम्हीं दोषी ठराल. आणि तुम्हीं बरख्याचा बेन (मुलगा) जख-याला जिवे मारण्याविषयी दोषी ठराल. त्याला मंदिर आणि वेदी यांच्यामध्ये मारले होते. हावेलाच्या काळापासून ते जख-याच्या काळापर्यंत जे जे चांगले लोक मारण्यात आले, त्यांच्या वधाविषयी तुम्हीं दोषी ठराल. ३६ मी तुम्हांला खरे सांगतो, तुम्हीं लोक जिवंत असेपर्यंत या गोष्टी

घडतील.

३७ अगे यरूशलेमे, यरूशलेमे, तू नव्वीईमला (संदेष्टयांना) जिवे मारतेस. याव्हे एलोहिमने तुझ्याकडे पाठविलेल्या लोकांना दगडमार
करतेस. कोंबडी जशी आपल्या पिल्लांना पंखाखाली एकवटते, तसे तुझ्यातील लोकांना एकवटण्याचा पुष्कळ वेळा मी प्रयत्न केला,
पण तू मला तसे करू दिले नाहीस. ३८ आता तुझे घर उजाड होईल. ३९ मी तुला सांगतो, 'अदोनाईच्या नावाने येणारा धन्यवादित
असो, असे म्हणे पर्यंत तू मला पाहणार नाहीस."

२४. १ येशूवाह मंदिरातून बाहेर निघून चालत निघाला होता. तेंव्हा त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्याकडे आले. कारण त्यांना
त्याला मंदिराच्या इमारती दाखवायच्या होत्या. २ प्रतिसाद दाखल तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं या सर्व गोष्टी पाहता खरे ना? आता
मी तुम्हांला खरे सांगतो, येथे एक दगड दुस-या दगडावर राहणार नाही, त्यातील प्रत्येक दगड खाली टाकला जाईल." ३ येशूवाह
जैतूनाच्या डोंगरावर बसला असताना त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्याशी एकांतात बोलावे म्हणून आले. ते म्हणाले, "आम्हांला सांगा
की, या गोष्टी कधी होतील? तुम्हीं परत येण्याचा, आणि जगाचा शेवट होण्याचा काळ जवळ आला आहे, हे आम्हीं कोणत्या
घटनांवरून ओळखावे?" ४ येशूवाहने त्यांना उत्तर दिले, "सांभाळा! कोणीही तुम्हांला फसवू नये. ५ मी हे सांगतो, कारण असे
पुष्कळ आहेत की, जे माझ्या नावाने येतील आणि ते म्हणतील, 'मी मशीहा आहे.' आणि ते पुष्कळ लोकांना फसवितील. ६ तुम्हीं
लढायांबद्दल, आणि लढायांच्या अफवाबद्दल ऐकाल. पण त्यामुळे तुम्हीं त्यांना भिऊ नका. या गोष्टी घडल्याच पाहिजेत, तरी
इतक्यात शेवट जवळ येणार नाही. ७ होय एक राष्ट्र दुस-या राष्ट्रवर उठेल. अनेक ठिकाणी भूकंप व दुष्काळ येतील. ८ पण या
सर्व गोष्टी म्हणजे प्रसूतीच्या कळांची सुरूवात अशा आहेत.

९ लोक तुमच्याशी वाईट वागतील. तुमचा छळ व्हावा आणि तुम्हांला जिवे मारावे यासाठी, लोक तुम्हांला राज्यकर्त्यांच्या हाती
देतील. सर्व लोक तुमचा व्देष करतील. तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेवला, म्हणून या गोष्टी तुमच्यावर ओढवतील. १० अशा वेळी
बरेच विश्वासणारे आपला विश्वास गमवतील. ते एकमेकाविरूद्ध उठतील, आणि एकमेकांचा व्देष करतील. ११ अनेक खोटे
नव्वीईम (संदेष्टे) येतील. ते लोकांना चुकीचे शिक्षण देतील, व त्यावर विश्वास ठेवायला लावतील. १२ सतत वाढणा-या दुष्टाई
मुळे अधिकाधिक विश्वासणा-यांची प्रीति कमी कमी होत जाईल. १३ पण जो मनुष्य शेवटपर्यंत खंबीरपणे वागेल तोच तारला
जाईल. १४ सर्व जगभर याव्हे एलोहिमची सुवार्ता गाजविली जाईल, व हे सर्व राष्ट्रातील लोकांना साक्ष असे होईल, आणि मग
शेवट होईल. १५ दानीएल नव्वीने (संदेष्टयाने) एका अमंगळ गोष्टीविषयी सांगितले की, जिच्यामुळे नाश ओढवेल. आणि
अमंगळ गोष्ट ही मंदिरामध्ये उभी पाहाल." तुम्हीं जे हे वाचाल ते याचा अर्थ समजून घ्या. १६ त्यावेळी यहूदातील लोकांनी
डोंगरावर पळून जावे. १७ जो कोणी छपरावर असेल, त्याने घरातील सामान घेण्यासाठी उतरू नये. १८ जर कोणी शेतात असेल,
तर त्याने आपला सदरा घेण्यासाठी परत जाऊ नये. १९ त्याकाळी गर्भवती असलेल्या अगर तान्ही बालके असलेल्या स्त्रियांना फार
कठीण जाईल! २० जेंव्हा या गोष्टी होतील आणि तुम्हांला पळून जावे लागेल, तेंव्हा थंडीचे दिवस नसावेत, अथवा शव्वाथ दिवस
नसावा, यासाठी प्रार्थना करा. २१ कारण त्याकाळी फार संकटे येतील. जगाच्या आरंभापासून कधीही आले नाही, आणि पुन्हा
कधी येणार नाही, अशी संकटे त्या काळी भोगावी लागेल. २२ आणखी याव्हे एलोहिमने ते दिवस जर कमी केले नसते, तर
कोणीच वाचले नसते. परंतु त्याच्या निवडलेल्याकरिता तो ते दिवस कमी करील.

२३ त्या वेळी जर एखाद्याने तुम्हांला म्हंटले, 'पाहा मशीहा येथे आहे. किंवा तेथे आहे', तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका. २४
खोटे मशीहा आणि खोटे नव्वी (संदेष्टे) उदयास येतील. ते महान व आश्चर्यकारक चिन्हे दाखवतील. याव्हे एलोहिमच्या
निवडलेल्या लोकांना ते चिन्हे दाखवतील, व लोकांना एवढेच नव्हे तर याव्हे एलोहिमच्या निवडलेल्यांना फसविण्याचा प्रयत्न
करतील. २५ या गोष्टी होण्या अगोदर मी तुम्हांला सावध केले आहे. २६ एखादा मनुष्य तुम्हांला सांगेल, 'पाहा मशीहा ओसाड
रानात आहे.' तर तेथे जाऊ नका. किंवा जर ते म्हणाले 'पाहा मशीहा आतल्या खोलीत लपला आहे', तर त्याच्यावर विश्वास ठेवू

नका. २७ मी हे सांगतो, कारण वीज जशी पूर्वेकडून पश्चिमेकडे चमकताना सर्वांना दिसते, तसेच मनुष्याच्या मुलाचे येणे देखील असेल. २८ जेथे कोठे प्रेत असेल तेथे गिधाडेही असतील. २९ छळानंतर लगेच असे होईल. सूर्य अंधकारमय होईल, व चंद्र प्रकाश देणार नाही. आकाशातील तारे व नक्षत्रे गळून पडतील, आकाशातील सर्व शक्ती डळमळतील, आकाश गुंडाळीसारखे गुंडाळले जाईल.

३० त्या वेळेला मनुष्याच्या मुलाचे येण्याचे चिन्ह आकाशात दिसेल. तेंव्हा जगातील सर्व लोक शोक करतील. मनुष्याच्या मुलाला सर्व जण मेघावर बसून येताना पाहतील. तो महासामर्थ्य आणि वैभव यांच्यासह येईल. ३१ मनुष्याचा मुलगा तुतारीचा मोठा नाद करून आपले मालाक (दूत) पृथ्वी भोवती पाठवून देईल. ते पृथ्वीच्या चारही कोप-यातून, आकाशाच्या एका सीमेपासून दुस-या सीमेपर्यंत, त्याच्या निवडलेल्यांना एकत्र करतील.

३२ अंजिराच्या झाडापासून शिका. अंजिराच्या झाडाच्या फांद्या जेंव्हा हिरव्या आणि कोवळया असतात आणि पाने फूटू लागतात, तेंव्हा उन्हाळा जवळ आला हे तुम्हांला कळते. ३३ मी तुम्हांला ज्याविषयी सांगितले त्याबाबतीतही असेच होईल. जेंव्हा या सर्व गोष्टी तुम्हीं पाहाल, तेंव्हा वेळ जवळ येत आहे हे तुम्हीं ओळखाल. ३४ मी तुम्हांला खरे सांगतो, या घटना होत असताना आजची पिढी नाहीशी होणार नाही. ३५ सर्व जग आकाश पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचने कधीही नष्ट होणार नाहीत. ३६ पण त्या दिवसाविषयी आणि त्या घटकेविषयी कोणालाही माहीत नाही. शाम्माईम (आकाशातील) याव्हे एलोहिम मालाक ला (देवदूतांला) नाही. किंवा खुद्द मुलालाही नाही. फक्त याव्हे अव्वाला हे माहिती आहे. ३७ नोहाच्या काळी घडले तसे मनुष्याच्या मुलाच्या येण्याच्या वेळेसही होईल. ३८ महापूर येण्या अगोदर लोक खातपीत होते, लोक लग्न करीत होते, लग्न करून देत होते. नोहा तारवात जाईपर्यंत लोक या गोष्टी करीत होते. ३९ त्यांना माहीत नव्हते की, काही तरी घडणार आहे. परंतु नंतर महापूर आला आणि सर्व लोक मरून गेले. मनुष्याच्या मुलगा आल्यावर असेच होईल. ४० दोघे जण शेतात एकत्र काम करत असतील, तर त्यातला एक जण घेतला जाईल, आणि दुसरा तेथेच राहिल. ४१ दोन स्त्रिया जात्यावर धान्य दळत असतील, तर त्या दोघीतील एक वर घेतली जाईल, आणि दुसरी तेथेच ताहील. ४२ म्हणून तुम्हीं तयार असा. कारण तुम्हांला माहीत नाही की कोणत्या दिवशी तुमचा अदोनाई येत आहे. ४३ हे लक्षात ठेवा, चोर केंव्हा येईल हे जर घराच्या मालकाला माहीत असते, तर तो त्यासाठी तयारीत राहिला असता, आणि त्याने चोराला घर फोडू दिले नसते. ४४ या कारणासाठी तुम्हीं सुद्धा तयार असले पाहिजे, जेंव्हा तुम्हांला अपेक्षा नसेल तेंव्हा मनुष्याचा मुलगा येईल.

४५ शहाणा आणि विश्वासू सेवक कोण बरे? दुस-या सेवकांना वेळेवर जेवण देण्याचे काम मालक एका सेवकावर सोपवितो. हे काम करण्यासाठी मालक कोणाला विश्वासाने सांगेल? ४६ मालक आल्यावर आपले दिलेले काम करीत असलेल्या सेवक खरोखर आशिर्वादीत आहे. ४७ मी तुम्हांला सांगतो, मालक आपल्या सर्व मालमत्तेवर त्या सेवकाची नेमणूक करील. ४८ पण जर सेवक वाईट निघाला, आणि आपला मालक लवकर घरी परत येणार नाही. असे म्हणाला, तर काय होईल ४९ तो सेवक इतर सेवकांना मारहाण करील, आणि आपल्या सारख्या लोकावरोबर जेवण करील, आणि दारू पिऊन मस्त होईल. ५० आणि तो सेवक तयारीत नसेल अशा वेळी मालक येईल. ५१ मग मालक त्या सेवकाचे तुकडे करील. त्या सेवकाला मालक ढोंगी लोकांबरोबर राहायला पाठवील. आणि त्या ठिकाणी रडणे व दात खाणे चालेल.

**२५.** १ त्या दिवसांत आकाशाचे राज्य दहा कुमारीकांसारखे असेल, त्यांनी त्यांचे दिवे घेतले, व वराला भेटण्यास गेल्या. २ त्या दहा कुमारी पैकी पाच मूर्ख होत्या, आणि पाच शहाण्या होत्या. ३ मूर्ख कुमारीने आपले दिवे घेतले, पण दिव्यासाठी तेल घेतले नाही. ४ शहाण्या कुमारीने दिव्यावरोबर तेलही घेतले. ५ वराला उशीर झाल्याने सर्वाच कुमारीना डुकल्या लागल्या व त्या झोपी गेल्या.६ मध्यरात्री कोणीतरी घोषणा केली, वर येत आहे! बाहेर जाऊन त्याला भेटा! ७ सर्व कुमारी जाग्या झाल्या त्यांनी आपले दिवे तयार केले ८ पण मूर्ख कुमारी शहाण्या कुमारींना म्हणाल्या, 'तुमच्यातील काही तेल आम्हांला द्या. आमचे दिवे विझत आहेत.९ पण उत्तरदाखल शहाण्या कुमारी म्हणाल्या, 'नाही आम्हीं तुम्हांला काहीच देऊ शकत नाही. नाहीतर तुम्हांला व आम्हांलाही पुरणार नाही. त्या ऐवजी तेल विकणा-याकडे जा आणि आपणांसाठी तेल विकत आणा.' १० पाच मूर्ख कुमारी तेल

विकत घ्यायला निघाल्या, तेंव्हा वर आला. तेंव्हा ज्या कुमारी तयार होत्या, त्या मेजवानींसाठी त्याच्या बरोबर आत गेल्या. मग
दार बंद झाले. ११ शेवटी उरलेल्या पाच कुमारी आल्या आणि म्हणाल्या, 'महाराज, महाराज,' दार उघडा!' १२ पण तो त्यांना
उत्तरदाखल म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, मी तुम्हांला ओळखीत नाही." १३ म्हणून नेहमी तयार असा. कारण मनुष्याचा
मुलगा कधी येणार, तो दिवस व ती वेळ तुम्हांला माहीत नाही.१४ आकाशाचे राज्य अशा मनुष्यासारखे आहे. जे प्रवासाला जाण्या
अगोदर, आपल्या नोकरांना बोलावून आपल्या मालमत्तेवर लक्ष देण्यास सांगणा-या, मनुष्यासारखे आकाशाचे राज्य आहे. १५
त्याच्यातील एकाला त्याने पाच थैली दिल्या ( मुळात मराठीमध्ये, तालांत. म्हणजे वीस किलो चांदी. इंग्रजीमध्ये एक टायलेन्ट
म्हणजे चाळीस किलो चांदी किंवा वीस किलो सोने इतके एक थैलीचे प्रमाण आहे.) दुस-याला त्याने दोन तालांत थैल्या रूपये
दिली. आणि तिस-याला त्याने एक तालांत थैली दिले.प्रत्येकाला त्याच्या त्याचा कुवतीप्रमाणे त्याने धनाच्या थैल्या दिल्या. मग तो
आपल्या प्रवासाला गेला. १६ ज्याला पाच थैल्या धन दिले होते, त्याने त्याप्रमाणे काम करायला सुरूवात केली आणि आणखी पाच
थैल्या धन त्याने मिळविले. १७ त्याचप्रमाणे ज्याला दोन थैल्या धन मिळाले होते त्याने आणखी दोन थैल्या धन कामविले. १८ पण
ज्याला एक थैली मिळाली होती. त्याने जमिनीत एक खडडा खोदला आणि मालकाचे धन त्यात लपविले.

१९ बराच काळ लोटल्यानंतर त्या नोकरांचा मालक आला, व त्याने त्यांचा हिशेब घ्यायला सुरूवात केली. २० ज्याला पाच थैल्या
धन मिळाले होते. त्याने मालकाकडे धनाच्या आणखी पाच थैल्या आणून दिल्या. तो म्हणाला, मालक तुम्हीं दिलेल्या धनांवर मी
आणखी पाच थैल्या धन मिळविले. २१ त्याचा मालक म्हणाला, "शब्बास चांगल्या आणि इमानी दासा तू भरवसा ठेवण्यायोग्य नोकर
आहेस. त्या थोडया धनांचा तू चांगला वापर केलास म्हणून मी पुष्कळावर तुझी नेमणूक करीन. आता जा आणि आपल्या
मालकाच्या आनंदात सहभागी हो!" २२ नंतर ज्या मनुष्याला धनाच्या दोन थैल्या मिळाल्या होत्या तो मालकाकडे आला. आणि
म्हणाला "मालक तुम्हीं मला धनाच्या दोन थैल्या दिल्या होत्या, त्यापासून मी आणखी दोन थैल्या कमाविल्या." २३ मालक म्हणाला,
"चांगल्या आणि इमानी दासा! तू थोडया धनाविषयी इमानीपणे वागलास. म्हणून मी तुझी आणखी पुष्कळाशा गोष्टीवर नेमणूक
करीन. आता जा आणि आपल्या मालकाच्या आनंदात सहभागी हो!" २४ नंतर ज्याला धनाची एक थैली मिळाली होती. तो
मालकाकडे आला व म्हणाला, "मालक मला माहीत होते की, आपण एक करडया शिस्तीचे मनुष्य आहात. जेथे पेरणी केली
नाही, तेथे तुम्हीं कापणी करता. आणि जेथे बी पेरले नाही, तेथे पीक घेता. २५ मला आपली भीती होती. म्हणून मी जाऊन
तुमच्या धनाची थैली नमिनीत लपवून ठेवली. हे घ्या तुमचेच आहेत!" २६ मालकाने उत्तर दिले, 'अरे वाईट आणि आळशी नोकरा!
मी जेथे पेरणी केली नाही, तेथे कापणी करतो. आणि जेथे बी पेरले नाही, तेथे पीक घेतो हे तुला माहीत होते. २७ तर तू माझे
धन पेढीत ठेवायचे होतेस, म्हणजे मी घरी आल्यावर मला व्याजासहित धन मिळाले असते.२८ म्हणून मालकाने दुस-या नोकरांना
सांगितले. याच्याजवळची धनाची थैली घ्या. आणि ज्याच्याजवळ धनाच्या दहा थैल्या आहेत त्याला द्या. २९ कारण आपल्याकडे
जे आहे. त्याचा वापर करणा-याला आणखी देण्यात येईल. आणि त्याला त्याच्या गरजेपेक्षा जास्त मिळेल. पण जो आपल्याजवळ
असलेल्याचा उपयोग करीत नाही, त्याच्याजवळ जे काही असेल ते सर्व त्याजपासून काढून घेण्यात येईल. ३० नंतर मालक म्हणाला,
'त्या निकामी नोकराला बाहेरच्या अंधारात घालवून द्या. तेथे रडणे व दात खाणे चालेल.'

३१ मनुष्याचा मुलगा जेंव्हा त्याच्या आकाशातील गौरवाने आपल्या याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदूता) सह येईल, तेंव्हा तो त्याच्या
गौरवी आसनावर बसेल. ३२ मग सर्व राष्ट्रे त्याच्यासमोर एकत्र जमतील. त्यांना तो एकमेकांपासून विभक्त करील. ज्याप्रमाणे
मेंढपाळ मेंढरे शेरडांपासून वेगळी करतो. ३३ तो मेंढरांना आपल्या उजवीकडे बसवील पण तो शेरडांना तो डावीकडे बसवील. ३४
मग राजा जे त्याच्या उजवीकडे आहेत त्यांना म्हणेल, 'या जे तुम्हीं माझ्या अव्वाचे आशिर्वादीत आहात! जे तुमच्यासाठी तयार केले
आहे, त्या राज्याचे वतनदार व्हा. हे राज्य जगाच्या स्थापनेपासून तयार केले आहे. ३५ हे तुमचे राज्य आहे. कारण जेंव्हा मी
भुकेला होतो, तेंव्हा तुम्हीं मला खायला दिले. मी तहानेला होतो, तेंव्हा तुम्हीं मला प्यावयास दिले. मी प्रवासी असता तुम्हीं माझा
पाहुणचार केला. ३६ मी उघडा होतो तेंव्हा तुम्हीं मला कापडे दिले. मी आजारी होतो तेंव्हा तुम्हीं माझी काळजी घेतली. मी

तुरूंगात होतो, तेंव्हा तुम्हीं माझ्या समाचार घेण्यास आला.' ३७ मग जे नीतिमन आहेत ते उत्तर देतील, "अदोनाई आम्हीं तुला केंव्हा भुकेला व तहानेला पाहिला, आणि तुला खायला आणि प्यायला दिले?

३८ आम्ही तुला प्रवासी म्हणून कधी पाहिले, आणि तुझा पाहुणचार केला? किंवा आम्हीं तुला केंव्हा उघडे पाहिले, व कापडे दिले? ३९ आणि तू आजारी असताना आम्हीं तुला कधी भेटायला आलो? किंवा तुरूंगात असताना कधी तुझा समाचारास आलो?' ४० मग राजा त्यांना उत्तर देईल, "मी तुम्हांला खरे सांगतो, येथे असलेल्या माझ्या बांधवातील अगदी लहानातील एकाला तुम्हीं केले, तर ते तुम्हीं मलाच केले." ४१ मग राजा आपल्या डाव्या बाजूच्यांना म्हणेल, "माझ्यापासून दूर जा. तुम्हीं शापित आहात. अनंतकाळच्या अग्नीत जा. हा अग्नी सैतान व त्याच्या मालाक (दूतां) साठी तयार केला आहे. ४२ ही तुमची शिक्षा आहे. कारण मी भुकेला होतो, पण तुम्हीं मला काही खायला दिले नाही. मी तहानेला होतो, पण तुम्हीं मला काही प्यावयास दिले नाही. ४३ मी प्रवासी असता माझा पाहुणचार केला नाही, मी उघडा होतो पण तुम्हीं मला कापडे दिले नाहीत, मी आजारी होतो आणि तुरूंगात होतो, पण तुम्हीं माझी काळजी घेतली नाही.४४ मग ते लोक सुद्धा त्याला उत्तर देतील, "अदोनाई आम्हीं कधी तुला उपाशी अगर तहानेले पाहिले किंवा प्रवासी म्हणून कधी पाहिले. किंवा उघडा आजारी किंवा तुरूंगात कधी पाहिले. आणि तुला मदत केली नाही?' ४५ मग राजा त्यांना उत्तर देईल, "मी तुम्हांला खरे सांगतो, माझ्या अनुयायातील लहानातील लहानाला काही करण्याचे जेंव्हा तुम्हीं नाकारले, तेंव्हा तेंव्हा ते तुम्हीं मला करण्याचे नाकारले.' ४६ मग ते अनीतिमान लोक अनंतकाळच्या शिक्षेसाठी जातील, पण नीतिमान अनंतकाळच्या जीवनासाठी जातील."

**२६.** १ येशूवाहने या सर्व बोधकथा सांगण्याचे संपविल्यानंतर तो त्याच्या थालमीद (शिष्यां) ना म्हणाला, २" परवा पेसॅह (वल्हांडणा) चा सण आहे, हे तुम्हांला माहीत आहे. आणि मनुष्याचा मुलगा वधस्तंभावर खिळून जिवे मारला जाण्यासाठी शत्रूच्या हाती धरून दिला जाईल." ३ मग एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी), आणि लोकांचे वडील एलयोवन कोहेन (मुख्य याजका), च्या घरी जमले, एलयोवन कोहेन (मुख्य याजकांचे), नाव कयफा होते.४ सभेत त्यांनी धूर्तपणे येशूवाहला अटक करण्याचा, आणि जिवे मारण्याचा कट केला. ५ तरीही ते म्हणत होते, "वल्हांडण सणाच्या दिवसात आपण येशूवाहला धरू शकणार नाही. कारण लोकांमध्ये दंगा होईल."

६ येशूवाह वेथानीमध्ये होता, तो शिमोन कुष्ठरोग्याच्या घरात होता. ७ येशूवाह तेथे असताना एक बाई त्याच्याकडे आली. फार मोलवान सुगंधी अत्तराने भरलेली अलाबास्त्र कुपी तिच्याजवळ होती.येशूवाह जेवत असता ही कुपी त्या बाईने त्याच्या डोक्यावर ओतली. ८ त्या बाईला हे करताना थालमीद (शिष्यां) नी पाहिले तेव्हा त्यांना राग आला. थालमीद विचारू लागले, "या अत्तराचा असा नाश का व्हावा? ९ ते पुष्कळ पैशांना विकत आले असते, आणि ते पैसे गोरगरीबांना देता आले असते." १० येशूवाह ते काय बोलत आहेत, हे माहीत होते. त्याने त्यांना विचारले, "तुम्हीं त्या बाईला का त्रास देत आहा? तिने माझ्यासाठी फार चांगले काम केले आहे. ११ गरीब लोक तुमच्याबरोबर नेहमीच असतील, पण मी तुमच्याबरोबर नेहमी असणार नाही. १२ या बाईने माझ्या शरीरावर हे अत्तर ओतले. मला पुरण्याच्या वेळेची तयारी तिने केली. १३ मी तुम्हांला खरे सांगतो, सर्व जगातील लोकांना सुवार्ता सांगितली जाईल, आणि जेथे सुवार्ता सांगण्यात येईल, तेथे या बाईने जे केले त्याचे वर्णन तिची आठवण म्हणून करण्यात येईल."

१४ बारा थालमीद (शिष्यां) पैकी एक यहूदा इस्कार्योत एलयोवन कोहेन (मुख्य याजकां), कडे गेला. १५ यहूदा म्हणाला, " मी येशूवाहला धरून तुमच्या हाती दिले, तर तुम्हीं मला काय द्याल?" तेंव्हा त्यांनी त्याला चांदीची तीस नाणे दिले. १६ तेंव्हापासून यहूदा येशूवाहला धरून देण्याच्या संधीची वाट पाहू लागला.

१७ बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी येशूवाहचे थालमीद त्याच्याकडे आले. ते म्हणाले, "पेसॅह (वल्हांडण) सणाच्या जेवणाची सर्व तयारी आम्हीं करणार आहोत. पेसॅह (वल्हांडण) सणाचे जेवण कोठे करावे, अशी तुमची इच्छा आहे?" १८ येशूवाह म्हणाला, "ज्याला मी ओळखतो अशा त्या माणसाकडे खेडयात जा. आणि त्याला सांगा, "रब्बुनी (गुरूजी) म्हणतात माझी वेळ

जवळ आली आहे, तुझ्या घरी मी माझ्या थालमीद सह पेसॅह (वल्हांडण) सण साजरा करणार आहे." १९ येशूवाहने जे सांगितले होते, ते त्याच्या थालमीद (शिष्यां) नी केले. आणि त्यांनी पेसॅह (वल्हांडण) सणाचे जेवण तयार केले. २० संध्याकाळ झाल्यावर येशूवाह आपल्या थालमीद बरोबर मेजाशी जेवावयास बसला. २१ जेवण करीत असता येशूवाह म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यापैकी एक जण माझा विश्वासघात करील."२२ ते खुप दुःखी झाले आणि त्यांच्यातील प्रत्येक जण त्याला विचारू लागला,"तो मी नाही ना अदोनाई?"

२३ मग येशूवाहने उत्तर दिले, " जो माझ्याबरोबर ताटात हात घालतो, तोच माझा विश्वासघात करील. २४ जसे मनुष्याच्या मुलाविषयी शास्त्रलेखात लिहिले आहे, तसा मनुष्याच्या मुलाचा शेवट होईल. पण जो त्याचा विश्वासघात करील त्याच्या विषयी मला दुःख वाटते, तो जर जन्मला नसता तर त्याच्यासाठी ते बरे झाले असते." २५ मग यहूदा जो त्याचा विश्वासघात करणार होता. तो येशूवाह कडे वळून म्हणाला, "तो मी आहे का रब्बुनी (गुरूजी)." येशूवाह त्याला म्हणाला, " तू म्हणालास तसेच आहे (म्हणजे होय तो तूच आहेस")

२६ ते जेवण करीत असताना येशूवाहने भाकर घेतली, तिच्याबद्दल याव्हे एलोहिमचे उपकार मानले. आणि ती मोडली त्याने ती भाकर आपल्या थालमीद (शिष्यां) ना दिली. तो म्हणाला, हे घ्या आणि खा, हे माझे शरीर आहे." २७ नंतर येशूवाहने द्राक्षारसाचा प्याला घेतला, त्याबद्दल याव्हे एलोहिमचे उपकार मानले, आणि तो थालमीद (शिष्यां) ना दिला. येशूवाह म्हणाला, "तुम्हीं सर्वांनी यातील प्यावे, कारण हे माझे रक्त आहे. २८ हे नवा करार प्रस्थापित करते, ते पुष्कळ लोकांकरिता ओतले जात आहे. यासाठी की, त्यांच्या पापांची क्षमा व्हावी.२९ मी तुम्हांला सांगतो, माझ्या अब्बाच्या राज्यात आपण सर्व एकत्र होईपर्यंत, मी नवा द्राक्षारस पिणार नाही." ३० मग त्यांनी पेसॅह (वल्हांडणा) चे गीत गाईले. नंतर ते जैतूनाच्या डोंगरावर निघून गेले.

३१ येशूवाहने सांगितले, "आज रात्रीच तुमच्या मनात माझ्याविषयी शंकाकुशंका येतील, आणि माझ्यावरील तुमचा विश्वास उडेल. शास्त्रलेखात असे लिहिले आहे, 'मी मेंढपाळाचा वध करीन. कळपातील मेंढरांची दाणादाण होईल.' ३२ पण मी मरणातून उठल्यानंतर तुमच्या अगोदर गालीलात जाईल." ३३ उत्तर देताना केफा म्हणाला, "इतर सर्वांचा जरी तुमच्याविषयी गोंधळ झाला, तरी माझा कधीही होणार नाही." ३४ येशूवाह त्याला म्हणाला, "मी तुला खरे सांगतो, तू मला ओळखत नाहीत, असे आज रात्री कोंबडा आरवण्यापूर्वी तू तीन वेळा म्हणशील." ३५ केफा म्हणाला, " तुम्हांला ओळखीत नाही, असे मी कधीही म्हणणार नाही. मग मला तुमच्या बरोबर मरावे लागले तरी हरकत नाही." आणि इतर थालमीद (शिष्य) सुद्धा म्हणाले.

३६ नंतर गेथशेमाने नावाच्या जागी येशूवाह आपल्या थालमीद सह गेला. येशूवाह त्यांना म्हणाला, "मी थोडा पुढे जाऊन प्रार्थना करीपर्यंत येथेच थांबा. ३७ येशूवाहने केफा आणि दोन जब्दीचे मुले यांना आपल्याबरोबर यायला सांगितले. यानंतर येशूवाह मनातून फार दुःखी व व्याकूळ होऊ लागला. ३८ येशूवाह केफाला, व जब्दीच्या दोघा मुलांना म्हणाला, "माझे दुःख मला इतके झाले आहे की, ते मला मारून टाकील. येथे थांबा व माझ्यावरोबर जागे राहा." ३९ तो थोडे अंतर पुढे गेला, आणि जमिनीवर ओणवून प्रार्थना करू लागला."हे माझ्या अब्बा शक्य झाले तर हा दुःखाचा प्याला माझ्यापुढून जाऊ दे. तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको, तर तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे." ४० मग तो थालमीद (शिष्यां) कडे परत गेला, तेंव्हा ते झोपी गेले आहेत, असे त्याला आढळले. येशूवाह केफाला म्हणाला, "तुम्हा लोकांना माझ्याबरोबर एखादा तासही जागे राहता येत नाही काय? ४१ आपण परीक्षेत पडू नये म्हणून जागे राहा, आणि प्रार्थना करीत राहा. यासाठी की, तुम्हीं मोहात पडू नये. जे योग्य आहे ते तुमचा आत्मा करू इच्छितो. पण तुमचे शरीर अशक्त आहे." ४२ नंतर दुस-यांदा जाऊन येशूवाह प्रार्थना करू लागला, "हे माझ्या अब्बा, जर दुःखाचा हा प्याला पिणे मला अटळच आहे, तर तुझी इच्छा असेल तसे होवो." ४३ नंतर येशूवाह थालमीद (शिष्यां) कडे परत गेला, तेंव्हा त्याला आढळून आले, त्यांचे डोळे जड झाले होते, व ते झोपी गेले आहेत. कारण जागे राहणे त्यांना शक्य होत नव्हते. ४४ नंतर येशूवाह थालमीद (शिष्यां) ना पुन्हा तसाच पुढे गेला, आणि त्याने प्रार्थना केली. तिस-या वेळी प्रार्थना करताना

त्याने पुन्हा हेच शब्द उच्चारले. ४५ यानंतर येशूवाह परत थालमीद कडे गेला आणि त्यांना म्हणाला, “तुम्ही अजून झोप आणि विश्रांतीच घेत आहात का? ऐका! मनुष्याचा मुलगा पापी लोकांच्या हाती धरून दिला जाण्याची वेळ आली आहे. ४६ उठा! आपल्याला निघालेच पाहिजे. हा पाहा मला धरून शत्रूच्या हाती देणारा येत आहे.”

४७ येशूवाह हे बोलत असतानाच बारा जणांपैकी एक जो यहूदा तो तेथे आला, त्याच्याबरोबर बरेच लोक होते. एलयोवन कोहेन (मुख्य याजक), लोकांचे वडीलजन यांनी त्यांना पाठविले होते. ते लोक तलवारी व सोटे घेऊन आले होते. ४८ येशूवाहला विश्वासघाताने धरून लोकांच्या हाती देणारा यहूदा याने हाच येशूवाह आहे. याविषयी एक खूण सांगितली होती. यहूदा म्हणाला, “ज्या मनुष्याचे मी चुंबन घेईन तोच येशूवाह होय, त्याला तुम्हीं धरा. ४९ मग यहूदा येशूवाह कडे गेला आणि म्हणाला, “रब्बुनी” (गुरूजी) आणि यहूदाने येशूवाहचे चुंबन घेतले. ५० येशूवाह त्याला म्हणाला, “मित्रा जे करण्यास आलास ते कर!” मग येशूवाह कडे आला. त्यांनी येशूवाह वर हात टाकले, व त्याला धरले. ५१ हे झाल्यावर येशूवाह बरोबर असलेल्या एका अनुयायाने तलवारीला हात घातला, आणि ती उपसली. त्याने एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), नोकराचा कान कापला. ५२ येशूवाह त्या मनुष्याला म्हणाला, “तू आपली तलवार म्यानात ठेव. जे तलवारीचा वापर करतात ते तलवारीनेच मरतात. ५३ मी माझ्या अब्बाला सांगितले तर तो याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) च्या बारापेक्षा अधिक पलटणी पाठवील, हे तुम्हांला कळत नाही काय? ५४ परंतु हे अशाच रीतीने झाले पाहिजे असा शास्त्रलेखात जो लेख आहे, तो कसा काय पूर्ण होईल?” ५५ यानंतर येशूवाह सर्व लोकांमध्ये म्हणाला, “जसा मी कोणी गुन्हेगार आहे, अशा रीतीने तुम्हीं तलवारी व सोटे हाती घेऊन, मला धरायला माझ्यावर चाल करून आला काय? मी दररोज मंदिरात शिक्षण देत असता, तुम्हीं मला धरले नाही. ५६ परंतु या सर्व गोष्टी अशासाठी झाल्या आहेत की, नव्वीईमनी (संदेष्टयांनी) जे लिहिले होते, ते पूर्ण व्हावे.” नंतर येशूवाहचे सर्व थालमीद (शिष्य) त्याला सोडून पळून गेले.

५७ त्या लोकांनी येशूवाहला धरले, त्यांनी त्याला एलयोवन कोहेन (मुख्य याजक), कयफा याच्या घरी नेले. तेथे तोराह चे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) आणि वडीलजन एकत्र जमले होते. ५८ केफा काही अंतर ठेवून येशूवाहच्या मागे चालला होता, केफा येशूवाहच्या मागे एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), आवारापर्यंत गेला. आणि काय होते, ते पाहण्यासाठी नोकरांसोबत बसला.५९ येशूवाहला मरणदंड द्यावा म्हणून एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि सर्व यहूदी सभा त्याच्याविरूद्ध काही खोटे दोषारोप करता येईल काय, याचा प्रयत्न करू लागले. खोटी साक्ष देणारे लोक सापडतात काय, याचा शोध घेऊ लागले. ६० पुष्कळ लोक पुढे आले, आणि येशूवाह विरूद्ध साक्ष देऊ लागले. परंतु येशूवाहला जिवे मारण्याचे काहीही कारण यहूदी सभेला सापडेना. शेवटी दोन माणसे पुढे आली ती म्हणू लागली, ६१ हा मनुष्य असे म्हणाला की, याव्हे एलोहिमचे मंदिर मी पाडू शकतो, आणि ते तीन दिवसात पुन्हा बांधू शकतो.” ६२ तेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) उठून येशूवाहला म्हणाला, “ हे लोक तुझ्याविरूद्ध साक्ष देत आहेत, तुझ्याविरूद्ध जे आरोप आहेत. त्याविषयी तुला काही सांगायचे आहे का? हे सर्व खरे सांगत आहे काय? ६३ पण येशूवाहाने काहीच उत्तर दिले नाही. परत एकदा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) येशूवाहला म्हणाला, “जिवंत याव्हे एलोहिमच्या नावाची शपथ, मी तुला बजावून सांगतो की, खरे काय ते तू सांग! तू याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहेस काय?” ६४ येशूवाह त्यांना म्हणाला, “होय मी आहे, जसे तू म्हणतोस तरी मी तुम्हांला सांगतो, ह्यापुढे मनुष्याच्या मुलाला तुम्हीं ढगातून येताना पाहाल, व त्याला याव्हे एलोहिमच्या उजवीकडे बसलेले पाहाल.” ६५ जेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य याजकाने), हे ऐकले, तेंव्हा तो फार संतापला. आपले कपडे फाडून तो म्हणाला, “याने याव्हे एलोहिम विरूद्ध दुर्भाषण केले आहे! आम्हांला आणखी साक्षीदारांची गरज राहिली नाही. त्याला याव्हे एलोहिमची निंदा करताना तुम्हीं ऐकले! ६६ तुम्हांला काय वाटते?” यहूद्यांनी उत्तर दिले, “तो अपराधी आहे, आणि त्याला मेलेच पाहिजे.” ६७ तेंव्हा तो त्याच्यावर थुंकले, त्यांनी त्याला मारले. दुस-यांनी चपराका मारल्या. ६८ ते म्हणाले, “मशीहा आमच्यासाठी भविष्य सांग! तुला कोणी मारले?”

६९ यावेळी केफा वाडयाच्या अंगणात बसला होता. एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), दासीपैकी एक दासी केफाकडे

आली. ती म्हणाली, "तू सुद्धा गालीलच्या येशूवाह बरोबर होतास." ७० पण केफाने सर्वासमोर ते नाकरले. तो म्हणाला, "तू काय म्हणतेस ते मला माहीत नाही!" ७१ मग तो अंगणातून निघून फाटकापाशी गेला. फाटकाजवळ दुस-या एका दासीने त्याला पाहिले. ती तेथे असलेल्या लोकांना म्हणाली, "नात्सरेथकर येशूवाह बरोबर हा होता." ७२ पुन्हा एकदा केफा शपथ घेऊन येशूवाहला नाकरतांना म्हणाला, "मी त्याला ओळखत नाही!" ७३ काही क्षणानंतर तेथे असलेले लोक केफाकडे वळाले आणि त्याला म्हणाले, "तू खरोखर येशूवाहच्या थालमीद (शिष्यां) पैकी एक आहेस, हे आम्हांला माहीत आहे. तुझ्या बोलण्यावरून हे आम्हांला स्पष्ट दिसून येते." ७४ मग तो स्वतःला शपथ देऊ लागला. तो जोराने म्हणाला, "मी याव्हे एलोहिम शपथ सांगतो, येशूवाह हा मनुष्य कोण आहे हे मला माहीत नाही!" केफा असे म्हणाला, तोच कोंबडा आरवला. ७५ नंतर येशूवाह काय म्हणाला होता हे केफाला आठवले. "कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील." यानंतर केफा तेथून बाहेर निघून गेला, आणि फार दुःखाने रडला.

**२७.** १ जेंव्हा सकाळ झाली तेंव्हा सर्व एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व वडीलजन यांनी येशूवाह विरूद्ध कट केला. आणि कशा प्रकारे येशूवाहला ठार मारायचे याचा विचार केला. २ त्यांनी येशूवाहला साखळदंडानी बांधून दूर नेले, व राज्यपाल पिलाताच्या स्वाधीन केले.३ त्याच वेळेला यहूदा जो येशूवाहचा विश्वासघात करून त्याला पकडून देण्यास कारणीभूत होता. त्याने पाहिले की, त्यांनी येशूवाहला जिवे मारण्याचे ठरविले आहे. तेंव्हा त्याने जे केले होते, त्याचे त्याला वाईट वाटले. म्हणून त्याने चांदीची तीस नाणे घेऊन एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व वडीलांना परत दिली. ४ तो म्हणाला, "मी पाप केले आहे. मी एका निष्पाप मनुष्याला जिवे मारण्यासाठी तुमच्या हाती दिले." यहूदी पुढा-यांनी उत्तर दिले, "आम्हांला त्याचे काय? तो तुझा प्रश्न आहे!" ५ तेंव्हा यहूदाने ती चांदीची नाणे मंदिरात फेकून दिली, आणि तो गेला.मग बाहेर जाऊन त्याने स्वतःला गळफास लावून घेतला. ६ एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) ती तीस नाणी घेतले, आणि ते म्हणाले, "हे पैसे मंदिराच्या खजिन्यात ठेवता येणार नाहीत. हे आमच्या नियमाविरूद्ध आहे. कारण ते पैसे कोणाला तरी जिवे मारण्यासाठी दिले होते." ७ म्हणून त्यांनी त्या पैशांनी कुंभाराचे शेत नावाची जागा विकत घेण्याचे ठरविले.यरूशलेमला भेट देण्यासाठी येणा-या माणसांना मरण आले, तर त्यांना पुरण्यासाठी त्या शेताचा उपयोग करता येईल. ८ त्यामुळे आजही त्या जागेला, 'रक्ताचे शेत असे म्हणतात. ९ अशा रीतीने यिर्मया नवीचे (संदेष्टयाचे) वचन खरे ठरले. ते असे, "त्यांनी चांदीच्या तीस नाणी घेतली. हे पैसे यहूदी लोकांनी त्याच्या (येशूवाहच्या) जिवाचे मोल म्हणून देण्याचे ठरविले.१० मला अदोनाई याव्हेने आज्ञा दिल्यानुसार, चांदीच्या त्या तीस नाण्यांनी त्यांनी कुंभाराचे शेत विकत घेतले."

११ अधिकारी पिलातापुढे येशूवाह उभा राहिला, तेंव्हा पिलाताने त्याला प्रश्न विचारले तो म्हणाला, "तू यहूद्यांचा राजा आहेस काय?" येशूवाहने उत्तर दिले, "होय मी आहे जसे तुम्ही म्हणता." १२ पण जेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी), व वडिलांनी त्याच्यावर दोषारोप केले. तेंव्हा तो गप्प बसला, १३ म्हणून पिलात येशूवाहला म्हणाला, "हे लोक तुझ्यावर जो दोषारोप ठेवीत आहेत, तो तू ऐकत आहेस ना? तर मग तू का उत्तर देत नाहीस!" १४ परंतु येशूवाहने पिलाताला काहीही उत्तर दिले नाही. आणि पिलात आश्चर्यचकित झाला.१५ वल्हांडण सणानिमित्त दरवर्षी लोकसमुदयासाठी तुरूंगातून एकाला सोडण्याची प्रथा होती. १६ आणि त्या वेळी बरब्बा म्हंटलेला, एक कुप्रसिद्ध कैदी त्याच्या जवळ होते. १७ म्हणून जेंव्हा लोक जमले तेंव्हा पिलाताने त्यांना विचारले, "तुमच्यासाठी मी कोणाला सोडावे अशी तुमची इच्छा आहे? कुविख्यात बरब्बाला की, ज्याला मशीहा म्हणतात त्या येशूवाहला?" १८ लोकांनी ईर्षेला पेटून येशूवाहला पिलाताच्या हाती दिले होते, हे पिलाताच्या लक्षात आले. १९ न्यायासनावर बसला असता पिलात हे बोलला. तो तेथे बसलेला असतानाच त्याच्या बायकोने त्याला एक निरोप पाठविला. तो निरोप असा होता, "या मनुष्याविषयी सावध राहा. कारण तो दोषी नाही. त्याच्याविषयी स्वप्न पडल्यामुळे मला आज दिवसभर फार दुःख सहन करावे लागले आहे." २० पण पिलाताने बरब्बाला सोडून द्यावे, व येशूवाहला जिवे मरावे अशी मागणी लोकांनी करावी,

म्हणून एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी), व वडील जनांनी लोकांचे मन वळविले. २१ पिलात म्हणाला, "माझ्या समोर बरब्बा व येशूवाह दोघेही आहेत, मी तुमच्यासाठी कोणाला सोडून द्यावे, अशी तुमची इच्छा आहे?" २२ पिलाताने विचारले, "मग ज्याला मशीहा म्हणतात त्या येशूवाहचे मी काय करावे?" सर्व लोक ओरडून म्हणाले, "त्याला वधस्तंभावर खिळून मारून टाका!" २३ पिलाताने विचारले, "का? मी त्याला जिवे मारावे असे तुम्हीं का म्हणता? त्याने काय अपराध केला आहे?" परंतु सर्व लोक मोठयाने ओरडून म्हणू लागले, "त्याला वधस्तंभावर खिळा!" २४ लोकांच्या पुढे आपले काही चालणार नाही हे पिलाताने पाहिले. उलट लोक अधिक गडबड करू लागले होते. म्हणून पिलाताने थोडे पाणी घेतले, आणि लोकांच्या समोर आपले हात धुतले. मग पिलात म्हणाला, "या मनुष्याच्या मरणाची जबाबदारी माझ्यावर नाही. तुम्हींच त्यासाठी जबाबदार आहात!" २५ सर्व लोक ओरडून म्हणू लागले, "याच्या मरणाची जबाबदारी आमच्यावर आहे. त्याच्यासाठी व्हायची शिक्षा आम्ही व आमची मुले भोगायला तयार आहोत." २६ मग पिलाताने बरब्बाला सोडून दिले. येशूवाहला चाबकाचे फटके मारावे, असे पिलाताने आपल्या काही सैनिकांना सांगितले. नंतर येशूवाहला वधस्तंभावर खिळून मारावे, म्हणून पिलाताने शिपयांच्या हाती दिले.

२७ नंतर पिलाताचे शिपाई येशूवाहला राज्यपालाच्या वाडयात घेऊन आले. ते सर्व घोळक्याने येशूवाह भोवती जमले.२८ त्यांनी येशूवाहचे कपडे काढले व त्याला लाल किरमिजी झगा घातला. २९ काटेरी झाडांचा फांद्याचा एक मुगूट तयार करून, तो येशूवाहच्या डोक्यावर ठेवला. तसेच त्यांनी त्याच्या उजव्या हातात एक काठी दिली. मग शिपाई येशूवाह पुढे गुडघे टेकून त्याची थट्टा करू लागले. ते म्हणू लागले, "यहूद्यांचा राजा चिरायू होवो!" ३० नंतर शिपाई येशूवाह वर थुंकले, त्याच्या हातातील काठी त्यांनी घेतली, आणि त्या काठीने त्याच्या डोक्यावर मरत राहिले. ३१ येशूवाह ची थट्टा करण्याचे संपविल्यावर त्यांनी त्याचा झगा काढून घेतला, आणि त्याचे कपडे त्याला घातले. मग ते त्याला वधस्तंभावर खिळून मारण्यासाठी घेऊन गेले. ३२ शिपाई येशूवाहला नगराच्या बाहेर घेऊन चालले होते, तेंव्हा त्यांनी एका मनुष्याला वेठीला धरून येशूवाहचा वधस्तंभ वाहायला लावले. तो कुरेने या गावचा असून त्याचे नाव शिमोन होते. ३३ जेंव्हा ते गुलगुथा (म्हणजे कवटीची जागा) नावाच्या ठिकाणी घेऊन पोहोचले. ३४ तेंव्हा त्यांनी येशूवाहला पित्तमिश्रित द्राक्षारस प्यायला दिला, त्याने तो चाखला पण पिण्यास नकार दिला. ३५ त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले. नंतर त्यांनी चिठ्ठया टाकून येशूवाहचे कपडे आपसात वाटून घेतले. ३६ शिपाई तेथे बसून येशूवाह वर पाहारा देऊ लागले. ३७ येशूवाहच्या डोक्याच्या वरच्या बाजूला त्याच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप लिहिलेला लेख शिपायांनी लावला. त्यावर मजकूर होता. "येशूवाह यहूद्यांचा मेलेक." ३८ येशूवाहच्या दोन्ही बाजूंना दोन लुटारू खिळण्यात आले होते. ३९ जवळून जाणारे लोक येशवाहची निंदा करू लागले, ते डोकी हलवू लागले. ४० आणि म्हणू लागले, "तू म्हणालास की, हे मंदिर मोडून तीन दिवसात परत उभे करीन. आता स्वतःचा बचाव कर! जर तू खरोखरच याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) असलास तर वधस्तंभावरून खाली ये!" ४१ तसेच एलयोवन कोहेन (मुख्य याजक), तोराहचे रब्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) वडील हेही तेथे होते. तेही इतरांसारखी येशूवाहची निंदा करू लागले.४२ ते म्हणू लागले, "याने दुस-यांना वाचविले. परंतु तो स्वतःचा बचाव करू शकत नाही? लोक म्हणतात की, हा इस्त्राएल (यहूदी) लोकांचा राजा आहे. जर तो राजा असेल तर त्याने वधस्तंभावरून खाली यावे. म्हणजे आम्हीं त्याच्यावर विश्वास ठेवू! ४३ याचा याव्हे एलोहिमवर विश्वास आहे जर याव्हे एलोहिमला तो खरोखर पाहिजे असेल, तर त्याने त्याला वाचवावे. तो स्वतः असे म्हणत असे, 'मी याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे." ४४ तसेच त्याच्यावरोबर वधस्तंभावर खिळलेले चोर देखील येशूवाह विषयी वाईट गोष्टी बोलू लागले.

४५ दुपारनंतर लगेच सुमारे तीन तास सर्व भूमीवर अंधार पसरला. ४६ सुमारे तीन वाजता येशूवाह मोठयाने ओरडून म्हणाला, "एलोई, एलोई लमा सबकत्नी?" याचा अर्थ "माझ्या याव्हे एलोहिम, माझ्या याव्हे एलोहिम तू माझा त्याग का केलास?" ४७ जे लोक तेथे उभे होते त्यांनी हे ऐकले ते म्हणू लागले, "तो एलीयाला हाक मारीत आहे!" ४८ एक जण लगेच धावत गेला, आणि बोळा घेऊन आला. त्या मनुष्याने तो बोळा आंबेत बुडविला आणि तो वेताच्या टोकावर ठेवून येशूवाहला प्यायला दिला. ४९ परंतु दुसरे काही लोक म्हणू लागले, "थांबा एलीया येऊन त्याला वाचवितो काय हे आम्हांला पाहायचे आहे." ५० पुन्हा एकदा येशूवाह

मोठयाने आरोळी मारली आणि तो मरण पावला. ५१ त्याचवेळी येशूवाह मेल्याबरोबर मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत दुभागला गेला. भूकंप झाला, खडक फुटले, ५२ कबरी उघडल्या, आणि याव्हे एलोहिमचे बरेच लोक जे मरण पावले होते, ते उठविले गेले. ५३ ते लोक कबरीतून बाहेर पडले. येशूवाह मरणातून पुन्हा उठल्यावर ते लोक पवित्र नगरात गेले, आणि अनेक लोकांनी त्यांना पाहिले. ५४ सेनाधिकारी व त्याच्याबरोबर येशूवाह वर जे शिपाई पाहारा देत होते, त्यांनी भूकंप व जे काही घडले ते पाहिले, आणि ते फार भ्याले. ते म्हणाले, "हा मनुष्य खरोखर याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) होता." ५५ तेथे ब-याच स्त्रिया वधस्तंभापासून काही अंतरावर उभ्या होत्या, येशूवाहची सेवा करण्यासाठी या स्त्रिया गालीलाहून त्याच्यामागून आल्या होत्या. ५६ मरीया मग्दालिया, याकोब व योसेफ यांची आम्मी मरीया, आणि जब्दीचे बेन याकोब व योहानान यांची आम्मी तेथे होत्या.

५७ संध्याकाळ झाल्यावर योसेफ नावाचा एक श्रीमंत मनुष्य तेथे आला. तो अरिमथाईचा होता, व येशूवाहचा अनुयायी होता. ५८ योसेफ पिलाताकडे गेला, आणि त्याने त्याचे शरीर मागितले. पिलाताने येशूवाहचे शरीर योसेफाला देण्याचा हुकूम शिपायांना केला. ५९ नंतर योसेफाने येशूवाहचे शरीर घेतले, आणि नवीन तागाच्या कपडयात ते गुंडाळले. ६० मग योसेफाने खडकात खोदलेल्या नव्या कबरेत येशूवाहचे शरीर ठेवले. नंतर कबरेच्या तोंडावर एक मोठी धोंड लोटून ती कबर बंद केली, या गोष्टी केल्यानंतर योसेफ निघून गेला. ६१ मरीया मग्दालिया, आणि मरीया नावाची दुसरी स्त्री कबरेभोवती बसल्या होत्या.

६२ त्या दिवसाला तयारीचा दिवस (शब्बाथाच्या अगोदरचा दिवस) म्हणत असत. दुस-या दिवशी एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व परूशी पिलाताकडे गेले. ६३ ते म्हणाले, "महाराज तो लबाड मनुष्य (येशूवाह) जिवंत असताना असे म्हणाला होता की, मी मरण पावल्यानंतर तीन दिवसांनी परत उठेन. ६४ म्हणून तीन दिवसापर्यंत कबरेवर कडक पहारा ठेवण्याचा हुकूम द्या. कारण त्याचे थालमीद (शिष्य) येऊन त्याचे शरीर चोरून नेण्याचा प्रयत्न करतील. मग तो मरणानंतर पुन्हा उठला असे लोकांना सांगतील, ही शेवटची फसवणूक पहिल्यापेक्षा अधिक वाईट होईल." ६५ पिलात म्हणाला, "तुम्ही शिपाई घेऊ शकता. जा आणि कबरेवर कडक पाहारा ठेवा." कबरेवर जी धोंड होती तिच्यावर शिक्का मारला, आणि तेथे पाहारा करण्यासाठी शिपाई नेमले.

२८. १ शब्बाथवारा नंतर पहिला दिवस आला. पहाटेस मरीया मग्दालिया, मरीया नावाची दुसरी स्त्री कबर पाहावयास तेथे गेल्या. २ त्यावेळी तेथे मोठा भूकंप झाला, याव्हे एलोहिमचा मालाक (दूत) आकाशातून तेथे आला. तो याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) कबरेकडे गेला. त्याने कबरेच्या तोंडावरची धोंड बाजूला केली. नंतर तो याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) त्या धोंडेवर बसला. ३ चमकणा-या विजेसारखा तो याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) दिसत होता. त्याचे कपडे बर्फासारखे शुभ्र होते. ४ कबरेवर पहारा करणारे शिपाई याव्हे एलोहिमच्या मालाक ला पाहून खूप घाबरले. ते थरथर कापू लागले. आणि ते मेलेल्या माणसासारखे झाले. ५ याव्हे एलोहिम मालाक म्हणाला, "भिऊ नका ज्याला वधस्तंभावर खिळले होते, त्या येशूवाहला तुम्हीं पाहात आहात. ६ परंतु तो येथे नाही. तो म्हणाला त्याप्रमाणे त्याला मरणातून उठविण्यात आले आहे. या आणि जेथे त्याचे शरीर ठेवले होते ती जागा पाहा. ७ आता तावडतोब निघा, आणि त्याच्या थालमीद (शिष्यां) ना सांगा, येशूवाह मरणातून उठला आहे. तो गालीलात जाणार आहे, तो तुमच्या अगोदर तेथे जाईल. तुम्हीं त्याला तेथे पाहाल." नंतर याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) म्हणाला, "मी तुम्हांला सर्व काही सांगितले आहे." ८ म्हणून त्या स्त्रिया लगबगीने कबरे जवळून निघाल्या, त्या फार घावरलेल्या होत्या. परंतु फार आनंदितही झाल्या होत्या. जे काही घडले ते सांगण्यासाठी त्या धवत निघाल्या. ९ अचानक येशूवाह त्यांना भेटला आणि तो त्यांना म्हणाला, शालोम (शांती) असो." त्या त्याच्याजवळ आल्या. त्यांनी त्याचे पाय धरले, आणि त्याला त्यांनी नमन केले. १० मग येशूवाह त्यांना म्हणाला, "मला अडवू नका. माझ्या भावांना सांगा की, त्यांनी गालीलात जावे तेथेच त्यांची माझी भेट होईल."

११ स्त्रिया थालमीद (शिष्यां) ना सांगण्यासाठी गेल्या. तेंव्हा कबरेवरील पहारेकरी शिपयांतील काही जण नगरात गेले, आणि त्यांनी घडलेले सर्व एलयोवन कोहेन (मुख्य याजकला) सांगितले. १२ नंतर एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) जाऊन वडील जनांना

भेटले. आणि त्यांनी एक बेत रचला. त्यांनी शिपयांना पुष्कळ पैसे देऊन असे म्हणण्यास सांगितले. १३ ते म्हणाले, " लोकांना असे सांगा की, आम्ही रात्री झोपेत असताना येशूवाहच्या थालमीद (शिष्य) आले, आणि त्यांनी त्याचे शरीर चोरून नेले.१४ हे जर सुभेदाराच्या कानावर गेले, तर आम्हीं त्याला पटवून देऊ, आणि तुम्हांला काही होऊ देणार नाही." १५ मग शिपायांनी पैसे घेतले, व एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) सांगितले तसे केले. आणि ही गोष्ट यहूदी लोकांत आजपर्यंत तसेच चालू आहे.

१६ अकरा थालमीद (शिष्य) गालीलास निघून गेले. येशूवाहने सांगितलेल्या डोंगरावर ते हजर झाले. १७ त्या डोंगरावर येशूवाह त्यांना दिसला, त्यांनी त्याला नमन केले. पण तो येशूवाह आहे, यावर थालमीद (शिष्यां) पैकी काहीचा विश्वास बसला नाही.१८ तेंव्हा येशूवाह त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, "आकाशात आणि पृथ्वीवर मला सर्व अधिकार देण्यात आलेला आहे. १९ म्हणून तुम्हीं जा, आणि राष्ट्रातील लोकांस माझे थालमीद (शिष्य) करा. याव्हे अव्वा च्या, येशूवाह मशीहा वेन च्या, आणि क्वादोश रूहुव्वा, याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. २० आणि जे काही मी तुम्हांला शिकविले आहे, ते त्या लोकांना करायला शिकवा. आणि पाहा काळाच्या शेवटपर्यंत मी सदोदित तुमच्या बरोबर राहिन."

...... समाप्ती......

## मार्क ( उर्फ ) योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान

. लेखक ः मार्क ( उर्फ ) योहानान.

पुस्तकाची प्रस्तावना

चारही शुभवर्तमानमध्ये सर्वात पहिले शुभवर्तमान हे मार्कने इ.स.६0 ते ६४ मध्ये लिहिलेले होते. मार्क उर्फ योहानान हा यहूदी असल्याने त्याची स्वतःच्या मातृभाषेमध्ये हिब्रू असल्याने, त्याने हे शुभवर्तमान मूळ हिब्रू भाषेमध्ये दस्तावेज लिहिलेली होती. मार्कस हे नाव रोमन भाषेमध्ये घेण्यात येत असले, म्हणून तो रोमन किंवा ग्रीक नव्हता. शुभवर्तमान हे मूळ ग्रीक भाषेमध्ये लिहिलेले नव्हते. नवीन कराराचे भाषांतर, कालंतराने ह्या हिब्रू व अरामीक भाषेतील मूळ दस्तावेजचे इ.स.९00 मध्ये ग्रीक भाषेमध्ये भाषांतर करण्यात आले.

मार्क उर्फ योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान

१.१ याव्हे एलोहिमचा मुलगा येशूवाह मशीहा याच्या शुभवर्तमानाची सुरूवात.२ यशया नवीच्या (भविष्यवाद्याच्या) पुस्तकात असे
लिहिले आहे. "एका ! मी माझ्या मालाक (दूताला) तुम्हाकडे पाठवित आहे. तो तुझ्यासाठी मार्ग तयार करील.३ तेथे अरण्यात
एक व्यक्ती ओरडून सांगत होती. 'अदोनाईसाठी मार्ग तयार करा, त्याच्यासाठी वाटा सरळ करा'.४ मग बाप्तिस्मा करणारा
योहानान आला व अरण्यात लोकांचे बाप्तिस्मे करू लागला. लोकांना त्याने सांगितले की, जर त्यांना त्यांचे आत्मात बदल करावयाचा
असेल, तर त्यांनी पश्चात्तापाचा बाप्तिस्मा घ्यायला पाहिजे. मग त्यांच्या पापांची क्षमा केली जाईल.५ यहुदीया व यरूशलेम येथील
सर्व लोक योहानान कडे आले. त्यांनी आपली पापे कबूल केल्यावर त्याने त्यांचा यार्देन नदीत बाप्तिस्मा केला.६ योहानान उंटाच्या
केसांपासून तयार केलेली वस्त्रे वापरीत असे. त्याच्या कंबरेला कातडयाचा पट्टा होता. आणि तो टोळ व रानमध खात असे.७
योहानान ने लोकांना हा संदेश दिला. "माझ्यापेक्षाही महान असा कोणी एक येत आहे, माझ्यानंतर येत आहे. मी त्याच्या वहाणांचा
बंद सोडण्याच्या पात्रतेचा नाही.८ मी तुमचा पाण्याने बाप्तिस्मा करतो पण तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने करील."

९ त्यावेळी येशूवाह गालीलातील नात्सेरेथहून (नाझरेथ)जेथे योहानान होता, त्या ठिकाणी आला. यार्देन नदीत योहानान ने येशूवाहचा
बाप्तिस्मा केला.१0 येशूवाह पाण्यातून वर येत असता त्याने आकाश दुभागलेले पाहिले, आणि पवित्र आत्मा त्याच्यावर
कबुतरासारखा आला.११ आकाशातून वाणी झाली, ती म्हणाली, "तू माझा परमप्रिय मुलगा आहेस, तुझ्यावर मी प्रिती करतो
तुझ्याठायी मी संतुष्ट आहे." १२ नंतर आत्म्याने येशूवाहाला एकटयालाच अरण्यात पाठविले.१३ येशूवाह अरण्यात चाळीस दिवस
होता. तो तेथे हिंस्त्र प्राण्यामध्ये होता. तो तेथे असता सैतान त्याला मोहात पाडून त्याची परीक्षा बघत होता. पण मालाक
(दूत) येऊन त्याची सेवा करीत होते.

१४ यानंतर योहानानला तुरुंगात टाकण्यात आले. येशूवाह गालीलास गेला व याव्हे एलोहिम कडून आलेली सुवार्ता त्यांना
सांगितली.१५ येशूवाह म्हणाला, " आता योग्य वेळ आली आहे. याव्हे एलोहिमचे राज्य जवळ आले आहे. पश्चात्ताप करा आणि
सुवार्तेवर विश्वास ठेवा.१६ येशूवाह गालीलाच्या सरोवराजवळून जात होता, तेंव्हा त्याने शिमोन ( केफा ) व शिमोनाचा भाऊ अंद्रिया
याला सरोवरात जाळे टाकताना पाहिले, कारण ते मासे धरणारे होते. १७ येशूवाह त्यांना म्हणाला, " माझ्या मागे या, म्हणजे मी
तुम्हांला माणसे धरणारे करीन.१८ मग ते लगेचच जाळी सोडून त्याच्यामागे चालू लागले.१९ आणि तो थोडा पुढे गेल्यावर, त्याला
जव्दीचा मुलगा याकोब, व त्याचा भाऊ योहानान हे दिसले. ते त्यांच्या नावेत होते व आपली जाळी तयार करीत होते.२0 त्याने
लगेच त्यांना हाक मारली. मग त्यांनी आपले वडील जव्दी व नोकरचाकर यांना नावेत सोडले, आणि ते त्याच्या मागे गेले. २१.
येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) कफर्णहूमास गेले. लगेच येणा-या शब्बाथ दिवशी येशूवाह सभास्थानात गेला, आणि लोकांना
त्याने शिकवीले.२२ त्याच्या शिकवणुकीने ते चकित झाले. कारण येशूवाह तोराच्या ( नियमशास्त्राच्या ) शिक्षकांप्रमाणे शिकवीत
नव्हता, तर त्याला अधिकार असल्यासारखा शिकवित होता.२३ त्याच सभासस्थानात एक अशुद्ध आत्म्याची बाधा झालेला मनुष्य
होता. तो एकदम मोठयाने ओरडला. २४ आणि म्हणाला, "नात्सेरेथ (नाझरेथ) येशूवाह, तुला आमच्या कडून काय पाहिजे ? तू

आमचा नाश करावयास आला आहेस काय ? तू कोण आहेस हे मला माहिती आहे. याव्हे एलोहिमचा पवित्र असा तू आहेस." २५ परंतु येशूवाह ने त्याला अधिकारवाणीने म्हंटले, " शांत राहा व याच्यातून नीघ." २६ नंतर अशुद्ध आत्म्याने त्याला पिळले, व तो मोठयाने ओरडून त्याच्यातून बाहेर गेला. २७ आणि लोक आश्चर्यचकित झाले, व एकमेकास विचारू लागले, " येथे काय चालले आहे ? हा मनुष्य काही तरी नवीन शिकवीत आहे. आणि तो अधिकाराने शिकवीत आहे. तो दुष्ट आत्म्यांना आज्ञा करतो, आणि ते त्याचे ऐकतात!" २८ मग येशूवाह विषयीची बातमी तावडतोब गालीलाच्या सर्व प्रदेशात पसरली.

२९ येशूवाह व त्याच्या थालमीद (शिष्यांनी) सभासस्थान सोडले, आणि लागलीच ते योहानान व याकोब यांच्याबरोबर शिमोन व अंद्रिया यांच्या घरी गेले. ३० शिमोन केफाची सासू तापाने बिछान्यावर पडली होती. तेंव्हा त्यांनी तावडतोब येशूवाहला तिच्याविषयी सांगितले. ३१ तो तिच्याकडे गेला आणि तिला हाताला धरून त्याने उठविले. आणि तिचा ताप निघून गेला. व ती त्याची सेवा करू लागली. ३२ संध्याकाळ झाली आणि सूर्यास्त झाल्यावर लोकांनी सर्व आजारी आणि अशुद्ध आत्म्यांनी पिच्छाडलेल्यांना त्याच्याकडे आणले. ३३ तेंव्हा सर्व शहर घराच्या दारापुढे जमा झाले. ३४ त्याने निरनिराळया आजाराने पीडलेल्या अनेक मानसांना बरे केले. व अनेक लोकांतून अशुद्ध आत्मे काढली. पण त्यांने अशुद्ध आत्म्यांना बोलू दिले नाही, कारण ती त्याला ओळखत होती.

३५ आगदी पहाटेच अंधार असतानाच त्याने घर सोडले, आणि तो एकांत स्थळी गेला. तेथे त्याने प्रार्थना केली. ३६ शिमोन व त्याच्यासोबत असलेले येशूवाह चा शोध करीत होते. ३७ आणि जेंव्हा त्यांना तो सापडला तेंव्हा ते त्याला म्हणाले, "सर्वजण तुमचा शोध करीत आहेत." ३८ तेव्हा येशूवाह त्यांना म्हणाला, " आपण जवळपासच्या ठिकाणी जाऊ या, म्हणजे मला तेथे देखील उपदेश करणे शक्य होईल. कारण त्या कारणासाठीच मी बाहेर पडलो आहे." ३९ मग ती सर्व गालीलातून त्यांच्या सभास्थानातून उपदेश करीत, आणि अशुद्ध आत्मे काढीत फिरला.

४० तेंव्हा एक कुष्ठरोग येशूवाह कडे आला व त्याच्यापुढे गुडघे टेकून त्याने स्वतःला बरे करण्याची विनंती केली. तो येशूवाहला म्हणाला " जर तुमची इच्छा असेल तर तुंम्हामध्ये मला शुद्ध करण्याचे सामर्थ्य आहे." ४१ येशूवाहला त्याची दया आली. मग त्याने हात लांब केला, आणि त्याला स्पर्श केला व त्याला म्हणाला, " मला तुला बरे करावयाचे आहे. तुझा कुष्ठरोग बरा होवो." ४२ आणि लगेच त्याचे कुष्ठ गेला, व तो शुद्ध झाला. ४३ येशूवाहने त्याला सक्त ताकीद दिली व लगेच जाण्यास सांगितले. येशूवाह त्याला म्हणाला, ४४ पाहा, याविषयी कोणाला काहीही सांगू नकोस. परंतु जा आणि स्वतःला कोहेन (याजकाला) दाखव. व स्वतःला शुद्धीकरण्यासाठी मोशेच्या आज्ञेप्रमाणे अर्पण कर. हे यासाठी कर की, तू शुद्ध झाला आहेस याची त्या सर्वांना साक्ष पटावी. ४५ परंतु तो मनुष्य गेला व त्याने मोकळेपणाने सांगण्यास सुरूवात केली, व ही बातमी पसरविली. याचा परिणाम असा झाला की, येशूवाहला उघडपणे नगरात जाता येईना. म्हणून तो एकांतवासात राहिला. आणि चोहोबाजूंनी लोक त्याच्याकडे आले.

२. १ नंतर काही दिवसांनी येशूवाह कफर्णहूमास परत गेला. तो घरी आहे, ही बातमी लोकांपर्यंत पोहचली. २ तेंव्हा इतके लोक जमले की, जागा उरली नाही. एवढेच नव्हे तर दाराबाहेर देखील जागा नव्हती. येशूवाह त्यांना उपदेश करीत होता. ३ काही लोक त्याच्याकडे पक्षघाती मनुष्याला घेऊन आले. त्याला चौघांनी उचलून आणले होते. ४ परंतु गर्दीमुळे त्यांना त्या मनुष्याला येशूवाह जवळ नेता येईना. मग तो होता तेथील त्याच्या वरचे छपर त्यांनी काढले, व ज्या खाटेवर तो मनुष्य होता, ती खाट त्यांनी छपरातून खाली सोडता येईल अशी जागा केली. व त्या पक्षघाती मनुष्याला खाली सोडले. ५ येशूवाहने त्यांचा विश्वास पाहिला तेंव्हा तो पक्षघाती मनुष्याला म्हणाला, " मुला तुझ्या पापांची क्षमा झाली आहे."

६ तेथे तोराचे (नियमशास्त्राचे) काही रब्बुनी ( गुरूजी) बसले होते. ते आपसात कुजबूज करीत होते की, ७ हा मनुष्य असे का बोलत आहे ? हा याव्हे एलोहिमची निंदा करीत आहे. याव्हे एलोहिम शिवाय कोण पापांची क्षमा करू शकतो ? ८ आणि येशूवाहला त्याच क्षणी त्याच्या आत्म्यात समजले की, ते स्वतःशी असा विचार करीत आहेत. तो त्यांस म्हणाला, तुंम्ही या गोष्टीविषयी आपसात का कुजबूज करता ? ९ तुझ्या पापांची क्षमा झाली आहे, असे या पक्षघाती मनुष्याला म्हणणे, किंवा 'ऊठ आपली खाट

उचल, आणि आपल्या घरी जा.' असे म्हणणे यातील कोणते सोपे आहे ? १० परंतु मनुष्याच्या मुलाला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे, हे समजावे म्हणून तो पक्षघाती मनुष्याला म्हणाला. ११ "मी तुला सांगतो, ऊठ तुझी खाट उचल आणि आपल्या घरी जा." १२ मग तो लगेच उठला, त्याने आपली खाट घेतली व सर्वांच्या समक्ष बाहेर गेला. यामुळे ते सर्व लोक थक्क झाले. त्यांनी याव्हे एलोहिमची स्तुति केली आणि म्हणाले, " यासारखे आम्हीं कधी पाहिले नव्हते."

१३ येशूवाह पुन्हा सरोवराकडे गेला, व पुष्कळ लोक तेथे त्याच्यामागे गेले, आणि त्याने त्यांस शिक्षण दिले.१४ नंतर तो जात असता त्याने अल्फीचा मुलगा लेवी यांस जकातनाक्यावर बसलेले पाहिले. मग येशूवाह लेवीला म्हणाला, " माझ्या मागे ये." तेंव्हा लेवी उठला आणि येशूवाहच्या मागे गेला. १५ नंतर येशूवाह लेवीच्या घरी जेवत असता, पुष्कळ जकातदार व पापी लोकही येशूवाह व त्याच्या शिष्यांबरोबर जेवत होते. कारण तेथे जे त्याच्यामागे आले होते, त्यांच्यापैकी पुष्कळ जण होते. १६ काही तोराहचे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी शास्त्री) जे परूशी होते, त्यांनी येशूवाहला पापी व जकातदारां बरोबर जेवताना पाहिले. ते त्याच्या थालमीद (शिष्यास) म्हणाले, "येशूवाह हा पापी व जकातदार यांच्याबरोबर का जेवत आहे ? " १७ येशूवाहने हे ऐकले आणि तो त्यांना म्हणाला, "जे निरोगी आहेत त्यांस वैद्याची गरज नाही, पण रोग्यांस आहे. मी नीतिमान लोकांना नाही तर पाप्यांस बोलवावयास आलो आहे."१८ जेंव्हा योहानानचे थालमीद (शिष्य) व परूशी उपास करीत होते. ते काहीजण येशूवाह कडे आले आणि म्हणाले, " योहानानचे थालमीद (शिष्य) व परूशी लोक उपास करतात, परंतु तुझे थालमीद (शिष्य) उपास का करीत नाहीत." १९ येशूवाह म्हणाला, " खरोखर जो पर्यंत व-हाडयांबरोबर वर आहे, तोपर्यंत त्यांनी उपास करावा अशी तुमची अपेक्षा आहे काय ? जो पर्यंत त्यांच्याबरोबर वर आहे, तोपर्यंत त्यांना उपास करणे शक्य नाही."२० परंतु असे दिवस येतील की, वर त्यांच्यापासून घेतला जाईल, आणि नंतर ते त्या दिवशी उपास करतील.२१ कोणी नव्या कापडाचा तुकडा जुन्या कापडाला जोडीत नाही. जर तो असे करतो, तर नवे कापड अखडून जाईल. व जुन्याला अधिक फाडील, व ते अधिकच फाटेल. २२ तसेच नवा द्राक्षारस कोणीही द्राक्षारसाच्या जुन्या बुधलीत घालत नाही. जर तो असे करतो तर द्राक्षारसाची बुधली फुटत, आणि द्राक्षारस व द्राक्षारसाची बुधली नासते. म्हणून तो नव्या द्राक्षारस नव्या बुधलीत ठेवतात.

२३ नंतर असे झाले की, येशूवाह शब्बाथ दिवशी शेतातून जात असता, जाताना त्याचे थालमीद (शिष्य) कणसे मोडू लागले. २४ तेंव्हा परूशी येशूवाहला म्हणाले, " पाहा, शब्बाथ दिवशी जे करू नये ते हे का करतात." २५ येशूवाह म्हणाला, जेंव्हा दावीद व त्याच्या बरोबर असलेल्या लोकांना भूक लागली, व त्यांना खावयाला हवे होते, तेंव्हा त्यांनी काय केले, याविषयी तुंम्ही ऐकले नाही काय ? २६ अब्याथार एलयोवन कोहेन ( प्रमुख याजक ) असताना, तो याव्हे एलोहिमच्या मंदिरात कसा गेला, आणि याव्हे एलोहिमला समर्पित केलेल्या भाकरी ज्या तोरा मधील आज्ञेप्रमाणे (नियशास्त्रातील आज्ञेप्रमाणे) कोहेन (याजका) शिवाय कोणीही खाऊ नयेत, त्या कशा खाल्ल्या. व जे त्यांच्याबरोबर होते त्यांनाही कशा दिल्या, याविषयी तुंम्ही वाचले नाही काय ? २७ तो त्यास सांगत होता, " शब्बाथ मनुष्यांसाठी करण्यात आला. मनुष्य शब्बाथासाठी करण्यात आला नाही." २८ म्हणून मनुष्याचा मुलगा शब्बाथाचा देखील अदोनाई आहे.

**३**.१ दुस-यांदा येशूवाह सभास्थानात गेला. तेथे वाळलेल्या हाताचा मनुष्य होता.२ येशूवाह वर आरोप करण्यासाठी कारण मिळावे म्हणून, तो शाब्बाथ दिवशी त्या मनुष्याला बरे करतो की काय, हे पहाण्यासाठी काही लोक त्याच्यावर बारकाईने नजर ठेवून होते. ३ येशूवाह वाळलेल्या हाताच्या मनुष्याला म्हणाला, " लोकांच्या समोर उभा राहा." ४ नंतर तो त्यांना म्हणाला, "शब्बाथ दिवशी चांगले करणे, किंवा वाईट करणे, जीव वाचविणे, किंवा जिवे मारणे , यांतील कोणते योग्य आहे ? " परंतु ते गप राहिले.५ येशूवाहने सर्वांकडे रागाने पाहिले, त्यांच्या मनाच्या कठीणपणामुळे तो फार खिन्न झाला. तो त्या मनुष्याला म्हणाला, " तुझा हात पुढे सरळ कर." त्याने तो लांब केला आणि त्याचा हात बरा झाला.६ नंतर परूशी निघून गेले, आणि लगेच त्याला ठार करणे कसे शक्य होईल, याविषयी हेरोदीयां बरोबर (राजकीय यहूदी गट ) येशूवाह विरूद्ध कट करू लागले.

७ येशूवाह आपल्या थालमीद (शिष्यां) सह गालील सरोवराकडे निघून गेला, आणि गालील व यहूदीयातून, मोठा लोकसमुदाय त्याच्या मागे आला. ८ कारण तो करीत असलेल्या कृत्यांविषयी त्यांनी ऐकले व यरूशलेम, इदूमिया, यार्देनच्या पलीकडच्या प्रदेशातून, सोर व सीदोनच्या आसपासच्या प्रदेशातून, मोठा लोकसमुदाय येशूवाह कडे आला. ९ मग गर्दीमुळे चेंगरून जाऊ नये, म्हणून त्याने आपल्या थालमीद (शिष्यांस) एक छोटी होडी आणावयास सांगितली.१० त्याने अनेक लोकांना बरे केले होते, म्हणून ज्यांना रोग होते, ते त्याला स्पर्श करण्यासाठी व वाट काढण्यासाठी पुढे धकलीत होते. ११ जेंव्हा अशुद्ध आत्मे येशूवाहला पाहत, तेंव्हा ते त्याच्यासमोर खाली पडून मोठयाने ओरडत होते की, "तू यात्वे एलोहिमचा मुलगा आहेस!" १२ पण त्याने त्यांना सक्त ताकीद दिली की, मला प्रगट करू नका.

१३ नंतर येशूवाह डोंगरावर गेला आणि जे त्याला पाहिजे होते त्यांना त्याने स्वतःकडे बोलाविले, व ते त्याच्याकडे आले. १४ त्याने बारा जण निवडले व त्यांना प्रेषित हे नाव दिले. त्याने त्यांची यासाठी निवड केली की, त्यांनी त्याच्याजवळ असावे, व त्यांना दुस-या ठिकाणी उपदेश करण्यासाठी त्याला पाठविता यावे. १५ व त्यांना अशुद्ध आत्मे काढण्याचा अधिकार असावा. १६ मग येशुवाहने या बारा जणांची निवड केली, व जो शिमोन त्याला केफा हे नाव दिले. १७ जब्दीचा मुलगा याकोब व याकोबाचा भाऊ योहानान यांना त्याने बेनेरेगेश, ह्याचा अर्थ 'गर्जनेचे मूले' असे हे नाव दिले. १८ अंद्रिया, फिलीप, बर्थलमय, मतिय, थोमा, अल्फीचा मुलगा याकोब, तद्दय, शिमोन कनानी, १९ आणि यहूदा इस्कर्योत, ज्याने नंतर येशूवाहचा विश्वासघात केला.

२० नंतर येशूवाह घरी गेला, आणि पुन्हा एकदा एवढा मोठा जणसमुदाय जमला की, येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) ह्यांना जेवावयास वेळ मिळाला नाही. २१ त्याच्या कुटुंबातील लोकांनी याविषयी ऐकले, तेव्हा ते त्यास आणावयास गेले. कारण लोक म्हणत होते की, तो वेडा आहे. २२ यरूशलेम मधून आलेले तोराचे रब्बुनी ( नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री ) म्हणत होते की, "याच्यामध्ये बालजबूल आहे." आणि त्या अशुद्ध आत्म्यांच्या अधिपतीच्या सामर्थ्याने, हा अशुद्ध आत्मांना काढून टाकतो. २३ मग येशूवाहने त्यांना जवळ बोलाविले, व उदाहरणांच्या साहाय्याने त्याच्याशी बोलू लागला. सैतानच सैतानाला कसा काढू शकेल ? २४ जर राज्यातच फूट पडली, तर ते राज्य टिकू शकत नाही. २५ आणि घरामध्येच फूट पडली, तर ते घर टिकू शकत नाही. २६ तर मग सैतान स्वतःलाच विरोध करू लागला आणि त्यांच्यातच फूट पडली, तर तो टिकू शकणार नाही, परंतु त्याचा शेवट होईल.२७ खरोखर कोणालाही बलवान मनुष्याला घरात शिरून, त्याची मिळकत लुटता येणार नाही. प्रथम त्या बलवान माणसाला बांधले पाहिजे, मगच त्याचे घर लुटता येईल. २८ मी तुंम्हास खरे सांगतो की, मनुसाच्या पापांची व त्यांनी केलेल्या यात्वे एलोहिमच्या निंदेची त्यांना क्षमा होईल. २९ पण जो कोणी पवित्र आत्म्याची निंदा करील, त्याची कधीच क्षमा होणार नाही. आणि तो मनुष्य सार्वकालिक पापाचा दोषी आहे. ३० येशूवाह असे म्हणाला, कारण तोराचे रब्बुनी ( नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री ) म्हणाले की, त्याच्यामध्ये अशुद्ध आत्मा आहे.

३१ नंतर येशूवाहाची आई आणि भाऊ तेथे आले. ते बाहेर उभे राहिले, आणि कोणाला तरी त्याला बोलवावयास पाठविले. ३२ लोकसमुदाय त्याच्याभोवती जमा झाला होता. लोक येशूवाहला म्हणाले, " पाहा तुझी आई, व तुझे भाऊ बाहेर तुझी वाट पाहत आहेत." ३३ त्यांने त्यांना उत्तर दिले, " कोण माझी आई, आणि कोण माझे भाऊ?" ३४ येशूवाहने जे त्याच्याभोवती जमले होते, त्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाला, " हे पाहा माझी आई, आणि माझे भाऊ. ३५ जे जे कोणी यात्वे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे वागतात तेच माझे भाऊ, माझी बहीण, व माझी आई आहेत."

४.१ दुस-या वेळी येशूवाह सरोवराच्या काठी शिक्षण देऊ लागला. पुष्कळ लोक त्याच्या भोवती जमले. मग तो सरोवरातील नावेत बसला, आणि सर्व लोक सरोवराच्या किना-यावरील जमिनीवर होते. २ त्याने दाखले मधून पुष्कळ वचने शिकविल्या. शिक्षण देताना तो म्हणाला, ३ ऐका ! " एक शेतकरी आपले बी पेरावयास गेला. ४ तो पेरीत असता काही बी वाटेवर पडले, व पक्ष्यांनी येऊन ते सर्व खाऊन टाकले. ५ दुसरे काही बी खडकाळ जमिनीवर पडले तेथे फार माती नव्हती. माती खोल नसल्यामुळे ते लवकर

उगवले, पण ६ सूर्य उगवल्यावर ते करपले, आणि मूळ रूजले नसल्यामुळे ते वाळून गेले. ७ काही बी काटेरी झुडुपात पडले. काटेरी झुडपे अधिक वाढली, आणि त्यांनी त्याची वाढ खुंटविली. व त्याला पीक आले नाही. ८ पण काही बी चांगल्या जमिनीवर पडले, ते उगवले. व वाढले, आणि भरपूर पीक आले. आणि त्याचे कोठे तीसपट कोठे साठपट आणि कोठे शंभरपट पीक आले." ९
मग तो म्हणाला, " ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको!"

१० जेंव्हा तो एकटा होता, तेंव्हा त्याच्या भोवती बारा थालमीद (शिष्यां) सह जे इतर होते, त्यांनी त्या दाखल्या विषयी त्याला
विचारले. ११ तो त्यास म्हणाला, "केवळ तुम्हांस याव्हे एलोहिमच्या राज्याचे रहस्य जाणून घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
पण बाहेरच्यांना गोष्टी रूपात सांगितले आहे. १२ यासाठी की, ते पाहत असता पाहतील, पण त्यांना कधीच दिसणार नाही. ते ऐकत असता ऐकतील, पण त्यांना कधीच समजणार नाही.जर त्यांनी पाहिले, आणि त्यांना समजले, तर त्यांच्यात कदाचित बदल होईल, आणि त्यांना क्षमा करण्यात येईल." १३ मग तो त्यास म्हणाला, " तुम्हांला हा दाखला समजत नाही काय? तर मग तुम्हांस
दुसरे इतर कोणतेही दाखले कसे समजेल ? १४ पेरणारा वचन पेरतो. १५ काही लोक वाटेवर पेरलेल्या बियांसारखे जेथे वचन पेरले
आहे, अशासारखे आहेत. जेंव्हा ते ऐकतात तेंव्हा लगेच सैतान येतो, आणि त्यांच्यात पेरलेले वचन घेऊन जातो. १६ काही लोक
खडकाळ जमिनीत पेरलेल्या बियांसारखे असतात. ते ऐकतात, तेंव्हा लगेच आनंदाने ग्रहण करतात. १७ पण त्यांनी ते वचन
आपल्यामध्ये खोलमध्ये रूजवू ( मुळावू ) न दिल्यामुळे, ते थोडाच काळ टिकतात. जेंव्हा वचनामुळे संकटे येतात, किंवा त्रास होतो, तेंव्हा ते त्वरीत विश्वास ठेवण्याचे सोडून देतात. १८ इतर लोक काटेरी झुडपात बी पेरल्याप्रमाणे आहेत. ते असे आहेत की, जे
वचन ऐकतात, १९ परंतु या संसाराच्या चिंता, संपत्तीचा मोह, आणि इतर गोष्टीची वासना या गोष्टी आड येतात. व वचन
खुंटवितात, व ते फळ देत नाहीत. २० आणि इतर दुसरे चांगल्या जमिनीत पेरलेल्या बियांसारखे आहेत ते असे आहेत की, जे वचन
ऐकतात. स्विकारतात, आणि फळ देतात. कोणी तीसपट, साठपट, कोणी शंभरपट." २१ आणखी तो त्यांस म्हणाला, " दिवा
मापाखाली, किंवा पलंगाखाली कधी ठेवतात काय? तो दिवठणीवर ठेवण्यासाठी आणीत नाहीत काय? २२ प्रत्येक गोष्ट जी
झाकलेली आहे, ती उघड होईल. आणि प्रत्येक गुप्त गोष्ट जाहीर होईल. २३ ज्याला कान आहेत तो ऐको! २४ नंतर तो त्यास
म्हणाला, " तुंम्ही जे ऐकता त्याचा काळजी पूर्वक विचार करा. जे माप तुम्ही इतरांसाठी वापरता, त्याच मपाने तुमच्यासाठी मोजण्यात
येईल. किंबहुना थोडे जास्तच तुम्हांला देण्यात येईल. २५ कारण ज्याच्याजवळ आहे त्याला जास्त दिले जाईल, आणि ज्या
कोणाजवळ नाही, त्याच्यापासून जे आहे, तेही काढून घेतले जाईल."

२६ आणखी तो म्हणाला, " याव्हे एलोहिमचे राज्य असे आहे की, एखादा मनुष्य जमिनीवर बी पसरून ताकतो. २७ रात्री झोपेत
आणि दिवसा उठतो. बी रूजते व ते वाढते हे कसे होते, हे त्याला कळत नाही. २८ जमीन आपोआप पीक उपजविते. प्रथम
अंकुर, नंतर त्यावर तुरा, त्यानंतर दाण्यांनी भरलेली ओंबी, मग कणसात पूर्ण वाढलेला दाणा. २९ पीक तयार होते, तेंव्हा तो त्याला
लगेच विळा लावतो. कारण कापणीची वेळ आलेली असते."

३० येशूवाह म्हणाला, "आपण याव्हे एलोहिमचे राज्य कशासारखे आहे. असे म्हणावे, किंवा कोणती गोष्ट ते समजावून सांगण्यासाठी
उपयोगात आणवी ? ३१ ते मोहरीच्या दाण्यासारखे आहे. जो जमिनीत पेरते वेळी पृथ्वीवरील सर्व दाण्यात सर्वात लहान असतो. ३२
परंतु तो पेरला जातो, तेंव्हा तो वाढतो, व मळयातील सर्व झाडात मोठा होतो. त्याला मोठया फांद्या येतात, आणि आकाशातील
पाखरे त्याच्या सावलीत घरटे बांधू शकतात." ३३ अशा अनेक दाखल्यांनी त्याने ते समजू शकतील, असा संदेश त्यांना सांगितला.
३४ दाखल्यांचा उपयोग केल्याशिवाय त्याने त्यांना इतर काहीही सांगितले नाही. परंतु तो थालमीद (शिष्यां) सह एकांतात होता,
तेंव्हा त्याने शिष्यांना सर्व समजावून सांगितले.

३५ त्या दिवशी संध्याकाळ झाल्यावर तो त्यांना म्हणाला, "आपण सरोवरापलीकडे जाऊ या." ३६ मग त्यांनी लोकसमुदायाला सोडले,
आणि तो नावेत होता तसेच त्याला घेऊन गेले. त्यांच्यावबरोबर इतरही दुस-या नावा होत्या. ३७ नंतर जोराचे वा-याचे वादळ आले,

आणि लाटा नावेवर आदळू लागल्या, व ती पाण्याने भरू लागली. ३८ परंतु येशूवाह मागच्या बाजूस वरामावर उशी घेऊन झोपला होता. त्यांनी त्याला उठविले आणि म्हंटले, " रब्बुनी (गुरूजी)आपण बुडत आहोत, तरी आपणांस काळजी वाटत नाही काय?" ३९ मग तो उठला, आणि त्याने वा-याला धमकाविले, आणि सरोवराला म्हणाला , " शांत हो ! स्तब्ध राहा." मग वारा थांबला, व तेथे मोठी शांतता पसरली. ४० मग तो त्यांना म्हणाला, "तुंम्ही का भिता? तुमच्याकडे अजूनही कसा विश्वास नाही?" ४१ परंतु ते अतिशय घावरले, आणि एकमेकांस म्हणाले , " हा आहे तरी कोण, की वारा आणि सरोवर देखील त्याचे ऐकातात."

**५**.१ मग ते सरोवराच्या पलीकडच्या बाजूच्या गरसेकरांच्या प्रदेशात आले आणि तो नावेतून उतरला.२ तेंव्हा लगेच एक दुष्ट आत्मा लागलेला मनुष्य कबरस्थानातून निघून त्याच्याकडे आला. ३ हा मनुष्य कबरेमध्ये राहत असे, आणि कोणीही त्याला साखळदंडानी सुद्धा बांधून ठेवू शकत नव्हते. ४ कारण पुष्कळदा त्याच्या पायात बेडया घालून साखळयांनी बांधलेले असतानाही त्याने साखळया तोडल्या आणि बेडयांचे तुकडे केले. कोणीही त्याला काबूत आणू शकत नव्हते. ५ तो रात्रंदिवस कबरांतून आणि डोंगरातून मोठयाने ओरडत असे, आणि दगडांनी स्वतःस ठेचून घेत असे. ६ त्याने येशूवाहला दुरून पाहिले तेंव्हा तो येशूवाहकडे धावत आला, आणि त्याच्यापुढे पडून त्याने त्याला नमन केले.७ व तो मोठयाने ओरडून म्हणाला , " येशूवाह परात्पर याव्हे एलोहिमच्या मूला, तुला माझ्याकडून काय पाहिजे? मी तुला याव्हे एलोहिमची शपथ घालून विनवितो की मला छळू नकोस." ८ कारण येशूवाह त्याला म्हणत होता, " अरे अशुद्ध आत्म्या या माणसातून नीघ." ९ मग येशूवाहने त्याला विचारले, "तुझे नाव काय?" तो मनुष्य येशूवाहला म्हणाला " माझे नाव सैन्य आहे.( सैन्य = रोमन सैन्यातील सुमारे पाच हजार सैनिकांची तुकडी ) कारण आम्ही पुष्कळ आहोत." १० त्यांना या हद्दीतून घालवू नये म्हणून, तो मनुष्य येशूवाहला पुन्हा पुन्हा विनवीत होता.११ तेथे डोंगराच्या कडेला डुकरांचा एक कळप चरत होता.१२ मग त्या दुष्ट आत्म्यांने येशूवाहला विनंती केली आणि म्हणाले, " आम्हांला त्या डुकरांत पाठव म्हणजे आंम्ही त्यांच्यात शिरू." १३ मग त्याने त्यांना तसे करण्यास परवानगी दिली. मग दुष्ट त्या मनुष्यातून बाहेर आले, आणि त्या डुकरांत शिरले. मग तो दोन हजारांचा कळप डोंगरावरून पळत खाली जाऊन सरोवरात पडला व बुडून मेला.१४ त्या कळपाची राखण करणारे लोक दूर पळून गेले व त्यांनी ही बातमी गावात व शेतात सांगितली, तेंव्हा काय झाले हे पाहण्यास लोक तेथे आले.१५ ते येशूवाहकडे आले आणि त्यांनी त्या अशुद्ध आत्माग्रस्ताला तेथे बसलेले पाहिले.त्याने कपडे घातले होते. तो शुद्धीवर आलेला, व ज्याला सैन्य नावाच्या अशुद्ध आत्म्यांनी पछाडले होते, तो तोच होता हे पाहिले, तेंव्हा त्यांना भीति वाटली. १६ काही लोक तेथे होते, व त्यांनी येशूवाहने काय केले, हे पाहिले होते, त्यांनी ज्या मनुष्यात दुष्ट आत्मे होते, त्याच्या बाबतीत काय घडले, हे इतरांना सांगितले.१७ मग लोक त्याला आमचा प्रांत सोडून जा असे विनवू लागले.

१८ येशूवाह नावेतून जात असता पूर्वी अशुद्ध आत्माग्रस्त असलेल्या मनुष्याने त्याला आपणाबरोबर येऊ द्यावे, अशी विनंती केली. १९ पण येशूवाहने त्याला येऊ दिले नाही.तो त्यास म्हणाला, " आपल्या घरी तुझ्या लोकांकडे जा आणि अदोनाईने तुझ्यासाठी जे केले ते सर्व सांग.अदोनाईने तुझ्यावर कशी दया केली तेही सांग." २० मग तो निघाला आणि येशूवाहने त्याच्यासाठी जे काही केले याविषयी दकापलिस प्रांतातील येथील लोकांना सांगू लागला.तेव्हा सर्व लोकांना आश्चर्य वाटले.

२१ नंतर येशूवाह नावेत बसून परत सरोवरापलीकडे गेल्यावर, मोठा समुदाय त्याच्या भोवती जमला, तो सरोवराजवळ होता. २२ याईर नावाचा यहूद्यांच्या सभास्थानाचा एक अधिकारी तेथे आला.याईराने येशूवाहला पाहिले तेव्हा तो त्याच्या पाया पडला. २३ आणि आग्रहाने विनंती करून त्याला म्हणाला, " माझी लहान मुलगी मरावयास टेकली आहे.मी विनंती करतो की, आपण येऊन तिला बरे करावे म्हणून तिच्यावर हात ठेवावा." २४ मग येशूवाह त्याच्याबरोबर गेला. लोकांचा मोठा समुदाय येशूवाहच्या मागे चालत होता, व ते त्याच्या भोवती गर्दी करीत होते. २५ त्या लोकांमध्ये एक स्त्री बारा वर्षापासून रक्तस्त्रावाने पीडलेली होती. २६ ब-याच वैद्यांकडून उपचार करून घेऊन सुद्धा तिने बराच त्रास सहन केला होता. तिच्याकडे होते नव्हते, ते सर्व तिने उपचारासाठी खर्च केला होता. पण ती बरी न होता, तिचा आजार वाढला होता. २७ त्या स्त्रीने येशूवाह विषयी ऐकले, तेव्हा ती गर्दीत त्याच्या मागे आली, व त्याच्या झग्याला तिने स्पर्श केला. २८ कारण ती म्हणत होती, " जर मी त्याच्या झग्याला शिवले तरी बरी होईन."

२९ जेंव्हा तिने त्याच्या झग्याला स्पर्श केला, तेव्हा तिचा रक्तस्त्राव थांबला. व आपल्या त्रासातून आपण मुक्त झालो आहोत, असे तिला समजून आले.३० येशूवाहला तावडतोब जाणीव झाली की, आपल्या शरीरातून शक्ती गेली आहे. तो गर्दीत वळून म्हणाला, "माझ्या झग्याला कोणी स्पर्श केला." ३१ थालमीद (शिष्य) येशूवाहला म्हणाले, "लोक तुमच्या भोवती गर्दी करीत आहेत हे तुम्ही पाहता, आणि तरीही विचारता.मला कोणी स्पर्श केला?" ३२ परंतु हे कोणी केले हे पाहण्यासाठी तो सभोवार बघतच राहिला. ३३ त्या स्त्रीला ती बरी झाली आहे हे माहीत होते, म्हणून ती आली आणि येशूवाहच्या पाया पडली.ती स्त्री भीतीने थरथर कापत होती. तिने येशूवाहला सर्व काही सांगितले. ३४ येशूवाह त्या स्त्रीला म्हणाला, "मुली तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. शांतीने जा आणि त्रासापासून मुक्त राहा."

३५ तो हे बोलत असता सभास्थानातील अधिका-याच्या घरून काही माणसे निरोप घेऊन आली ती म्हणाली " तुमची मुलगी मेली आहे.रब्बुनीला (गुरूजींना) का त्रास देता." ३६ येशूवाहने त्यांचे बोलणे ऐकले, आणि तो यहूद्यांच्या सभास्थानाच्या अधिका-याला म्हणाला, " भिऊ नको, फक्त विश्वास धर." ३७ येशूवाहने फक्त केफा, याकोब, आणि याकोबाचा भाऊ योहानान, यांनाच आपल्या बरोबर येऊ दिले. ३८ ते त्या अधिका-याच्या घरी आले. त्यांने लोकांना मोठयाने शोक करताना व रडताना पाहिले.३९ आत गेला आणि त्यांना म्हणाला, " तुम्ही लोक रडून असा गोंधळ का करीत आहात ? ही मुलगी मेलेली नाही, ती झोपली आहे." ४० ते सर्व त्याला हसले. त्याने सर्व लोकांना बाहेर घालवून दिले, व मुलीचे आईवडील व जे त्याच्याबरोबर होते, त्यांना घेऊन जेथे मुलगी होती, तेथे आत गेला. ४१ त्याने मुलीचा हात धरला आणि म्हणाला, "तलीथा कूम" (लहान मुलगी मी तुला सांगतो ऊठ) ४२ ती लहान मुलगी लगेच उठली आणि सभोवती फिरू लागली. (ती बारा वर्षाची होती) ते फार आश्चर्यचकित झाले. ४३ नंतर त्याने त्यांना सक्त ताकीद दिली की, हे कोणाला कळता कामा नये. त्याने तिला खाण्यास देण्याविषयी सांगितले.

**६**.१ येशूवाह तेथून निघाला आणि आपल्या गावी गेला. आणि त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्यामागे गेले. २ शब्बाथ दिवशी तो सभास्थानात शिकवीत होता.पुष्कळ लोकांनी त्याची शिकवण ऐकली तेव्हा ते थक्क झाले. ते म्हणाले, " या माणसाला ही शिकवण कोठून मिळाली? आणि त्याला कोणते ज्ञान देण्यात आले आहे की, यासारखे चमत्कार त्याच्या हातून केले जातात? तो सुतार नाही काय? ३ तो मरीयेचा मुलगाच ना? तो याकोब, योसे, यहूदा, आणि शिमोनाचा भाऊ नव्हे काय? व या आपल्याबरोबर आहेत त्या त्याच्या बहिणी नव्हेत काय? " त्याचा स्विकार करण्याविषयी त्यांना प्रश्न पडला. ४ मग येशूवाह त्यांना म्हणाला, " नबीचा (भविष्यवाद्यांचा) सन्मान होत नाही असे नाही, पण त्याच्या गावात, नगरात, त्याच्या नातेवाईकात, आणि त्याच्या कुटुंबात होत नसतो." ५ आणि तेथे त्याला चमत्कार करता आला नाही. फक्त त्याने काही रोगी लोकांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना बरे केले. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले. ६ नंतर येशूवाह शिक्षण देत जवळपासच्या गावोगावी फिरला.७ त्याने बारा थालमीद (शिष्यांना) आपणांकडे बोलावून घेतले, व त्यांना जोडीजोडीने पाठविले, आणि त्याने त्यांना अशुद्ध आत्म्यावर अधिकार दिला.८ त्याने त्यांना आज्ञा दिल्या की " काठीशिवाय प्रवासासाठी त्यांनी काही घेऊ नये, भाकर, झोळी, किंवा कमरकशात पैसे काही घेऊ नये. ९ त्यांनी वहाणा घालाव्यात, पण जास्ती अंगरखा घेऊ नये. १० तो त्यांना म्हणाला, " ज्या कुठल्याही घरात तुंम्ही जाल तेथे तुंम्ही ते नगर सोडेपर्यंत राहा.११ आणि ज्या ठिकाणी तुमचे स्वागत होणार नाही, किंवा तुमचे ऐकणार नाहीत, ते गाव तुंम्ही सोडून जा. आणि त्यांच्याविरूद्ध साक्ष म्हणून तुमच्या पायाची धूळ तेथेच झटकून टाका." १२ मग थालमीद (शिष्य) गेले आणि लोकांनी पश्चात्ताप करावा, म्हणून त्यांना उपदेश केला.१३ त्यांनी पुष्कळ अशुद्ध आत्मे काढली, आणि अनेक रोग्यांना जैतुनाचे तेल लावून त्यांना बरे केले.

१४ हेरोद राजाने येशूवाह विषयी ऐकले कारण येशूवाहचे नाव सगळीकडे गाजले होते. काही लोक म्हणत होते बाप्तिस्मा करणारा योहानान मेलेल्यांतून उठला आहे, म्हणून त्याच्याठायी चमत्कार करण्याचे सामर्थ्य आहे. १५ इतर लोक म्हणत, " येशूवाह एलीया आहे " तर काही लोक म्हणत, " हा नबी (भविष्यवाद्यां) पैकी एक आहे."१६ परंतु हेरोदाने जेंव्हा ऐकले तेव्हा तो म्हणाला, " ज्या योहानानचा मी शिरच्छेद केला, तो मरणातून उठविला गेला आहे." १७ कारण हेरोदाने स्वतः योहानानला पकडून तुरूंगात

टाकण्याची आज्ञा दिली होती. त्याचा भाऊ फिलिप याची बायको हेरोदीया हिच्याबरोबर लग्न केले. त्या कारणामुळे त्याने असे केले. १८ योहानान हेरोदाला सांगत असे की " तुझ्या भावाच्या बायकोशी असे लग्न करणे तुला योग्य नाही." १९ याकरिता हेरोदीयाने योहानान विरूद्ध मनात अढी धरली, ती त्याला ठार मारण्याची संधी पाहात होती. परंतु ती त्याला मारू शकली नाही. २० कारण हेरोद योहानानला भीत असे हेरोदाला माहीत होते की, योहानान नीतिमान आणि पवित्र मनुष्य आहे, म्हणून तो त्याचे संरक्षण करी.हेरोद योहानानचे बोलणे ऐके तेव्हा फार गोंधळून जाई, परंतु तो आनंदाने त्याचे ऐकत असे.२१ मग एके दिवशी संधी आली, आपल्या वाढदिवशी हेरोदाने आपले महत्वाचे अधिकारी, सैन्यातील सरदार, व गालीलातील प्रमुख लोकांना मेजवानी दिली. २२ हेरोदीयाची मुलगी मेजवानीच्या ठिकाणी आली व तिने नाच केला, आणि हेरोद व आलेल्या पाहुण्यांना आनंदीत केले. तेंव्हा हेरोद राजा मुलीला म्हणाला, " तुला जे पाहिजे ते माग म्हणजे मी ते तुला देईन." २३ तो गंभीरपणे शपथ वाहून म्हणाला, "माझ्या अर्ध्या राज्यापर्यंत जे काही तू मागशील ते मी तुला देईन." २४ ती बाहेर गेली आणि तिच्या आईला म्हणाली, "मी काय मागू?" आई म्हणाली, " बाप्तिस्मा करणा-या योहानानचे शीर." २५ आणि ती मुलगी लगेच आत राजाकडे गेली आणि म्हणाली, " मला तुम्ही या क्षणी बाप्तिस्मा करणा-या योहानानचे शीर तवकात घालून द्यावे, अशी माझी इच्छाआहे." २६ राजाला फार वाईट वाटले, परंतु त्याच्या शपथेमुळे व भोजनास आलेल्या पाहुण्यांमुळे त्याला तिला नकार द्यावा असे वाटले नाही.२७ तेंव्हा राजाने लगेच वध करणा-याला पाठविले, व योहानानचे शीर घेऊन येण्याची आज्ञा केली. मग तो गेला व तुरूंगात जाऊन त्याने योहानानचे शीर कापले. २८ ते शीर तवकात घालून मुलीला दिले, व मुलीने ते आईला दिले.२९ योहानानच्या थालमीद (शिष्यांनी) हे ऐकले तेव्हां ते तेथे आले, त्यांनी त्याचे शरीर उचलले, आणि कबरेत नेऊन ठेवले.

३० प्रेषित येशूवाह सभोवती जमले. त्यांनी जे केले आणि शिकविले, ते सर्व त्याला सांगितले. ३१ नंतर येशूवाह त्यांना म्हणाला, "तुंम्ही माझ्याबरोबर एकांती चला, आणि थोडा विसावा घ्या." तो असे म्हणाला, कारण तेथे पुष्कळ लोक जात येत होते. व त्यांना जेवावयास वेळ मिळाली नव्हती. ३२ तेंव्हा ते सर्वजण नावेत बसून निर्जन ठिकाणी गेले.३३ परंतु पुष्कळ लोकांनी त्यांना जाताना पाहिले, व ते कोण आहेत हे त्यांना कळाले. तेंव्हा सर्व गावांतील लोक पायीच धावत निघाले व येशूवाह तेथे येण्या अगोदरच ते तेथे पोहोंचले.३४ येशूवाह नावेतून उतरला तेंव्हा त्याने मोठा लोकसमुदाय पाहिला, व त्याला त्यांचा कळवळा आला.कारण ते मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे होते. मग तो त्यांना ब-याच गोष्टी शिकवू लागला. ३५ या वेळेपर्यंत बराच उशीर झाला होता, आणि दिवस मावळतीला आला होता. मग त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्याकडे आले व म्हणाले, " ही निर्जन जागा आहे, व बराच उशीर झाला आहे. ३६ लोकांना पाठवून द्या, म्हणजे ते सभोवतालच्या शेतात व गावात जाऊन त्यांच्यासाठी खायला विकत आणतील." ३७ परंतु येशूवाहने त्यांना उत्तर दिले, " तुंम्ही त्यांना काहीतरी खावयास द्या." ते त्याला म्हणाले, "आम्ही जाऊन त्यांना खाण्यासाठी दोनशे दीनारांच्या (रूपयाच्या) भाकरी विकत आणाव्या काय?" ३८ तो त्यांना म्हणाला, "जा आणि पाहा की, तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?" त्यांनी पाहिले तेंव्हा ते म्हणाले, " आमच्याजवळ पाच भाकरी आणि दोन मासे आहेत." ३९ येशूवाहने थालमीद (शिष्यांना) सांगितले, " सर्व लोकांना गटागटाने हिरवळीवर बसायला सांगा." ४० तेंव्हा सर्व लोक गटागटाने बसले.प्रत्येक गटात पन्नास ते शंभर लोक होते. ४१ येशूवाहने पाच भाकरी आणि दोन मासे घेतले, त्याने त्याचे वाटे केले, त्यांने तेथे आकाशाकडे पाहून याव्हे एलोहिमचे आभार मानले. भाकरी मोडल्या व त्या लोकांना वाढण्यासाठी आपल्या थालमीद (शिष्यां) जवळ दिल्या. दोन मासे देखील वाटून दिले. ४२ मग ते सर्व जेवून तृप्त झाले. ४३ त्यांनी भाकरीच्या व माशांच्या तुकडयांनी भरलेल्या बारा टोपल्या भरल्या. ४४ आणि जे पुरूष जेवले, त्यांची संख्या पाच हजार होती.

४५ नंतर येशूवाहने लगेच शिष्यांना नावेत बसविले, आणि पलीकडे असलेल्या बेथसैदा येथे त्यांच्यापुढे जाण्यास सांगितले. तोपर्यंत त्याने लोकांना निरोप देऊन घरी पाठवले. ४६ त्यांना निरोप दिल्यावर तो प्रार्थना करण्यास डोंगरावर गेला. ४७ संध्याकाळ झाली तेंव्हा नाव ही सरोवराच्या मध्यभागी होती. आणि जमिनीवर येशूवाह एकटाच होता. ४८ मग त्याने त्यांना वल्ही मारणे अवघड जात आहे असे पाहिले.कारण वारा त्यांच्या विरूद्धचा होता. पहाटे तीन ते सहाच्या दरम्यान येशूवाह नावेकडे गेला. येशूवाह पाण्यावर

चालत होता, व तो त्यांना ओलंडून पुढे जाऊ लागला. ४९ जेंव्हा त्यांनी त्याला सरोवरा मध्ये पाण्यावर चालताना पाहिले, तेंव्हा त्यांना ते अशुद्ध आत्मा आहे, असे वाटले व ते ओरडले.५० कारण त्या सर्वांनी त्याला पाहिले व ते घाबरून गेले. तो लगेच त्यांना म्हणाला, " धीर धरा, भिऊ नका, मी आहे." ५१ नंतर तो त्यांच्याकडे नावेत गेला, तेंव्हा वारा शांत झाला. ते अतिशय आश्चर्य चकित झाले. ५२ कारण त्यांना भाकरीच्या संदर्भातील चमत्कार समजलाच नव्हता, आणि त्यांची आत्मे (मने) कठीण झाली होती.

५३ त्यांनी सरोवर ओलांडल्यावर ते गनेसरेतच्या किना-याला आले व नावेला बांधून टाकले.५४ ते नावेतून उतरले, तेव्हा लोकांनी येशूवाहला ओळखले.५५ लोक हे सांगण्यासाठी इतर सर्व लोकांकडे पळाले, आणि आजा-यांना खाटेवर घालून जेथे तो आहे, असे ऐकले तेथे घेऊन जाऊ लागले. ५६ खेडयांपाडयांत व गावात किंवा शेतात, आणि बाजाराच्या जागी कोठे तो गेला, तेथे लोकांनी आपल्या आजारी माणसांना आणून ठेवले. त्यांनी त्याला फक्त त्याच्या झग्याच्या काठाला स्पर्श करू देण्याची विनंती केली. ज्यांनी त्याला स्पर्श केला ते बरे झाले.

**७**.१ काही परूशी आणि तोराचे रब्बुनी ( नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री ) जे यरूशलेमेहून आले होते, ते येशूवाह भोवती जमले. २ आणि त्यांनी त्याच्या थालमीद (शिष्यांना) अशुद्ध ( म्हणजे हात न धुता ) जेवताना पाहिले होते.३ (कारण परूशी व इतर सर्व यहूदी वाडवडिलांच्या संप्रदाय पाळून विशिष्ट रीतीने स्वच्छ हात धुतल्याशिवाय जेवत नाहीत.) ४ बाजारातून आणलेली कुठलीही वस्तू पाण्याने धुतल्याशिवाय ते खात नाहीत; त्यांच्या पूर्वजांच्या इतर अनेक चालीरीती ते पाळतात. आणि प्याले, घागरी, तांब्याची भांडी धुणे, अशा दुस-या इतर रूढीही पाळतात. ५ मग परूशी व तोराचे रब्बुनी(नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री) यांनी येशूवाहला विचारले, "तुझे थालमीद (शिष्य) वाडवडिलांच्या संप्रदाय का पाळत नाहीत? हात न धुता का जेवतात? " ६ येशूवाह त्यांना म्हणाला, "यशयाने जेव्हा तुम्हा ढोंगी लोकांविषयी भविष्य केले, तेव्हा त्याचे खरोखरच होते." यशया लिहितो, हे लोक ओठांनी माझा सन्मान करतात, परंतु त्यांची आत्मे (अंतःकरणे) माझ्यापासून दूर आहेत.७ ते व्यर्थ माझी उपासना करतात, कारण ते लोकांना शास्त्र म्हणून जे शिकवितात, ते मनुष्यांनी केलेले नियम असतात. ८ तुम्ही याव्हे एलोहिमच्या आज्ञा पाळत नाही, तर आता तुंम्ही मनुष्यांनी शिकवण पाळता आहात."

९ आणखी तो त्यांना म्हणाला, " आपल्या स्वतःच्या संप्रदाय प्रस्थापित करण्यासाठी, याव्हे एलोहिमच्या आज्ञा दूर करण्यात तुम्हीं पटाईत आहात." १० मोशे म्हणाला, "तू आपल्या आईवडिलांचा सन्मान कर." जो मनुष्य आपल्या वडिलांबद्दल किंवा आईबद्दल वोलतो, त्याला ठार मारलेच पाहिजे.११ परंतु तुम्हीं शिकविता, एकादा मनुष्य आपल्या आईला व वडिलांना असे म्हणू शकतो की, तुम्हांला मदत करण्यासाठी माझ्याकडे थोडेफार आहे. परंतु तुम्हांला मदत करण्यासाठी मी ते वापरणार नाही, मी ते याव्हे एलोहिमला देईन.१२ तुम्ही त्याला त्याच्या वडिलांसाठी किंवा आईसाठी काही करू देत नाही. १३ तुम्ही अशा रूढी पाळण्याचे शिकवून, रूढींनी याव्हे एलोहिमचे वचन रद्द करता, आणि तुम्हीं अशा प्रकारच्या अनेक गोष्टी करता. १४ येशूवाहने लोकांना आपल्याकडे पुन्हा बोलावून म्हंटले, " प्रत्येकाने माझे ऐका व हे समजून घ्या.१५ बाहेरून मनुष्याच्या आत जाऊन त्याला अपवित्र करील असे काही नाही. ज्या कुणाला ऐकायला कान आहेत तो ऐको." १६ (ग्रीक भाषांतर करणा-यांनी १६ वे वचन हे घेतलेले आहे.) "ज्या कुणाला ऐकायला कान आहेत तो ऐको."

१७ लोकसमुदायाला सोडून येशूवाह घरात गेला, तेव्हां थालमीद (शिष्यां) नी त्याला या दाखल्याविषयी विचारले. १८ तो त्यांना म्हणाला, "तुम्हांला देखील हे समजत नाही काय? " जे बाहेरून मनुष्याच्या आत जाते ते त्याला अपवित्र करीत नाही, हे तुम्हांला समजत नाही का? १९ कारण ते त्याच्या आत्म्यात (अंतःकरणात) जात नाही, तर त्याच्या पोटात जाते.नंतर ते शरीराबाहेर जाते, असे सांगून सर्व अन्न त्याने शुद्ध ठरविले.२० आणखी तो म्हाणाला, " जे माणसाच्या आतून बाहेर पडते ते माणसाला अपवित्र करते, कारण आतून म्हणजे आत्म्यातून (अंतःकरणातून) वाईट विचार बाहेर पडतात. २१ जारकर्म, चोरी, खुन, २२ व्यभिचार, लोभ, वाईटपणा, कपट, कामातुरपणा, मत्सर, शिव्यागाळी, अहंकार, आणि मूर्खपणा, २३ या सर्व वाईट गोष्टी आतून बाहेर पडतात.

आणि माणसाला अपवित्र करतात." २४ येशूवाह त्या ठिकाणाहून निघाला आणि सोर प्रांताच्या आसपासच्या प्रदेशात गेला. तो एका घरात गेला व हे कोणाला कळू नये, अशी त्याची इच्छा होती. परंतु तो त्याची उपस्थिती लपवू शकला नाही. एका स्त्रीने ऐकले की, येशूवाह तेथे आहे.तिच्या मुलीला अशुद्ध आत्मा लागलेला होता. २५ ती स्त्री आली व येशूवाहच्या पाया पडली. २६ ती स्त्री ग्रीक होती, व सिरीयातील फिनीशिया येथे जन्मली होती. तिने येशूवाहला आपल्या मुलीतून अशुद्ध आत्मा काढण्याची विनंती केली. २७ येशूवाह तिला म्हणाला, " प्रथम मुलांना तृप्त होऊ दे, कारण मुलांची भाकरी घेऊन कुत्राला टाकणे योग्य नव्हे." २८ परंतु ती त्याला म्हणाली, " अदोनाई कुत्रीसुद्धा मुलांच्या हातून मेजाखाली पडलेला चुरा खातात." २९ येशूवाह त्या स्त्रीला म्हणाला, " तुझ्या या उत्तरामुळे तू शांतीने घरी जा. तुझ्या मुलीतून अशुद्ध आत्मा निघून गेला आहे." ३० मग ती घरी आली, आणि तिची मुलगी अंथरूणावर पडली आहे. व तिच्यातून अशुद्ध आत्मा निघून गेला आहे, असे तिने पाहिले.

३१ येशूवाह सोर परीसराच्या प्रदेशातून परतला आणि सिदोनहून दकापलीसच्या वाटेने गालील सरोवराकडे आला.३२ तेथे काही लोकांनी एका बहि-या तोत-या मनुष्याला येशूवाहकडे आणले व आपण त्याच्यावर हात ठेवा अशी विनंती केली. ३३ येशूवाहने त्याला लोकांपासून एका बाजूस घेऊन त्याच्या कानात आपले बोट घातले. नंतर तो थुंकला आणि त्या माणसाच्या जिभेला स्पर्श केला. ३४ त्याने आकाशाकडे पाहून मोठा उसासा टाकला व म्हणाला, " एफ्फात्था" म्हणजे मोकळा हो.३५ आणि त्याच क्षणी त्याचे कान मोकळे झाले. त्याला बोलता येऊ लागले.त्याने कोणाला सांगू नका, अशी आज्ञा केली. ३६ येशूवाह नेहमी अशा गोष्टी न सांगण्याविषयी लोकांना सूचना देऊ लागला.(पण लोक त्याविषयी अधिकाअधिक सांगत गेले.) ३७ ते लोक फारच आश्चर्यचकित झाले, व म्हणाले, " त्याने सर्व काही चांगले केले आहे, तो बहि-यांना ऐकण्यास आणि मुक्यांना बोलावयास लावतो."

८.१ त्या दिवसात आणखी एका वेळी लोकांचा मोठा समुदाय जमला. त्यांच्याजवळ खावयास काही नव्हते. येशूवाहने आपल्या थालमीद (शिष्यांस) बोलाविले आणि त्यांना म्हणाला, २ मला या लोकांचा कळवळा येतो, कारण तीन दिवसांपासून ते माझ्याबरोबर आहेत, आणि त्यांच्याजवळ खावयास काही नाही.३ मी जर त्यांना उपाशी घरी पाठविले, तर ते रस्त्यातच कासावीस होतील. त्यांच्यातील काही फार दुरून आले आहे." ४ त्याच्या थालमीद (शिष्यांनी) उत्तर दिले, "या निर्जन जागी एवढया लोकांना पुरतील इतक्या भाकरी कुठून मिळू शकेल काय? " ५ येशूवाहने त्यांना विचारले, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? थालमीद (शिष्य) म्हणाले, "आमच्याकडे सात भाकरी आहेत." ६ नंतर त्याने लोकांना जमिनीवर बसण्याची आज्ञा केली. त्याने सात भाकरी घेतल्या, आभार मानले व त्या मोडल्या व आपल्या शिष्यांजवळ त्या वाढण्यास दिल्या.नंतर त्यांनी त्या लोकांना वाढल्या. ७ त्यांच्याजवळ थोडे लहान मासे होते, मग त्याने त्यावर आभार मानले, व त्यांना तेही वाढावयास दिले. ८ लोक जेवून तृप्त झाले, उरलेल्या तुकडयांच्या सात टोपल्या त्यांनी भरल्या.९ तेथे सुमारे चार हजार पुरूष होते, नंतर त्याने त्यांना घरी पाठवले. १० आणि लगेच तो आपल्या थालमीद (शिष्यां) सह नावेत बसला, व दल्मनुथा प्रांतात आला. ११ मग परूशी आले व त्याला प्रश्न विचारू लागले.त्याची परीक्षा पाहावी म्हणून त्यांनी त्याला आकाशातून चिंन्ह मागितले. १२ आपल्या आत्म्यात मोठा उसासा टाकून तो म्हणाला, " ही पिढी चिन्ह का मागते? मी तुम्हांस सांगतो की, या पिढीला चिंन्ह दिले जाणार नाही." १३ नंतर त्याने त्यांना सोडले, व तो नावेत जाऊन बसला. व सरोवराच्या पलीकडच्या बाजूस गेला.

१४ थालमीद (शिष्य) भाकरी आणण्याचे विसरले होते, एका भाकरीशिवाय त्यांच्याकडे काही नव्हते. १५ येशूवाहने त्यांना निक्षून सांगितले, "सांभाळा परूश्यांचे खमीर व हेरोदाचे खमीर यापासून सावध राहा." १६ मग ते आपसात चर्चा करू लागले की, "आपल्याजवळ भाकरी नाहीत म्हणून तसे बोलला की काय ?" १७ ते काय बोलतात हे ओळखून येशूवाह त्यास म्हणाला, " आपणाजवळ भाकरी नाहीत याविषयी चर्चा का करता ? अजून तुमच्या लक्षात आले नाही काय व तुम्हांला समजत नाही काय ? तुमचे आत्मे (अंतःकरणे ) कठीण झाले आहे काय ? १८ तुमचे डोळे आंधळे आहेत काय? तुमचे कान बहिरे आहेत काय ? आपल्याकडे पुरेशा भाकरी नसताना मी काय केले हे तुम्हांला आठवत नाही काय? १९ पाच हजारांसाठी मी पाच भाकरी मोडल्या, तेंव्हा जे खाल्ले गेले नाही, अशा भाकरींच्या किती टोपल्या तुम्ही गोळा केल्या ते आठवा. थालमीद (शिष्यांनी) उत्तर दिले, " बारा

टोपल्या." २० चार हजारांसाठी मी सात भाकरी मोडल्या, तेंव्हा तुंम्ही तुकडयांनी किती टोपल्या गोळा केल्या, थालमीद (शिष्यांनी) उत्तर दिले " सात टोपल्या." २१ मग येशूवाह त्यांना म्हणाला, " अजूनही तुम्हांला समजत नाही काय?"

२२ ते बेथसैदा येथे आले आणि काही जणांनी त्याच्याकडे एका आंधळयाला आणले, व येशूवाहने त्याला स्पर्श करावा अशी विनंती केली. २३ मग त्याने आंधळयाला हात धरून त्याला गावाबाहेर नेले. मग येशूवाह त्या आंधळयाच्या डोळयात थुंकला व त्याच्यावर हात ठेवून त्याने विचारले, " तुला काही दिसते काय? " २४ त्याने वर पाहिले आणि म्हणाला, " मला माणसे दिसतात व सभोवताली झाडे चालत असल्यासारखे दिसतात." २५ नंतर येशूवाहने पुन्हा आपला हात त्या माणसाच्या डोळयावर ठेवले, त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला दृष्टी आली.त्याला सर्व काही स्पष्ट दिसू लागले. २६ येशूवाह त्याला त्या गावात पाऊल देखील ठेवू नकोस, असे सांगून घरी पाठवून दिले.

२७ मग येशूवाह व त्याचे शिष्य फिलीप्पै कैसरीयाच्या आसपासच्या गावांत गेले. वाटेत त्याने त्याच्या शिष्यांस विचारले, "लोक मला कोण म्हणून ओळखतात?" २८ त्यांनी त्याला उत्तर दिले. " काही जण म्हणतात, तुंम्ही बाप्तिस्मा करणार योहानान आहात.तर इतर काही एलीया समजतात.तर दुसरे काही तुंम्ही (नवी) भविष्यावाद्यांपैकी एक आहा असे म्हणतात." २९ मग येशूवाहने त्यांना विचारले, "तुम्हांला मी कोण आहे असे वाटते ? " केफाने उत्तर दिले, " तू मशीहा आहेस." ३० येशूवाह शिष्यांना म्हणाला, " मी कोण आहे हे कोणालाही सांगू नका."

३१ तो त्यांना शिकवू लागला, " मनुष्याच्या मुलाने पुष्कळ दुःख भोगावे, झाक्वेन (वडील), एलयोवन कोहेन ( मुख्य याजक) , तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री) यांजकडून नाकारले जावे. त्याला जिवे मारले जावे, व तिस-या दिवशी त्याने पुन्हा उठावे, हे होणे अगत्याचे आहे." ३२ त्याने हे स्पष्टपणे सांगितले, तेव्हा केफाने येशूवाहला बाजूला घेतले व तो त्याला दटावू लागला. ३३ परंतु येशूवाहने वळून आपल्या थालमीद (शिष्यां) कडे पाहिले व केफाला धमकावून म्हंटले, " अरे सैताना माझ्यापासून निघून जा. याव्हे एलोहिमच्या गोष्टीविषयी तुला काही वाटत नाही. तुझे लक्ष याव्हे एलोहिमच्या गोष्टीकडे लागलेले नाही. तर फक्त मानवाच्या दृष्टिकोणातून महत्वाच्या असणा-या गोष्टीकडे आहे." ३४ नंतर त्याने आपल्या थालमीद (शिष्यां) सह लोकांना बोलाविले व त्यांना म्हणाला, " जर कोणाला माझ्या मागे यावयाचे आहे, तर त्याने आत्मत्याग करावा. आपला वधस्तंभ उचलून घ्यावा, व मला अनुसरावे.

३५ जो कोणी आपला आत्मा वाचवू पाहतो तो आत्म्याल मुकेल. व जो कोणी माझ्यासाठी, व शुभवर्तमानाकरिता आपल्या आत्म्याला मुकेल, तो आपला आत्मा वाचवील. ३६ मनुष्याने सर्व जग मिळविले व रूहव्वाह् (आत्म्याचा) नाश करून घेतला तर त्याला काय लाभ? ३७ आत्म्याच्या मोबदल्यात मनुष्य काय देऊ शकेल? ३८ या व्यभिचारी आणि पापी पिढीत जो कोणी माझी व माझ्या वचनांची लाज धरतो, तर आदाम बेन (मनुष्याचा मुलगा) जेव्हा तो आपल्या आब्बा च्या (बापाच्या) गौरवात कादोश मालाक (पवित्र दूत) दूतांसह येईल, तेव्हा त्यांची लाज धरील."

९.१ येशूवाह त्या लोकांना म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो की, येथे उभे असलेले काही असे आहेत की, ज्यांना याव्हे एलोहिमचे राज्य सामर्थ्यानिशी आलेले दिसे पर्यंत मरणाचा अनुभव येणार नाही." २ सहा दिवसानंतर येशूवाहने केफा, याकोब, आणि योहानान यांना आपल्याबरोबर एका उंच डोंगरावर नेले, आणि तेथे त्यांच्यासमोर त्याचे रूपांतर झाले.३ त्याची वस्त्रे चमकदार अत्यंत पांढरी शुभ्र इतकी की, तशी पृथ्वीवरील कोणत्याही परिटाला शुभ्र करता येणार नाहीत, अशी होती.४ एलीया व मोशे त्याच्याबरोबर प्रगट झाले, ते येशूवाह बरोबर संभाषण करीत होते. ५ केफा येशूवाहला म्हणाला, "रब्बुनी (गुरूजी) आपण येथे आहोत हे चांगले आहे. आपण तीन मंडप बनवू , एक आपणांसाठी एक, मोशेसाठी व एक, एलीयासाठी." ६ केफा असे बोलला, कारण काय बोलावे ते त्याला समजेना, कारण ते भयभीत झाले होते. ७ मग एक मेघ आला आणि त्याने त्यांच्यावर छाया केली. मेघातून एक वाणी झाली, " हा माझा प्रिय मुलगा आहे याचे तुंम्ही ऐका." ८ आणि एकाएकी त्यांनी एकदम पाहिले तेंव्हा त्यांना येशूवाह शिवाय कोणीही

दिसले नाही. ९ ते डोंगरावरून खाली येत असता येशूवाहने त्यांना आज्ञा केली की, "तुम्हीं जे पाहिले आहे ते मनुष्याच्या मुलगा मेलेल्यातून उठे पर्यंत कोणालाही सांगू नका." १० म्हणून त्यांनी ही गोष्ट त्यांच्यातच ठेवली. परंतु ते मेलेल्यांतून उठणे याचा अर्थ काय याविषयी आपसात चर्चा करीत होते.११ त्यांनी येशूवाहला विचारले, "प्रथम एलीया आला पाहिजे, असे तोराचे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री) का म्हणतात?" १२ तो त्यांना म्हणाला, "होय, एलीया सर्व गोष्टी व्यवस्थितपणे करण्यासाठी आला पाहिजे. परंतु मनुष्याच्या मुलाविषयी त्याने पुष्कळ दुःखे सोसावे, व नाकारले जावे, असे शास्त्रलेखात का लिहिले आहे? १३ मी तुम्हांस सांगतो, एलीया आधीच आला आहे, आणि जसे त्याच्याविषयी लिहिले आहे, तसे त्यांनी त्याना पाहिजे तसे त्याचे केले."

१४ नंतर ते उरलेल्या थालमीद (शिष्यां) जवळ आले.तेव्हां त्यांना त्याच्या सभोवती मोठा लोकसमुदाय दिसला. आणि तोराचे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी शास्त्री) त्यांच्याशी वाद घालीत होते. १५ सर्व लोक येशूवाहला पाहताच आश्चर्यचकित झाले, आणि ते त्याला प्रणाम करण्यासाठी धावले. १६ येशूवाहने त्यांना विचारले, " तुम्ही त्यांच्याशी कसला वाद घालीत आहात?" १७ लोकांतील एकाने त्याला उत्तर दिले."रब्बुनी (गुरूजी) मी माझ्या मुलाला आपल्याकडे आणले त्याला अशुद्ध आत्मा लागला असून तो बोलू शकत नाही. १८ आणि जेव्हां तो त्याला धरतो तेव्हां त्याला खाली आपटतो व तोंडाला फेस आणतो. दात चावतो, व नंतर ताठ होतो. मी आपल्या थालमीद (शिष्यांना) त्याला काढावयास सांगितले, परंतु ते काढू शकले नाहीत." १९ येशूवाह त्यांना म्हणाला, " तुम्ही लोक विश्वास ठेवीत नाही, मी तुमचे कोठवर सहन करू ? मुलाला इकडे आणा." २० नंतर त्यांनी मुलाला येशूवाहकडे आणले, आणि जेव्हा त्या आत्म्याने येशूवाहकडे पाहिले तेव्हा लगेच त्या मुलाला पिळून टाकले, तो जमिनीवर पडला आणि तोंडाला फेस आला आणि तो लोळू लागला. २१ नंतर येशूवाहने त्याच्या वडिलांना विचारले, " किती काळ हा असा आहे ?" वडिलांनी उत्तर दिले, "बाळपणापासून हा असा आहे.२२ पुष्कळदा ठार करण्यासाठी तो त्याला अग्नीत किंवा पाण्यात टाकीत असे, परंतु आपण काही करत असाल तर आम्हांवर दया करा, आणि आम्हांला मदत करा." २३ येशूवाह त्याला म्हणाला, " तू म्हणालास तुम्हांला काही तरी करणे शक्य असेल तर, परंतु जो विश्वास ठेवतो त्या मनुष्याला सर्व काही शक्य असते." २४ तेव्हा लागलेच मुलाचे वडील मोठयाने ओरडून म्हणाले, "माझा अविश्वास घालवण्यास मदत करा." २५ येशूवाहने लोकसमुदाय त्याच्याकडे धावत येत आहे असे पाहिले तेव्हा येशूवाह त्या अशुद्ध आत्म्याला धमकावून म्हणाला, " अरे याला मुके बहिरे करणा-या आत्म्या मी तुला आज्ञा करतो की, याच्यातून बाहेर निघ, आणि पुन्हा कधीही याच्यात शिरू नको." २६ नंतर तो अशुद्ध आत्मा किंचाळून, आणि मुलाला आगदी पिळून बाहेर निघाला.मुलगा मृतासारखा झाला आणि लोकांना वाटले, तो मेला.२७ परंतु येशूवाहने त्याला हातास धरून त्याच्या पायावर उभे केले, आणि मुलगा उभा राहिला. २८ नंतर येशूवाह घरात गेल्यावर त्याच्या थालमीद (शिष्यांनी) त्याला एकांतात विचारल, "आम्ही तो अशुद्ध आत्मा का काढू शकलो नाही?" २९ येशूवाह त्यांना म्हणाला, "ही असली अशुद्ध आत्मे प्रार्थने शिवाय, व उपवासावाचून दुस-या कशाने निघणे शक्य नाही."

३० ते तेथून निघाले आणि गालीलातून प्रवास करीत गेले. ते कोठे आहेत हे कोणालाही कळू नये अशी येशूवाहची इच्छा होती. ३१ कारण तो आपल्या थालमीद (शिष्यांस) शिकवीत होता. तो त्यांना म्हणाला, " मनुष्याचा मुलगा विश्वास घाताने धरून माणसांच्या हाती दिला जाणार आहे. ते त्याला ठार मारतील. परंतु मारला गेल्यानंतर तो तिस-या दिवशी उठेल." ३२ पण या बोलण्यास अर्थ त्यांना समजला नाही. आणि त्याविषयी त्याला विचारण्यास ते भीत होते.

३३ येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) कफर्णहूमास आले. येशूवाह घरात असता त्याने त्यांना विचारले, "वाटेत तुम्हीं कशाविषयी चर्चा करीत होता ? " ३४ परंतु ते गप राहिले कारण वाटेत त्यांनी सर्वांत मोठा याविषयी चर्चा केली होती. ३५ मग येशूवाह खाली बसला, त्याचे बारा जणांना बोलावून त्यांना म्हंटले, "जर कोणाला पहिले व्हावयाचे असेल तर त्याने शेवटले झाले पाहिजे. आणि सर्वांचा सेवक झाले पाहिजे." ३६ येशूवाह एका बालकाला घेऊन त्यांच्यापुढे उभा राहिला. येशूवाहने त्या बालकाच्या हातास धरले, व बालकास उचलून घेऊन त्यांना म्हणाला, ३७ "जो कोणी ह्यासारख्या लहान बालकाला माझ्या नावाने स्विकारतो, तो मला

स्विकारतो. आणि जो कोणी मला स्विकारतो तो केवळ माझाच स्विकार करता असे नाही, तर ज्याने मला पाठविले त्याचाही स्विकार करतो."

३८ योहानान येशूवाहला म्हणाला, " रब्बुनी (गुरूजी) आम्ही एकाला आपल्या नावाने अशुद्ध आत्मे काढताना पाहिले, आणि आम्ही त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. कारण तो आपल्यापैकी नव्हता." ३९ परंतु येशूवाह म्हणाला, " त्याला मना करू नका. कारण जो कोणी माझ्या नावाने चमत्कार करतो, तो नंतर माझ्याविषयी वाईट बोलू शकणार नाही. ४० जो आपल्या विरूद्ध नाही तो आपल्याला अनुकूल आहे. ४१ मी तुम्हांला खरे सांगतो. मशीहाचे म्हणून तुम्हांला जो कोणी एक प्याला पाणी देईल, तो निश्चीत आपल्या प्रतिफळाला मुकणार नाही. ४२ माझ्यावर विश्वास ठेवणा-या या लहानातील एकाला याव्हे एलोहिम पासून परावृत्त करील, त्याच्या गळयात जात्याची तळी बांधून, त्याला समुद्रात फेकून देणे हे त्याच्यासाठी बरे आहे. ४३ जर तुझा उजवा हात तुला पाप करावयास प्रवृत्त करतो, तर तो तोडून टाक. ४४ दोन हात असून अग्नी गंधकाच्या सरोवरात म्हणजे न विझणा-या अग्नीत जाण्यापेक्षा, अपंग असून जीवनात जाणे बरे. (४४ वचन हे काही ग्रीक भाषांतर करणा-यांनी ४३ वचनाला जोडलेले आहे.) ४५ आणि जर तुझा पाय तुला पाप करण्यास प्रवृत्त करतो, तर तो काढून टाक. दोन पाय असून अग्नी गंधकाच्या सरोवरात फेकले जावे, यापेक्षा लंगडा होऊन जीवनात गेलेले बरे. ४६ जर तुझा उजवा डोळा तुला पाप करावयास लावितो, तर तो काढून टाक. ४७ दोन डोळे असून जेथे त्यांना खाणारे किडे मरत नाहीत, आणि अग्नी विझत नाही, ४८ अशा अग्नी गंधकाच्या सरोवरात फेकले जावे, यापेक्षा एक डोळा असून याव्हे एलोहिमच्या राज्यात जाणे हे बरे. ४९ कारण प्रत्येकाची अग्नीने परीक्षा घेतली जाईल.

५० " मीठ चांगले आहे जर मिठाने त्याचा खारटपणा सोडविला, तर ते पुन्हा कसे खारट कराल. तुम्हीं आपणामध्ये मीठ असू द्या, आणि एकमेकांबरोबर शांतीने राहा."

**१०**.१ नंतर येशूवाहने ती जागा सोडून यहूदीया व यार्देन नदी ओलांडून पलीकडे गेला. लोक पुन्हा घोळक्यांनी त्याच्याकडे आले. आणि जसा त्याचा परिपाठ होता, तसे त्याने त्यांना शिकविले. २ काही परूशी येशूवाहकडे आले. त्यांनी त्याला विचारले, " आपल्या पत्नीला घटस्फोट द्यावा हे मनुष्यासाठी कायदेशिर आहे काय? " हे तर त्यांनी त्याची परीक्षा पाहण्यासाठी विचारले. ३ येशूवाहने त्यांना उत्तर दिले. "मोशेने तुम्हांला काय आज्ञा दिली आहे? " ४ ते म्हणाले, " मोशेने पुरूष्याला सूटपत्र लिहिण्याची, व असे करून आपल्या बायकोला सोडण्याची परवानगी दिली आहे." ५ येशूवाह म्हणाला, " कारण केवळ तुमच्या हट्टामुळे मोशेने तुमच्यासाठी ही पर्यायी अनुमती दिली (लिहिली) आहे. ६ परंतु उत्पत्तीच्या आरंभापासून याव्हे एलोहिमने त्यांना पुरूष व स्त्री असे निर्माण केले. ७ या कारणामुळे पुरूष आपल्या आईवडिलांना सोडील व आपल्या पत्नीशी जडून राहिल. ८ आणि ती दोघे एकदेह होतील, म्हणून यापुढे ती दोन नाहीत तर एकदेह आहेत. ९ यासाठी याव्हे एलोहिमने जे जोडले आहे, ते मनुष्याने वेगळे करू नये." १० नंतर येशूवाह व शिष्य घरात असता शिष्यांनी या गोष्टीविषयी त्याला विचारले. ११ येशूवाह त्यांना म्हणाला, " जो कोणी आपली पत्नी टाकतो व दुसरी बरोबर लग्न करतो, तो आपल्या पत्नीविरूद्ध व्यभिचार करतो. १२ आणि जर पत्नी आपल्या पतीला सोडते आणि दुस-या बरोबर लग्न करतो, तर ती ही व्यभिचार करते."

१३ त्याने त्यांना स्पर्श करावा, यासाठी लोक लहान बालकांना त्याच्याकडे आणीत होते. परंतु थालमीद (शिष्यांनी) त्यांना दटावले. १४ येशूवाहने हे पाहिले तेव्हा तो रागावला आणि त्यांना म्हणाला, " लहान बालकांना माझ्याकडे येऊ द्या. त्यांना मना करू नका, कारण याव्हे एलोहिमचे राज्य यांच्यासारख्यांचेच आहे. १५ मी तुम्हांस खरे सांगतो, जो कोणी बालकासारखा याव्हे एलोहिमच्या राज्याचा स्विकार करणार नाही, त्याचा तेथे कधीही प्रवेश होणार नाही." १६ तेव्हा त्याने बालकांना उचलून जवळ घेतले. आपले हात त्यांच्यावर ठेवले, आणि आशिर्वाद दिला. १७ येशूवाह प्रवासाला निघला असता एक मनुष्य त्याच्याकडे धावत आला, आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, "उत्तम रब्बुनी (गुरूजी) अनंतकाळचे जीवन मिळण्यासठी मी काय करावे ?" १८ येशूवाह त्याला म्हणाला, " तू मला उत्तम का म्हणतोस ? एका याव्हे एलोहिम शिवाय कोणी उत्तम नाही. १९ तुला आज्ञा माहित आहेतच : खुन

करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, फसवू नको, आपल्या वडिलांचा व आईचा सन्मान कर." २० तो मनुष्य म्हणाला, " रब्बुनी (गुरूजी) मी तरूणपणापासून या आज्ञा पाळत आलो आहे." २१ येशूवाहने त्याच्याकडे पाहिले त्याला त्याच्याविषयी प्रेम वाटले. तो त्याला म्हणाला, " तुझ्यामध्ये एका गोष्टीची कमतरता आहे. जा तुझ्याजवळ जे सर्व आहे ते विक, नंतर ते गोरगरीबांस वाटून टाक. आकाशात तुला संपत्ती प्राप्त होईल. तर मग चल, आणि माझ्या मागे ये." २२ हे शब्द ऐकून तो मनुष्य खूप निराश झाला, व खिन्न होऊन निघून गेला. कारण त्याच्याजवळ खूप संपत्ती होती. २३ येशूवाहने सभोवताली पाहिले, व तो आपल्या शिष्यांना म्हणाला, " ज्याच्याजवळ संपत्ती आहे, त्याचा याव्हे एलोहिमच्या राज्यात (धनवानांचा) प्रवेश होणे फार कठीण आहे!" २४ त्याचे शब्द ऐकून थालमीद (शिष्य) थक्क झाले. परंतु येशूवाह त्यास म्हणाला, "माझ्या मुलांनो, याव्हे एलोहिमच्या राज्यात धनवानांचा प्रवेश होणे फार कठीण आहे! २५ धनवानांचा याव्हे एलोहिमच्या राज्यात प्रवेश होणे, यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणे सोपे आहे." २६ ते यापेक्षाही अधिक आश्चर्यचकित झाले, आणि एकमेकांना म्हणाले, " तर मग कोणाचे यशाह् (तारण) होणे शक्य आहे?" २७ त्यांच्याकडे पाहून येशूवाह म्हणाला, "मनुष्यांना हे अशक्य आहे, पण याव्हे एलोहिमला अशक्य नाही. कारण सर्व गोष्टी याव्हे एलोहिमला शक्य आहेत."

२८ केफा त्याला म्हणू लागला, " पाहा, आम्ही सर्व सोडले, आणि आपल्या मागे आलो आहोत." २९ येशूवाह म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो की, ज्या कोणी माझ्यासाठी, व शुभवर्तमानाकरिता, आपले घर, भाऊ, वहिणी, आईवडील, मुले, किंवा शेतीवाडी सोडली, त्याचा छळ झाला, तरी ३० त्याला शंभरपटीने फायदा मिळेल. आणि येणा-या युगात त्याला अनंतकाळचे जीवन मिळाल्याशिवाय राहणार नाही." ३१ परंतु ज्यांना सध्या मोठे स्थान आहे, भविष्यात त्यांना खालचे स्थान मिळेल, व ज्यांना खालचे स्थान आहे, त्यांना मोठे स्थान मिळेल."

३२ ते वर यरूशलेमेच्या रस्त्यावरून जात असता, येशूवाह त्यांच्यापुढे चालत होता. त्याचे थालमीद (शिष्य) विस्मित झाले होते, आणि त्याच्यामागून येणारे घाबरले होते. नंतर येशूवाहने त्या बारा शिष्यांना पुन्हा एका बाजूला घेतले, आणि स्वतःच्या बाबतीत काय घडणार आहे, हे त्यांना सांगू लागला. ३३ ऐका! आपण वर यरूशलेमेस जात आहोत, आणि मनुष्याचा मुलगा विश्वासघाताने धरून एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री) यांच्या हाती दिला जाईल. ते त्याला मरणाची शिक्षा देतील, आणि ते त्याला यहूदीतर लोकांच्या हाती देतील. ३४ ते त्याची थट्टा करतील, त्याच्यावर थुंकतील, त्याला फटके मारतील, व ठार करतील, आणि तीन दिवसांनी तो पुन्हा उठेल."

३५ याकोब व योहानान हे जब्दीचे मुलगे त्याच्याकडे आले. आणि त्याला म्हणाले, " रब्बुनी (गुरूजी) आम्ही आपणांजवळ जे मागू ते आपण आमच्यासाठी करावे, अशी आमची इच्छा आहे." ३६ येशूवाह त्यांना म्हणाला, " मी तुमच्यासाठी काय करावे, अशी तुमची इच्छा आहे?" ३७ ते म्हणाले, "आपल्या वैभवात आमच्यापैकी एकाला तुमच्या उजवीकडे व दुस-याला डावीकडे बसण्याचा अधिकार द्यावा." ३८ येशूवाह त्यांना म्हणाला " तुम्ही काय मागत आहात, हे तुम्हांस कळत नाही. मी जो प्याला पिणार आहे, तो तुमच्याने पिणे शक्य आहे काय? किंवा मी जो बाप्तिस्मा घेणार आहे, तो तुमच्याने घणे शक्य आहे काय?

३९ ते त्याला म्हणाले, "आम्हांस शक्य आहे." मग येशूवाह त्यांना म्हणाला, " मी जो प्याला पिणार आहे तो तुम्ही प्याल, आणि जो बाप्तिस्मा घेईन तो तुम्ही घ्याल, ४० परंतु माझ्या उजवीकडे किंवा डावीकडे बसू देणे माझ्या हाती नाही. ज्यांच्यासाठी त्या जागा तयार केल्या आहेत, त्यांच्यासाठीच त्या राखून ठेवल्या आहेत." ४१ दहा थालमीद (शिष्यांनी) या विनंतीविषयी ऐकले तेव्हा ते याकोब व योहानानवर फार रागावले. ४२ येशूवाहने त्यांना जवळ बोलाविले आणि म्हंटले, " तुम्हांस माहित आहे की, परराष्ट्रीयांचे जे सत्ताधारी आहेत ते त्यांच्यावर स्वामित्व गाजवितात. आणि त्यांचे पुढारी त्यांच्यावर अधिकार गाजवितात. ४३ परंतु तुमच्याबाबतीत तसे नाही, तुमच्यातील जो कोणी मोठा होऊ पाहतो, त्याने तुमचा सेवक झाले पाहिजे. ४४ आणि जो कोणी पहिला होऊ इच्छीतो, त्याने सर्वांचा सेवक झाले पाहिजे. ४५ कारण मनुष्याचा मुलगाही सेवा करून घ्यावयास नाही, तर तो सेवा करावयास

आला आहे.व अनेकांसाठी आपले जीवन खंडणी म्हणून देण्यासाठी आला आहे."

४६ मग ते यरीहोस आले येशूवाह आपले शिष्य व लोकसमुदायासह यरीहो सोडून जात असता तिमयाचा मुलगा बार्तीमय हा एक आंधळा भिकारी रस्त्याच्या कडेला बसला होता.४७ जेंव्हा त्याने ऐकले की नात्सेरेथहून (नासारेथ) येशूवाह जात आहे तेव्हा तो मोठयाने ओरडून म्हणू लागला, " येशूवाह दाविदाचे मुला माझ्यावर दया करा." ४८ तेंव्हा त्याने गप्प बसावे म्हणून अनेकांनी त्याला त्याला दटावले. पण तो अधिक मोठयाने ओरडून म्हणू लागला, येशूवाह दाविदाच्या मुला मजवर दया करा." ४९ मग येशूवाह थांबला आणि म्हणाला, "त्याला बोलवा. तेव्हा त्यांनी आंधळया मनुष्याला बोलाविले आणि म्हंटले, " धीर धर, येशूवाह तुला बोलावित आहे." ५० त्या आंधळयाने आपला झगा टाकला, उडी मारली, व तो येशूवाहकडे आला. ५१ येशूवाह त्याला म्हणाला, "मी तुझ्यासाठी काय करावे, अशी तुझी इच्छा आहे?" आंधळा मनुष्य त्याला म्हणाला, " रब्बुनी (गुरूजी) मला पुन्हा दृष्टी प्राप्त व्हावी." ५२ मग येशूवाह त्याला म्हणाला, " जा तू विश्वास ठेवलास म्हणून तू बरा झाला आहेस." लगेच तो पाहू शकला, (त्याला दृष्टी आली) आणि रस्त्याने तो येशूवाहच्या मागे चालू लागला.

११.१ जेव्हा ते यरूशलेमजवळ जैतुनाच्या डोंगराजवळ बेथानी गावाजवळ आले, तेव्हा येशूवाहने आपल्या दोन थालमीद (शिष्यास) असे सांगून पाठविले की, २ तुम्हास जे गाव पुढे दिसते, त्या गावात जा. गावात जाताच ज्याच्यावर कोणी बसले नाही असे शिंगरू बांधलेले आढळेल. ते सोडा व येथे आणा. ३ आणि जर कोणी तुम्हांला विचारले, 'तुम्ही हे का नेत आहात,? तर तुम्ही असे म्हणा, "अदोनाईला याची गरज आहे' व तो ते लगेच परत येथे पाठविल." ४ मग ते गेले आणि त्यांना रस्त्यावर दाराजवळ एक शिंगरू बांधलेले दिसले. मग त्यांनी ते सोडले. ५ तेथे उभे असलेल्या लोकांपैकी काही जण त्यांना म्हणाले, " हे शिंगरू सोडून तुम्ही काय करीत आहात?" ६ त्यांना येशूवाह काय म्हणाला ते सांगितले. तेव्हा त्या लोकांनी त्यांस ते शिंगरू नेऊ दिले. ७ त्यांनी ते शिंगरू येशूवाहकडे आणले. त्यांनी आपली वस्त्रे त्याच्यावर टाकली, व येशूवाह त्यावर बसला. ८ पुष्कळ लोकांनी आपले झगे रस्त्यावर पसरले, आणि इतरांनी शेतातून तोडलेल्या डहाळया पसरल्या. ९ पुढे चालणारे व मागून येणारे घोषणा देऊ लागले."होसान्ना अदोनाईच्या नावाने येणारा धन्यवादित असो.१० आमचा पूर्वज दावीद याचे येणारे राज्य धन्यवादित असो. आकाशात होसान्ना."
११ नंतर येशूवाह यरूशलेमात प्रवेश केल्यावर तो मंदिरात गेला व सभोवतालचे सर्व पाहिले. त्या सुमारास संध्याकाळ झाली होती म्हणून ती बेथानीस गेला व थालमीद (शिष्यांना) आपल्याबरोबर नेले.

१२ दुस-या दिवशी ते बेथानी सोडून जात असताना येशूवाहला भूक लागली. १३ त्याने दूर असलेल्या व पानांनी भरलेल्या अंजिराच्या झाडाकडे पाहिले. त्यावर काही मिळेल या आशेने तो पाहावयास गेला पण तेथे पानांशिवाय काही आढळले नाही, कारण तो अंजिराचा हंगाम नव्हता.१४ नंतर तो त्याला म्हणाला, "यापुढे तुझे फळ कोणीही कधीही खाणार नाही," त्याच्या थालमीद (शिष्यांनी) हे ऐकले.

१५ नंतर ते यरूशलेमेत गेले, आणि येशूवाह मंदिरात गेला.तेव्हा मंदिरात जे खरेदी विक्रीचा व्यवहार करीत होते, त्यांना येशूवाह बाहेर घालवू लागला.त्याने सराफांचे चौरंग व जे कबुतर विकत होते त्यांची बैठकी उलथून टाकल्या. १६ येशूवाहने मंदिरातून कोणालाही काहीही बाहेर नेऊ दिले नाही. १७ मग येशूवाह शिकवू लागला. तो त्यांना म्हणाला, "माझ्या घराला सर्व राष्ट्रीचे प्रार्थना मंदिर म्हणतील, असे शास्त्रलेखात लिहिले नाही काय? परंतु तुंम्ही त्याला चोरांची गुहा बनविली आहे."१८ एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी शास्त्री) यांनी हे ऐकले, आणि ते त्याला ठार मारण्याचा मार्ग शोधू लागले. कारण सर्व लोक त्याच्या शिक्षणाने थक्क झाल्याने ते त्याला भीत होते.१९ त्या रात्री येशूवाह व त्याचे थालमीद (शिष्य) नगराबाहेर गेले.

२० सकाळी येशूवाह आणि त्याचे थालमीद (शिष्य) जात असता, त्यांनी ते अंजिराचे झाड मुळापासून वाळून गेलेले पाहिले. २१ केफाला आठवण झाली, तो येशूवाहला म्हणाला, "रब्बुनी (गुरूजी), पाहा! ज्या अंजिराच्या झाडाला आपण शाप दिला, ते वाळून

गेले आहे." २२ येशूवाहने उत्तर दिले " याव्हे एलोहिमवर विश्वास ठेवा. २३ मी तुम्हांस खरे सांगतो की, जो कोणी या डोंगराला 'उपटून समुद्रात टाकला जा' असे म्हणेल व तो आपल्या मनात शंका न धरता, त्याच्या शब्दांप्रमाणे घडेल असा विश्वास धरील तर त्याच्यासाठी तसेच घडेल. २४ या कारणास्तव मी तुम्हांस सांगतो, जे काही तुम्ही प्रार्थनेत मागाल, ते मिळालेच आहे असा विश्वास धरा, आणि ते तुम्हांला मिळेल. २५ जेव्हा तुम्ही प्रार्थना करीत उभे राहता तेव्हा तुमच्या मनात जर कोणाच्या विरूद्ध काही असेल तर त्याची क्षमा करा. यासाठी की, तुमच्या आकाशातील बापाने तुमच्या पापांची क्षमा करावी. २६ परंतु तुम्ही जर क्षमा करणार नाही, तर तुमच्या आकाशातील बापही तुमच्या अपराध्यांची क्षमा करणार नाही."

२७ ते परत यरूशलेमेस आले. आणि येशूवाह मंदिरात फिरत असता एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री), आणि झाक्वेन (वडील) त्याच्याकडे आले.२८ आणि त्याला म्हणाले, " आपण कोणत्या अधिकाराने या गोष्टी करता? त्या करण्याचा अधिकार आपणांस कोणी दिला." २९ येशूवाह त्यांना म्हणाला, " मीही तुम्हांला एक प्रश्न विचारतो आणि जर तुंम्ही मला त्याचे उत्तर दिले तर मी या गोष्टी कोणत्या अधिकाराने करतो हे तुम्हांस सांगेन. ३० योहानानचा बाप्तिस्मा आकाशातून होता की, मनुष्यापासून होता? याचे उत्तर द्या." ३१ त्याविषयी त्यांनी आपसात चर्चा केली, आणि म्हणू लागले जर आपण तो आकाशापासून म्हणावे तर तो म्हणेल, " मग तुम्ही विश्वास का ठेवला नाही? ३२ परंतु जर आपण मनुष्यांपासून आहे असे म्हणावे, तर लोक आपणावर रागावतील." पुढा-यांना लोकांची भीती वाटत होती. कारण सर्व लोकांचा विश्वास होता की, योहानान खरोखर नबी (भविष्यवादी) होता.३३ मग त्यांनी येशूवाहला उत्तर दिले, "आम्हांला माहित नाही." तेंव्हा येशूवाह त्यांना म्हणाला, "मग मीही या गोष्टी कोणत्या अधिकाराने करीत आहे, हे तुम्हांला सांगत नाही"

१२.१ येशूवाह त्यांना दाखल्याच्याव्दारे शिकवू लागला. " एका मनुष्याने द्राक्षाचा मळा लावला व त्याच्याभोवती कुंपण घातले. त्याने द्राक्षरसासाठी कुंड खणले. आणि टेहळणीसाठी माळा बांधला. त्याने तो द्राक्षमळा माळयास खंडाने दिला, व तो दूर प्रवासास गेला.२ हंगामाच्या योग्य वेळी माळयांकडून द्राक्षमळयातील फळांचा योग्य हिस्सा मिळावा म्हणून त्याने एका नोकरास पाठविले. ३ परंतु त्यांनी नोकरास धरले, मारले आणि रिकामे पाठवून दिले.४ नंतर त्याने दुस-या नोकरास पाठविले, त्यांनी त्याचे डोके फोडले, आणि त्याला अपमानकारक रीतीने वागविले. ५ मग धन्याने आणखी एका नोकराला पाठविले. त्यांनी त्याला जीवे मारले, त्याने इतर अनेकांना पाठविले.माळयांनी काही जणांना मारहान केली, तर काहींना ठार मारले. ६ धन्याजवळ पाठविण्यासाठी आता फक्त त्याचा प्रिय मुलगा उरला होता. त्याने त्याला सर्वांत शेवटी पाठविले. तो म्हणाला, " खात्रीने ते माझ्या मुलाला मान देईल." तो त्याचा आवडता मुलगा होता. म्हणून शेवटी त्याने त्याला त्या माळयांकडे पाठविले. ७ परंतु माळी एकमेकांस म्हणले, " हा तर वारस आहे.चला, आपण याला जिवे मारू म्हणजे वतन आपले होईल!" ८ मग त्यांनी त्याला धरले व जिवे मारले, आणि द्राक्षामळयाबाहेर फेकून दिले. ९ तर मग द्राक्षमळयाचा धनी काय करील? तो येईल, आणि त्या माळयांना जिवे मारील, व द्राक्षमळा दुस-यांना देईल.१० तुम्ही हा शास्त्रलेख वाचला नाही काय? 'जो दगड बांधणा-यांनी नापसंत केला, तोच कोनशिला झाला. ११ हे अदोनाईने केले ते आमच्यासाठी आश्चर्यकारक आहे.' १२ मग ते येशूवाहला अटक करण्याचा मार्ग शोधू लागले.परंतु त्यांना लोकांची भीती वाटत होती. त्याला अटक करण्याची त्यांची इच्छा होती. कारण त्यांना माहित होते की, हा दाखला त्याने त्यांनाच उद्देशून सांगितला होता. मग ते त्याला सोडून निघून गेले.

१३ नंतर त्यांनी त्याला चुकीचे बोलताना पकडावे म्हणून काही परूशी व हेरोदी यांना त्याच्याकडे पाठविले. १४ ते त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, " रब्बुनी (गुरूजी) आम्हांस माहित आहे की, आपण प्रामाणिक आहात आणि कुणाची भीड भाव आपण ठेवित नाही. आपण याव्हे एलोहिमचा मार्ग खरेपणाने शिकविता, तर मग कैसाराला कर देणे योग्य आहे की नाही? आणि आम्ही तो द्यावा की न द्यावा." १५ परंतु येशूवाहने त्यांचा ढोंगीपणा ओळखला व त्यांना म्हणाला, " तुम्हीं माझी परीक्षा का पाहता? माझ्याकडे एक नाणे (चांदीचे एक नाणे) आणा म्हणजे मी ते पाहीन." १६ मग त्यांनी त्याच्याकडे नाणे आणले. त्याने त्यांना विचारले, " हा मुखवटा

व लेख कोणाचा आहे?" ते त्याला म्हणाले, "कैसराचा." १७ मग येशूवाह त्यांना म्हणाला, "कैसराचे ते कैसराला व याव्हे एलोहिमचे
ते याव्हे एलोहिमला द्या." तेव्हा त्यांना त्याच्या विषयी फार आश्चर्य वाटले.

१८ नंतर काही सदूकी त्याच्याकडे आले, (सदूकी पुनरूत्थान नाही असे समजतात) त्यांनी त्याला विचारले, १९ रब्बुनी (गुरूजी) मोशाने
आमच्यासाठी असे लिहिले आहे की, जर कोण मनुष्याचा भाऊ मेला, व त्याची पत्नी राहिली. परंतु मूळबाळ नसले तर वंश पुढे
चालावा म्हणून, त्या मनुष्याने तिच्याबरोबर लग्न करावे.आणि मेलेल्या भावाचा वंश वाढवावा. २० असे कोणी सात भाऊ होते.
पहिल्याने पत्नी केली व तो मूलबाळ न होता मेला.२१ दुस-याने तिच्याबरोबर लग्न केले, तोही मूलबाळ न होता मेला. २२ तिस-याने
तसेच केले, त्या सात भावांपैकी एकालाही त्या स्त्रीपासून मूलबाळ झाले नाही. शेवट ती स्त्रीही मेली.२३ सातही भावांनी
तिच्याबरोबर लग्न केले, तर पुनरूत्थानाच्या वेळी जेव्हा लोक मेलेल्यातून उठतील, तेव्हा ती कोणाची पत्नी असेल? कारण सातही
जणांनी तिच्याबरोबर लग्न केले होते." २४ येशूवाह त्यांना म्हणाला, " खात्रीने शास्त्रलेख आणि याव्हे एलोहिमचे सामर्थ्य तुम्हांला
माहित नाही, म्हणून तुम्हीं अशी चूक करीत आहात. २५ कारण जेव्हा लोक मेलेल्यातून उठतील ते लग्न करणार नाहीत, व करून
देणार नाहीत. त्याऐवजी ते आकाशातील देवदूताप्रमाणे असतील.२६ परंतु मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयी तुम्ही मोशाच्या
पुस्तकातील जळत्या झुडपा विषयी वाचले नाही काय? तेथे याव्हे एलोहिम मोशाला म्हणाला, " मी अब्राहामाचा, इसहाकाचा, आणि
याकोबाचा याव्हे एलोहिम आहे. २७ तो मेलेल्यांचा याव्हे एलोहिम नव्हे, तर जिवंत लोकांचा याव्हे एलोहिम आहे. तुम्ही फार चुकत
आहा."

२८ त्यानंतर एका तोराच्या रब्बुनी ने ( नियमशास्त्राच्या शिक्षकाने, शास्त्री) त्यांना वाद घालताना ऐकले, येशूवाहने त्यांना किती
चांगल्या प्रकारे उत्तर दिले ते पाहिले. तेव्हा त्याने विचारले, " सर्व आज्ञांत महत्वाची पहिली आज्ञा कोणती? " २९ येशूवाहने उत्तर
दिले, "पहिली महत्वाची आज्ञा ही, हे इस्त्राएला ऐक, आपला अदोनाई एलोहिम अनन्य आहे. ३० तू आपला याव्हे एलोहिम जो तुझा
अदोनाई आहे, त्याजवर संपूर्ण रूहुवाने (अंतःकरणाने), संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने प्रीति कर." ३१ दुसरी आज्ञा ही आहे, जशी
आपणांवर तशी आपल्या शेजा-यावर प्रीति कर. यापेक्षा दुसरी कोणतीही आज्ञा मोठी नाही." ३२ तो मनुष्य उत्तरला, " याव्हे
एलोहिम एकच आहे, रब्बुनी (गुरूजी) आणि त्याच्याशिवाय कोणीही नाही असे आपण म्हणाता ते योग्य बोललात. ३३ त्यच्यावर
पूर्ण रूहुवाने (अंतःकरणाने), पूर्ण समजुतीने, पूर्ण शक्तीने, आणि जशी आपणावर तशी आपल्या शेजा-यावर प्रीति करणे हे सर्व
यज्ञ व अर्पणे, जी आपणास करण्याची आज्ञा दिली आहे. त्यापेक्षाही अधिक महत्वाचे आहे." ३४ येशूवाहने पाहिले की, त्या
मनुष्याने शहाणपणाने उत्तर दिले आहे. तेंव्हा तो त्याला म्हणला, "तू याव्हे एलोहिमच्या राज्यापासून दूर नाही." त्यानंतर त्याला
प्रश्न विचारण्याचे धाडस कोणी केले नाही. ३५ येशूवाह मंदिरात शिकवित असता, तो म्हणाला "मशीहा दाविदाचा मुलगा आहे, असे
तोराचे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी शास्त्री)म्हणतात.ते कसे शक्य आहे?" ३६ दावीद स्वतः क्वादोश याव्हे रूहुव्वाने (पवित्र
आत्म्याने) प्रेरित होऊन म्हणाला, ' अदोनाई, याव्हे एलोहिम, माझ्या अदोनाईला म्हणाला, मी तुझे वैरी तुझ्या पायाखाली ठेविपर्यंत तू
माझ्या उजवीकडे बैस.' ३७ दावीद स्वतः मशीहाला अदोनाई म्हणतो, तर मग मशीहा दाविदाचा मुलगा कसा?" आणि मोठा
लोकसमुदाय त्याचे आनंदाने ऐकत होते. ३८ शिक्षण देताना तो म्हणाला, " तोराच्या रब्बुनी विषयी (नियमसास्त्राच्या गुरूजीपासून)
सावध असा, त्यांना लांब झगे घालून मिरवायला, आणि बाजारात शालोम (सलाम) घ्यावयाला आवडते.३९ आणि सभास्थानातील व
मेजवानीतील सर्वात महत्वाच्या जागेवर बसण्याची त्यांना आवड असते.४० ते विधवांची घरे खाऊन टाकतात, आणि धार्मिकता
दाखविण्यासाठी ते लांब लांब प्रार्थना करतात. या लोकांना फार कडक शिक्षा होईल."

४१ येशूवाह दान पेटीच्या समोर बसला असता, लोक दान पेटीत पैसे कसे टाकतात हे पाहत होता. आणि पुष्कळ श्रीमंत लोक भरपूर
पैसे टाकीत होते. ४२ नंतर एक गरीब विधवा आली, तिने तांब्याची दोन लहान नाणी टाकली. ज्याची किंमत शंभरातील एका
पैशाएवढी होती. ४३ येशूवाहने आपल्या थालमीद ना (शिष्यांना) एकत्र बोलावले, आणि म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो की,
सर्वांनी त्या पेटीत जे दान टाकले, त्या सर्वापेक्षा या विधवेने अधिक टाकले आहे.४४ मी असे म्हणतो कारण त्यांच्याजवळ जे भरपूर

होते त्यामधून त्यांनी काही दान दिले. परंतु ती गरीब असूनही तिच्याजवळ होते, ते सर्व तिने देऊन टाकले. ती सर्व तिच्या जीवनाची उपजीविका होती."

**१३** .१ येशूवाह मंदिरातून निघून जात असता त्याच्या थालमीद पैकी (शिष्यांपैकी) एक जण त्याला म्हणाला, "रब्बुनी (गुरूजी) पाहा, खूप मोठया दगडांनी बांधलेली या मंदिराची इमरत किती सुंदर आहे." २ येशूवाह त्याला म्हणाला, " तू या मोठया इमारती पाहतोस ना, येथील एकाही दगड दुस-या दगडावर राहणार नाही, त्यातील प्रत्येक खाली पाडला जाईल." ३ येशूवाह मंदिरासमोरच्या जैतुनाच्या डोंगरावर बसला होता. केफा, याकोब, योहान, आणि अंद्रिया यांनी त्याला एकांतात विचारले. ४ " या गोष्टी केव्हा घडतील हे आम्हांस सांगा. आणि या गोष्टी पूर्ण होण्याची वेळ येईल, तेव्हा कोणते चिन्हे घडेल?"

५ नंतर येशूवाह त्यांना सांगू लागला, " तुम्हांला कोणी फसवू नये म्हणून सावध राहा. ६ पुष्कळ लोक माझ्या नावाने येतील व म्हणतील की, 'मी तोच आहे' आणि ते पुष्काळांना फसवतील. ७ जेव्हा तुम्ही लढायाविषयी आणि लढायांच्या अफवांविषयी ऐकाल तेव्हा घाबरू नका, हे निश्चितपणे घडणारच आहे. पण एवढयाने शेवट होणार नाही. ८ एक राष्ट्र दुस-या राष्ट्रवर उठेल. एक राज्य दुस-या राज्यावर उठेल, निरनिराळया ठिकाणी भूमीकंप होतील. आणि दुष्काळ पडतील पण या गोष्टी म्हणजे नाशाची सुरूवात आहे. ९ तुम्ही सावध असा, ते तुम्हांस न्यायसभांच्या स्वाधीन करतील, आणि सभास्थानात तुम्हांला मार देतील. त्यांना साक्ष व्हावी म्हणून तुम्हांला राज्यकर्ते व राजे यांच्यासमोर उभे राहावे लागेल.१० या गोष्टी घडण्यापूर्वी सर्व राष्ट्रांमध्ये सुवार्तेची घोषणा झालीच पाहिजे. ११ ते तुम्हांला अटक करून चौकशीसाठी आणतील, तेव्हां अगोदरच तुम्हीं काय बोलावे याची काळजी करू नका, तर त्या घटकेला जे काही सुचविले जाईल ते बोला. कारण बोलणारे तुम्हीं नाही, तर पवित्र आत्मा तुम्हांसाठी बोलेले. १२ भाऊ भावाला व वडील आपल्या मुलाला ठार मारण्यासाठी विश्वासघात करून धरून देतील.मुले आपल्या आईवडिलांविरूद्ध उठतील, आणि ते त्यांना ठार करतील.१३ आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा व्देष करतील. पण जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल."

१४ जेंव्हा तुम्ही नाशाला कारण अशी भयंकर गोष्ट, (दानीयल नबीने सांगितलेला ओसाडीचा अमंगळ पदार्थ ) जो जिथे नको तेथे पाहाल. "( वाचकाने याचा अर्थ काय तो समजावून घ्यावा ) " तेव्हा जे यहुदीयांत आहेत त्यांनी डोंगरात पळून जावे.१५ जो मनुष्य आपल्या घराच्या छतावर असेल त्याने घरातून काही आणण्यासाठी खाली उतरू नये. १६ आणि जर एखादा मनुष्य शेतात असेल तर त्याने आपला झगा आणण्यासाठी माघार जाऊ नये. १७ त्या दिवसात ज्या स्त्रियांची मुले तान्ही असतील व अंगावर दूध पीत असतील त्यांच्यासाठी हे अती भयंकर होईल.१८ हे हिवाळयात होऊ नये म्हणून प्रार्थना करा.१९ कारण त्या दिवसात जे संकटे येतील, तो याव्हे एलोहिमने जग निर्माण केले, त्या आरंभापासून तो आजपर्यंत कधीही झाले नाही व पुन्हा त्यासारखा कधीही येणार नाही असा असेल.२० याव्हे एलोहिमने जर ते दिवस कमी केले नसते, तर कोणाचाही बचाव झाला नसता. परंतु ज्यांना त्याने निवडले आहे अशा निवडलेल्या लोकांसाठी ते दिवस त्याने कमी केले आहेत. २१ आणि जर कोणी तुम्हांला म्हणेल की, पाहा मशीहा येथे आहे किंवा तेथे आहे, तर त्यावर विश्वास ठेवू नका. २२ कारण काही लोक आपण मशीहा किंवा नबी (भविष्यवादी) असल्याचा खोटा दावा करतील, आणि शक्य झाले तर ते निवडलेल्या लोकांना देखील फसविण्यासाठी चिन्हे व आश्चर्यकारक कामे करतील. २३ तेंव्हा तुम्ही सावध राहा, मी त्या काळापूर्वीच तुम्हांला सर्व काही सांगून ठेवले आहे. २४ परंतु त्या दिवसांत ही संकटे येऊन गेल्यावर, सूर्य अंधकारमय होईल, व चंद्र प्रकाश देणार नाही. २५ आकाशातून तारे पडतील, आणि आकाशाचे सामर्थ्य डळमळीत होईल.२६ आणि लोक मनुष्याच्या मुलाला मेघारूढ होऊन मोठया सामर्थ्यानिशी, आणि वैभवाने येताना पाहातील.२७ नंतर तो आपल्या देवदूतास पाठवील व चार दिशांतून पृथ्वीच्या सीमेपासून ते आकाशाच्या सीमेपर्यंत, त्याच्या निवडलेल्या लोकांना एकत्र करील.

२८ अंजिराच्या झाडापासून धडा घ्या.जेव्हा त्याच्या डहाळया कोमल होतात, आणि त्यावर पाने फुटतात, तेव्हा उन्हाळा जवळ आला आहे, असे तुंम्ही समजतात.२९ त्याचप्रमाणे तुम्ही या गोष्टी घडताना पाहाल तेव्हा तुम्हांला समजेल की, तो काळ अगदीच दाराशी

येऊन ठेपला आहे.३० मी तुम्हांला खरे सांगतो की, या सर्व गोष्टी घडण्यापूर्वी ही पिढी खात्रीने नाहीशी होणार नाही. ३१ आकाशात आणि पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने नाहीशी होणार नाहीत. ३२ त्या दिवसाविषयी, किंवा त्या घटकेविषयी, कोणालाही ठाऊक नाही. देवदूतालाही नाही, व मुलालाही नाही, फक्त बापालाच माहिती आहे. ३३ सावध असा, जागृत असा, कारण ती वेळ केव्हा येईल, हे तुम्हांला ठाऊक नाही.

३४ ती वेळ अशी आहे की, एक मनुष्य प्रवासाला निघते वेळी घर सोडतो.आणि त्याच्या प्रत्येक नोकराला काम नेमून देतो, तो पहारेक-यास जागरूक राहण्याची आज्ञा करतो.३५ म्हणून तुम्ही जागरूक असा, कारण घरधनी केंव्हा येईल हे तुम्हांस ठाऊक नाही. तो संध्याकाळी, मध्यरात्री, पहाटे कोंबडा आरवण्यापूर्वी, किंवा सकाळी केंव्हा येईल, हे तुम्हांला माहित नाही.३६ जर तो अचानक आला, तर तुम्ही त्याला झोपलेले सापडू नका. ३७ मी तुम्हांला सांगतो ते सर्वांना सांगतो, 'जागृत राहा.'"

**१४**.१ पेसॅह (वल्हांडण) आणि बेखमीर भाकरीच्या सणाच्या दोन दिवस अगोदर एलयोवन कोहेन (प्रमुख याजक), आणि तोरा शिकविणारे रब्बुनीने (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्रीने), कपटाने त्याला धरून जिवे मारण्याचा मार्ग शोधीत होते. २ कारण ते म्हणत होते, " आपण ते सणात करू नये, नाही तर लोक दंगा करतील."

३ येशूवाह बेथानी येथे शिमोन कुष्ठरोगी याच्या घरी मेजावर जेवायला बसला असता, कोणी एक स्त्री वनस्पतींपासून बनविलेल्या शुद्ध सुगंधी तेलाची फार मैल्यवान अलाबास्त्र कुपी घेऊन आली. तिने अलाबास्त्र कुपी फोडली, आणि सुगंधी तेल येशूवाहच्या मस्तकावर ओतले. ४ तेथे असलेले काही लोक रागावले, ते एकमेकांना म्हणाले, " सुगंधी तेलाचा असा नाश व्हावा, हे बरे नही. ५ कारण हे सुगंधी तेल तीस दिनारापेक्षा अधिक किंमतीला विकता आले असते. आणि ते पैसे गरीबांना देता आले असते." त्यांनी तिच्यावर कडक टीका केली.६ पण येशूवाह म्हणाला, " तिला एकाकी असू द्या. तिला का त्रास देता? तिने माझ्यासाठी एक सुंदर कृत्य केले आहे.७ गरीब तर नेहमी तुमच्याजवळ असतील, आणि पाहिजे त्या वेळेला त्यांना मदत करणे तुम्हांला शक्य आहे. परंतु मी नेहमीच तुमच्याबरोबर असेन असे नाही.८ तिला शक्य झाले ते तिने केले. तिने दफनविधीच्या तयारीच्या काळा अगोदरच माझ्या शरीरावर सुगंधी तेल ओतले आहे. ९ मी तुम्हांला खरे सांगतो सर्व जगात जेथे कोठे सुवार्तेची घोषणा केली जाईल तेथे तिची आठवण म्हणून तिने जे केले ते नेहमीच सांगितले जाईल."

१० नंतर बारा थालमीद (शिष्यां) पैकी एक यहूदा इस्कर्योत येशूवाहला विश्वासघाताने धरून देण्यासाठी एलयोवन कोहेन (प्रमुख याजकां), कडे गेला. ११ त्यांना हे ऐकून आनंद झाला, आणि त्यांनी त्याला पैसे देण्याचे वचन दिले. मग यहूदा येशूवाहला धरून त्यांच्या हातात देण्याची संधि पाहू लागला.१२ बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी जेव्हां पेसॅह (वल्हांडण) सणाचा कोकरा मारीत असता, तेव्हां येशूवाहचे थालमीद (शिष्य) त्याला म्हणाले, " आम्ही जातो आणि पेसॅह (वल्हांडण) सणाच्या भोजनाची तयारी करतो. आम्ही कोठे जाऊन तयारी करावी, अशी आपली इच्छा आहे?" १३ येशूवाहने आपल्या दोघा थालमीद ना (शिष्यांना) पाठविले. आणि त्यांना सांगितले, "नगरात जा, आणि पाण्याची घागर घेऊन जाणारा मनुष्य तुम्हांला भेटेल, त्याच्या मागे जा.१४ आणि जेथे तो आत जाईल, त्या घराच्या मालकास सांगा. 'रब्बुनी (गुरूजी) म्हणतात, जेथे मला माझ्या थालमीद (शिष्यां) बरोबर पेसॅह (वल्हांडण) सणाचे भोजन करणे शक्य होईल, अशी खोली कोठे आहे?' १५ आणि तो तुम्हांला माडीवरची एक मोठी सजवून तयार केलेली खोली दाखवील, तेथे आपणांसाठी तयारी करा." १६ थालमीद (शिष्य) निघाले आणि ते नगरात गेले, आणि येशूवाहने सांगितल्या प्रमाणे त्यांना सर्व आढळले. मग त्यांनी पेसॅह (वल्हांडण) सणाच्या भोजनाची तयारी केली.१७ संध्याकाळ झाली तेव्हां येशूवाह बारा जणांसह आला.१८ मेजावर बसून ते जेवीत असता येशूवाह म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यापैकी जो एक जण मला शत्रूच्या स्वाधीन करून देईन. तो माझ्याबरोबर येथे जेवीत आहे." १९ थालमीद (शिष्य) अतिशय खिन्न झाले, व प्रत्येक जण त्याला म्हणू लागला, " तो मी आहे का?" २० तो त्यांना म्हणाला , " बारा जणांपैकी एक जो माझ्या बरोबर ताटात भाकर बुडवीत आहे तोच, २१ हाय हाय त्याच्याविषयी शास्त्रलेखात असे लिहिले आहे, तसा मनुष्याचा मुलगा जाईल,

परंतु ज्याच्याकडून मनुष्याचा मुलगा धरून दिला जाईल, त्याचा नाश होवो. तो जन्मला नसता तर ते त्याच्यासाठी बरे झाले असते."

२२ ते भोजन करीत असता येशूवाहने भाकर घेतली, उपकारस्तुति केली. ती मोडली, आणि त्यांना दिली. तो म्हणाला, "घ्या, हे माझे शरीर आहे." २३ नंतर येशूवाहने प्याला घेतला उपकारस्तुति केली, तो प्याला त्यांना दिला.आणि सर्व त्यातून प्याले. २४ मग येशूवाह म्हणाला, " हे माझे नव्या कराराचे रक्त आहे, पुष्कळांसाठी ते ओतले जात आहे. २५ मी तुम्हांला खरे सांगतो की, याव्हे एलोहिमच्या राज्यात मी नवा द्राक्षारस पिईन त्या दिवसापर्यंत मी यापुढे द्राक्षाचा उपज (द्राक्षारस) पिणार नाही." २६ नंतर त्यांनी उपकारस्तुतिचे गीत गाईले व ते जैतुनाच्या डोंगराकडे निघून गेले.२७ येशूवाह थालमीद ला (शिष्यांला) म्हणाला, " तुम्ही सर्व विश्वास गमावून बसल, कारण असे लिहिले आहे की, 'मी मेंढपाळास मारीन आणि मेंढरे विखुरली जातील." २८ " परंतु माझे पुनरूत्थान झाल्यावर मी तुमच्यापुढे गालीलात जाईल." २९ केफा म्हणाला, "इतर सर्वांनी जरी त्यांचा विश्वास गमविला तरी मी गमविणार नाही." ३० मग येशूवाह त्याला म्हणाला, "मी तुला निश्चित सांगतो, आज रात्री दोनदा कोंबडा आरवण्यापूर्वी, तू तीन वेळा मला नाकारशील." ३१ तरीही केफा अधिक आवेशाने म्हणाला, " जरी मला आपणावरोबर मरावे लागले, तरी सुद्धा मी आपणांस नाकारणार नाही." आणि इतर सर्व जण तसेच म्हणाले.

३२ नंतर ते गेथशेमाने म्हंटलेल्या जागी आले, तेंव्हा येशूवाह त्याच्या थालमीद ना (शिष्यांना) म्हणाला " मी प्रार्थना करीपर्यंत येथे बसा. ३३ येशूवाह आपल्याबरोबर केफा, याकोव, व योहानान यांना घेतले दुःख व वेदनांनी त्याचे मन भरून आले. ३४ तो त्यांना म्हणाला, "माझा जीव मरणाप्राय वेदना सोशित आहे. येथे राहा व जागृत असा." ३५ त्यांच्यापासून थोडे दूर अंतरावर जाऊन तो जमिनीवर पडला, आणि त्याने प्रार्थना केली की, " शक्य असेल तर ही घटका टळून जावो." ३६ तो म्हणाला, " अब्बा, अब्बा, (बापा, बापा,) तुला सर्व काही शक्य आहे. हा प्याला मजपासून दूर कर, पण मला पाहिजे ते नको तर तुला पाहिजे ते कर.माझ्या इच्छेप्रमाणे नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे कर)" ३७ नंतर येशूवाह आला आणि त्यांना झोपलेले पाहिले, तो केफाला म्हणाला, " शिमोना तू झोपी गेलास काय? तासभर तुझ्याच्याने जागे राहवत नाही काय? ३८ जागृत राहा, आणि प्रार्थना करा, म्हणजे तुम्ही मोहात पडणार नाही. आत्मा उत्सुक आहे, पण देह अशक्त आहे." ३९ पुन्हा येशूवाह दूर गेला आणि त्याच गोष्टी उच्चारून त्याने प्रार्थना केली. ४० नंतर तो परत आला, व त्याला ते झोपलेले आढळले. कारण त्यांचे डोळे जड झाले होते, आणि त्याला काय उत्तर द्यावे, हे त्यांना कळेना. ४१ तो पुन्हा तिस-या वेळेस आला आणि त्यांना म्हणाला, "तुम्ही अजून झापेलेले आणि विश्रांती घेत आहात काय? पुरे झाले ! आता वेळ आली आहे. मनुष्याचा मुलगा पाप्यांच्या हाती धरून दिला जात आहे. ४२ उठा आपण जाऊ या, पाहा, मला धरून देणारा मनुष्य इकडे येत आहे."

४३ आणि येशूवाह बोलत आहे, तोपर्यंत बारा जणांपैकी एक यहूदा आला. त्याच्याबरोबर एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री), आणि झाक्वेन (वडील) यांनी पाठविलेले अनेक लोक तलवारी व सोटे घेऊन आले. ४४ घात करून देणा-याने त्यांना अशी खूण दिली होती की, " मी ज्या कोणाचे चुंबन घेईन तोच तो आहे. त्याला धरा आणि बाजूला काढा." ४५ मग यहूदा आल्याबरोबर तो येशूवाह कडे गेला, आणि म्हणाला, "'रब्बुनी' (गुरूजी) आणि यहूदाने येशूवाहचे चुंबन घेतले." ४६ नंतर त्यांनी त्याच्यावर हात टाकला, आणि त्याला अटक केली. ४७ तेथे जवळ उभे असलेल्यांपैकी एकाने आपली तलवार काढली, आणि एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), नोकरावर वार करून त्याचा कान कापून टाकला.४८ नंतर येशूवाह त्यांना म्हणाला, " मी लुटारू असल्याप्रमाणे तुम्ही तलवारी, आणि सोटे घेऊन मला पकडायला बाहेर पडलात काय? ४९ मी दररोज मंदिरात शिकवीत असता तुम्हांबरोबर होतो, आणि तुम्ही मला अटक केली नाही. परंतु शास्त्रलेख पूर्ण झालाच पाहिजे." ५० सर्व थालमीद (शिष्य) त्याला सोडून पळून गेले. ५१ एक तरून मनुष्य अंगावर तागाचे वस्त्र पांघरून त्याच्या मागे चालत होता. त्यांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला.५२ परंतु तो तागाचे वस्त्र टाकून उघडाच पळून गेला.

५३ नंतर त्यांनी येशूवाहला तेथून एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), झाक्वेन (वडील), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी

(नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री), जमा झाले. ५४ थोडे अंतर ठेवून केफा, येशूवाहच्या मागे थेट एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या), वाडयात गेला. तेथे केफा पहारेक-यांबरोबर विस्तवाजवळ शेकत बसला.५५ एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि सन्हेद्रिनमध्ये (सर्व यहूद्यांची न्याय सभा) येशूवाहला जिवे मरण्यासाठी पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत होते, परंतु त्यांना काही मिळेना. ५६ पुष्कळांनी त्याच्याविरूद्ध खोटी साक्ष दिली. परंतु त्यांची साक्ष सारखी नव्हती.५७ नंतर काही जण उभे राहिले, आणि त्याच्या विरूद्ध साक्ष देऊन म्हणाले, " आम्ही त्याला असे म्हणताना ऐकले की, ५८ हाताने बांधलेले मंदिर मी पाडून टाकीन, आणि हातांनी न बांधलेले असे दुसरे मंदिर तीन दिवसात उभारीन." ५९ परंतु तरीही या बाबतीत त्यांच्या साक्षीत मेळ नव्हता. ६० नंतर एलयोवन कोहेन (मुख्य याजक) त्यांच्यापुढे उभा राहिला, आणि त्याने येशूवाहला विचारले, " तू उत्तर देणार नाहीस काय? हे लोक तुझ्याविरूद्ध आरोप करत आहेत हे कसे?" ६१ परंतु येशूवाह गप्प राहिला, त्याने उत्तर दिले नाही. नंतर एलयोवन कोहेन ने (मुख्य याजकाने) पुन्हा विचारले, "धन्यवादित याव्हे एलोहिमचा मुलगा तो तू मशीहा आहेस काय?" ६२ येशूवाह म्हणाला," मी आहे, आणि तुंम्ही मनुष्याच्या मुलाला सर्वसमर्थ याव्हे एलोहिमाच्या उजवीकडे बसलेले व आकाशातील मेघांसह येताना पाहाल." ६३ एलयोवन कोहेन ने (मुख्य याजकाने) आपले कपडे फाडले आणि म्हणाला, " आपणांला अधिक साक्षीदारांची काय गरज आहे? ६४ तुम्ही निंदा ऐकली आहे, तुम्हांला काय वाटते?" सर्वांनी त्याला मरणदंड योग्य आहे अशी शिक्षा जाहीर केली.६५ काही जण त्याच्यावर थुंकू लागले, त्याचे तोंड झाकून बुक्के मारू लागले व त्याला म्हणू लागले, " ओळख बरे, तुला कोणी मारले?" पहारेक-यांनी त्याला ताब्यात घेतले आणि मारले.

६६ केफा अंगणात असताना एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या) दासींपैकी एक आली.६७ आणि तिने केफाला शेकताना पाहिले. तेंव्हा तिने त्याच्याकडे निरखून पाहिले व म्हणाली " तू सुद्धा नात्सेरेथकर (नासरेथकर) येशूवाह बरोबर होतास ना?" ६८ परंतु केफाने ते नाकारले, आणि म्हणाला, "तू काय म्हणतेस हे मला कळत नाही व समजतही नाही," केफा अंगणाच्या दरवाजाच्या देवडीवर गेला आणि कोंबडा आरवला.६९ जेंव्हा दासीने त्याला पाहिले, तेंव्हा जे लोक तेथे होते, त्यांना ती म्हणू लागली की, हा मनुष्य त्यांच्यापैकीच एक आहे." ७० केफाने पुन्हा ते नाकारले, नंतर थोडया वेळाने तेथे उभे असलेले लोक केफाला म्हणाले, "निश्चित तू त्यांच्यापैकी एक आहेस, कारण तू सुद्धा गालीली आहेस." ७१ केफा स्वतःची निर्भत्सना करीत व शपथ वाहून म्हणाला, "तुम्ही ज्या माणसाविषयी बोलत आहात त्याला मी ओळखत नाही!" ७२ आणि लगेच दुस-यांदा कोंबडा आरवला." दोन वेळा कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील," असे येशूवाह म्हणाला होता, याची केफाला आठवण झाली.व तो अतिशय दुःखी झाला व ढसाढसा रडला.

**१५**.१ पहाट होताच एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि झाक्वेन (वडील), आणि तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजी, शास्त्री), व सर्व यहूदी सन्हेद्रिन (सर्व यहूद्यांची न्याय सभा) यांनी एक योजना आखली.त्यांनी येशूवाहला बांधले आणि पिलाताच्या ताब्यात दिले.२ पिलाताने त्याला विचारले, " तू यहूद्यांचा राजा आहेस काय?" येशूवाहने उत्तर दिले, " तू म्हणतोस तसेच." ३ एलयोवन कोहेन नी (मुख्य याजकांनी) पुष्कळ बाबतीत येशूवाहवर आरोप ठेवले. ४ मग पिलाताने त्याला पुन्हा प्रश्न विचारला, " तू उत्तर देणार नाहीस काय? पाहा, ते किती तरी गोष्टीविषयी तुझ्यावर आरोप ठेवीत आहेत." ५ पण तरीही येशूवाहने उत्तर दिले नाही, म्हणून पिलाताला आश्चर्य वाटले.

६ पेसॅह (वल्हांडण) सणाच्या वेळी ते कोणत्याही एका कैद्याच्या सुटकेची मागणी करीत असत. त्याला पिलात रिवाजाप्रमाणे लोकांसाठी सोडत असे. ७ बरब्बा नावाचा एक मनुष्य बंडखोराबरोबर तुरुंगात होता. या लोकांनी दंगलीमध्ये खून केला होता. ८ लोक आले, आणि पिलाताला तो नेहमी त्यांच्यासाठी करीत असे, तसे करायला लावले. ९ पिलाताने विचारले "तुमच्यासाठी यहूद्यांच्या राजाला सोडावे अशी तुमची इच्छा आहे काय?" १० पिलात असे म्हणाला कारण त्याला माहित होते की, व्देषामुळे एलयोवन कोहेन नी (मुख्य याजकांनी) येशूवाहला धरून दिले होते.११ परंतु पिलाताकडे त्याच्याऐवजी बरब्बाला सोडावे असे एलयोवन कोहेन नी (मुख्य याजकांनी) लोकांना चिथावले. १२ परंतु पिलात त्यांना पुन्हा म्हणाला, "तर मग तुम्ही ज्याला यहूद्यांचा

राजा म्हणता, त्याचे मी काय करावे अशी तुमची इच्छा आहे?" १३ ते पुन्हा मोठयाने ओरडले, " त्याला वधस्तंभार खिळा." १४ पिलाताने पुन्हा विचारले, " का? त्याने कोणता गुन्हा केला आहे?" ते सर्व अधिकच मोठयाने ओरडले, " त्याला वधस्तंभावर खिळा!" १५ पिलाताला लोकांना खूष करावयाचे होते म्हणून त्याने त्यांच्यासाठी बरब्बाला सोडले, आणि येशूवाहला फटके मारून वधस्तंभावर खिळण्यासाठी शिपायांच्या स्वाधीन केले. १६ शिपायांनी येशूवाहला राज्यपालाच्या राजवाडयात, ज्याला प्रयटोरियम म्हणतात तेथे नेले, आणि त्यांना सैनिकांची एक तुकडीच एकत्र बोलविली. १७ त्यांनी त्याच्या अंगावर जांभळा झगा घातला, व काटयांचा मुगुट करून त्याला घातला.१८ ते त्याला मुजरा करू लागले आणि म्हणू लागले, " यहूद्यांच्या राजाचा जयजयकार असो." १९ त्यांनी वेताच्या काठीने वारंवार त्याच्या डोक्यावर मारले, त्याच्यावर थुंकले आणि गुडघे टेकून त्याला नमन केले. २० त्यांनी त्याची थट्टा केल्यावर त्याच्या अंगावरून जांभळा झगा काढून घेतला, व त्याचे स्वतःचे कपडे त्याला घातले. नंतर वधस्तंभावर खिळणे शक्य व्हावे, म्हणून ते त्याला बाहेर घेऊन गेले.

२१ वाटेत त्यांना कुरेने येथील शिमोन नावाचा एक मनुष्य दिसला. तो अलेक्सांद्र व रूफ यांचा वडील होता. व आपल्या शेतातून घरी परत चालला होता. मग सैनिकांनी त्याला जबरदस्तीने येशूवाहचा वधस्तंभ वहावयास लावले. २२ आणि त्यांनी येशूवाहला गुलगुथा म्हणजे 'कवटीची जागा' म्हंटलेल्या ठिकाणी आणले.२३ त्यांनी त्याला बोळ मिसळलेला द्राक्षारस दिला, परंतु त्याने तो घेतला नाही.२४ त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले, कोणी कोणते कपडे घ्यावे यासाठी त्यांनी चिठ्ठया टाकल्या, व त्याचे कपडे वाटून घेतले. २५ त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले, तेंव्हा सकाळचे नऊ वाजले होते. २६ आणि त्याच्यावर त्याच्या दोषारोपाचा लेख "यहूद्यांचा राजा" लिहिला होता. २७ त्यांनी त्याच्याबरोबर दोन लुटारूंना एकाला त्याच्या उजवीकडे व दुस-याला त्याच्या डावीकडे वधस्तंभावर खिळले होते. २८ वचन (काही ग्रीक आवृत्या २८ वचन घातलेले आहे. "आणि त्याला गुन्हेगारांमध्ये ठेवले हा शास्त्रलेख पूर्ण झाला." ) २९ जवळून जाणारे लोक त्याची निंदा करीत होते, ते आपली डोकी हलवून म्हणाले, " अरे! मंदिर पाडून ते तीन दिवसात बांधणारा तो तूच ना! ३० वधस्तंभावरून खाली ये, आणि स्वतःचा बचाव कर." ३१ तसेच एलयोवन कोहेन नी (मुख्य याजकांनी),तोरा शिकविणारे रब्बुनी (नियमशास्त्राचे गुरूजीनी, शास्त्री) येशूवाहची थट्टा केली, आणि एकमेकांला म्हणाले, "त्याने दुस-यांचे तारण केले, आणि त्याला स्वतःचा बचाव करता येत नाही!" ३२ या मशीहाला, इस्त्राएलाचा राजा मशीहा याला वधस्तंभावरून खाली येऊ द्या, मग आंम्ही ते पाहू आणि त्याच्यावर विश्वास ठेवू." आणि जे त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळले होते, त्यांनी देखील त्याचा अपमान केला.

३३ दुपारची वेळ झाली. सगळया भूमीवर अंधार पडला, तो अंधार दुपारी तीन वाजेपर्यंत राहिला. ३४ मग तीन वाजता मशीहा मोठयाने आरोळी मारून म्हणाला, " एलोई, एलोई, लमा सबखथनी" म्हणजे " माझ्या एलोहिम, माझ्या एलोहिम, माझा त्याग तू का केलास?" ३५ जवळ उभे असलेल्या काही जणांनी हे ऐकले, तेंव्हा ते म्हणाला, " ऐका, तो एलीयाला बोलावीत आहे." ३६ एक जण धावत गेला. त्याने स्पंज आंबेत बुडवून भरला काठीवर ठेवला, व तो येशूवाहला पिण्यास दिला आणि म्हणाला, "थांबा! एलीया येऊन त्याला खाली उतरवितो की, काय? हे आपण पाहू." ३७ मग मोठयाने आरोळी मारून येशूवाहने प्राण सोडला.३८ तेंव्हा मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटला, व त्याचे दोन भाग झाले. ३९ येशूवाहच्या पुढे उभे असलेल्या सेनाधिका-याने जेंव्हा त्याची आरोळी ऐकली, आणि तो कसा मरण पावला हे पाहिले, तेव्हा तो म्हणाला, " खरोखर हा मनुष्य याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) होता." ४० तेथे असलेल्या काही स्त्रीया दुरून पाहत होत्या, त्यांच्यामध्ये मरीया, मग्दालिया धाकटा याकोब आणि योसे यांची आई मरीया, व सलोमी या होत्या. ४१ येशूवाह जेव्हा गालीलात होता, तेव्हा या स्त्रिया त्याच्या मागे जात, व त्याची सेवा करीत असत.याशिवाय त्याच्याबरोबर यरूशलेमेपर्यंत असलेल्या इतर अनेक स्त्रियाही होत्या. ४२ त्या सुमारास संध्याकाळ झाली होती, आणि तो तयारीचा म्हणजे, शब्बाथाच्या आधीचा दिवस होता. ४३ योसेफ अरिमथाईकर न्यायसभेचा माननीय सभासद होता, व तो सुद्धा याव्हे एलोहिमचे राज्य येण्याची वाट पाहत होता. तो योसेफ धैर्याने पिलाताकडे गेला, आणि त्याने येशूवाहचे शरीर मागितले.४४ येशूवाह इतक्या लवकर कसा मरण पावला, याचे पिलाताला आश्चर्य वाटले. मग त्याने सेनाधिका-याला बोलाविले.

आणि त्याना विचारले, येशूवाह मरून बराच वेळ झाला की काय? ४५ सेनाधिका-याकडून त्याने अहवाल ऐकला, तेंव्हा त्याने ते शरीर योसेफाला दिले. ४६ मग योसेफाने तागाचे वस्त्र विकत आणले, आणि येशूवाहला वधस्तंभावरून खाली काढले, व त्याला तागाच्या वस्त्रात गुंडाळून, ते त्याने खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले. नंतर त्याने कबरेच्या तोंडावर धोंड बसविली.४७ येशूवाहला कोठे ठेवले हे मरीया मग्दालिया, आणि योसेची आई मरीया हे सर्व बघत होत्या. येशूवाहला कोठे ठेवले, हे त्यांनी पाहिले.

**१६**.१ शव्वाथाचा दिवस संपला.तेंव्हा मरीया मग्दालिया, याकोबाची आई मरीया, आणि सलोमी यांनी त्याला लावण्याकरिता सुगंधी तेल विकत आणले. २ आणि आठवडयाच्या पहिल्या दिवशी, अगदी पहाटे सूर्योदयाच्या वेळी त्या कबरेकडे गेल्या. ३ त्या एकमेकीस म्हणत होत्या की, " कबरेच्या तोंडावरून आपणांसाठी धोंड कोण बाजूला लोटील?" ४ नंतर त्यांनी वर पाहिले, आणि त्यांना धोंड दूर लोटलेली आढळली. ती फारच मोठी होती. ५ त्या कबरेत आत गेल्या तेव्हा त्या भयचकित झाल्या. त्यांना एक तरूण पुरूष उजव्या बाजूस बसलेला आढळला. त्याने पांढरा शुभ्र झगा घातला होता.६ तो त्यांना म्हणाला, " भयभीत होऊ नका तुम्ही नात्सेरेथकर (नाझरेथकर) येशूवाह जो वधस्तंभावर खिळला होता त्याचा शोध करीत आहात, पण तो उठला आहे, येथे नाही. त्यांनी त्याला ठेवले होते ती जागा पाहा. ७ जा आणि त्याच्या थालमीद ना (शिष्यांना) व केफाला ही सांगा की, तो तुमच्या अगोदर गालीलात जात आहे. त्याने तुम्हांस सांगितल्याप्रमाणे, तेथे तो तुम्हांस दृष्टीस पडेल." ८ मग त्या बाहेर गेल्या, आणि भीतीमुळे कबरेपासून पळाल्या, त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी कोणाला काहीही सांगितले नाही, कारण त्या भयभीत झाल्या होत्या.

९ आठवडयाच्या पहिल्या दिवशी येशूवाह उठल्यावर, त्याने प्रथम मरीया मग्दालियाला जिच्यामधून त्याने सात भुते काढली होती, तिला दर्शन दिले.१० ती गेली आणि रडून शोक करणा-या त्याच्या अनुयांना तिने हे वृत्त सांगितले.११ त्यांनी ऐकले की तो जिवंत आहे, व तिने त्याला पाहिले आहे. तेव्हा त्यांनी तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाही. १२ यानंतर त्यांच्यापैकी दोघे उघडया माळरानामधून चालले होते.गावाकडे जात असता येशूवाह त्यांना दुस-या रूपाने प्रगट झाला.१३ ते परत आले व इतरांना त्याविषयी सांगितले, परंतु त्यांनी त्यावरही विश्वास ठेवला नाही. १४ नंतर अकरा जण जेवत बसले असता येशूवाह त्यांना प्रगट झाला. त्याने थालमीद (शिष्यांना) अविश्वासाबद्दल आणि त्यांच्या आत्माच्या (अंतःकरणाच्या) कठोर ते बद्दल त्यांना समज दिला. कारण ज्यांनी त्याला उठल्यावर पाहिले होते, त्यांच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही. १५ तो त्यांना म्हणाला, "संपूर्ण जगात जा, आणि सर्व सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा." १६ जो कोणी विश्वास धरतो आणि बाप्तिस्मा घेतो, त्याचे यशाह् (तारण) होईल. परंतु जो विश्वास ठेवीत नाही त्याला धिक्कार होईल.१७ आणि जे विश्वास धरतील त्यांच्याबरोबर ही चिन्हे असतील. ते माझ्या नावाने अशुद्ध आत्मे काढतील, ते नव्या नव्या भाषा बोलतील. १८ ते आपल्या हातांनी साप उचलतील, आणि ते कोणतेही विष पितील, तेंव्हा ते त्यांना बाधणार नाही.ते आजा-यांवर हात ठेवतील, आणि ते बरे होतील."१९ मग अदोनाई येशूवाह त्यांच्याबरोबर बोलल्यानंतर तो आकाशात घेतला गेला, आणि याव्हे एलोहिमच्या उजव्या बाजूस बसला. २० थालमीद (शिष्य) बहेर गेले, आणि त्यांनी प्रत्येक ठिकाणी सुवार्तेची घोषणा केली.अदोनाईने त्यांच्याबरोबर कार्य केले,व त्याने वचनाबरोबर असणा-या चिन्हांनी त्यांची खात्री केली.

.................. समाप्त ...............

# लूकाने लिहिलेले शुभवर्तमान.

## .प्रस्तावना.

लूकाने स्वतः हे शुभवर्तमान लिहिलेले आहे. वास्तविक लूक हा येशूवाह मशीहाचा स्विकार करण्या आधी एक विदेशी व विधर्मी व्यक्ती होता. नंतर तो येशूवाह मशीहाचा अनुयायी झाला. तो प्रेषित पौलाच्या सहवासात रहात होता. तो एक वैद्य म्हणजे डॉक्टर असून सुशिक्षीत असा होता. त्याने हे शुभवर्तमान इसवी सन ६0 ते ७0 च्या कालावधीमध्ये लिहिलेले होते.तो गोड स्वभावाचा असून निष्ठावान असा तो होता. तो शेवट ग्रीस देशामध्ये रक्तसाक्षी झाला असा परंपरागत समज आहे. हे निश्चित सांगता येणार नाही की लूक हा रोमी किंवा ग्रीक अथवा इतर दुस-या देशातील एक विधर्मी व्यक्ती होता. मशीहाचे जे नवीन विश्वासणारे आहे, त्यांना अती उत्तम प्रतिचे वचनाचे शिक्षण देण्याकरिता त्याने हे शूभवर्तमान लिहिले.लूकाने स्वतःच्या मनाच्या कोणतेही वचने लिहिलेली नसून, जे येशूवाह मशीहाच्या प्रेषितांनी सांगितलेल्या व शिकविलेल्या आज्ञा होते, म्हणजे जे मूळ हिब्रू व अरामीक भाषेमध्ये सांगितलेली होते, तेच त्याने योग्य कम लावून, त्याचे पुरावे मिळाल्यानंतर त्याचे लिखाण केले. त्याच प्रमाणे लूकाने ते हिब्रू भाषेमध्ये लिहिले, किंवा ते इतर दुस-या भाषेमध्ये लिहिलेले आहे, हे देखील निश्चित सांगता येणार नाही. थियाफील महाराज हा रोमन व्यक्ती होता. आणि इसवी सन ख्रिस्तापूर्वी ५00 वर्षापासून रोमन लोक लॅटिन भाषेचा वापर करीत असलेले हे इतिहासामध्ये सबळ पुरावे पहावयास मिळतात. म्हणजेच थियाफील महाराजांना त्यांची लॅटीन भाषा येत होती.ह्या सर्व मूळ बाबी लक्षात घेतल्यानंतर व अभ्यास केल्यावर दिसून येते की, लूकाने हे शुभवर्तमान लॅटीन भाषेतून थियाफील महाराजांना शिकविलेले होते, हे निश्चित ग्रह्य धरले जाते.अर्थात ग्रीक भाषेमध्ये हे लिहीलेले दिसून येत नाही. जेंव्हा संपूर्ण बायबलचे भाषांतर हे ग्रीक लोकांनी त्यांच्या ग्रीक भाषेमध्ये इसवी सन ९00 च्या दरम्यान केले. तेंव्हा त्यांनी नवीन करारातील सर्व मूळ हिब्रू व अरामीक आणि लूकाचे हे लॅटीन भाषेतील शब्द काढून, त्यांनी त्यांच्या विधर्मी धर्मातील शब्दांचा पूर्णपणे वापर केलेला आहे हे दिसून येते. मूळ लेखातील दस्तावेजमधील शब्द काढून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आणि त्यांच्या ग्रीक भाषेला त्यांनी जागतिक प्रसिद्धी मिळवून घेतली, हे कालंतरांनी अनेक सत्य शोधक अभ्यासकांच्या लक्षात आले.लूक हा अध्याय १ः १ ते ४ वचनामध्ये स्पष्ट काही महत्वाच्या बाबी दाखवित आहे. येशूवाह मशीहाच्या सर्व ऐतहासिक घटना व त्याने दिलेल्या त्याच्या आज्ञा ह्या उत्तम प्रकारे त्याने त्याच्या शभवर्तमाना मध्ये लिहिलेल्या आहे. आणि तोच शभवर्तमानाचा अन्य भाषेमध्ये भाषांतर करणारा सर्वात पहिला भाषांतरकार असा आहे, हे स्पष्ट ह्यातील इतिहासामधून स्पष्ट होते.

## .लूकाने लिहिलेले शूभवर्तमान.

**१.**१ ज्या आज्ञा आमच्यामध्ये पूर्णपणे स्थापित झालेल्या आहेत. २ त्या आज्ञा प्रारंभापासून प्रत्यक्ष पाहणारे, व संदेश वचनाचे सेवक होते. त्यांनी त्या जशा आम्हांला सोपवून दिल्या, तशाच त्या सांगाव्या, म्हणून त्या घडलेल्या ऐतिहासिक घटनांची नोंद, अनुक्रमाने लिहून काढण्याचे काम पुष्कळांनी हाती घेतले आहे.३ म्हणून हे थियफिल महाराज, मलाही बरे वाटले की, मी त्या सर्व आज्ञांचा मुळापासून बिनचूक शोध केल्यामुळे, त्या अनुक्रमाने लिहाव्या ४ हे मी यासाठी लिहित आहे की, जे काही तुम्हांला शिकविण्यात आले, त्यात निश्चितपणे व परिपूर्णआहे, हे तुम्हांला समजावे.

५ यहूद्यांवरील राजा हेरोद याच्यादिवसात जख-या नावाचा एक कोहेन (याजक) होता.तो अबीयाच्या कोहेन (याजक) कुळातील होता. त्याला एक बायको होती. ती अहरोनाच्या वंशातील कन्यांपैकी होती. तिचे नाव अलीशिबा होते. ६ दोघेही याव्हे एलोहिमच्या दृष्टीने धार्मिक होते, आणि अदोनाईच्या आज्ञा व विधी काटेकोर पणाने पाळीत होते.७ परंतु त्यांना मूल नव्हते कारण अलीशिबा वांझ होती, आणि शिवाय दोघेही फार म्हतारे झाले होते.८ जेंव्हा जखा-याच्या गटाची मंदिरात सेवा करण्याची पाळी आली आणि त्यावेळी तो तेथे एलोहिमचा कोहेन (याजक) म्हणून सेवा करीत होता. ९ कोहेन च्या (याजकांच्या) प्रथेप्रमाणे मंदिरात एलोहिम पुढे क्वेतोरेथ (धूप) जाळण्यासाठी चिठ्ठ्या टाकून त्याची निवड करण्यात आली. १0 जेंव्हा क्वेतोरेथ (धूप) जाळण्याच्या वेळी सर्वजण बाहेर जमून प्रार्थना करीत होते. ११ तेंव्हा याव्हे एलोहिमच्या मालाक (दूताने) त्याला दर्शन दिले. याव्हे एलोहिमचा

मालाक (देवदूत) क्वेतोरेथ (धूप) जाळण्याच्या वेदीच्या उजव्या बाजूला उभा होता. १२ जेंव्हा जखा-याने त्याला पाहिले तेंव्हा तो अस्वस्थ झाला. आणि त्याला भीति वाटली. १३ याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) त्याला म्हणाला, "जखा-या भिऊ नको. कारण तुझी प्रार्थना ऐकण्यात आली आहे. आणि तुझी बायको अलीशिबा इजपासून तुला बेन (मुलगा) होईल. तू त्याचे नाव योहानान ठेव. १४ तो तुला आनंद आणि सुख देईल. त्याचा जन्म होईल तेंव्हा पुष्कळ लोक आनंदित होतील. १५ याव्हे एलोहिमच्या दृष्टीने तो महान होईल. त्याने कोणतेही द्राक्षारस किंवा मद्य पिऊ नये. आणि तो अम्मीच्या गर्भात असल्यापासूनच क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्याने) परीपूर्ण असेल.१६ आणि तो पुष्कळ इस्त्राएल लोकांना अदोनाई त्यांचा याव्हे एलोहिम याच्याकडे वळविण.१७ योहानान स्वतः याव्हे एलोहिम पुढे चालेल. तो एलीयाप्रमाणे समर्थ होईल. एलीयाला जो रूहुव्वा (आत्मा) होता तोच त्याला असेल. तो अब्वांची आत्मे त्याच्या बेन (मुला) कडे वळवील. आज्ञा न मानणा-यांना तो धार्मिकतेकडे नेईल. अदोनाई साठी लोकांना तयार करण्यासाठी तो या गोष्टी करील." १८ मग जखा-या याव्हे एलोहिमच्या मालाक, यास म्हणाला, "हे खरे आहे हे मला कसे समजेल? कारण मी वृद्ध मनुष्य आहे. आणि माझी बायको सुद्धा वृद्ध झाली आहे." १९ आणि याव्हे एलोहिमच्या मालाकने उत्तर दिले तो म्हणाला, "मी गब्रीएल आहे. मी याव्हे एलोहिमच्या समक्षतेमध्ये उभा राहातो. आणि मला तुझ्याशी बोलायला व तुला ही सुवार्ता सांगायला पाठविण्यात आले आहे. २० पण हे लक्षात ठेव, तू मुका राहशील. हे घडेपर्यंत तुला बोलता येणार नाही. कारण माझे शब्द जे योग्य वेळी खरे ठरणार आहेत त्या माझ्या शब्दांवर तू विश्वास ठेवला नाहीस." २१ लोक जखा-याची वाट पाहत होते. आणि तो मंदिरात इतका वेळ का राहिला याचे त्यांना नवल वाटत होते.२२ जेंव्हा तो बाहेर आला तेंव्हा त्याला त्यांच्याशी बोलता येईना. मग त्यांना जाणीव झाली की, मंदिरात त्याने दृष्टान्त पाहिला आहे. तो त्यांना खुणा करीत होता, परंतु बोलू शकत नव्हता. २३ मग असे झाले की, त्याच्या सेवेचा कालवधि संपल्यानंतर तो घरी गेला.२४ काही काळानंतर त्याची बायको अलीशिबा गरोदर राहिली. आणि पाच महिने तिने स्वतः एकांतवास पत्करला. ती म्हणाली, २५ शेवटी आता अदोनाईने मला या मार्गाने मदत केली आहे. लोकांमध्ये माझी लाज राखण्यासाठी त्याने माझी पुष्कळ काळजी घेतली."

२६ अलीशिबाच्या सहाव्या महिन्यात याव्हे एलोहिमने गब्रीएल मालाक ला (दूताला) गालीलातील नात्थेरेथ (नासरेथ) गावी पाठविले. २७ योसेफ नावाच्या मनुष्याशी ज्या कुमारीची मागनी झाली होती, तिच्याकडे गब्रीएलाला पाठविण्यात आले. योसेफ हा दाविदाच्या घराण्यातील होता, तिचे नाव मरीया होते. २८ गब्रीएल तिच्याकडे आला आणि म्हणाला, "अभिवादन! तुझ्यावर कृपा झालेली आहे. अदोनाई तुझ्याबरोबर आहे." २९ परंतु या शब्दांनी ती अस्वस्थ झाली. आणि या अभिवादनाचा अर्थ काय असावा याचे ती नवल करू लागली.

३० याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) तिला म्हणाला, "मरीये भिऊ नकोस. याव्हे एलोहिमने तुझ्यावर कृपा केली आहे. ३१ ऐक! तू गरोदर राहशील आणि तुला बेन (मुलगा) होईल. त्याचे नाव तू येशूवाह ठेव. ३२ तो महान होईल व त्याला सर्वोच्च याव्हे एलोहिमचा बेन म्हणतील. आणि अदोनाई याव्हे एलोहिम त्याला त्याचा अब्वा दावीद याचे सिंहासन देईल. ३३ याकोबाच्या घराण्यावर सर्वकाळासाठी तो सत्ता चालविल. त्याच्या राज्याचा कधीही अंत होणार नाही." ३४ तेंव्हा मरीया मालाक ला (दूताला) म्हणाली, "मी कुमारी असल्याने हे असे कसे घडेल?" ३५ याव्हे एलोहिमच्या मालाक तिला म्हणाला, "क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) तुझ्यावर येईल. आणि सर्वोच्च याव्हे एलोहिमचे सामर्थ्य तुझ्यावर सावली करील. आणि म्हणून जे क्वादोश बाळ जन्मास येईल त्याला याव्हे एलोहिमचा बेन म्हणतील. ३६ आणि याकडे लक्ष दे. तुझी नातेवाईक अलीशिबा जरी वांझ असली तरी ती सुद्धा गरोदर आहे व तिच्या पाटी बेन (मुलगा) आहे. आणि ज्या स्त्रीला ते म्हणाले की, तुला बेन (मुल) होणार नाही तिला सहावा महिना आहे! ३७ कारण याव्हे एलोहिमला कोणत्याही गोष्टी अशक्य नाही." ३८ मी अदोनाईची दासी आहे, आपण म्हणलात तसे माझ्या बाबतीत घडो." मग याव्हे एलोहिम चा मालाक (देवदूत) तिला सोडून गेला.

३९ त्याच वेळी मरीया तयार झाली, आणि लगेच यहूदीयाच्या डोंगराळ भागातील एका गावी गेली. ४० तिने जखा-याच्या घरात प्रवेश केला आणि अलीशिबेला अभिवादन केले. ४१ आणि असे झाले की, जेंव्हा अलीशिबेने मरीयेचे अभिवादन ऐकले तेंव्हा तिच्या

पोटातील बालकाने उडी मारली. आणि अलीशिवा क्वादोश रूहुव्वाने (पवित्र आत्म्याने) भरून गेली.४२ ती मोठया आवाजात बोलली, "सर्व स्त्रियांमध्ये तू अधिक धन्य आहेस, तुझ्या पोटचे फळ धन्य आहे.४३ परंतु माझ्या बाबतीत अशी कोणती गोष्ट घडली की, माझ्या अदोनाई च्या अम्मीने माझ्याकडे यावे? ४४ कारण तुझ्या अभिवादनाचा आवाज माझ्या कानी पडताक्षणीच, माझ्या पोटातील बाळाने आनंदाने उडी घेतली. ४५ अदोनाईने तुला ज्या गोष्टी घडतील असे सांगितले, त्यावर तू विश्वास ठेवलास म्हणून तू धन्य आहेस."

४६ आणि मरीया म्हणाली, ४७ माझा रूहुव्वा (आत्मा) अदोनाईची स्तुति करतो, माझा रूहुव्वा माझ्या यशाह (तारणा-या) याव्हे एलोहिम मध्ये आनंद करतो. ४८ कारण त्याने त्याच्या नम्र दासीची काळजी वाहिली. होय, येथून पुढे सर्व लोक मला धन्य म्हणतील. ४९ कारण सर्वसामर्थ्याने माझ्यासाठी महान कृत्ये केली आहेत, त्याचे नाव क्वादोश (पवित्र) आहे. ५० जे त्याचे भय धरतात त्यांच्यावर तो पिढयांपिढया दया करतो. ५१ त्याने आपल्या बाहूंनी आपले सामर्थ्य दाखविले; गर्विष्ठ लोकांना त्यांच्या बढाई खोर विचारांसह, विखरून टाकले आहे. ५२ सत्ताधिशांना त्याने त्यांच्या सिंहासनावरून खाली आणले आहे. आणि नम्र जनांना त्याने उंच केले आहे. ५३ त्याने भुकलेल्यांना उत्तम पदार्थांनी समाधान दिले आहे. श्रीमंत लोकांना त्याने रिकामे पाठविले आहे. ५४ त्याचा सेवक जो इस्त्राएल याला मदत करण्यास तो आला आहे. ५५ त्याने आपल्या पूर्वजांना जे अभिवचन दिले होते, त्याप्रमाणे अब्राहाम व त्याच्या वंशजांवर दया करण्याचे तो लक्षात ठेवतो." ५६ मरीया अलीशिवे बरोबर तीन महिने राहिली, आणि मग ती तिच्या घरी परत गेली.

५७ अलीशिवेला तिचे मूल होण्याची वेळ आली. तेंव्हा तिने एका बेन ला (मुलाला) जन्म दिला. ५८ तिच्या शेजा-यांनी व नातेवाई कांनी ऐकले की, याव्हे एलोहिमने तिच्यावर मोठी हेस्न् (कृपा) केली आहे. ते तिच्या आनंदात सहभागी झाले. ५९ मग असे झाले की, आठव्या दिवशी मुलाची सुंता करण्यासाठी ते आले. ते त्याच्या अब्बाचे जे नाव होते तेच म्हणजे जख-या नाव ठेवणार होते.६० पण त्याची अम्मी म्हणाली, "नाही, त्याला योहानान असे म्हणावे." ६१ ते तिला म्हणाले, "तुझ्या कोणत्याच नातेवाईकाचे नाव ते नाही." ६२ नंतर त्यांनी त्याच्या वडिलांना खुणेने विचारले, "त्याला कोणते नाव ठेवायचे आहे?" ६३ त्याने लिहिण्यासाठी पाटी मागितली आणि लिहिले, "त्याचे नाव योहानान आहे." त्या सर्वांना खूपच आश्चर्य वाटले. ६४ लगेच त्याचे तोंड उघडले, आणि त्याची जीभ मोकळी झाली,आणि तो बोलू लागला, व याव्हे एलोहिमची स्तुति करू लागला. ६५ सर्व शेजारी भयभीत झाले, आणि यहूदीयाच्या सर्व डोंगराळ प्रदेशात लोक या सर्व गोष्टी बद्दल बोलत होते. ६६ ज्या कोणी हे ऐकले त्या प्रत्येकाने याविषयी नवल केले. ते म्हणाले, "हे मूल पुढे कोण होणार आहे?" कारण याव्हे एलोहिमचा वरदहस्त त्यांच्यावर होता.

६७ मग त्याचा अब्बा जख-या क्वादोश रूहुव्वा ने (पवित्र आत्म्याने) परिपूर्ण होऊन, त्याने भविष्यवाणी केली. तो म्हणाला, ६८ अदोनाई, इस्त्राएलाचा याव्हे एलोहिम धन्यवादित असो, कारण तो त्याच्या लोकांना मदत करण्यास, व त्यांना मुक्त करण्यास आला आहे. ६९ त्याने आमच्यासाठी आपला सेवक दावीद याच्या घरण्यातून आम्हांला सामर्थ्यशाली तारणारा दिला आहे. ७० याव्हे एलोहिम म्हणाला की, मी असे करीन त्याच्या क्वादोश नव्वीईम (पवित्र भविष्यवाद्यां) करवी तो हे बोलला, व ते फार वर्षा पूर्वी होऊन गेले. ७१ जे आमचे शत्रू आहेत, व जे आमचा व्देष करतात, त्यांच्यापासून मुक्त करण्याचे अभिवचन त्याने आम्हांला दिले. ७२ आमच्या पूर्वजांवर दया दाखविण्यासाठी तो हे करणार आहे, व त्यांच्याशी केलेला क्वादोश बेरीथ (पवित्र करार) लक्षात ठेवण्यासाठी तो आमचे रक्षण करणार आहे.७३ हा बेरीथ (करार) एक शपथ होती जी त्याने आमचा पूर्वज अब्राहाम याच्याशी घेतली. ७४ ती अशी की, तो आम्हांला शत्रूच्या सामर्थ्या पासून मुक्त करील. अशासाठी की, आम्हीं त्याची सेवा निर्भयपणे करू शकू.७५ त्याची अशी इच्छा होती की, आम्हीं त्याच्यासमोर धार्मिकतेने, व पवित्रतेने, आमच्या आयुष्याचे सर्व दिवस जगावे. ७६ मुला आता तुला सर्वोच्च याव्हे एलोहिमचा नबी (संदेष्टा) म्हणतील, अदोनाई येण्यासाठी लोकांना तयार करण्यासाठी, तू अदोनाई च्या पुढे चालशील. ७७ कारण तू अदोनाई समोर त्याचा मार्ग तयार करण्यासाठी, आणि पापक्षमा मिळवून तुमचे येशूवाह (तारण) होईल, हे त्याच्या लोकांना सांगण्यासाठी पुढे जाशील.७८ कारण याव्हे एलोहिमच्या हळुवार करूणेमुळे आकाशातील दिवसाची पहाट

उजाडेल, व मरणाच्या दाट छायेत जे जगत आहेत, त्यांच्यावर प्रकाशेल. ७९ आणि शालोम (शांती) चा मार्गावर आमच्या पावलांना मार्गदर्शन करील." ८० अशा रीतीने तिचा बेन (मुलगा) मोठा होत गेला, आणि आत्म्यात सामर्थ्यशाली झाला. इस्त्राएल लोकांना प्रगट होण्याच्या दिवसापर्यंत तो अरण्यात राहिला.

२.१ त्या दिवसात कैसर औगुस्तकडून हुकूम झाला की रोमन जगातील सर्व लोकांच्या नावांची नोंद झालीच पाहिजे. २ ही पहिली नाव नोंदणी होती. क्वीरिनिय हा सूरिया प्रातांचा राज्यपाल होता, त्यावेळेस ही नाव नोंदणी झाली.३ प्रत्येक जण नाव नोंदणी करण्यासाठी आपापल्या गावी गेले. ४ मग योसेफ सुद्धा गालीलातील नात्सेरेथ (नाझरेथ) गावाहून यहूदीयाच्या दाविदाच्या बेथलहेम या गावी गेला. कारण तो दाविदाच्या घराण्यातील व कुळातील होता. ५ जिच्याशी त्याचे लग्न ठरले होते, व जी गरोदर होती, त्या मरीयेसह तो तेथे नाव नोंदणी करण्यासाठी गेला. ६ ते तेथे असतानाच तिची बाळंतपणाची वेळ आली. ७ आणि तिने तिच्या पहिल्या मुलाला जन्म दिला.तिने त्याला फडक्यांमध्ये गुंडाळले, व गोठयात ठेवले. कारण धर्मशाळेत उतरण्यासाठी त्यांना जागा मिळाली नाही.

८ आणि तेथे काही धनगर रात्रीच्या वेळी शेतामध्ये राहून आपले कळप राखीत होते.९ आणि याव्हे एलोहिमचा एक मालाक (दूत) त्यांच्यासमोर प्रगट झाला, व अदोनाईचे तेज त्यांच्या भोवती पसरले, आणि ते धनगर घाबरून गेले. १० याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) त्यांना म्हणाला, "भिऊ नका, कारण मी तुम्हांला आनंदाची बातमी सांगणार आहे. जिच्यामुळे सर्व लोकांना आनंद होणार आहे. ११ कारण आज दाविदाच्या गावात येशूवाह (तारणारा) जन्मला आहे, तो मशीहा अदोनाई आहे. १२ आणि तुमच्यासाठी ही खुण असेल, फडक्यात गुंडाळलेले आणि गोठयात निजविलेले बाळ तुम्हांला आढळेल." १३ आणि अचानक तेथे याव्हे एलोहिम मालाक (देवदूता) बरोबर आकाशातील सैन्याचा समुदाय जमला. ते याव्हे एलोहिमची स्तुति करीत होते, आणि म्हणत होते. १४ शाम्माईमात (आकाशात) याव्हे एलोहिमला गौरव, आणि ज्यांच्याबद्दल याव्हे एलोहिम समाधानी आहे, त्या पृथ्वीवरील मनुष्यांत शालोम (शांति)." १५ तेंव्हा याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) त्यांना सोडून परत आकाशात गेले. तेंव्हा धनगर एकमेकांना म्हणाले, "चला, बेथेलहेमला जाऊ या, आणि घडलेली जी गोष्ट याव्हे एलोहिमने आम्हांला कळविली, ती पाहू या." १६ ते घाईने गेले आणि त्यांना मरीया व योसेफ आढळले, आणि त्यांनी गोठयात ठेवलेले बाळ पाहिले. १७ जेंव्हा धनगरांनी त्याला पाहिले, तेंव्हा याव्हे एलोहिमच्या मालाक ने (देवदूताने) त्यांना त्या बाळाविषयी जे सांगितले होते, ते सर्वांना सांगितले. १८ ज्यांनी हे ऐकले ते सर्व धनगरांनी सामगितलेल्या गोष्टीमुळे चकित झाले. १९ पण मरीयेने या गोष्टी स्वतः जवळच ठेवल्या, व सतत त्याविषयी विचार करू लागली. २० त्यांनी पाहिलेल्या, आणि ऐकलेल्या सर्व गोष्टीं विषयी याव्हे एलेहिमचे गौरव, आणि स्तुति करीत धनगर घरी गेले. त्यांना जसे सांगण्यात आले, तसेच सर्व घडले.

२१ आणि जेंव्हा बाळाची सुंता करण्याच्या आठव्या दिवस आला. तेंव्हा त्यावे नाव येशूवाह ठेवले गेले. हे नाव याव्हे एलोहिमच्या मालाक ने (देवदूताने) त्याला त्याची गर्भधारण होण्यापूर्वीच ठेवले होते.२२ मोशेच्या तोराह (नियम शास्त्रा) प्रमाणे, जो त्यांचा शुद्धीकरणाच्या विधीचा काळ होता, तो आला. तेंव्हा त्याला याव्हे एलोहिम पुढे सादर करण्याचा विधी करण्यासाठी, ते त्याला घेऊन यरूशलेमला गेले. २३ ज्याप्रमाणे अदोनाईच्या नियमात लिहिले आहे, " प्रत्येक प्रथम जन्मलेला नर अदोनाईला अर्पण करावा." २४ आणि, "कबुतरांच्या जोडीचा, किंवा पारव्याच्या दोन पिलांचा यज्ञ करावा." अदोनाईच्या या नियमाप्रमाणे यज्ञ करण्यास ते गेले.

२५ यरूशलेम येथे एक मनुष्य होता, त्याचे नाव शिमोन होते.तो नीतिमान आणि धार्मिक होता. इस्त्राएलाचे सांत्वन होण्याची तो वाट पाहत होता, आणि क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) त्याच्यावर होता. २६ क्वादोश रूहुव्वाने (पवित्र आत्म्याने) त्याला दाखवून दिले की, अदोनाईच्या मशीहाला पाहिल्या शिवाय तो मरणार नाही. २७ रूहुव्वा (आत्म्याने) भरलेला तो मंदिरात गेला. आणि येशूवाह च्या आईवडिलांनी बाळाला तोराह त (नियमशास्त्रात) सांगितलेल्या विधीप्रमाणे करण्यासाठी, त्याच्या जवळ आणले. २८ शिमोनाने येशूवाहला आपल्या हातात घेतले, आणि त्याने याव्हे एलोहिमची स्तुति केली.तो म्हणाला, २९ आता अदोनाई आपल्या वचनाप्रमाणे

आपल्या सेवकाला जाऊ दे. ३० कारण माझ्या डोळयांनी तुझे येशूवाह (तारण) पाहिले आहे. ३१ जे तू सर्व लोकांच्या समोर केलेस,
३२ तो यहूदीतर लोकांना तुझा मार्ग प्रगट करण्यासाठी ओर (प्रकाश) असा आहे. आणि तो तुझे लोक इस्त्राएल यांच्यासाठी गौरव
असा आहे." ३३ त्याच्याविषयी सांगितलेल्या गोष्टीमुळे त्याचे आईवडील आश्चर्यचकित झाले. ३४ मग शिमोनाने त्यांना आशिर्वाद
दिला. तो येशूवाहची अम्मी मरीया हिला म्हणाला, "इस्त्राएलात हे मूल अनेकांचे पडणे, व उठणे यांस कारणीभूत ठरेल.जे चिन्ह
नाकारले जाईल ते होण्याकरिता याची नेमणूक झाली आहे. ३५ आणखी तुझ्या स्वतःच्या जिवातून तरवार भोसकून पार जाईल; हे
अशासाठी की अनेकांच्या मनातील विचार प्रगट व्हावेत."

३६ तेथे हन्ना नावाची एक संदेष्टी स्त्री होती. ती फनूएलाची मुलगी होती. ती अशेर वंशाची होती. ती फार वृद्ध झाली होती. ती
लग्नानंतर आपल्या पतीसमवेत सात वर्षे राहिली. ३७ ती विधवा असून आता चौ-याऐंशी वर्षांची होती. तिने मंदिर कधीही सोडले
नाही; उपास व प्रार्थना करून ती रात्रंदिवस उपवास करीत असे. ३८ ती त्यावेळी बालकाच्या आईवडिलांकडे आली, व तिने याव्हे
एलोहिमचे आभार मानले. आणि जे यरूशलेमच्या सुटकेविषयी वाट पाहत होते, त्या सर्वांना तिने त्याच्याविषयी सांगितले. ३९
अदोनाईच्या तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे त्यांनी सर्व पूर्ण केले, व नंतर ते गालीलातील त्यांच्या नात्सेरेथ (नासरेथ) या गावी
परतले.४० बालक वाढत होता, तो बलवान झाला. तो ज्ञानाने परिपूर्ण झाला, आणि याव्हे एलोहिमची कृपा त्याच्यावर होती.

४१ प्रत्येक वर्षी त्याचे आईवडील पेसॅह (वल्हांडण) सणासाठी यरूशलेमाला जात होते.४२ जेंव्हा तो बारा वर्षांचा झाला, तेंव्हा ते
नेहमी प्रमाणे सणासाठी वर गेले. ४३ सण संपल्यावर ते घरी परतत असता, येशूवाह बेन मात्र यरूशलेमातच राहिला. पण त्याच्या
आईवडिलांना हे माहीत नव्हते.४४ कुठल्या तरी प्रवाश्यांच्या घोळक्याबरोबर तो येत असवा, असा विचार करून पुढे एक दिवसाचा
प्रवास केला. मग ते त्याला त्यांच्या नातेवाईकांमध्ये, व मित्रांमध्ये शोधू लागले. ४५ जेंव्हा तो त्यांना सापडला नाही. तेंव्हा त्याला
शोधण्यासाठी यरूशलेमास परत गेले.

४६ असे घडले की, तीन दिवसांनंतर तो त्यांना मंदिरात सापडला. तो राब्बी (गुरू) जनांच्यामध्ये बसून त्यांचे ऐकत होता, व त्यांना
प्रश्न विचारीत होता. ४७ ज्यांनी त्याचे बोलणे ऐकले, ते सर्व त्याच्या समजबुद्धीमुळे आणि उत्तरांमुळे चकित झाले.४८ जेंव्हा त्याच्या
आईवडिलांनी त्याला पाहिले, तेंव्हा ते चकित झाले. त्याची अम्मी त्याला म्हणाली, "बेन (मुला) तू आमच्या बरोबर असे का केले?
तुला शोधत असताना तुझे वडील, व मी अतिशय काळजीत होतो." ४९ मग येशूवाह त्यांना म्हणाला, "तुम्हीं माझा शोध का
केलात? माझ्या अब्बाचे कार्य जेथे आहे, तेथे मी असावे, हे तुम्हांला माहीत नव्हते काय? ५० परंतु त्याने हे जे उत्तर दिले ते त्यांना
समजले नाही. ५१ मग तो त्यांच्या बरोबर नात्सेरेथत (नासरेथास) गेला, आणि तो त्यांच्या आज्ञत राहिला. त्याची अम्मी या सर्व
गोष्टी अंतःकरणात (आत्म्यात) ठेवीत होती. ५२ येशूवाह ज्ञानाने, आणि शरीराने, याव्हे एलोहिमच्या, आणि मनुष्यांच्या कृपेत
वाढला.

**३**.१ तिबिर्य कैसराच्या कारकीर्दीच्या पंधराव्या वर्षी, जेंव्हा पंतय पिलात यहूदीयाच्या अधिकारी होता. आणि हेरोद गालीलाचा
अधिकारी असताना, आणि त्याचा भाऊ फिलीप्प हा इतुरीया व त्राखोनीती या देशांचा अधिकारी होता. व लूसानिय हा अबिलेनेचा
अधिकारी होता.२ हनन्या, व केयफा हे एलयोवन क्वादोश (मुख्य याजक) होते. तेंव्हा अरण्यात याव्हे एलोहिमचे वचन
जखा-याचा बेन (मुलगा) योहानान याच्याकडे आले.३ तो यार्देनच्या सभोवतालच्या सर्व परिसरात गेला, व लोकांना त्यांच्या
पापांपासून क्षमा मिळण्यासाठी पश्चात्तापाचा बाप्तिस्मा घेण्याविषयी घोषणा करीत फिरला.४ हे यशया नबी च्या (संदेष्ट्याच्या) सेफेर
मध्ये (पुस्तकामध्ये) लिहिल्याप्रमाणे झाले. "अरण्यात कोणाचा तरी आवाज ऐकू आला. "अदोनाई साठी मार्ग तयार करा, त्याचे
रस्ते सरळ करा. ५ प्रत्येक दरी भरून येईल, आणि प्रत्येक डोंगर व टेकडी सपाट केली जाईल. वाकडया तिकडया जागा सरळ
केल्या जातील. ओबडधोबड रस्ते सपाट केले जातील. ६ आणि सर्व लोक याव्हे एलोहिमचे यशाह (तारण) पाहतील!" ७
त्याच्याकडून बाप्तिस्मा करून घेण्यासाठी येणा-या जमावला योहानान म्हणाला, "अहो सापाच्या पिल्लांनो, येणा-या क्रोधापासून

सुटका करून घेण्यासाठी तुम्हांला कोणी सावध केले? ८ पश्चात्तापास योग्य असे फळ द्या. आणि आपोसात असे म्हणू नका की,
आमच्यासाठी अब्राहाम आमच्या अब्बा सारखा आहे. मी तुम्हांला सांगतो की, अब्राहामा साठी मुले निर्माण करण्यास याव्हे एलोहिम,
या खडकांचा उपयोग करण्यास समर्थ आहे. ९ आणि झाडांच्या मुळाशी कु-हाड अगोदरच ठेवलेली आहे. आणि प्रत्येक झाड जे
चांगले फळ देत नाही, ते तोडून अग्नीत टाकले जाईल." १० जमावाने त्याला विचारले, "मग आता आम्हीं काय करावे?"

११ त्याने उत्तर दिले, "ज्याच्याकडे दोन सदरे असतील, त्याने ज्याच्याकडे काहीच नाही, त्याला ते वाटून द्यावे. ज्याच्याकडे अन्न
आहे, त्यानेही तसेच करावे." १२ काही जकातदारही बाप्तिस्मा करून घ्यावयास आले होते. ते म्हणाले, "राब्बी (गुरूजी) आम्हीं
काय करावे?" १३ तो त्यांना म्हणाला, "गरजेपेक्षा जास्त जमा करू नका." हेच तुम्हांला सांगितले आहे. १४ काही शिपायांनी सुद्धा
त्याला विचारले, "आणि आम्हीं काय करावे?" योहानान त्यांना म्हणाला "कोणाकडून बळजबरीने पैसे घेऊ नका. कोणावरही खोटा
आरोप करू नका, आणि तुम्हांला मिळणा-या पगारात समाधानी राहा." १५ लोक मशीहाची अपेक्षा करीत होते, आणि ते सर्व त्यांच्या
मनामध्ये योहानान बद्दल आश्चर्य करीत होते. व असा विचार करीत होते की, "कदाचित तो मशीहा असण्याची शक्यता आहे." १६
त्या सर्वांना योहानानने उत्तर दिले. तो म्हणाला, "मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, पण एकजण जो माझ्यापेक्षाही सामर्थ्यशाली
आहे, तो येत आहे. त्याच्या वहाणांचे बंद सोडण्यासही मी पात्र नाही. तो तुमचा बाप्तिस्मा क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्याने) व
अग्नीने करील. १७ त्याचे खळे स्वच्छ करण्यासाठी, व त्याच्या कोठारात गहू साठविण्यासाठी, त्याच्या हातात त्याचे सुप आहे. पण
भुसा तो न विझविता येणा-या अग्नीने जाळून टाकील."

१८ योहानानने इतर पुष्कळ उत्तेजन देणा-या शब्दांनी, त्यांना बोध करून सुवार्ता सांगितली. १९ योहानानने हेरोद या सत्ताधिशांची
कान उघडणी केली. कारण त्याने त्याच्या भावाच्या बायकोशी हेरोदियाशी अनैतिक संबंध होते. तसेच इतर अनेक वाईट गोष्टी त्याने
केल्या होत्या. २० हे सर्व करून सुद्धा, त्यात भर म्हणून की काय, त्याने योहानानला तुरूंगात टाकले. २१ तेंव्हा असे झाले की, जेंव्हा
सर्व लोकांचा बाप्तिस्मा केला जात होता, तेंव्हा येशूवाहचा सुद्धा बाप्तिस्मा झाला. तो प्रार्थना करीत असता, आकाश उघडले गेले.
२२ आणि क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) कबुतरासारखा त्याच्यावर उतरला. आणि आकाशातून एक वाणी झाली, "तू माझा प्रिय
बेन (मुलगा) आहेस, मी तुझ्याविषयी फार संतुष्ट आहे."

२३ जेंव्हा येशूवाहने त्याच्या कार्यास सुरूवात केली, तेंव्हा तो सुमारे तीस वर्षांचा होता. लोकांना असे वाटे की, येशूवाह योसेफाचा
बेन (मुलगा) आहे. योसेफ एलीचा बेन (मुलगा) होता. २४ एली मत्ताथाचा बेन होता. मत्ताथ लेवीचा बेन होता. लेवी मल्खीचा
बेन होता. मल्खी यन्नयाचा बेन होता. यन्नया योसेफाचा बेन होता. २५ योसेफ मत्तिथ्याचा बेन होता. मत्तिथ्य अमोसाचा बेन
होता. अमोस नहूमाचा बेन होता. नहूम हेस्लीचा बेन होता. हेस्ली नग्गयाचा बेन होता. २६ नग्गय महथाचा बेन होता. महथ
मत्तिथ्याचा बेन होता. मत्तिथ्य शिमयीचा बेन होता. शिमयी योसेखाचा बेन होता. योसेख यादाचा बेन होता. २७ योदा योहानानचा
बेन होता. योहानान रेशाचा बेन होता. रेशा जरूब्बावेलाचा बेन होता. जरूब्बावेल शल्तीएलाचा बेन होता. शल्तीएल नेरीचा बेन
होता. २८ नेरी मल्खीचा बेन होता. मल्खी अद्दीचा बेन होता. अद्दी कोसोमाचा बेन होता. कोसोम एल्मदामाचा बेन होता.
एल्मदाम एराचा बेन होता. २९ एर येशूचा बेन होता. येशू अलिएजरचा बेन होता. अलिएजर योरीमाचा बेन होता. योरीम
मत्ताथाचा बेन होता. मत्ताथ लेवीचा बेन होता. ३० लेवी शिमोनाचा बेन होता. शिमोन यहूदाचा बेन होता. यहूदा योसेफाचा बेन
होता. योसेफ योनामाचा बेन होता. योनाम एल्याकीमाचा बेन होता.

३१ एल्याकीम मल्ल्याचा बेन होता. मल्ल्या मिन्नाचा बेन होता. मिन्ना मत्ताथाचा बेन होता. मत्ताथ नाथानाचा बेन होता. नाथान
दाविदाचा बेन होता. ३२ दावीद इशायाचा बेन होता. इशाय ओबेदाचा बेन होता. ओबेद बवाजाचा बेन होता. बवाज सल्मोनाचा
बेन होता. सल्मोन नहशोनाचा बेन होता. ३३ नहशोन अम्मीनादावाचा बेन होता. अम्मीनादाव अर्णयाचा बेन होता. अर्णय हेम्रोनाचा
बेन होता. हेम्रोन पेरेसाचा बेन होता. पेरेस यहूदाचा बेन होता. ३४ यहूदा याकोबाचा बेन होता. याकोब इसहाकाचा बेन होता.
इसहाक अब्राहामाचा बेन होता. अब्राहाम तेराहाचा बेन होता. तेराह नाहोराचा बेन होता. ३५ नाहोर सरूगाचा बेन होता. सरूग

रऊचा बेन होता. रऊ पेलेगाचा बेन होता. पेलेग एबराचा बेन होता. एबर शेलहाचा बेन होता. ३६ शेलेह केनानाचा बेन होता.
केनाना अर्पक्षदाचा बेन होता. अर्पक्षद शेमाचा बेन होता. शेम नोहाचा बेन होता. नोहा लामेखाचा बेन होता.३७ लामेख
मथुशलहाचा बेन होता. मथुशलह हनोखाचा बेन होता. हनोख यारेदाचा बेन होता. यारेद महललेलाचा बेन होता. महललेल
केनानाचा बेन होता. ३८ केनान अनोशाचा बेन होता. अनोश शेथाचा बेन होता. शेथ आदामाचा बेन होता. आदाम याव्हे
एलोहिमचा बेन होता.

४.१ येशूवाह, क्वादोश रूहुवा ने (पवित्र आत्म्याने) परिपूर्ण होऊन यार्देन नदीहून परतला.मग आत्म्याने त्याला अरण्यात नेले. २
तेथे सैतानाने त्याला चाळीस दिवस मोहात टाकले. त्या दिवसांत येशूवाहने काहीही खाल्ले नाही. जेंव्हा ती वेळ संपली, तेंव्हा
येशूवाहला भूक लागली.३ सैतान त्याला म्हणाला, “जर तू याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहेस तर या दगडांची भाकर करून
दाखव.” ४ येशूवाहने त्याला उत्तर दिले, “असे लिहिले आहे. मनुष्य केवळ भाकरीनेच जगेल असे नाही.” ५ मग सैतान त्याला वर
घेऊन गेला. आणि एका क्षणात जगातील सर्व राज्ये त्याला दाखविली. ६ सैतान त्याला म्हणाला, “मी तुला या सर्व राज्यांचे
अधिकार व गौरव देईन. कारण ते माझ्या हाती दिले आहे. आणि माझ्या मर्जीस येईल, त्याला मी ते देतो. ७ म्हणून जर तू
माझ्यापुढे नमन करशील तर हे सर्व तुझे होईल.” ८ येशूवाहने उत्तर दिले, शास्त्रलेखात असे लिहिले आहे, “तू अदोनाई तुझा याव्हे
एलोहिम याला नमन कर, व त्याचीच सेवा कर. ९ नंतर त्याने त्याला यरूशलेमेस नेले, आणि मंदिराच्या कंगो-यावर त्याला उभे
केले. व त्याला म्हंटले, “तू जर याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) असल्यास, तर येथून खाली उडी मार. १० कारण असे लिहिले आहे
की, तो तुझे संरक्षण करण्याकरिता, तो आपल्या मालाक ना (दूतांना) तुझ्याविषयी आज्ञा करील. ११ आणि तुझा पाय धोंडयावर
आपटू नये, म्हणून ते आपल्या हातांवर तुला झेलून धरतील. १२ तेंव्हा येशूवाहने उत्तर दिले, “शास्त्रलेखात असेही म्हंटले आहे. तू
अदोनाई तुझा याव्हे एलोहिम याची परीक्षा पाहू नकोस.” १३ म्हणून सैतानाने प्रत्येक प्रकारची परीक्षा घेण्याचे संपविल्यावर, योग्य
वेळ येईपर्यंत तो येशूवाहला सोडून निघून गेला.

१४ मग आत्म्याच्या सामर्थ्यात येशूवाह गालीलास परतला.आणि त्याच्याविषयीची बातमी सगळीकडे पसरली.१५ त्याने त्यांच्या
सभास्थानात शिकवित असे, आणि सर्वांनी त्याची गौरव केली.१६ मग तो नात्सेरेथला (नासरेथला) गेला.जेथे तो लहानाचा मोठा
झाला होता. आणि शब्बाथ दिवशी त्याच्या प्रथे प्रमाणे तो सभास्थानात गेला. तो वाचण्यासाठी उभा राहिला. १७ आणि यशया
नवीचे (संदेष्टयाचे) पुस्तक त्याला देण्यात आले. त्याने ते पुस्तक उघडले, आणि जो भाग शोधून काढला. त्या ठिकाणी असे
लिहिले आहे.

१८ अदोनाईचा रूहुव्वा (आत्मा) मजवर आहे, कारण त्याने मला मशीहा (अभिषेक) केला आहे. यासाठी की, गरीबांना सुवार्ता
सांगण्या साठी, बंदीवान म्हणून नेलेल्यांस सोडविण्याची घोषणा करण्यासाठी, आंधळयांना दृष्टी मिळावी व त्यांनी बघावे, यासाठी
जुलूम होणा-यांची सुटका करण्यासाठी, १९ आणि अदोनाईच्या कृपेच्या वर्षाची घोषणा करण्यासाठी त्याने मला पाठविले आहे.” २०
मग त्याने पुस्तक बंद केले आणि सेवकाला परत दिले व तो खाली बसला. सभास्थानातील प्रत्येक जण त्याच्याकडे रोखून पाहत
होते.२१ त्यांने त्यांच्याशी बोलण्यास सुरूवात केली. “तुमच्या ऐकण्यामुळे आज हे शास्त्रवचन पूर्ण झाले.” २२ तेंव्हा सर्व लोक
त्याच्याविषयी साक्ष देऊ लागले.आणि जी कृपेची वचने त्याच्या मुखातून निघत होती.त्याविषयी ते आश्‍चर्य चकित झाले. आणि
ते म्हणाले, “हा योसेफाचाच बेन (मुलगा) नव्हे काय?” २३ तो त्यांना म्हणाला, “अर्थात तुम्हीं मला ही म्हण लागू कराल, वैद्या
स्वतःला बरे कर. कफर्णहूमात ज्या गोष्टी तू केल्याचे आम्हीं ऐकले, त्या गोष्टी तुझ्या स्वतःच्या गावात सुद्धा कर.” मग तो
म्हणाला, २४ “मी तुम्हांला खरे सांगतो कोणीही नवी (संदेष्टा) त्याच्या गावात स्विकारला जात नाही.२५ मी तुम्हांला खरे सांगतो,
इस्त्राएलात एलीयाच्या काळात पुष्कळ विधवा होत्या. जेंव्हा साडेतीन वर्षेपर्यंत पाऊस पडला नाही, आणि सर्व प्रदेशात मोठा
दुष्काळ पडला होता. २६ तरी ही एलीयाला इतर कोणत्याही विधवेकडे पाठविण्यात आले नाही. त्याला सिदोन प्रांतातील सरफथ
येथील विधवेकडेच पाठविण्यात आले. २७ अलीशा नवीच्या (संदेष्टयाच्या) वेळेस इस्त्राएलात अनेक कुष्ठरोगी होते, परंतु त्यापैकी

कोणीही शुद्ध झाले नाही.केवळ सूरीया येथील नामान कुष्ठ रोग्यालाच शुद्ध करण्यात आले होते." २८ जेंव्हा सभास्थानातील लोकांनी हे ऐकले, तेंव्हा ते फार रागावले.२९ ते लोक उठले, आणि त्यांनी येशूवाहला नगराबाहेर घालवून दिले. आणि ज्या टेकडीवर त्याचे गाव बसले होते, त्या टेकडीच्या कडयाकडे त्याला ढकलून देण्यासाठी घेऊन गेले. ३० परंतु तो त्यांच्यातून निघून आपल्या वाटेने गेला.

३१ नंतर तो गालीलातील कफर्णहुम गावी गेला. तो त्यांना शब्बाथ दिवशी शिक्षण देत असे. ३२ ते त्याच्या शिकवणीने आश्चर्य चकित झाले. तो अधिकार वाणीने शिकवीत असे.३३ सभास्थानात एक मनुष्य होता. त्याच्यात अशुद्ध आत्मा होता. ३४ तो मोठयाने ओरडून म्हणाला, "हे नात्सेरेथच्या (नासरेथच्या) येशूवाह तुला आमच्याकडून काय पाहिजे? तू आमचा नाश करावयास आला आहेस काय? तू कोण आहेस हे मला माहीत आहे. याव्हे एलोहिमचा क्वादोश (पवित्र) तोच तू आहेस." ३५ येशूवाहने त्याला म्हंटले, "शांत राहा, आणि त्याच्यातून निघा!" तेंव्हा त्या अशुद्ध आत्म्याने त्या मनुष्याला जमिनीवर खाली ढकलले, व त्या माणसाला काहीही इजा न करता, तो बाहेर आला. ३६ सर्व जण आश्चर्य चकित झाले, व एकमेकांना बोलू लागले, "हे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत, अधिकाराने आणि सामर्थ्याने तो अशुद्ध आत्म्यांना आज्ञा करतो, व ते बाहेर येतात." ३७ अशा प्रकारे त्या भागात त्याच्याविषयी सगळीकडे ही बातमी पसरली.

३८ येशूवाह सभास्थानातून निघून शिमोनाच्या घरी गेला. शिमोनाची सासू अति तापाने आजारी होती. त्यांनी येशूवाहला तिला बरे करण्याविषयी विनंती केली. ३९ येशूवाह तिच्याजवळ उभा राहिला, त्याने तापाला आज्ञा दिली, व ताप निघाला. ती तावडतोब उठली, आणि त्यांची सेवा करू लागली. ४० सूर्य मावळतीला जात असताना ज्यांची माणसे निरनिराळया रोगांनी आजारी होती, त्या सर्वांना लोकांनी त्याच्याकडे आणले. प्रत्येकाच्या डोक्यावर हात ठेवून त्याने त्यांना बरे केले. ४१ कित्येकांमधून अशुद्ध आत्मे बाहेर आले, ते अशुद्ध आत्मे ओरडत होती. आणि म्हणत होते, 'तू याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहेस." परंतु त्याने त्यांना दटावले व बोलू दिले नाही. कारण त्यांना माहीत होते की, तो मशीहा आहे. ४२ जेंव्हा दिवस उगवला. तेंव्हा तो एकांत स्थळी गेला. पण लोक त्याला शोधत होते. तो जेथे होता तेथे ते लगेच आले. आणि त्यांने त्यांच्यातून निघून जाऊ नये, म्हणून प्रयत्न केला. ४३ तेंव्हा तो त्यांना म्हणाला, "याव्हे एलोहिमच्या राज्याची सुवार्ता मला इतर गावांमध्येही सांगितली पाहिजे. कारण याच कारणासाठी मला पाठविले आहे." ४४ आणि तो यहूदाच्या वेगवेगळया सभास्थानात उपदेश करीत होता.

**५.**१ मग असे झाले की लोकांनी त्याच्या भोवती गर्दी केली होती, व ते याव्हे एलोहिमचे वचन ऐकत होते, आणि तो गनेसरेत सरोवराच्या काठी उभा होता. २ तेंव्हा त्याने सरोवरातील दोन होडया पाहिल्या, पण होडयातील कोळी बाहेर गेले होते, व त्यांची जाळी धूत होते. ३ त्यातील शिमोनाच्या होडीवर येशूवाह चढला, आणि त्याने ती होडी किना-यापासून थोडी दूर नेण्यास सांगितले. नंतर तो होडीत बसला व लोकांना शिक्षण देऊ लागला. ४ जेंव्हा त्याने बोलणे संपविले. तेंव्हा तो शिमोनाला म्हणाला, "खोल पाण्यात होडी ने, आणि मासे पकडण्यासाठी तुझे जाळे खाली सोड." ५ शिमोनाने उत्तर दिले, "रब्बुनी (गुरूजी) संपूर्ण रात्र आम्ही खूप कष्ट घेतले पण काहीच मासे पकडू शकलो नाही. तरी आपण सांगत आहात म्हणून मी जाळे खाली सोडतो." ६ जेंव्हा त्यांनी तसे केले, तेंव्हा त्यांच्या जाळयात भरपूर मासे लागले. पण त्यांचे जाळे तुटू लागल्याने, ७ त्यांनी दुस-या होडीतील आपल्या जोडीदारांना मदत करण्यासाठी बोलविले, ते आले. आणि त्यांनी इतके मासे भरले की, दोन्ही होडया बुडू लागल्या.८ शिमोन केफाने जेंव्हा हे पाहिले, तेंव्हा तो येशूवाहच्या पाया पडला. आणि म्हणाला, "अदोनाई माझ्या पासून दूर जा. कारण मी पापी मनुष्य आहे!"

९ तो असे म्हणाला, कारण तो आणि त्याच्या साथीदारांना इतके मासे मिळाले होते की, हे कसे झाले म्हणून ते आश्चर्यचकित झाले. १० जब्दीचा बेन (मुलगा) याकोब, व योहानान हे ही, त्यांच्या प्रमाणे आश्चर्य चकित झाले होते. ते शिमोनाचे भागीदार होते. मग येशूवाह शिमोनाला म्हणाला, "भिऊ नको, कारण येथून पुढे तू माणसे धरशील." ११ त्यांनी त्यांच्या होडया किना-याला आणल्या.

नंतर त्यांनी सर्व काही सोडले, आणि त्याच्यामागे गेले.

१२ आणि असे झाले की, तेंव्हा येशूवाह कुठल्या एका गावात असता. तेथे कुष्ठाने भरलेला एक मनुष्य होता. जेंव्हा त्याने येशूवाहला पाहिले, तेंव्हा तो तोंडावर उपडा पडला. आणि त्याला विनंती केली, "अदोनाई जर तुझी उच्छा असेल, तर तू मला बरे करण्यास समर्थ आहेस." १३ येशूवाहने आपला हात लांब करून त्याला स्पर्श केला. आणि म्हंटले, "मला तुला बरे करायचे आहे, वरा हो!" आणि तावडतोब त्याचे कुष्ठ नाहीसे झाले. १४ मग येशूवाहने त्याला आज्ञा केली की, "कोणालाही सांगू नकोस. पण जा आणि स्वतःला कोहेनला (याजकाला) दाखव, आणि तुझ्या शुद्धीबद्दल मोशेने आज्ञा केल्याप्रमाणे अर्पण कर. त्यांना समजेल की, तू वरा झाला आहेस. ते आश्चर्य चकित झाले. त्याच्यासाठी हा पुरावा म्हणून कर." १५ परंतु येशूवाह विषयीच्या बातम्या अधिक पसरतच गेल्या. आणि मोठे जमाव त्याचे ऐकण्यासाठी, व त्यांच्या रोगांपासून मुक्त होण्यासाठी येत असत. १६ परंतु येशूवाह नेहमी एकांतात जात असे, व प्रार्थना करीत असे.

१७ असे झाले की, एके दिवशी तो शिक्षण देत असता, तेथे परूशी व तोराह चे राव्वी (नियमशास्त्राचे शिक्षक) बसले होते. ते गालील, यहूदीया, आणि यरूशलेम, या भागातील प्रत्येक गावातून आले होते. अदोनाईचे सामर्थ्य त्याच्या जवळ होते, त्यामुळे तो बरे करत होता. १८ काही लोक अर्धांगवायु झालेल्या मनुष्याला बिछान्यात घालून आले. त्यांनी त्याला आत आणण्याचा व येशूवाह समोर खाली ठेवण्याचा प्रयत्न केला. १९ परंतु गर्दीमुळे आत आणण्याचा मार्ग त्यांना सापडेना. ते छपरावर गेले, आणि त्याला खाटेसह आत सोडले. कौले काढून बरोबर मध्यभागी जेथे येशूवाह बसला होता तेथे सोडले. २० त्यांचा विश्वास पाहून येशूवाह त्याला म्हणाला, "मनुष्या तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. २१ तोराह चे राव्वी (नियमशास्त्राचे शिक्षक) , आणि परूशी स्वतःसी विचार करू लागले. "हा कोण आहे, जो असे दुर्भाषण करीत आहे? याव्हे एलोहिम शिवाय कोण पापांची क्षमा करू शकतो?" २२ पण येशूवाह त्यांचे विचार जाणून होता. तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं आपल्या अंतःकरणात असा विचार का करता? २३ तुझ्या पापांची क्षमा झाली आहे, किंवा ऊठ, आणि चालू लाग. यातील कोणते सोपे आहे? २४ पण तुम्हांला हे कळावे की, मनुष्याच्या मुलाला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे." तो अर्धांगवायु झालेल्या मनुष्याला म्हणाला, "मी तुला सांगतो, ऊठ, आपला बिछाना उचल आणि घरी जा." २५ तावडतोब तो उभा राहिला ज्या बिछान्यावर तो झोपला होता, तो त्याने उचलला व याव्हे एलोहिमची स्तुति करीत, आपल्या घरी गेला. २६ आणि ते सर्व आश्चर्य चकित झाले, आणि याव्हे एलोहिमची स्तुति करू लागले. ते खरोखरच आश्चर्य चकित झाले ते म्हणाले, "आम्हीं आज आश्चर्य पाहिले!"

२७ यानंतर येशूवाह बाहेर गेला, आणि त्याने लेवी नावाच्या जकातदाराला जकात नाक्यावर बसलेले पाहिले. येशूवाह त्याला म्हणाला, "माझ्या मागे ये!" २८ लेवी सर्व काही तेथेच सोडून उठला, आणि त्याच्या मागे गेला. २९ नंतर लेवीने त्याच्या घरी येशूवाह साठी मोठी मेजवानी दिली. जकातदारांचा आणि इतर लोकांचा मोठा जमाव, त्याच्या बरोबर जेवत होता. ३० परूशी आणि तोराह चे राव्वी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांनी त्याच्या थालमीद (शिष्या) कडे तक्रार केली. ते म्हणाले, "तुम्हीं जकातदार, आणि पापी लोकांबरोबर का जेवता?" ३१ येशूवाह त्यांना म्हणाला, " जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज नाही, पण जे रोगी आहेत त्यांना वैद्याची गरज आहे. ३२ मी धार्मिकांस नाही, तर पाप्यांस पश्चात्ताप करण्यासाठी बोलावण्यास आलो आहे.

३३ ते त्याला म्हणाले, "योहानानचे थालमीद (शिष्य) नेहमी उपास करतात आणि प्रार्थना करतात, आणि परूश्यांचे थालमीद (शिष्य) सुद्धा तसेच करतात, पण तुझे थालमीद (शिष्य) नेहमीच खातपीत असतात." ३४ येशूवाह त्यांना म्हणाला, "वर मुलगा बरोबर असताना, त्याच्या पाहुण्यांना तुम्हीं उपाशी ठेवाल काय? ३५ पण असे दिवस येत आहेत की, वराला त्यांच्या पासून घेतले जाईल, आणि त्या दिवसांत ते उपास करतील." ३६ त्याने त्यांना आणखी एक बोधकथा सांगितली. कोणीही नवीन कपडाचा तुकडा फाडून, जुन्याला लावीत नाही. जर तो तसे करतो तर तो नवे कापड फाडतो, पण नव्या कापडांचे ठिगळ जुन्या कापडाला योग्य दिसत नाही. ३७ आणि कोणीही नव्या द्राक्षारस जुन्या द्राक्षारसाच्या कातडी पिशवीत ठेवीत नाही. जर तो असे करतो तर नवा द्राक्षारस

कातडी पिशवी फाडून बाहेर उसळेल. ३८ नवा द्रासारस नव्या कातडी पिशवीतच ठेवला पाहिजे. ३९ कोणालाही जुना द्राक्षारस प्याल्यानंतर नवा नको असतो. कारण तो म्हणतो, "जुना द्राक्षारसच चांगला आहे."

६.१ नंतर असे झाले की, शब्बाथ दिवशी येशूवाह शेतामधून जात होते. आणि त्याचे थालमीद (शिष्य) धान्याची कणसे मोडून, हातावर चोळून खात होते.२ मग परूश्या पैकी काही म्हणाले, "शब्बाथ दिवशी जे करण्यास मना आहे ते तुम्हीं का करता." ३ येशूवाहने त्यांना म्हंटले, "जेंव्हा दावीद व त्याच्यावरोबर असलेल्यांना भूक लागली, तेंव्हा त्यांनी काय केले, हे तुम्हीं वाचले नाही काय? ४ तुम्हीं हे ऐकले नाही का की तो याव्हे एलोहिमच्या मंदिरात गेला. आणि अर्पणाची भाकर त्याने खाल्ली व त्याच्या बरोबर जे होते त्यांना दिली. जी भाकर फक्त कोहेन (याजकच,) खाऊ शकत, असे ती त्यांनी खाल्ली." ५ येशूवाह त्यांना म्हणाला, "मनुष्याचा मुलगा शब्बाथाचा अदोनाई आहे."

६ असे झाले की, दुस-या एका शब्बाथाच्या दिवशी येशूवाह सभास्थानात गेला, आणि शिकवू लागला. तेंव्हा तेथे एक मनुष्य होता. त्याचा उजवा हात वाळलेला होता. ७ येशूवाह शब्बाथ दिवशी कोणाला बरे करतो की काय? हे पाहण्यासाठी तोराह चे राब्बी व परूशी त्याच्यावर पाळत ठेवून होते. यासाठी की, त्याच्यावर आरोप ठेवण्यासाठी त्यांना काही तरी कारण मिळावे.८ त्याला त्यांचे विचार माहीत होते. पण वाळलेल्या हाताच्या मनुष्याला तो म्हणाला, "ऊठ आणि सर्वा समोर उभा राहा!" आणि तो मनुष्य उठला आणि तेथे उभा राहिला. ९ येशूवाह त्यांना म्हणाला, "मी तुम्हांला विचारतो, शब्बाथ दिवशी कोणत्या गोष्टी करायला परवानगी आहे? चांगले करणे की वाईट करणे? कोणते कायदेशीर आहे. एखाद्याचा जीव वाचविणे, का जीव घेणे? १० येशूवाहने सर्वांकडे पाहिले. मग तो त्या मनुष्याला म्हणाला, "हात सरळ कर." त्याने हात सरळ केला. आणि त्याचा हात बरा झाला.११ पण परूशी व तोराह चे राब्बी (नियमशास्त्राचे शिक्षक) खूप रागावले, व येशूवाह विषयी काय करता येईल, याविषयी आपापसात चर्चा करू लागले.

१२ त्या दिवसांत असे झाले की, येशूवाह प्रार्थना करण्यासाठी डोंगरावर गेला. त्याने ती रात्र याव्हे एलोहिमची प्रार्थना करण्यात घालविली. १३ जेंव्हा दिवस उगवला तेंव्हा त्याने थालमीद (शिष्यांना) आपणांकडे बोलाविले, त्याने त्यांच्यातील बारा जणांना निवडले, व त्यांना 'प्रेषित' असे नाव दिले. १४ शिमोन, त्याला केफा हे सुद्धा नाव दिले. आंद्रिया, (शिमोन केफाचा भाऊ) याकोब, आणि योहानान, फिलिप्प, बर्थलमय, १५ मतिया, थोमा, अल्फीचा बेन याकोब, शिमोन, ज्याला जिलोट म्हणत १६ याकोबाचा मुलगा यहूदा व यहूदा इस्कर्योत, जो पुढे विश्वासघात करणारा निघाला. १७ तो त्यांच्या बरोबर खाली उतरला व सपाट जागेवर उभा राहिला, आणि त्याच्या अनुयायांचा मोठा समुदाय तेथे आला होता. व यहूदीया, यरूशलेम, सोर, आणि सिदोनच्या समुद्र किना-याकडचे असे पुष्कळसे लोक तेथे आले होते.१८ ते तेथे त्याचे ऐकण्यास, व त्यांच्या रोगापासून बरे होण्यास आले होते. व ज्यांना अशुद्ध आत्म्यांची बाधा होती, त्यांनाही व्याधीपासून मुक्त करण्यात आले. १९ सगळा लोकसमुदाय त्याला स्पर्श करू पाहत होता. कारण त्याच्यामधून सामर्थ्य येत होते, व ते सर्वांना बरे करीत होते.

२० येशूवाहने आपल्या थालमीद (शिष्यां) कडे पाहिले व म्हणाला, "जे तुम्हीं गरीब आहात, ते तुम्हीं आशिर्वादीत आहात. कारण याव्हे एलोहिमचे राज्य तुमचे आहे.२१ तुम्हीं जे भुकेले ते आशिर्वादीत आहात. कारण तुम्हीं तृप्त व्हाल. आता तुम्हीं जे रडता ते तुम्हीं आशिर्वादीत आहात. कारण तुम्हीं हसाल. २२ जेंव्हा लोक तुमचा व्देष करतील, तुम्हांला वाळीत टाकतील, आणि तुमचा अपमान करतील, जेंव्हा तुमचे नाव ते वाईट समजतील, आणि मनुष्याच्या मुलामुळे तुम्हांला नाकारतील, तेंव्हा तुम्हीं आशिर्वादीत व्हाल. २३ त्या दिवशी तुम्हीं आनंद करा. आनंदाने उडया मारा. कारण आकाशात तुमचे बक्षीस मोठे आहे. कारण त्यांच्या पूर्वजांनी नबीईम (संदेष्टयां) ना सुद्धा तसेच केले.

२४ पण श्रीमंतानो तुम्हांला दुःख होवो कारण तुम्हांला अगोदरच सर्व सुख मिळाले आहे. २५ जे तुम्हीं तृप्त आहात त्या तुम्हांला दुःख होवो . कारण तुम्हीं भुकेले व्हाल. जे आता हसतात त्यांना दुःख होवो. कारण तुम्हीं शोक कराल आणि रडाल. २६ जेंव्हा सर्व

तुमच्याविषयी चांगले बोलतील, तेंव्हा तुम्हांला दुःख होवो. कारण त्यांच्या वाडवडिलांनी खोटया संदेष्टयांना असेच केले.

२७ माझे ऐकणा-यांना मी सांगतो. तुमच्या शत्रूंवर अहेव (प्रीति) करा.जे तुमचा व्देष करतात, त्यांचे चांगले करा. २८ जे तुम्हांला शाप देतात, त्यांना आशिर्वाद द्या. जे तुम्हांला वाईट वागवितात, त्यांच्यासाठी प्रार्थना करा.२९ जर कोणी तुमच्या एका गालावर मारतो तर त्याच्यासमोर दुसरा पण गाल करा. जर कोणी तुमचा अंगरखा घेतो तर त्याला तुमचा सदराही घेऊ द्या. ३० जे तुम्हांला मागतात त्या प्रत्येकाला द्या. आणि जो तुमचे घेतो ते परत मागू नका. ३१ लोकांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हांला वाटते, तसेच तुम्हींही त्यांच्याशी वागा. ३२ तुमच्यावर जे अहेव (प्रीति) करतात, त्यांच्यावर जर तुम्हीं प्रीति केली.तर तुम्हीं काय विशेष केले? पापी लोकसुद्धा जे त्यांच्यावर अहेव (प्रीति) करतात, त्यांच्यावर अहेव (प्रीति) करतात. ३३ तुमचे जे चांगले करतात त्यांचे जर तुम्हीं चांगले करता, तर तुम्हांला काय लाभ? पापीसुद्धा असेच करतात. ३४ ज्यांच्याकडून तुम्हांला परत मिळेल अशी आशा असते, त्यांना जर उसने देता. तर तुम्हांला काय लाभ? पापीसुद्धा परत मिळावे या उद्देशाने दुस-या पाप्याला उसने देतात.३५ पण तुमच्या शत्रूवर अहेव (प्रीति) करा, आणि त्यांचे चांगले करा. व कोणतीही अपेक्षा न ठेवता उसने द्या. मग तुमचे बक्षीस मोठे असेल, व तुम्हीं सर्वोच्च याव्हे एलोहिमचे मुलगे व्हाल. कारण याव्हे एलोहिम हा कृतन्घ व दुष्ट लोकांवर दया करतो. ३६ जसा तुमचा अव्वा कनवाळू आहे, तसे तुम्हींही कनवाळू व्हा.

३७ दुस-यांचा न्याय करू नका, म्हणजे तुमचाही न्याय होणार नाही. दुस-यांना दोषी ठरवू नका, म्हणजे तुम्हांला ही दोषी ठरविले जाणार नाही. दुस-यांची क्षमा करा, म्हणजे तुमचीही क्षमा केली जाईल. ३८ दुस-यांना द्या, म्हणजे तुम्हांलाही दिले जाईल. तुमच्या पदरात हलवून, दाबून, ओसांडून वाहणारे उत्तम माप ओतले जाईल. जे माप तुम्हीं दुस-यांसाठी वापरता, त्याच मापाने तुम्हांला दिले जाईल.३९ त्याने त्यांना एक गोष्ट सांगितली, 'एक आंधळा दुस-या आंधळयाला मार्ग दाखवू शकेल काय? ते दोघे ही खडडयात पडणार नाहीत काय?' ४० कोणताही थालमीद (शिष्य) त्याच्या राब्बी (गुरू) पेक्षा थोर नाही.तर प्रत्येक थालमीद (शिष्य) पूर्ण शिकतो तेंव्हा तो त्याच्या राब्बी (गुरू) सारखा होईल.४१ तू आपल्या भावाच्या डोळयातील कुसळ का पाहतोस? स्वतःच्या डोळयातील मुसळ तुला दिसत नाही काय? ४२ तू तुझ्या भावाला कसे म्हणू शकतोस, बंधु तुझ्या डोळयातील कुसळ मला काढू दे.तुझ्या स्वतःच्या डोळयातील मुसळ तुला दिसत नाही? ढोंग्या प्रथम तुझ्या डोळयातील मुसळ काढ मगच तुला तुझ्या भावाच्या डोळयातील कुसळ काढाताना चांगले दिसेल.

४३ कोणतेही चांगले झाड असे नाही की, ते वाईट फळ देते. किंवा कोणतेही वाईट झाड असे नाही की, जे चांगले फळ देते. ४४ कारण प्रत्येक झाड हे त्याच्या फळावरून ओळखले जाते. लोक काटेरी झडुपातून अंजिर गोळा करीत नाहीत. तसेच काटेरी झुडपातून ते द्राक्षे गोळा करीत नाहीत.४५ चांगला मनुष्य त्याच्या आत्म्यात ज्या चांगल्या गोष्टी साठविलेल्या असतात, त्याच काढतो. आणि दुष्ट मनुष्य त्याच्या आत्म्यात जे वाईट आहे, तेच बाहेर काढतो. कारण मनुष्याच्या आत्म्यात जे असते, तेच तो मुखाव्दारे काढतो.

४६ तुम्हीं मला अदोनाई, अदोनाई, का म्हणता, आणि मी जे सांगतो, ते तुम्हीं का करीत नाही? ४७ प्रत्येक जण जो माझ्याकडे येतो व माझी वचने ऐकतो व त्या आज्ञा पाळतो. तो कसा आहे हे मी तुम्हांला दाखविता. ४८ तो एका घर बांधणा-या मनुष्यासारखा आहे.त्याने खोल खोदले आणि खडकावर पाया बांधला. मग पूर आला, तेंव्हा नदीचे पाणी घरावर आदळले, पण पाण्याने ते हलले नाही.कारण ते चांगले बांधले होते.४९ पण जो कोणी माझी वचने ऐकतो, पण ती पाळीत नाही. तो ज्याने आपले घर पाया न घालता जमिनीवर बांधले, त्या मनुष्यासारखा आहे. नदीच्या पुराचे पाणी घरावर आढळते, व ते घर लगेच कोसळते, आणि पूर्णपणे नष्ट होते.

**७**.१ नंतर ज्या बोधकथा लोकांनी ऐकाव्यात असे त्याला वाटत होते. त्या सांगण्याचे संपविल्यावर तो कफर्णहूमास गेला. २ तेथे एक रोमी शताधिपती होता. त्याचा नोकर इतका आजारी होता की, तो मरावयास टेकाला होता. हा नोकर त्या शताधिपतीचा फार

आवडता होता. ३ जेंव्हा शताधिपतीने येशूवाह विषयी ऐकले, तेंव्हा त्याने काही यहूदी वडील जनांन त्याच्याकडे पाठविले. व अशी विनंती केली की, त्याने येऊन त्याच्या नोकराला वाचवावे. ४ जेंव्हा ते येशूवाह कडे आले, तेंव्हा त्यांनी मनःपूर्वक विनंती केली. ते म्हणाले, "तू त्याच्यासाठी हे करावेस कारण तो त्या योग्यतेचा आहे. ५ कारण तो आमच्या लोकांवर अहेद (प्रीति) करतो. त्याने आमचे सभास्थान आम्हांला बांधून दिले." ६ म्हणून येशूवाह त्याच्या बरोबर गेला, तो घरापासून दूर नव्हता. तोच शताधिपतीने मित्रांना असे सांगण्यासाठी पाठविले की, "अदोनाई आपण त्रास करून घेऊ नका. कारण आपण माझ्या घरी यावे, इतकी माझी योग्यता नाही. ७ यासाठीच मी स्वतः आपणाकडे येऊ नये, असा विचार केला होता. परंतु तुम्हीं फक्त शब्द बोला, म्हणजे माझा चाकर बरा होईल. ८ कारण मी ही तावेदार असून, माझ्या अधिपत्याखाली शिपाई आहेत. मी एखाद्याला जा असे म्हणतो, आणि तो जातो. दुस-याला ये म्हणतो, आणि तो येतो. मी माझ्या नोकराला हे कर! आणि तो ते करतो." ९ जेंव्हा येशूवाहने हे ऐकले, तेंव्हा त्याला त्याच्याविषयी आश्चर्य वाटले. तो त्याच्यामागे येणा-या जमावाकडे वळून म्हणाला, "मी तुम्हांला सांगतो, असा विश्वास मला इस्त्राएलात देखील आढळला नाही." १० ज्यांना पाठविले होते, ते घराकडे परतले. तेंव्हा त्यांना आढळून आले की, तो नोकर वरा झाला आहे.

११ नंतर असे झाले की, येशूवाह नाईन नावाच्या गावाला गेला. त्याच्याबरोबर त्याचे थालमीद (शिष्य) व मोठा लोक समुदाय होता. १२ तो गावाच्या वेशीजवळ आला असता, एका मेलेल्या मुलाला अंत्यविधीकरिता नेले जात होते. तो त्याच्या आईला एकुलता एक मुलगा होता, आणि ती विधवा होती. आणि गावातील बरेच लोक तिच्याबरोबर होते. १३ जेंव्हा अदोनाईने तिला पाहिले, त्याला तिची कळवळा आला. व तो तिला म्हणाला, "रडू नकोस." १४ नंतर तो पुढे तिरडीजवळ गेला, व तिला स्पर्श केला. जे लोक तिरडी वाहून नेत होते, ते थांबले. १५ तेंव्हा येशूवाह म्हणाला, "मुला मी तुला सांगतो ऊठ!" आणि तो मुलगा उठून बसला व बोलू लागला. मग येशूवाहने त्याला त्याच्या आई कडे दिले. १६ ते सर्व भयचकित झाले, त्यांनी याव्हे एलोहिमचे गौरव केले. ते म्हणाले, "आमच्यामध्ये एक महान नवी (संदेष्टा) प्रगट झाला आहे." आणि म्हणाले, "याव्हे एलोहिम त्याच्या लोकांना मदत करण्यास आला आहे!" १७ येशूवाह विषयीची ही बातमी सर्व यहूदीयात, आणि सभोवतालच्या परीसरात पसरली.

१८ योहानानला जाऊन हे सर्व सांगितले, नंतर योहानानने आपल्या दोन थालमीद ला (शिष्यांना) बोलाविले. १९ आणि त्याने त्यांना अदोनाई कडे हे विचारण्यासाठी पाठविले की, "जो येणारा तो तूच आहेस की, आम्हीं दुस-या कोणाची तरी वाट पाहावी? २० जेंव्हा लोक त्याच्याकडे आले ते म्हणाले, "बाप्तिस्मा करणा-या योहानानने आम्हांला तुमच्याकडे हे विचारण्यास पाठविले आहे की, "जो येणारा तो तूच आहेस की, आम्हीं दुस-या कोणाची वाट पाहावी?" २१ त्यावेळी येशूवाहने अनेक लोकांचे रोग आजार बरे केले. पुष्कळांमधील अशुद्ध आत्मे काढली. आंधळयांना दृष्टी दिली. २२ येशूवाहने त्यांना उत्तर दिले, "जा आणि तुम्हीं जे ऐकले व पाहिले आहे, ते योहानानला सांगा. आंधळे पाहतात, लंगडे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले जिवंत केले जातात, आणि गरीब लोकांना सुवार्ता सांगण्यात येते. २३ आणि जो माझ्याविषयी अडखळत नाही तो आशिर्वादीत आहे." २४ योहानानचे निरोपे गेल्यावर, येशूवाह लोक समुदयाबरोबर योहानान विषयी बोलू लागला. "अरण्यात तुम्हीं काय पाहण्यासाठी गेला होता? वा-याने वाकलेला बोरू? २५ नाही, मग काय पहाण्यासाठी तुम्हीं गेला होता? मऊ वस्त्रे ल्यालेल्या माणसाला काय? पाहा भडक पोषाख घातलेले व चैनीत असणारे लोक राजवडयात असतात. २६ पण तुम्हीं बाहेर काय पाहण्यासाठी गेला होता? नवी (संदेष्टा)? होय, मी तुम्हांला सांगतो, तुम्हीं नवी (संदेष्टया) पेक्षा काही तरी अधिक पाहिले आहे! २७ हाच तो ज्याच्याविषयी शास्त्रलेखात लिहिले आहे.

"पाहा, मी माझ्या संदेश वाहकाला माझ्यापुढे पाठवीत आहे. तो तुमच्यापुढे मार्ग तयार करील." २८ मी तुम्हांला सांगतो, जे स्त्रियापासून जन्मले त्यात योहानान पेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. तरीही याव्हे एलोहिमच्या राज्यातील अगदी सामान्य माणूस सुद्धा, त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. २९ जेंव्हा लोकांनी हे ऐकले. तेंव्हा त्यांनी मान्य केले की, याव्हे एलोहिमची शिकवण चांगली आहे. जकातदार सुद्धा सहमत झाले. या लोकांना योहानानने अगोदरच बाप्तिस्मा दिला होता. ३० पण परूशी, व तोराह शिकविणारे राव्बी

नी (नियमशास्त्र शिकविणारे शिक्षकांनी) याव्हे एलोहिमची त्यांच्याविषयी असलेली योजना नाकारली.त्यांनी योहानानला त्यांचा बाप्तिस्मा करू दिला नाही. ३१ मग मी या पिढीची कोणाशी तुलना करू? ते कोणासारखे आहेत? ३२ ते उनाड मुलांसारखे आहेत, ते बाजारात बसतात ते एकमेकाला म्हणतात, 'आम्हीं तुमच्यासाठी पावा वाजविला, पण तुम्हीं नाचला नाही. आम्हीं तुमच्यासाठी शोकगीत गाईले, पण तुम्हीं रडला नाही.' ३३ बाप्तिस्मा करणारा योहानान, हा भाकर किंवा द्राक्षारस खात किंवा पीत आला नाही. पण तुम्हीं म्हणता, 'त्याला अशुद्ध आत्मा लागला आहे.' ३४ मनुष्याचा मुलगा खात पीत आला, आणि तुम्हीं म्हणता तो खादाड, मद्यापी, जकातदारांचा, आणि पाप्यांचा मित्र आहे. ३५ ज्ञान तेंव्हा योग्य ठरते, जेंव्हा त्याचा वापर केल्याने झालेल्या गोष्टी योग्य असतात.

३६ कोणा एका परूश्याने, येशूवाहला त्याच्याबरोबर जेवणाचे आमंत्रण दिले. म्हणून तो परूश्याच्या घरी गेला, व मेजासभोवती आपल्या जागेवर बसला. ३७ तेथे त्या गावात एक स्त्री होती, ती पापी होती. जेंव्हा तिला समजले की, येशूवाह परूश्याच्या घरी जेवत आहे. तेंव्हा तिने सुगंधी तेलाची एक आलाबास्त्र कुपी आणली. ३८ ती त्याच्या पाठीमागे पायाशी उभी राहून रडत होती. ती आपल्या आसवांनी त्याचे पाय भिजवू लागली. नंतर तिने ते आपल्या केसांनी पुसले. त्याच्या पायाचे मुके घेतले, व त्यावर सुगंधी तेल ओतले. ३९ ज्या परूश्याने हे आमंत्रण दिले होते, त्याने ते पाहिले. आणि तो स्वतःशी म्हणाला, "जर हा मनुष्य नबी (संदेष्टा) असता, तर ही कोण व कशा प्रकारची स्त्री आपल्या पायाला स्पर्श करीत आहे, हे त्याला कळले असत!" ४० येशूवाह त्याला म्हणाला, "शिमोना मला तुला काही सांगयचे आहे." त्याने उत्तर दिले, "सांगा राब्बी (गुरूजी)." ४१ येशूवाह म्हणाला, "एका सावकाराचे दोन कर्जदार होते.एकाकडे पाचशे चांदीची नाणी, आणि दुस-याकडे पन्नास चांदीची नाणी, असे कर्ज होते.४२ ते कर्ज फेडू शकत नसल्याने, सावकाराने दोघ्यांचीही कर्जे माफ केली. आता त्यांच्यापैकी कोण त्याच्यावर अधिक अहेद (प्रीति) करील?" ४३ शिमोनाने उत्तर दिले, "मला वाटते ज्याचे कर्ज जास्त होते तो." येशूवाह त्याला म्हणाला, "तू बरोबर ओळखलेस." ४४ तो स्त्रीकडे वळून शिमोनाला म्हणाला, "तू ही स्त्री पाहतोस काय? मी तुझ्या घरात आलो, तेंव्हा माझे पाय धुण्यास तू मला पाणी दिले नाहीस. परंतु हिने माझे पाय अश्रूंनी ओले केले, ते तिने केसांनी पुसले. ४५ तू मला साधे शुभेच्छालिंगन सुद्धा दिले नाहीस. पण मी आत आल्यापासून तिने माझ्या पायाचे मुके घेण्याचे थांबवले नाही. ४६ तू माझ्या डोक्याला तेल लावले नाही, परंतु तिने माझ्या पायावर सुगंधी तेल ओतले. ४७ यासाठी मी तुला सांगतो की, तिच्या अनेक पापांची क्षमा झाली आहे, हे स्पष्ट आहे. कारण तिने विपुल अहेद (प्रीति) दाखविली आहे. परंतु ज्याला कमी क्षमा केली आहे, तो कमी अहेद (प्रीति) करतो." ४८ तेंव्हा तो तिला म्हणाला, "तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." ४९ नंतर जे त्याच्याबरोबर जेवत होते. ते स्वतःशीच म्हणू लागले, "हा कोण आहे जो पापांची सुद्धा क्षमा करतो?" ५० पण तो स्त्रीला म्हणाला, "तुझ्या विश्वासाने तुला वाचविले आहे, शांतीने जा."

८.१ यानंतर असे झाले की, येशूवाह सर्व गावांतून, आणि खेडयामधून उपदेश करीत, व याव्हे एलोहिमच्या राज्या संबंधीची सुवार्ता सांगत जात होता.आणि बारा प्रेषित त्याच्याबरोबर होते. २ ज्यांच्यामधून अशुद्ध आत्मे काढली होती, व ज्यांना आजारातून बरे केले होते, अशा काही स्त्रियाही त्याच्याबरोबर होत्याः मरीया जिला मग्दालिया म्हणत, तिच्यातून सात अशुद्ध आत्मे बाहेर काढली होती. ३ हेरोदाच्या घराचा कारभारी खुजा, याची बायको योहान्ना, सुसान्ना, आणि इतर अनेक स्त्रिया होत्या. या स्त्रिया त्यांच्याकडे जे होते, म्हणजे त्यांच्या उत्पन्नातून येशूवाह, व त्याच्या थालमीद ला (शिष्यांना) देत असत.

४ जेंव्हा मोठा जनसमुदाय जमत असे, व प्रत्येक गावातून लोक त्याच्याकडे येत असत, तेंव्हा येशूवाह बोधकथांचा उपयोग करून बोलत असे.५ एक शेतकरी आपले बी पेरायला गेला.तो पेरत असताना, काही बी रस्त्यावर पडले व ते तुडविले गेले, व पक्ष्यांनी ते खाऊन टाकले. ६ काही बी खडकाळ जमिनीतवर पडले, आणि उगवल्यावर वाळून गेले, कारण त्यात ओलवा नव्हता. ७ काही बी काटेरी झुडूपात पडले, काटेरी झुडूप त्याच्याबरोबर वाढली, व त्याची वाढ खुंटविली. ८ काही बी चांगल्या जमिनीत पडले, ते उगवले, वाढले व जे पेरले होते, त्यापेक्षा शंभर पट पीक जास्त आले. या बोधकथा सांगत असता तो मोठयाने म्हणाला, "ज्याला ऐकाण्यांस कान आहेत, त्यांने ऐकावे." ९ त्याच्या थालमीद नी (शिष्यांनी) या बोधकथेचा अर्थ काय, असे विचारले.१० म्हणून तो

म्हणाला, "तुम्हांला याव्हे एलोहिमच्या राज्याची रहस्य जाणून घेण्याचा अधिकार दिलेला आहे. पण इतरांच्यासाठी ते बोधकथेमध्ये दिले आहे. यासाठी की, जरी ते पाहत असले, तरी त्यांना दिसू नये. आणि ऐकत असले, तरी त्यांना समजू नये.

११ बोधकथेचा अर्थ पुढील प्रमाणे आहे. बी हे याव्हे एलोहिमची संदेश वचने आहे. १२ आणि जे बी वाटेवर पडले, ते जे ऐकतात
त्याचे दर्शक आहेत. नंतर सैतान येतो आणि त्यांच्या हृदयातील बी घेऊन जातो. यासाठी की, त्यांनी विश्वास ठेवू नये, व त्यांचे
तारण होऊ नये. १३ जे बी खडकावर पडले ते असे की, ते ऐकतात आणि आनंदाने संदेश वचने ग्रहण करतात.पण त्यांना मूळ
नसते, ते काही वेळ विश्वास ठेवतात. पण परीक्षेच्या वेळी याव्हे एलोहिम पासून दूर जातात. १४ जे बी काटेरी झुडूपात पडलेले
असते ते दर्शविते की, ते ऐकतात परंतु आपल्या मार्गाने जात असता काळजी, श्रीमंती, जीवनातील सुखे, यांनी ते खुंटविले जाते. ते
पक्व फळ देत नाही. १५ चांगल्या जमिनीतील बी दर्शविते की, ते चांगल्या व प्रामाणिक आत्म्याचे आहेत. ते संदेश वचन ऐकतात,
ग्रहण करतात, व धीराने फळ देतात.

१६ कोणीही दिवा लावून तो भांडयाने झाकून ठेवीत नाही, किंवा खाटेखाली ठेवीत नाहीत. तर तो दिवठणीवर ठेवतात. यासाठी
की, जे आत येतात त्यांना प्रकाश दिसावा. १७ लक्षात ठेवा असे काहीही लपविलेले नाही, जे उघड होणार नाही. प्रत्येक रहस्य
सर्वांना सांगितले जाईल, आणि ते प्रकाशात येईल. १८ म्हणून तुम्हीं कसे ऐकता, याविषयी काळजी घ्या. कारण ज्याच्याजवळ आहे,
त्याला अधिक दिले जाईल. आणि ज्याच्याजवळ नाही त्याच्याकडे जे आहे, असे वाटते ते देखील काढून घेतले जाईल."

१९ येशूवाहची अम्मी व त्याचे भाऊ त्याच्याकडे आले. पण गर्दीमुळे त्यांना त्याच्याजवळ जात येईना. २० म्हणून त्याला असे
सांगण्यात आले की, "तुझी अम्मी व तुझे भाऊ बाहेर उभे आहेत, त्यांना तुला भेटायचे आहे." २१ पण त्याने त्यांना उत्तर दिले, "जे
याव्हे एलोहिमचे वचन ऐकतात व त्याप्रमाणे करतात. तेच माझी अम्मी व माझे भाऊ आहेत."

२२ त्या दिवसात एकदा असे झाले की, येशूवाह त्याच्या थालमीद (शिष्यां) सह नावेत बसला. आणि तो त्यांना म्हणाला, "आपण
सरोवराच्या पलीकडच्या बाजूला जाऊ या." २३ आणि ते निघाले ते जात असता येशूवाह झोपी गेला. सरोवरावर तुफान वादळी
वारे सुरू झाले, व नावेत पाणी जाऊ लागले. ते अतिधोकादायक स्थितीत सापडले. २४ म्हणून त्यांनी त्याला उठविले. ते त्याला
म्हणाले, 'राब्बी राब्बी (गुरूजी गुरूजी) आपण बुडत आहोत." मग तो उठला, त्याने वारा व लाटा यांना दटाविले. ते थांबले व
सर्वत्र शांतता पसरली. २५ येशूवाह त्यांना म्हणाला, "तुमचा विश्वास कोठे आहे?" पण ते भयचकीत आणि विस्मित झाले व
एकमेकांना म्हणाले, "हा आहे तरी कोण! कारण तो वारा आणि लाटा यांनाही आज्ञा करतो आणि ते त्याचे ऐकतात?"

२६ नतंर ते गालील सरोवरापलीकडील गरसेकरांच्या प्रदेशात गेले, २७ जेंव्हा तो किना-यावर उतरला. तेव्हा नगरातला एक मनुष्या
त्याला भेटला. त्या माणसामध्ये अनेक अशुद्ध आत्मे होती. बराच काळपर्यंत त्याने कपडे घातले नव्हते, व तो घरातही राहिला
नव्हता.तो कबरांमध्ये राहत होता. २८ जेंव्हा त्याने येशूवाहला पाहिले तेंव्हा तो मोठयाने ओरडला व त्याच्यापुढे पडला तो मोठया
आवाजात म्हणाला, 'येशूवाह सर्वोच्च याव्हे एलोहिमच्या बेन तुला माझ्यापासून काय पाहिजे? मी तुला विनंती करतो की, मला त्रास
देऊ नको." २९ तो असे म्हणाला कारण येशूवाहने अशुद्ध आत्म्याला त्याच्यातून बाहेर येण्याची आज्ञा केली होती. कारण त्याने
त्याला पुष्कळ वेळा धरले होते. त्याला त्यावेळी साखळयांनी बांधले होते. पायात बेडया होत्या, व त्याला पहा-यात ठेवले
होते.परंतु तो नेहमी साखळया तोडीत असे व अशुद्ध आत्मे त्याला एकांतात घेऊन जात असत.

३० येशूवाहने त्याला विचारले, "तुझे नाव काय आहे?" तो म्हणाला सैन्य कारण त्याच्यात अनेक अशुद्ध आत्मे शिरली होती.३१
अशुद्ध आत्म्यांनी येशूवाहला विनवणी केली की आम्हांला अथांग डोहात जाण्याची आज्ञा करू नको.३२ डोंगराच्या कडेला डुकरांचा
एक मोठा कळप चरत होता. अशुद्ध आत्म्यांनी त्याला विनंती केली. आम्हांला त्या डुकरांच्या मध्ये जाऊ दे. आणि येशूवाहने
त्यांना तसे करण्यासाठी परवानगी दिली. ३३ मग अशुद्ध आत्मे त्या मनुष्यातून बाहेर आली, आणि डुकरात शिरली. नंतर डुकरांचा

कळप सरोवराकडे जोरात पळाला, आणि संपूर्ण कळप सरोवरात बुडून मेला. ३४ जेंव्हा डुकरांचा कळप राखणा-यांनी हे पाहिले, तेंव्हा ते दूर पळाले, व त्यांनी नगरात व त्या प्रदेशात हे वर्तमान सांगितले. ३५ काय झाले हे पाहण्यासाठी लोक बाहेर आले. ते येशूवाह कडे आले, आणि त्यांनी ज्या माणसाच्या अंगातून अशुद्ध आत्मे निघाली होती, त्याला येशूवाह च्या पायाजवळ बसलेला त्यांनी पाहिले. त्याने नीट कपडे घातले होते व तो पूर्ण शुद्धीवर होता. या घटनेचे त्यांना भय वाटले.३६ ज्यांनी हे पाहिले त्यांनी तो अशुद्ध आत्मा लागलेला मनुष्य कसा बरा झाला हे त्यांना सांगितले. ३७ तेंव्हा गरसेकर प्रदेशातील सर्व लोकांनी येशूवाहला त्यांना सोडून जाण्यास सांगितले. कारण ते सर्व फार घाबरले होते. मग येशूवाह नावेत बसून परत गेला. ३८ ज्याच्या अंगातून अशुद्ध आत्मे निघाली होती तो त्याच्याबरोबर जाण्यासाठी विनवणी करू लागला. पण येशूवाहने त्याला परत जाण्यास सांगितले. आणि म्हणाला, ३९ "घरी जा, आणि याव्हे एलोहिमने तुझ्यासाठी जे केले आहे ते सांग." तेंव्हा तो मनुष्य गेला आणि येशूवाहने त्याच्यासाठी जे काही केले ते नगरातील सर्व लोकांना त्याने सांगितले.

४० नंतर जेंव्हा येशूवाह परत आला, तेंव्हा लोकांनी त्याचे स्वागत केले. कारण ते सर्व त्याची वाट पाहत होते. ४१ त्यावेळी याईर नावाचा एक मनुष्य आला. तेथील सभासस्थानात तो अधिकारी होता. त्याने येशूवाहच्या पाया पडून त्याला आपल्या घरी येण्याची विनंती केली. ४२ कारण त्याला बारा वर्षाची एक मुलगी होती, आणि ती मरावयास टेकली होती. येशूवाह जात असता लोकांची गर्दी झाली होती, व ते चेंगरला जात होता. ४३ आणि एक स्त्री तेथे होती, तिला बारा वर्षे रक्तस्त्राव होत होता. तिच्याकडे जे काही पैसे होते, ते सर्व तिने वैद्यांसाठी खर्च केले, पण कोणीही तिला बरे करू शकले नाही. ४४ ती त्याच्या मागेमाग आली, व तिने त्याच्या वस्त्राच्या टोकाला स्पर्श केला. आणि तावडतोब तिचा रक्तस्त्राव थांबला. ४५ मग येशूवाह म्हणाला, "मला कोणी स्पर्श केला?" ते सर्व जण नाकारीत असताना केफा म्हणाला, "सर्व जण आपल्या भोवती गर्दी करीत आहेत. आणि तुम्हांला चेंगरीत आहेत." ४६ परंतु येशूवाह म्हणाला, "कोणी तरी मला स्पर्श केला आहे. कारण मला माहीत आहे की, माझ्यातून शक्ती निघाली आहे." ४७ आपण येशूवाहच्या नजरेतून सुटू शकणार नाही, हे जेंव्हा त्या स्त्रीने पाहिले. तेंव्हा ती थरथर कापत आली, आणि त्याच्या पाया पडली. तेथे तिने सर्व लोकांसमोर आपण त्याला का स्पर्श केला, व आपण कसे बरे झाली ते सांगितले.४८ तेंव्हा तो तिला म्हणाला, "मुली तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे, शांतीने ना."

४९ तो हे बोलत आसतानाच कोणी तरी सभास्थानाच्या अधिका-याच्या घरून आले. आणि म्हंटले, "तुमची मुलगी मरण पावली आहे. आता राब्बींना त्रास देऊ नका." ५० येशूवाहने हे ऐकले, व तो सभास्थानाच्या अधिका-याला म्हणाला, "भिऊ नको फक्त विश्वास ठेव आणि ती मरणातून वाचविली जाईल. ५१ जेंव्हा येशूवाह त्या घरी आला. त्याने आपणाबरोबर केफा, योहानान, याकोब, आणि मुलीचे अम्मी व अब्वा यांच्याशिवाय कोणालाही आत येऊ दिले नाही. ५२ सर्व लोक तिच्यासाठी रडत होते. येशूवाह म्हणाला, "रडणे थांबवा, ती मेलेली नाही, ती झोपेत आहे." ५३ पण ते त्याला हसले, कारण त्यांना माहीत होते की, ती मेली आहे. ५४ परंतु त्याने तिचा हात धरला आणि मोठयाने म्हणाला, " मुली ऊठ!" ५५ मग तेंव्हा तिचा रूहुव्वा (आत्मा) पुन्हा आला, आणि ती लगेच उभी राहिली. नंतर त्याने तिला खाण्यास देण्याची आज्ञा केली. ५६ तेंव्हा तिचे अम्मी अब्वा आश्चर्याने थक्क झाले. परंतु जे घडले त्याबद्दल कोणालाही सांगू नका, अशी त्याने त्यांना आज्ञा केली.

९.१ येशूवाहने बारा थालमीद ना (शिष्यांना) एकत्र बोलविले.आणि त्याने त्यांना सर्व अशुद्ध आत्म्यांना काढण्याचे, व रोग बरे करण्याकरिता सामर्थ्य, व अधिकार दिला.२ नंतर त्याने त्यांना याव्हे एलोहिमच्या राज्याच्या सुवार्तेची घोषणा करण्यास, व रोग्यांना बरे करण्यास पाठविले. ३ तो त्यांना म्हणाला, "तुमच्या प्रवासासाठी बरोबर काठी, पिशवी, भाकर, चांदीची नाणे, दोन अंगरखे, असे काहीही घेऊ नका. ४ आणि ज्या घरात तुम्हीं जाल, त्या घरातच तुम्हीं राहा. व दुस-या गावाला जाताना, ते घर सोडा. ५ जेथे लोक तुमचे स्वागत करणार नाहीत, तेथे गाव सोडताना त्यांच्याविरूद्ध साक्ष म्हणून, आपल्या पायावरील धूळ झटकून टाका!" ६ ते निघाल्यानंतर सर्व गावातून सुवार्ता सांगत, व लोकांचे रोग बरे करीत गेले.

७ जेंव्हा हेरोद राजाने जे सर्व काही घडत होते, त्याविषयी ऐकले. तेंव्हा तो घोटाळयात पडला. कारण काही जणांनी असे म्हंटले
की, “योहानान मेलेल्यातून उठविला गेला आहे.” ८ इतर काही जण असे म्हणत होते की “एलीया पुन्हा आला आहे.” इतर काही
जणांनी असे सांगितले की “फार पूर्वीच्या नबी पैकी एक जण मेलेल्यातून पुन्हा जिवंत झाला आहे.” ९ परंतु हेरोद म्हणाला, “मी
योहानानचा शिरच्छेद केला आहे. मग ज्याच्याविषयी अशा गोष्टी ऐकत आहे, तो कोण आहे?” म्हणून हेरोदाने येशूवाहला
पाहण्याचा प्रयत्न केला.

१० थालमीद (शिष्य) परत आले, तेंव्हा त्यांनी येशूवाहला आपण केलेल्या सर्व गोष्टी सांगितल्या. नंतर येशूवाह त्यांना घेऊन वेथसैदा
नावाच्या नगरास गुप्तपणे गेला. ११ पण लोकसमुदायाला हे कळाले, व ते त्याच्यामागे गेले. त्याने त्यांचे स्वागत केले, आणि त्यांना
आकाशाच्या राज्याविषयी सांगितले. ज्यांना बरे होण्याची आवश्यकता होती, त्यांना त्याने बरे केले. १२ दिवस मावळत असता प्रेषित
त्याच्याकडे आले आणि म्हणाले, “लोकांना जाऊ द्या. म्हणजे ते आजूबाजूच्या शेतात, आणि खेडयात जातील व त्यांना खावयाला व
राहण्यास मिळण्याची शक्यता आहे का, ते पाहतील. कारण आपण दूर ठिकाणी आहोत.” १३ पण तो त्यांना म्हणाला, “तुम्हीं त्यांना
काही खावयास द्या.” ते म्हणाले, “आम्हीं जाऊन या सर्व लोकांसाठी अन्न विकत घ्यावे, असे तुम्हांला वाटते काय? आमच्याजवळ
फक्त पाच भाकरी, आणि दोन मासे याशिवाय काही नाही.” १४ तेथे ते सुमारे पाच हजार पुरूष होते. परंतु तो आपल्या थालमीद
ला (शिष्यांस) म्हणाला, “त्यांना सुमारे पन्नासाच्या गटाने बसवा.” १५ त्यांनी तसे केले व सर्वांना खाली बसविले. १६ नंतर त्याने पाच
भाकरी व दोन मासे घेतले मग आकाशाकडे वळून, त्याने भाकरी व मासे याबद्दल याव्हे एलोहिमचे उपकार मानले. त्याचे तुकडे केले,
नंतर लोकांना वाढण्यासाठी थालमीद ला दिले. १७ लोक जेवले व सर्व तृप्त झाले, आणि जेवून झाल्यानंतर उरलेले गोळा करण्यात
आले. तेंव्हा त्या तुकडयांच्या बारा टोपल्या भरल्या.

१८ मग असे झाले की एकदा येशूवाह एकटाच प्रार्थना करीत असताना त्याचे थालमीद त्याच्याबरोबर होते. त्याने त्यांना विचारले,
“मी कोण आहे, याबद्दल लोक काय म्हणतात?” १९ ते म्हणाले, “बाप्तिस्मा करणारा योहानान, इतर काही एलीया, आणि काही जण
म्हणतात की फार पूर्वी होऊन गेलेल्या नबी (संदेष्टयां) पैकी कोणी तरी उठला आहे.” २० तो त्यांना म्हणाला, “तुम्हीं मला कोण
म्हणून म्हणतात?” केफाने उत्तर दिले “याव्हे एलोहिमचा मशीहा.” २१ तेंव्हा ताकीद देऊन त्याने त्यांना सूचना दिली की, हे
कोणालाही सांगू नका. २२ येशूवाह म्हणाला, “मनुष्याच्या मुलाला पुष्कळ दुःख सोसणे आवश्यक आहे. आणि वडिलांनी, एलयोवन
कोहेन (मुख्य याजकांनी), तोराह चे राब्बी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांनी नाकारावे, व त्यांच्याकडून मारले जावे, व पुन्हा तिस-या
दिवशी उठावे, हे आवश्यक आहे.” २३ नंतर तो त्या सर्वांना म्हणाला, “जर कोणा व्यक्तीला माझ्या मागे यायचे असेल, तर त्याने
स्वतःला नाकारले पाहिजे. व दररोज स्वतःचा वधस्तंभ उचलून माझ्या मागे आले पाहिजे. २४ जो कोणी स्वतःचा जीव वाचवू
पाहतो, तो त्याला मुकेल. पण जो कोणी माझ्यासाठी जिवाला मुकेल, तो त्याला वाचवील. २५ कोणी सर्व जग मिळविले परंतु
स्वतःचा नाश करून घेतला, किंवा स्वतःला गमविले तर त्याला काय लाभ? २६ जो कोणी माझी व माझ्या वचनांची लाज धरतो, तर
मनुष्याचा मुलगा जेंव्हा त्याच्या वैभवाने याव्हे अव्वाच्या आणि क्वादोश मालाक (पवित्र दूतांच्या) गौरवाने येईल, तेंव्हा तो ही त्याची
लाज धरील. २७ परंतु मी तुम्हांला खरे सांगतो, येथे उभे राहिलेल्यांमध्ये असे काही आहेत की, आकाशाचे राज्य पाहिल्याशिवाय
त्यांना मरणाचा अनुभव येणारच नाही.”

२८ मग असे झाले की, तो असे बोलल्यावर साधारण पणे आठ दिवसांनंतर आपल्याबरोबर केफा, योहानान, व याकोब यांना घेऊन
डोंगरावर प्रार्थना करण्यास गेला. २९ मग असे घडले की, तो प्रार्थना करीत असताना त्याच्या चेह-याचे रूप पालटले, व त्याचे कपडे
डोळे दिपविण्याएवढे पांढरे शुभ्र झाले. ३० आणि तेथे दोघे जण त्याच्याबरोबर बोलत होते. ते एलीया व मोशे होते. ते गौरवामध्ये
प्रगट झाले होते. ३१ आणि ते येशूवाह च्या मरणाविषयी जे तो यरूशलेमामध्ये पूर्ण करणार होता त्याविषयी बोलत होते. ३२ पण
केफा व त्याच्याबरोबर असलेले सर्व झोपी गेले होते. जेंव्हा ते जागे झाले, त्यांनी येशूवाहचे गौरव पाहिले. आणि दोन मनुष्यांना
त्याच्याबरोबर उभे असलेले पाहिले. ३३ मग असे झाले की, ते दोघे जण येशूवाह पासून विभक्त होत असताना केफा येशूवाहला

म्हणाला, “राब्बी आम्ही येथे आहोत, ते चांगले झाले.आपण तीन मंडप तयार करू, या एक तुमच्यासाठी, एक मोशेसाठी, व एक
एलीयासाठी.” (तो काय बोलत होता हे त्याचे त्याला कळत नव्हते) ३४ पण तो या गोष्टी सांगत असता एक मेघ खाली आला,
आणि त्याने छायेने त्यांना झाकून टाकले. त्यांनी मेघामध्ये प्रवेश केल्यानंतर ते घाबरले. ३५ आणि त्यांना वेढलेल्या ढगातून एक
वाणी ऐकू आली. ती म्हणाली, “हा माझा बेन (मुलगा) आहे, तो माझा निवडलेला आहे, त्याचे ऐका.” ३६ जेंव्हा वाणी झाली तेंव्हा
येशूवाह एकटाच तेथे होता. आणि याविषयी ते गप्प राहिले. त्यांनी त्यावेळी जे काही पाहिले होते, त्याविषयी कोणालाही काही
सांगितले नाही.

३७ नंतर दुस-या दिवशी असे झाले की, जेंव्हा ते डोंगरावरून खाली आले. तेंव्हा मोठा जमाव येशूवाहला भेटण्यासाठी आला. ३८
आणि त्याचवेळी जमावातील एक मनुष्य मोठयाने ओरडून म्हणाला, “राब्बी (गुरूजी) मी तुम्हांला विनंती करतो, माझ्या मुलाकडे पाहा
कारण तो माझा एकुलता एक मुलगा आहे. ३९ एकाएकी त्याला अशुद्ध आत्मा धरतो, व तो अचानक किंचाळतो, आणि तो त्याला
झटके देईपर्यंत पिळतो. त्यामुळे त्याच्या तोंडाला फेस येतो. तो त्याला सोडीत नाही, व त्याला फार ठेचतो, आणि त्याला मोठया
प्रयासाने सोडून जातो. ४० मी तुमच्या थालमीद ला (शिष्यांना) तो अशुद्ध आत्मा काढण्याची विनंती केली, पण त्यांना ते शक्य झाले
नाही.” ४१ येशूवाह म्हणाला, “अहो अविश्वासू व विपरीत पिढी, मी तुमच्याबरोबर किती काळ राहू, व किती काळ तुमचे सोसू? त्या
मुलाला इकडे आणा.” ४२ परंतु तो येत असताना अशुद्ध आत्म्याने त्याला पाडले, आणि पिळावटले. येशूवाहने अशुद्ध आत्म्याला
धमकावले. त्याने मुलाला बरे केले, आणि त्याला त्याच्या वडिलांजवळ परत दिले. ४३ याव्हे एलोहिमचा महिमा पाहून ते सर्व फार
आश्चर्यचकित झाले. पण सर्व लोक येशूवाहने जे केले त्याविषयी आश्चर्य व्यक्त करीत असताना, तो त्याच्या थालमीद ला
(शिष्यांना) म्हणाला,

४४ “मी तुमच्याजवळ ज्या गोष्टी सांगतो, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. मनुष्याच्या मुलाला लोकांच्या हाती देण्यात येईल.” ४५
पण थालमीद ला (शिष्यांना) त्याचे बोलणे समजले नाही. तो त्यांच्यापासून लपवून ठेवण्यात आले होते. यासाठी की, ते त्यांना
समजू नये. आणि या बोलण्याविषयी त्याला विचारण्याची त्यांना भिती वाटत होती.४६ आपणामध्ये सर्वात मोठा असा थालमीद
(शिष्यां ) मध्ये वाद सुरू झाला. ४७ पण येशूवाह ला त्यांच्या मनातले विचार समजले. तेंव्हा त्याने एका लहान बालकाला घेतले, व
त्याच्याजवळ त्याला उभे केले. ४८ येशूवाह त्यांना म्हणाला, “जो कोणी ह्या लहान बालकाला माझ्या नावाने स्विकारतो, तो मला
स्विकारतो. आणि जो मला स्विकारतो, तो ज्याने मला पाठविले त्याला स्विकारतो. कारण जो कोणी तुम्हांमध्ये सर्वात लहान बनेल,
तो सर्वात मोठा आहे.”

४९ परंतु योहानानने उत्तर दिले “राब्बी आम्हीं कोणाला तरी तुमच्या नावाने अशुद्ध आत्मे काढताना पाहिले, व आम्हीं त्याला मना
केले. कारण आम्हीं जे तुम्हांला अनुसरतो त्यापैकी तो नाही.” ५० परंतु येशूवाह योहानानला म्हणाला, “त्याला मना करू नका.
कारण जो तुमच्याविरूद्ध नाही तो तुम्हांला अनुकूल आहे.” ५१ आता असे घडले की, जेंव्हा त्याला आकाशात घेण्याची वेळ आली.
त्याने यरूशलेमाला जाण्याचे ठरविले. ५२ त्याने आपणांपुढे निरोपे पाठविले. ते गेले, आणि येशूवाहच्या येण्याविषयीच्या तयारीसाठी
एका शोमरोनी खेडयात गेले. ५३ पण शोमरोन्यांनी येशूवाहचा स्विकार केला नाही. कारण तो यरूशलेमाकडे निघाला होता. ५४
जेंव्हा याकोव व योहानान या थालमीद ने पाहिले तेंव्हा ते म्हणाले “अदोनाई आकाशातून अग्नीने येऊन त्यांचा नाश करावा. यासाठी
आम्हीं आज्ञा करावी, असे तुला वाटते काय?” ५५ तेंव्हा त्याने वळून त्यांना धमकावले, ५६ आणि ते दुस-या खेडयात निघून गेले.

५७ ते रस्त्याने चालत जात असता कोणी तरी त्याला म्हणाले, “तू जेथे कोठे जाशील तेथे मी तुझ्यामागे येईन.” ५८ तेंव्हा येशूवाह
त्याला म्हणाला, ‘कोल्ह्यांना बिळे आहेत. आणि आकाशातील पक्ष्यांना घरटी आहेत. पण मनुष्याच्या मुलाला डोके सुद्धा टेकावयास
जागा नाही.” ५९ तो दुस-या एकाला म्हणाला, “माझ्यामागे ये.” पण तो मनुष्य म्हणाला, “पहिल्यांदा मला जाऊ दे, आणि माझ्या
वडिलांना पुरू दे.” ६० पण येशूवाह त्याला म्हणाला, “मेलेल्यांना त्यांच्या मेलेल्यांना पुरू दे, तू जा, आणि याव्हे एलोहिमच्या राज्याची

घोषणा कर." ६१ दुसरा म्हणाला, "मी तुला अनुसरेन अदोनाई पण अगोदर मला माझ्या घरातील लोकांचा निरोप घेऊ दे." ६२ पण येशूवाह त्यास म्हणाला, "जो कोणी नांगराला हात घालतो, व मागे पाहतो, तो याव्हे एलोहिमच्या राज्यासाठी योग्य नाही."

**१०.**१ या घटना नंतर अदोनाईने इतर बहात्तर जणांची नेमणूक केली. आणि येशूवाहने त्यांना जोडीजोडीने पाठविले. त्याला ज्या ठिकाणी जायचे होते, त्या प्रत्येक गावात व ठिकाणी त्याने त्यांना पाठविले. २ तो त्यांना म्हणाला, "पीक फार आहे, पण कामकरी थोडे आहेत. यास्तव पिकाच्या धन्याने त्याच्या पिकासाठी कामकरी पाठवावेत, यासाठी प्रार्थना करा. ३ जा! आणि लक्षात ठेवा, लांडग्यात जशी कोकरे, तसे मी तुम्हांस या जगात पाठवीत आहे. ४ झोळी, किंवा वहाणा बरोबर घेऊ नका. व रस्त्याने जाताना कोणाला शालोम (सलाम) करू नका. ५ कोणत्याही घरात तुम्हीं प्रवेश कराल तेंव्हा पहिल्यांदा असे म्हणा, 'या घरास शालोम (शांती) असो! ६ जर तेथे शांती प्रिय मनुष्य असेल, तर तुमची शांती त्याच्यावर राहील. परंतु तो मनुष्य शांती प्रिय नसेल, तर तुमची शांती तुमच्याकडे परत येईल. ७ त्या घरात तुम्हांला जे देतील ते खातपीत राहा. कारण कामकरी हा त्याच्या मजुरीस पात्र आहे. या घरातून त्या घरात असे घर बदलू नका. ८ कोणत्याही नगरात तुम्हीं प्रवेश कराल तेंव्हा आणि जेंव्हा तुमचे स्वागत करतील, तेंव्हा तुमच्यासमोर जे वाढलेले असेल, ते खा. ९ तेथील रोग्यांना बरे करा, आणि नंतर त्यांना सांगा की, याव्हे एलोहिमचे राज्य लवकरच तुमच्याकडे येत आहे!' १० परंतु तुम्हीं एखाद्या गावात प्रवेश कराल, आणि त्यांनी जर तुमचे स्वागत केले नाही.तर रस्त्यात जा आणि म्हणा, ११ आमच्या पायाला लागलेली तुमची गावाची धूळ देखील आम्हीं तुम्हांविरूद्ध झटकून टाकीत आहोत.तरी ही हे लक्षात असू द्या की, याव्हे एलोहिमचे राज्य लवकरच तुमच्याकडे येत आहे!" १२ मी तुम्हांला सांगतो, त्या दिवशी त्या गावापेक्षा सदोमातील लोकांना सोपे जाईल."

१३ खोरजिना (बेथसैदा) तुझ्यासाठी हे वाईट होईल बेथसौदा तुझ्यासाठी हे वाईट होईल, कारण जे चमत्कार तुम्हांमध्ये घडले ते जर सोर व सिदोनामध्ये घडले असते, तर त्यांनी फार पूर्वीच गोणपाट नेसून, राखेत बसून पश्चात्ताप केला असता. १४ तरी सुद्धा सोर व सिदोन यांना न्यायाच्या वेळी तुमच्यापेक्षा सोपे जाईल. १५ आणि कफर्णहूम तुला आकाशापर्यंत चढवले जाईल काय? तू तर शेओल (अधोलोका) तच जाशील. १६ जो थालमीद चे (शिष्यांचे) ऐकतो, तो माझे ऐकतो. आणि जो थालमीद ला नाकारतो, तो मला नाकारतो. आणि जो मला नाकारतो, तो ज्याने मला पाठविले त्याला नाकारतो." १७ ते बहात्तर जण आनंदाने परतले आणि म्हणाले, "अदोनाई तुझ्या नावाने अशुद्ध आत्मे सुद्धा आम्हांला वश होतात!" १८ तेंव्हा तो त्यांना म्हणाला, "मी सैतानाला आकाशातून विजेसारखे पडताना पाहिले! १९ ऐका मी तुम्हांला साप आणि विंचू यांना तुडविण्याचा अधिकार दिला आहे. व मी तुम्हांला शत्रूच्या सर्व सामर्थ्यावर अधिकार दिलेला आहे. आणि कशानेच तुम्हांला अपाय होणार नाही. २० तथापि तुम्हांला अशुद्ध आत्मे वश होतात, याचा आनंद मानू नका. तर तुमची नावे आकाशात लिहिली आहेत, याचा आनंद माना."

२१ त्या क्षणी तो क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्यात) उल्हासित झाला. आणि म्हणाला, "हे याव्हे अव्वा शाम्माईम (आकाशाच्या) आणि ऐरेत्स (पृथ्वीच्या) अदोनाई मी तुझी स्तुति करतो. कारण तू या गोष्टी ज्ञानी आणि बुद्धिमान लोकांपासून लपवून ठेवून त्या लहान बाळकांस प्रगट केल्या आहेस. होय, याव्हे अव्वा कारण तुला जे बरे वाटते, ते तू केलेस. २२ माझ्या याव्हे अव्वाने सर्व गोष्टी माझ्यासाठी दिल्या होत्या. आणि बेन (मुलगा) कोण आहे, हे याव्हे शिवाय कोणालाच ठाऊक नाही. आणि बेन शिवाय कोणालाही याव्हे अव्वा कोण आहे हे माहीत नाही. व ज्या कोणाला ते प्रगट करण्याची बेन ची (मुलाची) इच्छा असेल, त्यालाच फक्त माहीत आहे." २३ आणि थालमीद (शिष्यां) कडे वळून तो एकांतात बोलला. तुम्हीं जे पाहता, ते पाहणारे डोळे आशिर्वादीत आहे. २४ मी तुम्हांस सांगतो अनेक मेलेक (राजांनी) व नवीईम नी (संदेष्टयांनी) तुम्हीं जे पाहता, ते पाहण्याची इच्छा बाळगली. परंतु त्यांनी ते पाहिले नाही आणि तुम्हीं जे ऐकता, ते ऐकण्याची इच्छा बाळगली, परंतु त्यांनी ते ऐकले नाही."

२५ नंतर एक तोराह चे राब्बी (नियमशास्त्राचे शिक्षक) उभा राहिला आणि त्याने येशूवाहची परीक्षा पाहण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "राब्बी अनंतकाळचे जीवन मिळण्यासाठी मी काय करावे?" २६ तेंव्हा येशूवाह त्याला म्हणाला, "तोराह त (नियमशास्त्रात)

काय लिहिले आहे, तू त्यात काय वाचतोस?” २७ तो म्हणाला, “तू तुझा एलोहिम अदोनाई याच्यावर पूर्ण शरीराने, पूर्ण आत्म्यांने, पूर्ण शक्तीने, अहेद (प्रीति) कर.” व स्वतःवर जशी अहेद (प्रीति) करतोस तशी तू आपल्या शेजा-यावरही अहेद (प्रीति) कर.”
२८ तेंव्हा येशूवाह त्याला म्हणाला, “तू बरोबर उत्तर दिलेस. हेच कर, म्हणजे तू चिरकाल राहशील.” २९ पण आपण योग्य प्रश्न विचारला आहे, हे इतरांना दाखवून देण्यासाठी त्याने येशूवाहला विचारले, मग माझा शेजारी कोण?” ३० येशूवाहने उत्तर दिले, “एक मनुष्य यरूसलेमाहून यरीहोस निघाला होता, आणि तो लुटारूंच्या हाती सापडला. त्यांनी त्याचे कपडे काढून घेतले. त्यांनी त्याला मारले, आणि त्याला अर्धमेला टाकून ते निघून गेले. ३१ तेंव्हा त्याचवेळी एक कोहेन (याजक) त्या रस्त्याने जात होता.कोहेन (याजका) ने त्याला पाहिले, पण तो रस्त्याच्या दुस-या बाजूने निघून गेला.३२ त्याच मार्गाने एक लेवी त्या ठिकाणी आला लेव्याने त्याला पाहिले व तो सुद्धा रस्त्याच्या दुस-या बाजूने निघून गेला.

३३ नंतर एक शोमरोनी त्याच रस्त्याने प्रवास करीत तेथे आला. जेंव्हा त्याने त्या मनुष्याला पाहिले, तेंव्हा त्याला त्याच्याविषयी कळवळा आला. ३४ तो त्याच्याजवळ आला त्याच्या जखमांवर तेल व द्राक्षारस ओतून, त्या बांधल्या. नंतर त्या शोमरोन्याने त्याला आपल्या गाढवावर बसविले व त्याला उतारशाळेत आणले, व त्याची देखभाल केली. ३५ दुस-या दिवशी त्याने दोन दिनार काढले, आणि उतारशाळेच्या मालकाला दिले. व म्हणाला, “याची चांगली देखभाल कर, म्हणजे यापेक्षा जे तू अधिक खर्च करशील, ते मी परत आल्यावर तुला देईन.” ३६ लुटारूच्या तावडीत जो मनुष्य सापडला होता, त्याचा त्या तिघांपैकी कोण खरा शेजारी होता, असे तुला वाटते?” ३७ तो तोराह चा राव्वी म्हणाला, “ज्याने त्या गरजू जखमी प्रवाशावर दया मनापासून केली, तो.” तेंव्हा येशूवाह त्याला म्हणाला, “जा आणि तू ही तसेच कर.”

३८ मग येशूवाह आणि त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्या मार्गाने जात असता तो एका खेडयात आला. तेथे मार्था नावाच्या स्त्रीने त्याचे स्वागत करून पाहुंचार केला. ३९ तिला मरीया नावाची एक बहीन होती. ती अदोनाईच्या पायाजवळ बसली, व तो काय बोलतो हे ऐकत राहिली. ४० पण मार्थेची अति कामामुळे तारांबळ झाली, ती येशूवाह कडे आली आणि म्हणाली, “अदोनाई माझ्या बहिणीने सर्व काम माझ्यावर टाकले, याची तुला काळजी नाही काय? तेंव्हा मला मदत करावला तिला सांग.” ४१ अदोनाईने उत्तर दिले, “मार्था, मार्था, तू पुष्कळ गोष्टीविषयी दगदग करतेस. ४२ पण एक गोष्ट आवश्यक आहे. हे मी सांगतो, कारण मरीयेने तिच्यासाठी चांगला कार्यभाग निवडला आहे. ते तिच्यापासून काढून घेतला जाणार नाही.”

**११**.१ मग असे झाले की, तो एका ठिकाणी प्रार्थना करीत होता. प्रार्थना संपल्यावर थालमीद (शिष्यां ) पैकी एक जण त्याला म्हणाला, “अदोनाई योहानानने जशी त्याच्या थालमीद ला (शिष्यांना) प्रार्थना शिकवली.” त्याच प्रमाणे, आम्हीं प्रार्थना कशी करावी ते आम्हांस शिकवा.” २ मग तो त्यांना म्हणाला, “जेंव्हा तुम्हीं प्रार्थना करता तेंव्हा असे म्हणा. याव्हे अब्बा तुझे नाव पवित्र राखले जावो, तुझे राज्य येवो. ३ आम्हांला रोज लागणारी भाकर रोज आम्हांला दे. ४ आणि आमच्या पापांची आम्हांला क्षमा कर. कारण आम्हीं सुद्धा जे आमचे वाईट करतात, त्यांची क्षमा करतो. आणि आम्हांला परीक्षेत आणू नकोस, तर आम्हांस वाइटापासून सोडीव.” ५ मग येशूवाह त्यास म्हणाला, “समजा तुमच्यांपैकी कोणाला तरी एक मित्र होता. आणि तो त्याच्याकडे मध्यरात्री गेला. व त्याला म्हणाला, ‘मित्रा मला तीन भाकर उसन्या दे. ६ कारण माझा मित्र नुकताच प्रवास करून माझ्याकडे आला आहे.आणि त्याला वाढायला माझ्याजवळ काही ही नाही.’ ७ आणि समजा तो मनुष्य आतून म्हणाला, ‘मला त्रास देऊ नको! अगोदरच दार लावलेले आहे, आणि माझी मुले माझ्या जवळ झोपलेली आहेत. मी तुला देण्यासाठी उठू शकत नाही.’ ८ मी तुम्हांला सांगतो, जरी तो उठून त्याला काही देण्याची टाळटाळ करील, तरी त्याच्या मित्राच्या आग्रही वृत्तीमुळे तो खात्रीने उठून त्याला पाहिजे ते देईल. ९ आणि म्हणून मी तुम्हांला सांगतो, मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल, शोधा म्हणजे तुम्हांला सापडेल, आणि ठोठवा म्हणजे तुम्हांसाठी उघडले जाईल. १० कारण जो कोणी मागतो, त्याला मिळेल. जो शोधतो, त्याला सापडेल आणि जो कोणी ठोठावतो, त्याच्यासाठी दार उघडले जाईल. ११ तुम्हांमध्ये असा कोण बाप आहे की, त्याच्या मुलाने त्याला मासा मागितला असता त्यास माशाऐवजी साप

देईल? १२ किंवा जर मुलाने अंडे मागितले तर कोणता बाप त्याला विंचू देईल? १३ जर तुम्हीं इतके वाईट असताना, तुम्हांला तुमच्या
मुलांना चांगल्या देणग्या देण्याचे समजते, तर जे त्याच्याकडे मागतात, त्यांना आकाशातील याव्हे अव्वा किती तरी अधिक क्वादोश
रूहव्वा (पवित्र आत्मा) देईल?"

१४ येशूवाह एक अशुद्ध आत्मा काढीत होता. ते मुके होते मग असे झाले की, जो मनुष्य बोलू शकत नव्हता. तो अशुद्ध आत्मा
बाहेर आल्यावर बोलू लागला, व लोकांचा जमाव चकित झाला. १५ परंतु त्यांच्यातील काही लोक म्हणाले की, "अशुद्ध आत्म्यांचा
प्रमूख जो बालजबूल याच्या साहाय्याने तो अशुद्ध आत्मे काढतो." १६ काहींनी त्याची परीक्षा पाहण्यासाठी आकाशातून चिन्ह
मागितले. १७ पण त्यांच्या मनात काय होते, हे त्यास माहीत होते. आणि तो त्यांना म्हणाला, "आपसात फूट पडलेले प्रत्येक राज्य
ओसाड पडते. आणि एखाद्या घरात एकमेकांविरूद्ध भांडतात, तेंव्हा त्या घराचे तुकडे होतात. १८ आणि तुम्हीं म्हणता तशी जर
अशुद्ध आत्म्यांमध्ये ही फूट पडली, तर त्याचे राज्य कसे टिकेल? मी तुम्हांला हे विचारतो. कारण तुम्हीं म्हणता, मी बालजबूलच्या
साहाय्याने अशुद्ध आत्मे काढतो. १९ पण जर मी बालजबूलच्या साहाय्याने अशुद्ध आत्मे काढतो, तर तुमचे अनुयायी कोणाच्या
साहाय्याने अशुद्ध आत्मे काढतात? म्हणून तेच तुमचा न्याय करतील. २० परंतु जर मी याव्हे एलोहिमच्या साहाय्याने अशुद्ध आत्मे
काढतो, तर मग हे स्पष्ट आहे की, याव्हे एलोहिमचे राज्य तुमच्याकडे आले आहे.

२१ जेंव्हा एखादा बलवान मनुष्य आपल्या सुरक्षिततेसाठी पूर्ण शस्त्रसामग्री बाळगतो, आणि स्वतःचे रक्षण करतो. तेंव्हा त्याची
मालमत्ता सुरक्षित राहते. २२ परंतु कोणी त्याच्याही पेक्षा अधिक बलवान त्याच्यावर हल्ला करून त्याचा पराभव करतो. तेंव्हा ज्या
शस्त्रसामग्रीवर त्याने भरवसा ठेवला होता, ती तो घेऊन जातो, व त्याला मिळालेली लूट आपल्या मित्रांना वाटतो. २३ जो माझ्या
पक्षाचा नाही, तो माझ्याविरूद्ध आहे. आणि जो माझ्याबरोबरीने गोळा करीत नाही, तर तो उधळून टाकतो. २४ जेंव्हा अशूद्ध
आत्मा माणसाबाहेर येतो, व ते विसावा घेण्यासाठी निर्जल प्रदेशात जागा शोधतो, पण त्याला ती विश्रांती मिळत नाही. तेंव्हा तो
म्हणतो, 'मी ज्या घरातून बाहेर आलो, त्या घरात परत जाईन.' २५ तो जातो आणि त्याला ते घर झाडून, नीटनेटके केलेले
आढळते. २६ नंतर तो जातो आणि आपणापेक्षा अधिक बळकट व दुष्ट असे सात आत्मे मिळवितो. आणि ते आत जातात आणि
तेथेच राहतात. तेंव्हा त्या मनुष्याची शेवटची अवस्था पहिल्या पेक्षा वाईट होते."

२७ असे घडले की, तो या गोष्टी बोलला तेंव्हा गर्दीतील एक स्त्री मोठयाने ओरडून त्याला म्हणाली, "धन्य ते गर्भशय ज्याने तुझा
भार वाहिला, व धन्य ती स्तने जी तू चोखलीस!" २८ परंतु तो म्हणाला, "जे याव्हे एलोहिमचे वचन ऐकतात व पाळतात ते
आशिर्वादीत!" २९ जसजसा लोकसमुदाय वाढू लागला. तेंव्हा तो बोलू लागला, "ही पिढी दुष्ट आहे. ती चिन्ह मागत आहे. आणि
योनाच्या चिन्हांशिवाय कोणतेही चिन्ह तिला दिले जाणार नाही. ३० कारण जसा योना निनवेच्या लोकांकरिता चिन्ह होता, तसा
मनुष्याचा मुलगा ही या पिढीसाठी चिन्ह होईल. ३१ दक्षिणेकडची राणी न्यायाच्या दिवशी या पिढीविरूद्ध उठेल, आणि ती त्यांचा
धिक्कार करील, कारण ती पृथ्वीच्या दक्षिण टोकाकडून शलमोनाचे शहाणपण ऐकण्यासाठी आली. आणि आता तर शलमोनापेक्षाही
थोर असा कोणी एक येथे आहे. ३२ न्यायाच्या दिवशी निनवेचे लोक या पिढीबरोबर उभे राहतील, व त्यांचा धिक्कार करतील.
कारण योनाचा उपदेश ऐकून त्यांनी पश्चात्ताप केला, पण आता योनापेक्षाही थोर असा कोणी येथे आहे.

३३ कोणी दिवा लावून तळघरात, किंवा भांडयाखाली ठेवत नाहीत, उलट तो दिवठणीवर ठेवतात. यासाठी की, जे कोणी आत
येतात त्यांना प्रकाश दिसणे शक्य व्हावे. ३४ डोळा हा तुमच्या शरीराचा दिवा आहे, जर तुमचे डोळे चांगले आहेत, तर तुमचे
शरीरही प्रकाशाने भरलेले आहे. ३५ पण ते जर वाईट आहेत, तर तुमचे शरीर अंधकारमय आहेत. तुमच्यातला प्रकाश हा अंधार
तर नाही ना. याची काळजी घ्या. ३६ जर तुमचे सर्व शरीर प्रकाश आहे, आणि जर त्याचा एकही भाग अंधार नाही, तर जशी
दिव्याची प्रकाश किरणे तुझ्यावर प्रकाशतात, तसे ते पूर्णपणे प्रकाशतील. ३७ जेंव्हा येशूवाहने आपले बोलणे संपविले. तेंव्हा एका
परूश्याने त्याला आपल्याबरोबर जेवायला बोलाविले. तो आत गेला आणि आपल्या जागी जेवायला बसला. ३८ परंतु त्याने

जेवणापूर्वी हात धुतले नाहीत, हे पाहून परूश्याला फार आश्चर्य वाटले. ३९ तेंव्हा अदोनाई त्याला म्हणाला, "तुम्हीं परूशी प्याला व ताट बाहेरून स्वच्छ करता, पण तुम्हीं आतून अधाशीपणाने व फसवणुकीच्या दुष्टतेने भरले आहात. ४० तुम्हीं मूर्ख लोक ज्याने बाहेरील बाजू बनवली, तो आतली बाजू बनवणार नाही का? ४१ पण जे आत मध्ये आहे, ते गरीबांना द्या. आणि नंतर सर्व काही तुमच्यासाठी स्वच्छ होईल. ४२ परंतु तुम्हां परूश्यांना हाय, हाय,! कारण तुम्हीं पुदीना व सताप व प्रत्येक भाजी यांचा दहावा भाग देता. पण न्याय व याव्हे एलोहिमची अहेद (प्रीति) याकडे दुर्लक्ष करता, तुम्हीं या गोष्टी प्रथम कराव्यात व मुख्य गोष्टीकडे दुर्लक्ष करू नये.४३ परूश्यांनो तुमचा धिक्कार असो! कारण तुम्हांला सभास्थानातील महत्वाच्या जागी बसणे, आणि बाजारात सलाम घेणे आवडते. ४४ तुम्हांला हाय, हाय,! कारण तुम्हीं न दिसणा-या कबरांसारखे आहात. आणि त्यांच्यावरून जी माणसे चालतात त्यांना ते ठाऊक नाही.

४५ तोराह चे एक राब्बी येशूवाहला म्हणाला, "राब्वी तुम्हीं असे बोलता, तेंव्हा तुम्हीं आमचा सुद्धा अपमान करता." ४६ तेंव्हा
येशूवाह म्हणाला "तोराह चे राब्बी नो तुमचाही धिक्कार असो, कारण तुम्हीं लोकांना वाहण्यास कठीण असे ओझे लादता, व ते उचलण्यास तुमच्या एका बोटाने सुद्धा मदत करीत नाही. ४७ तुमचा धिक्कार असो, कारण तुमच्या पूर्वजांनी ठार केलेल्या नव्वीईम साठी तुम्हीं कबरा बांधता. ४८ अशा प्रकारे तुमच्या पूर्वजांनी केलेल्या कृत्यांचे समर्थन करता. ४९ यामुळे याव्हे एलोहिमचे ज्ञानसुद्धा असे म्हणाले, "मी प्रेषित व नव्वीईम त्यांच्याकडे पाठवील. त्यांपैकी काही जणांना ते ठार मारतील, व काही जणांचा ते छळ करतील!' ५० तेंव्हा या पिढीस नव्वीईमचे जे रक्त जगाच्या प्रारंभापासून सांडले गेले, त्यावद्दल दंड भरून द्यावा लागेल. ५१ म्हणजे
हावेलाच्या रक्तापासून ते जख-या जो याव्हे एलोहिमचे मंदिर व वेदी यांच्यामध्ये मारला गेला. खरोखर मी तुम्हांस सांगतो, या पिढीला ते भरून द्यावे लागेल.५२ तोराह चे राब्वी तुमचा धिक्कार असो, कारण तुम्हीं ज्ञानाची किल्ली काढून घेतली आहे. तुम्हीं स्वतही आत गेला नाहीत, आणि जे आत जाण्याचा प्रयत्न करत होते, त्यांनाही जाऊ दिले नाही." ५३ येशूवाह तेथून निघून जात
असता तोराह चे राव्वी व परूशी फार विरोध करू लागले व त्याला अनेक गोष्टीविषयी प्रश्न विचारू लागले.५४ तो जे बोलेल त्यामध्ये त्याला एखाद्या शिका-याप्रमाणे पकडण्यासाठी टपून बसले.

१२ .१ आणि म्हणून हजारो लोकांचा समुदाय जमला होता. इतके लोक जमले होते की, ते एकमेकांना तुडवू लागले. तेंव्हा येशूवाह प्रथम आपल्या थालमीद शी (शिष्यांशी) बोलला, "परूश्यांच्या खमिराविषयी जपा.म्हणजे जे ढोंगी आहे त्याविषयी जपा. २ उघड केले जाणार नाही, असे काहीच झाकलेले नाही. व जे कळणार नाही, असे काहीच गुप्त नाही. ३ यास्तव जे काही तुम्हीं अंधारात बोलाल, ते उजेडात ऐकले जाईल. आणि जे काही तुम्हीं कोणाच्या कानात एकांतात सांगाल, ते घराच्या छपरावरून घोषित केले जाईल."

४ परंतु माझ्या मित्रानो, मी तुम्हांला सांगतो, जे शरीराला जिवे मारतात, त्यांना तुम्हीं भिऊ नका. कारण त्यानंतर त्यापेक्षा जास्त त्यांना काही करता येत नाही. ५ तुम्हीं कोणाची भीति बाळगावी हे मी तुम्हांला सांगतो, तुम्हांला जिवे मारल्यानंतर तुम्हांस गंधक अग्नीच्या सरोवरात टाकून देण्यास जो समर्थ्य आहे, त्याची भीति धरा. होय, मी तुम्हांस सांगतो, त्यालाच भ्या. ६ पाच चिमण्या दोन पैशांना विकतात की नाही? आणि त्यातील एकीचाही याव्हे एलोहिमला विसर पडत नाही. ७ पण तुमच्या डोक्यावरील सर्व केसदेखील त्याने मोजलेले आहेत. भिऊ नका, पुष्कळ चिमण्यापेक्षा तुम्हीं मोलवान आहात."

८ प्रत्येक जण जो मला इतर लोकांसमोर स्विकारतो. त्या मनुष्याला याव्हे एलोहिमच्या मालाक (दूतां) समोर मनुष्याचा मुलगा ही स्विकारील. ९ परंतु जो मला इतर लोकांसमोर नाकारतो, तो याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदूतां ) समोर ही नाकारला जाईल. १०
प्रत्येक मनुष्य जो मनुष्याच्या मुलाविरूद्ध बोलतो, त्याला क्षमा केली जाईल. परंतु जो क्वादोस रूहुव्वा (पवित्र आत्म्या) विरूद्ध दुर्भाषण करतो, त्याला क्षमा केली जाणार नाही. ११ जेंव्हा ते तुम्हांला सभास्थान, सरकार, अधिकारी, यांच्यासमोर अणतील. तेंव्हा काय बोलावे किंवा स्वतःचा बचाव कसा करावा, याविषयी आधीच काळजी करीत वसू नका. १२ कारण तुम्हीं काय बोलावे, हे

क्वादोश रूहुवा (पवित्र आत्मा) त्यावेळी तुम्हांला शिकवील."

१३ नंतर लोकसमुदायातील एक जण त्याला म्हणाला, "राब्बी माझ्या भावाला वतन विभागून माझे मला द्यायला सांगा." १४ परंतु
येशुवाह त्याला म्हणाला, "मनुष्या मला तुमच्यावर मध्यस्थ किंवा न्यायाधिश म्हणून कोणी नेमले?" १५ मग येशूवाह त्यांना म्हणाला,
"सांभाळा आणि सर्व प्रकारच्या लोभापासून स्वतःला दूर ठेवा. कारण जेंव्हा एखाद्या माणसाजवळ त्याच्या गरजेपेक्षा अधिक असते,
तेंव्हा ती संपत्ती म्हणजे, त्याचे जीवन असे होत नाही." १६ नंतर त्याने त्यास एक दाखला सांगितल, "कोणी एका धनवान मनुष्याच्या
जमिनीत फार उत्तम पीक आले. १७ तो स्वतःशी विचार करून असे म्हणाला, 'मी काय करू, कारण धान्य साठवायला माझ्याकडे
जागा नाही?' १८ मग तो म्हणाला, "मी असे करीन की, धान्याची कोठारे पाडून मोठी बांधीन. मी माझे सर्व धान्य व माल तेथे
साठवीन. १९ आणि मी माझ्या जिवाला म्हणेन, हे जिवा तुला पुष्कळ वर्षे पुरेल इतका पुष्कळ माल ठेवलेला आहे. तू विसावा घे.
खा, पी, आनंदित राहा.२० पण याव्हे एलोहिमने त्याला म्हंटले, "अरे मूर्खा, याच रात्री तुझा जीव तुझ्या मधून काढून घेतला जाईल,
तेंव्हा ज्या वस्तू तू तयार केल्या, त्या कोणाच्या होतील? २१ जो आपल्यासाठी संपत्ती जमा करतो. परंतु याव्हे एलोहिमच्या दृष्टीने
जो धनवान नाही, अशा मनुष्यासारखे हे आहे."

२२ मग येशूवाह त्याच्या थालमीद ला (शिष्यांना) म्हणाला, "म्हणून मी तुम्हांस सांगतो, स्वतःच्या जीवनाविषयी, किंवा तुम्हीं काय
खावे, याविषयी चिंता करू नका. किंवा तुमच्या शरीराविषयी, म्हणजे कोणते कपडे घालावेत, याविषयी चिंता करू नका. २३
कारण अन्नापेक्षा जीव, आणि कपडयांपेक्षा शरीर महत्वाचे आहे. २४ कावळयांचा विचार करा, ते पेरीत नाहीत, व कापणीही करीत
नाहीत. त्यांना कोठार नाही, व कणगीही नाही, तरीही याव्हे एलोहिम त्याचे पोषण करतो. पक्ष्यांपेक्षा तुम्हीं किती तरी मोलवान
आहात. २५ चिंता करून तुम्हांपैकी कोण स्वतःच्या आयुष्यात एका तासाची भर घालू शकेल? २६ ज्या अर्थी तुम्हीं ही लहान गोष्ट
करू शकत नाही, तर इतर गोष्टीं विषयी चिंता का करता? २७ रानफूल कशी वाढतात याचा विचार करा. जे कष्ट करीत नाहीत,
व कातीत नाहीत. तरी मी तुम्हांला सांगतो, शलमोनाने सुद्धा आपल्या सर्व वैभवात त्यांच्यातील एका सारखाही पोशाख घातला
नव्हता. २८ जर याव्हे एलोहिमने जे आज आहे, व उद्या भट्टीत टाकले जाईल, अशा त्या रानातील गवताला असा पोशाख घातला
आहे. तर तुम्हीं जे अल्पविश्वासू, त्या तुम्हांला तो किती तरी अधिक चांगला पोशाख घालणार नाही काय? २९ आणि तुम्हीं काय
खावे, व काय प्यावे याविषयी खटपट करू नका, या गोष्टी विषयी चिंता करू नका. ३० कारण जगातील सर्व लोक हे मिळविण्याची
खटपट करतात. पण या गोष्टीची गरज तुम्हांला आहे, हे तुमच्या आकाशातील याव्हे अब्वाला माहीत आहे. ३१ त्या ऐवजी प्रथम
त्याचे राज्य मिळविण्यासाठी झटा, म्हणजे याही गोष्टी तुम्हांला दिल्या जतील. ३२ लहान कळपा भिऊ नको, कारण तुम्हांला त्याचे
राज्य द्यावे, हे दयाळू याव्हे अब्वाला समाधानाचे वाटते. ३३ तुमच्याकडे असलेले सर्व विका, आणि गरीबांना पैसे द्या. जुन्या न
होणा-या व थैल्या. न संपणारी संपत्ती तुम्हीं आकाशांमध्ये आपणासाठी करून ठेवा. जेथे चोर जाऊ शकणार नाही, व कसरही
त्याचा नाश करू शकणार नाही. ३४ कारण जेथे तुमचे धन आहे, तेथे तुमचे मनही लागेल.

३५ तुमच्या कंबरा बांधलेल्या आणि दिवे लागलेले असू द्या. ३६ लग्नाच्या मेजवानीवरून त्यांचा मालक परत येईल, अशी वाट
पाहणा-या लोकांसारखे व्हा. यासाठी की, जेंव्हा तो येतो व ठोठावतो, तेंव्हा त्याच्यासाठी ते तावडतोब दार उघडतील. ३७
आशिर्वादीत ते नोकर जे त्यांचा मालक परत आल्यावर त्याला जागे व तयारीत असलेले आढळतील. मी तुम्हांला खरे सांगतो, तो
स्वतः त्यांची सेवा करण्यासाठी कंबर कसेल, त्यांना मेजावर बसायला सांगून त्यांची सेवा करील. ३८ तो मध्यरात्री येवो अगर त्यानंतर
येवो. जर ते त्याला असे तयारीत आढळतील, तर ते आशिर्वादीत. ३९ परंतु याविषयी खात्री बाळगा.जर घराच्या मालकाला चोर
केंव्हा येणार हे माहीत असते, तर त्याचे घर त्याने फोडू दिले नसते. ४० तुम्हींही तयार असा कारण तुम्हीं अपेक्षा करणार नाही अशा
कोणत्याही क्षणी मनुष्याचा मुलगा येईल." ४१ मग केफा म्हणाला, "अदोनाई तुम्हीं ही बोधकथा आम्हांलाच सांगत आहात की
सर्वांना?" ४२ तेंव्हा अदोनाई म्हणाला, "असा कोण शहाणा व विश्वासू कारभारी आहे की, ज्याला अदोनाई त्याच्या नोकरांना त्यांचे

धान्य योग्य वेळी देण्यासाठी त्याची नेमणूक करील? ४३ त्याचा मालक येईल त्यावेळी असे करताना जो नोकर आढळेल तो आशिर्वादीत. ४४ मी तुम्हांला खरे सांगतो, मालक त्या नोकराला त्याच्या सर्व मालमत्तेवर अधिकारी म्हणून नेमील. ४५ पण जर तो नोकर मनात म्हणतो, "माझा मालक येण्यास फार विलंब लावतो व तो त्याच्या स्त्री, व पुरूष, नोकरांना मारहाण करतो व खाण्यापिण्यास सुरूवात करतो. ४६ तर तो वाट पाहत नाही, त्या दिवशी व त्याला माहीत नाही, त्या घटकेस त्या नोकराचा मालक येईल व त्याला कापून टाकील, आणि अविश्वासू लोकांबरोबर त्याचा वाटा नेमील.४७ ज्या नोकराला आपल्या मालकाची इच्छा माहीत असते व जो तयार राहत नाही, किंवा जो आपल्या मालकाच्या इच्छेप्रमाणे करीत नाही, त्या नोकराला खूप मार मिळेल. ४८ परंतु कसलाही वाईट हेतू न बाळगता मालकाला न आवडणारे जर त्याने केले असेल तर त्याला कमी मार बसेल. ज्या कोणाला पुष्कळ दिले आहे, त्याच्या कडून पुष्कळाची अपेक्षा केली जाईल. ज्याच्याकडून जास्त ठेवले आहे, त्याच्याकडून जास्त मागितले जाईल."

४९ मी पृथ्वीवर आग लावण्यास आलो आहे. मला असे वाटते की, ती अगोदरच पेतली असती, तर किती बरे झाले असते. ५० मला एक बाप्तिस्मा घ्यायचा आहे, आणि तो होईपर्यंत मी कसा पेचात पडलो आहे. ५१ तुम्हांला असे वाटते का की, मी पृथ्वीवर शांतता प्रस्थापित करण्यास आलो आहे? नाही, मी तुम्हांला सांगतो, मी तुमच्यात फूट पाडण्यासाठी आलो आहे. ५२ मी असे म्हणतो, कारण आतापासून घरातील पाच जणात एकमेकांविरूद्ध फूट पडेल. तिघे दोघांविरूद्ध व दोघे तिघांविरूद्ध अशी फूट पडेल.५३ त्यांच्यात बापाविरूद्ध मुलगा व मुलाविरूद्ध बाप अशी फूट पडेल. आईविरूद्ध मुलगी व मुलीविरूद्ध आई अशी फूट पडेल. सासूविरूद्ध सुन व सूनेविरूद्ध सासू अशी त्यांच्यात फूट पडेल."

५४ तो लोकसमुदयाला म्हणाला, "तुम्हीं जेंव्हा पश्चिमेकडून ढग येताना पाहता, तेंव्हा तुम्हीं लगेच म्हणता की पाऊस पडेल, आणि तेच घडते. ५५ जेंव्हा दक्षिणेकडचा वारा वाहतो, तेंव्हा तुम्हीं म्हणता उन्हाळा येईल, आणि तसे घडते. ५६ अहो ढोंग्यांनो तुम्हीं पृथ्वीवरील व आकाशातील स्थितीची लक्षणे पाहून अनुमान काढता.पण सध्याच्या काळाचा अर्थ तुम्हांला का काढता येत नाही?"

५७ आणि काय योग्य आहे, हे तुमचे तुम्हीं स्वतःच का ठरवीत नाही? ५८ तुम्हीं तुमच्या वाद्याबरोबर न्यायालयात जात असता वाटेतच त्याच्याशी समेट करा. नाही तर तो तुम्हांला न्यायाधीशासमोर नेईल. आणि न्यायाधीश तुम्हांला दंडाधिका-याच्या स्वाधीन करील. आणि अधिकारी तुम्हांला तुरूंगात टाकील. ५९ मी तुम्हांला सांगतो, तुम्हीं पै न पै देईपर्यंत तेथून बाहेर पडू शकणार नाही."

**१३**.१ त्यावेळी तेथे काही लोक उपस्थित होते. त्यांनी येशूवाहला गालीलतील त्या लोकांविषयी सांगितले, ज्या गालीलकरांचे रक्त पिलाताने आधीच त्याच्या यज्ञपशूंच्या रक्तात मिसळले होते. २ त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हांला वाटते का की, ह्या गालीलकरांनी जे भोगले त्यावरून ते इतर गालीलकरांपेक्षा जास्त पापी होते? ३ नाही, मी तुम्हांस सांगतो, जर तुम्हीं पश्चात्ताप केला नाही तर ते जसे मेले तसे तुम्हींही मराल. ४ किंवा त्या अठरा जणांचे काय? ज्यांच्यावर शिलोहाचा बुरूज पडला, व ते मारले गेले. तुम्हांला वाटते का की, यरूशलेम येथे राहणा-या सर्व लोकांपेक्षा ते अधिक दोषी होते? ५ नाही, मी तुम्हांला सांगतो, जर तुम्हीं पश्चात्ताप केला नाही तर तुम्हीं सर्व जण त्यांच्यासारखे मराल."

६ नंतर त्याने हा दाखला सांगितला, "एका माणसाने त्याच्या द्राक्षमळयात अंजिराचे झाड लावले होते. त्यावर फळ असेल म्हणून तो पाहावयास आला. परंतु त्याला काहीही आढळले नाही. ७ म्हणून तो माळयाला म्हणाला, "पाहा या अंजिराच्या झाडावर फळ पाहण्यासाठी मी गेल्या तीन वर्षापासून येत आहे. परंतु मला त्यावर काहीही आढळले नाही. तेंव्हा ते तोडून टाक, त्याचा उगीच भुईला भार कशाला?" ८ माळयाने उत्तर दिले, मालक या एका वर्षासाठी ते राहू द्या. मग मी त्याच्याभोवती खणून, त्याला खत पाणी घालीन. ९ पण येत्या वर्षात फळ आले तर ठिक, जर आले नाही तर मग आपण ते तोडून टाकावे." १० शब्बाथ दिवशी येशूवाह एका सभास्थानात शिकवीत होता. ११ तेथे एक स्त्री होती. तिला अशुद्ध आत्म्याने अठरा वर्षे विकाराने ग्रासले होते.

आणि ती कुबडी होती व तिला सरळ उभे राहता येत नव्हते. १२ येशूवाहने तिला पाहिले त्याने तिला बोलावले, आणि तो तिला म्हणाला, "बाई, तुझ्या आजारापासून तू मुक्त झाली आहेस!" १३ नंतर त्याने आपले हात तिच्यावर ठेविले आणि ती तत्काळ बरी झाली. आणि ती याव्हे एलोहिमची स्तुति करू लागली. १४ नंतर सभास्थानाचा अधिकारी रागावला. कारण येशूवाहने शब्बाथ दिवशी तिला बरे केले होते. तो लोकांना म्हणाला, "काम करण्यासाठी सहा दिवस आहेत. म्हणून या सहा दिवसांमध्ये या, व बरे व्हा. पण शब्बाथ दिवशी येऊन बरे होऊ नका." १५ येशूवाहने त्याला उत्तर दिले आणि म्हणाला, "ढोंग्यानो तुम्हांपैकी प्रत्येक जण त्याच्या बैलाला वा गाढवाला शब्बाथ दिवशी त्याच्या ठिकाणाहून सोडून, पाणी पाजायला घेऊन जात नाही का? १६ ही तर अब्राहामची कन्या आहे. सैतानाने हिला अठरा वर्षे बांधून ठेवले होते. ज्या बंधनात ती होती, त्यापासून तिला शब्बाथ दिवशी सोडविणे चूक होते काय? १७ तो असे म्हणाल्यावर जे त्याचा विरोध करीत होते त्यांना लाज वाटली, व त्याने ज्या अद्भुत गोष्टी केल्या होत्या, त्यामुळे सगळा समुदाय आनंद करू लागला.

१८ मग तो म्हणाला, "याव्हे एलोहिमचे राज्य कशासारखे आहे? आणि मी त्याची कशाबरोबर तुलना करू? १९ याव्हे एलोहिमचे राज्य एका मोहरीच्या दाण्यासारखे आहे. तो मोहरीचा दाणा एका मनुष्याने घेतला, व आपल्या मळयात लावला. तो वाढला आणि त्याचे झाड झाले. आकाशातील पाखरांनी त्याच्या फांद्यांवर घरटी बांधली." २० तो पुन्हा म्हणाला, "मी याव्हे एलोहिमच्या राज्याची तुलना कोणावरोबर करू? २१ ते खमिरासारखे आहे. एका स्त्रीने तीन मापे पिठात खमिर मिसळले, आणि ते सर्व खमिरामुळे फुगले."

२२ येशूवाह गावागावांतून आणि खेडयाखेडयांतून जात असता, व यरूशलेमाच्या दिशेने वाटचाल करीत असता तो लोकांना शिकवीत होता. २३ कोणीतरी त्याला विचारले, "अदोनाई फक्त थोडया लोकांचेच तारण होईल का?" तो त्यांना म्हणाला, २४ "अरूंद दरवाजाने आत जाण्याचा प्रयत्न करा. कारण मी तुम्हांला सांगतो की, पुष्कळ जण आत येण्याचा प्रयत्न करतील. पण त्यांना ते शक्य होणार नाही. २५ जेंव्हा घराचा मालक उठून दार बंद करील, तेंव्हा तुम्हीं बाहेर उभे राहाल व दार ठोठवाल. आणि म्हणाल, "अदोनई आम्हांसाठी दार उघडा!" परंतु तो तुम्हांला उत्तर देईल, तुम्हीं कोठून आलात हे मला माहीत नाही. २६ नंतर तुम्हीं म्हणाल, "आम्हीं तुमच्याबरोबर जेवलो, आम्हीं तुमच्याबरोबर प्यालो. आमच्या रस्त्यावर तुम्हीं शिक्षण दिले! २७ आणि तो तुम्हांला म्हणेल, "तुम्हीं कोठून आलात हे मला माहीत नाही, जे तुम्हीं दुष्टपणा करता ते सर्व माझ्यापासून निघून जा. २८ तेथे रडणे व दात खाणे चालेल.तेंव्हा तुम्हीं अब्राहामाला, आणि इसहाकाला, आणि याकोबाला, आणि सर्व नबीईम ला (संदेष्टयांना) याव्हे एलोहिमच्या राज्यामध्ये पाहाल. पण तुम्हीं स्वतः मात्र बाहेर फेकलेले असाल. २९ आणि लोक पूर्वेकडून, पश्चिमेकडून, उत्तरेकडून, व दक्षिणेकडून येतील व याव्हे एलोहिमच्या राज्यात मेजासभोवती आपापल्या जागेवर बसतील. ३० लक्षात ठेवा की, जे शेवटचे आहेत, ते पहिले होतील. व जे पहिले आहेत, ते शेवटचे होतील."

३१ त्यावेळी काही परूशी येशूवाह कडे आले. आणि ते त्याला म्हणाले, "येथून निघा, व दुसरीकडे कुठे तरी जा. कारण हेरोद तुम्हांला ठार मारणार आहे." ३२ येशूवाह त्यांना म्हणाला, "जा आणि त्या कोल्ह्याला सांगा. ऐक मी लोकांतून अशुद्ध आत्मे काढीन, आज व उद्या रोग बरे करीन, आणि तिस-या दिवशी माझे काम संपवीन. ३३ तरी ही आज, उद्या, आणि परवा मला पुढे गेले पाहिजे. कारण नव्वीईम ने (संदेष्टयांने) यरूशलेमा बाहेर मरणे, ह्याचा विचार करणे चूक आहे. ३४ हे यरूशलेमे, यरूशलेमे, जी तू नव्वीईम (संदेष्टयां) चा घात करणारी, व याव्हे एलोहिमने पाठविलेल्यांवर दगडमार करणारी! किती तरी वेळा कोंबडी जशी पिलांना आपल्या पंखाखाली एकवटते, तसे तुम्हां लोकांना एकवटण्याची माझी इच्छा होती, पण तुमची तशी इच्छा नव्हती. ३५ पाहा, याव्हे एलोहिमने तुमच्या घराचा त्याग केला आहे. मी तुम्हांला सांगतो, "याव्हे एलोहिमच्या नावाने येणारा धन्यवादित असो, असे म्हणण्याची वेळ येईपर्यंत तुम्हीं मला पाहणार नाही."

१४.१ एका शब्बाथ दिवशी तो प्रमुख परूश्यांपैकी एकाच्या घरी जेवावयास गेला. तेंव्हा तेथे असणारे लोक येशूवाह वर बारकाईने नजर ठेवीत होते. २ आणि तेथे त्याच्यासमोर जलोदर झालेला एक मनुष्य होता. ३ येशूवाहने तोराह चे राव्वी ना व परूश्यांना

विचारले, "शव्वाथ दिवशी बरे करणे तोराह ला धरून आहे की कसे?" ४ पण ते गप्प राहिले, तेंव्हा येशूवाहने त्या आजारी माणसाला धरून त्याला बरे केले, व त्याला पाठवून दिले.५ मग तो त्यांना म्हणाला, "जर तुमच्यापैकी एखाद्याला एक मुलगा किंवा एक बैल आहे, व तो विहीरीत पडला. तर शव्वाथ दिवशी तुम्हीं त्याला तावडतोब बाहेर काढणार नाही काय?" ६ आणि ह्या प्रश्नाला उत्तर देणे त्यांना जमले नाही.

७ मग त्याने पाहुण्यांना एक दाखला सांगितला. कारण त्याने पाहिले की, ते त्यांच्यासाठी मानाच्या जागा शोधीत होते. तो त्यांना म्हणाला, ८ "जेंव्हा एखादा तुम्हांला लग्नाच्या मेजवानीला आमंत्रित करील, तेंव्हा मानाच्या आसनावर बसू नका. कारण तुमच्यापेक्षा अधिक महत्वाच्या माणसाला त्याने कदाचित आमंत्रण दिले असेल. ९ मग ज्याने तुम्हां दोघांना आमंत्रित केले आहे तो येईल. आणि तुम्हांला म्हणेल, "या माणासाला तुझी जागा दे. मग लाजेने होऊन तुम्हांला खालच्या जागी बसावे लागेल. १० पण जेंव्हा तुम्हांला आमंत्रित केलेले असेल, तेंव्हा जा आणि अगदी खालच्या जागी जाऊन बसा. यासाठी की, जेंव्हा यजमान येईल तेंव्हा तो तुम्हांला म्हणेल, मित्रा वरच्या आसनावर येऊन बैस. तेंव्हा तुझ्या पाहुण्यांसमोर तुझा मान होईल. ११ कारण जो कोणी स्वतःला उच्च करितो, त्याला लीन केले जाईल. व जो स्वतःला लीन करील, त्याला उच्च केले जाईल."

१२ मग ज्याने आमंत्रण दिले होते त्याला तो म्हणाला, "तू जेंव्हा दुपारी किंवा संध्याकाळी भोजनास बोलावशील तेंव्हा तुझ्या मित्रांना, भावाना, किंवा तुझ्या नातेवाईकांना, किंवा श्रीमंत शेजा-यांना बोलवू नको. कारण ते ही तुला परत आमंत्रण देतील, व अशा रीतीने तुझ्या आमंत्रणाची परत फेड केली जाईल. १३ पण जेंव्हा तू मेजवानी देशील, तेंव्हा गरीब, लंगडे, पांगळे, आंधळे, यांना आमंत्रण दे. १४ आणि तुला आशिर्वाद मिळतील, कारण तुझी परत फेड करण्यासाठी त्यांच्याकडे काहीही असणार नाही. कारण नीतिमानांच्या पुनरूत्थानाच्या वेळी तुझी परत फेड होईल."

१५ आता जेंव्हा मेजाभोवती बसलेल्या पैकी एकाने हे ऐकले, तेंव्हा तो येशूवाहला म्हणाला, 'याव्हे एलोहिमच्या राज्यात जेवतो तो प्रत्येक जण आशिर्वादीत." १६ मग येशूवाह त्याला म्हणाला, "एक मनुष्य एका मोठया मेजवानीची तयारी करीत होता. त्याने पुष्कळ लोकांना आमंत्रण दिले. १७ भोजनाच्या वेळी ज्यांना आमंत्रण दिले होते, त्यांना 'या, कारण सर्व तयार आहे' हे सांगण्यासाठी नोकराला पाठविले १८ ते सर्वजण कारणे सांगू लागले. पहिला त्याला म्हणाला, "मी शेत विकत घेतले आहे, आणि मला जाऊन ते पाहिले पाहिजे. कृपा करून मला क्षमा कर." १९ दुसरा म्हणाला, "मी बैलाच्या पाच जोडया विकत घेतल्या आहेत. व त्या कशा आहेत, हे बघण्यासाठी मी चाललो आहे, कृपा करून मला क्षमा कर." २० आणखी तिसरा म्हणाला, "मी लग्न केले आहे, व त्यामुळे मी येऊ शकणार नाही. २१ म्हणून जेंव्हा तो नोकर परत आला, तेंव्हा त्याने आपल्या मालकाला या गोष्टी सांगितल्या. मग घराचा मालक रागावला, आणि नोकराला म्हणाला, "लवकर बाहेर रस्त्यावर आणि नगरातल्या, गल्ल्यांमध्ये जा व गरीब, आंधळे, असहाय्य, लंगडे, यांना घेऊन या!" २२ नोकर म्हणाला, "आपल्या आज्ञेप्रमाणे केले आहे. आणि तरीही जागा आहे. २३ मालक नोकराला म्हणाला, 'रस्त्यावर जा कुंपणाजवळ जा, आणि तेथे असलेल्या लोकांना आग्रहाने आत येण्यास सांगा, म्हणजे माझे घर भरून जाईल. २४ कारण मी तुम्हांस सांगतो की, त्या आमंत्रित केलेल्या कोणालाही माझ्या मेजवानीतली चव पाहायला मिळणार नाही."

२५ मोठया संख्येने लोक येशूवाह बरोबर चालत होते. तो त्यांच्याकडे वळाला व म्हणाला, २६ "जर कोणी माझ्याकडे येतो आणि आपले वडील, आई, बायको, मुले, भाऊ, बहिणी, एवढेच नव्हे तर स्वतःच्या जिवाचा सुद्धा व्देष करीत नाही, तर तो माझा थालमीद (शिष्य) होऊ शकत नाही.२७ जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येणार नाही, तो माझा थालमीद (शिष्य) होऊ शकणार नाही. २८ जर तुम्हापैकी कोणाला बुरूज बांधायचा असेल, तर तो अगोदर बसून खर्चाचा अंदाज करून, तो पूर्ण करावयास त्याच्याजवळ पुरेसे आहे की नाही, हे पाहणार नाही काय? २९ नाहीतर कदाचित तो पाया घालील, आणि पूर्ण करू शकणार नाही. आणि जे पाहणारे आहेत, ते त्याची थट्टा करतील आणि म्हणतील, ३० या मनुष्याने बांधण्यास सुरूवात केली, पण पूर्ण करू शकला नाही! ३१ किंवा एक राजा दुस-या राजावरोबर लढाई करण्यास निघाला. तर तो अगोदर बसून याचा विचार करणार नाही का की,

त्याच्या दहा हजार मनुष्यांसोबत त्याच्या शत्रूशी जो वीस हजार सैन्यासोबत चालून येत आहे, त्याला मुकाबला करता येणे शक्य आहे
काय? ३२ जर तो त्याला तोंड देऊ शकणार नसेल, तर त्याचा शत्रू दूर अंतरावर असतानाच तो शिष्टमंडळ पाठवून शांततेसाठी
तह अटींची विचारणा करील. ३३ त्याच प्रकारे तुमच्यापैकी जो कोणी सर्वस्वाचा त्याग करीत नाही, त्याला माझा थालमीद (शिष्य)
होता येणार नाही.

३४ मीठ चांगले आहे. पण मिठाचा जर खारट पणा गेला, तर त्याला खारटपणा कशाने येईल? ३५ ते पूर्णपणे निरूपयोगी ठरेल व
लोक ते फेकून देतील. "ज्याला ऐकायला कान आहेत, तो ऐको!"

**१५** .१ सर्व पापी लोक त्याचे ऐकायला त्याच्याकडे येत होते. २ तेंव्हा परूशी व तोराह चे राब्वी कुरकूर करू लागले, "हा पाप्यांचे
स्वागत करतो, आणि त्यांच्याबरोबर जेवतो!" ३ मग येशूवाहने त्यांना ही गोष्ट सांगितली. ४ जर तुमच्यापैकी कोणा एकाजवळ शंभर
मेंढरे असून त्यातील एक हरवले, तर तो नव्याण्णव रानांत सोडून हरवलेल्या मेंढरामागे, ते सापडेपर्यंत जाणार नाही काय? ५ आणि
जेंव्हा त्याला ते सापडेल तेंव्हा तो आनंदाने ते खांद्यांवर घेतो. ६ आणि घरी येतो तेंव्हा मित्रांना, आणि शेजा-यांना एकत्र करून
म्हणतो, "माझ्याबरोबर आनंद करा, कारण माझे हरवलेले मेंढरू सापडले आहे. ७ मी तुम्हांस सांगतो, त्याच प्रमाणे ज्यांना
पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांपेक्षा, पश्चात्ताप करणा-या एका पाप्याबद्दल आकाशात अधिक आनंद होईल.८
समजा एका बाईजवळ चांदीची दहा नाणी आहेत. जर तिचे एक नाणे हरवलले, तर ती दिवा लावून घर झाडून ते मिळेपर्यंत
काळजीपूर्वक शोधणार नाही काय? ९ आणि जेंव्हा ते नाणे सापडेल, तेंव्हा ती मैत्रिणीना, आणि शेजा-यांना बोलविते आणि म्हणते,
"माझ्याबरोबर आनंद करा कारण माझे हरवलेले नाणे सापडले आहे." १० त्याच प्रमाणे, पश्चात्ताप करणा-या एका पाप्याबद्दल याव्हे
एलोहिमच्या मालाक (दूता) समोर आनंद होतो, हे मी तुम्हांस सांगतो."

११ मग येशूवाह म्हणाला, "एका मनुष्याला दोन मुले होते. १२ त्यापैकी धाकटा म्हणाला बाबा मालमत्तेचा माझा वाटा मला द्या. आणि
वडिलांनी आपली संतती दोघा मुलांमध्ये विभागली. १३ नंतर फार दिवस झाले नाहीत, तोच धाकटया मुलाने आपले सर्व गोळा केले,
आणि तो दूरदेशी निघून गेला. तेथे त्याने सर्व संपत्ती चैनीचे जीवन जगून उधळून टाकली. १४ त्याने सर्व पैसे खर्च केल्यावर त्या
देशात भयंकर दुष्काळ पडला, व त्याला गरज भासू लागली. १५ मग तो गेला, आणि त्या देशातील एका रहिवाश्याजवळ नोकरी करू
लागला. त्या रहिवाश्याने त्याला डुकरे चारावयास पाठविले. १६ तेंव्हा डुकरे खातात त्या शेंगा तरी खाव्यात अशी त्याला इच्छा
होई. पण कोणी त्याला काहीही दिले नाही. १७ नंतर तो शुद्धीवर आला आणि म्हणाला, "माझ्या बापाच्या घरी किती तरी मजुरांना
पुरून उरेल इतके अन्न आहे. आणि येथे मी भुकेने मरत आहे! १८ मी उठून आपल्या बापाकडे जाईन आणि त्यांना म्हणेन, बाबा मी
आकाशाविरूद्ध आणि तुमच्याविरूद्ध पाप केले आहे. १९ तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही, तर मला आपल्या
मोलक-याप्रमाणे ठेवा.

२० मग तो उठला आणि आपल्या बापाच्या घरी गेला. तो दूर असतानाच बापाने त्याला पाहिले, आणि त्याला त्याचा कळवळा
आला. बाप पळत गेला, आणि त्याच्या गळयात पडला. आणि त्याचे मुके घेतले.२१ मुलगा त्यांना म्हणाला, "बाबा मी
आकाशाविरूद्ध व तुमच्याविरूद्ध पाप केले आहे. तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही." २२ परंतु बाप आपल्या नोकरांस
म्हणाला, "त्वरा करा. चांगला झगा आणून त्याला घाला. त्याच्या हातात अंगठी, आणि पायात जोडे घाला. २३ आणि पुष्ट वासरू
आणून कापा, आपण खाऊ आणि आनंद करू! २४ कारण हा माझा मुलगा मेला होता, पण जिवंत झाला आहे! तो हरवला होता,
पण आता सापडला आहे. व ते आनंद करू लागले.२५ त्याचा मोठा मुलगा शेतात होता. तो घराकडे निघाला, जेंव्हा तो घराजवळ
आला तेंव्हा त्याने गायनवादन व नाचण्याचा आवाज ऐकला. २६ त्याने एका नोकराला बोलावून विचारले, "हे सर्व काय चालले
आहे?" २७ तो नोकर त्याला म्हणाला, "तुमचा भाऊ आला आहे, तो सुखरूप आला म्हणून तुमच्या वडिलांनी पुष्ट वासरू कापले
आहे." २८ मोठा मुलगा रागावला, त्याला आत जाण्याची इच्छा होईना. तेंव्हा वडिलांनी येऊन त्याची समजूत काढली. २९ परंतु

त्याने वडिलांना उत्तर दिले, "पाहा इतकी वर्षे मी तुमची सेवा केली आहे, व कधीही तुमची आज्ञा मोडली नाही! मित्रांबरोबर आनंद करण्यासाठी तुम्हीं मला कधी करडूही दिले नाही. ३० ज्याने तुमची सर्व संपत्ती वेश्यांसाठी उधळली, तो तुमचा मुलगा आला. तेंव्हा तुम्हीं त्याच्यासाठी पुष्ट वासरू कापले! ३१ वडील त्याला म्हणाला, "माझ्या मुला तू नेहमीच माझ्याबरोबर आहेस, आणि जे माझे आहे ते सर्व तुझे आहे. ३२ आपण आनंद आणि उत्सव केला पाहिजे, कारण हा तुझा भाऊ मेला होता, तो जिवंत झाला आहे. तो हरवला होता, तो सापडला आहे."

१६.१ येशूवाह त्याच्या थालमीद ला (शिष्यांना) म्हणाला, "एका श्रीमंत मनुष्य होता. त्याचा एक कारभारी होता. हा कारभारी तुमचे पैसे उधळतो, असे त्या श्रीमंत माणसाला सांगण्यात आले. २ म्हणून त्या श्रीमंत मनुष्याने कारभा-याला आत बोलावले आणि म्हणाला, "हे मी तुझ्याविषयी काय ऐकत आहे? तुझ्या कारभाराचा हिशोब दे.कारण यापुढे कारभारी म्हणून तुला राहता येणार नाही." ३ तेंव्हा कारभारी स्वतःशी म्हणाला, "मी काय करू? माझे मालक माझे कारभा-याचे काम काढून घेत आहेत. शेतात कष्ट करण्याइतका मी बळकट नाही, व भीक मागण्याची मला लाज वाटते. ४ मी काय करावे हे मला माहीत आहे. यासाठी की जेंव्हा मला कारभा-याच्या कामावरून काढून टाकतील. लोक मला त्यांच्या घरांमध्ये घेतील. ५ मग त्याने त्याच्या मालकाच्या प्रत्येक कार्ज दाराला बोलावले. पहिल्याला तो म्हणाला, 'तू माझ्या मालकाचे किती देणे लागतोस?' ६ तो म्हणाला, 'चार हजार लीटर जैतून तेल.' मग तो त्याला म्हणाला, 'तुझा पावती घे बघू खाली बस, आणि लवकर त्यावर दोन हजार लीटर लिही. ७ मग दुस-याला तो म्हणाला, आणि तुझे किती देणे आहे? तो म्हणाला, 'तीस हजार किलो गहू.' तो त्याला म्हणाला, 'तुझ्या हिशोबाची पावती घे, व त्यावर पंचवीस हजार किलो लिही. ८ आणि मालकाने त्या अप्रमाणिक कारभा-याची प्रशंसा केली, कारण तो धूर्तपणे वागला होता.या जगाचे मुले त्यांच्या सारख्यांशी वागताना प्रकाशाच्या मुलांपेक्षा अधिक धूर्ततेने वागतात. ९ मी तुम्हांला सांगतो, तुमच्यासाठी तुमच्या ऐहिक संपत्तीने मित्र मिळवा. यासाठी की, जेंव्हा हे संपेल तेंव्हा ते तुमचे अनंतकाळच्या घरात स्वागत करतील. १० ज्या कोणावर थोडा विश्वास ठेवणे शक्य आहे. त्याच्यावर जास्त विश्वास ठेवला जाण्याची शक्यता आहे.व जे कोणी थोडक्याविषयी अविश्वासू आहे, तो अधिकाविषयी सुद्धा अविश्वासू आहे. ११ म्हणून जर तुम्हीं ऐहिक संपत्तीविषयी विश्वासू नाही, तर मग ख-या संपत्तीविषयी तुमच्यावर कोण विश्वास ठेवील? १२ जे दुस-याचे आहे त्याविषयी तुम्हीं विश्वासू नसाल तर जे तुमचे आहे, ते तुम्हांस कोण देईल?" १३ कोणत्याही नोकराला दोन मालकांची सेवा करता येत नाही. एकाचा तो व्देष करील, व दुस-यावर तो प्रीति करील. किंवा एकाशी तो प्रामाणिक राहील, व दुस-याला तुच्छ मानील. तुम्हीं एकाच वेळी याव्हे एलोहिमची, व पैशाची सेवा करू शकणार नाही."

१४ मग जे परूशी धनलोभी होते. त्यांनी हे सर्व ऐकले, व त्यांनी त्याचा उपहास केला. १५ तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं स्वतःला लोकांसमोर नीतिमान म्हणून मिरवत दाखविता.पण याव्हे एलोहिम तुमची अंतःकरणे ओळखतो. जे लोकांना महत्वाचे वाटते, ते याव्हे एलोहिमच्या दृष्टीने टाकावू आहे. १६ तोराह व नव्वीईम योहानान पर्यंत होते. तेंव्हापासून याव्हे एलोहिमच्या राज्याची सुवार्ता गाजविली जात आहे. व प्रत्येक जण त्यात घुसण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहे. १७ एक वेळ आकाश व पृथ्वी नाहीशी होणे शक्य होईल, पण तोराह तील एक काना किंवा मात्राही नाहीसा होणार नाही.

१८ जो कोणी आपल्या बायकोला सूतपत्र देतो, व दुसरीबरोबर लग्न करतो, तो व्यभिचार करतो. आणि जो कोणा एखाद्या स्त्रीशी जिला तिच्या पतीने टाकलेले आहे, तिच्याशी लग्न करतो तो व्यभिचार करतो."

१९ एक मनुष्य होता, तो श्रीमंत होता. तो जांभळी आणि तलम वस्त्रे घालीत असे. प्रत्येक दिवस तो ऐषारामात घालवीत असे. २० त्याच्या फाटकाजवळ लाजार नावाचा एक गरीब मनुष्य पडून होता. त्याच्या अंगावर फोड भरलेले होते. २१ त्या श्रीमंत मनुष्याच्या टेबलावरून खाली पडलेले असेल ते खाण्याची तो आतुरतेने वाट पाही. कुत्री देखील येऊन त्याचे फोड चाटीत असत. २२ मग असे झाले की, तो गरीब मनुष्य मरण पावला. व याव्हे एलोहिमच्या मालाक नी (देवदूतांनी) त्याला अब्राहामाच्या उराशी नेऊन ठेवले.

त्याने वर पाहिले व दूरवर असलेल्या अब्राहामाला पाहिले आणि लाजाराला त्याच्या शेजारी पाहिले. २४ तो मोठयाने ओरडला,
"अब्वा अब्राहामा माझ्यावर दया कर आणि लाजाराला पाठव. यासाठी की, तो बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड
करील.कारण या अग्नीमध्ये मी भयंकर वेदना भोगीत आहे!" २५ परंतु अब्राहाम म्हणाला, "माझ्या मुला लक्षात ठेव की तुझ्या
जीवनात तू आपले सुख भरून पावलास.आणि त्याप्रमाणे लाजार दुःख भरून पावला. परंतु आता तेथे याला समाधान मिळत आहे,
आणि तू दुःख भोगीत आहेस. २६ आणि याशिवाय आमच्या व तुमच्यामध्ये मोठी दरी स्थापलेली आहे. ती अशी की, जे येथून
तुमच्याकडे पार जायला पाहतात त्यांना तसे करता येऊ नये, आणि तिकडून कोणी पार आमच्याकडे येऊ नये. २७ मग तो म्हणाला,
तर याव्हे अब्वा मी तुला विनंती करतो की, त्याला माझ्या बापाच्या घरी पाठवावे. २८ कारण मला पाच भाऊ आहेत, त्यांनीही या
यातनेच्या ठिकाणी येऊ नये, म्हणून त्याने त्यांना साक्ष द्यावी. २९ पण अब्राहामाने त्याला म्हंटले, "मोशे व नव्वीईम त्यांच्याजवळ
आहेत. त्यांचे त्यांनी ऐकावे. ३० तो श्रीमंत मनुष्य म्हणाला, "नाही याव्हे अब्वा अब्राहामा, मेलेल्यातील कोणी त्यांच्याकडे गेला, तर
ते पश्चात्ताप करतील. ३१ अब्राहाम त्याला म्हणाला, " जर ते मोशेचे आणि नव्वीईम चे ऐकत नाहीत, तर मेलेल्यांतून जर कोणी
उठला तरी त्यांची खात्री होणार नाही."

**१७**.१ येशूवाह त्याच्या थालमीद ला (शिष्यांना) म्हणाला, "ज्या गोष्टी लोकांना याव्हे एलोहिम पासून दूर नेतात, त्या येणे निश्चित
आहे. परंतु ज्याच्यामुळे त्या येणार त्याची वाईट दशा होवो! २ त्याने या लहानातील एकाला पाप करावयास लावण्यापेक्षा त्याच्या
गळयात जात्याची तळी बांधून, त्याला समुद्रात फेकणे हे त्याच्यासाठी अधिक बरे होईल. ३ स्वतःकडे लक्ष द्या, जर तुमचा भाऊ
पाप करतो, तर त्याला धमकावा. आणि जर तो पश्चात्ताप करतो, तर त्याची क्षमा करा. ४ जर तो तुझ्याविरूद्ध दिवसातून सात
वेळा पाप करतो, आणि सात वेळा तुमच्याकडे येतो व म्हणतो, 'मी पश्चात्ताप करतो,' त्याला क्षमा करा."

५ मग थालमीद (शिष्य) अदोनाईला म्हणाले, "आमचा विश्वास वाढव." ६ अदोनाई म्हणाला, "जर तुमचा विश्वास मोहरीच्या
दाण्याएवढा असेल, तर तुम्हीं या तुतीच्या झाडाला म्हणू शकता मुळासकत उपटून समुद्रात लावला जा. आणि ते तुमच्या आज्ञा
पाळील." ७ समजा तुमच्यापैकी एकाला एक सेवक आहे. व तो शेत नांगरीत आहे, किंवा मेंढरे राखीत आहे. जेंव्हा तो शेतातून
परत येतो, तुम्हीं त्याला ताबडतोब ये आणि जेवायला बैस असे म्हणाल का? ८ उलट तुम्हीं असे म्हणणार नाही, का मझे भोजन
तयार कर. आणि कामाचे कपडे घालून माझे खाणेपिणे चालू असताना माझी सेवा कर, त्यानंतर तू खाऊ पिऊ शकतोस? ९ ज्या
गोष्टी करण्याबद्दल तुम्हीं नोकराला आज्ञा करता ते केल्याबद्दल त्याचे आभार तुम्हीं मानता काय? १० तुमच्या बाबतीतही हे तसेच
आहे, जेंव्हा तुम्हांला करण्यास सांगितलेली सर्व कामे तुम्हीं केल्यावर असे म्हंटले पाहिजे, आम्हीं कोणत्याही मानास पात्र नसलेले सेवक
आहोत. आम्हीं फक्त आमचे कर्तव्य केले आहे."

११ येशूवाह यरूशलेमाला जात असताना त्याने शोमरोन व गालील यांच्या सीमेवरून प्रवास केला. १२ तो एका खेडयात जात असताना
कुष्ठरोग झालेले दहा पुरूष त्याला भेटले, ते दूर उभे राहिले. १३ ते मोठयाने ओरडून म्हणाले, "येशूवाह राब्वी आम्हांवर दया करा!
१४ तेंव्हा त्याने त्यांना पाहिले तेंव्हा तो म्हणाला, "जा आणि स्वतःला कोहेन ला (याजकाला) दाखवा." ते जात असतानाच बरे
झाले. १५ जेंव्हा त्यांच्यातील एकाने पाहिले की, आपण बरे झालो आहोत. तेंव्हा तो परत आला व त्याने मोठया स्वरात याव्हे
एलोहिमची स्तुति केली. १६ तो येशूवाहच्या पायाजवळ उपडा पडला, आणि त्याने त्याचे उपकार मानले, तो शोमरोनी होता. १७
येशूवाह त्याला म्हणाला, "दहाजण बरे झाले नव्हते काय, नऊजण कोठे आहेत? १८ या विदेशी माणसाशिवाय कोणीही याव्हे
एलोहिमची स्तुति करण्यासाठी परत आला नाही काय?" १९ येशूवाह त्याला म्हणाला, "ऊठ आणि जा तुझ्या विश्वासाने तुला बरे
केले आहे."

२० एकदा परूश्यांनी येशूवाहला विचरले, याव्हे एलोहिमचे राज्य केंव्हा येईल. त्याने त्यांना उत्तर दिले, "याव्हे एलोहिमचे राज्य दृश्य
स्वरूपात येत नाही. लोक असे म्हणणार नाहीत की, २१ ते येथे आहे! किंवा ते तेथे आहे! कारण याव्हे एलोहिमचे राज्य तुमच्यामध्ये

आहे." २२ पण थालमीद ला (शिष्यांला) तो म्हणाला, "असे दिवस येतील की, जेंव्हा मनुष्याच्या मुलाचे गौरवाने येण्याच्या एका
दिवसाची तुम्हीं उत्सुकतेने वाट पाहाल, परंतु तो दिवस तुम्हीं पाहू शकणार नाही. २३ आणि लोक तुम्हांला म्हणतील, तेथे पाहा! येथे
पाहा! तेथे जाऊ नका, किंवा त्यांच्यामागे जाऊ नका.२४ कारण जशी वीज आकाशाच्या एका बाजूपासून दुस-या बाजूपर्यंत चमकते
आणि प्रकाशते, तसेच मनुष्याच्या मुलाचे त्याच्या दिवसात होईल. २५ पण पहिल्यांदा त्याने पुष्कळ गोष्टी विषयी दुःख भोगले
पाहिजे, व या पिढीने त्याला नाकारले पाहिजे. २६ जसे नोहाच्या दिवसात झाले, तसेच मनुष्याच्या मुलाच्या दिवसात देखील होईल.ते
खात होते, पीत होते, लग्न करीत होते, लग्न करून देत होते. २७ नोहा तारवात जाईपर्यंत असे चालले होते. मग पूर आला, व
त्या सर्वांचा नाश झाला. २८ त्याच प्रकारे लोटाच्या दिवसात झाले तसे होईल. ते खात होते, पीत होते, विकत घेत होते, विकत देत
होते. लागवड करीत होते, बांधीत होते. २९ परंतु ज्या दिवशी लोट सदोमातून बाहेर पडला त्या दिवशी अग्नि व गंधक यांचा
पाऊस पडला, आणि सर्वांचा नाश केला.३० मनुष्याचा मुलगा प्रगट हाईल, तेंव्हा असेच होईल.

३१ त्या दिवशी जर एखादा छपरावर असेल, व त्याचे सामान घरात असेल, त्याने ते घेण्यासाठी घरात जाऊ नये. त्याच प्रमाणे जो
शेतात असेल, त्याने परत जाऊ नये. ३२ लोटाच्या बायकोची आठवण करा. ३३ जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो, तो त्याला
गमवील, आणि जो कोणी आपला जीव गमवील, तो त्याला राखील. ३४ मी तुम्हांला सांगतो, त्या रात्री बिछान्यावर दोघे असतील,
त्यापैकी एक घेतला जाईल. ३५ दोन स्त्रिया धान्य दळत असतील, तर त्यापैकी एक घेतली जाईल, व दुसरी ठेवली जाईल. ३६
शेतात दोघे असतील एकाला घेतले जाईल, व दुस-याला ठेविले जाईल." ३७ थालमीद नी (शिष्यांनी) त्याला विचारले, 'कोठे
अदोनाई'. येशूवाहने उत्तर दिले, "जेथे प्रेत असेल, तेथे गिधाडे जमतील."

१८.१ त्यांनी नेहमी आशा न सोडता प्रार्थना करावी व ती करण्याचे कधीच सोडू नये, हे शिकविण्यासाठी त्याने त्यांना एक दाखला
सांगितला. २ तो म्हणाला, "एका नगरात एक न्यायाधीश हेता. तो याव्हे एलोहिमला भीत नसे, लोकांना मानही देत नसे. ३ त्या
नगरात एक विधवा होती. ती वारंवार येत असे, व न्यायाधीशाला म्हणत असे, 'माझ्या विरोधकाविरूद्ध मला न्याय मिळेल असे
बघा!' ४ काही काळ त्याची इच्छा नव्हती. पण शेवटी तो स्वतःशीच म्हणाला, 'मी जरी याव्हे एलोहिमल भीत नाही, व लोकांना मान
देत नाही, ५ तरीही ती विधवा मला त्रास देत असल्याने, तिला न्याय मिळेल असे मी करावे. यासाठी की, ती वारंवार येऊन मला
त्रास देणार नाही.' ६ मग अदोनाई म्हणाला, "अनीतिमान न्यायाधीश काय म्हणला त्याकडे लक्ष द्या. ७ आणि मग जे याव्हे
एलोहिमने निवडलेले लोक रात्रंदिवस त्याचा धावा करतात, त्यांचा तो न्याय करणार नाही काय? त्यांना मदत करावयास वेळ लावील
काय? ८ मी तुम्हांस सांगतो, तो त्यांना न्याय देईल. तरीही जेंव्हा मनुष्याचा मुलगा येता, तेंव्हा त्याला पृथ्वीवर विश्वास आढळेल
काय?"

९ अशा लोकांना जे स्वतः नीतिमान असल्याचा अभिमान बाळगत होते, व इतरांना कमी लेखत होते. अशा लोकांसाठी येशूवाहने ही
गोष्ट सांगितली. १० दोघे जण प्रार्थना करावयास वर मंदिरात गेले. एक परूशी होता, व दुसरा जकातदार होता.११ परूशी उभा
राहिला व त्याने अशी प्रार्थना केली. "हे याव्हे एलोहिम मी तुझे उपकार मानतो कारण इतर लोकांसारखा म्हणजे चोर, फसविणारा,
व्यभिचारी, व या जकातदार सारखा मी नाही. १२ उलट मी आठवडयातून दोनदा उपास करतो. व माझ्या सर्व उत्पन्नाचा दहावा
भाग देतो. १३ परंतु जकातदार दूर अंतरावर उभा राहिला, व आपले डोळे आकाशाकडे वर न उचलता आपली छाती बडवीत
म्हणाला, 'हे याव्हे एलोहिम मज पापी माणसावर दया कर!' १४ मी तुम्हांला सांगतो, हा मनुष्य त्या दुस-या माणसापेक्षा नीतिमान ठरून
घरी गेला. कारण जो कोणी स्वतःला उंच करतो, त्याला नीच केले जाईल. आणि जो कोणी स्वतःला नीच करतो, त्याला उंच केले
जाईल."

१५ आणि ते आपल्या बालकांना देखील त्याच्याकडे आणीले यासाठी की, त्याने त्यांना स्पर्श करावा. पण जेंव्हा थालमीद नी
(शिष्यांनी) हे पाहिले तेंव्हा ते त्यांना दटावू लागले. १६ पण येशूवाहने बालकांना त्याच्याकडे बोलाविले आणि म्हणाला, "बालकांना

मजकडे येऊ द्या, त्यांना आडवू नका. कारण याव्हे एलोहिमचे राज्य त्यांच्या सारख्यांचेच आहे. १७ मी खरोखर तुम्हांला सांगतो, जो कोणी याव्हे एलोहिमच्या राज्याचा बालका सारखा स्विकार करीत नाही, त्यांचा आकाशात प्रवेश होणार नाही."

१८ एका यहूदी पुढा-याने त्याला विचारले, "उत्तम राब्बी (गुरूजी) अनंतकाळचे जीवन मिळविण्यासाठी मी काय करू?" १९ येशूवाह त्याला म्हणाला, "मला ऊत्तम का म्हणतोस! याव्हे एलोहिम शिवाय कोणीही उत्तम नाही. २० तुला आज्ञा माहीत आहेत. व्यभिचार करू नको, खुन करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, तुझ्या आईवडिलांचा मान राख. २१ तो पुढारी म्हणाला, "या सर्व आज्ञा मी माझ्या बालपणापासून पाळल्या आहेत." २२ जेंव्हा येशूवाहने हे ऐकले तेंव्हा तो त्याला म्हणाला, "तुझ्यामध्ये अजून एका गोष्टीची उणीव आहे. तुझ्या जवळचे सर्व काही विकून, ते गरीबास वाट, म्हणजे आकाशात तुला संपत्ती मिळेल. मग ये माझ्या मागे चाल." २३ पण जेंव्हा त्या पुढा-याने हे ऐकले, तेंव्हा तो फार दुःखी झाला. कारण तो फार श्रीमंत होता. २४ जेंव्हा येशूवाहने पाहिले की, तो दुःखी झाला आहे. तो म्हणाला, "ज्याच्या जवळ धन आहे, त्या लोकांना याव्हे एलोहिमच्या राज्यात प्रवेश होणे फार कठीण आहे! २५ होय, श्रीमंत माणसाला याव्हे एलोहिमच्या राज्यात प्रवेश होणे, यापेक्षा उंटाने सुईच्या छिद्रातून जाणे सोपे आहे.

२६ नंतर ज्या लोकांनी हे ऐकले ते म्हणाले, "तर मग कोणाच यशाह (तारण) होईल?" २७ येशूवाह म्हणाला, "ज्या गोष्टी माणसांना अशक्य आहेत, त्या याव्हे एलोहिमला शक्य आहेत." २८ मग केफा म्हणाला, "पाहा, आमच्याकडे जे होते ते सर्व सोडून, आम्हीं तुमच्या मागे आलो आहेत." २९ येशूवाह त्यांना म्हणाला, "मी तुम्हांस खरे सांगतो, ज्याने याव्हे एलोहिमच्या राज्याकरिता आपले घर, किंवा बायको, किंवा भाऊ, किंवा आईवडिल सोडले आहेत. ३० आणि ज्याला या काळी पुष्कळ अधिक व पुढील काळी अनंतकाळचे जीवन मिळणार नाही असा कोणीच नाही!"

३१ येशूवाहने बारा थालमीद ला (प्रेषितांना) बाजूला घेतले. आणि त्यांना म्हणाला, "ऐका आपण वर यरूशलेमास जात आहोत, आणि नव्वीईम (भविष्यवाद्यांनी) मनुष्याच्या मुलाविषयी जे काही लिहिले होते, ते पूर्ण होईल. ३२ होय, त्याला विदेश्यांच्या हाती धरून देण्यात येईल, त्याची कुचेष्टा होईल, त्याची निंदा करतील, त्याच्यावर थुंकतील. ३३ ते त्याला चाबकाने फटके मारून रक्तबांबाळ करून ठार करतील. आणि तो तिस-या दिवशी मरणातून उठेल." ३४ थालमीद ला (शिष्यांना) यातील काहीही कळाले नाही. कारण हे वचन त्यांच्या पासून लपवूम ठेवण्यात आले होते. आणि तो कशा विषयी बोलत आहे, हे त्यांना माहीत नव्हते.

३५ येशूवाह यरीहो जवळ येत असताना, एक आंधळा रस्तावर बसून भीक मागत होता. ३६ जेंव्हा त्या आंधळया मणुष्याने जवळून जाणा-या समुदायाचा आवाज ऐकला. तेंव्हा त्याने विचारले, हे काय चालले आहे. ३७ त्यांनी त्याला सांगितले की, "नात्सेरेथ (नासरेथ) कर येशूवाह आहे." ३८ तो मोठयांने ओरडून म्हणाला, "येशूवाह दाविदाच्या मुला माझ्याव दया करा!" ३९ जे पुढे चालले होते ,त्यांनी त्याला गप्प राहण्यास सांगितले. परंतु तो आणखी मोठयाने ओरडून म्हणाला, दाविदाच्या मुला माझ्यावर दया करा!" ४० येशूवाह थांबला! आणि त्या आंधळयाला आपणांकडे आणण्याची आज्ञा केली. जेंव्हा आंधळा मनुष्य आला, तेंव्हा येशूवाहने त्याला विचारले, ४१ "तूला काय हवे?" आंधळया मनुष्य म्हणाला, "अदोनाई मला परत दृष्टि प्राप्त व्हावी." ४२ येशूवाह त्याला म्हणाला, "तुला दृष्टि येवो; तुझ्या विश्‍वासाने तुला बरे केले आहे." ४३ तत्काळ त्याला दृष्टि आली, आणि याव्हे एलोहिमचे गौरव करीत तो येशूवाहच्या मागे गेला. सर्व लोकांनी हे पाहिले, आणि याव्हे एलोहिमची स्तुति केली.

**१९**. १ येशूवाहने यरीहोत प्रवेश केला, आणि यरीहोतून जात होता. २ तेथे जक्कय नावाचा मनुष्य होता. तो मुख्य जकातदार होता, आणि खूप श्रीमंत होता. ३ येशूवाह कोण आहे, हे पहाण्याचा तो प्रयत्न करीत होता. परंतु गर्दीमुळे त्याला काही दिसेना. कारण तो बुटका होता. ४ तेंव्हा तो सर्वांच्या पुढे पळत गेला, आणि त्याला पाहण्यासाठी उंबराच्या झाडावर चढला. कारण तो त्याच रस्त्याने पुढे जाणार होता. ५ येशूवाह जेंव्हा त्या ठिकाणी आला, तेंव्हा वर पाहून जक्कय याला म्हणाला, "जक्कय त्वरा कर आणि खाली ये, कारण आज मला तुझ्याच घरी राहायचे आहे." ६ मग तो घाईघाईने खाली उतरला, आणि आनंदाने त्याचे स्वागत

केले. ७ सर्व लोकानी ते पाहिले ते कुरकूर करू लागले, व म्हणू लागले की, “तो पापी माणसाच्या घरी उतरायला गेला आहे.८ परंतु जक्कय उभा राहिला व अदोनाईला म्हणाला, “राव्वी जे माझे आहे त्यातील अर्धे मी गरीबांना दिले असे समजा, व मी कोणाला फसवून काही घेतले असेल, तर ते चौपट परत करीन.” ९ येशूवाह त्याला म्हणाला, “आज या घराला तारण प्राप्त झाले आहे. कारण हा मनुष्य सुद्धा अब्राहामाचा मुलगा आहे. १० कारण मनुष्याचा मुलगा जे हरवलेले ते शोधावयास, व तारावयास आला आहे.” ११ लोक या गोष्टी ऐकत असतानाच येशूवाहने त्यांना आणखी एक गोष्ट सांगितली, कारण तो यरूशलेमा जवळ होता. म्हणून त्यांनी असा विचार केला की, याव्हे एलोहिमचे राज्य तत्काळ प्रगट होणार आहे. १२ मग येशूवाह म्हणाला, “कोणी एक उच्च कुळातील मनुष्य आपली त्या भागाचा सरदार म्हणून नेमणूक करून घेण्यासाठी, व पुन्हा परतण्यासाठी दूरच्या देशी गेला. १३ त्याने त्याच्या नोकरांपैकी दहा नोकरांना बोलाविले. त्यांना त्याने दहा मोहरा (एका मजुराची तीन महिन्याच्या पगाराइतकी एक मोहरेची किंमत) दिल्या आणि तो त्यांना म्हणाला, “मी परत येईपर्यंत यावर व्यापार करा. १४ परंतु त्याचे प्रजाजन त्याचा व्देष करीत असत, त्यांनी त्याच्यामागे एक शिष्टमंडळ पाठविले. व सांगितले की, “या माणसाला आमचा सरदार करू नका.” १५ परंतु त्याची सरदार म्हणुन नेमणूक झाली, व तो परत आला. त्याने ज्या नोकरांना पैसे दिले होते, त्यांना बोलावणे पाठविले. यासाठी की, त्यांनी त्यापासून किती फायदा मिळविला हे पाहावे. १६ पहिला वर आला आणि म्हणाला, “धनी तुम्ही दिलेल्या नाण्यावर मी आणखी दहा नाणी मिळवली आहेत. १७ तेंव्हा तो त्याला म्हणाला, “चांगल्या दासा छान केलेस. तू थोडक्या विषयी विश्वासू झालास, म्हणून तू दहा नगरांवर अधिकारी होशील.”

१८ मग दुसरा नोकर आला व म्हणाला, “तुमच्या पाच नाण्यांवर मी पाच नाणी आणखी मिळवली.” १९ आणि तो त्याला म्हणाला, “तू पाच नगरांवर अधिकारी असशील.” २० मग तिसरा नोकर आला आणि म्हणाला, “धनी आपण दिलेले नाणी मी हात रूमालात बांधून ठेवले होते. २१ आपण कठोर आहात, मला तुमची भीति वाटत होती. जे आपण ठेवले नाही, ते आपण काढता. आणि जे पेरिले नाही, ते कापता. २२ धनी त्यास म्हणाला, “दुष्ट माणसा तुझ्याच शब्दांनी मी तुझा न्याय करतो. तुला ठाऊक होते की, मी कडक शिस्तीचा माणूस आहे. मी जे दिले नाही ते घेतो, आणि जे पेरले नाही त्याची कापणी करतो. २३ तर तू माझा पैसा पेढीवर का ठेवला नाहीस? मग जेंव्हा मी परत आलो असतो, तेंव्हा ते मला व्याजसह मिळाले असते. २४ त्याच्याजवळ उभे राहणा-यांना तो म्हणाला, “त्याच्या जवळून ते नाणे घ्या, आणि ज्याच्याजवळ दहा नाणी आहेत त्याला द्या. २५ ते त्याला म्हणाले, ‘धनी त्याच्याजवळ दहा नाणी आहेत. २६ धन्याने उत्तर दिले, “मी तुम्हांला सांगतो, ज्याच्याजवळ आहे त्याला अधिक दिले जाईल.आणि ज्याच्याजवळ नाही त्याच्याकडून जे काही असेल, ते सुद्धा काढून घेतले जाईल. २७ परंतु मी राज्य करू नये, अशी इच्छा करणा-या माझ्या शत्रूंना येथे आणा, आणि माझ्यासमोर ठार मारा.”

२८ येशूवाहने या गोष्टी सांगितल्यानंतर तो वर यरूशलेमा पर्यंत गेला. २९ जेंव्हा तो वर जातच राहिला, तेंव्हा तो जैतून डोंगर म्हटलेल्या टेकडीजवळ असलेल्या बेथफगे आणि बेथानी जवळ आला. तेंव्हा त्याने आपल्या दोन थालमीद ला (शिष्यांना) असे सांगून पाठविले की, ३० तुमच्यासमोर असलेल्या खेडयात जा. तुम्हीं प्रवेश करताच ज्यावर कोणी बसले नाही, असे शिंगरू तुम्हांस आढळेल. ते सोडून येथे आणा. ३१ जर तुम्हांला कोणी विचारले की, “तुम्हीं ते का सोडता?” तर म्हणा की, “अदोनाईला याची गरज आहे.” ३२ ज्यांना पाठविले होते ते गेले, आणि त्याने सांगितल्या प्रमाणे त्यास आढळले. ३३ ते सोडीत असता त्याचा मालक त्यांना म्हणाला, “तुम्हीं शिंगरू का सोडता?” ३४ ते म्हणाले, “अदोनाईला याची गरज आहे.” ३५ त्यांनी ते येशूवाह कडे आणले, त्यांनी झगे शिंगरावर घातले, आणि येशूवाहला त्याच्यावर बसविले. ३६ येशूवाह रस्त्यावरून जात असता लोक आपली वस्त्रे रस्त्यावर पसरीत होते. ३७ जेंव्हा तो जैतून डोंगराच्या उतरणीवर आला तेंव्हा सर्व जनसमुदाय त्यांनी जे चमत्कार पाहिले होते, त्याबद्दल मोठया आनंदाने याव्हे एलोहिमची स्तुति करू लागले.

३८ ते म्हणाले, “अदोनाईच्या नावाने येणारा राजा धन्यवादित असो! आकाशात शांती, आणि उर्ध्वलोकी याव्हे एलोहिमला गौरव!” ३९ जमावातील काही परूशी येशूवाहला म्हणाले, “राव्वी आपल्या थालमीद ला दटावा!” ४० त्याने उत्तर दिले, “मी तुम्हांला सांगतो,

जर ते शांत बसतील तर हे धोंडे ओरडतील?" ४१ जेंव्हा तो जवळ आला, व त्याने नगर पाहिले. तेंव्हा तो त्यासाठी रडला आणि म्हणाला, ४२ "जर तू आज शांतीच्या गोष्टी जाणून घेतल्या असत्या, तर किती बरे झाले असते.परंतु आता ते तुझ्या नजरेपासून लपवून ठेवण्यात आले आहे. ४३ तुझ्यावर असे दिवस येतील की, तुझे शत्रू तुझ्याभोवती कोट उभारतील, तुला वेढीतील, आणि सर्व बाजूंनी तुला कोंडीत पकडतील. ४४ ते तुला, तुझ्या मुलांना तुझ्या भिंतीच्या आत धुळीस मिळवतील, व दगडावर दगड राहू देणार नाही. कारण याव्हे एलोहिमने तुझ्यावर कृपा दृष्टी केल्याचा समय, तू ओळखून घेतला नाही."

४५ येशूवाहने मंदिरात प्रवेश केला, व जे विक्री करीत होते, त्यांना बाहेर हाकलू लागला. ४६ तो त्यास म्हणाला, "असे लिहिले आहे की, माझे घर प्रार्थनेचे घर होईल! पण तुम्हीं ते लुटारूची गुहा केली आहे." ४७ तो दररोज मंदिरात शिकवीत असे, एलयोवन कोहेन (मुख्य याजक), तोराह चे राव्बी (नियमशास्त्राचे शिक्षक), लोकांचे पुढारी त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करीत होते. ४८ पण तसे करण्यासाठी त्यांना काही मार्ग सापडत नव्हता. कारण सर्व लोक फार उत्कंठेने त्याचे ऐकत होते.

**२०.**१ एके दिवशी येशूवाह मंदिरात लोकांना शिक्षण देत असताना, व सुवार्ता सांगत असताना, एकदा एक एलयोवन कोहेन (मुख्ययाजक), आणि तोराह चे राव्बी (नियमशास्त्राचे शिक्षक), वडील जनांसह एकत्र वर त्याच्याकडे आले. २ ते त्याला म्हणाले, "आम्हांला सांग कोणत्या अधिकाराने तू या गोष्टी करत आहेस, तुला हा अधिकार कोणी दिला?" ३ तेंव्हा त्याने त्यास उत्तर दिले, "मी सुद्धा तुम्हांला एक प्रश्न विचारीन, तुम्हीं मला सांगा. ४ योहानानचा बाप्तिस्मा आकाशातून होता की मनुष्यापासून?" ५ त्यांनी आपसात चर्चा केली आणि म्हंटले, "जर आपण आकाशातून म्हणावे तर तो म्हणेल, तुम्हीं त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही? ६ पण जर आपण मनुष्याकडून म्हणावे, तर सर्व लोक आपणांस दगडमार करतील. कारण त्यांची खात्री होती की, योहानान नबी (संदेष्टा) होता." ७ म्हणुन त्यांनी असे उत्तर दिले की, तो कोणापासून होता, हे त्यांना माहीत नाही. ८ मग येशूवाह त्यास म्हणाला, "मग मी या गोष्टी कोणत्या अधिकाराने करतो, हे तुम्हांला मी सुद्धा सांगणार नाही.

९ मग तो लोकांना ही गोष्ट सांगू लागला, "एका मनुष्याने द्राक्षमळा लावला, व तो काही माळयांना मोलाने देऊन, बरेच दिवसासाठी तो दूर गेला. १० हंगामाच्या वेळी त्याने नोकराला माळयाकडे पाठविले यासाठी की, त्यांनी द्राक्षमळयातील काही फळे द्यावीत. पण माळयांनी त्या नोकराला मारले, व रिकाम्या हाताने परत पाठविले. ११ नंतर त्याने दुस-या नोकराला पाठविले, पण त्याला सुद्धा त्यांनी मारले. त्या नोकराला त्यांनी लज्जास्पद वागणूक दिली, आणि रिकाम्या हाताने परत पाठविले. १२ तेंव्हा त्याने तिस-या नोकराला पाठविले, पण त्यालाही त्यांनी जखमी करून फेकून दिले. १३ द्राक्षमळयाचा मालक म्हणाला, "मी काय करू? मी माझा स्वतःचा प्रिय मुलाला पाठवितो. कदाचित ते त्याला मान देतील. १४ पण जेंव्हा माळयांनी मुलाला पाहिले तेंव्हा त्यांनी आपसात चर्चा केली आणि म्हणाले, "हा तर वारस आहे. आपण त्याला ठार मारू, म्हणजे वतन आपले होईल." १५ त्यांनी त्याला द्राक्षमळयाच्या बाहेर ठार मारून फेकू दिले." तर मग द्राक्षमळयाचा मालक काय करील? १६ "तो येईल आणि त्या माळयांना ठार मारील, व तो द्राक्षमळा दुस-यांना सोपवून देईन." त्यांनी हे ऐकले तेंव्हा ते म्हणाले, "असे कधीही न होवो."

१७ येशूवाहने त्यांच्याकडे पाहिले व म्हंटले, "तर मग जो दगड बांधणा-यांनी नापसंत केला, तोच कोनशिला झाला. असे जे लिहिले आहे, त्याचा अर्थ काय?" १८ जो कोणी त्याच्यावर पडेल, त्याचे तुकडे तुकडे होतील. परंतु ज्या कोणावर तो पडेल, त्याचा चुराडा होईल." १९ तोराह चे राव्बी (नियमशास्त्राचे शिक्षक) एलयोवन कोहेन (मुख्य याजक) यांनी त्याचवेळी त्याला अटक करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना लोकांची भीति वाटत होती. त्यांना त्याला अटक करायचे होते, कारण त्यांना माहीत होते की, हा दाखला त्याने त्यांनाच उद्देशून सांगितला होता. २० तेंव्हा त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली, आणि आपण प्रामाणिक आहोत, असे भासविणारे हेर पाठविले. त्यांची अशी योजना होती की, त्याच्या बोलण्यात त्याला पकडावे, म्हणजे त्यांना त्याला सुभेदाराच्या सत्तेत व अधिकारात द्यावे. २१ म्हणून त्या हेरांनी त्याला प्रश्न विचारला ते म्हणाले, "राव्बी आम्हांला माहीत आहे की, जे योग्य तुम्हीं बोलता व शिकविता, आणि तुम्हीं पक्षपात करीत नाही, तर सत्याने याव्हे एलोहिमचा मार्ग शिकविता. २२ आम्हीं कैसराला कर द्यावा, हे

योग्य आहे किंवा नाही?" २३ ते धूर्तपणे आपल्याला फसवू पाहात आहेत, याची येशूवाहला कल्पना होती. २४ मला एक नाणे
दाखवा, त्यावर कोणाचा मुखवटा व लेख आहे?" ते म्हणाले, 'कैसराचा' २५ तेंव्हा तो त्यांना म्हणाला, "कैसराचे ते कैसराला आणि
याव्हे एलोहिमचे ते याव्हे एलोहिमला द्या." २६ तेंव्हा लोकांसमोर तो जे बोलला त्यात त्याला धरणे त्यांना शक्य झाले नाही, त्याच्या
उत्तराने ते आश्चर्यचकित झाले, आणि शांत झाले.

२७ मग पुनरूत्थान नाही असे म्हणणारे काही सदूकी त्यांच्याकडे आले त्यांनी त्याला प्रश्न विचारला. ते म्हणाले, २८ "राब्बी (गुरूजी)
मोशेने आमच्यासाठी लिहून ठेवले आहे की, जर एखाद्याचा भाऊ मेला, व त्या भावाला बायको आहे. पण मूल नाही, तर त्याच्या
भावाने त्या विधवेशी लग्न करावे, आणि भावासाठी त्याला मुले व्हावीत. २९ सात भाऊ होते. पहिला भावाने लग्न केले, व तो मूल
न होता मेला. ३० नंतर दुस-या भावाने तिच्याशी लग्न केले. ३१ नंतर तिस-याने तिच्याशी लग्न केले, सातही भावांबरोबर तीच
गोष्ट घडली, कोणालाही मुले न होता ते मरण पावले. ३२ नंतर ती स्त्री ही मरण पावली. ३३ तर मग पुनरूत्थानाच्या वेळी ती
कोणाची बायको होईल? कारण त्या सातांनीही तिच्याबरोबर लग्न केले होते. ३४ तेंव्हा येशूवाह त्यांना म्हणाला, "या युगातले लोक
लग्न करून घेतात, व लग्न करून देतात. ३५ परंतु जे लोक त्या येणा-या युगामध्ये, व मृतांच्या पुनरूत्थानामध्ये भाग घेण्यासाठी
पात्र ठरतील, ते लग्न करून घेणार नाहीत. आणि लग्न करून देणार नाहीत, ३६ आणि ते मरणार नाहीत. कारण ते याव्हे
एलोहिमच्या मालाक (देवदूता) सारखे आहेत. ते पुनरूत्थानाचे मुले असल्यामुळे ते याव्हे एलोहिमची मुले ही आहेत. ३७ जळत्या
झुडुपाविषयी मोशेने लिहिले, तेंव्हा त्याने याव्हे आदोनायला अब्राहामाचा एलोहिम इसाहाकाचा एलोहिम आणि याकोबाचा एलोहिम असे
म्हंटले, व मेलेले सुद्धा उठविले जातात, हे दाखवून दिले. ३८ याव्हे एलोहिम मेलेल्यांचा नाही तर जिवंतांचा याव्हे एलोहिम आहे.
सर्व लोक जे त्याचे आहेत, ते जिवंत आहेत." ३९ काही तोराह चे राब्बी म्हणाले "राब्बी उत्तम बोलतात!" ४० तेंव्हा त्याला आणखी
प्रश्न विचारण्याचे धाडस कोणी केले नाही.

४१ परंतु तो त्यांना म्हणाला, "मशीहा दाविदाचा मुलगा आहे असे ते कसे म्हणतात. ४२ कारण दावीद स्वतः तेहिलीम च्या सेफेरमध्ये
(स्तोत्राच्या पुस्तकात) म्हणतो. "अदोनाई माझ्या अदोनाईला म्हणाला, तू माझ्या उजवीकडे बैस. ४३ जो पर्यंत मी तुझ्या शत्रूला
तुझ्या पायाखालचे आसन करीत नाही, तो पर्यंत."४४ अशा रीतीने दावीद त्याला अदोनाई म्हणतो, तर मग मशीहा दावीदाचा मुलगा
कसा?" ४५ सर्व लोक हे ऐकत असताना, तो थालमीद ला (शिष्यांना) म्हणाला, तोराह च्या राब्बी विषयी सावध असा. त्यांना लांब
झगे घालून फिरणे आवडते. ४६ त्यांना बाजारात शालोम घेण्यास सभास्थानत महत्वाच्या आसनावर, व मेजवानीच्या वेळी मानाच्या
जागी बसणे आवडते. ४७ ते विधवांची घरे खाऊन फस्त करतात, आणि देखाव्यासाठी लांब प्रार्थना करतात. या माणसांना अत्यंत
वाईट शिक्षा होईल.

**२१.** १ येशूवाहने वर पाहिले व श्रीमंत लोकांना दानपेटीत दाने टाकताना न्याहाळले. २ त्याने एका गरीब विधवेलाही तांब्याची दोन
नाणी टाकताना पाहिले. ३ तेंव्हा तो म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, या गरीब विधवेने इतर सर्वांपेक्षा अधिक टाकले. ४ कारण
या सर्व लोकांनी आपल्या भरपूर संपत्तीमधून काही भाग दान म्हणून टाकले. परंतु तिने गरीब असून आपल्या उपजीविकेतील सर्वच
टाकले.

५ थालमीद (शिष्यां) तील काही जण मंदिराविषयी असे बोलत होते की, ते सुंदर पाषाणांनी आणि नवसाच्या अर्पणांनी सुशोभित केले
आहे. येशूवाह म्हणाला, ६ "या गोष्टी तुम्हीं पाहताना असे दिवस येतील की, एकावर एक असा एकही दगड ठेवला जाणार नाही,
ते सर्व पाडले जातील." ७ त्यांनी त्याला प्रश्न विचारला आणि ते म्हणाले, "राब्बी या गोष्टी केंव्हा घडतील? व या गोष्टी घडणार
आहेत यासंबंधी कोणते चिन्ह असेल?" ८ आणि तो म्हणाला, "तुम्हांला कोणी फसवू नये म्हणून सावध राहा. कारण माझ्या नावाने
पुष्कळ येतील, आणि तो मी आहे असे म्हणतील. आणि ते म्हणतील वेळ जवळ आली आहे. त्यांच्यामागे जाऊ नका! ९ जेंव्हा
तुम्हीं लढाया व दंगे याविषयी ऐकाल, तेंव्हा घाबरू नका. कारण या गोष्टी घडल्याच पाहिजेत. पण एवढयात शेवट होणार

नाही." १० पण तो त्यांना म्हणाला, "एक राष्ट्र दुस-या राष्ट्रावर उठेल. ११ मोठे भूकंप होतील, दुष्काळ पडतील, आणि वेगवेगळया ठिकाणी पीडा उद्‌भवतील. भितीदायक घटना घडतील, आणि आकाशात मोठी चिन्हे घडतील. १२ परंतु हे सर्व होण्यापूर्वी ते तुम्हांला अटक करतील. ते तुमचा छळ करतील. चौकशीसाठी ते तुम्हांस सभास्थानांसमोर उभे करतील, आणि तुरूंगात टाकतील. माझ्या नावासाठी ते तुम्हांला राजे, व राज्यपाल यांच्यासमोर नेतील. १३ यामुळे तुम्हांला माझ्याविषयी साक्ष देण्याची संधी मिळेल. १४ आपला स्वतःचा बचाव कसा करायचा याविषयी काळजी करू नका, अशा मनाची तयारी करा. १५ कारण मी तुम्हांला असे शब्द व अशी बुद्धी देईन की, ज्यामुळे त्यांना तुमचा विरोध करायला, किंवा तुमच्याविरूद्ध बोलायला मुळीच जमणार नाही. १६ परंतु आईवडील, भाऊ, नातेवाईक, आणि मित्र तुमचा विश्वासघात करतील, आणि तुम्हांपैकी काही जणांना ठार मारतील. १७ माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा व्देष करतील, १८ परंतु तुमच्या डोक्यावरील एक केसही नाहीसा होणार नाही. १९ आपल्या सहनशीलतेने तुम्हीं जिवाचे रक्षण कराल.

२० जेंव्हा तुम्हीं यरूशलेमाला सैन्यांनी वेढा घातलेला पाहाल, तेंव्हा तुम्हांला कळून येईल की, तिचा नाश होण्याची वेळ आली आहे. २१ जे यहूदीयात आहेत त्यांनी डोंगरांमध्ये पळून गेले पाहिजे. जे रानात आहेत, त्यांनी नगरात जाऊ नये. २२ ज्या सर्व गोष्टी लिहिलेल्या आहेत, त्या पूर्ण होण्यासाठी हे सूड घेण्याचे दिवस आहेत. २३ त्या दिवसांत ज्या गरोदर स्त्रिया आहेत, व ज्या अंगवर पाजणा-या असतील, त्यांच्यासाठी ते किती भयंकर होईल. अशा स्त्रियांची खरोखर दुर्दशा होईल. मी असे म्हणतो, कारण देशावर मोठे संकट येईल, आणि लोकांवर याव्हे एलोहिमचा क्रोध ओढवेल. २४ ते तरवारीच्या धारेने पडतील, आणि त्यांना बंदीवान करून राष्ट्रांत नेतील, आणि यहूदीतर लोकांचा काळ संपेपर्यंत, यहूदीतर राष्ट्रे यरूशलेम पायाखाली तुडवतील.

२५ सूर्य, चंद्र, तारे यांच्यात चिन्हे होतील. पृथ्वीवरील राष्ट्रे हतबल होतील, व समुद्राच्या गर्जणा-या लाटांनी ते घाबरून जातील. २६ भीतिमुळे लोक बेशुद्ध होतील, आणि जगात काय घडणार आहे ह्या धास्तीमुळे व भीतिमुळे लोक दुर्बल होतील. आकाशातील सामर्थ्य डळमळीत होतील. २७ नंतर ते मनुष्याच्या मुलाला सामर्थ्याने आणि वैभवाने मेघात येताना पाहतील. २८ मग या गोष्टी घडण्यास आरंभ होईल तेंव्हा सरळ उभे राहा, आणि तुमचे मस्तक वर करा. कारण तुमच्या सुटकेची वेळ जवळ येत आहे."

२९ नंतर त्याने त्यास एक दाखला सांगितला. "अंजिराच्या झाडाकडे व इतर दुस-या सर्व झाडांकडे पाहा. ३० त्यांना पालवी येऊ लागली की, तुमचे तुम्हींच समजता की उन्हाळा अगदी जवळ आला आहे. ३१ त्याच प्रमाणे, या गोष्टी घडताना तुम्हीं पाहाल तेंव्हा ओळखा की, याव्हे एलोहिमचे राज्य जवळ आले आहे. ३२ मी तुम्हांस खरे सांगतो की, ह्या सर्व गोष्टी घडून येईपर्यंत ही पीढी नाहीशी होणार नाही. ३३ आकाश व पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने नाहीशी होणार नाहीत. ३४ सावध राहा दारूबाजी आणि आधाशीपणात तुमच्या वेळ घालवू नका. किंवा संसाराच्या चिंता याकडून तुमची अंतःकरणे जड होतील, व तो दिवस पाशासारखा अकस्मात तुमच्यावर येईल. ३५ कारण तो सर्व पृथ्वीच्या पाठीवर राहणा-या सर्वांवर तसाच येईल. ३६ सर्व समयी जागृत राहा, होणा-या सर्व गोष्टी चुकविण्यासाठी, आणि विश्वासाने मनुष्याच्या मुलासमोर उभे राहणे शक्य व्हावे, यासाठी प्रार्थना करा." ३७ दर दिवशी तो मंदिरात शिक्षण देत असे, परंतु रात्री मात्र तो जैतूनाचा डोंगर म्हंटलेल्या टेकडीवर जात असे. ३८ सर्व लोक मंदिरात जाण्यासाठी, व त्याचे ऐकण्यासाठी पहाटेस उठून त्याच्याकडे जात असे.

**२२.**१ नंतर बेखमीर भाकरीचा सण ज्याला पेसॅह (वल्हांडण) म्हणतात तो समय जवळ येत होता. २ आणि एलयोवन कोहेन (मुख्य याजक), तोराह चे राब्बी(नियमशास्त्राचे शिक्षक) येशूवाहला कसे मारता येईल, हे बघत होते. कारण त्यांना लोकांची भीति वाटत होती. ३ नंतर सैतान यहूदामध्ये ज्याला इस्कर्योत म्हणत, व जो बारा जणापैकी एक होता. त्याच्यात शिरला. ४ यहूदा एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व मंदिराचे अधिकारी यांच्याकडे गेला. आणि येशूवाहला त्यांच्या हाती कसे धरून देता येईल, याविषयी त्याने बोलणी केली. ५ त्यांना फार आनंद झाला, व त्यांनी त्याला पैसे देण्याचे मान्य केले. ६ म्हणून त्याने संमति दर्शविली, आणि तो येशूवाहला गर्दी नसेल तेंव्हा धरून त्यांच्या हाती देण्याची संधी शोधू लागला. ७ बेखमीर भाकरीचा सण ज्या दिवशी पेसॅह

(वल्हांडणा) चा कोकरू मारावयाचे तो दिवस आला. ८ तेंव्हा त्याने केफा व योहानान यांना सांगून पाठविले की, "जा आणि आपणांसाठी पेसॅह (वल्हांडण) सणाच्या भोजनाची तयारी करा, म्हणजे आपण ते खाऊ." ९ केफा व योहानान येशूवाहला म्हणाले, "आम्हीं ते कोठे करावे, अशी तुमची इच्छा आहे?" १० तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं नगरात प्रवेश कराल तेंव्हा पाण्याचे भांडे घेऊन जाणारा एक मनुष्य तुम्हांला भेटेल. तो ज्या घरात जाईल, तेथे जा. ११ आणि घरमालकांस सांगा, "राव्बी नी तुम्हांला विचारले आहे की, माझ्या थालमीद सह पेसॅह (वल्हांडण) सणाचे भोजन करता येईल, ती पाहुण्यांची खोली कोठे आहे?" १२ तो मनुष्य तुम्हांला माडीवरील सजविलेली खोली दाखवील, तेथे तयारी करा." १३ तेंव्हा केफा व योहानान तेथून निघाले. जसे येशूवाहने सांगितले तसेच सर्व घडले, तेंव्हा त्यांनी पेसॅह (वल्हांडणा) च्या भोजनाची तयारी केली.

१४ वेळ झाली तेंव्हा येशूवाह त्याच्या थालमीद सह भोजनास बसला. १५ तो त्यांना म्हणाला, "मी दुःख भोगाण्यापूर्वी सुमच्याबरोबर पेसॅह (वल्हांडण) सणाचे भोजन घ्यावे अशी माझी फार इच्छा होती. १६ कारण मी तुम्हांला सांगतो की, याव्हे एलोहिमच्या राज्यात हे परिपूर्ण होईपर्यंत मी पुन्हा हे भोजन करणार नाही." १७ नंतर त्याने पेला घेतला आणि उपकार मानले तो म्हणाला, "हे घ्या, आणि आपसात वाटून घ्या. १८ कारण मी तुम्हांस सांगतो की, याव्हे एलोहिमच्या राज्यात येईपर्यंत यापुढे मी द्राक्षवेलीचा उपज मी पिणारच नाही." १९ नंतर त्याने भाकर घेतली, आणि उपकार मानले. त्याने ती मोडली, आणि त्यांना दिली व म्हणाला, "हे माझे शरीर आहे जे तुम्हांसाठी दिले आहे. माझ्या आठवणीसाठी हे करा." २० त्याच प्रमाणे, त्यांचे भोजन झाल्यावर त्याने प्याला घेतला आणि म्हणाला, "हा प्याला माझ्या **देम्ये हादेश बेरीथ** (रक्तात नवा करार) आहे. जो तुमच्यासाठी ओतला जात आहे."

२१ परंतु पाहा, माझा विश्वासघात करणा-याचा हात, माझ्याबरोबरच मेजावर आहे.२२ कारण मनुष्याचा मुलगा जसे निश्चित केले, आहे, त्याप्रमाणे मरावयास जाईल. परंतु ज्याने विश्वासघात केला आहे, त्याचा धिक्कार असो." २३ आणि ते आपापसात एकमेकाला प्रश्न विचारू लागले. "हे करणारा आपणापैकी कोण असावा?"

२४ तसेच त्यांच्यामध्ये अशासंबंधी वाद निर्माण झाला की, त्यांच्यामध्ये सर्वात श्रेष्ठ कोण आहे. २५ पण येशूवाह त्यांना म्हणाला, विदेश्यांचे राजे त्यांच्या लोकांवर सत्ता गाजवितात. इतर लोकांवर अधिकार असणारी माणसे लोकांनी त्यांना लोकांचे उपकारकर्ते म्हणण्यास भाग पाडतात, उपकारकर्ते म्हणवून घेतात. २६ परंतु तुम्हीं तसे नाही. त्या ऐवजी तुमच्यातील सर्वात मोठा असलेल्याने सर्वात लहान व्हावे. व जो अधिकारी आहे त्याने सेवक व्हावे. २७ तेंव्हा मोठा कोण? जो मेजावर बसतो तो की, जो सेवा करतो ता? जो मेजावर बसतो तो नाही का? परंतु मी तुम्हांमध्ये सेवा करणारासारखा आहे. २८ परंतु माझ्या परीक्षेमध्ये माझ्या पाठीशी उभे राहिलेले असे तुम्हींच आहात. २९ ज्याप्रमाणे माझ्या याव्हे अव्बाने माझी नेमणूक केली तरी मी तुमची नेमणूक राज्यावर करतो. ३० म्हणून तुम्हीं माझ्या राज्यात माझ्या मेजावर खावे व प्यावे आणि आसनावर बसून इस्त्राएलाच्या बारा वंशाचा न्याय करावा.

३१ शिमोना, शिमोना, ऐक! सैतानाने तुम्हांला गव्हासारखे चाळावे म्हणून मागितले आहे. ३२ परंतु शिमोना तुझा विश्वास ढळू नये म्हणून मी तुझ्यासाठी प्रार्थना केली आहे. आणि तू पुन्हा माझ्याकडे वळलास म्हणजे तुझ्या भावांस स्थिर कर. ३३ परंतु शिमोन केफा त्याला म्हणाला, "अदोनाई मी तुझ्याबरोबर तुरूंगात जाण्यासाठी तयार आहे." ३४ पण येशूवाह म्हणाला, "केफा मी तुला सांगतो, तू मला ओळखतोस हे तीन वेळा नाकारीपर्यंत आज कोंबडा आरवणार नाही." ३५ येशूवाह थालमीद ना (शिष्यांना) म्हणाला, "जेंव्हा मी तुम्हांला थैली व वहाणांशिवाय पाठविले, तेंव्हा तुम्हांस काही कमी पडले का, ते म्हणाले? "काहीही नाही." ३६ तो त्यांना म्हणाला, "पण आता ज्याच्याजवळ थैली आहे त्याने ती घ्यावी, आणि ज्याच्याजवळ तलवार नाही, त्याने आपला झगा विकावा आणि एक विकत घ्यावी. ३७ कारण मी तुम्हांस सांगतो, हा शास्त्रलेख माझ्यामध्ये परिपूर्ण झालाच पाहिजे. 'आणि तो अपराधी असा गणला गेला.' होय, हा माझ्याविषयीचा संदर्भ पूर्ण होत आहे." ३८ ते म्हणाले "अदोनाई पाहा, येथे दोन तलवारी आहेत." तो त्यांना म्हणाला "तेवढे पुरे!" ३९ तो निघाला आणि नेहमी प्रमाणे जैतूनाच्या डोंगराकडे गेला व थालमीद (शिष्य) ही त्याच्या मागोमाग गेले. ४० तो त्या ठिकाणी आला तेंव्हा त्यांना म्हणाला, "तुम्हीं मोहात पडू नये म्हणून प्रार्थन कारा." ४१ तो त्यांच्यापासून

दगडाच्या टप्प्याइतका दूर गेल्यानंतर त्याने गुडघे टेकले, आणि अशी प्रार्थना केली. ४२ याव्हे अव्वा जर तुझी इच्छा असेल तर हा
प्याला माझ्याकडून दूर कर. तरी माझ्या इच्छेप्रमाणे नको, तर तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे." ४३ आकाशातून एक याव्हे एलोहिम
मालाक (देवदूत) आला, व तो त्याला सामर्थ्य देत राहिला. ४४ दुःखाने ग्रासलेला असताना सुद्धा त्याने अधिक काकुळतीने प्रार्थना
केली. आणि त्याचा घाम रक्ताच्या थेंबासारखा जमिनीवर पडत होता. ४५ आणि जेंव्हा प्रार्थना करून तो उठला, आणि थालमीद
(शिष्यां) कडे आला, तेंव्हा ते त्यांच्या दुःखामुळे थकून जाऊन झोपी गेलेले आढळले. ४६ तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं का झोपत
आहात? उठा आणि मोहात पडू नये म्हणून प्रार्थना करा." ४७ तो बोलत असता लोकांचा जमाव आला. आणि बारा थालमीद
(शिष्यां) तील यहूदा इस्कर्योत म्हंटलेला एक जण त्यांच्यापुढे चालत होता. येशूवाहचे चुंबन घेण्यासाठी तो त्याच्याजवळ आला. ४८
परंतु येशूवाह त्यास म्हणाला "यहूदा चुंबन घेऊन मनुष्याच्या मुलाचा तू विश्वासघात करतोस काय?" ४९ त्याच्या भोवती जे होते ते
काय होणार हे पाहून म्हणाले, "अदोनाई आम्हीं तलवारीने मारावे काय ५० त्यांच्यापैकी एकाने एलयोवन कोहेन च्या (मुख्य
याजकाच्या) नोकरावर वार केला आणि त्याचा उजव कान कापला. ५१ येशूवाहने उत्तर दिले, "असे काही करू नका त्याने त्याच्या
कानाला स्पर्श केला व त्याला बरे केले. ५२ नंतर येशूवाह एलयोवन कोहेन (मुख्य याजक) मंदिराचे मुख्य अधिकारी, व वडील जे
त्याच्यावर चालून आले होते. त्यांना म्हणाला, "तुम्हीं तलवारी आणि सोटे घेऊन माझ्यावर चालून आलात, जसा मी लूटारू आहे.
५३ मी तर तुम्हांबरोबर दररोज मंदिरात असे, आणि तुम्हीं माझ्यावर हात टाकला नाही. परंतु ही तुमची आणि अंधाराचे राज्य
करण्याची वेळ आहे." ५४ त्यांनी त्याला अटक केली, व ते त्याला एलयोवन कोहेन च्या (मुख्य याजकाच्या) घरी घेऊन गेले पण
केफा दुरून त्यांच्या मागे चालला. ५५ त्यांनी अंगणाच्या मध्यभागी विस्तव पेटविला, आणि त्याच्याभोवती बसले. केफा ही त्यांच्यात
बसला. ५६ एका दासीने तेथे त्याला विस्तवाच्या उजेडात बसलेले पाहिले. तिने त्याच्याकडे निरखून पाहिले, आणि ती म्हणाली,
"हा मनुष्यही त्यांच्याबरोबर होता." ५७ केफा तो नाकारून म्हणाला, "बाई मी त्याला ओळखत नाही!" ५८ थोडया वेळानंतर दुस-या
मनुष्याने त्याला पाहिले आणि म्हणाला, "तू सुद्धा त्यांच्यापैकी एक आहेस!" पण केफा म्हणाला, "गृहस्था मी नाही!" ५९ नंतर सुमारे
एक तास झाल्यावर आणखी एक जण ठामपणे म्हणाला, "खात्रीने हा मनुष्यसुद्धा त्याच्यावरोबर होता. कारण हा गालीलाचा आहे."
६० परंतु केफा म्हणाला, "गृहस्था तू काय बोलतोस ते मला कळत नाही!" तो बोलत असताना त्याच क्षणी कोंबडा आरवला. ६१
आणि अदोनाईने वळून केफाकडे पाहिले. केफाला अदोनाईने उच्चारलेले वाक्य आठवले, "आज कोंबडा आरवण्यापूर्वी तू तीन वेळा
मला नाकारशील." असे सांगितलेले त्याला आठवले. ६२ मग तो बाहेर गेला आणि अति दुःखाने रडला.

६३ येशूवाह वर पहारा देणा-या लोकांनी त्याचा उपहास करायला व त्याला मारायला सुरूवात केली. ६४ त्यांनी त्याचे डोळे बांधले, व
त्याला प्रश्न विचारू लागले ते म्हणाले, "ओळख बघू तुला कोणी मारले?" ६५ आणि ते त्याचा अपमान करण्यासाठी आणखी पुष्कळ
काही बोलले. ६६ दिवस उगवला तेंव्हा वडील लोकांची, म्हणजे त्यात दोन्ही प्रकारचे लोक एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व
तोराह चे राव्वी (नियमशास्त्राचे शिक्षक) यांची सभा भरली. आणि ते त्याला त्यांच्या सभेत घेऊन गेले. ६७ ते म्हणाले, "जर तू
मशीहा आहेस तर आम्हांला सांग." येशूवाह त्यांना म्हणाला, "जरी मी तुम्हांला सांगितले, तरी तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेवणार
नाही. ६८ आणि जरी मी तुम्हांला प्रश्न विचारला, तरी तुम्हीं उत्तर देणार नाही. ६९ पण आतापासून मनुष्याचा मुलगा सर्वसमर्थ याव्हे
एलोहिमच्या उजवीकडे बसलेला असेल." ७० ते सर्व म्हणाले, "तर मग तू याव्हे एलोहिमचा मुलगा आहेस काय?" त्याने त्यांना उत्तर
दिले, "मी आहे असे तुम्हीं म्हणता ते बरोबर आहे." ७१ मग ते म्हणाले, "आता आपल्याला आणखी साक्षीची काय गरज आहे?
आपण स्वतः त्याच्या तोंडचे शब्द ऐकले आहेत."

**२३.**१ मग त्यांचा सर्व समुदाय उठला व त्यांनी येशूवाहला पिलाताकडे नेले. २ व ते त्याच्यावर आरोप करू लागले ते म्हणाले,
"आम्हीं या माणसाला लोकांची दिशाभूल करताना पकडले. तो कैसराला कर देण्यासाठी विरोध करतो आणि म्हणतो की, तो स्वतः
मशीहा एक राजा आहे." ३ मग पिलाताने येशूवाहला विचारले, "तू यहूद्यांचा राजा आहेस काय? येशूवाह म्हणाला, "मी आहे, हे तू
म्हणतोस ते बरोबर आहे." ४ मग पिलात एलयोवन कोहेन ला (मुख्य याजकांना) आणि जमावाला म्हणाला, "या माणसावर दोष

ठेवण्यास मला काही कारण आढळत नाही." ५ पण त्यांनी आग्रह धरला ते म्हणाले, "यहूदीयातील सर्व लोकांना तो आपल्या
शिकवणीने भडकावीत आहे. त्याने गालीलापासून सुरूवात केली, आणि येथपर्यंत आला आहे." ६ पिलाताने हे ऐकले, तेंव्हा त्याने
विचारले की, "हा मनुष्य गालीलाचा आहे" ७ जेव्हा त्याला समजले की येशूवाह हेरोदाच्या अंमलाखाली येतो. तेंव्हा त्याने त्याला
हेरोदाकडे पाठविले. तो त्या दिवसात यरूशलेमामध्येच होता. ८ हेरोदाने येशूवाहला पाहिले तेंव्हा त्याला फार आनंद झाला, कारण
त्याने त्याविषयी ऐकले होते. व त्याला असे वाटत होते की, तो एखादा चमत्कार करील व आपल्याला तो बघायला मिळेल. ९ त्याने
येशूवाहला अनेक प्रश्न विचारले, पण येशूवाहने त्याला उत्तर दिले नाही. १० एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि तोराह चे
राब्वी (नियमशास्त्राचे शिक्षक) तेथे उभे होते. ते त्याच्याविरूद्ध जोरदारपणे आरोप करीत होते. ११ हेरोदाने त्याच्या शिपायांसह
येशूवाहला अपमानस्पद वागणूक दिली, त्याची थट्टा केली. त्यांनी त्याच्यावर एक तलम झगा घातला, व त्याला पिलाताकडे परत
पाठविले. १२ त्याच दिवशी हेरोद आणि पिलात एकमेकांचे मित्र बनले, त्यापूर्वी ते एकमेकांचे वैरी होते.

१३ पिलाताने एलयोवन कोहेन (मुख्य याजक), पुढारी आणि लोकांना एकत्र बोलावले. १४ तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं या माणसाला
तो भडकावीत होता म्हणून आणले. आता मी त्याची तुमच्यासमोर चौकशी केली आहे. आणि तुम्हीं त्याच्याविरूद्ध जे आरोप करीत
आहात त्यासाठी मला काहीही आधार सापडत नाही. १५ हेरोदालाही आरोपाविषयी काहीही आधार सापडला नाही. कारण त्याने
त्याला परत आमच्याकडे आणले आहे. तुम्हीही पाहू शकता की, मरणाची शिक्षा देण्यास योग्य असे त्याने काहीही केलेले नाही. १६
म्हणून मी याला फटके मारून सोडून देतो. १७ (वचन १७ काही ग्रीक प्रतीमध्ये "प्रत्येक वर्षी वल्हांडणाच्या वेळी पिलाताला लोकांसाठी
एका कैद्याला सोडावे लागे." ) १८ पण ते सर्व एकत्र मोठयाने ओरडले! "या माणसाला ठार करा आणि आम्हांसाठी बरब्बाला
सोडा!" १९ तो तर नगरात झालेला दंगा, व खून यामुळे बंदिशाळेत टाकलेला होता. २० पुन्हा पिलात त्यांच्याशी बोलला कारण
येशूवाहला सोडण्याची त्याची इच्छा होती. २१ पण ते ओरडतच राहिले, "त्याला वधस्तंभावर खिळा, त्याला वधस्तंभावर खिळा!"
२२ तिस-यांदा पिलात त्याना म्हणाला, "परंतु या माणसाने असा कोणता गुन्हा केला आहे? मरणाची शिक्षा देण्यायोग्य असे मला
याच्याविरूद्ध काहीही आढळले नाही. यास्तव मी याला फटक्यांची शिक्षा सांगून सोडून देतो." २३ परंतु ते मोठयाने ओरडतच
राहिले, आणि त्याला वधस्तंभावर खिळण्याची मागणी करू लागले, आणि त्यांचे ओरडणे प्रबळ झाले. २४ पिलाताने त्यांची मागणी
मान्य करण्याचे ठरविले. २५ जो मनुष्य दंगा आणि खून यासाठी तुरूंगात टाकला गेला होता, व ज्याची त्यांनी मागणी केली होती,
त्याला त्याने सोडून दिले. पिलाताने त्यांच्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी येशूवाहला त्यांच्या हाती दिले.

२६ ते त्याला घेऊन जात असताना कुरेने येथील शिमोन नावाच्या मनुष्याला त्यांनी धरले, तो शेताकडून येत होता. त्यांनी वधस्तंभ
त्याच्यावर ठेवला, व त्यांनी त्याला तो वधस्तंभ येशूवाहच्या मागे वाहावयास लावला. २७ लोकांचा मोठा समुदाय त्याच्यामागे चालला
होता. त्यामध्ये त्याच्यासाठी शोक करणा-या, आणि रडणा-या काही स्त्रियांचाही समावेश होता. २८ येशूवाह त्यांच्याकडे वळून
म्हणाला, "यरूशलेमच्या कन्यांनो माझ्यासाठी रडू नका, तर आपल्या स्वतःसाठी आणि आपल्या मुलांबाळांसाठी रडा. २९ कारण पाहा
असे दिवस येत आहेत की, जेंव्हा लोक म्हणतील ज्या वांझ स्त्रिया, व जी उदरे प्रसवली नाहीत, व ज्या स्तनांनी पाजले नाही, ती
सुखी!" ३० तेंव्हा ते डोंगरांना म्हणू लागतील आमच्यावर पडा, व टेकडयांस म्हणतील आम्हांला झाका. ३१ जर लोक असे करतात,
जेंव्हा झाड हिरवे असते तर झाड सुकल्यावर काय होईल?" ३२ आणि दुसरे दोघेजन आपराधी होते, त्यांनाही मृत्युदंडाच्या शिक्षेची
अमलबजावणी करण्यासाठी नेत होते. ३३ आणि जेंव्हा ते गुन्हेगारांसमवेत 'कवटी' म्हंटलेल्या ठिकाणी आले. तेथे त्यांनी त्याला
वधस्तंभी गुन्हेगारांमध्ये खिळले. एका गुन्हेगाराला त्यांनी उजवीकडे ठेवले, व दुस-याला डावीकडे ठेवले. ३४ नंतर येशूवाह म्हणाला,
"हे याव्हे अब्वा त्यांची क्षमा कर, कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही." त्यांनी चिठ्ठया टाकून त्याचा झगा वाटून घेतला.
३५ लोक तेथे पाहात उभे होते, आणि पुढारी थट्टा करून म्हणाले, "त्याने दुस-यांना वाचविले, जर तो मशीहा, याव्हे एलोहिमचा
निवडलेला असेल, तर त्याने स्वतःला वाचवावे!" ३६ शिपायांनीही त्याची थट्टा केली, ते त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याला आंब
दिली. ३७ आणि ते म्हणाले, "जर तू यहूद्यांचा राजा आहेस तर स्वतःला वाचव!" ३८ त्याच्यावर असे लिहिले होते, "हा यहूदी

लोकांचा राजा आहे." ३९ तेथे खिळलेल्या एका गुन्हेगाराने त्याचा अपमान केला. तो म्हणाला, "तू मशीहा आहेस ना? स्वतःला व आम्हांलाही वाचव!" ४० परंतु दुस-या गुन्हेगाराने त्याला दटावले आणि म्हणाला, "तुला याव्हे एलोहिमचे भय नाही काय? तुलाही तीच शिक्षा झाली आहे. ४१ पण आपली शिक्षा योग्य आहे. कारण आपण जे केले, त्याचे योग्य फळ आपणांस मिळत आहे. पण या माणसाने काहीही अयोग्य केले नाही." ४२ नंतर तो म्हणाला, "येशूवाह तू आपल्या राज्याधिकाराने येशील, तेंव्हा माझी आठवण कर." ४३ येशूवाह त्याला म्हणाला, "मी आज तुला खचित सांगतो, तू मजबरोबर सुखलोकात असशील."

४४ त्यावेळी जवळजवळ दुपारचे बारा वाजले होते, आणि तीन वाजेपर्यंत सर्व प्रदेशावर अंधार पडला. त्यादरम्यान सूर्य प्रकाश नाहीस झाला.४५ आणि मंदिरातील पवित्रस्थानाचा पडदा फाटला, आणि तो दुभागला. ४६ येशूवाह मोठयाने ओरडून म्हणाला, "हे याव्हे अव्वा मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो," असे म्हंटल्यानंतर त्याने प्राण सोडून दिला. ४७ जेंव्हा रोमी सेनाधिका-याने काय घडले ते पाहिले, तेंव्हा त्याने एलोहिमचे गौरव केले, आणि म्हणाला, हा नीतिमान मनुष्य होता." ४८ हे दृष्य पाहण्यासाठी जमलेल्या लोकांनी घडलेल्या गोष्टी पाहिल्या, तेंव्हा ते छाती बडवीत परत गेले. ४९ परंतु त्याच्या ओळखीचे सर्वजण हे पाहण्यासाठी दूर उभे राहिले.त्यामध्ये गालीलाहून त्याच्यामागे आलेल्या स्त्रियाही होत्या.

५० तेथे एक योसेफ नावाचा एक मनुष्य होता, तो यहूदी सभेचा सभासद होता. तो चांगला आणि धार्मिक मनुष्य होता. ५१ तो सभेच्या निर्णयाशी, व कृतीशी सहमत नव्हता. तो यहूदीयातील अरिमथाई नगराचा होता. तो याव्हे एलोहिमच्या राज्याची वाट पाहत होता. ५२ हा मनुष्य पिलाताकडे गेला, आणि त्याने येशूवाहचे शरीर मागितले. ५३ ते त्याने वधस्तंभावरून खाली काढले, आणि तागाच्या वस्त्रात गुंडाळले. नंतर ते खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले. ही कबर अशी होती की, जिच्यात तोपर्यंत कोणाला ही ठेवले नव्हते. ५४ तो तयारीचा दिवस होता, आणि शब्बाथ सुरू होणार होता. ५५ गालीलाहून येशूवाह बरोबर आलेल्या स्त्रिया योसेफाच्या मागे गेल्या, त्यांनी ती कबर व तिच्यामध्ये ते शरीर कसे ठेवले ते पाहिले. ५६ नंतर त्या घरी गेल्या, व त्यांनी सुगंधी मसाले आणि लेप तयार केले. शब्बाथ दिवशी त्यांनी आज्ञेप्रमाणे विसावा घेतला.

**२४.** १ आठवडयाच्या पहिल्या दिवशी त्या स्त्रिया आगदी पहाटेस कबरेकडे आल्या. आणि त्यांनी स्वतः तयार केलेले मसाले आणले. २ त्यांना धोंड कबरेवरून लोटलेली आढळली, ३ त्या आत गेल्या. परंतु त्यांना अदोनाई येशूवाहचे शरीर सापडले नाही. ४ आणि असे झाले की, त्याविषयी त्या भ्रांतीत पडल्या असता पाहा, लखलखीत वस्त्रे ल्यालेले दोन पुरूष त्यांच्याजवळ उभे राहिले. ५ अतिशय भयभीत होऊन त्यांनी आपले चेहरे जमिनीकडे वळविले. ते दोन पुरूष त्यांना म्हणाले, "जो जिंवत आहे त्याचा शोध, तुम्हीं मेलेल्यांमध्ये का करता? ६ तो येथे नाही तो उठला आहे! तो गालीलात असताना त्याने तुम्हांला काय सांगितले, याची आठवण करा. ७ तो असे म्हणाला की, मनुष्याच्या मुलाला धरून पापी लोकांच्या हाती द्यावे, त्याला वधस्तंभावर खिळावे, आणि तिस-या दिवशी त्याने उठावे.

८ नंतर स्त्रियांना येशूवाहच्या शब्दाची आठवण झाली. ९ त्या कबरेपासून परतल्या, आणि त्यांनी या सर्व गोष्टीचे वर्तमान अकरा प्रेषितांना, व इतर सर्वांना सांगितले. १० त्या स्त्रिया मरीया मग्दालिया, योहान्ना, आणि याकोबाची आई मरीया ह्या होत्या. त्या आणि इतर स्त्रियांसुद्धा ज्या त्याच्यावरोबर होत्या. प्रेषितांना या गोष्टी सांगत होत्या. ११ पण प्रेषितांना त्यांचे सांगणे मूर्खपणाचे वाटले, आणि त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही. १२ पण केफा उठला आणि कबरेकडे पळाला. त्याने खाली वाकून पाहिले, पण त्याला तागाची गुंडाळण्याच्या वस्त्राशिवाय काही आढळले नाही. जे घडले त्याविषयी तो स्वतःशीच आश्चर्य करीत दूर गेला.

१३ त्याच दिवशी त्यांच्यातील दोघे थालमीद यरूशलेमापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या अम्माऊस नावाच्या गावाला चालले होते. १४ ते एकमेकांशी या घडलेल्या सर्व गोष्टीविषयी बोलत होते. १५ ते बोलत असताना आणि या गोष्टींची चर्चा करीत असताना येशूवाह स्वतः आला, आणि त्यांच्याबरोबर चालू लागला. १६ पण त्यांचे डोळे त्याला ओळखण्यापासून बंद करण्यात आले होते. १७ येशूवाह त्यांना म्हणाला, "चालत असताना तुम्हीं एकमेकांबरोबर बोलत आहात, त्या गोष्टी कोणत्या आहेत!" चालता

चालता ते थांबले, ते अतिशय दुःखी दिसले. १८ त्यांच्यातील एकजण ज्याचे नाव क्लयपा होते. तो त्याला म्हणाला, "ह्या दिवसांमध्ये घडलेल्या गोष्टी माहीत नसलेले असे यरूशलेमात राहणारे तुम्हीं एकटेच आहात काय?" १९ येशूवाह त्यांना म्हणाला, "तुमच्या मते कोणत्या गोष्टी?" ते त्याला म्हणाले, "नात्सेरेथ (नासरेथ) कर येशूवाह विषयीच्या सर्व गोष्टी हाच तो मनुष्य, जो आपल्या कृत्यांनी आणि शब्दांनी याव्हे एलोहिम समोर आणि मनुष्यांसमोर एक महान नबी (संदेष्टा) झाला. २० आणि आम्हीं चर्चा करीत होतो की, कसे आमच्या एलयोवन कोहेन (प्रमुख याजकां) नी, आणि अधिका-यांनी त्याला मरणदंड भोगण्यासाठी स्वाधीन केले. आणि त्यांनी त्याला वधस्तंभी खिळले. २१ आम्हीं अशी आशा केली होती की, तोच एक आहे जो इस्त्राएलाची मुक्तता करील. आणि या सगळयाशिवाय हे सर्व घडून गेलेल्या गोष्टीला आज तीन दिवस झालेत.

२२ आणि आमच्या परिवारातील काही स्त्रियांनी आम्हांला थक्क केले आहे. आज अगदी पहाटे त्या कबरेकडे गेल्या, परंतु त्यांना त्याचे शरीर सापडले नाही. २३ त्यांनी येऊन आम्हांला सांगितले की, त्यांना याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदुता) चा दृष्टात घडला. आणि देवदूतांनी सांगिताले की, तो जिवंत आहे. २४ तेंव्हा आमच्यातील काही कबरेकडे गेले,. आणि स्त्रियांनी जसे सांगितले होते तसेच त्यांना आढळले, पण त्यांनी त्याला पाहिले नाही." २५ मग येशूवाह त्यांना म्हणाला, "नव्बीईमनी (संदेष्टयांनी) सांगितलेल्या सर्व गोष्टीवर विश्वास ठेवण्यास, तुम्हीं अति मूर्ख आणि मंद आहात. २६ मशीहा साठी या सर्व गोष्टी सहन करणे, आणि त्याच्या गौरवात जाणे, आवश्यक नव्हते काय?" २७ आणि म्हणून त्याने मोशेपासून सुरूवात करून आणि सर्व नव्बीईम पर्यंत सांगून, शास्त्रलेखात त्याच्या विषयी काय लिहिले आहे, ते सर्व त्याने त्यांना स्पष्ट करून सांगितले. २८ ज्या खेडयाकडे ते जात होते त्याच्या जवळ ते आले, आणि येशूवाहने त्याने पुढे जाण्यास रोख दाखवला.२९ परंतु जास्त आग्रह करून ते म्हणाले, "आमच्या बरोबर राहा. कारण जवळजवळ संध्याकाळ झालीच आहे, आणि दिवसही जवळजवळ मावळला आहे." मग तो त्यांच्याबरोबर राहावयास आत गेला, ३० जेंव्हा तो त्यांच्याबरोबर मेजासभोवती बसला. त्याने भाकर घेतली, आणि उपकार मानले . नंतर त्याने ती मोडली, व ती त्यांना तो देऊ लागला. ३१ तेंव्हा त्यांचे डोळे उघडले, आणि त्यांनी त्याला ओळखले. पण तो त्यांच्यातून अदृश्य झाला.

३२ मग ते एकमेकांना म्हणू लागले, "तो वाटेवर आपणाशी बोलत असताना व शास्त्रलेख आपल्याला स्पष्ट करून सांगत असताना, आपली अंतःकरणे आतल्या आत उकळत नव्हती काय?" ३३ मग ते लगेच उठले व यरूशलेमेस परत गेले. तेंव्हा त्यांना आकरा प्रेषित व त्यांच्याबरोबर असलेले इतर एक जमलेले आढळले. ३४ प्रेषित आणि इतरजण म्हणाले, "खरोखर अदोनाई उठला आहे! आणि शिमोनाला दिसला आहे." ३५ नंतर त्या दोन थालमिद नी (शिष्यांनी) वाटेत काय घडले ते त्याला सांगितले, आणि तो भाकर मोडत असताना, त्यांनी त्याला कसे ओळखले ते सांगितले. ३६ ते या गोष्टी सांगत असतानाच येशूवाह त्यांच्यामध्ये उभा राहिला, आणि त्यास म्हणाला, "तुम्हांस शालोम (शांती) असो." ३७ ते घाबरले आणि भयभीत झाले. त्यांना असे वाटले की, ते अशुद्ध आत्मा पाहात आहेत.

३८ तो त्यांना म्हणाला, "तुम्हीं असे अस्वस्थ का झालात? तुमच्या मनात शंका का निर्माण झाल्या?" ३९ माझे हात व पाय पाहा, तुम्हांला मी दिसतो तोच मी आहे. मला स्पर्श करा आणि पाहा की, मला आहे तसे हाडमांस अशुद्ध आत्म्यांला नसते.४० असे बोलून त्याने त्यास आपले हातपाय दाखवले. तरीही त्यांच्या आनंदामुळे त्यांना ते खरे वाटेना. ४१ ते आश्चर्यचकित झाले तेंव्हा येशूवाह त्यांना म्हणाला, "येथे तुमच्याजवळ खाण्यासाठी काय आहे?" ४२ त्यांनी त्याला भाजलेला माशाचा तुकडा दिला. ४३ त्याने तो घेतला व त्यांच्यासमोर खाल्ला.

४४ तो त्यांना म्हणाला, "ह्याच त्या गोष्टी ज्या मी तुम्हांबरोबर असताना सांगितल्या होत्या की, मोशेचे तोराह (नियमशास्त्र) नव्बीईम (भविष्यवादी) आणि तेहिलीम (स्तोत्रे) ह्यात माझ्याविषयी जे सांगितले आहे, ते सर्व पूर्ण झालेच पाहिजे." ४५ नंतर शास्त्रलेख समजण्यासाठी त्याने त्यांची मने उघडली. ४६ मग तो त्यांना म्हणाला, "असे लिहिले आहे की मशीहाने दुःख भोगावे, आणि मेलेल्यांतून तिस-या दिवशी उठावे, ४७ आणि यरूशलेमापासून सुरूवात करून, सर्व राष्ट्रांस माझ्या याव्हे अव्वाने जे वचन दिले आहे

ते पाठवीन, पापक्षमेसाठी पश्चात्तापाची घोषणा करावी.४८ या गोष्टीचे तुम्हीं साक्षी आहात. ४९ आता मी तुम्हांला माझ्या याव्हे अव्बाचे जे वचन दिले आहे ते पाठवीन. परंतु जोपर्यंत तुम्हीं आकाशातील सामर्थ्याने भरले जात नाही, तो पर्यंत तुम्हीं या नगरात राहा."

५० नंतर तो त्यांना बाहेर दूरवर बेथानीपर्यंत घेऊन गेला, आणि त्याने हात वर करून आशिर्वाद दिला. ५१ तो त्यांना आशिर्वाद देत असतानाच तो त्यांना सोडून गेला, आणि त्याला आकाशात घेण्यात आले.५२ नंतर त्यांनी त्याची उपासना केली, व ते मोठया आनंदाने यरूशलेमाला परतले. ५३ आणि याव्हे एलोहिमची सतत स्तुति करीत, ते मंदिरात राहिले.

......... समाप्त .........

# .योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान.

.प्रस्तावना.

**लेखक** ः- स्वतः योहानानने हे शुभवर्तमान लिहिले, किंवा दुस-या कडून त्याने लिहून घेतले आहे, हे सांगता येत नाही.परंतु योहानान हा मूळ यहूदी-इस्त्राएली होता, आणि त्याची मातृभाषा ही हिब्रू व अरामीक होती. त्याने तोराह (नियमशास्त्र) व नबीईम चे (संदेष्टयांचे) आणि शास्त्रलेख ह्यातील वचनांचे संदर्भ सोबत जोडलेले आहे, हे पहावयास मिळते. त्याने हे शुभवर्तमान मूळ हिब्रू भाषेमधून लिहिलेले आहे, हे त्यातील वचनांचे आवशेष पुरावा देतात. योहानान हा जब्दीचा मुलगा होता. **लेखन काळ** ः अनिश्चित कालावधी.सदर नवीन करारातील कोणतेही मूळ दस्तावेज पुरावे म्हणून अस्तित्वात नसल्याने सर्व पुस्तकाबावत अंदाजी कालावधी सर्वांनी दिलेले आहेत.

**लेखाचा उद्देश** ः येशूवाह मशीहा बाबत सर्वांना सत्याच्या वचनाचे ज्ञान प्राप्त व्हावे. प्रत्येकांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा. त्याने आज्ञा केल्या प्रमाणे प्रत्येकाने त्याचे शिष्य होऊन, त्याने सोपविलेली सेवाकार्य करावे. स्वतःचे तारण साधून इतरांना देखील तारणाच्या मार्गात आणावे, हा मूळ उद्देश लेखाचा आहे.

## .योहानान ने लिहिलेले शुभवर्तमान.

१. १ ऐरेस्त (जग किंवा पृथ्वी ) अस्तित्वात आणण्यापूर्वी मशीहा अस्तित्वात होता. ( 'शब्द' ग्रीक शब्द 'लोगोस' चे मराठी
भाषांतर आहे. या ठिकाणी मशीहा हा मूळ शब्द आहे.मशीहा हा शब्द कोणत्याही भाषांतर करणा-यांनी वापरलेला नाही) तो
मशीहा याव्हे एलोहिम बरोबर होता, आणि मशीहा हा याव्हे एलोहिम होता.२ तो मशीहा सुरुवातीपासूनच याव्हे एलोहिम बरोबर
होता.३ मशीहा व्दारे सर्व काही अस्तित्वात आणण्यात आले. आणि मशीहा वांचून काही अस्तित्वात आले. ४ मशीहा मध्ये यशाह्
(जीवन) होते.ते यशाह (जीवन) जगातील लोकांसाठी ओर (प्रकाश) असे होते.५ हा ओर (प्रकाश) होशेख (अंधकारात)
प्रकाशतो पण त्या प्रकाशाला अंधकाराने पराभूत केले नाही.

६ योहानान (मूळात एलीया) नावाचा एक मनुष्य होता.याव्हे एलोहिमने त्याला पाठविले. ७ तो लोकांना प्रकाशाविषयी
(मशीहाविषयी) सांगण्यासाठी आला. यासाठी की, योहानान कडून मशीहा विषयी ऐकून लोकांनी विश्वास ठेवावा. ८ योहानान तो
मशीहा नव्हता. परंतु लोकांना मशीहा विषयी सांगण्यासाठी योहानान आला.९ खरा प्रकाश (मूळात मशीहा) जगात येणार होता, हा
मशीहा सर्व लोकांना यशाह् (प्रकाश) देतो.१० मशीहा अगोदरच जगात होता. त्याच्याव्दारेच जग अस्तित्वात आले, परंतु जगाने
मशीहाला ओळखले नाही.११ मशीहा जगात आला. जे त्याचे स्वतःचे होते, त्या लोकांकडे आला. परंतु त्याच्या स्वतःच्याच लोकांनी
त्याला आपले मानले नाही. १२ काही लोकांनी मशीहाला आपले मानले, त्यांनी मशीहा वर विश्वास ठेवला. विश्वास ठेवणा-या
सर्वांना, मशीहाने याव्हे एलोहिमचे बेन (मुले) होण्याचा हक्क दिला.१३ ही बेन (मुले) लहान बालके जन्मतात तशी जन्मली नाहीत.
त्यांचा जन्म आईवडिलांच्या इच्छेने किंवा योजनेमुळे झाला नाही, तर त्यांचा जन्म एलोहिम कडून झाला.

१४ मशीहा मनुष्य झाला आणि आमच्यामध्ये राहिला, आम्हीं त्याचे गौरव पाहिले, तो याव्हे एलोहिम अव्वाचा एकमेव अशा बेन
(मुलाचे) गौरव मशीहा शिवाय दुसरे असू शकत नाही. तो मशीहा कृपा (दयाळूपणा) आणि सत्य यांनी पूर्णपणे भरला होता. १५
योहानानने मशीहा विषयी लोकांना सांगितले. योहानान म्हणाला, "ज्याच्याविषयी मी सांगत आहे तो हाच. मी म्हणालो, माझ्यानंतर
येणारा माझ्याहून थोर आहे, तो माझ्या पूर्वीचा आहे." १६ मशीहा हा कृपा व सत्य यांनी पूर्णपणे भरला होता. मशीहा कडून
आम्हांला भरपूर आशिर्वाद मिळाले. १७ मोशेव्दारे तोराह् (नियमशास्त्र) दिले, पण दया व सत्याचा मार्ग ही येशूवाह मशीहा व्दारे
प्राप्त झाली. १८ कोणाही मनुष्याने आतापर्यंत याव्हे एलोहिमला कधी पाहिले नाही, परंतु एकमेव याव्हे एलोहिम जवळ येशूवाह, जो
याव्हे अव्वाच्या उराशी आहे. तो मुलाच्याव्दारे आम्हांला प्रकट झाला आहे. १९ यरूशलेम येथील यहूदी लोकांनी, योहानानकडे काही
कोहेन (याजक) व लेवी ह्यांना पाठविले. " तू कोण आहेस?" हे विचारण्यासाठी यहूदी लोकांनी त्यांना पाठविले.२० योहानान

अगदी मोकळेपणाने बोलला, त्याने उत्तर देण्यास नकार दिला नाही. तो स्पष्टपणे म्हणाला, “ मी मशीहा नाही.” योहानानने लोकांना तेच सांगितले.२१ यहूदी लोकांनी योहानानला विचारले , “ तर मग तू कोण आहेस? तू एलीया आहेस काय?” योहानानने उत्तर दिले, “ नाही, मी एलीया नाही.” यहूदी लोकांनी विचारले, “ तू नबी (संदेष्टा) आहेस काय?” योहानानने म्हंटले , “ नाही मी नबी (संदेष्टा) नाही.” २२ यावर यहूदी लोक म्हणाले, “ तू कोण आहेस?” तुझ्याविषयी आम्हांला सांग. ज्या लोकांनी आम्हांला पाठविले, त्यांना आम्ही काय उत्तर द्यावे, हे तू आम्हांला सांग. तू स्वतःला कोण म्हणवितोस?” २३ योहानानने त्यांना यशया नबीच्या (संदेष्टयाच्या) शब्दात सांगितले. “ मी वैराण रानात ओरडणा-या मनुष्याची वाणी आहे. ‘अदोनाई साठी सरळ मार्ग तयार करा.’” २४ परूशी लोकांनी या यहूदी लोकांना पाठविले होते. २५ लोक योहानानला म्हणाले, “ तू म्हणतोस की, मी मशीहा नाही, मी एलीया नाही, किंवा नबी ही (संदेष्टाही) नाही. मग तू लोकांचा बाप्तिस्मा का करतोस?” २६ योहानानने उत्तर दिले, “ मी लोकांचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, परंतु तुम्हांला माहिती नाही असा एक मनुष्य येथे तुमच्यात आहे. २७ माझ्या नंतर येणार तो हाच मनुष्य आहे, त्याच्या वहाणांचे बंद सोडण्या इतकीही माझी लायकी नाही.” २८ यार्देन नदीपलीकडील बेथानी गावात या सर्व गोष्टी घडल्या. योहानान तेथेच लोकांचा बाप्तिस्मा करीत असे. २९ दुस-या दिवशी योहानानने येशूवाहला आपणांकडे येताना पाहिले.योहानान म्हणाला, “ पाहा, हा याव्हे एलोहिमचा केवेस (कोकरा), जगाचे पाप वाहून नेणारा.३० याच्या विषयी मी बोलत होतो, तो म्हणाला, “ माझ्या नंतर एक मनुष्य येणार आहे ,परंतु तो माझ्याहून थोर आहे. तो माझ्या अगोदर पासून आहे. तो सदाजीवी आहे. ३१ तो कोण होता हे मलाही माहित नव्हते. परंतु मी पाण्याने बाप्तिस्मा करीत आलो यासाठी की, येशूवाह हाच मशीहा आहे. हे इस्राएलाला (यहूदी लोकांना) कळावे.” ३२ नंतर योहानान म्हणाला, “ मशीहा कोण होता हे मलाही माहित नव्हते. परंतु मी लोकांचा बाप्तिस्मा पाण्याने करावा म्हणून याव्हे एलोहिमने मला पाठविले, आणि याव्हे एलोहिमने मला सांगितले. “क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा)खाली येऊन एका मनुष्यावर स्थिरावताना दिसेल. ३३ तोच मनुष्य पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करील, योहानान म्हणाला, “ हे होताना मी पाहिले आहे.आकाशातून पवित्र आत्मा खाली उतरताना मी पाहिला. आत्मा कबुतरासमान दिसत होता. आणि तो येशूवाह वर येऊन स्थिरावला. ३४ म्हणून मी लोकांना सांगतो, ‘ तो येशूवाह, याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे.’”

३५ दुस-या दिवशी योहानान पुन्हा तेथे आला. योहानान बरोबर त्याचे दोन थालमीद (शिष्य) होते. ३६ योहानानने येशूवाहला जाताना पाहिले.योहानान म्हणाला, “ पाहा हा याव्हे एलोहिमचा केवेस (कोकरा)!” ३७ योहानान हे बोलत असता, त्या दोघा थालमीद (शिष्यां) नी ऐकले, म्हणून ते योहानानचे थालमीद (शिष्य) येशूवाहच्या मागे गेले. ३८ येशूवाहने मागे वळून पाहिले, तो दोघेजण आपल्यामागे येत आहेत, असे त्याला दिसले. येशूवाहने विचारले, “ तुम्हांला काय पाहिजे?” ते दोघे म्हणाले “ राब्बी (गुरूजी) तुंम्ही कोठे राहता?” ३९ येशूवाहने उत्तर दिले, “ माझ्याबरोबर या म्हणजे तुम्हांला दिसेल.” तेंव्हा ते दोघेजण येशूवाह बरोबर गेले. येशूवाह राहात होता ती जागा त्यांनी पाहिली, ते त्या दिवशी येशूवाह बरोबर तेथे राहिले. त्यावेळी सुमारे दुपारचे चार वाजले होते. ४० येशूवाह विषयी योहानान कडून ऐकल्यावर, ते दोघे जण येशूवाहच्या मागे गेले. त्यांच्यापैकी एकाचे नाव आंद्रिया होते.आंद्रिया हा शिमोनाचा (केफाचा) भाऊ. ४१ आंद्रियाने पहिली गोष्ट ही केली की, आपला भाऊ शिमोन याला शोधून काढले. आंद्रिया शिमोनाला म्हणाला, “ आम्हांला मशीहा सापडला आहे.”

४२ शिमोनाला घेऊन आंद्रिया येशूवाहकडे आला. शिमोनाकडे पाहून येशूवाह म्हणाला, “ तू योहानानचा मुलगा शिमोन आहेस.तुला केफा (अरामीकमध्ये केफा याचा अर्थ ‘खडक’) म्हणतील.४३ दुस-या दिवशी येशूवाहने गालील प्रांतात जाण्याचे ठरविले. तेंव्हा तो फिलिप्पाला भेटला. येशूवाह त्याला म्हणाला, “ माझ्यामागे ये.” ४४ जसे आंद्रिया व शिमोन (केफा) तसाच फिलिप्पही बेथसैदा या गावचा होता. ४५ फिलिप्प नथनेलास भेटला व म्हणाला,“ मोशेने व नबीईम (भविष्यवाद्दांनी) ही लिहिले, तो आम्हांला सापडला आहे.त्याचे नाव येशूवाह आहे.तो योसेफाचा बेन (मुलगा) असून नात्सेरेथ (नासरेथ) गावचा आहे.” ४६ परंतु नथनेल फिलिप्पाला म्हणाला, “ नात्सेरेथ (नासरेथ)! नात्सेरेथ (नासरेथ) मधून काही चांगले निघेल काय?” फिलिप्प म्हणाला, “ येऊन पहा.” ४७

येशूवाहने नथनेलाला आपल्याकडे येताना पाहिले, येशूवाह म्हणाला, “ हा येत असलेला मनुष्य खरोखर याव्हे एलोहिमच्या लोकांपैकी
एक आहे. त्याच्यात खोटे काहीच नाही.” ४८ “तुम्ही मला कसे ओळखता? ” नथनेलाने विचारले. येशूवाहने उत्तर दिले, “तू
अंजिराच्या झाडाखाली उभा होता, तेंव्हाच मी तुला पाहिले. फिलिप्पने तुला माझ्याविषयी सांगण्यापूर्वीच.” ४९ मग नथनेल
येशूवाहला म्हणाला, “राब्वी (गुरूजी) तुम्ही याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहात, तुम्हीं इस्त्राएलाचे राजे आहात.५० येशूवाह
नथनेलला म्हणाला, “तू अंजिराच्या झाडाखाली उभा असतानाच मी तुला पाहिले, असे मी सांगितले म्हणून तुझा माझ्यावर विश्वास
बसला. परंतु यापेक्षा मोठमोठया गोष्टी तू पाहशील!” ५१ येशूवाह पुढे म्हणाला, “मी तुला सत्य सांगतो की, तू प्रत्यक्ष आकाश
उघडताना, आणि याव्हे एलोहिमचे मालाक (देवदूत) मजकडे, म्हणजे मनुष्याच्या मुलाकडे खाली उतरताना, व मजपासून वर जाताना
तू पहाशील.”

२. १ दोन दिवसांनी गालीलातील काना गावी एक लग्न होते, येशूवाहची अम्मी (आई) तेथे होती.२ येशूवाह व त्याचे थालमीद
(शिष्य) यांनाही लग्नाला बोलाविले होते. ३ लग्नात पुरेसा द्राक्षारस नव्हता, सगळा द्राक्षारस संपला. तेंव्हा येशूवाहची अम्मी (आई)
त्याला म्हणाली, “त्यांच्याजवळ द्राक्षारस संपला आहे.” ४ येशूवाहने उत्तर दिले, “अम्मी (आई), तू मला यात का गुंतवितेस? माझी
वेळ अजून आलेली नाही.” ५ येशूवाहची अम्मी (आई) नोकरांना म्हणाली, “ येशूवाह तुम्हांला सांगेल तसे करा.” ६ त्या ठिकाणी
दगडाचे सहा मोठे रांजण होते. यहूदी लोक विशेष विधीप्रसंगी (जेवणापूर्वी व उपासनेपूर्वी व इतर विषेश प्रसंगी) धुण्यासाठी पाणी
ठेवण्यासाठी हे रांजण वापरीत असत. प्रत्येक रांजणात वीस ते तीस बादल्या पाणी मावत असे. ७ येशूवाह नोकरांना म्हणाला, “ हे
रांजण पाण्याने भरा.” मग नोकरांनी ते रांजण काठोकाठ भरले. ८ मग येशूवाह नोकरांना म्हणाला, “ आता यातील काही पाणी
काढा, आणि भोजन प्रमुखाकडे न्या.” मग ते पाणी घेऊन भोजन प्रमुखाकडे नेले. ९ मग लग्न समारंभातील भोजन प्रमुखाने ते
चाखून पाहिले, तर पाण्याचा द्राक्षारस झालेला होता. तो द्राक्षारस कोठून आला, हे त्या माणसाला माहित नव्हते.परंतु ज्या नोकरांनी
ते पाणी नेले होते, त्यांना तो द्राक्षारस कोठून आला होता, हे माहित होते. लग्ना समांरभाच्या भोजन प्रमुखाने वराला बोलविले.१०
तो वराला म्हणाला, “ लोक नेहमी उत्तम द्राक्षारस पहिल्यांदा वाढतात. नंतर पाहूणे भरपूर प्याले म्हणजे, मग लोक हलका प्रतीचा
वाढतात. परंतु तू तर उत्तम द्राक्षारस अजून राखून ठेवला आहेस.” ११ आकाशातील सामर्थ्याचे चिंन्ह म्हणून येशूवाहने केलेला, हा
पहिला चमत्कार होता. गालीलातील काना येथे येशूवाहने हा चमत्कार केला. आणि येशूवाहने आपली महानता दाखवून दिली.
तेंव्हा त्याच्या थालमीद (शिष्यां) नी त्याच्यावर विश्वास ठेवला.

१२ नंतर येशूवाह कफर्णहूम गावी गेला. येशूवाहची अम्मी (आई), अह्च (भाऊ), व त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्यासोबती गेले.ते
सर्व काही दिवस कफर्णहूमास राहिले. १३ यहूदी लोकांचा वल्हांडण सण अगदी जवळ आला होता, म्हणून येशूवाह यरूशलेमला
गेला. १४ येशूवाह यरूशलेम येथील मंदिरात गेला. येशूवाहला मंदिरात गुरे, मेढयां, आणि कबुतरे विकणारी माणसे दिसली. काही
माणसे मेज मांडून बसल्याचे त्याने पाहिले. ती माणसे लोकांना पैसे बदलून देण्याचा व्यापार करीत होती. १५ येशूवाहने दो-यांचे
तुकडे जोडून एक चाबूक तयार केला. मग येशूवाहने त्या सर्वांना तसेच मेंढयांना व गुरांना मंदिरातून हाकलून दिले. लोकांच्या
पैशाचा व्यापार करणा-यांचे मेज उलथेपालथे केले आणि त्यांचे पैसे विस्कटून टाकले. १६ येशूवाह कबुतरे विकणा-यांना म्हणाला,
“या सर्व गोष्टी येथून घेऊन जा, माझ्या याव्हे अव्वाचे (बापाचे) घर विकणा-यांची व विकत घेणा-यांची बाजार पेठ बनवू नका?”
१७ हे घडले तेव्हां येशूवाहच्या थालमीद (शिष्यां) ना शास्त्रलेखात जे लिहिले होते, त्याची आठवण झाली.“तुझ्या मंदिराच्या आवेशाने
मला ग्रासून टाकले जाईल.”

१८ यहूदी लोक येशूवाहला म्हणाले, “ एखादा चमत्कार करून आम्हांला चिन्हे दाखवा, आणि या गोष्टी करण्याचा तुम्हांला अधिकार
आहे हे सिद्ध करा.” १९ येशूवाहने उत्तर दिले , “ हे मंदिर नष्ट करा म्हणजे, मी ते तीन दिवसांत पुन्हा उभारीन.” २० यहूदी लोक
म्हणाले, “ लोकांना हे मंदिर बांधण्यासाठी शेहेचाळीस वर्षे लागली! आणि तुम्ही ते तीन दिवसांत बांधू शकता, यावर तुमचा
खरोखरच विश्वास आहे काय?” २१ परंतु येशूवाह मंदिराविषयी म्हणजे स्वतःच्या शरीराविषयी बोलला. २२ (नंतर येशूवाह

मेलेल्यांतून पुन्हा उठविला गेला, तेंव्हा त्याच्या थालमीद (शिष्यांना) तो हे बोलल्याचे आठवले. आणि त्याच्या शिष्यांनी त्याच्याविषयी लिहिलेल्या शास्त्रलेखावर आणि जे शब्द येशूवाह बोलला त्यावर विश्वास ठेवला.) २३ पेसॅह (वल्हांडण) सणासाठी येशूवाह यरूशलेमात होता. पुष्कळ लोकांनी येशूवाहवर विश्वास ठेवला. कारण तो करीत असलेले चमत्कार त्यांनी पाहिले. २४ परंतु येशूवाहने त्यांच्यावर भरवसा ठेवला नाही. कारण येशूवाहला त्यांचे विचार माहीत होते.२५ लोकांविषयी कोणी येशूवाहला सांगावे, याची त्याला काहीच गरज नव्हती. लोकांच्या मनात काय आहे, हे येशूवाह जाणून होता.

**३.** १ निकदेम नावाचा एक मनुष्य होता. निकदेम परूशी लोकांपैकी एक असून, तो यहूदी लोकांचा एक महत्वाचा पुढारी होता. २ एका रात्री निकदेम येशूवाहकडे आला आणि म्हणाला, " राव्वी तुम्ही याव्हे एलोहिमकडून पाठविलेले राव्वी (शिक्षक) आहात हे आम्हांला माहीत आहे.कारण जे चमत्कार करता, ते याव्हे एलोहिमच्या मदतीशिवाय कोणाही माणसाला करता येणार नाहीत." ३ येशूवाहने उत्तर दिले, "मी तुम्हांला खरे सांगतो. प्रत्येक व्यक्तीचा नव्याने जन्म झालाच पाहिजे, जर एखाद्या माणसाचा नव्याने जन्म झाला नाही, तर याव्हे एलोहिमचे राज्य पाहू शकणार नाही." ४ निकदेम म्हणाला, " जर एखादा माणूस म्हातारा असेल, तर त्याचा नव्याने जन्म कसा होईल. तो आपल्या आईच्या उदरात परत जाऊ शकत नाही! म्हणून त्या व्यक्तीचा दुस-यांदा जन्म होणारच नाही!" ५ येशूवाहने उत्तर दिले " मी तुम्हांला खरे सांगतो ः मनुष्याचा पाण्याने आणि आत्म्याने जन्म झाला नाही तर त्याच्या याव्हे एलोहिमच्या राज्यात प्रवेश होणे शक्यच नाही. ६ मनुष्य मानवी आईवडिलांच्या उदरी जन्माला येतो. परंतु त्याच्या आत्मिक जीवनाचा जन्म पवित्र आत्म्यापासून होतो. ७ तुमचा नवीन जन्म झाला पाहिजे म्हणून मी तुम्हांला सांगितल्याबद्दल आश्चर्यचकित होऊ नका. ८ वा-याला वाहायला पाहिजे तिकडे तो वाहतो. वारा वाहताना तुम्हांला त्याचा आवाज ऐकू येतो, परंतु वारा कोठून येतो व कोठे जातो हे तुम्हांला कळत नाही. आत्म्यापासून जन्म पावलेल्या प्रत्येक माणसाचे असेच असते.९ निकदेम म्हणाला, " हे सारे कसे शक्य आहे?" १० येशूवाह म्हणाला, " तुम्हीं इस्त्राएलाचे प्रमुख राव्बी (शिक्षक) आहात.तरी ही तुम्हांला या गोष्टी कळत नाही काय? ११ मी तुम्हांला खरे तेच सांगतो, आम्हांला जे माहीत आहे त्याविषयी आम्ही बोलतो. जे पाहिले त्याविषयी आम्ही सांगतो. परंतु आम्ही जे सांगतो, ते तुम्हीं लोक मानीत नाही.१२ मी तुम्हांला जगातील गोष्टीविषयी सांगितले, पण तुमचा माझ्यावर विश्वास बसत नाही. मग जर मी तुम्हांला आकाशातील गोष्टीविषयी सांगितले, तर तुम्हीं विश्वास ठेवणारच नाही! १३ मनुष्याचा मुलगा असा एकमेव आहे, जो वर आकाशांत जेथे होता तेथे गेला.आणि आकाशांतून उतरून खाली आला." १४ "मोशेने अरण्यात असताना सापाला उंच केले, तसेच मनुष्याच्या पुत्रालाही तसेच उंच केले पाहिजे. १५ अशासाठी की जो कोणी मनुष्याच्या मुलावर विश्वास ठेवतो त्याला अनंतकाळचे जीवन मिळू शकते." १६ होय, याव्हे एलोहिमने जगावर एवढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक मुलगा दिला. याव्हे एलोहिमने आपला मुलगा यासाठी दिला की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला अनंतकाळचे जीवन मिळावे.१७ याव्हे एलोहिमने आपल्या मुलाला जगात पाठविले. जगाचा न्याय करण्यासाठी याव्हे एलोहिमने आपला मुलाला पाठविला नाही. तर आपल्या मुलाव्दारे जगाचे तारण व्हावे यासाठी याव्हे एलोहिमने त्याला जगात पाठविले. १८ जो कोणी याव्हे एलोहिमच्या मुलावर विश्वास ठेवतो त्याचा न्याय (दोषी ठरविले जाणे) होणार नाही. परंतु जो विश्वास ठेवीत नाही त्याचा न्याय झाल्यासारखाच आहे. कारण त्याने याव्हे एलोहिमच्या एकुलता एका मुलावर विश्वास ठेवला नाही. १९ ज्या वस्तुस्थितीच्या आधारे लोकांचा न्याय केला जातो, ती ही जगामध्ये प्रकाश आला. परंतु लोकांना प्रकाश नको होता. त्यांना अंधार पाहिजे होता. कारण लोक वाईट कृत्ये करीत होते. २० वाईट कृत्ये करणारा प्रत्येक जण प्रकाशाचा व्देष करतो, तो प्रकाशाकडे येत नाही.कारण त्याने केलेली सर्व वाईट कृत्ये तो प्रकाश उघड करील. २१ परंतु जो सत्य मार्गाने चालतो तो प्रकाशाकडे वळतो.आणि त्याने केलेली कामे याव्हे एलोहिम कडून झाली होती हे तो प्रकाश दाखवून देईल.

२२ त्यानंतर येशूवाह आणि त्याचे थालमीद (शिष्य) यहूदीया प्रांतात गेले. तेथे येशूवाह आपल्या थालमीद (शिष्यां) सह राहिला आणि लोकांचा बाप्तिस्मा करीत असे. एनोन गाव शालिम नगराजवळ आहे, तेथे भरपूर पाणी असल्याने योहानान लोकांचा बाप्तिस्मा तेथे करीत असे. बाप्तिस्मा करून घेण्यासाठी लोक तेथे येत असत. २४ (योहानान तुरूंगात जाण्याच्या अगोदर हे घडले ) २५

योहानानच्या काही थालमीद (शिष्यांचा) दुस-या यहूदी लोकांबरोबर वादविवाद झाला.तोराह (नियमशास्त्रात) सांगितलेल्या शुद्धीकरणाच्या विधीविषयी ते वाद घालीत होते. २६ म्हणून ते थालमीद (शिष्य) योहानानकडे आले व म्हणाले, राब्बी यार्देन नदीच्या पलीकडे जो मनुष्य तुमच्याबरोबर होता तो आठवतो? तुम्हीं त्याच्याविषयी साक्ष देखील दिली, तो मनुष्य लोकांना बाप्तिस्मा देत आहे. व पुष्कळ जण त्याच्याकडे जात आहेत.२७ योहानानने उत्तर दिले, " याव्हे एलोहिम जे देतो तेच माणसाला मिळते. २८ मी हे सांगताना तुम्हीं स्वतःच ऐकले आहे की, 'मी मशीहा नाही. त्याच्याकरिता मार्ग तयार करण्यासाठी याव्हे एलोहिमने ज्याला पुढे पाठविले तो मी आहे.' २९ ज्याला वधू असते तो वर असतो. वराला मदत करणारा वराचा मित्र वराची वाट पाहतो, आणि वेगळया आवाजामुळे त्याच्या येण्याची चाहूल लागते काय, ते कान देऊन ऐकतो. वराची वाणी आली म्हणजे त्याच्या मित्राला आनंद होतो. तसाच आनंद मला वाटत आहे. आणि माझ्या आनंदाची वेळ आता आलेली आहे. ३० तो महान व्हावा आणि मी लहान व्हावे हे योग्यच आहे."

३१ जो येशूवाह वरून येतो, तो इतर सर्वांहून थोर आहे. जो मनुष्य या जगापासून आला आहे, तो जगाचा आहे. तो जगातल्याच गोष्टी विषयी बोलतो. परंतु जो आकाशांतून आला, तो येशूवाह इतर लोकांहून थोर आहे.३२ त्याने जे ऐकले व पाहिले त्याविषयी सांगतो, परंतु तो सांगतो त्या गोष्टी कोणी स्विकारीत नाहीत.३३ तो येशूवाह जे सांगतो, ते मान्य करणारा माणूस याव्हे एलोहिम सत्य आहे, याचा पुरावाच देतो. ३४ याव्हे एलोहिमने येशूवाहला पाठविले. आणि याव्हे एलोहिम सांगतो, त्याच गोष्टी विषयी तो सांगतो. कारण याव्हे एलोहिम त्याला आत्म्याने पुर्णपणे भरतो. ३५ बाप मुलावर प्रीति करतो. बापाने सर्व गोष्टीवरील अधिकार मुलाला दिलेला आहे. ३६ जो कोणी मुलांवर विश्वास ठेवतो, त्याला अनंतकाळचे जीवन मिळते. परंतु जो मुलाची आज्ञा पाळीत नाही, त्याला अनंतकाळचे जीवन कधीही मिळणार नाही. उलट याव्हे एलोहिमच्या कोध त्याच्यावर राहतो."

४. १ परूशांनी हे ऐकले की, येशूवाह योहानानपेक्षा अधिक लोकांना बाप्तिस्मा देऊन, थालमीद (शिष्य) करून घेत आहे.२ (परंतु खरे पाहता येशूवाह स्वतः बाप्तिस्मा देत नसे, तर त्याचे थालमीद (शिष्य) त्याच्या वतीने लोकांना बाप्तिस्मा देत असे.) परूश्यांनी आपणाविषयी ऐकले आहे, हे येशूवाहला समजले.३ म्हणून येशूवाह यहूदीयातून निघून परत गालील प्रांतात गेला.४ गालीलाकडे जाताना येशूवाह शोमरोन प्रांतांतून जावे लागले.५ शोमरोनातील सूखार नावाच्या गावात येशूवाह आला. याकोबाने आपला मुलगा योसेफ याला दिलेल्या शेताजवळ हे गाव आहे. ६ याकोबाची विहीर तेथे होती लांबच्या प्रवासामुळे येशूवाह थकला होता, म्हणून येशूवाह विहीरीजवळ बसला. ती दुपारची वेळ होती. ७ तेंव्हा पाणी नेण्यासाठी एक शोमरोनी स्त्री त्या विहीरीवर आली. येशूवाह तिला म्हणाला, "मला प्यावयास पाणी दे." ८ हे घडले तेंव्हा येशूवाहचे थालमीद (शिष्य) अन्न विकत घेण्यासाठी गावात गेले होते. ९ ती शोमरोनी स्त्री म्हणाली, "तुम्ही यहूदी आहात आणि मी तर एक शोमरोनी स्त्री आहे. तुम्ही माझ्या हातून पाणी प्यावयास मागता याचे मला मोठे आश्चर्य वाटते." (यहूदी लोकांचे शोमरोनी लोकांशी सलोख्याचे संबंध नव्हते.) १० येशूवाहने उत्तर दिले " याव्हे एलोहिम काय दान देतो याविषयी तुला माहीत नाही, आणि तुझ्या हातून पाणी मागणारा कोण हे देखील तुला माहीत नाही. तुला जर या गोष्टी माहीत असत्या तर तूच माझ्याकडे मागितले असतेस, आणि मी तुला जिवंत पाणी दिले असते." ११ ती स्त्री म्हणाली, " महाराज जिवंत पाणी तुम्हांला कोठून मिळणार, विहीर तर फार खोल आहे.आणि पाणी काढण्यासाठी तुमच्याजवळ पोहरा वगैरे काही नाही.१२ आमचा वडील (पूर्वज) याकोब याच्यापेक्षाही तुंम्ही मोठे आहात काय? याकोबानेच ही विहीर आम्हांला दिली, ते स्वतः या विहीरीचे पाणी पीत असत. शिवाय त्यांची मुले व गुरेढोरे याच विहीरीचे पाणी पीत असत." १३ येशूवाह म्हणाला, " जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल. १४ परंतु मी जे पाणी देतो ते पाणी जो पिईल, त्याला कधीही तहान लागणार नाही. मी दिलेले पाणी त्याच्या अंतर्यामी जिवंत पाण्याच्या झ-यासारखे होईल. त्या पाण्यामुळे त्याला अनंतकाळचे जीवन मिळेल."
१५ ती स्त्री येशूवाहला म्हणाली, महाराज " ते पाणी मला द्या. म्हणजे मला पुन्हा तहान लागणार नाही. आणि पाणी आणण्यासाठी मला इकडे परत यावे लागणार नाही." १६ येशूवाहने तिला सांगितले, "जा, तुझ्या पतीला घेऊन इकडे ये." १७ ती स्त्री म्हणाली, "मला पती नाही." येशूवाह तिला म्हणाला, " हे तू बरोबर सांगितलेस की, तुला पती नाही. १८ खरे तर तुझे पाच पती झाले,

आणि आता तू ज्याच्याबरोबर राहतेस तो तुझा पती नाही. तेंव्हा तू मला सत्यच सांगितलेस." १९ ती स्त्री म्हणाली, "महाराज मला आता कळले की, तुम्हीं एक नबी (संदेष्टा )आहात.२० आमचे वाडवडील या डोंगरावर उपासना करीत, परंतु तुम्ही यहूदी लोक म्हणता की, यरूशलेम हीच ती जागा आहे, जेथे लोकांनी उपासना केली पाहिजे."

२१ येशूवाह म्हणाला, " बाई माझ्यावर विश्वास ठेव! अशी वेळ येत आहे की, आपल्या अब्बाची (याव्हे एलोहिमची) उपासना करण्यासाठी यरूशलेमला अगर या डोंगरावर जाण्याची गरज पडणार नाही.२२ जे तुम्हांला समजत नाही, त्याची तुंम्ही शोमरोनी उपासना करता. आम्ही यहूदी लोक कशाची उपासना करतो हे आम्हांला चांगले कळते, कारण यहूदी लोकांकडूनच यशाह (तारण) येते. २३ असा काळ येत आहे की, खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने अब्बाची उपासना करतील. तशी वेळ आता आलेली आहे. आणि तशाच प्रकारचे उपासक अब्बाला पाहिजे. २४ याव्हे एलोहिम आत्मा आहे. म्हणून त्याच्या उपासकांनी आत्म्याने व खरेपणाने त्याची उपासना केली पाहिजे." २५ ती स्त्री म्हणाली, " मशीहा येणार आहे हे मला माहीत आहे, मशीहा येईल तेव्हा तो आम्हांला प्रत्येक गोष्टी समजावून सांगेल."२६ येशूवाह म्हणाला, " ती व्यक्ती तुझ्याशी आता बोलत आहे, मीच तो मशीहा आहे." २७ तेवढयात येशूवाहचे थालमीद (शिष्य) गावातून परत आले. येशूवाह एका बाईशी बोलत आहे, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. परंतु " तुम्हांला काय पाहिजे?" अगर " तुम्ही तिच्याशी का बोलत आहात?" असे त्यांच्यापैकी एकानेही विचारले नाही.२८ मग ती स्त्री आपली पाण्याची घागर तशीच विहीरीवर सोडून परत गावात गेली. तिने गावांतील लोकांना सांगितले. २९ एका मनुष्याने मी आतापर्यंत जे काही केलेले आहे, ते सर्व सांगितले. त्याला भेटायला चला, कदाचित तो मशीहा असेल.३० मग लोक गावातून बाहेर पडले आणि येशूवाहला भेटायला आले.३१ ती स्त्री गावात होती, तेव्हां येशूवाहचे थालमीद (शिष्य) त्याला विनवणी करू लागले." राब्बी (गुरूजी) दोन घास खाऊन घ्या." ३२ परंतु येशूवाहने उत्तर दिले, " माझ्याजवळ खावयाला जे अन्न आहे, त्याविषयी तुम्हांला काहीच माहिती नाही." ३३ म्हणून थालमीद (शिष्य) एकमेकांना विचारू लागले, " येशूवाहला कोणीतरी अगोदरच काही खावयास आणून दिले काय?" ३४ येशूवाह म्हणाला, "ज्याने मला पाठविले त्याच्या इच्छेप्रमाणे करणे हेच माझे अन्न! त्याने मला दिलेले काम पूर्ण करणे हेच माझे अन्न होय. ३५ जेंव्हा तुम्ही पेरणी करता तेंव्हा तुम्ही नेहमी म्हणता, 'पीक गोळा करायला अजून चार महिने आहेत.' परंतु मी तुम्हांला सांगतो, तुम्ही तुमचे डोळे उघडा. लोकांकडे पाहा, पीक तयार असलेल्या शेतांसारखेच ते आहेत. ३६ आताही पीक कापणा-या मजुराला मजुरी दिली जात आहे. तो अनंतकाळासाठी पीक गोळा करीत आहे. म्हणून आता पेरणी करणारा कापणी करणारासह आनंदी आहे.३७ एक पेरणी करतो तर दुसरा कापणी असे जे आपण म्हणतो ते किती खरे आहे. ३८ ज्या पीकासाठी तुम्ही मेहनत केली नाही, त्याची कापणी करण्यासाठी मी तुम्हांस पाठविले. दुस-या लोकांनी काम केले, आणि त्यांनी केलेल्या श्रमाचा फायदा तुम्हांस मिळतो."

३९ त्या गावातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी येशूवाह वर विश्वास ठेवला. त्या स्त्रीने येशूवाह विषयी जे सांगितले त्यावरून त्यांनी विश्वास ठेवला. तिने त्यांना सांगितले होते " मी केलेली प्रत्येक गोष्ट त्याने मला सांगितली." ४० शोमरोनी लोक येशूवाह कडे आले. त्यांनी येशूवाहला त्यांच्याबरोबर राहण्याची विनंती केली. म्हणून येशूवाह तेथे दोन दिवस राहिला. ४१ आणखी पुष्कळ लोकांनी येशूवाहच्या शिक्षणामुळे विश्वास ठेवला. ४२ ते लोक त्या स्त्रीला म्हणाले, " पहिल्यांदा तू जे आम्हांला सांगितलेस त्यामुळे आम्ही येशूवाहवर विश्वास ठेवला. परंतु आता स्वतःच त्याचे बोलणे ऐकले त्यामुळे विश्वास ठेवतो. आता आम्हांला कळले की, खरोखर हाच मनुष्य जगाचे यशाह (तारण) करील."

४३ दोन दिवसांनी येशूवाह तेथून निघाला आणि गालील प्रांतात गेला.४४ (पूर्वीच येशूवाह म्हणाला होता की, नबीईम (संदेष्टयाला) त्याच्या देशात मान मिळत नाही.) ४५ येशूवाह जेंव्हा गालीलात आला तेंव्हा तेथील लोकांनी त्याचे स्वागत केले. वल्हांडण सणाच्या दिवसात यरूशलेम येथे येशूवाहने केलेली सर्व कामे लोकांनी पाहिली होती. कारण ते लोकही सणानिमित तेथे गेले होते. ४६ येशूवाह पुन्हा गालीलातील काना गावाला भेट देण्यास गेला. काना गावीच येशूवाहने पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर केले होते. तेथे राजाचे जे मुख्य अधिकारी होते त्यापैकी एक अधिकारी कफर्णहूम नगरात राहत होता. या माणसाचा मुलगा आजारी होता.४७

येशूवाह यहूदीयातून आला आहे, आणि आता तो गालीलातच आहे, हे त्या अधिका-याने ऐकले. म्हणून तो मनुष्य येशूवाहकडे काना गावी गेला.येशूवाहने कफर्णहूम येथे येऊन आपल्या मुलाला बरे करावे, म्हणून त्याने याचना केली. कारण त्याचा मुलगा जवळजवळ मेला होता. ४८ येशूवाह त्याला म्हणाला, " चमत्कार आणि अद्‌भुत कामे पाहिली तरच तुंम्ही लोक माझ्यावर विश्वास ठेवाल." ४९ राजाचा अधिकारी म्हणाला, "महाराज माझा लहान मुलगा मरण्यापूर्वी माझ्या घरी चला.५० येशूवाहने उत्तर दिले, जा तुझा मुलगा वाचेल." येशूवाहने सांगितले त्यावर विश्वास ठेवून तो मनुष्य घरी गेला.५१ तो घरी चाललेला असताना वाटेतच त्याचे नोकर त्या माणसाला भेटले. त्यांनी त्याला सांगितले, " तुमचा मुलगा बरा आहे." ५२ त्या मनुष्याने विचारले " माझ्या मुलाला कधी पासून बरे वाटू लागले?" नोकर म्हणाले, "काल दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्याचा ताप उतरला." ५३ "तुझा मुलगा वाचेल" असे एक वाजण्याच्या सुमारालाच येशूवाहने सांगितले होते, हे त्या मुलाच्या अब्वाला माहीत होते. म्हणून त्याने व त्याच्या घरातील सर्वांनी येशूवाह वर विश्वास ठेवला. ५४ यहुदीयातून गालील प्रांतात आल्यानंतर, येशूवाहने केलेला हा दुसरा चमत्कार.

**५.** १ नंतर एका यहुदी सणासाठी येशूवाह यरूशलेमला गेला. २. यरूशलेमात एक तळे आहे, त्या तळयाला लागून पाच पडव्या आहेत.(होत्या) यहूदी हिब्रू भाषेत त्या तळयाला बेथेझाथा (बेथसैदा किंवा बेतेस्दा) म्हणत.हे तळे मेंढरे नावाच्या वेशीजवळ आहे.३ तळयाला लागून असलेल्या पडव्यामध्ये, अनेक रोगी पडून असत त्यात काही आंधळे, लंगडे, व काही पांगळे होते.४ कारण की याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) वेळोवेळी तळयात उतरून पाणी हालवीत असे, आणि पाणी हालविल्यानंतर प्रथम जो त्यात जाई, त्याला कोणताही रोग असला तरी तो बरा होत असे.५ तेथे अडतीस वर्षे आजारी असलेला एक रोगी पडून होता. ६ येशूवाहने त्याला तेथे पडलेले पाहिले. तो मनुष्य तेथे बराच काळ पडून असावा हे येशूवाहने ओळखले. म्हणून येशूवाहने त्या मनुष्याला विचारले, " तुला बरे व्हावयाला पाहिजे का?" ७ त्या आजारी मनुष्याने उत्तर दिले, "महाराज पाणी हालते तेंव्हा त्यात घेऊन जाण्यासाठी माझ्याजवळ कोणीही व्यक्ती नाही. सर्वात अगोदर पाण्यात उतरण्यासाठी मी निघालो की, माझ्या अगोदर दुसराच रोगी पाण्यात उतरतो." ८ मग येशूवाह म्हणाला, " उठून उभा राहा! आपली खाट उचल आणि चालू लाग." ९ तेंव्हा तो रोगी ताबडतोब बरा झाला, तो आपली खाट उचलून चालू लागला.हे सर्व ज्या दिवशी घडले तो शब्बाथाचा दिवस होता. १० म्हणून ब-या झालेल्या त्या मनुष्याला यहुदी म्हणाले, "आज शब्बाथाचा दिवस आहे. शब्बाथाच्या दिवशी तू आपली खाट उचलून नेणे, आपल्या तोराह च्या (नियमशास्त्राच्या) विरूद्ध आहे." ११ परंतु तो मनुष्य म्हणाला, " ज्याने मला बरे केले त्यानेच मला सांगितले की, तू आपली खाट उचल आणि चालू लाग." १२ यहुदी लोकांनी त्या मनुष्याला विचारले, " तुला आपली खाट उचलून चालायला कोणी सांगितले?" १३ परंतु तो कोण होता, हे त्या बरे झालेल्या माणसाला माहित नव्हते. त्या ठिकाणी बरेच अनेक होते, आणि येशूवाह तेथून निघून गेला होता.१४ त्यानंतर तो मनुष्य येशूवाहला मंदिरात भेटला. तेव्हा येशूवाह त्याला म्हणाला, " पाहा, तू बरा झाला आहेस, पण पाप करण्याचे सोडून दे. नाही तर तुझे अधिक वाईट होईल!" १५ नंतर तो मनूष्य तेथून निघाला, आणि त्या यहुदी लोकांकडे परत गेला. त्याने त्यांना सांगितले की, ज्याने मला बरे केले तो येशूवाह आहे.१६ येशूवाह शब्बाथ दिवशी या गोष्टी करीत होता, म्हणून यहुदी लोक येशूवाह शी दुष्टपणे वागू लागले. १७ परंतु येशूवाह यहुदी लोकांना म्हणाला, "माझ्या याव्हे अब्वाचे काम नेहमीच करीत असतो, व म्हणून मी ही काम करतो." १८ यावरून यहुदी लोकांचा येशूवाहला जिवे मारण्याचा पक्का निश्चय झाला. ते म्हणाले, " पहिली गोष्ट ही की, येशूवाह शब्बाथा संबंधीचा नियम मोडतो. दुसरे, 'याव्हे एलोहिम माझा अब्वा आहे!' असे तो म्हणाला, तो स्वतःची याव्हे एलोहिमशी बरोबरी करतो."

१९ परंतु येशूवाहने उत्तर दिले, "मी तुम्हांला खरे सांगतो. मुलगा जरी सर्व करू शकत असला, तरी अब्वाच्या इच्छेला डावलून एकटा काही करू शकत नाही.अब्वा करतो, त्या गोष्टी मुलगाही करतो. २० बाप मुलावर प्रीति करतो, आणि ज्या गोष्टी अब्वा करतो, त्या सर्व तो मुलाला दाखवितो. हा मनुष्य बरा झाला, परंतु यापेक्षाही मोठमोठया गोष्टी करण्याचे अब्वा मुलाला दाखविल. तेव्हा तुम्हीं सर्व जण चकित व्हाल. २१ अब्वा लोकांना मेलेल्यांतून उठवितो आणि जीवन देतो. तसेच मुलगाही त्याला ज्यांना द्यायला पाहिजे त्यांना जीवन देतो.२२ याशिवाय अब्वा कोणाचाही न्याय करीत नाही.परंतु न्याय करण्याचा सर्व अधिकार अब्वाने मुलाला

दिलेला आहे. २३ याव्हे एलोहिमने हे अशासाठी केले की, लोक जसा अव्वाचा सन्मान करतात. तसा त्यांनी मुलाचाही करावा. जर कोणी मुलाचा मान राखीत नाही, तर तो बापाचाही मान राखीत नाही. याव्हे अव्वानेच वेन ला (मुलाला) पाठविले आहे. २४ मी तुम्हांला खरे सांगतोः जो माझे ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याला अनंतकाळचे जीवन मिळेल. त्याला दोषी ठरविले जाणार नाही. तर त्याने मरणातून निघून जीवनात प्रवेश केला आहे. २५ मी तुम्हांला खरे सांगतो, अशी महत्वाची वेळ येत आहे. ती वेळ जवळजवळ आलेलीच आहे. जे लोक पापामध्ये मृत आहेत, ते याव्हे एलोहिमच्या मुलाची वाणी ऐकतील, आणि याव्हे एलोहिमच्या मुलाकडून ऐकलेल्या गोष्टी जे लोक स्विकारतील त्यांना अनंतकाळचे जीवन मिळेल. २६ खुद्द अव्वा पासून (याव्हे एलोहिमपासून) जीवनाचा लाभ होतो. म्हणून याव्हे अव्वाने मुलालाही जीवन देण्याची देणगी दिली आहे. २७ आणि मुलाने सर्व लोकांचा न्यायनिवाडा करावा, असा अधिकार याव्हे अव्वाने मुलाला दिला आहे. कारण तो मुलगा मनुष्याचाही मुलगा आहे. २८ तुम्हीं याचे आश्चर्य मानू नका, अशी वेळ येत आहे की, सर्व लोक जे मेलेले आहेत व आपल्या कबरेत आहेत, ते त्याची वाणी ऐकतील. २९ मग ते आपल्या कबरेतून बाहेर येतील. ज्या लोकांनी आपल्या आयुष्यात चांगली कामे केली ते उठतील, आणि त्यांना अनंतकाळचे जीवन मिळेल. परंतु ज्या लोकांनी वाईट कामे केली, ते शिक्षा भोगण्यासाठी उठतील.

३० "मी एकटा काहीच करू शकत नाही, मला सांगितल्याप्रमाणे मी न्याय करतो. म्हणून माझा न्याय योग्य आहे. कारण मी स्वतःच्या; समाधानासाठी नाही, परंतु ज्याने मला पाठविले त्याच्या समाधानासाठी न्याय करतो." ३१ "जर मी स्वतःच माझ्याविषयी लोकांना सांगितले, तर लोक त्या गोष्टी मानणार नाहीत. ३२ परंतु लोकांना याविषयी सांगणारा दुसरा एक जण आहे. आणि तो माझ्याविषयी ज्या गोष्टी सांगतो, त्या ख-या आहेत हे मला माहीत आहे." ३३ तुम्हीं योहानानकडे काही लोकांना पाठविले, आणि सत्याविषयी त्याने तुम्हांला सांगितलेच आहे. ३४ माझ्याविषयी लोकांना सांगण्यास मला कोणाही माणसाची गरज नाही. परंतु तुमचे यशाह (तारण) व्हावे, म्हणून मी या गोष्टी तुम्हांला सांगतो, ३५ पेटलेला दिवा प्रकाश देतो. तसाच योहानान होता, आणि तुम्हांला त्याच्या प्रकाशाकडून काही काळ आनंद मिळाला." ३६ परंतु मजजवळ माझ्याविषयी योहानानपेक्षाही मोठा पुरावा आहे, जी कामे मी करतो तीच माझा पुरावा आहेत. या गोष्टी माझ्या अव्वाने मला करण्यासाठी दिलेल्या आहेत. त्या गोष्टीवरून हे सिद्ध होते की, याव्हे अव्वाने मला पाठविले आहे. ३७ आणि ज्या याव्हे अव्वाने मला पाठविले, त्याने स्वतःही माझ्याविषयी साक्ष दिलेली आहे. परंतु तुम्हीं त्याची वाणी कधीही ऐकली नाही. तो कसा दिसतो हे तुम्हीं कधी पाहिले नाही. ३८ याव्हे अव्वाची शिकवण तुमच्यामध्ये राहात नाही. कारण याव्हे अव्वाने ज्या एकाला तुमच्याकडे पाठविले, त्याच्यावर तुम्हीं विश्वास ठेवित नाही. ३९ तुम्हीं शास्त्राचा काळजीपूर्वक अभ्यास करता. त्या शास्त्राच्याव्दारे आपल्याला अनंतकाळचे जीवन मिळते, असे तुम्हांला वाटते. तेच शास्त्र माझ्याविषयी सांगते! ४० तरी तुम्हीं अनंतकाळचे जीवन मिळण्यासाठी मजकडे येण्यास नकार देता."

४१ " मला माणसांकडून स्तुति नको, ४२ पण मी तुम्हांला ओळखतो. तुम्हांमध्ये याव्हे एलोहिम विषयी प्रीति नाही, हे मला माहीत आहे. ४३ मी माझ्या याव्हे अव्वा पासून आलो आहे. मी त्याच्यावतीने बोलतो, परंतु तरीही तुम्हीं मला स्विकारीत नाही. पण जर दुसरा कोणी मनुष्य फक्त स्वतःविषयी सांगत आला, तर मात्र तुम्हीं त्याचे मानाल. ४४ तुम्हांला एकमेकांकडून स्तुति करवून घ्यायला आवडते. परंतु एकाच याव्हे एलोहिम कडून होणारी स्तुति मिळविण्याचा प्रयत्न तुम्हीं कधी करीत नाही. मग तुम्हीं माझ्यावर कसा काय विश्वास ठेवाल? ४५ मी अव्वा समोर उभा राहून तुम्हांला दोषी ठरवीन असे समजू नका. तुमचे चुकते, असे मोशेच तुम्हांला म्हणतो. आणि मोशे आपले यशाह (तारण) करील अशी तुम्हांला आशा आहे. ४६ जर तुम्ही खरोखरच मोशेवर विश्वास ठेवला आहे. तर तुम्हीं माझ्यावरही विश्वास ठेवाल. कारण खुद्द मोशेनेच माझ्याविषयी लिहिले आहे. ४७ परंतु मोशेने जे लिहिले आहे, त्याच्यावर तुम्हीं विश्वास ठेवित नाही. तर मी सांगतो त्या गोष्टीवर तुम्हीं विश्वास ठेव शकणारच नाही.

**६.** १ नंतर येशूवाह गालील (किंवा तिबिर्या) सरोवराच्या पलीकडे गेला. २ तेंव्हा पुष्कळ लोक येशूवाहच्या मागे गेले. कारण येशूवाहने अनेक आजारी लोकांना बरे केले. व निरनिराळया मार्गांनी आपले जे सामर्थ्य दाखविले, ते लोकांनी पाहिले. म्हणून ते त्याच्यामागे गेले. ३ मग येशूवाह टेकडीच्या वर चढून गेला, तो आपल्या थालमीद (शिष्यां) सह तेथे बसला. ४ त्याच सुमारास यहुदी

लोकांचा वल्हांडण सण जवळ आला होता.५ येशूवाहने नजर वर करून पाहिले, तो लोकांचा मोठा समुदाय आपणांकडे येताना त्याला
दिसला. येशूवाह फिलिप्पाला म्हणाला, " आपण या लोकांना पुरेशा भाकरी कोठून विकत आणाव्या बरे?" ६ (फिलिप्पची परीक्षा
पाहण्यासाठी येशूवाहने त्याला हा प्रश्न विचारला. कारण आपण काय करायचे याचा विचार येशूवाहने अगोदरच करून ठेवला
होता.) ७ फिलिप्पने उत्तर दिले, " येथील प्रत्येकाला थोडी थोडी भाकर दिली, तरी या सर्वांना पुरेशी भाकर विकत घेण्यासाठी
आपणा सर्वांना महिनाभर काम करावे लागेल." ८ आंद्रिया नावाचा जो थालमीद (शिष्य) तेथे होता. आंद्रिया हा शिमोन केफाचा
भाऊ होता. ९ आंद्रिया म्हणाला, " येथे असलेल्या एका लहान मुलाजवळ जवाच्या पाच भाकरी आणि दोन मासे आहेत. परंतु
इतक्या लोकांना त्या पुरणार नाहीत." १० येशूवाह म्हणाला, " लोकांना खाली बसण्यास सांगा." ती बरीच गवताळ अशी जागा
होती, तेथे खाली बसलेले सुमारे पाच हजार पुरूष होते.११ मग येशूवाहने त्या भाकरी हातात घेतल्या, येशूवाहने भाकरीबद्दल याव्हे
एलोहिमचे उपकार मानले, आणि त्या तेथे बसलेल्या लोकांना दिल्या. मासे घेऊन त्याने तसेच केले. येशूवाहने लोकांना पाहिजे
तितके खाऊ दिले. १२ सर्व लोकांना खाण्यासाठी भरपूर होते. जेवण झाल्यावर येशूवाह त्याच्या थालमीद (शिष्यांना) म्हणाला,
"लोकांनी खाऊन उरलेले भाकरीचे व माशांचे तुकडे गोळा करा.काहीही वाया जाऊ देऊ नका." १३ म्हणून थालमीद (शिष्यांनी)
उरलेले तुकडे जमा केले. लोकांनी जेवायला सुरूवात केली, तेव्हा जवाच्या फक्त पाच भाकरी तेथे होत्या. थालमीद (शिष्यांनी)
उरलेल्या तुकडयांच्या बारा टोपल्या भरल्या. १४ येशूवाहने केलेला हा चमत्कार लोकांनी पाहिला, तेव्हा ते म्हणाले, " जगात येणारा
नबी (संदेष्टा) तो खरोखर हाच असला पाहिजे." १५ आपण राजा बनावे असे लोकांना वाटते, हे येशूवाहला माहित होते.
येशूवाहला आपला राजा करावे, असा बेत लोकांनी केला. तेव्हां येशूवाह तेथून निघून एकटाच डोंगराळ भागात गेला.

१६ त्या संध्याकाळी येशूवाहने थालमीद (शिष्य) गालील सरोवराकडे गेले. १७ थालमीद (शिष्य) एका नावेत बसून सरोवरापलीकडील
कफर्णहूम नगराकडे निघाले. आता अंधार पडला होता. आणि येशूवाह अजून त्यांच्याकडे आलेला नव्हता. १८ वारा फारच जोराने
वाहत होता, आणि सरोवरात मोठमोठया लाटा उसळू लागल्या होत्या. १९ त्यांनी नाव तीन ते चार मैल वल्हवीत नेली, तेव्हा त्यांना
येशूवाह नावेकडे येताना दिसला, तो सरोवराच्या पाण्यावरून चालत होता. तो नावेकडेच येत होता, तेव्हां थालमीद (शिष्य)
घाबरले. २० परंतु येशूवाह त्यांना म्हणाला, " मी आहे, भिऊ नका." २१ येशूवाह असे बोलल्यावर त्यांनी आनंदाने येशूवाहला
नावेत घेतले. आणि त्यांना जायचे होते, त्या ठिकाणी नाव लगेच येऊन काठाला लागली.

२२ दुसरा दिवस उजाडला. काही लोक सरोवराच्या दुस-या काठावर राहिले होते. त्या लोकांना माहित होते की, येशूवाह थालमीद
(शिष्यां) बरोबर नावेतून गेलेला नव्हता. त्यांना समजले की, येशूवाहचे थालमीद (शिष्य) नावेत बसून निघून गेलेत. आणि तेथे
असलेली तेवढीच एक नाव होती, हेही त्यांना ठाऊक होते. २३ पण मग तिबिर्याहून आणखी काही नावा आल्या. आदल्या दिवशी
ज्या ठिकाणी लोकांनी अन्न खाल्ले, त्या ठिकाणी त्या नावा येऊन काठाला लागल्या. अदोनाई येशूवाहने, याव्हे एलोहिमचे उपकार
मानल्यावर लोकांनी भाकरी खाल्ल्या, तीच ही जागा होती. २४ आता येशूवाह किंवा त्याचे थालमीद (शिष्य) तेथे नाहीत हे लोकांनी
पाहिले. म्हणून लोक नावेमध्ये बसले आणि कफर्णहूमला गेले. त्यांना येशूवाहला शोधायचे होते.२५ लोकांना येशूवाह सरोवराच्या
दुस-या काठावर भेटला.लोक म्हणाले, " राब्बी, (गुरूजी) तुम्ही इकडे कधी आलात?" २६ येशूवाहने उत्तर दिले, " तुम्ही माझा
शोध का करता? माझे सामर्थ्य सिद्ध करणारे चमत्कार पाहिले, म्हणून तुम्ही माझा शोध करता का? मी तुम्हांला खरे सांगतो, तुम्ही
मला शोधता कारण तुम्ही भाकरी खाल्ल्या, आणि तुमची तृप्ती झाली. २७ ऐहिक अन्न नाश पावते. म्हणून नाश पावणा-या
अन्नासाठी कष्ट करू नका. परंतु जे अन्न कायम टिकते आणि अनंतकाळचे जीवन देते, अशा अन्नासाठी तुम्ही कष्ट करा.
मनुष्याचा मुलगा ते अन्न तुम्हांला देईल. याव्हे एलोहिम जो अव्वा याने दाखवून दिले आहे की, तो मनुष्याच्या मुलाबरोबर आहे. २८
लोकांनी येशूवाहला विचारले, " आम्ही कोणत्या गोष्टी कराव्यात अशी याव्हे एलोहिमची इच्छा आहे?" २९ येशूवाहने उत्तर दिले,
"तुम्ही जे काम करावे अशी याव्हे एलोहिमची इच्छा आहे, ते हेच की, याव्हे एलोहिमने ज्याला पाठविले त्याच्यावर तुम्ही विश्वास
ठेवावा." ३० मग लोक येशूवाहला म्हणाले, "याव्हे एलोहिमने तुम्हांला पाठविले आहे, हे पटविण्यासाठी तुम्ही कोणता चमत्कार

कराल? तुम्हांला एखादा चमत्कार करताना जर आम्हीं पाहिले तर आम्हीं तुमच्यावर विश्वास ठेवू. तुम्ही काय कराल? ३१ अरण्यात
आमच्या पूर्वजांनी याव्हे एलोहिमने दिलेला मान्ना खाल्ला. शास्त्रलेखात असे लिहिले आहे की, याव्हे एलोहिमने त्यांना आकाशातील
भाकर खायला दिली." ३२ येशूवाह म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो. मोशेने तुमच्या लोकांना आकाशातील भाकर दिली
नाही.माझ्या अव्वाने तुम्हांला खरी आकाशातील भाकर देतो. ३३ याव्हे एलोहिमची भाकर कोणती? याव्हे एलोहिमची भाकर म्हणजे,
जो आकाशातून खाली उतरतो आणि जगाला जीवन देतो, तोच ती भाकर." ३४ ते लोक येशूवाहला म्हणाले, " महाराज आम्हांला
हीच भाकर नेहमी द्या.३५ मग येशूवाह म्हणाला, " मीच ती जीवनाची भाकर आहे. जो माझ्याकडे येतो त्याला कधीही भूक लागणार
नाही. आणि जो माझ्यावर विश्वास ठेवतो, त्याला कधीही तहान लागणार नाही. ३६ मी तुम्हांला पूर्वीच सांगितले की, तुम्ही मला
पाहिले, तरीही विश्वास ठेवीत नाही. ३७ अव्वा माझे लोक मला देतो. त्यातील प्रत्येकजण माझ्याकडे येईल, आणि माझ्याकडे
येणा-या प्रत्येकाला मी स्विकारीन. ३८ मी आकाशातून खाली आलो, ते नेहमीच याव्हे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे करण्यास आलो
आहे. मला पाहिजे ते करायला मी आलो नाही. ३९ याव्हे एलोहिमने मला दिलेल्या लोकांपैकी एकालाही मी गमवू नये, परंतु त्या
सर्वांना मी शेवटच्या दिवशी जिवंत असे उठवावे.ज्याने मला पाठविले ते मी हेच करावे, अशी त्याची इच्छा आहे. ४० मुलाला
पाहून त्याच्यावर विश्वास ठेवणा-या प्रत्येक व्यक्तीला अनंतकाळचे जीवन आहे.मी त्या व्यक्तीला शेवटच्या दिवशी उठवील. हेच
माझ्या अव्वाला हवे." ४१ मग यहूदी लोक येशूवाह विरूद्ध कुरकुर करू लागले. कारण "आकाशातून खाली आलेली लेहेम
(भाकर) मी आहे" असे तो म्हणाला. ४२ यहुदी लोक म्हणाले, " हा येशूवाह आहे. आपण त्याच्या आईवडिलांना ओळखतो.
येशूवाह तर योसेफाचाच मुलगा आहे. 'मी आकाशातून खाली आलो आहे,' असे तो कसे काय म्हणू शकतो?"

४३ मग येशूवाहने उत्तर दिले, " आपापसात कुरकूर करू नका. ४४ याव्हे अव्वानेच मला पाठविले आहे, याव्हे अव्वाच लोकांना
माझ्याकडे पाठवितो. त्या लोकांना मी शेवटच्या दिवशी परत उठवीन. अव्वाने जर एखाद्या व्यक्तीला आकर्षित केले नाही, तर ती
व्यक्ती माझ्याकडे येऊ शकत नाही.४५ नबीईम (संदेष्टयांनी) असे लिहिले आहे की, याव्हे एलोहिम सर्व लोकांना शिक्षण देईल.
लोक याव्हे एलोहिमचे ऐकतात, आणि त्याच्याकडून शिक्षण घेतात. तेच लोक माझ्याकडे वळतात. ४६ याव्हे एलोहिमने ज्याला
पाठविले, त्याच्याशिवाय दुस-या कोणीही याव्हे एलोहिमला पाहिले नाही.फक्त त्यानेच याव्हे एलोहिमला पाहिले आहे.४७ मी
तुम्हांला खरे तेच सांगतो, " जो विश्वास ठेवतो त्याला अनंतकाळचे जीवन मिळाले आहे. ४८ मी जीवन देणारी भाकर आहे.४९
तुमच्या वाडवडिलांनी अरण्यांत असताना, याव्हे एलोहिमने दिलेला मान्ना खाल्ला. परंतु इतर सर्व लोकाप्रमाणेच ते मरण पावले.५०
जी आकाशातून उतरते, ती लेहेम (भाकर) मी आहे. जर ही लेहेम (भाकर) कोणी खाईल, तर तो कधीच मरणार नाही. ५१
आकाशातून खाली उतरलेली जिवंत लेहेम (भाकर) मी आहे. जर कोणी ती लेहेम (भाकर) खाईल, तर तो अनंतकाळासाठी
जिवंत राहील. आणि ती लेहेम (भाकर) म्हणजे माझे शरीर आहे. जगातील लोकांना जीवन मिळावे, मी माझे शरीर देईन." ५२
नंतर यहूदी आपापसात वाद घालू लागले. ते म्हणाले, " हा मनुष्य आपले स्वतःचे शरीर आम्हांला कसे काय खायला देऊ शकेल?"
५३ येशूवाह म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, तुम्हीं मनुष्याच्या मुलाचे शरीर खाल्ले पाहिजे आणि त्याचे रक्त प्याले पाहिजे. जर
तुम्हीं हे करणार नाही, तर तुमच्यात खरे जीवन नाही.५४ जो कोणी माझे शरीर खातो आणि माझे रक्त पितो, त्याला अनंतकाळचे
जीवन मिळेल. शेवटच्या दिवशी मी त्याला उठवीन. ५५ माझे शरीर खरे अन्न आहे. आणि माझे रक्त खरे पेय आहे.५६ जो
माझे शरीर खातो आणि माझे रक्त पितो तो माझ्यात राहतो, आणि मी त्याच्यामध्ये राहतो. ५७ अव्वाने मला पाठविले, तो जिवंत
आहे आणि याव्हे अव्वा मुळे मी ही जगतो. म्हणून जो कोणी मला खातो, तो माझ्यामुळे जिवंत राहील.५८ आपल्या वाडवडिलांनी
अरण्यांत जी लेहेम (भाकर) खाल्ली, त्या भाकरीसारखी मी नाही.त्यांनी ती लेहेम (भाकर) खाल्ली, परंतु इतर सर्व लोकांप्रमाणे ते
मरून गेले. मी आकाशातून उतरलेली लेहेम (भाकर) आहे, जे कोणी ही लेहेम (भाकर) खातो तो अनंतकाळ जगेल." ५९
कफर्णहूम नगरातील सभास्थानात शिक्षण देताना येशूवाहने या सर्व गोष्टी सांगितल्या. ६० येशूवाहच्या थालमीद (शिष्यांनी) हे
ऐकले.त्यांपैकी अनेक जण म्हणाले, " हे शिक्षण स्विकारण्यास फार कठीण आहे. कोण हे शिक्षण मान्य करील?" ६१ आपले
थालमीद (शिष्य) याविषयी कुरकूर करीत आहेत, हे येशूवाहने ओळखले. म्हणून तो त्यांना म्हणाला, " ही शिकवण तुम्हांला

त्रासदायक वाटते काय? ६२ तर मग मनुष्याचा मुलगा जेथून आला, तेथे परत जाताना पाहून तुम्हांला तसेच त्रासदायक वाटेल काय? ६३ शरीराव्दारे मनुष्याला जीवन मिळत नाही. परंतु आत्म्याकडून ते यशाह (जीवन) मिळते. मी तुम्हांला सांगितलेल्या गोष्टी आत्म्याविषयी आहेत, म्हणूनच या गोष्टीपासून जीवन मिळते.६४ परंतु तुमच्या तील काही जण विश्वास ठेवीत नाहीत." जे लोक विश्वास ठेवीत नव्हते, ते येशूवाहला माहीत होते. येशूवाहला हे अगदी सुरूवातीपासूनच माहीत होते. आणि जो मनुष्य त्याचा विश्वासघात करणार होता, तो ही त्याला माहीत होता. ६५ येशूवाह म्हणाला, "म्हणूनच मी तुम्हांला म्हंटले की, जर याव्हे अब्बा एखाद्दा व्यक्तीला माझ्याकडे येऊ देत नसेल, तर ती व्यक्ती येणारच नाही." ६६ येशूवाहने हे सर्व सांगितल्यावर त्याच्या थालमीद (शिष्यां) पैकी बरेच जण त्याला सोडून गेले. येशूवाहच्या मागे जाण्याचे त्यांनी सोडून दिले.६७ नंतर येशूवाहने आपल्या बारा थालमीद (शिष्यां) ना विचारले, " तुम्हांलासुद्धा मला सोडून जावेसे वाटते काय?" ६८ शिमोन केफाने उत्तर दिले, "अदोनाई आम्ही कोठे जाणार? अनंतकाळच्या जीवनाची वचने तर तुमच्या जवळ आहेत. ६९ आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवतो. तुम्ही क्वादोश (पवित्र) व्यक्ती आहात, हे आम्हांला माहीत आहे." ७० मग येशूवाहने उत्तर दिले, " तुम्हा बारा जणांना मी निवडले, पण तुमच्यातील एक सैतान आहे." ७१ शिमोन इस्कर्योत याचा मुलगा यहूदा इस्कर्योत याच्याविषयी येशूवाह बोलत होता. यहूदा बारा थालमीद ( शिष्यां) पैकी एक होता.परंतु पुढे हाच यहूदा येशूवाहच्या विरूद्ध उठणार होता.

**७.** १ यानंतर येशूवाह गालील प्रांतात फिरला. येशूवाहला यहूदीया प्रांतातून फिरण्यास इच्छीत नव्हता, कारण तेथील काही यहूदी लोक येशूवाहला जिवे मारावयास पहात होते. २ यहूदी लोकांचा मंडपाचा सण जवळ आला होता.३ म्हणून येशूवाहचे भाऊ त्याला म्हणाले, "तू येथून सणासाठी यहूदीयात जा.म्हणजे तू करतोस ते चमत्कार, तेथे तुझे थालमीद (शिष्य) पाहू शकतील. ४ लोकांना माहिती व्हावी असे एखाद्याला वाटत असेल तर त्याने तो करतो ती कामे लपवू नयेत. तू जगाला प्रगट हो, तू जे चमत्कार करतोस ते त्यांना पाहू दे." ५ येशूवाहच्या भावांनीसुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. ६ येशूवाह आपल्या भावांना म्हणाला, " माझी योग्य वेळ अजून आलेली नाही, पण तुम्हीं जाण्यासाठी मात्र कोणतीही वेळ योग्य असेल.७ जग तुमचा व्देष करू शकत नाही, परंतु जग माझा व्देष करते. कारण जगातील लोक वाईट कामे करतात, हे मी त्यांना सांगतो. ८ तेव्हां तुम्ही सणासाठी जा. मी आताच सणाला येणार नाही, माझी योग्य वेळ अजून आली नाही.९ हे सांगितल्यानंतर येशूवाह गालीलातच राहिला. १० म्हणून येशूवाहचे भाऊ सणासाठी तेथून निघून गेले. ते गेल्यावर मग येशूवाह ही गेला, परंतु येशूवाहने हे लोकांना उघडपणे दाखविले नाही. ११ सणाच्या काळात यहूदी लोक येशूवाहचा शोध करीत होते, यहूदी म्हणाले, " तो मनुष्य कोठे आहे?" १२ लोकांचा मोठा जमाव त्या ठिकाणी जमा झालेला होता.त्यातील अनेक लोक येशूवाह विषयी आपसांत बोलत होते. काही म्हणाले, " तो चांगला मनुष्य आहे." परंतु दुसरे काही जण म्हणाले, " नाही तो लोकांना ठकवितो." १३ परंतु लोकांपैकी कोणीच येशूवाह विषयी उघडपणे बोलायला धजत नव्हते. लोकांना यहूदी पुढा-यांची भीती वाटत होती.

१४ अर्धाअधिक सण पार पडला होता, तेव्हा येशूवाह मंदिरात गेला, आणि तेथे लोकांना शिक्षण देण्यास त्याने सुरूवात केली. १५ यहूदी लोकांना मोठे आश्चर्य वाटले. ते म्हणाले, " हा माणूस शाळेत कधी शिकला नाही. हे एवढे तो कोठून शिकला?" १६ येशूवाहने उत्तर दिले, " मी ज्या गोष्टी शिकवितो त्या माझ्या स्वतःच्या नाहीत. माझी शिकवण मला पाठविणा-या याव्हे अब्बा कडून आलेली आहे." १७ जो याव्हे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे करतो, त्याला माझी शिकवण याव्हे एलोहिम कडून आहे हे कळेल. त्याला हे कळेल की, माझी शिकवण माझी स्वतःची नाही.१८ जो कोणी स्वतःच्या मनचेच शिकवितो, तो स्वतःला मानसन्मान मिळावा असा प्रयत्न करतो. परंतु ज्याने मला पाठविले, त्याचा सन्मान करण्याचा जो प्रयत्न करतो, तोच माणूस सत्य सांगतो, त्याचे काहीच खोटे नसते. १९ मोशेने तुम्हांला ताराह (नियमशास्त्र) दिले, खरे ना? परंतु तुमच्या तील कोणी तोराह (नियमशास्त्र) पाळीत नाही. तुम्हीं का बरे मला जिवे मारायला पाहता?" २० लोकांनी उत्तर दिले, "तुम्हांला अशुद्ध आत्मा लागले आहे.आम्हीं काही तुम्हांला जिवे मारण्याचा प्रयत्न करीत नाही." २१ येशूवाह त्यांना म्हणाला, " मी एक चमत्कार केला, आणि तुम्ही सारे चकित झालात. २२ मोशेने तुम्हांला सुंतेचा नियम दिला. परंतु खरे पाहता सुंता मोशे पासून आलेली नाही. ती मोशेच्या आधीच आपल्या पूर्वजांपासून

चालत आलेली आहे. म्हणून कधी कधी शब्बाथ दिवशीही तुम्हीं मुलांची सुंता करता. २३ याचा अर्थ मोशेच्या नियमांचे पालन
करण्यासाठी, शब्बाथ दिवशीही बालकाची सुंता करता येते. मग मी शब्बाथ दिवशी एका माणसाचे संपूर्ण शरीर बरे केले, तर तुम्हीं
माझ्यावर का रागावता? २४ वरवर पाहून न्याय करू नका, तर खरोखर काय बरोबर आहे, याची कसून शहानिशी करून योग्य
प्रकारे न्याय करा."

२५ मग यरूशलेमात राहणारे काही लोक म्हणाले, "याच माणसाला लोक जिवे मारण्याच्या प्रयत्नात आहेत. २६ परंतु सर्व लोक
आपल्याला पाहू आणि ऐकू शकतील, अशा ठिकाणी हा शिक्षण देत आहे. आणि शिक्षण देताना त्याला थांबविण्याचा कोणीही
प्रयत्न करीत नाही. कदाचित हा खरोखरच मशीहा आहे. असे पुढारी लोकांनी ठरविले असेल. २७ परंतु हा माणूस कोठून आला
आहे, हे आपल्याला माहीत आहे. आणि खरोखरच मशीहा येईल, तेव्हां तो कोठून येईल हे कोणालाच कळणार नाही." २८ अजूनही
येशूवाह मंदिरात शिक्षण देत होता. येशूवाह म्हणाला, " होय तुम्ही मला ओळखता आणि मी कोठला, हे ही तुम्हांला माहीत आहे.
परंतु मी स्वतःच्या अधिकाराने आलो नाही. जो खरा याव्हे एलोहिम आहे त्याने मला पाठविले, तुम्हीं त्याला ओळखीत नाही. २९
पण मी त्याला ओळखतो, मी त्याच्याकडून आलो, आणि त्यानेच मला पाठविले." ३० येशूवाह हे बोलला तेव्हा लोकांनी त्याला
धरण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणीही त्याला धरू शकले नाही. कारण त्याला मारले जाण्याची वेळ अजून आली नव्हती. ३१ परंतु
लोकांपैकी पुष्कळ जणांनी येशूवाह वर विश्वास ठेवला. लोक म्हणाले, "आम्ही मशीहाच्या येण्याची वाट पाहत आहोत. मशीहा
आला तर या मनुष्याने केले त्याहून जास्त चमत्कार तो करून दाखवील काय? नाही! म्हणून हाच मशीहा असला पाहिजे."

३२ लोक येशूवाह विषयी जे बोलत होते, ते परूश्यांनी ऐकले. म्हणून एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि परूशी यांनी
येशूवाहला अटक करण्यासाठी मंदिराचे शिपाई पाठविले. ३३ मग येशूवाह म्हणाला, " मी तुम्हा लोकांबरोबर आणखी थोडा काळ
राहीन, नंतर ज्याने मला पाठविले त्याच्याकडे मी परत जाईन. ३४ तुम्हीं माझा शोध कराल पण मी तुम्हांला सापडणार नाही." ३५
यहूदी आपापसात म्हणाले, " हा माणूस असा कोठे जाणार आहे की, जेथे आपण त्याला शोधू शकणार नाही, ग्रीक शहरात
राहणा-या यहूदी लोकांकडे हा जाईल काय? तो तेथील ग्रीक लोकांना शिक्षण देईल काय? ३६ हा माणूस म्हणतो, तुम्ही माझा शोध
कराल, परंतु मी तुम्हांला सापडणार नाही. तो असेही म्हणतो, 'जेथे मी आहे तेथे तुम्ही येऊ शकत नाही' याचा अर्थ काय?" ३७
सणाचा शेवटचा दिवस आला, तो फार महत्वाचा दिवस होता. त्या दिवशी उभे राहून येशूवाह मोठयाने म्हणाला, "ज्याला तहान
लागली असेल, त्याने माझ्याकडे यावे आणि प्यावे. ३८ जर कोणी माझ्यावर विश्वास ठेवील, तर त्याच्या अंतःकरणातून (आत्म्यातून)
जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील." असे शास्त्रलेखात सांगते, ३९ येशूवाह आत्म्याविषयी बोलत होता. लोकांना अजून पवित्र आत्मा
देण्यात आला नव्हता. कारण येशूवाह अजून मरण पावला नव्हता, आणि गौरवात उठविला गेला नव्हता. परंतु नंतर येशूवाहवर
विश्वास ठेवणा-या लोकांना तो मिळणर होता.

४० येशूवाहने सांगितलेल्या या गोष्टी लोकांनी ऐकल्या. काही लोक म्हणाले, " हा माणूस खरोखरच नबी (संदेष्टा) आहे. ४१ दुसरे
म्हणाले, "हा मशीहा आहे." तर दुसरे काही जण म्हणाले, "मशीहा हा गालील प्रांतातून येणार नाही." ४२ शास्त्रलेखात असेही
लिहिले आहे की, 'मशीहा दावीद राज्याच्या घराण्यातून येईल." ४३ आणि शास्त्रलेखात असेही लिहिले आहे की, "दावीद राजा
राहत असे, त्या बेथलहेम गावातून मशीहा येईल." तेंव्हा येशूवाह मुळे लोकांचे एकमत होईना. ४४ काहींना येशूवाहला अटक
करायचे होते, पण तसा प्रयत्न कोणीच केला नाही. ४५ मंदिराचे शिपाई एलीयोवन कोहेन (मुख्य याजकां) कडे आणि परूश्यांकडे
परत गेले. एलीयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) व परूश्यांनी शिपायांना विचारले, "तुम्हीं येशूवाहला का आणले नाही?" ४६ मंदिराचे
शिपाई म्हणाले, " तो बोलतो त्या गोष्टी कोणत्याही मानवी शब्दांपेक्षा महान आहेत!" ४७ मग परूशी म्हणाले, "म्हणजे येशूवाहने
तुम्हांलासुद्धा मूर्ख बनविले! ४८ पुढा-यांपैकी एकाने तरी येशूवाहवर विश्वास ठेवला का? नाही! आम्हा परूश्यांपैकी एकाने तरी
त्याच्यावर विश्वास ठेवला का? नाही! ४९ परंतु बाहेरच्या लोकांना तोराह (नियमशास्त्राची) माहिती नाही. त्याच्यावर याव्हे
एलोहिमचा कोप होईल" ५० परंतु त्या घोळक्यात निकदेम हजर होता. यापूर्वी हा निकदेमच येशूवाहला भेटायला आला होता.

निकदेम म्हणाला, ५१ " एखाद्या माणसाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय, त्याला आपल्या तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे दोषी ठरवता येत नाही. त्याने काय केले हे कळल्याशिवाय आपण त्याचा न्याय करू शकत नाही." ५२ यहूदी पुढा-यांनी उत्तर दिले, " तू सुद्धा गालील प्रांतामधील आहेस काय? शास्त्रलेखात वाचून पाहा! गालीलातून एकही नबी (संदेष्टा) येणार नाही, हे तुला कळेल." ५३ नंतर ते सर्व यहूदी पुढारी आपापल्या घरी गेले.

८. १ येशूवाह जैतूनाच्या डोंगरावर निघून गेला. २ दुस-या दिवशी सकाळीच येशूवाह परत मंदिरात गेला. सर्व लोक येशूवाहकडे आले. येशूवाह बसला, आणि त्यांने लोकांना शिक्षण दिले. ३ तोराह (नियमशास्त्राचे) राब्बी (शिक्षक), व परूशी एका स्त्रीला घेऊन तेथे आले. त्या स्त्रीला व्यभिचाराचे पाप करताना पकडले होते. या यहूदी लोकांनी त्या स्त्रीला बळजबरीने लोकांपुढे उभे केले. ४ ते येशूवाहला म्हणाले, "राब्बी, (गुरूजी) जो हिचा नवरा नाही, अशा माणसाशी व्यभिचार करताना ह्या स्त्रीला पकडले. ५ मोशेच्या तोराह (नियमशास्त्रात) अशी आज्ञा दिलेली आहे की, असे कर्म करणा-या प्रत्येक स्त्रीला आम्ही धोंडमार करून जिवे मारले पाहिजे. आम्ही काय करावे असे तुमचे मत आहे?" ६ येशूवाहला पेचात पकडावे म्हणून यहूदी लोकांनी हा प्रश्न विचारला होता. काही तरी चुकीचे बोलताना येशूवाहला धरावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणजे मग त्यांना येशूवाह वर आरोप ठेवता आला असता. पण येशूवाहने गुडघे टेकले व आपल्या बोटाने जमिनीवर लिहू लागला. ७ यहूदी पुढारी येशूवाहला प्रश्न विचारीतच राहिले, म्हणून येशूवाह मान वर करून त्यांच्याकडे पाहत म्हणाला, " ज्याने कधीच पाप केले नाही, असा एकतरी मनुष्य येथे आहे काय? निष्पाप मनुष्य या स्त्रीवर पहिला दगड फेकू शकतो." ८ मग येशूवाहने पुन्हा गुडघे टेकले व जमिनीवर लिहू लागला. ९ येशूवाहचे हे शब्द ज्या लोकांनी ऐकले, ते एक एक करून निघून जाऊ लागले. जे वयस्कर होते ते अगोदर गेले, मग इतर लोक गेले. येशूवाह एकटाच त्या स्त्रीसह तेथे राहिला होता, ती त्याच्यासमोर उभी होती. १० येशूवाहने पुन्हा वर पाहिले आणि तिला विचारले, " बाई, ते सर्व लोक निघून गेले आहेत. त्यातील एकानेही तुला दोषी ठरविले नाही काय?" ११ त्या स्त्रीने उत्तर दिले, " महाराज मला कोणीही दोषी ठरविले नाही." मग येशूवाह म्हणाला, " मग मीहि तुझा न्याय करीत नाही. आता तू जाऊ शकतीस. पण परत पाप करू नकोस."

१२ नंतर येशूवाह पुन्हा लोकांशी बोलू लागला. तो म्हणाला, " मी जगाचा ओर (प्रकाश) आहे. जो माझ्यामागे येतो तो कधीही होशेख (अंधारात) राहणार नाही. त्या माणसाजवळ जीवन देणारा प्रकाश राहिल." १३ परंतु परूशी लोक येशूवाहला म्हणाले, "जेव्हा तुम्हीं स्वतः आपल्याविषयी बोलता, तेव्हा ह्या गोष्टी ख-या आहेत, असे म्हणणारे तुम्हीं एकटेच असता. तेव्हा तुम्हीं सांगता त्या गोष्टी आम्ही स्विकारू शकत नाही." १४ येशूवाहने उत्तर दिले, " होय, मी स्वतःच माझ्याविषयी ह्या गोष्टी सांगत आहे. परंतु मी सांगतो, त्या गोष्टीवर लोक विश्वास ठेवू शकतील. कारण मी कोठून आलो हे मला माहीत आहे, व कोठे जाणार हे मला माहीत आहे. मी तुमच्यासारखा नाही, मी कोठून आलो, व कोठे जाणार हे तुम्हांला माहीत नाही. १५ तुम्हीं एखाद्याचा न्याय करता तसाच माझाही करता, मी कोणाचा न्याय करीत नाही. १६ पण जर मी न्याय केला, तर त्यात माझा न्याय खरा असतो. कारण जेंव्हा मी न्याय करतो तेंव्हा मी एकटा नसतो. ज्या बापाने मला पाठविले, तो माझ्याबरोबर असतो. १७ तुमचे स्वतःचेच तोराह (नियहाशास्त्र) असे म्हणते की, दोन साक्षीदार एकाच गोष्टीविषयी साक्ष देतात, तेंव्हा ते काय म्हणतात ते तुम्हांला स्विकारावेच लागते. १८ स्वतः विषयी बोलणा-या दोघा साक्षीदारांपैकी मी एक साक्षीदार आहे. आणि ज्या याव्हे अव्वाने मला पाठविले, तो दुसरा साक्षीदार आहे." १९ लोकांनी येशूवाहला विचारले, " तुमचा अव्वा कोठे आहे?" येशूवाहने उत्तर दिले, " तुम्ही मला अगर माझ्या याव्हे अव्वाला ओळखत नाही. जर तुम्हीं मला ओळखले असते तर माझ्या याव्हे अव्वालाही ओळखले असते." २० येशूवाह मंदिरात शिक्षण देत असता, या गोष्टी बोलला. ज्या पेटीत लोक पैसे टाकीत, त्या पेटीजवळच तो होता. परंतु येशूवाहला कोणी अटक केली (पकडले) नाही, कारण त्याची वेळ अजून आलेली नव्हती.

२१ येशूवाह पुन्हा लोकांना म्हणाला, " मी लवकरच तुम्हांला सोडून जाईन. तुम्हीं माझा शोध कराल, परंतु तुम्ही आपल्या पापात मराल. मी जातो तेथे तुम्हीं येऊ शकत नाही." २२ म्हणून यहूदी लोक एकमेकांस विचारू लागले, " येशूवाह स्वतःला ठार करणार

नाही ना? यासाठी तो असे म्हणाला का, 'की मी जाणार आहे.तिकडे तुम्हीं येऊ शकणार नाही?' २३ पण येशूवाह म्हणाला, " तुम्हीं लोक येथील खालचे आहात. पण मी वरचा आहे. तुम्हीं या जगाचे आहा; परंतु मी या जगाचा नाही. २४ तुम्ही आपल्या पापात मराल असे मी म्हणालो, होय. **'मी आहे'** (जुन्या करारातील निर्गम ३ः१४ मध्ये वापरलेल्या याव्हे एलोहिमच्या नावासारखे हे आहे. परंतु 'मी तो मशीहा आहे' असाही याचा अर्थ होऊ शकतो.) यावर तुम्हीं विश्वास ठेवीत नाही तर तुम्हीं पापात मराल." २५ यहूदी लोकांनी विचारले, " मग तुम्हीं कोण आहात?" येशूवाहने उत्तर दिले, " मी सुरूवाती पासून तुम्हांला सांगत आलो तोच मी आहे.२६ तुमच्याविषयी बोलण्यासारख्या ब-याच गोष्टी माझ्याकडे आहेत. मी तुमचा न्याय करू शकतो, परंतु ज्याने मला पाठविले त्याच्याकडून ऐकलेल्या गोष्टीच मी लोकांना सांगतो, आणि तो सत्य सांगतो." २७ येशूवाह कोणाविषयी बोलत आहे, हे लोकांना समजेना. येशूवाह त्यांना याव्हे अब्बा विषयी सांगत होता. २८ म्हणून येशूवाह लोकांना म्हणाला, " तुम्हीं मनुष्याच्या मुलाला उंच कराल (वधस्तंभावर ठार माराल) मग तो मी आहे हे समजू शकाल. मी ज्या गोष्टी करतो, त्या माझ्या स्वतःच्या अधिकारात करीत नाही, हे तुम्हांला समजेल. तुम्हांला समजेल की, ज्या गोष्टी मला याव्हे अब्बाने शिकविल्या, त्याच गोष्टीविषयी मी बोलतो.२९ ज्याने मला पाठविले तो माझ्याबरोबर आहे. त्याला ज्यामुळे संतोष होतो तेच मी नेहमी करतो. म्हणून त्याने मला एकटे सोडले नाही." ३० येशूवाह या गोष्टी बोलत असता अनेकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.

३१ ज्यांनी येशूवाह वर विश्वास ठेवला त्या यहूदी लोकांना तो म्हणाला, " तुम्हीं जर नेहमी माझ्या शिकवणुकीचे पालन कराल, तरच तुम्हीं माझे खरे थालमीद (शिष्य) आहात.३२ मग सत्य काय आहे हे तुम्हांला समजेल, आणि सत्य तुम्हांला स्वतंत्र करील." ३३ यहूदी लोकांनी उत्तर दिले " आम्ही अब्राहामाचे संतान आहोत आणि आम्हीं कधीच गुलाम नव्हतो.तर आम्हीं स्वतंत्र होऊ असे तुम्हीं का म्हणता?" ३४ येशूवाहने उत्तर दिले, " मी तुम्हांला खरे तेच सांगतो. जो प्रत्येक पाप करतो तो गुलाम आहे, पाप त्याचा मालक आहे. ३५ गुलाम कुटुंबात कायमचा राहत नाही, परंतु मुलगा कायमचा आपल्या कुटुंबात राहतो. ३६ म्हणून जर मुलगा तुमची सुटका करतो, तर तुम्हीं खरोखरच स्वतंत्र व्हाल.३७ तुम्हीं अब्राहामाची संतान आहात हे मला माहीत आहे. परंतु तुम्हीं मला जिवे मारावयास टेपलेले आहात, कारण तुम्हांला माझे शिक्षण स्विकारायला नको आहे. ३८ माझ्या याव्हे अब्बाने जे काही मला दाखवून दिले, तेच मी तुम्हांला सांगत आहे. परंतु तुमच्या अब्बाने तुम्हांला सांगितले तेच तुम्हीं करता." ३९ यहुदी लोकांनी उत्तर दिले, " आमचा अब्बा अब्राहम आहे." येशूवाह म्हणाला, " तुम्ही जर खरोखरच अब्राहामाची संतान असता, तर अब्राहामाने केल्या त्याच गोष्टी तुम्हीं केल्या असत्या. ४० याव्हे एलोहिमकडून जे सत्य ऐकले ते तुम्हांला सांगणारा मी एक मनुष्य आहे. परंतु तुम्हीं मला जिवे मारायला पाहता. अब्राहामाने तसे केले नाही. ४१ पण अब्राहामाने जे केले नाही ते तुम्हीं करता, याचा अर्थ तुम्हीं त्याची मुले नाहीत, तर तुमचा अब्बा अब्राहम नसून कोणी वेगळा आहे." परंतु यहूदी म्हणाले, " ज्या मुलांना आपला अब्बा कोण आहे ते माहीत नाही त्यांच्यासारखे आम्हीं नाही.याव्हे एलोहिम आमचा अब्बा आहे, तोच एक आमचा अब्बा आहे." ४२ येशूवाह त्या यहूदी लोकांना म्हणाला, " जर याव्हे एलोहिम खरोखरच तुमचा अब्बा असता, तर तुम्हीं माझ्यावर प्रीति केली असती. मी अब्बा कडून आलो आणि आता मी येथे आहे. मी माझ्या स्वतःच्या अधिकारात आलो नाही, याव्हे एलोहिमनेच मला पाठविले. ४३ मी म्हणतो, मी देत असलेली शिकवण तुम्हांला समजत नाही का? कारण की तुम्हांला माझी शिकवण स्विकारता येत नाही. ४४ तुमचा बाप सैतान आहे, तुम्हीं त्याचे आहात. त्याला करायला पाहिजे तेच तुम्हीं करता. सैतान सुरूवातीपासूनच खुनी आहे. सैतान सत्याच्या विरूद्धात आहे, आणि सैतानाच्या ठायी सत्य नाही. तो सांगतो, त्या लबाडयाप्रमाणेच तो आहे. सैतान लबाड आहे, आणि तो असत्याचा बाप आहे. ४५ मी सत्य बोलतो म्हणून तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेवीत नाही. ४६ मी एखाद्या पापाविषयी दोषी आहे, असे तुमच्यातील कोणी सिद्ध करू शकेल काय? जर मी सत्य सांगतो तर तुम्हीं मझ्यावर विश्वास का ठेवीत नाही? ४७ जो याव्हे एलोहिमचा आहे, तो याव्हे एलोहिमचे म्हणणे ऐकतो. परंतु तुम्हीं याव्हे एलोहिमचे म्हणणे ऐकत नाही, कारण तुम्हीं याव्हे एलोहिमचे लोक नाहीत."

४८ यहूदी म्हणाले, " तुम्हीं शोमरोनी आहात. तुम्हांला अशुद्ध आत्म्याने पछाडले आहे. असे आम्ही म्हणालो, तर आम्हीं म्हणतो तेच बरोबर नाही काय?" ४९ येशूवाहने उत्तर दिले, " मला अशुद्ध आत्मा लागले नाही. मी तर आपल्या याव्हे अब्बाचा मान राखतो.

परंतु तुम्हीं माझा मान राखीत नाही. ५० स्वतःला सन्मान मिळविण्याचा प्रयत्न मी करीत नाही. माझा सन्मान व्हावा, असे एकाला (याव्हे एलोहिमला) वाटते. तोच न्यायाधीश आहे. ५१ मी तुम्हांला खरे तेच सांगतो. जो कोणी माझ्या शिक्षणाचे पालन करतो तो कधीही मरणार नाही. ५२ यहूदी लोक म्हणाले, " तुमच्यात खरोखर अशुद्ध आत्मा संचारले आहे, हे आता आम्हांला माहीत झाले. अब्राहाम आणि नबी (संदेष्टे) मेले, परंतु तुम्हीं म्हणता, 'जो माझ्या शिकवणूकीचे पालन करतो, तो कधीही मरणार नाही.' ५३ तुम्हीं आमचा अब्बा अब्राहाम याच्यापेक्षाही थोर आहात असे तुम्हांला वाटते काय? अब्राहाम मेला, तसेच नबीईम (संदेष्टे) ही मेले. तुम्हीं स्वतःला समजता तरी कोण?" ५४ येशूवाहने उत्तर दिले, " जर मी स्वतःचा सन्मान केला, तर त्या सन्मानाला काहीच अर्थ नाही. माझा याव्हे अब्बा माझा सन्मान करतो तो आमचा याव्हे एलोहिम आहे, असे तुम्हीं म्हणता.५५ परंतु तुम्हीं खरोखर त्याला ओळखीत नाही.पण मी त्याला ओळखतो, तो सांगतो त्याचे पालन मी करतो. मी त्याला ओळखीत नाही असे जर मी म्हणालो, तर तुम्हीं लबाड आहात तसा मी ही लबाड ठरेन, परंतु मी त्याला नक्कीच ओळखतो. आणि तो जे काही सांगतो त्याचे पालन करतो.५६ माझ्या येण्याचा दिवस पाहण्याच्या आशेने तुमचा अब्बा अब्राहाम आनंदीत झाला होता. त्याने तो दिवस पाहिला आणि त्याला आनंद झाला." ५७ यहूदी लोक येशूवाहला म्हणाले, " तुम्हीं अब्राहामाला कधीच पाहिले नाही, तुम्हीं पन्नास वर्षाचेही नाही!" ५८ येशूवाहने उत्तर दिले, " मी तुम्हांला खरे तेच सांगतो. अब्राहामाच्या जन्मापूर्वी पासून मी आहे." ५९ जेव्हा येशूवाह असे बोलला, तेव्हा लोकांनी त्याला मारण्यासाठी दगड उचलले. पण येशूवाह गुप्त झाला, आणि नंतर मंदिरात निघून गेला.

९. १ येशूवाह चालला असताना त्याने एक आंधळा मनुष्य पाहिले.हा मनुष्य त्याच्या जन्मापासून आंधळा होता. २ येशूवाहच्या शिष्यांनी त्याला विचारले, " राब्बी (गुरूजी) हा मनुष्य आंधळा जन्मला, परंतु तो कोणाच्या पापामुळे आंधळा जन्मला? त्याच्या स्वतःच्या, का त्याच्या आईवडिलांच्या पापामुळे?" ३ येशूवाहने उत्तर दिले, "त्याच्या स्वतःच्या पापामुळे किंवा त्याच्या आईवडिलांच्या पापामुळे हा आंधळा झाला नाही.मी याला बरे करताना लोकांना एलोहिमचे सामर्थ्य दाखविता यावे म्हणून हा आंधळा जन्मला. ४ दिवस आहे तो पर्यंत ज्याने मला पाठविले, त्याचे काम आपण करीत राहिले पाहिजे. रात्र येत आहे, आणि रात्री कोणी काम करू शकत नाही.५ मी जगात आहे, तोपर्यंत मी जगाचा प्रकाश आहे." ६ असे बोलल्यानंतर येशूवाह मातीवर थुंकला, त्याने त्या थुंकीने चिखल केला. आणि त्या चिखलाचा गोळा करून त्याने त्या माणसाच्या डोळयांला लावला. ७ मग येशूवाहने त्या मनुष्याला सांगितले, "जाऊन शिलोह तळयात डोळे धू." (शिलोह म्हणजे पाठविलेला) म्हणून तो मनुष्य त्या तळयापाशी गेला. त्याने डोळे धुतले आणि तो परत आला, तेव्हा त्याला चांगले दिसू लागले होते.८ काही लोकांनी त्याला भीक मागताना पूर्वी पाहिले होते. ही माणसे आणि त्याचे शेजारी म्हणाले, " पाहा! येथे बसून भीक मागत असे तो मनुष्य हाच आहे ना?" ९ काही लोक म्हणाले, "होय हा तोच आहे." परंतु दुसरे काही म्हणाले, " नाही हा तो मनुष्य नाही. हा फक्त त्याच्यासारखा दिसतो." मग तो मनुष्य स्वतः होऊनच म्हणाला, " अहो मीच तो पूर्वीचा आंधळा आहे." १० लोकांनी विचारले, "अरे असे घडले तरी काय? तुला कसे दिसू लागले?" ११ त्या मनुष्याने उत्तर दिले, " लोक ज्याला येशूवाह म्हणतात, त्याने थोडा चिखल केला.त्याने तो चिखल माझ्या डोळयांवर लावला. मग येशूवाहने मला शिलोह तळयाकडे जाऊन धुण्यास सांगितले. म्हणून मी शिलोह तळयावर जाऊन डोळे धुतले, आणि मग मला दिसू लागले." १२ लोकांनी त्या मनुष्याला विचारले, "तो मनुष्य कोठे आहे?" त्या मनुष्याने उत्तर दिले, "मला माहीत नाही."

१३ मग लोकांनी परूशी लोकांकडे त्या मनुष्याला नेले, हाच पूर्वी आंधळा मनुष्य होता.१४ येशूवाहने चिखल करून त्या मनुष्याचे डोळे बरे केले होते.ज्या दिवशी येशूवाहने हे केले तो शब्बाथ दिवस होता. १५ म्हणून आता परूशी लोक त्या मनुष्याला विचारू लागले, "तुला कसे काय दिसू लागले?" त्या मनुष्याने उत्तर दिले, " त्याने माझ्या डोळयांवर चिखल लावला. मी डोळे धुतले, आणि आता मी पाहू शकतो." १६ परूश्यांतील काही लोक म्हणाले, "हा मनुष्य शब्बाथाचा नियम पाळीत नाही. म्हणून तो याव्हे एलोहिम पासून नाही." दुसरे लोक म्हणाले, " परंतु एखादा पापी असेल तर त्याला असे चमत्कार करताच येणार नाहीत." याविषयी त्या यहूदी लोकांचे एकमत होईना. १७ मग यहूदी पुढा-यांनी त्या मनुष्याला पुन्हा विचारले, " त्या मनुष्याने तुला बरे केले, आणि आता तुला दिसते. तर त्याच्याविषयी तुला काय म्हणायचे आहे?" त्या मनुष्याने उत्तर दिले, " तो एक नबी (संदेष्टा) आहे. १८ हे या

माणसाच्या बाबतीत घडले आहे, यावर यहूदी लोकांचा विश्वासच बसेना. हा मनुष्य आंधळा होता आणि आता त्याला दिसते, या गोष्टीवर त्यांचा विश्वास बसत नव्हता. नंतर त्यांनी त्या मनुष्याच्या आईवडिलांना बोलावून घेतले.१९ यहूदी लोकांनी त्याच्या आई वडिलांना विचारले, "हा तुमचाच मुलगा आहे काय? तुम्ही म्हणता हा जन्मापासून आंधळा होता, तर आता याला कसे काय दिसू लागले?" २० त्याच्या आईवडिलांनी उत्तर दिले, "हा आमचाच मुलगा आहे.आणि तो आंधळाच जन्माला आला, हे आम्हांला माहीत आहे. २१ परंतु त्याला आता कसे दिसायला लगले, आणि त्याचे डोळे कोणी बरे केले, हे आम्हांला माहीत नाही. त्यालाच विचारा तो स्वतः बद्दल सांगण्याइतका सुज्ञ झाला आहे.२२ त्याचे आईवडिल असे म्हणाले, कारण त्यांना यहूदी धर्म पुढा-यांची फार भीती वाटत होती.येशूवाह हा मशीहा आहे असे जो कोणी म्हणेल, त्याला शिक्षा करायची असे यहूदी पुढा-यांनी अगोदरच ठरवून ठेवलेले होते. अशा लोकांना यहूदी पुढारी सभास्थानाबाहेर घालवू शकत होते. २३ म्हणून 'त्यालाच विचारा तो आता मोठा झाला आहे' असे त्या मनुष्याचे आईवडिल म्हणाले. २४ मग जो पूर्वी आंधळा होता, त्याला यहूदी पुढा-यांनी पुन्हा बोलाविले. ते त्याला म्हणाले, "तुला बरे केले म्हणून तू याव्हे एलोहिमला गौरव द्यावे, हा मनुष्य पापी आहे हे आम्हांला माहीत आहे."

२५ त्या मनुष्याने उत्तर दिले, " तो पापी आहे की नाही, हे मला माहीत नाही. परंतु हे मला नक्कीच माहीत आहे की, मी पूर्वी आंधळा होतो आणि आता मला दिसते." २६ यहूदी पुढा-यांनी विचारले, " त्याने तुला काय केले? त्याने तुझे डोळे कसे बरे केले?"
२७ त्या मनुष्याने उत्तर दिले, " ते मी तुम्हांला अगोदरच सांगितले आहे.परंतु तुम्हीं माझे एकत नाही. पुन्हा तुम्हांला ते ऐकावेसे वाटते काय? तुम्हांलाही त्याचे थालमिद (शिष्य) व्हावयाची इच्छा आहे काय?" २८ यहूदी पुढारी फार संतापले आणि त्याला फारच वाईट रीतीने बोलू लागले. ते त्याला म्हणाले, "तू त्याचा थालमिद आहेस. आम्ही तर मोशेचे थलमिद (शिष्य) आहोत. २९ याव्हे
एलोहिम मोशेशी बोलत असे, हे आम्हांला माहीत आहे. परंतु हा मनुष्य कोण कोठून आला, हे आम्हांला माहीत नाही." ३० त्या
मनुष्याने उत्तर दिले, "ही फारच विचित्र गोष्ट आहे. येशूवाह कोठून आला हे तुम्हांला माहीत नाही. परंतु त्याने माझे डोळे बरे
केले. ३१ याव्हे एलोहिम पापी लोकांचे ऐकत नाही, हे आपणा सर्वांना माहीत आहे. पण जो त्याची उपासना करतो, आणि आज्ञा
पाळतो, त्याचेच तो ऐकेल.३२ जो मनुष्य जन्माजात आंधळा होता, त्याला दृष्टी येण्याची ही पहिलीच वेळ आहे. ३३ हा मनुष्य याव्हे
एलोहिम कडूनच आला असला पाहिजे. जर तो याव्हे एलोहिम कडून आला नसता, तर त्याला असे काहीच करता आले नसते."
३४ यहूदी पुढा-यांनी उत्तर दिले, " तू तर पापात जन्मला आहेस तू आम्हांला शिकवू पाहतोस काय ?" आणि यहूदी पुढा-यांनी त्या
मनुष्याला तेथून हाकलून दिले. ३५ यहूदी पुढा-यांनी त्या मनुष्याला बळजबरीने हाकलून दिले. हे येशूवाहने ऐकले. म्हणून येशूवाह
त्या मनुष्याला भेटला आणि म्हणाला, " तू मनुष्याच्या मुलावर विश्वास ठेवतोस काय? ३६ त्या मनुष्याने विचारले, " महाराज, हा
मुलगा कोण? मला सांगा, म्हणजे मला त्याच्यावर विश्वास ठेवता येईल." ३७ येशूवाह त्याला म्हणाला, " तू त्याला अगोदरच
पाहिले आहेस. मनुष्याचा मुलगा आता तुझ्याशी बोलत आहे." ३८ "होय ,अदोनाई. मी विश्वास ठेवतो." त्या मनुष्याने उत्तर
दिले. मग त्या मनुष्याने खाली वाकून येशूवाहला नमन केले. ३९ येशूवाह म्हणाला, " जगाचा न्याय व्हावा म्हणून मी जगात आलो
आहे.मी आलो आहे तो यासाठी की, जे आंधळे आहेत त्यांनी पहावे. आणि आम्हांला पाहता येते असे वाटणारे आंधळे व्हावेत."
४० परूश्यांतील काही जण येशूवाहच्या आजूबाजूला होते, त्यांनी येशूवाहला हे बोलताना ऐकले. आणि त्यांनी विचारले, " काय
आम्हींसुद्धा आंधळे आहोत, असे तुला म्हणायचे आहे काय?" ४१ येशूवाह म्हणाला, "तुम्हीं जर खरोखरच आंधळे (समज नसलेले)
असता, तर तुम्हीं पापाबद्दल दोषी ठरला नसता. परंतु 'आम्हांस दिसते' असे ( तुम्हीं म्हणता तुम्ही काय करता हे जाणता) म्हणून
तुम्हीं दोषी आहात."

**१०.** १ येशूवाह म्हणाला, " मी तुम्हांला खरे तेच सांगतो. जेव्हा एखादा मनुष्य मेंढवाडयात प्रवेश करतो, तेव्हा त्याने दाराचाच
उपयोग करावा. जर तो दुस-या मार्गाने चढून जातो, तर तो चोर व लुटारू आहे. तो मेंढरे चोरण्याचा प्रयत्न करीत आहे. २ परंतु
मेंढरांची काळजी घेणारा दारातून आत जातो, तो मेंढपाळ आहे.३ दारावरचा पहारेकरी मेंढपाळासाठी दार उघडतो आणि मेंढरे
आपल्या मेंढपाळाचा आवाज ऐकतात. राअह (मेंढपाळ) आपल्या मेंढरांना त्यांच्या नांवाने हाका मारतो. आणि त्यांना तो बाहेर

घेऊन जातो. ४ आपली सर्व मेंढरे बाहेर पडल्यावर तो त्यांच्या पुढे पुढे चालतो. मेंढरे त्याच्या मागोमाग जातात. कारण ती त्याचा
आवाज ओळखतात.५ अनोळखी माणसांच्या मागे मेंढरे कधीच जाणार नाहीत. ती त्या माणसापासून दूर पळून जातील. कारण
त्यांना त्यांचा आवाज परिचयाचा नसतो.६ येशूवाहने लोकांना हा दाखला सांगितला, परंतु तो काय सांगत आहे हे लोकांना समजले
नाही.

७ म्हणून येशूवाह पुन्हा म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, मी मेंढरांचे दार आहे. ८ माझ्या अगोदर आलेले सर्व चोर व लुटारू
होते. मेंढरांनी त्यांचे आवाज ऐकले नाहीत. ९ मी दार आहे जो माझ्याव्दारे आत जातो, त्याचे यशाह (तारण) होईल.त्याला आत
येता येईल व बाहेर जाता येईल.त्याला पाहिजे ते सर्व त्याला मिळेल. १० चोर चोरी करायला व ठार मारण्यास आणि नाश
करावयास येतो. परंतु मी जीवन देण्यासाठी आलो. असे जीवन जे भरपूर आणि चांगले आहे. ११ मी चांगला मेंढपाळ आहे.
चांगला राअह (मेंढपाळ) आपल्या मेंढरासाठी स्वतःचा जीव देतो. १२ ज्याला मजुरी देऊन मेंढरे राखावयास ठेवलेले असते, तो
मेंढपाळापेक्षा निराळा असतो. मजुरीवर मेंढरे राखणारा कळपाचा मालक नसतो, राअह (मेंढपाळ) हाच कळपाचा मालक असतो.
म्हणून मजुरीवर काम करणारा माणूस लांडगा येताना पाहून मेंढरे सोडून पळून जातो. मग लांडगा मेंढरांवर हल्ला करून त्यांची
दाणादाण करतो. १३ मजूर पळून जातो कारण तो रोजंदारीवर कामगार असतो, तो मेंढरांची खरी काळजी करीत नाही. १४ मी
मेंढरांची काळजी घेणारा मेंढपाळ आहे. जसा याव्हे अब्वा मला ओळखतो, तसा मी माझ्या मेंढरांना ओळखतो. आणि जसा मी याव्हे
अब्वाला ओळखतो, तशी माझी मेंढरे मला ओळखतात. १५ या मेंढरांसाठी मी आपला जीव देतो. १६ माझी दुसरीही मेंढरे आहेत, ती
येथे या कळपात नाहीत. त्यांनाही मला आणले पाहिजेत.आणि ती माझी वाणी ऐकतील, मग एक कळप, एक मेंढपाळ असे
होईल. १७ मी आपला जीव देतो, म्हणून माझा बाप मजवर प्रीति करतो. मी आपला जीव परत घेण्याकरिता देतो. १८ तो कोणी
माझ्यापासून घेत नाही. मी माझा स्वतःचा जीव स्वतःच्या इच्छेने देतो. माझा जीव देण्याचा मला अधिकार आहे, आणि मला तो
परत घेण्याचाही अधिकार आहे. हेच करण्याची माझ्या याव्हे अब्वाने मला आज्ञा दिली आहे." १९ येशूवाहने सांगितलेल्या ह्या
गोष्टीमुळे यहूदी लोकांचे आपापसात एकमत होईना. २० यहूदी लोकांपैकी पुष्कळ जण म्हणाले, "याला अशुद्ध आत्मा लागले
आहे.म्हणून याचे डोके ठिकाणावर नाही, त्याचे का ऐकावे?" २१ परंतु दुसरे काही जण म्हणाले "हा करतो तशा गोष्टी अशुद्ध
आत्म्यांने डोके फिरविलेला मनुष्य करीत नाही. अशुद्ध आत्मा आंधळया माणसाचे डोळे बरे करील काय? मुळीच नाही!" २२
यरूशलेमात साजरा होणारा समर्पणाचा सण जवळ आला, तो हिवाळा होता.२३ येशूवाह मंदिरातील शलमोनाच्या देवडीत तो होता.
२४ यहूदी लोक येशूवाहच्या भोवती जमा झाले. आणि म्हणाले, " किती दिवस तुम्हीं आम्हांला असे गोंधळात ठेवणार आहात? जर
तुम्हीच मशीहा असाल तर आम्हांला तसे स्पष्टच सांगा!"

२५ येशूवाहने उत्तर दिले, " मी तुम्हांला आधीच सांगितले, परंतु तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेवला नाही. मी माझ्या याव्हे अब्वाच्या
नावाने जी कामे करतो, ती कामे सुद्धा मी कोण याची साक्ष देतात.२६ पण तुम्हीं विश्वास ठेवीत नाही, कारण तुम्ही माझी नाहीत.२७
माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात. मी त्यांना ओळखतो,आणि ती माझ्यामागे येतात.२८ मी माझ्या मेंढरांना अनंतकाळचे जीवन
देतो.ती कधीच मरणार नाहीत. आणि त्यांना कोणीच माझ्या हातून हिरावून घेणार नाही. २९ माझ्या याव्हे अब्वाने माझी मेंढरे
माझ्या हाती दिली आहेत. तो सर्वांहून थोर आहे. माझ्या याव्हे अब्वाच्या हातून ती कोणी हिरवून घेणार नाही. ३० माझा याव्हे
अब्वा आणि मी एक आहोत."

३१ तेव्हा यहूदी पुढा-यांनी येशूवाहला ठार मारण्यासाठी पुन्हा दगड उचलेले.३२ परंतु येशूवाह त्यांना म्हणाला, "याव्हे अब्वा पासून
आलेल्या कितीतरी चांगल्या गोष्टी मी केल्या. त्या गोष्टी तुम्हीं पाहिल्या आहेत. त्यापैकी कोणत्या गोष्टीसाठी तुम्हीं मला जिवे
मारीत आहात?" ३३ यहूदी पुढा-यांनी उत्तर दिले, " तुम्ही केलेल्या कोणत्याही चांगल्या गोष्टीसाठी आम्ही तुम्हांला मारीत नाही, परंतु
तुम्ही ज्या गोष्टी बोलता त्या याव्हे एलोहिम विरूद्ध आहोत. तुम्ही फक्त मानव आहात, पण स्वतःला याव्हे एलोहिम सारखेच
आहोत असे मानता, आणि म्हणून आम्हीं तुम्हांला धोंडमार करून ठार करीत आहोत!" ३४ येशूवाहने उत्तर दिले, " तुमच्या तोराह

(नियमशास्त्रात) असे लिहिले आहे; 'मी म्हणालो तुम्हीं याव्हे एलोहिम आहात' ३५ ज्या लोकांना याव्हे एलोहिमने त्याची आज्ञा वचने
दिली, त्यांच्याविषयी ते सांगते. शास्त्रलेखात त्या लोकांना याव्हे एलोहिमने असे म्हंटले, आणि शास्त्रलेख नेहमीच सत्य आहे. ३६
त्याच्या कामासाठी याव्हे एलोहिमने मला निवडले. याव्हे एलोहिमने मला जगात पाठविले. मी याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे.
आणि तुम्हीं म्हणता, मी बोलतो त्या गोष्टी याव्हे एलोहिम विरूद्ध आहेत. ३७ जे माझा याव्हे अब्बा करतो ते जर मी करत नाही, तर
तुम्हीं माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवू नका. ३८ परंतु माझा याव्हे अब्बा करतो तीच कृत्यांवर जर मी करतो, तर मी करतो त्या
माझ्या गोष्टीवर विश्वास ठेवा.तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेवणार नाही.पण मी करतो त्या गोष्टीवर तरी विश्वास ठेवा. मग तुम्हीं
ओळखाल आणि समजून घ्याल की, याव्हे अब्बा माझ्यामध्ये आहे.आणि मी याव्हे अब्बा मध्ये आहे."

३९ यहूदी लोकांनी येशूवाहला पुन्हा धरण्याचा प्रयत्न केला, परंतु येशूवाह त्यांच्यातून निघून गेला. ४० मग येशूवाह यार्देन नदी
ओलांडून माघारी गेला. येशूवाह जेथे योहानान लोकांना बाप्तिस्मा देत असे तेथे गेला.आणि येशूवाह तेथेच राहिला. ४१ आणि
पुष्कळ लोक त्याच्याकडे आले. लोक म्हणाले, "योहानानने कधी चमत्कार केला नाही. परंतु योहानानने या मनुष्याविषयी जे
सांगितले ते खरे आहे." ४२ आणि त्याठिकाणी अनेक लोकांनी येशूवाह वर विश्वास ठेवला.

११. १ लाजार नावाचा एक मनुष्य आजारी होता. तो बेथानी गावात राहत होता. याच गावात मार्था आणि मरीया राहत होत्या.
२ ज्या मरीयेने अदोनाईला सुगंधी तेल लावले, व त्याचे पाय आपल्या केसांनी पुसले, तिचा हा भाऊ होता. ३ त्या बहिणींनी
येशूवाहला निरोप पाठविला की, हे अदोनाई ज्याच्यावर तू प्रीति करतोस तो आजारी आहे. ४ पण येशूवाहने हे ऐकून म्हंटले, " हा
आजार मरणासाठी नव्हे, तर याव्हे एलोहिमच्या गौरवासाठी आहे. याव्दारे याव्हे एलोहिमचे गौरव व्हावे यासाठी हा आजार आहे."
५ येशूवाह मार्था मरीया व लाजर यांच्यावर प्रीति करीत असे.६ म्हणून तो आजारी आहे हे ऐकल्यावरही तो होता त्याच ठिकाणी दोन
दिवस राहिला. ७ नंतर त्याने थालमीद (शिष्यां) ना म्हंटले, " आपण यहूदीयात परत जाऊ." ८ थालमीद (शिष्य) त्याला म्हणाले,
" राब्बी (गुरूजी) यहूदी आपणांस दगडमार करू पाहत होते, आणि आपण पुन्हा तेथे जात आहात काय?" ९ येशूवाहने उत्तर दिले,
" दिवसाचे बारा तास असतात की नाहीत, जर कोणी दिवसा चालतो तर त्याला ठेच लागत नाही, कारण तो या जगाचा प्रकाश
पाहतो.१० पण जर कोणी रात्री चालतो, तर त्याला ठेच लागते. कारण त्याच्याकडे प्रकाश नसतो." ११ या गोष्टी बोलल्यानंतर तो
त्यांना म्हणाला, "आपला मित्र लाजर झोपी गेला आहे. पण मी त्याला झोपेतून जागे करावयास जात आहे." १२ तेंव्हा त्याचे
थालमिद (शिष्य) म्हणाले, " अदोनाई, तो झोपी गेला असेल तर बरा होईल." १३ पण येशूवाह खरे तर त्याला मरणाविषयी बोलला
होता. पण तो त्याच्या नेहमीच्या झोपेविषयी बोलत आहे, असे त्यांना वाटले. १४ तेंव्हा येशूवाहने त्यांना स्पष्ट सांगितले, " लाजर
मेला आहे. १५ आणि मी तेथे नव्हतो म्हणून मला तुमच्यामुळे आनंद वाटतो. यासाठी की, तुम्हीं विश्वास धरावा. आपण त्याच्याकडे
जाऊ या." १६ तेव्हा दिदुम म्हंटलेला थोमा थालमीद (शिष्यां) ना म्हणाला, "आपणही त्यांच्याबरोबर जाऊ या.अशासाठी की
आपणही त्याच्याबरोबर मरू."

१७ येशूवाह आल्यावर त्याला समजले की, लाजराला चार दिवसांपूर्वीच कबरेत ठेवण्यात आले आहे. १८ बेथानी यरूशलेम पासून
तीन किलोमीटर अंतरापेक्षा कमी होते. १९ आणि पुष्कळसे यहूदी मार्था, मरीयेकडे त्यांचा भाऊ मेला याबद्दल सांत्वन करण्यासाठी
आले होते. २० जेंव्हा मार्थाने ऐकले की, आपल्या घरी येशूवाह येत आहे.तेंव्हा ती त्याला भेटायला बाहेर गेली, पण मरीया घरातच
राहिली.२१ "अदोनाई", मार्था येशूवाहला म्हणाली, " तू जर येथे असतास तर माझा भाऊ मेला नसता. २२ पण मला माहीत आहे
की, तू जे मागशील ते एलोहिम तुला देईल." २३ येशूवाह म्हणाला, "तुझा भाऊ पुन्हा उठेल." २४ मार्था म्हणाली "मला माहीत
आहे, शेवटच्या दिवशी पुनरूत्थानाच्या वेळेस तो पुन्हा उठेल." २५ येशूवाह तिला म्हणाला, " मी पुनरूत्थान आणि जीवन आहे.
जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असेल तरी जगेल.२६ आणि जो कोणी जगतो आणि माझ्यावर विश्वास ठेवतो, तो कधीच
मरणार नाही. तू यावर विश्वास ठेवतेस काय?" २७ " होय अदोनाई," ती त्याला म्हणाली, " तू मशीहा आहेस, असा मी विश्वास
धरते. तू या जगात आलेला आहे, याव्हे एलोहिमचा बेन आहेस." २८ आणि असे म्हंटल्यानंतर ती परत गेली, आणि आपली बहीण

मरीया हिला एका बाजूला बोलाविले. आणि म्हणाली, राव्बी (गुरूजी) येथे आहेत.आणि ते तुला विचारीत आहेत." २९ तेंव्हा
मरीयेने हे ऐकले, तेंव्हा ती लगेच उठली आणि त्याच्याकडे गेली. ३० आता तो पर्यंत येशूवाह त्या खेडयाच्या आत आला नव्हता.
तर मार्था त्याला भेटली, तेथेच अजून पर्यंत होता. ३१ तेंव्हा जे यहूदी तिच्या घरात तिचे सांत्वन करीत होते. ते मरीया लगबगीने
उठून बाहेर गेली असे पाहून, ती कबरेकडे शोक करायला गेली, असे समजून तिच्यामागे गेले. ३२ मग येथे येशूवाह होता, तेथे
मरीया आल्यावर ती त्याला पाहून त्याच्या पाया पडली.व त्याला म्हणाली, "अदोनाई आपण येथे असता तर माझा भाऊ मेला
नसता." ३३ मग येशूवाह तिला रडताना पाहून व तिच्याबरोबर असलेल्या यहूद्यांनाही रडताना पाहून आत्म्यात व्याकुळ झाला. व
हेलावून गेला. ३४ तो म्हणाला, "तुम्हीं त्याला कोठे ठेवले आहे?" ते म्हणाले, "अदोनाई, या आणि पाहा," ३५ येशूवाह रडला. ३६
तेंव्हा यहूदी म्हणाले, "पाहा, त्याला तो किती आवडत होता." ३७ पण त्यांच्यातील कित्येक म्हणाले, "ज्याने आंधळयाचे डोळे
उघडले, त्या या मनुष्याला लाजराला मरणापासून वाचविता येऊ नये काय?"

३८ मग येशूवाह पुन्हा आत्म्यात विव्हळ झाला असता कबरेकडे आला.ती गुहा होती आणि तिच्यावर दगड लोटला होता. ३९
येशूवाहने म्हंटले, " हा दगड काढा." मार्था म्हणाली, " पण अदोनाई लाजर मरून चार दिवस झाले आहेत, त्याला आता दुर्गंधी येत
असेल." ती मृत लाजराची बहीण होती. ४० येशूवाहने तिला म्हंटले, " जर तू विश्वास धरशील तर याव्हे एलोहिमचे गौरव
पाहशील. असे मी तुला सांगितले नव्हते काय?" ४१ मग त्यांनी दगड बाजूला केला. तेंव्हा येशूवाह वर पाहून म्हणाला, " याव्हे
अव्बा, तू मझे ऐकले म्हणून मी तुझे उपकार मानतो. ४२ आणि तू नेहमीच माझे ऐकतोस हे मला माहीत आहे. पण जो लोकसमुदाय
आजूबाजूला उभा आहे, त्यांच्यासाठी मी हे बोललो. यासाठी की, तू मला पाठविले आहेस यावर त्यांनी विश्वास ठेवावा." ४३ असे
बोलल्यावर त्याने मोठयाने हाक मारली, " लाजरा, बाहेर ये." ४४ मग जो मेला होता तो लाजर जिवंत होऊन बाहेर आला. त्याचे
हात पाय वस्त्रांनी बांधले होते, व तोंड रूमालाने झाकले होते. येशूवाह लोकांना म्हणाला, " त्याला मोकळे करा, आणि जाऊ द्या."

४५ जे यहूदी मरीयेकडे आले होते, त्यांनी येशूवाहने जे केले ते पाहिले, आणि त्यांच्यापैकी पुष्कळांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. ४६
पण त्यांच्यातील काहींनी परूश्यांकडे जाऊन येशूवाहने जे केले होते, ते त्यांना सांगितले.४७ तेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य
याजकांनी) व परूष्यांनी सभा भरवून म्हंटले, "हा मनुष्य पुष्कळ चमत्कार करीत आहे. ४८ आम्हीं त्याला असेच राहू दिले तर सर्व
लोक त्याच्यावर विश्वास ठेवतील, आणि रोमी येऊन आमचे मंदिर व राष्ट्र दोन्हीही घेतील." ४९ तेंव्हा त्यांच्यातील कायफा नावाची
व्यक्ती त्या वर्षी एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) होती. तो त्यांना म्हणाला, "तुम्हांला काहीच माहिती नाही! ५० तुम्हीं हे लक्षात
घेत नाही की, सर्व लोकांसाठी एका माणसाने मरणे हे सर्व राष्ट्राचा नाश होण्यापेक्षा हिताचे आहे." ५१ तो हे स्वतः होऊन बोलला
नाही.तर त्यावर्षी तो एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) होता म्हणून त्याने संदेश दिला की, येशूवाह त्या राष्ट्राकरिता मरणार आहे.
५२ केवळ त्या राष्ट्रासाठी असे नाही. तर यासाठी की, त्याने याव्हे एलोहिमच्या पांगलेल्यांना एकत्र करावे म्हणून तो मरणार
आहे.५३ म्हणून त्या दिवसापासून त्यांनी त्याला जिवे मारण्याची मसलत केली.५४ यामुळे येशूवाह तेंव्हापासून उघडपणे यहूद्यांमध्ये
फिरला नाही. त्याऐवजी तो रानाजवळच्या प्रदेशातील एफ्राईम नावाच्या नगरात गेला, व तेथे थालमीद (शिष्यां) सह राहिला. ५५
तेव्हा यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला होता.आणि सणा अगोदर पुष्कळ लोक आपणांस शुद्ध करायला देशातून वर यरूशलेमेस
गेले.५६ ते येशूवाहचा शोध करीत राहिले. आणि मंदिरात उभे असताना एकमेकास म्हणाले, " तुम्हांला काय वाटते? तो सणाला
येणार नाही काय?" ५७ पण एलयोवन कोहेन (मुख्य याजक) व परूश्यांनी अशी आज्ञा केली होती की, येशूवाह कोठे आहे. हे
ज्याला कळेल त्याने कळवावे, म्हणजे ते त्याला पकडू शकतील.

**१२**.१ मग येशूवाह पेसॅह (वल्हांडण) सणाच्या अगोदर सहा दिवस असताना बेथानीस आला. येशूवाहने ज्याला मेलेल्यातून
उठविले होते तो लाजर तेथे होता. २ म्हणून तेथे त्यांनी त्याच्यासाठी संध्याकाळचे भोजन आयोजित केले. मार्था जेवण वाढत होती,
आणि लाजर त्यांच्याबरोबर जेवायला बसला होता. ३ तेंव्हा मरीयेने अर्धा किलो शुद्ध जटामांसीचे मोलवान सुगंधी तेल घेऊन
येशूवाहच्या पायावर ओतले व आपल्या केसाने त्याचे पाय पुसले व सर्व घर त्या सुवासाने भरले.४ पण त्याच्या थालमीद (शिष्यां)

पैकी एक यहूदा इस्कर्योत ज्याने नंतर त्याचा विश्वास घात केला होता. त्याने विरोध केला. म्हणून तो म्हणाला ५ "हे सुगंधी द्रव्य
विकून आलेले पैसे गरिबांना का देण्यात आले नाहीत? ते तेल चांदीच्या तीनशे रूपयाच्या किमतीचे होते." ६ गरिबांचा कळवळा
आला म्हणून त्याने असे म्हंटले नाही, तर तो चोर होता. आणि त्याच्याजवळ पेटी होती व तिच्यात जे पैसे टाकण्यात येत, ते तो
चोरून घेई म्हणून तो असे म्हणाला.७ "तिला एकटे सोडा" येशूवाहने उत्तर दिले, "मला पुरण्याच्या दिवसासाठी ते तेल राखून
ठेवण्यात आले.८ तुमच्यात गरीब नेहमीच असतील, पण मी तुमच्यात नेहमी असणार नाही." ९ मग तो तेथे आहे हे यहूदीयांतील
ब-याच जणांना कळले. तेव्हा फक्त येशूवाह साठीच नव्हे,तर ज्याला त्याने मेलेल्यातून उठविले होते त्या लाजराला पाहावे म्हणून ते
आले. १० तेंव्हा एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) लाजाराला मारण्याचा कट केला. ११ कारण त्याच्यामुळे पुष्कळ लोक
येशूवाहकडे जात होते, व त्याच्यावर विश्वास ठेवित होते.१२ दुस-या दिवशी सणासाठी आलेल्या मोठया जमावाने ऐकले की,
येशूवाह यरूशलेमकडे येत आहे. १३ त्यांनी खजुरीच्या झाडाच्या फांद्या घेतल्या आणि त्याला भेटण्यास गेले. ते ओरडून जयघोष
करीत होते. " होसान्ना! अदोनाईच्या नावाने येणारा धन्यवादित असो! इस्त्राएलचा मेलेक (राजा) धन्यवादित असो." १४
येशूवाहला एक शिंगरू दिसले, त्यावर तो बसला, आणि नवीईमनी (संदेष्टयांनी) लिहिल्याप्रमाणे हे झाले. ते असे, १५ " सियोनेच्या
कन्ये, भिऊ नको; पहा, तुझा राजा येत आहे; गाढवीच्या शिंगरावर बसून येत आहे." १६ सुरवातीला थालमीद (शिष्यांना) या
गोष्टी समजल्या नाहीत.पण येशूवाहचे गौरव झाल्यावर त्यांना जाणीव झाली की, त्याच्या विषयी या गोष्टी लिहिल्या होत्या आणि
त्यांनी या गोष्टी त्याच्यासाठी केल्या.

१७ मग जो जमाव त्याने लाजरला कबरेतून आणलेले, व मरणातून उठविलेले पाहत होता.तो जमाव सतत्याने त्याच्या विषयी सांगत
होता. १८ पुष्कळ लोक त्याला जाऊन भेटले.कारण त्याने तो चमत्कार केला होता, हे त्यांनी ऐकले होते. १९ म्हणून परूशी
ऐकमेकांस म्हणाले, "पाहा, याच्यापुढे आपले काही चालत नाही सगळे जग त्याच्यामागे चालले आहे !"

२० आता सणाच्या वेळी उपासनेसाठी जे लोक वर गेले होते, त्यांच्यात काही ग्रीक होते.२१ ते फिलिप्पाकडे आले. जो गालीलातील
बेथसैदा येथील होता, त्यांनी विनंती केली. "महाराज, येशूवाहला पाहावे अशी आमची इच्छा आहे." २२ फिलिप्प अंद्रियाकडे हे
सांगण्यास गेला. नंतर अंद्रिया व फिलिप्प यांनी येशूवाहला सांगितले.२३ येशूवाह त्यांना म्हणाला "मनुष्याच्या मुलाचे गौरव होण्याची
वेळ आली आहे. २४ मी तुम्हांला खरे सांगतो, गव्हाचा दाणा भूमीत पडून मेला नाही, तर एकटाच राहतो. पण तो मेला तर पुष्कळ
फळ देतो. २५ जो आपल्या जिवावर प्रीति करतो तो त्याला गमवेल.पण जो या जगात आपल्या जिवाचा व्देष करतो, तो त्याला
अनंतकाळच्या जीवनासाठी राखील. २६ जो कोणी माझी सेवा करतो त्याने मला अनुसरले पाहिजे.जेथे मी असेन तेथे माझे सेवकही
असतील. जो माझी सेवा करतो, त्याचा सन्मान माझा याव्हे अव्वा करील."

२७ माझे अंतःकरण व्याकूळ झाले आहे. आणि मी आता काय सांगू, "याव्हे अव्वा माझी या घटकेपासून सुटका कर? केवळ याच
कारणासाठी, या वेळेला मी आलो. २८ याव्हे अव्वा तुझे गौरव कर!" तेंव्हा आकाशातून वाणी झाली की " मी त्याचे गौरव केले
आहे व पुन्हाही त्याचे गौरव करीन." २९ जो जमाव तेथे होता, त्याने हे ऐकले व म्हंटले, "गडगडाट झाला." दुसरे म्हणाले, याव्हे
एलोहिम मालाक (देवदूत्) त्याच्याशी बोलला. ३० येशूवाह म्हणाला, " हा आवाज तुमच्यासाठी होता. माझ्यासाठी नव्हे.३१ या
जगाचा न्याय होण्याची आता वेळ आली आहे. या जगाच्या मेलेक बेन (राजकुमाराला) हाकलून देण्यात येईल. ३२ परंतु मी जेंव्हा
पृथ्वीपासून वर उचलला जाईन, तेंव्हा मी सर्व लोकांना माझ्याकडे ओढीन." ३३ त्याने हे यासाठी म्हंटले की, कोणत्या प्रकारच्या
मरणाने तो मरणार आहे हे त्याला दाखवायचे होते. ३४ जमाव म्हणाला, " मशीहा सर्वकाळ राहतो असे आम्हीं तोराह तून
(नियमशास्त्रातून) ऐकले आहे. तर मनुष्याच्या मुलाला उंच केले पाहिजे, असे तुम्हीं का म्हणता? मनुष्याचा मुलगा कोण आहे?" ३५
मग येशूवाह त्यांना म्हणाला, " आणखी थोडा वेळ ओर (प्रकाश) तुमच्यामध्ये असणार आहे. तुमच्या मध्ये ओर (प्रकाश) आहे, तो
पर्यंत तुम्हीं चाला. यासाठी की, होशेक (अंधाराने) तुमच्यावर मात करू नये. कारण जो होशेक (अंधारात) चालतो, त्याला आपण
कोठे जातो हे कळत नाही. ३६ तुम्हीं ओर बेन (प्रकाशाची मुले) व्हावे म्हणून तुम्हांला ओर (प्रकाश) आहे. तोपर्यंत त्याच्यावर

विश्वास ठेवा." येशूवाह या गोष्टी बोलला मग तो निघून गेला, आणि त्यांच्यापासून गुप्त राहिला. ३७ येशूवाहने इतके चमत्कार त्यांच्यासमोर केलेले असतानाही, त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवीला नाही. ३८ यासाठी की, यशया नवीईमचे (संदेष्टयाचे) वचन पूर्ण व्हावे ः "अदोनाई, आमच्या संदेशावर कोणी विश्वास ठेवला आहे, आणि अदोनाईचा हस्तप्रताप कोणास प्रगट झाला आहे?" ३९ या कारणासाठी त्यांनी विश्वास ठेवला नाही, जसे यशया एके ठिकाणी म्हणतो. ४० त्यांनी डोळयांनी पाहू नये, व अंतःकरणाने समजू नये, त्यांनी फिरू नये, व मी त्यांना बरे करू नये, म्हणून त्याने त्यांचे डोळे आंधळे केले, आणि त्यांचे अंतःकरण कठीण केले आहे."
४१ यशया असे म्हणाला कारण त्याने त्याचे गौरव पाहिले आणि तो त्यांच्याविषयी बोलला. ४२ तरीही अधिका-यातील पुष्कळांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. पण आपणांस सभास्थानाच्या बाहेर घालवू नये, म्हणून परूश्यां मुळे त्यांनी हे पत्करले नाही. ४३ कारण त्यांना याव्हे एलोहिमच्या गौरवापेक्षा मनुष्याकडील गौरव अधिक आवडले.

४४ तेंव्हा येशूवाह मोठयाने बोलला, "जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो माझ्यावर विश्वास ठेवतो असे नाही, तर ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो. ४५ आणि जो मला पाहतो, तो ज्याने मला पाठविले त्याला पाहतो. ४६ मी ओर (प्रकाश) असा जगात आलो आहे यासाठी की, जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्याने होशेक (अंधारात) राहू नये.४७ आणि जो कोणी माझी वचने ऐकून पाळीत नाही, त्याचा न्याय मी करणार नाही. कारण मी जगाचा न्याय करण्यासाठी आलो नाही, तर जगाच्या तारणासाठी आलो आहे. ४८ जो माझा स्विकार करीत नाही, व माझ्या वचनाप्रमाणे वागत नाही, त्याचा न्याय करणार कोणी एक आहे. जे वचन मी सांगिताले, तेच शेवटच्या दिवशी त्याचा न्याय करील.४९ कारण मी स्वतःहून बोललो असे नाही.तर मी काय सांगावे व काय बोलावे याविषयी ज्या याव्हे अव्वाने मला पाठविले, त्यानेच मला आज्ञा केली आहे. ५० आणि त्याची आज्ञा अनंतकाळचे जीवन आहे. हे मला ठाऊक आहे. म्हणून जे काही मी बोलतो ते जसे याव्हे अव्वाने मला सांगितले तसेच बोलतो."

**१३.** १ मग पेसॅह (वल्हांडण) सणापूर्वी येशूवाहने आपण या जगातून निघून याव्हे अव्वा कडे जावे, असा समय आला आहे. हे जाणून आपले स्वतःचे लोक जे जगात होते त्यांच्यावर शेवटपर्यंत अहेद (प्रीति) केली. २ मग संध्याकाळचे भोजन होण्याच्या वेळेस सैतानाने शिमोनाचा मुलगा यहूदा इस्कार्योत याच्या मनात त्याला शत्रूंच्या हाती द्यावे, असे आधीच घालून दिले असताना, ३ आपल्या हाती याव्हे अव्वाने सर्व काही दिले आहे आणि आपण याव्हे एलोहिम पासून आलो, आणि आता याव्हे एलोहिमकडे जातो हे ओळखून, ४ येशूवाह जेवणावरून उठला. त्याने आपली बाह्यवस्त्रे काढून ठेवली, व रूमाल घेऊन आपल्या कमरेस बांधला. ५ मग तो गंगाळात पाणी ओतून थालमीद (शिष्यांचे) पाय धुऊ लागला. आणि कमरेस बांधलेल्या रूमालाने पुसू लागला. ६ मग तो शिमोन केफा कडे आला.पण केफा त्याला म्हणाला, "अदोनाई तू माझे पाय धुणार काय?" ७ येशूवाहने उत्तर दिले, " मी आता जे करीत आहे, ते तुला आता कळणर नाही. तर पुढे तुला कळेल." ८ केफा त्याला म्हणाला, "तू माझे पाय कधीही धुवायचे नाहीत." येशूवाहने उत्तर दिले, "जर मी तुझे पाय धुतले नाहीत, तर तुला माझ्या बरोबर वाटा नाही." ८ शिमोन केफाने उत्तर दिले. ९ मग अदोनाई माझे पायच नव्हे तर हात व डोकेही धुवा." १० येशूवाहने उत्तर दिले, "ज्याची आंघोळ झाली आहे, त्याचे फक्त पाय धुतले तरी चालेल. कारण तो स्वच्छच आहे. तुम्हीं स्वच्छ आहात, पण सर्वच नाहीत." ११ आपल्याला कोण धरून देणार, हे येशूवाहला माहीत होते. म्हणून "तुम्ही सर्वच शुद्ध नाहीत" असे तो म्हणाला.

१२ जेंव्हा त्याने त्याचे पाय धुण्याचे संपविले, तेंव्हा त्याने आपली बाह्यवस्त्रे घातली. व आपल्या जागेवर आला.त्याने त्यांना विचारले, " मी काय केले हे तुम्हांला समजले काय? १३ तुम्हीं मला 'राव्बी' (गुरूजी) आणि 'अदोनाई' म्हणता आणि योग्य म्हणता, कारण मी तोच आहे.१४ म्हणून मी जो अदोनाई आणि राव्बी असूनही, मी तुमचे पाय धुतले तर तुम्हींही एकमेकांचे पाय धुवावे.१५ कारण जसे मी केले तसे तुम्हींही करावे, म्हणून मी तुम्हांला उदाहरण घालून दिले. १६ मी खरे सांगतो, दास आपल्या मालकापेक्षा श्रेष्ठ नाही, आणि पाठविलेला ज्याने पाठविले त्याच्यापेक्षा श्रेष्ठ नाही. १७ या गोष्टी जर तुम्हीं समजता आणि त्या तुम्हीं जर केल्या तर तुम्हीं आशिर्वादित आहात. १८ मी तुम्हां सर्वांविषयी बोलत नाही. ज्यांना मी निवडले ते मला माहीत आहेत. "परंतु शास्त्रलेखात असे लिहिले आहे, तसे घडलेच पाहिजे ः ' जो माझी भाकर खातो, त्याने माझ्यावर आपली टाच उचलली आहे.' १९

हे होण्या अगोदरच मी तुम्हांस सांगतो, यासाठी की, जेव्हा हे होईल. तेव्हा तुम्हीं विश्वास धरावा, की मी तो आहे. २० मी तुम्हांस खरे सांगतो, ज्या कोणाला मी पाठवितो त्याला जो स्विकारतो, तो मला स्विकारतो.आणि जो मला स्विकारतो तो ज्याने मला पाठविले त्याला स्विकारतो."

२१ असे बोलल्यावर येशूवाह आपल्या आत्म्यात व्याकुळ झाला आणि उघडपणे म्हणाला, " मी तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यातील एक जण मला धरून देईल." २२ तेंव्हा तो कोणाविषयी बोलला, असा संशय धरून थालमीद (शिष्य) एकमेकांकडे पाहू लागले. २३ आणि ज्याच्यावर येशूवाह अहेद (प्रीति) करीत असे, असा त्याच्या थालमीद (शिष्या) तील एक जण येशूवाह जवळ खेटून बसला होता. २४ शिमोन केफाने त्या थालमीद (शिष्या) ला खुणावले आणि म्हणाला, "ज्याच्याविषयी तो बोलतो तो कोण आहे? हे विचार." २५ तेंव्हा तो तसाच येशूवाहच्या अगदी जवळ असता त्याला म्हणाला, "अदोनाई तो कोण आहे?" २६ येशूवाहने उत्तर दिले, "ज्याला मी भाकरीचा तुकडा ताटात भिजवून देईन तोच तो आहे." मग त्याने भाकरीचा तुकडा ताटात बुडवून घेतला व तो शिमोनाचा मुलगा यहूदा इस्कर्योत याला दिला. २७ त्याने भाकरीचा तुकडा घेतला, आणि सैतानाने त्याचा ताबा घेतला. मग येशूवाने त्याला म्हंटले, "तुला जे करायचे आहे, ते लवकर कर." २८ पण त्याने त्याला काय सांगिताले, हे जेवणास बसलेल्यांपैकी कोणाला कळले नाही. २९ कारण यहूदा जवळ पैशाचा व्यवहार होता. काहींना वाटले येशूवाह त्याला भोजनास जे पाहिजे ते आपणासाठी सांगत आहे, किंवा गरीबाला काही देण्या विषयी सांगत आहे. ३० यहूदाने भाकर घेतल्यावरोबर तो बाहेर गेला, कारण ती वेळ रात्रीची होती.

३१ तो गेल्यावर येशूवाह म्हणाला, " आता मनुष्याच्या मुलाचे गौरव झाले आहे. आणि त्याच्याठायी याव्हे एलोहिमचे गौरव झाले आहे. ३२ याव्हे एलोहिम आपल्याठायी त्याचे गौरव करील, तो त्याचे गौरव लवकर करील. ३३ माझ्या मुलांनो, अजून थोडा वेळ मी तुमच्याबरोबर आहे. तुम्हीं माझा शोध कराल, आणि जसे मी यहूद्यांस सांगितले की, जेथे मी जातो तेथे तुमच्याने येता येणार नाही तसेच मी तुम्हांलाही आता सांगतो.३४ मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्हीं एकमेकांवर अहेद (प्रीति) करा. जशी मी तुम्हांवर अहेद (प्रीति) केली आहे तशीच तुम्हींही एकमेकांवर अहेद (प्रीति) करा. ३५ तुमची एकमेकावर अहेद (प्रीति) असली तर सर्व ओळखतील की, तुम्हीं माझे थालमीद (शिष्य) आहात."

३६ शिमोन केफा त्याला म्हणाला, " अदोनाई तुम्हीं कोठे जात आहात?" येशूवाहने उत्तर दिले "जेथे मी जातो तेथे तुझ्याने येता येणार नाही. पण नंतर तू माझ्यामागे येशील." ३७ केफा त्याला म्हणाला, "माझ्याने आताच तुमच्या मागे का येता येणार नाही? मी तुमच्यासाठी मरायला तयार आहे." ३८ मग येशूवाहने उत्तर दिले, " तू खरोखर आपला जीव मजसाठी देशील? मी खरे सांगतो, तू मला तीन वेळा नाकरीपर्यंत कोंबडा आरवणार नाही."

**१४.** १ तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये, याव्हे एलोहिमवर विश्वास ठेवा, आणि माझ्यावरही विश्वास ठेवा.२ माझ्या याव्हे अव्वाच्या घरात राहण्याच्या पुष्कळ जागा आहेत. जागा नसत्या तर मी तुम्हांला सांगितले असते. कारण मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. ३ मी गेल्यावर तुमच्यासाठी जागा तयार करीन, आणि पुन्हा येईन.आणि तुम्हांला माझ्या जवळ घेईन. यासाठी की, जेथे मी आहे तेथे तुम्हींही असावे.४ आणि मी कोठे जातो तिकडे जाण्याचा मार्गही तुम्हांला ठाऊक आहे." ५ थोमा येशूवाहला म्हणाला, " अदोनाई तुम्हीं कोठे जात आहात, हे आम्हांला ठाऊक नाही. मग आम्हांला मार्ग कसा ठाऊक असणार? " ६ येशूवाहने उत्तर दिले, "मी मार्ग, सत्य आणि जीवन आहे. केवळ माझ्या व्दारेच याव्हे अव्वा जवळ जाता येते. ७ जर तुम्हीं मला ओळखले असते तर माझ्या याव्हे अव्वाला ही ओळखले असते. आणि आता पासून तुम्हीं त्याला ओळखता, व त्याला पाहिले आहे." ८ फिलिप्प येशूवाहला म्हणाला, " अदोनाई आम्हांला याव्हे अव्वास दाखवा.एवढेच आमचे मागणे आहे." ९ येशूवाहने त्याला म्हंटले, " फिलिप्पा, मी इतका वेळ तुमच्याजवळ असताना तू मला ओळखले नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे, त्याने याव्हे अव्वाला पाहिले आहे. तर मग आम्हांस याव्हे अव्वास दाखव असे तू कसे म्हणतोस? १० मी याव्हे अव्वा मध्ये आहे व याव्हे

अव्बा मजमध्ये आहे. असा तू विश्वास धरतोस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो, त्या माझ्या स्वतःच्या नाहीत. तर माझ्यामध्ये
जो याव्हे अव्बा आहे, तो स्वतः कामे करतो. ११ मी याव्हे अव्बा मध्ये आहे व याव्हे अव्बा माझ्यामध्ये आहे, असा विश्वास धरा.
नाहीतर मी केलेल्या कामावरून तरी माझ्यावर विश्वास ठेवा.१२ मी तुम्हांला खरे सांगतो, मी जी कामे करतो ती कामे पाहून माझ्यावर
विश्वास ठेवणाराही करील. आणि त्यापेक्षाही मोठी कामे करील. कारण मी याव्हे अव्बा कडे जातो. १३ आणि तुम्हीं जे काही
माझ्या नावाने माझ्याजवळ मागाल, ते मी करीन यासाठी की, वेन (मुला) मध्ये याव्हे अव्बाचे गौरव व्हावे. १४ जर तुम्हीं माझ्या
नावाने माझ्याजवळ काही मागाल, तर ते मी करीन.”

१५ जर तुम्हीं माझ्यावर अहेद (प्रीति) करीत असाल, तर ज्या आज्ञा मी करतो, त्या तुम्हीं पाळाल. १६ आणि मी याव्हे अव्बाला
सांगेन, आणि तो तुम्हांला दुसरा सहाय्यकर्ता देईल. यासाठी की, त्याने तुम्हांबरोबर सर्वकाळ राहावे. १७ सहाय्यकर्ता हा सत्याचा
आत्मा आहे. जग त्याचा स्विकार करू शकत नाहीत. कारण ते त्याला पाहात किंवा ओळखत नाही. पण तुम्हीं त्याला ओळखता.
कारण तो तुमच्याबरोबर राहतो, तो तुमच्यामध्ये वास करील.१८ मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही. मी तुमच्याकडे येईल. १९
आणखी काही वेळाने जग मला पाहणार नाही, परंतु तुम्हीं मला पाहाल. मी जगतो म्हणून तुम्हींही जगाल. २० त्या दिवशी तुम्हांला
जाणीव होईल की, मी आपल्या याव्हे अव्बा मध्ये आहे. आणि तुम्हीं माझ्यामध्ये आहात, मी तुमच्यामध्ये आहे.२१ ज्याच्याकडे
माझ्या आज्ञा आहेत, आणि त्या जो पाळतो. तो असा आहे की, जो माझ्यावर प्रीति करतो. त्याच्यावर याव्हे अव्बा अहेद (प्रीति)
करील. मी सुद्धा त्याच्यावर अहेद (प्रीति) करीन, आणि स्वतःला त्याच्यासाठी प्रगट करीन.” २२ मग यहूदा (यहूदा इस्कर्योत नव्हे)
त्याला म्हणाला, “ पण अदोनाई तू आम्हांसमोर स्वतःला का प्रगट करणार आहेस, आणि जगासमोर का नाही?” २३ येशूवाहने उत्तर
दिले, “जर कोणी माझ्यावर प्रीति करतो, तर तो माझी शिकवण पाळील.माझा याव्हे अव्बा त्याच्यावर प्रीति करील. आम्ही
त्याच्याकडे येऊ व त्याच्याबरोबर राहू. २४ जो माझ्यावर प्रीति करीत नाही, तो माझी शिकवण पाळणार नाही. हे शब्द जे तुम्हीं
ऐकता ते माझे नाहीत, ज्या याव्हे अव्बाने मला पाठविले त्याचे हे शब्द आहेत.” २५ “ मी तुम्हांजवळ राहत असतानाच तुम्हांस या
गोष्टी सांगितल्या आहेत. २६ तरी ज्याला अव्बा माझ्या नावाने पाठवील तो साहाय्यकर्ता म्हणजे कादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा)
तुम्हांस सर्व शिकवील. आणि ज्या गोष्टी मी तुम्हांस सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांस आठवण करून देईल. २७ “शालोम (शांती) मी
तुमच्याजवळ ठेवतो, माझी शालोम (शांती) मी तुम्हांला देतो. जसे जग देते तशी मी तुम्हांला देत नाही.तुमची अंतःकरणे अस्वस्थ
होऊ देऊ नका, आणि भिऊ नका.२८ मी जातो आणि तुम्हांकडे येणार आहे, असे मी तुम्हांस सांगितले ते तुम्हीं ऐकले आहे. जर
तुमची माझ्यावर अहेद (प्रीति) असती तर मी याव्हे अव्बा कडे जातो याबद्दल तुम्हीं आनंद केला असता, कारण माझा याव्हे अव्बा
माझ्यापेक्षा महान आहे. २९ मी तुम्हांला हे घडण्यापूर्वी सांगितले आहे. यासाठी की, जेंव्हा हे घडेल तेंव्हा तुम्हीं विश्वास धरवा. ३०
मी जास्त काळ तुमच्याशी बोलणार नाही. कारण या जगाचा अधिपती येत आहे. तरी त्याचा माझ्यावर अधिकार नाही. ३१ परंतु
जगाने हे शिकले पाहिजे की, मी याव्हे अव्बा वर अहेद (प्रीति) करतो. आणि माझ्या याव्हे अव्बाने जी आज्ञा मला केलेली आहे,
नेमके तसेच मी करतो. “चला आता, आपण निघू या.”

**१५.** १ मी खरा द्राक्षवेल आहे आणि माझा याव्हे अव्बा माळी आहे. २ तो माझ्यातील फळ न देणारी प्रत्येक फांदी तोडून टाकतो.
ज्या प्रत्येक फांद्या फळ देतात त्यांनी अधिक फळ द्यावे, म्हणून त्या द्राक्षवेलीला तो साफ करतो. ३ जे वचन मी तुम्हांला सांगितले,
त्यामुळे तुम्हीं आता शुद्ध झालाच आहा. ४ तुम्हीं माझ्यामध्ये राहा, आणि मी तुम्हांमध्ये राहिन. जसा फाटा वेलात राहिल्यावाचून
त्याच्याने फळ देता येत नाही, तसे माझ्यामध्ये राहिल्याशिवाय तुम्हांला फळ देता येणार नाही. ५ “मी वेल आहे, तुम्हीं फाटे आहा,”
जो माझ्यामध्ये राहतो व मी त्याच्यामध्ये राहतो, तोच पुष्कळ फळ देतो. कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुमच्याने काही होत
नाही. ६ कोणी माझ्यामध्ये राहिला नाही तर तो फाटयाप्रमाणे बाहेर टाकला जातो. तो वाळून जातो मग त्याला गोळा करून अग्नीत
टाकतात. व ते जाळण्यात येते. ७ “तुम्ही माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली, तर जे काही तुम्हांला पाहिजे ते
तुम्हीं मागा, म्हणजे ते तुम्हांस मिळेल.” ८ तुम्हीं पुष्कळ फळ दिल्यानेच माझ्या याव्हे अव्बाचे गौरव होते, आणि तुम्हीं माझे थालमीद

(शिष्य) व्हाल. ९ जशी याव्हे अव्वाने माझ्यावर अहेद (प्रीति) केली आहे, तशीच मीहि तुम्हांवर अहेद (प्रीति) केली आहे. माझ्या प्रीतित राहा. १० ज्याप्रमाणे मी आपल्या याव्हे अव्वाच्या आज्ञा पाळल्या म्हणून त्याच्या प्रीतित राहतो, तसेच तुम्हीं माझ्या आज्ञा पाळाल, तर माझ्या प्रीतित राहाल. ११ माझा आनंद तुम्हांमध्ये राहावा, आणि तुमचा आनंद पूर्ण व्हावा, म्हणून मी तुम्हांला या गोष्टी सांगितल्या आहेत. १२ जशी मी तुम्हांवर प्रीति केली, तशीच तुम्हीं एकमेकांवर प्रीति करा. ही माझी आज्ञा आहे. १३ आपल्या मित्रासाठी मरावे, यापेक्षा कोणाचीही प्रीति मोठी नाही. १४ मी आज्ञा करतो तसे तुम्हीं वागता, तर तुम्हीं माझे मित्र आहात. १५ आता मी तुम्हांला दास म्हणत नाही, कारण आपला धनी काय करतो, हे दासाला माहीत नसते. पण मी तुम्हांला मित्र म्हणतो, कारण ज्या गोष्टी मी आपल्या याव्हे अव्वा कडून ऐकल्या, त्या सर्व तुम्हांला कळविल्या आहेत.१६ तुम्हीं मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले आणि नेमले आहे. यासाठी की, तुम्हीं जाऊन फळ द्यावे. आणि तुमचे फळ टिकावे यासाठी की जे काही तुम्हीं माझ्या नावाने याव्हे अव्वा जवळ मागाल, ते त्याने तुम्हांस द्यावे. १७ तुम्हीं एकमेकांवर अहेद (प्रीति) करावी, म्हणून या गोष्टी मी तुम्हांस आज्ञा देऊन सांगतो.

१८ जर जग तुमचा व्देष करते तर लक्षात ठेवा की, पहिल्यांदा जगाने माझा सुद्धा व्देष केलेला आहे. १९ तुम्हीं जर जगाचे असता तर जगाने तुम्हांवर जशी, ते स्वतःवर करतात तशी प्रीति केली असती.पण तुम्हीं जगाचे नसल्याने, आणि तुमची जगातून निवड केल्याने जग तुमचा व्देष करते. २० जे वचन तुम्हांला सांगितले ते लक्षात ठेवा.कोणताही दास आपल्या धन्यापेक्षा श्रेष्ठ नसतो. त्यानी जर माझी छळणूक केली, तर ते तुमचीही करतील. त्यांनी जर माझी शिकवण पाळली तर ते तुमची सुद्धा पाळतील.२१ माझ्या नावामुळे ते तुमच्याशी अशाप्रकारे वागतील, कारण ज्याने मला पाठविले त्याला ते ओळखत नाहीत.२२ जर मी आलो नसतो आणि त्यांना सांगितले नसते, तर ते पापाबद्दल दोषी ठरले नसते. आता त्यांना त्यांच्या पापाविषयी कारण सांगता येणार नाही. २३ जो माझा व्देष करतो, तो माझ्या याव्हे अव्वाचा ही व्देष करतो. २४ मी त्या लोकांमध्ये अशा गोष्टी केल्या, ज्या दुस-या कोणीही केल्या नाहीत.मी जर त्या गोष्टी केल्या नसत्या, तर पापाबद्दल ते दोषी ठरले नसते. पण आता त्यांनी ते चमत्कार पाहिले आहेत, आणि तरीही त्यांनी माझा व माझ्या याव्हे अव्वाचा व्देष केला. २५ परंतु तोराह (नियमशास्त्रात) लिहिलेले पूर्ण व्हावे म्हणून हे घडलेः कारण नसतांना त्यांनी माझा व्देष केला. २६ याव्हे अव्वा पासून मी साहाय्यकर्ता (क्वादोश रूहुव्वा, पवित्र आत्मा) पाठवीन. पवित्र आत्मा हा सत्याचा आत्मा आहे, तो याव्हे अव्वा पासून येतो. जेव्हा तो येतो, तेव्हा तो माझ्याविषयी सांगतो. २७ आणि तुम्हींसुद्धा माझ्याविषयी लोकांना सांगाल, कारण तुम्हीं माझ्यावरोबर सुरूवातीपासून आहात."

**१६**.१ मी हे सर्व तुम्हांला सांगितले आहे ते यासाठी की, तुम्हीं माझ्यावरील विश्वासाविषयी भुलविले जाऊ नये. २ ते तुम्हांला सभास्थानाच्या बाहेर काढतील. खरे पाहता अशी वेळ येत आहे की, जो कोणी तुमचा जीव घेईल. त्याला वाटेल की, आपण याव्हे एलोहिमची सेवाच करीत आहोत. ३ आणि ते तुम्हांला असे जरूर करतील. कारण त्यांना याव्हे अव्वा, किंवा मी माहीत नाही. ४ मी तुम्हांला आता या गोष्टी सांगितल्या आहेत. म्हणून या गोष्टी घडण्याची वेळ येईल, तेव्हा मी तुम्हांला त्यांच्याविषयी सावध केले होते, हे तुमच्या लक्षात येईल.

५ "परंतु ज्याने मला पाठविले त्याच्याकडे आता मी जातो. 'तरी तू कोठे जातोस,' असे तुम्हांतील कोणी मला विचारीत नाही. ६ पण या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या आहेत, म्हणून तुमचे अंतःकरणे दुःखाने भरले आहे.७ तरी तुम्हांस खरे ते सांगतो, मी जातो हे तुमच्या हिताचे आहे. कारण मी गेलो नाही, तर पवित्र आत्मा ( साहाय्यकर्ता ) तुमच्याकडे येणार नाही. पण जर मी गेलो, तर मी त्याला तुमच्याकडे पाठवीन. ८ आणि तो येऊन पाप, धार्मिकता, आणि न्याय याविषयी जग दोषी आहे, हे सिद्ध करील. ९ मी पापाविषयी सांगितले, तर लोक माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत. पवित्र आत्मा त्यांना त्यांची जाणीव करून देईल. १० नीतिमत्वाविषयी मी याव्हे अव्वा कडे जात आहे, मी याव्हे एलोहिमशी प्रामाणिक असल्याचे पवित्र आत्मा त्यांना पटवून देईल." ११ हा पवित्र आत्मा जगाला न्यायाचे सत्य पटवून देईल. कारण या जगाच्या अधिपतीचा (सैतानाचा) न्याय होऊन चुकला आहे.१२ मला

आणखी पुष्कळ सांगावयाचे आहे. तुम्हांला झेपणार नाही इतके सांगायचे आहे. १३ पण जेंव्हा तो सत्याचा आत्मा येतो, तेंव्हा तो तुम्हांला सर्व सत्यात मार्गदर्शन करील.तो त्याचे स्वतःचे असे काही बोलणार नाही, तो जे ऐकतो तेच तो बोलतो. आणि जे अजून यावयाचे आहे, त्याविषयी तो तुम्हांला सांगेल. १४ जे माझे त्यातून घेऊन आणि ते तुम्हांला कळवून तो माझे गौरव करील. १५ जे सर्व याव्हे अव्वाचे आहे, ते माझे आहे. या कारणासाठीच मी म्हणालो की, आत्मा जे माझे आहे. त्यातून घेईल आणि ते तुम्हांला कळवील.

१६ " थोडया वेळाने तुम्हीं मला पाहणार नाही, नंतर थोडया वेळाने तुम्हीं मला पाहाल." १७ त्याच्या थालमीद (शिष्या) तील काही जण एकमेकांस म्हणाले, " तो असे म्हणतो याचा अर्थ काय? थोडया वेळाने तुम्हीं मला पाहणार नाही. मग थोडया वेळाने तुम्हीं मला पाहाल, कारण मी याव्हे अव्वा कडे जात आहे!" १८ ते विचारतच राहिले, 'थोडया वेळाने' याला अर्थ काय? तो काय म्हणत आहे, हे आम्हांला समजत नाही." १९ येशूवाहने पाहिले की याविषयी त्यांना काही विचारायचे आहे; म्हणून तो त्यांना म्हणाला "तुम्हीं एकमेकांना हे विचारीत आहात की, जेंव्हा मी म्हणालो 'थोडया वेळाने तुम्हीं मला पाहणार नाही. आणि मग थोडया वेळाने तुम्हीं मला पाहाल ?' २० मी तुम्हांला खरे सांगतो, जग आनंद करीत असताना तुम्हीं रडाल आणि शोक कराल. तुम्हीं दुःखी व्हाल, पण तुमचे दुःख आनंदात बदलेल. २१ जन्म देणा-या स्त्रीला वेदना होतात, कारण तिची वेळ आलेली असते. पण जेव्हा बाळ जन्मते, तेव्हा ती सर्व वेदना विसरते. कारण एक बाळ या जगात जन्म घेते. २२ त्याप्रमाणे तुम्हांला आता खरोखर दुःख आहे. पण मी तुम्हांला पुन्हा भेटेन. आणि तुम्हीं आनंद कराल, आणि कोणीही तुमचा आनंद हिरावून घेणार नाही. २३ त्या दिवशी तुम्हीं माझ्याकडे काही मागणार नाही. मी खरे सांगतो, माझ्या नावाने जे काही तुम्हीं मागाल, ते माझा याव्हे अव्वा तुम्हांला देईल. २४ आतापर्यंत तुम्हीं माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे तुम्हांला मिळेल आणि तुमचा आनंद परिपूर्ण होईल."

२५ " जरी मी तुम्हांला रूपकाच्या भाषेत या गोष्टी सांगितल्या आहेत. तरी मी आणखी अशा प्रकारची भाषा बोलणार नाही. पण साधेपणाने याव्हे अव्वा विषयी तुम्हांला सांगेन. २६ त्या दिवशी तुम्हीं माझ्या नावाने मागाल, आणि मी तुमच्यासाठी याव्हे अव्वा कडे विनंती करीन, असे मी म्हणत नाही. २७ कारण याव्हे अव्वा स्वतः तुमच्यावर प्रीति करतो, कारण तुम्हीं माझ्यावर प्रीति केली. व माझ्यावर विश्वास ठेवला की, मी एलोहिम पासून आलो. २८ मी याव्हे अव्वा पासून निघून आलो, आणि जगात आलो आहे; पुन्हा मी जग सोडून याव्हे अव्वा कडे जात आहे." २९ मग येशूवहाचे थालमीद (शिष्य) म्हणाले, "आता तुम्हीं स्पष्टपणे बोलत आहात, आणि रूपकाची भाषा वापरीत नाही. ३० आता आम्हांला पक्के समजले की, तुम्हांला सर्व माहीत आहे. आणि तुम्हांला कोणी प्रश्न विचारण्याची सुद्धा आवश्यकता नाही.यामुळे आम्ही विश्वास धरतो की, आपण याव्हे एलोहिम पासून आला आहात." ३१ येशूवाहने उत्तर दिले, "आता तुम्ही विश्वास धरू लागला काय? ३२ पण अशी वेळ येत आहे, आणि आली आहे. जेव्हा तुमची पांगापांग होईल. प्रत्येक जण त्याच्या घरी जाईल. तुम्हीं मला एकटेच सोडाल. तरीही मी एकटा नाही कारण माझा याव्हे अव्वा मजबरोबर आहे." ३३ मी तुम्हांला या गोष्टी सांगितल्या आहेत. यासाठी की, माझ्यामध्ये तुम्हांला शालोम (शांती) मिळावी. या जगात तुम्हांला त्रास होईल, पण धीर धरा, मी जगाला जिंकले आहे.

**१७.**१ येशूवाहने हे बोलणे संपविल्यावर, आपले डोळे आकाशांकडे लावले आणि प्रार्थना केली. " याव्हे अव्वा वेळ आली आहे, वेन (मुलाचे) गौरव कर. यासाठी की, वेन (मुलगा) तुझे गौरव करील. २ तू त्याला जे दिले आहे, त्या सर्वांना त्याने अनंतकाळचे जीवन द्यावे. यासाठी सर्व मनुष्यांवर तू त्याला अधिकार दिला, त्याप्रमाणे त्याने तुझे गौरव करावे. ३ आणि अनंतकाळचे जीवन हेच की, तू जो एकच खरा याव्हे एलोहिम त्या तुला, व ज्याला तू पाठविलेस त्या येशूवाह मशीहाला, त्यांनी ओळखावे. ४ तू मला जे काम करायला दिले, ते संपवून मी पृथ्वीवर तुला गौरविले. ५ तर आता हे याव्हे अव्वा जग होण्यापूर्वी तुझ्याबरोबर जे गौरव मला होते, त्याव्दारे तू स्वतःबरोबर माझे गौरव कर." ६ ज्यांना तू मला या जगातून दिलेस, त्यांना मी तुला प्रगट केले.ते तुझे होते. व तू त्यांना माझ्या स्वाधीन केलेस. आणि त्यांनी तुझे वचन पाळले. ७ आता त्यांना माहीत आहे की, जे काही तू मला दिले आहेस, ते तुझ्यापासून येते. ८ कारण जी वचने तू मला दिली, ती मी त्यांना दिली आहेत. आणि त्यांनी ती स्विकारली.त्यांना खरोखरच माहीत

होते की, मी तुझ्यापासून आलो आहे. आणि त्यांनी विश्वास ठेवला की, तू मला पाठविले आहेस. ९ मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो
. मी जगासाठी प्रार्थना करीत नाही. तर ज्यांना तू माझ्या स्वाधीन केलेस त्यांच्यासाठीच, कारण ते तुझे आहेत. १० माझ्या कडे जे
काही आहे ते तुझे आहे. आणि जे तुझे आहे ते माझे आहे. आणि त्यांच्याव्दारे गौरव माझ्याकडे आले. ११ आणि यापुढे मी जगात
नाही, ते जगात आहेत. आणि मी तुझ्याकडे येत आहे. हे पवित्र याव्हे अव्बा जे नाव तू मला दिले आहेस, त्या तुझ्या नावात त्यांना
राख. यासाठी की, जसे आपण एक आहोत तसे त्यांनीही एक व्हावे. १२ मी त्यांच्या बरोबर होतो, तो पर्यंत जे नाव तू मला दिलेस,
त्या तुझ्या नावात मी त्यांना राखले. आणि मी त्यांना संभाळले, आणि ज्याने नाशाचा मार्ग निवडला होता, त्यांच्याशिवाय त्यांच्यातील
कोणी नाश पावला नाही. हे यासाठी झाले की, शास्त्रलेख पूर्ण व्हावा. १३ पण आता मी तुझ्याकडे येत आहे. आणि त्यांच्यामध्ये
माझा आनंद पूर्ण व्हावा, म्हणून मी जगात या गोष्टी सांगतो." १४ मी त्यांना तुझे वचन दिले आहेत, आणि जगाने त्यांचा व्देष
केला. कारण जसा मी या जगाचा नाही, तसे तेही या जगाचे नाहीत. १५ या जगातून तू त्यांना काढून घ्यावेस, अशी माझी प्रार्थना
नाही. पण दुष्टांपासून तू त्यांचे रक्षण करावेस. १६ जसा मी या जगाचा नाही, तसे ते सुद्धा या जगाचे नाहीत. १७ तू त्यांना सत्यात
क्वादोश (पवित्र) कर, कारण तुझा मशीहा हेच सत्य आहे. १८ जसे तू मला जगात पाठविले, तसे मी त्यांना या जगात पाठवितो. १९
त्याच्यांसाठी मी स्वतःला पवित्र करतो यासाठी की, ते सुद्धा ख-या अर्थाने पवित्र व्हावेत. २० आणि मी फक्त त्यांच्यासाठीच विनंती
करतो असे नाही, तर त्यांच्या वचनावरून जे माझ्यावर विश्वास ठेवतात, त्यांच्यासाठीही विनंती करतो. २१ यासाठी की, त्या सर्वांनी
एक व्हावे. याव्हे अव्बा जसा तू माझ्यामध्ये व मी तुझ्यामध्ये, तसेच त्यांनी आम्हांमध्ये असावे. यासाठी की, तू मला पाठविले असा
जगाने विश्वास धरावा. २२ आणि तू जे गौरव मला दिले आहे, ते मी त्यांना दिले आहे. यासाठी की, जसे आपण एक आहो, तसे
त्यांनीही एक व्हावे. २३ मी त्यांच्यामध्ये आणि तू माझ्यामध्ये ते पूर्णपणे ऐक्यात आणले जावेत. यासाठी की, हे जगाला माहीत
व्हावे की ,तू मला पाठविलेस.आणि जशी तू माझ्यावर प्रीति केलीस, तशी मी ही त्यांच्यावर केली. २४ हे याव्हे अव्बा जे लोक तू
मला दिलेस. त्यांनी मी जेथे आहे, तेथे माझ्याबरोबर असावे असे मला वाटते. आणि त्यांनी माझे गौरव करावे. जगाच्या निर्मीत्ती
पूर्वी तू माझ्यावर प्रीति केली. म्हणून जे गौरव तू मला दिलेस, तेच हे गौरव आहे. २५ नीतिमान याव्हे अव्बा जरी जग तुला
ओळखत नाही, तरी मी तुला ओळखतो. आणि त्यांना माहीत आहे की, तू मला पाठविलेले आहेस. २६ मी त्यांना तुझी ओळख
करून दिलेली आहे, व तुझी ओळख करून देतच राहीन.यासाठी की, जी अहेद (प्रीति) तू माझ्यावर करतोस, ती त्यांच्यावरही
करावे. आणि मी स्वतः त्यांच्यामध्ये असावे."

१८. १ या गेष्टी बोलल्यावर, येशूवाह आपल्या थालमीद (शिष्यां) बरोबर किद्रोन ओहोळाच्या पलीकडे गेला. तेथे एक बाग होती,
त्या बागेत तो व त्याचे थालमीद (शिष्य) गेले.२ आणि त्याला धरून शत्रूच्या हाती देणारा यहूदा, यालाही ही जागा ठाऊक होती.
कारण येशूवाह आपल्या थालमीद (शिष्यां) बरोबर नेहमी तेथे येत असे. ३ तेंव्हा शिपायांची तुकडी, एलयोवन कोहेन (मुख्य
याजकाचे) काही अधिकारी, परूशी, यांना वाट दाखवीत यहूदा तेथे बागेत आला. ते मशाल, कंदील, आणि हत्यारे घेऊन आले
होते. ४ मग येशूवाह आपल्या बाबतीत जे काही होणार हे सर्व जाणून पुढे जाऊन त्यांना म्हणाला, " तुम्हांला कोण पाहिजे." ५
"नात्सेरेथचा येशूवाह," ते म्हणाले. येशूवाहने उत्तर दिले, " तो मी आहे" (आणि विश्वासघात करणारा यहूदा तेथे त्यांच्यामध्ये उभा
होता) ६ तेंव्हा येशूवाह म्हणाला " तो मी आहे." ते मागे सरले आणि जमिनीवर पडले. ७ पुन्हा त्याने त्यांना विचारले, "तुम्हांला
कोण पाहिजे ?" आणि ते म्हणाले "नात्सेरेथचा येशूवाह". ८ येशूवाहने उत्तर दिले, "मी तुम्हांला सांगितले की, तो मी आहे. जर
तुम्हीं मला शोधत असाल, तर या लोकांना जाऊ द्या." ९ हे यासाठी घडले की, जे वचन बोलण्यात आले होते, ते सर्व पूर्ण
व्हावेत. " जे तू मला दिलेस त्यांतील एकही मी गमवला नाही." १० मग शिमोन केफा ज्याच्याकडे तलवार होती त्याने ती बाहेर
काढली व एलयोवन कोहेन (मुख्य याजका) च्या सेवकाचा कान कापला.(त्या सेवकाचे नाव मल्ख होते) ११ येशूवाहने केफाला आज्ञा
केली "तुझी तलवार तिच्या जागेवर ठेव! याव्हे अव्बाने दिलेल्या प्याला मी पिऊ नये काय?"

१२ मग शिपायांची तुकडी, व त्यांचा सरदार, आणि यहूदी रक्षक यांनी येशूवाहला अटक केली. त्याला त्यांनी बांधले आणि, १३

त्याला प्रथम हन्नाकडे आणले. तो कायफा या एलयोवन कोहेन (प्रमुख याजका) चा सासरा होता. कायफा त्या वर्षीचा एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) होता.१४ आणि कायफा हाच असे म्हणणार होता की, सर्व माणसांसाठी एका माणसाने मरणे बरे. १५ शिमोन केफा, व दुसरा थालमीद (शिष्य) येशूवाहच्या मागून चालले. कारण हा थालमीद (शिष्य) एलयोवन कोहेन (प्रमुख याजका) च्या ओळखीचा होता. म्हणून तो येशूवाहच्या बरोबर एलयोवन कोहेन (प्रमुख याजका) च्या वाडयात आत गेला.१६ परंतु केफा दाराशी बाहेर उभा राहिला. म्हणून जो दुसरा थालमीद (शिष्य) एलयोवन कोहेन (प्रमुख याजका) च्या ओळखीचा होता, त्याने बाहेर जाऊन तेथे कामावर असणा-या मुलीला सांगून केफाला आत आणले. १७ ती मुलगी केफाला म्हणाली, “ तुम्हीं त्या मनुष्याच्या थालमीद (शिष्यां) पैकी आहेस काय?” केफाने उत्तर दिले, “मी नाही.” १८ थंडी असल्याने नोकरांनी, व रक्षकांनी स्वतःला गरम राखण्यासाठी शेकोटी पेटविली होती, व ते शेकत उभे राहिले होते. केफाही त्यांच्याबरोबर शेकत उभा राहिला होता.

१९ तेंव्हा एलयोवन कोहेन ने (प्रमुख याजकाने), येशूवाहला त्याच्या थालमीद (शिष्यां) विषयी व त्याच्या शिकवणुकी विषयी विचारले. २० येशूवाहने त्याला उत्तर दिले की, “मी उघडपणे जगाशी बोललो. सभास्थानात, व मंदिरात जेथे यहूदी एकत्र जमतात. तेथे मी नेहमी शिकविले, आणि मी गुप्त असे काहीच बोललो नाही. २१ मला तू का विचारतोस ज्यांनी माझी शिकवण ऐकली, त्यांना विचार. मी काय बोललो ते त्यांना माहीत आहे.” २२ येशूवाहने असे म्हंटले, तेंव्हा तेथे उभे असलेल्या रक्षकाने येशूवाहला चपराक मारली. रक्षक म्हणाला, “ तू एलयोवन कोहेन (प्रमुख याजका) ला असे उत्तर देतोस काय?” २३ येशूवाहने त्याला उत्तर दिले, “जर मी वाईट बोललो असेन तर तसे सांग, की मी चुकीचे बोललो. पण जर चांगले बोललो तर तू मला का मारतोस?” २४ हन्नाने त्याला बांधलेलेच एलयोवन कोहेन (मुख्य याजक) कायफाकडे पाठविले. २५ शिमोन केफा शेकत असता त्याला विचारले गेले, “ तू त्याच्या थालमीद (शिष्यां) पैकी एक नाहीस ना?” त्याने ते नाकारले, “मी नाही.” २६ एलयोवन कोहेन (मुख्य याजका) च्या नोकरांपैकी एक जण ज्याचा कान केफाने कापला होता, त्याचा नातेवाईक होता. तो म्हणाला, “मी तुला त्याच्याबरोबर बागेत पाहिले नाही काय?” २७ केफाने पुन्हा नाकारले, आणि त्या क्षणी कोंबडा आरवला.

२८ नंतर यहूदी येशूवाहला कायफाच्या वाडयातून, रोमन राजवाडयाकडे घेऊन गेले.तेंव्हा पहाट झाली होती. आपण विटाळले जाऊ नये, व वल्हांडणाचे भोजन करता यावे म्हणून ते राजवाडयात गेले नाहीत. २९ म्हणून पिलात त्यांच्याकडे बाहेर येऊन म्हणाला, “तुम्हीं या माणसावर कोणता आरोप करीत आहात?” ३० तेंव्हा त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हंटले, “ हा जर दुष्कर्मी नसता, तर आम्हीं याला तुमच्या स्वाधीन केले नसते.” ३१ मग पिलाताने त्यांना म्हंटले, “ तुम्हीं याला घेऊन आपल्या तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे त्याचा न्याय करा.” यहूदी म्हणाले, “आम्हांला कोणाचा जीव घेण्याचा अधिकार नाही.” ३२ आपल्याला कसले मरण येणार हे सुचवून, येशूवाह जे वचन बोलला होता. ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले. ३३ मग पिलात पुन्हा राजवाडयात गेला. येशूवाहला बोलावले आणि विचारले, “तू यहूद्यांचा मेलेक (राजा) आहेस काय?” ३४ येशूवाहने विचारले , “तू हे स्वतःहून विचारतोस की, दुस-यांनी तुला माझ्याविषयी सांगितले.”

३५ पिलाताने उत्तर दिले, “ मी यहूदी आहे काय? तुझे लोक, आणि तुझ्या एलयोवन कोहेन (मुख्य याजकां) नी तुला माझ्या हाती दिले.तू काय केले आहेस.” ३६ येशूवाह म्हणाला, “ माझे राज्य या जगाचे नाही. जर ते असते तर यहूद्यांपासून माझी सुटका करण्यासाठी माझे सेवक लढले नसते का? पण माझे राज्य दुस-या ठिकाणाचे आहे.” ३७ पिलात म्हणाला, “तर तू एक मेलेक (राजा) आहेस!” येशूवाहने उत्तर दिले, “ मी मेलेक (राजा) आहे असे तू म्हणतोस तेंव्हा बरोबर म्हणतोस. खरे पाहता, या कारणासाठी मी जन्मलो आणि सत्याविषयी साक्ष देण्यासाठी मी या जगात आलो. जे सर्व सत्याच्या बाजूचे आहेत ते माझे ऐकतात.” ३८ पिलाताने विचारले, “ सत्य काय आहे?” असे म्हणून तो पुन्हा यहूद्यांकडे गेला. आणि म्हणाला, “ मला याच्यात काहीच अपराध सापडत नाही. ३९ पण पेसॅह (वल्हांडण) सणात मी तुम्हांसाठी एकाला सोडावे, अशी तुमच्यामध्ये रीत आहे. म्हणून मी तुमच्यासाठी यहूद्यांच्या राजाला सोडावे, अशी तुमची इच्छा आहे काय?” ४० ते ओरडले, “नको, त्याला नको! ‘आम्हांला वरब्बाला सोडा’ वरब्बा एक दरोडेखेर होता.

१९. १  मग पिलाताने येशूवाहला नेऊन फटके मारण्याची आज्ञा दिली. २ आणि शिपायांनी काटयांचा मुगूट गुंफून तो त्याच्या
डोक्यात घातला, व त्याला जांभळे वस्त्र घातले. ३ ते त्याच्याजवळ वारंवार येऊन म्हणाले, ‘ हे यहूद्यांच्या मेलेक (राजा) तुझा
जयजयकार असो!” आणि त्यांनी त्याच्या तोंडावर मारले. ४ पुन्हा एकदा पिलात बाहेर आला, आणि यहूद्यांना म्हणाला, “ पाहा! मी
त्याला बाहेर तुमच्याकडे आणत आहे.तुम्हांला हे समजावे म्हणून की, मला त्याच्यावर दोषारोप कोणतेच कारण सापडत नाही.” ५
जेंव्हा येशूवाह काटयांचा मुगूट, व जांभळी वस्त्रे घालून बाहेर आला. तेंव्हा पिलात त्यांना म्हणाला, “ हा पहा तो मनुष्य!” ६
एलयोवन कोहेन (मुख्य याजक), व त्यांचे रक्षक त्याला पाहता क्षणीच मोठयाने ओरडले, “त्याला वधस्तंभावर खिळा! वधस्तंभावर
खिळा!” पण पिलाताने उत्तर दिले, “तुम्हीं त्याला घ्या व वधस्तंभावर खिळा. माझ्या दृष्टीने त्याच्यावर आरोप ठेवण्यास कोणतेही
कारण मला दिसत नाही.” ७ यहूद्यांनी जोर देऊन म्हंटले, “ आम्हांला तोराह (नियमशास्त्र) आहे, आणि त्या तोराह (नियमशास्त्रा)
प्रमाणे त्याने मेलेच पाहिजे. कारण त्याने स्वतः याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) असल्याचा दावा केला.” ८ जेंव्हा पिलाताने हे ऐकले
तेंव्हा तो अधिकच घाबरला. ९ आणि तो आत राजवाडयात परत गेला. येशूवाहला त्याने विचारले, “ तू कोठून आला आहेस?”
पण येशूवाहने त्याला उत्तर दिले नाही. १० पिलात म्हणाला, “ तू माझ्याशी बोलण्यास नकार देतोस काय? तुला वधस्तंभावर
खिळण्याची, किंवा मुक्त करण्याची ताकद मला आहे, हे तुला समजत नाही का?” ११ येशूवाहने उत्तर दिले, “जर वरून अधिकार
देण्यात आला नसता, तर तुला माझ्यावर अधिकार नसता. म्हणून ज्याने मला तुझ्या स्वाधीन केले, तो महान पापाचा दोषी आहे.”
१२ तेंव्हा पासून पिलाताने येशूवाहला सोडण्याचा प्रयत्न केला. पण यहूदी मोठमोठयाने ओरडत राहिले. “जर तुम्ही या मानसाला
जाऊ दिले, तर तुम्हीं कैसराचे मित्र नाही. जो कोणी स्वतः राजा असल्याचा दावा करतो, तो कैसराला विरोध करतो.” १३ जेंव्हा
पिलाताने हे ऐकले, तेंव्हा त्याने येशूवाहला बाहेर आणले. आणि फरसबंदी नावाची जागा जिला इब्री भाषेत गब्बाथा म्हणतात, तेथे
तो न्यायासनावर बसला. १४ तो तर पेसॅह  (वल्हांडणा) ची तयारी करण्याचा दिवस असून, दुपारची वेळ झाली होती.१५ पिलात त्या
यहूद्यांना म्हणाला, “पहा हा तुमचा मेलेक (राजा)” यहूदी ओरडले, “त्याला घेऊन जा! त्याला घेऊन जा! आणि वधस्तंभावर खिळून
मारा!” पिलाताने त्यांना विचारले, “ मी तुमच्या मेलेकला (राजाला) वधस्तंभी द्यावे काय” एलयोवन कोहेन (मुख्य याजकांनी) उत्तर
दिले, “ आम्हांला कैसराशिवाय दुसरा कोणी राजा नाही.” १६ मग त्याने त्याला वधस्तंभी खिळण्यासाठी त्यांच्या हाती दिले. मग
शिपायांनी येशूवाहचा ताबा घेतला.

१७ येशूवाहने स्वतःचा वधस्तंभ वाहिला, तो बाहेर कवटीची जागा म्हंटलेल्या ठिकाणी गेला.(इब्री भाषेत त्याला गुलगुथा म्हणतात.)
१८ गुलगुथा येथे येशूवाहला वधस्तंभावर खिळयांनी ठोकले. आणखी दोन मनुष्यांना सुद्धा वधस्तंभावर खिळले. त्या दोघांना त्यांनी
येशूवाहच्या दोन्ही बाजूंना खिळले व मध्ये येशवाहला खिळले. १९ आणि पिलाताने एक वाक्य लिहिले आणि ते वधस्तंभावर
लावले.त्यावर असे लिहिले होते की, “येशूवाह नात्सेरेथकर यहूद्यांचा मेलेक” २० ती पाटी इब्री भाषेत लिहिली होती.पुष्कळ यहूदी
लोकांनी ती पाटी वाचली. कारण येशूवाह जेथे वधस्तंभावर देण्यात आले होते, ते ठिकाण शहराच्या जवळ होते. तसेच ते लॅटीन,
ग्रीक, आरामी भाषेतही लिहिले होते.२१ यहूद्यांच्या एलयोवन कोहेन (मुख्य याजकां) नी पिलाताला विरोध केला. ते म्हणाले,
‘यहूद्यांचा मेलेक (राजा)’ असे लिहू नका. ‘तर हा मनुष्य यहूदी लोकांचा मेलेक (राजा) आहे’ “असा दावा करतो असे लिहा.” २२
पिलाताने म्हंटले, “ मी जे लिहिले ते लिहिले.” २३ जेंव्हा शिपायांनी येशूवाहला वधस्तंभावर खिळले, तेंव्हा त्यांनी त्याचे वस्त्रे घेतली,
आणि चौघात ती वाटून घेतली. फक्त अंतर्वस्त्रे ठेवली हा झगा वर पासून खालपर्यंत पूर्ण विणलेला होता. त्याला शिवलेले नव्हते.
२४ म्हणून ते एकमेकांस म्हणाले, “हा आपण फाडू नये, तर यासाठी चिठ्ठया टाकून कोणाला मिळतो ते ठरवू या.” हे यासाठी घडले
की शास्त्रलेखात जे लिहिले होते ते पूर्ण व्हावे. “त्यांनी माझी वस्त्रे आपसात वाटून घेतली, आणि माझ्या वस्त्रासाठी चिठ्ठया
टाकल्या.” म्हणून शिपायांनी असे केले. २५ येशूवाहच्या वधस्तंभाशेजारी त्याची अम्मी (आई), त्याच्या आईची बहीण, क्लोपाची
आई मरीया, आणि मरीया मग्दालिया उभ्या होत्या. २६ जेंव्हा येशूवाहने त्याच्या अम्मीला (आईला) तेथे पाहिले, आणि ज्या थालमीद
(शिष्या) वर त्याची प्रीति होती, तो जवळच उभा होता. तेंव्हा तो त्याच्या अम्मीला (आईला) म्हणाला, “अम्मी (आई) हा तुझा बेन

(मुलगा) आहे." २७ आणि त्या थालमीद (शिष्यां) ला येशूवाह म्हणाला, " पाहा ही तुझी अम्मी (आई) आहे." म्हणून त्या
दिवसापासून या थालमीद (शिष्यांने) तिला आपल्या घरी नेले.

२८ नंतर हे ओळखून की, आता सर्व पूर्ण झाले आहे, आणि शास्त्रलेखातील वचनांची परिपूर्ती व्हावी म्हणून येशूवाह म्हणाला, " मला
तहान लागली आहे." २९ तेथे एक आंब भरून ठेवलेले भांडे होते, म्हणून त्यांनी बोळा आंबेत बुडवून भरून, एजोबाच्या काठीवर
ठेवून त्याच्या तोंडाला लावला. ३० येशूवाहने आंब घेतल्यावर म्हणाला , "पूर्ण झाले आहे." मग त्याने आपले डोके लववून, आपला
आत्मा सोडून दिला. ३१ तो तयारीचा दिवस होता, व दुस-या दिवशी विशेष शब्बाथाचा दिवस होता. शब्बाथ दिवशी शरीरे
वधस्तंभावर राहू नयेत ,अशी यहूदी लोकांची इच्छा होती.त्यांनी पिलाताला पाय तोडण्यांची, आणि शरीरे वधस्तंभावरून खाली
घेण्याविषयी विचारले. ३२ म्हणून शिपायांनी येऊन येशूवाह बरोबर वधस्तंभी खिळलेल्या, पहिल्याचे व दुस-याचे पाय तोडून
टाकले.३३ पण जेंव्हा ते येशूवाहकडे आले, तेंव्हा त्यांना आढळून आले की, तो अगोदरच मेला आहे.तेंव्हा त्यांनी त्याचे पाय तोडले
नाहीत.३४ तरी शिपायांपैकी एकाने त्याच्या कुशीत भाला भोसकला, तेंव्हा लगेच रक्त आणि पाणी बाहेर निघाले. ३५ ज्या मनुष्याने
हे पाहिले, त्याने साक्ष दिली आहे.आणि त्याची साक्ष खरी आहे. त्याला माहीत आहे की, तो खरे बोलत व तो साक्ष देतो यासाठी
की, तुम्हीं विश्वास धरावा.३६ या गोष्टी अशासाठी घडल्या की, शास्त्रलेखाची परिपूर्ती व्हावे. "त्याचे एकही हाड मोडणार नाही."
३७ आणि दुस-या शास्त्रलेखात म्हंटले आहे, "ज्याला त्यांनी भोसकले त्याला ते पाहतील."

३८ नंतर अरिमथाई येथील योसेफाने पिलाताला येशूवाहचे शरीर मागितले. योसेफ हा येशूवाहचा थालमीद (शिष्य) होता. पण गुप्त
रीतीने, कारण त्याला यहूद्यांची भीति वाटत होती. पिलाताच्या परवानगीने तो आला व शरीर घेऊन गेला. ३९ त्याच्या बरोबर
निकदेम होता. याच मनुष्याने रात्रीच्या वेळी येशूवाहची भेट घेतली होती. निकदेम शंभर पौंड गंधरस, व अगरू (सुवास असलेले
मसाल्याचे पदार्थ) घेऊन आला.४० मग त्यांनी येशूवाहचे शरीर घेतले, आणि यहूदी लोकांच्या प्रेत पुरण्याच्या रीतीप्रमाणे सुगंधीत
द्रव्यासहित तागांनी ते गुंडाळले.४१ जेथे त्याला वधस्तंभी मारले होते, तेथे एक बाग होती.आणि त्या बागेत एक नवीन कबर होती,
व त्या कबरेत आतापर्यंत कोणालाच ठेवलेले नव्हते. ४२ तो यहुद्यांच्या सणाच्या पूर्वतयारीचा दिवस असल्याने, व ती कबर जवळ
असल्याने, त्यांनी येशूवाहला तेथेच ठेविले.

**२०.** १ मग आठवडयाच्या पहिल्या दिवशी सकाळी अगदी पहाटे मरीया मग्दालिया कबरेकडे आली. आणि कबरे वरील धोंड
काढलेली आहे असे तिला आढळले.२ म्हणून तिने शिमोन केफा व ज्याच्यावर येशूवाहची अहेद (प्रीति) होती, तो दुसरा थालमीद
(शिष्य) यांच्याकडे धावत येऊन म्हंटले, " त्यांनी अदोनाईला कबरेतून काढून नेऊन कोठे ठेवले, हे आम्हांला माहीत नाही." ३ मग
केफा व दुसरा शिष्य हे निघाले, व कबरेकडे गेले. ४ तेंव्हा ते दोघे बरोबर पळत गेले, आणि तो दुसरा थालमीद (शिष्य) केफा पेक्षा
लवकर पुढे जाऊन, त्याच्या आधी कबरेजवळ पोहोचला. ५ आणि त्याने वाकून आत डोकावले, तेंव्हा त्याने तागाची वस्त्रे पडलेली
पाहिली, पण तो आत गेला नाही. ६ मग शिमोन केफा ही त्याच्यामागून आला व कबरेत आत गेला. ७ तेंव्हा तागाची वस्त्रे
पडलेली, आणि जो रूमाल त्याच्या डोक्याला होता. तो तागाच्या वस्त्राबरोबर नाही, तर वेगळीकडे गुंडाळलेला पडलेला त्याने
पाहिला.८ शेवटी तो दुसरा थालमीद (शिष्य) जो कबरेकडे पहिल्यांदा पोहोचला होता, तो सुद्धा आत गेला. त्याने पाहिले आणि
विश्वास ठेवला. ९ येशूवाहने मरणातून पुन्हा उठणे आवश्यक आहे, हे त्यांना अजून सुद्धा समजले नव्हते.

१० मग थालमीद (शिष्य) त्यांच्या घरी गेले. ११ पण मरीया कबरेसमोर रडत उभी राहिली. ती रडत असता आत डोकावण्यासाठी
वाकली, १२ आणि तिने दोन याव्हे एलोहिम मालाक (देवदूतांना) पांढ-या पोशाखात जेथे येशूवाहचे शरीर होते, तेथे बसलेले
पाहिले. एकजण डोके होते तेथे बसला होता, व एकजण पायाजवळ बसला होता.१३ त्यांनी तिला विचारले, " ईशशाह (बाई) तू
का रडत आहेस?" ती म्हणाली, "ते माझ्या अदोनाईला घेऊन गेले आहेत, आणि मला माहीत नाही, त्यांनी त्याला कोठे ठेवले
आहे." १४ या वेळी ती पाठमोरी वळाली, तिने तेथे येशूवाहला उभे असलेले पाहिले. पण तिला हे समजले नाही की, तो येशूवाह

आहे. १५ तो म्हणाला, "ईशशाह (बाई) तू का रडत आहेस? तू कोणाला शोधत आहेस?" तिला वाटले तो माळी आहे.ती म्हणाली, "दादा, जर तू त्याला कोठे नेले असशील, तर मला सांग तू त्याला कोठे ठेवले आहेस, म्हणजे मी त्याला घेऊन जाईन."
१६ येशूवाह तिला म्हणाला, "मरीये" ती त्याच्याकडे वळाली आणि अरामीक भाषेत मोठयाने ओरडली, "रब्बूनी" (याचा अर्थ गुरूजी)
१७ येशूवाह तिला म्हणाला, "माझ्याजवळ येऊ नकोस, कारण मी अजून याव्हे अब्वा कडे गेलो नाही. तर माझ्या भावांकडे जा, आणि त्यांना सांगः मी माझ्या याव्हे अब्वा कडे व तुमच्या याव्हे अब्वा कडे, व माझ्या याव्हे एलोहिमकडे व तुमच्या याव्हे एलोहिमकडे जात आहे. १८ मरीया मग्दालिया ही बातमी घेऊन थालमीद (शिष्यां) कडे गेली. " मी अदोनाईला पाहिले आहे!" आणि तिने त्यांना सांगितले की, त्याने या गोष्टी सांगितल्या आहेत.

१९ आणि आठवडयाच्या पाहिल्या दिवशी संध्याकाळी थालमीद (शिष्य) होते, तेथील दार यहूदी लोकांच्या भीतीमुळे बंद असता. येशूवाह आत आला व मध्ये उभा राहिला.त्यांना म्हणाला, "तुम्हांला शालोम (शांति) असो." २० असे बोलल्यावर त्याने आपले हात व कूस त्यांना दाखविली. तेंव्हा अदोनाईला पाहून थालमीद (शिष्यांना) आनंद झाला. २१ पुन्हा येशूवाह म्हणाला, "तुम्हांबरोबर शालोम (शांति) असो! जसे याव्हे अब्वाने मला पाठविले आहे, तसे मी तुम्हांला पाठवितो." २२ आणि असे म्हणून त्याने त्यांच्यावर फुंकर टाकला आणि म्हणाला, " क्वादोश रूहुव्वा चा(पवित्र आत्म्याचा) स्विकार करा. २३ जर तुम्ही कोणाच्या पापांची क्षमा केली, तर त्याला पापक्षमा मिळेल. जर तुम्हीं क्षमा केली नाही तर त्यांची क्षमा होणार नाही."

२४ आता थोमा (याला दिदुम म्हणत) बारा थालमीद (शिष्या) पैकी एक होता. येशूवाह आला तेंव्हा तो थालमीद (शिष्यां) बरोबर नव्हता. २५ तेंव्हा इतर थालमीद नी (शिष्यांनी) त्याला सांगितले की, "आम्ही अदोनाईला पाहिले आहे!" पण तो त्यांना म्हणाला, "त्याच्या हातांमधील खिळयांचे व्रण पाहिल्याशिवाय व खिळयांच्या व्रणांत माझे बोट घातल्याशिवाय व त्याच्या कुशीत माझा हात घातल्या शिवाय मी विश्वास धरणार नाही." २६ एक आठवडयानंतर येशूवाहचे थालमीद (शिष्य) त्या घरामध्ये पुन्हा बसले होते, व थोमा त्यांच्याबरोबर होता. जरी दार बंद होते तरी येशूवाह आत आला व त्यांच्यामध्ये उभा राहिला. आणि म्हणाला, "तुम्हां बरोबर शालोम (शांति) असो. २७ मग तो थोमाला म्हणाला, " तुझे बोट इकडे कर, व माझे हात पाहा, आणि तुझा हात इकडे कर, व माझ्या कुशीत घाल. संशय सोड आणि विश्वास ठेव." २८ थोमा त्याला म्हणाला, "माझा अदोनाई आणि माझा याव्हे एलोहिम!" २९ मग येशूवाह त्याला म्हणाला, "तू मला पाहिले आहेस म्हणून तू विश्वास ठेवला आहेस. पण ज्यांनी मला पाहिले नाही, तरीही त्यांनी विश्वास धरला ते आशिर्वादित आहेत. ३० आणखी या पुस्तकात लिहिली नाहीत, अशी पुष्कळ अदभुत चिन्हे येशूवाहने त्याच्या थालमीद (शिष्यां) च्या समवेत केली. ती या पुस्तकात लिहिली नाहीत. ३१ पण ही लिहिली यासाठी की, तुम्हीं विश्वास ठेवावा की येशूवाह हा मशीहा आहे. याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे आणि विश्वास ठेवल्याने त्याच्या नावात तुम्हांला यशाह (जीवन) मिळेल.

**२१.** १ नंतर येशूवाह त्याच्या थालमीद (शिष्यां) ना पुन्हा दिसला. तो तिबीर्या सरोवराजवळ (जे गालीलात होते) त्या ठिकाणी दिसला. हे अशा प्रकारे घडलेः २ काही थालमीद (शिष्य) एकत्र होते, ते म्हणजे शिमोन केफा, थोमा, (दिदुम म्हणत तो) गालीलातील काना येथील नथनीएल, जब्दीचे मुलगे, व त्याच्या थालमीद (शिष्यां) तील दुसरे दोघे असे ते होते. ३ शिमोन केफाने त्यांना म्हंटले, "मी मासे धरायला जातो." ते त्याला म्हणाले, "आम्हीही तुझ्याबरोबर येतो." नंतर ते बाहेर गेले, व नावेत बसले. पण त्या रात्री त्यांना काहीही मिळाले नाही. ४ दुस-या दिवशी पहाटे येशूवाह किना-यावर उभा राहिला, पण थालमीद (शिष्यां) ना समजले नाही की, तो येशूवाह आहे.५ तो त्यांना म्हणाला, मित्रांनो, तुम्हीं काही मासे पकडले का?" त्यांनी उत्तर दिले, "नाही." ६
तो म्हणाला, "तुमचे जाळे नावेच्या उजव्या बाजूला टाका, व मग तुम्हांला काही मासे मिळतील." जेंव्हा त्यांनी तसे केले तेंव्हा त्यांना पुष्कळ मासे मिळाल्यामुळे जाळे ओढता येईना.७ तेंव्हा येशूवाहची ज्याच्यावर अहेद (प्रीति) होती तो केफाला म्हणाला, "तो अदोनाई आहे!" असे म्हणता क्षणीच केफाने कपडे गुंडाळले. (कारण त्याने कपडे काढले होते) व पाण्यात उडी मारली. ८ दुसरे थालमीद (शिष्य) माशांचे जाळे ओढीत होडीतून आले, कारण ते काठापासून दूर नव्हते. फक्त दोनशे हातावर होते. ९ जेंव्हा ते किना-याला

आले त्यांनी कोळशांनी पेटविलेला विस्तव पाहिला, व दागाह (मासे) आणि लेहेम (भाकर) त्यावर ठेवलेली पाहिली. १० येशूवाहने त्यांना म्हंटले, "तुम्हीं आता धरलेल्या दागाह (माशां)तून काही मासे आणा."

११ शिमोन केफाने नावेत जाऊन एकशे त्रेपन्न मोठया दागाह (माशां) नी भरलेले जाळे काठास आणले. इतरे दागाह (मासे) असतानाही जाळे फाटले नाही. १२ येशूवाह त्यांना म्हणाला, " या जेवा."तेव्हा तो अदोनाई आहे, असे त्यांना समजले.म्हणून थालमीद (शिष्यां) पैकी कोणी त्याला तू कोण आहेस, हे विचारायला धजले नाही. १३ मग येशूवाहने येऊन लेहेम (भाकर) घेतली, व त्यांना दिली. तसेच दागाह (मासळी) ही दिली. १४ येशूवाह मेलेल्यांतून उठल्यावर तो आपल्या थालमीद (शिष्यांस) प्रगट होण्याची ही तिसरी वेळ.१५ मग जेंव्हा त्यांनी खाणे संपविले. येशूवाह केफाला म्हणाला, " योहानानच्या बेन (मुला), शिमोना, तू माझ्यावर या सर्वापेक्षा अधिक अहेद (प्रीति) करतोस काय?" तो म्हणाला, " होय, अदोनाई तुम्हांला माहीत आहे की, मी तुमच्यावर अहेद (प्रीति) करतो." येशूवाह म्हणाला, "माझ्या केबेस (कोकरां) ना चार." १६ पुन्हा येशूवाह म्हणाला, "शिमोना, योहानानच्या बेन (मुला) तू खरोखर माझ्यावर अहेद (प्रीति) करतोस का?" केफाने उत्तर दिले, " होय, अदोनाई तुम्हांला माहीत आहे की, मी तुमच्यावर अहेद (प्रीति) करतो." येशूवाह म्हणाला, "माझ्या त्सओन (मेंढरां) ची काळजी घे." १७ तिस-या वेळी तो त्याला म्हणाला, "शिमोना योहानानच्या बेन (मुला), तू माझ्यावर अहेद (प्रीति) करतोस का?" केफा दुःखी झाला, कारण येशूवाहने त्याला तिस-यांदा विचारले होते, ' तू माझ्यावर अहेद (प्रीति) करतोस का?' तो म्हणाला, "अदोनाई तुम्हांला सर्व गोष्टी माहीत आहेत.तुम्हांला माहीत आहे की, मी तुमच्यावर अहेद (प्रीति) करतो." येशूवाह म्हणाला, " माझ्या त्सओन (मेंढरांना) चार. १८ मी खरे सांगतो, तू तरूण होतास, तेंव्हा तू स्वतः कंबर बांधून तुला जेथे पाहिजे तेथे जात होतास. पण जेंव्हा तू म्हतारा होशील, तेंव्हा तू आपला हात लांब करशील. आणि दुसरा कोणीतरी तुझी कंबर बांधेल.आणि जेथे तुझी इच्छा नाही तेथे नेईल." १९ तो कोणत्या प्रकारच्या मरणाने तो मरणार व याव्हे एलोहिमचे गौरव करणार हे सुचविण्यासाठी येशूवाह हे बोलला. हे बोलल्यानंतर तो म्हणाला, " माझ्यामागे ये."

२० मग केफाने वळून ज्या थालमीद (शिष्या) वर येशूवाह अहेद (प्रीति) करीत असे तो त्यांच्यामागे येत होता. (हा तोच होता, जो भोजनाच्या वेळी येशूवाह जवळ बिलगून बसला होता. आणि म्हणाला होता, "अदोनाई, तुझा विश्वासघात कोण करणार आहे?") त्याला पाहिले. २१ जेंव्हा केफाने त्याला पाहिले.तेंव्हा त्याने विचारले, "अदोनाई याचे काय?" २२ येशूवाहने उत्तर दिले, "मी परत येईपर्यंत त्याने जगावे अशी माझी इच्छा असेल, तर तुला त्याचे काय? तू मला अनुसर." २३ या कारणामूळे अशी अफवा बंधुवर्गात पसरली की, हा थालमीद (शिष्य) मरणार नाही. पण येशूवाह असे म्हणाला नव्हता की, तो मरणार नाही. तो फक्त म्हणाला, " मी येईपर्यंत त्याने जिवंत राहावे, अशी माझी इच्छा असेल, तर तुला त्याचे काय?" २४ जो थालमीद (शिष्य) या गोष्टीविषयी साक्ष देतो, व ज्याने या गोष्टी लिहिल्या तोच हा थालमीद (शिष्य) आहे. आणि त्याची साक्ष खरी आहे. हे आम्हांला माहीत आहे. २५ आणि येशूवाहने केलेली दुसरीही पुष्कळ कामे आहेत. ती एकेक लिहिली, तर लिहिलेली पुस्तके या जगात ठेवायला जागा पुरणार नाही, असे मला वाटते.

......... समाप्त .........

## .थालमीद ची (प्रेषितांची) कार्य.

### .प्रस्तावना.

ह्या पुस्तकाचा लेखक हा लूक हा असून, त्याने लूक शुभवर्तमान व प्रेषितांची कृत्ये दोन्ही पुस्तके लिहून, त्यातील वचनाचे शिक्षण रोमचा अधिकारी थियफिलस ह्यास दिले. ह्या पुस्तकाचा लेखन काळ अनिश्चित आहे.कोणत्याही तज्ञाचे एकमत होत नाही. काही तज्ञांचे मत हे इसवी सन ६0 ते ६९ च्या दरम्यान लिहिले, तर काही तज्ञांचे मत हे इसवी सन ८0 ते ८९ च्या दरम्यान लिहिलेले आहे. त्याच प्रमाणे, ह्या पुस्तकाचे लेखनाचे ठिकाण दिलेले नाही. या पुस्तकाच्या एका प्राचीन हस्तलिखितात केवळ ह्या पुस्तकाचे नाव फक्त 'कृत्ये', ऐवढेच नाव दाखविलेले आहे, असे सांगितले जाते.ह्या पुस्तकामध्ये प्रेषितांनी जी काही अनेक सेवाकार्य केली, त्यामधील थोडक्याच कार्याची माहिती व कार्यांच्या इतिहासाची नोंद देण्यात आलेली आहेत. प्रगटीकरणामध्ये ह्या काळातील मंडळीला इफिस मंडळीच्या नावाने संबोधीलेले आहे, आणि मंडळी युगातील ही पहिली मंडळी आहे.ह्याला प्रेषितांची मंडळी, प्रगटीकरणात संबोधीले आहे. सुवार्ता प्रसार करून अनेक ठिकठिकाणी मंडळयांचे रोपन करून, मंडळया स्थापन केल्या. ह्यामध्ये फार थोडक्याच प्रेषित व इतर सेवक वर्गाची नावे पुस्तकात आलेली आहे, परंतु काही प्रेषित व अनेक सेवकांची नावे ह्या पुस्तकामध्ये दिलेली नाही, किंवा त्यांच्या कार्याची तपशिल देणारा इतिहास दिलेला नाही. उदाहरणार्थ थोमा, मतिया, आंद्रिया, झिलोट म्हंटलेला शिमोन, बर्थलमय, अल्फीचा मुलगा याकोब व इतर. ह्या सर्व प्रेषिताचे व इतर सेवक वर्गाचे मुख्य कार्यालयाचे ठिकाण हे यरूशलेम होते. थालमीद हा हिब्रू शब्द असून त्याचा अर्थ शिष्ये, अनुयायी, प्रेषित, विद्यार्थी असे आहे.

* * * * * * * * * * * *

## .थालमीद ची (प्रेषितांची) कार्य.

१.१ हे थियफिलस, येशूवाहने जे प्रेषित निवडले होते, त्यांना क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्याच्या) व्दारे आज्ञा दिल्यावर तो वर
घेतला गेला. २ त्या दिवसापर्यंत त्याने जे जे करण्यास, व शिकविण्यास, आरंभ केला, त्या सर्वाविषयी मी पहिला ग्रंथ लिहिला.३
मरण सोसल्यानंतरही आपण जिवंत झालो, असे त्याने त्यांना पुष्कळ निश्चित प्रमाणांनी दाखवले. चाळीस दिवसापर्यंत तो त्यांना
दिसत गेला, आणि याव्हे एलोहिम च्या राज्याविषयीच्या गोष्टी त्यांना सांगत गेला. ४ आणि ते एकत्र जमले असता त्यांच्याशी मिळून
त्याने त्यांना आज्ञा केली की, यरूशलेम सोडून जाऊ नका तर तर अब्वाने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून जे
ऐकिले आहे, तिची वाट पाहा, ५ कारण योहानानने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा, परंतु तुमचा बाप्तिस्मा थोडया दिवसांनी क्वादोश
रूहुव्वा ने होईल.

६ ह्यास्तव ते एकत्र असताना त्यांनी त्याला विचारिले, अदोनाई ह्याच काळात तुम्ही इस्त्राएलाचे राज्य पुन्हा स्थापित करणार काय? ७
येशूवाह त्यास म्हणाला, जे काळ व समय अब्वाने स्वतःच्या अधिकारांत ठेविले आहेत, जे जाणणे तुम्हांकडे नाही. ८ परंतु क्वादोश
रूहुव्वा तुम्हांवर येईल, तेंव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरूशलेमेत सर्व यहूदीयांत, शोमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यंत,
तुम्ही माझे साक्षी व्हाल. ९ असे सांगितल्यावर त्यांच्या डोळया देखत तो वर घेतला गेला, आणि मेघाने त्याला त्यांच्या दृष्टीआड
केले. १० तो जात असता ते आकाशाकडे निरखून पाहत होते, तेंव्हा पाहा, शुभ्र वस्त्रे परिधान केलेले दोन पुरूष त्यांच्याजवळ उभे
राहिले. ११ ते म्हणाले, अहो गालीलकरांनो तुम्ही आकाशाकडे का पाहत उभे राहिला? हा जो येशूवाह तुम्हांपासून वर आकाशांत
घेतला गेला आहे, तोच तुम्ही त्याला जसे आकाशात जातांना पाहिले, तसाच तो येईल.

१२ मग ते सर्वजण जैतुनाचा म्हंटलेला डोंगरावरून, यरूशलेमास परत आले. (हा डोंगर यरूशलेमापासून एक किलोमिटर अंतरावर
आहे.) १३ आणि यरूशलेमात आल्यावर, ते एका माडीवरच्या खोलीत चढून गेले. तेथे शिमोन केफा, योहानान, याकोब, आंद्रिया,
फिलिप्प, थोमा, बर्थलमय, मतिया, अल्फीचा मुलगा याकोब, झिलोट म्हंटलेला शिमोन, आणि याकोबाचा मुलगा यहूदा. १४ हे सर्व
प्रेषित एकत्र राहत होते, ते एकाच उद्देशाने सतत प्रार्थना करीत होते. काही स्त्रिया, मरीया येशूवाहची आई आणि त्याचे भाऊ

प्रेषितांबरोबर होते. १५ काही दिवसांनी विश्वासणा-यांची एक सभा झाली, (तेथे सुमारे १२० जण होते.) तेंव्हा शिमोन केफा उभा राहिला आणि म्हणाला, १६ बंधुजनहो, येशूवाहला धरून नेणा-यांना वाट दाखविणा-या यहूदांविषयी क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) ने दाविदाच्या मुखावाटे जे भविष्य भाकीत केले, ते पूर्ण होण्याचे अगत्य होते. १७ त्याची आपल्यामध्ये गणना होती, आणि त्याला ह्या सेवेचा वाटा मिळाला होता. १८ त्याने आपल्या दुष्टाईच्या मजुरीने शेत विकत घेतले, तो पालथा पडल्याने त्याचे पोट मध्येच फुटले, व त्याची सर्व आतडी बाहेर पडली. १९ हे यरूशलेमेत राहणा-या सर्वास कळले, म्हणून त्याच्या भाषेत त्या शेताला 'हकलदमा' म्हणजे रक्ताचे शेत असे नाव पडले आहे. २० तेहिलीम मध्ये असे लिहिले आहे, "त्याचे घर उजाड पडो, व त्यात कोणीहि न राहो, आणि त्याचा हुद्दा दुसरा घेवो."

२१ ह्यास्तव योहानानच्या बाप्तिस्म्यापासून तर ज्या दिवशी अदोनाई येशूवाहला आपल्यापासून वर घेण्यात आले, तोपर्यंत २२ म्हणजे, तो आपणांमध्ये येत जात असे त्या सगळया काळांत, ही जी माणसे आपल्या संगतीसोबतीत होती, त्यांच्या तून एकाने आपल्याबरोबर त्याच्या पुनरूत्थानाचा साक्षी झाले पाहिजे. २३ तेंव्हा ज्याचे उपनाव यूस्त होते, तो बर्सबा म्हंटलेला योसेफ, व मत्थिया ह्या दोघांस त्यांनी पुढे आणिले.२४ मग त्यांनी अशी प्रार्थना केली, "हे सर्वांची रूहुव्वा जाणणा-या अदोनाई, २५ हे सेवकपद, व प्रेषितपद सोडून आपल्या जागी गेलेल्या यहूदाचे पद ज्याला मिळावे, असा ह्या दोघांपैकी तू कोण निवडला आहेस ते दाखीव. २६ मग त्यांनी त्यांच्यासाठी चिठ्ठया टाकल्यावर मत्थियाची चिठ्ठी निघाली, तेंव्हा त्याला अकरा प्रेषितांबरोबर गणण्यात आले.

२.१ नंतर पन्नासावाचा दिवस आला, तेंव्हा सर्व प्रेषित एका ठिकाणी एकत्र होते. २ अचानक आकाशातून आवाज ऐकू आला, तो आवाज सोसाटयाने वाहणा-या वा-यासारखा होता. ज्या ठिकाणी ते बसले होते, ते घर त्या आवाजाने भरून गेले. ३ त्यांनी अग्नीच्या ज्वालांसारखे काहीतरी पाहिले. त्या ज्वाला विभक्त होत्या, आणि तेथील प्रत्येक जणावर एक एक अशा बसल्या. ४ ते सर्व क्वादोश रूहुव्वाने भरून गेले, आणि ते निरनिराळया भाषा बोलू लागले. हे करण्यासाठी क्वादोश रूहुव्वा त्यांना सामर्थ्य देत होता. ५ आता त्या वेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रातील भक्तिमान यहूदी यरूशलेमेत राहत होते. ६ आणि हा आवाज झाल्यावर लोकसमुदाय एकत्र जमून गोंधळला, कारण प्रत्येकाने आपापल्या भाषेत त्यांना बोलताना ऐकले. ७ आणि ते सर्व थक्क व चकित होऊन म्हणाले. पाहा, हे जे बोलतात ते सर्व गालीली आहेत ना? ८ तर आम्ही प्रत्येक आपापल्या जन्मभाषेत त्यांचे बोलणे ऐकतो हे कसे? ९ पार्थी, व मेदी, व एलामी, आणि मेसोपटेम्या, व यहूदीया, व कप्पदुकिया, व पंत, व आशिया, यातले राहणारे १० आणि फुमिया, व पंफूलिया, मिसर, व कुरणेच्या जवळचा लिबुवा देश यातले राहणारे आणि रोमी प्रवाशी, यहूदी, व यहूदीय मतानुसारीहि ११ केती, व अरब, असे आम्ही त्यांना आमच्या भाषांमध्ये याव्हे एलोहिमची महत्कृत्ये सांगताना ऐकतो. १२ तेंव्हा ते सर्व थक्क होऊन बुचकळयात पडून एकमेकांस म्हणाले, हे काय असेल? १३ पण इतर कित्येक थट्टा करीत म्हणाले, हे द्राक्षारसाने मस्त झाले आहेत.

१४ तेंव्हा शिमोन केफा अकराजणांबरोबर उभे राहून मोठयाने त्यांना म्हणाला, अहो यहूदीयातील माणसांनो व यरूशलेमेतील सर्व राहणा-यांनो हे तुमच्या लक्षात येवो, आणि माझ्या बोलण्याकडे तुम्ही कान द्या. १५ कारण तुम्हांला वाटते तसे हे मस्त झालेले नाहीत, कारण आता सकाळचे नऊ वाजलेले आहे.१६ परंतु जे योएल नव्बीईम च्या (संदेष्टयाच्या) व्दारे सांगितले होते, ते हे आहे. १७ याव्हे एलोहिम म्हणतो, "शेवटच्या दिवसांमध्ये असे होईल की, मी आपला रूहुव्वा सवे मानवजातीवर ओतून देईन, तेंव्हा तुमचे मुले व तुमच्या मुली भविष्य सांगतील. आणि तुमच्या तरूणांस दृष्टान्त होतील, व तुमच्या म्हता-यास स्वप्ने पडतील. १८ आणखी त्या दिवसांमध्ये माझ्या दासांवर व माझ्या दासीवरही मी आपला रूहुव्वा ओतून देईन, तेंव्हा ती भविष्य सांगतील. १९ आणि वर आकाशात अद्भुते, व खाली पृथ्वीवर चिन्हे, म्हणजे रक्त व अग्नी व धुराचा लोळ अशी मी दाखवीन. २० अदोनाईचा तो मोठा व प्रसिद्ध दिवस येण्यापूर्वी, सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल. २१ तेंव्हा असे होईल की, जो कोणी अदोनाईचे नाव घेऊन त्याला हाक मारील, तो तारला जाईल.

२२ अहो इस्त्राएली लोकांनो, या गोष्टी ऐका नात्सेरेथ (नासरेथ) चा येशूवाह याच्या हातून, याव्हे एलोहिमने जी सामर्थ्यांची कृत्ये, व अद्भुते, व चिन्हे तुमच्यामध्ये केली, ती तुम्ही स्वतः जाणता. त्यावरून तो याव्हे एलोहिमने तुम्हांकरिता पाठविलेला होता, हे स्पष्टपणे दाखविले आहे. २३ तो याव्हे एलोहिम च्या ठाम संकल्पाप्रमाणे, व पूर्वज्ञानानुसार तुमच्या हाती दिल्यावर, तुम्ही त्याला अधर्म्यांच्या हातांनी वधस्तंभावर खिळून मारले. २४ त्याला याव्हे एलोहिमने मरणाच्या वेदनांपासून सोडवून उठवले. कारण त्याने मरणाच्या स्वाधीन राहावे, हे शक्य नव्हते. २५ कारण दावीद त्याच्याविषयी असे म्हणतो, "मी याव्हे आदोनाय ला आपणापुढे नित्य पाहिले आहे, मी ढळू नये म्हणून तो माझ्या उजवीकडे आहे. २६ ह्यास्तव माझे हृदय आनंदित व माझी जीभ उल्लसित झाली, आणखी माझा देहहि आशेवर राहिल. २७ कारण तू माझा जीव शेओलात राहू देणार नाहीस, व आपल्या पवित्र पुरूष्याला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस.२८ जीवनाचे मार्ग तू मला कळविले आहेत, तू आपल्या समक्षतेने मला हर्षभरित करिशील."

२९ बंधुजनहो, कुलाधिपति दावीद ह्याच्याविषयी मी तुम्हांबरोबर प्रशस्तपणे बोलतो. तो मरण पावला पुरला गेला, व त्याची कबर आजपर्यंत आपल्यामध्ये आहे. ३० तो नव्वी (संदेष्टा) होता, आणि त्याला ठाऊक होते की, याव्हे एलोहिम शपथ वाहून त्याला म्हणाला, तुझ्या संतानांतील एकाला तुझ्या राजासनांवर बसवील. ३१ ह्याचे पूर्वज्ञान असल्यामुळे तो मशीहा च्या पुनरूत्थानाविषयी असे बोलला की, त्याला शेओलात (अधोलोकांत) सोडून दिले नाही, व त्याच्या देहाला कुजण्याचा अनुभव आला नाही. ३२ त्या येशूवाह ला, याव्हे एलोहिमने उठविले ह्याविषयी आम्ही सर्व साक्षी आहो. ३३ ह्यास्तव तो याव्हे एलोहिम च्या उजव्या हाताकडे बसविलेला आहे. त्याला क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) विषयीचे वचन अव्बा पासून प्राप्त झाले आहे, आणि तुम्ही जे पाहता व ऐकता, त्याचा त्याने वर्षाव केला आहे. ३४ कारण दावीद आकाशात वर चढून गेला नाही. पण तो स्वतः म्हणतो, "याव्हे आदोनाय ने माझ्या अदोनाईला सांगितले की, ३५ मी तुझे वैरी तुझ्या पायांसाठी आसन करीपर्यंत, तू माझ्या उजवीकडे बसून राहा." ३६ ह्यास्तव इस्त्राएलाच्या सर्व घराण्यांने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की, ज्या येशूवाह ला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारिले, त्याला याव्हे एलोहिमने, अदोनाई व मशीहा असे करून ठेविले आहे.

३७ हे ऐकून त्यांच्या अंतःकरणास चुटपुट लागली, आणि ते केफा व इतर प्रेषित ह्यांना म्हणाले. बंधुजनहो, आम्ही काय करावे? ३८ केफा त्यांना म्हणाला, "पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून, तुम्ही प्रत्येक जण येशूवाह मशीहा च्या नांवाने बाप्तिस्मा घ्या. म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. ३९ कारण हे वचन तुम्हांस, तुमच्या मुलांबाळांस, व जे दूर आहेत त्या सर्वास, म्हणजे जितक्यांस याव्हे आदोनाय जो आपला एलोहिम स्वतःकडे बोलवील तितक्यास दिले आहे. ४० आणखी त्याने दुस-या पुष्कळ गोष्टी सांगून त्यांस साक्ष दिली, व बोध करून म्हंटले, ह्या कुटिल पिढीपासून तुम्ही आपला बचाव करून घ्या. ४१ तेंव्हा ज्यांनी त्याच्या संदेशाचा स्विकार केला, त्यांचा बाप्तिस्मा झाला. आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली.

४२ ते प्रेषितांच्या शिक्षणात, आणि सहवासात भाकर मोडण्यांत, व प्रार्थना करण्यात तत्पर असत. ४३ तेंव्हा प्रत्येक मनुष्याला भय वाटले आणि प्रेषितांच्या हातून पुष्कळ अद्भुत कृत्ये, व चिन्हे घडत होती. ४४ तेंव्हा विश्वास ठेवणारे सर्व एकत्र होते, आणि त्यांचे सर्व काही समाईक होते. ४५ ते आपआपली जमीन, व मालमत्ता विकून जसजशी प्रत्येकाला गरज लागत असे, तसतसे सर्वांना वाटून देत असत. ४६ ते दररोज एकचित्ताने, व तत्परतेने मंदिरात जमत असत, घरोघरी भाकर मोडीत असत, आणि याव्हे एलोहिमची स्तुति करीत, हर्षाने, व सालस मनाने अन्न खात असत. ४७ सर्व लोक त्यांस प्रसन्न असत, आणि अदोनाई तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची, दररोज त्यांच्यात भर घालीत असे.

**३** .१ केफा व योहानान हे तिस-या प्रहरी प्रार्थनेच्या वेळेस वरती मंदिरात जात होते २ तेंव्हा जन्मापासून पांगळा असलेला कोणीएक माणूस होता. त्याला मंदिरात जाणा-यांजवळ भीक मागण्यासाठी म्हणून दररोज उचलून मंदिराच्या सुंदर नांवाच्या दरवाजाजवळ ठेवीत असत ३ केफा व योहानान हे मंदिरात जात आहेत, असे पाहून त्याने भीक मागितली. ४ तेंव्हा केफा व योहानान ह्यांनी त्याच्याकडे

निरखून पाहिले, आणि केफा म्हणाला, 'आम्हांकडे पाहा', ५ तेंव्हा त्यांच्यापासून काहीतरी मिळेल, ह्या अपेक्षेने त्याने त्यांच्याकडे लक्ष लाविले. ६ मग केफा म्हणाला, 'माझ्याजवळ सोनेरूपे काही नाही, पण जे आहे ते तुला देतो. "नात्सेरेथ (नाझरेथ) येशूवाह मशीहा च्या नांवाने चालू लाग. ७ आणि त्याने त्याचा उजवा हात धरून त्याला उठविले, तेंव्हा त्याची पावले व घोटे ह्यात तत्काळ बळ आले. ८ तो उडी मारून उभा राहिला व चालू लागला, आणि तो चालत उडया मारीत, व याव्हे एलोहिमची स्तुति करीत, त्यांच्याबरोबर मंदिरात गेला. ९ सर्व लोकांनी त्याला चालताना, व याव्हे एलोहिमची स्तुति करितांना पाहिले. १० आणि मंदिराच्या सुंदर नांवाच्या दरवाजाजवळ बसून भीक मागणारा तो हाच, हे त्यांनी ओळखिले. तेंव्हा त्याच्या बाबतीत जे घडून आले त्यावरून त्यांना फार आश्चर्य व विस्मय वाटला.

११ मग तो केफा व योहानान ह्यांना बिलगून राहिला असता, सर्व लोक आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे शलमोनाची देवडी नांवाच्या ठिकाणी धावत आले. १२ हे पाहून केफाने लोकांस म्हंटले, 'अहो, इस्त्राएल लोकांनो ह्याचे आश्चर्य का करिता? अथवा आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालावयास लाविले आहे, असे समजून आम्हांकडे निरखून का पाहता? १३ अब्राहाम, इसहाक, व याकोब ह्यांचा याव्हे आदोनाय, आपल्या पूर्वजांचा एलोहिम ह्याने आपला सेवक येशूवाह, ह्याचे गौरव केले आहे. त्याला तुम्ही धरिले व पिलाताने त्याला सोडून देण्याचा निश्चय केला, असताहि त्याच्यासमक्ष तुम्ही त्याला नाकारिले. १४ जो पवित्र व नीतिमान त्याला तुम्ही नाकारिले, आणि खूनी पुरुष आम्हांला द्या, अशी मागणी केली. १५ आणि तुम्ही जीवनाच्या अधिपतीला जिवे मारिले, पण याव्हे एलोहिमने त्याला मेलेल्यांमधून उठविले, ह्याचे आम्ही साक्षी आहो. १६ त्याच्याच नांवावरील विश्वासामुळे, त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता, व ओळखिता त्याला शक्तिमान केले आहे. त्याच्याव्दारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हां सर्वांसमक्ष ही शरीरसंपत्ति प्राप्त झाली आहे.

१७ बंधुजनहो, तुम्ही तसेच तुमच्या अधिका-यांनीहि जे केले, ते अज्ञानामुळे केले हे मी जाणून आहे. १८ परंतु याव्हे एलोहिमने आपल्या मशीहाने दुःख सहन करावे, असे जे सर्व नव्वीईम (संदेष्टयां) च्या मुखाने पूर्वी सांगितले होते, ते त्याने त्या प्रमाणे पूर्ण केले. १९ तेंव्हा तुमची पापे पुसून टाकिली जावे, म्हणून पश्चात्ताप करा, व वळा. अशासाठी की, विश्रांतीच्या समय अदोनाई जवळ यावे. २० आणि तुम्हांकरिता पूर्वी नेमिलेला मशीहा येशूवाह ह्याला त्याने पाठवावे. २१ सर्व गोष्टी पूर्वस्थितीला पोहंचण्याच्या ज्या काळाविषयी, याव्हे एलोहिमने आरंभापासून आपल्या क्वादोश नव्वीईम च्या मुखाने सांगितले, त्या काळापर्यंत येशूवाहला आकाशात वर घेतला जाणे, प्राप्त आहे. २२ मोशेनेहि म्हंटलेच आहे, अदोनाई याव्हे एलोहिम तुम्हांसाठी माझ्यासारखा नव्वी तुमच्या बांधवामधून उभा करील, तो जे काही तुम्हांला सांगेल, त्याप्रमाणे सर्व गोष्टीत त्याचे ऐका. २३ आणि असे होईल की, जो कोणी त्या नव्वीचे ऐकणार नाही, तो लोकांतून अगदी नष्ट केला जाईल.२४ आणखी शमुवेला पासून परंपरेने जितके नव्वीईम ने बोलले, तितक्या सर्वांना ह्या दिवसांविषयी सांगितले. २५ तुम्ही नव्वीईमचे मुले आहा, आणि तुझ्या संततीच्या व्दारे पृथ्वीतील सर्व कुळे आशिर्वादीत होतील. असे अब्राहामाशी बोलून, याव्हे एलोहिमने तुमच्या पूर्वजांबरोबर केलेला करारांचेहि तुम्ही मुले आहा. २६ याव्हे एलोहिमने आपल्या सेवकाला उठवून प्रथम तुम्हांकडे पाठविले. ह्यासाठी की, त्याने तुम्हां प्रत्येकांला तुमच्या दुष्कृत्यांपासून वळून जाण्याचा आशिर्वाद देत जावा.

४.१ ते लोकांबरोबर बोलत असता त्यांच्यावर कोहेन (याजक), मंदिराचा सरदार, व सदूकी, हे चालून आले. २ कारण ते लोकांस शिक्षण देऊन येशूवाह च्या व्दारे मेलेल्यांतून पुन्हा उठणे आहे, असे प्रसिद्धपणे सांगत होते, ह्यांचा त्यांना संताप आला. ३ तेंव्हा त्यांनी त्यांना अटक केली, व संध्याकाळ झाली होती, म्हणून सकाळपर्यंत त्यांस चौकीत ठेविले. ४ तथापि वचन ऐकणा-यांतील पुष्कळांनी विश्वास ठेविला, आणि अशा पुरूषांची संख्या सुमारे पांच हजार झाली.५ नंतर दुस-या दिवशी असे झाले की, त्याचे अधिकारी वडील, व तोराह् चे रब्बुनी, ६ हे आणि एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) हन्ना, आणि कयफा, योहानान, आलेक्सांद्र, व प्रमुख याजकाच्या कुळातील जितके होते, तितके यरूशलेमेत एकत्र जमले. ७ आणि त्यांनी त्यांस मध्ये उभे करून विचारिले, तुम्ही हे कोणत्या सामर्थ्याने, किंवा कोणत्या नांवाने केले? ८ तेंव्हा केफा पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्यास म्हणाला, अहो लोकधिका-यांनो, व

वडील जनांनो, ९ एका दुर्बल मनुष्यावर कसे उपकार झाले, म्हणजे तो कशाने बरा झाला, ह्याविषयी आमची आज चौकशी व्हावयाची असेल, १० तर तुम्हां सर्वांस, व सर्व इस्त्राएल लोकांस हे कळावे की, ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारिले, ज्याला याव्हे एलोहिमने मेलेल्यांमधून उठविले, त्या नात्सेरेथ (नाझरेथ) येशूवाह मशीहा च्या नांवाने हा मनुष्य बरा होऊन, तुमच्यापुढे उभा राहिला आहे. ११ तुम्ही बांधकाम करणा-यांनी तुच्छ मानिलेला जो दगड, कोनशिला झाला तो हाच आहे. १२ आणि तारण दुस-या कोणाकडून नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल, असे दुसरे कोणतेहि नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही.

१३ तेंव्हा केफाचे व योहानानचे धैर्य पाहून, तसेच हे निरक्षर व अज्ञांनी इसम आहेत हे जाणून, ते आश्‍चर्य करू लागले. आणि हे येशूवाह च्या सहवासांत होते, हेहि त्यांनी ओळखिले. १४ तरी बरा झालेल्या त्या माणसाला त्यांच्याजवळ उभे असलेले पाहून, त्यांना काही विरूद्ध बोलता येईना. १५ मग त्यांनी त्यास न्यायसभेच्या बाहेर जाण्याची आज्ञा केली, आणि ते आपसांत विचार करून म्हणाले, १६ ह्या माणसांना आपण काय करावे? कारण त्यांच्याकडून खरोखरच प्रसिद्ध चमत्कार घडला आहे, हे सर्व यरूशलेमकरांस कळून चुकले आहे. तेंव्हा ते आपणांला नाकारिता येत नाही, १७ तरी ते लोकांमध्ये अधिक पसरू नये म्हणून त्यांना अशी ताकीद द्यावी की, ह्यापुढे तुम्ही ह्या नावाने लोकांपैकी कोणाबरोबरहि बोलू नये. १८ मग त्यांनी त्यास बोलावून असे निक्षून सांगितले की, येशूवाह च्या नावाने अगदी बोलू नका, अथवा शिकवूहि नका. १९ परंतु केफा व योहानान ह्यांनी त्यास उत्तर दिले की, याव्हे एलोहिम च्या ऐवजी तुमचे ऐकावे, हे याव्हे एलोहिम च्या दृष्टीने योग्य की अयोग्य आहे, हे तुम्हीच ठरवा. २० कारण जे आम्ही पाहिले व ऐकले ते न बोलणे, हे आम्हांला शक्य नाही. २१ तेंव्हा त्यांनी त्यास पुन्हा ताकीद देऊन सोडून दिले, त्यास शिक्षा कशी करावी हे लोकांमुळे त्यांना सुचेना, कारण घडलेल्या गोष्टीमुळे सर्व लोक याव्हे एलोहिमचे गौरव करीत होते. २२ कारण बरे करण्याचा हा चमत्कार ज्या माणसावरून घडला, तो माणूस चाळीस वर्षाहून अधिक वयाचा होता.

२३ ते सुटल्यानंतर आपल्या मित्रमंडळीकडे गेले, आणि एलयोवन कोहेन (मुख्य याजक), आणि वडील जे काही त्यांना म्हणाले होते, ते सर्व त्यांनी सांगितले. २४ हे ऐकून ते एकचित्ताने याव्हे एलोहिमला उच्च स्वराने म्हणाले, हे अदोनाई शाम्माईम (आकाशे), ऐरेत्स (पृथ्वी), याम्मीम (समुद्र) ह्यांचा, व त्यांच्यात जे काही आहे, त्या सर्वांना अस्तित्वात आणणारा तूच आहेस.२५ तू आपला सेवक आमचा पूर्वज दावीद याच्या तोंडून क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) कडून म्हंटले की, “राष्ट्रे का खवळली, व लोकांनी व्यर्थ कल्पना का केल्या? २६ अदोनाई विरूद्ध व त्याच्या मशीहा विरूद्ध पृथ्वीचे राजे उठले आहेत, व अधिकारी एकत्र जमले. २७ कारण खरोखरच ज्याला तू अभिषेक केलास, तो तुझा क्वादोश ऐवेद (पवित्र सेवक) येशूवाह याच्याविरूद्ध ह्या नगरात राष्ट्रांचे लोक, व इस्त्राएल लोक यांच्याबरोबर हेरोद व पंतय पिलात एकत्र झाले. २८ यासाठी की, जे काही घडावे म्हणून तुझ्या हाताने, व तुझ्या संकल्पाने पूर्वी नेमले होते, ते त्यांनी करावे. २९ तर हे अदोनाई आता तू त्यांच्या धमकावण्याकडे पाहा, आणि तुझ्या दासांनी पूर्ण धैर्याने तुझे वचन बोलावे, असे दान दे. ३० तू आपला हात लोकांस निरोगी करण्यास पुढे करीत असता असे कर की, तुझा क्वादोश ऐवेद (पवित्र सेवक) येशूवाह याच्या नावाने चमत्कार, व अद्भुते घडावी. ३१ आणि यांनी प्रार्थना केल्यावर ज्या जागेमध्ये ते एकत्र जमले होते, ती हादरली. आणि ते सर्व क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) ने पूर्ण असता, त्यांनी याव्हे एलोहिमचे वचन धैर्याने बोलू लागले.

३२ तेंव्हा विश्‍वास ठेवणा-यांचा समुदाय एकमनाचा, व एकजिवाचा होता. आणि कोणीही आपल्या मालमत्तेतील काही आपले स्वतःचे आहे असे म्हणत नसे, तर त्यांचे सर्व पदार्थ समाईक होते. ३३ आणि प्रेषित मोठया सामर्थ्याने अदोनाई येशूवाह च्या पुनरूत्थानाविषयी साक्ष देत होते, आणि त्या सर्वांवर मोठी कृपा होती. ३४ त्यातील कोणालाही काही उणे नव्हते. कारण जितके जमिनीचे किंवा घराचे मालक होते, तितक्यांनी ती विकली आणि विकलेल्या वस्तूचे मोल आणले, ३५ आणि ते प्रेषितांच्या पायांशी ठेवले. मग जसजशी कोणाला गरज लागत असे, तसतसे ते प्रत्येकाला वाटून देत असत. ३६ आणि कुप्राचा राहणारा लेवी योसेफ, ज्याला प्रेषितांनी वर्णबा म्हणजे बोधाचा मुलगा असे नाव दिले होते. ३७ त्याची जमीन होती, ती त्याने विकून तिचा पैसा प्रेषितांच्या पायांशी ठेवला.

प्रेषितांचे कार्य

**५** .१ तेंव्हा हनन्या नावाचा कोणीएक माणूस, व त्याची बायको सप्पीरा यांनी मालमत्ता विकली. २ मग त्याने आलेल्या किंमतीतून काही भाग बायकोच्या संमतीने मागे ठेविला. आणि काही भाग आणून प्रेषितांच्या चरणापाशी ठेविला. ३ तेंव्हा केफा म्हणाला, हनन्या तू क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) शी लबाडी करावी, आणि जमिनीच्या किंमतीतून काही ठेवून घ्यावे, म्हणून सैतानाने तुझे अंतःकरण का भरले आहे? ४ ती होती तोपर्यंत तुझी खाजगीची नव्हती काय? आणि ती विकल्यावर तुझ्याच स्वाधीन नव्हती काय? ही गोष्ट तू आपल्या मनात का आणली? तू माणसांशी नाही, तर याव्हे एलोहिम शी लबाडी केली आहे. ५ तेंव्हा हनन्या हे शब्द ऐकताच, खाली पडून प्राण सोडला. आणि ऐकणा-या सर्वांना मोठे भय प्राप्त झाले. ६ तेंव्हा तरूणांनी उठून त्याला गुंडाळले, व बाहेर नेऊन पुरले.

७ त्यानंतर सुमारे तीन तासांच्या अंतराने त्याची बायको आत आली. पण जे झाले, ते तिला समजले नव्हते. ८ तेंव्हा केफाने तिला म्हंटले, मला सांग तुम्ही एवढयाला जमीन विकली काय? आणि तिने म्हंटले होय, एवढयालाच. ९ पण केफा तिला म्हणाला अदोनाई च्या रूहुव्वाची परीक्षा पाहण्यास तुम्ही एकोपा का केला? पाहा, ज्यांनी तुझ्या नव-याला पुरले त्यांचे पाय दारापाशी आहेत, ते तुलाही उचलून बाहेर नेतीन. १० तेंव्हा लागलेच तिने त्याच्या पायाजवळ पडून प्राण सोडला. आणि तरूण आत आले तेंव्हा ती मेलेली अशी आढळली, आणि त्यांनी तिला बाहेर नेऊन तिच्या नव-या शेजारी पुरले. ११ आणि सर्व मंडळीला व ज्यांनी ह्या गोष्टी ऐकल्या, त्या सर्वांना मोठे भय प्राप्त झाले.

१२ तेंव्हा प्रेषितांच्या हातून लोकांमध्ये पुष्कळ चमत्कार व अद्भुते घडत असत, आणि ते सर्व एकचित्ताने शलमोनाच्या व्दारमंडपात जमत असत. १३ आणि इतर लोकांतला कोणी त्यांच्याशी मिळण्यास धजत नसे, तरी लोक त्यांना थोर मानीत असत. १४ इतकेच नव्हे, तर विश्वास धरणारे पुष्कळ पुरूष व स्त्रिया यांचे समुदाय अदोनाई मिळत असत. १५ इतके की, लोक दुखणाइतास उचलून रस्त्यांत आणून पलंगावर आणि खाटांवर ठेवीत. ह्यासाठी की, केफा जवळून येत असता, त्याची सावली तरी त्यांच्यावर कोणावर पडावी. १६ आणखी यरूशलेमेच्या आसपासच्या चोहोकडल्या गावांतून लोकसमुदाय दुखणेक-यांस व अशुद्ध आत्म्यांनी पीडलेल्यांस घेऊन तेथे येत असत, आणि ते सर्व बरे होत असत.

१७ तेंव्हा एलयोवन कोहेन (प्रमुख याजक), व त्याच्याबरोबर असलेले सर्व सदूकांची मत्सरग्रस्त होऊन उठले. १८ आणि त्यांनी प्रेषितांना अटक करून तुरूंगात घातले. १९ परंतु रात्री अदोनाई च्या मालाक (दूताने) तुरूंगाचे दरवाजे उघडीले, व त्यास बाहेर आणून म्हंटले, २० जा, आणि मंदिरात उभे राहून ह्या जीवनाचा सर्व संदेश लोकांस सांगा. २१ हे ऐकून उजाडतांच ते मंदिरामध्ये जाऊन शिक्षण देऊ लागले. इकडे एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) व त्याच्यावरोबर जे होते, त्यांनी येऊन न्यायसभा, व इस्त्राएल लोकांचे संबंध वडीलमंडळ एकत्र बोलाविले. आणि त्यांस आणावयास बंदिशाळेकडे पाठविले. २२ पण तिकडे गेलेल्या शिपायांना ते तुरूंगात सापडले नाहीत. म्हणून त्यांनी परत येऊन सांगितले की, २३ बंदिशाळा चांगल्या व्यवस्थेने बंद केलेली, आणि दरवाजांपाशी पहारेकरी उभे राहिलेले आम्हांस आढळले, परंतु तुरूंग उघडल्यावर आम्हांस आत कोणी सापडले नाही. २४ हे वर्तमान ऐकून मुख्य याजक घोटाळयात पडले. २५ इतक्यात कोणी तरी येऊन त्यास असे सांगितले की, पाहा, ज्या माणसांना तुम्ही तुरूंगात ठेविले होते, ते तर मंदिरात उभे राहून लोकांस शिक्षण देत आहेत. २६ तेंव्हा सरदाराने शिपायांसह जाऊन, त्यास जुलूम न करिता आणिले. कारण लोक आपणांला दगडमार करतील, असे त्यास भय वाटत होते.

२७ त्यांनी त्यास आणून न्यायसभेपुढे उभे केले, तेंव्हा प्रमुख याजकाने त्यांस विचारले, २८ ह्या नावांने शिक्षन देऊ नका, असे आम्ही तुम्हांस निक्षून सांगितले होते की, नाही? तरी पाहा तुम्ही आपल्या शिकवणीने यरूशलेम भरून टाकिले आहे. आणि ह्या मनुष्याच्या रक्तपाताचा दोष आम्हांवर आणू पाहत आहा. २९ परंतु केफाने व इतर प्रेषितांनी उत्तर केले, आम्ही मनुष्यापेक्षा याव्हे एलोहिमची आज्ञा मानिली पाहिजे. ३० ज्या येशूवाहला तुम्ही खांबावर टागून मारिले, त्याला आपल्या पूर्वजांच्या याव्हे एलोहिमने उठविले. ३१ त्याने इस्त्राएलाला पश्चात्ताप, व पापांची क्षमा ही देणगी देण्याकरिता याव्हे एलोहिमने त्याला, आपल्या उजव्या हाताशी अधिपति, व

तारणारा असे उच्च पद दिले. ३२ ह्या गोष्टीविषयी आम्ही साक्षी आहो. आणि याव्हे एलोहिमने आपल्या आज्ञा पाळणा-यांस जो क्वादोश रूहुव्वा दिला आहे, तोहि साक्षी आहे.

३३ हे ऐकून ते चिडून गेले, आणि त्यास जिवे मारण्याचा विचार करू लागले. ३४ परंतु सर्व लोकांनी प्रतिष्ठित मानलेला गमलियेल नावाचा एक परूशी शास्त्राध्यापक होता. त्याने न्यायसभेत उभे राहून, त्या माणसांना थोडा वेळ बाहेर पाठविण्यास सांगितले. ३५ मग तो त्यास म्हणाला, अहो इस्त्राएल लोकांनो तुम्ही ह्या माणसांचे काय करणार ह्याविषयी जपून असा. ३६ कारण काही दिवसापूर्वी थुदास हा पुढे येऊन, मी कोणी तरी आहे असे म्हणू लागला. त्याला सुमारे चारशे माणसे मिळाली तो मारला गेला, आणि जितके त्याला मानीत होते, त्या सर्वांची दाणादाण होऊन ते नाहीसे झाले. ३७ त्याच्या मागून गालीलकर यहूदा नांवनिशी होण्याच्या दिवसात पुढे आला, व त्याने पुष्कळ लोकांस फितवून आपल्या नादी लाविले. त्याचाहि नाश झाला व जितके त्याला मानीत होते, त्या सर्वांची पांगापांग झाली. ३८ म्हणून मी तुम्हांस आता सांगतो, ह्या माणसांपासून दूर राहा व त्यांना जाऊ द्या. कारण हा बेत किंवा हे कार्य मनुष्याचे असल्यास नष्ट होईल. ३९ परंतु ते याव्हे एलोहिमचे असल्यास तुम्हांला ते नष्ट करिता यावयाचे नाही, तुम्ही मात्र याव्हे एलोहिमचे विरोधी ठराल.

४० तेंव्हा त्यांनी त्याचे सांगणे मान्य केले, त्यांनी प्रेषितांस बोलावून त्यांस मारहाण केली. आणि येशूवाह च्या नावाने बोलू नका, अशी ताकीद देऊन त्यास सोडून दिले. ४१ ते तर त्या नावासाठी आपण अपमानास पात्र ठरविण्यांत आलो, म्हणून आनंद करीत न्यायसभेपुढून निघून गेले. ४२ आणि दररोज मंदिरात, व घरोघर शिकविण्याचे व येशूवाह हाच मशीहा आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडिले नाही.

**६.**१ त्या दिवसात शिष्यांची संख्या वाढत चालली असता, हेल्लेणी यहूद्यांची इब्री लोकांविरूद्ध कुरकुर सुरू झाली. कारण रोजच्या वाटणीत त्यांच्या विधवांची उपेक्षा होत आहे.२ तेंव्हा बारा प्रेषितांनी शिष्यगणाला बोलवून म्हंटले, आम्ही याव्हे एलोहिमचे वचन सांगण्याचे सोडून पक्तिंसेवा करावी हे ठीक नाही. ३ तरी बंधुजनहो, तुम्ही आपल्यामधून पवित्र आत्म्याने, व ज्ञानाने पूर्ण असे सात प्रतिष्ठित पुरूष शोधून काढा, त्यांस आम्ही ह्या कामावर नेमू. ४ म्हणजे आम्ही स्वतः प्रार्थनेत व वचनाच्या सेवेत तत्पर राहू. ५ ही गोष्ट सर्व लोकांना पसंत पडली, आणि त्यांनी विश्वासांने व पवित्र आत्म्याने पूर्ण असे पुरूष स्तेफन, आणि फिलिप्प, प्रखर, नीकानुर, तीमोन, पार्मिना, व यहूदीयमतानुसारी नीकलाव, अंत्युखीयकर, ह्यांची निवड केली. ६ त्यास त्यांनी प्रेषितांसमोर उभे केले आणि त्यांनी प्रार्थना करून त्यांच्यावर हात ठेविले. ७ मग याव्हे एलोहिम च्या वचनांचा प्रसार होत गेला, यरूशलेमेत शिष्यांची सख्या फार वाढत गेली, कोहेन (याजक) वर्गातीलहि पुष्कळ लोकांनी ह्या विश्वासाला मान्यता दिली.

८ स्तेफन कृपा व सामर्थ्य ह्यांनी पूर्ण होऊन, लोकात मोठी अद्भुते व चिन्हे करीत असे. ९ तेंव्हा लिबिर्तिन नामक लोकांच्या सभास्थानांतील काही जण तसेच कुरेनेकर आलेक्सांद्रियेकर आणि किलिकिया व आसिया ह्यातील लोकांपैकी कित्येक उठले, आणि स्तेफनाबरोबर वितंडवाद घालू लागले. १० पण तो ज्या ज्ञानाने, व ज्या आत्म्याने बोलत होता, त्यास त्याच्याने तोंड देववेना. ११ तेंव्हा त्यांनी काही लोकास फूस देऊन, आम्ही त्याला मोशेविरूद्ध व याव्हे एलोहिम विरूद्ध दुर्भाषण करितांना ऐकले, असे म्हणण्यास चेतवले. १२ आणि लोकास वडिलांस व तोराह् चे रब्बुनी ह्यास चेतविले. त्यांनी त्याच्यावर चाल करून, त्याला धरून न्यायसभेपुढे नेले. १३ आणि त्यांनी खोटे साक्षीदार उभे केले ते म्हणाले, हा माणूस ह्या पवित्र स्थानाच्या व तोराह् च्या विरूद्ध बोलण्याचे सोडीत नाही. १४ कारण आम्ही त्याला असे बोलतांना ऐकले की, हा नात्सेरेथ (नासोरी) येशूवाह हे स्थान मोडून टाकील, आणि मोशेने आपल्याला लावून दिलेले परिपाठ बदलून टाकील. १५ तेंव्हा न्यायसभेत बसलेले सर्वजण त्याच्याकडे निरखून पाहत असता, त्यास त्याचे मुख एलोहिम मालाक (देवदूता) च्या मुखासारखे दिसले.

**७.**१ मग एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) म्हणाला, ह्या गोष्टी अशाच आहेत काय? २ तेंव्हा तो म्हणाला, "बंधुजनहो व

वडिलांनो ऐका, आपला पूर्वज अब्राहाम हारान प्रांतात जाऊन राहण्यापूर्वी मेसोपटेम्या देशात असता, गौरवशाली याव्हे एलोहिमने त्याला दर्शन देऊन म्हंटले, ३ तू आपला देश व आपले नातलग सोडून, मी तुला दाखवीन त्या देशात चल. ४ तेंव्हा तो खास्द्यांच्या देशातून निघून हारानांत जाऊन राहिला. मग त्याचा बाप मेल्यावर याव्हे एलोहिमने त्याला तेथून काढून, सध्या तुम्ही राहता त्या देशात आणिले. ५ पण त्यात त्याला वतन दिले नाही, पाऊलभर देखील जमीन दिली नाही, तथापि त्याला मूलबाळ नव्हते. तरी हा देश त्याच्या, व त्याच्यामागे त्याच्या संततीच्या स्वाधीन कायमचा करण्याचे अभिवचन, याव्हे एलोहिमने त्याला दिले. ६ याव्हे एलोहिमने आणखी असे सांगितले की, त्याच्या संतती परदेशांत जाऊन उपरी होईल, आणि ते लोक त्यांस गुलाम करून चारशे वर्षे जाचतील. ७ ज्या राष्ट्रांच्या गुलामगिरीत ते असतील त्याचे पारिपत्य मी करीन असे याव्हे एलोहिमने सांगितले, आणि त्यानंतर ते तेथून निघून माझी सेवा ह्या स्थळी करितील. ८ त्याने त्यांना सुंतेचा करार लावून दिला. हा करार झाल्यानंतर अब्राहामाला इसाहाक झाला, त्यांची त्याने आठव्या दिवशी सुंता केली. मग इसहाकाला याकोब झाला व याकोबाला बारा पूर्वज वडील झाले.

९ नंतर पूर्वज वडीलांनी हेव्यामुळे योसेफाला मिसर देशात विकून टाकिले, पण याव्हे एलोहिम त्याच्यासह होता. १० त्याने त्याला त्यांच्यावरील सर्व संकटातून सोडविले, आणि मिसर देशाचा राजा फारो, ह्याच्या दृष्टीने कृपापात्र व ज्ञानी असे केले. ह्यावरून त्याने त्याला मिसर देशावर, व आपल्या सर्व घरावर अधिकारी नेमिले. ११ मग सर्व मिसर व कनान ह्या देशात दुष्काळ पडून, त्यांच्यावर जबर संकट आले. आणि आपल्या पूर्वजांस अन्न मिळेनासे झाले. १२ तेंव्हा मिसर देशात धान्य आहे हे ऐकून, याकोबाने तुमच्या आमच्या पूर्वजांस पहिल्या खेपेस पाठविले. १३ मग दुस-या खेपेस योसेफाने आपल्या भावांना ओळख दिली. आणि योसेफाचे कूळ फारो राजाला कळाले, १४ जेंव्हा योसेफाने आपला बाप याकोब, व आपले सगळे नातलग, म्हणजे पंचाहत्तर माणसे ह्यांस बोलावून घेतले. १५ ह्याप्रमाणे याकोब मिसर देशात गेला, आणि तेथे ती व आपले पूर्वजहि मरण पावले. १६ त्यांना शखेमात नेले, आणि जी कबर अब्राहामाने शखेमात हमोराच्या मुलांपासून रोख रूपये देऊन विकत घेतली होते, तीत त्यांना पुरले. १७ मग याव्हे एलोहिमने अब्राहामाला जे अभिवचन दिले होते, ते पूर्ण होण्याचा समय जसजसा जवळ आला. तसतसे ते लोक मिसर देशात वाढून संख्येने पुष्कळ झाले १८ योसेफाची माहिती नसलेला असा दुसरा राजा मिसर देशाच्या गादीवर असेपर्यंत असे चालले. १९ तो राजा आपल्या लोकांबरोबर कपटाने वागला, आणि त्यांची बालके जगू नयेत म्हणून ती बाहेर टाकून देण्यास त्याने त्यास भाग पाडिले. असे त्याने आपल्या पूर्वजांस छळले. २० ह्याच्या काळात मोशेचा जन्म झाला, तो याव्हे एलोहिम च्या दृष्टीने अतिशय सुंदर होता. त्याचे पालनपोषन तीन महिने पर्यंत त्याच्या बापाच्या घरी झाले. २१ मग त्याला बाहेर टाकून देण्यात आले असता, फारोच्या कन्येने त्याला घेऊन आपला मुलगा म्हणून, त्याचे संगोपन केले. २२ मोशेला मिसरी लोकांच्या सर्व विद्यांचे शिक्षण मिळाले, आणि तो भाषणात व कृतीत पराक्रमी होता.

२३ मग तो जवळजवळ चाळीस वर्षांचा झाला. तेंव्हा आपले बांधव, म्हणजे इस्त्राएलाचे संतान ह्यांची भेट घ्यावी, असे त्याच्या मनात आले. २४ तेंव्हा मोशेने त्यातील कोणाएकावर अन्याय होत आहे असे पाहून, त्या जाचलेल्या माणसाचा कैवार घेतला आणि मिस-याला मारून, त्याचा सूड उगविला. २५ तेंव्हा याव्हे एलोहिम त्याच्या हाताने त्याच्या बांधवांची सुटका करीत आहे, हे त्यास समजले असेल असे त्याला वाटत होते, पण ते त्यास समजले नाही. २६ मग दुस-या दिवशी कोणी भांडत असता तो त्यांच्यापुढे येऊन उभा राहिला व त्यांची समजूत घालण्याकरिता त्यास म्हणाला, अहो मनुष्यांनो तुम्ही भाऊबंद आहा, एकमेकांवर अन्याय का करिता? २७ तेंव्हा जो आपल्या शेजा-यावर अन्याय करीत होता, तो त्याला ढकलून देऊन म्हणाला, तुला आम्हांवर अधिकारी व न्यायाधीश कोणी केले? २८ काल तू मिस-याला ठार मारिले तसे मलाहि मारावयास पाहतोस काय? २९ हे शब्द ऐकतांस मोशे पळून गेला आणि मिद्यान देशात उपरी झाला, तेथे त्याला दोन मुलगे झाले. ३० मग चाळीस वर्षे भरल्यावर सिय्योन पर्वताच्या रानात, एका झुडपातील अग्निज्वालेत एक एलोहिम मालाक (देवदूत) त्याच्या दृष्टीस पडला. ३१ हे दृश्य पाहून मोशेला अश्चर्य वाटले आणि ते काय आहे, हे पाहण्याकरिता तो जवळ गेला. तेंव्हा अदोनाई ची वाणी झाली की, ३२ मी तुझ्या पूर्वजांचा याव्हे एलोहिम अब्राहामाचा, इसहाकाचा, व याकोबाचा, याव्हे एलोहिम आहे तेंव्हा मोशे कंपित झाला, व त्याला तिकडे पाहावयाचे धैर्य झाले नाही.

३३ कारण अदोनाईने त्याला म्हंटले, तू आपल्या पायातले जोडे काढ. कारण की, ज्या जागेवर तू उभा आहेस ती क्वादोश (पवित्र)
भूमि आहे. ३४ मिसर देशांतल्या माझ्या लोकांची विपत्ति मी खरोखर पाहिली आहे. त्यांचे मी कण्हणे ऐकले आहेत, आणि त्यास
सोडवून घेण्यासाठी मी उतरलो आहे. तर आता चल, मी तुला मिसर देशाला पाठवितो.

३५ तुला अधिकारी व न्यायाधीश कोणी केले, असे म्हणून ज्या मोशेला त्यांनी झिडकारिले होते, त्यालाच झुडपात दर्शन झालेल्या
देवदूताच्या हस्ते, याव्हे एलोहिमने अधिकारी, व मुक्तिदाता म्हणून पाठविले. ३६ त्याने मिसर देशात तांबडया समुद्रात व रानात
चाळीस वर्षे अद्भुत कृत्ये करून, व चिन्हे दाखवून त्या लोकांस बाहेर नेले. ३७ तोच मोशे इस्राएल लोकांस म्हणाला, "याव्हे आदोनाय
तुमच्या बांधवांमधून माझ्यासारखा नव्वी (संदेष्टा) तुम्हांसाठी उठवील. ३८ रानांतील मंडळीमध्ये त्सिय्योन पर्वतावर त्याच्याशी
बोलणा-या देवदूता बरोबर, आणि आपल्या पूर्वजांबरोबर जो होता, तो हाच होय. त्यालाच आपल्याला देण्याकरिता जिवंत वचने
मिळाली. ३९ त्याचे ऐकण्याची आपल्या पूर्वजांची इच्छा नव्हती, तर त्यांनी त्याला धिक्कारिले. व आपले मन मिसर देशाकडे
फिरवून, ४० ते अहरोनाला म्हणाले, "आमच्यापुढे चालतील असे देव आम्हांस करून दे. कारण ज्याने आम्हांस मिसर देशातून
आणिले त्या मोशेचे काय झाले, हे आम्हांस कळत नाही. ४१ मग त्या दिवसात त्यांनी वासराची मूर्ती बनविली, व तिच्यापुढे यज्ञ
करून आपल्या हाताच्या कृतीबद्दल आनंदोत्सव केला. ४२ तेंव्हा याव्हे एलोहिमने त्यांच्याकडे पाठ फिरविली, आणि त्यांना
'आकाशातील सैन्यांची' पूजा करावयास सोडून दिले, ह्याविषयी नव्वीईम (संदेष्टयां) च्या पुस्तकांत लिहिले आहे. "हे इस्राएलाच्या
घराण्या तुम्ही चाळीस वर्षे अरण्यात बलिदाने व यज्ञ केले काय? ४३ मोलखाचा मंडप, व रेफान दैवताचा तारा, म्हणजे पुजण्याकरिता
तुम्ही ज्या प्रतिमा केल्या त्या तुम्ही उचलून घेतल्या, मीहि तुम्हांला बाबेलच्या पलीकडे नेऊन ठेवीन." ४४ तू जो नमुना पाहिला
त्याप्रमाणे साक्षीचा मंडप कर असे ज्याने मोशेला सांगितले, त्याने नेमल्याप्रमाणे तो मंडप रानांत आपल्या पूर्वजांचा होता. ४५ तो मंडप
आपल्या पूर्वजास मिळाल्यावर जी राष्ट्रे याव्हे एलोहिमने त्यांच्या समोरून घालविली, त्यांचा देश आपल्या पूर्वजांनी आपल्या ताब्यात
घेतला. तेंव्हा त्यांनी तो मंडप यहोशवा बरोबर त्या देशात आणिला, आणि दावीदाच्या दिवसापर्यंत परंपरेने तसाच ठेविला. ४६
दावीदावर याव्हे एलोहिमची कृपादृष्टि झाली, आणि त्याने याकोबाच्या, याव्हे एलोहिम साठी मंदिर बांधण्याची इच्छा त्याने दर्शविली.
४७ आणि शलमोनाने त्याच्यासाठी मंदिर बांधिले. ४८ तथापि, जो सर्वोच्च याव्हे एलोहिम मनुष्यांनी त्याच्या हातानी बांधलेल्या घरात
राहत नाही. नव्वीईम (संदेष्टयां) नी असे म्हंटले आहे. ४९ "याव्हे आदोनाय असे म्हणतो, शाम्माईम (आकाशे) माझे राजासन आहे
ऐरेत्स (पृथ्वी) माझे पादासन आहे. तुम्ही माझ्यासाठी कशा प्रकारचे घर बांधणार? किंवा माझ्या विसाव्याचे स्थान कोणते? ५० माझ्या
हाताने ह्या सर्व वस्तु केल्या नाहीत काय? ५१ अहो ताठ मानेच्या, आणि हृदयाची, व कानाची सुंता न झालेल्या लोकांनो तुम्ही तर
क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) ला सर्वदा विरोध करिता. जसे तुमचे पूर्वज तसेच तुम्हीहि, ५२ ज्याचा पाठलाग तुमच्या पूर्वजांनी
केला नाही, असा नव्वीईम (संदेष्टयां) मध्ये कोणी झाला का? ज्यांनी त्या नीतिमान पुरूष्याच्या आगमनाविषयी पूर्वी सांगितले, त्यास
त्यांनी जिवे मारिले, आणि आता त्याला धरून देणारे, व जिवे मारणारे तुम्ही निघाला आहा. ५३ अशा तुम्हांस एलोहिम मालाक
(देवदूतां) च्या योगे योजिलेला तोराह् प्राप्त झाले होते, पण तुम्ही ते पाळिले नाही.

५४ त्याचे हे भाषण ऐकणा-यांच्या अंतःकरणास इतके झोंबले की, ते त्याच्यावर दांतओठ खाऊ लागले. ५५ परंतु क्वादोश रूहुव्वा
(पवित्र आत्म्या) ने पूर्ण होऊन, त्याने आकाशाकडे निरखून पाहिले. तेंव्हा याव्हे एलोहिमचे तेज व याव्हे च्या उजवीकडे, येशूवाह
उभा असलेला त्याच्या दृष्टीस पडला. ५६ आणि त्याने म्हंटले, पाहा, आकाश उघडलेले व मनुष्याचा मुलगा, याव्हे आदोनाय च्या
उजवीकडे उभा असलेला मला दिसत आहे. ५७ तेंव्हा ते मोठयाने ओरडून, व कान बंद करून एकजुटीने त्याच्या अंगावर धावून
गेले. ५८ मग ते त्याला नगराबाहेर घालवून दगडमार करू लागले, आणि साक्षीदारांनी आपली वस्त्रे शौल नावाच्या एका तरूणाच्या
पायांजवळ ठेविली. ५९ ते दगडमार करीत असता स्तेफन अदोनाईचा धावा करीत म्हणाला, हे अदोनाई येशूवाह माझ्या रूहुव्वा
(आत्म्या) चा स्विकार कर. ६० मग गुडघे टेकून तो मोठयाने ओरडला, "हे अदोनाई हे पाप त्यांच्याकडे मोजू नको असे बोलून तो
झोपी गेला."

८. १ आणि स्तेफन ची हत्या करण्यात आली, त्यास शौलाची संमति होती. त्या दिवसापासून यरूशलेम येथील मंडळीचा मोठा छळ सुरू झाला. प्रेषितांशिवाय इतर सर्व विश्‍वासणारे शिष्य यहूदा व शोमरोन प्रांताच्या कानाकोप-यात पांगून गेले. २ तेंव्हा भक्तिमान माणसांनी स्तेफनाला पुरायला नेले, आणि त्याच्यासाठी मोठा शोक केला. ३ पण शौल हा मंडळीला हैराण करीत आहे, तो प्रत्येक घरात शिरून पुरूषांस व स्त्रियांस ओढून काढून तुरूंगात घालीत होता.

४ इकडे तर जे पांगून गेले ते वचनाचे शुभवर्तमान सांगत चहूकडे फिरले. ५ आणि फिलिप्प खाली शोमरोन नगरात जाऊन, त्यांना मशीहा गाजवू लागला. ६ तेंव्हा त्याचे ऐकून व जे चमत्कार तो करीत होता, ते पाहून लोकसमुदायांनी फिलिप्पाने सांगितलेल्या गोष्टीकडे एकमताने लक्ष दिले. ७ कारण ज्यांना अशुद्ध आत्मे लागले होते, अशा पुष्कळांतून ते अशुद्ध आत्मे मोठयाने ओरडून निघून गेले, आणि पुष्कळ पक्षघाती, व पांगळे बरे झाले. ८ आणि त्या नगरात फार आनंद झाला. ९ मग शिमोन नावाचा कोणीएक मनुष्य होता. तो पूर्वी त्या नगरात जादुगिरी करून शोमरोनी लोकांस थक्क करीत असे, आणि आपण कोणी मोठे आहो, असे तो सांगत असे. १० अगदी लहानापासून तो अगदी थोरापर्यंत सगळे लोक त्याच्याकडे लक्ष देत असत, आणि म्हणत असत की, जी देवाची मोठी शक्ती म्हणून म्हणतात, ती हाच आहे. ११ आणि पुष्कळ काळापासून त्याने आपल्या जादुगिरीने त्यांना थक्क केले होते. म्हणून ते त्याच्याकडे लक्ष देत होते. १२ परंतु जेंव्हा फिलिप्प याव्हे एलोहिमचे राज्य, व येशूवाह मशीहाचे नाव याविषयी शुभवर्तमान सांगत असता, लोकांनी विश्‍वास धरला, तेंव्हा पुरूषांचा व स्त्रियांचाहि बाप्तिस्मा झाल. १३ आणि शिमोनानेहि स्वतः विश्‍वास धरला, व बाप्तिस्मा घेऊन तो फिलिप्पाला धरून राहिला. आणि जी चिन्हे व जे मोठे चमत्कार घडत होते, ते पाहून तो थक्क झाला.

१४ मग शोमरोनाने याव्हे एलोहिमचे वचन अंगीकारले आहे, हे यरूशलेमेतल्या प्रेषितांनी ऐकले. तेंव्हा त्यांनी केफाला व योहानानला त्यांच्याकडे पाठवले. १५ ते तेथे उतरून आल्यावर त्यांनी त्या लोकांसाठी प्रार्थना केली की, त्यांना पवित्र आत्मा मिळावा. १६ कारण तोपर्यंत तो त्यांच्यातील कोणावरहि मिळाला नव्हता. केवळ अदोनाई येशूवाह च्या नावाने त्यांचा बाप्तिस्मा झाला होता. १७ तेंव्हा त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले, आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला. १८ मग प्रेषितांचे हात ठेवल्याने पवित्र आत्मा देण्यात आला, हे शिमोनाने पाहिले. तेंव्हा त्याने त्यांच्याकडे पैसे आणले १९ आणि तो म्हणाला, ज्या कोणावर मी आपले हात ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळावा, असा हा अधिकार मलाही द्या. २० तेंव्हा केफा त्याला म्हणाला, तुझ्या रूपये तुझ्यावरोबर नाश होवो. कारण तू याव्हे एलोहिमचे दान पैशाने विकत घेण्याचा विचार केला. २१ तुला या गोष्टीत भाग किंवा वाटा नाही, कारण याव्हे एलोहिम च्या समोर तुझे अंतःकरण नीट नाही. २२ तर तू या आपल्या दुष्टतेचा पश्‍चात्ताप कर, आणि अदोनाईला विनंती कर, म्हणजे कदाचित तुझ्या अंतःकरणाच्या कल्पनेची तुला क्षमा होईल. २३ कारण तू अतिशय कडूपणात व अन्यायाच्या बंधनात आहेस, असे मला दिसून येते. २४ तेंव्हा शिमोनाने उत्तर देऊन म्हंटले, तुम्ही सांगितले त्यातले काही माझ्यावर येऊ नये, म्हणून तुम्हीच माझ्यासाठी अदोनाई जवळ विनंती करा. २५ मग ते साक्ष देऊन अदोनाईचे वचन सांगितल्यावर यरूशलेमेकडे परत गेले, आणि जाता जाता त्यांनी शोमरोनी लोकांच्या पुष्कळ गावांमध्ये शुभवर्तमान सांगितले.

२६ पण अदोनाईचा मालाक (दूत) फिलप्पाशी बोलला, तो म्हणाला, ऊठ जी वाट यरूशलेमेपासून गज्जाकडे जाते, त्या वाटेने दक्षिणेकडे जा, ती रानवाट आहे. २७ तेंव्हा तो उठून गेला, आणि पाहा, कोणी कूशी षंढ कूशी लोकांची राणी कांदके, हिच्या हाताखालचा मोठा अधिकारी, जो तिच्या सर्व भांडारावर देखरेख करणारा होता. तो यरूशलेमेत याव्हे एलोहिमची भक्ती करण्यासाठी आला होता. २८ आणि तो परत जाताना आपल्या रथात बसला होता. आणि यशया नव्वी (संदेष्टा) याचा ग्रंथ वाचीत होता. २९ तेंव्हा आत्म्याने फिलिप्पाला म्हंटले, जवळ जाऊन तू तो रथ गाठ. ३० मग फिलिप्प त्याच्याजवळ धावत गेला, आणि त्याने त्याला यशया नव्वी (संदेष्टा) याचा ग्रंथ वाचताना ऐकले. तेंव्हा तो म्हणाला, तू जे वाचतोस ते तुला समजते काय? ३१ आणि त्याने म्हंटले, कोणी मला मार्ग दाखवल्यावाचून हे मला कसे समजेल? मग त्याने फिलिप्पाला आपल्याजवळ वरती येऊन बसायला बोलावले. ३२ तेंव्हा तो शास्त्रलेखाचा जो भाग वाचीत होता, तो हा होता. त्याला मेंढरासारखे वधासाठी नेले, आणि जसे मेंढराप्रमाणे आपल्या कातरणा-याच्या पुढे गप्प राहिला, त्याने आपले तोंड उघडले नाही. ३३ त्याच्या लीन अवस्थेत त्याला न्याय

मिळाला नाही, त्याच्या पिढीचे वर्णन कोण करील? कारण त्याचा जीव पृथ्वीवरून घेतला गेला. ३४ तेंव्हा षंढाने फिलिप्पाला म्हंटले, मी तुम्हांला विनंतीपूर्वक विचारतो, नव्वी (संदेष्टा) कोणाविषयी असे म्हणतो, स्वतःविषयी किंवा दुस-या कोणाविषयी? ३५ तेंव्हा फिलिप्पाने बोलावयास आरंभ केला, व ह्या शास्त्रलेखापासून सुरूवात करून, येशूवाह विषयीची सुवार्ता त्याला सांगितली. ३६ मग वाटेने जात असता ते पाणवठयाजवळ आले. तेंव्हा षंढ म्हणाला पाहा, हे पाणी मला बाप्तिस्मा घेण्यास काय हरकत आहे? ३७ मग फिलिप्पाने म्हंटले, जर आपण आपल्या सर्व अंतःकरणाने विश्वास धरिता तर तुम्हीहि बाप्तिस्मा घेऊ शकता, त्याने उत्तर दिले येशूवाह मशीहा, याव्हे एलोहिमचा मुलगा आहे, असा मी विश्वास धरितो. ३८ तेंव्हा त्याने रथ उभा करावयास सांगितले, आणि फिलिप्प व षंढ असे ते दोघे पाण्यात उतरले, आणि त्याने त्याला बाप्तिस्मा दिला. ३९ मग ते पाण्यांतून वर आले तोच अदोनाईच्या आत्मा फिलिप्पाला घेऊन गेला, म्हणून तो पुन्हा षंढाच्या दृष्टीस पडला नाही. नंतर तो आपल्या वाटेने हर्ष करीत चालला. ४० इकडे फिलिप्प अजोत नगरात आढळला, आणि कैसरीया येथे येईपर्यंत, त्याला वाटेत जी जी गावे लागली, त्यातून जातांना त्याने सुवार्ता सांगितली.

९. १ शौल यरूशलेममध्ये अदोनाईच्या अनुयायांना अजूनही धमकावण्याचा व जिवे मारण्याचा प्रयत्न करीत होता म्हणून तो प्रमुख याजकांकडे गेला. २ त्याने प्रमुख याजकाकडे जाऊन त्याच्यापासून दिमिष्कातल्या सभास्थानांना अशी पत्रे मागितली की तो मार्ग अनुसरणारे पुरूष किंवा स्त्रिया कोणीहि त्याला आढळल्यास त्याने त्यांना बांधून यरूशलेमेस आणावे. ३ मग जाता जाता असे झाले की तो दिमिष्काजवळ येऊन पोहंचला, त्यावेळी अकस्मात त्याच्या सभोवती आकाशातून प्रकाश चमकला. ४ तेंव्हा तो जमिनीवर पडला, आणि त्याने अशी वाणी आपणाबरोबर बोलतांना ऐकली की, शौला, शौला माझा छळ का करितोस? ५ तेंव्हा तो म्हणाला, अदोनाई तू कोण आहेस? त्याने म्हंटले, ज्या येशूवाहचा तू छळ करितोस, तोच मी आहे. ६ तर ऊठ व नगरात जा, म्हणजे तू काय करावयाचे हे तुला सांगण्यांत येईल. ७ त्याच्याबरोबर जी माणसे जात होती, ती स्तब्ध उभी राहिली त्यांनी वाणी ऐकली खरी, पण त्यांच्या दृष्टीस कोणी पडले नाही. ८ मग शौलाला जमिनीवरून उठविले, तेंव्हा त्याने डोळे उघडले, तो त्याला काही दिसेना. तेंव्हा त्यांनी त्याला हाती धरून दिमिष्कात नेले. ९ तेथे तो तीन दिवस आंधळयासारखा झाला, व त्याने काही अन्नपाणी घेतले नाही.

१० इकडे दिमिष्कात हनन्या नांवाचा कोणीएक शिष्य होता. त्याला अदोनाई दृष्टांतात म्हणाला, हनन्या! त्याने म्हंटले, काय अदोनाई ? ११ अदोनाई त्याला म्हणाला, उठून नीट नावाच्या रस्त्यावर जा, आणि यहूदाच्या घरी तार्सेकर शौल नावाच्या मनुष्याचा शोध कर, कारण पाहा, तो प्रार्थना करीत आहे. १२ आणि हनन्या नांवाच्या एक मनुष्य आपल्याला पुन्हा दिसावे, म्हणून आपणावर हात ठेवीत आहे, असे त्याने पाहिले आहे. १३ तेंव्हा हनन्याने उत्तर दिले, अदोनाई यरूशलेमेतल्या तुझ्या पवित्र जनांचे ह्या माणसाने किती वाईट केले आहे, हे मी पुष्कळांकडून ऐकले आहे. १४ आणि येथेहि तुझे नांव घेणा-या सर्वांस बांधावे, असा मुख्य याजकांपासून त्याला अधिकार मिळाला आहे. १५ परंतु अदोनाईने त्याला म्हंटले, जा कारण परराष्ट्रीय राजे व इस्त्राएलाची संतति ह्यांच्यासमोर माझे नांव घेऊन जाण्याकरिता, तो माझे निवडलेले पात्र आहे. १६ आणि त्याला माझ्या नांवासाठी किती दुःख सोसावे लागेल, हे मी त्याला दाखवीन. १७ तेंव्हा हनन्या निघाला आणि त्या घरी गेला, आणि त्याच्यावर हात ठेवून म्हणाला, शौल भाऊ, तू वाटेने येत असता ज्या अदोनाईने म्हणजे, येशूवाहने तुला दर्शन दिले, त्याने तुला पुन्हा दृष्टि यावी, व तू क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) ने परिपूर्ण व्हावे म्हणून मला पाठविले आहे. १८ तत्क्षणी त्याच्या डोळयावरून खपल्यांसारिखे काही पडले व त्याला दृष्टि आली, आणि त्याने उठून बाप्तिस्मा घेतला. १९ मग अन्न घेतल्यावर त्याला शक्ति आली, नंतर तो दिमिष्कातल्या शिष्यांबरोबर काही दिवस होता.

२० आणि त्याने लागलेच सभास्थानांमध्ये येशूवाह विषयी घोषणा केली की, तो याव्हे एलोहिमचा मुलगा आहे. २१ तेंव्हा सर्व ऐकणारे विस्मित होऊन म्हणू लागले, हे नांव घेणा-यांचा ज्याने यरूशलेमेत नाश केला हा नव्हे काय? आणि त्यास बांधून मुख्य याजकांकडे न्यावे म्हणूनच हा येथे आला होता ना? २२ पण शौलाला तर अधिक सामर्थ्य प्राप्त होत गेले, आणि हाच मशीहा आहे असे सिद्ध करून तो दिमिष्कात राहणा-या यहूदी लोकांस कुंठित करीत राहिला. २३ असे बरेच दिवस चालले, तेंव्हा यहूदी लोकांनी त्याला ठार मारण्याचा मनसुबा केला. २४ पण त्यांचा तो कट शौलाला समजला, त्यांनी तर त्याला मारण्याकरिता रात्रंदिवस वेशीवर पाळत

ठेविली होती. २५ परंतु त्याच्या शिष्यांनी रात्रीच्या वेळी त्याला नेले, व पाटीतून गांवकुसावरून खाली सोडून उतरले.

२६ मग तो यरूशलेमेत आला आणि शिष्यांबरोबर मिळण्यामिसळयाचा प्रयत्न करू लागला, परंतु हा शिष्य आहे असा त्याचा विश्वास नसल्यामुळे, ते सर्व त्याला भीत होते. २७ तेंव्हा बर्णबा त्याला घेऊन प्रेषितांकडे आला, आणि त्याला वाटेत अदोनाईचे दर्शन कसे झाले, अदोनाई त्याच्याबरोबर कसा बोलला, आणि येशूवाह च्या नांवाने दिमिष्कात त्याने धैर्याने कसे भाषण केले, हे सर्व त्याने त्यास सांगितले. २८ आणि तो यरूशलेमेत अदोनाई येशूवाह च्या नांवाने धैर्याने बोलत त्यांच्याबरोबर जात येत असे. २९ आणखी हेल्लेणी यहूद्यांबरोबरहि बोलत असे व वादविवाद करीत असे, म्हणून ते त्याला मारण्याचा प्रयत्न करू लागले. ३० बंधुजनांस हे समजल्यावर त्यांनी त्याला कैसरीयात नेले, व पुढे तार्सास पाठविले. ३१ अशा प्रकारे सर्व यहूदीया, गालील, व शोमरोन, ह्या प्रदेशातील मंडळीस स्वस्थता मिळाली. आणि तिची उन्नत्ति होऊन ती अदोनाई च्या भयांत, व पवित्र आत्म्याच्या समाधानांत, चालत असता वाढत गेली.

३२ मग असे झाले की, केफा चहूंकडे फिरत असता लोद गांवात जे पवित्र जन राहत होते, त्यांच्याकडेहि गेला. ३३ तेथे त्याला ऐनेयास नांवाचा एक मनुष्य आढळला, त्याला पक्षघात झाल्यामुळे तो आठ वर्षे अंथरूणाला खिळलेला होता. ३४ त्याला केफाने म्हंटले, ऐनेयास येशूवाह मशीहा तुला बरे करीत आहे, ऊठ व स्वतः आपले अंथरूण नीटनेटके कर. तेंव्हा तो तत्काळ उठला, ३५ त्याला पाहून लोद व शारोन येथील सर्व रहिवासी अदोनाई कडे वळले. ३६ आणखी यापोमध्ये टबीथा ऊर्फ दुर्कस ह्या नांवाची कोणीएक शिष्या होती, ती सत्कृत्ये व दानधर्म करण्यात तत्पर असे. ३७ पुढे असे झाले की, त्या दिवसात ती आजारी पडून मरण पावली. तेंव्हा त्यांनी तिला आंघोळ घालून माडीवरच्या खोलीत ठेविले. ३८ लोद यापोजवळ असल्यामुळे केफा तेथे आहे, असे जेंव्हा शिष्यांनी ऐकले, तेंव्हा त्यांनी दोघा जणास पाठवून त्याला विनंती केली की, आम्हांकडे यावयाला उशीर करू नका. ३९ तेंव्हा केफा उठून त्यांच्याबरोबर गेला, तो तेथे पोहंचताच त्यांनी त्याला माडीवरच्या खोलीत नेले, त्याच्याजवळ सर्व विधवा रडत उभ्या राहिल्या, आणि दुर्कस त्यांच्याजवळ असता ती जे अंगरखे व जी वस्त्रे करीत असे, ती त्यांनी त्याला दाखविली. ४० पण केफाने त्या सर्वास बाहेर काढिले, आणि गुडघे टेकून प्रार्थना केली. मग कुडीकडे वळून म्हंटले, टबीथे ऊठ, तेंव्हा तिने डोळे उघडले व केफाला पाहून ती उठून बसली. ४१ मग त्याने तिला हात देऊन उठविले. आणि पवित्र जनांस, व विधवांस बोलावून त्यांच्यापुढे तिला सजीव असे उभे केले. ४२ मग सर्व यापोमध्ये हे माहित झाले, आणि पुष्कळांनी अदोनाई वर विश्वास ठेविला. ४३ नंतर असे झाले की, तो यापोत शिमोन नांवाच्या कोणाएका कांतडे कमावणा-या चांभाराच्या येथे बरेच दिवस राहिला.

**१०**.१ कैसरीया येथे कर्नेल्य नांवाचा कोणीएक पुरूष इटलिक म्हंटलेल्या पलटणीत शताधिपति होता. २ तो नीतिमान, व आपल्या घराण्यांतील सर्वांसह याव्हे एलोहिमचे भय बाळगणारा, लोकास फार दानधर्म करणारा, व याव्हे एलोहिमला नित्य विनंती करणारा असा होता. ३ त्याने दिवसाच्या सुमारे तिस-या प्रहरी दृष्टांतात असे स्पष्टपणे पाहिले की, आपणा कडे याव्हे एलोहिमचा मालाक (दूत) येत असून कर्नेल्या अशी आपणास हाक मारीत आहे. ४ तेंव्हा तो त्याच्याकडे निरखून पाहून भयभीत होऊन म्हणाला, काय महाराज? त्याने त्यास म्हंटले, तुझ्या प्रार्थना व तुझे दानधर्म ही याव्हे आदोनाय समोर स्मरणार्थ आली आहेत. ५ तर आता यापोस माणसे पाठीव, आणि शिमोन नांवाच्या माणसाला बोलावून आण, त्याला केफाहि म्हणतात. ६ तो शिमोन नांवाच्या कोणाएका कातडे कमावणा-या चांभाराच्या येथे उतरला आहे. त्याचे घर समुद्राच्या किना-यास आहे. ७ जो देवदूत त्याच्याबरोबर बोलत होता, तो निघून गेल्यानंतर त्याने आपल्या घरच्या दोघां चाकरास, व आपल्या हुजरातीतल्या एका धार्मिक शिपयास बोलविले. ८ आणि त्याच्याजवळ सर्व सविस्तर सांगून, त्यास यापोस पाठविले. ९ ते दुस-या दिवशी वाटेवर असता गांवाजवळ येत आहेत, तो दोन प्रहरच्या सुमारास केफा प्रार्थना करावयास धाब्यावर गेला. १० तेंव्हा त्याला भूक लागून काही खावेसे वाटले, आणि जेवनाची तयारी होत आहे, इतक्यात त्याचे देहभान सुटले. ११ तेंव्हा आकाश उघडलेले व मोठया चांदव्यासारिखे चार कोपरे धरून सोडिलेले एक पात्र पृथ्वीवर उतरत आहे, असा दृष्टांत त्याला झाला. १२ त्यात पृथ्वीवरील सर्व चतुष्पाद, सरपटणारे जीव, व आकाशातील पाखरे होती. १३ मग त्यास अशी वाणी झाली की, केफा ऊठ मारून खा. १४ केफा म्हणाला, नको नको अदोनाई, कारण निषिद्ध आणि

अशुद्ध असे काही मी कधीहि खाल्ले नाही.१५ मग दुस-यांदा त्याला वाणी झाली की, याव्हे एलोहिमने जे शुद्ध केले आहे, ते तू
निषिद्ध मानू नको. १६ असे तीन वेळा झाले, आणि लागलेच ते पात्र आकाशात वर घेतले गेले.

१७ आपण पाहिलेल्या दृष्टांताचा अर्थ काय असावा ह्याविषयी केफा विचारात पडला असता. पाहा, कर्नेल्याने पाठविलेली माणसे
शिमोनाचे घर शोधल्यावर दरवाजाजवळ येऊन उभी राहिली. १८ आणि त्यांनी हाक मारून विचारिले, शिमोन केफा येथे पाहुणा
उतरला आहे काय? १९ केफा त्या दृष्टांताविषयी विचार करीत असता, आत्मा त्याला म्हणाला, पाहा, तीन माणसे तुझा शोध करीत
आहेत. २० तर ऊठ खाली ये, आणि काही संशय न धरिता त्यांच्याबरोबर जा. कारण मीच त्यांना पाठविले आहे. २१ केफा त्या
माणसांकडे खाली येऊन म्हणाला, पाहा, ज्याचा तुम्ही शोध करीत आहा तो मी आहे. तुम्ही कोणत्या कारणामुळे येथे आला? २२ ते
म्हणाले कर्नेल्य शताधिपति हा नीतिमान मनुष्य असून, याव्हे एलोहिमचे भय बाळगणारा आहे. आणि सर्व यहूदी लोक त्याच्याविषयी
चांगली साक्ष देतात. त्याला पवित्र देवदूताने सुचविले आहे की, आपणांला घरी बोलावून आपणांकडून संदेश ऐकावा. २३ मग त्याने
त्यास आत बोलावून त्यांचा पाहुणचार केला. दुस-या दिवशी केफा त्यांच्याबरोबर निघाला, आणि यापोतील बंधुजनांपैकी कित्येक
त्याच्याबरोबर गेले. २४ दुस-या दिवशी तो कैसरीयास पोहंचला. तेंव्हा कर्नेल्य आपल्या नातलगांस, व इष्टमित्रांस जमवून त्यांची
वाट पाहत होता. २५ केफा आंत जात असता कर्नेल्य त्याला सामोरा गेला, आणि त्याने त्याच्या पाया पडून त्याला नमन केले. २६
पण केफा त्याला उठवून म्हणाला, उभे राहा मीहि मनुष्य आहे. २७ मग तो त्याच्याबरोबर बोलत बोलत आंत गेला. तेंव्हा त्याला
पुष्कळ लोक एकत्र जमलेले आढळून आले. २८ त्याने त्यास म्हंटले, तुम्हांला ठाऊकच आहे की, यहूदी मनुष्याने अन्य जातीच्या
मनुष्याबरोबर निकट संबंध ठेवणे, किंवा त्याच्याकडे जाणे येणे ठेवणे, हे त्याच्या रीतिरिवाजा विरूद्ध आहे. तथापि कोणाहि
मनुष्याला निषिद्ध किंवा अशुद्ध म्हणू नये, असे याव्हे एलोहिमने मला दाखविले आहे.

२९ म्हणून मला बोलाविल्याबरोबर मी काकू न करिता आलो आहे. तर मी विचारिता तुम्ही मला कशासाठी बोलाविले? ३० तेंव्हा
कर्नेल्य म्हणाला, आज चार दिवस झाले. मी आपल्या घरी तिस-या प्रहरी प्रार्थना करीत होता. तेंव्हा पाहा, तेजस्वी वस्त्रे परिधान
केलेला एक पुरूष मजपुढे उभा राहून म्हणाला, ३१ कर्नेल्य तुझी प्रार्थना ऐकण्यात आली आहे. आणि याव्हे एलोहिम समोर तुझ्या
दानधर्मांचे स्मरण करण्यात आले आहे. ३२ तर यापोस कोणाला पाठवून केफा म्हंटलेला, शिमोन ह्याला बोलावून आण. तो
समुद्राच्या काठी कातडे कमावणा-या शिमोन चांभाराच्या घरी पाहुणा आहे. ३३ म्हणून मी आपणांकडे माणसांना तत्काळ पाठविले.
आपण आला हे बरे केले, तर आता अदोनाईने जे काही आपणांला आज्ञापिले आहे, ते ऐकावे, म्हणून आम्ही सर्व जण येथे याव्हे
एलोहिम समोर हजर आहो.

३४ तेंव्हा केफाने बोलण्यास आरंभ केला. ३५ याव्हे आदोनाय पक्षपाती नाही, हे माझ्या पक्के ध्यानात आहे. तर प्रत्येक राष्ट्रात जो
त्याची भीति बाळगतो व ज्याची कृत्ये नैतिक आहेत, तो त्याला मान्य आहे. ३६ येशूवाह मशीहा तोच सर्वांचा अदोनाई आहे,
त्याच्याव्दारे याव्हे एलोहिमने शांतीच्या सुवार्तेची घोषणा करितांना, आपले जे वचन इस्त्राएलाच्या संततीस पाठविले, ते हे ३७
योहानानने जो बाप्तिस्मा गाजविला, त्यानंतर गालीलापासून प्रारंभ होऊन सर्व यहूदीयामध्ये घडलेली गोष्ट तुम्हांला तर माहित आहे.
३८ नात्सेरेथ (नासोरी) येशूवाहला, याव्हे आदोनाय क्वादोश रूहुव्वा चा (पवित्र आत्म्याचा) व सामर्थ्याचा अभिषेक केला. तो
सत्कर्मे करीत, व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांस बरे करीत फिरला, कारण याव्हे एलोहिम त्याच्याबरोबर होता. ३९ आणि
त्याने यहूद्यांच्या देशात व यरूशलेमेत जे काही केले, त्या सर्वांचे साक्षी आम्ही आहो. त्यांनी त्याला खांबावर टांगून मारिले. ४०
त्याला याव्हे एलोहिमने तिस-या दिवशी उठविल, व त्याने प्रगट व्हावे असे केले. ४१ तरी हे प्रगटीकरण सर्व लोकांस नव्हे, पण जे
साक्षी याव्हे एलोहिमने पूर्वी निवडिले त्या आम्हांस केले. त्या आही तो मेलेल्यांतून उठल्यानंतर, त्याच्या बरोबर खाणेपिणे केले. ४२
त्याने आम्हांस अशी आज्ञा केली की, लोकांस उपदेश करा, व अशी साक्ष द्या की, एलोहिमने नेमलेला असा जिवंताचा व मेलेल्यांचा
न्यायाधीश तो हाच आहे. ४३ त्याच्यावर विश्वास ठेवणा-या प्रत्येकाला त्याच्या नांवाने पापांची क्षमा मिळेल, अशी साक्ष सर्व नव्वीईम
ने त्याच्याविषयी दिली.

४४ केफाचे हे भाषण चालू असतांनाच वचन ऐकणा-या सर्वांवर, क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) उतरला. ४५ मग परराष्ट्रीयांवरहि पवित्र आत्म्याच्या दानाचा वर्षाव झाला आहे, असे पाहून केफाबरोबर आलेल्या विश्वास ठेवणा-या व सुंता झालेल्या, सर्व लोकांना आश्चर्य वाटले. ४६ कारण त्यांनी त्यांना अनेक भाषांतून बोलतांना, व याव्हे एलोहिमची थोरवी गातांना ऐकले. ४७ तेंव्हा केफाने म्हंटले, आम्हांला मिळाला तसा पवित्र आत्मा ज्यांना मिळाला आहे, त्यांचा बाप्तिस्मा होऊ नये, म्हणून कोणाच्याने पाण्याची मनाई करवेल? ४८ मग येशूवाह मशीहा च्या नांवात त्यांचा बाप्तिस्मा व्हावा, अशी त्याने आज्ञा केली. तेंव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली.

**११.**१ प्रेषितांनी व यहूदीया प्रांतात असलेल्या बंधुजनांनी असे ऐकले की, परराष्ट्रीयांनीहि याव्हे एलोहिमचे वचन ग्रहण केले. २ मग केफा यरूशलेमेस गेला तेंव्हा सुंता झालेले लोक त्याच्याबरोबर वाद घालू लागले की, ३ सुंता न झालेल्या माणसांकडे जाऊन त्यांच्याबरोबर तुम्ही जेवला. ४ तेंव्हा केफाने अनुक्रमाने साविस्तर सांगण्यास सुरूवात केली, ५ मी यापो नगरात प्रार्थना करीत होतो. तेंव्हा देहभान सुटून मी असा एक दृष्टांत पाहिला की, एक पात्र उतरले व ते मोठया चांदव्यासारखे चार कोपरे धरून, आकाशातून सोडिलेले असे माझ्यापर्यंत आले. ६ त्याच्याकडे मी न्याहाळून पाहत विचार करीत होतो, तो पृथ्वीवरचे चतुष्पाद श्वापदे, सरपटणारे जीव, व आकाशांतली पाखरे माझ्या दृष्टीस पडली. ७ आणि मी अशी वाणीहि माझ्याबरोबर बोलतांना ऐकली की, केफा ऊठ मारून खा. ८ परंतु मी म्हणालो, नको नको, अदोनाई, कारण निषिद्ध किंवा अशुद्ध असे काही माझ्या तोंडांत अजून कधी गेले नाही. ९ मग दुस-यांदा आकाशातून वाणी होऊन ती मला म्हणाली, याव्हे एलोहिमने जे शुद्ध केले आहे, ते तू निषिद्ध मानू नको, १० असे तीनदा झाले. नंतर ती अवघी पुन्हा आकाशात वर ओढिली गेली. ११ इतक्यात पाहा, ज्या घरांत आम्ही होतो, त्याच्यापुढे कैसरीयांतून माझ्याकडे पाठविलेली तीन माणसे येऊन उभी राहिली. १२ तेंव्हा आत्म्याने मला सांगितले की, काही संशय न धरिता त्यांच्याबरोबर जा. मग हे सहा बंधुहि माझ्याबरोबर आले, आणि आम्ही त्या माणसांच्या घरी गेलो. १३ त्याने आम्हांला सांगितले की, मी आपल्या घरी देवदूत उभा राहिलेला पाहिला. तो म्हणाला, यापोस कोणाला पाठवून केफा म्हंटलेल्या शिमोनाला बोलवून आण. १४ ज्याच्या योगे तुझे व तुझ्या सर्व कुटुंबाचे तारण होईल, अशा गोष्टी तो तुला सांगेल. १५ मी बोलू लागलो, तो जसा आरंभी आपल्यावर तसा त्यांच्यावरहि क्वादोश रूहुव्वा उतरला. १६ तेंव्हा अदोनाईने सांगितलेली गोष्ट मला आठवली. ती अशी की, योहानान पाण्याने बाप्तिस्मा करी हे खरे, परंतु तुमचा बाप्तिस्मा क्वादोश रूहुव्वाने होईल. १७ जेंव्हा आपण अदोनाई येशूवाह मशीहा वर विश्वास ठेविला, तेंव्हा जसे आपणांस तसे त्यांसहि याव्हे एलोहिमने सारखेच दान दिले, तर मग याव्हे एलोहिमला अडविणारा असा मी कोण? १८ हे ऐकून ते उभे राहिले, आणि याव्हे एलोहिमचे गौरव करीत बोलले, तर मग याव्हे एलोहिमने परराष्ट्रीयांसहि जीवन मिळावे, म्हणून पश्चात्ताप बुद्धि दिली आहे.

१९ स्तेफना वरून उद्भवलेल्या संकटामुळे ज्यांची पांगापांग झाली होती, ते फेनीके कुप्र व अंत्युखिया येथपर्यंत फिरून, यहूद्यांस मात्र याव्हे एलोहिमचे वचन सांगत असत. २० तरी त्यांच्यापैकी कित्येक कुप्री व कुरेनेकर होते. ते अंत्युखियांत येऊन अदोनाई येशूवाहची सुवार्ता हेल्लेणी लोकांसहि सांगू लागले. २१ तेंव्हा अदोनाईचा हात त्यांच्याबरोबर होता, आणि पुष्कळ लोक विश्वास धरून अदोनाई कडे वळले. २२ त्यांच्याविषयीचे वर्तमान यरूशलेमेतल्या मंडळीच्या कानी आले, तेंव्हा त्यांनी बर्णबाला अंत्युखिया पर्यंत पाठविले. २३ तो तेथे पोहंचल्यावर याव्हे एलोहिमची कृपा पाहून हर्षित झाला, आणि त्याने त्या सर्वांस बोध केला की, दृढनिश्चयाने अदोनाईला बिलगून राहा. २४ कारण तो चांगला मनुष्य होता, आणि क्वादोश रूहुव्वा ने व विश्वासाने पूर्ण होता. तेंव्हा अदोनाईला पुष्कळ जण मिळाले. २५ नंतर तो शौलाचा शोध करावयाला तार्सास गेला. २६ त्याचा शोध लागल्यावर त्याने त्याला अंत्युखियास आणिले. मग असे झाले की, त्यांनी तेथे वर्षभर मंडळीमध्ये मिळूनमिसळून ब-याच लोकांस शिकविले, आणि शिष्यास मशीही हे नांव पहिल्याने अंत्युंखियांत मिळाले.

२७ त्या दिवसांत यरूशलेमेहून अंत्युंखियास नव्वीईम आले. २८ तेंव्हा त्यांच्यातील अगब नांवाच्या मनुष्याने उठून रूहुव्वाच्या योगे सुचविले की, सर्व जगांत मोठा दुष्काळ पडणार आहे. (हा दुष्काळ क्लोद्याच्या वेळेस पडला होता.) २९ तेंव्हा प्रत्येक थालमीद

(शिष्या) ने निश्चय केला की, यहूदीयात राहणा-या बंधुजनांच्या मदतीकरिता, यथाशक्ति काही पाठवावे. ३० त्याप्रमाणे त्यांनी केले म्हणजे, ते बर्णबा व शौल ह्यांच्या हाती वडील (मूळात झाक्वेन हिब्रू शब्द ) वर्गाकडे पाठवून दिले.

१२ .१ त्या वेळेच्या सुमारास हेरोद राजाने मंडळीतल्या कित्येकांस छळावे म्हणून, आपला हात पुढे केले. २ आणि योहानानचा भाऊ याकोब याला त्याने तरवारीने जिवे मारले.३ आणि हे यहूदी लोकांना आवडले, असे पाहून तो केफालाही धरायला पुढे सरसावला, तेंव्हा बेखमीर भाकरीचे दिवस होते. ४ आणि त्याला धरल्यावर त्याने त्याला तुरूंगात ठेवले, आणि त्याची रखवाली करण्यास त्याला शिपयांच्या चार चौकडयांच्या स्वाधीन केले, आणि पॅसेह (वल्हांडण) सण झाल्यावर त्याला लोकांपुढे बाहेर काढावे, असा त्याचा बेत होता. ५ याप्रमाणे इकडे केफा तुरूंगामध्ये पहा-यात राहिला, परंतु त्याच्याकरिता याव्हे एलोहिम जवळ मंडळीची प्रार्थना कळकळीने होत होती. ६ मग हेरोद त्याला बाहेर आणणार होता, त्याच रात्री केफा दोन साखळयांनी बांधलेला, असा दोघा शिपायांच्या मध्ये निजला होता. आणि पहारेकरी दरवाजाच्या पुढे तुरूंगात पहारा करीत होते.७ तेंव्हा पाहा अदोनाईचा मालाक (दूत) येऊन त्याच्याजवळ उभा राहिला. आणि त्या खोलीत उजेड चकाकला, मग त्याने केफाच्या कुशीवर थापटून त्याला जागे करून म्हंटले, लवकर ऊठ. तेंव्हा त्याच्या हातांतल्या बेडया पडल्या. ८ मग दूताने त्याला सांगितले, तू आपली कंबर बांध, व वाहाणा घाल, तेंव्हा त्याने तसे केले. मग त्याने त्याला म्हंटले, तू आपले वस्त्र पांघरून माझ्यामागे ये. ९ तेंव्हा तो निघून त्याच्या मागे जाऊ लागला. तरी दूताने केले ते खरे आहे, हे त्याला कळले नाही. पण आपण दृष्टांन्त पाहत आहो असे त्याला वाटले. १० मग पहिला व दुसरा पहारा ओलंडून ते नगरात जाण्याच्या लोखंडी दरवाजापर्यंत आले, तो दरवाजा आपोआप त्यांच्यासाठी उघडला. आणि ते बाहेर पडून पुढे एका रस्त्यातून चालत गेले, तेंव्हा लागलाच देवदूत त्याच्या पासून निघून गेला.

११ मग केफा शुद्धीवर येऊन म्हणाला, आता मला खरेच कळले आहे की, अदोनाईने आपला दूत पाठवून मला हेरोदाच्या हातांतून, व यहूदी लोकांच्या सर्व अपेक्षेपासून सोडवले आहे. १२ असे त्याला समजल्यावर तो मार्क म्हंटलेल्या योहानानची आई मरीया हिच्या घरी गेला. तेथे पुष्कळ लोक एकत्र जमलेले होते, व प्रार्थना करीत होते. १३ तेव्हा केफा दरवाजाच्या दिंडीवर ठोकीत असता, रूदा नावाची मुलगी कानवसा घ्यायला पुढे आली. १४ आणि तिने केफाची वाणी ओळखली, तेंव्हा हर्षामुळे दरवाजा न उघडता तिने आत धावत जाऊन सांगितले की, केफा दरवाजापुढे उभा राहिला आहे. १५ तेंव्हा त्यांनी तिला म्हंटले, तू बावचळलीस. परंतु ती खातरीने सांगत राहिली की, तसेच आहे तेंव्हा ते म्हणाले, तो त्याचा दूत आहे. १६ पण केफा ठोकीत राहिला, मग त्यांनी दरवाजा उघडून त्याला पाहिले, आणि ते थक्क झाले. १७ पण त्यांनी उगे राहावे म्हणून त्याने हाताने त्यांना खुणावले, आणि आपल्याला अदोनाईने तुरूंगातून कसे काढून आणले, हे त्यांना सविस्तर सांगितले. आणखी तो म्हणाला, हे याकोबाला व इतर भावांस सांगा. मग तो दुस-या ठिकाणी निघून गेला. १८ मग दिवस उगवल्यावरोबर केफाचे काय झाले, याबद्दल शिपायांमध्ये मोठी गडबड उडली. १९ नंतर हेरोदाने त्याचा शोध केला, तरी तो सापडला नाही. म्हणून त्याने पहारेक-यांची चौकशी केली, व त्यांना ठार मारावे, अशी आज्ञा दिली, मग तो यहूदीयाहून कैसरीयास येऊन राहिला.

२० आणि हेरोद सोरकरांवर व सीदोनकरांवर फार रागावला होता. परंतु ते एकमताने त्याच्याकडे आले, आणि राजाच्या रंगमहालावरचा अधिकारी ब्लस्त याला अनुकूल करून घेऊन, त्यांनी समेट करण्याची विनंती केली. कारण त्या राजाच्या देशाकडून, त्यांच्या देशाचे पोषण होत असे. २१ तेंव्हा नेमलेल्या दिवशी हेरोद राजकीय पोषाख करून, व न्यायासनावर बसून त्यांच्यपुढे जाहीर भाषण करू लागला. २२ तेंव्हा लोक आरोळी करीत म्हणाले, ही देवाची वाणी आहे, मनुष्याची नव्हे. २३ आणि त्याने याव्हे एलोहिमला गौरव दिले नाही, म्हणून लागलेच अदोनाई च्या दूताने त्याला मारले. तेंव्हा किडयांनी त्याला खाऊन टाकले, आणि त्याने प्राण सोडला. २४ याव्हे एलोहिमचे वचन तर वाढत आणि पसरत गेले. २५ आणि बर्णबा व शौल यांनी आपली सेवा परिपूर्ण केल्यानंतर, ते मार्क म्हंटलेल्या योहानानला बरोबर घेऊन यरूशलेमे हून परत आले.

१३ .१ आता अंत्युखियाच्या मंडळीत बर्णबा, शिमोन, निग्र लूक्य, कुरेनेकर जो बाळपणापासून मांडलिक हेरोद राजाबरोबर वाढला

होता. तो मनाएल व शौल हे नब्वीईम (संदेष्टे) व रब्बुनी (शिक्षक) होते. २ ते अदोनाईची सेवा व उपास करीत असता, पवित्र
आत्मा म्हणाला की, बर्णबा व शौल ह्यांना ज्या कार्यासाठी मी बोलाविले आहे, त्यासाठी त्यांना माझ्याकरिता वेगळे करून ठेवा. ३
तेंव्हा त्यांनी उपास व प्रार्थना करून, आणि त्यांच्यावर हात ठेवून यांची रवानगी केली. ४ ह्याप्रमाणे पवित्र आत्म्याच्या व्दारे त्यांची
रवानगी झाल्यावर, ते सलुकीयांत येऊन तारवांतून कुप्रास गेले. ५ मग ते सलमीनांत असता, त्यांनी याव्हे एलोहिमच्या वचनाची
यहूद्यांच्या सभास्थानांमध्ये घोषणा केली, आणि योहानान हाहि त्यांचा सेवक होता. ६ पुढे ते सवंध बेटातून चालून पफेस गेल्यावर
बर्येशू नांवाचा कोणीएक यहूदी जादूगार व खोटा संदेष्टा त्यास आढळला. ७ तो तेथील सुभेदार सिग्ये पौल ह्या बुद्धिमान
मनुष्याजवळ होता. ह्या सुभेदारने बर्णबा व शौल ह्यांना बोलावून, याव्हे एलोहिमचे वचन ऐकण्याची उत्कंठा दर्शविली.८ परंतु
अलीम जादूगार (कारण त्याच्या नांवाचा अर्थ हाच आहे.) ह्यांनी त्यांना अडवून सुभेदाराला विश्वासापासून फितविण्याचा प्रयत्न
केला. ९ तेंव्हा शौल ज्याला पौलहि म्हणत, तो पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्याच्याकडे रोखून पाहत म्हणाला, १० अरे सर्व कपटाने व
सर्व लुच्चेगिरीने भरलेल्या सैतानाच्या पोरा, अवघ्या नीतिमत्वाच्या वै-या तू अदोनाईचे सरळ मार्ग विपरीत करण्याचे सोडून देणार
नाहीस काय? ११ तर पाहा, आता अदोनाईचा हात तुला प्रतिकूल आहे. तू आंधळा होशील, व काही वेळेपर्यंत तुला सूर्य दिसणार
नाही. तत्क्षणीच त्याच्यावर धुक्के पडल्यासारखे होऊन, त्याच्या डोळयांना अंधारी आली. तेंव्हा आपणाला कोणीतरी हाती धरून
न्यावे, म्हणून तो इकडे तिकडे माणसांचा शोध करू लागला. १२ तेंव्हा जे झाले ते पाहून, त्या सुभेदाराने अदोनाईच्या शिक्षणावर
विश्वास ठेविला.

१३ मग पौल व त्याच्या सोबतीचे लोक पफेहून तारवांतून पफुल्यांतील पिर्गा येथे गेले, आणि योहानान त्यांना सोडून यरूशलेमेस परत
गेला. १४ नंतर ते पिर्गा येथून निघून फिरत फिरत पिसिदियांतील अंत्युखियास पोहंचले, आणि शब्बाथ दिवशी सभास्थानांत जाऊन
बसले. १५ तेंव्हा तोराह् (नियमशास्त्रा) चे व नब्वीईम (संदेष्टयां) च्या ग्रंथाचे वाचन झाल्यावर, सभास्थानाच्या अधिका-यांनी त्यांना
सांगून पाठविले की, बंधुजनहो तुम्हांजवळ लोकांकरिता काही बोधवचन असले तर सांगा. १६ तेंव्हा पौल उभा राहून हाताने खुणावून
म्हणाला, “अहो इस्त्राएल लोकांनो व याव्हे एलोहिमचे भय बाळगणा-यांनो ऐका,” १७ ह्या इस्त्राएल लोकांच्या याव्हे एलोहिमने
आमच्या पूर्वजांस निवडून घेतले. ते लोक मिसर देशात उपरी असता त्यांचा उत्कर्ष केला, आणि पराक्रमी भुजाने त्यांना तेथून
काढिले. १८ पुढे सुमारे चाळीस वर्षेपर्यंत ते रानांत असता, त्याने त्यांचे गैरवर्तन सहन केले. १९ नंतर त्याने कनान देशातील सात
राष्ट्रांचा विध्वंस करून, तेथील भूमि त्यांना सुमारे साडेचारशे वर्षेपर्यंत वतन अशी दिली. २० त्यानंतर त्याने शमुवेल नब्वीपर्यंत त्यांना
न्यायाधीश नेमून दिले. २१ मग त्यांनी राजा मागितला, तेंव्हा याव्हे एलोहिमने बन्यामीन वंशातील किशाचा मुलगा शौल हा चाळीस
वर्षे पर्यंत त्यांना दिला. २२ नंतर त्याने त्याला काढून, त्यांचा राजा होण्यासाठी दावीद उभा केला. आणि त्याच्याविषयी प्रतिज्ञेने
म्हंटले की, इशायाचा मुलगा दावीद मला माझ्या मनासारिखा मिळाला आहे. तो माझ्या सर्व इच्छा सिद्धीस नेईल, २३ ह्या मनुष्याच्या
वंशाजातून याव्हे एलोहिमने वचनानुरूप इस्त्राएलासाठी येशूवाह हा तारणारा उदयास आणिला. २४ त्याच्या प्रगट होण्यापूर्वी
योहानानने पुढे येऊन, पश्चात्तापाच्या बाप्तिस्माची सर्व इस्त्राएल लोकांमध्ये घोषणा केली होती. २५ योहानान आपले कार्य पूर्ण
करीत असता म्हणाला, मी कोण आहे म्हणून तुम्हांस वाटते? मी तो नव्हे, तर पाहा ज्याच्या पायातील वहाणा सोडावयास मी योग्य
नाही, असा कोणी माझ्यामागून येत आहे.

२६ अहो बंधुजनहो, अब्राहामाच्या वंशातील मुलांनो, व तुम्हांपैकी याव्हे एलोहिमचे भय बाळगण-यांनो, आपल्याला ह्या तारणाची
वार्ता पाठविलेली आहे. २७ कारण यरूशलेम वासीयांनी व त्यांच्या अधिका-यांनी त्याला न ओळखिता, आणि दर शब्बाथ दिवशी
वाचून दाखविण्यात येणारे नब्वीईम (संदेष्टां) चे शब्दहि न समजता, त्याला दोषी ठरवून त्याने ते शब्द पूर्ण केले. २८ आणि
मरणदंडाचे कोणतेहि कारण सापडले नसता त्याला जिवे मारावे, अशी त्यांनी पिलातास विनंती केली. २९ मग त्याच्याविषयी लिहिलेले
सर्व काही पूर्ण करून, त्यांनी त्याला खांबावरून खाली काढून कबरेमध्ये ठेविले. ३० पण याव्हे एलोहिमने त्याला मेलेल्यांमधून
उठविले. ३१ त्याच्याबरोबर जे गालीलाहून यरूशलेमेत आले होते, त्याच्या दृष्टीस तो पुष्कळ दिवस पडत असे, ते आता लोकांना

त्याचे साक्षी आहेत. ३२ आपल्या पूर्वजांना जे वचन देण्यात आले होते, त्याची सुवार्ता आम्ही तुम्हांस सांगतो. ३३ याव्हे एलोहिमने, येशूवाहला पुन्हा उठवून ते वचन तुमच्याआमच्या मुलांबाळांकरिता पूर्ण केले आहे. तेहिलीम (स्तोत्र) दुसरे ह्यांतहि असे लिहिले आहे की, "तू माझा मुलगा आहेस, आज मी तुला जन्म दिला आहे." ३४ शिवाय त्याने कुजण्याच्या अवस्थेपर्यंत जाऊ नये, म्हणून त्याने त्याला मेलेल्यांतून उठविले. ह्या विषयी त्याने असे म्हंटले आहे की, दावीदाला दिलेले जे पवित्र व विश्वासनीय दान ते तुम्हांला देईन. ३५ ह्यास्तव आणखी एका तेहिलीम मध्ये तो म्हणतो, "तू आपल्या पवित्र पुरूषाला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस."
३६ कारण दावीद आपल्या पिढीची याव्हे एलोहिम च्या इच्छेप्रमाणे सेवा करून झोपी गेला, आणि पूर्वजांबरोबर मिळून त्याला कुजण्याचा अनुभव आला. ३७ परंतु ज्याला याव्हे एलोहिमने उठविले, तो कुजला नाही. ३८ म्हणून बंधुजनहो, तुम्हांस हे ठाऊक असो की, ह्याच्या व्दारे तुम्हांस पापांच्या क्षमेची घोषणा करण्यात येत आहे. ३९ आणि ज्याविषयी मोशेच्या तोराह् ने तुम्ही न्यायी ठरत नाही, त्या सर्वांविषयी ह्याच्याकडून प्रत्येक विश्वास ठेवणारा न्यायी ठरतो. ४० ह्यास्तव सावध राहा, नाहीतर नव्वीईम च्या ग्रंथात जे सांगितलेले आहे, ते तुम्हांवर येईल.

४१ अहो धिक्कार करणा-यांनो पाहा, आश्चर्य करा व नाहीसे व्हा. कारण तुमच्या काळांत मी एक कार्य करितो, ते कार्य असे की, त्याविषयी तुम्हांला कोणी सविस्तर सांगितले, तरी तुम्ही विश्वासच ठेवणार नाही. ४२ ते बाहेर जात असता लोकांनी विनंती केली की, आम्हांला पुढल्या शव्वाथ दिवशी ह्या गोष्टी सांगाव्या. ४३ आणि सभा उठल्यावर यहूद्यांतील व भक्तिमान यहूदी मतानुसार, ह्यांच्यातील पुष्कळजण पौल व बर्णबा ह्यांच्यामागे गेले. त्या दोघांनी त्यांच्याबरोबर बोलून याव्हे एलोहिम च्या कृपेत टिकून राहण्यास, त्यांचे मन वळविले. ४४ पुढल्या शव्वाथ दिवशी बहुतेक सर्व नगर याव्हे एलोहिमचे वचन ऐकावयाला जमले. ४५ पण लोकसमुदयांस पाहून यहूदी लोकांस हेव्यामुळे चेव आला. आणि पौल जे बोलला त्याला विरोध करून ते अपशब्द बोलू लागले. ४६ तेंव्हा पौल आणि बर्णबा हे निर्भीडपणे म्हणाले, याव्हे एलोहिमचे वचन प्रथम तुम्हांस सांगावयाचे अगत्य होते. तरी ज्या अर्थी तुम्ही त्याचा अव्हेर करिता, व आपणांस सार्वकालिक जीवनाकरिता अयोग्य ठरविता, त्या अर्थी पाहा, आम्ही परराष्ट्रीयांकडे वळतो. ४७ कारण अदोनाईने आम्हांला आज्ञा दिली आहे की, "मी तुला राष्ट्रांचा प्रकाश असे करून ठेविले आहे. ह्यासाठी की, पृथ्वीच्या दिगंतापर्यंत तू तारण व्हावेस." ४८ हे ऐकून परराष्ट्रीय आनंदित झाले, आणि त्यांनी याव्हे एलोहिम च्या वचनाचा महिमा वर्णिला. तेंव्हा जितके सार्वकालिक जीवनासाठी नेमिलेले होते, तितक्यांनी विश्वास ठेविला. ४९ आणि अदोनाईचे वचन त्या सर्व प्रांतात पसरत गेले. ५० तेंव्हा यहूदी लोकांनी भक्तिमान, व कुलीन स्त्रियांना, व नगरातील मुख्य पुरूषांना चिथविले, आणि पौल व बर्णबा ह्यांचा छळ करून, त्यांना आपल्या सीमेबाहेर घालवून दिले. ५१ त्यामुळे ते आपल्या पायांची धूळ त्यांच्यावर झटकून, इकुल्यास गेले.
५२ इकडे शिष्य आनंदाने व पवित्र आत्म्याने पूर्ण झाले.

**१४.**१ मग इकुन्यांत असे झाले की, यहूदी लोकांच्या सभास्थानांत ते दोघे मिळून गेले. आणि अशा रीतीने बोलले की, यहूदी व हेल्लेणी ह्यांच्या मोठया लोकसमुदायाने विश्वास ठेविला. २ परंतु विरोधी यहूद्यांनी परराष्ट्रीयांचे मन, बंधुजनाविरूद्ध चेतवून कलुषित केले. ३ ते बरेच दिवस तेथे राहिले, व अदोनाई विषयी निर्भीडपणे बोलले त्यानेहि आपल्या कृपेच्या वचनाविषयी साक्ष दिली म्हणजे, त्यांच्या हस्ते चिन्हे व अद्भुत कार्य होऊ दिली. ४ तेंव्हा नगरातील लोकसमुदायात फूट पडली, कित्येकांनी यहूद्यांची बाजू धरली, तरी कत्येकांनी प्रेषितांची बाजू धरली. ५ मग त्यांची अवहेलना करून त्यांना धोंडमार करावा, म्हणून राष्ट्रांचे लोक आणि यहूदीही यांनी आपल्या अधिका-यांसुद्धा त्यांच्यावर हल्ला सुरू केला. ६ हे पाहून ते लुकवनिया देशातील लुस्त्र व दर्बे या नगरात व त्यांच्या सभोवतीच्या प्रदेशात पळून गेले, ७ आणि तेथे ते शुभवर्तमान सांगत राहिले.

८ तेंव्हा लुस्त्र येथे आपल्या पायांनी अधू असा कोणीएक माणूस बसला होता. तो जन्मापासून पांगळा असून, कधीही चालला नव्हता. ९ तो पौलाचे भाषण ऐकत होता, पौलाने त्याच्याकडे दृष्टी लावून त्याला बरा होण्याचा विश्वास आहे, असे पाहून १० मोठयाने म्हंटले, तू आपल्या पायांवर नीट उभा राहा, तेंव्हा तो उडी मारून चालू लागला.११ पौलाने जे केले ते लोकसमुदायाने पाहिले, तेंव्हा ते आपली वाणी उंचावून लुकवनी भाषेत म्हणाले, देव मानुष्यांच्या रूपाने आमच्याकडे उतरून आले आहेत. १२ तेंव्हा

त्यांनी वर्णबाला ज्युपितर म्हंटले, व पौल मुख्य बोलणारा होता. म्हणुन त्याला मर्क्युरी म्हंटले, १३ मग त्यांच्या नगरापुढे जो ज्युपितर होता. त्याच्या पुजा-यांने बैल व माळा दरवाजाजवळ आणल्या आणि लोकसमुदायासहित तो यज्ञ करणार होता. १४ तेंव्हा वर्णबा व पौल या प्रेषितांनी त्याविषयी ऐकून आपली वस्त्रे फाडली, आणि ते लोकांमध्ये धावत जाऊन मोठयाने ओरडले १५ व म्हणाले, अहो लोकांनो, तुम्ही हे काय करता? आम्हीही तुमच्यासारख्याच भावना असलेली माणसे आहो. आणि तुम्ही या निरर्थक गोष्टी सोडून ज्या जिवंत याव्हे एलोहिमने आकाश, व पृथ्वी, व समुद्र, आणि त्यातील अवघे निर्माण केले, त्याच्याकडे फिरावे असे शुभवर्तमान आम्ही तुम्हांस सांगतो. १६ गतकाळातील पिढयांमध्ये त्याने सर्व राष्ट्रांना, त्यांच्या स्वतःच्या मार्गानी चालू दिले. १७ तरी त्याने स्वतःला साक्षीविरहित असे राहू दिले नाही. कारण त्याने उपकार करीत असता, आकाशापासून पाऊस व फलदायक ऋतू तुम्हांला देऊन, अन्नाने व आनंदाने तुमची हृदय तृप्त केली. १८ या गोष्टी बोलूनही त्यांनी आपर्णाला, यज्ञ अर्पिण्या पासून मोठया प्रयासाने लोकांना आवरले.

१९ तेंव्हा अंत्युखिया व इकुन्या येथून कित्येक यहूदी तेथे आले, आणि त्यांनी लोकसमुदायाचे मन वळवून पौलाला धोंडमार केला, आणि तो मेला आहे असे समजून, त्याला नगराबाहेर ओढून टाकले. २० परंतु शिष्य त्याच्यासभोवती उभे राहिले असता तो उठला, व नगरात आला. मग दुस-या दिवशी तो वर्णबा बरोबर दर्बेस निघून गेला. २१ आणि त्या नगरात त्यांनी शुभवर्तमान सांगून पुष्कळ शिष्य केले. मग ते लुस्त्र व इकुन्या व अंत्युखिया या नगरात परत आले. २२ आणि शिष्यांची मने स्थिरावीत त्यांनी त्यांना बोध केला की, विश्वासात टिकून राहा. कारण आपल्याला अनेक संकटांमधून याव्हे एलोहिम च्या राज्यात जावे लागते. २३ तेंव्हा त्यांनी त्यांच्यासाठी प्रत्येक मंडळीत वडील नेमले, आणि उपास व प्रार्थना करून, ज्या अदोनाई वर त्यांनी विश्वास ठेवला होता, त्याच्याकडे त्यांना सोपवून दिले. २४ मग ते पिसिदियातून जाऊन पंफुल्यात आले. २५ आणि पिर्गा येथे वचन सांगितल्यानंतर ते अत्तलियास उतरून गेले. २६ मग तेथून तारवात बसून ते अंत्युखियास आले. जे कार्य त्यांनी परिपूर्ण केले होते, त्याकरिता ते तेथूनच याव्हे एलोहिम च्या कृपेवर सोपवून पाठविण्यात आले होते. २७ तेथे पोहंचल्यावर त्यांनी मंडळी एकत्र जमवून आपण याव्हे एलोहिम च्या सहवासात असतांना, याव्हे एलोहिमने काय काय केले? आणि परराष्ट्रीयांकरिता विश्वासाचे दार कसकसे उघडिले, हे सांगितले. २८ मग ते शिष्यांबरोबर बराच काळ राहिले.

**१५ .**१ मग काहीजण यहूदीयातून उतरून येऊन बंधुजनास अशी शिकवण दिली की, मोशेने लावून दिलेल्या परिपाठाप्रमाणे तुमची सुंता झाल्यावाचून, तुमचे तारण होणे शक्य नाही. २ तेंव्हा पौल व वर्णबा यांचा त्यांच्याशी मोठा मतभेद व वादविवाद झाल्यावर त्यांनी असे ठरवले की, पौल व वर्णबा यांनी व आपल्यामधून दुस-या कित्येकांनी या वादा संबंधी वर यरूशलेमेस प्रेषित व वडील यांच्याकडे जावे. ३ मग मंडळीने त्यांना वाटेस लावल्यावर ते फेनिके व शोमरोन यांमधून गेले, आणि जाताना राष्ट्रांचे लोक याव्हे एलोहिम कडे फिरल्याचे वर्तमान सविस्तर सांगून, त्यांनी सर्व बंधुजनांना फार आनंदित केले. ४ आणि ते यरूशलेमेस आल्यावर तेथील मंडळी, व प्रेषित, व वडील, यांनी त्यांचा सत्कार केला. आणि याव्हे एलोहिमने आपणाबरोबर असताना काय काय केले, ते सगळे त्यांनी सांगितले. ५ परंतु परूशी यांच्या पंथातले विश्वास धरणारे कित्येक उठून म्हणाले, त्यांची सुंता केली पाहिजे, व मोशेचे तोराह (नियमशास्त्र) पाळायला त्यांना आज्ञा केली पाहिजे.

६ मग प्रेषित व वडील या गोष्टीचा विचार करायला एकत्र जमले. ७ आणि फार वादविवाद झाल्यावर केफा उभा राहून त्यांना म्हणाला, अहो बंधुजनहो, तुम्हांस ठाऊक आहे की, आरंभीच्या दिवसापासून तुम्हांमध्ये याव्हे एलोहिमने अशी निवड केली की, माझ्या तोंडून राष्ट्रांच्या लोकांनी शुभवर्तमानाचे वचन ऐकून विश्वास धरला. ८ आणि अंतःकरणे जाणणा-या याव्हे एलोहिमने जसा आम्हांला, तसा त्यांनाही क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) देऊन, त्यांच्याविषयी साक्ष दिली. ९ आणि त्यांनी त्यांची अंतःकरणे विश्वासाने शुद्ध करून, आमच्यामध्ये व त्यांच्यामध्ये काही भेद ठेवला नाही. १० असे असता जे जू आमचे पूर्वज व आम्हीही वाहायला समर्थ नव्हते, ते शिष्यांच्या मानेवर घालून, तुम्ही याव्हे एलोहिमची परीक्षा का पाहता? ११ आम्ही तर असा विश्वास धरतो की, जसे ते तसे आम्हीही अदोनाई येशूवाह च्या कृपेने तारले जाऊ. १२ तेंव्हा सर्व समुदाय उभा राहिला, आणि वर्णबा व पौल हे

आपल्याकडून राष्ट्रांच्या लोकांमध्ये याव्हे एलोहिमने जे चमत्कार, व जी अद्‌भुते केली, त्याविषयी सविस्तर सांगत असता, त्यांनी ऐकून घेतले.

१३ मग हे उगे राहिल्यानंतर याकोबाने उत्तर देऊन म्हंटले, अहो बंधुजनहो, माझे ऐका. १४ राष्ट्रांच्यामधून आपल्या नांवा करिता लोक काढून घ्यावे, म्हणून याव्हे एलोहिमने त्यांची भेट कशी घेतली, हे शिमोनाने सविस्तर सांगितले आहे. १५ आणि या गोष्टीला नव्बीईम (संदेष्टयां) च्या वचनांचा सुद्धा मेळ बसतो, असा शास्त्रलेख आहे. १६ "यानंतर मी परत येईन, व दावीदाचा पडलेला मंडप पुन्हा उभारीन त्याची मोडतोडही पुन्हा बांधून मी तो उभारीन. १७ यासाठी की, उरलेल्या माणसांनी, व ज्या सर्व राष्ट्रांना माझे नांव दिलेले आहे, त्यांनी अदोनाईचा शोध करावा." १८ पुरातन काळापासून जो या गोष्टी कळवतो, तो अदोनाई असे म्हणतो. १९ म्हणून माझे तर मत असे आहे की, राष्ट्रांच्या लोकांतून जे याव्हे एलोहिम कडे फिरतात, त्यांना आपण त्रास देऊ नये. २० परंतु आपण त्यांना असे लिहून पाठवावे की, त्यांनी मूर्तींच्या अमंगळपणापासून, व जारकर्म, व गुदमरून मेलेले जनावर, व रक्त, यांपासून दूर रहावे. २१ कारण प्राचीन काळच्या पिढयां पासून, दर शब्बाथ दिवशी सभास्थानांमध्ये मोशेचे पुस्तक वाचून दाखवून, त्याची घोषणा करणारे प्रत्येक नगरात आहेत. २२ तेंव्हा सर्व मंडळीसह, प्रेषितांस, व वडिलांस हे बरे वाटले की, पौल व बर्णबा यांच्याबरोबर आपल्यांतून निवडलेली माणसे, म्हणजे बंधुजनांतील श्रेष्ठ जरी बर्शब्बा म्हंटलेला यहूदा, व सीला यांना अंत्युखियास पाठवावे. २३ आणि त्यांच्या हाती त्याने असे लिहून पाठवले की, राष्ट्रांच्या लोकांतले जे बंधु, अंत्युखिया व सूरिया व किलिकिया यांमध्ये आहेत, त्यांना प्रेषित व वडील ह्या बंधुजनांचा सलाम.

२४ आम्ही असे ऐकले की, आमच्यापैकी कित्येकांनी जाऊन आपल्या बोलण्यांनी, तुमचे जीव घोटाळयात घालून तुम्हांला त्रास दिला आहे, त्यांना आम्ही काही आज्ञा दिली नव्हती. २५ म्हणून आमचे एकमत झाल्यावर आम्हांस हे बरे वाटले की, २६ आमचे प्रिय बर्णबा व पौल यांच्याबरोबर काही निवडलेले पुरूष, म्हणजे ज्यांनी आपल्या अदोनाई येशुवाह मशीहा च्या नावासाठी आपले जीव धोक्यात घातले आहेत, अशी माणसे तुमच्याकडे पाठवावी. २७ म्हणून यहूदा व सीला यांना आम्ही पाठवले आहे, तेही याच गोष्टी तुम्हांला तोंडोतोंड सांगतील. २८ कारण क्वादोश रूहुव्वा ला (पवित्र आत्म्याला), व आम्हांला हे बरे वाटले की, ह्या पुढील गोष्टी वाचून काही अधिक मोठा भार तुम्हांवर टाकू नये. २९ म्हणजे मूर्तीला अर्पिलेल्या वस्तू, व रक्त, व गुदमरून मेलेली जनावरे, व जारकर्म, ही तुम्ही वर्ज्य करावी. जर तुम्ही आपणांस त्यापासून राखाल तर तुमचे बरे होईल, व सुखरूप असा. ३० अशी त्यांची रवानगी झाल्यावर ते खाली अंत्युखियात गेले, आणि तेथील मंडळीला एकत्र जमवून त्यांनी ते पत्र सादर केले. ३१ मग त्यांनी ते वाचल्यानंतर त्यातल्या बोधावरून ते आनंदित झाले.

३२ तेंव्हा यहुदा व सीला हेही स्वतः नव्बीईम (संदेष्टे) होते. म्हणून त्यांनी पुष्कळ वचनांनी, बंधुजनास बोध करून स्थिरावले. ३३ ते काही काळ तेथे राहिल्यावर ज्यांनी त्यांना पाठवले होते. त्यांच्याकडे जाण्यास बंधुजना पासून त्यांची रवानगी शांतीने झाली. ३४ परंतु सीलाला तेथे आणखी राहणे बरे वाटले. ३५ पौल व बर्णबा हेही अंत्युखियात राहिले, आणि इतर पुष्कळांच्याबरोबर ते लोकांना शिकवीत, व अदोनाईचे वचन गाजवीत असत. ३६ मग काही दिवसांनंतर पौल व बर्णबाला म्हणाला, ज्या ज्या नगरात आपण अदोनाई च्या वचनाची घोषणा केली, त्या प्रत्येकात परत जाऊन बंधुजनांना भेटू, आणि ते कसे आहेत हे पाहू. ३७ तेंव्हा मार्क म्हंटलेला योहान, यालाही आपणांबरोबर घ्यावे, असा बर्णबाचा विचार होता. ३८ परंतु पौलाला वाटले की पंफुल्याहून जो आपणांपासून निघून गेला होता, व आपल्या बरोबर कामावर आला नाही, त्याला आपणांबरोबर घेणे बरे नाही. ३९ यावरून असा कडाक्याचा वाद झाला की, ते एकमेकांपासून वेगळे झाले, आणि बर्णबा मार्काला बरोबर घेऊन तारवात बसून कुप्रास गेला. ४० पण पौलाने सीलाला निवडून घेतले, आणि बंधुजनानी त्याला अदोनाई च्या कृपेवर सोपविल्यावर, तो तेथून निघून गेला. ४१ आणि तो सूरिया व किलिकिया यांमधून मंडळयांस स्थिरावीत गेला.

**१६ .**१ मग पौल दर्बे व लुस्त्र येथेही आला, आणि पाहा, तेथे तीमथ्य नावाचा कोणी शिष्य होता. तो एका विश्वासणा-या

कोणाएका यहूदी स्त्रीचा मुलगा होता, पण त्याचे वडील हेल्लेणी होते. २ त्याला लुस्त्रातले व इकुन्यांतले बंधु नांवाजीत होते. ३ त्याने आपणाबरोबर यावे, अशी पौलाची इच्छा होती. तेंव्हा त्या ठिकाणी जे यहूदी होते, त्यांच्या खातर त्याने त्याला घेऊन त्याची सुंता केली, कारण त्याचे वडील हेल्लेणी आहे, हे सर्वांना ठाऊक होते. ४ तेंव्हा त्यांनी नगरांमधून जाता जाता यरूशलेमेतील प्रेषित व वडील ह्यांनी जे ठराव केले होते, ते त्यांना पाळावयास नेमून दिले. ५ ह्यावरून मंडळया विश्वासांत स्थिर झाल्या, व दिवसेंदिवस त्यांची सख्यां वाढत चालली. ६ नंतर आशिया प्रांतात वचन सांगण्यास त्यांना पवित्र आत्म्याकडून प्रतिबंध झाल्यामुळे, ते फ्रुगिया व गलतिया ह्या प्रांतामधून गेले. ७ आणि मुसिया पर्यंत आल्यावर बिथुनियास जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु येशूवाह च्या रूहुव्याने त्यांना जाऊ दिले नाही.८ मग ते मुसियाजवळून जाऊन त्रोवसाला खाली गेले. ९ तेथे रात्री पौलाला असा दृष्टांत झाला की, मासेदोनियाचा कोणीएक माणूस उभा राहून आपणाला विनंती करीत आहे की, इकडे मासेदोनियात येऊन आम्हांला साहाय्य कर. १० त्याला असा दृष्टांत झाल्यानंतर, त्या लोकांना सुवार्ता सांगावयास याव्हे एलोहिमने आम्हांला बोलविले आहे, असे अनुमान करून आम्ही मासेदोनियांत जाण्याचा लागलाच विचार केला.

११ तेंव्हा आम्ही त्रोवसाहून तारवातून निघालो, आणि नीट मार्गाने समथ्राकेस गेलो, व दुस-या दिवशी नियापुलीस गेलो. १२ आणि तेथून फिलिप्पैस गेलो, ते मासेदोनियातील त्या भागातले पहिले नगर असून, रोमी लोकांची वसाहत आहे. आणि त्या नगरात आम्ही काही दिवस राहिलो. १३ मग शब्बाथ दिवशी आम्ही वेशीच्या बाहेर नदीपाशी जेथे प्रार्थनाची जागा आहे, असे आम्हांला वाटले तेथे जाऊन बसलो, आणि ज्या स्त्रिया तेथे जमल्या त्यांच्याशी आम्ही बोलू लागलो. १४ तेंव्हा थुवतीरा नगरातील लुदिया नांवाची कोणीएक स्त्री जांभळी वस्त्रे विकणारी, याव्हे एलोहिमची भक्ती करणारी ही ऐकत होती. तिचे अंतःकरण अदोनाईने असे प्रफुल्लित केले की, पौलाच्या सांगण्याकडे तिने लक्ष दिले. १५ मग तिचा आणि तिच्या घराण्याचा बाप्तिस्मा झाल्यानंतर ती आम्हांला विनंती करीत म्हणाली, मी अदोनाई वर विश्वास ठेवणारी आहे, असे जर तुम्ही ठरवले आहे, तर माझ्या घरी येऊन राहा. आणि तिने आम्हांला फार आग्रह केला. १६ मग असे झाले की, आम्ही प्रार्थनेच्या ठिकाणाकडे जात होतो. तेंव्हा पुथोन नांवाचे दैवप्रश्न सांगणारे अशुद्ध आत्मा लागलेली एक मुलगी आम्हांला आढळली. ती दैवप्रश्न सांगून आपल्या धन्याला फार मिळकत करून देत असे. १७ ती पौलाच्या व आमच्या मागे येऊन ओरडत बोलत असे की, हे मनुष्य परात्पर याव्हे एलोहिमचे दास आहेत. हे तुम्हांला तारणाचा मार्ग कळवतात, १८ ती पुष्कळ दिवस असे करीत असे. मग पौल कष्टी होऊन मागे फिरून त्या आत्म्याला म्हणाला, येशूवाह मशीहा च्या नांवाने मी तुला आज्ञा करतो की, तिच्यातून बाहेर निघ. आणि तो त्याच घटकेस बाहेर निघाला.

१९ मग आपल्या मिळकतीची आशा गेली असे पाहून, तिच्या धन्यांनी पौल व सीला यांना धरून पेठेत अधिका-यांकडे ओढून नेले. २० तेंव्हा त्यांनी त्यांना न्यायाधीशांपुढे आणून म्हंटले, हे मनुष्य यहूदी असून आमच्या नगराला फार त्रास देतात. २१ आणि आम्ही रोमी लोक असल्यामुळे जे परिपाठ अंगीकारणे व चालवणे, आम्हांला योग्य नाही त्यांची घोषणा हे करतात. २२ तेंव्हा लोकसमुदाय मिळून त्यांच्यावर उठला, आणि न्यायाधीशांनी त्यांची वस्त्रे फाडून काढविली, आणि त्यांना छडयांनी मारण्याची आज्ञा केली. २३ आणि त्यांना पुष्कळ फटके मारल्यावर त्यांनी त्यांना तुरूंगात टाकले. व तुरूंगाच्या नायकाला, त्यांना बंदोबस्ताने राखण्यास हुकुम केला. २४ असा त्याला हुकूम मिळाल्यावर, त्याने त्यांना आतल्या तुरूंगात घालून त्यांचे पाय खोडयांत अडकवले. २५ आणि मध्यरात्रीच्या सुमारास पौल व सीला हे प्रार्थना करून याव्हे एलोहिमला गाणी गात असता, बंदिवान त्यांचे ऐकत होते. २६ तेंव्हा एकाएकी असा मोठा भूमिकंप झाला की, बंदिशाळेचे पाये डगमगले, आणि सर्व दरवाजे लागलेच उघडले, व सर्वांची बंधने तुटली. २७ तेंव्हा तुरूंगाच्या नायकाने झोपेतून जागे होऊन बंदिशाळेचे दरवाजे उघडे पाहिले, आणि बंदिवान पळून गेले आहेत असे समजून, तो आपली तरवार उपसून आपला घात करणार होता. २८ इतक्यात पौल मोठयाने ओरडून म्हणाला, तू आपले काही वाईट करून घेऊ नको, कारण आम्ही सर्व येथेच आहो.

२९ तेंव्हा दिवे आणून तो आत धावत गेला, आणि थरथर कापत पौल व सीला यांच्यापुढे उपडा पडला. ३० आणि त्यांना बाहेर आणून तो म्हणाला, महाराज माझे तारण व्हावे, म्हणून मी काय केले पाहिजे? ३१ तेंव्हा ते म्हणाले, अदोनाई येशूवाह मशीहा वर

विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घरण्याचे तारण होईल. ३२ आणि त्यांनी त्याला व त्याच्या घरातील सर्वांना अदोनाईचे वचन सांगितले. ३३ मग रात्रीच्या त्याच घटकेस त्याने त्यांना जवळ घेऊन त्यांच्या जखमा धुतल्या. मग त्याने व त्याच्या घरच्या सर्वांनी लागलीच बाप्तिस्मा घेतला. ३४ मग त्याने त्यांना आपल्या घरी नेऊन त्यांना जेवण वाढले, आणि त्याने आपल्या सर्व घराण्यातील सर्वांनी याव्हे एलोहिम वर विश्वास ठेवून, आनंदोत्सव केला. ३५ मग दिवस उगवल्यावर न्यायाधीशांनी चोपदारांस पाठवून सांगितले की, त्या माणसांना सोडून द्या. ३६ तेंव्हा बंदिशाळेच्या नायकाने हे शब्द पौलाला सांगितले तो म्हणाला, न्यायाधीशांनी तुम्हांला सोडून द्यावे म्हणून सांगून पाठवले आहे, तर आता तुम्ही शांतीने निघून जा. ३७ तेंव्हा पौल त्यांना म्हणाला, आम्ही रोमी मनुष्ये असता त्यांनी आम्हांला अपराधी न ठरवता उघडपणे फटके मारून तुरूंगात टाकले, आणि आता ते आम्हांला गुप्तपणे घालवतात काय? खरोखर असे नको तर त्यांनी येऊन आम्हांस बाहेर न्यावे. ३८ मग चोपदारांनी या गोष्टी न्यायाधीशांना सांगितल्या, तेंव्हा ते रोमी आहेत, असे ऐकून त्यांना भय वाटले. ३९ मग त्यांनी येऊन त्यांची समजूत काढली, आणि त्यांना बाहेर त्यांनी त्या नगरातून जावे, म्हणून त्यांना विनंती केली. ४० मग ते तुरूंगातून निघून लुदीयेच्या येथे गेले. आणि बंधुजनांस भेटून त्यांनी त्यांचे समाधान केले, मग ते निघून गेले.

**१७** .१ मग ते अंफिपुली व अपुल्लोनिया यामधून जाऊन थेस्सलनीकास आले, तेथे यहूद्यांचे सभास्थान होते. २ तेंव्हा पौल आपल्या परिपाठाप्रमाणे त्यांच्याकडे गेला, आणि त्याने तीन शब्बाथ, शास्त्रलेखावरून त्यांच्याशी संवाद केला. ३ त्याने उलगडा करून दाखवले की, मशीहाचे मरण सोसणे, व मेलेल्यांमधून उठावे, याचे अगत्य होते. आणि ह्या ज्या येशूवाह ची घोषणा मी तुम्हांला करीत आहे, तोच मशीहा आहे. ४ तेंव्हा त्यांच्यातील काही जणांची खात्री झाली, व ते पौल व सीला यांना मिळाले, आणि भक्तिमान हेल्लेणी यांचा मोठा समुदाय, व पुष्कळशा श्रेष्ठ स्त्रिया यांनीही तसे केले.५ परंतु यहूद्यांनी हेव्यामुळे बाजारची काही दुष्ट माणसे, आपल्या कडे घेऊन घोळका जमवून नगरात बंडाळी केली, आणि यासोनाच्या घरावर हल्ला करून, ते त्यांनी लोकांकडे बाहेर आणायला पाहत होते. ६ पण त्यांना ते सापडले नाहीत. तेंव्हा त्यांनी यासोनाला व कित्येक बंधुजनास नगराच्या अधिका-यांपुढे ओढीत नेऊन ओरडून म्हंटले, ज्यांनी जगाची उलथापालट केली, ते येथेही आले आहेत. ७ त्यांना यासोनाने आपल्या घरात घेतले आहे, आणि हे सर्व कैसराच्या आज्ञा विरूद्ध चालतात, येशूवाह म्हणून कोणी दुसरा राजा आहे असे ते म्हणतात. ८ आणि ह्या गोष्टी ऐकवून त्यांनी लोकसमुदायास, व नगराच्या अधिका-यांस घाबरविले.९ मग त्यांनी यासोनापासून, व इतरांपासून जामीन घेतल्यावर त्यांना सोडून दिले.

१० मग लागलेच बंधुजनांनी, पौल व सीला यांना रात्री बिरूया येथे पाठवले. ते तेथे पोंहचल्यावर यहूद्यांच्या सभास्थानात गेले. ११ तेथील लोक थेस्सलनीकातल्या लोकांपेक्षा अधिक थोर मनाचे होते. त्यांनी मोठया उत्सुकतेने वचन अंगीकारले, आणि या गोष्टी अशाच आहेत की काय? याविषयी ते शास्त्रलेखात दररोज शोध करीत असत. १२ यावरून त्यांच्यातील पुष्कळांनी, व प्रतिष्ठित हेल्लेणी स्त्रिया व पुरूष, यांच्यातील पुष्कळांनी विश्वास ठेविला. १३ तेंव्हा पौलाकडून बिरूयातही याव्हे एलोहिम च्या वचनाची घोषणा करण्यात आली आहे. हे थेस्सलनीकातल्या यहूद्यांना समजल्यावर त्यांनी तिकडेही जाऊन, लोकसमुदायांस चेतवून घाबरविले. १४ आणि मग लागलेच बंधुजणांनी, पौलाला समुद्राकडे लागलेच जाण्यास पाठविले, पण सीला व तीमथ्य हे तेथेच राहिले. १५ तेंव्हा पौलाला पोहचविणा-यांनी त्याला अथेनै पर्यंत नेले, आणि सीला व तीमथ्य यांनी आपल्याकडे होईल तितके लवकर यावे, अशी त्यांच्यासाठी पौलाची आज्ञा घेऊन ते निघाले.

१६ मग पौल अथेनैत त्यांची वाट पाहत असता, ते नगर मूर्तींनी भरलेले आहे, असे पाहून त्याच्या आत्मा त्याच्या ठायी संतप्त झाला. १७ यामुळे तो सभास्थानात यहूद्यांशी, व भक्तिमानांशी, तसेच जे बाजारामध्ये त्याला आढळत, त्यांच्याशी दररोज संवाद करीत असे. १८ तेंव्हा एपिकूर पंथातील, व स्तोयिक पंथातील, कित्येक तत्वज्ञानी त्याच्याशी वाद करू लागले, आणि कित्येक म्हणाले, हा वडवडया काय बोलू इच्छितो. दुसरे म्हणाले, हा परक्या देवांची घोषणा करणारा दिसतो. कारण तो त्यांना येशूवाह, आणि पुनरूत्थान याविषयी उपदेश करीत असे. १९ नंतर त्यांनी त्यांना घेऊन अरीयपग या ठिकाणावर नेऊन म्हंटले, ही जी नवी शिकवण

तू सांगत आहेस ती काय आहे, हे आम्हांला कळेल काय? २० कारण तू काही विलक्षण गोष्टी आम्हांला ऐकवतोस म्हणून या गोष्टीचा अर्थ काय आहे, हे समजून घ्यावे अशी आमची इच्छा आहे. २१ कारण सर्व अथेनैकर, व तेथे राहणारे परके लोक, हे काही नवल विशेष सांगणे किंवा ऐकणे, यावाचून दुस-या कशातही आपला वेळ घालवीत नसत.

२२ तेंव्हा पौल अरीयपगाच्या मध्यभागी उभा राहून म्हणाला. अहो, अथेनैकर लोकांनो तुम्ही सर्व बाबतीत देवदैवतांची भक्ती करणारे आहा, असे मला दिसते. २३ कारण मी फिरता फिरता तुम्ही ज्यांची पूजा करता, त्या वस्तू मी पाहिल्या तेंव्हा जिच्यावर अज्ञात देवाला हा लेख कोरलेला आहे, अशीही एक वेदी मला आढळली. तर ज्याला तुम्ही न जाणता भजता, त्याची मी तुम्हांला घोषणा करीत आहे. २४ ज्या याव्हे एलोहिमने जग व त्यातले सर्व काही निर्माण केले, तो आकाशांचा व पृथ्वीचा अदोनाई असून, हातांनी बांधलेल्या देवळांमध्ये राहत नाही. २५ आणि त्याला कशाची गरज पडली आहे, म्हणून मनुष्यांच्या हातांनी त्याची सेवा घडते असेही नाही. कारण तोच सर्वांना जीवन, व श्वास, व सर्व काही देणारा आहे. २६ आणि त्याने एकापासूनच मनुष्यांची सर्व राष्ट्रे पृथ्वीच्या सा-या पाठीवर राहण्यासाठी केली. त्याचे नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा, त्याने पूर्वीच ठरवून ठेवल्या आहेत. २७ यासाठी की, त्यांनी याव्हे एलोहिमचा शोध करावा. म्हणजे त्यांनी चाचपत चाचपत कसे तरी त्याला मिळवून घ्यावे, तरी तो आपणांतील कोणा एकापासूनही दूर नाही.

२८ कारण आपण त्याच्यामध्ये जगतो व वागतो, व आहो तसेच तुमच्यांतील कित्येक कवीनीही म्हंटले आहे की, आपण त्याचा वंशही आहो. २९ तर आपण एलोहिमचा वंश आहो, म्हणून मनुष्याच्या चातुर्याने, व युक्तीने कोरलेले सोने, किंवा रूपे, किंवा पाषाण यासारखा देवपण आहे, असे आपण समजून नये. ३० तर अज्ञानाच्या काळाकडे याव्हे एलोहिमने डोळेझाक केली, परंतु आता तो सर्व मनुष्यास आज्ञा करतो की, सर्व ठिकाणी त्यांनी पश्चात्ताप करावा. ३१ कारण त्याने असा एक दिवस नेमला आहे की, त्यात तो आपण नेमलेल्या मनुष्याकडून न्यायीपणाने जगाचा न्याय करणार आहे. याविषयी त्याने त्याला मेलेल्यांमधून उठवून, सर्वांना प्रमाण पटवले आहे.३२ मग मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयी त्यांनी ऐकले, तेंव्हा कित्येक थट्टा करू लागले. पण दुसरे कित्येक म्हणाले, याविषयी आम्ही तुझे आणखी पुन्हा ऐकू. ३३ याप्रमाणे झाल्यावर पौल त्यांच्यामधून निघून गेला. ३४ तरी काही माणसांनी त्याच्याकडेच राहून विश्वास ठेविला.त्यांच्यामध्ये दिओनुस्य, अरीयपगकर, व दामारी नावाची एक स्त्री ही होती, आणि त्यांच्याबरोबर दुसरेही होते.

**१८.**१ त्यानंतर पौल अथेनैहून निघून करिंथास आला. २ आणि तेथे पंतात जन्मलेला अक्विला नांवाचा कोणी यहूदी त्याला आढळला. सर्व यहूद्यांनी रोममधून निघून जावे, अशी क्लौद्याने आज्ञा केली होती, म्हणून तो आपली बायको प्रिस्किल्ला हिच्याबरोबर इटलीहून नुकताच आला होता. तेंव्हा त्यांच्याजवळ तो आला, ३ आणि त्याचा व ह्यांचा धंदा एकच होता, म्हणून तो त्यांच्याजवळ राहिला आणि त्यांनी उद्योग चालवला. कारण त्यांचा धंदा राहुटया करण्याचा होता. ४ आणि तो दर शब्बाथ दिवशी सभास्थानात संवाद करून यहूद्यांची व हेल्लेण्यांची खात्री करीत असे.५ आणि सीला व तीमथ्य हे मासेदोनीयाहून खाली आले, तेंव्हा पौल शब्दाकडून प्रेरित होऊन येशूवाह हाच मशीहा आहे, अशी यहूद्यांस साक्ष देत होता. ६ परंतु ते अडवीत असता व दुर्भाषण करीत असता, त्याने आपली वस्त्रे झटकून त्यांना म्हंटले, तुमचे रक्त तुमच्याच माथ्यांवर असो, मी निर्दोष आहे. आतापासून पुढे मी राष्ट्रांच्या लोकांकडे जाईन. ७ मग तो तेथून निघाला, आणि सभास्थानाच्या लगत ज्याचे घर होते, असा कोणी तीत यूस्त नांवाच्या एलोहिमची भक्ती करणारा त्याच्या घरी गेला. ८ तरी सभेचा प्रमुख अधिकारी क्रिस्प याने, आपल्या सर्व घराण्याने सुद्धा अदोनाई वर विश्वास ठेवला, आणि करिंथकरां पैकी पुष्कळांनी वचन ऐकून विश्वास ठेवला, व बाप्तिस्मा घेतला.

९ तेंव्हा अदोनाईने पौलाला रात्री दृष्टान्तात म्हंटले, भिऊ नको, तर बोलत जा, व उगा राहू नको. १० कारण मी तुझ्याबरोबर आहे. तुझे वाईट करायला कोणी तुझ्यावर येणार नाही, कारण या नगरात माझे पुष्कळ लोक आहेत. ११ मग तो त्यांच्यामध्ये याव्हे एलोहिमचे वचन शिकवीत दीड वर्षे राहिला. १२ मग गल्लियो हा अखया प्रांताचा रोमी अधिकारी असता, यहूद्यांनी एकाचित्ताने

पौलावर उठून त्याला न्यायासनाकडे आणले. १३ ते म्हणाले, हा लोकांस तोराह विरूद्ध, याव्हे एलोहिमला भजावयला चिथावतो. १४
तेंव्हा पौल तोंड उघडून बोलणार होता, इतक्यात गल्लियोने यहूद्यांस म्हंटले, अहो यहूद्यांनो हे प्रकरण काही अन्यायाचे, किंवा दुष्ट
आचरणाचे असते, तर मी तुमचे बोलणे मनावर घेणे योग्य कारण झाले असते. १५ परंतु हे प्रश्न जर शब्द, व नावे व तुमचा तोराह
याविषयी असले, तर तुमचे तुम्हींच पाहा. या गोष्टीं विषयीचा न्यायाधीश व्हायला मला नको. १६ मग त्याने त्यांना न्यायासनापुढून
घालवून दिले. १७ तेंव्हा त्या सर्वांनी सभेचा अधिकारी सोस्थनेस याला धरून न्यायासनासमोर मार दिला, पण गल्लियोने त्यांतील
कोणत्याही गोष्टीची पर्वा केली नाही.

१८ मग पौल तेथे आणखी पुष्कळ दिवस राहिल्यावर बंधुजनांचा निरोप घेऊन, तारवात बसून सूरिया देशात गेला. आणि प्रिस्किल्ला
व अक्किला ही त्यांच्याबरोबर गेली, त्यांनी किंख्रियात आपले डोके मुंडवले. कारण त्याचा असा नवस होता. १९ मग ते इफिस
नगरात आले आणि तेथे त्यांने त्यांना सोडले, आणि त्याने स्वतः सभास्थानात जाऊन यहूद्यांशी संवाद केला. २० आणि त्याने आणखी
काही वेळ आपल्या जवळ राहावे, अशी ते विनंती करीत असताही, तो मान्य झाला नाही. २१ परंतु तो त्यांचा निरोप घेताना म्हणाला,
याव्हे एलोहिमची इच्छा असली तर तुमच्याकडे मी पुनः येईन, मग तो इफिसाहून तारवात बसून निघाला. २२ आणि कैसरीया येथे
तारवातून उतरल्यानंतर तो वर गेला. आणि मंडळीस सलाम सांगून, खाली अंत्युखियास गेला. २३ मग तेथे काही काळ राहून तो
निघाला, आणि गलतिया प्रांत व फुगिया यांमधून अनुक्रमाने जाऊन, त्याने सर्व शिष्यांस स्थिरावले. २४ तेंव्हा अपुल्लो नांवाचा
आलेक्सांद्रियात जन्मलेला कोणी यहूदी जो शास्त्रात पारंगत असून वक्ता होता, तो इफिसास आला. २५ तो अदोनाई च्या मार्गा
विषयी शिक्षण घेतलेला असा होता. आणि तो आत्म्यात आवेशी असल्यामुळे येशूवाह विषयीच्या गोष्टी अचूक सांगून शिकवीत
असे, पण त्याला योहानानचा बाप्तिस्मा मात्र ठाऊक होता. २६ आणि तो सभास्थानात धैर्याने बोलू लागला. तेंव्हा प्रिस्किल्ला आणि
अक्किला यांनी त्याचे भाषण ऐकून त्याला आपल्याजवळ घेतले, आणि याव्हे एलोहिमचा मार्ग त्याला अधिक स्पष्ट करून दाखवला.
२७ आणि तो अखयात जाण्याच्या बेतात होता, तेंव्हा बंधुजनांनी त्याला उत्तेजन दिले, आणि त्याचा अंगीकार करावा म्हणून शिष्यांस
लिहिले. मग तो तेथे पोहचल्यावर ज्यांनी कृपेच्या व्दारे विश्वास धरला होता, त्यांचे त्याने फार साहाय्य केले. २८ कारण येशूवाह
हाच मशीहा आहे, असे शास्त्रावरून उघडपणे दाखवून तो यहूद्यांचे खंडन करीत असे.

**१९.**१ मग असे झाले की, अपुल्लो करिंथात असता पौल वरच्या प्रांतामधून जाऊन इफिसास आला, आणि तेथे त्याला काही शिष्य
आढळले. २ त्यांना तो म्हणाला, विश्वास धरल्यावर तुम्हांला क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) मिळाला काय? तेंव्हा त्यांनी त्याला
म्हंटले, क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) दिला आहे की नाही, हे आम्ही ऐकले देखील नाही. ३ तो म्हणाला, तर तुम्ही कसला
बाप्तिस्मा घेतला? मग ते म्हणाले, योहानानचा बाप्तिस्मा. ४ तेंव्हा पौलाने म्हंटले, योहानान पश्चात्तापाच्या बाप्तिस्म्याने बाप्तिस्मा
करीत असे, तो लोकांस सांगत असे की, माझ्यामागून येणा-यावर म्हणजे येशुवाह वर तुम्ही विश्वास ठेवावा. ५ मग हे ऐकून त्यांनी
अदोनाई येशूवाह च्या नावात बाप्तिस्मा घेतला , ६ आणि पौलाने आपले हात त्यांच्यावर ठेवले, तेंव्हा पवित्र आत्मा त्यांच्यावर
आला. आणि ते अनेक भाषा बोलू लागले, व भविष्य वचने सांगू लागले.

७ ते सगळे सुमारे बारा पुरूष होते. ८ आणि तो सभास्थानात जाऊन तीन महिनेपर्यंत याव्हे एलोहिम च्या राज्याविषयी वादविवाद
करीत, व प्रमाण पटवीत धैर्याने बोलत राहिला. ९ मग कित्येक जण कठीण होऊन अमान्य झाले, व लोकसमुदायापुढे त्या मार्गाची
निंदा करू लागले. म्हणून त्याने त्यांच्यामधून निघून शिष्यांस वेगळे केले, आणि तुरन्न याच्या पाठशाळेत तो दररोज वादविवाद करीत
राहिला. १० हे तर दोन वर्षे चालले, म्हणून आशिया प्रांतात राहणारे सर्व यहूदी व हेल्लेणी यांनी अदोनाईचे वचन ऐकले.

११ आणि याव्हे एलोहिमने पौलाच्या हातून असाधारण चमत्कार घडविले १२ ते असे की, त्याच्या अंगावरून रूमाल किंवा फडकी
आणून रोग्यांवर ठेवली, म्हणजे त्याचे रोग दूर होत असत, व दुष्ट आत्मे त्यांच्यामधून निघून जात असत. १३ तेंव्हा कित्येक मंत्रवादी,
फिरस्ते यहूदी दुष्ट आत्मे लागलेल्या लोकांवर अदोनाई येशूवाहचे नाव ऊच्चारून म्हणू लागले, ज्या येशूवाहची पौल घोषणा करितो,

त्याची मी तुम्हांला शपथ घालतो. १४ एक यहूदी मुख्य याजक स्किवा ह्याला सात मुलगे होते ते असे करीत होते. १५ त्यांस दुष्ट आत्म्याने उत्तर दिले, येशूवाहला मी ओळखतो, व पौलाची मला माहिती आहे, पण तुम्ही कोण आहा? १६ मग ज्या माणसास दुष्ट आत्मा लागला होता, त्याने त्यांच्यावर झडप घालून दोघांस हटविले, आणि त्यांच्यावर इतकी जरब बसविली की, ते घायळ होऊन उघडेनागडे त्या घरांतून पळून गेले. १७ मग इफिसात राहणारे यहूदी व हेल्लेणी ह्या सर्वांस हे कळाले, तेंव्हा ते भयभीत झाले, आणि अदोनाई येशूवाह च्या नांवाचा महिमा झाला. १८ विश्वास ठेवणा-या लोकांपैकी पुष्कळ जणांनी येऊन, आपली कृत्ये उघडपणे पदरांत घेतली. १९ जादूटोणा करणा-यांपैकी ब-याच जणांनी आपली पुस्तके जमा करून सर्वां देखत जाळून टाकिली, आणि त्यांच्या किंमतीची बेरीज केली, तेंव्हा ती पन्नास हजार रूपये झाली. २० ह्याप्रमाणे अदोनाई च्या सामर्थ्याने वचन वाढत जाऊन प्रबल झाले.

२१ मग या गोष्टी झाल्यावर मासेदोनिया व अखया यांमधून जाऊन यरूशलेमेस जावे, असा पौलाने आत्म्यात निश्चय केला. त्याने म्हंटले की, तेथे गेल्यावर मला रोमही पाहणे अवश्य आहे. २२ मग आपली सेवा करणा-यांतील दोघांस, म्हणजे तीमथ्य व एरास्त यांस मासेदोनियात पाठवून देऊन, तो स्वतः काही दिवस आशिया प्रांतात राहिला. २३ आणि त्या समयी त्या मार्गाविषयी फार खळबळ उडाली. २४ कारण देमेत्रिय नांवाचा कोणीएक सोनार होता, तो अर्तमी देवीचे रूप्याचे देव्हारे बनवून, कारागिरांस बराच कामधंदा मिळवून देत होता. २५ त्याने त्यांना व तशा प्रकारचे उद्योग करणा-यांना एकत्र जमवून म्हंटले, अहो गडयांनो, या उद्योगाने आपल्याला संपत्ती मिळत आहे, हे तुम्हांला ठाऊक आहे. २६ आणि तुम्ही पाहता व ऐकता की, केवळ इफिस नगरातच नव्हे, तर बहुतेक सर्व आशिया प्रांतात या पौलाने पुष्कळ समुदायाला चिथवून फितवले आहे. तो म्हणतो, जे हातांनी केलेले आहेत ते देव नाहीतच, २७ आणि ह्या आमच्या उद्योगाची अपकीर्ती होण्याचे भय आहे, इतकेच नव्हे तर सर्व आशिया व जग ज्या मोठया अर्तमी देवीची पूजा करते, तिचे देऊळ तुच्छ लेखले जाईल, व तिचे महत्व नाहीसे होईल.

२८ हे ऐकून ते रागाने भरून गेले आणि ओरडत म्हणू लागले इफिसकारांची अर्तमा थोर! २९ आणि ते नगर गोंधळाने भरून गेले, आणि पौलाचे वाटेतले सोबती मासेदोनियाची माणसे गायस व अरिस्तार्ख ह्यांना धरून ओढून, ते एकचित्ताने नाटकगृहात धावत गेले. ३० तेंव्हा आपण समुदायात जावे असे पौलाच्या मनात होते, पण शिष्यांनी त्याला तसे करू दिले नाही. ३१ आणि आशिया प्रांताच्या अधिका-यांतील कित्येक त्याचे मित्र होते, त्यांनी त्याला निरोप पाठवून आग्रह केला की, तू नाटकगृहात जाऊन आपणाला धोक्यात घालू नये. ३२ तेंव्हा कोणी काही, कोणी काही अशा आरोळया मारीत राहिले, कारण मंडळीचा एकच गोंधळ झाला होता. आणि आपण कशाला एकत्र जमलो आहो, हे बहुतेकांना ठाऊक नव्हते. ३३ आणि आलेक्सांद्र याला यहूदी लोकांनी पुढे केल्यावर, कित्येकांनी त्याला समुदायातून ओढून काढले. तेंव्हा आलेक्साम्द्र हाताने खुणावून लोकांना प्रत्युत्तर देण्यास पाहत होता. ३४ परंतु तो यहूदी आहे असे समजल्याबरोबर सुमारे दोन तास सर्वांची एकच ओरड झाली की, इफिसकरांची अर्तमी थोर! ३५ मग नगर चिटणीस समुदायाला शांत करून म्हणाला, अहो इफिसकर पुरूषांनो, इफिस नगर हे मोठया अंर्तमी देवीचे देऊळ व आकाशातून पडलेली तिची मूर्ती यांचा संभाळ करणारे आहे, हे ज्याला माहीत नाही असा कोण माणूस आहे? ३६ तर या गोष्टी निर्विवाद आहेत म्हणून तुम्ही शांत असावे, व काही उतावळी करू नये. ३७ कारण ही माणसे तुम्ही येथे आणली, ती देवळे लुटणारी किंवा आमच्या देवीची निंदा करणारी अशी नाहीत. ३८ यास्तव देमेत्रिय व त्याच्या बरोबरचे कारागीर यांचा जर कोणाशी वाद असेल, तर त्यांना न्यायगृहे उघडी आहेत, व न्यायाधीशही आहेत. त्यांच्यापुढे त्यांनी एकमेकांवर आरोप ठेवावा. ३९ पण जर तुम्ही दुसरे काही करायला पाहत असाल, तर ते कायद्याप्रमाणे नेमलेल्या सभेमध्ये ठरवले जाईल. ४० कारण आजच्या दंग्याविषयी आपल्यावर आरोप ठेवला जाईलच, असे भय आम्हांस आहे. काही कारण नसता हा दंगा झाला, आणि ह्या जमावाचे कारण आपल्याला सांगता येणार नाही. ४१ असे बोलून त्याने त्या मंडळीस लावून दिले.

**२०.** १ नंतर गलबला निवाल्यावर पौलाने शिष्यांस बोलावणे पाठवून, त्यांना बोध केल्यावर तो त्यांचा निरोप घेऊन, मासेदोनियात जायला निघाला. २ आणि त्या भागातून जाताना तेथल्या लोकांस पुष्कळ बोध केल्यावर, तो हेल्लासात आला. ३ आणि तेथे तीन

महिने राहिल्यावर तो सूरियात तारवातून जाणार होता तेंव्हा यहूदी लोकांनी त्याच्याविरूद्ध कट केला म्हणून त्याने मासेदोनियामधून परत जाण्याचा निश्चय केला. ४ तेंव्हा पुर्राचा मुलगा सोपत्र विरूयाकर, व थेस्सलनीकाकरांतले अरिस्तार्ख, व सकूंद, आणि गायस दर्बेकर, व तीमथ्य, व आशियातले तुखिक, व त्रफिम, हे आशिया पर्यत त्याच्याबरोबर गेले. ५ पण ते पुढे जाऊन त्रोवसात आमची वाट पाहत राहिले होते, ६ आणि बेखमीर भाकरीच्या दिवसानंतर आम्ही फिलिप्पैहून तारवात बसून पाच दिवसांनी त्रोवसात त्यांच्याकडे आलो. तेथे आम्ही सात दिवस राहिलो. ७ मग आठवडयाच्या पहिल्या दिवशी आम्ही सर्व भाकर मोडण्यासाठी (मूळात अदोनाईचे भोजन हा अर्थ आहे.) एकत्र जमलो असताना, पौल त्यांच्याबरोबर बोलू लागला. कारण दुस-या दिवशी निघण्याचा त्यांचा बेत होता. तो मध्यरात्रीपर्यंत बोलत राहिला, ८ वरच्या मजल्यावरील ज्या खोलीत आम्ही जमा झालो होतो, तेथे पुष्कळ दिवे होते. ९ युतुख नांवाचा एक तरूण खिडकीत बसला होता. पौल बोलत असताना, तो झोपेच्या गुंगीत होता. तिस-या मजल्यावरून खाली पडला, व मेलेला हाती लागला. १० पौल खाली गेला व त्याच्यावर पाखर घालून, व त्याला कवटाळून म्हणाला, घाबरू नका कारण हा अजून जिवंत आहे. ११ मग त्याने वर येऊन भाकर मोडून खाल्ल्यावर बराच वेळ, म्हणजे पहाटे पर्यत त्यांच्याबरोबर संभाषण केले, व तो निघून गेला. १२ त्या तरूणाला जिवंत नेता आल्यामुळे, त्यांना फार समाधान वाटले.

१३ तेथून आम्ही पुढे निघालो, व अस्सा या नगरी समुद्रमार्गे निघालो, तेथे आम्ही पौलाला घेणार होतो. त्यानेच अशा प्रकारे योजना केली होती. ती म्हणजे त्याने स्वतः पायी जायचे, १४ जेंव्हा आम्हांला तो अस्सा येथे भेटला, तेंव्हा आम्ही त्याला जहाजात घेतले, आणि आम्ही मितुलेनाला गेलो. १५ दुस-या दिवशी आम्ही जहाजाने मितुलेनाहून निघालो, व खियासमोर आलो. मग दुस-या दिवशी सामा बेट ओलांडले, आणि एक दिवसानंतर मिलेतला आलो. १६ कारण पौलाने ठरविले होते की, इफिस येथे थांबायचे नाही. आशियात त्याला जास्त वेळ थांबायचे नव्हते, तो घाई करीत होता. कारण शक्य झाल्यास पन्नासाव्या दिवसाच्या सणासाठी, त्याला यरूशलेम येथे राहावयास हवे होते. १७ मिलेताहून इफिस येथे निरोप पाठवून, पौलाने तेथील मंडळीच्या वडील जनांना बोलावून घेतले. १८ जेंव्हा ते आले तेंव्हा तो त्यांना म्हणाला, आशियात आलो त्या दिवसापासून मी तुमच्या सोबत असताना कसा राहिलो, हे तुम्हांला माहीत आहे. १९ मी अदोनाईची सेवा पूर्ण नम्रतेने, व रडून केली. यहूदी लोकांनी केलेल्या कटामुळे निर्माण झालेल्या उपद्रवांना तोंड देत, मी त्यांची सेवा केली. २० जे काही तुमच्या चांगल्यासाठी होते, ते तुम्हांला सांगण्यासाठी कोणतीही कसर ठेवली नाही, हे तुम्हांला माहीत आहे. आणि या गोष्टी जाहीरपणे व घराघरातून सांगण्यासाठी, मी कधीही मागेपुढे पाहिले नाही. २१ पश्चात्ताप करून याव्हे एलोहिम कडे वळण्याविषयी, आणि आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा वर विश्वास ठेवणे ह्यासंबंधाने, यहूदी व हेल्लेणी लोकांना सारखीच साक्ष देत होता. २२ पण आता पाहा, मी आत्म्यात बांधलेला असा यरूशलेमेस जात आहे, तेथे माझ्याबाबतीत काय काय होईल, हे माहीत नाही.

२३ मला फक्त एकच गोष्ट माहीत आहे की, प्रत्येक नगरात क्वादोश रूहव्वा (पवित्र आत्मा) मला सावध करतो, तुरूंगवास व संकटे माझी वाट पाहत आहेत, हे तो मला सांगतो. २४ मी माझ्या जीवनाविषयी काळजी करीत नाही, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, मी माझे काम पूर्ण करणे. अदोनाई येशूवाहने जे काम मला दिले, ते मला पूर्ण करायला पाहिजे. ते काम म्हणजे याव्हे एलोहिम च्या कृपेबद्दल ची सुवार्ता, लोकांना सांगितली पाहिजे. २५ राज्याची घोषणा करीत ज्या लोकांत मी फिरलो, त्या तुम्हांतील कोणालाही मी पुन्हा कधीही दिसणार नाही, हे आता मला माहीत आहे. २६ म्हणून मी तुम्हांला जाहीरपणे सांगतो की, सर्वांच्या रक्तासंबंधाने मी निर्दोष असा आहे. २७ याव्हे एलोहिमची संपूर्ण इच्छा काय आहे, हे प्रगट करण्यास, मी कधीही मागेपुढे पाहिलेले नाही. २८ तुमची स्वतःची, व याव्हे एलोहिम च्या सर्व लोकांची, ज्यांना याव्हे एलोहिमने तुम्हांला दिलेले आहे, त्यांची काळजी घ्या. कळपाची (एलोहिमच्या लोकांची) काळजी घेण्याचे काम क्वादोश रूहव्वा ने तुम्हांला दिलेले आहे. तुम्ही मंडळीसाठी मेंढपाळासारखे असले पाहिजे, ही मंडळी याव्हे एलोहिमने स्वतःचे रक्त देऊन विकत घेतली. २९ मला माहीत आहे की, मी गेल्यावर तुमच्यामध्ये भयंकर असे दुष्ट लांडगे येतील, ते कळपाला सोडणार नाहीत. ३० तुमच्या मधून सुद्धा लोक उठतील, चुकीचे असे तुम्हांला शिकवून आपल्या मागे घेऊन जातील.

३१ यासाठी सावध राहा, तुम्हांतील प्रत्येकाला गेले तीन वर्षे डोळयांत आश्रु आणून, सावध करण्याचे मी कधीच थांबविले नाही, हे
आठवा. ३२ आणि आता मी तुम्हांला याव्हे एलोहिम च्या व वचनाच्या कृपेच्या अधीन करतो. जी तुमची वाढ करण्यासाठी समर्थ
आहे, व सर्व पवित्र केलेल्यांमध्ये वतन द्यावयाला समर्थ आहे. ३३ मी कोणाच्याही सोन्याचा, चांदीचा, व कपडयांचा लोभ धरला
नाही. ३४ मी आपल्या स्वतःच्या, व माझ्याबरोबर राहणा-यांच्या गरजा माझ्या हातांनी श्रम करून भागविल्या, हे तुम्हांला चांगले
माहीत आहे. ३५ अशा रीतीने मी तुम्हांस उदाहरण घालून दिले आहे की, जे दुर्बल आहेत अशांना आपण स्वतः मेहनत करून मदत
केली पाहिजे, व अदोनाई येशूवाहचे शब्द लक्षात ठेवले पाहिजेत. तो स्वतः म्हणाला, घेण्यापेक्षा देणे अधिक आशिर्वादाचे असते.
३६ आणि हे बोलल्यावर पौलाने गुडघे टेकले, आणि प्रार्थना केली. ३७ तेंव्हा प्रत्येकाला खूपच रडू आले, ते पौलाच्या गळयात पडले,
व त्याचे मुके घेत राहिले. ३८ ते पुन्हा त्याला कधीही पाहू शकणार नाहीत, या वाक्याने त्यांना फार दुःख झाले. मग ते त्याला
जहाजा पर्यंत निरोप देण्यास गेले.

**२१.**१ त्यांचा निरोप घेतल्यानंतर आम्ही समुद्रमार्गे निघालो, आणि सरळ प्रवास करीत कोस येथे आलो. दुस-या दिवशी आम्ही
रूदास गेलो, तेथून आम्ही पातरा येथे गेलो. २ तेथे फेनीकेला जाणारे जहाज आम्हांला आढळले, तेंव्हा आम्ही जहाजात बसून पुढे
निघालो. ३ तेंव्हा कुप्र आमच्या नजरेत आले, परंतु ते डाव्या अंगाला टाकून आम्ही थेट सूरीया देशाला रवाना झालो, व सोर येथे
उतरलो. कारण तेथे जहाजातील माल उतरावयाचा होता. ४ तेथे येशूवाहचे काही शिष्य आम्हांला आढळले, आणि आम्ही
त्यांच्याबरोबर सात दिवस राहिलो. पवित्र आत्म्याच्या सूचनेवरून त्यांनी पौलाला असे सांगितले की, त्याने यरूशलेमला जाऊ नये. ५
आमच्या भेटीचे दिवस संपत आल्यावर, आम्ही तेथून निघून आमचा पुढील प्रवास परत सुरू केला. त्यावेळी तेथील बंधुजन आपल्या
बायको मुलांच्याबरोबर, आमच्यासह नगराबाहेर आले, व तेथील समुद्रकिना-यावर आम्ही गुडघे टेकले, व प्रार्थना केली. ६ मग
एकमेकांचा निरोप घेऊन आम्ही जहाजात बसलो, व ते लोक आपापल्या घरी गेले.

७ सोर पासून आम्ही आमचा प्रवास सुरू केला, व पोलेमा येथे उतरलो. आणि तेथील बंधुवर्गास भेटलो, त्यांच्याबरोबर एक दिवस
राहिलो. ८ आणि दुस-या दिवशी निघून आम्ही कैसरीयास आलो, व सुवार्तिक फिलिप्प याच्या घरी जाऊन राहिलो. तो निवडलेल्या
सात सेवकांपैकी, एक होता. ९ त्याला चार मुली होत्या त्यांची लग्ने झालेली नव्हती, त्या मुलीना याव्हे एलोहिम च्या भविष्य वचने
सांगण्याचे दान होते. १० त्या बंधूच्या बरोबर बरेच दिवस राहिल्यावर, अगब नांवाचा नव्वी (संदेष्टा) यहूदीयाहून तेथे आला. ११
त्याने आमची भेट घेऊन पौलाच्या कमरेचा पट्टा मागून घेतला, त्याने स्वतःचे हात व पाय बांधले. आणि तो म्हणाला, "क्वादोश
रूहुव्वा असे म्हणतो, हा पट्टा ज्या मनुष्याच्या कमरेचा आहे, त्याला यरूशलेमा येथील यहूदी लोक असेच बांधतील, व यहूदीतरांच्या
हाती देतील." १२ आम्ही व तेथील सर्वांनी ते शब्द ऐकले. तेंव्हा आम्ही व इतर लोकांनी पौलाला कळकळीची विनंती केली की,
त्याने यरूशलेमला जाऊ नये. १३ पण पौल म्हणाला, "तुम्ही हे काय करीत आहा, असे रडून तुम्ही मला खचवित आहेत काय? मी
फक्त बांधून घेण्यासाठीच नव्हे, तर अदोनाई येशूवाह च्या नांवासाठी यरूशलेम मध्ये मरायला देखील तयार आहे."

१४ यरूशलेमापासून दूर राहण्यासाठी आम्ही त्याचे मन वळवू शकलो नाही, म्हणून आम्ही त्याला विनंती करायची सोडली. आणि
म्हंटले, "अदोनाई च्या इच्छेप्रमाणे होवो." १५ त्यानंतर आम्ही तयार झालो, आणि यरूशलेमला निघालो. १६ कैसरीया तेथलि येशूवाह
चे काही शिष्य आमच्याबरोबर आले, आणि आम्हांला म्लासेनकडे घेऊन गेले, कारण त्यांच्याकडेच आम्ही राहणार होतो. तो म्नासोन
कृप्रचा होता, तो सुरूवातीच्या काळात प्रथम शिष्य झालेल्यांपैकी एक होता. १७ आम्ही जेंव्हा यरूशलेमला पोहोंचलो, तेंव्हा तेथील
बंधुजनांनी मोठया आनंदाने आमचे स्वागत केले. १८ दुस-या दिवशी पौल आमच्यासह याकोबाला भेटायला आला, तेंव्हा सर्व
वडीलवर्ग हजर होते. १९ पौल त्यांना भेटला नंतर, त्याच्या हातून याव्हे एलोहिमने यहूदीतर लोकांत कशीकशी सेवा करून घतली,
याविषयी क्रमवार सविस्तर माहिती सांगितली . २० तेंव्हा त्यांनी हे ऐकले, तेंव्हा त्यांनी याव्हे एलोहिमचे गौरव केले. आणि ते त्याला
म्हणाले, बंधु ज्यांनी विश्वास ठेवला आहे, असे यहूद्यांमध्ये कितीतरी हजारो आहेत, हे तुम्ही पाहतच आहा. ते सर्व तोराह

(नियमशास्त्र) बाबत स्वाभिमानी आहेत. २१ या यहूदी लोकांनी तुझ्याविषयी ऐकले आहे की, जे यहूदी इतर देशांत राहतात, त्यांना तू मोशेचे नियम पाळू नका असे सांगतोस, तसेच आपल्या मुलांची सुंता करू नका असे सांगतो, व आपल्या चालरीति पाळू नका असे सांगतो. २२ मग आता काय केले पाहिजे, तू येथे आला आहेस हे त्यांना नक्की कळेल. २३ तेंव्हा आता आम्ही सांगतो, तसे कर. आमच्यातील चार लोकांनी नवस केला आहे. २४ त्या चौघांना घे, व स्वतःचे त्यांच्यासह शुद्धीकरण करून घे, त्या चौघांना त्यांच्या डोक्याचे मुंडण करता यावे, म्हणून त्यांचा खर्च तू कर. मग सर्वांना हे समजेल की, त्यांनी जे काही तुझ्या बद्दल ऐकले आहे, ते खरे नाही. उलट तू तोराह (नियमशास्त्रा) चे पालन करतोस हे दिसेल. २५ जे विदेशी विश्वासणारे आहेत, त्यांना आम्ही पत्र लिहिले आहे. ते असे, "मूर्तीला वाहिलेले अन्न त्यांनी खाऊ नये, रक्त अगर गुदमरून मारलेले प्राणी त्यांनी खाऊ नयेत, अनैतिक कृत्ये करू नयेत." २६ मग पौलानेच त्या चार लोकांना आपल्यावरोबर घेतले, दुस-या दिवशी शुद्धीकरणाच्या विधीमध्ये तो सहभागी झाला. मग तो मंदिरात गेला, शुद्धीकरणाचे दिवस केव्हा संपतील हे जाहीर केले. शेवटच्या दिवशी प्रत्येकासाठी अर्पण देण्यात येईल. २७ सात दिवस जवळ जवळ संपत आले होते, परंतु आशियातील काही यहूदी लोकांनी पौलाला मंदिरात पाहिले. त्यांनी लोकांना भडकाविले व पौलाला धरले. २८ ते मोठयाने ओरडून म्हणाले, "इस्त्राएलच्या लोकांनो मदत करा? हाच तो मनुष्य आहे. जो सर्व लोकांना सगळीकडे आपल्या लोकांविरूद्ध, आपल्या नियमांविरूद्ध, व या जागेबद्दल शिकवीत आहे. आणि आता त्याने विदेशी लोकांना देखील मंदिरात आणले आहे, आणि ही पवित्र जागा विटाळविली आहे. २९ ते असे म्हणाले, कारण इफिसच्या त्रफिमला त्यांनी पौलाबरोबर यरूशलेम येथे पाहिले होते. त्रफिम यहूदी नव्हता तो हेल्लेणी होता. लोकांना वाटले पौलानेच त्याला मंदिरात नेले आहे.

३० सर्व नगर खवळून उठले सगळे लोक धावू लागले, त्यांनी पौलाला पकडले व मंदिरातून बाहेर ओढून काढले. लगेच दारे बंद करण्यात आली. ३१ ते त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करीत असतानाच, रोमी सैन्याच्या सरदाराकडे बातमी गेली की, नगरात सगळीकडे गोंधळ उडालेला आहे. ३२ तावडतोब त्याने काही शिपाई व काही शताधिपती घेतले, व तो यहूदी जेथे पौलाला मारीत होते तेथे धावत गेले. जेंव्हा यहूदी लोकांनी रोमी सरदाराला व सैन्याला पाहिले, तेंव्हा त्यांनी पौलाला मारण्याचे थांबविले. ३३ मग सरदार पौलाकडे आला व त्याला अटक केली, व त्याला साखळदंडानी बांधण्याचा आदेश दिला. मग सरदाराने पौल कोण आहे व त्याने काय केले आहे, याविषयी विचारले. ३४ गर्दीतून कोणी काही, तर कोणी काही सांगू लागले. ह्या गोंधळामुळे त्याला खात्रीलायक असे काही कळेना, म्हणून त्याने त्याला गढीत नेण्याचा हुकूम दिला. ३५ जेंव्हा पौल इमारतीच्या पाययांजवळ आला तेंव्हा असे झाले की, समुदायाच्या दांडगाईमुळे शिपायांनी त्याला उचलून आत न्यावे लागले. ३६ कारण जमाव हिंसक बनत चालला होता. जमाव त्याच्यामागे चालला होता, व ओरडत होता त्याला जिवे मारा! ३७ शिपाई पौलाला इमारतीत घेऊन जाणार इतक्यात पौल सरदाराला म्हणाला, मी काही बोलू शकतो काय? तो सरदार म्हणाला, तुला हेल्लेणी बोलता येती काय? ३८ ज्या मिस-याने काही दिवसापुर्वी वंड करून त्या चार हजार मारेक-यास रानात नेले, तोच तू आहेस की नाही? ३९ पौल म्हणाला, किलकिया प्रांतातील तार्सकर नगरात राहणारा मी एक यहूदी आहे. मी एका महत्वाच्या नगराचा नागरिक आहे. मी तुम्हांला विनवितो मला लोकांशी बोलू द्या. ४० जेंव्हा सरदाराने त्याला बोलण्याची परवानगी दिली, तेंव्हा तो पाय-यांवर उभा राहिला, आणि आपल्या हाताने त्याने लोकांना शांत राहण्यास सांगितले. जेंव्हा सगळीकडे शांतता पसरली, तेंव्हा पौल हिब्रू भाषेत बोलू लागला.

**२२.** १ बंधुजनहो व वडिलजनांनो, मी माझ्या बचावासाठी जे काही सांगतो ते ऐका. २ जेंव्हा लोकांनी पौलाला हिब्रू भाषेत बोलताना ऐकले, तेंव्हा ते अधिकच शांत झाले. पौल म्हणाला, ३ मी एक यहूदी आहे आणि किलिकीया प्रांतातील तार्स येथे माझा जन्म झाला. परंतु याच नगरात मी लहानाचा मोठा झालो. आपल्या पूर्वजांच्या नियमांचे सविस्तर शिक्षण मी गमालीएल यांच्या पायाजवळ बसून घेतले. जसे तुम्ही आज याव्हे एलोहिम विषयीच्या आवेशाने भरलेले आहात, तसाच मी देखील याव्हे एलोहिम विषयीच्या आवेशाने भरलेला होतो. ४ आणि मी पुरूष व स्त्रिया यांना बांधून तुरूंगात घालून, त्यांना जिवे मारीपर्यंत या पंथाचा पाठलाग केला. ५ याविषयी एलयोवन कोहेन (मुख्य याजक) व वडीलवर्ग माझा साक्षी आहे. त्यांच्यापासून बंधुजनांस पत्रेही घेऊन

मी दिमिष्कास चाललो होतो. यासाठी की, जे तेथे होते त्यांनाही बांधून यरूशलेमेत शासन करायला आणावे.

६ मग असे झाले की, मी जाता जाता दिकिाष्काजवळ पोहचलो. तेंव्हा सुमारे दुपारच्या वेळेस आकाशातून मोठा प्रकाश माझ्या
सभोवती एकाएकी चकाकला. ७ तेंव्हा मी भूमीवर पडलो, आणि शौला, शौला, माझा छळ का करितोस? अशी वाणी माझ्याशी
बोलताना मी ऐकली. ८ मग मी उत्तर दिले की, हे अदोनाई तू कोण आहेस? आणि त्याने मला म्हंटले, ज्याचा छळ तू करतोस तोच
नात्सेरेथ (नासोरी) येशूवाह मी आहे. ९ जे माझ्याबरोबर होते त्यांनी प्रकाश पाहिला, पण जो आवाज माझ्याशी बोलत होता, तो
त्यांना ऐकू आला नाही. १० मी म्हणालो, अदोनाई मी काय करू? आणि अदोनाई मला म्हणाला, ऊठ आणि दिमिष्कात जा. तेथे
तुला जे काम नेमून देण्यात आले आहे, ते सांगण्यात येईल. ११ त्या प्रकाशामुळे मला काही दिसेनासे झाले, तेंव्हा माझ्या सोबत्यांनी
मला हाताला धरून नेले, आणि मी दिमिष्काला पोहोंचलो. १२ तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे धार्मिक पालन करणारा हनन्या नांवाचा
एक मनुष्य होता. तेथे राहणारे सर्व यहूदी त्याच्याबद्दल चांगले बोलत. १३ तो माझ्याकडे आला आणि माझ्याजवळ उभा राहून तो
म्हणाला, वंधु शौल तुला दृष्टी येवा! आणि त्याच घटकेला मला दिसू लागले.

१४ तो म्हणाला, आपल्या पूर्वजांच्या याव्हे एलोहिमने तुला निवडले आहे. यासाठी की, त्याची इच्छा तुला कळावी. त्या धार्मिकाला
तू पहावेस, आणि त्याच्या तोंडचे शब्द तुला ऐकायला मिळावेत. १५ कारण तू जे काही पाहिलेस आणि ऐकलेस, याविषयी तू त्याचा
सर्वांसमोर साक्षीदार होशील. १६ मग आता कशाची वाट पाहतोस? ऊठ, आणि बाप्तिस्मा घे, व तुझी पापे धुवून टाक येशूवाह वर
विश्वास ठेवून हे कर. १७ मग असे झाले की, जेंव्हा मी यरूशलेमला परत आलो, आणि मंदिरात प्रार्थना करीत होतो, तेंव्हा मला
दृष्टान्त झाला. १८ मी येशूवाहला पाहिले, आणि येशूवाह मला म्हणाला, घाई कर! यरूशलेम ताबडतोब सोड! येथील लोक
माझ्याविषयीचे सत्य स्विकारणार नाहीत. १९ पण मी म्हणालो, अदोनाई जे लोक तुझ्यावर विश्वास ठेवीत होते, त्यांना अटक करून
मारण्यासाठी मी जात असे, हे या लोकांना माहीत आहे. २० आणि जेंव्हा तुझा साक्षीवर स्तेफन याचे रक्त सांडले, तेंव्हा तेथे उभा
राहून मी त्याला संमति दर्शवीत होतो. आणि ज्या लोकांनी स्तेफनाला मारले, त्यांचे कपडे मी राखीत होतो. २१ तेंव्हा अदोनाई मला
म्हणाला, जा! मी तुला दुरवरच्या यहूदीतर विदेशी लोकांकडे पाठवीन.

२२ येथपर्यंत यहूदी लोकांनी पौलाचे बोलणे ऐकले, मग ते मोठमोठयाने ओरडून म्हणू लागले, अशा मनुष्याला जगातून नाहीसे केले
पाहिजे! तो जिवंत राहण्याच्या लायकीचा नाही! २३ ते मोठमोठयाने ओरडत होते. आपल्या अंगावरील कपडे काढून फेकीत होते,
आणि हवेत धूळ उधळीत होते, हे पाहून सरदाराने पौलाला किल्ल्यात नेण्याची आज्ञा केली. २४ त्याने शिपायांना सांगितले पौलाला
चावकाने मारा, अशा प्रकारे हे लोक पौला विरूद्ध का ओरड करीत आहेत, हे सरदाराला जाणून घ्यायचे होते.२५ परंतु जेंव्हा
पौलाला चावकाने मारण्यासाठी बाहेर काढले. तेंव्हा पौल जवळ उभ्या असलेल्या शताधिपतीला म्हणाला, ज्याच्यामध्ये काही अपराध
आढळत नाही, अशा रोमी नागरिकाला तुमचे हे चाबकाचे मारणे कायदेशीर ठरते काय? २६ जेंव्हा शताधिपतीने हे ऐकले, तेंव्हा तो
सरदाराकडे गेला आणि म्हणाला, तुम्ही काय करीत आहात? तो मनुष्य तर रोमी नागरिक आहे.२७ सरदार पौलाकडे आला व
म्हणाला, मला सांग तू रोमी नागरिक आहेस काय? पौल म्हणाला, होय. २८ शताधिपती म्हणाला, रोमी नागतिकत्व मिळविण्यासाठी
मला पुष्कळ पैसे द्यावे लागले. पौल म्हणाला, मी जन्मतःच रोमी नागरिक आहे. २९ जे लोक त्याला प्रश्न विचारणार होते, ते
ताबडतोब मागे सरकले सरदार घावरला. कारण त्याने पौलाला बांधले होते, व पौल हा रोमी नागरिक होता, त्यामुळे तो घाबरला.
३० दुस-या दिवशी यहूदी लोक पौलावर नेमके कशामुळे दोष ठेवीत होते, ते समजून घेण्यासाठी सरदाराने त्याला मोकळे सोडले. मग
त्याने मुख्य याजक, व धर्मसभेचे सभासद, यांना एकत्र जमण्याची आज्ञा केली. मग त्याने पौलाला आणून त्यांच्यापुढे उभे केले.

**२३.** १ पौल यहूदी धर्मसभेच्या सभासदांकडे रोखून पाहत म्हणाला, माझ्या बंधुनो, मी आजपर्यंत चांगला विवेकभाव बाळगून याव्हे
एलोहिम समोर माझे जीवन जगत आलो आहे. २ तेंव्हा मुख्य याजक हनन्या याने, पौलाच्या जवळ उभे राहिलेल्यांना पौलाच्या
तोंडात मारण्यास आज्ञा केली. ३ तेंव्हा पौल हनन्याला म्हणाला, हे चुना लावलेल्या भिंती तुला याव्हे एलोहिम मारील, तू तोराह

(नियमशास्त्रा) प्रमाणे माझा न्याय करावयाला बसला असता, तोराह् विरूद्ध मला मारण्याची आज्ञा देतोस काय? ४ जे लोक पौलाच्या जवळ उभे होते ते म्हणाले, याव्हे एलोहिम च्या मुख्य याजकाविरूद्ध तू असे बोलू शकत नाहीस, तू त्याचा अपमान करतोस काय? ५ पौल म्हणाला, वंधुनो, तो मनुष्य मुख्य याजक आहे, हे मला माहीत नव्हते. कारण असे लिहिले आहे की, तू आपल्या शासन करणायाविरूद्ध बोलू नकोस. ६ जेंव्हा पौलाच्या लक्षात आले की, धर्मसभेतील एक गट सदूकी आहे. तर दुसरा गट परूशी ,तेंव्हा पौल मोठयाने ओरडून सर्व धर्मसभेपुढे म्हणाला, वंधूनो, मी एक परूशी आहे परूश्याचा मुलगा आहे. मेलेल्यांच्या पुन्हा उठण्यासंबंधी माझी जी आशा आहे, त्यामुळे माझ्यावर हा चौकशीचा प्रसंग आला आहे. ७ पौलाने असे म्हणताच, परूशी व सदूकी या दोन गटांमध्ये भांडण लागून धर्मसभेत फूट पडली. ८ सदूकी असे म्हणतात की, मृतांचे पुनरूत्थान नाही. आणि एलोहिम मालाक (देवदूत) व रूहुव्वा (आत्मे) नसतात, परूशी दोन्हीवर विश्वास ठेवतात. ९ सर्व यहूदी मोठमोठयाने ओरडून बोलू लागले, तेंव्हा तोराह् चे रव्बुनी (नियमशास्त्राचे शिक्षक) उभे राहिले, व जोरदारपणे आपले म्हणणे मांडू लागले. ते म्हणाले, या मनुष्यात आम्हांला काहीच दोष आढळत नाही. कदाचित एखाद्या देवदूत, किंवा आत्मा, त्याच्याशी बोलला असेल! १० वादविवादाला हिंसक स्वरूप येऊ लागले. तेंव्हा लोक पौलाचे कदाचित तुकडे तुकडे करतील, अशी सरदाराला भीति वाटू लागली. म्हणून त्याने शिपायांना पौलाला तेथून घेऊन जाण्याची आज्ञा केली. व त्याला किल्ल्यात घेऊन जाण्यास सांगितले.

११ त्या रात्री अदोनाई पौलाजवळ उभा राहिला आणि म्हणाला, धीर धर! कारण जशी तू माझ्याविषयी यरूशलेममध्ये साक्ष दिलीस, तशी तुला माझ्याविषयी रोम येथे साक्ष द्यावी लागेल. १२ दुस-या सकाळी काही यहूदी लोकांनी एकजूट करून कट रचला, त्यांना पौलाला जिवे मारायचे होते. यहूदी लोकांनी अशा प्रकारची शपथ वाहिली की, पौलाला जिवे मारेपर्यंत अन्नपाणी सेवन करायचे नाही. १३ अशा प्रकारे कट करणा-यांची संख्या चाळीस होती. १४ या यहूदी पुढा-यांनी जाऊन मुख्य याजक, व वडीलजनांशी वोलणी केली. यहूदी म्हणाले, आम्ही एक कडकडीत शपथ घेतली आहे. पौलाला जिवे मारेपर्यंत आम्ही काही खाणार व पिणार नाही! १५ म्हणून तुम्ही आता असे करा, मुख्य याजक धर्मसभेने अशा प्रकारचा विनंति अर्ज सरदाराला लिहा की, पौलासंबंधी अधिक वारकाईने चौकशी करायची असल्याने, पौलाला आमच्याकडे घेऊन यावे. तो येथे येण्या अगोदरच आम्ही त्याला जिवे मारण्याच्या तयारीत असू. १६ पण पौलाच्या बहिणीच्या मुलाने या सर्व गोष्टी ऐकल्या, व तो किल्ल्यात गेला. त्याने पौलाला सर्व काही सांगितले. १७ पौलाने एका शतधिपतीला बोलाविले आणि सांगितले, या तरूणाला सरदाराकडे घेऊन जा. कारण सरदाराला सांगण्या सारखे याच्याकडे काहीतरी आहे. १८ मग त्याने त्या मुलाला घेतले, व सरदाराकडे गेला. व त्याला म्हणाला, कैदेत असलेल्या पौलाचे मला बोलावून या तरूणाला तुमच्याकडे घेऊन जायला सांगितले, कारण हा तुम्हांला काही तरी सांगणार आहे.

१९ सरदाराने त्या तरूणाचा हात धरून बाजूला नेले, आणि तो त्याला म्हणाला, तू मला काय सांगणार आहेस? २० तो मुलगा म्हणाला, यहूदी लोकांनी असे ठरविले आहे की, पौलाला घेऊन तुम्हांला उद्या धर्मसभेपुढे यायला सांगायचे. व अशा बहाण्याने त्याला आणायचे की, जणू काय त्यांना पौलाची अधिक वारकाईने चौकशी करायची आहे. २१ पण त्यांच्यावर विश्वास ठेवू नका! कारण चाळीस लोकांहून अधिक लोक लपून बसणार आहेत, व पौलाला गाठून मारणार आहेत. त्यांनी अशा प्रकारची शपथ वाहिली आहे की, जोपार्यंत ते पौलाला जिवे मारणार नाहीत, तोपर्यंत कोणीही काहीही खाणार वा पिणार नाही. म्हणून ते आता तुमच्या होकाराची वाट पाहत अगदी तयारीत आहेत. २२ तू मला ह्या विषयी सांगितले आहेस, हे कोणाला सांगू नको! असे म्हणून सरदाराने त्याला जाण्याची आज्ञा केली.२३ मग सरदाराने दोघा शताधिपतींना बोलाविले आणि म्हणाला, दोनशे शिपाई कैसरीयाला जाण्यासाठी तयार ठेवा. तसेच सत्तर घोडेस्वार, व दोनशे भालेदार, रात्री नऊ वाजता येथून जाण्यासाठी तयार ठेवा! २४ खोगीर घातलेला घोडा पौलासाठी तयार ठेवा, आणि त्याला सुभेदार फेलीक्स यांच्याकडे सुखरूप न्या. २५ सरदाराने एक पत्र लिहिले त्यात असे लिहिलेले होते, २६ क्लौद्य लुसिया याजकडून सुभेदार फेलिक्स महाराज यास सलाम. २७ या मनुष्याला यहूदी लोकांनी धरले होते, ते त्याला जिवे मारण्याच्या वेतात होते. पण तेवढयात माझ्या शिपायांसह मी तेथे गेलो, व त्याला सोडविले. तो रोमी नागरिक आहे, हे समजल्यावरून मी त्याची सुटका केली.

२८ यहूदी लोक त्याच्यावर का दोषारोप करीत आहेत हे कळावे, म्हणून मी त्याला धर्मसभेपुढे घेऊन गेलो. २९ यहूदी लोकांच्या तोराह् (नियमशास्त्रा) च्या प्रश्नावरून त्यांनी त्याला दोषी ठरविले, हे मला दिसून आले, पण त्याच्यावर असा कोणताही आरोप नव्हता. ज्याची शिक्षा मरणदंड, किंवा तुरूंगवास होईल. ३० जेंव्हा या मनुष्याला जिवे मारण्याचा कट रचला गेल्याचे मला कळले. तेंव्हा मी त्याला तावडतोब आपल्याकडे पाठविले. ३१ शिपायांनी त्यांना मिळालेल्या हुकूमाचे पालन केले, ते पौलाला घेऊन रात्रीच अंतिपत्रियास गेले. ३२ दुस-या दिवशी घोडेस्वार पौलासोबत कैसरियास गेले, व शिपाई किल्ल्यात परतले. ३३ जेंव्हा पौल व घोडेस्वार कैसरियास पोहोंचले, तेंव्हा त्यांनी सुभेदाराला पत्र दिले, व पौलाला त्याच्या स्वाधीन केले. ३४ सुभेदारने ते पत्र वाचले, व पौल कोणत्या प्रांताचा आहे हे विचारले. जेंव्हा त्याला समजले की, तो किलिकीयाचा आहे. तेंव्हा तो म्हणाला, ३५ तुझ्यावर दोष ठेवणारे आले, म्हणजे तुझे ऐकेन. पौलाला हेरोदाच्या राजवाडयात पहा-यात ठेवावे असा हुकूम सुभेदारने दिला.

**२४.**१ पाच दिवसांनंतर हनन्या कैसरिया येथे गेला, हनन्या मुख्य याजक होता. हनन्याने आपल्याबरोबर काही यहूदी वडीलजन आणि तिर्तुल्ल नांवाचा वकील यांना कैसरिया येथे नेले. त्यांनी सुभेदारापुढे पौलावरील दोषारोप सादर केले. २ जेंव्हा पौलाला आत नेण्यात आले, तेंव्हा तिर्तुल्ल याने पौलावरील आरोप सांगण्यास सुरूवात केली. तो म्हणाला, फेलिक्स महाराज तुमच्यामुळे आम्हांला फार शांतता लाभली असून, तुमच्या दूरदृष्टीमुळे जरूर असलेल्या सुधारणा सुद्धा या देशात झाल्या आहेत. ३ फेलिक्स महाराज आम्ही हे सर्व प्रकारांनी, व सर्व ठिकाणी, हे कृतज्ञतेने मान्य करतो. ४ परंतु तुमचा अधिक वेळ न घेता आम्ही जे काही तुम्हांला थोडक्यात सांगतो, ते ऐकून घेण्याची कृपा करावी, ही विनंती करतो. ५ हा मनुष्य त्रास देणारा आहे जगात सगळीकडे यहूदी लोकांना त्याने त्रास दिलेला आहे. तो नात्सेरेथकराच्या पंथाचा पुढारी आहे. ६ ह्याने मंदिरहि विटाळविण्याचा प्रयत्न केला, तेंव्हा आम्ही ह्याला धरले व आमच्या तोराह् (नियमशास्त्रा) प्रमाणे, ह्याचा न्याय करण्यास आम्ही पाहत होतो. ७ पण लुसिया सरदाराने येऊन मोठया जबरदस्तीने ह्याला आमच्या हातांतून काढून नेले. ८ आणि ह्याच्या वादीना आपणांकडे येण्याची आज्ञा केली. ह्याची आपण चौकशी कराल, तर ज्या गोष्टीचा दोषारोप आम्ही त्याच्यावर करितो, त्या सर्वांविषयी त्याच्याकडूनच आपणाला समजेल.९ तेंव्हा ह्या गोष्टी अशाच आहेत असे म्हणून यहूद्यांनीहि दुजोरा दिला.

१० मग सुभेदाराने बोलण्यास खुणाविल्यावर पौलाने उत्तर दिले. आपण पुष्कळ वर्षापासून ह्या लोकांचे न्यायाधीश आहा, हे मला ठाऊक आहे. म्हणून मी आपल्यासंबंधीच्या गोष्टीचे संतोषाने समर्थन करितो. ११ आपल्याला पूर्णपणे कळून येईल की, मला यरूशलेमेत उपासना करावयास जाऊन अजून बारापेक्षा अधिक दिवस झाले नाहीत. १२ आणि मंदिरात सभास्थानांत किंवा नगरात, कोणाबरोबर वादविवाद करितांना किंवा लोकांत बंडाळी माजविताना, मी त्यांना आढळलो नव्हतो. १३ ज्या गोष्टीचा दोषारोप ते माझ्यावर आता करीत आहेत, त्या गोष्टी त्यांना आपणापुढे शाबीत करिता येत नाहीत. १४ तरी मी आपणां जवळ इतके कबुल करितो की, ज्या मार्गाला ते पाखंड म्हणतात, त्या मार्गाप्रमाणे जे जे तोराह् नुसार आहे. व जे जे नव्वीईम च्या लेखात आहे, त्या सर्वांवर विश्वास ठेवून मी आमच्या पूर्वजांच्या याव्हे एलोहिमची सेवा करितो. १५ आणि नीतिमानाने व अनीतिमानाचे पुनरूत्थान होईल, अशी जी ते आशा धरितात तीच आशा मी एलोहिम कडे पाहून धरितो. १६ ह्यामुळे याव्हे एलोहिम संबंधाने व माणसांसंबंधाने,माझे मन सतत शुद्ध राखण्याचा मी प्रयत्न करीत असतो. १७ मी पुष्कळ वर्षांनी आपल्या लोकांना दानधर्म करावयास, व यज्ञार्पण वाहावयास आलो, १८ ही करीत असता मी व्रतस्थ असा मंदिरात आढळलो. माझ्याबरोबर लोकांचा घोळका नव्हता किंवा दंगा होत नव्हता, पण तेथे आशिया प्रांतातले कित्येक यहूदी होते.

१९ त्यांचे माझ्याविरूद्ध काही असते, तर त्यांनी आपणांपुढे येऊन माझ्यावर दोषारोप करावयाचा होता. २० किंवा मी न्यायसभेपुढे उभा राहिलो असता, माझा कोणता अपराध ह्यांस दिसून आला ते ह्यांनी तरी सांगावे. २१ ह्यांच्यामध्ये उभे राहून मेलेल्यांच्या पुनरूत्थानाविषयी माझा न्याय आज तुम्हांपुढे होत आहे, हे शब्द मी मोठयांने बोललो, हा एवढा माझा उद्‌गार अपराध असला तर असेल. २२ फेलिक्साला त्या मार्गाची चांगली माहिती असल्यामुळे त्याने खटला तहकूब करून म्हंटले, लूसिया सरदार येईल तेंव्हा तुमच्या प्रकरणाचा निकाल करीन. २३ आणि त्याने शताधिपतीला हुकूम केला की, ह्याला पहा-यांत ठेवावे. तरी ह्याला मोकळीक

असावी, आणि ह्याच्या स्वकीयांस ह्याची सेवा करण्यास मनाई नसावी. २४ मग काही दिवसानंतर फेलिक्स आपली यहूदी बायको दुसिल्ला हिच्यासह आला, व त्याने पौलाला बोलावून मशीहा येशूवाह वरील विश्वासाविषयी त्याच्यापासून ऐकून घेतले. २५ तेंव्हा नीतिमान इंद्रियदमन, व पुढे होणारा न्याय ह्यांविषयी तो भाषण करीत असता, फेलिक्साने भयभीत होऊन म्हंटले, आता जा संधी सापडली म्हणजे तुला बोलावील. २६ आणखी आपणास पौलाकडून द्रव्य मिळेल अशी आशाहि त्याला होती. म्हणून तो त्याला पुन्हा पुन्हा बोलावून घेऊन, त्याच्या बरोबर संभाषण करीत असे. २७ पुढे दोन वर्षानंतर फेलिक्साच्या जागेवर पुर्क्य फेस्त हा आला. तेंव्हा यहूद्यांची मर्जी संपादन करण्याच्या इच्छेने, फेलिक्स पौलाला कैदेतच ठेवून गेला.

**२५.** १ मग फेस्त सुभ्यात आल्यावर तीन दिवसांनी कैसरीयाहून वर यरूशलेमेस गेला. २ तेंव्हा प्रमुख याजक व यहूद्यांतील मुख्य पुरूष ह्यांनी त्याच्याकडे पौलाविरूद्ध फिर्याद नेली. ३ आणि मेहरबानी करून त्याला यरूशलेमेत बोलावून घ्यावे, अशी त्याच्याकडे विनंती केली. वाटेत दबा धरून त्याचा घात करण्याचा त्यांचा बेत होता. ४ फेस्ताने उत्तर दिले पौल कैसरीयात कैदेत आहे, मी स्वतः लवकरच तिकडे जाणार आहे. ५ म्हणून त्या माणसाचा काही अपराध असला, तर तुम्हांतील प्रमुखांनी माझ्याबरोबर येऊन त्याच्यावर आरोप ठेवावा. ६ मग तो त्याच्यामध्ये आठदहा दिवस राहून कैसरीयास खाली गेला. आणि दुस-या दिवशी न्यायासनावर बसल्यावर, त्याने पौलाला आणण्यांचा हुकूम केला. ७ तो आल्यावर यरूशलेमेहून आलेल्या यहूद्यांनी त्याच्याभोवती उभे राहून, ज्याचा पुरावा त्याना देता आला नाही. असे पुष्कळ व भयकंर आरोप त्याच्यावर ठेविले. ८ पौलाने प्रत्युत्तर केले की, मी यहूद्यांच्या तोराह् (नियमशास्त्रा) चा, मंदिराचा, किंवा कैसराचा काही अपराध केला नाही.

९ तेंव्हा यहूद्यांची मर्जी संपादन करण्याच्या इच्छेने फेस्त पौलाला म्हणाला, यरूशलेमेस जाऊन तेथे माझ्यापुढे ह्या गोष्टीविषयी तुझा न्याय व्हावा, अशी तुझी इच्छा आहे काय? १० तेंव्हा पौलाने म्हंटले, कैसराच्या न्यायासनापुढे मी उभा आहे. येथेच माझा न्याय झाला पाहिजे, मी यहूद्यांचा काही अपराध केला नाही, हे आपणहि चांगले जाणता. ११ मी अपराध केला असला, किंवा मरणास योग्य असे काही केले असले, तर मी मरावयास तयार नाही, असे नाही. परंतु त्यांनी माझ्यावर जे आरोप ठेविले आहेत, त्यातला एकहि जर खरा ठरत नाही, तर मला त्यांच्या स्वाधीन करण्याचा कोणताहि अधिकार नाही. मी कैसराजवळ न्याय मागतो. १२ तेंव्हा फेस्ताने सभेची मसलत घेऊन उत्तर दिले, तू कैसराजवळ न्याय मागितला आहेस, तर कैसरापुढे जाशील. १३ मग काही दिवस झाल्यावर अग्रिप्पा राजा व बर्णीका ही दोघे कैसरीयास येऊन फेस्ताला भेटली. १४ तेथे ती पुष्कळ दिवस राहिली, तेंव्हा फेस्ताने राजापुढे पौलाचे प्रकरण काढून म्हंटले, फेलिक्साने बंदीत ठेवलेला एक मनुष्य येथे आहे. १५ मी यरूशलेमेस गेलो होतो, तेंव्हा त्यांच्यावर यहूद्यांच्या मुख्य याजकांनी, व वडिलांनी, फिर्याद करून त्याच्याविरूद्ध ठराव व्हावा, म्हणून विनंती केली. १६ त्यांस मी उत्तर दिले की, आरोपी व वादी हे समोरासमोर येऊन, आरोपाविषयी प्रत्युत्तर देण्याची आरोपीला संधी मिळण्यापूर्वी, कोणालाहि शिक्षेकरिता सोपून देण्याची रोमी लोकांची रीत नाही.

१७ ह्यास्तव ते येथे आल्यावर काही उशीर न करिता, दुस-या दिवशी न्यायासनावर बसून, मी त्या माणसाला आणावयाचा हुकूम केला. १८ वादी उभे असता ज्या वाईट गोष्टींचा त्याच्याविषयी माझ्या मनांत संशय आला होता, त्याबाबत एकहि आरोप त्यांनी त्याच्यावर ठेविले नाही. १९ केवळ त्यांच्या धर्माविषयी, व जो जिवंत आहे म्हणून पौल म्हणतो, असा कोणी मृत झालेला येशूवाह ह्याच्याविषयी, ह्यांचा व त्यांचा वाद होता. २० तेंव्हा ह्याची चौकशी कशी चालवावी, हे मला सुचेनास झाल्यामुळे मी त्याला विचारिले, यरूशलेमेस जाऊन तेथे ह्या गोष्टीविषयी तुझा न्याय व्हावा अशी तुझी इच्छा आहे काय? २१ तेंव्हा बादशहाच्या निकालासाठी मला ठेवावे, अशी पौलाने मागणी केल्यावरून मी हुकूम केला की, ह्याला कैसराकडे पाठवीपर्यंत कैदेत ठेवावे. २२ अग्रिप्पा फेस्ताला म्हणाला, त्या माणसांचे म्हणणे ऐकावे, असे माझ्याहि मनांत आहे. त्याने उत्तर दिले, उद्या आपल्याला त्याचे म्हणणे ऐकावयास मिळेल.

२३ दुस-या दिवशी अग्रिप्पा व बर्णीका ही मोठया थाटामाटाने येऊन, सरदार, व नगरांतील मुख्य लोक, ह्यांच्यासह दरबारांत गेली.

आणि फेस्ताने हुकूम दिल्यावर पौलाला तेथे आणण्यात आले. २४ तेंव्हा फेस्त म्हणाला, हे राजा अग्रिप्पा व आम्हांबरोबर उपस्थित असलेले सर्व जनहो, ह्या माणसाला तुम्ही पाहता ना? ह्याला ह्यापुढे जिवंत ठेवू नये, असे ओरडत यहूद्यांच्या सर्व समुदायाने यरूशलेमेस व येथेहि मला अर्ज केला. २५ परंतु त्याने मरणदंडास योग्य असे काही केले नाही असे मला कळून आले, आणि त्याने स्वतः बादशहाजवळ न्याय मागितला, म्हणून त्याला पाठविण्याचे मी ठरविले. २६ ह्याविषयी मी आपल्या स्वामीला निश्चित असे लिहिण्यासारखे काही नाही, म्हणून तुमच्यापुढे व विशेषेकरून हे राजा अग्रिप्पा आपणांपुढे ह्याला आणिले आहे. अशा हेतूने की, चौकशी झाली म्हणजे, मला काहीतरी लिहावयास सापडावे. २७ कारण बंदिवानास पाठवितांना त्याच्यावरील दोषारोप न कळविणे, मला ठीक दिसत नाही.

**२६.** १ मग अग्रिप्पाने पौलाला म्हंटले, तुला स्वतःच्या तर्फे बोलावयास परवानगी आहे. तेंव्हा पौलाने हात पुढे करून प्रत्युत्तर केले. २ हे राजा अग्रिप्पा यहूद्यांनी माझ्यावर ज्या गोष्टीचा दोषारोप ठेवला आहे, त्या सर्वांविषयी मला आज तुझ्यासमोर प्रत्युत्तर द्यायचे आहे, यावरून मी आपल्याला धन्य समजतो. ३ विशेषेकरून तू यहूद्यांच्या चालीरीती व धर्मविचार यामध्ये वाकबगार आहेस. म्हणून मी तुला विनंती करतो की, तू सहनशीलतेने माझे ऐकून घ्यावे. ४ माझ्या तरूणपणापासून अगदी पहिल्यापासून माझी जी वर्तणूक, माझ्या राष्ट्रामध्ये, व यरूशलेमेतही होती, ती सर्व यहूद्यांस माहीत आहे. ५ ते पहिल्यापासून मला ओळखतात म्हणून ते साक्ष द्यायला मान्य असेल, तर ते साक्ष देतील की, आमच्या धर्माच्या अत्यंत कडकडीत पंथाप्रमाणे मी परूशी होतो. ६ आता याव्हे एलोहिमने आमच्या पूर्वजांना जे वचन दिले, त्याची आशेबद्दल माझा न्याय होण्यासाठी मी येथे उभा आहे.७ आमचे बारा वंश रात्रदिवस एकाग्रतेने याव्हे एलोहिमची सेवा करीत असता, ते वचन प्राप्त होण्याची आशा धरतात, आणि हे राजा त्याच आशेविषयी यहूद्यांनी माझ्यावर दोषारोप ठेविला आहे. ८ याव्हे एलोहिम मेलेल्यांना उठवितो, हे तुम्हांपैकी कित्येकास अविश्वासनीय का वाटावे?

९ मलाहि खरोखर वाटत असे की, नात्सेरेथ (नासोरी) येशूवाह च्या नांवाविरूद्ध पुष्कळ गोष्टी कराव्या, १० आणि तसे मी यरूशलेमेत केलेहि. मी मुख्य याजकांपासून अधिकार मिळवून पुष्कळ पवित्र जनांना तुरूंगात कोंडून टाकिले, आणि त्यांचा घात होत असतांना मी संमति दिली. ११ प्रत्येक सभास्थानात त्यांना वारंवार शासन करून त्यांना दुर्भाषण करण्यास लावण्याचा प्रयत्न मी करीत असे. त्यांच्यावर अतिशय पिसाळून जाऊन, बाहेरच्या नगरांपर्यंत देखील मी त्यांचा पाठलाग करीत असे. १२ हे चालू असता मुख्य याजकांकडून अखत्यार व अधिकारपत्र मिळवून, मी दिमिष्काकडे चाललो होता. १३ तेंव्हा हे राजा वाटेवर दोन प्रहरी, सूर्याच्या तेजापेक्षा प्रखर असा प्रकाश, आकाशांतून माझ्या व माझ्याबरोबर चालणा-या माणसांच्या सभोवती चकाकतांना मी पाहिला. १४ जेंव्हा आम्ही सर्व जमिनीवर पडलो, इतक्यात इब्री भाषेत माझ्यावरोबर बोलतांना मी अशी वाणी ऐकली की, शौला, शौला, माझा छळ का करितोस? पराणीवर लाथ मारणे, तुला कठीण आहे. १५ मी म्हंटले, अदोनाई तू कोण आहेस? अदोनाई म्हणाला, ज्या येशूवाहचा तू छळ करितोस, तोच मी आहे. १६ तर ऊठ व आपल्या पायावर उभा राहा, कारण मी तुला एवढयासाठी दर्शन दिले आहे की, तू जे माझ्याविषयी पाहिले आहे, व ज्याबाबत मी तुला दर्शन देणार आहे, त्याचा सेवक व साक्षी असे तुला नेमावे.

१७ ह्या लोकांपासून व परराष्ट्रीयांपासून मी तुझे रक्षण करीन. १८ मी तुला त्याच्याकडे पाठवितो ह्यासाठी की, त्यांनी अंधारातून उजेडाकडे, व सैतानाच्या अधिकारातून याव्हे एलोहिम कडे वळावे. म्हणून तू त्यांचे डोळे उघडावे, आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी, व माझ्यावरील विश्वासाने पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळावे. १९ म्हणून हे राजा अग्रिप्पा, मी तो आकाशातील दृष्टांत अवमानिला नाही. २० तर पहिल्याने दिमिष्कांतील लोकांना व यरूशलेमेत अवघ्या यहूदीया देशांत, व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करीत आलो की, पश्चात्ताप करा आणि पश्चात्तापास शोभतील अशी कृत्ये करून, याव्हे एलोहिम कडे वळा. २१ ह्या कारणामुळे यहूदी मला मंदिरात धरून ठार मारावयास पाहत होते. २२ तथापि, याव्हे एलोहिम पासून साहाय्य प्राप्त झाल्यामुळे, मी आजपर्यंत लहान मोठयांस साक्ष देत राहिलो आहे. आणि ज्या गोष्टी होणार आहेत, म्हणून नव्वीईम (संदेष्टयां) नी व मोशेने सांगितले, त्याखेरीज मी दुसरे काही सांगत नाही. २३ त्या अशा की, मशीहाने दुःख सोसणारे व्हावे, आणि त्यानेच मेलेल्यांतून उठणा-यांपैकी पहिले होऊन, आमच्या लोकांस व परराष्ट्रीयांसहि प्रकाश प्रगट करावा.

२४ ह्याप्रमाणे तो प्रत्युत्तर करीत असता फेस्त मोठयाने बोलला, पौला तू वेडा आहेस. विद्येचे अध्ययन फार झाल्यामुळे तुझे डोके फिरले आहे. २५ पौल म्हणाला, फेस्त महाराज मी वेडा नाही, तर मी खरेपणाच्या व सुज्ञपणाच्या गोष्टी बोलतो. २६ ह्या गोष्टी राजे अग्रिप्पा ह्यांना ठाऊक आहेत. त्यांच्यासमोर मी मनमोकळेपणे बोलतो, ह्यातले त्यांच्यापासून काही गुप्त नाही, अशी माझी खातरी आहे. कारण हे कोनाकोप-यांत घडलेले नाही. २७ हे राजा अग्रिप्पा नव्वीईम (संदेष्टयां) वर आपला विश्‍वास आहे ना? विश्‍वास आहे हे मला ठाऊक आहे. २८ तेंव्हा अग्रिप्पाने पौलाला म्हंटले, मी मशीही व्हावे म्हणून तू थोडक्यानेच माझे मन वळवितोस! २९ पौल म्हणाला, थोडके किंवा फार कसेहि असो पण केवळ आपणच नव्हे, तर आज हे जे सर्व माझे भाषण ऐकत आहेत, त्यांनी ह्या वचनांशिवाय माझ्यासारखे व्हावे, अशी याव्हे एलोहिम जवळ माझी प्रार्थना आहे. ३० तेंव्हा राजा, सुभेदार, बर्णीक, व त्यांच्याबरोबर जे बसले होते, ते उठले. ३१ आणि एकीकडे जाऊन आपआपसांत म्हणाले, ह्या माणसाने मरणास, किंवा बंधनास पात्र, असे काही केले नाही. ३२ तेंव्हा अग्रिप्पाने फेस्ताला म्हंटले, ह्या माणसाने कैसराजवळ न्याय मागितला नसता, तर त्याला मोकळेकरिता आले असते.

**२७.**१ नंतर आम्ही इटली देशास तारवात बसून जावे असे ठरल्यावर, त्यांनी पौलाला व दुस-या कित्येक बंदिवानांस बादशाही पलटणीचा, यूल्य नांवाचा शतपती याच्या स्वाधीन केले.२ तेंव्हा आशियाच्या किना-यावरील अनेक ठिकाणी जाण्याच्या बेतात असणा-या, अद्रमुत्तीय येथील तारवात बसून आम्ही निघालो. आणि मासेदोनियातील थेस्सलनीका येथला, आरिस्तार्ख हा आमच्याबरोबर होता. ३ मग दुस-या दिवशी आम्ही सीदोनास पोहचलो, आणि युल्याने पौलाशी सौजन्याने वागून त्याला समाधान वाटावे, म्हणून त्याच्या मित्रांस भेटायला जाण्याची मोकळीक दिली. ४ मग आम्ही तेथून निघाल्यावर वारा समोरचा होता, म्हणून कुप्राच्या आढून गेलो. ५ नंतर किलिकिया व पंफुल्या यांच्या समोरच्या समुद्रावरून जाऊन, आम्ही लुफियांतील मुर्या येथे पोहचलो. ६ तेथे इटलीस जाणारे आलेक्सांद्रिया येथील तारू शतपतीला मिळाले, म्हणून त्यावर त्याने आम्हांस चढवले. ७ मग पुष्कळ दिवस हळूहळू जाता जाता फार कष्टाने आम्ही कनिदासमोर आलो. तेंव्हा वारा पुढे जाऊ देईना म्हणून आम्ही केताच्या आडून सलमोनासमोर हाकारून गेलो. ८ मग आम्ही फार कष्टाने त्याच्या काठाकाठाने सुंदर या नांवाच्या ठिकाणी आलो, त्याजवळ लसया नगर होते.

९ तेंव्हा पुष्कळ वेळ गेल्यामुळे आणि तितक्यात उपासाचा दिवसही होऊन गेल्यामुळे, त्या वेळेस समुद्रावरून जाणे संकटाचे होते, म्हणून पौलाने त्यांना सूचना केली. १० आणि म्हंटले, अहो गृहस्थांनो, ह्या जलप्रवासात केवळ माल व तारू यांचीच नव्हे, तर आमच्या जिवांचीही हानी, व मोठे नुकसान होईल असे मला दिसते. ११ तरी पण पौल सांगत होता, त्या गोष्टींपेक्षा शतपतीने तांडेल व तारवाचा धनी, यांच्या सांगण्याकडे अधिक लक्ष दिले. १२ आणि ते बंदर हिवाळयात राहायला सोईचे नव्हते, म्हणून बहुतेकांनी मसलत दिली की, तेथून निघावे आणि होईल तर केतातील फेनिके बंदर येथे जाऊन हिवाळयात राहावे. त्याचे तोंड नैऋत्येस व वायव्येस आहे. १३ मग दक्षिण वारा वाहत असता बेत सिद्धीस गेल्याचे असे समजून, ते तेथून नांगर उचलून केताच्या बाजूने काठाजवळून तारू हाकारीत चालले. १४ परंतु थोडया वेळा नंतर युरकुलोन नांवाचा तुफानी वारा तिकडून सुटला. १५ तेंव्हा तारू त्यात सापडून वा-यापुढे ठरेना, म्हणून आम्ही त्याच्या स्वाधीन वाहत जाऊ लागलो. १६ मग क्लौदा नांवाच्या एका लहान बेटाजवळून जाताना, आम्ही मोठया होडी आपल्या स्वाधीन करून घेतली.

१७ ती तारवात उचलून घेतल्यावर त्यांनी साहित्ये घेऊन आवळून बांधले, आणि आपण सुर्ती नांवाच्या भाटीवर टाकले जाऊ असे त्यांना भय वाटले. म्हणून त्यांनी शीड उतरले, आणि ते तसेच वाहवत चालले. १८ तेंव्हा वादळाने आमचे फार हाल होत असल्यामुळे, ते दुस-या दिवशी भरगत टाकून देऊ लागले. १९ आणि तिस-या दिवशी त्यांनी आपल्या हातांनी तारवाचे सामान काढून टाकले. २० आणि पुष्कळ दिवस सूर्य व तारेही दिसले नाहीत, आणि आम्हांवर मोठे वादळ होते, ह्यामुळे शेवटी आमची तरण्याची आशा अगदी नाहीशी झाली. २१ आणि त्यांना पुष्कळ दिवस उपास पडल्यावर पौल त्यांच्यामध्ये उभा राहून म्हणाला, अहो गृहस्थांने, तुम्ही माझे ऐकायचे होते, आणि केताहून निघायचे नव्हते, म्हणजे हे हाल व ही हानी झाली नसती. २२ तर मी आता तुम्हांस सांगतो

की, धैर्य धरा. कारण तुम्हांतील कोणाच्याही जिवाचा नाश होणार नाही, तारवाचा मात्र होईल. २३ कारण ज्या याव्हे एलोहिमचा मी आहे, आणि ज्याची सेवा मी करतो, त्याचा दूत गेल्या रात्री माझ्यापाशी उभा राहिला. २४ तो म्हणाला, पौला भिऊ नको, तुला कैसरापुढे अवश्य उभे राहिले पाहिजे, आणि पाहा, तुझ्याबरोबर जे तारवातून प्रवास करीत आहेत, ते सगळे याव्हे एलोहिमने तुला दिले आहेत. २५ म्हणून अहो गृहस्थांनो धैर्य धरा कारण माझा याव्हे एलोहिम वर भरवसा आहे की, जसे त्याने मला सांगितले आहे, तसेच घडेल. २६ तरी पण आम्हांला कोणत्या तरी एका बेटावर पडावे लागेल.

२७ मग चौदावी रात्र आल्यावर अंद्रिया समुद्रात आम्ही इकडे तिकडे हेलकावत असता, मध्यरात्रीच्या सुमारास खलाशांना वाटले की, आपण कोणत्या तरी देशाजवळ येत आहो. २८ मग त्यांनी बुडीद टाकले, तेंव्हा वीस वावे पाणी आहे असे आढळले. आणि काही पुढे जाऊन पुन्हा बुडीद टाकले, तेंव्हा पंधरा वावे पाणी आढळले. २९ ओबडधोबड खडकाळ जागेवर आपले तारू आदळेल, अशी भीती वाटल्याने त्यांनी चार नांगर तारवाच्या मागील बाजूने टाकले, आणि दिवस उजाडण्याची वाट पाहू लागले. ३० मग नांगर नाळीवरूनही टाकावे या निमित्ताने खलाशी होडी खाली समुद्रात उतरवीत होते, आणि तारवातून पळायला पाहत होते. ३१ तेंव्हा पौल शतपतीला व शिपायांना म्हणाला, हे तारवात न राहिले तर तुम्ही वाचणार नाही. ३२ तेंव्हा शिपायांनी होडीचे दोर कापून ती पडू दिली. ३३ नंतर दिवस उगवण्याच्या सुमारास पौल सर्वांना अन्न खाण्या विषयी विनंती करू लागला. तो म्हणाला, आज चौदा दिवस तुम्ही वाट पाहत उपाशी राहिला आहा, तुम्ही काहीच अन्न घेतले नाही. ३४ म्हणून मी विनंती करतो की, अन्न घ्या कारण हे तर तुमच्या निभावासाठी आहे. कारण तुम्हांतील कोणाच्या डोक्याचा केसही नाश पावणार नाही. ३५ असे म्हंटल्यावर त्याने भाकर घेऊन त्या सर्वांसमोर याव्हे एलोहिमचे उपकार मनले, आणि ती मोडून तो खाऊ लागला. ३६ मग त्या सर्वांना धीर आला आणि त्यांनीही अन्न घेतले. ३७ त्या तारवात आम्ही सर्व मिळून दोनशे शाहत्तर जीव होतो. ३८ मग पुरेसे अन्न खाल्ल्यावर ते समुद्रात गहू टाकून देऊन, तारू हलके करू लागले.

३९ मग दिवस उगवल्यावर त्यांनी ती भूमी ओळखली नाही, पण सोयीवर काठाची खाडी पाहून साधेल तर तिच्यामध्ये तारू घालावे, की काय याविषयी त्यांनी मसलत केली. ४० आणि नांगर टाकून देऊन त्यांनी ते समुद्रात राहू दिले, आणि त्याच वेळेस सुकाणाची वंधने सोडून, आणि पुढचे शीड वा-यासमोर चढवून काठाकडची वाट धरली. ४१ परंतु दोन समुद्रांमधील वर आलेल्या वाळूच्या ढिगावर तारू जोराने आदळले. तेंव्हा तारवाची पुढची बाजू वाळूमध्ये रूतून बसली, आणि तारवाचा मागचा भाग लाटांच्या तडाख्यामुळे तुटू लागला.४२ तेंव्हा बंदिवानांस मारून टाकावे, नाही तर कदाचित त्यांतला कोणी पोहून पळून जाईल, अशी शिपायांची मसलत होती. ४३ परंतु पौलाला वाचवावे अशी इच्छा धरून शतपती त्यांच्या बेतास आडवा आला आणि त्याने आज्ञा केली की, ज्यांना पोहता येत असेल त्यांनी उडी टाकून पहिल्याने काठास जावे. ४४ आणि बाकीच्यांनी कोणी फळयांवर, व कोणी तारवातल्या दुस-या कशावर बसून जावे, आणि याप्रमाणे असे झाले की, ते सर्व काठास सुरक्षित पोहचले.

**२८.**१ आणि असे सुरक्षित पोहचल्यावर ते मिलिता नांवाचे बेट आहे, असे आम्हांला समजले. २ त्या देशातील लोकांनी आम्हांवर अतिशय उपकार केले. कारण पाऊस पडत होता व गारठा होता, म्हणून त्यांनी शेकोटी पेटवून आम्हां सर्वांचा अंगीकार केला. ३ मग पौलाने काटक्यांची मोळी आणून शेकोटीवर घातली, इतक्यात उष्णता झाल्यामुळे एक साप बाहेर निघून त्याच्या हातास झोंबून राहिला. ४ ते जिवाणू त्याच्या हाताला लटकलेले पाहून, तेथले लोक एकमेकांना म्हणू लागले, खरेच हा माणूस घातकी आहे. हा समुद्रांतून वांचला, तरी न्यायदेवता त्याला जगू देत नाही. ५ त्याने तर ते जिवाणू विस्तवांत झटकून टाकिले, आणि त्याला काही इजा झाली नाही. ६ तो सुजेल अथवा एकाएकी मरून पडेल, ह्याची ते वाट पाहत होते. पण बराच वेळ वाट पाहिल्यावर त्याला काही विकार झाला नाही, असे पाहून ते आपले मत बदलून म्हणाले, हा कोणी देव आहे.७ तिकडे त्या बेटावरील पुब्ल्य नांवाच्या मुख्य अधिकायाच्या जमिनी आसपास होत्या, त्याने आमचे आगतस्वागत करून, तीन दिवस आदराने आमचा पाहुणचार केला. ८ तेंव्हा असे झाले की, पुब्ल्याचा वडील तापाने व हगवणीने आजारी पडला होता. त्याच्याकडे आत जाऊन पौलाने प्रार्थना केली, व त्याच्यावर हात ठेवून त्याला बरे केले.९ हे झाल्यावर त्या बेटामध्ये ज्या दुस-या लोकांना रोग होते, तेहि त्याच्याकडे येऊन जात. १०

तेंव्हा त्यांनी आमचा नानाप्रकारे सन्मान केला, आणि आम्ही हाकारून निघालो. तेंव्हा आमच्या गरजेचे पदार्थ त्यांनी जहाजावर भरिले.

११ ह्याप्रमाणे तीन महिन्यांनंतर आलेक्सांद्रियाचे दयस्कुरै, ह्या निशाणीचे एक तारू हिवाळा घालविण्याकरिता त्या बेटाजवळ राहिले
होते, त्यांत बसून आम्ही निघालो. १२ मग सुराकूस येथे जाऊन पोहोंचलो, आणि तेथे तीन दिवस राहिलो. १३ तेथून वळसा घेऊन
आम्ही रेगियोनास आलो, आणि एक दिवसानंतर दक्षिणेचा वारा सुटल्यावर दुस-या दिवशी पुत्युलास पोहंचलो. १४ तेथे आम्हांस
वंधुजन भेटले, त्यांनी आपल्या येथे सात दिवस राहावयाची आम्हांला विनंती केली, अशा रीतीने आम्ही रोम नगरास आलो. १५
तेथले वंधुजन आम्हांविषयी ऐकून अप्पियाची पेठ व तीन उतारशाळा येथपर्यंत आम्हांस सामोरे आले, त्यांना पाहून पौलाने याव्हे
एलोहिमची उपकारस्तुति करून धैर्य धरिले. १६ आम्ही रोम नगरात गेल्यावर शताधिपतीने बंदिवानांस सेनापतीच्या स्वाधीन केले, पण
पौलाला त्याच्यावर पहारा करणा-या शिपायाबरोबर वेगळे राहण्याची परवानगी मिळाली. १७ मग असे झाले की, तीन दिवसांनंतर
पौलाने यहूद्यांची जी मुख्य माणसे होती, त्यांना एकत्र बोलाविले ते एकत्र जमल्यावर तो त्यांना म्हणाला. बंधुजनहो, मी आपल्या
लोकांविरूद्ध किंवा पूर्वजांच्या संप्रदायांविरूद्ध काही केले नसता, मला यरूशलेमेत बंदिवान करून रोमी लोकांच्या हाती देण्यात आले.
१८ त्यांनी चौकशी केल्यावर माझ्याकडे मरणदंडास पात्र असा काही गुन्हा नसल्यामुळे, ते मला सोडू पाहत होते.

१९ परंतु यहूद्यांनी विरोध केल्यामुळे कैसराजवळ न्याय मागणे मला भाग पडले. तरी मला आपल्या राष्ट्रावर काही दोषारोप
करावयाचा होता, असे नाही. २० ह्याकरिता तुमची भेट घेऊन तुम्हांबरोबर भाषण करावे, म्हणून तुम्हांला बोलाविले इस्त्राएलाच्या
आशेमुळे मी ह्या सांखळीने बांधलेला आहे. २१ त्यांनी त्याला म्हंटले की, आपल्यासंबंधाने यहूदीयाहून आम्हांस काही पत्रे आली
नाहीत, किंवा बंधुजनांपैकी कोणी येथे येऊन आपणांविषयी काही प्रतिकूल बातमी आणिली नाही, अथवा काही सांगितले नाही. २२
तरी आपले विचार काय आहेत, ते आपणांपासून ऐकून घ्यावे हे आम्हांला योग्य वाटते. कारण ह्या पंथाविषयी म्हंटले, तर लोक
त्याविरूद्ध सर्वत्र बोलतात, हे आम्हांला ठाऊक आहे. २३ तेंव्हा त्यांनी त्याला एक दिवस नेमून दिल्यावर, त्या दिवशी पुष्कळ लोक
त्याच्या बि-हाडी आले. त्यास याव्हे एलोहिम च्या राज्याविषयी साक्ष देण्याकरिता, आणि येशूवाह विषयी मोशेच्या तोराह् वरून व
नव्वीईम च्या लेखांवरून त्यांची खातरी करण्याकरिता, तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या विषयाची फोड करीत होता. २४ त्याने
जे सांगितले त्यावरून कित्येकांची खातरी झाली, तर कित्येक विश्वास ठेवीनात. २५ त्यांचे आपसात एकमत न झाल्यामुळे, ते उठून
जाऊ लागले. तेंव्हा पौलाने त्यांस एक वचन सांगितले, क्वादोश रूहुव्वा, यशया नव्वी च्या व्दारे तुमच्या पूर्वजांबरोबर बोलला ते
ठीक बोलला ते असे की,

२६ ह्या लोकांकडे जाऊन सांग की, तुम्ही ऐकाल तर खरे, परंतु तुम्हांला समजणारच नाही. व पाहाल तर खरे, परंतु तुम्हांला
दिसणारच नाही. २७ कारण ह्या लोकांचे अंतःकरण जड झाले आहे. ते कानानी मंद ऐकतात, आणि त्यांनी आपले डोळे मिटून
घेतले आहेत. ह्यासाठी की, त्यांनी डोळयांनी पाहू नये, कानानी ऐकू नये, मनाने समजू नये, त्यांनी वळू नये, आणि मी त्यांना बरे
करू नये. २८ म्हणून तुम्हांस ठाऊक असो की, हे याव्हे एलोहिमने सिद्ध केलेले तारण, परराष्ट्रीयांकडे पाठविले आहे, आणि ते ते
श्रवण करितील. २९ तो असे बोलल्यावर यहूदी आपसांत बराच वादविवाद करीत निघून गेले.

३0 आपल्या भाडयाच्या घरात पुरी दोन वर्षे राहिला, आणि जे त्याच्याकडे येत असत, त्या सर्वांचे तो स्वागत करीत असे. ३१
कोणापासून अडथळा न होता, तो पूर्ण धैर्याने याव्हे एलोहिम च्या राज्याची घोषणा करीत असे, आणि अदोनाई येशूवाह मशीहा
विषयीच्या गोष्टी शिकवीत असे.

............... समाप्त ...............

## .प्रेषित पौलाने रोमच्या मंडळीला लिहिलेले पत्र.

### .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने रोमच्या मंडळीला हे पत्र लिहिलेले होते, पत्राचा लेखन काळ हा इसवी सन ५८ च्या दरम्यान लिहिलेला आहे. पहिल्या शतकातील इतिहासाशी परिचित असणा-या अधिकारी भाष्यकारांनी या पत्राच्या अस्सलपणा बद्दल संशय घेतला जात नाही. प्रेषित पौल हा कुशल, बुद्धीमान, धर्मगुरूंच्या पद्धतीप्रमाणे, धर्मशास्त्रात पारंगत, व सुशिक्षित यहूदी होता. येशूवाह मशीहाचा अनुयायी होण्या आधी, तो एक मशीही लोकांचा तीव्र विरोधक होता. त्यावेळेस तो शौल ह्या नावाने ओळखला जात होता. आरंभीच पौलाने रोमला भेट देण्याचा हेतू स्पष्ट केला होता. रोम येथील मंडळीमध्ये यहूदी मशीही, व विदेशी मशीही यांच्यामध्ये मतभेद होते. ही मिश्रीत मंडळी होती. पौल हा रोममध्ये गेल्यावर काही काळ तरी, त्याचे सहकारी दोनच यहूदी मशीही होते. एक मार्क उर्फ योहानान, व दुसरा युस्त म्हंटलेला येशूवाह हे होते. सुवार्तेचे रूप व व्याप्ती स्पष्ट करून सांगणे अत्यंत निकडीचे होते. ह्या पत्रामध्ये देखील अनेक विषय अभ्यासण्याकरिता मिळतात. प्रेषित पौलाने ह्या बोधपत्रा मध्ये जुन्या करारातील तोराह, व शास्त्रलेख त्यातील वचने संदर्भ जोडूनव सांगड घालून सत्यता प्रगट करण्याचा चांगला व मोठा प्रयत्न केलेला आहे. अभ्यास करणा-यांनी ही बाब लक्षात ठेवली पाहिजे की, प्रेषित पौलाच्या काळातील ही सुरूवातीची मशीहाची मंडळी आणि आता सध्याची रोमची मंडळी ह्या दोन्ही भिन्न भिन्न आहे. सध्याची रोमची मंडळी ही साम्राज्यवादी मंडळी आहे. ह्यांच्या साम्राज्यवादी पुर्वजांनी ह्या सुरूवातीच्या रोमच्या मशीहाच्या मंडळीचा अत्यंत क्रूर प्रकारे छळ करून, अनेकांना वाईट प्रकारे देखील जिवे मारून टाकले आहे. ह्याचा इतिहास स्वतः ठोस पुरावा देतो.जुन्या प्रतीमध्ये हेल्लेणी हा शब्द आलेला आहे, आणि नवीन प्रतीमध्ये ग्रीक शब्द वापरलेला आहे. वास्तविक हेल्लेणी शब्दाची तपशिल पुढील प्रमाणे आहे. ज्या यहूदी लोकांनी ग्रीक भाषा व त्यांच्या परंपरा स्विकारल्या अशा यहूदी लोकांना हेल्लेणी शब्द आहे. परंतु मूळ यहूदी लोक त्या हेल्लेणी लोकांबरोबर संबंध ठेवत नव्हते.

* * * * * * * * * * * * * * *

### .प्रेषित पौलाने रोमच्या मंडळीला लिहिलेले पत्र.

१. १ प्रेषित होण्यासाठी पाचारण केलेला, याव्हे एलोहिमचे शुभवर्तमान सांगण्यासाठी वेगळा केलेला, मशीहा येशूवाह चा एवेद (सेवक) पौल याजकडून २ जी सुवार्ता त्याने क्वादोश (पवित्र) शास्त्रलेखांमध्ये आपल्या नव्वीईम (संदेष्टयां) कडून पूर्वी देऊ केली होती, ३ ती त्याचा मुलगा येशूवाह मशीहा, आपला अदोनाई याच्याविषयी आहे. तो देहासंबंधाने दावीदाच्या वंशापासून जन्मला. ४ आणि पवित्रतेच्या रूहुव्वा च्या संबंधाने तो मेलेल्यांतून पुन्हा उठल्यामुळे, सामर्थ्याने याव्हे एलोहिमचा बेन ठरला. ५ त्याच्याकडून आम्हांला हेख्न व थालमीद पण ही मिळाली. यासाठी की, त्याच्या नावाकरिता सर्व राष्ट्रांमध्ये विश्वासाने आज्ञापालन व्हावे. ६ त्यांच्यामध्ये तुम्हीही येशूवाह मशीहाचे बोलावलेले आहा. ७ याव्हे एलोहिम च्या सर्व प्रियांस क्वादोश होण्यास, बोलावलेले असे जे तुम्ही रोम नगरात आहा. त्या तुम्हांस याव्हे एलोहिम आपला अव्वा, व अदोनाई येशूवाह मशीहा यांच्यापासून हेख्न (कृपा) व शालोम (शांति) असो.

८ सुरूवातीलाच तुम्हां सर्वांसाठी येशूवाह मशीहा व्दारे मी याव्हे एलोहिमचे आभार मानतो. कारण तुमचा अमान (विश्वास) जगात सगळीकडे जाहीर होत आहे. ९ याव्हे एलोहिम माझा साक्षी आहे, ज्याची सेवा मी रूहुव्वा ने त्याच्या बेन (मुला) ची सुवार्ता सांगून करतो, मी तुमची नेहमी आठवण करतो. १० माझ्या प्रार्थनेत मी नेहमी मागतो, जर याव्हे एलोहिमची इच्छा असेल, तर शेवटी मला तुम्हांला भेटता येणे शक्य व्हावे. ११ मला तुम्हांला भेटण्याची फार इच्छा आहे. यासाठी की, काही आध्यात्मिक दानांविषयी तुम्हांबरोबर सहभागी व्हावी, आणि तुम्ही बलवान व्हावे. १२ म्हणजे जो पर्यंत मी तुमच्यामध्ये आहे, तो पर्यंत आपण एकमेकांना विश्वासामध्ये मदत करू. माझ्या विश्वासामुळे तुम्हांला, व तुमच्या विश्वासामुळे मला फायदा होईल. १३ बंधूंनो, पुष्कळ वेळा तुम्हांला भेट देण्याची मला इच्छा झाली. यासाठी की, जसे मला यहूदीतरांमध्ये मिळाले, तसे तुमच्यामध्ये सुद्धा फळ मिळावे. परंतु

आतापर्यंत मला तुमच्यापर्यंत येण्यास अडथळे आले, हे तुम्हांला माहीत असावे. १४ मी हेल्लेणी लोकांचा व अन्यदेशीय लोकांचा ही, ज्ञानी व अज्ञानीही यांचा ऋणी आहे.१५ त्यासाठीच तुम्ही जे रोममध्ये आहात, त्या तुम्हांला सुद्धा सुवार्ता सांगण्याची माझी फार इच्छा आहे.१६ मला सुवार्तेची लाज वाटत नाही, कारण याव्हे एलोहिमचे सामर्थ्य जो कोणी विश्वास ठेवतो, त्या सर्वांसाठी तारण आहे. प्रथम यहूद्याकरिता आणि नंतर हेल्लेणी साठी, १७ कारण सुवार्तेमध्ये याव्हे एलोहिमचे नितिमत्व ते विश्वासापासून विश्वास असे प्रगट झाले आहे. शास्त्रलेखात असे लिहिले आहे की, नितिमान विश्वासाव्दारे वाचेल.

१८ कारण जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात, त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर, याव्हे एलोहिमच क्रोध आकाशातून प्रगट होता. १९ कारण याव्हे विषयी प्राप्त होणारे ज्ञान, त्यांच्यात दिसून येते. कारण याव्हे एलोहिमने ते त्यांना दाखवून दिले आहे. २०
कारण त्याच्यासंबंधाच्या अदृश्य गोष्टी म्हणजे, त्याचे युगानुयुगाचे सामर्थ्य व याव्हे चे एलोहिम पण ही जग अस्तित्वात आल्यापासून निर्मिलेल्या वस्तूंवरून समजून येत असल्यामुळे स्पष्ट दिसत आहेत. यासाठी की, त्यांना कोणतीहि कारण व सबब राहू नये.२१
कारण जरी त्यांनी याव्हे एलोहिम ओळखून सुद्धा, त्यांनी याव्हे एलोहिम म्हणून त्याचे गौरव केले नाही. किंवा त्याचे आभार मानले नाहीत. उलट ते आपल्या विचारात निष्फळ झाले आणि त्यांचे निर्बुद्ध अंतःकरणे अंधकाराने भरून गेली. २२ स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले, २३ आणि अविनाशी याव्हे एलोहिमच्या गौरवाची नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशु, व सरपटणारे प्राणी, ह्यांच्या प्रतिमेच्या रूपाशी, त्यांनी अदलाबदल केली. २४ ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असतांना याव्हे एलोहिमने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले. असे की, त्यांच्या देहांची त्यांच्यात्यांच्यातच विटंबना व्हावी २५ त्यांनी याव्हे एलोहिमच्या खरेपणाची लबाडीशी अदलावदल केली, आणि निर्माण कर्त्यां ऐवजी, निर्मितांची भक्ती व सेवा केली. तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे आमेन.

२६ ह्या कारणामुळे याव्हे एलोहिमने त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केले. त्यांच्यातल्या स्त्रियांनी शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केले. २७ तसेच पुरुषांनी स्त्रियांचा नैसर्गिक उपभोग सोडून, परस्परे कामसंतप्त होऊन पुरूषांनी पुरूषांबरोबर अनुचित कर्म केले, आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचे योग्य प्रतिफळ आपल्याठायी भोगिले. २८ आणखी ज्या अर्थी याव्हे एलोहिमची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी याव्हे एलोहिमने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले. २९
सर्व प्रकारची अनीति, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा, ह्यांनी ते भरलेले असून हेवा, खून, कलह, कपट, कुबुद्धि, ह्यांनी पुरेपूर भरलेले होते. ३० ते चहाडखोर, निंदक, याव्हे एलोहिमला तिटकारा असलेले, उद्धट, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्मकल्पक, आईवडिलांची अवज्ञा करणारे, ३१ निर्बुद्ध, वचनभंग करणारे, ममताहीन, निर्दय, असे होते. ३२ जे ह्या रीतीने वागतात, ते मरणास पात्र आहेत. हा याव्हे एलोहिमचा निर्णय त्यांना ठाऊक असूनहि, ते स्वतः त्याच गोष्टी करीत असतात, इतकेच केवळ नव्हे तर त्या करणा-यांना संमतीहि देतात.

**२**. १ ह्यास्तव हे मानवा, दोष लावणारा तू कोणीहि असलास, तरी स्वतः तुला सबब नाही. कारण ज्यात तू दुस-याला दोष लावितोस, त्यात तू स्वतःला दोषी ठरवितोस. कारण दोषी ठरविणारा तूहि त्याच गोष्टी करितोस. २ आता आपणांला माहीत आहे की, जे अशा वाईट गोष्टी करतात, त्यांचा न्याय याव्हे एलोहिम करतो. आणि याव्हे एलोहिमचा न्याय योग्य असतो. ३ तर हे मानवा, जो तू अशी कर्मे करणा-यांचा न्याय करीत असून स्वतः त्याच गोष्टी करतोस, तो तू याव्हे एलोहिमचा न्याय चुकवशील असे तुला वाटते काय? ४ अथवा याव्हे एलोहिमचे चांगुलपण तुला पश्चात्ताप करायला लावतो हे समजता, त्याचे चांगुलपण, क्षमा, आणि सहनशीलता, यांची संपत्ती तु तुच्छ मानतोस काय? ५ आणि तू आपल्या कठिणपणाला व अपश्चात्तापी आत्म्याला अनुसरून याव्हे एलोहिमचा क्रोध, व यथार्थ न्याय प्रकट होण्याच्या दिवसाकरिता क्रोध साठवून ठेवतोस काय? ६ तो प्रत्येकाला त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे फळ देईल. ७ जे धीराने चांगले करण्यात महिमा, व सन्मान, व अमरत्वता मिळवण्यास पाहतात, त्यांना तो सर्वकालचे जीवन देईल. ८ परंतु जे तट पाडणरे आहेत, व सत्याला न मानिता, अनीतीला मानितात त्याच्यावर क्रोध, व कोप, संकट, व क्लेश, ही येतील.९ म्हणजे दृकृत्य करणारा मनुष्य, प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी अशा प्रत्येकाच्या जिवावर ती येतील. १० पण सकृत्य

करणारा प्रत्येक प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी ह्यास गौरव, सन्मान, व शांति, ही मिळतील. ११ कारण याव्हे एलोहिम जवळ पक्षपात नाही.१२ कारण ज्यांना तोराह (नियमशास्त्र) नाही, अशा जितक्यांनी पाप केले, तितके तोराह (नियमशास्त्र) व्यतिरिक्त नाश पावतील. आणि तोराह (नियमशास्त्र) असून जितक्यांनी पाप केले, तितक्यांचा न्याय तोराह (नियमशास्त्रा) नुसार होईल. १३ कारण तोराह (नियमशास्त्र) ऐकणारे याव्हे एलोहिमच्या दृष्टीने नीतिमान आहेत असे नाही, तर तोराह (नियमशास्त्र) प्रमाणे आचरण करणारे नीतिमान ठरविण्यांत येतील. १४ कारण ज्यांना तोराह (नियमशास्त्र) नाही, असे विदेशी जेंव्हा तोराह (नियमशास्त्रा) त जे आहे, ते स्वभावत करीत असतात. तेंव्हा त्यांना तोराह (नियमशास्त्र) नाही, तरी ते स्वतःच आपले नियम शास्त्र आहेत. १५ म्हणजे ते तोराह (नियमशास्त्रां) तील आचार आपल्या आत्म्यात लिहिलेला आहेत, असे दाखवितात. त्यांच्याबरोबर त्यांची सद्सद्विवेक बुद्धिहि त्यांना साक्ष देते, आणि त्याचे एकमेकांविषयीचे विचार दोष लावणारे, किंवा दोषमुक्त करणार असे असतात. १६ ज्या दिवशी याव्हे एलोहिम माझ्या सुवार्तेप्रमाणे येशूवाह मशीहा च्या व्दारे, माणसांच्या गुप्त गोष्टींचा न्याय करील, त्या दिवशी हे दिसून येईल.

१७ आता जर तू स्वतःला यहूदी म्हणवीत आहेत, आणि तोराह (नियमशास्त्रा) चा आधार घेतोस, व याव्हे एलोहिम विषयी अभिमान बाळगितोस. १८ तुला त्याची इच्छा कळते, आणि तोराह (नियमशास्त्रा) तले शिक्षण मिळाल्यामुळे, जे सर्वोत्तम ते तू पसंत करितोस. १९ आणि तोराह (नियमशास्त्रा) त आपल्याला ज्ञानाचे व सत्याचे स्वरूप उपलब्ध झाले आहे. म्हणून आपण आंधळयांचे वाटाडी अंधारात असलेल्यांचा प्रकाश, २० अल्पबुद्धि लोकांचे रबुन्नी (शिक्षक) बाळकांचे गुरू आहोत, अशी तुझी खातरी झाली आहे. २१ तर मग दुस-याला शिकविणारा तू स्वतःलाच शिकवित नाहीस काय? चोरी करू नये अशी घोषणा करणारा, तू स्वतःच चोरी करितोस काय? २२ व्यभिचार करू नये असे सांगणारा, तू स्वतःच व्यभिचार करितोस काय? मूर्तीचा विटाळ मानणारा, तू स्वतःच देवळे लुटतोस काय? २३ तोराह (नियमशास्त्रा) चा अभिमान बाळगणारा, तू स्वतःच तोराह (नियमशास्त्रा) च्या उल्लंघनाने याव्हे एलोहिमचा अपमान करितोस काय? २४ तुम्हांमुळे परराष्ट्रीयांमध्ये, याव्हे एलोहिमच्या नावांची निंदा होत आहे, असे शास्त्रांत लिहिलेले आहे.

२५ कारण जर तू तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे वागत असलास, तर सुंतेचा उपयोग आहे. खरा परंतु जर तू तोराह (नियमशास्त्रा) चे उल्लंघन करणारा असलास, तर तुम्ही सुंता झालेली असूनहि, ती न झाल्यासारखीच आहे. २६ तर मग सुंता न झालेल्या माणसाने तोराह (नियमशास्त्रा) तील नियम पाळिले, तर त्याचे सुंता न होणे, हे सुंता असे गणण्यात येणार नाही काय? २७ आणि तुला शास्त्रलेख असूनहि, व तुझी सुंता होऊनहि जो तू तोराह (नियमशास्त्रा) चे उल्लंघन करणारा आहेस, त्या तुझा न्याय जो शारीरिक सुंता न झालेल्यांपैकी असून, तोराह (नियमशास्त्र) पाळितो तो करील. २८ कारण जो बाह्यात्कारी यहूदी तो यहूदी नव्हे, आणि देहाची बाह्यात्कारी सुंता ती सुंता नव्हे. २९ परंतु जो अंतरी यहूदी तो यहूदी होय, आणि लेखाप्रमाणे व्हावयाची ती सूंता नव्हे, तर आध्यात्मिक दृष्टीने आत्म्याची व्हावयाची ती सुंता होय, अशाची प्रशंसा माणसाकडून नव्हे, तर याव्हे एलोहिम कडून होते.

**३**. १ तर मग यहूदी असण्यात फायदा तो काय? अथवा सुंतेपासून झालेला लाभ तो कोणता? २ सर्व बाबतीत पुष्कळच प्रथम हे की, याव्हे एलोहिमची वचने त्यांना सोपून दिली होती. ३ कित्येकांनी विश्वास ठेवला नाही म्हणून काय झाले? त्यांचा अविश्वासूपणाला व्यर्थ करील काय? ४ असे न होवो! तर याव्हे एलोहिम खरा आणि प्रत्येक मनुष्य लबाड दिसून येवो. ह्याप्रमाणे लिहिलेले आहे की, तू आपल्या वचनात न्यायी ठरावे, आणि न्याय होत असता तू जिंकावे. ५ पण आपला अन्याय जर याव्हे एलोहिमचे न्यायीपण स्थापित करतो, तर आपण काय म्हणावे? याव्हे एलोहिम जो क्रोधाने शासन करतो तो अन्यायी आहे काय? (मी हे मानवी व्यवहाराप्रमाणे बोलतो.) ६ असे न होवो, असे असेल तर याव्हे एलोहिम जगाचा न्याय करील? ७ पण जर माझी लबाडीमुळे याव्हे एलोहिमचा खरेपणा त्याच्या महिम्यासाठी विशेष वाढता झाला, तर अजून माझाही न्याय पाप्यासारखा का होतो? ८ आपण काही वाईट करू नये, जर त्याचा परिणाम चांगला होत असेच, कारण काही जण आपल्या विरूद्ध वाईट बोलत आहेत. आणि त्यांना मिळणारी शिक्षा त्याबद्दलचा न्याय आहे.

९ तर मग काय? आम्ही यहूदी विदेशी लोकांपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आहेत काय? मुळीच नाही! कारण यहूदी आणि हेल्लेणी
हे सारखेच पापाच्या अधिकाराखाली आहेत. १० शास्त्रात असे लिहिले आहे, "नीतिमान कोणीही नाही, एक देखील नाही." ११
समंजस असा कोणी नाही. कोणीही याव्हे एलोहिमचा शोध झटून करीत नाही. १२ ते सर्व बहकून गेले आहेत, ते एकंदर निरूपयोगी
झाले आहेत, सत्कर्म करणारा कोणीही नाही, एकदेखील नाही. १३ त्यांची तोंडे उघडया कबरांसारखी आहेत, ते आपल्या जिभांनी
लोकांना फसवितात. ते ज्या गोष्टी बोलतात, त्यात सापाचे विष असते. १४ त्यांची तोंडे शापांनी, आणि कडूपणाने भरली आहेत.
१५ त्यांचे पाय रक्तपात करण्यास नेहमी तयार असतात. १६ जेथे कोठे ते जातात तेथे विध्वंस व विपत्ती आणतात. १७ त्यांना
शांतीचा मार्ग माहीत नाही. १८ त्यांच्या डोळयांपुढे याव्हे एलोहिमचे भय नाही."

१९ आता आपणाला माहीत आहे की तोराह् जे सांगते, ते तोराह् (नियमशास्त्रा) च्या आधिन असणा-यांकरिता आहे. व मनुष्यांच्या
कामचुकार पणाला आळा घालण्यासाठी, व सर्व जगाला चांगले व पूर्ण होण्यासाठी आहे. त्या तोराह् प्रमाणे सर्व दोषी आहेत. २०
तोराह् च्या कर्मांनी कोणीही याव्हे एलोहिम समोर नीतिमान ठरणार नाही. कारण तोराह् व्दारे पापांची जाणीव होते. २१ परंतु आता
याव्हे एलोहिमची मानवाविषयीची नीतिमत्वाची कृती, तोराह् व्यतिरिक्त प्रगट झाली आहे. २२ याव्हे एलोहिमची नीतिमत्वाची कृती
ही, येशूवाह मशीहा वरील विश्वासाव्दारे आहे. आणि जे विश्वास ठेवतात त्या सर्वांसाठी दाखविली आहे, त्यात भेदभाव नाही. २३
सर्वांनी पाप केले आहे, आणि ते याव्हे एलोहिमच्या गौरवाला उणे पडले आहेत. २४ परंतु त्यांना याव्हे एलोहिमने त्याच्या कृपेने,
येशूवाह मशीहा व्दारे खंडणी भरून नीतिमान ठरविले आहे. २५ लोकांच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून मशीहाचे रक्त सांडून, याव्हे
एलोहिमने त्याला जाहीरपणे पुढे केले. याव्हे एलोहिमने हे यासाठी सिद्ध केले की, तो नीतिमान आहे, हे सिद्ध व्हावे. २६ याव्हे
एलोहिम च्या सहनशीलतेमुळे त्याने हे सिद्ध केले की, या सध्याच्या काळी तो नीतिमान आहे. यासाठी जो मशीहा वर विश्वास ठेवतो,
तो नीतिमान असावा. २७ मग आमच्या बढाई मारण्याचे प्रयोजन काय? ती वगळण्यात आली, कोणत्या प्रकारच्या नियमाने? कर्मांच्या
काय? नाही, तर ज्यामध्ये विश्वास आहे. त्याच्या आधारे, २८ कारण आपण असे मानतो की, मनुष्य याव्हे एलोहिम वरील
विश्वासाने तोराह् तील कर्मांशिवाय नीतिमान ठरतो. २९ किंवा, याव्हे एलोहिम फक्त यहूद्यांचाच आहे काय? तो विदेशी लोकांचा
नाही काय? होय, तो विदेशी लोकांचादेखील आहे.३० ज्याअर्थी, याव्हे एलोहिम एकच आहे. त्याअर्थी, तो ज्यांची सुंता झाली
त्यांच्या विश्वासाने आणि ज्यांची सुंता झालेली नाही, अशांनाही विश्वासाने नीतिमान ठरवील. ३१ तर मग आपण या विश्वासाचा
आग्रह धरून, तोराह् निरर्थक ठरवितो काय? खात्रीने नाही, आपण तर तोराह् ला मान्यता देतो.

४. १ तर मग अब्राहाम जो मानवी रितीने आपला पूर्वज याच्याविषयी आपण काय म्हणावे? २ जर अब्राहाम आपल्या कर्मांनी
नीतिमान ठरला, तर त्याला अभिमान बाळगण्यास जागा आहे. परंतु त्याला याव्हे एलोहिम समोर अभिमान बाळगणे शक्य नाही. ३
कारण शास्त्रलेख काय सांगते? "अब्राहामाने याव्हे एलोहिम वर विश्वास ठेवला, आणि त्याचा विश्वास त्याला नीतिमान असा
गणण्यात आला." ४ जो कोणी काम करतो, त्याला मजुरी ही मेहरबानी म्हणून नाही. तर त्याचा मोबदला म्हणून दिली जाते. ५
कोणताही मनुष्य कर्मे करून, याव्हे एलोहिम च्या दृष्टीने नीतिमान ठरू शकत नाही. म्हणून त्याने याव्हे एलोहिम वरच भरवसा
ठेवावा. मग याव्हे एलोहिम त्या मनुष्याच्या भरवसा स्विकारून, त्याला आपल्या दृष्टीने नीतिमान ठरवतो. दुराचारी मनुष्यालाहि
नीतिमान ठरविणारा याव्हे एलोहिमच आहे. ६ ज्याला याव्हे एलोहिम कर्मांवाचून नीतिमान ठरवितो, त्याच्याविषयीही दावीद सांगतो.
७ "ज्याच्या अपराधांची क्षमा झाली आहे, ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे तो आशिर्वादीत! ८ आशिर्वादीत तो पुरूष, ज्याच्या
पापांचा हिशोब अदोनाई लावत नाही."

९ तर मग हे नीतिमान ज्यांची सुंता झाली आहे. आणि ज्यांची सुंता झाली नाही, अशांनाही लागू होते काय? जे बेसुंती आहेत,
अशांनाही ते लागू पडते. कारण आम्ही म्हणतो, "अब्राहामाचा विश्वास त्याला नीतिमान असा गणण्यात आला." १० आणि तो कसा
गणण्यात आला, तो सुंता झालेल्या असताना का सुंता झालेली नसताना? ११ सुंता झालेला नसताना ही त्याने जो विश्वास दाखविला
,त्याचा परिणाम व नीतिमत्वाचा शिक्का म्हणून, त्याला सुंता ही खूण मिळाली यासाठी की, जे सुंता झाली नसताही, विश्वास ठेवतात

त्यांच्याकडे ते नीतिमत्व गणले जावे. (त्यांचा तो अव्बा आहे.) १२ आणि तो ज्यांची सुंता झाली आहे, त्यांचाही अव्बा आहे. पण त्यांची सुंता झालेली आहे, म्हणून तो त्यांचा अव्बा झाला नाही. तर आपला पूर्वज अब्राहाम याची सुंता होण्यापूर्वी सुद्धा तो जसा विश्वासात जगत होता, तसे जर ते जगले तरच अब्राहाम त्यांचा अव्बा होऊ शकतो.१३ अब्राहाम आणि त्याचा वंशजांना जे अभिवचन मिळाले की, ते जगाचे वारस होतील. ते अभिवचन तोराह् मुळे आले नाही, तर विश्वासाचा परिणाम असलेल्या नीतिमत्वामुळे आले. १४ लोकांना याव्हे एलोहिमने दिलेले अभिवचन, जर तोराह् पाळण्याने मिळत असेल, तर विश्वास व्यर्थ आहे. आणि याव्हे एलोहिमने अब्राहामाला दिलेले अभिवचन व्यर्थ आहे. १५ कारण तोराह् मनुष्यांच्या आज्ञाभंगामुळे, याव्हे एलोहिमचा क्रोध निर्माण करतो. आणि जेथे तोराह् नाही तेथे आज्ञा मोडणेही नाही. १६ म्हणून याव्हे एलोहिमचे वचन हे विश्वासाचा परिणाम आहे. यासाठी की, ते कृपेव्दारे मिळावे. अशा रीतीने ते अभिवचन अब्राहामाच्या सर्व संततीला आहे. फक्त तोराह् वर अवलंबून राहतात अशांसाठीच नव्हे, तर अब्राहामा प्रमाणे विश्वासाने जगणा-या प्रत्येकासाठी आहे. १७ शास्त्रलेखात असे लिहिले आहे, “मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा अव्बा केले आहे.” अब्राहामाचा याव्हे एलोहिम जो मेलेल्यांना जीवन देतो. जे अस्तित्वात नाही, त्यांना अस्तित्वात आणतो. त्या याव्हे एलोहिम समोर हे खरे अहे.

१८ आपल्या आत्म्यात आशा धरून, सर्व मानवाच्या अपेक्षेपेक्षा विरूद्ध असा विश्वास धरला, म्हणून तुझी संतती ता-यांसारखी अगणित होईल. आणि तुझे असंख्य वंशज होतील, असे जे म्हंटले आहे. त्याप्रमाणे तो अनेक राष्ट्रांचा अव्बा झाला. १९ अब्राहाम जवळ जवळ शंभर वर्षांचा झाला होता, त्यामुळे त्याचे शरीर मृतवतच झाल्यासारखे होते, तसेच साराह् ला सुद्धा मूल होणे शक्य नव्हते, अब्राहामाने याविषयी विचार केला होता, तरीपण त्याने त्याचा विश्वास कमकुवत होऊ दिला नाही. २० याव्हे एलोहिमने जे अभिवचन दिले आहे, त्याविषयी त्याने कधीच संशय बाळगला नाही. त्याने विश्वास ठेवण्याचे कधीच थांबविले नाही. तो विश्वासात बळकट होत गेला, आणि त्याने याव्हे एलोहिम ला गौरव दिले. २१ त्याची पूर्ण खात्री होती की, याव्हे एलोहिमने जे अभिवचन दिले, ते पूर्ण करण्यास तो समर्थ आहे. २२ म्हणूनच त्याला नीतिमान असे गणण्यात आले. २३ ते अभिवचन केवळ अब्राहामासाठीच होते असे नव्हे, २४ तर आपल्यासाठी सुद्धा होते, ज्याने आपल्या अदोनाई येशूवाह ला मेलेल्यांतून उठविले, आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो. २५ येशूवाह आमच्या पापांकरिता मरण्यासाठी दिला गेला. आणि त्याला मरणातून उठविण्यात आले. यासाठी की, याव्हे एलोहिम समोर आम्ही नीतिमान ठरविले जावे.

**५**. १ ज्याअर्थी विश्वासाने आपल्याला नीतिमान ठरविले आहे, त्याअर्थी आपल्या विश्वासाचा परिणाम म्हणून, आपल्याला येशूवाह मशीहा व्दारे, याव्हे एलोहिम कडून शालोम (शांति) मिळाली आहे. २ आता आपण ज्या कृपेमध्ये आहोत, त्यात त्याच्याव्दारे विश्वासाने आम्ही सुद्धा प्रवेश मिळविला आहे. आणि आम्ही याव्हे एलोहिम च्या गौरवाचे, भागीदार होण्याच्या आशेने अभिमान बाळगतो.३ याशिवाय आम्ही संकटांतही अभिमान बाळगतो. कारण आम्हांस ठाऊक आहे की, या संकटांमुळे आम्हांला अधिक धीर येतो. ४ आणि धीराने आम्ही कसोटीस उतरतो, आणि कसोटीस उतरल्याने आशा अत्पन्न होते. ५ आणि आशा लाजवित नाही, कारण आपणांस दिलेल्या क्वादोश रूहव्वा (पवित्र आत्म्या) कडून, आपल्या रूहव्वा त (आत्म्यात), याव्हे एलोहिमची प्रीति ओतली आहे. ६ आम्ही जेंव्हा आमचे स्वतःचे तारण करण्यासाठी अशक्त होतो, तेंव्हा मशीहा योग्य वेळी आमच्या साठी मरण पावला. ७ आता नीतिमान मनुष्यासाठी सुद्धा कदाचित कोणी मरणार नाही, एखादा मनुष्य चांगला असेल, तर त्याच्यासाठी मरण्याचे धाडस कदाचित कोणीतरी करील. ८ परंतु आम्ही पापी असतानाच, मशीहा आमच्यासाठी मरण पावला. त्याव्दारे त्याने दाखवून दिले की, तो आमच्यावर फार अहेद (प्रीति) करतो. ९ तर मग आता आपण मशीहाच्या रक्ताने नीतिमान ठरलो आहोत. म्हणून मशीहा व्दारे याव्हे एलोहिम च्या क्रोधापासून आपण वाचले जाणार आहोत. १० आम्ही याव्हे एलोहिमचे शत्रू असताही, त्याच्या मुलाच्या मरणाव्दारे, त्याने आमच्याशी समेट केला. त्यामुळे आता आम्ही याव्हे एलोहिमचे मित्र असल्यामुळे, याव्हे एलोहिम आम्हांला त्याच्या मुलाच्या जीवनाव्दारे राखील. ११ इतकेच नव्हे, तर ज्याच्याव्दारे आमचा याव्हे एलोहिम बरोबर समेट झाला. त्या आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा व्दारे, आम्ही सुद्धा याव्हे एलोहिम विषयी अभिमान बाळगतो.

१२ म्हणून पाप जसे एका मनुष्याव्दारे जगात आले, आणि पापाव्दारे मरण आले. तसेच सर्वांनी पाप केल्यामुळे, सर्व माणसांमध्ये मरण आले. १३ तोराह् (नियमशास्त्र) जगात येण्यापूर्वी पाप जगात आले होते. परंतु तोराह् नसल्यामुळे कोणाच्याही हिशोबी पाप गणले जात नव्हते. १४ परंतु मरणाने आदामाच्या काळापासून ते मोशेच्या काळापर्यंत राज्य केले. ज्यांनी पाप केले नाही, त्याच्यांवर सुद्धा मरणाने राज्य केले. याव्हे एलोहिमची आज्ञा न मानून आदामाने पाप केले, म्हणून तो मेला. आदाम तर जो मशीहा हा येणार होता, त्याचे प्रतिरूप आहे. १५ पण याव्हे एलोहिमची मोफत देणगी आदामाच्या पापा सारखी नाही, कारण आदामाच्या पापामुळे पुष्कळ जण मरण पावले. याव्हे एलोहिमची कृपा, आणि दान, एक मानव येशूवाह मशीहा च्या कृपेव्दारे आली, व विशेषेकरून सर्व लोकांकरिता विपुल झाली.

१६ आदामाने पाप केल्यानंतर तो दोषी ठरला होता, पण याव्हे एलोहिम ची देणगी वेगळी आहे. याव्हे एलोहिम ची मोफत देणगी पुष्कळ पापांनंतर आली, आणि त्या देणगीमुळे तिने, आपल्या लोकांना याव्हे एलोहिम समोर नीतिमान केले. १७ एका मनुष्याच्या पापांमुळे मरणाने राज्य केले. पण आता काही लोक याव्हे एलोहिम च्या कृपेची विपुलता, आणि देणगी, जिच्यामध्ये नीतिमान आहे. ते अनुभवतात ते विशेषेकरून येशूवाह मशीहा व्दारे जीवनात राज्य करतील. १८ म्हणून एका पापामुळे सर्व मनुष्यांना शिक्षा झाली. तसेच एका नीतिमत्वाच्या कृत्याने, सर्व लोकांना अनंतकालचे जीवन देणारे नीतिमत्व मिळाले. १९ यास्तव आदामाच्या आज्ञाभंगामुळे पुष्कळांना पापी ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे मशीहा च्या आज्ञापालनाने पुष्कळांना नीतिमान ठरविण्यात येईल. २० पापे वाढण्यासाठी म्हणून तोराह् चा प्रवेश झाला. परंतु जेथे पाप वाढले, तेथे याव्हे एलोहिम ची कृपाही विपुल झाली. २१ अशासाठी की, जसे पापाने मरणाच्या योगे राज्य केले. त्याच रीतीने याव्हे एलोहिम ची कृपाही नीतिमत्वाने, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा व्दारे अनंतकाळच्या जीवनासाठी राज्य करील.

**६**. १ तर मग आपण काय म्हणावे? याव्हे एलोहिम ची कृपा वाढावी म्हणून आपण पापांत राहावे काय? २ खात्रीने नाही, आपण जे पापाला मेलो, ते अजूनही जिवंत कसे राहू? ३ तुम्हांला माहीत नाही का की, ज्या आपण अदोनाई येशूवाह मशीहा मध्ये बाप्तिस्मा घतला होता. त्या आपला त्याच्या मरणातही बाप्तिस्मा झाला. ४ म्हणून आपण त्याच्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो. यासाठी की, अब्बाच्या गौरवाने मशीहा जसा मेलेल्यांतून उठविला गेला. तसे आम्हीही जीवनाच्या नवीन पणात चालावे. ५ कारण जर त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने आपण त्याच्याशी जोडलो आहोत, तर त्याच्या पुनरूत्थानाच्या प्रतिरूपाने त्याच्याशी जोडले जाऊ. ६ आपणाल हे माहीत आहे की, आपल्यातील जुना मनुष्य, मशीहा बरोबर वधस्तंभावर खिळला गेला. यासाठी की, आपल्या पापमय शरीराचा नाश व्हावा, व यापुढे आपण पापाचे दास होऊ नये. ७ कारण जो कोणी मशीहा बरोबर मरतो, तो पापापासून मुक्त होऊन नीतिमान होतो.

८ आणि जर आपण मशीहा बरोबर मेलो, तर आम्ही विश्वास धरतो की, त्याच्याबरोबर जिवंतही राहू. ९ कारण आम्हांस माहीत आहे की, मशीहा जो मेलेल्यांतून उठविला गेला, तो यापुढे मरणार नाही. मरणाची त्याच्यावर सत्ता चालणार नाही. १० जे मरण तो मेला, ते एकदाच पापासाठी मेला. परंतु जे जीवन तो जगतो, ते तो याव्हे एलोहिम साठी जगतो. ११ त्याच रीतीने तुम्ही स्वतःला पापाला मेलेले पण मशीहा येशूवाह मध्ये, व याव्हे एलोहिम साठी जिवंत असे समजा. १२ यासाठी की, तुम्ही पापाच्या वाईट वासना पाळाव्यात, म्हणून पापाने तुमच्यावर राज्य करू नये. १३ आणि अनीतिची साधने व्हावीत, म्हणून तुम्ही आपल्या शरीराचे अवयव पापाच्या स्वाधीन करू नका. त्याऐवजी तुम्ही जे मरणातून उठविलेले लोक, व जे आता जिवंत ते आपणांला याव्हे एलोहिम च्या स्वाधीन करा. आपल्या शरीराचे अवयव नीतिची साधने व्हावीत, म्हणून याव्हे एलोहिम च्या स्वाधीन करा. १४ पाप तुम्हांवर राज्य करणार नाही, कारण तुम्ही तोराह् स्वाधीन नाही, तर याव्हे एलोहिम च्या कृपेच्या अधीन आहात.

१५ तर मग आपण काय करावे? आपण तोराह् स्वाधीन नसून याव्हे एलोहिम च्या कृपेच्या अधीन आहोत, म्हणून पाप करावे काय? १६ खात्रीने नाही तुम्हांला माहीत नाही काय की, जेंव्हा तुम्ही स्वतःला आज्ञा पालना करता, एखाद्याच्या स्वाधीन करता तर ज्याची

आज्ञा तुम्ही पाळता, त्याचे गुलाम आहात. तुम्ही पापांत चालू शकता, किंवा याव्हे एलोहिम ची आज्ञा पाळू शकता, पापांमुळे आध्यात्मिक मरण येते. पण याव्हे एलोहिम ची आज्ञा पाळल्याने तुम्हांला नीतिमान मिळते. १७ पूर्वी तुम्ही पापाचे गुलाम होता, पाप तुम्हांला काबूत ठेवीत होते. पण याव्हे एलोहिमचे उपकार मानू या की, ज्या गोष्टी तुम्हांला शिकविल्या गेल्या, त्या तुम्ही पूर्णपणे पाळल्या. १८ तुम्हांला पापांपासून मुक्त केले गेले, आणि नीतिमत्वाचे गुलाम करण्यात आले. १९ तुमच्या शरीराच्या दुर्बलतेमुळे व लोकांना समजावे, म्हणून मी उदाहरणाचा उपयोग करीत आहे. कारण जसे तुम्ही आपले अवयव अशुद्धतेच्या, आणि परिणाम म्हणून गुलाम होण्यासाठी स्वैरचाराच्या अधीन केले. त्याच रीतीने आता आपल्या शरीराचे अवयव याव्हे एलोहिम च्या सेवेला नीतिमत्वाचे गुलाम व्हावे, म्हणून अर्पण करा. २० कारण जेंव्हा तुम्ही पापाचे गुलाम होता, तेंव्हा नीतिमत्वा संबंधाने मोकळे होता. २१ आणि त्यावेळेला तुम्हांला काय फळ मिळाले, त्या गोष्टीची तुम्हांला आता लाज वाटते, ज्याचा शेवट मरण आहे. २२ परंतु आता तुम्हांला पापापासून मुक्त करून, याव्हे एलोहिमचे गुलाम केले आहे. याव्हे एलोहिम च्या सेवेसाठी तुमचे फळ तुम्हांला मिळाले आहे, व त्याचा शेवटचा परिणाम, म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे. २३ कारण पापाची मजुरी मरण आहे, परंतु याव्हे एलोहिम ची, मशीहा येशूवाह मध्ये दिलेली मोफत देणगी, म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे.

**७**. १ बंधूनो तुम्हांस माहीत नाही काय? कारण तोराह् महीत असलेल्या लोकांबरोबर मी बोलत आहे. की, जो पर्यंत मनुष्य जिवंत आहे, तो पर्यंत तोराह् त्याच्यावर सत्ता चालविते. २ कारण विवाह झालेली स्त्री जोपर्यंत तिचा नवरा जिवंत आहे, तोपर्यंत ती तोराह् ने बांधलेली असते. पण जर तिचा नवरा मेला, तर ती नव-याविषयीच्या नियमातून मोकळी होते. ३ म्हणून नवरा जिवंत असताना ती दुस-याची झाली, तर तिला व्यभिचारिणी असे म्हणतील. पण जर तिचा नवरा मरण पावला, तर ती विवाहाच्या नियमातून मुक्त होते. आणि जरी ती दुस-या पुरूषाची बायको झाली, तरी ती व्यभिचारिणी होत नाही. ४ माझ्या बंधूनो अशाच प्रकारे तोराह् प्रमाणे तुम्हांलाही मशीहा च्या शरीराव्दारे ठार मारण्यात आले. यासाठी की, तुम्ही दुस-या पुरूषाचे (म्हणजे मशीहाचे) जो मेलेल्यातून उठविला गेला होता, त्याचे व्हावे. यासाठी की, याव्हे एलोहिमला आपण फळ द्यावे. ५ कारण जेंव्हा आम्ही आमच्या पापी मानवी स्वभावांप्रमाणे जगत होतो. तेंव्हा पापी वासना तोराह् च्या व्दारे मरणाला फळ देण्यासाठी, आपल्या अवयवामध्ये कार्य करीत होतो. ६ ज्या तोराह् मध्ये आम्ही कैदी झालो होतो. त्यात आम्ही मेलेलो असल्याने, आता आम्ही तोराह् पासून मुक्त आहोत. तेंव्हा आता आम्ही याव्हे एलोहिम आमचा अदोनाई याची शास्त्रलेखाच्या जुनेपणाप्रमाणे नव्हे, तर रूहुव्वा च्या नवेपणाप्रमाणे सेवा करतो.

७ तर मग आता आपण काय म्हणतो? तोराह् पाप आहे असे आम्ही म्हणावे काय? खात्रीने नव्हे! कारण तोराह् वाचून पाप काय आहे, हे मला समजले नसते. खरोखर लोभ धरू नको असे तोराह्ने सांगितले नसते, तर लोभ म्हणजे काय हे मला माहीत नसते. ८ परंतु पापाने संधी साधली, आणि मजमध्ये सर्व प्रकारचा लोभ भरला. कारण तोराह् शिवाय पाप मृतवत आहे. ९ एके काळी मी तोराह् शिवाय जगत होतो. परंतु जेंव्हा तोराह् आले तेंव्हा पाप संजीवित झाले. १० आणि मी मरण पावलो, जी आता जीवन आणण्यासाठी योजण्यात आली होती, तिचा परिणाम माझ्यासाठी मरण असा झाला. ११ कारण पापाने संधी साधली, आणि त्या आज्ञेयोगे मला फसविले, व तिच्याव्दारे ठार केले. १२ म्हणून आम्ही असा निष्कर्ष काढतो की, तोराह् क्वादोश आहे, आणि आज्ञा पवित्र, नीतिमान, आणि उत्तम होते. १३ तर ते माझ्यासाठी मरण होते काय? निश्चत नाही! परंतु पाप हे पाप म्हणून ओळखले जावे, म्हणून त्याने जे उत्तम त्याव्दारे मजमध्ये मरण निर्माण केले. यासाठी की, पाप त्या आज्ञेमुळे कमालीचे पापीष्ट व्हावे.

१४ कारण आम्हांला माहीत आहे की, तोराह् आत्मिक आणि दैहिक मनुष्य आहे. मी गुलाम म्हणून पापांत शरणागत राहावे, म्हणून विकलेला असा आहे. १५ मी काय करतो हे मला माहीत नाही, कारण काय करायचे हे मला माहीत नाही, कारण ज्या गोष्टीचा मी व्देष करतो, त्याच गोष्टी मी करतो. १६ आणि ज्या गोष्टी मला कराव्याशा वाटत नाही त्याच करतो, तर तोराह् उत्तम आहे हे मान्य करतो. १७ परंतु खरे तर मी त्या करतो असे नव्हे, तर माझ्या ठायी वसत असलेले पाप, त्या गोष्टी करते. १८ होय, मला माहीत आहे की, जे चांगले आहे ते माझ्यामध्ये वसत नाही. १९ चांगले करण्याची माझ्या ठायी इच्छा आहे, परंतु तसे मी करीत नाही.

त्याऐवजी जे फार वाईट व जे मला करावेसे वाटत नाही, तेच करतो. २० आणि ज्या अर्थी ज्या गोष्टी मला कराव्याशा वाटत नाहीत त्या मी करतो. तेंव्हा खरे तर ज्या गोष्टी मी करतो असे नाही, तर माझ्याठायी असणारे पाप त्या गोष्टी करते.

२१ तर माझ्यामध्ये मला हा नियम आढळतो की, माझ्यातील मनुष्याला चांगले करावेसे वाटते, पण वाईट ही एकच गोष्ट माझ्याबरोबर आहे. २२ माझ्या आत असलेला मनुष्य याव्हे एलोहिम च्या तोराह् मुळे आनंद करतो. २३ परंतु माझ्या अवयवात मला निराळाच नियम कार्य करताना दिसतो. तो माझ्या मनावर अमल करण्या-या नियमाबरोबर लढतो, आणि पापाने मजवर लादलेल्या नियमाचा, जो माझ्या शरीरात कार्य करतो, तोच कैदी करतो. २४ मी अत्यंत दुःखी मनुष्य आहे! मरणाधीन असलेल्या शरीरापासून मला कोण सोडवील? २५ परंतु आमचा अदोनाई येशूवाह मशीहा याच्याव्दारे, याव्हे एलोहिमचे आभार मानतो. तर मग माझ्या मनाने मी याव्हे एलोहिम च्या नियमाचा गुलाम आहे. पण माझ्या पापी स्वभावाने, मी पापाने माझ्यावर लादलेल्या नियमाचा गुलाम आहे.

८. १ म्हणून आता जे मशीहा येशूवाह मध्ये आहेत, त्यांना शिक्षा नाही. २ कारण रूहुव्वा चा जो नियम मशीहा येशूवाह मध्ये जीवन देतो. त्याने पापाचा नियम जो तुम्हांला मरणाकडे नेतो, त्यापासून मुक्त केले आहे. ३ तोराह् समर्थ आहे पण आपण दुर्बळ आहोत, त्यामुळे वाचू शकत नाही. याव्हे एलोहिमने आपल्या मुलाला पापी देहाच्या प्रतिरूपाने, व पापाकरिता पाठवून, मशीहा च्या देहामध्ये पापाला न्यायदंड ठरविला. ४ यासाठी की, नीतिच्या व आवश्यक गोष्टी आपण जे देहाच्या पापमय स्वभावाप्रमाणे नव्हे, तर रूहुव्वा प्रमाणे चालत, त्या आमच्याव्दारे पूर्ण व्हाव्यात. ५ कारण जे त्यांच्या मानवी पापी देहाप्रमाणे जगतात, ते देहाच्या गोष्टींचा विचार करतात. परंतु जे रूहुव्वाने चालतात, व ज्यांचे मन आत्म्याच्या गोष्टींकडे लागलेले असते, ते त्याप्रमाणे जीवन जगतात. ६ देहाचे चिंतन हे मरण आहे, पण रूहुव्वाचे मनन हे जीवन, आणि शांति आहे. ७ मानवी स्वभावाचे अधिकार असलेले पापी मन, म्हणजे याव्हे बरोबर वैर आहे. कारण ते याव्हे एलोहिम च्या नियमाच्या आधीन होत जाही, व त्याला आधीन होताही येत नाही. ८ कारण जे देहस्वभावाच्या आधीन आहेत, त्यांना याव्हे एलोहिमला प्रसन्न करता येत नाही.

९ याव्हे एलोहिमचा रूहुव्वा तुम्हांमध्ये राहतो, तर तुम्ही देहाचे नसून रूहुव्वाचे आहात. परंतु जर कोणाला मशीहाचा रूहुव्वा नसेल, तर तो मशीहाचा नाही. १० उलट जर मशीहा तुम्हांमध्ये आहे, व तुमचा देह पापामुळे मेला आहे, तरी नीतिमत्वामुळे तुमच्या रूहुव्वा तच जीवन आहे. ११ आणि ज्या रूहुव्वाने येशूवाह मरणातून उठविला, तो त्याच रूहुव्वा तुम्हांमध्ये राहतो, त्या तुमच्या मर्त्य शरीराला जीवन देईल. १२ तर मग बंधूनो, आम्ही कर्जदार आहोत. देहाप्रमाणे जगण्यास देहाचे नव्हे, १३ कारण जर तुम्ही तुमच्या पापी देहस्वभावा प्रमाणे जीवन जगाल, तर तुम्ही मरणार आहात. परंतु रूहुव्वा च्या करवी, जर तुम्ही देहाची कर्मे ठार माराल, तर तुम्ही जगाल. १४ कारण जितक्यांना याव्हे एलोहिमचा रूहुव्वा चालवितो, तितके याव्हे एलोहिमची मुले आहेत. १५ पुन्हा भीति वाटू नये, म्हणून तुम्हांला दत्तकपणाचा रूहुव्वा मिळाला आहे. त्याच्यायोगे आम्ही “अब्बा, अब्बा” अशी हाक मारतो. १६ तो रूहुव्वा स्वतः आपल्याबरोबर साक्ष देतो की, आपण याव्हे एलोहिमची मुले आहोत. १७ आपण जर याव्हे एलोहिमची मुले आहोत, तर आम्ही वारसही आहोत आणि मशीहा बरोबर वारस आहोत. खरोखर आपण त्याच्याबरोबर दुःखे भोगत असेल तरच, त्याच्याबरोबर आपणांस गौरवही मिळावे.

१८ कारण मी असे मानतो, आपल्याठायी जे गौरव प्रगट होणार आहे, त्यापुढे या आताच्या काळाची दुःखे ही काहीच नाहीत. १९ कारण सृष्टी याव्हे एलोहिम च्या मुलाच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा, अत्यंत उत्कंठेने करीत आहे. २० कारण सृष्टी व्यर्थतेच्या स्वाधीन केली गेली, ती स्वतःच्या इच्छेने नव्हे तर ज्याने तिला स्वाधीन केले, त्याच्यामुळे ती स्वाधीन केली गेली. २१ ती आशा धरते, कारण सृष्टीही स्वतः अशुद्धतेच्या दास्यांतून सोडवली जाईल, आणि तिला याव्हे एलोहिम च्या लेकरांची गौरवयुक्त मुक्तता मिळावी, ह्या आशेने वाट पहाते. २२ कारण आपल्याला ठाऊक आहे की, सर्व सृष्टी मिळून आजपर्यंत कण्हत आहे, व वेदना भोगीत आहे. २३ इतकेच नाही तर ज्या आपणांस रूहुव्वा चे प्रथमफळ मिळाले आहे, ते आपण स्वतःही दत्तकपणांची, म्हणजे नाशवंत आपल्या शरीराच्या खंडणी भरून मिळवलेल्या सुटकेची वाट पाहत, स्वतःमध्ये कण्हत आहो. २४ कारण आपण आशा धरून तारण पावलो,

पण जी आशा पाहण्यात आली, ती आशा नव्हे. कारण जे आपल्या पाहण्यात आले त्याची आशा कोण धरील? २५ पण जे आपणाला दिसत नाही, त्याची आशा जर आपण धरतो, तर धीराने आपण त्याची वाट पाहतो.

२६ त्याप्रमाणेच रूहव्वा ही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो. कारण आपण प्रार्थना कशी करावी, हे आपल्याला ठाऊक नाही. परंतु रूहव्वा स्वतः अनिर्वाच्य कण्हण्यांनी आपल्यासाठी मध्यस्थी करतो. २७ आणि अंतःकरणे शोधतो त्याला आत्म्याचा मनोभाव काय आहे, हे ठाऊक आहे. कारण तो क्वादोश (पवित्र) लोकांसाठी, याव्हे एलोहिम च्या इच्छे प्रमाणे मध्यस्थी करतो. २८ आपल्याला तर ठाऊक आहे की, याव्हे एलोहिम वर प्रीति करणारे, म्हणजे जे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेले आहेत, त्यांच्या हितासाठी सर्व गोष्टी मिळून कार्य करणा-या होतात. २९ कारण ज्यांना त्याने पूर्वी ओळखले, त्यांना त्याने आपल्या मुलाच्या प्रतिमेप्रमाणे होण्यास पूर्वी नेमले. यासाठी की, तो पुष्कळ बंधूमध्ये ज्येष्ठ व्हावा. ३० आणखी ज्यांना त्याने पूर्वी नेमले, त्यांना बोलावलेही आणि ज्यांना त्याने बोलावले, त्यांना त्याने न्यायी ठरवले. आणि ज्यांना त्याने न्यायी ठरवले, त्यांना त्याने गौरविले.

३१ तर मग या गोष्टीविषयी आपण काय म्हणावे? याव्हे एलोहिम आपणांला अनुकूल असला, तर आपणांला प्रतिकूल कोण? ३२ ज्याने आपल्या मुलाला देखील राखून ठेवले नाही, तर आपणा सर्वांकरिता त्याला देऊन टाकले. तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्व गोष्टी कशा देणार नाही? ३३ याव्हे एलोहिम च्या निवडलेल्यांवर आरोप कोण ठेवील? याव्हे एलोहिमच न्यायी ठरवणारा आहे, ३४ तर दंडाज्ञा करणारा कोण? जो मेला पण विशेषेकरून पुन्हा उठवला गेला, जो याव्हे एलोहिम च्या उजवीकडे आहे, जो आपल्यासाठी मध्यस्थीही करीत आहे, तो मशीहा येशूवाह आहे. ३५ मशीहाच्या प्रीतिपासून आपल्याला कोण वेगळे करील? संकटे, किंवा क्लेश, किंवा छळणूक, किंवा भूक, किंवा नग्नता, किंवा धोका, किंवा तरवार, ही वेगळे करतील काय? ३६ असे लिहिले आहे की, दिवसभर आम्ही तुझ्यामुळे वधले जात आहो, वधावयाच्या मेंढरांसारखे आम्हांला गणले आहे. ३७ तथापि ज्याने आपणांवर प्रीति केली, त्याच्याव्दारे या सर्व गोष्टीमध्ये आपण अत्यंत विजयी आहो. ३८ कारण माझी खात्री आहे की, मरण, किंवा जीवन, किंवा मालाक (दूत), किंवा अधिकार, किंवा हल्लीच्या गोष्टी, किंवा होणा-या गोष्टी, किंवा सामर्थ्ये, ३९ किंवा उंची, किंवा खोली, किंवा दुसरी कोणतीही उत्पन्न झालेली वस्तू, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा मध्ये, जी याव्हे एलोहिमची अहेद (प्रीति) आहे, तिच्यापासून आपणांस वेगळे करायला समर्थ होणार नाही.

९. १ मी मशीहा मध्ये खरे बोलतो, खोटे बोलत नाही. क्वादोश रूहव्वा ने (पवित्र आत्म्याने) बोध केलेला, माझा विवेक मजविषयी साक्ष देतो २ की, मला मोठे दुःख आहे. आणि माझ्या आत्म्यात सतत वेदना आहेत. ३ कारण माझे बंधू, वंशाने, माझे नातेवाईक, यांच्याऐवजी मी स्वतः शापित व्हावे, आणि मशीहा पासून मी वेगळा केलेला असावा, अशी मी इच्छा करतो. ४ ते इस्त्राएली कोण आहेत? ते याव्हे एलोहिमचे निवडलेले लोक आहेत. या लोकांकडे याव्हे एलोहिमचे गौरव, आणि याव्हे एलोहिमने त्यांच्याशी केलेला करार आहे, याव्हे एलोहिमने त्यांना तोराह् दिले. आणि उपासना करण्याचा योग्य मार्ग दिला. आणि याव्हे एलोहिमने त्यांना त्याचे अभिवचन दिले आहे. ५ त्यांचे पूर्वज थोर आहेत, मानवी दृष्टीने सांगताना मशीहा त्यांच्यापासून आला. तो सर्वांच्या वर सदासर्वकाळ धन्यवादित आहे, आमेन. ६ परंतु याव्हे एलोहिमचे वचन व्यर्थ झाले असे नाही, कारण सर्व जण जे इस्त्राएला पासून आले आहेत, ते खारोखरच इस्त्राएली आहेत असे नाही. ७ याचा अर्थ असाही नाही की, ते अब्राहामा पासून आलेले आहेत, म्हणून खरोखरच ती अब्राहामाची मुले आहेत, तर याव्हे एलोहिमने म्हंटल्याप्रमाणे, इसहाकाच्या वंशातील लोकांना तुझे संतान म्हंटले जाईल. ८ म्हणजे देहदृष्टया जन्मली, ती याव्हे एलोहिमची मुले आहेत असे नाही, तर वचनाच्या मुलांना संतान म्हंटले आहे. ९ नेमलेल्या वेळी मी परत येईन त्यावेळेला साराह् ला मुलगा होईल, आणि हे ते वचन आहे.

१० इतकेच नव्हे तर रिबेका सुद्धा एकाकडून, म्हणजे आपला पूर्वज इसहाक याच्याकडून गरोदर झाली. ११ मुले जन्माला येण्यापूर्वी, आणि त्यांनी काही बरे किंवा वाईट केले नव्हते. तेंव्हा निवडीवरून असणारा याव्हे एलोहिमचा पूर्वसंकल्प कायम राहावा, म्हणजे कर्मावरून नाही, तर बोलावणा-याच्या इच्छेवरून घडावे. १२ म्हणून तिला सांगितले होते की, वडील धाकटयाची सेवा करील. १३

शास्त्रलेखात लिहिले आहे की, मी याकोबा वर प्रीति केली, आणि एसावाचा व्देष केला. १४ तर मग आपण काय म्हणावे? याव्हे एलोहिम च्या ठायी अन्याय नाही आहे काय? निश्चित नाही! १५ कारण तो मोशेला म्हणाला, ज्याच्यावर मला दया करायची, त्यावर मी दया करीन. आणि ज्याच्यावर करूणा करायची, त्याच्यावर करूणा करीन. १६ म्हणून ते इच्छा करणा-यावर, किंवा पाळणा-या वर नव्हे, तर दयाळू याव्हे एलाहिम वर अवलंबून आहे. १७ कारण शास्त्रलेखात याव्हे एलोहिम फारोला म्हणाला, याच हेतूसाठी मी तुला उच्च केले. यासाठी की, मी तुझ्यामध्ये आपले सामर्थ्य दाखवावे, आणि माझे नाव सर्व पृथ्वीवर गाजविले जावे. १८ म्हणून याव्हे एलोहिमला ज्याच्यावर दया करायची त्याच्यावर दया करतो, आणि ज्यास कठीण करायचे त्यास कठीण करतो. १९ तुमच्यापैकी एखादा मला म्हणेल, याव्हे एलोहिम जर आमच्या कृति नियंत्रित करतो, तर तो अजूनही आमचे व्दोष का काढतो? शेवटी त्याच्या इच्छेला कोण विरोध करील? २० होय, हे मानवा याव्हे एलोहिमला उलट उत्तर देणारा तू कोण आहेस? जे घडले आहे, ते घडणा-याला तू मला असे का केलेस, असे विचारील काय?

२१ एका ठराविक गोळयापासून एक भांडे गौरवासाठी, आणि एक भांडे अपमानासाठी करावे, असा कुंभाराला मातीवर अधिकार नाही काय? २२ परंतु याव्हे एलोहिमला जरी त्याचा राग, आणि सामर्थ्य व्यक्त करावेसे वाटत होते, तरी त्याने जी माणसे नाशासाठी नेमलेली होती, त्यांचे मोठया धीराने सहन केले नाही काय? २३ जी त्याच्या दयेची पात्रे होणार होती. त्यांना त्याने गौरव मिळण्यासाठी तयार केले, त्यांचे त्याने सहन केले. यासाठी की, त्यांना त्याच्या दयेची विपुलता कळावी. २४ ज्या आपणांला त्याने फक्त यहूद्यांतूनच नव्हे, तर विदेशातूनही बोलाविले होते. २५ होशेया च्या ग्रंथात शास्त्रलेख सांगतो, “जे माझे लोक नव्हते, त्यांना मी माझे लोक म्हणेन. आणि जी प्रिय नाही, तिला प्रिय म्हणेन.” २६ आणि असे होईल की, जेथे माझे लोक नाहीत असे म्हंटले होते, तेथे त्यांना जिवंत याव्हे एलोहिम ची मुले म्हणण्यात येईल. २७ आणि यशया इस्त्राएल विषयी असे ओरडून सांगतो की, “जरी इस्त्राएलाविषयी मुलांची संख्या समुद्राच्या वाळू इतकी असली, तरी त्यांच्यातील फक्त थोडेच तारण पावतील. २८ कारण पूर्ण करून व आटोपते घेऊन अदोनाई पृथ्वीवर आपले वचन अंमलात आणील. २९ आणि जसे यशयाने पूर्वी सांगितले होते, “जर सेनाधीश याव्हे ने आम्हांसाठी बीज राहू दिले नसते, तर आम्ही सदोम आणि गमोरा सारखे झालो असतो.” ३० तर मग आपण काय म्हणावे? आम्ही असे अनुमान काढतो की, जे यहूदीतर याव्हे एलोहिमला अपेक्षित असलेल्या नीतिमत्वाच्या मागे लागले नव्हते. त्यांना त्यांचे न्यायीपण विश्वासाचा परिणाम म्हणून मिळाले. ३१ परंतु इस्त्राएल लोक जे तोराह् च्या पालनातून मिळणा-या नीतिमत्वाच्या मागे लागले होते. त्यांना तोराह् मिळाले नाही, ३२ का नाही? कारण ते हे नीतिमान विश्वासाने नाही, तर त्यांनी केलेल्या कर्मांनी मिळेल. असे समजून त्याच्या मागे लागले होते, व ते अडखळण्याच्या दगडावर ठेचाळले. ३३ शास्त्रलेखात असे लिहिले आहे, “पाहा, मी त्सिय्योनात अडखळण्याचा दगड आणि अपाय करणारा खडक ठेवतो. परंतु जो त्याच्यावर विश्वास ठेवतो तो लज्जित होणार नाही.”

**१०.** १ बंधूनो इस्त्राएलाच्या वतीने माझी मनीषा, आणि याव्हे एलोहिम जवळ प्रार्थना आहे. की, २ त्यांचे तारण व्हावे, कारण मी त्यांच्याविषयी साक्ष देतो की, त्यांना याव्हे एलोहिम विषयी कळकळ आहे, परंतु ती ज्ञानावर आधारित नाही. ३ याव्हे एलोहिम पासून मिळणा-या नीतिमत्वाविषयी त्यांना माहिती नसल्यामुळे, ते आपलेच नीतिमत्व स्थापावयास पाहत होते. त्यामुळे ते याव्हे एलोहिम च्या नीतिमत्वाला वश झाले नाहीत. ४ कारण मशीहा तोराह् चा शेवट आहे. यासाठी की, जे विश्वास ठेवतात त्यांना नीतिमत्व मिळावे. ५ तोराह् व्दारे मिळणा-या नीतिमत्वाविषयी मोशे लिहितो, “जो मनुष्य या गोष्टी करतो, तो त्याकडून जगेल.” ६ विश्वासाने मिळणारे नीतिमत्व हे सांगते, “तुम्ही आपल्या मनात म्हणू नका की, आकाशात कोण जाईल? (म्हणजे मशीहाला खाली आणावयास) ७ किंवा खाली शेओल त (अधोलोकात) कोण जाईल? (म्हणजे मशीहाला मेलेल्यातून वर आणायला) ८ नाही! शास्त्रलेख काय सांगते? “ते वचन तुमच्याजवळ आहे, तुमच्या मुखात व तुमच्या आत्म्यात आहे.” आमच्या विश्वासाचा विषय असलेले जे वचन आम्ही गाजवीत आहो, ते हेच होय.९ की, येशूवाह हाच अदोनाई आहे, असे जर तू आपल्या मुखाने कवूल करिशील, आणि याव्हे एलोहिमने त्याला मेलेल्यांतून उठविले, असा आपल्या आत्म्यात विश्वास ठेवशील, तर तुझे तारण होईल.

१० कारण जो आत्म्याने विश्वास ठेवितो, तो नीतिमान ठरतो. व जो मुखाने कबूल करितो, त्याचे तारण होते. ११ कारण शास्त्रलेख सांगतो, त्याच्यावर विश्वास ठेवणारा कोणीहि फजित होणार नाही. १२ यहूदी व हेल्लेणी ह्यांच्यामध्ये भेद नाही, कारण सर्वांचा अदोनाई तोच, आणि जे त्याचा धावा करितात, त्या सर्वांना पुरविण्याइतका तो संपन्न आहे.१३ कारण जो कोणी अदोनाईचे नाव घेऊन हाक मारतो, त्याचे तारण होईल. १४ परंतु ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही, त्याला हाक मारणे त्यांना कसे शक्य होईल? ज्याच्याविषयी त्यांनी ऐकले नाही, त्याच्या वर विश्वास ठेवणे, त्यांना कसे शक्य होईल? आणि जर कोणी त्यांना घोषणा केली नाही, तर ते कसे ऐकतील? १५ त्यांना जर पाठविले नाही तर घोषणा करणे, त्यांना कसे शक्य होईल? असे लिहिले आहे की, “शुभवार्ता सांगणा-याचे पाय किती मनोरम आहेत!

१६ परंतु सर्वच यहूद्यांनी ती शुभवार्ता स्विकारली नाही. यशयाने म्हंटल्याप्रमाणे, “अदोनाई, आम्ही ज्या गोष्टी त्यांना सांगितल्या, त्यावर कोणी विश्वास ठेवला? १७ तर विश्वास शुभवार्ता ऐकण्यावरून होतो, आणि शुभवार्ता ऐकणे, येशूवाह मशीहा च्या वचनाच्याव्दारे होते.१८ परंतु मी म्हणतो, “त्यांनी आमची घोषणा ऐकली नव्हती काय?” होय, त्यांनी ऐकाली रूहुव्वा (आत्मा) म्हणतो, “त्यांच्या आवाजाचा नाद सर्व पृथ्वीवर गेला आहे, आणि त्यांचे शब्द पृथ्वीच्या शेवटापर्यंत गेले आहेत.” १९ परंतु मी म्हणतो, “इस्त्राएल लोकांना कळले नव्हते काय? होय, त्यांना कळले प्रथम मोशे सांगतो, “खरे तर ज्या लोकांचे राष्ट्र नाही त्यांचा उपयोग करून, मी तुम्हांला ईर्षायुक्त करीन विश्वासहीन राष्ट्राचा उपयोग करून, मी तुम्हांला राग आणीन.” २० नंतर यशया फार धीट होऊन सांगतो, “जे मला शोधीत नव्हते त्यांना मी सापडलो. जे माझ्याविषयी विचारीत नव्हते, त्यांना मी प्रगट झालो.” २१ परंतु याव्हे एलोहिम इस्त्राएल लोकांविषयी म्हणतो, “ज्या लोकांनी माझी आज्ञा मोडली आणि मला विरोध केला, त्यांच्याकडे सर्व दिवसभर मी आपले हात पसरले आहेत.”

११. १ तर मग मी म्हणतो, “याव्हे एलोहिमने आपल्या लोकांना सोडून दिले आहे काय? निश्चित नाही! कारण मीही इस्त्राएली आहे. अब्राहामा पासूनचा बन्यामिन वंशातला. २ याव्हे एलोहिमला ज्यांचे पूर्वज्ञान होते. त्या इस्त्राएली लोकांना त्याने सोडून दिले नाही, एलिया संबंधी शास्त्रलेख काय सांगते, ते तुम्हांस ठाऊक नाही काय? तो याव्हे एलोहिम जवळ इस्त्राएल लोकांविरूद्ध अशी विनंती केली की, ३ “हे अदोनाई त्यांनी तुझ्या नव्वीईम ला (संदेष्टयांना) ठार मारले आहे. त्यांनी तुझ्या वेदया पाडून टाकल्या आहेत. तुझ्या नव्वीईम (संदेष्टया) पैकी मीच एकटा राहिलो आहे. आणि ते माझाही जीव घ्यावयास पाहतात. ४ परंतु त्याला याव्हे एलोहिम कडून काय उत्तर मिळाले? “ज्यांनी बालापुढे गुडघे टेकले नाहीत, अशी सात हजार माणसे मी आपणासाठी राखून ठेवली आहेत. ५ त्याच प्रमाणे, हल्ली याव्हे एलोहिम च्या कृपेच्या निवडीप्रमाणे काही शिल्लक राहिले आहे.६ आणि जर तो याव्हे एलोहिम च्या कृपेचा परिणाम असेल, तर तो लोकांच्या कर्माचा नाही. नाही तर, याव्हे एलोहिम ची कृपा, ही कृपाच राहत नाही

७ तर मग काय? इस्त्राएल लोक जे मिळविण्याचा प्रयत्न करीत होते, ते त्यांना मिळाले नाही. परंतु जे निवडलेले त्यांना मिळाले, आणि बाकीचे कठीण झाले. ८ शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे, “याव्हे एलोहिमने त्यांना बधीरपणाचा आत्मा, पाहू न शकणारे डोळे, ऐकू न शकणारे कान दिले, आणि आजपर्यंत हे असे चालूच आहे.” ९ दाविद म्हणतो, “त्यांचे मेज त्यांस सापळा, आणि फास होवो. त्यांचे पतन होवो, आणि त्यांना अपराधाबद्दल शिक्षा व प्रायश्चित मिळो. १० दिसू नये म्हणून त्यांचे डोळे अंधकारमय होवोत, आणि त्यांच्या कष्टाच्या ओझ्याखाली, तू सर्वकाळ त्यांच्या पाठी वाकीव.” ११ म्हणून मी असे म्हणतो, यहूद्यांचा नाश व्हावा, म्हणून ते अडखळले नाहीत काय? निश्चित नाही! त्यांच्या चुकीमुळे विदेशी लोकांना तारण प्राप्त व्हावे, आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये ईर्षा उत्पन्न व्हावी, म्हणून असे झाले. १२ आता त्यांचा अपराध जर जगाची संपत्ती झाली, आणि त्यांचा उणे होणे जर राष्ट्रांची संपत्ती झाली, तर पूर्णता किती विशेषेकरून तशी होईल. १३ तर तुम्ही जे यहूदी नाही, त्यांना मी निश्चितपणे सांगतो, कारण मी यहूदीतरासाठी प्रेषित आहे. मी माझ्या सेवेला मान देतो. १४ या आशेने की, माझ्या हाडामांसातल्यांना ईर्षावान करून, त्यांच्यातील काही जणांचे तारण करावे.

१५ जर याव्हे एलोहिमने त्यांच्या केलेल्या अव्हेराचा परिणाम जगासाठी समेट झाला, तर याव्हे एलोहिम कडून स्विकार याचा अर्थ मेलेल्यांतून जिवंत होणे नाही का? १६ जर प्रथम भाग पवित्र आहे, तर संपूर्ण पिठाचा गोळा पवित्र आहे. जर झाडाचे मूळ पवित्र आहे, तर फांद्यासुद्धा पवित्र आहेत. १७ परंतु काही डहाळया तोडून टाकण्यात आल्या, आणि तुम्ही रानटी जैतून असता कलम करून लावले गेलात, व जैतूनाच्या पौष्टिक मुळाचे भागीदार झालात. १८ तर तुम्ही त्या तोडलेल्या फांद्याहून मोठे आहात, अशी बढाई मारू नका. लक्षात ठेवा, तुम्ही मुळाला आधार देत नाही, तर मूळ तुमचे पोषण करते. १९ आता तुम्ही म्हणाल, होय, आमचे कलम व्हावे यासाठीच फांद्या तोडल्या होत्या. २० त्या त्यांच्या अविश्वासामुळे तोडून टाकण्यात आल्या, हे खरे आहे. परंतु तुम्ही तुमच्या विश्वासामुळे स्थिर आहात, यास्तव अभिमान बाळगू नका, तर भीति बळगा. २१ कारण याव्हे एलोहिमने जर मूळ फांद्याही राखल्या नाहीत, तर तो तुम्हांलाही राखणार नाही.

२२ अशा प्रकारे तुम्ही याव्हे एलोहिमचा दयाळूपणा, आणि कठोरताही पाहा. जे पतन पावले आहेत त्यांच्याविषयी कठोरता, परंतु याव्हे एलोहिमचा तुमच्याविषयीचा दयाळूपणा जर तुम्ही त्याच्या दयेत राहिला नाहीत, तर तुम्हांला झाडापासून छाटून टाकले जाईल. २३ आणि इस्त्राएल त्याच्या अविश्वासात राहिले नाही, तर तेही कलम पुन्हा लावण्यात येईल. कारण याव्हे एलोहिम त्यांना कलम म्हणून लावण्यास समर्थ आहे. २४ म्हणून तुम्ही जे निसर्गत रानटी जैतूनांची फांदी म्हणून तोडले गेलात. आणि निसर्गक्रम सोडून मशागत केलेल्या जैतूनाच्या झाडास कलम असे लावले गेलात. तर किती सहजपणे मशागत केलेल्या जैतूनांच्या फांद्या, त्या मूळाच्या झाडात कलम केल्या जातील! २५ परंतु बंधूनो, तुम्ही आपल्या शहाणपणावर अवलंबून या रहस्याविषयी अजाण असावे, असे मला वाटत नाही. इस्त्राएल लोकांत अंशतः कठीणपणा आला आहे. आणि तो याव्हे एलोहिम च्या कुटूंबात विदेशी लोकांचा भरणा पूर्ण होईपर्यंत राहणार आहे. २६ आणि नंतर इस्त्राएलाचे राष्ट्र म्हणून तारण होईल, असे लिहिले आहे. "मुक्त करणारा सियोनातून येईल तो याकोबाच्या घरण्यांतून त्यांची सर्व अभक्ती दूर करील. २७ जेंव्हा मी त्यांच्या पातकांची क्षमा करीन तेंव्हा त्यांच्याशी मी हा करार करीन."

२८ जेथपर्यंत सुवार्तेचा संबंध आहे, ते तुमच्यामुळे शत्रू आहेत. परंतु याव्हे एलोहिम च्या निवडीमुळे त्याने पूर्वजांना दिलेल्या वचनाप्रमाणे, याव्हे एलोहिम त्यांच्यावर प्रीति करतो. २९ कारण याव्हे एलोहिमने ज्यांना बोलाविले आहे, आणि तो जे देतो त्याच्याविषयी कधीही आपले मत बदलत नाही. ३० कारण जसे तुम्ही पूर्वी एलोहिमची आज्ञा पाळत नव्हता, परंतु आता तुम्हांला त्यांच्या आज्ञाभंगामुळे याव्हे एलोहिमची दया मिळाली आहे. ३१ त्याचप्रमाणे तेही आता आज्ञा मोडणारे झाले आहेत. यासाठी की, त्यांना याव्हे एलोहिम ची कृपा मिळावी. ३२ कारण याव्हे एलोहिमने सर्व लोकांना आज्ञाभंगाच्या तरूंगात कोंडले आहे. यासाठी की, त्याने त्यांच्यावर दया करावी. ३३ याव्हे एलोहिम च्या बुद्धीची, आणि ज्ञानाची संपत्ती किती अगाध आहे, त्याच्या निर्णय आणि त्याच्या मार्गाचा मार्ग काढणे कठीण आहे. ३४ शास्त्रलेख सांगते, "अदोनाईचे मन कोणाला माहीत आहे, किंवा त्याचा सल्लागार कोण असेल?" ३५ "प्रथम कोणी काही त्याला दिले का यासाठी की, त्याची परतफेड याव्हे एलोहिमने करावी?" ३६ कारण सर्व गोष्टी त्याने निर्माण केल्या, आणि त्याच्या व्दारे अस्तित्वात आहेत. त्याला युगानुयुग गौरव असो, आमेन.

**१२.** १ म्हणून बंधूजननो, मी याव्हे एलोहिम च्या करूणेमुळे तुम्हांला विनवितो की, तुम्ही आपली शरीरे, जिवंत पवित्र, याव्हे एलोहिमला आवडणारा यज्ञ म्हणून समर्पण करावा, ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. २ याव्हे एलोहिम ची उत्तम, ग्रहणीय, व परिपूर्ण इच्छा काय आहे, हे तुम्ही समजून घ्यावे. म्हणून ह्या जगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या आत्म्याच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या. ३ कारण मला प्राप्त झालेल्या कृपादानांवरून, मी तुम्हापैकी प्रत्येक जणाला असे सांगतो की, आपल्या योग्यतेपेक्षा स्वतःला अधिक मानू नका. तर याव्हे एलोहिमने प्रत्येकाला वाटून दिलेल्या विश्वासाच्या परिमाणानुसार मर्यादेने स्वतःला माना. ४ कारण जसे आपणांला एक शरीर असून, त्यांत पुष्कळ अवयव आहेत, तरी त्या सर्व अवयवांचे कार्य एकच नाही. ५ तसे आपण पुष्कळ जण असून मशीहा मध्ये एक शरीर, आणि प्रत्येक जण एकमेकांचे अवयव असे आहो. ६ आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत. म्हणून याव्हे एलोहिमचा संदेश सांगावयाचा असल्यास, आपण तो आपल्या

विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा. ७ सेवा करितांना सेवेत तत्पर असावे, शिकविणा-यांने शिक्षण देण्यात, ८ बोध करणा-यांने बोध करण्यात तत्पर असावे, दान देणा-यांने ते उदारपणाने द्यावे, अधिका-यांने आपले काम आस्थेने करावे, दया करणा-यांने ती संतोषाने करावी.

९ प्रीतिमध्ये ढोंग नसावे, वाइटाचा वीट माना, जे बरे त्याला चिकटून राहा. १० बंधुप्रीतिच्या बाबतीत एकमेकांवर स्नेहभाव दाखवा, तुम्ही प्रत्येक जण दुस-याला आदराने आपणापेक्षा थोर माना. ११ आस्थेविषयी मंद असू नका, आत्म्यात उत्सुक असा अदोनाईची सेवा करा. १२ आशेने हर्षित व्हा, संकटात धीर धरा, प्रार्थनेत तत्पर असा, १३ पवित्र जनांच्या गरजा भागवा, आदरातिथ्य करण्यात तत्पर असा. १४ जे तुमचा छळ करतात त्यांना आशिर्वाद द्या आशिर्वादच द्या, शाप देऊ नका. १५ जे आनंद करतात त्यांच्याबरोबर आनंद करा, शोक करणा-याबरोबर शोक करा. १६ एकमेकांबरोबर ऐक्याने रहा, मोठमोठया गोष्टीवर चित्त ठेवू नका, तर लीन वृत्तीच्या लोकांचा सहवास करा, स्वतःला शहाणे समजू नका. १७ कोणाचीही वाईटा बद्दल वाईट, अशी फेड करू नका. सर्व लोकांच्या दृष्टीने चांगले ते करण्याचा प्रयत्न करा. १८ शक्य तर सर्व माणसांबरोबर तुम्हांकडून होईल तितके शांतीने राहा. १९ प्रिय बंधूनो सूड उगवू नका, याव्हे एलोहिम च्या रागाला वाट द्या.असे लिहिले आहे, "सूड घेणे माझ्याकडे आहे मी फेड करीन, असे अदोनाई म्हणतो. २० तुमचा शत्रू भुकेला असल्यास त्यास खावयास द्या, तहानेला असेल तर प्यावयास पाणी द्या, कारण असे केल्याने तुम्ही त्याच्या डोक्यावर निखा-यांची रास करिशिल. २१ वाइटाने जिंकला जाऊ नको, तर चांगल्याने वाइटास जिंका.

**१३.** १ प्रत्येक जणाने वरिष्ठ अधिका-यांच्या अधीन असावे. कारण याव्हे एलोहिमने नेमल्यावाचून अधिकार स्थापित होत नाही, व जे आहेत ते याव्हे एलोहिमने नेमलेले आहेत. २ ह्यास्तव जो अधिकाराला आड येतो, तो याव्हे एलोहिम च्या व्यवस्थेस आड येतो, आणि आड येणारे आपणांवर दंड ओढवून घेतील. ३ कारण अधिकारी चांगल्या कामास भय दाखवणारे नाहीत, पण वाईट कामास भय दाखवणारे आहेत. तर अधिका-याचे भय तुला नसावे, अशी तुझी इच्छा आहे काय? जे बरे ते कर म्हणजे, त्याच्याकडून तुझी प्रशंसा होईल. ४ कारण तो तुझ्या हितासाठी याव्हे एलोहिमचा सेवक आहे. पण जे वाईट ते जर तू करशील, तर भय धर. कारण तो उगीचच तलवार धरीत नाही, तर वाईट करणा-याला क्रोधाकरिता तो सूड घेणारा याव्हे एलोहिमचा सेवक आहे. ५ यावरून क्रोधामुळे केवळ नाही, तर विवेकभावामुळेही तुम्हांस त्याच्या अधीन असण्याचे अगत्य आहे. ६ या कारणांमुळे तुम्ही काही देता, कारण ते याव्हे एलोहिमचे सेवक असून हेच काम नेहमी पाहत असतात. ७ तर ज्यांस जे देणे ते त्या सर्वांस भरून द्या, ज्याला कर द्यावा त्याला कर द्यावा, ज्याला जकात द्यावी त्याला जकात द्या, ज्याचे भय धरावे त्याचे भय धरा, ज्याला मान द्यावा त्याला मान द्या.

८ एकमेकांवर प्रीति करणे, याखेरीज कोणाचे ऋणी असू नका. कारण जो दुस-यावर प्रीति करतो, त्याने तोराह पूर्णपणे पाळले आहे. ९ कारण तू व्यभिचार करू नको, तू खून करू नको, तू चोरी करू नको, तू खोटी साक्ष देऊ नको, तू लोभ धरू नको, आणि दुसरी काही आज्ञा असेल, तर तिचा सारंश ह्या वचनात आहे. जशी आपणावर, तशी तू आपल्या शेजा-यावर प्रीति कर. १० प्रीति शेजा-याचे काही वाईट करीत नाही, म्हणून प्रीति ही तोराह ची परिपूर्णता आहे. ११ आणि समय ओळखून हे करा. कारण तुम्ही आता झोपेतून उठावे, अशी वेळ आली आहे.कारण आपण विश्वास ठेविला, तेंव्हापेक्षा तारण आता आपल्या जवळ आले आहे. १२ रात्र सरत जाऊन दिवस जवळ आला आहे, म्हणून आपण अंधकाराची कर्मे टाकून द्यावी, आणि प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करावी. १३ दिवसाढवळया साजेल असे आपण शिष्टाचाराने चालावे. चैनबाजीत, व मद्यपानांत, विषयविलासांत, व कामासक्तीत, कलहात, व मत्सरात नसावे. १४ तर तुम्ही अदोनाई येशूवाह मशीहा ला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका.

**१४.** १ जो विश्वासामध्ये दुर्बल आहे, त्याला जवळ करा. पण शंकाकुशंकाचा निर्णय लावण्याकरिता करू नका. २ एखाद्याचा विश्वास असा असतो की, त्याला कसलेहि खाद्य चालते,. परंतु दुर्बळ शाकभाजीच खातो. ३ जो खातो त्याने न खाणा-याला तुच्छ

मानू नये, आणि जो खात नाही त्याने खाणा-याचा न्याय करू नये. कारण याव्हे एलोहिमने त्याचा अंगीकार केला आहे. ४
दुस-याच्या चाकराचा न्याय करतोस असा तू कोण आहेस? तो स्थिर राहतो किंवा पडतो, याची काळजी त्याच्या धन्याला तो तर
स्थिरावला जाईल. कारण अदोनाई त्याला स्थिरावण्यास समर्थ आहे.

५ कोणी एकाद्या दिवसाला दुस-या दिवसापेक्षा अधिक मानतो, कोणी सर्व दिवस सारखे मानतो, प्रत्येकाने आपल्या मनाची पूर्ण खात्री
करून घ्यावी. ६ जो दिवस मानतो, तो अदोनाई करिता मानतो. आणि जो खातो, तो अदोनाई करिता खातो. कारण तो याव्हे
एलोहिमची उपकारस्तुति करतो, आणि जो खात नाही. तो अदोनाई करिता खात नाही, आणि याव्हे एलोहिमची उपकारस्तुति
करतो. ७ कारण आपल्यांतील कोणी स्वतःकरिता जगत नाही, आणि कोणी स्वतःकरिता मरत नाही. ८ कारण आपण जगतो, तर
अदोनाई करिता जगतो. आणि आपण मरतो, तर अदोनाई करिता मरतो. म्हणून आपण जगू किंवा मरू, तरी आपण अदोनाईचे
आहो. ९ कारण मशीहा मेला, आणि पुन्हा जिवंत झाला. यासाठी की, तो मेलेल्यांचा, व जिवंतांचाही, अदोनाई असावा. १० तर तू
आपल्या भावाचा न्याय का करतोस? आणखी तू आपल्या भावाला तुच्छ का मानतोस? कारण आपण सर्व याव्हे एलोहिम च्या
न्यायासमोर उभे राहायचे आहे. ११ कारण असे लिहिले आहे की, अदोनाई म्हणतो, मी जिवंत आहे, प्रत्येक गुडघा माझ्यासमोर
टेकल, व प्रत्येक जीभ याव्हे एलोहिमची स्तुति करील. १२ यावरून आपल्यांतील प्रत्येकजण आपल्या स्वतःविषयीचा हिशोब याव्हे
एलोहिमला देईल.

१३ म्हणून यापुढे आपण एकमेकांचा न्याय करू नये. तर असे ठरवावे की, कोणी आपल्या भावांपुढे ठेच लागल्यासारखे काही किंवा
अडखळण ठेवू नये. १४ मला ठाऊक आहे, आणि अदोनाई येशूवाह मध्ये माझी अशी खात्री आहे की, कोणताही पदार्थ मूळचा
अशुद्ध नाही, तरी अमुक पदार्थ अशुद्ध आहे असे जो मानतो, त्याला तो अशुद्ध आहे.१५ जर अन्नामुळे तुझ्या भावाला खेद होत
आहे, तर आता तू प्रीतिप्रमाणे वागत नाहीस. ज्याच्यासाठी मशीहा मरण पावला, त्याचा नाश तू आपल्या अन्नाने करू नको. १६ तर
तुमचे जे चांगले, त्यांची निंदा होऊ नये. १७ कारण खाणे व पिणे ह्यात याव्हे एलोहिमचे राज्य नाही, तर न्यायीपण, व शांती, आणि
क्वादोश रूहुव्वा मध्ये आनंद, हे याव्हे एलोहिमचे राज्य आहे.१८ कारण या गोष्टींमध्ये जो मशीहाची सेवा करतो, तो याव्हे
एलोहिमला संतोषकारक, आणि मनुष्यांस मान्य आहे.

१९ तर मग ज्या गोष्टींकडून शांती, आणि एकमेकांची अभिवृद्धी होईल, त्याच्यामागे आपण लागावे. २० अन्नाकरिता याव्हे एलोहिम
च्या कामाचा मोड करू नका, सर्व पदार्थ शुद्ध आहेत. परंतु जो मनुष्य अडखळण्यासहित खातो, त्याला ते वाईट आहे. २१ मास न
खाणे, किंवा द्राक्षारस न पिणे, आणि ज्याकडून तुझा भाऊ ठेचाळतो, किंवा (अडखळतो, किंवा अशक्त केला जातो,) ते न करणे
उत्तम आहे. २२ तुझा जो विश्वास आहे, तो याव्हे एलोहिम समोर तुझ्याठायी असू दे, आपण जे पसंत करतो, त्याविषयी जो
स्वतःला दोषी ठरवीत नाही, तो सुखी आहे. २३ पण संशय धरणारा जर खातो, तर तो दोषी ठरलाच आहे. कारण ते खाणे
विश्वासाचे नव्हे, आणि जे काही विश्वासाचे नाही, ते पाप आहे.

**१५**. १ तर जे आपण सशक्त आहो, त्या आपण अशक्तांच्या दुर्बळता वागवून घेणे योग्य आहे. आणि आपणांस संतोषवू नये. २
आपल्या पैकी प्रत्येकाने त्याच्या शेजा-याला त्यांच्याकरिता, व त्याची उन्नती व्हावी, या हेतूने सुखी करावे. ३ कारण मशीहाने ही
स्वतःला संतोषविले नाही, तर जसे लिहिले आहे की, तुझी निंदा करणा-यांनी केलेल्या निंदा माझ्यावर पडल्या आहेत, तसे त्याला
झाले. ४ कारण जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले आहे, ते आपल्या शिक्षणाकरिता लिहिले आहे. यासाठी की, धीर व शास्त्राचे
समाधान यांकडून आपणांस आशा प्राप्त व्हावी. ५ तर धीराचा व समाधानाचा याव्हे एलोहिम, तुम्ही मशीहा येशूवाह प्रमाणे परस्पर
एकचित्त व्हावे, असे दान तुम्हांस देवो. ६ यासाठी की, तुम्ही एकमताने, एकमुखाने याव्हे एलोहिम आपल्या अदोनाई येशूवाह
मशीहाचा अब्वा याचे गौरव करावे. ७ यास्तव जसे मशीहाने, याव्हे एलोहिम च्या गौरवाकरिता, तुमचा अंगीकार केला तसा तुम्हीही
एकमेकांचा अंगीकार करा.

८ तर मी म्हणतो की, येशूवाह मशीहा हा याव्हे एलोहिम च्या सत्याकरिता सुंता झालेल्यांचा सेवक करण्यात आला. यासाठी की,
पूर्वजांस दिलेली वचने त्याने निश्चित करावी. ९ आणि राष्ट्रांच्या लोकांनी याव्हे एलोहिम च्या दयेमुळे, त्याचे गौरव करावे. असे
लिहिले आहे की, यास्तव राष्ट्रांच्या लोकांमध्ये मी तुझी स्तुती करीन, आणि तुझ्या नावाला स्तोत्रे गाईन. १० आणि पुन्हा तो म्हणतो,
राष्ट्रांच्या लोकांनो त्याच्या लोकांबरोबर तुम्ही उल्लास करा. ११ आणि पुन्हा तो म्हणतो, सर्व राष्ट्रांच्या लोकांनी तुम्ही अदोनाईला
स्तवा, आणि सर्व देशांच्या लोकांनी त्याची स्तुती करावी. १२ आणखी यशया म्हणतो, इशायाला धुमारा फुटेल, आणि तो राष्ट्रांच्या
लोकांवर अधिकार करायला उभा राहिल, त्याच्यावर राष्ट्रांचे लोक आशा ठेवतील. १३ आता आशेचा याव्हे एलोहिम विश्वास
धरण्याकडून, तुम्हांस संपूर्ण आनंदाने, व शांतीने भरो. असे की, क्वादोश रूहुव्वा च्या (पवित्र आत्म्याच्या) सामर्थ्यात तुम्हांला आशा
विपुल व्हावी.

१४ तर माझ्या बंधुनो, तुम्ही चांगलेपणाने भरलेले, सर्व ज्ञानाने पूर्ण, एकमेकांना बोध करायला समर्थही आहा.अशी तुम्हां विषयी
माझी स्वतःची खात्री आहे. १५ तरी बंधुनो, याव्हे एलोहिम पासून जी कृपा मला दिलेली आहे, तिच्यामुळे मी अधीक प्रशस्तपणाने,
काही अंशी तुम्हांला आठवण देण्याकरिता लिहित आहे. १६ ती कृपा अशी की, मी याव्हे एलोहिमची सुवार्ता सांगण्याचे हे कोहेन
(याजक) पण करीत असणारा, असा राष्ट्रांच्या लोकांकरिता मशीहा येशूवाह चा ऐबेद (सेवक) व्हावे. यासाठी की, राष्ट्रांच्या
लोकांचे अर्पण क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) ने शुद्ध केलेले, स्विकारयोग्य व्हावे. १७ यास्तव याव्हे एलोहिम च्या गोष्टी संबंधाने,
मशीहा येशूवाह मध्ये मला अभिमान वाटतो. १८ कारण माझ्या शब्दांनी, आणि कृत्यांनी, राष्ट्रांच्या लोकांनी आज्ञापालन करावे.
अशा ज्या गोष्टी मशीहाने माझ्या करवी घडविल्या नाहीत, त्या सांगण्याचे धैर्य मी करणार नाही. १९ चिन्हे व अद्भुते यांच्या सामर्थ्याने
याव्हे एलोहिम च्या रूहुव्वा च्या सामर्थ्याने, जे घडले त्याविषयी मात्र मी सांगेन. ते असे की, यरूशलेमेपासून सभोवती इल्लूरिकमा
पर्यंत मी मशीहाची सुवार्ता पूर्णपणे सांगितली आहे. २० जेथे मशीहाचे नाव सांगितले जात नाही, अशा ठिकाणी सुवार्ता सांगण्याची
माझी आकांक्षा आहे. यासाठी की, मी दुस-याच्या पायावर बांधु नये. २१ परंतु असे लिहिले आहे, "ज्यांना त्याचे वर्तमान आले नाही
ते ऐकतील, आणि ऐकले नाही ते समजतील."

२२ या कारणांमुळे मला तुमच्याकडे येण्यास पुष्कळ वेळा अडथळा झाला.२३ परंतु ज्या अर्थी मला या प्रांतात एकही ठिकाण राहिले
नाही, व पुष्कळ वर्षांपासून तुम्हांला भेटण्याची माझी इच्छा आहे. २४ जेंव्हा मी स्पेनला जाईल तेंव्हा तुम्हांला भेटण्याचा विचार करीत
आहे, व तुमच्याविषयी माझे मन भरल्यावर माझ्या त्या प्रवासात तुम्ही मला मदत कराल, अशी आशा आहे. २५ पण मी
यरूशलेमातील पवित्रांच्या सेवेसाठी जात आहे. २६ कारण मासेदोनिया आणि अखिया येथील मंडळयांनी, यरूशलेमेतील गरीब पवित्र
जनांना मदत करण्याचे ठरविले आहे. २७ ते त्यांचे ऋणी आहेत, व त्यांनी हे करण्याचे ठरविले आहे. कारण जर यहूदीतरांना
इस्त्राएलाच्या आशिर्वादात भागी मिळाली आहे, तर त्यांनी त्यांच्या ऐहिक गरजा भागवून त्यांची सेवा करावी. २८ मग हे काम संपवून
त्याचे फळ सुरक्षितपणे त्यांच्या हाती सोपविल्यावर, जेंव्हा मी स्पेनला जाण्यासाठी निघेन, तेंव्हा मी त्या मार्गाने जात असता तुमच्या
नगरातून जाईन. २९ आणि मला माहीत आहे की, मी जेंव्हा तुमच्याकडे येईन, तेंव्हा मशीहाच्या पूर्ण आशिर्वादाने भरलेला असा
येईन.

३० बंधुनो, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा मुळे आणि आत्म्याकडून जे प्रीति आपणांकडे येते, त्यामुळे माझ्या वतीने माझ्या बरोबर
याव्हे एलोहिम जवळ आग्रहाने प्रार्थना करण्याची विनंती करतो. ३१ यासाठी की, यहूदीयात जे अविश्वासू आहेत, त्यांच्यापासून
माझी सुटका व्हावी. आणि यरूशलेमेतील मंडळीतील माझी सेवा पवित्र जणांना मान्य व्हावी. ३२ यासाठी की, याव्हे एलोहिम च्या
इच्छेने मी तुम्हांकडे आनंदाने यावे, आणि तुम्हांबरोबर ताजेतवाने व्हावे. ३३ शालोम चा (शांतीचा) याव्हे एलोहिम तुम्हा सर्वांबरोबर
असो आमेन.

**१६**. १ किंख्रियातील मंडळीची सेविका जी आमची वहीण फिबी, तिच्याविषयी मी तुम्हांस अशी शिफारस करतो की, २ पवित्र

लोकांस योग्य तसा अदोनाई मध्ये, तिचा अंगीकार करा. आणि ज्या कोणत्याही कामात तिला तुमची गरज लागेल, त्यात तिचे साहाय्य करा. कारण ती स्वतः पुष्कळांना व मलाही साहाय्य करणारी आहे.३ प्रिस्क व अक्किला जे मशीहा येशूवाह मध्ये माझ्याबरोबर काम करणारे, त्यांना सलाम सांगा.४ त्यांनी माझ्या जिवाकरिता, आपली मान पुढे केली, त्यांचे उपकार केवळ मीच मानतो असे नाही, तर राष्ट्रांच्या लोकांच्या सर्व मंडळयाही मानतात. ५ आणि जी मंडळी त्यांच्या घरी जमत असते, तिला सलाम सांगा. माझा प्रिय अपैनत याला सलाम सांगा. तो मशीहा करिता आशिया प्रांताचे प्रथमफळ आहे. ६ मरियेला सलाम सांगा, तिने तुमच्यासाठी पुष्कळ श्रम केले. ७ माझे नातलग, व माझे सोबतीचे बंदिवान अंद्रोनीक व युनिया यांना सलाम सांगा. ते प्रेषितांमध्ये नामांकित आहेत, आणि माझ्यापूर्वी ते मशीहा मध्ये होते. ८ अदोनाई मध्ये माझा प्रिय आंप्लियात याला सलाम सांगा. ९ मशीहा मध्ये आमचा सहकारी उर्बान, व माझा प्रिय मित्र स्ताखु यांना सलाम सांगा.

१० मशीहा मध्ये पसंतीस उतरलेला, अपिल्लेस याला सलाम सांगा. अरिस्तवूल याच्या घरातील संडळीस सलाम सांगा. ११ माझे नातेवाईक, हेरोदियोन आणि नार्किसास याच्या घरातील मंडळी, जी अदोनाई मध्ये आहे, त्यांना सलाम सांगा. १२ त्रुफैना आणि त्रुफीसा जे अदोनाई मध्ये श्रम करणारे आहेत, त्यांना सलाम सांगा. प्रिय पर्सिस जिने अदोनाई मध्ये फार श्रम केले आहेत, तिला सलाम सांगा. १३ अदोनाई मध्ये निवडलेला रूफ आणि त्याची आई जी माझीही आई आहे, तिला सलाम सांगा. १४ असुंकित, फ्लगोन, हर्मेस, पत्रवास, हर्मास, आणि त्यांच्यावरोबर जे वंधु आहेत, त्यांना सलाम सांगा. १५ फिललग, युलिया, निरिय, त्यांची वहीण ओलुंपा, आणि त्यांच्यावरोबर असलेले सर्व पवित्रजण, यांना सलाम सांगा. १६ पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम करा. मशीहा च्या सर्व मंडळया तुम्हांला सलाम सांगतात.

१७ बंधूजनहो, मी तुम्हांस विनंती करतो की, तुम्हांला जे शिक्षण मिळाले आहे. त्याविरूद्ध जे कलह आणि असंतोष निर्माण करतात त्यांच्यावर लक्ष ठेवा, व त्यांच्यापासून दूर राहा. १८ असे लोक आपल्या अदोनाईची सेवा करीत नाहीत. परंतु स्वतःच्या पोटाची सेवा करतात. आपल्या मधुर, व खुशामत करणा-या भाषणाने भोळया लोकांची फसवणूक करतात. १९ त्यांच्यापासून दूर राहा, कारण सर्व विश्वासणा-यांना तुंम्ही किती आज्ञाधारक आहात, हे माहीत आहे. म्हणून तुम्हांविषयी मी फार आनंदात आहे. परंतु मला तुम्ही जे चांगले त्याविषयी शहाणे आणि वाईटाविषयी भोळे असावे, असे वाटते. २० शालोम चा याव्हे एलोहिम लवकरच, सैतानाला तुमच्या पायदळी तुडवील. आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाची हेख्न (कृपा) तुम्हांबरोबर असो. २१ माझा सहकारी तिमथ्य, त्याच प्रमाणे माझे नातेवाईक लुक्य, यासोन, व सोसिपतेर हे तुम्हांला सलाम सांगतात. २२ पौलासाठी हे पत्र लिहून देणारा, मी तर्तिय तुम्हांला अदोनाई मध्ये सलाम सांगतो.

२३ माझे व सर्व मंडळीचे आतिथ्य करणारा गायस, तुम्हांला सलाम सांगतो. नगराचा खजिनदार एरास्त, आणि आमचा भाऊ क्वर्त तुम्हांला सलाम सांगतात. २४ आपला अदोनाई येशूवाह मशीहा याची कृपा, तुम्हां सर्वांबरोबर असो आमेन. २५ आता याव्हे एलेहिम, जो तुमच्या विश्वासात तुम्हांला मी सांगत असलेल्या, सुवार्तेप्रमाणे आणि अदोनाई येशूवाह मशीहा विषयी घोषणा करण्यास, व तुमच्या विश्वासात स्थिर करण्यास समर्थ आहे. त्याला व याव्हे एलोहिम च्या रहस्याच्या प्रकटीकरणाला धरून, जे पुष्कळ काळपर्यंत गुप्त ठेवले होते, ते प्रकट करणा-या याव्हे एलोहिमला गौरव असो. २६ परंतु आता आपणांला नव्वीईम च्या (संदेष्टयांच्या) लिखाणाव्दारे दाखवून दिले आहे की, हे गुप्त सत्य सनातन याव्हे एलोहिम च्या आज्ञेप्रमाणे, सर्व परराष्ट्रीयांनी विश्वासापासून आज्ञाधारकपणा निर्माण करावा, यासाठी माहीत करून दिले आहे. २७ एकच ज्ञानी याव्हे एलोहिम त्याला, येशूवाह मशीहा व्दारे युगानुयुग गौरव असो, आमेन.

............ समाप्त ............

## •प्रेषित पौलाने करिंथ मंडळीला लिहिलेले पहिले, व दुसरे पत्र•

### •प्रस्तावना•

प्रेषित पौलाने, हे पहिले पत्र करिंथ येथील मंडळीला लिहिलेले होते• ह्या पत्राचा लेखन काळ हा इसवी सन ५६ च्या दरम्यान असावा, असे अनेक तज्ञांचे मत आहे• प्रेषित पौलाने तिस-या सुवार्ता फेरीच्या वेळी इफिस मधून, हे पत्र लिहिलेले होते• यापूर्वी या करिंथ मंडळीला त्याने एक पत्र लिहिले होते, ते आज उपलब्ध नाही•( १ले करिंथ ५ः ९ ) या पत्राला करिंथ येथील मंडळीने उत्तर पाठवले, त्यात करिंथकरांनी काही प्रश्न विचारले होते• ख्लोवेल सेवकांकडून मंडळीमधील भांडणे, वाद याविषयी पौलाने ऐकले होते• अशा परिस्थितीत पौलाने हे पत्र लिहिले• वास्तविक करिंथ हे नगर त्याकाळामध्ये व्यापाराच्या दृष्टीने भरभराटीचे केंद्र होते• त्याचबरोबर चैनबाजी, दुराचार, मुर्तिपूजा, व व्हीनस देवतेच्या नावाखाली चाललेली दृष्टाईची कृत्ये, यांनी ही भरलेले होते• येथे पौलाने मंडळी स्थापन केली होती• या मंडळीला त्याने दोन पत्रे लिहिलेली पहावयास मिळतात• प्रेषित पौलाने ह्या पहिल्या पत्रामध्ये काही मुद्दे लिहिलेली आहे• १• मंडळीतील भांडणे, २• शास्त्रनिषिद्ध विवाहसंबंध, ३• मशीही लोकांची भांडणे न्यायालयात अधार्मिकांपुढे नेणे, ४• विवाह विषयाचे प्रश्न, ५• मुर्तीना अर्पण केलेले अन्न, ६•मंडळीतील उपासनेची शिस्तेबावत, व ह्या उपासनेमध्ये स्त्रियांनी मस्तक आच्छादणे, आणि पुरूष्याने स्वतःचे मस्तक झाकू नये ह्याबाबत, ७• अदोनाई भोजनाचा संस्कार योग्य रीतीने पाळणे, ८• आध्यात्मिक दाने, ९• पुनरूत्थना बाबतचे रहस्य उलगडा करून, त्याचे सखोल ज्ञानाची शिकवण देणे, १०• यरूशलेम येथील गोरगरीबांसाठी वर्गणी देणे, ह्या इतर अनेक विषयाबावतचे मुद्दे व वचनाचे शिकवण ही ह्या पहिल्या पत्रामध्ये पहावयास मिळते•

* * * * * * * * * * * * * * *

## •प्रेषित पौलाने करिंथ मंडळीला लिहिलेले पहिले पत्र•

१•१ याव्हे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे, मशीहा येशूवाहचा प्रेषित होण्याकरिता, निवडलेला मी पौल आणि वंधु सोस्थनेस यांजकडून २
याव्हे एलोहिमच्या सेवेला समर्पित केलेल्या करिंथ येथील मंडळीस, तसेच याव्हे एलोहिमने क्वादोश (पवित्र) होण्यास पाचारण
केलेल्या, व येशूवाह मशीहाच्या नावावर विश्वास ठेवणा-या सर्व बंधूजनांस, ३ याव्हे एलोहिम अव्वा आणि त्याचा व आपला
अदोनाई , येशूवाह मशीहा यांजपासून हेख्न (कृपा) व शालोम (शांति) असो•

४ मी नेहमीच तुमच्यासाठी माझ्या याव्हे एलोहिमचे उपकार मानतो, कारण मशीहा येशूवाह मध्ये, याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा)
तुम्हांला मिळाली आहे•५ कारण जशी मशीहा विषयाची साक्ष तुम्हांमध्ये मान्य झाली आहे, ६ तसे तुम्हीं त्याच्यात सर्व गोष्टीमध्ये सर्व
बोलण्यात, व सर्व ज्ञानात संपन्न झाला आहात• ७ असे की, तुम्हीं कोणत्याही कृपादानात कमी न पडता, आपल्या अदोनाई येशूवाह
मशीहाच्या प्रकट होण्याची बाट पाहत आहा• ८ तोच तुम्हांस शेवटपर्यंत आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या दिवशी तुम्हीं निर्दोष
असावे, असे दृढ करून ठेवील• ९ याव्हे एलोहिम विश्वासू आहे, त्याच्याकडून तुम्हीं त्याचा मुलगा येशूवाह मशीहा आपला अदोनाई,
याच्या भागीपणात बोलावलेले होता•

१० परंतु बंधूंनो, अदोनाई येशूवाह मशीहाच्या नावांमध्ये मी तुम्हांस विनंती करतो की, तुम्हीं सर्वांनी सारखेच बोलावे, आणि तुमच्यात
मतभेद असू नयेत, तर तुम्हीं एकाच विचाराने व एकाच हेतूने परिपूर्ण व्हावे• ११ कारण ख्लोवेल च्या घरातील माणसांकडून मला असे
कळविण्यात आले की, तुमच्यात भांडणे आहेत• १२ माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यातील प्रत्येक जण म्हणतो, “मी पौलाचा
आहे,” “मी अपुल्लोचा आहे,” “मी केफाचा आहे,” “मी मशीहाचा आहे•” १३ मशीहाचे असे विभाग झालेले आहेत काय? पौलाला
तुमच्यासाठी वधस्तंभावर खिळले गेले होते काय? पौलाच्या नावाने तुमचा बाप्तिस्मा झाला काय? १४ मी याव्हे एलोहिमचे आभार
मानतो की, क्रिस्प व गायस यांच्याशिवाय मी कोणाचाही बाप्तिस्मा केला नाही• १५ यासाठी की, कोणीही म्हणू नये की, माझ्या
नावात तुमचा बाप्तिस्मा करण्यात आला• १६ स्तेफनाच्या घरच्यांचा सुद्धा मी बाप्तिस्मा केला, पण उरलेल्यांविषयी म्हणाल, तर इतर

कोणाचाहि बाप्तिस्मा केल्याचे मला आठवत नाही. १७ कारण मशीहाने मला बाप्तिस्मा करण्यासाठी नाही, तर सुवार्ता सांगण्यासाठी पाठविले. ती शब्दांच्या चातुर्याच्या ज्ञानाने नव्हे, तर अशासाठी की, मशीहाच्या वधस्तंभाचे सामर्थ्य निरर्थक होऊ नये.

१८ कारण ज्यांचा नाश होत आहे, अशांसाठी वधस्तंभाविषयीची संदेशवचने मूर्खपणाचा आहे. परंतु ज्याचे तारण होत आहे, अशांसाठी तो याव्हे एलोहिमचे सामर्थ्य आहे. १९ कारण शास्त्रलेखात असे लिहिले आहे की, "ज्ञानांचे ज्ञान मी नष्ट करीन, व बुद्धिमंतांची बुद्धी व्यर्थ करीन. २० ज्ञानी काठे आहे? विद्वान कोठे आहे? या जगाचा वादविवाद करणारे कोठे आहे? याव्हे एलोहिमने जगाचे ज्ञान मूर्खपणाचे ठरविले आहे की नाही. २१ कारण ज्या अर्थी याव्हे एलोहिमच्या ज्ञानाने पहिले असता, जगाने स्वतःच्या ज्ञानाच्या योगे, याव्हे एलोहिमला ओळखता आले नाही. आम्हीं जो मूर्खपणात संदेश वचने गाजवितो, त्यामुळे जे विश्वासणारे आहेत, त्यांचे तारण करण्याचे याव्हे एलोहिमला बरे वाटते. २२ कारण अनेक यहूदी लोक चमत्काराची चिंन्हे मागतात, आणि हेल्लेणी लोक ज्ञान शोधतात.२३ परंतु आम्हीं वधस्तंभावर खिळलेला मशीहा गाजवितो. हा संदेश यहूदी लोकांसाठी अडखळण, आणि यहूदीतरांसाठी मूर्खपण असा आहे. २४ परंतु ज्यांना बोलावलेले आहे, अशा यहूदी व हेल्लेणी दोघांसाठी मशीहा हा संदेश आहे. तो याव्हे एलोहिमचे सामर्थ्य व याव्हे एलोहिमचे ज्ञान असाही आहे. २५ तथापि ज्यांस तुम्हीं याव्हे एलोहिमचा मूर्ख पणा म्हणता, तो माणसाच्या ज्ञानापेक्षा अधिक ज्ञानपणाचे आहे, आणि ज्यांस तुम्हीं याव्हे एलोहिमचा दुर्बळपणा समजता, ते माणसाच्या सशक्तपणाहून अधिक शक्तिमान आहे. २६ तर आता बंधूभगिनीनो, याव्हे एलोहिमने तुम्हांला केलेल्या पाचरणाबद्दल विचार करा. मानवी दृष्टीकोनातून तुमच्यातील पुष्कळसे ज्ञानी नव्हते, तुमच्यापैकी पुष्कळसे सामर्थ्यशाली नव्हते, तुमच्यापैकी पुष्कळसे उच्च कुळातले नव्हते. २७ त्याऐवजी जगातले जे मूर्ख पण त्यांना त्याने निवडले यासाठी की, ज्ञानी माणसास फजित करावे.२८ आणि याव्हे एलोहिमने जे दीन, धिक्कारलेले, जे नगण्य त्यांना निवडले.यासाठी की, जे काहीतरी आहेत त्यांना निरर्थक करावे.२९ यासाठी की, कोणीही याव्हे एलोहिम समोर बढाई मारू नये. ३० कारण तो मशीहा येशूवाह मध्ये तुमच्या जीवनाचा उगम आहे, व तो याव्हे एलोहिमची देणगी म्हणून, आपले ज्ञान, आपली नीतिमत्व, आपले पवित्रीकरण, आणि आपली खंडणी असा झाला. ३१ यासाठी की, शास्त्रलेखात असे लिहिले आहे, "जो बढाई मारतो त्याने याव्हे एलोहिम विषयी बढाई मारावी."

२.१ म्हणून बंधूनो, जेंव्हा मी तुमच्याकडे आलो, तेंव्हा मी याव्हे एलोहिमचे रहस्यमय सत्य, मानवी ज्ञानाने किंवा वक्तृत्वकलेने सांगण्यासाठी आलो नाही.२ कारण तुमच्यामध्ये असताना फक्त येशूवाह मशीहा, आणि तो ही वधस्तंभावर खिळलेला याशिवाय कशाचेही ज्ञान असू नये, असा मी निश्चय केला आहे. ३ तेंव्हा मी तुमच्याकडे अशक्तपणाने, भीतियुक्त असा व थरथर कापत आलो आहे. ४ माझे भाषण व संदेश हे मन वळविणा-या मानवी ज्ञानाव्दारे दिलेले नव्हते. ते रूहुव्वा (आत्मा), आणि सामर्थ्य यांचा पुरावा असलेले होते. ५ यासाठी की, तुमचा विश्वास मानवी ज्ञानावर नव्हे, तर याव्हे एलोहिमच्या सामर्थ्यावर असावा.

६ परंतु जे प्रौढ आहेत त्यांना आम्हीं ज्ञान देतो या युगाच्या अधिका-यांचे नव्हे, ज्यांचा शेवट करण्यासाठी आणण्यात येत आहे. ७ त्याऐवजी जे लपविलेले आहे, आणि हे युग सुरू होण्यापूर्वी याव्हे एलोहिमने आमच्या गौरवासाठी नेमले होते, ते याव्हे एलोहिमचे रहस्यमय ज्ञान देतो. ८ जे या युगाच्या कोणाही सत्ताधीशाला माहीत नव्हते. कारण जर त्यांना कळले असते, तर त्यांनी गौरवाच्या अदोनाईला वधस्तंभावर खिळले नसते. ९ परंतु ज्याप्रमाणे शास्त्रलेख सांगतो, "डोळयांनी पाहिले नाही, कानांनी ऐकले नाही, आणि मनुष्याच्या आत्म्यांने उपजविले नाही, ते याव्हे एलोहिमने त्याच्यावर अहेद (प्रीति) करणा-यांसाठी तयार केले आहे."

१० परंतु याव्हे एलोहिमने ते रूहुव्वा (आत्म्या) च्या व्दारे आपणांस प्रकट केले आहे, कारण रूहुव्वा (आत्मा) हा प्रत्येक गोष्टीचा शोध घेतो. एवढेच नव्हे तर तो याव्हे एलोहिमच्या सखोलतेच्या गुप्ततेचाही शोध घेतो. ११ कारण मनुष्याच्या रूहुव्वा (आत्म्या) शिवाय त्या मनुष्याच्या गोष्टी ओळखणारा दुसरा कोण मनुष्य आहे? याप्रमाणेच याव्हे एलोहिमच्या रूहुव्वा शिवाय याव्हे एलोहिमचे विचार कोणीच ओळखू शकत नाही. १२ परंतु आम्हांला जगाचा रूहुव्वा (आत्मा) मिळाला नाही. तर याव्हे एलोहिम पासूनचा रूहुव्वा मिळाला आहे. यासाठी की, याव्हे एलोहिमने ज्या गोष्टी फुकट दिल्या आहेत, त्यांचे आम्हांला ज्ञान व्हावे. १३ मानवी ज्ञानाने

शिकविलेल्या शब्दांनी आम्हीं या गोष्टी सांगत नाही, तर रूहुव्वाने शिकविलेल्या शब्दांनी, आध्यात्मिक शब्द उपयोगात आणून, आध्यात्मिक गोष्टींचे स्पष्टीकरण करतो. १४ परंतु दैहिक स्वभावाचा मनुष्य, याव्हे एलोहिमच्या आत्म्याने प्रगट झालेल्या गोष्टी स्विकारू शकत नाही. कारण त्या त्याला मूर्खपणाच्या आहेत, आणि त्या त्याला समजत नाही. १५ परंतु आध्यात्मिक मनुष्य सर्व गोष्टी पारखू शकतो. कारण त्याची पारख करणे कोणालाही शक्य नसते. कारण शास्त्रलेख सांगते, १६ "अदोनाईचा रूहुवा (आत्मा) कोण जाणतो,कोण त्याला शिकवू शकेल?" परंतु आमच्या ठायी मशीहाचा रूहुवा (आत्मा) आहे

**३**.१ परंतु बंधूनो, आध्यात्मिक लोक म्हणून मी तुमच्याशी बोलू शकत नव्हतो, त्याऐवजी मला तुमच्याशी दैहिक लोकांसारखे आणि मशीहा मधील बालकासारखे बोलावे लागले.२ मी तुम्हांला पिण्यासाठी दूध दिले, जड अन्न दिले नाही. कारण तुम्हीं जड अन्न खाऊ शकत नव्हता, व आता सुद्धा तुम्हीं खाऊ शकत नाही.३ कारण तुम्हीं अजून सुद्धा दैहिक आहात. कारण तुमच्यात मत्सर व भांडणे चालू आहेत, तर तुम्हीं दैहिक नाही काय? व जगातील लोकांसारखे वागत नाही काय? ४ कारण जेंव्हा तुम्ही म्हणतात, "मी पौलाचा आहे," आणि इतर दुसरे म्हणतात, "मी अपुल्लोसाचा आहे." तेंव्हा तुम्हीं जगिक लोकांसारखे वागत नाही काय? ५ तर अपुल्लोस कोण? आणि पौल कोण? आम्हीं केवळ ऐवेद (सेवक) आहोत ज्यांच्याव्दारे तुम्हीं विश्वासणारे झाला, आणि आम्हां प्रत्येकाला याव्हे एलोहिमने जे काम नेमून दिले, ते काम आम्हीं केले.

६ मी बी पेरले, अपुल्लोसाने त्याला पाणी घातले, पण याव्हे एलोहिमने त्याची वाढ केली. ७ म्हणून जो बी पेरतो, तो किंवा जो पाणी घालतो, तो महत्वाचा नाही. तर याव्हे एलोहिम जो त्याची वाढ करतो, तो महत्वाचा आहे. ८ जे बी पुरतात व पाणी घालतात ते एक आहेत, व प्रत्येकाला त्याच्या फळावर आधरित अशी मजूरी मिळेल. ९ कारण याव्हे एलोहिम समवेत, आपण सर्वजण कामगार आहोत. तुम्हीं याव्हे एलोहिमचे शेत आहात, व याव्हे एलोहिमची इमारत आहात. १० आणि याव्हे एलोहिमच्या दानाप्रमाणे जे मला दिले होते. त्याप्रमाणे सूज्ञ व कुशल बांधणा-यांप्रमाणे पाया घातला, पण दुसरा कोणी तरी त्यावर बांधतो. परंतु प्रत्येकाने आपण त्यावर कसे बांधतो, याविषयी खबरदारी घ्यावी. ११ येशूवाह मशीहा जो पाया आहे, त्याच्यावाचून इतर कोणीही दुसरा पाया घालू शकत नाही. १२ तर कोणी त्या पायावर सोने, चांदी, मौल्यवान दगड, लाकूड, गवत, किंवा पेंढा यांनी बांधतो.

१३ तर प्रत्येक व्यक्तीचे काम स्पष्ट दिसून येईल, कारण तो दिवस ते स्पष्ट करील. तो दिवस अग्नीने प्रगट होईल, व तोच अग्नी प्रत्येक माणसाचे काम कसे आहे, हे ठरविण्यासाठी परीक्षा घेईल. १४ ज्या कोणाचे बांधकाम जे त्या पायावर बांधलेले आहे, ते टिकेल. १५ त्याला बक्षीस मिळेल, जर एखाद्याचे काम जळून गेले तर त्याचे नुकसान होईल. परंतु जेंव्हा तो इमारतीला लागलेल्या अग्नीपासून बचावासाठी पळून जाईल, तेंव्हा तो तारला जाईल. १६ तुम्हीं याव्हे एलोहिमचे मंदिर आहात आणि याव्हे एलोहिमचा रूहुव्वा (आत्मा) तुमच्यामध्ये राहतो, हे तुम्हांला माहीत नाही काय? १७ जर कोणी याव्हे एलोहिमच्या मंदिराचा नाश करतो, तर याव्हे एलोहिम त्याचा नाश करील. कारण याव्हे एलोहिमचे मंदिर क्वादोश (पवित्र) आहे, आणि ते तुम्हीं आहात. १८ कोणीही स्वतःला फसवू नये, जर कोणी स्वतःला या जगाच्या दृष्टीकोणानुसार ज्ञानी समजत असेल, तर त्याने खरोखर ज्ञानी होण्यासाठी मूर्ख व्हावे. १९ कारण या जगाचे ज्ञान याव्हे एलोहिमच्या दृष्टीने मूर्खपणाचे आहे. असे लिहिले आहे, "याव्हे एलोहिम ज्ञानाला त्याच्या धूर्तपणात पकडतो." २० आणि पुन्हा "याव्हे एलोहिम जाणतो की, ज्ञान्यांचे विचार निरर्थक आहेत." २१ म्हणून मनुष्यांविषयी कोणीही फुशारकी मारू नये, कारण सर्व गोष्टी तुमच्या आहेत. २२ तर तो पौल, अपुल्लोस, केफा, जग, जीवन, किंवा मरण असो, वर्तमानकाळाच्या गोष्टी असोत, अथवा भविष्यकाळाच्या गोष्टी असोत, सर्व गोष्टी तुमच्या आहेत.२३ तुम्हीं मशीहा मध्ये आहात आणि मशीहा, याव्हे एलोहिमचा आहे.

**४**.१ माणसाने आम्हांला मशीहाचे ऐवेद (सेवक), आणि याव्हे एलोहिमच्या रहस्याचे कारभारी असे गणावे .२ आणखी असे की, जबाबदारी असलेल्या कारभा-याने विश्वासू असले पाहिजे. ३ पण तुम्हांकडून किंवा कोणा मानवी न्यायाधीशाकडून माझा न्याय व्हावा, यावद्दल मला काही वाटत नाही. किंवा मी माझ्या स्वतःचा देखील न्याय करीत नाही. ४ कारण माझी विवेकबुद्धी शुद्ध

आहे, पण त्यामुळे मी निर्दोष ठरत आहे, अदोनाई हाच माझा न्यायनिवाडा करतो. ५ म्हणून योग्य समय येईपर्यंत, म्हणजे अदोनाई येईपर्यंत न्यायनिवाडा करू नका. तो अंधारातील गुप्त गोष्टी प्रकाशित करील, व आत्म्यातील योजना उघड करील, आणि त्या वेळेस प्रत्येकाची स्तुति याव्हे एलोहिम कडून होईल.

६ बंधूनो, तुमच्यासाठी मी या गोष्टी माझ्याकरिता, व अपुल्लोसाकरिता लागू केल्या आहेत. यासाठी की, शास्त्रलेख सांगते त्यापलीकडे जाऊ नका. हे आमच्या उदाहरणावरून तुम्हीं शिकावे, व तुम्हीं गर्वाने फुगून जाऊ नये, म्हणजे एखाद्याला चांगली वागणूक देऊन दुस-याला विरोध करू नये. ७ कोण म्हणतो की, तू दुस-यापेक्षा चांगला आहेस? आणि तुझ्याजवळ असे काय आहे जे तुला मिळाले नाही? ज्या अर्थी तुला सर्व मिळाले आहे तर तुला मिळाले नाही, अशी बढाई का मारतोस? ८ तुम्हांला असे वाटते की, तुम्हीं अगोदरच श्रीमंत झाला आहात, तृप्त झाला आहात. असे वाटते की, आमच्या शिवाय तुम्हीं राजे झाला आहात. आणि माझी अशी इच्छा आहे की, तुम्हीं खरोखरच राजे होता. यासाठी की, आम्हीं तुमच्यासह राजे झालो असतो. ९ कारण मला वाटते की, याव्हे एलोहिमने आम्हांला मरण्यासाठी शिक्षा दिलेल्या, अशा लोकांसारखे शेवटचे प्रेषित केले. कारण आम्हीं जगाला, व एलोहिमच्या मालाक ला (देवदूतांना), तसेच माणसांना जणू काय तमाशा असे झालो आहोत! १० आम्हीं मशीहा साठी मूर्ख, तर तुम्हीं मशीहा मध्ये हुशार आहात! आम्हीं अशक्त आहोत, पण तुम्हीं किती बलवान आहात! तुम्हीं आदरणीय आहात, पण आम्हीं तुच्छ आहोत!

११ अगदी या क्षणापर्यंत आम्हीं भुकेले, आणि तहानलेले, फाटकेतुटके कपडे घातलेले, ठोसे मारलेले, आम्हीं बेघर असे आहोत. १२ आणि आम्हीं श्रम करतो, आम्हीं स्वतःच्या हातांनी काम करतो. १३ जेंव्हा आमची निंदा होते, तेंव्हा आम्हीं आशिर्वाद देतो. जेंव्हा आमचा छळ होतो, तेंव्हा आम्हीं सहन करतो. जेंव्हा आमची निंदा होते, आम्हीं दयाळूपणे त्यांच्याशी बोलतो. या क्षणापर्यंत आम्हीं जगासाठी गाळ, आणि कचरा असे झालो आहोत. १४ मी तुम्हांला हे लाजविण्यासाठी लिहित नाही, तर उलट मी तुम्हांला माझ्या प्रिय लेकरांप्रमाणे, चांगल्या गोष्टींची जाणीव करून देतो. १५ कारण जरी तुम्हांला मशीहा मध्ये दहा हजार पालक असले, तरी पुष्कळ वडील नाहीत. कारण मशीहा येशूवाह मध्ये सुवार्तेच्या योगे, मी तुम्हांला जन्म दिला आहे. १६ यास्तव मी तुम्हांला बोध करतो की, माझे अनुकरण करा. १७ यासाठीच तीमथ्याला तुमच्याकडे पाठविले आहे, अदोनाई मध्ये तो माझा प्रिय व विश्वासू मुलगा आहे. ज्या प्रमाणे मी त्यांना सगळीकडे, प्रत्येक मंडळीमध्ये शिकवितो, तसेच तो मशीहा मधील माझ्या शिकवणूकीची आठवण करून देईल. १८ पण जणू काय मी तुमच्याकडे येणारच नव्हतो, म्हणून काही जण गर्वाने फुगले होते. १९ तरीही जर अदोनाईची इच्छा असेल, तर मी लवकरच तुमच्याकडे येईल. आणि मग मला समजेल की, जे गर्वाने फुगून गेले ते किती चांगले वक्ते आहेत. हे नव्हे, तर ते किती सामर्थ्यशाली आहेत हे मला समजेल. २० कारण याव्हे एलोहिमचे राज्य बोलण्यावर अवलंबून नसते, तर सामर्थ्यावर असते. २१ तुम्हांला कोणते पाहिजे? मी तुमच्याकडे तुम्हांला शिक्षा करण्यासाठी काठी घेऊन यावे की, प्रीतिने व सौम्यतेच्या आत्म्याने यावे?

**५**.१ खरोखरच असे सांगण्यात आले आहे की, तुमच्यामध्ये जारकर्म चालू आहे. ते असे की, आपणामध्ये कोणी आपल्या सावत्र आईशी अनैतिक संबंध ठेऊन आहे. वास्तविक असले दृष्कृत्ये विदेशी लोकांमध्येही आढळणार नाही. २ आणि तरीही तुम्हीं गर्वाने फुगला आहात! आणि हे कर्म करणारा, आपणांतून घालवून देण्या इतके शोक तुम्हीं केला नाही. ३ कारण जरी मी शरीराने तुमच्यात नसलो, तरी आत्म्याने हजर आहे. आणि हजर असल्याप्रमाणे ज्याने हे अयोग्य कृत्य केले आहे, त्यांचा मी अगोदरच न्याय केलेला आहे. ४ आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या नावाने तुम्हीं एकत्र जमला असता, आणि माझा आत्माही तुम्हांबरोबर असता, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाचे सामर्थ्य आपल्यावरोबर असता, ५ अशाला देहाच्या नाशाकरिता सैतानाच्या स्वाधीन करावे. अशासाठी की, त्याचा आत्मा अदोनाई येशूवाहच्या दिवशी तारला जावा.

६ तुमचे बढाई मारणे चांगले नाही, तुम्हांला माहीत नाही. का की, थोडेसे खमीर सगळे पीठ फुगविते. ७ तर जुने खमीर काढून टाका. यासाठी की, जसे तुम्हीं बेखमीर आहात, तसे तुम्हीं नवीन पीठाचा गोळा व्हावे. कारण आपला पेसॅह (वल्हांडणा) चा केवेस

(कोकरा), जो मशीहा त्याचे अर्पण झाले आहे. ८ यास्तव जुन्या खमिराने नव्हे, आणि वाईटपण व दुष्टपण यांच्या खमिराने नव्हे, तर सरळपण व खरेपण यांच्या बेखमीर भाकरीनी आपण सण पाळावा.९ तुम्हीं जारकर्म्यांची संगत धरू नका, असे मी तुम्हांस आपल्या पत्रात लिहिले होते. १० तथापि या जगाच्या जारकर्म्यांची, किंवा लोभी, वित्त हरण करणारे, किंवा मूर्तिपूजकांची संगत मुळीच धरू नका. कारण तसे कराल, तर तुम्हांस जगातून निघून जावे लागेल. ११ ह्यास्तव मी तुम्हांस जे लिहिले होते, त्याच अर्थ असा आहे की, बंधू म्हंटलेला असा कोणी जर जारकर्मी, लोभी, मूर्तीपूजक, निंदक, मद्यपि, फसविणारा असेल, तर त्यांची संगत धरू नका. अशा माणसाबरोबर भोजन सुद्धा करू नका. १२ परंतु जे मंडळी बाहेर आहेत, त्यांचा निवाडा करणे माझे काम आहे काय? जे मंडळीत आहेत, त्यांचा न्याय तुम्हीं करीत नाही काय? १३ याव्हे एलोहिमने मंडळी बाहेर जे आहेत, त्यांचा तो न्याय करील. शास्त्रलेख सांगते, "तुमच्यामधून दुष्ट मनुष्याला काढून टाका."

६.१ तुम्हांतील कोणाचा दुस-याशी वाद असला, तर तो पवित्रांच्यापुढे आपला वाद घेऊन न जाता, अधार्मिकांच्यापुढे फिर्याद नेण्यास कसा धजतो? २ किंवा पवित्र जण जगाचा न्यायनिवाडा करितील, हे तुम्हांस ठाऊक नाही काय? तुमच्या कडून जगाचा न्यायनिवाडा व्हावयाचा आहे, तर तुम्हीं अगदी क्षुल्लक बाबीचा न्याय करण्यास अपात्र आहा काय? ३ आपण देवदूतांचा न्यायनिवाडा करणार आहो, हे तुम्हांस ठाऊक आहे ना? तर मग व्यावहारिक गोष्टीविषयी सांगणे नकोच. ४ तुम्हांला व्यावहारिक प्रकरणांचा न्यायनिवाडा करावयाचा आहे, तर मंडळीत जे हिशेबात नाहीत त्यांस कसे नेमता? ५ तुम्हांस लाज वाटावी म्हणून मी असे म्हणतो. ज्याला भावाभावांचा निवाडा करता येईल, असा एकहि शहाणा मणूस तुम्हांमध्ये नाही, असे आहे की काय? ६ परंतु भाऊ भावावर फिर्याद करितो, आणि तीहि विश्वास न ठेवणा-यांपुढे करितो हे कसे? ७ तुम्हीं एकमेकांवर खटले भरिता, ह्यांत सर्व प्रकारे तुमची हानीच आहे. त्यापेक्षा तुम्हीं अन्याय का सहन करीत नाही? त्यापेक्षा नाडणूक का सोसून घेत नाही ८ उलट तुम्हीं स्वतः अन्याय व नाडणूक करिता, आणि ती बंधुजनाची करिता.

९ अनीतिमान माणसांना याव्हे एलोहिमच्या राज्याचे वतन मिळणार नाही, हे तुम्हांला ठाऊक आहे काय? फसू नका; जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, स्त्रीसारखा संभोग देणारे पुरूषसंभोग घेणारे, १० चोरी, लोभी, मद्यपी, चहाड, व वित्तहरण करणारे, ह्यांना याव्हे एलोहिमच्या राज्याचे वतन मिळणार नाही.११ आणि तुम्हांपैकी कित्येक तसे होते, तरी तुम्हीं अदोनाई येशूवाह मशीहा च्या नावाने व आपल्या याव्हे एलोहिमच्या रूहुव्वा (आत्म्या) मध्ये धुतलेले क्वादोश (पवित्र) केलेले व त्साद-दीक्व (नीतिमान) ठरविलेले असे झाला.

१२ मी काहीही करण्यास स्वतंत्र आहे, पण प्रत्येक गोष्ट हितकारक नसते. होय, मी काहीही करण्यास स्वतंत्र आहे, पण कोणत्याही गोष्टीचे वर्चस्व माझ्यावर होऊ देणार नाही. १३ अन्न पोटासाठी आहे, व पोट अन्नासाठी आहे, आणि हे खरे आहे. पण याव्हे एलोहिम अन्नाचा व पोटाचा अशा दोघांचाही नाश करील. आणि आमची शरीरे ही जारकर्मासाठी नाही, तर याव्हे एलोहिम च्या सेवेसाठी, आणि अदोनाई च्या शरीराच्या हितासाठी आहेत. १४ आणि याव्हे एलोहिमने केवळ अदोनाईला मरणातून उठविले असे नाही, तर तो आम्हांलाही आपल्या सामर्थ्याने मरणातून उठवील. १५ तुम्हांला माहीत नाही का की, तुमची शरीरे मशीहाला जोडलेली आहेत? तर मग जे मशीहाशी जोडलेले आहे, ते घेऊन मी वेश्येला जोडावे काय? निश्चितच नाही! किंवा तुम्हांस ठाऊक नाही काय की, जो वेश्येशी जडतो, तो तिच्याशी एकदेह होतो. १६ कारण ती दोघे एकदेह होतील, असा शास्त्रच सांगते. १७ परंतु जो स्वतः अदोनाईशी जडतो तो त्याच्याशी रूहुव्वा त (आत्म्यात) एक आहे. १८ जारकर्मापासून दूर पळा. मनुष्य एखादे पाप करणे शक्य आहे, ते त्याच्या शरीराबाहेरचे आहे. परंतु जो जारकर्म करतो, तो त्याच्या स्वतःच्या शरीराविरूद्ध पाप करतो. १९ किंवा तुम्हांला हे माहीत नाही काय? तुमची शरीरे ही तुमच्यामध्ये जो क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) आहे, व जो तुम्हांला याव्हे एलोहिम कडून प्राप्त झाला, त्यांचे मंदिर आहे. आणि स्वतःचे असे तुम्हीं नाही? २० कारण तुम्हांला मोल देऊन विकत घेतले आहे. म्हणून तुमच्या शरीराने याव्हे एलोहिमचे गौरव करा.

७.१ आता ज्या गोष्टीविषयी तुम्हीं मला लिहिले त्याविषयी सांगतो, पुरूषाने स्त्रीला शिवू नये हे त्याला बरे, २ तरी पण जारकर्मे होत आहेत. म्हणून प्रत्येक पुरुषाला स्वतःची बायको असावी, आणि प्रत्येक स्त्रीला स्वतःचा नवरा असाला. ३ नव-याने बायकोला तिचे योग्य हक्काचे ते भरून द्यावे, आणि त्याप्रमाणे बायकोनेही नव-याला द्यावे. ४ बायकोला आपल्या स्वतःच्या शरीरावर अधिकार नाही, तर नव-याला आहे. आणि त्याप्रमाणे, नव-यालाही आपल्या स्वतःच्या शरीरावर अधिकार नाही तर बायकोला आहे. ५ एकमेकांशी वंचना करू नका, तरी उपास व प्रार्थना यांत तत्पर होता यावे, म्हणून काही वेळ संमतीने वेगळे व्हावे. मग पुन्हा एकत्र व्हावे यासाठी की, सैतानाने तुमच्या असंयमनावरून तुम्हांला परीक्षेत पाडू नये. ६ तर मी हे आज्ञा म्हणून सांगत नाही, तर सवलत म्हणून सांगतो. ७ कारण जसा मी आहे तसे सर्व माणसांनी असावे, अशी माझी इच्छा आहे. तरी प्रत्येकाला याव्हे एलोहिम पासून आपापलेच कृपादान आहे. एकाला ह्या प्रकाराचे व दुस-याला त्या प्रकाराचे.

८ परंतु जे अविवाहित व ज्या विधवा आहेत त्यांना मी म्हणतो की, ती माझ्यासारखीच राहिली तर ते त्यांना बरे. ९ पण जर त्यांना संयम होत नाही तर त्यांनी विवाह करावे. कारण जळण्यापेक्षा विवाह करणे बरे आहे. १० परंतु ज्यांनी विवाह केले आहे, त्यांना मी आज्ञा करतो. मी नव्हे तर अदोनाई करतो की, बायकोने नव-यापासून वेगळे होऊ नये. ११ परंतु ती वेगळी झाली, तर तिने विवाह केल्यावाचून राहावे. किंवा नव-याशी समेट करावा, आणि नव-यानेही बायकोला सोडू नये. १२ परंतु बाकीच्या लोकांना अदोनाई नव्हे तर मी म्हणतो की, जर कोणा एका बंधूला विश्वास न ठेवणारी बायको आहे, आणि ती त्याच्याजवळ राहायला खुशी आहे, तर त्याने तिला सोडू नये.१३ आणि जर कोणा बायकोला विश्वास न ठेवणारा नवरा आहे, आणि तो तिच्याजवळ राहायला खुशी आहे, तर तिने त्याला सोडू नये. १४ कारण बायकोकरून अविश्वासी नवरा पवित्र होतो, आणि नव-यावरून अविश्वासी बायको पवित्र होते, असे नसते तर तुमची लेकरे अशुद्ध असती, परंतु आता ती पवित्र आहेत. १५ तरी पण जर अविश्वासी माणूस वेगळे होईल, तर त्याला वेगळे होऊ द्या. अशा प्रसंगी भाऊ किंवा बहीण बांधलेली नाही. परंतु याव्हे एलोहिमने आपल्याला शांतीत राहण्यासाठी पाचारण केलेले आहे. १६ कारण बायको ही आपल्या नव-याला तारशील, किंवा नाही हे तुला काय ठाऊक आहे? अथवा नव-या तू आपल्या बायकोला तारशील, किंवा नाही हे तुला काय ठाऊक आहे?

१७ जसे प्रत्येकाला अदोनाईने वाटून दिले आहे. जसे प्रत्येकाला याव्हे एलोहिमने पाचारण केले आहे, तसे मात्र त्याने चालावे. आणि याप्रमाणे मी सर्व मंडळयांस नेमून देतो. १८ सुंता झालेली असता कोणाला पाचारण केले आहे काय? तर त्याने बेसुंता होऊ नये. सूंता झालेली नसता कोणी पाचारण केलेले आहे काय? तर त्याने सुंता करून घेऊ नये. १९ सुंता काही नाही व बेसुंताही काही नाही. परंतु याव्हे एलोहिम च्या आज्ञा पाळणे, हेच काय ते आहे. २० प्रत्येकाने तो ज्या स्थितीत असताना त्याला बोलावले त्या स्थितीत राहावे. २१ तू दास असता तुला पाचारण केलेले आहे काय? त्याची चिंता करू नको, परंतु त्यापेक्षा जर तुला मोकळे होता येईल, तर त्याचा उपयोग कर. २२ कारण जो दास असता अदोनाई मध्ये पाचारण केलेला आहे, तो अदोनाईचा मोकळा झालेला माणूस आहे. तसेच जो मोकळा असता पाचारण झालेला आहे, तो मशीहाचा दास आहे. २३ तुम्हीं मोलाने विकत घेतलेले आहा, माणसांचे दास होऊ नका. २४ बंधूनो प्रत्येकाने तो ज्या स्थितीत असताना त्याला पाचारण केलेले आहे, त्या स्थितीत त्याने याव्हे एलोहिम जवळ राहावे.

२५ कुमारीच्याविषयी तर अदोनाईची आज्ञा मला नाही, परंतु विश्वासू व्हावे अशी दया अदोनाई कडून मी पावलो, म्हणून माझे मत देतो. २६ मला तर असे वाटते की, हल्लीच्या अडवणीमुळे मनुष्य जसा आहे, तसेच त्याने राहावे हे त्याला बरे. २७ तू बायकोशी बांधलेला आहेस काय? तर तिच्यापासून मोकळे व्हायला पाहू नको, तू बायकोपासून मोकळा झालेला आहेस काय? तर बायको करायला पाहू नको. २८ परंतु तू विवाह केलेस तर पाप केले नाहीस, आणि कुमारीकेने विवाह केले तर तिने पाप केले नाही. तरी पण अशांस संसारात संकट प्राप्त होईल, आणि मी तर तुमचा बचाव करायला पाहतो.

२९ बंधूनो मी हेच म्हणतो, की काळ थोडाच आहे. अशासाठी की, ज्यांना बायका आहेत, त्यांनी यापुढे त्या नसल्यासारखे असावे.

३० आणि जे रडतात त्यांनी रडत नसल्यासारखे, व जे आनंद करतात त्यांनी आनंद करीत नसल्यासारखे, व जे विकत घेतात त्यांनी आपणांस काही नसल्यासारखे, ३१ व जे या जगाचा उपयोग करतात, त्यांनी त्याचा पूर्ण उपयोग करीत नसल्यासारखे असावे, कारण या जगाचे बाह्यस्वरूप बदलत जात आहे. ३२ तर तुम्हीं निश्चित असावे, असे मी इच्छितो. जो अविवाहित तो आपण अदोनाईला कसे संतोषवावे, अशी अदोनाईच्या गोष्टीविषयीची चिंता करतो. ३३ परंतु जो विवाहित तो आपण आपल्या बायकोला कसे संतोषवावे, अशी जगातील गोष्टीविषयी चिंता करतो. ३४ आणि तो विभागलेला आहे त्याप्रमाणे अविवाहित स्त्री आणि कुमारी ह्या आपण शरीराने, व आत्म्यानेही पवित्र व्हावे. अशी अदोनाईच्या गोष्टीविषयीची चिंता करतात. ३५ हे मी तुमच्या हितासाठी बोलतो, तुम्हांवर फास टाकण्यासाठी नाही. तर तुम्हांकडून योग्य आचरण व्हावे, व निश्चितपणाने अदोनाईची एकनिष्ठ सेवा व्हावी, म्हणून हे सांगतो. ३६ परंतु जर कोणाला असे वाटते की, आपण आपल्या कुमारीविषयी अयोग्य आचरण करतो ती उपवर झाली आहे, आणि तसे अगत्य आहे तर जशी इच्छा असेल तसे त्याने करावे. तो पाप करीत नाही ती विवाह करोत. ३७ तरीपण जो आत्म्यात स्थिर राहातो, व ज्याला अगत्य नाही तर ज्याची आपल्या इच्छेवर सत्ता आहे, आणि आपली कुमारीपण तशीच ठेवावी, असे ज्याने आपल्या आत्म्यात ठरवले आहे, तो बरे करतो. ३८ म्हणून जो आपल्या कुमारीकेचे विवाह करून देतो, तो बरे करतो. परंतु जो विवाह करून देत नाही, तो विशेष बरे करतो.

३९ बायको आपला नवरा जिवंत आहे, तोपर्यंत तोराह् ला (नियमशास्त्राला) बांधलेली आहे. परंतु तिचा नवरा मेला असला, तर तिची इच्छा असेल त्याच्याशी पण अदोनाई मध्ये, असलेल्याशी मात्र विवाह करायला ती मोकळी आहे. ४० परंतु जर ती जशी आहे तशीच राहील, तर माझ्या मताने ती अधिक सुखी आहे. आणि मला वाटते की, याव्हे एलोहिमचा रूहुवा (आत्मा) मलाही आहे.

८.१ आता मूर्तीस यज्ञ म्हणून अर्पण केलेल्या पदार्थाविषयी, आपणा सर्वांना ज्ञान आहे, हे आपणाला ठाऊक आहे. ज्ञान फुगवते, परंतु प्रीति वृद्धी करते.२ जर एखाद्याला वाटत असेल की, त्याला काही माहीत आहे. तर जसे त्याला कळायला पाहिजे, तसे त्याला माहीत नसते. ३ पण जर कोणी याव्हे एलोहिम वर प्रीति करतो, तर याव्हे एलोहिमला तो माहीत असतो. ४ म्हणून मूर्तिला वाहिलेल्या अन्नाविषयी आपल्याला माहीत आहे की, जगामध्ये खरी मूर्तीच नाही. आणि त्या एका याव्हे एलोहिम शिवाय दुसरा देव नाही. ५ आणि जरी लोक त्यांना देव म्हणतात, तरी असे अनेक तथाकथित अनेक देव व अनेक प्रभु आहेत, जे आकाशात किंवा पृथ्वीवर आहेत.६ परंतु आमच्यासाठी फक्त एकच याव्हे एलोहिम जो अव्वा तो आहे. आणि ज्याच्यासाठी आपण जगतो, आणि ज्याच्यापासून सर्व गोष्टी येतात, आणि फक्त एकच अदोनाई येशूवाह मशीहा आहे. ज्याच्याव्दारे सर्व गोष्टी अस्तित्वात येतात, व ज्याच्याव्दारे आपण जगतो.

७ तरी पण हे ज्ञान सर्वांमध्ये नाही. तर कित्येकास आतापर्यंत मूर्तीची उपासना करण्याची सवय असल्याने, हा पदार्थ मूर्तीस यज्ञ म्हणून अर्पण केलेला आहे, असे मानुन तो ते खातात. आणि त्यांची सद्सद्विवेक बुद्धी दुर्वल असल्यामुळे तो विटाळतो.८ परंतु अन्न आपणाला याव्हे एलोहिम जवळ आणणार नाही. जर आपण खाल्ले तर आपण काही अधिक नाही, आणि आपण खात नाही, तर आपण काही कमीही नाही. ९ परंतु ही तुमची मोकळीक अशक्तांस अपराधी होण्यास कारण होऊ नये म्हणून जपा.१० कारण ज्याला ज्ञान आहे. त्या तुला मूर्तीच्या देवळात जेवायला बसलेले जर कोणी पाहिले, तर तो दुर्वल असल्यास, त्याच्या विवेकभावाला मूर्तीस यज्ञ म्हणून अर्पण केलेले पदार्थ खायला, धैर्य येईल की नाही? ११ मग जो दुर्वल आहे, ज्याच्याकरिता मशीहा मरण पावला, तो बंधू तुझ्या ज्ञानाकडून नाश पावतो. १२ आणि ह्याप्रमाणे भावाच्याविरूद्ध पाप करून आणि त्याच्या दुर्वल विवेकबुद्धीला धक्का देऊन तुम्हीं मशीहा विरूद्ध पाप करता. १३ यामुळे जर अन्न माझ्या बंधूना पाप करायला लावते. तर मी आपल्या बंधूने पाप करू नये, म्हणून मी कधीही मांस खाणार नाही.

९.१ मी स्वतंत्र नाही काय? मी प्रेषित नाही काय? आपल्या अदोनाई येशूवाहला मी पाहिलेले नाही काय? अदोनाई मध्ये तुम्हीं माझे काम नाही काय? २ जरी मी दुस-यांस प्रेषित नसलो, तरी निदान तुम्हांस तरी आहे. कारण अदोनाई मध्ये माझ्या प्रेषितपणाचा तुम्हीं

शिक्का आहा. ३ माझी चौकशी करणा-यांना माझे हेच उत्तर आहे. ४ आम्हांला खाण्यापिण्यास हक्क नाही काय? ५ इतर प्रेषित, अदोनाईचा भाऊ, व केफा ह्यांच्याप्रमाणे, आम्हांलाहि एखाद्या मशीहा ही बहिणीला लग्नाची बायको करून, घेऊन तिला बरोबर नेण्याचा हक्क नाही काय? ६ अथवा कामधंदा केल्यावांचून, उपजीविका करण्याचा हक्क मला व बर्णबाला मात्र नाही काय? ७ आपल्याच खर्चाने शिपाईगिरी करितो, असा कोण आहे? द्राक्षमळा लावून, त्याचे फळ खात नाही असा कोण आहे? कळप पाळून, कळपाचे दूध सेवन करीत नाही असा कोण आहे?

८ मी माणसांच्या रिवाजाप्रमाणे ह्या गोष्टी सांगत आहे काय? तोरा हि (नियमशास्त्रहि), हेच सांगत नाही काय? ९ कारण मोशेच्या तोराह् त (नियमशास्त्रात) असे लिहिले आहे की, मळणी करीत असलेल्या बैलाला मुसके घालू नको. तेंव्हा याव्हे एलोहिमला बैलांचीच काळजी आहे की, १० तो हे सर्वस्वी तुमच्या आमच्याकरिता सांगतो? हो हे तुमच्या आमच्याकरिता लिहिले होते. अशा अर्थाने की, जी नांगरतो त्याने आशेने नांगरावे, आणि जो मळणी करितो, त्याने ती उपयोग घेण्याच्या आशेने करावी. ११ आम्हीं तुम्हांसाठी आध्यात्मिक वस्तूंची पेरणी केल्यावर, जर तुमच्या ऐहिक वस्तूंची कापणी केली, तर त्यात काही मोठी गोष्ट आहे काय? १२ दुसरे लोक जर तुम्हांवरच्या ह्या हक्काचा उपयोग घेतात, तर आम्हीं विशेषेकरून घेऊ नये काय? तथापि हा हक्क आम्ही बजाविला नाही. एवढेच नव्हे तर मशीहा च्या शुभवर्तमानला काही अडथळा करू नये, म्हणून आम्हीं सर्वकाही सहन करितो. १३ मंदिरात सेवा करणारे मंदिरातले उत्पन्न खातात, आणि वेदीजवळ सेवा करणारे वेदीचे भागीदार आहेत, हे तुम्हांस ठाऊक नाही काय? १४ त्याप्रमाणे, अदोनाईने नेमिले आहे की, जे शुभवर्तमान सांगतात, त्यांनी शुभवर्तमानावर आपली उपजीविका करावी.

१५ मी तर ह्यांपैकी कशाचाहि उपयोग केला नाही, व ह्याप्रमाणे मला प्राप्त व्हावे म्हणून मी हे लिहिले असेहि नाही. कारण त्यापेक्षा मी मेलेले बरे, हा स्वभिमान कोणीहि व्यर्थ करणार नाही. १६ जरी मी शुभवर्तमान सांगतो, तरी मला प्रतिष्ठा मिरविण्याचे कारण नाही, कारण मला ती सांगणे भाग आहे. कारण मी शुभवर्तमान सांगितली नाही, तर माझी केवढी दुर्दशा होणार! १७ मी हे स्वतः होऊन केले तर मला वेतन मिळेल, आणि स्वतः होऊन केले नाही, तरी माझ्यावर कारभार सोपविला आहे. १८ तर मग माझे वेतन काय? ते हेच की, मी शुभवर्तमान फूकट सांगावी. अशा हेतूने की, मी शुभवर्तमानाविषयी जो माझा अधिकार तो मी पूर्णपणे चालवू नये.

१९ कारण मी सर्वांपासून स्वतंत्र असतांहि अधिक लोक मिळविण्यासाठी, आपणाला सर्वांचा दास केले आहे. २० यहूदी लोक मिळविण्यासाठी लोकांना यहूद्यासारखा झालो. तोराह् अधीन लोक मिळविण्यासाठी मी तोराह् अधीन नसता, त्यांना तोराह् अधीन सारखा झालो. २१ जे तोराह् विरहित आहेत त्यांना मिळविण्यासाठी, म्हणजे तोराह् नाही अशांना मी तोराह् विरहित असा झालो. तरी याव्हे एलोहिमच्या नियमांबाहेर होतो असे नाही, तर मशीहाच्या नियमाच्या अधीन होतो. २२ दुर्बळांना मिळविण्यासाठी दुर्बळांना मी दुर्बळ झालो, मी सर्वांना सर्व काही झालो आहे. अशा हेतूने की, मी सर्व प्रकारे कित्येकांचे तारण साधावे. २३ मी सर्व काही शुभवर्तमानाकरिता करितो अशासाठी की, मी इतरांबरोबर तिचा भागीदार व्हावे.

२४ शर्यतीत धावणारे सर्व धावतात, पण एकालाच बक्षीस मिळते. हे तुम्हांला ठाऊक नाही काय? असे धावा की, तुम्हांला ते मिळेल. २५ स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येक जण सर्व गोष्टींविषयी इंद्रियदमन करतो. ते नाशवंत मुगूट मिळविण्यासाठी असे करितात, आपण तर अविनाशी मुगूट मिळविण्यासाठी असे करतो. २६ ह्यास्तव मीहि तसाच धावतो, म्हणजे अनिश्चितपणे धावत नाही. तसेच मुष्टियुद्धहि करतो, म्हणजे वा-यावर मुष्टिप्रहार करीत नाही. २७ तर मी आपले शरीर कुदळतो, व त्याला दास करून ठेवतो. असे न केल्यास मी दुस-यांस घोषणा केल्यावर कदाचित मी स्वतः पसंतीस न उतरलेला असा ठरेन.

**१०**.१ बंधूजनहो आपले पूर्वज सर्वच मेघाखाली होते, आणि समुद्रातून ते सर्व पार गेले. २ मेघ व समुद्र ह्यांच्याव्दारे मोशेमध्ये त्या सर्वांचा बाप्तिस्मा झाला. ३ त्या सर्वांनी एकाच आध्यात्मिक अन्न खाल्ले.४ व ते एकच आध्यात्मिक पाणी प्याले. कारण ते

त्यांच्यामागून चालणा-या खडकातून पीत होते, आणि तो खडक मशीहा होता. ५ परंतु याव्हे एलोहिम त्यांच्यातील पुष्कळ लोकांविषयी आनंदी नव्हता, आणि त्यांना अरण्यात ठार मरण्यात आले. ६ आणि या गोष्टी आमच्यासाठी उदाहरण म्हणून घडल्या. कारण ज्याप्रमाणे त्यांनी वाईट गोष्टींची अपेक्षा केली, त्याप्रमाणे आपण वाईटाची इच्छा धरणारे लोक होऊ नये. ७ त्यांच्यापैकी काही जण होते, तसे मूर्तिपूजक होऊ नका. शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे, "लोक खाण्यापिण्यास खाली बसले, आणि ते नाचणे मौजमजा करण्यासाठी उठले." ८ ज्याप्रमाणे त्यांच्यातील काही जणांनी केले, तसे जारकर्म आपण करू नये. त्याचा परिणाम असा झाला की, एका दिवसात तेवीस हजार लोक मरण पावले. ९ आणि त्यांच्यातील काही जणांनी पाहिली तशी आपण मशीहाची परीक्षा पाहू नये. याचा परिणाम असा झाला की, सापांकडून ते मारले गेले.१० कुरकूर करू नका, ज्याप्रमाणे त्यांच्यातील काहीजणांनी केली. याचा परिणाम असा झाला की, नाश करणा-यांकडून नाश पावले.

११ या गोष्टी त्यांच्याबाबतीत उदाहरणार्थ होत्या, म्हणून घडल्या व त्या गोष्टी लिहिल्या गेल्या. यासाठी की, आम्हीं ज्यांच्यावर युगाचा शेवट आला आहे, अशा आपणासाठी त्या इशारा अशा व्हाव्यात. १२ म्हणून मी खंबीरपणे उभा आहे असा जो विचार करतो, त्याने आपण पडू नये म्हणून जपावे. १३ जे मनुष्याला सामान्य नाही, अशा कोणत्याही मोहाने तुम्हांला पकडले नाही. परंतु याव्हे एलोहिम विश्वासनीय आहे. तुम्हांला सहन करता येते त्यापलीकडे तो तुमची परीक्षा घेणार नाही. परंतु त्या मोहाबरोबर त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही तयार करील, म्हणजे तुम्हांला सहन करणे शक्य होईल. १४ तेंव्हा माझ्या प्रियांनो मूर्तिपूजा टाळा. १५ मी तुमच्याशी बुद्धिमान लोक समजून बोलत आहे, मी काय बोलत आहे याचा तुम्हींच न्याय करा. १६ आशिर्वादाचा प्याला जो आशिर्वादीत करण्यास सांगतो, तो मशीहाच्या रक्तात सहभागी आहे नाही काय? १७ वस्तुस्थिती अशी आहे की, फक्त भाकरीचा एकच तुकडा आहे, म्हणजे आपण सर्व एकाच शरीरापासून आहोत. आपण पुष्कळजण एक भाकर एक शरीर आहोत, कारण आपला सर्वांचा त्या भाकरीत भाग आहे. १८ इस्राएल राष्ट्राकडे पाहा, जे अर्पण केलेले खातात, ते वेदीचे भागीदार आहेत नाही का? १९ तर मी काय म्हणतो? माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे का की, मूर्तिला वाहिलेले अन्न काहीतरी आहे, किंवा मूर्ति काहीतरी आहे? २० नाही, परंतु उलट माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, जे अर्पण ते लोक करतात, ते अर्पण अशुद्ध आत्म्यांना करतात. याव्हे एलोहिमला करीत नाहीत, आणि तुम्हीं अशुद्ध आत्म्याचे भागीदार व्हावे, असे मला वाटत नाही! २१ तुम्हीं याव्हे एलोहिमचा, आणि अशुद्ध आत्म्यांचा सुद्धा, असे दोन्ही प्याले पिऊ शकत नाही. तुम्ही अदोनाईच्या मेजाचे, आणि अशुद्ध आत्म्याच्या मेजाचे, भागीदार होऊ शकत नाही. २२ आपण अदोनाईला ईर्षेस पेटविण्याचा प्रयत्न करीत आहोत का? कारण तो जितका सामर्थ्य शाली आहे तितके आम्हीं नाही.

२३ काहीही करण्यास आम्हीं स्वतंत्र आहोत, पण सर्वच हितकारक नाही.आम्हीं काहीही करण्यास स्वतंत्र आहोत, परंतु सर्व गोष्टी लोकांना सामर्थ्ययुक्त होण्यास मदत करीत नाहीत. २४ कोणीही स्वतःचेच हित पाहू नये, तर दुस-यांचेही पाहावे.२५ मांसाच्या बाजारात जे मांस विकले जाते, ते कोणतेही मांस खा. विवेकबुद्धीला त्या मांसाविषयीचे कोणतेही प्रश्न न विचारता खा. २६ कारण ज्याप्रमाणे शास्त्रलेख सांगते, "पृथ्वी व तिच्यावरील सर्व काही अदोनाईचे आहे." २७ विश्वास न ठेवणा-या पैकी जर कोणी तुम्हांला जेवावयास बोलाविले, आणि तुम्हांस जावेसे वाटले, तर सद्सद्विवेक बुद्धिने कोणतेही प्रश्न न विचारता तुमच्यापुढे वाढलेले सर्व खा. २८ परंतु जर कोणी तुम्हांस सांगितले की, हे मांस यज्ञात देवाला अर्पिलेले होते. तर विवेकबुद्धि साठी खाऊ नका. २९ आणि जेंव्हा मी विवेक म्हणतो, तो स्वतःचा असे मी म्हणत नाही. तर इतरांचा, आणि हेच फक्त एक कारण आहे. कारण माझ्या स्वतंत्त्याचा इतरांच्या सद्सद्विवेक बुद्धिने न्याय का करावा? ३० जर मी आभारपूर्वक अन्न खातो, तर माझ्यावर टीका होऊ नये. कारण या गोष्टींबद्दल याव्हे एलोहिमला मी धन्यवाद देतो. ३१ म्हणून खाताना पिताना, किंवा काहीही करताना सर्व काही, याव्हे एलोहिमच्या गौरवासाठी करा. ३२ यहूदी लोक, हेल्लेणी लोक, किंवा याव्हे एलोहिमच्या मंडळीला, अडखळण होऊ नका. ३३ जसा मी प्रत्येक बाबतीत सर्वांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतो. आणि माझ्यासाठी काय हितकारक आहे, हे न पाहता इतर प्रत्येकासाठी काय हितकारक आहे, ते पाहतो. यासाठी की, त्यांचे तारण व्हावे.

११ •१ मी जसे मशीहाचे अनुकरण करतो, तसे माझे अनुकरण करणारे व्हा • २ मी तुमची प्रशंसा करतो, कारण तुम्हीं माझी नेहमी आठवण करता • आणि मी जी शिकवण तुम्हांला दिली, ती तुम्हीं काटेकोरपणे पाळता • ३ परंतु तुम्हांला हे माहीत व्हावे असे मला वाटते की, मशीहा हा प्रत्येक पुरूषाचे मस्तक आहे • आणि याव्हे एलोहिम, मशीहाचे मस्तक आहे • ४ प्रत्येक मनुष्य जो प्रार्थना करतात, किंवा याव्हे एलोहिम कडून आलेला संदेश देताना आपले मस्तक आच्छादितो, तो मस्तकाला लज्जा आणतो • ५ परंतु प्रत्येक स्त्री जी आपले मस्तक न झाकता, लोकांमध्ये याव्हे एलोहिमचा संदेश सांगते, ती मस्तकाचा अपमान करते • कारण ती स्त्री मुंडलेल्या स्त्री सारखीच आहे • ६ जर स्त्री आपले मस्तक आच्छादित नाही, तर तिने आपले केस कापून घ्यावेत • परंतु केस कापणे किंवा मुंडण करणे स्त्रीस लज्जास्पद आहे, तिने आपले मस्तक झाकावे • ७ ज्या अर्थी मनुष्य याव्हे एलोहिमची प्रतिमा आणि वैभव प्रतिबिंबित करतो, त्या अर्थी त्याने मस्तक झाकणे योग्य नाही • परंतु स्त्री पुरूषाचे वैभव आहे • ८ पुरूष स्त्रीपासून नाही, परंतु स्त्री पुरूषापासून आली आहे • ९ आणि मनुष्य स्त्रीकरिता निर्माण केला गेला नाही, तर स्त्री पुरूषासाठी निर्माण केली गेली • १० यासाठी याव्हे एलोहिमने स्त्रीला अधिकार दिलेला आहे, त्याचे चिन्ह म्हणून तिने आपले मस्तक आच्छादावे, व याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) करिता सुद्धा तिने हे करावे • ११ तरीही अदोनाई मध्ये स्त्री पुरूषा पासून स्वतंत्र नाही, व पुरूष स्त्रीपासून स्वतंत्र नाही • १२ कारण स्त्री जशी पुरूषापासून आहे, तसा पुरूषही स्त्रीपासून जन्माला येतो, परंतु सर्व गोष्टी याव्हे एलोहिम पासून आहेत • १३ हे तुम्हीच ठरवा की, मस्तक न आच्छादिता सभेत याव्हे एलोहिमची प्रार्थना करणे स्त्रीसाठी योग्य आहे का? १४ पुरूषांनी लांब केस वाढविणे, हे त्याच्यासाठी लज्जास्पद आहे • असे निसर्गसुद्धा तुम्हांला शिकवीत नाही काय? १५ परंतु स्त्रीने लांब केस राखणे हा तिचा मान आहे, कारण तिला तिचे केस निसर्गतः आच्छादनासाठी दिले आहेत • १६ परंतु जर कोणी वितंडवाद दिसला तर आपल्यात अशी रीत नाही, आणि याव्हे एलोहिम च्या मंडळयांतहि नाही •

१७ पण आता ही पुढची आज्ञा देत असताना, मी तुमची प्रशंसा मंडळी म्हणून करीत नाही • कारण तुमच्या एकत्र येण्याने तुमचे चांगले न होता, तुमची हानि होते • १८ प्रथम मी ऐकतो की, जेंव्हा मंडळीमध्ये तुम्हीं एकत्र जमता • तेथे तुमच्यामध्ये गट असतात, आणि काही प्रमाणात ते खरे मानतो • १९ तरीही तुम्हांमध्ये पक्ष असावेत यासाठी की, जे तुमच्यामध्ये पसंतीस उतरलेले आहेत, ते प्रगट व्हावेत • २० म्हणून जेंव्हा तुम्हीं एकत्र येता, तेंव्हा तुम्हीं ख-या अर्थाने अदोनाई भोजन घेत नाही • २१ कारण तुम्हीं भोजन करता तेंव्हा तुम्हांतील प्रत्येक जण, अगोदरच आपले स्वतःचे भोजन करतो • एक भुकेला राहतो, तर दुसरा मस्त झालेला असतो • २२ खाण्यापिण्यासाठी तुम्हांला घरे नाहीत का? का तुम्ही याव्हे एलोहिमच्या मंडळीला तुच्छ मानता, आणि जे गरीब आहेत त्यांना लाजवता? मी तुम्हांला काय म्हणू? मी तुमची प्रशंसा करू काय? याबाबतीत मी तुमची प्रशंसा करीत नाही •

२३ कारण अदोनाई पासून जे मला मिळाले तेच मी तुम्हांला दिले • अदोनाई येशूवाह ज्या रात्री मारण्यासाठी धरून देण्यात आले त्याने भाकर घेतली, २४ आणि उपकार मानल्यावर ती मोडली • आणि म्हणाला, "हे माझे शरीर आहे जे मी तुमच्यासाठी देत आहे, माझी आठवण करण्यासाठी हे करा •" २५ त्याच प्रमाणे, त्यांनी भोजन केल्यावर त्याने द्राक्षारसाचा प्याला घेतला • आणि म्हणाला, "हा द्राक्षारसाचा प्याला माझ्या रक्ताने स्थापित केलेला हादेश बेरीथ (नवा करार) आहे • जेंव्हा जेंव्हा तुम्हीं द्राक्षारस प्याल, तेंव्हा माझी आठवण करण्यासाठी हे करा • २६ कारण जितके वेळा तुम्हीं ही भाकर खाता व हा द्राक्षारसाचा प्याला पिता, तितके वेळा तुम्हीं अदोनाईच्या मरणाची, तो येईपर्यंत त्याची घोषणा करीता • २७ म्हणून जो कोणी अयोग्य रीतीने अदोनाईची भाकर खातो, किंवा द्राक्षारसाचा प्याला पितो, तो अदोनाईच्या शरीराविषयी आणि रक्ताविषयी दोषी ठरेल • २८ म्हणून मनुष्याने स्वतःची आत्मपरीक्षण करावे, आणि नंतर भाकर खावी किंवा द्राक्षारसाचा प्याला घ्यावा •२९ कारण जर तो अदोनाईच्या शरीराचा अर्थ न जाणता, ती भाकर खातो व द्राक्षारसाचा प्याला पितो • तर तो खाण्याने आणि पिण्याने स्वतःवर दंड ओढवून घेतो • ३० याच कारणामुळे तुम्हांतील अनेक जण अशक्त व आजारी आहेत, आणि पुष्कळजण झोपलेले आहेत • ३१ परंतु जर आम्हीं आपण आपलाच न्यायनिवाडा केला असता, तर आपला दंड ओढवला नसता • ३२ ज्या अर्थी आपलावर दंड ओढवला आहे, त्या अर्थी आपल्याला अदोनाई कडून शिक्षा होत आहे • अशा हेतूने की, जगाच्या बरोबर आपल्याला दंडाज्ञा होऊ नये • ३३ ह्यास्तव माझ्या बंधूनो, तुम्हीं

भोजनास एकत्र जमता, तेंव्हा एकमेकांची वाट पाहा. ३४ कोणी भुकेला असला तर त्याने घरी खावे. अशा हेतूने की, तुमचे एकत्र जमणे दंडास कारण होऊ नये. बाकीच्या गोष्टींची व्यवस्था मी आल्यावर लावून देईन.

**१२** .१ आता बंधूनो, आध्यात्मिक दानांसबंधी तुम्ही अज्ञान असावे, असे मला वाटत नाही.२ तुम्हांला माहीत आहे की, जेंव्हा तुम्हीं यहूदीतर होता, तेंव्हा मूर्तिपूजेकडे तुमचा काल होता. ३ म्हणून मी तुम्हांला सांगत आहे की, याव्हे एलोहिमच्या रूहुव्वा ने (आत्म्याने) बोलणारा कोणीही मनुष्य असे म्हणत नाही की, येशूवाह शापित आहे. आणि पवित्र आत्म्याशिवाय कोणीही येशूवाह हा अदोनाई आहे, असे म्हणू शकत नाही. ४ आध्यात्मिक दाने विभागलेली आहेत, पण तोच रूहुव्वा (आत्मा) ही विभागणी करतो. ५ सेवेचे प्रकार आहेत, परंतु ज्याची आम्ही सेवा करतो तो एकच आहे. ६ कार्य करण्याचे वेगवेगळे विभाग आहेत, पण ह्या सेवा एकाच याव्हे एलोहिम कडून येतात. ७ कारण प्रत्येकाच्या फायद्यासाठी एकेकाला आत्म्याचे प्रकटीकरण दिले आहे. ८ एका व्यक्तीला आत्म्याच्या व्दारे ज्ञानाचे वचन मिळते, एखाद्याला त्याच आत्म्यानुसार विद्येचे वचन मिळते, ९ एखाद्याला त्याच आत्म्यात विश्वास, एखाद्याला त्याच एका आत्म्यात निरोगी करण्याची कृपादाने, १० एखाद्याला अद्भुत कार्य करण्याची शक्ति, एखाद्याला संदेश देण्याची शक्ति, एखाद्याला आत्मे ओळखण्याची शक्ति, एखाद्याला विशेष भाषा बोलण्याची शक्ति, व एखाद्याला भाषाचा अर्थ सांगण्याची शक्ति मिळते.११ तरी ही सगळी कार्ये तोच एक रूहुव्वा करतो, तो आपल्या इच्छेप्रमाणे एकेकाला ती वाटून देतो.

१२ कारण जसे शरीर एक असून त्याला अवयव पुष्कळ असतात, आणि त्या शरीराचे अवयव पुष्कळ असून, सर्व मिळून एक शरीर बनते, तसाच मशीहा आहे. १३ कारण आपण यहूदी असू, किंवा हेल्लेणी असू, गुलाम असू, किंवा स्वतंत्र असू, एक शरीर होण्यासाठी आपणा सर्वांना एका रूहुव्वा त (आत्म्यात) बाप्तिस्मा मिळाला आहे. आणि आपण सर्व एकाच आत्म्याने पूर्ण झालो आहो. १४ कारण शरीर म्हणजे एक अवयव असे नव्हे, तर अनेक अवयव असे आहे. १५ जर पाय म्हणेल मी हात नाही म्हणून मी शरीराचा नाही, तर त्यावरून तो शरीराचा नाही, असे होत नाही १६ जर कान म्हणेल मी डोळा नाही, म्हणून मी शरीराचा नाही, तर त्यावरून तो शरीराचा असे होत नाही. १७ सवंध शरीर डोळा असते, तर ऐकण्याची क्रिया कशी झाली असती? सवंध शरीर कानच असते, तर हुगण्याची क्रिया कशी झाली असती? १८ तर याव्हे एलोहिमने आपल्या इच्छेप्रमाणे शरीरामध्ये, प्रत्येक अवयव लावून ठेविला आहे. १९ ते सर्व मिळून एकच अवयव असते, तर शरीर कोठे असते? २० तर मग अवयव पुष्कळ असून शरीर एक असे आहे. २१ डोळयाला हातास म्हणता येत नाही, की मला तुझी गरज नाही. तसेच मस्तकाला पायांना म्हणता येत नाही की, मला तुमची गरज नाही. २२ इतकेच नव्हे तर शरीराचे जे अवयव विशेष अशक्त दिसतात, तेहि आवश्यक आहेत. २३ शरीराची जी असे कमी योग्यतेची अशी आपण मानतो, त्यांना आपण पाघंरूण घालून विशेष मान देतो, आणि आपल्या कुरूप अंगास सुरूपता मिळते. २४ आपल्या सुरूप अंगांस अशी गरज नाही जे उणे आहे. त्यास विशेष मान मिळावा, अशा रीतीने याव्हे एलोहिमने शरीर जुळविले आहे. २५ अशासाठी की, शरीरात फूट नसावी, तर अवयवांनी एकमेकांची सारखीच काळजी घ्यावी. २६ एक अवयव दुखावला, तर त्याच्याबरोबर सर्व अवयवांना सोसावे लागते, एका अवयवाचा सन्मान झाला, तर त्याच्याबरोबर सर्व अवयव आनंदित होतात.

२७ तुम्हीं मशीहाचे शरीर असून वैयक्तिकरित्या त्याचे अवयव आहा. २८ तसे याव्हे एलोहिमने मंडळीला कित्येकांना नेमिले आहे. प्रथम प्रेषित, दुसरे नव्वीईम (संदेष्टे), तिसरे रव्वुनी (शिक्षक), शिवाय अद्भुत कृत्ये करणारे, निरोगी करण्याची कृपादाने मिळालेले, मदतनीस असणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्नभिन्न भाषा बोलणारे, असे नेमिले आहेत. २९ सगळेच प्रेषित आहेत काय? सगळेच नव्वीईम (संदेष्टे,) आहेत काय? सगळेच रव्वुनी (शिक्षक) आहेत काय? सगळेच अद्भुत कृत्ये करणारे आहेत काय? ३० निरोगी करण्याची कृपादाने सगळयानांच आहेत काय? सगळेच भिन्नभिन्न भाषा बोलतात काय? भाषाचा अर्थ सगळेच सांगतात काय? ३१ श्रेष्ठ कृपादानांची उत्कंठा बाळगा, शिवाय एक सर्वोत्कृष्ट मार्ग मी तुम्हांस दाखवितो.

**१३** .१ मी जरी मनुष्यांच्या व एलोहिम मालाक (देवदूतां) च्या भाषा बोलत असलो, तरी माझ्या ठायी अहेद (प्रीति) नसली तर मी वाजणारी थाळी, किंवा झणझणणारी झांज असा झालो आहे. २ आणि जरी मला संदेश देण्याचे कृपादान असले, आणि मला सर्व

गुजे व सर्व विद्या समजत असल्या, आणि जरी डोंगर ढळवावे, असा मला पूर्ण विश्वास असला. तरी मला अहेद (प्रीति) नसल्यांस, मी काहीच नाही. ३ आणि जरी मी आपली सर्व मालमत्ता गोरगरिबांच्या पोषणासाठी दिली, आणि मी आपले शरीर जाळण्यासाठी दिले, तरी मला अहेद (प्रीति) नसल्यास, मला काही लाभ नाही. ४ अहेद (प्रीति) सहनशील आहे, उपकारशील आहे, अहेद (प्रीति) हेवा करीत नाही, अहेद (प्रीति) बढाई मारत नाही, फुगत नाही, ५ ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहात नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही, ६ ती अनीतीत आनंद मानीत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानिते. ७ ती सर्व काही सहन करिते, सर्व काही खरे मानण्यास सिद्ध असते. सर्वांची आशा धरिते, सर्वासंबंधाने धीर धरिते.

८ अहेद (प्रीति) कधी अंतर देत नाही. संदेश असले तरी ते रद्द होतील, भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील, आणि विद्या असली तरी ती रद्द होईल. ९ कारण आपल्याला केवळ अंशतः कळते, आणि अंशतः संदेश देता येतो. १० पण जे पूर्ण ते येईल, तेंव्हा अपूर्णता नष्ट होईल. ११ मी मूल होतो, तेंव्हा मुलासारखा बोलत असे, मुलासारखी माझी बुद्धि असे, मुलासारखे माझे विचार असत, आता प्रौढ झाल्यावर, मी पोरपणाच्या गोष्टी सोडून दिल्या आहेत. १२ कारण हल्ली आपल्याला आरशात अस्पष्ट असे दिसते. परंतु नंतर आपण साक्षात पाहू, आता मला कळते, ते अपूर्ण आहे. पण नंतर मला असे पूर्णपणे ओळखण्यांत आले आहे, तसे मी पूर्णपणे ओळखीन. १३ सारंश, अमान (विश्वास), तीक्ववाह (आशा) अहेद (प्रीति), ही तिन्ही टिकणारी आहेत, परंतु त्यात अहेद (प्रीति) श्रेष्ठ आहे.

**१४** .१ मी अहेद (प्रीति) हे तुमचे ध्येय असू द्या. आणि आध्यात्मिक दानांची विशेषतः तुम्हांला संदेश देता यावा, याची मनापासून इच्छा बाळगा. २ ज्याला इतर भाषांमध्ये बोलण्याचे दान आहे, तो खरे पाहता माणसांबरोबर बोलत नाही. तर याव्हे एलोहिम बरोबर बोलतो. कारण तो काय बोलतो हे कोणालाही कळत नाही, आत्म्याच्या व्दारे तो गुढ गोष्टी बोलतो. ३ परंतु जो संदेश देतो, तो माणसांना उद्देशून बोध, उन्नती, व सांत्वन याविषयी बोलतो. ४ भाषा बोलणारा, स्वतःचीच आध्यात्मिक दृष्टया उन्नती करून घेतो. पण संदेष्टा संपूर्ण मंडळीची उन्नती करतो. ५ आता तुम्हीं सर्वांनी भाषा बोलाव्या तरी विशेषतः तुम्हीं संदेश द्यावा, अशी माझी इच्छा आहे. कारण मंडळीच्या उन्नती करिता अर्थ न सांगता, जो भाषा बोलतो त्याच्यापेक्षा संदेष्टा श्रेष्ठ आहे.

६ तर आता बंधुजनहो, मी तुमच्याकडे येऊन निरनिराळया भाषांमध्ये बोललो. पण प्रगटीकरण, विद्या, संदेश, किंवा शिक्षण ह्यांच्याव्दारे जर तुमच्या बरोबर बोललो नाही, तर मी तुमचे काय हित साधणार? ७ पावा, वीणा असल्या नाद काढणा-या निर्जीव वस्तुंच्या भिन्नभिन्न नादांत भेद करून न दाखविल्यास पांव्याचा नाद कोणता विण्याचा नाद कोणता हे कसे समजेल? ८ तसेच कर्णा अस्पष्ट नाद काढील तर लढाईस जाण्याची तयारी कोण करील? ९ त्याप्रमाणे तुम्हीहि सहज समजेल अशा भाषेतून बोलला नाही, तर तुमचे बोलणे कसे कळेल? तुम्हीं वा-याबरोबर बोलणारे व्हाल. १० जगात भाषांचे बरेच प्रकार असतील, तरी एकहि अर्थरहित नाही. ११ ह्यास्तव मला भाषेचा अर्थ समजला नाही, तर बोलणा-याला मी परक्या देशाचा असा होईन, आणि बोलणारा मला परक्या देशाचा असा होईल. १२ तर जे तुम्हीं अध्यात्मिक दानांविषयी उत्सुक आहा, ते तुम्हीं मंडळीच्या उन्नतीसाठी ती दाने विपुल मिळावी म्हणुन खटपट करा.

१३ भाषा बोलणा-यांने आपणाला अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी. १४ कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली, तर माझा आत्मा प्रार्थना करितो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणालाहि होत नाही. १५ तर मग काय? मी प्रार्थना आत्म्याच्या सामर्थ्याने करणार, व बुद्धीच्या सामर्थ्यानेहि करणार. मी स्तोत्र आत्म्याच्या सामर्थ्याने गाणार, व बुद्धीच्या सामर्थ्यानेहि गाणार. १६ तू केवळ आत्म्याने धन्यवाद केला, तर जो अशिक्षित लोकांपैकी आहे, तो तुझ्या उपकारस्तुतीला आमेन कसे म्हणेल? कारण तू जे बोलतोस ते त्याला समजत नाही. १७ कारण तुझे उपकारस्तुति करणे चांगले असेल, तरी त्याने दुस-याची उन्नति होत नाही. १८ तुम्हां सर्वांपेक्षा मी अधिक भाषा बोलतो, म्हणून मी याव्हे एलोहिमचे आभार मानितो. १९ तथापि मंडळीत अन्य भाषेत दहा हजार शब्द बोलवे,

त्यापेक्षा मी दुस-यांस शिकविण्यासाठी पांच शब्द स्वतः समजून उमजून बोलावे, हे मला आवडते.

२० बंधुजनहो, बालबुद्धीचे होऊ नका, तर दुष्टाईविषयी तान्ही बाळे व्हा, आणि बुद्धीविषयी प्रौढ व्हा. २१ तोराह् त लिहिलेले आहे की, मी या लोकांशी अन्य भाषांनी व परक्यांच्या ओठांनी बोलेन, तरी तशानेही ते माझे ऐकाणार नाहीत, असे अदोनाई म्हणतो. २२ म्हणून अन्य भाषा चिन्ह अशा आहेत, ते विश्वास ठेवणा-यांसाठी नव्हे, पण विश्वास न ठेवणा-यांसाठी आहे. परंतु संदेश सांगावे, हे विश्वास न ठेवणा-यांसाठी नव्हे, पण विश्वास ठेवणा-यांसाठी आहे.२३ यास्तव जर सगळी मंडळी एकत्र मिळाली आणि सर्वच अन्य भाषांमध्ये बोलले, आणि अशिक्षित किंवा अविश्वासी आत आले, तर तुम्हीं वेडे आहा असे ते म्हणणार नाहीत काय? २४ परंतु जर सर्वांनी संदेश सांगितला, आणि कोणी अविश्वासी किंवा अशिक्षित आत आला, तर सर्वांच्याकडून त्याच्या पापाविषयी त्याची खात्री होते. सर्वांच्याकडून त्याचा निवाडा होतो. २५ त्याच्या आत्म्यातील गुप्त गोष्टी प्रकट होतात. आणि म्हणून तो उपडा पडून याव्हे एलोहिमला नमन करील, आणि याव्हे एलोहिम तुम्हांमध्ये खचित आहे, असे तो प्रसिद्ध करून सांगेल.

२६ बंधुजनहो, तर मग काय? तुम्हीं उपासनेकरिता एकत्र जमता, तेंव्हा तुमच्यापैकी प्रत्येक जण कोणी स्तोत्र गाण्यास, कोणी शिक्षण देण्यात, कोणी प्रगटीकरण सांगण्यास, कोणी भाषेतून बोलण्यास, तर कोणी तिचा अर्थ सांगण्यास तयार असतो, सर्व काही उन्नतीसाठी असावे. २७ भाषा बोलायच्या तर बोलणारे दोघे, किंवा फार तर तिघे असावे. अधिक नसावे व त्यांनी पाळीपाळीने बोलावे, आणि एकाने अर्थ सांगावा. २८ परंतु अर्थ सांगणारा नासला, तर त्यांनी मंडळीमध्ये गप्प राहावे, स्वतःबरोबर व याव्हे एलोहिम बरोबर बोलावे. २९ संदेश देणा-या दोघांनी किंवा तिघांनी बोलावे, आणि इतरांनी निर्णय करावा. ३० तरी बसलेल्या इतरांपैकी कोणाला काही प्रगट झाले, तर बोलणा-यांने गप्प राहावे.३१ सर्वांस शिक्षण मिळेल व सर्वांस बोध होईल, अशा रीतीने तुम्हां सर्वांना एकामागून एक संदेश देता येईल. ३२ नव्वीई चे रूहुव्वा (संदेष्टयांचे आत्मे) नव्वीईम च्या (संदेष्टयांच्या) स्वाधीन असतात. ३३ कारण याव्हे एलोहिम अव्यवस्था माजविणारा नाही, तर तो शालोम चा (शांतीचा) याव्हे एलोहिम आहे. पवित्र जनांच्या सर्व मंडळयांत जशी रीत आहे.

३४ तसे स्त्रियांनी मंडळयात गप्प राहावे, कारण त्यांना बोलण्याची परवानगी नाही. तोराह् त सांगितल्याप्रमाणे, त्यांनी आपल्या मर्यादेत राहावे. ३५ त्यांना काही माहिती करून घेण्याची इच्छा असली, तर त्यांनी आपल्या पतीना घरी विचारावे. कारण स्त्रीने मंडळीत बोलणे, हे लज्जास्पद आहे. ३६ याव्हे एलोहिमच्या वचनाचा उगम तुमच्यापासून झाला काय? अथवा ते केवळ तुमच्याकडे आले काय? ३७ जर कोणी स्वतःला संदेष्टा किंवा आत्म्याने संपन्न असे मानीत असेल, तर जे मी तुम्हांस लिहिले ते अदोनाईची आज्ञा आहे, असे त्यांने समजावे ३८ कोणी तसे समजत नसल्यास न समजो. ३९ ह्यास्तव बंधुजनहो, तुम्हीं संदेश देण्याची उत्कंठा बाळगा, व निरनिराळया भाषा बोलण्यास मना करू नका. ४० सर्व काही शिस्तवार, व व्यवस्थितपणे होऊ द्या.

**१५** .१ बंधुजनहो, जी सुवार्ता मी तुम्हांस सांगितली, जिचा तुम्हीं स्विकार केला. जिच्यांत तुम्हीं स्थिरहि राहत आहा, २ जिच्याव्दारे तुमचे तारण होत आहे. तीच सुवार्ता मी तुम्हांस कळवितो. ज्या वचनाने मी तुम्हांस ही सुवार्ता सांगितली, त्या वचनानुसार ती तुम्हीं दृढ धरिली असेल, नसल्यास तुम्हीं विश्वास ठेवलेला नाही. ३ कारण मला सुद्धा पहिल्यांस, जे मिळाले ते मी तुमच्या स्वाधीन केले. ते हे की, मशीहा आमच्या पापांसाठी मरण पावला, हे जे वचनात लिहिले आहे. ४ व त्याला पुरण्यात आले, व तिस-या दिवशी त्याला उठविण्यात आले .५ व तो केफाला दिसला, नंतर आकरा प्रेषितांना, ६ नंतर तो एकाच वेळी पाचशे हून अधिक बांधवांना दिसला, त्यांच्यापैकी बहुसंख्य अजूनही जिवंत आहेत, तर काही मेले आहेत. ७ नंतर तो याकोबाला दिसला, मग पुन्हा तो सर्व प्रेषितांना दिसला. ८ आणि शेवटी मी जो अवेळी जन्मलो, त्या मलासुद्धा तो दिसला. ९ कारण प्रेषितांमध्ये मी कनिष्ठ आहे. मी प्रेषित म्हणून घेण्याच्या सुद्धा योग्यतेचा नाही, कारण याव्हे एलोहिम च्या मंडळीचा मी छळ केला. १० पण याव्हे एलोहिमच्या दयेने मी जो आहे, तो मी प्रेषित आहे. आणि त्याची माझ्यावरची कृपा व्यर्थ गेली नाही. उलट त्या सर्वांपेक्षा अधिक काम मी केले आहे.

करणारा मी नव्हतो, तर याव्हे एलोहिमची दया जी माझ्याबरोबर होती, ती करीत होती. ११ म्हणून जरी मी तुम्हांला उपदेश केला,
किंवा त्यांनी उपदेश केला, तरी आम्हीं सर्व हाच उपदेश करू. आणि तुम्ही यावरच विश्वास ठेवला.

१२ पण जर आम्हीं मशीहा मेलेल्यांतून उठविला गेला आहे, अशी सुवार्ता गाजवितो. तर मृतांचे पुनरूत्थान नाही, असे तुमच्यातील
काहीजण म्हणतात हे कसे? १३ जर मृतांचे पुनरूत्थान नाही, तर मशीहा मरणातून उठविला गेला नाही.१४ तर आमचा संदेश व्यर्थ
आहे. आणि तुमचा विश्वासही व्यर्थ आहे. १५ आणि आम्हीं सुद्धा याव्हे एलोहिम विषयीचे खोटी साक्षीदार ठरू. कारण आम्हीं
याव्हे एलोहिम समोर शपथपूर्वक साक्ष दिली आहे की, मशीहाला मेलेल्यांतून त्याने उठविले, पण जसे ते म्हणतात. त्याप्रमाणे, जर
याव्हे एलोहिमने मशीहाला उठविले नाही, तर मेलेले मरणातून उठविले जात नाहीत. १६ आणि जर मृतांना उठविले जात नाही, तर
मशीहाला मरणातून उठविण्यात आले नाही. १७ आणि जर मशीहा मरणातून उठविला गेला नाही, तर तुमचा विश्वास व्यर्थ आहे.
तुम्हीं अजून सुद्धा पापातच आहात. १८ होय, आणि जे मशीहात मेलेले आहेत, त्यांचा नाश झाला आहे. १९ जर मशीहा वर
असलेली आमची आशा, ही फक्त या पृथ्वीवरील जीवनासाठीच असली, तर सर्व मनुष्यात आम्हीं दयनीय असे आहोत.

२० परंतु आता प्रत्यक्षात मशीहा मरणातून उठविला गेला आहे. जे मेलेले आहेत, त्यांच्यातील तो प्रथम फळ आहे. २१ कारण ज्या
अर्थी मनुष्याव्दारे मरण आले, त्या प्रमाणे मृतांचे पुनरूत्थान सुद्धा मनुष्याव्दारेच आले. २२ कारण जसे आदामाव्दारे सर्व मरण
पावतात, तसेच सर्वजण मशीहा व्दारे जिवंत केले जातील. २३ पण प्रत्येक जण त्याच्या क्रमानुसार, मशीहा जो प्रथम फळ आहे.
आणि मग मशीहा येण्याच्या वेळी त्याचे असलेले, २४ मग शेवट येईल. प्रत्येक अधिपती, प्रत्येक सत्ता, व प्रत्येक सामर्थ्य, जेंव्हा
मशीहा नाहीसे करील, तेंव्हा मशीहा, याव्हे एलोहिम अब्बाचे राज्य देईल. २५ कारण याव्हे एलोहिमने मशीहाचे शत्रू, मशीहाच्या
पायाखाली ठेवीपर्यंत मशीहाने राज्य केले पाहिजे. २६ जो शेवटचा शत्रू नाहीसा केला, जाईल तो मृत्यू हा होय. २७ कारण याव्हे
एलोहिमने सर्व काही त्याच्या अधिकारात ठेवले आहे. आता जेंव्हा शास्त्रलेख सांगते की, सर्व गोष्टी अंकीत केल्या आहेत. तेंव्हा
सर्व स्पष्ट आहे की, ज्याने सर्व गोष्टी त्याच्या अंकीत केल्या आहेत. तो याव्हे एलोहिम सोडून, इतर सर्व गोष्टी त्याच्या अधिकार
क्षेत्रात आहेत. २८ आणि सर्व गोष्टी जेंव्हा स्वाधीन केलेल्या आहेत. तेंव्हा बेन (मुलगा) सुद्धा, याव्हे एलोहिमच्या ज्याने सर्व गोष्टी
स्वाधीन केल्या आहेत, स्वतः स्वाधीन केला जाईल. यासाठी की, याव्हे एलोहिम सर्वांवर संपूर्णपणे अधिपती असावा. २९ नाही तर
मेलेल्यांसाठी, व त्यांची पुन्हा भेट होईल, या आशेने ज्यांनी बाप्तिस्मा घेतला आहे, ते काय करतील? जर मेलेले उठविले जात
नाहीत, तर त्यांच्यासाठी लोक बाप्तिस्मा का घेतात?

३० आम्हीं सुद्धा प्रत्येक घटकेला जीव धोक्यात का घालतो? ३१ बंधूजनहो, मशीहा येशूवाह आपला अदोनाई ह्यांच्या ठायी मला
तुम्हांविषयी जो अभिमान आहे. त्याला स्मरून मी शपथपूर्वक सांगतो की, मी रोज रोज मरतो. ३२ मनुष्य स्वभावाप्रमाणे म्हणावयाचे,
तर इफिसांत मी श्वापदांबरोबर लढाई केली. ह्यात मला काय लाभ? मेलेले उठविले जात नाहीत, तर चला आपण खाऊ पिऊ,
कारण उद्या मरावयाचे आहे. ३३ फसू नका, वाईट सोबती चांगल्या सवयी बिघडवितात. ३४ नीतिमत्वा संबंधाने शुद्धीवर या, आणि
पाप करू नका. कारण कित्येकांना याव्हे एलोहिम संबंधीचे ज्ञान नाही, हे मी तुम्हांस लाजविण्या साठी बोलतो.

३५ आता कोणी म्हणेल मेलेले कसे उठविले जातात, व ते कोणत्या प्रकारच्या शरीराने ते येतात? ३६ हे निबुद्धि मनुष्या, तू जे
पेरतोस, ते प्रथम मेल्याशिवाय जिवंत होत नाही. ३७ आणि तू पेरतोस, त्यासंबंधी तू जे जमिनीत पेरतोस, ते वाढलेले रोपटे नसून जे
वाढतच राहणार आहे. ते नव्हे, तर फक्त दाणा तो गव्हाचा, किंवा इतर कोठला तरी असेल. ३८ आणि मग याव्हे एलोहिमने
निवडल्याप्रमाणे, तो त्याला आकार देतो. तो प्रत्येक दाण्याला त्याचे स्वतःचे शरीर देतो. ३९ जिवंत प्राणीमात्रांचे सर्वांचे देह सारखेच
नसतात. ज्याप्रकारे मनुष्याचे शरीर एक प्रकारचे असते, प्राण्यांचे शरीर दुस-या प्रकारचे असते, पक्ष्यांचे वेगळया प्रकारचे असते,
आणि माशांचे आणखी वेगळया प्रकारचे असते. ४० तसेच आकाशातील शरीरे आहेत, आणि पृथ्वीवरील शरीरे आहेत. पण
आकाशातील शरीराचे वैभव एक प्रकारचे असते, तर पृथ्वीवरील शरीराला दुस-या प्रकारचे असते. ४१ सूर्याचे तेज वेगळया

प्रकारचे, तर चंद्राचे तेज वेगळया प्रकारचे असते. ता-यांचे तेज वेगळया प्रकारचे असते, आणि तेजाबाबत एक तारा, दुस-या ता-यांहून निराळा असतो. ४२ तसेच मेलेल्यांचे पुनरूत्थान आहे. जे विनाशीपणांत पेरले जाते, ते अविनाशीपणांत उठविले जाते. ४३ जे अपमानांत पेरले जाते, ते गौरवात उठविले जाते. जे अशक्तपणांत पेरले जाते, ते सामर्थ्यात उठविले जाते. ४४ जीवस्वभावाचे शरीर असे पेरले जाते, आध्यात्मिक शरीर असे उठविले जाते. जर जीवस्वभाचे शरीर असेल, तर आध्यात्मिक शरीरहि आहे. ४५ त्याप्रमाणे असा शास्त्रलेख आहे की, पहिला मनुष्य आदाम जिवंत जिव असा झाला, शेवटचा आदाम (मशीहा) जिवंत करणारा रूहुव्वा (आत्मा) असा झाला. ४६ तथापि, जे आध्यात्मिक ते प्रथम नाही. जीवस्वभावी ते प्रथम, मग जे आध्यात्मिक ते. ४७ पहिला मनुष्य भूमीतून म्हणजे मातीचा आहे. दुसरा मनुष्य आकाशातून आहे. ४८ तो जसा मातीचा होता, तसे जे मातीचे तेहि आहेत. आणि तो आकाशातला जसा आहे, तसेच जे आकाशातील तेहि आहेत. ४९ आणि जो मातीचा त्याचे प्रतिरूप जसे आपण धारण केले, तसे जो आकाशातील त्याचेहि प्रतिरूप धारण करू.

५० बंधुजनहो, मी असे म्हणतो की, मांस व रक्त ह्यांना याव्हे एलोहिमाच्या राज्याचे वतन मिळू शकत नाही. आणि विनाशीपणाला, अविनाशीपणाचे वतन मिळत नाही. ५१ पाहा, मी तुम्हांस एक रहस्य सांगतो. आपण सर्वच महानिद्रा घेणार नाही, तर आपण सर्व जण बदलून जाऊ. ५२ क्षणात, निमिषात, शेवटचा कर्णा वाजेल, तेंव्हा कारण कर्णा वाजेल मेलेले ते अविनाशी असे उठविले जातील, आणि आपण बदलून जाऊ. ५३ कारण हे जे विनाशी, त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य, त्यांने अमरत्व परिधान करावे, हे आवश्यक आहे. ५४ हे जे विनाशी, त्याने अविनाशीपण परिधान केले. आणि हे जे मर्त्य, त्याने अमरत्व परिधान केले. असे जेंव्हा होईल, तेंव्हा 'मरण विजयात गिळिले गेले आहे', असा जो शास्त्रलेख आहे तो पूर्ण होईल. ५५ अरे मरणा तुझा विजय कोठे? अरे मरणा तुझी नांगी कोठे? ५६ मरणाची नांगी पाप, आणि पापाचे बळ तोराह् आहे. ५७ परंतु जो याव्हे एलोहिम आपला अदोनाई, येशूवाह मशीहाच्या व्दारे आपणाला जय देतो, त्याची स्तुति असो. ५८ ह्यास्तव माझ्या प्रिय बंधूनो, अदोनाई मध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत, हे तुम्हीं जाणून आहा. म्हणून तुम्हीं स्थिर व अढळ व्हा, आणि अदोनाईच्या कामांत सर्वदा अधिकाधिक तत्पर असा.

**१६** .१ आता पवित्र जनांसाठी जी वर्गणी गोळा करावयाची, तिच्याविषयी मी गलतीयांतील मंडळयांना आज्ञा दिल्याप्रमाणे, तुम्हीहि करा. २ आठवडयाच्या पहिल्या दिवशी, तुम्हीं प्रत्येकाने जसे आपणाला यश मिळाले असेल, त्या मानाने आपणाजवळ द्रव्य जमा करून ठेवावे. अशा हेतूने की, मी येईन तेंव्हा वर्गणी होऊ नयेत. ३ मी येईन तेंव्हा ज्या कोणांस तुम्हीं पत्रे देऊन मान्यता द्याल, त्यांना तुमच्या देणग्या यरूशलेमेत पोहंचविण्याकरिता मी पाठवीन. ४ मीहि जावे असे योग्य दिसल्यास, ते माझ्या बरोबर येतील.

५ मी मासेदोनियांतून जाईन तेंव्हा तुम्हांकडे येईन, कारण मी मासेदोनियांतून जाणार आहे. ६ पण कदाचित तुम्हांजवळ राहिन, व हिवाळाहि घालवीन. अशा हेतूने की, मला जावयाचे असेल तिकडे तुम्हीं मला वाटेस लावावे. ७ कारण आता तुम्हांला केवळ भेटून जावे, अशी माझी इच्छा नाही. तर अदोनाईची इच्छा असल्यास, मी काही वेळ तुम्हांजवळ राहीन, अशी आशा मी बाळगून आहे. ८ तरी पन्नासाव्या दिवसाच्या सणापर्यंत मी इफिस येथे राहीन. ९ कारण मोठे, व कार्य साधण्याजोगे व्दार माझ्यासाठी उघडले आहे. आणि विरोध करणारे पुष्कळच आहेत. १० तीमथ्य आल्यास त्याने तुमच्याजवळ निर्भयपणाने राहावे, म्हणून खबरदारी घ्या. कारण माझ्याप्रमाणे तोहि अदोनाईचे कार्य करीत आहे. ११ ह्यास्तव कोणी त्याला तुच्छ मानू नये, तर त्याने माझ्याकडे यावे म्हणून त्याला सुखरूपपणे वाटेस लावा. कारण बंधुजनांसह त्याच्या येण्याची मी वाट पाहत आहे.

१२ आपला बंधु, अपुल्लोस ह्यांने बंधुजनांबरोबर तुम्हांकडे यावे, म्हणून मी त्याची फार विनवणी केली. तथापि आतांच यावे अशी त्याची इच्छा अगदी नव्हती, सवड होईल तेंव्हा तो येईल. १३ सावध असा, विश्वासात स्थिर राहा, मर्दासारखे वागा, खंबीर व्हा. १४ तुम्हीं जे काही करता, ते सर्व प्रीतिने करावे.

१५ बंधुजनहो, तुम्हांला स्तेफनाच्या घराण्याची माहिती आहे. 'ते अखयाचे प्रथम फळ आहे', आणि त्यांनी आपणास पवित्र जनांच्या सेवेला वाहून घेतले आहे. १६ अशांना, आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो, त्याला तुम्हीं मान्यता द्यावी, अशी मी तुम्हांला विनंती करितो. १७ स्तेफन फर्तूनात व अखायिक हे आल्याने, मला आनंद झाला आहे. कारण तुम्हीं नसल्याची उणीव, त्यांनी भरून काढिली आहे. १८ कारण त्यांनी माझ्या व तुमच्या आत्म्यांस हुरूप आणिला आहे, ह्यास्तव तुम्हीं अशांना मान द्या.

१९ आशियांतल्या मंडळया तुम्हांला सलाम सांगतात. अक्किला व प्रिस्का व त्यांच्या घरांत जी मंडळी जमत असते, ती तुम्हांला अदोनाई मध्ये फार फार सलाम सांगतात. २० सर्व बंधु तुम्हांला सलाम सांगतात, पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम करा.

२१ माझा पौल, स्वतः माझ्या स्वतःच्या हाताने हा सलाम लिहित आहे. २२ जर कोणी अदोनाई वर प्रीति करीत नाही, तर तो शापित होवो. मारानाथा, ( मूळ आरामीक शब्द आहे.) 'आमचा अदोनाई येत आहे'. २३ अदोनाई येशूवाहची हेख्न (कृपा) तुम्हांबरोबर असो! २४ मशीहा येशूवाह मध्ये माझी अहेद (प्रीति) तुम्हां सर्वांबरोबर असो. आमेन.

........... समाप्त ...........

## . प्रेषित पौलाने करिंथ मंडळीला लिहिलेले दुसरे पत्र .

### . प्रस्तावना .

प्रेषित पौलाने, हे दुसरे पत्र करिंथ येथील मंडळीला लिहिलेले होते . ह्या पत्राचा लेखन काळ हा इसवी सन ५७ च्या दरम्यान असावा, असे अनेक तज्ञांचे मत आहे . प्रेषित पौलाने तिस-या सुवार्ता फेरीच्या वेळी मासेदोनिया तून बहुधा फिलिप्पै येथून हे पत्र लिहिले . तीताने या मंडळीविषयी दिलेल्या बातमीवरून त्याने हे पत्र लिहिले . ह्या पत्राची रूपरेखा, १ .मंडळीवर नुकत्याच येऊन गेलेल्या विकट प्रसंगाविषयी काही विचार, २ . गरिबांसाठी वर्गणीबाबत, ३ . पौलाच्या सेवाकार्यावर त्याच्या शत्रूने केलेल्या आरोपांचे खंडन, व स्वतःच्या प्रेषित पणाचे समर्थन, ४ .पौलाने सहन केलेल्या दुःखाची व संकटाची तपशिल, ५ . प्रेषित पौलाला आत्म्यामध्ये तिस-या आकाशामध्ये उचलून नेणा-या घटनेबाबत थोडक्यात माहिती ही देण्यात आलेली पहावयास मिळते .

* * * * * * * * * * * * * * *

१ .१ करिंथ येथील याव्हे एलोहिमच्या मंडळीस, व तिच्यासुद्धा संपूर्ण अखयांतील सर्व पवित्र जनांस, याव्हे एलोहिमच्या इच्छेने मशीहा येशूवाह चा प्रेषित झालेला पौल, व आपला बंधु तीमथ्य ह्यांच्याकडून, २ याव्हे एलोहिम आपला अब्वा, व अदोनाई येशूवाह मशीहा ह्यांच्यापासून हेख्न (कृपा) व शालोम (शांति) असो .

३ आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाचा, याव्हे एलोहिम, व अब्वा, जो करूणायुक्त अब्वा, व सर्व सांत्वनदाता, याव्हे एलोहिम तो धन्यवादित असो ; ४ तो आमच्या सर्व संकटात आमचे सांत्वन करतो . यासाठी की, ज्या सांत्वनाने आम्हीं स्वतः याव्हे एलोहिम कडून सांत्वन पावतो . त्या सांत्वनाकडून आम्हीं जे कोणत्याही संकटात आहेत, त्यांने सांत्वन करायला समर्थ व्हावे . ५ कारण मशीहा ची दुःखे जशी आम्हांला पुष्कळ होतात, तसे मशीहा कडून आमचे सांत्वनही पुष्कळ होते . ६ आणि जरी आम्हांवर संकट येते, तरी ते तुमचे सांत्वन व तारण यासाठी आहे, किवा आम्हीं सांत्वन पावतो . तरी ते तुमच्या सांत्वनासाठी आहे, हे सांत्वन तर तुम्ही दुःखे सहनशीलतेने सोसण्याच्याव्दारे कार्य करते, तीच दुःखे आम्हीही सोसतो . ७ आणि तुम्हांविषयी आमची आशा खंबीर आहे . कारण आम्हांस ठाऊक आहे की, जसे तुम्हीं दुःखाचे भागीदार आहा, तसे सांत्वनाचेही भागीदार आहा . ८ कारण बंधुनो अशिया प्रांतात जे संकट आमच्यावर आले त्याविषयी तुम्ही अजाण असावे, अशी आमची इच्छा नाही . ते असे की, आम्ही आमच्या शक्तीच्यापलीकडे अतिशय भाराकांत झालो होतो . ते इतके की, आम्ही जगण्याविषयी देखील निराश झालो . ९ आमच्या अंतरी तर आमच्या मरणाचा ठराव झालाच होता . यासाठी की, आम्ही स्वतःवर भरवसा ठेवू नये, पण जो याव्हे एलोहिम मेलेल्यांस उठवतो, त्याच्यावर भरवसा ठेवावा . १० त्याने आम्हांला एवढया मोठया मरणापासून सोडवले, आणि तो सोडवीत आहे . त्याच्यावर आम्ही अशी आशा ठेवतो की, तो यापुढेही आम्हांस सोडवील . ११ तुम्हीही आम्हांसाठी प्रार्थना करण्याने साहाय्य करीत असता . असे होईल यासाठी की, जी देणगी पुष्कळांच्या योगाने आम्हांस मिळाली, तिच्याविषयीची उपकारस्तुति आम्हांकरिता पुष्कळांकडून व्हावी .

१२ कारण आम्हांला अभिमान बाळगण्याचे कारण हेच आहे, म्हणजे आमच्या विवेकभावाची साक्ष होय . ती अशी की, आम्ही दैहिक ज्ञानाने नव्हे, तर याव्हे एलोहिमच्या कृपेने, याव्हे एलोहिमच्या पवित्रतेने, व सरळपणाने, जगात व विशेषेकरून तुमच्याजवळ वागलो . १३ कारण ज्या गोष्टी तुम्ही वाचता, किंवा मान्य करता, त्यांवाचून दुस-या गोष्टी आम्ही तुम्हांस लिहीत नाही . आणि शेवटपर्यंतही तुम्ही त्या मान्य कराल, अशी मी आशा धरतो . १४ आणि त्याप्रमाणे तुम्ही आम्हांस काही अंशी मान्य केले आहे की, अदोनाई येशूवाह च्या दिवशी जसे आम्ही तुमच्याविषयी अभिमान बाळगतो, तसे तुहीही आमच्याविषयी अभिमान बाळगता . १५ आणि या भरवशाने मी पहिल्याने अशी योजना केली होती की, तुमच्याकडे यावे . यासाठी की, तुम्हांस दोनदा कृपादान मिळावे . १६ मग तुम्हांकडून मासेदोनियास जावे, नंतर फिरून मासेदोनियाहून तुम्हांजवळ यावे, आणि तुम्ही मला यहूदीयाकडे वाटेस लावावे .१७ तर अशी योजना करून मी चंचलपण केले काय? अथवा जे मी योजितो ते देहाला अनुसरून योजितो काय? असे की, माझ्यापाशी होय, होय असे असता, नाही, नाही असे व्हावे? १८ परंतु याव्हे एलोहिम विश्वासू आहे, म्हणून तुम्हांजवळ आमचे वचन होय आणि नाही .

१९ कारण याव्हे एलोहिमचा मुलगा येशूवाह मशीहा जो आम्हांकडून, म्हणजे मी व सिल्वान व तीमथ्य यांच्या कडून तुम्हांमध्ये गाजवला गेला. तो होय व नाही असा झाला नाही, तर त्याच्यामध्ये होय हेच आहे. २० कारण याव्हे एलोहिमची वचने कितीही असली, तरी त्याच्यामध्ये होय आहे. यामुळे आम्हांकडून याव्हे एलोहिमचे गौरव व्हावे, म्हणून त्याच्याकडून आमेन ही आहे. २१ आता जो तुम्हांसहित आम्हांस मशीहा मध्ये स्थिर करतो. व ज्याने आम्हांस अभिषेक केला, तो याव्हे एलोहिम आहे. २२ त्याने आम्हांवर शिक्काही केला, व आम्हांस आमच्या आत्म्यात, क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) हा विसार दिला आहे. २३ मी याव्हे एलोहिमला साक्षी होण्यास हाक मारून, आपल्या जिवावर प्रतिज्ञा करतो की, मी तुमची दया करतो, म्हणून मी करिंथास येणे रहित केले. २४ आम्हीं तुमच्या विश्वासावर धनीपण करतो असे नाही. तर तुमच्या आनंदाचे साहाय्यकारी आहो, कारण विश्वासानेच तुम्ही स्थिर राहता.

**२**.१ म्हणून मी असा निश्चय केला की, मी पुन्हा तुमची दुःखदायक अशी भेट घेणार नाही. २ कारण जर मी तुम्हांला दुःख देतो, तर मला तुमच्याशिवाय आनंद कोण देईल? ३ आणि मी तुम्हांस हे यासाठी लिहिले की, मी आल्यावर ज्यांच्यापासून मी आनंदी व्हावे, त्यांच्यापासून मला दुःख होऊ नये. मला तुम्हां सर्वांविषयी विश्वास आहे की, माझा आनंद तो तुम्हां सर्वांचा देखील आहे. ४ कारण मी अत्यंत दुःखाने, व कळवळून हे लिहित आहे. पण तुम्हांला खिन्न करावे म्हणून नव्हे, तर तुमच्या विषयी माझ्या मनात जी प्रीति आहे, तिची खोली तुम्हांला समजावी म्हणून लिहित आहे.

५ जर कोणी कोणाला दुःख दिले असेल, तर त्याने फक्त मलाच ते दिले असे नाही, तर काही प्रमाणात तुम्हांसर्वांना दिले आहे. त्यासंबंधी मी फार कठीण होऊ इच्छित नाही. ६ अशा मनुष्यांना सगळयांनी मिळून दिलेली शिक्षा पुरे. ७ आता त्याऐवजी तुम्ही त्याला क्षमा केली पाहिजे, आणि त्याचे सांत्वन केले पाहिजे. यासाठी की, अति दुःखाने तो दबून जाऊ नये. ८ मी विनंती करतो, म्हणून तुमचे त्याच्यावरील प्रीति पुन्हा व्यक्त करा. ९ मी तुम्हांला लिहिण्याचे कारण हेच की, तुम्ही परीक्षेत टिकता की नाही, व प्रत्येक बाबतीत तुम्हीं आज्ञाधारक राहता की नाही, हे पाहावे. १० जर तुम्ही एखाद्याला क्षमा करता, तर मी सुद्धा त्याला क्षमा करीन. आणि ज्याची ज्या कशाची मी क्षमा केली आहे, आणि त्यातूनही जर काही क्षमा करण्याचे राहिले असेल, तर मी मशीहाच्या नजरेत तुमची क्षमा केली आहे.११ यासाठी की, सैतानाने आम्हांवर वरचढ होऊ नये, कारण त्याच्या योजना आम्हांला माहीत नाहीत असे नाही.

१२ जेंव्हा मी मशीहाच्या सुवार्तेकरिता त्रोवसास आलो, तेंव्हा अदोनाई मध्ये मजसाठी दार उघडल्यावर, १३ माझा भाऊ तीता मला तेथे सापडला नाही. म्हणून माझ्या आत्म्याचे समाधान झाले नाही. पण तेथील लोकांना निरोप घेऊन, मी मासेदोनियास गेलो. १४ पण याव्हे एलोहिमचे आभार मानतो, जो मशीहा मध्ये नेहमी आम्हांला विजयी करतो, व त्याच्याविषयीच्या ज्ञानाचा सुगंध आमच्याव्दारे सगळीकडे पसरवितो. १५ कारण आम्हीं जे तारले जात आहोत, व जे नाश पावत आहेत, ते याव्हे एलोहिमला वाहिलेला, मशीहाचा सुगंध असे आहोत. १६ ह्यांना तर मरण होण्यासाठी मरणाचा गंध, परंतु त्यांना जीवन होण्यासाठी जीवनाचा गंध आहो. तर या कार्यासाठी कोण समर्थ आहे? १७ कारण पुष्कळांसारखे आम्ही याव्हे एलोहिमचे वचन भेसळ करून नासवणारे नाही. पण जसे खरेपणाने पण जसे याव्हे एलोहिम कडून, याव्हे एलोहिमच्या देखत बोलावे, तसे आम्ही मशीहा मध्ये बोलतो.

**३**.१ पुन्हा आम्ही आमची प्रशंसा करायला लागलो काय? किंवा आम्हांला काही लोकांसारखी तुमच्याकडे येण्यास, किंवा तुमच्या कडून येण्यास शिफारसपत्रांची आवश्यकता आहे काय? २ तुम्ही स्वतःच आमची शिफारस पत्रे आहात. आमच्या आत्म्यावर लिहिलेले प्रत्येकाने वाचलेले व प्रत्येकाला महीत असलेले, ३ तुम्ही दाखवून देता की, तुम्ही मशीहा कडून आलेले पत्र आहात. आणि ते आमच्या सेवेचा परिणाम शाईने लिहिलेले पत्र नव्हे, तर जिवंत याव्हे एलोहिमच्या रूहुव्वाने लिहिलेले दगडी पाटयावर नव्हे, तर मानवी रूहुव्वा च्या (आत्म्याच्या) पाटयांवर लिहिलेले आहात.

४ याव्हे एलोहिम समोर मशीहा व्दारे, अशा प्रकारचा आमचा विश्वास आहे.५ असे नाही की, आम्ही स्वतःहून आमच्यासाठी सर्वकाही करण्यास समर्थ आहोत. तर आमचे सामर्थ्य याव्हे एलोहिम पासून येते. ६ त्याने आम्हांला हादोश बेरीथ (नव्या कराराचे) ऐवेद (सेवक), म्हणून समर्थ बनविले आहे. पत्राने नव्हे, तर रूहुव्वाने कारण पत्र मारून टाकते, पण रूहुव्वा जीवन देतो.७ आणि जिची अक्षरे दगडावर कोरलेली, ती मरणाची सेवा जर अशी गौरवयुक्त झाली की, इस्त्राएलाच्या संतानांच्याने मोशेच्या तोंडाचे तेज जे नाहीसे होत चालले होते, त्या तेज्याकडे दृष्टी लाववत नव्हती. ८ तर तिच्यापेक्षा रूहुव्वा ची सेवा अधिक गौरवयुक्त कशी होणार नाही? ९ कारण जर सेवा जी माणसाचा निषेध करते, ती गौरवी असेल तर तिच्यापेक्षा, न्यायी ठरवण्याच्या सेवेला फार अधिक गौरव आहे. १० आणखी या प्रकारे जे गौरवयुक्त केलेले होते, ते महान गौरवामुळे गौरवयुक्त केलेले नव्हते.११ कारण जे नाहीसे केले जायचे ते जर गौरवाने आले, तर जे टिकणारे ते त्यापेक्षा फार अधिक गौरवयुक्त आहे. १२ म्हणून आम्हांला अशी आशा असल्यामुळे, आम्ही फार मोकळेपणाने बोलतो. १३ आणि मोशेसारखे करीत नाही त्याने तर आपल्या तोंडावर आच्छादन घातले. यासाठी की, जे नाहीसे होत चालले होते त्याच्या चेह-याच्या तेजामुळे, इस्त्राएली लोकांचे डोळे दिपून जाऊ नयेत. १४ परंतु त्यांची आत्मे कठीण केली होती, कारण जुना करार वाचताना तेच आच्छादन आजपर्यंत न काढलेले राहते, ते तर मशीहा मध्ये नाहीसे होते. १५ तरी आजपर्यंत जेंव्हा मोशेचे ग्रंथ वाचतात, तेंव्हा त्यांच्या आत्म्यावर आच्छादन राहते. १६ पण जेंव्हा ते अदोनाई कडे वळतील, तेंव्हा ते आच्छादन काढले जाईल. १७ अदोनाई तर रूहुव्वा आहे, आणि जेथे अदोनाईचा रूहुव्वा आहे, तेथे मोकळेपणा आहे. १८ तर आपण सर्व आच्छादन नसलेल्या तोंडाने, अदोनाईचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पाहत असता, अदोनाई जो रूहुव्वा याच्याकडूनच गौरवापासून असे त्याच्या प्रतिरूपात पालटले जातो.

४.१ म्हणून याव्हे एलोहिमच्या दयेव्दारे आम्हांला ही सेवा मिळाली आहे, आम्ही धीर सोडत नाही. २ तर आम्ही लज्जास्पद गुप्त गोष्टी सोडून दिल्या आहेत. आम्ही कपटाने वागत नाही, आणि कपटदृष्टीने याव्हे एलोहिमच्या वचनाचा उपयोग करीत नाही. तर याव्हे एलोहिम समोर खरेपण प्रगट करण्यास, आम्ही आपणांसमोर सर्व लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धिला पटवितो. ३ आणि जरी आमचे शुभवर्तमान झाकलेले आहे, तर जे नाश पावत आहेत, अशांसाठी ते आच्छादित आहे. ४ या जगाच्या दैवतांनी अविश्वासणा-यांची आत्मे आंधळे केली आहेत. यासाठी की, मशीहाच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांना पाहता येऊ नये. जो याव्हे एलोहिमच्या प्रतिमेचा आहे, ५ कारण आम्ही आमचीच सुवार्ता सांगत नाही. तर मशीहा येशूवाह हाच अदोनाई आहे, अशी घोषणा करतो. आणि आम्ही येशूवाह मशीहा साठी तुमचे ऐवेद (सेवक) आहोत, असे स्वतःविषयी सांगतो. ६ कारण याव्हे एलोहिम जो म्हणाला, "अंधारातून प्रकाश होवो." त्याने तो प्रकाश आमच्या रूहुव्वा त (आत्म्यात), मशीहाच्या चेह-यात याव्हे एलोहिमच्या गौरवाच्या ज्ञानात दाखवावा. ७ पण आमचा हा ठेवा मातीच्या भांडयामध्ये आहे. यासाठी की, सामर्थ्याचे अतिशय मोठेपण याव्हे एलोहिम पासून येते, आम्हांकडून नाही. ८ आम्हांवर चारी दिशांनी संकटे येतात, पण आम्ही अजून चिरडले गेलो नाही. गोंधळलेलो आहोत, पण निराश झालो नाही. ९ छळ झालेले असे आहोत, पण टाकून दिलेले असे आम्ही नाही. खाली पडलेलो असलो, तरी आमचा नाश झालेला नाही.

१० आम्ही नेहमी येशूवाहचे मरण आमच्या शरीरात घेऊन जात असतो. यासाठी की, मशीहाचे जीवनही आमच्या शरीराव्दारे प्रकट व्हावे. ११ कारण आम्ही जे जीवंत आहोत, ते आम्ही नेहमीच मशीहा करिता मरणाला सोपविलेले आहोत. यासाठी त्याचे जीवन आमच्या मर्त्य शरीराव्दारे प्रकट व्हावे. १२ म्हणून मग आमच्यामध्ये मृत्यू काम करीत आहे, पण तुमच्यामध्ये जीवन काम करीत आहे. १३ असे लिहिले आहे, "मी विश्वास ठेवला म्हणून मी बोललो आहे." विश्वासाच्या त्याच रूहुव्वाने आम्ही सुद्धा विश्वात ठेवतो, आणि म्हणून बोलतो. १४ कारण आम्हांला माहीत आहे, ज्याने अदोनाई येशूवाह ला उठविले, तो त्याच्याबरोबर आम्हांला उठवील. व आम्हांला तुमच्याबरोबरच त्याच्यासमोर सादर करील. १५ कारण या सर्व गोष्टी तुम्हांकरिता आहेत. यासाठी की, पुष्कळांच्या व्दारे विपुल झालेली कृपा, अनेकांच्या उपकारस्तुतिमुळे याव्हे एलोहिमने भरघोस गौरव होण्याला कारण व्हावी. १६ म्हणून आम्ही धीर सोडीत नाही. जरी बाह्यदृष्टया आम्ही व्यर्थ ठरत आहोत, तरी अंतरीकदृष्टया आम्हीं दिवसेंदिवस नवीन होत आहोत.

१७ कारण आमची हलकी व क्षणिक दुःखे, ही आमच्यासाठी अनंतकाळचे गौरव मिळवीत आहेत, जे दुःखापेक्षा कितीतरी मोठे आहे. १८ म्हणून आम्ही ज्या गोष्टी कायमस्वरूपात दिसत नाहीत, तिकडे आमचे डोळे लावीत नाही. पण जे दिसत नाही, पण अविनाशी आहे, त्याकडे डोळे लावतो. कारण जे दिसते ते क्षणिक आहे पण जे दिसत नाही, ते अनंतकालीक आहे.

**५**.१ आता आम्हांला माहीत आहे की, जर आमचे पृथ्वीवरील मंडपरूपी घर मोडून गेले, तर आम्हांला याव्हे एलोहिम पासून मिळणारे अनंतकाळचे घर आकाशामध्ये आहे, ते मानवी हातांनी बांधलेले नाही.२ कारण यात असताही आम्ही आपले आकाशातून येणारे घररूपी वस्त्र परिधान करण्याच्या उत्कठेने कण्हतो. ३ असे की, वस्त्र पांघरल्यामुळे आम्ही उघडे सापडणार नाही. ४ कारण आम्ही जे या मंडपात आहो, ते आम्ही भाराक्रांत होऊन कण्हतो; आम्ही वस्त्र काढून टाकायला इच्छितो असे नव्हे, तर वस्त्र पांघरायला इच्छितो. यासाठी की, जे मरणारे ते जीवनाकडून गिळले जावे. ५ आणि ज्याने आम्हांस या करिताच घडले, तो याव्हे एलोहिम आहे. त्याने आम्हांस रूहुव्वा हा विसारही दिला आहे. ६ म्हणून आम्ही सर्वदा धैर्य धरतो व जाणतो की, शरीरात वस्ती करीत असता, आम्ही अदोनाई पासून दूर आहो. ७ कारण आम्ही विश्वासाने चालतो, दृष्टीने पाहत चालत नाही. ८ तर आम्ही धैर्य धरतो आणि शरीरापासून गैरहजर असणे, व अदोनाई पाशी हजर असणे हे आम्हांस विशेष आवडते. ९ म्हणून शरीरात वस्ती करीत असलो, किंवा शरीरापासून गैरहाजर असलो, तरी आम्ही त्याला संतुष्ट करणारे असे होण्यास झटतो.

१० कारण आपणा सर्वांस मशीहा च्या न्यायासनासमोर प्रकट केले जायचेच आहे. यासाठी की, प्रत्येकाने आपल्या शरीराकडून जे जे केले, मग ते बरे असो किंवा वाईट असो, त्याप्रमाणे त्याला फळ मिळावे. ११ यास्तव आम्ही अदोनाई चा धाक जाणून माणसांची समजूत करतो, पण आम्ही याव्हे एलोहिम जवळ प्रकट केलेले आहो, आणि तुमच्या विवेकभावातही आम्ही प्रकट केलेले आहो, अशी आशा मी धरतो. १२ आम्ही आपणांस तुम्हांजवळ फिरून वाखाणीत नाही, तर तुम्हांस आम्हांविषयी नावाजून घेण्याचा प्रसंग देतो. यासाठी की, जे आत्म्यात नव्हे पण तोंडावर तेवढे नावाजून घेतात, त्यांना उत्तर देण्यास तुम्हांपासाशी काही साधन असावे. १३ कारण आम्ही वेडे आहो तर ते याव्हे एलोहिम साठी, आणि आम्ही सावधही आहो तर ते तुमच्यासाठी आहो. १४ कारण मशीहा ची अहेद (प्रीति) आम्हांला आवरून धरिते. कारण आम्ही असे ठरवतो की, एक सर्वांसाठी मेला, तर सर्व मेले. १५ आणि तो सर्वांसाठी याकरिता मेला की, जे जगतात त्यांनी पुढे आपणांकरिताच नव्हे, तर आपणांसाठी जो मेला व पुन्हा उठला, त्याच्याकरिता जगावे.

१६ म्हणून आतापासून आम्ही कोणाला देहावरून ओळखत नाही. आणि जरी आम्ही मशीहा ला देहावरून ओळखले होते, तरी आता यापुढे आम्ही त्याला तसे ओळखत नाही. १७ यास्तव जर कोणी मशीहा मध्ये आहे, तर तो नवीन उत्पत्ती आहे. जुने ते होऊन गेले पाहा, ते नवीन झाले आहे. १८ परंतु सर्व काही याव्हे एलोहिम पासून आहे. त्याने आपणाशी आमचा समेट येशूवाह मशीहा कडून करवून घेतला, आणि समेटाची सेवा आम्हांस दिली. १९ म्हणजे माणसांची पातके त्यांच्याकडे न मोजता, आणि समेटाचे वचन आम्हांजवळ ठेवले असता, याव्हे एलोहिम मशीहा मध्ये आपणाशी जगाचा समेट करीत होता. २० म्हणून आम्ही मशीहा च्या वतीने वकील आहो. जणू काय याव्हे एलोहिम आम्हांकडून तुम्हांस विनवीत आहे, आम्ही मशीहा च्या वतीने विनंती करतो की, तुम्ही याव्हे एलोहिमशी समेट केलेले असे व्हा. २१ कारण ज्याने पाप जाणलेच नाही, त्याला त्याने आम्हांकरिता पाप असे केले. यासाठी की, आम्ही त्याच्यामध्ये याव्हे एलोहिमचे न्यायीपण असे व्हावे.

**६**.१ याव्हे एलोहिमचे सहकामकरी म्हणून आम्ही तुम्हांला विनंती करतो की, जी याव्हे एलोहिमची कृपा आपल्याला मिळते, ती व्यर्थ घालवू नका. २ कारण तो म्हणतो, "माझ्या अनुकूलसमई मी तुझे ऐकले, आणि तारणाच्या दिवशी मी तुला साहाय्य केले." मी तुम्हांला सांगतो, याव्हे एलोहिमच्या अनुकूल समई आताच आहे. आताच तारणाचा दिवस आहे. ३ आमची सेवा दोषी ठरू नये, यासाठी आम्ही कोणालाही दोष देत नाही. ४ उलट सर्व प्रकारच्या परिस्थितीत आम्ही याव्हे एलोहिमचे ऐवेद (सेवक) होतो, हे आम्ही दाखवून दिले. फार धीराने, संकटांमध्ये, गरजांमध्ये, पेचांमध्ये, ५ फटक्यांमध्ये, कैदांमध्ये, दंग्यांमध्ये, कष्टांमध्ये, जागरणांमध्ये, उपासांमध्ये, ६ शुद्धपणाने, ज्ञानाने, सहनशीलतेने, उपकारकपणाने, क्वादोश रूहुव्वा ने (पवित्र आत्म्याने) निष्कपट

प्रीतिने, ७ खरेपणाच्या वचनाने, याव्हे एलोहिम च्या सामर्थ्याने, उजवीकडे व डावीकडे न्यायीपणाच्या शस्त्रसामग्रीकडून, ८ सन्मानाकडून, व अपमानाकडून, अपकिर्तीकडून, आम्ही आपणांस पटवतो. आम्ही फसवणा-या सारखे, तरी आम्ही खरे. ९ अनोळख्यांसारखे, तरी चांगल्या ओळखीचे. मरत असलेल्यांसारखे, तरी पाहा आम्ही जगतो. शिक्षा भोगत असलेल्यासारखे, तरी जिवे मारलेले नाही. १० दुःखी असलेल्यासारखे, तरी सर्वदा आनंद करणारे. दरिद्री असलेल्यासारखे, तरी बहुतांस धनवान करणारे. आपल्या जवळ काही नसलेल्यांसारखे, तरी अवघ्याचे मालक असे, आम्ही आपणांस याव्हे एलोहिमचे ऐवेद (सेवक) पटवतो.

११ आम्ही मोकळेपणाने तुमच्याशी बोललो, करिंथकरांनो आणि आमचे अंतःकरण तुमच्यासमोर अगदी पूर्णपणे रीतीने उघडी केली. १२ आम्ही तुमच्याबद्दल प्रीतिभावना ठेवण्याचे थांबवले नाही, पण तुमची आमच्याबद्दलची प्रीतिभावना मात्र संकुचित झाला आहे. १३ आपल्यातली देवाणघेवाण चांगली असावी, म्हणून मी तुमच्याशी माझ्या मुलांप्रमाणे बोलतो. तुम्हीही तुमची अंतःकरण विशाल करा. १४ जे तुमच्या बरोबरीचे नाहीत, त्यांच्याबरोबर एका जुवाखाली एकत्र येऊ नका. नाहीतर नीतिमान व दुष्टपणा, यात काय फरक उरला? किंवा प्रकाश व अंधार, यात कोणते साम्य आहे? १५ मशीहा आणि सैतान यांना सलोखा कसा होणार? विश्वासणा-याचा अविश्वासणा-या बरोबर काय सारखेपणा आहे? १६ याव्हे एलोहिमचे मंदिर आणि मूर्ति यांच्या मान्यता कशा असतील? कारण आम्ही जिवंत याव्हे एलोहिमचे मंदिर आहोत. ज्याप्रमाणे याव्हे एलोहिमने म्हंटले आहे, "मी त्यांच्याबरोबर राहीन आणि त्यांच्याबरोबर चालेन. मी त्यांचा याव्हे एलोहिम होईन, आणि ते माझे लोक होतील." १७ म्हणून त्यांच्यामधून बाहेर या, आणि स्वतःला त्यांच्यापासून वेगळे करा. असे अदोनाई म्हणतो, "अशुद्ध वस्तूला स्पर्श करू नका, आणि मी तुम्हांला स्विकारीन. १८ मी तुम्हांला अब्वा असा होईन, तुम्ही माझी मुले व कन्या व्हाल. असे सर्वसमर्थ अदोनाई म्हणतो."

**७**.१ प्रिय मित्रांनो, याव्हे एलोहिमची अभिवचने आमच्याकडे असल्याने, जे शरीर व रूहुव्वा ला (आत्म्याला) दुषित करते, त्या प्रत्येक गोष्टी पासून स्वतःला शुद्ध ठेऊ या. याव्हे एलोहिम विषयी असलेल्या आदराने पवित्रतेत परिपूर्ण होऊ या.२ तुम्ही आमचा अंगीकार करा, आम्ही कोणावर अन्याय केला नाही, कोणाला बिघडविले नाही, कोणाचा गैरफायदा घेतला नाही. ३ दोषी ठरविण्यासाठी मी हे म्हणत आहे असे नाही, कारण मी पूर्वीच सांगितले आहे की, तुम्हांला आमच्या आत्म्यात असे स्थान आहे की, आम्ही मरणार तुम्हांबरोबर व जगणारहि, तुम्हांबरोबर ४ मला तुमचा मोठा भरवसा आहे. मला तुम्हांविषयी फार अभिमान आहे. माझे पुरेपूर सांत्वन झाले आहे. आम्हांवर आलेल्या सर्व संकटात मला आनंदाने उतून जात आहे. ५ आम्ही मासेदोनियांत आल्यावरहि आम्हांला शारीरिक स्वस्थता अशी नव्हतीच, तर आम्ही चहूकडून गांजलेले होतो. बाहेर भांडणतंटे, आत भीति, ६ तथापि दीनांचे सांत्वन करणारा याव्हे एलोहिम ह्याने, तीताच्या येण्याकडून आमचे सांत्वन केले.

७ आणि त्याच्या येण्याकडून केवळ नाही, तर तुमची उत्कंठा, तुमचा शोक, तुमची माझ्याविषयीची आस्था, ह्यासंबधाने आम्हांस सांगत असताना तुमच्या बाबतीत त्याने जे सांत्वन झाले. त्याच्या योगाने आमचे सांत्वन होऊन, मला आनंद विशेष आनंद झाला. ८ मी आपल्या पत्राने तुम्हांला दुःख दिले, ह्याबद्दल मला वाईट वाटत नाही, मला वाईट वाटले होते. कारण त्या पत्रापासून तुम्हांला काही वेळ तरी दुःख झाले, असे मला दिसते. ९ तरी आता मी आनंद करतो, तुम्हांला दुःख झाले ह्यामुळे नव्हे, तर पश्चात्ताप होण्याजोगे दुःख झाले. ह्यामुळे कारण याव्हे एलोहिम च्या मनास येण्यासारखे दुःख झाले. आमच्या हातून तुमची कसलीहि हानि होऊ नये, म्हणून असे झाले. १० कारण याव्हे एलोहिमच्या मनास येण्यासारखे दुःख हे ज्याविषयी पस्तावा होणार नाही, असा पश्चात्ताप तारण होण्यासाठी घडवते, परंतु जगासंबंधी दुःख मरण घडवते.

११ कारण पाहा, तुमचे हे दुःख याव्हे एलोहिम च्या इच्छेनुसार होते. ह्या एकाच गोष्टीने तुम्हांमध्ये केवढी कळकळ, केवढे दोषनिवारण, केवढा संताप, केवढे भय, केवढी उत्कंठा, केवढी आस्था, केवढी शिक्षा, करण्याची बुद्धि उत्पन्न झाली. ह्या बाबतीत तुम्ही सर्व प्रकारे निर्दोष आहा, ह्याचे प्रमाण तुम्ही पटवून दिले १२ तथापि मी तुम्हांला लिहिले ते ज्याने अन्याय केला त्याच्याविषयी नव्हे, आणि ज्यावर अन्याय झाला त्याच्यामुळेहि नव्हे. तर आम्हांविषयी तुम्ही दाखवीत असलेल्या कळकळीची जाणीव, तुम्हांस याव्हे

एलोहिम समक्ष व्हावी म्हणून लिहिले. १३ ह्यामुळे आमचे सांत्वन झाले आहे, आणि आमचे सांत्वन झाले. इतकेच नव्हे तर विशेषेकरून तीताला आनंद झाल्यामुळे, आम्हीहि फारच आनंदित झाला. कारण तुम्हां सर्वांकडून त्याच्या मनाला स्वस्थता मिळाली. १४ मी त्याच्याजवळ तुम्हींविषयी कसलाहि अभिमान बाळगला, तरी मला खाली पाहण्याची पाळी आली नाही. तर आम्ही तुम्हांबरोबर सर्व गोष्टी खरेपणाने बोललो, त्याप्रमाणे तीता जवळ आम्ही अभिमानयुक्त केलेले भाषणहि खरे ठरले. १५ आणि तुम्ही सर्वांनी भीत भीत व कापत कापत त्याचा स्विकार करून, आज्ञांकितपणा दर्शविला ह्याची तो आठवण करिता, म्हणून त्याला तुम्हांविषयी अधिकाधिक ममता आहे. १६ मला सर्व बाबतीत तुमचा भरवसा वाटतो म्हणून मी आनंद करितो.

८.१ बंधूंनो मासेदोनियांतील मंडळयांवर झालेल्या याव्हे एलोहिम च्या कृपेविषयी, आम्ही तुम्हांस कळवितो. २ ती अशी की, संकटाच्या मोठया परीक्षेत त्याच्या आनंदाचे उदंडपण, आणि त्याचे अत्यंत दारिद्रय यांमध्ये त्यांच्या उदारपणाची संपत्ती विपुल झाली. ३ कारण मी साक्ष देतो की, त्यांनी आपल्या शक्तिप्रमाणे आणि शक्तिपलीकडे आपण होऊन दिले. ४ पवित्रांची सेवा करण्यात भाग असावा, असे त्यांनी ह्या कृपेविषयी फार विनंती करून आम्हांजवळ मागितले ५ आणि अशी आम्ही आशा धरली होती. तसे केवळ नाही, तर त्यांनी प्रथम आपणा स्वतःस अदोनाईला, आणि याव्हे एलोहिमच्या इच्छेने आम्हांलाही दिले. ६ इतके की, आम्ही तीताला अशी विनंती केली की, जसा त्याने पूर्वी आरंभ केला होता, तशीच त्याने तुम्हांमध्ये या कृपेची पूर्णताही करावी.७ जर जसे तुम्ही सर्व गोष्टीत म्हणजे विश्वासात, व बोलण्यात, व ज्ञानात, व सर्व आस्थेत, व आम्हांवरील आपल्या प्रीतित वाढला आहा, तरी तुम्ही या कृपेतही फार वाढावे. ८ हे मी आज्ञेने सांगत नाही तर दुस-यांच्या आस्थेवरून, तुमच्यासाठी प्रीतिच्या खरेपणाची प्रतीती पाहावी, म्हणून सांगतो. ९ कारण आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा ची कृपा तुम्ही जाणता की, तो धनवान असताही तुम्हांकरिता दरिद्री झाला. यासाठी की, तुम्ही त्याच्या दारिद्राने धनवान व्हावे. १० आणि याविषयी मी आपले मत सांगतो, कारण हे तुम्हांस उपयोगी आहे. तुम्ही एका वर्षामागे या कार्याला आरंभ करण्यास पहिले झाला होता. तुम्ही करण्यास केवळ नाही, तर ते करण्याची इच्छा धरण्यासही पहिले झाला होता. ११ तर आता ते करणेही पूर्ण करा, म्हणजे जशी इच्छा धरण्याची तुमची उत्सुकता होती. तसेच तुम्हांपाशी जे आहे, त्यातून कृती पूर्ण करणेही व्हावे . १२ कारण उत्सुकता असली तर जे कोणापाशी नाही त्याप्रमाणे नव्हे, तर जे कोणापाशी आहे त्याप्रमाणे ती मान्य होते. १३ कारण दुस-यांस स्वस्थता व तुम्हांस अडचण व्हावी असे नाही. १४ परंतु समानतेने या हल्लीच्या काळी तुमच्या भरपुरीतून त्यांची गरज भागावी. यासाठी की, त्यांच्याही भरपुरीतून तुमची गराज भागावी, अशी समानता व्हावी. १५ "ज्याने पुष्कळ गोळा केले होते, त्याला अधिक झाले नाही. व ज्याने थोडे गोळा केले होते, त्याला कमी पडले नाही" असे लिहिले आहे, त्याप्रमाणे व्हावे.

१६ तर ज्याने तीताच्या अंतःकरणात तुम्हांकरिता तशीच कळकळीची काळजी घातली, त्या याव्हे एलोहिमची उपकारस्तुति असो. १७ कारण त्याने आमची विनंती मान्य केली इतकेच नव्हे, पण तो स्वतः फार उत्सुक असल्यामुळे, आपण होऊन तुम्हांकडे निघून गेला. १८ आणि त्याच्याबरोबर आम्ही ज्या बंधुस पाठवले आहे, त्याची शुभवर्तमाना संबंधी प्रशंसा सर्व मंडळयात पसरली आहे. १९ आणि इतकेच केवळ नाही, तर हे जे कृपेचे दान त्याच अदोनाईच्या गौरवाकरिता, व आमची उत्सुकता दाखवण्यासाठी आम्हांकडून गोळा करून येत आहे. त्याविषयी त्याने आमच्याबरोबर प्रवास करावा, म्हणून तो मंडळयांकडून निवडलेला आहे. २० ही जी विपुलता आम्हांकडून सेवेस उपयोगी पडत आहे, तिच्या कामात कोणी आम्हांवर दोष लावू नये, म्हणून आम्ही सांभाळून आहो. २१ कारण जे अदोनाईच्या दृष्टीने चांगले आहे, तेच आम्ही योजितो इतकेच केवळ नव्हे, तर माणसांच्याही दृष्टीने जे चांगले आहे, ते योजितो. २२ आणि त्यांच्याबरोबर आम्ही आमचा एक बंधु पाठवीले आहे, तो उत्सुक आहे. त्याची परीक्षा आम्ही पुष्कळ गोष्टीविषयी पुष्कळ वेळा घेतली आहे, पण तो आता तुम्हांवरील मोठया भरवशावरून फार अधिक उत्सुक आहे. २३ तीता विषयी कोणी विचारतील तर तो माझा भागीदार, व तुम्हांकरिता संगतीचा कामकरी आहे. अथवा आमचे बंधु ते तर मंडळयांचे प्रेषित मशीहाचे गौरव असे आहेत. २४ म्हणून तुम्ही आपल्या प्रीतिचे, आणि आमचे तुम्हांविषयी जे नावाजून घेणे, त्याचे प्रमाण त्यांच्याजवळ व मंडळयांच्या देखत प्रकट करून दाखवा.

**९** .१ पवित्रांच्या या सेवेविषयी तर मी तुम्हांस लिहावे याची गरज नाही. २ कारण मला तुमची उत्सुकता ठाऊक आहे, तिच्यावरून मी मासेदोनियातील लोकांजवळ तुम्हांविषयी वाखवणी करीत असतो. की, अखया प्रांत एका वर्षामागे तयार झाला होता, आणि तुमच्या आवेशाने त्यांच्यातील पुष्कळांना उत्तेजीत झाले आहे. ३ तरी पण या बाबतीत तुम्हांविषयी आमची नावाजणूक व्यर्थ होऊ नये, म्हणून मी या बंधूला पाठविले आहे. यासाठी की, मी तुमच्याविषयी सांगितले होते, तसेच तुम्ही तयार असावे. ४ नाही तर कदाचित मासेदोनियातील माणसे माझ्यावरोवर आली, आणि तुम्ही तयार नाही असे त्यांनी पाहिले, तर तुम्हांला असे आम्ही म्हणत नाही, पण आम्हांला ह्या आमच्या भरवशाविषयी लाज वाटेल. ५ म्हणून मला बंधुजवळ अशी विनंती करणे अशक्य वाटले की, त्यांनी तुम्हांकडे पुढे जाऊन पूर्वी देऊ केलेल्या तुमच्या देणगीची व्यवस्था अगोदर करावी. यासाठी की, तो लोभिष्ठपणाने झाल्यासारखा तयार होऊ नये, तर जसे उदार अंतःकरणाने देणगी देणारे असे तो व्हावे.

६ आणि हे लक्षात ठेवा की, जो हात राखून पेरतो तो त्याच मानाने कापणी करील. आणि जो उदार हाताने पेरतो, तो त्याच मानाने कापणी करील. ७ प्रत्येकाने आपल्या अंतःकरणात जशी योजना केली असेल, तसे त्याने करावे. दुःखाने किंवा भाग पडते म्हणून देऊ नये, कारण संतोषाने देणारा याव्हे एलोहिमला आवडतो.८ आणि याव्हे एलोहिम सर्व प्रकारची कृपा तुम्हांवर विपुल होईल, असे करण्यास समर्थ आहे. याकरिता की, तुम्हांस सर्व गोष्टीत सर्व पुरवठा सर्वदा होत असता, तुम्ही प्रत्येक चांगल्या कामात अधिकाधिक तत्पर असावे. ९ त्याने विखरले आहे, त्याने गोरगरिबांना दिले आहे, त्याचे न्यायीपण सर्वकाळ राहते असे लिहिले आहे, त्याप्रमाणे व्हावे. १० आणि जो पेरणा-याला बीज, व खाण्यासाठी अन्न पुरवतो, तो तुम्हांला पेरायला तुमचे बी पुरवील, आणि ते बहुतपट करील, व तुमच्या न्यायीपणाची फळे वाढवील. ११ तुम्ही सर्व प्रकारच्या उदारपणाकरिता प्रत्येक गोष्टीत धनवान व्हाल, त्यावरून आम्हांकडून याव्हे एलोहिमची उपकारस्तुति होईल. १२ कारण ह्या अर्पण कार्याची ही सेवा पवित्रांच्या गरजा पुरवते इतकेच केवळ नाही, तर ती याव्हे एलोहिमच्या पुष्कळ उपकारस्तुतिनीही फार अधिक होते. १३ कारण या सेवेवरून तुम्ही मशीहाच्या शुभवर्तमानाला अधीन असल्याचे, तुमचे पत्करणे पटल्यामुळे, आणि त्यांना व सर्वांना वाटा देण्याचे जे तुमचे उदारपण, त्यामुळे ते याव्हे एलोहिमचे गौरव करतात. १४ आणखी ते तुम्हांकरिता प्रार्थना करीत असता, तुम्हांवरची जी याव्हे एलोहिमची अतिशय कृपा तिच्यावरून तुमची भेट व्हावी, अशी उत्कंठा धरतात. १५ याव्हे एलोहिमचा अनिर्वाच्या दानाबद्दल त्याची उपकारस्तुति होवे.

**१०** .१ तर मी जो पौल तुम्हांसमक्ष असताना तुम्हांमध्ये दीन असतो परंतु दूर असताना तुम्हांशी धैर्यवान आहे तो मी स्वतः मशीहाच्या लीनतेने व सौम्यतेने तुम्हांस विनंती करतो.२ माझे मागणे असे आहे, आम्ही देहस्वभावाने चालणारे आहो, असे कित्येक लोक मानितात. असे लोक माझ्यासमोर आल्यावर त्याच्याशी कडकपणे बोलावेसे मला वाटण्याचा संभव आहे, तेंव्हा कडकपणाने बोलण्याचा माझ्यावर प्रसंग आणू नये. ३ कारण अम्ही देहात चालणारे असूनहि, आम्ही देहस्वभावाप्रमाणे युद्ध करीत नसतो. ४ कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास, ती याव्हे एलोहिम च्या दृष्टीने समर्थ आहेत. ५ तर्क वितर्क व याव्हे एलोहिम विषयक ज्ञाना विरूद्ध, उंच उभारिलेले असे सर्व काही पाडून टाकून, प्रत्येक कल्पना बांधून तिला मशीहा पुढे मान वाकविण्यास लावतो. ६ आणि तुम्ही आज्ञापालनांत पूर्ण व्हाल, तेंव्हा सर्व आज्ञाभंगाबद्दल शासन करावयास आम्ही सिद्ध आहो.

७ डोळयापुढे आहे ते पाहा, आपण मशीहाचे आहो असा जर कोणाला स्वतःविषयी भरवसा असेल, तर त्याने पुन्हा आम्हांविषयी स्वतःशी विचार करावा की, जसे आपण मशीहाचे आहो तसे तेहि मशीहाचे आहेत. ८ आमचा तो अधिकार अदोनाईने तुमच्या नाशांसाठी नव्हे, तर उन्नतीसाठी आम्हांस दिला. त्याविषयी मी काहीशी विशेष प्रौढी मिरविली तरी मला संकोच वाटणार नाही. ९ असे की, मी तुम्हांस पत्रव्दारे भीति घालणारा आहे, असा भास होऊ नये. १० कारण ते म्हणतात, त्याची पत्रे वजनदार व जोरदार आहेत. परंतु त्याची शरीरयष्टी दुर्बळ व त्याचे भाषण टाकाऊ आहे. ११ अशा माणसाने हे लक्षात ठेवावे की, आम्ही दूर असताना पत्रांत असे आमचे शब्द असतात. तसेच आम्ही जवळ असतांना आमची कृतीहि असते. १२ कारण जे कित्येक स्वतःची प्रशंसा

करितात. त्यांच्यामध्ये आपली गणना करण्याचे, अथवा त्यांच्याशी तुलना करण्याचे धाडस आम्ही करीत नाही. ते तर स्वतःच स्वतःशी आपले मोजमाप करितात, व स्वतःची स्वतःबरोबर तुलना करितात हा शहाणपणा नाही.

१३ आम्ही प्रतिष्ठा मिरविली तर ती आपल्या मर्यादेबाहेर न मिरविता, याव्हे एलोहिमने आम्हांला लावून दिलेल्या मर्यादेच्या आतच मिरवू, ती मर्यादा तुमच्यापर्यंत येऊन पोहंचली आहे.१४ कारण तुम्हांपर्यंत संबंध पोहंचत नसल्यासारखे, आम्ही मर्यादेचे अतिक्रमण करीत नाही. कारण मशीहाचे शुभवर्तमान घेऊन, पहिल्याने आम्ही तुम्हांपर्यंत पोहंचलोच आहो. १५ आम्ही मर्यादा सोडून म्हणजे दुस-यांच्या श्रमांसंबंधाने प्रतिष्ठा मिरवीत नाही. तर तुमचा विश्वास वाढत जाईल तसतसे आमच्या मर्यादेचे क्षेत्र तुमच्यामध्ये अधिकाधिक वाढत जाईल, अशी आम्हांला आशा आहे. १६ ते असे की, तुमच्या पलीकडल्या भागांत आम्ही शुभवर्तमान सांगावे, दुस-याच्या कार्यक्षेत्रात अगोदरच झालेल्या कामाची प्रतिष्ठा मिरवू नये. १७ जो प्रतिष्ठा मिरवितो त्याने ती अदोनाई विषयी मिरवावी. १८ कारण स्वतःची प्रशंसा करणारा कसोटीस उतरत नाही, तर ज्याची प्रशंसा अदोनाई करितो तोच कसोटीस उतरतो.

**११**.१ माझी आशा आहे की, आपण माझा थोडासा मूर्खपणा माझ्यासाठी सहन कराल, पण तो तुम्ही करीतच आहा. २ कारण तुम्हांविषयीची माझी आस्था एलोहिम प्रेरित आस्था आहे. मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे. अशा हेतूने की, तुम्हांला शुद्ध कुमारी असे मशीहाला सादर करावे. ३ पण मला भीति वाटते की, जसे सापाने आपल्या धूर्तपणाने हव्वेला फसविले, त्याप्रमाणे कशाने तरी तुमची अंतःकरणे मशीहा कडील सरळपण व शुद्धपण, यांपासून दूर होऊन बिघडवली जातील.४ कारण जर कोणी तुमच्याकडे येऊन ज्याची आम्ही घोषणा केली नाही. अशा दुस-या येशूवाह ची घोषणा करतो, किंवा तुम्हांला मिळाला नव्हता असा निराळा आत्मा जर तुम्ही घेतला. अथवा तुम्ही स्विकारले नव्हती असे निराळे शुभवर्तमान जर तुम्हीं स्विकारले, तर ह्याचे तुम्ही चांगले सहन करता.

५ पण मला वाटते, मी अति श्रेष्ठ प्रेषिता पेक्षा कुठल्या प्रकारे कमी आहे असे नाही. ६ मी प्रशिक्षित वक्ता नसेन, परंतु मला ज्ञान आहे. आम्ही हे तुम्हांला प्रत्येक प्रकारे पूर्णपणे स्पष्ट केले आहे. ७ तुम्ही उंच व्हावे म्हणून मी आपणांला नीच केले. म्हणजे मी याव्हे एलोहिमचे शुभवर्तमान तुम्हांला फुकट सांगितले. यात मी पाप केले काय? ८ तुमची सेवा करण्यासाठी मी दुस-या मंडळयांकडून वेतन घेऊन त्यांना लुटले? ९ आणि मी तुम्हांजवळ होतो तेंव्हा मला कमी पडले असतानाही, मी कोणाला भार असा झालो नाही. कारण मासेदोनियाहून जे बंधु आले, त्यांनी माझी गरज पुरविली. आणि सर्व गोष्टीत मी तुम्हांस ओझे होऊ नये, म्हणून मी स्वतःस ठेवले, आणि यापुढे ठेवीन. १० मशीहाचे खरेपण माझ्यामध्ये आहे म्हणून मी सांगतो की, अखया प्रांतात कुणीही माझ्या आभिमानास विरोध करणार नाही, ११ का? कारण मी तुम्हांवर प्रीति करीत नाही काय? याव्हे एलोहिम जाणतो की, मी तुमच्यावर अहेद (प्रीति) करतो!

१२ आणि मी जे करतो, ते मी करीत जाईन यासाठी की, जे निमित्त पाहतात त्यांचे निमित्त मी नाहीसे करावे. म्हणजे ज्याविषयी ते प्रौढी मिरवितात, त्या बाबतीत त्यांनी आम्हांसारखेच आढळून यावे. १३ कारण अशी माणसे म्हणजे खोटे प्रेषित, कपटी कामदार, मशीहाच्या प्रेषितांचे सोंग घेणारी आहे.१४ ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण सैतानहि स्वतः तेजस्वी एलोहिमच्या मालाक चे (देवदूताचे) रूप धारण करतो. १५ म्हणून त्याच्या सेवकांनीहि नीतिमत्त्वाच्या सेवकांचे रूप धारण केले, तर ती मोठीशी गोष्ट नाही, त्यांचा शेवट त्यांच्या कर्माप्रमाणे होईल.

१६ मी पुन्हा म्हणतो, कोणीही मला मूर्ख समजू नये. पण जर तुम्ही समजता, तर जसा मूर्खाचा तसा माझा स्विकार करा. यासाठी की, मी थोडीसा अभिमान बाळगीन. १७ जे मी बोलतो ते अदोनाईला अनुसरून नव्हे, तर प्रौढीला अनुसरून मूर्खपणाने बोलल्याप्रमाणे बोलतो. १८ देहस्वभावानुसार पुष्कळ लोक प्रौढी मिरवितात, म्हणून मीहि प्रौढी मिरविणार. १९ कारण तुम्ही शहाणे आहा, म्हणून आनंदाने मूर्खांचे सहन करता. २० कारण कोणी तुम्हांला गुलामगिरीत लोटले, किंवा छळ करतो, अथवा तुम्हांला अंकित केले,

स्वतःला कोणी उंच केले, कोणी तुमच्या तोंडात मारिले, तर हे सगळे तुम्ही सहन करिता. २१ आम्ही जणू अशक्त असल्यासारखे, मी लज्जेने बोलतो. पण ज्याविषयी कोणी अभिमान धरण्याविषयी धीट असेल, त्याविषयी मीहि असून हे मी मूर्खपणाने बोलतो. २२ ते इब्री आहेत काय? मीहि इब्री आहे. ते इस्त्राएली आहेत काय? मीहि आहे. २३ ते अब्राहामाचे संतान आहेत काय? मीहि आहे. ते मशीहाचे ऐवेद (सेवक) आहेत काय? मी अधिक प्रमाणात असून, हे मी मूर्खासारखे बोलतो. मी पुष्कळ कठीण काम केले आहे, सारखा तुरूंगात जात होता, बेसुमार फटके खाल्ल्यामुळे, व पुष्कळ वेळा मृत्यूच्या दाढेत पडल्यामुळे, मी अधिक आहे. २४ पांच वेळा मी यहूद्यांच्या हातून एकुणचाळीस फटके खाल्ले, २५ तीन वेळा छडयांचा मार खाल्ला, एकदा मला दगडमार झाला, तीन वेळा माझे गलबत फुटले, व एक दिवस व एक रात्र मी समुद्रात घालविली, २६ मी किती तरी प्रवास केला, नद्यांवरली संकटे, लुटारूमुळे आलेली संकट, नगरातील संकटे, रानांतील संकटे, समुद्रावरची संकटे, नामधारी बंधूंनी आणिलेली संकटे, २७ श्रम व कष्ट किती तरी वेळा केलेली, जागरणे, तहानभूक, पुष्कळ उपासतापास, थंडी, व उघडावागडेपणा, ह्या सर्वांमुळे मी अधिक आहे. २८ शिवाय ह्या व अशा इतर गोष्टीखेरीज माझ्या मनावरचे ओझे म्हणजे, सर्व मंडळयांविषयीची चिंता ही आहे २९ एखादा दुर्बळ असेल, तर मी दुर्बळ होत नाही काय? आणि एखादा अडखळविला गेला, तर मला संताप येत नाही काय?

३० मला प्रौढी मिरविणे भाग पडले, तरच मी आपल्या दुर्बलतेच्या गोष्टींची प्रौढी मिरवीन. ३१ आपल्या अदोनाई येशूवाह चा, याव्हे एलोहिम व अब्वा जो युगानुयुग धन्यवादित आहे. त्याला ठाऊक की, मी खोटे बोलत नाही. ३२ दिमिष्कांत अरीतास राजाने नेमिलेल्या अधिका-यांने मला धरण्याकरिता दिमिष्ककरांच्या नगरावर पहारा ठेविला होता. ३३ तरी मला पाटीत बसवून गांवकुसाच्या खिडकीतून खाली सोडण्यात आले, आणि त्याच्या हातांतून मी निसटलो.

**१२** -१ मी प्रौढी मिरविलीच पाहिजे, जरी त्यापासून कोणताही मला लाभ नाही. मी आता अदोनाईचे दृष्टांन्त व प्रकटीकरण याकडे वळतो. २ मशीहा मधील एक माणुस मला माहीत आहे-जो चौदा वर्षापूर्वी तिस-या आकाशापर्यंत नेण्यात आला. तो शरीरात किंवा शरीराबाहेर घेतला गेला हे मला माहीत नाही, याव्हे एलोहिमला ठाऊक आहे. ३ आणि मला माहीत आहे, हा मनुष्य शरीरात किंवा शरीराबाहेर मला माहीत नाही, पण याव्हे एलोहिम जाणतो. ४ तो वर उचलण्यात आला. आणि माणसाने ज्यांचा उच्चारहि करणे निषिद्ध आहे, अशी वाक्ये त्याने ऐकली-५ मी अशा माणसांविषयी प्रौढी बाळगीन, परंतु माझ्या अशक्तपणाशिवाय, मी स्वतःविषयी अभिमान बाळगणार नाही. ६ जरी मी मशीहाच्या अभिमान बाळगण्याचे निवडले, तरी मी मूर्ख असणार नाही. कारण मी सत्य बोलत असेन, पण मी स्वतःला आवरतो. यासाठी, जो कोणी माझ्या मागे जे काही पाहतो, किंवा माझ्यापासून जे काही ऐकतो, त्यापेक्षा कोणीही मला अधिक मानू नये. ७ आणि माझ्या प्रकटीकरणाच्या अतिशय मोठेपणामुळे मी खूप जास्त चढून जाऊ नये, म्हणून माझ्या शरीरात काटा असा सैतानाचा दूत, मला ठोसे मारण्यासाठी ठेवण्यात आला. ८ तीन वेळा मी अदोनाईला विनंती केली की, तो माझ्यातून काढून टाक. ९ पण तो मला म्हणाला, “माझी हेख्न (कृपा) तुला पुरे आहे. कारण माझे सामर्थ्य अशक्तपणात पूर्णत्वास येते.” म्हणून मी माझ्या अशक्तपणाबद्दल आनंदाने प्रौढी मिरवीन. यासाठी की, मशीहाचे सामर्थ्य माझ्यावर स्थिर राहावे. १० या कारणासाठी मशीहा करिता अशक्तपणात आनंद करतो. अपमानात, कठीण परिस्थितीत, छळात, अडचणीच्या वेळी, कारण जेंव्हा मी अशक्त तेव्हा मी सशक्त असतो.

११ मी स्वतःच मूर्ख झालो, पण तसे होण्यास तुम्ही मला भाग पाडले. तुमच्याकडून माझी प्रशंसा व्हावयाची होती, जरी मी काही नसलो, तरी अतिश्रेष्ठ प्रेषितांपेक्षा मी कमी नव्हतो. १२ चिन्हे व अद्‌भुते, आणि सामर्थ्याची कृत्ये, यांच्या योगाने प्रेषिताची चिन्हे खरोखरच सर्व सहनशीलतेने तुम्हांमध्ये घडवण्यात आली होती. १३ कारण मी स्वतः तुम्हांला भार झालो नाही. याखेरीज कोणत्या गोष्टीत तुम्ही इतर मंडळयांपेक्षा उणे होता? मला या अपराधाची क्षमा करा. १४ पाहा, तिस-यांदा मी तुम्हांकडे येण्यास तयार आहे, आणि मी तुम्हांला भार टाकणार नाही. कारण मी तुमचे द्रव्य मिळवायला पाहत नाही, तर तुम्हांला मिळवायला पाहत आहे. कारण लेकरांनी आईबापांसाठी नव्हे, तर आईबापांनी लेकरांसाठी साठवले पाहिजे. १५ आणि तुमच्या जिवांसाठी मी फार आनंदाने खर्च

करीन, आणि स्वतः सर्वस्व खर्ची पडेन. मी जरी तुम्हांवर फार अधिक प्रीति करतो, तरी माझ्यावर कमी प्रीति करण्यात येते काय?
१६ बरे असो, मी तुम्हांवर भार टाकत नाही. तरी पण मी धूर्त असल्यामुळे मी तुम्हांस कपटाने धरले.
१७ ज्यांना मी तुम्हांकडे पाठवले त्यांच्यांतील कोणाकडून, तरी मी तुम्हांपासून काही फायदा करून घेतला काय?
१८ मी तीताला तुम्हांकडे जाण्यास विनंती केली, आणि मी त्याच्याबरोबर बंधूंला पाठवले. तीताने तुम्हांपासून काही फायदा करून घेतला काय? आम्ही एकाच आत्म्याने सारख्याच पावलाने चाललो नाही काय?
१९ आम्ही आपणास तुम्हांजवळ निर्दोष करून दाखवतो, असे तुम्हांस आता वाटते. आम्ही याव्हे एलोहिम समक्ष मशीहा मध्ये बोलतो. तर प्रियांनो, सर्व गोष्टी तुमच्या वृद्धीसाठी आहेत.
२० कारण मला भय वाटते की, मी आल्यावर कदाचित जसे मी इच्छितो, तसे असलेले तुम्ही मला आढळणार नाही. आणि जसे तुम्ही इच्छिता नाही, तसा असलेला मी तुम्हांस आढळेन. म्हणजे कदाचित भांडणे, मत्सर, राग, कलह, चहाडया, कुजबूज, फुगणे, अव्यवस्था ही दिसून येतील.
२१ म्हणजे मी पुन्हा आल्यावर, माझा याव्हे एलोहिम मला तुम्हांजवळ नीच करील. आणि ज्यांनी पूर्वी पाप केले होते, आणि आपण आचरलेल्या अशुद्धपणाचा, व जारकर्माचा, व कामातुरपणाचा, पश्चात्ताप केला नाही, अशा पुष्कळांविषयी मला शोक करावा लागेल.

**१३**.१ ही माझी तुम्हांला भेटण्याची तिसरी वेळ आहे. दोन किंवा तीन साक्षीदारांच्या तोंडाने प्रत्येक गोष्ट प्रस्थापित होते.
२ मी पूर्वी सांगितले होते, आणि जसे दुस-यांदा मी जवळ असताना सांगितले होते. तसे आताही मी दूर असताना ज्यांनी पूर्वी पाप केले, त्यांना व इतर सर्वांना अगोदर सांगून ठेवतो. की, जर मी फिरून आलो, तर गय करणार नाही.
३ कारण मशीहा माझ्यामध्ये बोलत आहे. याचे प्रमाण मिळावे असे तुम्ही पाहता, तो तर तुम्हांविषयी अशक्त नाही, पण तुम्हांमध्ये शक्तिमान आहे.
४ कारण जरी तो अशक्तपणात वधस्तंभावर खिळला गेला, तरी तो याव्हे एलोहिमच्या सामर्थ्याने जिवंत आहे. कारण आम्हीही त्याच्यामध्ये अशक्त आहे, तरी याव्हे एलोहिमच्या सामर्थ्याने, त्याच्याबरोबर तुमच्यासाठी आम्ही जिवंत असू.

५ तुम्ही विश्वासात आहा की, नाही याविषयी स्वतःची परीक्षा पाहा, आपली पारख करा. मशीहा तुमच्यामध्ये आहे, ह्याची जाणीव तुम्हांला होत नाही का? जर अर्थात तुम्ही परीक्षेत उतरला नाही, तर
६ आणि माझा विश्वास आहे की, तुम्ही हे शोधाल की, या परीक्षेत आम्ही अनुत्तीर्ण झालो नाही.
७ आता आम्ही याव्हे एलोहिम जवळ अशी प्रार्थना करतो की, तुम्ही काहीही चुकीचे करणार नाही. आम्ही परीक्षेत उत्तीर्ण व्हावे यासाठी नव्हे. तर अशासाठी की, आम्ही जरी नाकारलेल्यासारखे असलो, तरी तुम्ही चांगले काम करावे.
८ कारण सत्या विरूद्ध आम्हांस काही करता येत नाही, तर सत्यासाठी करता येते.
९ जेंव्हा आम्ही अशक्त आहो, आणि तुम्ही शक्तीमान आहा. तेंव्हा आम्ही आनंद करतो, आणि आम्ही प्रार्थनाही करतो ती अशी की, तुम्ही पूर्ण व्हावे.
१० यामुळे तुम्हांपासून आम्ही दूर असताना, हे तुम्हांला लिहितो यासाठी की, अदोनाईने जो अधिकार तुम्हांला खाली पाडून टाकण्यासाठी नव्हे, तर वृद्धीसाठी मला दिला त्याप्रमाणे, जवळ आल्यावर मी कठोर वागू नये.

११ शेवटी बंधूंनो, आता इतकेच म्हणतो तुमचे कल्याण असो, तुम्हांस पूर्णता लाभो, समाधान मिळो, तुम्ही एकचित्त व्हा, शांतीने राहा, म्हणजे अहेद व शालोम चा याव्हे एलोहिम तुम्हांसह राहिल.
१२ पवित्र चुंबन घेऊन एकमेकांना शालोम करा.
१३ सर्व क्वादोश जन तुम्हांला शालोम सांगतात.

१४ अदोनाई येशूवाह मशीहा ची हेस्त्रद (कृपा), याव्हे एलोहिम ची अहेद (प्रीति), आणि क्वादोश रूहुव्वा ची (पवित्र आत्म्याची) सहभागीता तुम्हां सर्वांसह असो, आमेन.

.................. समाप्त ...............

## .प्रेषित पौलाने गलतीकरांस लिहिलेले पत्र.

### .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने हे पत्र गलतीकरांस च्या मंडळीला लिहिलेले आहे. ह्या पत्राचा लेखन काळ, इसवी सन ५८ ते ६१ च्या दरम्यान असलेला पहावयास मिळतो. हे पत्र लहान असले, तरी महत्वाचे आहे. हे पत्र पौलाने लिहिले असून तोराह (नियनशास्त्र) पाळले पाहिजे, असे म्हणणा-यांचे खंडण केल्याचे दिसून येते. आणि याव्हे एलोहिमच्या कृपेच्या सुवार्तेचे महत्वाचे दाखविण्यास आलेले आहे. पहिल्या सुवार्तेच्या फेरीच्या नंतर, पौलाने हे पत्र मंडळीला लिहिलेले आहे. मशीहा वरील विश्वासाला सुंता, व मोशेचे तोराह (नियमशास्त्र) यांची जोड दिलीच पाहिजे, असा आग्रह धरणा-या यहूदी धर्म रब्बुनी च्या (शिक्षकांच्या) प्रचाराला पायबंदी घालून, सत्य प्रकट करण्यासाठी पौलाने हे पत्र लिहिले. हे पत्र लिहिण्याचा हेतू व उद्देश पत्रातील मजकुरावरून स्पष्ट होतो. आपल्या प्रेषितीय अधिकाराचे समर्थन करणे भाग पडत आहे, असे तो पहिल्या दोन अध्यायांत सांगतो. यहूदी मतप्रसारकांचे म्हणणे, पौलाच्या शिक्षणाविरूद्ध होते. तेंव्हा त्यांनी पौलाच्या अधिकारालाच सुरूंग लावण्याचा घात घातला होता. आपले प्रेषित पण झालेले पाचारण, व अधिकार याचे समर्थन केल्यावर पौल नीतीमान ठरवणे, या तत्वाचे विवरण करतो. आणि यहूदी रब्बुनी चे (शिक्षकांचे) मत खोडून काढतो. नीतिमान ठरवले जाणे, या तत्वाचे सुसंगत सर्वसमावेशक विवेचन करून, तो तोराह चा (नियशास्त्राचा) आग्रह धरणा-यांचे असत्यता उघड करून दाखवितो. विश्वासणा-यावर तोराह चे (नियमशास्त्राचे) बंधन नको, असे म्हंटल्याने सर्वत्र अनाचार माजेल हा यहूदी रब्बुनी चा (शिक्षकांचा) प्रमुख आक्षेप होता. त्याला उत्तर म्हणून पौलाने मशीहा ही जीवनात स्वातंत्र म्हणजे का, व त्याचा खरा परिणाम काय होतो, हे दाखविलेले आहे. विश्वासाने नीतिमान ठरवले गेल्यावर हातून जी कामे होतात, ती चांगलीच असतात. हे सत्य तो तर्कशुद्ध रीतीने मंडळी समेर स्पष्ट मांडतो.

* * * * * * * * * * * * * * * *

### .प्रेषित पौलाने गलतीकरांस लिहिलेले पत्र.

१.१ प्रेषित पौलाकडून, प्रेषित होण्यासाठी मी मनुष्यांकडून निवडला गेलो नाही. मनुष्यांकडून मला पाठविण्यात आले नव्हते. याव्हे
एलोहिम जो अव्वा त्याने व येशूवाह मशीहाने मला प्रेषित केले. याव्हे एलोहिमनेच, येशूवाहला मरणातून उठविले.२ हे पत्र मशीहा
मधील जे बंधु माझ्याबरोबर आहेत, त्यांच्याकडून ही आहे. आणि हे गलतीया येथील मंडळीतील विश्वासू जणांना लिहिले आहे. ३
यांची हेख्न (कृपा), चांगुलपण, व शालोम (शांती) तुम्हांबरोबर असो. ४ येशूवाहने स्वतःला आमच्या पापांसाठी दिले. ज्या दुष्ट
जगात आम्हीं राहतो, त्यापासून आम्हांला मुक्त करण्यासाठी त्याने असे केले, आणि याव्हे एलोहिम जो अव्वा त्याची हीच इच्छा
होती.५ त्याला सदासर्वकाळ गौरव असो आमेन.

६ मला आश्चर्य वाटते की, ज्या याव्हे एलोहिमने तुम्हांला मशीहा व्दारे बोलविले आहे. त्याच्यापासून तुम्हीं इतक्या लवकर दुस-या
सुवार्तेकडे वळत आहात.७ ती खरी सुवार्ता नाही पण असे काही जण आहेत की, ते तुम्हांला गोंधळात टाकीत आहेत. व मशीहा
विषयीची सुवार्ता बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत. ८ आम्हीं तुम्हांला सांगितली त्याहून निराळी सुवार्ता आम्हीं, किंवा आकाशातील
मालाक नी (दूतांनी), जर तुम्हांला सांगितली तर याव्हे एलोहिम चा शाप त्याच्यावर येवो. ९ आम्हीं अगोदर सांगितल्याप्रमाणे आणि
आता पुन्हा सांगतो, तुम्हीं जी स्विकारली आहे, तिच्याहून वेगळी सुवार्ता जर कोणी तुम्हांस सांगत असेल, तर याव्हे एलोहिम चा शाप
त्याच्यावर येवो.१० आता मी मनुष्याला, किंवा याव्हे एलोहिम ला संतोषविण्याचा प्रयत्न करीत आहे काय? मी मनुष्यांना संतुष करीत
राहिलो असतो, तर मशीहा चा ऐबेद (सेवक) झालो नसतो.

११ वंधूंनो, तुम्हांला माहीत असावे असे मला वाटते ते हे की, जी सुवार्ता मी तुम्हांस सांगितली तो मानवी संदेश नाही. १२ कारण मला
ती मनुष्यांकडून झालेल्या प्रकटीकरणामुळे कळली नाही, तर येशूवाह मशीहाने मला ती दाखविली. १३ यहूदी धर्मातील माझ्या पूर्वीच्या
जीवनाविषयी तुम्हीं ऐकले आहे. आणि हे जाणता की, याव्हे एलोहिमच्या मंडळीचा मी भयंकर छळ केला होता. १४ माझ्या यहूदी

धर्माच्या पालनाबाबत मी माझ्या वयाच्या लोकांपेक्षा कितीतरी पुढे होतो. माझ्या पूर्वजांनी दिलेल्या शिकवणीविषयी, मी त्याला पूर्ण वाहिलेला होतो.१५ त्यामुळे मी जन्महोण्या अगोदरच याव्हे एलोहिमने माझ्यासाठी वेगळी योजना आखली होती, आणि त्याच्या कृपेत त्याची सेवा करण्यासाठी त्याने मला बोलावले. १६ आणि जेंव्हा याव्हे एलोहिमने त्याचा मुलाला प्रगट करण्याचे ठरविले ते यासाठी की, विदेशी लोकांमध्ये मुलाविषयीची सुवार्ता मी सांगावी. मी कोणत्याही मनुष्याबरोबर सल्लामसलत केली नाही. १७ किंवा जे माझ्यापूर्वी प्रेषित होते, त्यांना भटण्यासाठी यरूशलेमात वर गेलो नाही. त्याऐवजी मी तावडतोब अरबस्तानात गेलो. आणि मग दिमिष्कास परत आलो.

१८ मग तीन वर्षानंतर केफा बरोबर ओळख करून घेण्यासाठी यरूशलेमला गेलो, आणि त्याच्याबरोबर मी पंधरा दिवस राहिलो. १९ परंतु प्रेषितांपैकी दुस-यांना मी पाहिले नाही. मी फक्त अदोनाई येशूवाहचा भाऊ याकोब यालाच पाहिले. २० आणि मी याव्हे एलोहिम समोर शपथ घेऊन सांगतो की, जे काही मी तुम्हांला लिहित आहे, ते खोटे नाही. २१ नंतर मी सूरीया व किलीकिया प्रांतांत गेलो. २२ परंतु यहूदीया येथे विश्वासात ज्या मशीहाच्या मंडळया आहेत, त्यांना मी व्यक्तीशः माहीत नव्हतो. २३ त्यांनी फक्त ऐकले होते. लोक म्हणतात, "ज्या मनुष्याने ज्या विश्वासासाठी पूर्वी आपला छळ केला, ज्या विश्वासाचा त्याने नाश करण्याचा प्रयत्न केला, तो आता त्याचीच घोषणा करीत आहे." २४ आणि माझ्यामुळे त्यांनी याव्हे एलोहिमचे गौरव केले.

२.१ मग चौदा वर्षाच्या काळानंतर मी पुन्हा यरूशलेमास गेलो, मी बर्णबा बरोबर गेलो. तीताला सुद्धा माझ्याबरोबर घेतले. २ मी जावे असे याव्हे एलोहिमने मला प्रगट केले म्हणुन मी गेलो. ज्याप्रमाणे मी पूर्वी यहूदीतर लोकांमध्ये सुवार्ता सांगितली, तशी मी जे प्रतिष्ठि दिसले त्यांच्यापुढे ते एकान्ती मांडले, तसे केले नसते तर कदाचित मी व्यर्थ धावत असतो, किंवा व्यर्थ धावलो असे झाले असते.३ त्याचा परिणाम असा झाला की, तीता जो माझ्याबरोबर होता, तो हेल्लेणी असतानाही त्याला सुंता करवून घेण्यास भाग पाडण्यात आले नाही. ४ कारण मशीहा येशूवाह मध्ये आम्हांला जे स्वातंत्र्य मिळाले, ते हेरण्यासाठी व आम्हांला दासपणा करीता यावे, म्हणून ज्या खोटया विश्वासणा-यांना आत आणण्यात आले, त्यामुळे हे झाले. ५ सुवार्तेमधील सत्य तुमच्याजवळच राहावे, म्हणून आम्हीं क्षणभर देखील त्यांना वश झालो नाही. ६ जे लोक महत्वाचे आहेत, असे लोक समजत होते, त्यांच्याकडून मला काहीही मिळाले नाही. जे कोणी ते होते, त्यांच्यामुळे मला काही फरक पडला नाही. सर्व माणसे याव्हे एलोहिम समोर सारखीच आहेत. काहीही असो, त्या प्रतिष्ठित माणसांनी माझ्यामध्ये, किंवा माझ्या संदेश वचनामध्ये कोणतीही भर टाकली नाही. ७ उलट जेंव्हा ते म्हणतात की, विदेशी लोकांना सुवार्ता सांगण्याचे कार्य माझ्यावर सोपविण्यात आले आहे. ज्याप्रमाणे केफाला यहूदी लोकांना सुवार्ता सांगण्याचे कार्य सोपविलेले आहे. ८ कारण ज्याने केफाला यहूदी लोकांकरिता प्रेषित बनविले, त्यानेच मला विदेशी लोकांकरिता प्रेषित बनविले. ९ म्हणून याकोब, केफा, व योहान ज्यांची मंडळीचे आधारस्तंभ म्हणून प्रसिद्धी होती. त्यांनी याव्हे एलोहिमने मला दिलेला अधिकार ओळखला, आणि बर्णबा व माझ्याशी सहभागितेचे चिन्ह म्हणून हात मिळविला. व सहमती दर्शविली की, आम्हीं विदेशी लोकांमध्ये जाऊन संदेश वचने द्यावी. आणि त्यांनी जाऊन यहूदी लोकांना उपदेश करावा. १० त्यांनी फक्त हेच सांगितले की, त्यांच्या गरिबांना मदत करण्याची आम्हीं आठवण ठेवावी, आणि मी ते सर्व करण्यास राजी होतो. एवढेच नव्हे, तर ते करण्यास उत्कंठित झालो होतो.

११ पण जेंव्हा केफा अंत्युखियात आला, तेंव्हा मी त्याला उघडपणे विरोध केला. कारण त्याने स्पष्टपणे चूक केली होती. १२ कारण याकोबाने पाठविलेली काही माणसे येण्यापूर्वी, केफा विदेशी लोकांबरोबर जेवत असे. पण जेंव्हा याकोबाने पाठविलेले यहूदी आले, तेंव्हा त्याने अंग काढून घेतले. आणि तो विदेशी लोकांपासून वेगळा झाला. कारण या यहूदी लोकांचा विश्वास होता की, विदेशी माणसांची सुंता झालीच पाहिजे. म्हणून त्यांची त्याला भीती वाटत होती. १३ व बाकीचे यहूदी लोकसुद्धा त्याच्या ढोंगामध्ये सामील झाले. येथपर्यंत की, बर्णबा सुद्धा त्यांच्या ढोंगाला वश झाला. १४ जेंव्हा मी पाहिले की, सुवार्तेच्या सत्याच्या सरळ मार्गात, ते योग्य प्रकारे वागत नाहीत. तेंव्हा मी सर्वांसमोर केफाला म्हणालो, "जर तू जो यहूदी आहेस व यहूदीतरांप्रमाणे वागत आहेस, व यहूदी माणसाप्रमाणे वागत नाहीस. तर तू विदेशी लोकांना यहूदी लोकांना यहूदी लोकांच्या चालीरीतींचे अनुकरण करण्यास त्यांना कसे भाग

पाडू शकतोस?" १५ आम्हीं जन्माने यहूदी आहोत, आणि पापी यहूदीतर लोकांपैकी नाही. १६ तरीही आम्हांला माहीत होते की, मनुष्य तोराह (नियमशास्त्रा) तील कृत्यांने नीतिमान ठरत नाही. तर येशूवाह मशीहा वर विश्वास ठेवण्याने ठरतो. म्हणून आम्हीं आमचा विश्वास येशूवाह मशीहा वर ठेवला आहे. यासाठी की, मशीहा वरील विश्वासाने आम्हीं नीतिमान ठरावे. तोराह (नियमशास्त्रा) तील कृत्यांनी नव्हे. कारण कोणीही देहधारी मनुष्य तोराह (नियमशास्त्रा) तील कृत्यांनी नीतिमान ठरणार नाही. १७ पण जर आम्हीं मशीहा मध्ये नीतिमान होण्याचे पाहतो, तर आम्हीं यहूदी सुद्धा विदेश्यांप्रमाणे पापी असे आढळतो. याचा अर्थ असा आहे की, मशीहा पापाचा सेवक आहे काय?

१८ अर्थातच नाही! कारण जर मी या सोडून दिलेल्या पद्धती प्रमाणे पुन्हा शिकविण्यास सुरूवात केली, तर मी तोराह (नियमशास्त्र) मोडणारा होतो. १९ कारण तोराह (नियमशास्त्रा) मुळे, मी तोराह (नियमशास्त्रा) ला मेलो यासाठी की, मी याव्हे एलोहिम साठी जगावे. मी मशीहा बरोबर वधस्तंभावर खिळला गेलो. २० यासाठी की, यापुढे मी जगतो असे नाही, तर मशीहा माझ्यामध्ये जगतो. आता देहामध्ये जे जीवन मी जगतो, ते मी ज्याने माझ्यावर अहेद (प्रीति) केली, आणि माझ्या ऐवजी स्वतःला दिले, त्या याव्हे एलोहिमच्या बेन (मुला) वरील विश्वासाने जगतो. २१ मी याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा) नाकारीत नाही. कारण जर नीतिमत्व तोराह (नियमशास्त्रा) मुळे मिळत असेल तर मशीहा विनाकारण मरण पावला.

**३**.१ अहो मूर्ख गलतीकरांनो, ज्या तुमच्या डोळयांसमोर येशूवाह मशीहाला वधस्तंभावर खिळलेले, जाहीर रितीने तुम्हांला वर्णन करून सांगितले होते. त्या तुम्हांला कोणी भुरळ घातली आहे. २ मला तुमच्या कडून ही एक गोष्ट शिकायची आहे? आत्म्याची दाने तुम्हांला तोराह् चे पालन करण्याने मिळाली आहेत की, सुवार्ता ऐकून तिच्यावर विश्वास ठेवल्याने मिळाली आहेत? ३ तुम्हीं इतके मूर्ख आहात का की, जे जीवन तुम्हीं आत्म्यात सुरु केले, ते आता देहाने पूर्ण करीत आहात? ४ तुम्हीं व्यर्थच इतकी दुःखे अनुभवली का? माझी आशा आहे की, ती व्यर्थ नव्हती. ५ याव्हे एलोहिम जो तुम्हांला रूहुव्वा (आत्मा) पुरवितो, आणि तुम्हांमध्ये चमत्कार करतो, तो तुम्हीं तोराह् चे पालन करता म्हणून, का सुवार्ता ऐकून तीवर विश्वास ठेवला म्हणून तो हे करतो. ६ ते अब्राहामा विषयी शास्त्रलेख सांगते तसे आहे, "त्याने याव्हे एलोहिम वर विश्वास ठेवला. आणि ते त्यांच्यासाठी याव्हे एलोहिम कडून, नीतिमत्व असे गणण्यात आले." ७ मग तुम्हांला समजले पाहिजे की, जे विश्वास ठेवतात तेच अब्राहामाचे खरे संतान आहेत. ८ शास्त्रलेखाने आधीच सांगितले आहे की, याव्हे एलोहिम विदेशी लोकांना त्यांच्या विश्वासाने नीतिमान ठरवील. त्याने अब्राहामाला पूर्वीच सुवार्ता सांगितली की, "तुझ्याव्दारे सर्व राष्ट्रे आशिर्वादीत होतील." ९ म्हणून ज्यांचा विश्वास आहे, त्यांना विश्वासणा-या अब्राहामासह आशिर्वाद मिळेल.१० परंतु तोराह् (नियमशास्त्रा) च्या कृतीवर जे अवलंबून राहतात, ते शापित आहेत. कारण शास्त्रात असे लिहिले आहे की, "तोराह् च्या सेफेर मध्ये लिहिलेल्या सर्व गोष्टी करण्यात जो कोणी टिकून राहत नाही, तो शापित असो." ११ तोराह् मुळे कोणीही मनुष्य याव्हे एलोहिम समोर नीतिमान ठरत नाही, हे उघड आहे. कारण शास्त्रलेख सांगते की, "विश्वासामुळे नीतिमान मनुष्य जगेल." १२ तोराह् हे विश्वासाचे नाही, त्याऐवजी शास्त्रलेख असे सांगते की, "जो कोणी ते पाळतो तो त्यामुळे जगेल." १३ मशीहाने आपल्याला तोराह् च्या शापापासून मुक्त केले आहे. आपणासाठी शाप होऊन त्याने हे केले. असे लिहिले आहे, "प्रत्येक जण जो कोणी झाडावर टांगला आहे तो शापित असो." १४ मशीहाने आम्हांला मुक्त केले यासाठी की, अब्राहामाला मिळालेला आशिर्वाद मशीहा व्दारे विदेश्यांना मिळावा. यासाठी की, विश्वासाव्दारे आम्हांला रूहुव्वा चे (आत्म्याचे) अभिवचन मिळावे.

१५ बंधूंनो, मी तुम्हांला रोजच्या जीवनातील उदाहरण देतो. ज्याप्रमाणे मनुष्यांनी केलेल्या करार कोणीही रद्द करत नाही, किंवा त्यात भर घालीत नाही. याबाबतीत सुद्धा तसेच आहे. १६ अब्राहामाला व त्याच्या संतानाला अभिवचने दिलेली होती. लक्षात घ्या की, ते आणि त्याच्या संतानास असे अनेक जणासंबंधी म्हणत नाही. तर जसे काय ते एका व्यक्तीला म्हणते, "आणि तुझ्या संतानाला (आणि तो संतान) मशीहा आहे. १७ माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, याव्हे एलोहिमने अगोदर निश्चित केलेला करार चारशे तीस वर्षे उशिरा आलेल्या, तोराह्ने अभिवचन रद्द करण्यास केला नव्हता. १८ कारण वतन जर तोराह् वर अवलंबून होते, तर येथून पुढे

ते अभिवचनावर अवलंबून असणार नाही. परंतु याव्हे एलोहिमने अभिवचनामुळे अब्राहामाला मुक्तपणे हे वतन दिले. १९ तर मग तोराह् चा उद्देश काय होता? ज्या संतानाला वचन दिले होते. त्याच्या येण्यापर्यंत पापामुळे ते अभिवचनाला जोडण्यात आले होते. तोराह् हे, याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदूतां) कडून मोशे या मध्यस्थाच्या हाती देण्यात आले. २० आता मध्यस्थ हा फक्त एकाच पक्षाचा नसतो. पण याव्हे एलोहिम एकच आहे, आणि त्याची अभिवचने दुस-या पक्षावर अवलंबून नाहीत.

२१ तोराह् हे याव्हे एलोहिमच्या अभिवचनाविरूद्ध आहे. असा याचा अर्थ होतो का? अर्थातच नाही! कारण लोकांना जीवनत आणण्यासाठी जर तोराह् देण्यात आले असेल, तर मग नीतिमत्व त्याच तोराह् च्या व्दारे येईल. २२ पण शास्त्रलेखाने स्पष्ट केले आहे की, संपूर्ण जग हे पापाच्या सामर्थ्याने जखडून टाकले होते. यासाठी की, जे अभिवचन देण्यात आले होते, ते जे येशूवाह मशीहा वर विश्वास ठेवतात, त्यांना देण्यात यावे. २३ हा विश्वास येण्याअगोदर तोराह् ने आपणांस कैद्याप्रमाणे पहा-यात ठेवले होते.आणि हा येणारा विश्वास आम्हांला प्रगट होईपर्यंत, आम्हांला कैदी म्हणून ठेवण्यात आले होते. २४ त्यामुळे आपल्या विश्वासाच्या आधारे आपण नीतिमान ठरविले जावे, म्हणून तोराह् जे आपणाला मशीहा कडे घेऊन येणारे होते. कारण ते बालकांचा रब्बुनी (शिक्षक) असे झाले. २५ पण आता हा विश्वास आलाच आहे. तर यापुढे आम्हीं या कडक रब्बुनी च्या (शिक्षकाच्या) अधीन नाही. २६ कारण तुम्हीं सर्व सुवार्तेवर विश्वास ठेवल्यामुळे, येशूवाह मशीहा व्दारे याव्हे एलोहिमचे मुले आहोत. २७ कारण तुम्हीं जितक्यांनी मशीहात बाप्तिस्मा घेतला, तितक्यांनी मशीहाला परिधान केले आहे. २८ तेथे यहूदी किंवा हेल्लेणी गुलाम किंवा स्वतंत्र पुरूष किंवा स्त्री हा भेदच नाही. कारण तुम्हीं सर्व मशीहा येशूवाह मध्ये एक आहात. २९ आणि जर तुम्हीं मशीहाचे आहात तर तुम्हीं अब्राहामाचे संतान आणि याव्हे एलोहिमने अब्राहामाला दिलेल्या वचनानुसार वारस आहात.

४.१ मी जे म्हणत आहे ते हे की, जोपर्यंत वारसदार हा लहान बाळ आहे, तोपार्यंत तो दासापेक्षा वेगळा नाही. जरी तो सर्वांचा मालक असला तरी, २ तो जोपर्यंत त्याच्या अब्बाने नेमून दिलेला वेळ आहे, तोपर्यंत पालकांच्या व कारभा-यांच्या ताब्यात असतो. ३ याच प्रकारे जो पर्यंत आम्हीं "मुले" होतो, तोपर्यंत आम्हींसुद्धा या जगाच्या निरर्थक नियमाचे गुलाम होतो. ४ परंतु जेंव्हा काळाची पूर्णता झाली, तेंव्हा याव्हे एलोहिमने आपला बेन (मुलगा) पाठविला. जो स्त्रीपासून जन्मला, व तोराह् प्रमाणे वागला. ५ यासाठी की, त्याने जे तोराह् च्या अधीन होते, त्यांना सोडवावे व याव्हे एलोहिमची मुले म्हणून स्विकारावे.६ आणि तुम्हीं त्याचे मुले आहात, म्हणून याव्हे एलोहिमने आपल्या मुलाच्या आत्म्याला तुमच्या आत्म्यात पाठविले आहे. रूहव्वा (आत्मा) "अब्बा" अशी हाक मारतो, ७ म्हणून तू आता गुलाम नाही. तर एक मुलगा आहेस, आणि जर मुलगा आहेस, तर याव्हे एलोहिमने तुला त्याचा वारसदारही बनविले आहे.

८ गतकाळात जेंव्हा तुम्हीं याव्हे एलोहिमला ओळखीत नव्हता. तेंव्हा ख-या अर्थाने जे एलोहिम नव्हते, त्यांचे तुम्हीं गुलाम होता. ९ परंतु आता तुम्हीं याव्हे एलोहिमला ओळखता, किंवा आता याव्हे एलोहिमने तुमची ओळख करून घेतली आहे. तर मग आता तुम्हीं ज्यांचे गुलाम होण्याचे प्रयत्न करीत आहात, त्या दुर्बल आणि निरूपयोगी नियमाकडे कसे वळतात? १० तुम्ही विशेष दिवस, महिने, ऋतू, आणि वर्षे पाळता. ११ मला तुमच्याविषयी भीती वाटते, मला वाईट वाटते की, मी तुमच्यासाठी केलेले श्रम व्यर्थ आहेत.

१२ बंधूंनो, मी तुम्हांला कळकळीची विनंती करतो की, कृपाकरून माझ्यासारखे व्हा. कारण मी तुमच्यासारखा झालो असे काही नाही. की, तुम्हीं माझे काही वाईट केले होते. १३ तुम्हांला माहीत आहे की, माझ्या शारीरिक दुर्बलतेमुळे प्रथमतः मी तुम्हांला सुवार्ता सांगितली. १४ आणि माझ्या शारीरिक दुर्बलतेबाबत तुमची कठीण परीक्षा होत असतानाही, उलट माझे एखाद्या एलोहिमच्या मालाक (देवदूता) सारखे तुम्हीं स्वागत केले. जणू काय मीच स्वतः मशीहा असल्यासारखे स्वागत केले. १५ मग जो आनंद तुम्हांला मिळाला, तो कोठे आहे? कारण मी तुम्हांविषयी साक्ष देतो की, जर तुम्हीं समर्थ असता, तर तुम्हीं तुमचे स्वतःचे डोळे काढून ते मला दिले असते. १६ तुम्हांला खरे सांगितले, म्हणून मी तुमचा वैरी झालो काय?

१७ तुम्हीं तोराह् पाळावे असे ज्यांना वाटते, त्यांना तुमच्याविषयी आवेशमय आस्था आहे. पण चांगल्या हेतूसाठी नाही, माझ्या पासून

तुम्हांला वेगळे करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. यासाठी की, तुम्हांला त्यांच्याविषयी आवेशमय आस्था वाटेल. १८ हे नेहमी चांगले असते की, कोणासाठी तरी विशेष आवेश असावा. पण ती कोणत्या तरी चांगल्या गोष्टीसाठी, आणि मी जेंव्हा तुमच्याबरोबर असतो, फक्त तेव्हांच नव्हे. १९ माझ्या प्रिय मुलांनो, तुमच्यामुळे मी पुन्हा एकदा प्रसूतिवेदनातून जात आहे, आणि तुम्हीं मशीहा सारखे होईपर्यंत मला तसे करावेच लागेल. २० आता मला तुमच्याबरोबर तेथे हजर राहावेसे, व स्वर बदलून वेगळया प्रकारे बोलावेसे वाटते. कारण तुमच्याविषयी मी गोंधळात पडलो आहे. २१ जे तुम्हीं तोराह् अधीन राहू इच्छिता, त्या तुम्हांला मला विचारू द्या की, तोराह् काय म्हणते ते तुम्हांला माहीत आहे काय? २२ असे लिहिले आहे की, अब्राहामाला दोन मुले होत. एक त्याला गुलाम मुलीपासून झाला, व दुसरा स्वतंत्र स्त्रीपासून जन्मलेला, २३ याव्हे एलोहिमच्या वचनाचा परिणाम म्हणून जन्मला. २४ या गोष्टी दृष्टांतरूप आहेत, त्या स्त्रिया दोन करार आहेत. एक करार त्सियोन पर्वतावर झाला, आणि ज्यांच्या नशिबी गुलामगिरी होती अशा लोकांना त्याने जन्म दिला, हा करार हागारशी संबंध दर्शवितो. २५ हागार ही अरवस्तानातील, त्सियोन पर्वताचे दर्शक हल्लीच्या यरूशलेमचे वास्त्यरूप आहे. कारण ती आपल्या मुलासह गुलामगिरीत आहे. २६ परंतु आकाशातील यरूशलेम स्वतंत्र आहे. आकाशातील यरूशलेम ही आमची अम्मी आहे. २७ कारण असे लिहिले आहे, "जिने जन्म दिला नाही त्या मूल नसलेल्या स्त्रीने आनंद करावा! ज्या तुला प्रसूतिवेदना झालेल्या नाहीत, ती तू आनंदाने जयघोष कर, आरोळी मार. कारण जिला पती आहे, तिच्या मुलांपेक्षा सोडलेल्या स्त्रीची मुले अधिक आहेत."

२८ तर बंधूंनो, इसहाक जसा होता, तशी आपण वचनाची मुले आहो. २९ परंतु त्या वेळेस देहस्वभावाप्रमाणे जन्मलेल्याने आत्म्याप्रमाणे जन्मलेल्याचा पाठलाग केला, तसे आताही आहे. ३० पण शास्त्रलेख काय सांगते, दासी आणि तिचा मुलगा यांना बाहेर घालीव. कारण दासीचा मुलगा स्वतंत्र स्त्रीच्या मुलाबरोबर वारीस होणारच नाही. ३१ म्हणून बंधूंनो, आपण दासीची मुले नाही, तर स्वतंत्र स्त्रीची मुले आहोत.

**५**.१ मी आम्हीं स्वातंत्त्यात राहावे म्हणून मशीहाने आम्हांला मुक्त केले, म्हणून स्थिर राहा. आणि तोराह् च्या जुवाच्या गुलामगिरीचे ओझे पुन्हा लादून घेऊ नका. २ ऐका!, मी पौल तुम्हांला सांगतो की, जर सुंता करून घेऊन तुम्हीं तोराह् कडे वळला तर मशीहा तुमच्यासाठी कोणत्याही किंमतीचा नाही. ३ सुंता करून घेणा-या प्रत्येक माणसाला, मी पुन्हा एकदा जाहीर करतो की, तो संपूर्ण तोराह् पाळण्यास बांधलेला आहे. ४ तुमच्यापैकी जे तोराह् व्दारे नीतिमान ठरू पाहतात, त्यांचा मशीहा बरोबरचा संबंध तुटला आहे. याव्हे एलोहिमच्या दयेच्या बाहेर आता तुम्हीं आहात. ५ आम्हीं तर आत्म्याने विश्वासाकडून न्यायीपणाच्या आशेची वाट पाहात आहोत. ६ कारण मशीहा येशूवाह मध्ये सुंता झालेले, व सुंता न झालेले, यांना काही अर्थ नाही. तर विश्वास जो प्रीतिव्दारे कार्य करतो त्याला आहे.

७ तुम्हीं इतकी चांगली मशीहा मध्ये शर्यतीत धावत होता, तर तुम्हांला सत्याचे पालन करण्यास कोणी अडथळा केला? ८ सत्यापासून मन वळवणारे तुमचे कठोर वर्तन, ज्याने तुम्हांला बोलाविले त्या याव्हे एलोहिम पासून येत नाही. ९ थोडेसे खमीर कणकेचा गोळा फुगवून टाकतो. १० अदोनाई मध्ये मला तुमच्याविषयी खात्री आहे की, जे मी तुम्हांला शिकविले त्याच्याशिवाय इतर विचार तुम्हीं करणार नाही. परंतु जो तुम्हांला त्रास देत आहे, तो कोणी का असेना ते दंड भोगील. ११ बंधूजनहो, काही जण असा आरोप करतात की, अजूनही सूंतेची गरज आहे. असा उपदेश मी करतो, जर तसे आहे तर अजूनही माझा छळ का होत आहे? आणि जर मी सुंतेच्या आवश्यकतेविषयी उपदेश करीत असतो, तर वधस्तंभाविषयीची तत्वे राहिली नसती. १२ माझी इच्छा आहे की, जे तुम्हांमध्ये अस्थिरता उत्पन्न करतात, त्यांनी सूंते बरोबर स्वतःला छेदून घ्यावे.१३ परंतु स्वतंत्रतेमध्ये राहावे म्हणून तुम्हां बंधूना, याव्हे एलोहिमने बोलावले आहे. मात्र ती स्वतंत्रता देहाला निमित्त होऊ नये, तर प्रीतिने तुम्हीं एकमेकांची सेवा करा. १४ कारण संपूर्ण तोराह् (नियमशास्त्र) चा सारांश एकाच वचनात सामावला आहे.ते सांगते, "जशी आपणांवर तशी तू आपल्या शेजा-यावर प्रीति कर." १५ पण जर तुम्हीं एकमेकांना चावत राहिला, व खाऊन टाकीत असला, तर एकमेकांकडून नाश होऊ नये म्हणून जपा.

१६ पण मी म्हणतो तुम्हीं आत्म्यात चाला, आणि तुम्हीं देहाच्या पापी इच्छा पूर्ण करणार नाही. १७ कारण आपला देह ज्याची इच्छा

करतो, ती देहांविरूद्ध आहेत. परिणाम म्हणून तुम्हांला जे करावयास पाहिजे, ते करता येत नाही. १८ पण जर तुम्हीं आत्म्याकडून चालविले जाता, तर तुम्हीं तोराह (नियमशास्त्रा) अधीन नाही. १९ देहाची कर्मे तर उघड आहेत. ती म्हणजे जारकर्म, अशुद्धता, कामातुरपणा, २० मूर्तिपूजा, चेटके, व्देष, भांडणे, मत्सर, राग, स्वार्थ, हेवेदावे, पक्षभेद, २१ दारूबाजी, रंगेलपणा, अशासारख्या दुस-या सर्व गोष्टी या गोष्टींविषयी मी तुम्हांला पूर्वी सांगितले होते, तसे तुम्हांस आणखी पुन्हा सांगतो की, जे अशी कर्मे करतात, त्यांना याव्हे एलोहिमच्या राज्याचे वतन मिळणारच नाही. २२ पण आत्मा या गोष्टी निर्माण करतो, प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वास, २३ सौम्यता, व आत्मसंयमन अशा गोष्टीविरूद्ध तोराह (नियमशास्त्र) नाही. २४ जे मशीहा येशूवाहचे आहेत, त्यांनी देहस्वभावाला त्यांच्या वासना, व इच्छांसह वधस्तंभावर खिळले आहे. २५ जर आम्हीं आत्म्याने जगतो, तर तो जसा चालवितो, तसे आम्हींसुद्धा त्याच्यामागे चालू या. २६ आम्हीं पोकळ वढाई मारणारे, एकमेकांना चीड आणणारे, एकमेकांचा हेवा करणारे, होऊ नये.

**६**.१ बंधूंनो, कोणी दोषात सापडला तर तुम्हीं जे आध्यात्मिक दृष्टया चालणारे आहात, त्या तुम्हीं त्याला सुधारावे. पण ते सौम्यतेच्या आत्म्याने हे करा, आणि स्वतःकडे लक्ष ठेवा. यासाठी की, तुम्हींही मोहात पडू नये.२ एकमेकांची ओझी वाहा, अशा रितीने तुम्हीं मशीहाचा नियम पूर्ण कराल. ३ कारण जर कोणी मनुष्य आपण काही नसता, आपण काही आहो, अशी कल्पना करतो तर तो स्वतःला फसवतो. ४ तर प्रत्येकाने आपल्या स्वतःच्या कामाची परीक्षा करावी, म्हणजे त्याला दुस-यांच्या संबंधाने नव्हे तर केवळ स्वतः संबंधांने अभिमान बाळगण्यास जागा मिळेल. ५ कारण प्रत्येकाने आपल्या स्वतःची भार स्वतःच वाहिलाच पाहिजे. ६ ज्या कोणाला याव्हे एलोहिमच्या वचनांचे शिक्षण मिळाले आहे, त्याने जो शिक्षण देणा-याला सर्व चांगल्या गोष्टीचा वाटा द्यावा.

७ तुम्हीं फसू नका, याव्हे एलोहिमची उपहास व्हावयाचा नाही. कारण एखादी व्यक्ती जे पेरीते त्याचेच त्याला फळ मिळेल. ८ जो कोणी आपल्या देहस्वभावाचे बीज पेरतो, त्याला देहस्वभावापासून नाशाचे पीक मिळेल. पण जो आत्म्याकरिता बीज पेरतो, त्याला आत्म्यापासून सार्वकालिक जीवनाचे पीक मिळेल. ९ जे चांगले आहे ते करण्याचा आपण कंटाळा करू नये, कारण आपण आळस केला नाही, तर योग्य वेळी आपणांस आपले पीक मिळेल. १० तर मग ज्याप्रमाणे आपणांस संधि मिळेल, तसे सर्व लोकांचे, आणि विशेषतः ज्यांनी सुवार्तेवर विश्वास ठेवला आहे, त्यांच्या घराण्याचे चांगले करू या.

११ पाहा, मी आपल्या हाताने किती मोठया अक्षरांनी हे पत्र तुम्हांला लिहिले आहे. १२ ज्यांना बाह्य देखावा करणे आवडते, ते तुम्हांला सुंता करून घेण्याची सक्ती करतात. परंतु ते अशासाठी की, मशीहाच्या वधस्तंभामुळे त्यांचा छळ होऊ नये. १३ परंतु सुंता करून घेणारेही तोराह (नियमशास्त्र) पाळीत नाहीत, आणि तरीही तुमची सुंता व्हावी असे त्यांना वाटते. यासाठी की, त्यांना तुमच्या देहावरून फुशारकी मारता यावी. १४ आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या वधस्तंभावर खिळलेले, व मी जगाला वधस्तंभावर खिळलेला आहे. १५ कारण सुंता होणे किंवा न होणे काही नाही, तर नवी उत्पत्ति हीच महत्वाची आहे. १६ तर जितके हा नियम पाळतील, तितक्यांवर आणि याव्हे एलोहिमच्या सर्व इस्त्राएलावर शालोम (शांती) व दया असो.

१७ आता येथून पुढे मी एवढेच मागतो की, यापुढे कोणीही मला त्रास देऊ नये. कारण आधीच मी येशूवाह च्या खुणा माझ्या शरीरावर धारण केलेल्या आहेत. १८ बंधूंनो, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाची हेखेद (कृपा) तुमच्या रूहव्या बरोबर असो आमेन.

............... समाप्ती ...............

# .प्रेषित पौलाने इफिसकरांच्या मंडळीला लिहिलेले पत्र.

## .प्रस्तावना.

हे पत्र प्रेषित पौलाने लिहीलेले स्पष्ट दिसून येते.ह्या पत्राचा लेखन काळ इसवी सन ६० ते ६१ च्या दरम्यान चा आहे. नवीन करारातील पत्रांमध्ये हे पत्र महान अर्थपूर्ण, सखोल, ज्ञान संपन्न, असे असल्याचे सर्वमान्य आहे. हे पत्र प्रत्येक काळातील, प्रत्येक ठिकाणातील विश्वासणा-यांकरिता अनमोल ठेव आहे. अलीकडे मात्र उदार विचारांच्या टीकाकारांनी नसते प्रश्न उपस्थित करून, या पत्राचा लेखक पौलच आहे का? अशी शंका उपस्थित केली आहे.पत्राची शैली, शब्दप्रयोग, आणि त्यातील एलोहिमचे ज्ञान, या अंतर्गत मुद्द्यांवरच या शंका आधारित आहेत. हा युक्तिवाद असल्याचे पहावयास मिळतात. त्यातून कोणताही निश्चित निष्कर्ष निघत नाही. परंतु प्राचीन काळातील मंडळयांनी सर्वत्र एकमुखाने मान्य केले, व त्याचे त्यांनी जतन केले. हे पत्र पौलाने लिहिले नाही असे मानले, तर हे कोणीतरी पौला एवढयाच तोलामोलाच्या व्यक्तीने लिहिले, असे म्हणणे भाग आहे. आणि पहिल्या दोन शतकांच्या काळामध्ये असा दुसरा कोणी समर्थ लेखक असल्याचा काहीही पुरावा उपलब्ध होऊ शकत नाही. पौल हा रोम तेथे कैद असताना, त्याने हे पत्र लिहिलेले होते. हे पत्र तुखिकाच्या हाती इफिस येथे पाठविले. कलस्सै मंडळीला, व फिलोमोनला लिहिलेली पत्रही त्याच वेळी पाठविली गेली. हे पत्र लिहिण्याचे कारण, अथवा प्रसंग, या पत्रावरून स्पष्ट होत नाही. मशीहाशी विश्वासाने संयुक्त असणा-या विश्वासणा-यांची, अपार समृद्धी या पत्रात स्पष्टपणे दाखविली आहे. आमच्या तारणा-या येशूवाह मशीहाचे गौरवी वैभव येथे दाखविले आहे. आणि मंडळी म्हणजे मशीहाचे शरीर, हे पुन्हा एकवार जोरदारपणे स्पष्ट केले आहे.

* * * * * * * * * * * * * * *

## .प्रेषित पौलाने इफिस मंडळीला लिहिलेले पत्र.

१.१ यावे्ह एलोहिमच्या इच्छेने झालेला येशूवाह मशीहाचा ऐवेद (सेवक) पौल याजकडून इफिस येथे जे यावे्ह एलोहिमचे लोक आहेत त्यांना व येशूवाह मशीहा वर विश्वास ठेवणा-यांना २ यावे्ह एलोहिम आपला अव्वा आणि आपला अदोनाई येशूवाह मशीहा यांजकडून हेख्न (कृपा) व शालोम (शांति) असो.

३ आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाचा, यावे्ह एलोहिम व अव्वा धन्यवादित असो. त्याने आकाशाच्या राज्यातील प्रत्येक आध्यात्मिक आशिर्वाद देऊन, आम्हांला मशीहा मध्ये आशिर्वादीत केले आहे. ४ मशीहा मध्ये, यावे्ह एलोहिमने आम्हांला जग अस्तित्वात आणण्या पूर्वी, त्याच्या आमच्यावरील प्रीतिमुळे त्याच्यासमोर आम्हीं निर्दोष व पवित्र असावे, म्हणून निवडले आहे. ५ त्याच्या कृपायुक्त हेतू नुसार येशूवाह मशीहा व्दारे, त्याने दत्तक होण्यासाठी आमची नेमणूक केली. ६ त्याने हे त्याच्या गौरवी कृपेची स्तुति व्हावी म्हणून केले, ही हेख्न (कृपा) त्याने त्याच्या प्रिय बेन (मुला) व्दारे आम्हांला फुकट दिली. ७ त्याच्यामध्ये मशीहाच्या रक्ताने आम्हीं स्वतंत्र केले गेलो. त्याच्या कृपेच्या समृद्धीने आम्हांला आमच्या पापांची क्षमा मिळाली आहे. ८ त्याची कृपा आपले ज्ञान आणि समजबुद्धी वाढविण्यास कारणीभूत ठरली आहे. ९ मशीहा मध्ये आपणांला दाखविण्याच्या, त्याच्या अनुग्रहाप्रमाणे त्याच्या इच्छेचे रहस्य आपल्याला कळविले. १० पृथ्वीवरील आणि आकाशातील सर्व गोष्टी मशीहा मध्ये एकत्र आणण्यासाठी अशी ती योजना काळाच्या पूर्णतेसाठी होती. ११ मशीहा मध्ये आम्हीं यावे्ह एलोहिमचे लोक म्हणून निवडले गेलो होतो. यासाठी आम्हीं अगोदरच निवडले गेलो होतो. यावे्ह एलोहिमचा हेतू लक्षात घेऊन, जो सर्व गोष्टी त्याच्या इच्छेच्या हेतूनुसार पूर्णत्वास नेतो. १२ यासाठी की, ज्या आम्हीं मशीहा वर अगोदरच आशा ठेवली होती. त्या आम्हांकडून त्याच्या गौरवाची स्तुति व्हावी. १३ मशीहा व्दारे तुम्हीं सुद्धा, जेंव्हा सत्याचे वचन, म्हणजे तुमच्या तारणाची सुवार्ता ऐकली, आणि मशीहा वर विश्वास ठेवला. तेंव्हा क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) च्या अभिवचनाचा यावे्ह एलोहिमने तुम्हांवर शिक्का मारला. १४ तोपर्यंत यावे्ह एलोहिम आम्हीं जे त्याचे आहोत, त्यांना पूर्ण आणि शेवटचे स्वातंत्र्य देईपर्यंत, क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) हा आमच्या वतनाच्या हिश्शाचा विसार आहे. आणि त्यामुळे त्याच्या गौरवाची स्तुति होईल.

१५ यासाठी, जेंव्हा पासून मी तुमच्या अदोनाई येशूवाह वरील विश्वासाविषयी ऐकले, आणि याव्हे एलोहिमच्या लोकांबद्दलच्या तुमच्या अहेद (प्रीति) विषयी ऐकले. १६ तेंव्हापासून तुमच्यासाठी, याव्हे एलोहिमचे उपकार मानण्याचे मी थांबविले नाही. १७ मी प्रार्थना करतो की, आमच्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या, याव्हे एलोहिम गौरवी अव्वा तुम्हांला ज्ञान व प्रकटीकरणाचे आध्यात्मिक सामर्थ्य जे अव्वा विषयी ज्ञान तुम्हांला पुरवील ते देवो.

१८ मी असे सांगतो की, तुमच्या आत्म्याचे डोळे प्रकाशित होवोत. यासाठी की, तुम्हांला तुमच्या पाचारणाची आशा व पवित्र जणांमध्ये त्याच्या वतनाच्या वैभवाची श्रीमंती किती आहे, हे कळावे. १९ आणि आम्हांला विश्वासणा-यांसाठी त्याचे अतुलनीय सामर्थ्य किती महान आहे. जणू काय त्याच्या प्रचंड सामर्थ्याचा तो सराव आहे. २० जो तो मशीहा मध्ये करतो जेंव्हा मशीहाला मरणातून उठविले, आणि आकाशाच्या राज्यात याव्हे एलोहिमच्या उजव्या हाताला बसविले. २१ याव्हे एलोहिमने, मशीहाला प्रत्येक अधिपती अधिकारी, सामर्थ्य अदोनाई पण, आणि प्रत्येक सामर्थ्याचे नाव, जे या युगातच नव्हे, तर येणा-या युगातही दिले जाईल, त्या सर्वापेक्षा उंच ठिकाणी ठेवले. २२ आणि याव्हे एलोहिमने, मशीहाला मंडळीचा सर्वोच्च प्रमुख केले. २३ मंडळी मशीहाचे शरीर आहे, जी पूर्णता त्याने सर्व गोष्टींमध्ये, सर्व रीतीने भरली आहे ती पूर्णता तो मंडळीला देतो.

२.१ पूर्वी तुम्हीं आपले अपराध, आणि पातके यामुळे आध्यात्मिक रीतीने मेला होता. २ ज्यामध्ये तुम्हीं पूर्वी जगत होता. जगातील दुष्ट मार्गाचे अनुकरण करीत होता, आणि आपल्याला न दिसणारे आध्यात्मिक सामर्थ्य ज्याच्याकडे आहे, त्या सत्ताधीशाचे अनुकरण करीत होता. जे याव्हे एलोहिमच्या आज्ञा पाळीत नाहीत, त्यांच्या जीवनामध्ये हाच आत्मा कार्य करीत आहे. ३ एके काळी, आम्हीं सुद्धा त्यांच्यामध्ये आमच्या मानवी देहाच्या दुष्ट इच्छांचे समाधान करीत होतो, आणि आमच्या मानवी मनाच्या दुष्ट वासनांची पूर्तता करीत होतो. तसेच जगातील इतरांप्रमाणे, आम्हीं त्याच्या क्रोधाची मुले झालो होतो.४ पण याव्हे एलोहिम खूप दयाळू आहे.त्याच्या महान प्रीतिने त्याने आमच्यावर प्रीति केली. ५ आम्हीं आध्यात्मिक दुष्टया आमच्या पापांमध्ये मेलेले असताना, त्याने आम्हांला मशीहा बरोबर जीवन दिले.तुमचे तारण याव्हे एलोहिमच्या कृपेने झाले आहे.६ याव्हे एलोहिमने आम्हांला मशीहा बरोबर नविन जीवनात उठविले, आणि आकाशाच्या राज्यात त्याच्याबरोबर, त्याच्या आसनावर बसविले. कारण आम्हीं मशीहा येशूवाह मध्ये आहोत. ७ याव्हे एलोहिमने हे केले यासाठी की, येणा-या युगात त्याच्या अतुलनीय कृपेची संपत्ती दाखविता यावी. आणि मशीहा येशूवाह मध्ये आम्हांविषयीची ममता व्यक्त करावी. ८ कारण याव्हे एलोहिमच्या कृपेने विश्वासाच्या व्दारे तुमचे तारण झाले, आणि ते तुमच्याकडून झाले असे नाही, तर ते याव्हे एलोहिम पासूनचे दान असे आहे.९ आणि एखादा काही काम करतो त्याचा परिणाम म्हणून नव्हे, यासाठी कोणी बढाई मारू नये. १० कारण आम्हीं याव्हे एलोहिमच्या हाताने घडविलेले आहोत. मशीहा मध्ये आम्हांला चांगल्या कामासाठी निर्माण केले. जे याव्हे एलोहिमने अगोदरच तयार केले होते. यासाठी की, त्यामध्ये चालणे आम्हांला शक्य व्हावे.

११ म्हणून आठवा की, एके काळी तुम्हीं यहूदीतर म्हणून जन्माला होता. आणि विदेश्यांना सुंता न झालेले, असे ज्यांची सुंता झालेली होती, ते यहूदी लोक म्हणत होते. १२ आठवा की, त्यावेळी तुम्हीं मशीहा विरहित याव्हे एलोहिमचे लोक जे इस्त्राएल, त्या समाजातून तुम्हांला बहिष्कृत केले होते. आणि याव्हे एलोहिमच्या अभिवचनाशी निगडित अशा कराराशी तुम्हीं परके असे होता. तुम्हीं या जगात आशेशिवाय, आणि याव्हे एलोहिम शिवाय जगला.१३ पण आता मशीहा मध्ये जे तुम्हीं एके काळी याव्हे एलोहिम पासून दूर होता. ते तुम्हीं मशीहाच्या रक्ताने त्याच्याजवळ आणलेले आहात. १४ कारण त्याच्याव्दारे आम्हांला शांतीचा लाभ झाला आहे. त्याने दोन्ही गोष्टी एक केल्या, आणि आपल्या शरीराने त्याने वैराचा दुभागणा-या भिंतीचा अडथळा पाडून टाकला. १५ त्याने तोराह (नियमशास्त्र) त्याच्या नीतिनियमांसहित रद्द केले यासाठी की, स्वतःमध्ये दोघांचा एक मानव नविन निर्माण करून शांति करणे, त्याला शक्य व्हावे. १६ आणि त्याने वधस्तंभावर वैर जिवे मारून, त्याच्याव्दारे एका शरीरात दोघांचा याव्हे एलोहिम बरोबर समेट करावा.१७ म्हणून तो आला आणि त्याने जे तुम्हीं याव्हे एलोहिम पासून दूर होता, व जे तुम्हीं याव्हे एलोहिम जवळ होता. त्या तुम्हांला शांतीची सुवार्ता सांगितली. १८ कारण त्याच्या व्दारे आम्हां दोघांचा एका आत्म्याच्या व्दारे याव्हे एलोहिम जवळ प्रवेश

होतो. १९ तर यावरून तुम्हीं यापुढे परके व परदेशीय नाही, तर तुम्हीं पवित्रांचे सोबतीचे नागरीक, आणि याव्हे एलोहिमच्या घराण्यातले लोक आहात. २० प्रेषित व नव्वीईम (संदेष्टे) यांचा जो पाया, त्यावर तुम्हीं रचलेले आहा. मशीहा येशूवाह स्वतः कोप-याचा मुख्य दगड आहे. २१ त्याच्यामध्ये सगळी रचना नीट जुळलेली असता, अदोनाई मध्ये पवित्रस्थान म्हणून वाढत राहते. २२ त्याच्यामध्ये तुम्हीही याव्हे एलोहिमच्या वस्तीसाठी आत्म्यात एकत्र रचले जात आहा.

**३**.१ या कारणासाठी मी पौल, तुम्हां विदेशी लोकांसाठी मशीहा येशूवाहचा कैदी आहे. २ याव्हे एलोहिमची कृपा, तुमच्यापर्यंत पोचविण्याची व्यवस्था करण्याचे काम माझ्यावर सोपवल्याचे तुम्हीं जाणता. ३ त्याने प्रकटीकरणातून जे रहस्य कळवले, त्याप्रमाणे मी अगोदर थोडक्यात लिहिले. ४ जर तुम्हीं ती वाचाल, तर तुम्हांला माझ्या मशीहाच्या रहस्या विषयीचे पूर्ण ज्ञान शक्य होईल. ५ ते रहस्य जसे आता त्याच्या पवित्र प्रेषितांना व नव्वीईम ला (संदेष्टांना) रूहुव्वा त (आत्म्यात) प्रकट झाले आहे. तसे ते इतर पिढयांमध्ये मनुष्यांच्या संतानांस कळविले नव्हते. ६ हे रहस्य ते आहे की, सुवार्तेव्दारे विदेशी लोक, हे यहूदी लोकांबरोबर सहवारसदार आहेत. ते एकाच शरीराचे अवयव आहेत, आणि मशीहा येशूवाह मध्ये, याव्हे एलोहिमने दिलेल्या अभिवचनामध्ये सहभागीदार आहेत.

७ याव्हे एलोहिम च्या प्रभावी कृतीच्या सामर्थ्याचा परिणाम म्हणून, जे कृपेने दान मला देण्यात आले होते, त्यामुळे मी सुवार्ता सांगण्याची जबाबदारी दिलेला सेवक झालो. ८ सर्व पवित्रांतील जो लहानांपेक्षा लहान त्या मला ही कृपा देण्यात आली की, मी मशीहाच्या अगाध संपत्तीची सुवार्ता राष्ट्रांच्या लोकांमध्ये सांगावी. ९ आणि येशूवाह मशीहाने सर्व काही अस्तित्वात आणले, त्या याव्हे एलोहिमच्या ठायी जे रहस्य युगांपासून गुप्त राहिले होते. त्याची व्यवस्था काय हे प्रकाशित करावे. १० अशासाठी की, याव्हे एलोहिमचे बहुत प्रकारचे ज्ञान आकाशातल्या सत्तांस, व अधिकारांस, मंडळीकडून आता कळावे. ११ याव्हे एलोहिमच्या अनंतकाळच्या उद्देशाला अनुसरून, जे त्याने आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा याच्यामध्ये पूर्णत्वास नेले. १२ त्या मशीहा मध्ये आम्हांला याव्हे एलोहिमच्या समक्षतेत, आमच्या मशीहा वरील विश्वासामुळे धैर्य, आणि पूर्ण विश्वास आहे. १३ म्हणून मी असे सांगतो की, तुम्हांसाठी जी माझी संकटे त्यामुळे तुम्हीं खचू नये, ती तुमचे गौरव अशी आहेत.

१४ याकरिता मी आपल्या येशूवाह मशीहाच्या अव्वा समोर, आपले गुडघे टेकतो. १५ त्याच्यापासून आकाशातल्या व पृथ्वीवरल्या प्रत्येक घराण्याला नाव मिळाले आहे.१६ मी प्रार्थना करतो की, त्याने आपल्या वैभवी संपत्तीच्या प्रमाणाने तुम्हांस असे कृपादान द्यावे की, तुम्हीं त्याच्या आत्म्याव्दारे अंतर्यामीच्या तुमच्यात सामर्थ्याने बळकट व्हावे.१७ आणि विश्वासाव्दारे मशीहा तुमच्या आत्म्यात राहावा, व तुमची मुळे चांगले रूजलेली, व प्रीतित मूळावलेली असावी. १८ यासाठी की, सर्व पवित्रजणांनी मशीहा च्या प्रीतिची रूंदी, लांबी, उंची, आणि खोली, किती आहे हे समजुन घेण्यास तुम्हांला सामर्थ्य प्राप्त व्हावे. १९ आणि मशीहाची प्रीति जी जाणण्याच्या पलीकडे आहे. ती जाणायला सामर्थ्य व्हावे असे की, तुम्हीं याव्हे एलोहिमच्या सर्व पूर्णतेपर्यंत परिपूर्ण व्हावे.२० आणि आता याव्हे एलोहिम जो आपल्या सामर्थ्यानुसार आम्हांमध्ये कार्य करतो, इतकेच नव्हे तर आम्हीं ज्याच्या मागणीपेक्षा, किंवा अपेक्षेपेक्षा अधिक कार्य करण्यास तो समर्थ्य आहे.२१ याव्हे एलोहिमला मंडळीमध्ये, आणि मशीहा येशूवाह मध्ये, सर्व पिढयांनपिढयासाठी सदासर्वकाळ गौरव असो.

**४**.१ म्हणून मी जो अदोनाई मध्ये बंदिवान तो तुम्हांला विनंती करतो, याव्हे एलोहिम कडून तुम्हांला जे पाचारण झालेले आहे, त्याला शोभेल अशा प्रकारे तुम्हीं चालावे. २ नेहमी नम्रता सौम्यता दाखवा, आणि सहनशीलतेने एकमेकांबरोबर प्रीतिने राहा.३ शांतीच्या बंधनाने आत्म्याचे ऐक्य राखण्यासाठी, प्रत्येक गोष्टीत प्रयत्न करा. ४ एक शरीर, व एकच रूहुव्वा (आत्मा) आहे. ज्याप्रमाणे तुम्हांलाही एकाच आशेत सहभागी होण्यास बोलाविले होते. ५ एक अदोनाई, एक विश्वास, एक बाप्तिस्मा, ६ एक याव्हे एलोहिम, आणि अव्वा जो सर्वांचा मालक आहे. जो प्रत्येक गोष्टीव्दारे कार्य करतो, आणि जो प्रत्येकात आहे. ७ मशीहा च्या दानाच्या मोजमापा प्रमाणे, आपणा प्रत्येकाला कृपेचे विशेष दान दिले आहे. ८ यासाठीच शास्त्रलेख असे म्हणते, "जेंव्हा तो

उच्चस्थानी चढला, तेंव्हा त्याने युद्धकैद्यांस आपणांबरोबर नेले, आणि त्याने लोकांना देणग्या दिल्या."

९ तर तो चढला, म्हणजे पहिल्याने पृथ्वीच्या खालील भागांमध्ये तो उतरला, या खेरीज दुसरे काय आहे? १० जो उतरला तोच आपण सर्व काही भरावे, म्हणून सर्व आकाशांच्या फारच वरतीही चढला. ११ आणि त्याने कोणी प्रेषित, व कोणी नव्वीईम (संदेष्टे), व कोणी सुवार्तिक, व कोणी पाळक, व कोणी राब्बी (शिक्षक) असे नेमून दिले.१२ सेवेच्या कामासाठी पवित्रांची पूर्णता करण्यास मशीहा च्या शरीराच्या रचनेसाठी, १३ सर्व आपण विश्वास व याव्हे एलोहिमच्या बेन ची ओळख यांच्या ऐक्यात येऊन, पूर्ण मनुष्य पणात मशीहाच्या पूर्णतेच्या परिमाणास पोहचू, तो पर्यंत त्याने ते नेमून दिले. १४ यासाठी की, आपण या पुढे तान्ही बाळे अशी असू नये. म्हणजे शिकवणीच्या प्रत्येक वा-याने, माणसाच्या धूर्तपणाने फसविण्याच्या युक्तिचातुर्याने, हेलकावलेली व फिरवलेली अशी असू नये. १५ परंतु आपण प्रीतिने खरे बोलत असता, जो मस्तक आहे, त्याच्यात म्हणजे मशीहात सर्व प्रकारे वाढावे. १६ त्याच्यापासून सगळे शरीर त्याचा एकेक भाग जसजसा आपापल्या परिमाणाप्रमाणे कार्य करतो, तसतसे प्रत्येक सांध्याचा पुरवठा पावल्याने, ठीक जुळलेले व जमलेले असता, प्रीतित आपली रचना होण्यास शरीराची वृद्धी करते.

१७ म्हणून मी हे म्हणतो, व अदोनाई च्या नावात सावध करतो, ज्याप्रमाणे विदेशी त्यांच्या मनाच्या व्यर्थतेप्रमाणे चालतात, तसे चालू नका. १८ त्यांची आत्म्ये अंधकारमय अशा स्थितीत आहेत, आणि याव्हे एलोहिम पासून जे जीवन येते त्यापासून ते वेगळे झाले आहेत. कारण ते अजाण आहेत, आणि त्यांची आत्मे कठीण झाली आहेत. १९ त्यांना आता कशाचीच लाज वाटत नाही, व त्यांनी स्वतःला कामातुरपणाला वाहून घेतले आहे, व प्रत्येक प्रकारच्या अशुद्धतेच्या सवयीला वाहून घेतले आहे. २० परंतु तुम्हीं अशा प्रकारे मशीहा कडून शिकला नाही, आणि २१ मला यात काही शंका नाही की, तुम्हीं त्याच्याविषयी ऐकले आहे. आणि येशूवाह मध्ये जे सत्य आहे, त्याप्रमाणे त्याचे अनुयायी म्हणून ते सत्य तुम्हीं शिकला असाल. २२ तुमच्या पूर्वीच्या जीवनाविषयी, तुम्हांला तुमच्या जुन्या मनुष्यापासून सुटका करून घेण्यास शिकविले होते. जो मनुष्य फसवणुकीच्या इच्छेने अशुद्ध झाला आहे. २३ यासाठी तुम्हीं अंतःकरणामध्ये, व आत्म्यामध्ये नवे केले जावे, आणि २४ नवा मनुष्य तुम्हीं धारण करावा. जो याव्हे एलोहिम प्रमाणे निर्माण केलेला आहे. २५ म्हणून लबाडू करू नका, प्रत्येक व्यक्तीने त्याच्याबरोबरच्या व्यक्तीशी खरे तेच बोलावे. २६ तुम्हीं रागवा, पण पाप करू नका. सूर्यास्तापूर्वी तुम्हीं तुमचा राग सोडून द्यावा. २७ तुमचा पराभव करण्याची सैतानाला संधी देऊ नका. २८ जो कोणी चोरी करीत असेल, तर त्याने यापुढे चोरी करू नये. उलट त्याने आपल्या हातांनी काम करावे. यासाठी की, जो कोणी गरजू असेल, त्याला त्यातून वाटा देण्यासाठी त्याच्याकडे काही तरी असावे.२९ तुमच्या तोंडून कोणतीही वाईट भाषा न निघो, तर आध्यात्मिक सामर्थ्यासाठी ज्याची लोकांना गरज आहे, ते चांगले मात्र निघो. यासाठी की, जे ऐकतील त्यांना आशिर्वाद प्राप्त होईल. ३० आणि याव्हे एलोहिम च्या क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) ला दुःखी करू नका. कारण तुम्हीं रूहुव्वा (आत्म्या) बरोबर याव्हे एलोहिमची संपत्ती म्हणून, तारणाच्या दिवसासाठी शिक्का मारलेले असे आहात. ३१ सर्व प्रकारची कुटीलपणा, संताप, राग, ओरडणे, याव्हे एलोहिमची निंदा, ही सर्व प्रकारच्या दुष्टाईबरोबर तुम्हांमधून दूर करावी.३२ एकमेकांबरोबर दयाळू आणि कनवाळू व्हा. आणि याव्हे एलोहिमने मशीहामध्ये तुम्हांला क्षमा केली, तशी तुम्हीं एकमेकांची क्षमा करा.

**५**.१ यास्तव तुम्हीं प्रिय मुलासारखे, याव्हे एलोहिमचे अनुकरण करणारे व्हा. २ आणि ज्याप्रमाणे मशीहाने ही आम्हांवर अहेद (प्रीति) केली, व याव्हे एलोहिमला सुगंधाचा सुवास असे आम्हांसाठी आपणाला अर्पण व यज्ञ म्हणून दिले, त्या प्रमाणे, तुम्हीं प्रीतित चाला.

३ आणि पवित्रांस शोभते त्याप्रमाणे जारकर्म, व सर्व अशुद्धपण, किंवा लोभ, यांचा तुम्हांमध्ये उच्चार न होवो. ४ आणि ओंगळपणा, किंवा मूर्खपणाच्या गोष्टी, किंवा टवाळी, जी उचित नाहीत त्यांच्याही उच्चार न होवो. तर त्याऐवजी उपकारस्तुति होवो. ५ कारण तुम्हांला हे माहीत असावे की, जो मनुष्य जारकर्मी, अशुद्ध, किंवा अधाशी, जे मूर्तिपूजेसारखेच आहे. त्या मनुष्याला याव्हे एलोहिमच्या, आणि मशीहाच्या राज्यात वतन मिळणार नाही. ६ पोकळ भाषणाने कोणी तुम्हांला फसवू नये. कारण या कारणांमुळे

जे आज्ञा मोडतात, त्यांच्यावर याव्हे एलोहिमचा क्रोध येणार आहे. ७ म्हणून त्यांचे भागीदार होऊ नका. ८ मी हे सांगतो, कारण एके काळी तुम्हीं पूर्णपणे अंधारात होता. पण आता तुम्हीं अदोनाईचे अनुयायी म्हणून पूर्ण प्रकाशात आहात, प्रकाशात चालणा-या लेकरांसारखे व्हा. ९ कारण प्रकाशाची फळे प्रत्येक चांगुलपणात, नीतीमत्वात, आणि सत्यात दिसून येतात. १० नेहमी अदोनाईला कशाने संतोष होईल, हे शोधण्याचा प्रयत्न करा. ११ आणि अंधाराची जी निष्फळ कामे आहेत, त्यांचे भागीदार होऊ नका, तर उलट ती उघडकीस आणा. १२ कारण ज्या गुप्त गोष्टी त्यांनी केल्या आहेत, त्याविषयी बोलणेही लज्जास्पद आहे. १३ पण जेंव्हा सर्व काही प्रकाशाव्दारे उघड होते, तेंव्हा प्रत्येक गोष्ट दिसते. १४ आणि जी प्रत्येक गोष्ट दिसते, ती प्रकाश आहे. म्हणूनच आम्हीं असे म्हणतो, "हे निद्रिस्ता जागा हो व मेलेल्यांतून ऊठ. म्हणजे मशीहा तुझ्यावर प्रकाश पाडील." १५ म्हणून तुम्हीं कसे जगता, याविषयी सावध असा. मूर्ख लोकांसारखे होऊ नका, तर शहाण्या लोकांसारखे व्हा. १६ चांगल्या संधीचा उपयोग करून घेत जा, कारण दिवस वाईट आहे. १७ म्हणून मूर्खसारखे वागू नका, तर उलट याव्हे एलोहिमची इच्छा काय आहे, ते जाणून घ्या. १८ द्राक्षारस पिऊन झिंगल्यासारखे राहू नका, त्यामुळे मनुष्य सर्वच बाबतीत बेताल होतो. उलट आत्म्याने पूर्ण भरलेले व्हा. १९ स्तोत्रे, गीते, आणि आध्यात्मिक गीतांनी, एकमेकांबरोबर सुसंवाद साधा, गाणी गा. आणि आपल्या आत्म्यात अदोनाई साठी गायन गा. २० आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा च्या नावात याव्हे एलोहिम जो आपला अव्वा आहे, त्याचे प्रत्येक गोष्टीवद्दल नेहमी उपकार माना.

२१ मशीहाच्या भयात एकमेकांच्या अधीन असा. २२ पत्नीनो, जशा तुम्हीं अदोनाईच्या अधीन होता, तशा आपल्या पतीच्या अधीन असा. २३ कारण मशीहा जसा मंडळीचे मस्तक आहे, तसा पती पत्नीचे मस्तक आहे. मशीहा स्वतःच शरीराचा तारणारा आहे. २४ पण ज्याप्रमाणे मंडळी मशीहाच्या अधीन आहे, त्याचप्रमाणे पत्नीने प्रत्येक बाबतीत आपल्या पतीच्या अधीन असावे. २५ पतीनो ज्याप्रमाणे मशीहाने मंडळीवर प्रीति केली, तशी तुम्हीं आपल्या पत्नीवर प्रीति करावी. त्याने मंडळीवर प्रीति केली, आणि आपणाला तिच्याकरिता अर्पूण दिले. २६ यासाठी की, त्याने तिला याव्हे एलोहिमच्या वचनरूपी पाण्याने धुऊन निर्मळ करावे २७ याकरिता की, त्याने ती मंडळी गौरवी अशी आपणाला सादर करावी, म्हणजे तिला डाग, किंवा सुरकुती, किंवा अशासारखे काही नसावे. तर ती पवित्र, आणि निर्दोष अशी असावी.

२८ याप्रकारे पतींनो, तुम्हीं आपल्या पत्नीवर अशीच प्रीति करावी, जसे ते स्वतःच्या शरीरावर प्रीति करताता. जो कोणी त्याच्या स्वतःच्या प्त्नीवर प्रीति करतो, तो स्वतःवर प्रीति करतो. २९ कारण आतापर्यंत कोणीही आपल्या शरीराचा व्देष केला नाही. उलट तो त्याचे पोषण करतो, त्याची काळजी घेतो. ज्याप्रमाणे, मशीहा मंडळीचे पोषण करतो, व काळजी घेतो. ३० कारण आपण त्याच्या शरीराचे अवयव आहोत. ३१ शास्त्रलेख सांगते त्याप्रमाणे, "म्हणून पुरूष आपल्या आई वडीलांना सोडून तो आपल्या पत्नीशी जडून राहील, आणि ती दोघे एकदेह होतील." ३२ हे रहस्य सत्य, व फार महत्वाचे आहे. आणि मी हे सांगत आहे की, ते मशीहा व मंडळीला लागू पडते. ३३ तरीही तुमच्यातील प्रत्येकाने त्याच्या स्वतःच्या पत्नीवर प्रीति केली पाहिजे, व पत्नीनेही देखील पतीचा मान राखीला पाहिजे.

**६.**१ मुलांनो, अदोनाई शी प्रामाणिक राहून, आपल्या आईवडिलांच्या आज्ञा पाळा, कारण ते योग्य आहे. २ तुझ्या वडिलाचा व आईचा मान राखा. ३ अभिवचना बरोबरची ही पहिली आज्ञा असल्याने, तुझ्यासाठी सर्व काही चांगले असावे, आणि पृथ्वीवर तुला दीर्घ आयुष्य लाभावे. ४ आणि वडिलांनो, आपल्या मुलांना राग येईल असे करू नका. उलट याव्हे एलोहिम पासून जी शिष्ट व शिक्षण येते, त्यात त्यांना वाढवा.

५ दासांनो, तुम्हीं आपल्या आत्म्याच्या निष्कपटपणाने असे मशीहाच्या आज्ञेत, तसे भीत आणि थरथर कापत, जे देहानुसार तुमचे पृथ्वीवरील मालक आहेत, त्यांच्या आज्ञेत राहा. ६ मनुष्यांस संतोषविणा-यांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नव्हे, तर मनापासून याव्हे एलोहिमची इच्छा साधणा-या मशीहाच्या दासांसारखे आज्ञांकित असा. ७ तुम्हीं ती मानसाची चाकरी नव्हे, तर अदोनाईची चाकरी समजून सदिच्छेने करा. ८ तुम्हीं हे जाणता की, प्रत्येकजण जे चांगले करतो, तेच त्याला अदोनाई पासून मिळेल. मग दास असो,

किंवा स्वतंत्र असो. ९ आणि धन्याने तुम्हीं त्याचप्रकारे त्यांच्यापाशी वर्तन करा, व धमकावणे सोडा तुम्हीं जाणता की, जो त्यांचा व तुमचाही धनी आहे, तो आकाशांमध्ये आहे. आणि त्याच्यापाशी पक्षपात नाही.

१० शेवटी माझ्या बंधूंनो, अदोनाई मध्ये तुम्हीं त्याच्या महान शक्तीसामर्थ्याने सशक्त व्हा. ११ सैतानाच्या कपटयुक्तीविरूद्ध उभे राहण्यास तुम्हीं शक्तीमान व्हावे, म्हणून याव्हे एलोहिमची संपूर्ण शस्त्रसामग्री अंगावर घ्या. १२ कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नाही, तर सत्ताधीशांविरूद्ध, अधिका-याविरूद्ध, या अंधकारातील जगाच्या सत्ताधा-यांशी, आणि आकाशातील दुष्ट आत्म्यांविरूद्ध आहे. १३ म्हणून याव्हे एलोहिमने दिलेली संपूर्ण शस्त्रसामगी घ्या, म्हणजे तुम्हांला सर्व ते केल्यावर टिकून राहता येईल, व वाईट दिवस आल्यावर तुम्हांला प्रतिकार करता येईल. १४ तर सत्याने आपली कंबर बांधून, आणि न्यायीपणाचे उरस्त्राण धारण करून उभे राहा. १५ आणि शुभवर्तमान, व शांती यांची घोषणा करण्यासाठी सज्जतेच्या वहाणा पायी घाला. १६ या सर्वांवर ज्या विश्वासरूपी ढालीने, त्या दुष्टांचे सर्व जळते बाण तुम्हांला विझवता येतील, ती धरून उभे राहा. १७ आणि तारणाचे शिरस्त्राण घ्या. आणि आत्म्याची तलवार जो याव्हे एलोहिमची संदेश वचने आहे, ते घ्या. १८ प्रत्येक प्रसंगी सर्व प्रकारे प्रार्थनापूर्वक विनंती करून, आत्म्याने प्रार्थना करा. आणि याविषयी सर्व एकाग्रतेने, व सर्व पवित्रांच्यासाठी विनंती करीत जागे राहा.

१९ आणि माझ्यासाठी प्रार्थना करीत राहा. की, मी शुभवर्तमानाचे रहस्य प्रशस्तपणाने कळवायला माझे तोंड उघडीत असता, मला बोलण्याचे सामर्थ्य मिळावे. २० त्याकरिता मी बेडीत पडलेला वकील आहे. तर यात जसे मी बोलले पाहिजे, तसे मी धैर्याने बोलावे, म्हणून प्रार्थना करा.

२१ आणखी माझ्याविषयीच्या गोष्टी आणि मी काय करतो, हे तुम्हींही जाणावे. म्हणून प्रिय भाऊ, व अदोनाईचा विश्वासू सेवक तुखिक तुम्हांला सर्व कळवील. २२ यासाठीच मी त्याला तुमच्याकडे पाठवले आहे की, आमच्याविषयीच्या गोष्टी तुम्हीं जाणाव्या, आणि त्याने तुमच्या आत्म्याचे समाधान करावे.

२३ याव्हे एलोहिम अव्वा आणि अदोनाई येशूवाह मशीहा यांच्यापासून बंधु बहिणींना शालोम (शांती), व विश्वासासहित अहेद (प्रीति) असो. २४ आपला अदोनाई येशूवाह मशीहा याच्यावर अविनाशी अहेद (प्रीति) करतात त्या सर्वांबरोबर याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा) असो. आमेन.

............... समाप्ती ...............

## .प्रेषित पौलाने लिहिलेले फिलिप्पैकरांस पत्र.

### .प्रस्तावना.

हे पत्र प्रेषित पौलाने फिलिप्पै मंडळीला लिहिलेले होते. ह्या पत्राचा लेखन काळ इसवी सन ६0 ते ६२ च्या दरम्यानचा आहे.पौलाच्या सर्व पत्रात हेच पत्र अधिक जिव्हाळयाने भरलेले आहे. मासेदोनियतील फिलिप्पै येथे पौलाने मंडळी स्थापन केली होती. युरोपमधील हीच पहिली मंडळी होती. विदेशी लोकांत व परराष्ट्रांत सुवार्तेचा प्रसार मोठया प्रमाणावर येथेच झालेला होता.या ठिकाणी पौलाने जी पहिली व्यक्ती मशीहा कडे आणली होती, ती एक स्त्री होती. तिचे नांव लुदिया होते. ती जांभळया रंगाच्या कपडयांचा व्यापार करीत होती. ती व तिच्या घरच्या लोकांचाही बाप्तीस्मा झाला, व तिचे घर हेच नव्या मंडळीचे केंद्रस्थान बनले. तुरूंगाधिका-यांचा पालट व त्यासंबंधातील चमत्काराची अद्‌भुत घटना, ह्या फिलिप्पैमध्येच घडलेली होती. ह्या मंडळीचे व पौलाचे अधिक स्नेहसंबंध जुळले होते. पौलाला ह्या मंडळीने अनेक वेळा वर्गणी जमा करून, कार्यासाठी मदत केलेली होती. तो तुरूंगात असताना देखील ह्या मंडळीने साहाय्य केले होते.या पत्राचा प्रमुख विषय, आनंद हा आहे. त्याच प्रमाणे, पौलाने अनेक गहण वचनाच्या व्दारे, ह्या मंडळीला शिक्षण व मार्गदर्शन केलेले पहावयास मिळते. मशीहाची नम्रता व गौरव यावर आधारीत, अशी नम्रतेचे आव्हान मंडळीला पौलाने केलेले आहे. त्याच प्रमाणे सुवार्तेची प्रगती, व जगात राहून मशीहा साठी दुःख सोसणे, व त्याचे सेवा कार्य करणे, ह्या सारख्या अनेक विषयाबाबतचे ज्ञान व शिक्षण पौलाने मंडळीला दिले.

* * * * * * * * * * * * * * *

## .प्रेषित पौलाने लिहिलेले फिलिप्पैकरांस पत्र.

१.१ मशीहा येशूवाह चा दास असलेल्या पौल व तीमथ्य यांजकडून, फिलिप्पै येथे रहाणा-या मशीहा येशूवाह मधील, याव्हे
एलोहिमच्या सर्व पवित्र लोकांना, तसेच सर्व वडील मंडळीला, व विशेष मदतनिसांना, २ याव्हे एलोहिम आपला अव्बा, आणि आपला
अदोनाई येशूवाह मशीहा, याजपासून तुम्हांस हेख्न (कृपा) असो.

३ प्रत्येक वेळी जेंव्हा मी तुमची आठवण करतो, तेंव्हा याव्हे एलोहिमचे आभार मानतो. ४ नेहमी तुमच्यासाठी केलेल्या प्रत्येक
प्रार्थनेच्या वेळी, मी आनंदाने प्रार्थना करतो.५ कारण अगदी पहिल्या दिवसांपासून ते आजपर्यंत, सुवार्तेच्या कामात तुमचा सहभाग
आहे. ६ मला याची खात्री आहे की, ज्या याव्हे एलोहिमने तुमच्यामध्ये अशा प्रकारचे चांगले कार्य सुरू केले आहे. तो मशीहा
येशूवाह येण्याच्या वेळेपर्यंत, ते पूर्ण करीत आणील.७ तुम्हां सर्वांविषयी असा विचार करणे मला योग्य वाटते, कारण तुम्हीं माझ्या
हदयात आहात. आणि मी तुरूंगात असतानाच केवळ नव्हे, तर जेंव्हा मी सुवार्तेचे सत्य ठासून सिद्ध करीत होतो, तेंव्हा ही याव्हे
एलोहिमने जी कृपा मला दिली आहे, त्यात तुम्हीं सुद्धा माझ्याबरोबर वाटेकरी होता. ८ याव्हे एलोहिम माझा साक्षी आहे, कारण
मशीहा येशूवाहने जी प्रीति दाखविली, त्यामुळे तुम्हां सर्वांसाठी मी उत्कंठित झालो होतो.९ आणि माझी हीच प्रार्थना आहे की, तुमची
प्रीति अधिकाधिक वाढत जाईल, पूर्ण ज्ञान व सर्व प्रकारच्या समजबुद्धीने वाढत जाईल. १0 मी अशी प्रार्थना करतो की, तुमच्याठायी
हे गुण असावेत यासाठी की, जे शुद्ध व निर्दोष ते तुम्हीं निवडावे, आणि अशा प्रकारे मशीहाच्या येण्याच्या दिवसासाठी, तुम्हीं शुद्ध व
निर्दोष असावे. ११ आणि याव्हे एलोहिम च्या गौरवासाठी स्तुतिसाठी, आणि नीतिमत्वाचे फळ देण्यासाठी भरून जावे.

१२ बंधूंजनहो, जे काही माझ्या बाबतीत घडले त्यामुळे सुवार्ताकार्यात प्रत्यक्ष वाढ झाली, हे तुम्हांला कळावे अशी माझी इच्छा आहे.
१३ याचा परिणाम असा झाला की, राजवाडयाच्या सर्व पहारेक-यांना व येथे असणा-या सर्वांना हे माहीत झाले की, मी मशीहाला
अनुसरतो, म्हणून मला तुरूंगवास भोगावा लागत आहे.१४ शिवाय पुष्कळ बांधवांना माझ्या तुरूंगवासामुळे उत्तेजन मिळाले. व ते
बोलण्यात मशीहा मध्ये अधिकाधिक धीट होत चालले आहेत, व ते निर्भयपणे संदेश देत आहेत. १५ हे खरे आहे की, त्यांच्यातील
काही जण हेव्याने व वैरभावाने मशीहाचा संदेश देतात. पण इतर चांगल्या भावनेने मशीहाचा संदेश देतात. १६ हे लोक प्रीतिच्या
व्दारे असे करतात. कारण त्यांना माहीत आहे की, सुवार्तेचे समर्थन करण्यासाठी याव्हे एलोहिमने मला येथे ठेवले आहे. १७ पण

दुसरे मशीहाची घोषणा स्वार्थी ध्येयाने करतात, आणि प्रामाणिकपणे नाहीत. कारण त्यांना वाटते की, मी तुरूंगात असताना मला त्रास देणे, त्यांना शक्य होईल.१८ पण त्यामुळे काय होते? महत्वाची गोष्ट अशी आहे की, प्रत्येक मार्गाने चांगला हेतू असो की, वाईट हेतू असो. मशीहा गाजविला जातो आणि त्यामुळे मला आनंद होतो, आणि मला आनंद होतच राहील. १९ कारण मला माहीत आहे, तुमच्या प्रार्थनेमुळे आणि येशूवाह मशीहाच्या रूहुव्वा (आत्म्या) व्दारे येणा-या मदतीमुळे याचा परिणाम माझ्या सुटकेत होणार आहे.

२० हे माझ्या उत्सुक अपेक्षे प्रमाणे आहे. कारण मला खात्री आहे की, माझी निराशा होणार नाही. पण आता नेहमीसारखे माझ्या सर्व धैर्याने माझ्या जगण्याने, किंवा मरणाने मशीहाचा माझ्या शरीराव्दारे महिमा होईल २१ कारण माझ्यासाठी जगणे, म्हणजे मशीहा आणि मरणे म्हणजे लाभ आहे. २२ पण जर मी या शरीरातच राहिलो तर त्याचा अर्थ असा की, माझ्या कामाचे फळ आनंद मी अनुभवीन. मला माहीत नाही की, मी काय निवडू. २३ या दोन पर्यायातून निवडण्यासाठी मोठा दबाव आहे. माझी अशी इच्छा आहे की, या जीवनातून जाऊन मशीहा बरोवर असावे. कारण ते फार फार चांगले होईल. २४ पण तुमच्यासाठी या शरीरात राहणे, हे माझ्यासाठी अधिक आवश्यक आहे. २५ आणि मला याची खात्री असल्याने मला माहीत आहे की, मी येथेच राहीन व तुमच्याबरोबर असेन. २६ यासाठी की, तुमच्याबरोबर पुन्हा असण्याचा परिणाम म्हणून तुम्हांला अभिमान बाळगण्यास अधिक योग्य कारण मिळेल.

२७ पण कोणत्याही परिस्थितीत मशीहाच्या सुवार्तेला योग्य अशा प्रकारे तुम्हीं वागा. यासाठी की, जरी मी तुम्हांला येऊन भेटलो, किंवा तुमच्यापासून दूर असलो. तरी मला तुमच्याविषयी असे ऐकायला मिळो की, तुम्हीं एका आत्म्यात खंबीर असे उभे आहात. तुम्हीं सुवार्तेच्या विश्वासाने एकजीवाने धडपड करीत आहात. २८ आणि जे तुम्हांला विरोध करतात त्यांना तुम्हीं भ्याला नाहीत. तुमचे हे धैर्य त्यांच्या नाशाचा पुरावा होईल. पण तुमच्या तारणाचा पुरावा होईल. आणि याव्हे एलोहिम कडून असेल, २९ कारण मशीहाच्या वतीने केवळ त्याच्यावर विश्वास ठेवणे एवढेच नव्हे, तर त्याच्यासाठी दुःख भोगणे, असा हक्क तुम्हांला देण्यात आलेला आहे. ३० माझ्यामध्ये चाललेले युद्ध तुम्हीं अनुभवलेले आहे, आणि पाहिले आहे. आताही ते माझ्यामध्ये चालले असल्याचे तुम्हीं ऐकत आहात.

**२**.१ जर मग मशीहात तुमच्यामध्ये काही समाधान आहे, जर तुमच्यामध्ये तुमच्या प्रीतितून वाढणारे सांत्वन आहे. जर तुमच्यामध्ये आत्म्यात काही भाग आहे, जर तुमच्यामध्ये जिव्हाळा व कळवळा आहे, २ तर मला पूर्णपणे आनंदी करा. मी सांगतो की, तुम्हीं त्याच गोष्टीचा विचार करता. एकमेकांविषयी सारखीच प्रीति आहे, तर आत्म्यात एक व्हा. आणि एकच उद्देश असू द्या.३ हेवा किंवा पोकळ व्यर्थ अभिमानाने काहीही करू नका. उलट नम्रतेने एकमेकांना स्वतःपेक्षा चांगले माना. ४ प्रत्येक व्यक्तीने केवळ आपलेच हित पाहू नये, तर प्रत्येकाने दुस-यांचे हित सुद्धा पाहावे.

५ मशीहा येशूवाहच्या ठायी जे विचार होते, तसेच तुमचेही असू द्या. ६ जरी तो याव्हे एलोहिमच्या स्वरूपाचा होता, तरी याव्हे एलोहिम सारखे असणे हा लाभ आहे, असे त्याने मानले नाही. ७ पण त्याने आपणाला रिक्त केले, म्हणजे तो दासाचे स्वरूप धारण करून माणसांच्या प्रतिमेचा झाला. ८ आणि माणसासारख्या स्वरूपात प्रकट होऊन, त्याने मरण ते ही वधस्तंभावरील मरण सोसले. येथपर्यंत आज्ञांकित होऊन आपणाला नम्र केले. ९ यामुळे याव्हे एलोहिमने त्याला अती उंचही केले, आणि प्रत्येक नावापेक्षा जे श्रेष्ठ जे नाव ते त्याला दिले. १० यासाठी की, आकाशात, व पृथ्वीवर, व पृथ्वीखाली जे काही आहे, त्यातील प्रत्येक गुडघा येशूवाहच्या नावाने टेकला जावा. ११ आणि याव्हे एलोहिम अव्वा याच्या गौरवासाठी, प्रत्येक जिभेने येशूवाह मशीहा हा अदोनाई आहे, असे कबूल करावे.

१२ म्हणून माझ्या प्रियांनो, जसे तुम्हीं मी प्रत्यक्ष असतानाच नव्हे. तर आता दूर असताना सुद्धा आज्ञा पाळता, तसे भीतीने कापत, तुमचे तारण पूर्ण होण्यासाठी कार्य करीत राहा. १३ कारण याव्हे एलोहिमच असा एक आहे, जो तुमच्यामध्ये कार्य करण्याची इच्छा

निर्माण करतो, व तो संतुष्ट होईल. अशा रीतीने कार्य पूर्णत्वास नेतो.१४ प्रत्येक गोष्ट तकार किंवा भांडण न करता करा. यासाठी की, १५ तुम्हीं निर्दोष व शुद्ध असे, या कुटील व विपरीत पिढीतील लोकांमध्ये असता, त्यांच्या मध्ये अंधा-या जगातील प्रकाशासारखे चमकणारे अशी निष्कलंक याव्हे एलोहिमची मुले असावी. १६ तुम्हीं त्यांना जीवनाचे वचन सांगत असता, माझे शर्यतीत धावणे व्यर्थ झाले नाही, असे मला दिसते. यासाठी की, मशीहाच्या परत येण्याच्या दिवशी, मला तुमचा अभिमान वाटावा. १७ तुमच्या यज्ञार्पणा समवेत तसेच तुमच्या विश्वासाच्या सेवेसमवेत, जरी मी अर्पिला गेलो, तरी ते आनंदाने करतो. आणि तुमच्या समवेत आनंद करतो. १८ त्याच प्रकारे तुम्हीं सुद्धा आनंदी असावे, आणि तुमच्या आनंदात मला सहभागी करावे.

१९ पण मला आशा आहे, अदोनाई येशूवाह च्या साहाय्याने मी लवकरच तीमथ्यीला तुमच्याकडे पाठवीन यासाठी की, तुमच्या विषयीच्या बातमीने मला उत्तेजन मिळावे. २० तोच एक आहे, ज्याला पाठविण्याची माझी इच्छा आहे. कारण माझ्यासारख्या भावना असणारा दुसरा कोणी माझ्या जवळ नाही. आणि त्याला तुमच्या कल्याणाची मनापासून कळकळ आहे. २१ सर्व जण स्वतःच्या हिताकडेच लक्ष देतात, पण मशीहाच्या हिताकडे कोणीही लक्ष देत नाही. २२ परंतु त्याचा स्वभाव तुम्हांला माहीत आहे, जसे मूल बापाची सेवा करते, तशी त्याने सुवार्तेसाठी माझ्याबरोबर दासासारखी सेवा केली आहे. २३ त्याला तुमच्याकडे पाठविण्याविषयी मी आशा करीत आहे. माझ्याबाबतीत काय होते, ते कळताच त्याला तुमच्याकडे पाठवीन.

२४ आणि माझा असा विश्वास आहे की, याव्हे एलोहिमच्या साहाय्याने मला स्वतःला सुद्धा तुमच्याकडे येणे लवकरच शक्य होईल.२५ एपफ्रदीत तो माझा बंधु आहे, सहकारी व सहशिपाई आहे. त्याला तुमच्याकडे पाठविण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. तसेच तो तुमचा प्रतिनिधी आहे, जो माझ्या गरजेच्या वेळी मला साहाय्य करतो. मी असे करण्याचे ठरविले आहे. कारण तो तुम्हां सर्वांना भेटण्यास आतुर झाला आहे. २६ मी त्याला पाठवितो, कारण त्याला तुम्हांला फार भेटावेसे वाटते. तुम्हीं तो आजारी असल्याचे जे ऐकले, त्यामुळे त्याला काळजी वाटत आहे. २७ तो खरोखरच आजारी होता, अगदी मरणाला टेकला होता. पण याव्हे एलोहिमने त्याच्यावर करूणा केली. त्याच्यावरच केली असे नाही, तर माझ्यावरही केली. यासाठी की, मला आणखी दुःख होऊ नये.

२८ म्हणून अधिक अतुरतेने मी त्याला पाठवीत आहे. यासाठी की, जेंव्हा तुम्हीं त्याला पाहाल तेंव्हा पुन्हा एकदा तुम्हीं आनंदी व्हाल, आणि मी निश्चित असेन. २९ म्हणून अदोनाई मध्ये त्याचे स्वागत करा, आणि अशा लोकांचा सन्मान करा. कारण मशीहा च्या कामासाठी तो जवळजवळ मेला होता. ३० त्याने त्याचे जीवन धोक्यात घातले. यासाठी की, माझी सेवा करण्यात तुमच्यात जी उणीव होती, ती भरून काढावी.

**३**.१ शेवट माझ्या बंधूंनो, अदोनाई मध्ये आनंद करा. त्याच गोष्टी मी पुन्हा लिहिण्यास मला त्रासदायक वाटत नाहीत, आणि ते तुमच्यासाठी सुरक्षित आहे.२ कुत्र्यांविषयी सावध असा, वाईट कामे करणा-यांविषयी सावध असा, जे व्यर्थ सुंतेचे त्यांच्याविषयी सावध असा. ३ कारण आम्हीं जे याव्हे एलोहिमच्या रूहुव्वाने (आत्म्याने) आराधना करणारे, व मशीहा येशूवाहत आनंद करणारे, व देहावर भरवसा न ठेवणारे, ते आम्हीं खरे सुंतेचे आहो. ४ तथापि मला स्वतःला देहावरही भरवसा ठेवता आला असता. आपल्याला देहावर भरवसा ठेवता येईल, असे जर दुस-या कोणाला वाटत असेल, तर मला तसे अधिक वाटणार. ५ मी तर आठव्या दिवशी सुंता झालेला, इस्त्राएल लोकांतील बन्यामीन वंशातला, इब्यातील इब्री, तोराह (नियमशास्त्रा) विषयी परूशी, ६ आवेशाने मंडळीचा पाठलाग करणारा, तोराह (नियमशास्त्रा) तील न्यायीपणाविषयी निर्दोष असा होतो.

७ परंतु ज्या गोष्टी मला लाभ अशा होत्या, त्या मी मशीहा साठी हानी अशा लेखल्या आहेत. ८ होय, खरेच आणि मशीहा येशूवाह माझा अदोनाई याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे, मी सर्व काही हानी असे लेखतो. त्याच्याकरिता मी सर्व गोष्टीची हानी सोसली, आणि त्या मळ अशा लेखतो. यासाठी की, मला मशीहा हा लाभ मिळवा. ९ आणि तोराह (नियमशास्त्रा) च्याव्दारे जे माझे

स्वतःचे न्यायीपण ते नसलेल्या, पण जे मशीहा वरील विश्वासाने मिळते, जे न्यायीपण याव्हे एलोहिम पासून विश्वासाच्या व्दारे आहे, ते असलेल्या मी त्याच्यामध्ये सापडावे.१० यासाठी की, मी त्याला ओळखावे व त्याच्या पुनरूत्थानाचे सामर्थ्य, व त्याच्या दुःखाचे भागीपण, ही मी त्याच्या मरणाशी अनुरूप होऊन ओळखावी. ११ म्हणजे मी कसेही करून, मेलेल्यांमधून पुनरूत्थानापर्यंत पोंहचावे.

१२ मी इतक्यात मिळवले, किंवा इतक्यात मी पूर्ण झालो असे नाही. तर यासाठी मी पाठी लागतो की, ज्याकरिता मशीहा येशूवाहने मला धरून घेतले, ते मीहि धरून घ्यावे. १३ भावांनो मी अजून धरून घेतले आहे असे मी लेखीत नाही. तर एक गोष्ट मी करतो ती ही की, मागील गोष्टी विसरून व पुढील गोष्टीकडे लक्ष ठेवून, १४ मशीहा येशूवाहत जे याव्हे एलोहिमचे वरील पाचारण, त्याचा पण जिंकण्यासाठी मी निशाणीकडे धावत चालतो. १५ तर जितके आम्हीं पूर्ण आहो, तितक्यांनी हाच भाव धरावा, आणि जर तुम्हीं कोणत्या तरी गोष्टीविषयी निराळा भाव धरला, तर याव्हे एलोहिम ती गोष्टदेखील तुम्हांला प्रकट करील. १६ तथापि आपण ज्या नियमाने येथवर पोहचलो त्या नियमाने चालावे, आपण एकचित्ताचे असावे.

१७ बंधूंजनहो, तुम्हीं मिळून माझे अनुकरण करणारे व्हा, आणि आम्हीं तुम्हांला कित्ता आहो, त्याप्रमाणे जे चालतात त्यांना लक्षात ठेवा. १८ कारण पुष्कळ असे चालतात की, ज्यांच्याविषयी मी तुम्हांस पुष्कळ वेळा सांगितले, व मी आताही रडत सांगतो की, ते मशीहाच्या वधस्तंभाचे वैरी आहेत. १९ नाश हा त्यांचा शेवट, पोट हे त्यांचा दैवत, आणि निर्लज्जपणा हे त्यांचे भूषण आहे, ते पृथ्वीच्या गोष्टींवर चित्त ठेवतात.

२० आमचे नागरीकत्व तर आकाशातील आहे, आणि तारणारा अदोनाई येशूवाह मशीहा तेथून येणार. त्याची आम्हीं वाट पाहतो. २१ तो ज्या सामर्थ्याने सर्व काही आपल्या स्वाधीन करायला शक्तिमान आहे, त्या सामर्थ्याने तो आमचे दैन्यावस्थेतील शरीर स्वतःच्या गौरवीवस्थेतील शरीरासारखे व्हावे, म्हणून त्याचे तो रूपांतर करील.

४.१ म्हणून माझ्या प्रिय, आणि भेटीसाठी आतुर झालेल्या बंधूंनो, माझा आनंद आणि मुकुट असलेल्या, मी तुम्हांला सांगितल्याप्रमाणे अदोनाई मध्ये स्थिर राहा. २ मी युवदीया आणि संतुखेला सुद्धा अदोनाई मध्ये वहिणी, या नात्याने एकच विचार करण्यासाठी उत्तेजन देत आहे. ३ माझ्या विश्वासू सहका-यांनो मी तुम्हांला सांगतो की, ज्या स्त्रियांनी माझ्याबरोबर सुवार्तेच्या प्रसारासाठी कष्ट घेतले, आणि ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहिली आहेत, त्यांना कृपा करून मदत करा.

४ अदोनाई मध्ये नेहमी आनंद करा. ५ मी पुन्हा म्हणेन आनंद करा! तुमची सहानशीलता सर्व लोकांना समजावी, अदोनाई समीप आहे. ६ कशाचीही चिंता करू नका, तर प्रत्येक परिस्थितीत प्रार्थना, आणि विनंत्या उपकारस्तुति करून, तुमच्या विनंत्या याव्हे एलोहिमला कळवा. ७ जी शालोम (शांति) याव्हे एलोहिम पासून येते, जी शांति सर्व मानवी समजबुद्धीच्या पलीकडे आहे, ती तुमचे अंतःकरण व आत्मा, येशूवाह मध्ये सुरशित ठेवील.

८ शेवटी बंधूंनो, जे काही सत्य आहे, जे काही सन्मान्य आहे, जे काही योग्य आहे, जे काही शुद्ध आहे, जे काही प्रिय आहे, जे काही प्रशंसनीय आहे, जे काही सद्गुण आहे, आणि जर काही स्तुति आहे, या गोष्टी तुमची आत्मे भरून टाका. ९ जे काही तुम्हीं शिकला आहात, जे तुम्हांला मिळाले आहे. व जे माझ्याकडून ऐकले आहे, आणि जे मी करताना तुम्हीं पाहिले आहे, त्या गोष्टी करीत राहा. आणि याव्हे एलोहिम जो शांतीचा उगम आहे, तो तुमच्याबरोबर राहिल.

१० मी अदोनाई मध्ये खूपच आनंदित झालो, कारण शेवटी तुमची माझ्याबद्दलची काळजी जागृत झाली. अर्थात तुम्हीं नेहमीच माझी काळजी घेतली, परंतु ती दाखविण्याची संधी तुम्हांला मिळाली नाही. ११ मला काही उणे होते, म्हणून मी बोलतो, असे नाही. कारण मी ज्या स्थितीत आहे, तीत तृप्त असण्यास शिकलो आहे. १२ गरजू स्थितीत किंवा सर्व विपुल स्थितीत असताना, कसे राहायचे ते मी जाणतो. कोणत्याही वेळी आणि सर्व परिस्थितीत, तृप्त राहण्याचे व भुकेले राहण्याचे, भरपूर बाळगण्याचे आणि अपुरेपणात

राहण्याचे, अशा सर्व परिस्थितीत राहण्याचे रहस्य मी शिकलो आहे १३ जो मशीहा मला सामर्थ्य पुरवितो, त्याच्या व्दारे मी सर्व परिस्थितीचा सामना करू शकतो.

१४ तरीही माझ्या संकटकाळात तुम्हीं साहाय्य केलेत, हे चांगले केले. १५ तुम्हीं फिलिप्पैकरांना माहीत आहे की, सुवार्ता सांगण्याच्या सुरूवातीच्या काळात, जेंव्हा मी मासेदोनिया सोडले. तेंव्हा तुमच्याशिवाय कोणत्याही मंडळीने माझ्याशी देवण घेवण केले नाही. १६
कारण जेंव्हा मी थेस्सलनीकात होतो, तेंव्हा अनेक वेळेस तुम्हीं माझी गरज भागविण्यासाठी मदत पाठविली.

१७ मी तुमच्याकडून केवळ देणगीची अपेक्षा करतो असे नाही, उलट तुमच्या हिशोबी अधिक फळवृद्धी व्हावी, असे पाहतो. १८
माझ्या गरजेपुरते माझ्याजवळ सर्व काही आहे, आणि ते विपुल आहे.एपफदीताच्या करवी, ज्या गोष्टी तुम्हीं पाठविल्या त्या मिळाल्यामुळे, गरजेपेक्षा अधिक माझ्याजवळ आहे. ते मधुर सुगंध अर्पण स्विकारण्यास योग्य, असा यज्ञ जो याव्हे एलोहिमला संतोष देणार असा आहे.

१९ आणि माझा याव्हे एलोहिम तुमच्या सर्व काही गरजा, मशीहा येशूवाहच्या ठायी असलेल्या त्याच्या गौरवी संपत्तीला साजेल, अशा
रीतीने पुरवील. २० आपला याव्हे एलोहिम जो अव्वा त्याला अनंतकाळ गौरव असो आमेन.

२१ मशीहा येशूवाह मधील प्रत्येक पवित्र जण, शालोम (सलाम) सांगा. माझ्याबरोबर जे बंधु आहेत, ते तुम्हांला शालोम (सलाम) सांगतात.

२२ येथील सर्व पवित्र जण विशेषेकरून कैसराच्या घरातील पवित्र जण, तुम्हांला शालोम (सलाम) सांगतात.

२३ अदोनाई येशूवाह मशीहाची हेख्न (कृपा), तुमच्या रूहुव्वा (आत्म्या) बरोबर असो, आमेन.

............... समाप्ती ..............

## . प्रेषित पौलाने कलस्सै मंडळीला लिहिलेले पत्र .

### . प्रस्तावना .

प्रेषित पौलाने हे पत्र कलस्सै गावातील मंडळीला लिहिलेले आहे . प्रेषित पौल तुरूंगात असताना त्याने हे पत्र लिहिले . लिखाणाचा कालावधी हा इसवी सन ६0 ते ६२ च्या सुमारास लिहिलेले होते . पौलाच्या तिस-या सुवार्तेच्या फेरीमध्ये कालस्सै मंडळीची बांधणी झालेली असवी . कलस्सै २:१ वचनानुसार पौलाने कलस्सै येथे सुवार्ता प्रसार केलेला नाही हे दिसून येतो . कलस्सै येथील एक रहिवाशी एपफ्रास ह्याचा पौलाच्याव्दारे इफिस येथे पालट झालेला होता . नंतर पौलाने सुवार्ता प्रसार करण्यास एपफ्रास कलस्सै येथे पाठविले . १:७ ते ९ वचनात पुढील थोडक्या दिवसात मंडळीमध्ये घातकी व खोटया शिक्षणाचा प्रसार झाला . त्या काळात खोटे शिक्षक कोण होते त्यांची तपशिल उपलब्ध नाही . आत्मक्लेश आत्मदंडन याविषयी अनेक नियम केले होते . याव्हे एलोहिमच्या मालाक ची (देवदूताची) देखील उपासना सुरू झाली होती . पौलाने ह्या सर्व खोटया शिक्षणाला खोडून काढले होते . अर्थात ह्या पत्रामध्ये पौलाने मंडळीला याव्हे एलोहिम बाबत पूर्ण ओळख करून देण्याकरिता त्या एलोहिमचे जे मूळ नाव याव्हे आहे . त्या याव्हे शब्दाचा वापर निश्चीतच केलेला असल्याने आम्हीं ह्या पत्रामध्ये एलोहिमच्या नावावरोबर त्याचे मूळ याव्हे हे नाव सोवत जोडले आहे . ह्याला विपरीत म्हणता येणार नाही तर त्या परिस्थितीत याव्हे ह्या शब्दाचा उपयोग केलाच असणार हा ठाम विश्वास आहे . तर येशूवाह मशीहाचे सर्वश्रेष्ठत्व दाखवून मशीहा हा अदुष्य याव्हे एलोहिमचे प्रतिरूप आहे, हे २: १५ व्या वचनामध्ये स्पष्ट दाखविलेले आहे . सर्व ज्ञान व शहाणपण येशूवाह मशीहा मध्ये आहे . मशीहा हा सर्वांचा उत्पन्नकर्ता व सर्व सामर्थ्यांचा उगमस्थान आहे . मशीहाचे मरण व पुनरूत्थान याव्दारे विश्वासणा-यांना नवजीवन प्राप्त होते . त्याचप्रमाणे पत्रातील वचनामध्ये अनेक रहस्यमय गोष्टी पहावयास मिळतात .

### . प्रेषित पौलाने कलस्सै मंडळीला लिहिलेले पत्र .

१ . १ एलोहिमच्या इच्छेने येशूवाह मशीहाचा थालमीद (प्रेषित) पौल, आणि बंधु तीमथ्यी याजकडून, २ मशीहामध्ये आमचे जे विश्वासू बंधु आहेत . त्या कलस्सै येथील याव्हे एलोहिमच्या पवित्र लोकांना, याव्हे आदोनाय आपला अव्वा, याजकडून तुम्हांला हेख्न (कृपा), व शालोम (शांती) असो . ३ आम्हीं जेंव्हा तुमच्यासाठी प्रार्थना करतो, तेंव्हा आम्हीं नेहमी याव्हे एलोहिमचे जो आमच्या अदोनाई येशूवाह मशीहाचा अव्वा आहे, त्याचे आभार मानतो . ४ कारण आम्हीं मशीहा येशूवाह वरील तुमच्या विश्वासा विषयी आणि एलोहिमच्या सर्व लोकांविषयी तुम्हांला वाटत असलेल्या अहेद (प्रीति) विषयी ऐकले आहे . ५ कारण शाम्माईम (आकाशा) मध्ये जी आशा तुमच्यासाठी राखून ठेवली आहे . तुम्हीं पहिल्यांदा त्या आशे विषयी ख-या संदेशाव्दारे म्हणजेच सुवार्तो व्दारे ऐकले . ६ जी सुवार्ता तुमच्याकडे आली आहे . संपूर्ण जगातून त्या सुवार्तेचे फळ मिळत आहे, व ती वाढत आहे . ज्याप्रमाणे ती तुमच्यामध्ये सुद्धा तशीच वाढत होती, व फळ देत होती . ज्या दिवसापासून तुम्हीं याव्हे एलोहिमच्या हेख्न (कृपे) विषयी ऐकले, व ती खरोखर काय आहे हे समजून घेतले, तेंव्हापासून ती कार्य करीत आहे .

७ तुम्हीं ते आमचा सहसेवक एपफ्रास जो आमच्या वतीने मशीहाचा विश्वासू सेवक आहे, त्याच्याकडून शिकून घेतले आहे . ८ त्याने आम्हांला तुमची अहेद (प्रीति) रूहुव्वा (आत्म्या) पासून आहे, त्याविषयीही सांगितले . ९ या कारणासाठी आम्हीं सुद्धा तुमच्या विषयी ज्या दिवसापासून ऐकले . तेंव्हापासून तुमच्यासाठी प्रार्थना करण्याचे थांबविले नाही . आम्हीं प्रार्थना करीत आहोत की, तुम्ही याव्हे एलोहिमच्या इच्छेच्या सर्व प्रकारच्या ज्ञानाने, आणि आध्यात्मिक समंजसपणाने भरले जावे . १० यासाठी की, त्याच्या योग्य असे तुम्हीं चालावे, आणि सर्व बाबतीत त्याला आनंद द्यावा . आणि तुम्हीं याव्हे एलोहिमच्या ज्ञानात वाढावे . ११ त्याच्या गौरवी सामर्थ्यात त्याच्या महान सामर्थ्यामुळे, समर्थ बनण्यासाठी तुम्हांला सहनशिलता, व धैर्य प्राप्त व्हावे . १२ आणि आनंदाने याव्हे अव्वाला धन्यवाद द्यावेत . ज्याने तुम्हांला ओर (प्रकाशात) राहणा-या याव्हे एलोहिमच्या लोकांचे जे वतन आहे, त्यात वाटा मिळण्यासाठी पात्र केले . १३ याव्हे एलोहिमने होशेक (अंधाराच्या) अधिपत्यापासून आमची सुटका केली आणि त्याच्या प्रिय वेन च्या (मुलाच्या) राज्यात आणले . १४ मुलाव्दारे आम्हांला आमच्या हा-ताअह् (पापांची) क्षमा मिळाली .

१५ तो आदृश्य याव्हे एलोहिमची प्रतिमा आहे, आणि निर्माण केलेल्या सर्व गोष्टीत तो प्रथम आहे.१६ कारण शाम्माईम (आकाशात) आणि ऐरेस्त वर (पृथ्वीवर) सर्व काही त्याच्या सामर्थ्याने निर्माण केले होते. जे काही दृश्य आहे, आणि जे काही अदृश्य आहे. किस्से (सिंहासने) असोत, किंवा सामर्थ्य असो. सत्ताधीश असोत, किंवा अधिपती असोत, सर्व काही त्याच्याव्दारे निर्माण केले गेले. १७ सर्व गोष्टी निर्माण होण्याच्या अगोदर पासून तो अस्तित्वात आहे. सर्व गोष्टी त्याच्या व्दारे चालतात. १८ आणि तो शरीराचा म्हणजे मंडळीचा मस्तक आहे, तो प्रारंभ आहे. मृतांमधून पुनरूत्थान पावलेल्यां मध्ये तो सर्वात प्रथम आहे. यासाठी की, प्रत्येक गोष्टीत त्याला प्रथम स्थान मिळावे. १९ कारण याव्हे एलोहिमने त्याच्या सर्व पूर्णतेत त्याच्यामध्ये राहण्याचे निवडले.२० आणि मशीहा व्दारे सर्व गोष्टीचा स्वतःशी, म्हणजे त्या ऐरेस्त (पृथ्वी) वरील गोष्टी असोत, किंवा शाम्माईम (आकाशा) तील गोष्टी असोत, समेट करण्याचे ठरविले. मशीहाने जे देम्ये (रक्त) वधस्तंभावर सांडले, त्याच्याव्दारे याव्हे एलोहिमने शांति केली.

२१ एके काळी तुम्हीं परके होता, आणि तुमच्या विचारांमुळे, आणि तुमच्या दुष्ट कृत्यांमुळे, तुम्हीं याव्हे एलोहिमचे शत्रू होता. २२ परंतु आता मशीहाच्या शारीरिक देहाने, व त्याच्या मरणाने याव्हे एलोहिमने तुमच्या त्याच्याशी समेट घडवून आणला आहे. यासाठी की, त्याच्या समोर क्वादोश (पवित्र), निष्कलंक, आणि दोषविरहीत असे सादर करावे. २३ तुम्हीं तुमच्या विश्वासात दृढ व स्थिर असावे, आणि जी सुवार्ता तुम्हीं ऐकली आहे.तिच्याव्दारे तुम्हांला दिलेल्या आशेपासून दूर जाऊ नये, ज्याचा मी पौल सेवक झालो.

२४ आता तुम्हांसाठी जी माझी दुःखे त्यामध्ये मी आनंद करतो, आणि मशीहाच्या दुःखातले जे उणे आहे ते मी आपल्या देहात, मशीहाचे शरीर जी मंडळी तिच्याकरिता सोसून पूर्ण करतो. २५ याव्हे एलोहिमच्या आज्ञेप्रमाणे मी एक त्यांच्यापैकी सेवक झालो. ती आज्ञा तुमचा फायदा व्हावा म्हणून दिली होती. ती म्हणजे याव्हे एलोहिमचा संदेश वचने पूर्णपणे गाजवावा. २६ हे संदेश वचने एक रहस्य आहे, जे अनेक युगापासून आणि अनेक पिढयांपासून गुप्त ठेवले होते. परंतु आता ते याव्हे एलोहिमने त्याच्या लोकांना माहीत करून दिले आहे. २७ याव्हे एलोहिमला त्याच्या लोकांना माहीत करून द्यायचे होते की, विदेशी लोकांमध्ये या वैभवी रहस्याची संपत्ती मशीहा येशूवाह जो तुम्हांमध्ये आहे, आणि जो याव्हे एलोहिमच्या गौरवामध्ये सहभागी होण्याची आमची आशा आहे. २८ आम्हीं त्याची घोषणा करतो, प्रत्येक व्यक्तीला सूचना देतो, व प्रत्येक व्यक्तीला शक्य ते ज्ञानाने शिकविण्याचा प्रयत्न करतो. यासाठी की, आम्हांला व्यक्ती मशीहा मध्ये पूर्ण अशी याव्हे एलोहिमला सादर करता यावी. २९ या उद्देशाने मी झगडत आहे, मशीहाच्या शक्तीच्या उपयोगाने जी माझ्यामध्ये सामर्थ्यशाली रीतीने कार्य करीत आहे.

२.१ कारण माझी अशी इच्छा आहे की, तुमच्या वतीने जो महान झगडा मी करीत आहे. आणि जे लावादिकीयात आहेत, त्यांच्या वतीने आणि ज्यांची माझी व्यक्तीशः भेट झाली नाही.अशा सर्वांसाठी जो महान झगडा मी केला, तो तुम्हांला माहीती व्हावा. २ यासाठी की, त्यांच्या मनाला समाधान वाटावे. आणि ते प्रीतिने एकत्र जोडले जावेत, आणि विश्वासाची सर्व संपत्ती जी समजबुद्धीने येते ती मीळावी. तसेच याव्हे एलोहिमचे रहस्य जो मशीहा त्याच्या विषयी पूर्ण ज्ञान मिळावे. ३ ज्यामध्ये ज्ञानाचे व बुद्धीची सर्व संपत्ती गुप्त आहे. ४ मी हे म्हणत आहे ते यासाठी की, तुम्हांला दिसायला चांगल्या पण खोटया कल्पनांनी फसवू नये. ५ कारण मी जरी शरीराने तुम्हांपासून दूर असलो, तरी ही आत्म्यात मी तुम्हांबरोबर आहे, आणि तुमच्या जीवनातील नीटनेटकेपणा, आणि मसीहा वरील विश्वासासाठी खंबीरता पाहून मी आनंदीत आहे.

६ म्हणून ज्याप्रमाणे तुम्हांला दिलेल्या शिक्षणाव्दारे, तुम्हांला येशूवाह मशीहा व अदोनाई म्हणून मिळाला. तसे त्याच्यामध्ये एक होत चला. ७ त्याच्यामध्ये मुळावलेले त्याच्यावर रचलेले, व शिकवल्याप्रमाणे विश्वासात दृढ झालेले असे व्हा. आणि याव्हे एलोहिमची उपकारस्तुति करण्यास फार वाढा.८ मूलभूत शिक्षण जे मशीहा पासून नाही, व मनुष्यांनी हस्तांतरीत केले आहे. त्या मानवी तत्वज्ञानाने, व पोकळ फसव्या कल्पनांनी, तुम्हांला कोणही कैद्यासारखे घेऊन जाऊ नये, म्हणून सावध असा. ९ कारण याव्हे एलोहिमने पूर्णत्व त्याच्यात शरीरात राहते. १० आणि तो जो प्रत्येक सत्तेच्या व अधिकाराच्या उच्चस्थानी आहे. त्याच्यामध्ये तुम्हीं पूर्ण झाले आहात. ११ मानवी हातांनी न केलेल्या सुंतेने तुम्ही सुद्धा त्याच्यामध्ये सुंता झालेले आहात. मशीहाने केलेल्या सुंतेव्दारे

तुम्हीं तुमच्या पापाच्या सामर्थ्यापासून मुक्त झाला होता.१२ हे असेच घडले, जेंव्हा तुम्हीं बाप्तिस्मा घेण्याच्या कृतीमध्ये त्याच्यावरोबर पुरले गेला, आणि तुम्हीं त्याच्यामध्ये याव्हे एलोहिमच्या कृतीमध्ये, तुमच्या विश्वासाव्दारे उठविले गेला. याव्हे एलोहिमने मशीहाला मेलेल्यांतून उठविले. १३ तुमच्या पापांमुळे आणि सुंता न झाल्याने, तुम्हीं आध्यात्मितेमध्ये मृत झाला होता. परंतु याव्हे एलोहिमने मशीहा बरोबर तुम्हांला जीवन दिले. आणि त्याने आमच्या सर्व पापांची क्षमा केली. १४ त्याने आमच्या विरूद्ध असलेल्या आरोप पत्राचा निवाडा असलेला दस्तावेज, आणि ज्यात आम्हांला विरोध होता. तो त्याने आमच्यातून काढून घेतला, आणि वधस्तंभावर खिळयांनी ठोकून रद्द केला. १५ त्याने स्वतः वधस्तंभाव्दारे सत्ता, आणि अधिकारांस, निशस्त्र करून उघड प्रदर्शन करून, त्यांच्यावर विजय मिळविला आहे.

१६ म्हणून कोणीही तुमच्यावर खाण्याविषयी, आणि पिण्याविषयी, किंवा मेजवान्यांविषयी, किंवा सण, किंवा अमावास्था, किंवा शब्बाथ याविषयी, कोणी तुमचा न्याय न ठरवो. १७ कारण ते फक्त येणा-या गोष्टींची सावली आहेत.परंतु खरे शरीर ज्यामुळे सावली पडते, ते तर मशीहाचे आहे. १८ कोणीही जो स्वतःचा अपमान, नम्रतेची कृत्ये, व एलोहिम मालाक ची (देवदूतांची) उपासना यात समाधान मानून घेतो.त्याने तुम्हांला बक्षिसासाठी अपात्र ठरवू नये. असा मनुष्य नेहमी हे सर्व दृष्टान्त पाहिल्यासारखे बोलतो आणि कोणतेही कारण नसता त्याच्या आध्यात्मिक नसलेल्या अंतःकरणामुळे (मूळात आत्म्यामुळे) गर्वाने फुगलेला असतो. १९ आणि असा मनुष्य मशीहा जो मस्तक त्याला धरीत नाही. संपूर्ण शरीर त्याच्या अस्थिबंधाचे स्नायू स्नायूंना आधार दिलेले, आणि एकत्रित धरल्याने याव्हे एलोहिम पासून होणारी वाढ यात वाढते, त्यावद्दल त्याला धन्यवाद असो.२० जर तुम्हीं मशीहा बरोबर मेला आहात, व या जगाच्या प्राथमिक शिक्षणापासून मुक्त झाला आहात. तर मग का तुम्हीं या जगाचे असल्यासारखे त्यांच्या नियमांच्या अधीन राहाता. २१ याला स्पर्श करू नका! त्याची चव पाहू नका. २२ या सर्व गोष्टी त्यांच्या वापरावरोबर नाहीशा होणार आहेत. अशा नियमांच्या अधीन होताना, तुम्हीं मानवी नियम, व शिकवणूक यांचे पालन करता. २३ खरोखर मनुष्यांनी केलेला धर्म, स्वतःची सेवा नम्रतेची कृत्ये, शरीराचा छळ, या विषयीच्या ज्ञानावद्दल त्यांची किर्ती आहे. परंतु शरीराच्या समाधानाविरूद्ध लढताना, ते काही किंमतीचे नाहीत.

**३**.१ म्हणून जसे तुम्हांला मशीहा बरोबर मेलेल्यामधून उठविले गेले आहे तर, आकाशातील म्हणजे ज्या वरील गोष्टी आहेत, त्यासाठी प्रयत्न करा. जेथे मशीहा, याव्हे एलोहिमच्या उजव्या हाताला बसलेला आहे. २ ज्या आकाशातील गोष्टी आहेत त्यावद्दलचा विचार करा. ज्या गोष्टी पृथ्वीवरच्या आहेत, त्यांचा विचार करू नका. ३ कारण तुम्हीं मेलेले आहात, आणि तुमचे नवे जीवन याव्हे एलोहिम मध्ये, मशीहा बरोबर आहे. ४ जेंव्हा मशीहा जो आमचे जीवन आहे, त्याच्या दुस-या येण्याच्या वेळेस प्रगट होईल. तेंव्हा तुम्हीही त्याच्यावरोबर गौरवात प्रकट व्हाल.

५ म्हणून तुमच्यामध्ये पृथ्वीतलावरील जे काही आहे, ते सर्व जिवे मारा. जारकर्म, अशुद्धता, लोभ, दुष्ट इच्छा, अधाशीपणा, जी एक प्रकारची मुर्तीपूजा आहे. ६ कारण या गोष्टीमुळे याव्हे एलोहिमचा क्रोध ओढवणार आहे.७ तुम्ही सुद्धा असेच जीवन जगत होता, जेंव्हा तुम्हीं अशा गोष्टी करीत होता. ८ पण आता तुम्हीं या सर्व गोष्टी बाजूला केल्या पाहिजे. राग, क्रोध, दुष्टता, निंदा, आणि तुमच्या मुखातील लज्जापद बोलणे, या सर्व गोष्टी तुम्हीं दूर केल्याच पाहिजेत. ९ एकमेकांशी लवाडी करू नका. कारण तुम्हीं जुना मनुष्य, त्याच्या कृतीसह काढून टाकला आहे. १० आणि तुम्हीं नवीन मनुष्य धारण केला आहे. हे नवे रूप त्याच्या निर्माणकर्त्याच्या प्रतिमेप्रमाणे सतत नवे होत जाते. यासाठी की, या नव्या मनुष्याला याव्हे एलोहिमचे पूर्ण ज्ञान मिळावे. ११ परिणाम म्हणून यहूदी व विदेशी असा कोणताही फरक नाही. एखाद्याची सुंता झालेला, किंवा एखाद्याची सुंता न झालेला, वेताल, व असंस्कृत, गुलाम, आणि स्वतंत्र, मनुष्य असा कोणताही फरक नाही. पण मशीहा हाच सर्व काही आहे, आणि तो सर्व विश्वासणा-यात आहे.१२ म्हणून जसे याव्हे एलोहिमचे निवडलेले लोक जे पवित्र आहेत. तसे करूना, दयाळूपणा, नम्रता, सौम्यता, आणि धीर हे परिधान करावे. १३ एकमेकांचे सहन करा. जशी अदोनाईने तुम्हांला क्षमा केली, तशी एकाद्याविरूद्ध तकार असेल, तर एकमेकांना क्षमा करा. १४ या सर्वांवर प्रीतिचे वस्त्र परिधान करा. जे त्या सर्वांना एकत्र ठेवते, आणि त्यांना परिपूर्ण करते. १५

आणि मशीहाची शालोम (शांती) जिच्यासाठी तुम्हीं जे एका देहातील लोक त्या तुम्हांला बोलाविले होते, ती तुमच्या अंतःकरणावर (मूळात आत्म्यात) राज्य करो, आणि नेहमी उपकार मानणारे व्हा. १६ मशीहाची संदेश वचने तुमच्यामध्ये त्याच्या सर्व वैभवाच्या ज्ञानाने भरपूर असो. एकमेकांना महान असा सुज्ञतेने शिकवा, व बोध करा, तेहिलीम (स्तोत्रे) व गीते कृपेने गा, आणि आध्यात्मिक गीते गाऊन उपकारस्तुतिसह, आपल्या अंतःकरणात (मूळात आत्म्यात) याव्हे एलोहिमला गीते गा. १७ आणि प्रत्येक गोष्ट जी तुम्हीं बोलता, किंवा करता, ते अदोनाई येशूवाहच्या नावात करावे. यामुळे तुम्ही याव्हे एलोहिम अव्वामध्ये त्याच्याव्दारे आभार मानावे.

१८ पत्नींनो, जसे अदोनाई मध्ये योग्य आहे, तसे तुम्हीं आपल्या पतींच्या अधीन राहा. १९ पतींनो, आपल्या पत्नीवर प्रीति करा आणि त्याच्याबरोबर कठीणतेने वागू नका. २० मुलांनो, सर्व गोष्टीत आपल्या आईवडीलांच्या आज्ञा पाळा. कारण अदोनाईच्या अनुयांचे असे वागणे याव्हे एलोहिमला आनंद देणारे आहे. २१ वडिलांनो, आपल्या मुलाला चिडवू नका. म्हणजे ते निराश होणार नाहीत. २२ गुलामांनो, तुमच्या जगिक मालकाच्या सर्व आज्ञा पाळा. आणि मनुष्याला संतोषविणा-या, डोळयांना देखरेख करण्यासाठी नव्हे तर त्याऐवजी पूर्ण मनाने अदोनाईला भिऊन आज्ञा पाळा. कारण तुम्हीं अदोनाईचा आदर करता. २३ तुमच्या अंतःकरणापासून (आत्म्यापासून) काम करा. जणू काय तुम्हीं अदोनाई साठी काम करीत आहात, मनुष्यांसाठी नव्हे असे काम करा. २४ लक्षात ठेवा, अदोनाई तुम्हांला तुमच्या आकाशातील वारशाचे बक्षीस देईल. मशीहा जो तुमचा खरा धनी त्याची सेवा करीत राहा. २५ कारण जो कोणी वाईट करतो, त्याचे सुद्धा तसेच होईल. याव्हे एलोहिम असेच वागवील, कारण त्याच्याकडे पक्षपात नाही.

**४**.१ मालकांनो, आपल्या गुलामांना जे न्याय, व योग्य ते द्या.२ नेहमी प्रार्थना करीत राहा. उपकारस्तुति करीत त्यामध्ये जागृत राहा. ३ त्याचवेळी आमच्यासाठी सुद्धा प्रार्थना कारा. यासाठी की, मशीहाच्या विषयीचे जे रहस्य, याव्हे एलोहिमने आम्हांला कळविले त्याविषयी बोलण्यासाठी त्याची संदेश वचने सांगण्यासाठी, याव्हे एलोहिमने आमच्यासाठी वचनाचे दार उघडावे. कारण तो उपदेश करण्याकरिता मी बंधनात आहे. ४ ते रहस्य ज्या रीतीने मी सांगावयास पाहिजे, त्याप्रकारे सांगण्यासाठी माझ्यासाठी प्रार्थना करा.५ बहेरच्या लोकांबरोबर सुज्ञतेने वागा, आणि प्रत्येक संधीचा चांगला फायदा करून घ्या. ६ तुमचे बोलणे नेहमी कृपायुक्त आणि मिठाने रूचकर केल्यासारखे असावे. यासाठी की, प्रत्येक मनुष्याला कसे उत्तर द्यावे हे तुम्हांला कळावे.

७ तुखिक, प्रिय बंधु, विश्वासू सेवक आणि अदोनाई मधील सहकारी, तो तुम्हांला माझ्याविषयी सगळी माहिती देईल. ८ त्याला मी याच कारणाने पाठवीत आहे की, आमच्याविषयीची बातमी तुम्हांला कळावी आणि तुमची अंतःकरणे (मूळात आत्म्याने) उत्तेजित व्हावीत. ९ मी त्याला आमचा विश्वासू व प्रिय बंधू, अनेसिम, जो तुमच्यातील एक आहे. त्याच्या बरोबर पाठवीत आहे. ते तुम्हांला येथे काय घडत आहे ते सांगतील. १० अरिस्तार्ख, माझ्या सोबतीचा कैदी, तुम्हांला शालोम (सलाम) सांगतो. त्याचप्रमाणे वर्णवाचा चुलत भाऊ मार्क ज्याच्याविषयी तुम्हांला अगोदरच माहिती मिळाली आहे. तो जर तुमच्याकडे आला तर त्याचे स्वागत करा. ११ येशूवाह, ज्याला युस्त म्हणतात. तो सुद्धा तुम्हांला शालोम (सलाम) सांगतो. यहूदी विश्वासणा-यापैकी फक्त हेच काय ते याव्हे एलोहिमच्या राज्याचा प्रसार करण्यात माझ्या बरोबर काम करीत आहेत. ते मला आधीच फार मोठा आधार आहेत. १२ एपफ्रास सुद्धा तुम्हांला शालोम (सलाम) सांगतो, तो तुमच्यापैकीच मशीहा येशूवाहचा सेवक आहे. तुम्हीं आध्यात्मिक दृष्टया परिपक्व वाढलेले, आणि याव्हे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे करण्यात तुम्ही पूर्णपणे गुंतलेले असावे. १३ लवादिकीयात, व हेरापल्लीत राहत आहेत. त्याच्या साठी तो फार श्रम करीत आहे, याचा मी साक्षी आहे. १४ प्रिय वैद्य लूक, आणि देमास, तुम्हांला शालोम (सलाम) सांगतात. १५ लावदिकीयात राहणारे बंधु आणि नेफा, आणि तिच्या घरी जमणारी मंडळी, यांना शालोम (सलाम) सांगा. १६ आणि जेंव्हा तुम्हांला हे पत्र वाचून दाखविले जाईल, तेंव्हा ते लावदिकीयाच्या मंडळीत सुद्धा वाचले जाते की नाही, ते पाहा. आणि तू सुद्धा माझे पत्र वाच. १७ आणि अर्खिप्पाला सांगा, जी सेवा तुला अदोनाई मध्ये मिळाली आहे, ती पुढे चालू ठेव. १८ मी पौल हा शालोम (सलाम) माझ्या स्वतःच्या हस्ताक्षरात लिहितो. मी तुरूंगात आहे, हे लक्षात ठेवा. याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा) तुम्हांबरोबर असो.

........... समाप्त ...........

## .प्रेषित पौलाने थेस्सलनीकाकरांना लिहिलेले पहिले व दुसरे पत्र.

### .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने थेस्सलनीकाच्या मंडळीला दोन पत्रे लिहिलेले आहे. ह्या पहिल्या पत्राचा लेखन काळ इसवी सन ५० ते ५१ च्या दरम्याचा आहे.पौलाने आपल्या दुस-या सुवार्ता प्रसार फेरीमध्ये सीला उर्फ सिल्वान ह्यास आणि तीमथ्य ह्यास थेस्सलनीका येथे घेऊन गेला होता. ह्या थेस्सलनीका गावामध्ये कित्येक ग्रीक धर्मातरीत उच्च समाजिक दर्जाच्या स्त्रिया आणि काही यहूदी मशीहाचे झालेले होते, त्यांनी त्यांचा भयंकर छळ करून त्यांना विरोध केला. विरोध चालू असताना देखील तेथे सुवार्ता प्रसाराचे कार्य करून व मंडळीची स्थापना करून, नंतर पौल व सिल्वान आणि तीमथ्य करिंथ मध्ये सुवार्ता प्रसार कार्य करण्यास निघून गेले होते.पौलाने लिहिलेल्या मंडळयांच्या पत्रांमधील सर्वात प्रथम हेच पत्र लिहिलेले आहे, हे पहावयास मिळते. हे थेस्सलनीका मंडळीचे पत्र पौलाने करिंथ येथून लिहिलेले आहे हे पहावयास मिळते. ह्या पत्राची रूपरेखा १. सुवार्तेच्या वचनाव्दार थेस्सलनीका लोकांचा पालट, २. त्यांच्यामध्ये पौलाचे सेवा कार्य, ३.मंडळीची स्थापना करून, त्यांना नीतिविषयीच्या वचनाने बोध केला.

* * * * * * * * * * * * * * * * *

## .प्रेषित पौलाने थेस्सलनीकाकरांना लिहिलेले पहिल पत्र.

**१**.१ प्रेषित पौल, सिल्वान, आणि तीमथ्य यांच्या व्दारे, याव्हे एलोहिम हो अव्वा त्यामध्ये, तसेच अदोनाई येशूवाह मशीहा मध्ये दृढ असलेल्या, थेस्सलनीकाच्या मंडळीस, याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा) व शालोम (शांति) लाभो.

२ आम्ही नेहमीच प्रार्थनांमध्ये तुमची आठवण करून, तुम्हां सर्वांसाठी याव्हे एलोहिमचे आभार मानतो. ३ आम्ही आमचा याव्हे एलोहिम व अव्वा समोर तुमचे विश्वासाचे कार्य, तुम्हीं प्रीतिने केलेले श्रम, आणि आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा वरील दृढ आशेने धरलेला धीर, याची आठवण करतो. ४ माझ्या बंधूंनो, याव्हे एलोहिमने अहेद (प्रीतित) केलेली तुमची निवड, ही आम्हांला माहीत आहे. ५ कारण आमची सुवार्ता तुमच्याकडे केवळ शब्दांनी आली नाही, तर क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्याने), व पूर्ण खात्रीने आली, हे तुम्हांला माहीत आहे. आम्हीं तुमच्यामध्ये कसे राहिलो, तुम्हांला माहीत आहे. ते तुमच्या फायद्यासाठी होते. ६ आणि तुम्ही आमचे, व अदोनाईचे अनुकरण करणारे झाला. क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्म्या) कडून मिळणा-या आनंदात, तुम्हीं मोठया कष्टाने संदेश स्विकारलात. ७ त्याचा परिणाम म्हणजे तुम्हीं सर्व विश्वासणा-यांसाठी जे मासेदोनियात व अखियात होते, त्यांच्यासाठी आदर्श असे झालात. ८ कारण तुमच्याकडून गाजविण्यात आलेला संदेश, केवळ मासेदोनिया आणि अखियातच ऐकला गेला असे नाही, तर तुमचा याव्हे एलोहिम वरील विश्वास सगळीकडे माहीत झाला आहे, म्हणून आम्हांला काही सांगण्याची गरज नाही. ९ कारण ते स्वतःच आमच्याविषयी सांगत आहेत, म्हणजे कशा प्रकारे तुम्हीं आमचे स्वगत केले, तसेच तुम्हीं मूर्तिपासून याव्हे एलोहिम कडे कसे वळलात, व ख-या आणि जिवंत याव्हे एलोहिमची सेवा करण्यासाठी कसे वळलात, १० आणि आता ज्याला याव्हे एलोहिमने मेलेल्यांतून उठविले, त्या त्याच्या आकाशातून येणा-या मुलाची तुम्हीं वाट पाहत आहात, तोच येशूवाह, याव्हे एलोहिमच्या येणा-या कोधापासून आपले रक्षण करतो.

**२**.१ बंधूंनो, तुमचे तुम्हांलाच माहीत आहे की, आम्हीं तुम्हांला दिलेली भेट व्यर्थ झाली नाही. २ पण तुम्हांला माहीत आहे की, आम्हांला मागे फिलिप्पै येथे त्रास, आणि अपमान सहन करावा लागला. पण याव्हे एलोहिमच्या साहाय्याने मोठा विरोध झला असताना, याव्हे एलोहिम कडून येणारी सुवार्ता सांगण्यासाठी, आम्हांला धैर्य प्राप्त झाले. ३ खरोखर आमची घोषणा आमच्याकडून झालेल्या चुकांमुळे, किंवा अशुद्ध हेतूने, किंवा भ्रमाने येत नाही. ४ उलट ज्याप्रमाणे याव्हे एलोहिमने पसंत केलेले सुवार्तेचे कार्य सोपविलेले, असे आम्हीं आहोत, म्हणून आम्हीं बोलतो. आम्हीं मनुष्याला संतुष्ट करण्यासाठी नाही, तर याव्हे एलोहिमला जो आमच्या उद्दिष्टांची परीक्षा घेतो. ५ खरोखर तुम्हांला माहीत आहे की, आम्हीं तुमच्यासमोर खुशामत करणा-या शब्दांनी बोललो नाही, किंवा आमचे उपदेश करणे, हे आमचा लोभ झाकण्याचे खोटे कारण नव्हते. कारण याव्हे एलोहिम आमचा साक्षी आहे! ६

किंवा आम्हीं लोकांकडून किंवा तुमच्याकडून अथवा दुस-या कोणाकडून सन्मान मिळावा, म्हणून अपेक्षा करीत नव्हतो . मशीहाचे
प्रेषित या नात्याने जरी आम्हांला आमचा अधिकार तुमच्यावर दाखविता आला असता . ७ तरीही आम्हीं तुमच्यामध्ये आई जशी प्रेमाने
तिच्या मुलाला स्वतःचे दूध पाजते, आणि काळजी घेते, तसे आम्हीं तुमच्यात आम्हीं तुमच्या मते लहान बालके असे झालो . ८ कारण
आम्हांला तुमच्या विषयी इतकी प्रीति होती की, आम्हीं तुमच्याबरोबर याव्हे एलोहिम कडून येणारी सुवार्ताच नव्हे, तर आमचे स्वतःचे
जीवन सुद्धा देण्यास तयार होतो . याचे कारण म्हणजे, तुम्हीं आमच्यासाठी प्रिय झाला होता ९ बंधूंनो आम्हीं याव्हे एलोहिम कडून
आलेली सुवार्ता सांगत असताना, तुम्हांला आठवत असेल की, आम्हीं रात्रंदिवस किती कष्ट केले . आमचे कष्ट आणि श्रम तुम्हीं
जाणता ते यासाठी केले की, तुम्हां कोणावरही भार पडू नये . १० तुम्हीं साक्षी आहात, आणि याव्हे एलोहिम सुद्धा साक्षी आहे की,
आम्हीं किती धार्मिकतेने, न्यायाने, आणि निर्दोष रीतीने, तुम्हां विश्वासणा-यां बरोबर वागलो . ११ आणि तुम्हांला हे चांगले माहीत
आहे की, जसा बाप आपल्या मुलांना वागवितो, तसे आम्हीं तुम्हांतील प्रत्येकाला वागविले आहे . १२ अशा प्रकारे आम्हीं तुम्हांला
उत्तेजन दिले, सांत्वन केले, आणि तुम्हांला साक्ष दिली की, याव्हे एलोहिमला आवडेल अशा प्रकारे वागा . जो त्याच्या राज्यात व
गौरवात तुम्हांला बोलावितो, १३ आणि या कारणासाठी आम्हीं सुद्धा याव्हे एलोहिमचे सातत्याने आभार मानतो . कारण जेंव्हा तुम्हीं
आमच्याकडून याव्हे एलोहिमचा संदेश ऐकला, तेंव्हा तो मनुष्याकडून आलेला म्हणून स्विकारला नाही . तर याव्हे एलोहिम पासून
आलेला असा खरा होता, तसाच स्विकारला . याव्हे एलोहिमचा संदेश जो तुम्हां विश्वासणा-यामध्ये सुद्धा कार्य करीत आहे . १४
कारण बंधूंनो, तुम्हीं येशूवाह मध्ये याव्हे एलोहिमच्या ज्या मंडळया यहूदीयात आहेत, त्याचे अनुकरण करणारे झाला आहात . कारण
त्यांनी यहूद्यांच्या हातून जसे दुःख सोसले, तसेच तुम्हीं तुमच्या देशबांधवांकडून दुःख सोसले १५ त्यांनी अदोनाई येशूवाहला आणि
नव्वीईम ला (संदेष्टयानां) मारले, त्यांनी आम्हांला बाहेर हाकलून लावले, ते याव्हे एलोहिमला संतोष देत नाहीत, आणि ते सर्व
लोकांच्या विरोधी आहेत . १६ यहूदीतर लोकांचे तारण होण्यासाठी, आम्हीं त्यांच्याशी बोलायला हवे, परंतू ते आम्हांला मना करून,
एक प्रकारे पापच करीत आहेत . ते या पापाव्दारे जे ते नेहमी करीत आले आहेत, आपल्या पापाचे माप भरत आले आहेत, आणि
आता शेवटी आणि पूर्णतेने याव्हे एलोहिमचा क्रोध त्यांच्यावर ओढवला आहे .

१७ बंधूंनो, आमच्यासाठी आम्हीं तुमच्यापासून थोडया वेळासाठी वेगळे झालो होतो . आम्हीं शरीराने वेगळे झालो होता . विचाराने
नाही, आणि आम्हीं तुम्हांला भेटण्याची फार इच्छा होती . १८ होय, तुमची भेट घेण्याचा खरोखर आम्हीं प्रयत्न केला होता, खरोखर
मी पौलाने एकदा दोनदा प्रयत्न केला, परंतु सैतानाने असे करण्यापासून आम्हांला अडवले . १९ शेवटी जेंव्हा आपला अदोनाई येशूवाह
दुस-यांदा येईल, तेंव्हा त्याच्यासमोर उभे राहू, तेंव्हा आमची आशा, किंवा आनंद, किंवा मुगूट काय असेल, ज्याचा आम्हांला
अभिमान वाटेल, ते तुम्हींच नाही का? २० होय, तुम्हीं आमचे गौरव व आनंद आहात!

**३** .१ म्हणून आम्हांला अधिक वाट पाहणे शक्य नसल्याने, आम्हीं अथेन्स येथेच राहण्याचे ठरविले . २ आणि आम्हीं तीमथ्याला
पाठविले, जो आमचा भाऊ, आणि याव्हे एलोहिमच्या कामाकरिता मशीहाच्या सुवार्तेची घोषणा करण्याकरिता सहकारी असा आहे .
आम्हीं त्याला तुम्हांला दृढ करण्यासाठी, आणि तुमच्याविषयीच्या विश्वासात तुम्हांला उत्तेजन देण्यासाठी पाठविले आहे . ३ यासाठी
की, सध्या होणा-या छळामुळे तुम्हीं कोणी अस्वस्थ होऊ नये . कारण तुम्हां स्वतःलाच माहीत आहे की, यासाठीच आपली नेमणूक
झाली आहे . ४ खरे तर जेंव्हा आम्हीं तुमच्याबरोबर होतो, तेंव्हा आम्हीं तुम्हांला सुरूवातीपासूनच सातत्याने सांगत होतो की, आपला
छळ होणार आहे . आणि तुम्हांला माहीत आहे की, नेमके तसेच घडले आहे ५ म्हणून मी अधिक काळ वाट पाहू शकत नसल्याने,
तुमच्या विश्वासाविषयी माहिती करून घेण्याविषयी तीमथ्याला पाठविले . कारण भुलवून टाकणा-यांने तुम्हांला भुलवून टाकले असेल,
आणि आमचे श्रम व्यर्थ गेले असतील, अशी मला भीती वाटत होती .

६ पण तीमथ्य आताच तुमच्याकडून परत आला आहे, आणि त्याने आम्हांला तुमचा विश्वास व प्रीति याविषयी चांगली बातमी
सांगितली आहे . त्याने आम्हांला सांगितले की, तुम्हीं नेहमीच आमच्याविषयीच्या चांगल्या आठवणी काढता, आणि ज्याप्रमाणे आम्हीं

तुम्हांला भेटणासाठी आतुर झालो आहोत, तसे तुम्हीही झाला आहात. ७ म्हणून आमच्या सर्व अडचणीत व त्रासात, बंधूंनो तुमच्याविषयी आम्हीं उत्तेजित झालो. याला कारण म्हणजे तुमचा विश्वास ८ होय, आम्हांला माहीत आहे, तुम्हीं अदोनाई मध्ये भक्कमपणे उभे आहात, आणि ही गोष्ट आमच्यासाठी जीवनदायी श्वास आहे. ९ तुमच्यामुळे आमच्या याव्हे एलोहिम समक्ष ज्या सर्व आनंदाचा अनुभव आम्हीं घेत आहोत. त्यावद्दलचे याव्हे एलोहिम कडे तुमच्या साठी आम्हीं पुरेसे आभार कसे मानायाचे? १० दिवस व रात्र आम्हीं कळकळीने प्रार्थना करीत आहोत की, आम्हांला तुमची व्यक्तीशः भेट घेणे शक्य व्हावे, आणि अजुनही तुमच्या विश्वासात जी उणीव आहे, ती पुरवावी.११ आता याव्हे एलोहिम स्वतः आमचा अव्बा आहे, आणि आमचा अदोनाई येशूवाह मशीहा तो आम्हांला तुमच्याकडे येण्याचा मार्ग दाखवो.१२ अदोनाई करा, आणि तुम्हांला प्रीतित वाढवो, आणि भरून टाको. जसे आम्हीं तुम्हांवरील प्रीतिने भरभरून वाहत आहोत, तसे तुम्हींही एकमेकासाठी व सर्वांसाठी प्रीतित भरभरून वाहावे. १३ यासाठी की, जेंव्हा आमचा अदोनाई येशूवाह त्याच्या पवित्र जनांसह येईल, तेंव्हा तो अशा प्रकारे तुमची अंतःकरणे बळकट करो. आणि त्यांना पवित्रतेने निर्दोष करो.

४.१ बंधूंनो, मला आता तुम्हांला काही इतर गोष्टींविषयी सांगायचे आहे. अदोनाई येशूवाहचे अनुयायी, या नात्याने आम्हीं तुम्हांला विनंती करतो. व बोध करतो की, याव्हे एलोहिमला कसे संतोषवायचे याचे शिक्षण तुम्हांला आमच्याकडून जसे मिळाले, तसे तुम्हीं खरोखरच जगत आहात, आणि तुम्हीं ते जास्तीत जास्त करा. २ कारण तुम्हांला हे माहीत आहे की, अदोनाई येशूवाह च्या अधिकाराने कोणत्या आज्ञा आम्हीं तुम्हांला दिल्या होत्या, ३ आणि हेच याव्हे एलोहिमला पाहिजे आहे, तुम्हीं पवित्र असावे ही त्याची इच्छा आहे. तुम्हीं जारकर्मापासून दूर असावे, ही त्याची इच्छा आहे. ४ त्याची अशी इच्छा आहे की, तुम्हांतील प्रत्येकाने स्वतःच्या शरीरावर ताबा मिळविण्यास शिकावे.५ आणि ज्यांना याव्हे एलोहिम माहीत नाही, ज्यांना याव्हे एलोहिमची ओळख नाही, त्या विदेशी लोकांप्रमाणे कामवासनेने नव्हे, ६ त्याची ही सुद्धा इच्छा आहे की, तुम्हीं प्रत्येक आपआपल्या बंधूंचा याबावतीत गैरफायदा घेऊ नये. कारण जसा आम्हीं पूर्वी इशारा देऊन सांगितले होते की, अदोनाई या सर्व गोष्टींचा सूड घेणार आहे. ७ कारण याव्हे एलोहिमने आम्हांला अमंगळ जीवनासाठी नव्हे, तर शुद्ध जीवनासाठी बोलाविले होते. ८ म्हणून जो कोणी हे शिक्षण नाकारतो, तो मनुष्याला नव्हे, तर पवित्र आत्मा देणा-या याव्हे एलोहिमला नाकारतो.

९ आता मशीहा तील तुमच्या भाऊ, बहिणीच्या प्रीतिविषयी, आम्हीं तुम्हांला लिहिण्याची गरज आहे असे नाही. कारण एकमेकांवर प्रीति करावी, असे याव्हे एलोहिमनेच तुम्हांला शिकविले आहे. १० आणि हे खरे पाहता, जे तुम्हीं तुमच्या सर्व बंधू बरोबर, मासेदोनियातील सर्व भावावर प्रीति करीत आहात. परंतु बंधूंनो, आम्हीं तुम्हांस कळकळीने सांगतो की, ती विपुलतेने करा. ११ आम्हीं तुम्हांला आज्ञा केल्याप्रमाणे शांततापूर्ण जीवन जगण्याची, आपले काम आपण करण्याची, आणि आपल्या स्वतःच्या हातांनी करण्याची, इच्छा करा. १२ यासाठी की, बाहेरचे लोक तुम्हीं ज्या प्रकारे जगता, ते पाहून तुमचा आदर करतील. आणि यासाठी की, तुमच्या गरजांसाठी इतर कोणावर आवलंबून राहावे लागू नये.

१३ बंधूंजनहो, झोपी गेलेल्या लोकांविषयी तुम्हीं अज्ञानी नसावे, अशी आमची इच्छा आहे. ह्यासाठी की, ज्यांना आशा नाही अशा बाकीच्या लोकांसारखे तुम्हीं दुःख करू नये. १४ कारण येशूवाह मरण पावला, व पुन्हा मरणांतून जिवंत झाला, असा जर आपला विश्वास आहे, तर त्याप्रमाणे येशूवाह च्याव्दारे जे निजलेले आहेत, त्यांना याव्हे एलोहिम त्याच्या बरोवर आणील.१५ कारण अदोनाई वचनावरून आम्हीं हे तुम्हांस सांगतो की, अदोनाईचे येणे होईपर्यंत जे आपण जिवंत असे उरू , ते आपण निजलेल्यांच्या आघाडीस जाणारच नाही. १६ कारण आज्ञाध्वनि, आद्यदिव्यदूतांची वाणी, व याव्हे एलोहिमच्या तुतारीचा नाद होत असता, अदोनाई स्वतः आकाशातून उतरेल, आणि मशीहा मध्ये जे मेलेले आहेत, ते पहिल्याने उठतील. १७ नंतर जिवंत उरलेले आपण त्याच्याबरोबर अदोनाईला सामोरे होण्यासाठी मेघारूढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सदासर्वदा अदोनाई जवळ राहू. १८ म्हणून ह्या वचनांनी एकमेकांचे सांत्वन करा.

५ .१ वंधूंनो, काळ व समय ह्याविषयी तुम्हांस काही लिहिण्याची गरज नाही .२ कारण तुम्हांला निश्चित माहीत आहे की, जसा रात्री चोर येतो, तसाच अदोनाईचा दिवस येईल. ३ शांति आहे, सुरक्षितपणा आहे, असे ते म्हणतात, तेंव्हा गरोदर स्त्रीला ज्याप्रमाणे अकस्मात वेदना होतात, त्याप्रमाणे त्यांचा अकस्मात नाश होतो, आणि ते निभावणारच नाहीत.

४ वंधुंजनहो, त्या दिवसाने चोरासारखे तुम्हांला गाठावे, असे तुम्हीं अंधारात नाही. ५ कारण तुम्हीं सगळे प्रकाशाची प्रजा आहा, आपण रात्रीचे किंवा अंधाराचे नाही. ६ ह्यावरून आपण इतरांसारखे झोप घेऊ नये, तर जागे व सावध राहावे. ७ कारण जे झोपतात ते रात्री झोपतात, व जे दारू पितात ते रात्री दारू पितात. ८ परंतु आपण दिवसाचे असल्याने स्वतःवर तावा ठेवण्याचा प्रयत्न करू या. आपण विश्वास, आणि प्रीतिचे उरस्त्राण, व तारणाची आशा हे शिरस्त्राण घालावे. ९ कारण याव्हे एलोहिमने आम्हांला त्याचा क्रोध सहन करण्यासाठी निवडले नाही, तर आपल्या अदोनाई येशूवाह मशीहा व्दारे तारण मिळावे म्हणून निवडले आहे.१० तो आमच्यासाठी मरण पावला यासाठी की, आम्हीं मेलेले असू, किंवा जिवंत असू, जेंव्हा येशूवाह येईल तेंव्हा आम्हांला त्याबरोबर एकत्र राहता यावे. ११ म्हणून एकमेकांना उत्तेजन द्या. आणि जसे आता तुम्हीं करीत आहात, तसे आध्यात्मिक रीतीने एकमेकांना पूर्ण मनाने बळकट करा.

१२ परंतु बंधूजनहो, आम्हीं तुम्हांला विनंती करतो की, जे तुम्हांमध्ये श्रम व अदोनाई मध्ये मार्गदर्शन करतात, आणि शिक्षण देतात, त्यांना तुम्हीं मान द्या. १३ आम्हीं तुम्हांला अशी विनंती करतो की, त्यांनी तुमच्याबरोबर केलेल्या कामामुळे, त्यांना प्रीतिने मोठा मान द्या. एकमेकांबरोबर शांतीने राहा. १४ बंधूंनो, आम्हीं तुम्हांला आग्रह करतो की, "आळशी लोकांना ताकीद द्या." अल्पधीराचे आहेत त्यांना धीर द्या, आणि अशक्तांना मदत करा, व सर्व लोकांबरोबर सहनशिलतेने राहा. १५ कोणीही वाईटाची फेड वाईटाने करू नये, म्हणून लक्षात ठेवा. परंतु नेहमी एकमेकांचे, आणि सर्व लोकांचे चांगले करण्याचा प्रयत्न करा. १६ सर्वदा आनंद करा. १७ नेहमी प्रार्थना करीत राहा. १८ प्रत्येक परिस्थितीत याव्हे एलोहिमचे उपकारस्तुति करा. १९ आत्म्याला विझविण्याचा प्रयत्न करू नका. २० नव्बीईम (संदेष्टयां) च्या संदेशाचा उपहास करू नका. २१ पण हे याव्हे एलोहिम कडून आले आहेत, याची परीक्षा करून, खात्री करून घेण्याची सवय करा. जे चांगले ते धरून ठेवा. २२ दुष्टाईच्या प्रत्येक प्रकारापासून दूर राहा. २३ आणि शांतीचा याव्हे एलोहिम स्वतः तुम्हांला पूर्णपणे पवित्र करो, आणि आपला अदोनाई येशूवाह मशीहा याच्या येण्याच्या वेळी, तुमचा आत्मा आणि जीव आणि शरीर ही संपूर्ण व निर्दोष अशी राखली जावोत. २४ तुम्हांला पाचारण करणारा विश्वासू आहे तो हे करीलच.

२५ वंधूंनो, कृपा करून आमच्यासाठी ही प्रार्थना करा. २६ पवित्र चुंबनाने सर्व बंधूंना शालोम (सलाम) करा. २७ मी तुम्हांला अदोनाईच्या नावाने निक्षून सांगतो की, हे पत्र सर्व बंधूंना वाचून दाखविण्यांत यावे. २८ आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो, आमेन.

............ समाप्त ............

## .प्रेषित पौलाने थेस्सलनीकाकरांना लिहिलेले दुसरे पत्र.

### .प्रस्तावना.

सदर प्रेषित पौलाने थेस्सलनीकाच्या मंडळीला हे दुसरे पत्रे लिहिलेले आहे. ह्या पत्राचा लेखन काळ इसवी सन ५१ च्या दरम्याचा आहे.ह्या दोन्ही पत्रामध्ये एकाच विषयाचे दोन वेगवेगळे पैलूंचा विचार केलेला आहे.दुसरे पत्र पाहिल्यानंतर काही महिन्यातच करिंथहून इ.स.५१ मध्ये पाठविले असावे. कारण पौलाच्या नावाने कोणीतरी पाठविलेले एक पत्र मिळाल्यानंतर, थेस्सलनीकाकर जरा बुचकळयात पडले होते. वास्तविक पौलाने हे पत्र पाठविलेले नव्हते. येथील काही जणांचा अमाप छळ होत होता. तर काही जण अदोनाईचा दिवस आल्याच आहे, या विचाराने धास्तीत पडले होते. आणि काही जण अजूनही दैहिका जीवन जगत होते. पहिल्या पत्रामध्ये ज्या प्रश्नांचा ऊहापोह केला आहे, येथे आणखी स्पष्टीकरण केले आहे, आणि वाचकांना विश्वासात दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे.

* * * * * * * * * * * * * * * * *

### .प्रेषित पौलाने थेस्सलनीकाकरांना लिहिलेले दुसरे पत्र.

१.१ बंधूंनो, पौल, सिल्वान, आणि तीमथ्य याजकडून, जो याव्हे एलोहिम आपला अव्वा, आणि अदोनाई येशूवाह मशीहा
यांच्यातल्या थेस्सलनीका येथील मंडळीला, २ याव्हे एलोहिम आपला अव्वा, व अदोनाई येशूवाह मशीहा यांच्या पासून तुम्हांला कृपा,
व शालोम (शांति) असो.

३ बंधूंनो आम्हीं नेहमीच तुमच्यासाठी याव्हे एलोहिमचे आभार मानतो, व तसे करणे योग्य आहे. कारण तुमचा विश्वास अद्‌भुत
रीतीने वाढत आहे, आणि जी अहेद (प्रीति) तुम्हांतील प्रत्येकाचे एकमेकांवर आहे, ती वाढत आहे.४ म्हणून आम्हांला स्वतः याव्हे
एलोहिमच्या मंडळींमध्ये सर्व छळात, व तुम्हीं सहन करीत असलेले दुःख त्याविषयीचा, तुमची सहनशीलता व विश्वासाचा अभिमान
आम्हीं वाळगतो.

५ याव्हे एलोहिम त्याच्या न्याय करण्यामध्ये योग्य आहे, हा त्याचा पुरावा आहे. त्याचा हेतू हा आहे की, ज्यासाठी आता तुम्हांला
त्रास सोसावा लागत आहे, त्या याव्हे एलोहिमच्या राज्यात प्रवेश करण्यास तुम्हांला पात्र ठरविले जावे. ६ खरोखर जे तुम्हांला दुःख
देतात त्याची दुःखाने परतफेड करणे, हे याव्हे एलोहिमच्या दृष्टीने त्याच्यासाठी योग्य आहे. ७ आणि आमच्याबरोबर जे तुम्हीं दुःख
भोगीत आहात, त्यांना आमच्याबरोबर विश्रांती देण्यासाठी अदोनाई येशूवाह प्रकट होताना, तो आकाशातून आपले सामर्थ्यवान
मालाक (दूत) आणि अग्निज्वालेसह येईल. ८ आणि ज्यांना याव्हे एलोहिम माहीत नाही, आणि आपल्या अदोनाई येशूवाह
मशीहाच्या सुवार्तेसाठी आवश्यक त्या आज्ञा पाळीत नाहीत, त्यांना याव्हे एलोहिम शिक्षा करील. ९ ते अनंतकाळचा नाश असलेला
असा शिक्षेचा दंड भरतील, ते अदोनाई येशूवाह च्या समक्षतेतून, आणि वैभवी सामर्थ्यातून वगळले जातील. १० त्या दिवशी जेंव्हा तो
त्याच्या क्वादोस (पवित्र) लोकांत गौरविला जाण्यासाठी सर्व विश्वासणा-यां कडून आश्चर्यचकित केले जाण्यासाठी येईल, तेंव्हा त्यात
तुमचाही समावेश आहे. कारण त्याविषयी आम्हीं सांगितलेल्या साक्षीवर तुम्हीं विश्वास ठेवला. ११ या कारणासाठी आम्हीं नेहमी
तुमच्यासाठी प्रार्थना करतो, व विनंती करतो की, आमच्या याव्हे एलोहिमने त्याच्या पाचारणासाठी योग्य असे तुम्हांला गणावे. तुमच्या
विश्वासापासून निर्माण होणारे प्रत्येक काम, व चांगुलपणा निश्चय समर्थपणे पूर्ण करावा. १२ यासाठी की, आमचा याव्हे एलोहिम
आणि अदोनाई येशूवाह च्या कृपेने आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाचे नांव तुमच्यामध्ये आणि तुम्हीं त्याच्यामध्ये गौरविले जावे.

२.१ आता बंधूंनो, आम्हीं तुम्हांला विनंती करतो. ती अदोनाई येशूवाह मशीहाच्या येण्याविषयी आणि त्याच्याबरोबर आमच्या
एकत्र भेटण्याविषयी, २ आम्हीं तुम्हांला विनंती करतो की, तुम्हीं तुमचे मन पूर्णपणे अस्वस्थ होऊ देऊ नका. किंवा सतत विचलित
होऊ नका. जर तुम्हीं ऐकले की, अदोनाईचा दिवस आला आहे, काही लोक अशा प्रकारचे भविष्य वर्तवतील. किंवा काही लोक

शिकवणुकीव्दारे, किंवा काही लोक आम्हांकडून पत्र लिहिले आहे, असे भासवून असा दावा करतील.३ तर कोणीही तुम्हांला कोणत्या प्रकारे फसवू नये, म्हणून सावध असा. कारण पहिल्याने विश्वासाचा त्याग होईल, आणि तो अधर्माचा पुरूष, तो नाशाचा मुलगा प्रकट होईल. ४ तो विरोध करतो, आणि अवघे जे देव किंवा भजनीय म्हंटलेला, त्याच्याविरूद्ध तो आपणाला उंच करतो. म्हणजे मी एलोहिम आहे, असे आपणाला दाखवीत, तो याव्हे एलोहिमच्या पवित्रस्थानात एलोहिम सारखा बसतो. ५ मी तुम्हांजवळ होतो तेंव्हा मी या गोष्टी तुम्हांला सांगितल्या, हे तुम्हांस आठवत नाही काय?

६ आणि तो त्याच्या नेमलेल्या समयीच प्रकट व्हावा, म्हणून आता त्याला प्रतिबंध होत आहे. हे तुम्हांला कळले आहे. ७ कारण अधर्माचे गूज आताच आपले काम करीत आहे. जो सध्या प्रतिबंध करीत आहे, तो मधून काढला जाईपर्यंत प्रतिबंध करत राहील. ८ आणि मग अधर्मी प्रकट होईल, त्याला अदोनाई येशूवाह आपल्या मुखाच्या श्वासाने मारून टाकील. आणि आपल्या येण्याच्या दर्शनाने त्याला नाहीसे करील. ९ त्या अधर्म्याला येणे सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व खोटे सामर्थ्य, व चिन्हे, व चमत्कार, यांसुद्धा १० आणि नाश पावणा-यांकरिता असलेले सर्व अन्यायीपणाचे ठकवणे, यांसुद्धा आहे. कारण आपले तारण व्हावे, म्हणून जी खरेपणाची प्रीति धरायला पाहिजे होती, ती त्यांनी धरली नाही. ११ आणि या कारणामुळे याव्हे एलोहिम त्यांच्याकडे भ्रांतीचे कार्य पाठवील असे की, ते खोटेपणावर विश्वास ठेवतील. १२ यासाठी की, ज्यांनी खरेपणावर विश्वास ठेवला नाही, तर अन्यायात संतोष मानला त्या सर्वांचा न्यायनिवाडा व्हावा.

१३ बंधूंजनहो, अदोनाईच्या प्रियांनो, आम्हीं सर्वदा तुम्हांविषयी याव्हे एलोहिमची उपकारस्तुति अवश्य करावी. कारण आत्म्याच्या पवित्रकरणांत व खरेपणातील विश्वासात, याव्हे एलोहिमने तुम्हांस प्रारंभापासून तारणासाठी निवडले आहे. १४ यात त्याने तुम्हांला आमच्या सुवार्तेच्या व्दारे, आपला अदोनाई येशूवाह मशीहा याचे गौरव मिळवण्यासाठी बोलावले आहे. १५ म्हणून बंधूंनो स्थिर राहा, आणि आमच्याकडून जे तोंडच्या वचनाव्दारे, किंवा आमच्या लेखी पत्राव्दारे जे परंपराने आम्हीं तुम्हांला शिकविली आहे, तिला बळकट धरून राहा. १६ आणि आपला अदोनाई येशूवाह मशीहा हा स्वतः आणि याव्हे एलोहिम आपला अव्वा ज्याने आपल्यावर प्रीति केली, आणि आपल्याला सर्वकालचे सांत्वन, व चांगली आशा कृपेने दिली, १७ तो तुमच्या आत्म्याचे सांत्वन करो, आणि प्रत्येक चांगल्या गोष्टी, व चांगली कामे यामध्ये तुम्हांला स्थिर करा.

**३**.१ शेवटी बंधूंनो, आमच्यासाठी प्रार्थना करा की, अदोनाईचे वचन वेगाने प्रसारीत व्हावे. आणि जसे तुम्हांमध्ये तसेच सर्वत्र गौरविले जावे.२ आणि प्रार्थना करा की, हेकट व दुष्ट माणसांपासून आमची सुटका व्हावी. कारण सर्वच लोकांचा अदोनाई वर विश्वास नाही. ३ पण अदोनाई विश्वासू आहे तो तुम्हांला बळकट करील, व दुष्टांपासून तुमचे रक्षण करील. ४ अदोनाई मध्ये आम्हांला तुमच्याविषयी विश्वास आहे. आणि खात्री आहे की, जे आम्हीं तुम्हांला करण्यासाठी सांगत आहोत, ते तुम्हीं करीत आहात व पुढे करीतच राहाल. ५ अदोनाई तुमची अंतःकरणे याव्हे एलोहिमच्या प्रीतित, व मशीहाच्या सहनशीलतेत नीट लावो.

६ आता बंधूंनो, आम्हीं तुम्हांला आमच्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या नावात आज्ञा करतो की, जो कोणी बंधू ज्या परंपरा त्यांना आमच्याकडून मिळाल्या, त्या परंपरांप्रमाणे चालत नाही, तर आळशी जीवन जगत आहे, तर त्याच्यापासून दूर राहा. ७ मी तुम्हांला हे सांगतो, कारण तुम्हीं स्वतः जाणता की, तुम्हीं आमचे अनुकरण कसे करायचे, कारण आम्हीं तुमच्यामध्ये आळशी नव्हतो. ८ किंवा कोणाकडूनही आम्हीं फुकटची भाकर खाल्ली नाही, उलट रात्रंदिवस आम्हीं काबाडकष्ट केले. यासाठी की, तुमच्यावर आम्हीं ओझे होऊ नये.

९ याचा अर्थ असा नाही की, आम्हांला तुमच्याकडून मदत मागण्याचा अधिकार नाही, पण आम्हीं आमच्या गरजा भागविण्यासाठी काम केले. ते यासाठी की, आम्हीं तुमच्यासमोर उदाहरण ठेवावे, व तुम्हीं आमचे अनुकरण करावे. १० कारण आम्हीं जेंव्हा तुमच्याबरोबर होतो, तेंव्हा आम्हीं तुम्हांला हा नियम दिला. “जर एखाद्याला काम करायचे नसेल, तर त्याने खाऊ नये.”

११ आम्हीं हे सांगतो, कारण आम्हीं ऐकतो की, तुमच्यापैकी काही जण आळशीपणाचे जीवन जगत आहेत. ते काहीच काम करीत
नाहीत. उलट कोणत्याही दिशाहीन असल्यासारखे इकडे तिकडे फिरत असतात, (इतरांच्या कामात दखल देतात) १२ आम्हीं अशा
लोकांना आज्ञा करतो, व अदानाई येशूवाह मशीहा मध्ये बोध करतो की, त्यांनी शांतीने काम करावे, आणि स्वतःच मिळवून खावे.
१३ पण बंधूंनो, तुम्हीं तुमच्यासाठी चांगले करीत असता थकू नका.

१४ जर कोणी या पत्राव्दारे आमच्या सूचनांचे पालन करीत नाही, तर तो कोण आहे हे लक्षात ठेवा, व त्याच्याबरोबर राहू नका.
यासाठी की, त्याला लाज वाटावी. १५ पण त्याला शत्रू समजू नका, परंतु धाक द्या. जसे त्याला तुमचा भाऊ समजा.

१६ आणि शांतीचा अदोनाई स्वतः सर्वकाळ व सर्व प्रकारे तुम्हांस शालोम (शांती) देवो.

१७ मी पौलाने स्वतःच्या हाताने लिहिलेला शालोम (सलाम), ही प्रत्येक पत्रात खूण आहे, मी असे लिहितो.

१८ आपला अदोनाई येशूवाह मशीहा याची हेख्न (कृपा) तुम्हां सर्वांबरोबर असो आमेन.

............ समाप्ती ............

## .प्रेषित पौलाने तीमथ्याला लिहिलेले पहिले व दुसरे पत्र.

### .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने हे पत्र तीमथ्याला व्ययक्तीकरित्या लिहिलेले आहे. ह्याचा लेखन काळ, इसवी सन ६४ मध्ये लिहिलेले असावे, असे तज्ञाचे मत आहे.तीमथ्य ह्या शब्दाचा अर्थ, याव्हे एलोहिमचा आदर करणारा, असा आहे. पौलाचा विश्वासातील मुलगा, म्हणजे तो मानस मुलगा होता. पौलाचा सहप्रवासी व अधिकृत प्रतिनिधी तीमथ्यावर पौलाचे जिवापाड प्रेम होते. त्याच्या अंगच्या गुणांचा पौलाला फार आदर होता. पौलाने आपल्या पत्रात तो आपला सोबती ह्या शब्दाचा वापर वारंवार केलेला आहे. तीमथ्याचा उल्लेख सर्वात प्रथम प्रेषित १६:१ मध्ये पहावयास मिळतो. यावरून तो लुस्त्रचा रहिवाशी असावा, असे दिसते. तो मिश्रीत विवाहाची संतती होता.त्याचे वडील ग्रीक असून मूर्तिपूजक होते. परंतु त्याची आई धार्मिक यहूदी स्त्री होती, तिचे नाव युनीके असे होते. तीमथ्याला बाळपणापासून जुन्या करारातील वचनाचे शिक्षण तिने दिलेले होते. त्याची आजी लोईस व आई युनीके ह्यांनी त्याला धर्मशील इस्त्राएली लोकांप्रमाणे धार्मिक शिक्षण दिले होते. पुढे पौलाने येऊन या धार्मिक कुटूंबाला येशूवाह मशीहा मध्ये आणले, आणि त्यांनी येशूवाह मशीहाचा स्विकार केला. पौलाच्या पहिल्या सुवार्ताच्या फेरीत ह्या कुटूंबाला सामील करून पौलाने तीमथ्याची सूंता करून घेतली. बहुधा याच वेळी स्थानिक मंडळीतील वडील जनांनी तीमथ्याची नव्या कार्यासाठी त्याच्या डोक्यावर हात ठेवून, सेवकाची दीक्षा केलेली होती. ह्या गंभीर प्रसंगी पौल हा उपस्थित असावा. (१ले तीमथ्यी ४:१४ व २रे तीमथ्य १:६) ह्या पत्रामध्ये पौल तीमथ्यावर इफिस मंडळीची जबाबदारी सोपवित असल्याचे पहावयास मिळते.इफिस मंडळी चुकीच्या वचनाचे शिक्षण देवून बहकविले होते. तिला सत्य वचनाचे शिक्षण देण्याकरिता व ह्या मंडळीमध्ये रहाण्याकरिता तीमथ्याला पौल विनंती करीत आहे.

* * * * * * * * * * * * * * *

### .प्रेषित पौलाने तीमथ्याला लिहिलेले पहिले पत्र.

१.१ आपला यशाह (तारणारा) याव्हे एलोहिम आणि आपली आशा मशीहा येशूवाह यांच्या आज्ञेने मशीहा येशूवाहचा प्रेषित पौल याजकडून, २ विश्वासातील माझा खरा बेन (मुलगा) तीमथ्य यालाः याव्हे एलोहिम जो अब्बा आणि आपला मशीहा येशूवाह आमचा अदोनाई याच्याकडून तुला हेख्न (कृपा) आणि शालोम (शांति) लाभो.

३ मी मासेदोनियाला जात असता तुला कळकळीने विनंती केल्याप्रमाणे, तू इफिस येथे राहावेस असे माझे म्हणणे आहे. यासाठी की, काही ठराविक लेकांना खोटे शिक्षण देऊ नका, अशी तुला त्यांना आज्ञा करता यावी, किंवा ४ कथा कहाण्यांच्या आहारी जाऊ नका, आणि न संपणा-या वंशावळया याकडे लक्ष देऊ नका, असे तू त्यांना सांगावेस . कारण त्यामुळे भांडण वाढते, आणि विश्वासाने याव्हे एलोहिमची योजना जी पूर्ण होते, ती या गोष्टीमुळे पूर्ण होत नाही. ५ आणि या आज्ञेचे उद्दिष्ट अहेद (प्रीति) आहे, जी शुद्ध आत्म्यातून चांगल्या सदसदविवेक बुद्धीतून, व प्रामाणिक विश्वासातून उगम पावते. ६ काहीनी पतनामुळे या गोष्टीकडून आपले लक्ष दुसरीकडे लावले आहे, व ते व्यर्थ बडबडीकडे वळले आहेत. ७ त्यांना तोराह् चे (नियमशास्त्राचे) राब्बी (शिक्षक) व्हायचे होते. पण ते ज्या गोष्टीविषयी मोठया आत्मविश्वासाने बोलतात व सांगतात, त्या त्यांनाच कळत नाहीत. ८ आता आम्हांला हे माहीत आहे की, तोराह् (नियमशास्त्र) खरोखरच चांगले आहे. जर कोणी त्याचा चांगला वापर करतो. ९ म्हणजे हे जाणून घेऊन की, तोराह् (नियमशास्त्र) हे नीतिमान लोकांसाठी, आणि बंडखोर लोकांसाठी, तिरस्करणीय लोकांसाठी, पाप्यांसाठी, भक्तिहीन, आणि अधर्मीक लोकांसाठी, वडिलांना ठार मारणा-या, आईला ठार मारणा-यासाठी, १० खुनी लोकांसाठी, जारकर्मी, समलिंगसंभोगी, इतर मनुष्यांना फसविणारे, खोटारडे, खोटी शपथ घेणारे, यांच्यासाठी आहे. इतर जे दुसरे सगळे करतात, ते चांगल्या शिक्षणाविरूद्ध आहेत. ११ गौरवी सुवार्ता, जी आशिर्वादीत याव्हे एलोहिम कडून येते, आणि जी माझ्यावर सोपविली आहे, तिला हे अनुसरून आहे.१२ जो मला सामर्थ्य देतो, त्या मशीहा येशूवाह आपल्या अदोनाईचे मी उपकार मानतो. कारण त्याने मला विश्वासू समजले, आणि त्याने मला त्याची सेवा करण्यासाठी नियुक्त केले.१३ जरी मी पूर्वी निंदा करणारा, मनस्ताप देणारा, आणि हिंसक होतो, तरी माझ्यावर दया

दाखविण्यात आली. तो पर्यंत मी विश्‍वासणारा नव्हतो, म्हणून अज्ञानामुळे मी तसा वागलो. १४ परंतु विश्‍वास आणि दया जी मशीहा येशूवाह मध्ये सापडते, ती आपल्या अदोनाईच्या कृपेने ओसंडून वाहिली.

१५ एक विश्वासनीय वचन आहे, जे स्विकारावयास पूर्णपणे योग्य आहे. येशूवाह मशीहा पाप्यांना तारावयास या जगात आला, मी त्या पाप्यातील पहिला आहे. १६ परंतु केवळ याच हेतूने, माझ्यावर दया दाखविण्यात आली यासाठी की, माझ्यासारख्या अत्यंत वाईट पाप्याच्या उदाहरणावरून पुढील काळात, जे त्याजवर विश्‍वास ठेवतील, त्यांना अनंतकाळचे जीवन मिळावे. १७ आता अनंतकाळचा मेलेक (राजा) जो अविनाशी, व अदृश्य आहे. अशा एकाच याव्हे एलोहिमला महिमा, आणि गौरव अनंतकाळासाठी असो आमेन. १८ तीमथ्या माझ्या मुला, मी तुला तुझ्याविषयी पूर्वीच सांगण्यात आलेल्या संदेशानुसार ही आज्ञा सोपवीत आहे. यासाठी की, सुयुद्ध करण्यात तिचा उपयोग करता यावा. १९ तुम्हांला विश्‍वास आणि चांगला विवेक असावा. कित्येकांनी चांगला विवेक नाकारून विश्‍वास रूपी तारू उद्ध्वस्त केला आहे. २० त्यात हुमनाय आणि आलेक्सांद्र आहेत, त्यांना मी सैतानच्या स्वाधीन केले आहे. यासाठी की, याव्हे एलोहिम विरूद्ध न बोलण्याविषयी त्यांनी शिकावे.

**२**.१ सर्वात प्रथम मी कळकळीने विनंती करतो की, मागण्या, प्रार्थना, विनंत्या, व आभारप्रदर्शन, सर्व माणसांच्या वतीने करावे. २ आणि विशेषतः राजांच्या वतीने करावे, आणि अधिका-याच्या वतीने करावे. प्रार्थना करा की, आम्हांला स्थिर, शांत, आणि याव्हे एलोहिमच्या पूर्ण भक्तीत सन्मानाने जगता यावे. ३ हे आपला यशाह (तारणारा) याव्हे एलोहिम याच्या दृष्टीने चांगले, व स्विकार करण्यास योग्य आहे. ४ ज्याला सर्व लोकांचे तारण व्हावे, आणि त्यांनी सत्य समजावे, असे वाटते. ५ कारण फक्त एकच याव्हे एलोहिम आहे. आणि याव्हे एलोहिम व मनुष्य, यांच्यामध्ये एकच मध्यस्थ आहे. तो म्हणजे मशीहा येशूवाह, जो स्वतः मनुष्य होता. ६ सर्व लोकांच्या पापांची खंडणी म्हणून, त्याने स्वतःला दिले. अशा प्रकारे याव्हे एलोहिमच्या योजनेविषयी त्याने योग्य वेळी साक्ष दिली. ७ आणि या साक्षीचा प्रसार करण्यासाठी मला घोषणा करणारा, आणि प्रेषित (मी खरे सांगतो, खोटे सांगत नाही) असा विदेशी लोकांमध्ये विश्‍वास आणि सत्याचा शिक्षक म्हणून नेमण्यात आले.

८ म्हणून प्रत्येक ठिकाणी पुरूष्यांनी प्रार्थना करावी, अशी माझी इच्छा आहे. ते प्रार्थना करीत असताना, त्यांनी आपले हात उंचवावेत. जे याव्हे एलोहिमला क्वादोश (पवित्र) असे आहेत, व असे न रागावता, व न भांडण करता करावे. ९ त्याच प्रमाणे, माझी अशी इच्छा आहे की, स्त्रियांनी स्वतःला सध्यासुध्या पोशाखाने, नम्रतेने, मर्यादेने, शोभित करावे. त्यांनी वेगळया पद्धतीच्या केसरचना करू नयेत. तसेच सोने, किंवा मोती, किंवा महाग कपडे वापरू नयेत. १० उलट याव्हे एलोहिम साठी समर्पित जीवन जगणा-या स्त्रियांनी, स्वतःला चांगल्या कृत्यांनी सुशोभित करणे, अगदी योग्य आहे.११ स्त्रीने शांतपणे पूर्ण अधीनतेने शिकावे. १२ मी स्त्रीला शिकविण्याची परवानगी देत नाही, किंवा पुरूष्यावर अधिकार गाजवण्यास परवानगी देत नाही. त्याऐवजी तिने शांत राहावे. १३ मी असे म्हणतो, कारण प्रथम आदाम निर्माण करण्यात आला, नंतर हव्वा.१४ आणि आदाम फसविला गेला नाही, तर हव्वा फसविली गेली. आणि ती पापात पडली. १५ परंतु स्त्रिया जर विश्वास, प्रीति, पवित्रता, व योग्य आत्मसंयमनात राहिल्या, तर बालकाला जन्म देण्यामुळे त्यांचे तारण होईल.

**३**.१ ही सत्य वचने आहे. जर कोणी मंडळीत अध्यक्ष (सर्वांगीण काळजीवाहक) होण्याची इच्छा धरतो, तर तो चांगल्या कामाची इच्छा धरतो. २ आता अध्यक्षाने त्याचे जीवन लोकांची टीका करू नये, अशा रीतीने जगावे. त्याला एकच बायको असावी, ३ तो मद्य पिणारा नसावा, तो हिंसक वृत्तीचा नसावा, तर तो सौम्य, आत्मसंयमी, आदरणीय, व आदरातिथ्य करणारा असावा. तो शिकविण्यात प्रवीण असावा. ४ तो पैशावर प्रेम करणारा नसावा, त्याने त्याच्या कुटूंबाचे चांगले पुढारीपण केलेला असावा, आणि त्याने त्याची लेकरे त्याच्या आज्ञेत ठेवावीत. ५ जर एखाद्याला स्वतःच्या कुटूंबाची देखभाल करता येत नसेल, तर तो याव्हे एलोहिमच्या मंडळीची काळजी कशी घेईल? ६ तो ह्या कार्यात नवशिका नसावा, म्हणजे तो गर्वाने फुगून जाणार नाही. व सैतानाला जशी शिक्षा झाली, तशी शिक्षा होऊन त्याचा अंत होणार नाही. ७ आणखी म्हणजे बाहेरच्या लोकांमध्ये त्याचे चांगले नाव असावे.

यासाठी की, त्याच्यावर टीका होऊ नये, व त्याने सैतानाच्या जाळयात सापडू नये.

८ त्याच प्रमाणे, विशेष मदतनीस (सेवक) आदरणीय असावेत. ते दुतोंडी, किंवा मद्यपान करणारे, किंवा घाणरडया लाभाची आवड धरणारे नसावे. ९ याव्हे एलोहिमने जे आम्हांला प्रगट केले आहे, ते आमच्या विश्वासाचे सखोल सत्य त्यानी शुद्ध विवेकाने धरून ठेवावे. १० आणि वडिलांप्रमाणे यांचीसुद्धा प्रथम परीक्षा व्हावी. मग जर त्यांच्या विरूद्ध असे आढळले नाही, तर त्यांनी मदतनीसाचे काम करावे. ११ त्याच प्रमाणे (विशेष मदतनीस) स्त्रियांनाही आदरणीय असावे. त्या चुगलखोर नसाव्यात, तर सौम्य, व प्रत्येक बाबतीत विश्वासनीय असाव्यात. १२ जे खास मदतनीस आहेत, त्यांना फक्त एकच बायको असावी, आणि त्यांनी त्यांच्या मुलांची, व कुटूंबाची चांगल्या प्रकारे काळजी घ्यावी. १३ कारण मदतनीस म्हणून जे चांगली सेवा करतात, ते त्यांच्यासाठी आदरणीय स्थान मिळवितात, आणि मशीहा येशूवाह मध्ये त्यांचा विश्वासात महान आत्मविश्वास मिळवितात.

१४ मी तुझ्याकडे लवकरच येण्याची इच्छा धरून असलो, तरी मी तुला या गोष्टी लिहित आहे. १५ यासाठी की, जरी मला उशीर झाला, तरी याव्हे एलोहिमच्या घरात, म्हणजे जिवंत याव्हे एलोहिमच्या मंडळीत, एखाद्या व्यक्तीने कसे वागावे, हे तुला माहीत असावे. ती मंडळी सत्याचा खांब, व पाया अशी आहे. १६ आणि आपल्या सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे. तो मानवी शरीरात दिसला, आत्म्याने तो नीतिमान ठरविला गेला, एलोहिम मालाक (देवदूतां) नी त्याला पाहिले होते, राष्ट्रांमध्ये तो गाजविला गेला. जगाने त्याच्यावर विश्वास ठेवला, आणि आकाशामध्ये तो गौरवाने घेतला गेला.

**४** .१ रूहुव्वा (आत्मा) स्पष्ट म्हणतो की, शेवटच्या काळांमध्ये, कित्येक लोक विश्वासापासून बहकून जातील. २ ज्या माणसाची सद्सद्विवेक बुद्धी तर डाग दिल्यासारखीच आहे अशा खोटे बोलणा-या माणसाच्या ढोंगाने ते फुसलाविणा-या आत्म्याच्या व अशुद्ध आत्म्यांच्या शिक्षणाच्या नादी लागतील. ३ लग्न करावयाची ते मनाई करितील, आणि विश्वास ठेवणारे व सत्य समजणारे, ह्यांनी उपकारस्तुति करून ज्यांचा उपभोग घ्यावयाचा, अशी याव्हे एलोहिमने निर्माण केलेली अन्न वर्ज्य करावी, असे सांगतील. ४ कारण याव्हे एलोहिमने निर्माण केलेली प्रत्येक गोष्टी चांगली आहे. आणि उपकारस्तुति करून घेतलेले काही वर्ज्य नाही. ५ कारण याव्हे एलोहिमचे वचन व प्रार्थना ह्यांनी ते शुद्ध होते.

६ तेंव्हा बंधु, जर तू या गोष्टी मशीहा ही बंधुभगिनींना शिकविल्या, तर तू जो सत्यात व विश्वासात वाढलास, व चांगल्या शिक्षणाला अनुसरलास, तो तू मशीहा येशूवाहचा चांगला सेवक होशील. ७ परंतु अनीतीच्या व आयाबायांच्या कहांण्यापासून दूर राहा. आणि याव्हे एलोहिमच्या सूभक्तीमध्ये सतत रहाण्याची सवय ठेव.८ कारण शारीरिक शिकवणुकीला अल्प महत्व आहे, पण याव्हे एलोहिमच्या सेवेला सर्व प्रकारे महत्व आहे. कारण ते सध्याच्या जीवनाविषयी आणि भविष्यातील जीवनाविषयी आशिर्वादाचे अभिवचन आहे. ९ हे सत्य व विश्वासनीय परिपूर्ण वचन आहे, ते स्विकारावयास योग्य आहे. १० म्हणून आम्हीं जास्त काम करतो, आणि धडपड करतो, कारण आम्हीं जो सर्व लोकांचा व विशेषेकरून जे विश्वास ठेवतात, अशा विश्वासणा-यांचा विशेषकरून तारणारा आहे, त्या जिवंत याव्हे एलोहिम वर आशा ठेवली आहे.

११ ह्या गोष्टी आज्ञा करून व सांगून शिकव.१२ कोणीही तुझ्या तरूण्याला तुच्छ मानू नये, त्याऐवजी विश्वासणा-यांसाठी तू तुझ्या बोलण्याने, तुझ्या वागण्याने, तुझ्या प्रीति दर्शविण्याने, तुझ्या असलेल्या विश्वासाने, व तुझ्या शुद्ध जीवनाने, त्यांचा आदर्श हो. १३ मी येईपर्यंत लोकांमध्ये, याव्हे एलोहिमचे वचन वाचण्यात, बोध करण्यात, व शिकविण्यात, स्वतःला तत्पर ठेव. १४ जेंव्हा वडील जनांनी तुझ्यावर हात ठेवला, त्यावेळी भविष्यवादाकडून तुला देण्यात आलेले जे कृपादान तुझ्यामध्ये आहे, त्याविषयी दुर्लक्ष करू नकोस. १५ या सर्व गोष्टींकडे पूर्ण लक्ष दे, त्यात पूर्ण गढून जा. यासाठी की, तुझी प्रगती सर्व लोकांना दिसून यावी, १६ आपणांकडे व आपल्या शिकवणुकीकडे लक्ष दे, त्यामध्ये टिकून राहा. असे केल्याने तू स्वतःचे, व जे तुझे ऐकतात, त्यांचे तारण साधिशील.

**५** .१ वडील माणसाला टाकून बोलू नको, उलट वडिलांप्रमाणे त्याला बोध कर. २ तरूणांना भावासारखे, वृद्ध स्त्रियांना आईसारखे,

तरूण स्त्रियांना बहिणीसारखे, पूर्ण शुद्ध भावाने बोध कर•३ ज्या विधवा खरोखरच निराधार आहेत, त्यांची काळजी घे• ४ पण जर कोणी विधवेला मुले किंवा नातवंडे आहेत, त्यांनी प्रथम आपल्या घरच्यांशी धार्मिकतेने वागायला, व आपल्या वडिलांचे उपकार फेडायला शिकावे• कारण हे याव्हे एलोहिमच्या दृष्टीने चांगले, व त्याला मान्य आहे• ५ तर जी विधवा खरोखरच एकटी पडली आहे, तिने याव्हे एलोहिम वर आपली आशा ठेवली आहे, आणि रात्रंदिवस विनंत्या, व प्रार्थना करीत राहते• ६ परंतु जी विधवा चैनीत राहते, ती जरी जिवंत असेल, तरी ती खरोखर मेलेली आहे• ७ म्हणून लोकांना याविषयी निक्षून सांग• यासाठी की, कोणालाही त्यांच्याकडे दोष दाखविण्यास वाव राहणार नाही• ८ पण जर कोणी त्याच्या स्वतःच्या नातेवाईकासाठी, आणि विशेषतः त्याच्या कुटूंबातील जवळच्यांसाठी तरतूद करीत नाही, तर त्याने विश्वास नाकारलेला आहे• व तो अविश्वासू माणसांपेक्षा वाईट आहे• ९ एखादी विधवा जी कमीत कमी साठ वर्षांची असेल, जिला सोडचिठ्ठी देण्यात आली नाही, व जिचे दुस-यांदा लग्न झाले नाही, अशाच स्त्रियांची विधवा म्हणून नोंद घ्यावी• १० चांगले काम करण्याबद्दल तिचा नावलौकिक असेल, व तिने मुलाबाळांना वाढवल असेल, जिने अनोळखी लोकांचे स्वागत केले असेल, व पवित्रांचे पाय धुतले असतील, जिने संकटात पडलेल्यांना मदत केली असेल, जी सर्व चांगल्या कामास अनुसरली असेल, तिला खास यादीत नोंद करून घ्यावी• ११ पण तरून विधवांची यादीत नोंद करण्याचे टाळावे• कारण जेंव्हा त्या मशीहाला सोडून अविचारी होतात, तेंव्हा त्यांनी पुन्हा लग्न करावेसे वाटते• १२ आणि त्या दोषी धरल्या जातील, कारण त्यांनी त्यांचे मूळ वचन मोडलेले असते• १३ आणखी त्या आळशी बनतात, व घरोघरी फिरताता•त्या आळशी बनतात एवढेच नाही, तर इतर लोकांच्या भानगडीत स्वतःला गुरफटून घेतात, व इतरांविषयी खोटेनाटे बोलतात• ज्या गोष्टी बोलू नयेत, त्या गोष्टी बोलतात• १४ यासाठी माझी अशी इच्छा आहे की, तरूण विधवांनी लग्न करावीत, मुलांचे संगोपण करावे, व आपले घर चालवावे• आपल्या शत्रूला आपली निंदा करण्यास, वाव मिळू देऊ नये• १५ मी तर असे म्हणतो, कारण काही विधवा सैतानामागे जाण्यासाठी वळाल्या देखील आहेत• १६ जर एखाद्या विश्वासणा-या स्त्रीच्या घरात विधवा स्त्रिया असतील, तर तिने त्यांची काळजी घ्यावी, व मंडळीवर भार टाकू नये• यासाठी की, ज्या खरोखरच विधवा आहेत त्यांना ते मदत करू शकतील• १७ जे वडील मंडळीची चांगल्या प्रकारे अधिकार चालवतात, विशेषेकरून जे उपदेश करण्याचे व शिकविण्याच्या कामाकरिता श्रम घेतात, ते दुप्पट सन्मानास योग्य गणले जावे• १८ कारण शास्त्रलेखात सांगितले की, बैल मळणी करीत असता, त्याला मुसके घालू नको, आणि कामकरी आपल्या मजुरीस योग्य आहे•

१९ दोन किंवा तीन साक्षीदारांनी पाठींबा असल्याशिवाय, वडिलांवरील दोषारोपाचा आरोप दाखल करून घेऊ नकोस• २० जे पाप करीत राहतात, त्यांचा जाहीरपणे निषेध कर• यासाठी की, इतरांनाही भय वाटावे• २१ याव्हे एलोहिम व येशूवाह मशीहा आणि निवडलेले मालाक (दूत) यांच्यासमोर मी निक्षून आज्ञा करतो की, तू कोणताही प्रकारची अढी न बाळगता, या गोष्टी पाळ, व पक्षपाताने काहीही करू नको• २२ याव्हे एलोहिमच्या सेवेसाठी नेमणूक करण्यासाठी घाईने कोणावरही हात ठेवू नको, आणि दुस-यांच्या पापांचा भागीदार होऊ नको, आपणाला शुद्ध राख•२३ यापुढे नुसतेच पाणी पीत राहू नको, तर आपल्या पोटासाठी म्हणजे आपल्या वारंवार होणा-या दुखण्यासाठी द्राक्षारसाचा वापर कर• २४ कित्येक माणसांची पापे उघड असून ती अगोदर न्यायनिवाडयाकरिता जातात , आणि कित्येक जण त्यांच्या मागून जातात• २५ त्याच प्रमाणे, चांगली कामेही उघड आहेत, आणि जी गुप्त आहेत, ती गुप्त राहू शकत नाही•

**६**•१ जितके दास म्हणून जुवाखाली आहेत, तितक्यांना आपापल्या धन्यांस सर्व सन्मानास योग्य मानावे• यासाठी की, याव्हे एलोहिमचे नाव आणि शिकवण यांची निंदा होऊ नये• २ आणि ज्यांना विश्वासनारे धनी आहेत, त्यांनी हे भाऊ आहेत, म्हणून यांचा अवमान करू नये, तर विशेषेकरून यांचे दास्य करावे• हे जे तुमची सुसेवा घेणारे आहेत, ते विश्वासणारे व प्रिय आहेत, या गोष्टी शिकवून बोध कर• ३ जर कोणी काही वेगळे शिकवितो, व मशीहा येशूवाह आपला अदोनाई याची शुद्ध सुवचने, आणि सुभक्तीस अनुसरणारी शिकवण यास मान्य करीत नाही, ४ तर तो गर्वाने फुगलेला आहे, त्याला काहीच समजत नाही• तो केवळ वादविवाद, व शब्दयुद्ध, ह्यांमुळे वेडा बनला आहे• ह्यांपासून हेवा, कलह, अपशब्द, दुस-याविषयी दुष्ट संशय, ही उत्पन्न होतात• ५ मन

बिघडलेल्या, सत्यास मुकलेल्या, भक्ती हे कमाईचे साधन आहे, अशी कल्पना करणा-या माणसांची एकसारखी भांडणे होतात. ६
चित्तसमाधानासह भक्ती हा तर मोठाच लाभ आहे. ७ आपण जगांत काही आणिले नाही, आपल्याला त्यांतून काही नेता येत नाही.
८ आपल्याला अन्न वस्त्र असल्यास तेवढयांत तृप्त असावे. ९ परंतु जे धनवान होऊ पाहतात, ते परीक्षेत पाशांत, आणि माणसांना
नाशांत व विध्वंसात बुडविणा-या अशा मूर्खपणाच्या व बाधक वासनांत सापडतात. १० कारण द्रव्याचा मोह सर्व प्रकारच्या वाईटाचे
एक मूळ आहे. त्याच्या पाठीस लागून कित्येक विश्वासापासून बहकले आहेत. आणि त्यांनी आपणास फार खेदांने भोसकून घेतले
आहे.

११ हे एलोहिमच्या माणसा, तू या गोष्टीपासून दूर राहा. आणि नीतिमत्त्व, सुभक्ति, विश्वास, प्रीति, धीर, व सौम्यता, ह्यांच्या पाठीस
लाग. १२ विश्वासासंबंधीचे जे सुयुद्ध ते कर, युगानुयुगाच्या जीवनाला बळकट धर, त्यासाठीच तुला पाचारण झाले आहे. आणि तू
पुष्कळ साक्षीदारांदेखत तो चांगला स्विकार केला. १३ सर्व प्राणिमात्राला जीवन देणारा जो याव्हे एलोहिम त्याच्यासमोर आणि ज्या
मशीहा येशूवाहने पंतय पिलातासमक्ष स्वतः विषयी चांगला स्विकार केला, त्याच्यासमोर मी तुला निक्षून सांगतो १४ आपला अदोनाई
येशूवाह मशीहा प्रगट होईपर्यंत, तू ही आज्ञा निष्कलंक व अदूष्य राख. १५ जो धन्य एकच सार्वभौम राजांचा राजा आणि अदोनाई
चा अदोनाई ज्या एकालाच अमरत्व आहे, जो अगम्य प्रकाशात राहतो, ज्याला कोणा माणसाने पाहिले नाही, १६ आणि कोणी पाहू
शकत नाही, तो ते त्याचे प्रगट होणे यथाकाळी दाखवील, त्याला सन्मान व पराक्रम युगानुयुग आहे, आमेन.

१७ या युगातील श्रीमंतास आज्ञा कर की गर्विष्ठ होऊ नका. पैसा जो चंचल आहे, त्यावर त्यांनी आशा ठेवू नये, परंतु याव्हे एलोहिम
जो विपुलपणे आवश्यक असणा-या सर्व गरजा पुरवितो, त्यावर आशा ठेवावी. १८ चांगले ते करावे, सत्कर्माविषयी धनवान असावे,
परोपकारी, व दानशूर असावे, १९ जे खरे जीवन ते बळकट धरण्यास, पुढील काळी चांगला आधार होईल, असा साठा स्वतःसाठी
करावा. २० हे तीमथ्या, तुझ्या स्वाधीन केलेली ठेव सांभाळ, अधर्माच्या रिकाम्या वटवटीपासून, आणि जिला विद्या हे नाव चुकीने
दिले गेले आहे, तिच्या परास्परविरोधी विश्वासापासून दूर राहा. २१ कित्येक ती विद्या स्विकारून, विश्वासापासून बहकून गेले आहेत.
तुझ्याबरोबर याव्हे एलोहिमची कृपा असो, आमेन.

............ समाप्ती ............

# .प्रेषित पौलाने तीमथ्याला लिहिलेले दुसरे पत्र.

## .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने हे दुसरे पत्र तीमथ्याला लिहिलेले आहे. ह्याचा लेखन काळ, इसवी सन ६६ ते ६७ मध्ये लिहिलेले असावे, असे तज्ञाचे मत आहे. हे पत्र पौलाने रोममध्ये तुरूंगात असताना लिहिलेले दिसून येते. हे पौलाचे शेवटचे पत्र होते. त्यानंतर पौलाचा रोम मध्येच शिरेच्छेद करण्यात आला. मशीहा ही जीवन कशा व कोणत्या प्रकारे त्या मशीहा मध्येच जगायचे, ह्याबाबत स्वतःच्या अनुभवाच्याव्दारे, तो स्वतःच्या मुलाला, म्हणजे तीमथ्याला लिहून शिकवित आहे.

* * * * * * * * * * * * * * *

१.१ येशूवाह मशीहा मध्ये असलेल्या जीवनाविषयीच्या अभिवचनाची घोषणा करण्यास, याव्हे एलोहिमच्या इच्छेने पाठविलेला,
मशीहा येशूवाहचा प्रेषित पौल याजकडून, २ प्रिय मुलगा तीमथ्य याला, याव्हे एलोहिम अव्वा, आणि आमचा अदोनाई येशूवाह
मशीहा याच्या पासून, हेख्न (कृपा) सेदेओ (दया) व शालोम (शांति) असो.

३ माझ्या पूर्वजांप्रमाणे ज्या याव्हे एलोहिमची मी शुद्ध विवेकभावाने भक्ती करतो, त्या याव्हे एलोहिमचे मी उपकार मानतो, आणि
रात्रंदिवस माझ्या प्रार्थनेत, तुझी नेहमी आठवण करतो. ४ माझ्यासाठी तू ढाळलेल्या अश्रूंची आठवण करताना, तुला भेटण्याची
आतुरतेने वाट पाहतो. यासाठी की, मी आनंदाने भरून जावे. ५ तुझ्यातील प्रामाणिक विश्वासाचे मला स्मरण होते, जो पहिल्यांदा
तुझी आजी लोईस मध्ये होता, आणि तुझी आई युनीके मध्ये होता. आणि माझी खात्री आहे की, तोच विश्वास तुझ्यामध्येही आहे.
६ या कारणासाठी मी तुला आठवण करून देतो की, जेंव्हा मी माझे हात तुझ्यावर ठेवले, तेंव्हा याव्हे एलोहिमच्या दानाची जी माओर
(ज्योत) तुला मिळाली ती प्रज्ज्वलित ठेव. ७ कारण याव्हे एलोहिम आम्हांला भित्रेपणाचा रूहुव्वा (आत्मा) दिला नाही, तर तो
गेवुराह (सामर्थ्याचा) व अहेद (प्रीति) चा व सावध मनाचा रूहुव्वा (आत्मा) दिला आहे. ८ म्हणून आपल्या अदोनाई विषयी साक्ष
देण्यासाठी लाज धरू नको, किंवा मी जो त्याच्या साठी कैद झालो, त्या माझी लाज धरू नको. तर माझ्याबरोबर सुवार्तेसाठी दुःख
सोस, याव्हे एलोहिम तुला जे सामर्थ्य देतो, त्याच्या साहाय्याने दुःख सोस. ९ त्याने आम्हांला तारले, आणि त्याने आम्हांला समर्पित
जीवनासाठी पाचारण केले. आम्ही काही सत्कृत्ये केली म्हणून नाही, तर त्याच्या स्वतःच्या हेतूने, व कृपेने केले. ही कृपा काळाच्या
सुरूवातीलाच याव्हे एलोहिम ने मशीहा येशूवाह मध्ये आम्हांला दिली होती.१० पण जी आता आम्हांला आमचा तारणारा मशीहा
येशूवाह याच्या प्रगट होण्याचे दाखवली गेली आहे. मशीहाने मरणाला नाहीशे केले, आणि सुवार्तेव्दारे अमरत्व व जीवन प्रकाशात
आणले. ११ मला त्या सुवार्तेचा उपदेशक, प्रेषित, आणि रब्बुनी (शिक्षक), असे नेमले होते. १२ आणि या कारणांमुळे मी सुद्धा दुःख
भोगीत आहे. परंतु मी लाजत नाही, कारण ज्याच्यावर मी विश्वास ठेवला आहे, त्याला मी जाणतो. आणि माझी खात्री पटली आहे
की, तो दिवस येईपर्यंत, त्याने जे माझ्याकडे सोपविले आहे, त्याचे तो रक्षण करील.१३ माझ्याकडून ऐकून घेतलेल्या सत्य शिक्षणाचा
नमुना दृढ धर. आणि मशीहा येशूवाह मध्ये सापडणा-या विश्वासाने, व प्रीतिने ते कर.१४ आपणामध्ये वस्ती करणा-या क्वादोश
रूहुव्वा (पवित्र आत्म्या) व्दारे त्या चांगल्या ठेवीचे रक्षण कर.

१५ आशिया प्रांतामध्ये असणा-या सर्वांनी मला सोडले आहे, हे तुला ठाऊकच आहे. त्यामध्ये फुगल व हर्मगनेस आहेत. १६
अनेसिफराच्या घरावर अदोनाई दया दाखवो. कारण त्याने अनेकदा माझे समाधान केले आहे आणि माझ्या तुरूंगात असण्याची त्याला
लाज वाटली नाही. १७ उलट रोममध्ये असताना त्याने माझा तपास लागेपर्यंत कसोशीने माझा शोध केला. १८ अदोनाई करो, आणि
त्याला त्या दिवशी अदोनाई कडून दया मिळो. कारण माझ्या इफिसातील वास्तव्य काळात त्याने अनेक प्रकारे माझी सेवा केली, हे
तुला चांगले माहीत आहे.

२.१ माझ्या मुला, तू मशीहा येशूवाह च्या ठायी असलेल्या कृपेत बलवान हो. २ माझ्याकडून ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमोर
ऐकल्यास त्या घे, व इतरांना शिकविण्यास, समर्थ अशा विश्वासू लोकांवर सोपवून दे. ३ मशीहा येशूवाह चा चांगला सैनिक, या

नात्याने आपल्या दुःखाच्या सहभागी बनून राहा•४ सैनिकाचे काम करणारा कोणीही जीवनातील संसाराच्या कामकाजात अडकत नाही• यासाठी की, त्याला आपल्या वरिष्ठ अधिका-याला संतुष्ट करता यावे•

५ जर कोणी मैदानी स्पर्धेत भाग घेतो, तर नियमाप्रमाणे स्पर्धेत भाग घेतल्याशिवाय, त्याला विजयाचा मुकूट मिळविता येत नाही• ६ अति श्रम करणारा शेतकरी, हा पहिल्या फळाचा वाटा घेणारा असावा• ७ मी काय म्हणतो, याविषयी तू विचार करावा, अशी माझी इच्छा आहे• अदोनाई तुला या सर्व गोष्टी समजून घेण्याचे सामर्थ्य देईल• ८ येशूवाह मशीहा जो मेलेल्यांतून उठला, व दाविदाचा वंशज आहे, त्याची आठवण करीत राहा• जी सुवार्ता मी सांगतो, तिचा हा सार आहे• ९ कारण सुवार्तेमुळे मी दुःख सहन करतो येथपर्यंत की, गुन्हेगाराप्रमाणे साखळदंडानी मला बांधण्यात आले• पण याव्हे एलोहिमचे शिक्षण बांधले गेले नाही• १० म्हणून याव्हे एलोहिम च्या निवडलेल्यांसाठी मी सर्व काही सोशीत आहे• म्हणजे त्यांनाही मशीहा येशूवाह व्दारे मिळणारे यशाह (तारण), व अनंतकाळचे गौरव प्राप्त व्हावे•११ येथे एक विश्वासनीय सत्य आहे• जर आम्ही त्याच्यासह मेलेले आहोत, तर त्याच्याबरोबर जीवंतही राहू• १२ जर आम्ही दुःखसहन केले, तर आम्ही त्याच्याबरोबर राज्यसुद्धा करू• जर आम्ही त्याला नाकारले, तर तोही आम्हांला नाकारील• १३ जरी आम्हीं अविश्वासू आहोत, तरी तो अजूनही विश्वासू आहे• कारण तो स्वतःला नाकारू शकत नाही•

१४ लोकांना या गोष्टीची आठवण करून देत राहा• याव्हे एलोहिम समोर त्यांना निक्षून ताकीद दे की, शब्दयुद्ध करू नका• ते कशाच्याहि उपयोगी न पडता, ऐकणा-यांच्या नाशास कारण होते• १५ याव्हे एलोहिमने पसंत केलेला, व याव्हे एलोहिमचे वचन योग्य रीतीने शिकवण्यास पात्र असा, आणि जे काम करतोस, त्यात लाज वाटण्यासारखे काही ही नसलेला, असा याव्हे एलोहिमने पसंत केलेला, कामकरी होण्याचा प्रयत्न कर• १६ पण ऐहिक वादविवाद टाळ, कारण ते लोकांना याव्हे एलोहिम पासून अधिकधिक दूर नेतात• १७ आणि अशा प्रकारे वादविवाद करणा-यांची शिकवण कर्करोगा सारखी पसरते• या लोकांमध्ये हुमनाय आणि फिलेत आहे• १८ जे सत्यापासून दूर गेले आहेत ते म्हणतात की, मरणानंतरचे सर्व लोकांचे पुनरूत्थान आधीच झाले आहे, व ते काही लोकांच्या विश्वासाचा नाश करीत आहेत• १९ तथापि याव्हे एलोहिमने घातलेला भक्कम पाया त्यावर असलेला शिक्का, यासह स्थिर राहतो• अदोनाई जे त्याचे आहेत त्यांना ओळखतो• “जो कोणी अदोनाईचे नाव घेतो त्याने वाईटापासून दूर राहावे•”

२० मोठया घरात केवळ सोन्याचांदीची भांडी असतात असे नाही, तर लाकूड व माती यापासून बनविलेलीही असतात• काही प्रतिष्ठेच्या कामात वापरण्यासाठी असतात, तर दुसरी काही कनिष्ठ प्रतीच्या कामी वापरण्यासाठी नेमलेली असतात• २१ म्हणून जर मनुष्य या अशुद्धतेपासून स्वतःला शद्ध करील, तर तो मानसन्मानास योग्य असे भांडे होईल, व धन्यासाठी प्रत्येक समर्पित कामासाठी क्वादोश (पवित्र) केलेले, व उपयुक्त पात्र होईल•

२२ तू तर तरूणपणाच्या वासनांपासून दूर पळ, जे अदोनाईला शुद्ध आत्म्याने हाक मारतात, ते अदोनाई वर विश्वास ठेवतात• अशांच्या बरोबर नीतिमत्व, विश्वास, प्रीति, आणि शांती, यांच्या मागे चाल• २३ नेहमी मूर्ख व निरर्थक अशा वादविवादापासून दूर राहा• कारण तुला माहीत आहे की, त्यामुळे भांडणे निर्माण होतात• २४ याव्हे एलोहिमच्या सेवकाने भांडू नये, तर सर्व लोकांशी दयाधर्माने वागावे, तसेच शिकवणारा कुशल व सहनशील असावे• २५ जे त्याला विरोध करतात, त्यांना सौम्यतेने शिक्षण द्यावे• या आशेने की, याव्हे एलोहिमने त्यांना पश्चात्ताप करण्यास सहाय्य करावे•आणि त्यांना सत्याची ओळख व्हावी• २६ आणि सैतानाने त्यांना धरून ठेविल्यानंतर ते त्याच्या पाशांतून सुटून याव्हे एलोहिमच्या इच्छेस वश होण्याकरिता शुद्धीवर येतील•

**३**•१ शेवटच्या काळी कठीण दिवस येतील हे लक्षात ठेव• २ कारण मानसे स्वार्थबुद्धी, धनलोभी, बढाईखोर, गर्विष्ठ, निंदक, आईवडिलांना न मानणारे, अनुपकारी, अपवित्र, ३ ममताहीन, शांतताव्देषी, चहाडखोर, असंयमी, क्रूर, चांगल्याचा अनादर करणारी, ४ विश्वासघातकी, हूड, गर्वांनी फुगलेली, याव्हे एलोहिम वर प्रीति करण्याऐवजी, सुखविलासाची आवड धरणारी• ५ सुभक्तीचे केवळ भाह्य स्वरूप दाखवून, तिचे सामर्थ्या नाकारणारी, अशी ती होतील• त्यांच्यापासूनही दूर राहा• ६ मी हे सांगतो, कारण त्यांच्या

पैकी काही घरात शिरकाव करतात, व पापाने भरलेल्या, सर्व प्रकारच्या वासनांनी बहकलेल्या, कमकुवत स्त्रियांवर ताबा मिळवितात.
७ अशा स्त्रिया नेहमी शिकण्याचा प्रयत्न करतात, पण सत्याच्या पूर्ण ज्ञानांपर्यंत, त्या कधीही जाऊ शकत नाहीत. ८ याव्वेस, व
यांब्रेस यांनी जसा मोशेला विरोध केला, तसा ही माणसे सत्याला विरोध करतात. ज्यांची मने भ्रष्ट आहेत, व सत्य अनुसरण्यात
अयशस्वी ठरलेली, अशी ही माणसे आहेत. ९ ते पुढे अधिक प्रगती करणार नाहीत, कारण जसा यान्नेस, व याब्रेस यांचा मूर्खपणा
प्रकट झाला, तसा यांचा मूर्खपणा सर्वांना प्रकट होईल.

१० तरीही तू माझी शिकवण, वागणूक, जीवनातील माझे ध्येय, माझा विश्वास, माझा धीर, माझी प्रीति, माझी सहनशीलता, ही
पाळली आहेस. ११ अंत्युखिया, इकुन्या, आणि लुस्त्र, येथे ज्या गोष्टी माझ्या बाबतीत घडल्या, जो भयंकर छळ मी सोसला, ते माझे
दुःख तुला माहीत आहे! परंतु अदोनाई ने या सर्व त्रासांपासून मला सोडविले.
१२ खरे पाहता, जे जे मशीहा येशूवाह मध्ये शुद्ध जीवन
जगू इच्छितात, त्या सर्वांचा छळ होईल.
१३ पण दुष्ट लोक, व भोंदू लोक इतरांना वरचेवर फसवीत राहतील, आणि स्वतःही फसून,
अधिक वाईटाकडे जातील.

१४ पण तुझ्या बाबतीत ज्या गोष्टी तू शिकलास, व ज्या विषयी तुझी खात्री झाली आहे, त्या तू तशाच पुढे चालू ठेव. ती सत्ये ज्या
कोणापासून तू शिकलास, ते तुला ठाऊक आहे. तू त्यांच्यावर विश्वास ठेवू शकतोस. १५ आणखी तुला बाळपणापासून पवित्र
शास्त्रलेख माहीत आहेत. ते तुला मशीहा येशूवाह तील विश्वासाच्या व्दारे, तारण पावण्यासाठी ज्ञानवान करायला समर्थ आहेत. १६
संपूर्ण शास्त्रलेख याव्हे एलोहिम प्रेरित आहे, आणि तो शिक्षण, निषेध, सुधारणा, न्यायीपणाचे शिकवणे, याकरिता उपयोगी आहेत.
१७ यासाठी की, याव्हे एलोहिमचा माणूस पूर्ण व प्रत्येक चांगल्या कामास सज्ज व्हावा.

**४**.१ तर याव्हे एलोहिम च्या समक्ष, आणि अदोनाई येशूवाह मशीहा जो आपल्या प्रकटण्याच्या, व राज्याच्या वेळेस जिवंताचा व
मेलेल्यांचा न्याय करणार आहे. त्याच्यासमक्ष मी तुला निक्षून सांगतो की, २ वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा, सर्व
प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखीव, व निषेध कर व बोध कर. ३ कारण ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर
आपल्या कानाची खाज जिरावी म्हणून, ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी रब्बुनी ची गर्दी जमवितील. ४ आणि ते सत्य ऐकण्यापासून
फिरतील, व कल्पित कहाण्यांकडे वळतील, अशी वेळ येईल. ५ तू तर सर्व गोष्टीविषयी सावध ऐस, दुःख सोस, सुवार्तिकाचे काम
कर, तुला सोपविलेली सेवा पूर्ण कर.

६ कारण आता माझे अर्पण होत आहे, आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे. ७ जे सुयुद्ध ते मी केले आहे. धाव संपविली
आहे, विश्वास राखिला आहे. ८ आता जे राहिले ते हेच की, माझ्यासाठी नीतिमत्वाचा मुगूट ठेविला आहे. अदोनाई जो नीतिमान
न्यायाधीश आहे, तो त्या दिवशी मला तो मुकूट देईल. आणि तो केवळ मलांच नव्हे, तर त्याचे प्रगट होणे ज्यांना प्रिय झाले, त्या
सर्वांनाहि देईल.

९ तू होईल तितके करून माझ्याकडे लवकर ये. १० कारण देमासला ऐहिक सुख प्रिय असल्यामुळे, तो मला सोडून थेस्सलनीकास
गेला. केस्केस गलतीयास व तीत दालमतियास गेला.
११ लूक मात्र माझ्याजवळ आहे. मार्काला आपल्या बरोबर घेऊन ये. कारण
तो सेवेसाठी मला उपयोगी आहे. १२ तुखिकाला मी इफिसास पाठविले आहे. १३ माझा झगा त्रोवसांत कार्पाजवळ राहिला आहे, तो
येताना घेऊन ये. आणि पुस्तके विशेषेकरून चर्मपत्रेही आण. १४ आलेक्सांद्र तांबटाने माझे पुष्कळ वाईट केले, त्याची फेड त्याच्या
कृत्यांप्रमाणे अदोनाई करील. १५ त्याच्याविषयी तू ही जपून राहा. कारण तो आमच्या बोलण्यास फार आडवा आला होता.

१६ माझ्या पहिल्या जबाबाच्या वेळेस माझ्या बाजूचा कोणी नव्हता, सर्वांनी मला सोडिले होते. त्याबद्दल त्यांचा हिशेब घेण्यात न
येवो. १७ तरी अदोनाई माझ्याजवळ उभा राहिला, माझ्याकडून घोषणा पूर्णपणे व्हावी, आणि ती सर्व परराष्ट्रीयांनी ऐकावी, म्हणून

त्याने मला शक्ती दिली. आणि त्याने मला सिंहाच्या जवडयांतून मुक्त केले. १८ अदोनाई मला सर्व दुष्ट योजनापासून मुक्त करील, व आपल्या आकाशातील राज्यात घेण्यासाठी तारील, त्याला युगानुयुग गौरव असो आमेन.

१९ प्रिस्का अक्किला व अनेसिफराच्या घरची माणसे ह्यांना शालोम सांग.

२० एरास्त करिंथांत राहिला त्रफिम आजारी आला त्याला मिलेतात ठेवून आलो.

२१ होईल तितके करून हिवाळयापूर्वी ये.युवुल व पुदेस लीन व क्लौदिया व सर्व बंधू तुला शालोम सांगतात.

२२ अदोनाई रूहुव्वा (आत्म्या) तुझ्या बरोबर असो तुम्हांबरोबर हेख्न (कृपा) असो. आमेन.

............ समाप्ती ............

## • प्रेषित पौलाने तीताला लिहिलेले पत्र •

### • प्रस्तावना •

प्रेषित पौलाने मंडळया समर्थ करावे म्हणून, तीताला हे पत्र लिहिलेले होते •हे पत्र इसवी सन ६४ ते ६६ या कालावधीमध्ये लिहिले आहे • तीता हा केतांत बेटावर मंडळीची सेवा करीत होता • पौलाचा आध्यात्मिक ते मध्ये दुसरा नंबरचा दत्तक मुलगा, तीता हा होता •वडिलवर्गातील विश्वासणा-यांना विश्वासाच्या मूलभूत तत्वात स्थिर राखण्याची कामगिरी तीतावर सोपविली होती • मशीही विश्वासाच्या विरूद्ध असलेल्या तत्वांपासून मंडळीस शुद्ध करून तिची उभारणी करण्याबाबत मार्गदर्शक करण्यास प्रेषित पौलाने हे पत्र लिहिले होते • या दुष्ट जगात अदोनाई एलोहिमचा सेवकास कशा प्रकारे तोंड द्यावे लागते, ते तो सांगतो • मंडळयामध्ये छळ चालू असताना, व बाहेर जगात भ्रष्टवाद माजलेला असताना देखील, याव्हे एलोहिमची कृपा काय करू शकते • हे आम्हीं आपल्या आचरणाव्दारे इतरांन दाखवून दिले पाहिजे, असे प्रभावी जीवन जगवून दाखवावे • ह्या पत्रामध्ये वेगवेगळया विषयावर मंडळयांना प्रेषित पौलाने बोध केलेला आहे • ती बोध वचने सांगण्याची जबाबदारी पौलाने तीतावर टाकलेली पहावयास मिळते •

### • प्रेषित पौलाने तीताला लिहिलेले पत्र •

१ •१ याव्हे एलोहिमचा सेवक, व येशूवाह मशीहाचा प्रेषित पौल, याजकडून एलोहिमच्या निवडलेल्या लोकांच्या विश्वासात त्यांना मदत करण्यासाठी, मला पाठविण्यात आले • त्या लोकांना सत्याची ओळख करवून देण्यासाठी मला पाठविले • व ते सत्य लोकांना याव्हे एलोहिमची सेवा कशी करायची हे दाखविते •२ तो विश्वास आणि ते ज्ञान अनंतकाळच्या जीवनाच्या आमच्या आशेमुळे येते • काळाची सुरूवात होण्यापूर्वी याव्हे एलोहिमने, त्या जीवनाचे अभिवचन आम्हांला दिले • आणि याव्हे एलोहिम खोटे बोलत नाही • ३ याव्हे एलोहिमने आपल्या योग्य वेळी, त्या जीवनाविषयीचा संदेश जगाला प्रगट केला, एलोहिमने ते काम माझ्यावर सोपविले • त्या गोष्टीविषयी मी संदेश दिला, कारण आमच्या तारणा-या याव्हे एलोहिमने मला तसे करण्याची आज्ञा केली होती •४ विश्वासातील माझा खरा मुलगा तीता याला मी लिहीत आहे • याव्हे एलोहिम अब्बा, व मशीहा येशूवाह आपला येशूवाह (तारणारा), याजकडून तुला हेख्न (कृपा), सेदेओ (दया), व शालोम (शांती) असो •

५ मी तुला केत येथे सोडून या कारणासाठी आलो की, जे अजून अपूर्ण राहिले होते, ते तू व्यवस्थित करावेस, व मी तुला आज्ञा केल्याप्रमाणे प्रत्येक गावी वडील नेमावेत • ६ ज्याच्यावर दुराचरणाचा दोष नसेल, ज्याला एकच ईशाशह (बायको) असेल, ज्याला मुले असून ती विश्वासणारी असतील, ज्याच्यावर स्वैरचाराचे जीवन जगल्याचा आरोप नसेल, अशा प्रकारच्या व्यक्तीस नेमावे • ७ कारण अध्यक्ष (सर्वांगीण काळजी वाहक) हा याव्हे एलोहिमचा कारभारी असल्यामुळे, तो दोषी नसावा • तो उद्धट नसावा, त्याला लवकर राग येऊ नये, तो मद्यपान करणारा नसावा, तो भांडखोर नसावा, अप्रामाणिकपणे पैसे मिळविण्याची आवड नसणारा असा असावा •८ तर तो आदरतिथ्य करणारा, चांगुलपणावर अहेद (प्रीति) करणारा, शहाणा, नीतिमान, भक्तीशील, व स्वतःवर संयम ठेवणारा असावा • ९ विश्वासनीय संदेश जसा तो शिकविला गेला, त्याला दृढ राहावे • यासाठी की, हितकारक शिक्षणाने लोकांना बोध करण्यास समर्थ असावे • व जे विरोध करतात, त्यांची चूक कौशल्याने त्यांना पटवून द्यावी •

१० हे महत्वाचे आहे, कारण पुष्कळ लोक बंड करणारे आहेत • जे व्यर्थ गोष्टीविषयी वडबड करतात, व लोकांना फसवितात • मी विशेषेकरून जे सुंता झालेले आहेत, त्यांना संबोधून बोलत आहे • ११ त्यांची तोंडे बंद केलीच पाहिजेत • ज्या गोष्टी शिकवू नयेत, त्या ते शिकवीत आहेत • ते हे यासाठी करीत आहेत की, अयोग्य मार्गाने पैसे मिळवावेत • अशा रीतीने ते संपूर्ण घराण्याचा नाश करीत आहेत •१२ त्यांच्यापैकी एक केतीय नव्बी (संदेष्टा) स्वतः म्हणाला, “ केतीय नेहमीच खोटारडे आहेत, दुष्ट पशू, आणि आळशी खादाड आहेत •” १३ हे वाक्य खरे आहे, म्हणून नेहमीच त्यांना कडक रीतीने धमकाव • यासाठी की, त्यांनी विश्वासात खंबीर व्हावे • १४ आणि यहूदी भाकड कथा, व जे सत्य नाकारतात, अशा लोकांच्या आज्ञांकडे लक्ष देऊ नये • १५ शुद्ध असणा-या सर्वांना सर्व गोष्टी शुद्ध आहेत • पण ज्यांचे विचार, व विवेकभाव ही दोन्हीही पापाने भ्रष्ट झाली आहेत, व जे विश्वास ठेवीत

नाहीत, त्यांना काहीच शुद्ध नाही. १६ ते याव्हे एलोहिमला ओळखत असल्याचा दावा करतात, पण ते त्यांच्या कृत्यांनी याव्हे एलोहिमला ओळखल्याचे नाकारतात. ते अमंगळ, व आज्ञा मोडणारे, व कोणतेच चांगले कृत्य करण्यास लायक नसलेले, असे त्यांचे त्यांनीच दाखवून दिले आहे.

**२**.१ तू मात्र नेहमी सत्य, किंवा निकोप शिक्षणाला शोभणा-या अशा गोष्टी बोल.२ वडील माणसांची आत्मसंयमित आदरणीय, व शहाणे असावे, आणि विश्वासात प्रीतित, व सहनशीलतेत बळकट असावे. ३ त्याचप्रमाणे, वृद्ध स्त्रियांना आपल्या वागण्यात आदरणीय असण्याबाबत शिकीव. त्या चहाडखोर नसाव्यात, तसेच त्यांना मद्यपानाची सवय नसावी, व त्यांना जे चांगले तेच शिकवावे. ४ यासाठी की, त्यांनी तरूण स्त्रियांना त्यांच्या पतीवर प्रीति करण्यास, त्यांच्या मुलांवर प्रीति करण्यास शिकवावे. ५ त्यांची मर्यादाशील, व शुद्ध असण्यास, त्यांच्या घराची काळजी घेण्यास, व दयाळू असण्यास आपल्या पतीच्या अधीन असण्यास शिकवावे. यासाठी की, याव्हे एलोहिमच्या संदेशाची कोणालाही निंदा करता येऊ नये. ६ त्याचप्रमाणे तरूण मनुष्यांनी मर्यादाशील रहावे, यासाठी त्यांना बोध करावा. ७ प्रत्येक गोष्टीत स्वतःला तू चांगल्या कामाचा कित्ता असे दाखवून दे. तुझ्या शिक्षणात शुद्धता, व गंभीरता असावी. ८ ज्यावर कोणी टीका करू शकत नाही, असा चांगल्या बोलण्याचा उपयोग कर. यासाठी की, जे तुला विरोध करतात, त्यांनी लज्जित व्हावे. ९ गुलामांना सर्व बाबतीत त्यांच्या मालकांच्या अधीन राहण्यासाठी, व त्यांना संतोष देण्याविषयी, व उलट न बोलण्याविषयी शिकीव. १० तसेच चोरी करू नये, तर पूर्णपणे विश्वासूपणा दाखविण्यास सांग. यासाठी की, त्यांनी आपला तारणारा अदोनाई एलोहिम, याच्या शिकवणुकीला सर्व बाबतीत सन्मान मिळवून द्यावा.

११ कारण सर्व माणसांना याव्हे एलोहिमची तारणाची कृपा प्रगट झाली आहे. १२ ती आम्हांला शिकविते की, आपण अभक्ती व ऐहिक गोष्टींची हाव यांचा नकार करावा, आणि या सध्याच्या जगात आपण सुज्ञपणाने, व नीतिने वागावे. व याव्हे एलोहिम प्रती आपली भक्ती प्रकट करावी. १३ आणि आपली धन्य आशा, म्हणजे आपला महान याव्हे एलोहिम, व आपला तारणारा येशूवाह मशीहा, याचे गौरव प्रगट होण्याच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहावी. १४ त्याने स्वतःला आमच्यासाठी दिले यासाठी की, सर्व दुष्टतेपासून त्याने खंडणी भरून आम्हांस सोडवावे, व चांगली कृत्ये करण्यासाठी, आवेशी असलेले असे जे केवळ आपले लोक, त्यांना स्वतःसाठी क्वाडाश (शुद्ध) करावे. १५ या गोष्टीविषयी बोध करीत राहा, आणि कडक शब्दात कानउघाडणी करीत राहा. आणि हे पूर्ण अधिकाराने कर. कोणीही तुला तुच्छ मानू नये.

**३**.१ सत्ताधीश, आणि अधिकारी यांच्या अधीन राहण्याविषयी, व त्यांच्या आज्ञा पाळण्याविषयी, व प्रत्येक चांगले काम करण्यास तयार राहण्याविषयी, २ कोणाचीही निंदा न करण्याविषयी, भांडण टाळण्याविषयी, आणि सर्व माणसांना मोठी नम्रता दाखविण्याविषयी, त्यांना सतत आठवण करून देत राहा.

३ मी हे सांगतो, कारण आपण सुद्धा एके काळी मूर्ख, आज्ञा न पाळणारे, आणि बहकलेले असे होतो. आम्हीं सर्व प्रकारच्या वासनांची, व विलासाची गुलामाप्रमाणे सेवा करणारे होतो. आम्ही दुष्टतेचे, व हेव्यादाव्याचे जीवन जगत होतो. इतर लोक आमचा व्देष करीत, आणि आम्हीं एकमेकांचा व्देष करीत होतो. ४ पण जेंव्हा आमच्या तारणा-या अदोनाई एलोहिमची हेख्‌न (कृपा), व अहेद (प्रीति) मानवा प्रती प्रगट झाली, तेंव्हा ५ त्याने आम्हांला तारले. याव्हे एलोहिम कडून निर्दोष म्हणवून घेण्यासाठी, आम्ही केलेल्या कोणत्याही कृत्यांनी नव्हे, तर त्याच्या दयेमुळे, आम्हीं तारले गेली. आणि ते आमच्याकडे नव्या जन्माच्या स्नानाव्दारे, आम्हीं नवीन जन्म पावलो. आणि पवित्र आत्म्याव्दारे प्राप्त झालेले नवीकरण यांनी तारले गेलो. ६ अदोनाई एलोहिमने तो कादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा), आमचा तारणारा येशूवाह मशीहा याच्या व्दारे विपुलपणे आम्हांवर ओतला. ७ यासाठी की, आता याव्हे एलोहिम कडून त्याच्या कृपेमध्ये, आम्हीं निर्दोष घोषित केले जावे. अनंतकाळच्या जीवनाच्या आशेने, आम्हीं त्याचे वारस व्हावे. ८ ही शिकवण विश्वासनीय आहे, आणि यावर जोर द्यावा, असे मला वाटते. यासाठी की, ज्यांनी याव्हे एलोहिमवर विश्वास ठेवला आहे. त्यांनी चांगली कृत्ये करण्याविषयी काळजी घ्यावी. या गोष्टी लोकांसाठी चांगल्या व हिताच्या आहेत.९ परंतु मूर्खपणाचे

वाद, वंशावळीसंबंधी चर्चा, भांडणे तोराह (नियमशास्त्रा) विषयीची भांडणे टाळ. कारण ते निष्फळ व निरर्थक असे आहेत. १० एक दोन वेळा बोध करून फूट पाडणा-या व्यक्तीला टाळा.११ कारण तुला माहीत आहे की असा ईश (मनुष्य) वाइटाकडे वाहवत गेला आहे, व तो हा-ताअह् (पाप) करीत आहे. व त्याने स्वतःलाच दोषी ठरविले आहे.

१२ जेंव्हा मी अर्तमाला किंवा तुखिकाला तुझ्याकडे पाठवीन, तेंव्हा मला भेटण्यासाठी निकपलिसास येण्याचा तू होईल तितका प्रयत्न कर. कारण तेथे हिवाळा घालविण्याचे मी ठरविले आहे. १३ जेना वकील, व अपल्लो यांना त्यांच्या प्रवासासाठी ज्याची गरज भासेल, ती पुरविण्यासाठी तू सर्वतोपरी प्रयत्न कर. यासाठी की, त्यांना कशाचीही कमतरता भासू नये. १४ आपल्या लोकांनी चांगली कृत्ये करण्याविषयी शिकले पाहिजे यासाठी की, तातडीच्या गरजा भागविल्या जाव्यात. म्हणजे ते निष्फळ ठरणार नाहीत. १५ माझ्याबरोबरचे सर्वजण तुला शालोम (सलाम) सांगतात. विश्वासामध्ये आम्हांवर अहेद (प्रीति) करणा-या सर्वांना शालोम (सलाम) सांग. याव्हे एलोहिमची हेख्न (कृपा) तुम्हा सर्वांबरोबर असो.

......... समाप्ती .........

## .प्रेषित पौलाचे फिलेमोनाला लिहिलेले पत्र.

### .प्रस्तावना.

प्रेषित पौलाने फिलेमोनाला हे पत्र लिहिलेले होते.हे पत्र इसवी सन ६० ते ६१ या कालावधीमध्ये लिहिले आहे, असे म्हंटले जाते. फिलेमोन हा स्वतःच्या घरी मंडळी चालवित होता. आणि फिलेमोन हा कलस्सै येथे रहात होता. फिलेमोन ह्याच्या जवळ अनेसिम नावाचा एक गुलाम म्हणून होता.अनेसिम ने फिलेमोन ह्याच्या घरी चोरी करून रोम मध्ये पळून गेला होता. पौलाने हे पत्र अनेसिम ह्याच्या हाती देऊन, फिलेमोन ह्यास देण्यास पाठविले.या वेळी एक नोकर म्हणून नव्हे, तर एक मशीहा मध्ये भाऊ म्हणून स्विकार करण्यास उत्तेजन दिले आहे. पौलाचा आध्यात्मिक ते मध्ये तिसरा दत्तक मुलगा, अनेसिम हा होता.

### .प्रेषित पौलाचे फिलेमोनाला लिहिलेले पत्र.

१. मशीहा येशूवाह करिता कैदी झालेला पौल, व आपला बंधु तिमथ्य यांजकडून, आमचा प्रिय बंधु व सहकारी फिलेमोन, २ आणि
आमची वहीण अफ्फिया, अर्खिप्प, आमचा सहसैनिक, आणि तुझ्या घरात जी मंडळी एकत्र येते, यांना ३ याव्हे एलोहिम आमचा
अब्वा याजपासून व अदोनाई येशूवाह मशीहा पासून खेस्न (कृपा) व शालोम (शांती) असो.

४ जेंव्हा मी प्रार्थनेत तुझी आठवण करतो, तेंव्हा नेहमी मी माझ्या याव्हे एलोहिमचे उपकार मानतो.५ कारण तुझ्या अहेव (प्रीति)
विषयी, आणि तुझ्या विश्वासाविषयी, जो विश्वास तू अदोनाई येशूवाह वर ठेवतोस, त्याविषयी मी ऐकतो. ज्या याव्हे एलोहिमच्या
सर्व लोकांसाठी, जी अहेव (प्रीति) तुझ्याकडे आहे, त्याविषयी मी ऐकतो. ६ मी अशी प्रार्थना करतो की, ज्या विश्वासाचा सहभागी
तू आमच्याबरोबर आहेस, तो विश्वास आमच्यामध्ये असलेल्या मशीहा येशूवाह मधील सर्व चांगल्या गोष्टी, त्या सखोलपणे
समजण्यासाठी तुला मार्गदर्शन करोत. ७ तुझ्या अहेव (प्रीति) मुळे मला मोठा आनंद, आणि समाधान मिळाले आहे. कारण बंधु
तुझ्या प्रयत्नांमुळे याव्हे एलोहिमच्या लोकांची आत्मे संजीवित झाली आहेत.

८ म्हणून जरी मी तुझा बंधु म्हणून तुला तुझे योग्य कर्तव्य करण्याविषयी, आज्ञा करून सांगण्याचे धैर्य असले तरी ९ अहेव (प्रीति)
मुळे मी तुला आवाहन करणे पसंत करतो. मी पौल एक वृद्ध मनुष्य म्हणून जसा स्वतःला सादर करतो, आणि आता मशीहा येशूवाह
मधील कैदीत सुद्धा असलेला, असा १० मी त्याला माझ्या आध्यात्मिक मुला समान असलेला, अनेसिम त्याच्या बरोबर मी तुरूंगात
असताना, वडिलांप्रमाणे वागलो. त्याजविषयी कळकळीने विनवितो की, ११ पूर्वी तो तुला निरूपयोगी होता. पण आता तो तुलाच
नाही, तर मला सुद्धा उपयोगी आहे. (पौल याठिकाणी अनेसिम हा शब्द दोन अर्थानी वापरतो. अनेसिम म्हणजे उपयोगी)

१२ मी त्याला तुझ्याकडे परत पाठवीत आहे. मला असे म्हणावयास पाहिजे की, मी त्याला पाठवीत असताना जणू काय माझे हदयच
पाठवित आहे.१३ त्याला येथे माझ्याजवळ ठेवायला मला आवडेल यासाठी की, सुवार्तेमुळे मिळालेल्या तुरूंगवासामध्ये त्याने तुझ्या
जागी माझी मदत करावी.

१४ परंतु तुझ्या संमती शिवाय मला काहीही करायचे नव्हते. यासाठी की, तुझे कोणतेही चांगले कार्य दडपणामुळे होऊ नये, तर
खुशीने व्हावे.१५ कदाचित त्याला थोडया काळासाठी तुझ्यापासून दूर घेतले जाणे यासाठी झाले असावे की, तू त्याला कायमचे तुझ्या
जवळ घ्यावे. १६ एक गुलाम म्हणून नव्हे, उलट गुलामापेक्षाही चांगला एक भाऊ म्हणून घ्यावे. मी त्याच्यावर खूप अहेव (प्रीति)
करतो. पण तू त्याच्यावर त्याहीपेक्षा अधिक अहेव (प्रीति) करशील. फक्त एक मनुष्य म्हणूनच नव्हे, तर अदोनाई मधील एक बंधु
म्हणून, १७ तर जर मग तू मला खरोखर भागीदार समजतोस, तर माझे स्वागत जसे तू केले, असतेस तसे त्याचे स्वागत कर.१८
आणि जर त्याने तुझे काही नुकसान केले असेल, किंवा काही देणे लागत असेल, तर ते माझ्या नावावर लाव. १९ मी पौल, हे माझ्या

स्वतःच्या हातांनी लिहीत आहे ः मी याची तुला परतफेड करीन.(मी तुला हे सांगण्याची गरज नाही की, तुझे स्वतःचे जीवन तू मला देणे लागतोस.)

२० होय बंधु, अदोनाई मध्ये मला तुझ्यापासून काही फायदा हवा आहे. मशीहा मध्ये माझा रूहुव्वा (आत्मा) उल्हासित कर. २१
तुझ्या आज्ञाधारकपणा विषयी मला खात्री आहे, म्हणून मी तुला लिहीत आहे. मला माहीत आहे की, मी सांगत असलेल्या गोष्टीपेक्षा तू अधिक करशील.२२ शिवाय खेहृन (कृपा) करून माझ्या विश्रांती करिता खोली तयार करून ठेव. कारण माझा विश्वास आहे की, तुमच्या प्रार्थनांचा परिणाम म्हणून मला सुरक्षितरित्या तुमच्या स्वाधीन करण्यात येईल.

२३ येशूवाह मशीहा मध्ये माझ्यासह बंदिवान एपफ्रास, २४ तसेच मार्क, अरिस्तार्ख, देमास, व लूक जे माझे सहकारी आहेत, ते शालोम (सलाम) सांगतात.२५ अदोनाई येशूवाह मशीहाची खेहृन (कृपा), तुमच्या रूहुव्वा (आत्म्या) बरोबर असो. आमेन.

...... समाप्त ......

## . इब्री लोकांस लिहिलेले पत्र .

लेखकाबावत अनिश्चितता ः- इब्री लोकास पत्र हे नेमके कोणी लिहिले, ह्याबावत पवित्र शास्त्रातील तज्ञांना देखील काही ठोस पुरावा सापडत नाही . त्याच प्रमाणे, त्यांची आपसात सहमती देखील होत नाही .तीन लेखकांबावतची नावे सांगितली जातात . पण लेखातील भाषाशैली ही स्पष्ट दर्शविते की, हे पत्र लिहिणारा याजकीय लोकांप्रमाणे पारंगत असा आहे . ह्यामध्ये

काही तज्ञांचे मत . १ . हे पत्र प्रेषित पौलाने लिहिलेले आहे, ह्यास अनेक जणांची सहमती मिळते . पण लेखकाबावत सखोल अभ्यास तज्ञानुसार, हे पत्र खालील दोन जणाबावत दाखविले जाते . २ . काही तज्ञांचे मत, हे पत्र बर्णबा ह्याने लिहिले आहे . कारण तो एक लेवी वंशातील आहे, आणि त्याला बोध मुलगा म्हणत . ३ .काही तज्ञांचे मत, हे पत्र अपुल्लो ह्याने लिहिले असावे . लिखानाचा कालावधी ः हे इब्री लोकास लिहिलेले पत्र इसवी सन ६० ते ६९ च्या दरम्यान लिहिलेली आहेत . हे इब्री लोकांना लिहिलेले पत्र मूळ दस्तावेज हे हिब्रू भाषेतील आहे, ह्यास ह्यातील संपूर्ण लेखाच्या मजकूरावरून सिद्ध होते . आणि ह्याचे लेखक हे स्वतः हिब्रू बोली भाषा बोलणारेच असून, याजक वर्गातील असलेले हे दिसून येतात . ह्या लेखामध्ये कोणताही प्रकारे मूळ ग्रीक भाषेचा संबंध दिसून येत नाही .

## .इब्री लोकांस लिहिलेले पत्र .

१ .१ जुन्या काळात याव्हे एलोहिम आपल्या पूर्वजांशी नबीच्या व्दारे ( भविष्यवाद्यांच्या व्दारे ) पुष्कळ वेळा, वेगवेगळया मार्गांनी
बोलला . २ पण या शेवटच्या दिवसांत तो आपल्यावरोबर त्याच्या बेन च्या (मुलाच्या) व्दारे बोलला . त्याने बेन ला (मुलाला) सर्व
गोष्टींचा वारस म्हणून नेमले, याव्हे एलोहिमने हे जग त्याच्या बेन च्या (मुलाच्या) व्दारे अस्तित्वात आणले . ३ मुलगा हा याव्हे
एलोहिमच्या गौरवाचा ओर (प्रकाश) असा आहे, व तो याव्हे एलोहिमच्या स्वभावाच्या त्सेलेम देमूथ (प्रतिरूपासमान) असा आहे .
बेन (मुलगा) आपल्या सामर्थ्याच्या अमार (शब्दा) ने सर्व गोष्टी राखतो, बेन (मुला) ने लोकांना त्यांच्या पापांपासून शुद्ध केले, नंतर
तो शाम्माईम (आकाशां) मधील सर्वात श्रेष्ठ याव्हे एलोहिमच्या उजव्या बाजूला बसला .४ तो याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूता)
पेक्षा श्रेष्ठ झाला, त्याचे नाव हे सुद्धा जे मिळाले, ते त्याचे नाव सर्व श्रेष्ठ असे आहे . ५ त्याने कोणत्याही याव्हे एलोहिमचा मालाक
ला (देवदूताला) म्हंटले नाही की, " तू माझा बेन (मुलगा) आहेस, आज मी तुझा अब्बा (वडील) झालो आहे ." याव्हे एलोहिमने
कोणत्याही मालाक ला (देवदूताला) म्हंटले नाही की, " मी त्याचा अब्बा (वडील) होईल, व ते माझे बेन (मुलगा) होईल ." ६ आणि
पुन्हा याव्हे एलोहिम जेव्हा त्याच्या बेन ला (मुलाला) जगामध्ये आणतो, तो म्हणतो, "याव्हे एलोहिमचे सर्व मालाक (देवदूत) त्याची
उपासना करोत ." ७ मालाक (देवदूता) विषयी याव्हे एलोहिम असे म्हणतो, " तो त्याच्या याव्हे एलोहिमचे मालाक (देवदूतांना)
रूहव्वा (वायु) व्दारे निर्माण करतो, आणि त्याच्या सेवकांना तो इश लाव्वाह (अग्नीच्या ज्वाला) व्दारे निर्माण करतो ." ८ पण बेन
(मुला) विषयी तो असे म्हणतो, " तुझे किस्से (सिंहासन) हे याव्हे एलोहिम, तुझे किस्से (सिंहासन) सदासर्वकाळासाठी आहे, आणि
तुझे राज्य न्यायाचे असेल . ९ नीति तुला नेहमी प्रिय आहे, अनीतिचा तू व्देष करतोस . म्हणून याव्हे एलोहिमने तुझ्या याव्हे
एलोहिमने, तुझ्या सोबत्यापेक्षा तुला श्रेष्ठ असा हर्षरूपी शेमेन चा (तेलाचा) मशीहा (अभिषेक) केला आहे . १० आणि याव्हे
एलोहिम असेही म्हणाला, " हे अदोनाई, तू सुरूवातीला ऐरेस्त चा (पृथ्वीचा) पाया घातला, आणि शाम्माईम (आकाशे ) तुझ्या
हाताची कामे आहे . ११ ती नाहीसे होतील पण तू सदोदीत राहशिल ते कापडासारखे जुने होतील . १२ तू त्यांना अंगरख्यासारखे
गुंडाळशील, तू त्यांना कपडयासारखे बदलशील, पण तू नेहमी सारखाच राहशिल, आणि तुझी वर्षे कधीही संपणार नाहीत ." १३
तो कोणत्याही मालाक ला (दूताला) असे म्हणाला नाही, " तुझ्या वै-याला तुझ्या पायाखाली घालेपर्यंत, तू माझ्या उजवीकडे बैस ."
१४ सर्व मालाक (देवदूत) याव्हे एलोहिमच्या सेवेतील आत्मे नाहीत काय? आणि यशाह चा (तारणाचा) वारसा ज्यांना मिळेल त्यांना
मदत करावयास ते पाठविले जातात की नाही ?

२ .१ त्यासाठी ज्या सत्याविषयी आपण ऐकलेले आहे, त्याकडे आपण अधिक काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे, यासाठी की, आपण
त्यातून निसटून जाऊ नये . २ कारण तोराह (नियमशास्त्र) जे याव्हे एलोहिमच्या मालाक व्दारे (देवदूतांकरवी) सांगितले गेले, ते

इतके प्रभावी होते आणि जर प्रत्येक आज्ञाभंगाच्या व प्रत्येक अवमानाच्या कृत्याला योग्य ती शिक्षा होते, ३ तर आपण अशा महान यशाह (तारणा) कडे लक्ष दिले नाही, मग आपण शिक्षेपासून कसे सुटू ? या यशाह ची (तारणाची) पहिली घोषणा अदोनाईने केली. ज्यांनी अदोनाईचे ऐकले त्यांच्याकडून याची खात्री पटली.४ याव्हे एलोहिमने सुद्धा चिन्हांव्दारे, अदभुत कृत्यांव्दारे आणि निरनिराळया चमत्कारांव्दारे, त्यांच्या साक्षीची भर घालून, त्याच्या इच्छेनुसार याव्हे, कादोश रूहुव्वा ची (पवित्र आत्म्याची) दाने वाटून दिली.५ जे येणारे नवीन जग होते त्याचे सत्ताधीश म्हणून याव्हे एलोहिमने मालाक ची (देवदूतांची) निवड केली नाही. त्याच जुन्या काळातील जगाविषयी आपण बोलत आहोत. ६ शास्त्रलेखात एका ठिकाणी असे लिहिले आहे, " मृर्त्य मानव तो काय की तू त्याची आठवण करावी? किंवा मनुष्याचा बेन (मुलगा) तो काय की तू त्याला दर्शन द्यावे? ७ थोडया काळासाठी तू त्याला याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदूतांपेक्षा) कमी केले, तू त्याला गौरव व सन्मान यांचा मुकूट घातला आहेस.८ तू सर्व काही त्याच्या पायाखाली (अधीन) ठेवलेस." याव्हे एलोहिमने सर्व काही त्याच्या अधीन ठेवले, आणि कोणतीही गोष्ट अधिपत्याखाली ठेवायची सोडली नाही. पण आता अजूनपर्यंत सर्व काही त्याच्या अधिपत्याखाली ठेवलेले आपण पाहत नाही. ९ परंतु आपण येशूवाहला पाहतो, ज्याला काही काळासाठी याव्हे एलोहिमच्या मालाक (देवदूतांपेक्षा) किंचित कमी केले होते. आता आम्ही त्याला, त्याने सहन केलेल्या मरणामुळे, गौरव व सन्मान यांचा मुगूट घातल्याचे पाहत आहोत. कारण याव्हे एलोहिमच्या कृपेमुळे येशूवाहने सर्व मानवजातीसाठी मरण सोसले.१० याव्हे एलोहिम असा आहे ज्याने सर्व गोष्टी निर्माण केल्या, आणि सर्व गोष्टी त्याच्या गौरवासाठी आहेत. याव्हे एलोहिमला त्याच्या गौरवाचे भागीदार होण्यासाठी पुष्कळ बानीम (मुले) व बानोवथ (कन्या) पाहिजेत. म्हणून याव्हे एलोहिमने जे त्याला करावयाला पाहिजे होते ते केले. त्याने येशूवाहला जो त्या लोकांना यशाह (तारणा) पर्यंत नेतो, त्याला परिपूर्ण केले. एलोहिमने येशूवाहला त्याच्या दुःखसहनाव्दारे परिपूर्ण यशाह (तारणारा) बनविले.११ जो लोकांना पवित्र करतो व ज्यांना कादोश (पवित्र) करण्यात आले आहे, ते सर्व एकाच कुटूंबाचे आहेत. या कारणासाठी तो त्यांना बंधु, आणि भगिनी म्हणण्यास लाजत नाही. १२ येशूवाह म्हणतो, " मी तुझे नाव माझ्या बंधु आणि भगिनींना सांगेन, मी सभेसमोर तुझी स्तुति गाईन." १३ तो म्हणतो, " मी माझा विश्वास याव्हे एलोहिवर ठेविन." आणि तो पुन्हा म्हणतो, "येथे मी आहे आणि माझ्याबरोबर याव्हे एलोहिमने दिलेली बानीम (मुले) आहेत." १४ म्हणून बानीम (मुले) देम्ये (रक्त) व बासार (मांस) यांची बनलेली असल्याने, त्याने सुद्धा त्या देम्ये (रक्तात) व बासार (मांसात) त्यांच्यासमवेत भाग घेतला. येशूवाहने हे यासाठी केले की, ज्याच्याकडे मरणाची सत्ता आहे, अशा सातान (सैताना) च्या मरणाने नाश करावा. १५ आणि जे लोक त्यांच्या सर्व आयुष्यात मरणाचे भय मनात ठेवून त्याचे गुलाम असल्यासारखे जगत होते, त्यांना मुक्त करावे. १६ कारण हे स्पष्ट आहे की, तो काही याव्हे एलोहिमच्या मालाक ना (देवदूतांना) मदत करत नाही. उलट अब्राहामचे जे वंशज आहेत, त्यांना तो मदत करतो. १७ या कारणासाठी एलोहिमच्या सेवेतील दयाळू व विश्वासू असा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) होण्यासाठी, आणि लोकांच्या पापांसाठी प्रायश्चित करण्यासाठी, येशूवाहला सर्व गोष्टीमध्ये आपल्या बांधवांसारखे होणे, अत्यंत आवश्यक होते. १८ कारण ज्या अर्थी त्याला स्वतःला परीक्षेला, व दुःखसहनाला तोंड द्यावे लागले. त्या अर्थी ज्यांना आता परीक्षेला तोंड द्यावे लागत आहे, त्यांना मदत करण्यास तो समर्थ आहे.

**३**.१ म्हणून पवित्र बंधूनो, ज्यांना याव्हे एलोहिमने बोलाविलेले आहे. त्यांनी येशूवाह विषयी विचार करावा. तो याव्हे एलोहिमचा प्रेषित (प्रतिनिधी) , आणि आमच्या विश्वासाचा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) आहे. २ ज्या याव्हे एलोहिमने त्याला प्रेषित (प्रतिनिधी) व एलयोवन कोहेन (मुख्य याजक) म्हणून नेमले, त्याच्याशी येशूवाह विश्वासू होता. जसा याव्हे एलोहिमच्या संपूर्ण घराण्यात मोशे याव्हे एलोहिमशी विश्वासू होता.३ ज्याप्रमाणे घरापेक्षा घर बांधणाराला अधिक मान असतो. त्याप्रमाणे, येशूवाह हा मोशेपेक्षा अधिक सन्मानास पात्र गणला गेला.४ कारण प्रत्येक घर बांधणारा कोणीतरी असतो. पण याव्हे एलोहिमने सर्व काही बांधलेले आहे. ५ याव्हे एलोहिमच्या संपूर्ण घराण्यात मोशे हा सेवक म्हणून अधिक विश्वासू होता. याव्हे एलोहिम ज्या गोष्टी पुढील काळात सांगणार होता, त्याविषयी त्याने लोकांना साक्ष दिली. ६ परंतु मशीहा हा बेन (मुलगा) म्हणून याव्हे एलोहिमच्या घराण्यात विश्वासू आहे, आणि जर आम्ही आपला विश्वास, व आशा यांचा अभिमान बाळगतो व धीर धरतो, तर आपणही त्याचे घर आहोत.

७ म्हणून कादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) म्हणतो, त्याप्रमाणे आज जर तुंम्ही याव्हे एलोहिमची वाणी ऐकाल, ८ तर आपली रूहुवा (आंत्मे) कठीण करू नका. ज्याप्रमाणे तुंम्ही अरण्यामध्ये याव्हे एलोहिमची परीक्षा पाहण्यासाठी याव्हे एलोहिम विरूद्ध बंडखोरी केली ९ जेथे तुमच्या वाडवडिलांनी माझी परीक्षा पाहिली, व मला कसोटीस लावले. तेथे त्यांनी चाळीस वर्षे सामर्थ्यशाली कामे पाहिली, १० त्यामुळे मी या पिढीवर रागावलो आणि म्हणालो, " या लोकांच्या मनात नेहमी चुकीचे विचार येतात, या लोकांना माझे मार्ग कधीही समजले नाहीत. ११ म्हणून रागाच्या भरात मी शपथ वाहून म्हणालो, 'हे लोक मी देऊ केलेल्या शव्वाथ ( विसाव्या) च्या ठिकाणी कधीच प्रवेश करणार नाहीत.'"

१२ सावध असा, बंधूंनो, तुमच्या पैकी कोणाचेही रूहुव्वा (आत्मे) दुष्ट व अविश्वासू असू नयेत, ती जिवंत याव्हे एलोहिम पासून दूर नेतात. १३ उलट 'आज म्हंटलेला काळ आहे तोपर्यंत प्रत्येक दिवशी एकमेकांना बोध द्या. यासाठी की, तुमच्यापैकी कोणाचीही पापामुळे फसगत होऊन, तुमचा रूहुव्वा (आत्मे) कठीण होऊ नये. १४ कारण आपण सर्व जण मशीहामध्ये त्याच्यावरील विश्वासाचे वाटेकरी आहोत. जर आपण आपल्या आरंभीचा विश्वास शेवटपर्यंत दृढ धरून राहिलो, तर १५ शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे "आज जर तुम्हीं त्याची वाणी ऐकाल, तर इस्त्राएल लोकांनी चीड याव्हे एलोहिमला आणली होती, तशी तुम्हीं आपले आत्मे (अंतःकरणे) कठीण करू नका."

१६ त्यांनी याव्हे एलोहिमची वाणी ऐकली, पण त्याच्याविरूद्ध बंड केले असे कोण होते ? तेच लोक नव्हेत का, ज्यांना मोशेने मिसर (इजिप्त) देशातून बाहेर नेले होते ? १७ आणि तो याव्हे एलोहिम कोणावर चाळीस वर्षे रागावला होता? ते सर्व तेच नव्हते काय, ज्यांनी पाप केले आणि ज्यांची प्रेते अरण्यात पडली होती. १८ कोणाविषयी याव्हे एलोहिमने अशी शपथ वाहिली की, ते माझ्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी प्रवेश करणार नाहीत? ज्यांनी त्याच्या आज्ञा मोडल्या तेच नव्हेत काय ? १९ म्हणून आपण पाहतो की, ते लोक याव्हे एलोहिमच्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी त्यांच्या अविश्वासामुळे येऊ शकले नाहीत.

४ .१ ज्या अर्थी याव्हे एलोहिम पासून मिळालेले अभिवचन, जे त्याच्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी प्रवेश करण्यासाठीचे आहे. ते अजून तसेच आहे, म्हणून तुमच्यापैकी कोणीही ते चुकवू नये, म्हणून काळजी घ्या. २ कारण आम्हांलासुद्धा सुवार्ता सांगितली गेली आहे, ज्याप्रमाणे ती इस्त्राएल लोकांना सांगण्यात आली होती. परंतु जो संदेश त्यांनी ऐकला त्यापासून त्यांना फायदा झाला नाही, कारण तो संदेश त्यांनी ऐकला, पण त्यांनी विश्वासाने स्विकारला नाही. ३ ज्या आम्ही विश्वास ठेवला, ते शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे, त्या शव्वाथ (विसावा) च्या ठिकाणी प्रवेश करणार आहेत, जसे याव्हे एलोहिमने म्हंटले आहे. "म्हणून मी माझ्या रागाच्या भरात अशी शपथ वाहून म्हणालो, 'ते माझ्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी कधीच प्रवेश करणार नाहीत.'" जगाच्या निर्मीत्तीपासूनचे त्याचे काम संपलेले होते, तरी तो असे म्हणाला, ४ कारण शास्त्रलेखात तो सातव्या दिवसा बद्दल असे बोलला आहे की, आणि " आणि सातव्या दिवशी याव्हे एलोहिमने त्याच्या कामापासून शव्वाथ (विसावा) घेतला." ५ आणि पुन्हा या वचनांमध्ये तो म्हणतो, " ते माझ्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी कधीही प्रवेश करणार नाहीत." ६ ज्यांना अगोदर सुवार्ता सांगण्यात आली होती, त्यांचा त्यांच्या अविश्वासामुळे त्यात प्रवेश झाला नाही. तरी हे खरे आहे की, काही जणांचा त्या शव्वाथात (विसाव्यात) प्रवेश होणार आहे. ७ त्यांच्यासाठी याव्हे एलोहिमने पुन्हा एक वेळ निश्चित केली असून, त्याला तो "आज" असे म्हणतो. अगोदरच दाखवून दिलेल्या उता-यामध्ये म्हंटल्याप्रमणे, याव्हे एलोहिम त्या दिवसाविषयी पुष्कळ वर्षांनी दाविदाव्दारे बोलला. " आज जर तुंम्ही त्याची वाणी ऐकााल, तर आपली रूहुव्वा (आत्मे) कठीण करू नका."

८ कारण जर यहोशवा त्यांना याव्हे एलोहिमने दिलेल्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी घेऊन गेला. तर याव्हे एलोहिम दुस-या दिवसाबद्दल पुन्हा बोलला नसता. ९ म्हणून याव्हे एलोहिमच्या लोकांसाठी अजूनही सातवा म्हणजे शव्वाथाचा (विसाव्याचा) दिवस आहे. १० कारण जो कोणी याव्हे एलोहिमच्या शव्वाथ (विसाव्या) च्या ठिकाणी प्रवेश करतो, तो त्याच्या स्वतःच्या कामापासून शव्वाथ (विसावा) घेतो. ज्याप्रमाणे याव्हे एलोहिमने त्याच्या कामापासून शव्वाथ (विसावा) घेतला होता. ११ म्हणून त्या शव्वाथ

(विसाव्या) च्या ठिकाणी प्रवेश करण्यासाठी, आपण सर्व तो परी प्रयत्न करू या. यासाठी की, इस्त्राएल लोकांच्या आज्ञाभंगच्या उदाहरणाप्रमाणे, त्यांचे अनुकरण कोणीही करू नये.१२ कारण याव्हे एलोहिमचे वचन जिवंत आणि कार्य करणरे आहे, आणि कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा अधिक धारदार आहे. ते आपला आत्मा, जीव, सांधे, आणि मज्जा यांना भेदून आरपार जाणारे आहे. ते रूहुव्वा (आत्मे) विचार, व कल्पना यांचे परीक्षक असे आहे. १३ आणि कोणतीही अशी निर्मीत्ती नाही की, जी त्याच्यापासून लपलेली आहे. आणि त्याच्यापाशी आम्हांला सर्व गोष्टीचा हिशेब द्यावयाचा आहे. त्याच्यासमोर सर्व गोष्टी उघड व स्पष्ट अशा आहेत. १४ म्हणून ज्या अर्थी आम्हांला येशूवाह एलोहिमचा बेन (मुलगा) हा महान एलयोवन कोहेन (मुख्य याजक) लाभला आहे, व जो शाम्माईम मध्ये (आकाशामध्ये) गेला आहे. असा जो विश्वास आपण गाजवितो, तो अखंडपणे भक्कम धरू या. १५ कारण आपल्याला लाभलेला महान कोहेन (याजक) असा नाही, जो आपल्या अशक्तपणाबद्दल सहानुभुति दाखविण्यास असमर्थ आहे. पण आपल्याला असा कोहेन (याजक) लाभला आहे की, जो आमच्या सारखाच सर्व प्रकारच्या मोहाच्या अनुभवातून गेला. तरीही तो पूर्णपणे निष्पाप राहिला. १६ म्हणून आपण त्याच्या कृपेच्या सिंहासनाजवळ ठाम निर्धाराने जाऊ या यासाठी की, आमच्या गरजेच्या वेळी साहाय्य मिळावे, म्हणून आम्हांला दया व कृपा प्राप्त व्हावी.

**५** .१ प्रत्येक एलयोवन कोहेन (मुख्य याजक) मानसातून घेतलेला आहे. आणि लोकांच्या वतीने त्यांच्या पापांसाठी जी दाने व अर्पणे याव्हे एलोहिमला सादर केली जातात, त्या कामाकरिता एलयोवन कोहेन (मुख्य याजक) नेमलेला असतो. २ प्रत्येक एलयोवन कोहेन (मुख्य याजक) हे जे चुका करतात व जे अज्ञानी आहेत, त्यांच्याशी सौम्यपणे वागण्यास असमर्थ असतो. कारण तो स्वतः दुबळा असतो. ३ आणि त्या दुबळेपणामुळे त्याने त्याच्या पापांसाठी तसेच लोकांच्या पापांसाठी अर्पण केलीच पाहिजेत. ४ आणि कोणीही एलयोवन कोहेन (मुख्य याजक) पणाचा बहुमान स्वतःच्या पुढाकाराने घेत नसतो, तर अहरोनाला होते तसे त्यालाही याव्हे एलोहिमचे पाचारण असणे आवश्यक असते. ५ त्याच प्रमाणे मशीहाने एलयोवन कोहेन (मुख्य याजक) होण्याचा गौरव स्वतःहून आपणावर घेतले नाही, परंतु याव्हे एलोहिम मशीहाला म्हणाला, “तू माझा बेन (मुलगा) आहेस, आज मी तुला जन्म दिला आहे.” ६ दुस-या शास्त्रलेखात तो असे म्हणतो, “ मलकीसदेका प्रमाणे, तू अनंतकाळासाठी कोहेन (याजक) आहेस.” ७ येशूवाहच्या पृथ्वीवरील जीवनाच्या काळात, त्याने याव्हे एलोहिमकडे मोठयाने ओरडून आणि रडून प्रार्थना व विनंत्या केल्या. जो याव्हे एलोहिम त्याला मृत्युपासून वाचवू शकत होता. आणि याव्हे एलोहिम विषयीच्या त्याच्या सन्माननीय आदरामुळे येशूवाहच्या प्रार्थना ऐकल्या गेल्या. ८ जरी तो बेन (मुलगा) होता तरी त्याने ज्या गोष्टी सोशिल्या, त्यापासून तो आज्ञाधारकपणा शिकला. ९ आणि नंतर त्याला परिपूर्ण केल्यावर, जे त्याच्या आज्ञा पाळतात, त्यांच्यासाठी अनंतकाळच्या तारणासाठी तो उगम झाला.१० व मलकीसदेकाच्या संप्रदायास अनुसरून याव्हे एलोहिम कडून तो एलयोवन कोहेन ( प्रमुख याजक) म्हणून नियुक्त झाला.११ याविषयी सांगण्यासारखे पुष्कळ आहे, पण तुम्हांला ते स्पष्ट करणे कठीण आहे. कारण तुंम्ही ऐकण्यात खूप मंद झाला आहात. १२ आतापर्यंत तुंम्ही रब्बुनी (शिक्षक) व्हायला हवे होते. तरी याव्हे एलोहिमच्या शिक्षणाचे प्राथमिक धडे पुन्हा तुम्हांला कोणीतरी शिकविण्याची गरज आहे. तुम्हांला दुधाची गरज आहे. सकस अन्नाची नव्हे! १३ कारण जो कोणी अजून दुधावरच जगतो त्याला वचनाच्या पोक्त शिक्षणाची काहीही माहिती नसते. कारण अजून तो बाळच असतो. १४ परंतु याउलट, सकस अन्न हे प्रौढांसाठी योग्य असते. मशीहा ही लोकांची इंद्रिये मशीहा ही जीवनाच्या सरावामुळे, चांगले व वाईट यांतील भेद ओळखण्यास तयार झालेली असतात.

**६** .१ म्हणून मशीहा विषयीची प्राथमिक माहिती आपण मागे सोडून देऊ व प्रौढतेप्रत जाऊ. २ पुन्हा एकदा याव्हे एलोहिम वरील विश्वास, बाप्तिस्म्या विषयीची शिकवण, (या ठिकाणी बाप्तिस्म्याचे दोन अर्थ होऊ शकतात. दोघांपैकी एक (१) याचा मशीहा ही बाप्तिस्मा काही क्षणाकरिता पाण्यात बुडविणे. किंवा (२) यहूदी विधीपूर्वक धुण्याची पद्धत) डोक्यावर हात ठेवणे, मृतांचे पुनरूत्थान आणि अनंतकाळचा न्यायनिवाडा, याव्हे एलोहिम वरील विश्वास, आपल्या निर्जीव गतजीवनाचा पश्चात्ताप, या मूलभूत पाया आपण पुन्हा घालू नये.३ आणि जर एलोहिमची इच्छा असेल तर आपण पूर्ण मशीहाही पणापर्यंत जाऊ. ४ ज्यांना आकाशातील दानांचा अनुभव आलेला आहे. व जे पवित्र आत्म्याचे भागीदार झाले आहेत. त्यांना पुन्हा पश्चात्तापाकडे नेणे अशक्य

आहे • ५ तसेच याव्हे एलोहिमच्या वचनाची गोडी अनुभवली आहे • व येणा-या सामर्थ्याचा अनुभव घेतली, आणि ६ त्यानंतर मशीहा पासून जर ते दूर गेले, तर त्यांना पश्चात्तापाकडे वळविणे अशक्य आहे • कारण त्याच्या स्वतःच्या हानीकरता ते याव्हे एलोहिमच्या बेन ला (मुलाला) पुन्हा वधस्तंभावर खिळतात व लोकांच्या समोर उघड अपमान करीत राहातात • ७ जी जमीन वेळोवेळी पडणा-या पावसाचे पाणी पिते, व ज्या लोकांकडून तिची लागवड होते, त्यांच्यासाठी धान्य उपजविते, तिला याव्हे एलोहिम कडून आशिर्वाद प्राप्त होतो •८ पण जी जमीन काटे व कुसळे उपजविते, ती निरूपयोगी आहे • व तिला शाप मिळण्याची भिती असते, तिचा अग्नीने नाश होईल •

९ बंधूजनहो, आम्ही या गोष्टी तुम्हांला सांगत आहोत • पण खरोखर आम्ही तुमच्याकडून अधिक चांगल्याची अपेक्षा करतो • आम्हांला अशी खात्री आहे की, ज्या यशाह चा (तारणाचा) भाग असलेल्या गोष्टी आहेत, त्या तुम्हीं कराल • १० कारण तुंम्ही केलेली पवित्रजणांची सेवा, त्या सेवेत तुम्हीं अजूनही दाखवित असलेले सातत्य, तुमचे काम व त्याच्या लोकांना दानाव्दारे व इतर मदत करण्याव्दारे तुम्हीं त्यांच्यावर केलेले प्रेम ही सर्व विसरण्या इतक याव्हे एलोहिम अन्यायी नाही • ११ पण आमची अशी इच्छा आहे की, तुमच्या आशेच्या पूर्तीची पूर्ण खात्री होण्याकरिता तुमच्यातील प्रत्येकाने शेवटपर्यंत कार्याची अशीच आवड दाखवावी • १२ आम्हांला असे वाटते की, तुम्ही आळशी बनू नये, तर जे लोक विश्वासाव्दारे, व धीराव्दारे याव्हे एलोहिमने दिलेल्या अभिवचनाचे फळ मिळवितात, अशा लोकांचे अनुकरण करणारे तुम्हीं व्हावे •

१३ जेव्हा याव्हे एलोहिमने अब्राहामाला वचन दिले, तेव्हा त्याच्यापेक्षा कोणी मोठा नसल्याने, याव्हे एलोहिमने स्वतःच्याच नावाने शपथ वाहिली • १४ तो म्हणाला, " मी तुला भरपूर आशिर्वाद देईन, आणि मी तुझ्या वंशजांना सतत बहुगुणित करीत राहीन • " १५ म्हणून धीराने वाट पाहिल्यानंतर, याव्हे एलोहिमने जे वचन त्याला दिले होते, ते त्याला प्राप्त झाले • १६ लोक नेहमी शपथ वाहताना आपल्यापेक्षा जो मोठा असतो, त्याच्या नावाचा उपयोग करतात • कारण शपथ ही विदित केलेल्या सत्याची खात्री पटविणे, व सर्व वादाचा शेवट करणे यासाठी असते •१७ आपल्या योजनेचे कधीही न बदलणारे स्वरूप वचनाच्या वारसदारांना कळावे, अशी याव्हे एलोहिमची इच्छा आहे • म्हणून त्याने वाहिलेल्या शपथेच्या व्दारे याबाबत हमी दिली •१८ याव्हे एलोहिमने असे केले यासाठी की, ज्याच्याविषयी लबाडी करणे याव्हे एलोहिम साठी अशक्य आहे • असे त्याचे **'वचन'** व **'शपथ'** ह्या दोन न बदलणा-या कृतीमुळे, जे आपण आश्रयाकरिता निघालो आहोत, त्या आपणांस त्या आशेसंबधाने अधिक उत्तेजन प्राप्त व्हावे • १९ आम्हांला ही आशा जणू काय भक्कम सुरक्षित अशा नांगरासारखी आत्म्याला आहे • व ही आशा मंदिराच्या पडद्यामागील आतील बाजूस प्रवेश करते • २० जेथे आमच्यापुढे धावत येशूवाह आमच्यासाठी आत गेलेला आहे •तो मलकीसदेकाप्रमाणे अनंतकाळासाठी एलयोवन कोहेन (मुख्य याजक) झाला आहे •

**७** •१ हा मलकीसदेक शालेमाचा राजा होता, आणि तो सर्वोच्च याव्हे एलोहिमचा कोहेन (याजक) होता • राजांचा पराभव करून अब्राहाम परतत असताना मलकीसदेक त्याला भेटला • मलकीसदेकाने त्याला आशिर्वाद दिला • २ व अब्राहामाने आपल्या सर्वस्वाचा दहावा भाग त्याला (मलकीसदेकाला) दिला • मलकीसदेकाच्या नावाचा अर्थ "नीतिमत्वाचा राजा" त्याप्रमाणे तो शालेमाचा राजा असल्याने त्याचा अर्थ "शांतीचा राजा" असा होतो • ३ मलकीसदेकाचे आईवडील किंवा त्याचे पूर्वज, त्याचा जन्म किंवा मृत्यूची नोंद आढळत नाही • याव्हे एलोहिम बेन च्या (मुलाच्या) प्रतिमेशी तो हुबेहूब मिळताजुळता असल्यामुळे, तो देखील अनंतकाळासाठी कोहेन (याजकच) राहणार आहे • ४ यावरून तुम्ही पाहता की, मलकीसदेक किती महान पुरूष होता • मूळ पुरूष अब्राहाम याने सुद्धा आपल्या लुटीतील दहावा भाग त्याला दिला • ५ आणि लेवीचे वंशज जे कोहेन (याजक) झाले • त्यांनी मोशेच्या तोराह तील (नियमशास्त्रातील)आज्ञेप्रमाणे लोकांकडून (आपल्या भावांकडून) जरी ते अब्राहामाचे वंशज होते, तरी दशमांश गोळा करावा • ६ मलकीसदेक लेव्याच्या वंशजापैकी नव्हता, पण तरीही त्याने अब्राहामाकडून दशमांश घेतला •आणि ज्याला याव्हे एलोहिम कडून अभिवचन मिळाले होते, त्याला (अब्राहामाला) त्याचे आशिर्वाद दिला • ७ यामध्ये कोणत्याही प्रकारचा संशय नाही की, श्रेष्ठ व्यक्ती कनिष्ठाला आशिर्वाद देते •८ एका बाबतीत म्हणजेच लेव्यांच्या बाबतीत, जो मनुष्य मरतो तो दशमांश गोळा करतो, पण दुस-या

बाबतीत म्हणजे मलकीसदेकाच्या बाबतीत, शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे दशमांश अशा व्यक्तीने घेतला की, जी अजूनही जिवंत आहे. ९ एखादा असेही म्हणू शकतो की, लेवी जे दशमांश गोळा करीत, प्रत्येक्षात तेही अब्राहामाव्दारे मलकीसदेकाला दशमांश देत. १० कारण जेव्हा मलकीसदेक अब्राहामाला भेटला, त्यावेळी लेवी जणू त्याच्या पूर्वज अब्राहाम याच्या शरीरात बीजरूपाने होता.

११ लेवीय वंशाजांच्या कोहेन (याजकीय) पद्धतीने लोकांना तोराह (नियमशास्त्र) दिले गेले. पण तशा प्रकारच्या कोहेन (याजकीय) पद्धतीने, लोक धार्मिकदृष्टया परिपूर्ण बनू शकले नसते. म्हणून आणखी एका कोहेन (याजकाच्या) येण्याची आवश्यकता होती, तो अहरोनासारखा नसून, मलकीसदेकासारखा हवा होता.१२ कारण जेंव्हा कोहेन (याजक,) पणात बदल होतो तेंव्हा तोराह (नियमशास्त्र) सुद्धा बदलणे अपरिहार्य होते.१३ कारण या सर्व गोष्टी ज्याच्याबद्दल सांगितल्या आहेत, तो लेवी वंशातील कोणीही वेदीजवळ अशा प्रकारची कोहेन (याजकीय) सेवा केलेली नाही. १४ हे स्पष्ट आहे की, आमचा अदोनाई यहूदा वंशातील होता. आणि या वंशासंबंधी कोहेन (याजक) पणा बद्दल मोशेने काहीही सांगितले नाही.

१५ आणि जेंव्हा या दुस-या प्रकारचा नवीन कोहेन (याजक) मलकीसदेका सारखा येतो तेंव्हा ही गोष्ट आणखी स्पष्ट होते. १६ मानवी तोराह च्या (नियमशास्त्राच्या) आज्ञेने येशूवाहला कोहेन (याजक) करण्यात आले नव्हते, तर अक्षय जीवनाच्या सामर्थ्याच्या आधारे त्याला कोहेन (याजक) करण्यात आले.१७ कारण अशाप्रकारे त्याच्याविषयी शास्त्रलेखात लिहिले आहे, “ तू मलकीसदेका सारखा अनंतकाळासाठी कोहेन (याजक) आहेस.” १८ जुना नियम बाजूला ठेवण्यात आला आहे. कारण तो दुबळा व निरूपयोगी होता. १९ कारण तोराह (नियमशास्त्रा) मुळे कोणतीच गोष्ट पूर्ण झाली नाही, आणि आता एक अधिक चांगली आशा आम्हांला देण्यात आली आहे. जिच्यामुळे आम्हीं याव्हे एलोहिम जवळ येतो. २० हे सुद्धा महत्वाचे आहे की, याव्हे एलोहिमने येशूवाहला एलयोवन कोहेन (मुख्य याजक) करताना शपथेशिवाय केले नाही. जेंव्हा इतरांना कोहेन (याजक) करण्यात आले, तेंव्हा त्यांना शपथेशिवाय कोहेन (याजक) करण्यात आले.२१ पण येशूवाह जेंव्हा कोहेन (याजक) बनला, तेंव्हा तो शपथेने बनला.ज्याने त्याला सांगितले की, “अदोनाईने शपथ वाहिली आहे. आणि तो आपले मत बदलणार नाही, तू अनंतकाळचा कोहेन (याजक) आहेस.” २२ याचा अर्थ असा की येशूवाह हा अधिक चांगल्या कराराची खात्री आहे. २३ तसेच इतर पुष्कळ एलयोवन कोहेन (मुख्य याजक) होते.परंतु मरणामुळे पुढे तो कोहेन (याजक) पद चालवू शकले नाही. २४ त्याचे कोहेन (याजक) पद कायमचे आहे.कारण तो सर्वकाळ राहतो. २५ म्हणून जे त्याच्याव्दारे याव्हे एलोहिमकडे येतात त्यांना तो अनंतकाळासाठी यशाह् (तारण्यास) समर्थ आहे. कारण त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यास तो सदैव जिवंत आहे.२६ म्हणून येशूवाह अगदी आपल्या गरजांस अनुरूप, असा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) आहे. ज्याची आम्हांला गरज आहे, तो पवित्र, निष्कपट, आणि निष्कलंक आहे.दोषविरहीत, आणि शुद्ध आहे. तो पापांपासून वेगळा केलेला आहे. त्याला शाम्माईम (आकाशाहून) ही उंच केलेले आहे.२७ दुसरे एलयोवन कोहेन (मख्य याजक) जसे दररोज अर्पणे अर्पण करतात, तसे करण्याची त्याला गरज नाही. जे इतर कोहेन (याजक) पहिल्यांदा त्यांच्या पापांसाठी, व मग लोकांच्या पापांसाठी जसे अर्पण करतात, तसे त्याला करण्याची गरज नाही.त्याने जेंव्हा स्वतःला अर्पण केले त्याच वेळी एकदाच व कायमचेच अर्पण केले आहे. २८ कारण तोराह (नियमशास्त्र) मानवी दुर्बलता असलेल्या मनुष्याची एलयोवन कोहेन (मुख्य याजक) म्हणून नेमणूक करते. परंतु तोराह (नियमशास्त्रा) नंतर शपथेचे वचन देण्यात आल्यामुळे बेन (मुलगा) हा सर्व काळासाठी परिपूर्ण असा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) झाला.

८.१ आम्ही जे सांगत आहोत.त्याचा मुद्दा असा आहे की, असा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) आम्हांला लाभलेला आहे की, जे शाम्माईम (आकाशां) मध्ये याव्हे एलोहिमच्या किस्से (सिंहासना) च्या उजवी बाजूस बसतो.२ आणि कोणत्याही मानव निर्मित मंडपात नव्हे, तर अदोनाई याव्हेने बनविलेल्या ख-याखु-या मंदिराच्या परम पवित्रस्थानात तो एलयोवन कोहेन (मुख्य याजका) ची सेवा करतो.३ प्रत्येक एलयोवन कोहेन (मुख्य याजक) जो नेमलेला असतो, त्याला दाने व अर्पणे सादर करावी लागतात. म्हणून आपल्या ह्या एलयोवन कोहेन (मुख्य याजका) ला देखील काही तरी सादर करणे जरूरीचे होते.४ तर तो पृथ्वीवर असता तर तो एलयोवन

कोहेन (मुख्य याजक) देखील झाला नसता. कारण तेथे अगोदरचे तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे दानांचे अर्पण करणारे आहेत.५ ते जो कामे करतात ती शाम्माईम (आकाशां) तील गोष्टीची नक्कल, आणि छाया अशी आहेत. याव्हे आदोनाय चा मंडप घालीत असताना, याव्हे एलोहिमने मोशेला जो आदेश दिला, तशी ही सेवा आहे. कारण याव्हे एलोहिम म्हणाला, " तुला पर्वतावर मी जो नमुना दाखविला, त्या आज्ञेनुसार प्रत्येक गोष्ट कर."

६ परंतु येशूवाहला नेमून दिलेली कोहेन (याजकीय) , एलयोवन कोहेन (मुख्य याजकां) च्या सेवेहून जशी फारच वरच्या दर्जाची आहे. तसाच येशूवाह ज्या नवीन कराराचा मध्यस्थ आहे, तो करार अगोदरच्या करारहून अधिक वरच्या दर्जाचा आहे. तो करार अधिक चांगल्या वचनांच्या पायावर उभा आहे. ७ जर पूर्वीचा करार दोष विरहीत असता, तर त्याच्या जागी दुस-या कराराची गरज भासली नसती. ८ परंतु याव्हे एलोहिमला लोकांमध्ये दोष आढळला, तो म्हणाला, "याव्हे आदोनाय म्हणतो, असे दिवस येत आहेत, जेव्हां मी इस्त्राएल लोकांबरोबर नवा करार करीन. व यहूदाच्या घराण्याशी नवा करार करीन.९ ज्याप्रमाणे मी त्यांच्या पूर्वजांशी करार केला, तशा प्रकारचा हा करार असणार नाही. त्या दिवशी मी त्यांच्या हाताला धरून मिसर (इजिप्त) देशातून बाहेर आणले, ते माझ्याशी केलेल्या कराराशी विश्वासू राहिले नाही, त्यामुळे मी त्यांच्याकडे पाठ फिरवली. १० याव्हे आदोनाय म्हणतो, " त्या दिवसानंतर मी इस्त्राएल लोकांबरोबर असा करार करीन. मी माझे नियम त्यांच्या रूहुव्वा (आत्म्यात) घालीन, त्यांच्या हृदयांवर ते लिहिन, मी त्यांचा याव्हे एलोहिम होईन, ते माझे लोक होतील. ११ तुमच्या अदोनाईला ओळखा असे एखाद्या मनुष्याने आपल्या बंधूला, अथवा आपल्या देश बांधवाला, सांगण्याची गरज पडणार नाही. कारण त्यांच्यातील कनिष्ठापासून ते वरीष्ठापर्यंत सर्वजण मला ओळखतील. १२ कारण मी दयाळूपणे यापुढे त्यांचे अपराध माफ करीन त्यांची पापे विसरून जाईन." १३ या बेरीथ ला (कराराला) हादेश बेरीथ (नवीन करार) म्हंटले, म्हणून त्याने पहिला करार जुना ठरविला, जे जुने ते निकामी ठरते व नाहीसे होऊन जाते.

९.१ पहिल्या करारात उपासनेसंबंधी काही नियम होत. आणि मनुष्यांनी बनविलेले एक पवित्रस्थान होते.२ कारण दिपस्तंभ व अर्पणाच्या विशेष भाकरी ठेवण्यासाठी पहिल्या मंडपामध्ये एक मेज ठेवण्यात आला होता. हा जो पहिला मंडप होता त्याला पवित्रस्थान असे म्हणतात. ३ दुस-या पडद्यामागे एक खोली (मंडप) होती.त्याला परमपवित्रस्थान म्हणत, ४ त्यामध्ये ऊद जाळण्यासाठी सोन्याची वेदी आणि कराराची पेटी (कोष) होता. हा कोष संपूर्ण सोन्याने मढवलेला होता. त्या कोषात एका सोन्याच्या भांडयात मान्ना होता. तसेच अहरोनांची काठी जिला पाने फुटलेली होती.व कराराच्या दगडी पाटया होत्या. ५ या कोषावर गौरवाचे करूबींम दयासनावर सावली करीत होते. परंतु या गोष्टीबाबत सविस्तर चर्चा आता आपण करू शकत नाही.६ या व्यवस्थेनुसार कोहेन (याजक) गण आपल्या कर्तव्य पार पाडण्यासाठी पहिल्या मंडपात तर नित्य प्रवेश करीत होते. ७ परंतु दुस-यात एलयोवन कोहेन (प्रमुख याजक) एकटाच दरवर्षी एकदा मात्र जात असतो. शिवाय तो रक्त घेतल्याशिवाय आत जात नसे, ते रक्त स्वतःच्या पापांसाठी, व लोकांच्या अज्ञानाच्या पापांसाठी अर्पण करावयास आत जात असे.८ याव्दारे क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) हे दर्शविते की, पहिला मंडप उभा आहे तोपर्यंत परमपवित्रस्थानात जाण्याचा मार्ग खुला नाही. ९ हे सर्व आजच्या काळात प्रतिकात्मक आहे. याचा अर्थ असा की, याव्हे एलोहिमला दिलेली दाने , व त्याला वाहिलेली अर्पणे, यामुळे सदविवेकबुद्धि परिपूर्ण होऊ शकत नाही.१० हे विधी केवळ बाह्य बाबी म्हणजे अन्न व पाणी तसेच निरनिराळया प्रकारच्या औपचारिक धुण्याबाबत संबंधीत आहेत.

११ पण आता मशीहा हा घडून आलेल्या चांगल्या गोष्टींचा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) म्हणून आला आहे. तो मनुष्याच्या हातांनी बांधलेला, अशा मोठया, तसेच सर्व दृष्टींनी परिपूर्ण अशा या निर्मीत्तीमधील मंडपामधील नव्हे.१२ बकरे किंवा वासरू यांचे रक्त घेऊन नव्हे, तर आपले स्वतःचेच रक्त घेऊन परमपवित्रस्थानात गेला. व त्याने सर्व काळासाठी स्वतःच एकदाच अर्पण करून आपल्याला कायमचे यशाह (तारण) मिळवून दिले.१३ कारण बकरे व बैल यांचे रक्त, तसेच कालवडीची राख त्यांच्यावर शिंपडले तर त्याची अपवित्र शरीरे शुद्ध होतात.१४ तर मशीहाचे रक्त याव्हे एलोहिम साठी त्याहून किती तरी अधिक परिणामकारक अर्पण

ठरू शकेल! मशीहाने सदाजीवी आत्म्याच्याव्दारे आपल्या स्वतःचे डागविरहीत आणि परिपूर्ण असे अर्पण केले. त्याचे रक्त आपल्या निर्जीव कर्मांमुळे मरून गेलेली, आपली सदविवेकबुद्धि शुद्ध करील. अशासाठी की, आपण जिवंत याव्हे एलोहिमची उपासना करू शकू.

१५ पहिल्या काळात ज्या चुका झाल्या, त्या चुकांपासून सुटका व्हावी, म्हणून याव्हे एलोहिम आपल्या वचनानुसार अनंतकालच्या वतनासाठी ज्या लोकांना बोलावितो, त्यांच्याकरिता मशीहा हा नवीन कराराचा मध्यस्थ झाला आहे.१६ जेथे मृत्यपत्र केलेले आहे तेथे ते करून ठेवणाराचा मृत्यू झाला आहे, हे सिद्ध होणे जरूरीचे असते. १७ कारण मृत्युपत्र करणारा जिवंत आहे, तोपर्यंत मृत्युपत्र अंमलात येऊ शकत नाही.१८ म्हणून रक्त सांडल्या शिवाय पहिला करार देखील अंमलात आला नव्हता. १९ कारण तोराह (नियमशास्त्राची) प्रत्येक आज्ञा सर्व लोकांसमोर जाहीर केल्यानंतर मोशेने पाणी आणि किरमिजी लोकर व एजोबाच्या फांद्या यांसह वासरांचे आणि बक-यांचे रक्त घेऊन ते त्याने तोराह् च्या (नियमशास्त्राच्या) सेफेर (पुस्तका) वर आणि सर्व लोकांवर शिंपडले. २० तो म्हणाला, “ जो करार पाळण्याची याव्हे एलोहिमने तुम्हांला आज्ञा केली होती, त्या कराराचे हे रक्त आहे.” २१ त्याचप्रमाणे, त्याने मंडपावर व उपासनेसाठी वापरण्यात येणा-या सर्व वस्तूंवर ते रक्त शिंपडले. २२ खरे पाहता तोराह (नियमशास्त्रा) प्रमाणे जवळजवळ प्रत्येक गोष्ट रक्ताने धुतलीच पाहिजे आणि रक्त सांडल्याशिवाय क्षमा मिळत नाही.

२३ म्हणून शाम्माईम (आकाशा) तील गोष्टीच्या नमुन्याप्रमाणे, असलेल्या वस्तु यज्ञाच्या व्दारे शुद्ध करणे जरूरीचे होते. पण त्याहूनही अधिक चांगल्या यज्ञाने शाम्माईम (आकाशां) तील गोष्टींच्या प्रतिमा शुद्ध केल्या जातात.२४ कारण मशीहाने मानवी हातांनी केलेल्या पवित्रस्थानात पाऊल ठेवले असे नाही, तर ते स्थान ख-या वस्तूंची केवळ प्रतिमाच आहे. याव्हे एलोहिमच्या समोर उभे होण्यासाठी खुद्द आकाशांत त्याने प्रवेश केला. २५ जे त्याचे स्वतःचे नाही असे रक्त घेऊन, जसा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) परमपवित्रस्थानात दरवर्षी जातो. तसा मशीहा पुन्हा पुन्हा परमपवित्रस्थानात गेला नाही.२६ तसे असते तर मशीहाला जगाच्या स्थापनेपासून स्वतःचे अर्पण पुष्कळ वेळा करावे लागले असते. परंतु आता युगाच्या शेवटी आपल्या स्वतःला अर्पण करून पाप नाहीसे करण्यासाठी तो एकदाच प्रगट झाला आहे. २७ आणि जसे मनुष्यांना एकदाच मरण, व नंतर न्यायासनासमोर येणे हे नेमून ठेवलेले आहे.२८ त्याप्रमणे मशीहा पुष्कळ लोकांची पापे नाहीशी करण्याकरिता अर्पणरूपाने केवळ एका वेळेस दिला गेला. आणि परत एकदा दुस-या वेळेस त्यांची पापे नाहीशी करावी म्हणून नव्हे. परंतु जे त्याची आतुरतेने वाट पाहतात त्यांच्यासाठी तो दिसेल.

**१०**.१ कारण तोराह (नियमशास्त्र) हे भविष्यकाळात येणा-या चांगल्या गोष्टींची केवळ एक छाया आहे.त्या सत्याचे ते खरे स्वरूप नव्हे. म्हणून याव्हे एलोहिमची उपासना करण्यासाठी जे त्याच्याजवळ येतात, त्यांना तोराह (नियमशास्त्र) त्याच अर्पणांमुळे जी वर्षानु वर्षे पुन्हा पुन्हा केली जातात, ते कदापि परिपूर्ण करू शकत नाही. २ जर तोराह (नियमशास्त्र) लोकांना परिपूर्ण करू शकले असते तर यज्ञ अर्पण करण्याचे थांबले नसते का? कारण उपासना करणारे कायमचेच शुद्ध झाले असते, आणि त्यानंतर आपल्या पापांच्या बाबतीत दोषी ठरले नसते. ३ पण त्याऐवजी ते यज्ञ दरवर्षी पापांची आठवण करून देतात.४ कारण बैलांच्या किंवा बक-याच्या रक्ताने पाप नाहीसे होणे शक्य नाही. ५ म्हणून मशीहा जेंव्हा या जगात आला, तेंव्हा तो म्हणाला, “ मला यज्ञ किंवा अर्पण नको होती. पण तू माझ्यासाठी शरीर तयार केले.६ होमार्पणांनी, व पापार्पणांनी तुला संतोष वाटला नाही.७ मग मी म्हणालो, ‘हा मी आहे! तोराह च्या (नियमशास्त्राच्या) गुंडाळयामध्ये माझ्याबद्दल लिहून ठेवले आहे. याव्हे एलोहिम तुझी उच्छा पूर्ण करण्यास मी आलो आहे.’”८ पहिल्याने तो म्हणाला, “ तुला यज्ञांनी, अर्पणांनी, होमार्पणांनी, व पापार्पणांनी संतोष वाटत नाही.” जरी तोराह नुसार (नियमशास्त्रानुसार) ही अर्पणे आवश्यक ठरतात तरी देखील. ९ मग तो म्हणाला, “ हा मी आहे! तुझी उच्छा पूर्ण करण्यास मी आलो आहे.” अशा रीतीने त्याने दुसरी व्यवस्था करण्यासाठी पहिली रद्द केली. १० याव्हे एलोहिमच्या उच्छेनुसार येशूवाह मशीहाच्या देहाच्या एकदाच झालेल्या अर्पणाव्दारे आपण शुद्ध करण्यात आलो. ११ प्रत्येक यहूदी कोहेन (याजक) उभा राहतो, आणि दररोज त्याची धार्मिक कामे करत असतो, आणि ज्यामुळे पाप नाहीसे होत नाही, असे यज्ञ तो वारंवार अर्पण करतो. १२ परंतु आपल्या पापांसाठी येशूवाहने त्याच्या देहाचे एकमेव अर्पण केले, कारण ते सर्वकाळासाठी चांगले होते. तो आता याव्हे एलोहिमच्या

उजवीकडे बसला आहे • १३ आणि आता त्याच्या शत्रूला त्याच्या पायाखाली तुडवूपर्यंत तो वाट पाहत आहे • १४ कारण आत्म्याच्या अनंतकाळच्या त्याने केलेल्या एका यज्ञाच्याव्दारे त्याने त्यांना शुद्ध केले • १५ पवित्र आत्माही याबाबत आपल्याला साक्ष देतो • पहिल्यांदा तो असे म्हणतो, १६ "त्या दिवसानंतर मी त्यांच्याशी हा करार करीन • असे अदोनाई म्हणतो, मी माझे नियम त्यांच्या रूहुव्वा (आत्म्यात) ठेवीन आणि ते त्यांच्या हदयावर लिहीन • १७ मग तो म्हणतो, आणि मी त्यांची पापे व नियमविरहीत कृत्ये कधीही आठवणार नाही • " १८ जेथे या पापांची क्षमा झाली आहे, तेथे पापाच्या आणखी अर्पणाची आवश्यकता भासणार नाही •

१९ म्हणून बंधु आणि भगिनींनो, येशूवाहच्या रक्ताव्दारे आपण बिनधास्तपणे परमपवित्र स्थानामध्ये प्रवेश करतो • २० त्याच्या शरीराव्दारे, त्याने उघडलेल्या नवीन आणि जिवंत अशा मार्गामुळे आपण न भीता परमपवित्र स्थानात पाऊल ठेवू शकतो • २१ आणि एलोहिमच्या घराण्यावर आपल्याला महान असा एलयोवन कोहेन (मुख्य याजक) मिळाला आहे • २२ म्हणून आपण आपली मळीन विवेकबुद्धि शुद्ध करण्यासाठी, आपल्या हदयावर केलेल्या येशूवाहच्या रक्तसिंचनाने, आणि आपली शरीरे पवित्र पाण्याने धुतल्याने, आपण विश्वासू आश्वासन तसेच तळमळ यांनी भरलेल्या अंतःकरणाने याव्हे एलोहिमच्या जवळ जाऊ • २३ आपल्याला जी आशा आहे, तिला आपण चिकटून राहू , कारण ज्याने आपल्याला अभिवचन दिले, तो विश्वासू आहे • २४ आपण एकमेकांस समजून घेऊ व प्रीति आणि चांगली कामे करण्याकरिता एकमेकांना उत्तेजन देऊ • २५ आणि काही जणांना जी वाईट सवय असते, तसे आपण एकत्र येण्याचे बंद करू नये • परंतु एकमेकांना उत्तेजन देऊ या आणि तो दिवस (कदाचित मशीहा पुन्हा येण्याची ती वेळ) जवळ येत असताना, तसे उत्तेजन देण्याची अधिकच गरज आहे •

२६ सत्याचे ज्ञान प्राप्त झाल्यानंतरसुद्धा जर आपण जाणूनबुजून पाप करीत राहिले, तर पापांसाठी यापुढे आणखी अर्पण करण्याचे बाकी राहिले नाही • २७ पण जे याव्हे एलोहिमला विरोध करतात, त्यांना भयंकर अशा न्यायनिवडया शिवाय, व भयंकर अशा भस्म करणा-या अग्नीशिवाय दुसरे काही शिल्लक राहिले नाही • २८ जो कोणी मोशेचे तोराह (नियमशास्त्र) नाकारतो, त्याला दोघा किंवा तिघांच्या साक्षीच्या आधारे कसलीही दया न दाखविता मारतात • २९ तर मग ज्याने याव्हे एलोहिमच्या बेन (मुलाला) पायाखाली तुडविले, ज्या रक्ताने त्याला शुद्ध केले, त्या रक्ताला अपवित्र ठरविले, आणि ज्याने कृपेच्या आत्म्याचा अपमान केला, त्या मनुष्याला किती तरी अधिक शिक्षा मिळेल, याचा विचार करा! ३० कारण त्याला ओळखतो तो म्हणतो, " सूड घेणे माझ्या हाती आहे, मी परतफेड करीन • " पुन्हा तो असे म्हणतो, " अदोनाई आपल्या लोकांचा न्याय करील • " ३१ जीवंत याव्हे एलोहिमच्या हाती सापडणे किती भयंकर गोष्टी आहे • ३२ पूर्वीचे दिवस आठवा जेव्हा नुकताच तुम्हांला सुवार्तेचा प्रकाश प्राप्त झाला होता, तेव्हा तुम्ही भयंकर दुःखे सोसली • ३३ काही वेळा जाहीरपणे तुमचा अपमान करण्यात आला • आणि वाईट शब्द वापरण्यात आले, तर काही वेळा ज्यांना अशा रीतीने वागणूक मिळाली त्यांचे सहभागी व्हावे लागले • ३४ एवढेच नाही तर त्यांच्यासाठी तुम्ही झीज देखील सोसली, जे तुरूंगात होते, त्यांना तुम्ही मदत केली • त्यांच्या दुःखात सहभागी झाला, आणि जे तुमच्याकडे होते, ते तुमच्याकडून घेण्यात आले, तरी तुम्ही आनंदी होता • कारण तुमच्याजवळ अधिक चांगली, व सर्वकाळ टिकणारी संपत्ती आहे • तुम्ही जाणून होता, ३५ म्हणून तुमच्यामध्ये जो दृढ विश्वास होता, तो सोडू नका • कारण त्यापासून तुम्हांला मोठा लाभ होणार आहे • ३६ तुम्ही धीर धरणे जरूरीचे आहे • म्हणजे जेव्हा तुम्ही याव्हे एलोहिमची इच्छा पूर्ण करून त्याने तुम्हांला दिलेल्या त्याच्या वचनाप्रमाणे तुम्ही प्रतिफळ मिळवावे • ३७ आता अगदी थोडक्या अवधीनंतर, " जो येणारा आहे तो येईल, तो उशीर लावणार नाही • ३८ परंतु माझा धार्मिक पुरूष विश्वासाने वाचेल, आणि जर तो पाठ फिरवील, तर माझ्या जिवाला संतोष होणार नाही • " ३९ परंतु पाठ फिरवून नाश झालेल्यां पैकी आपण नाही, तर आपल्या जिवाचे यशाह (तारण) साधून विश्वास बाळगणा-या पैकी आहोत •

**११** • १ आता विश्वास म्हणजे, आम्ही जी आशा धरतो • त्याबद्दलची खात्री म्हणजे ज्या गोष्टी आपण पाहू शकत नाही, त्याबद्दल भरवसा असणे • २ यासाठीच म्हणजे त्यांच्या विश्वासासाठीच याव्हे एलोहिमने पूर्वीच्या लोकांना उंचावले होते • ३ विश्वासामुळेच आम्हांला समजते की, या जगाची निर्मिती याव्हे एलोहिमच्या आज्ञेने झाली • म्हणून जे काही आता दिसते, ते जे दिसत नव्हते

त्यापासून निर्माण केले गेले . ४ विश्वासामुळेच हाबेलाने काईनापेक्षा अधिक चांगला यज्ञ याव्हे एलोहिमला अर्पण केला . याव्हे एलोहिमने हाबेलाचे अर्पण मान्य केल्यामुळे विश्वासाच्या व्दारे तो धार्मिक म्हणून उंचावण्यात आला . आणि जरी तो मेला असला तरी तो आपल्या विश्वासामुळे अजून बोलतो . ५ विश्वासामुळे हनोखाला याव्हे एलोहिम कडे नेण्यात आले यासाठी की, त्याला मरणाचा अनुभव आला नाही .व तो कोणाला सापडला जाऊ नये म्हणून याव्हे एलोहिमने त्याला दूर नेले . पण तो वर घेतला जाण्यापूर्वी त्याच्याबद्दल साक्ष देण्यात आली की, तो याव्हे एलोहिमला संतोषवीत असे . ६ आणि विश्वासाशिवाय याव्हे एलोहिमला संतोषविणे अशक्य आहे . कारण जो कोणी याव्हे एलोहिम कडे येतो, त्याने असा विश्वास धरला पाहिजे की, याव्हे एलोहिम आहे . आणि जे त्याला शोधतात त्यांना तो प्रतिफळ देतो . ७ ज्या गोष्टी अजून पाहिल्या नव्हत्या, अशा गोष्टींच्या बाबतीत नोहाला सावधान करण्यात आले होते . तेव्हा त्याने विश्वासाने त्याची दखल घेतली . आणि आपल्या कुटुंबाचा बचाव करण्यासाठी तारू बांधले . विश्वासामुळेच त्याने जगाचा धिक्कार केला, आणि विश्वासामुळे लाभणा-या धार्मिकतेचा तो वारस बनला . ८ जेंव्हा याव्हे एलोहिमने अब्राहामाला पाचारण केले, तेंव्हा विश्वासानेच त्याने आज्ञापालन केले . आणि त्याला वतन म्हणून जी जागा मिळणार होती, त्या जागेकडे तो गेला . आपण कोठे जात आहोत हे त्याला ठाऊक नसताना देखील तो बाहेर पडला . ९ विश्वासाने तो वचनदत्त देशात एखाद्या उप-यासारखा राहिला . इसहाक व याकोब यांच्यासारखा तो देखील तंबूत राहिला . कारण ते दोघेही अब्राहामाला दिलेल्या त्याच वचनाचे वारसदार होते . १० ज्या नगराला मजबूत पाया आहे, व ज्याचा प्रयोजक बांधकाम कारागीर स्वतः याव्हे एलोहिम आहे, अशा नगरीची ते वाट पाहात होते . ११ आपण दिलेल्या वचनाबाबत याव्हे एलोहिम विश्वासू आहे, हे जाणून साराह् ही जरी वांझ होती .आणि अब्राहामाचे वय लेकरे होण्याच्या अगदी मर्यादे पलीकडे गेले होते, तरी विश्वासाने बेन (मुलाला) जन्म देण्याची शक्ति त्यांना मिळाली .१२ आणि जवळजवळ मरावयास टेकलेल्या अशा एका अब्राहामा पासून शाम्माईम (आकाशांतील) कोकाब (ता-यां) च्या संख्येएवढी आणि याम्मीम (समुद) किना-यावरील वाळूच्या कणां इतकी अगणित संतति जन्मास आली . १३ हे सर्व लोक विश्वासात मरण पावले, देण्यात आलेल्या वचनांचे प्रतिफळ त्यांना प्राप्त झाले नव्हते .परंतु त्यांनी विश्वासाने ते दुरूनच पाहिले व त्याचे स्वागत केले . आणि त्यांनी उघडपणे कबूल केले की, ते परके आणि प्रवासी आहेत . १४ जे लोक अशा गोष्टी बोलतात ते हेच दर्शवितात की, ते त्यांच्या वतनासाठी देश पाहत आहेत . १५ जर आपण सोडून आलेल्या देशाबद्दल विचार करीत असते, तर त्यांना त्या देशात परत जाण्याची संधी मिळाली असती .१६ परंतु ते लोक त्याहून अधिक चांगल्या देशाची, म्हणजे आकाशांच्या वतनाची इच्छा धरून होते . म्हणून याव्हे एलोहिमला त्यांचा याव्हे एलोहिम म्हणवून घ्यायला लाज वाटली नाही . कारण त्यांने त्यांच्यासाठी एक नगर तयार केले आहे . १७ जेंव्हा याव्हे एलोहिमने अब्राहामाची परीक्षा पाहिली, तेंव्हा विश्वासाने आपला बेन (मुलगा) इसहाक याला अर्पण केले . होय, ज्याला अभिवचने दिली होती, तो आपला एकुलता एक मुलगा अर्पण करण्यास तयार झाला होता . १८ आणि याव्हे एलोहिमने त्याला सांगितले होते की, " इसहाका कडूनच तुझ्या वंशाची वाढ होईल ."

१९ अब्राहामाचा असा विश्वास होता की, याव्हे एलोहिम मनुष्याला मरणातून पुन्हा उठवू शकतो .आणि अलंकारिक भाषेत बोलायचे झाले, तर इसहाक त्याला जसा काय मरणातून परत मिळाला . २० इसहाकाने विश्वासाने याकोबाला व एसावाला पुढील काळासाठी आशिर्वाद दिले . २१ विश्वासाने याकोब जेंव्हा तो मरत होता, तेंव्हा त्याने योसेफाच्या प्रत्येक मुलाला आशिर्वाद दिला . आणि आपल्या काठीवर तो टेकला असताना, त्याने याव्हे एलोहिमची उपासना केली . २२ आपल्या आयुष्याच्या शेवटी योसेफ विश्वासाने इस्त्राएल लोक मिसर (इजिप्त) देशाच्या बाहेर जाण्याबाबत बोलला, आणि त्याच्या अस्थिसंबंधी काय करायचे याच्या सूचना त्यांना दिल्या .२३ जेंव्हा मोशे जन्मला तेंव्हा विश्वासाने त्याच्या आईवडिलांनी त्याला तीन महिने लपवून ठेवले . कारण त्यांनी पाहिले की, ते बाळ सुंदर आहे .आणि राजाज्ञेची त्यांना भीती वाटली नाही . २४ विश्वासाने मोशेने जेंव्हा तो मोठा झाला, तेंव्हा फारोच्या मुलीचा मुलगा म्हणवून घेण्याचे नाकारले . २५ पापाचे क्षणीक सुख भोगण्यापेक्षा, याव्हे एलोहिमच्या लोकांबरोबर त्रास सहन करण्याचे त्याने निवडले . २६ मिसर (इजिप्त) देशातील संपत्तीपेक्षा मशीहासाठी अपमान सहन करणे, हे अधिक मौल्यवान आहे . असे त्याने मानले . कारण तो पुढे मिळणा-या प्रतिफळाकडे पाहत होता . २७ राजाच्या रागाची भिती न बाळगता, मोशेने मिसर (इजिप्त) देश सोडला . जणू काय न दिसणा-या याव्हे एलोहिमला पाहत असल्यासारखा त्याने धीर धरला . २८ नाश करणा-याने (देवदूताने) इस्त्राएल

लोकांच्या प्रथम जन्मलेल्या मुलांपैकी एकालाही हात लावू नये, म्हणून त्याने विश्वासाने पेसॅह (वल्हांडण) सण पाळला, आणि रक्त शिंपडले. २९ विश्वासाने त्यांनी जणू काय कोरडया जमिनीवरून चालावे, तसा तांबडा याम्मीम (समुद्र) पार केला. पण जेंव्हा मिसरच्या (इजिप्तच्या) लोकांनी तसे करण्याचा प्रयत्न केला, तेंव्हा ते बुडाले. ३० लोकांनी विश्वासाने सात दिवस फे-या मारल्यावर यरीहोची भिंत पडली.३१ राहाव वेश्येच्या विश्वासामुळेच ज्या लोकांनी आज्ञा मोडली, त्यांच्याबरोबर ती मारली गेली नाही, कारण तिने हेरांचे शांतीने स्वागत केले.३२ मी आणखी काय सांगू ? गिदोन, बाराक, शमशोन, इफ्ताह, दावीद, शमुवेल, आणि नब्बीईम (संदेष्टे) यांच्याबाबत सांगू लागलो तर वेळ पुरणार नाही. ३३ लोकांनी विश्वासाने राज्ये जिंकली, आणि न्याय स्थापित केला. आणि त्यांना याव्हे एलोहिमची अभिवचने मिळाली, त्यांनी सिंहाची तोंडे बंद केली. ३४ त्यांनी अग्निचे सामर्थ्य नष्ट केले. तरवारीने मरण्यापासून बचावले.अशक्तपणात त्यांनी सामर्थ्य मिळविले. ते लढाईत सामर्थ्यशाली ठरले. आणि त्यांनी परकी सेवा मागे हटविली. ३५ स्त्रियांना त्यांचे मरण पावलेले पुन्हा जिवंत असे मिळाले.इतरांना वेदना सोसाव्या लागल्या कारणाने, त्यांनी अधिक चांगले पुनरूत्थान मिळावे, म्हणून सुटका करून घेण्यास नकार दिला. ३६ काहींना निंदा व चाबकाचा मार सहन करावा लागला. तर काहींना वेडया व तुरूंगवास भोगावे लागले, ३७ त्यांना दगडमार झाला. करवतीने त्यांना चिरण्यात आले, त्यांना तरवारीने मारण्यात आले. ते मेंढयांचे व बक-यांचे कातडे पांघरून फिरत राहिले, ते निराधार झाले. त्यांना अती दबावाखाली भारी पीडा देण्यात आल्या. ३८ त्यांच्यासाठी जग योग्य नव्हते. ते जंगलात, डोंगरकपारीत गुहांमधून व जमिनीतील बिळांतून लपून फिरत राहिले. ३९ या लोकांना त्यांच्या विश्वासाविषयी चांगले बोलविण्यात आले. पण याव्हे एलोहिमने त्यांना जे अभिवचन दिले होते, ते त्यांना मिळाले नाही. ४० याव्हे एलोहिमने आमच्यासाठी काहीतरी अधिक चांगली योजना तयार केली होती. यासाठी की, आपल्याबरोबर त्यांनाही परिपूर्ण करावे.

१२ .१ म्हणून विश्वास धरणारे पुष्कळ ढगांसारखे साक्षीदार सभोवती असल्याने, आपल्याला अडथळा आणणा-या सर्व गोष्टी, तसेच सहजासहजी गुंतविणारे पाप आपण दूर फेकू या, व जी शर्यत आपल्यासमोर आहे, ती शर्यत आपण चिकाटीने पूर्ण करू.२ जो आमचे विश्वासात नेतृत्व करतो, आणि पूर्णत्वास नेतो. त्या येशूवाहवर आपले लक्ष केंद्रित करू या. जो आनंद त्याच्यासमोर होता, त्यासाठी येशूवाहने वधस्तंभ सहन केला होता. वधस्तंभावरील निंदास्पद मरणाला त्याने तुच्छ मानले, आणि त्याने याव्हे एलोहिमच्या सिंहासनाजवळील उजवीकडे जागा घेतली आहे. ३ तुम्ही खचून जाऊ नये आणि धीर सोडू नये, म्हणून पापी लोकांचा मोठया प्रमाणातील विरोध सहन केला, त्याचा विचार करा.४ पापाविरूद्धच्या तुमच्या युद्धात, तुम्ही रक्त सांडेपर्यंत अजून झगडलेला नाही. ५ ज्याच्याकडून तुम्हांला उत्तेजन मिळेल असा जो शब्द (मुळात मुले) , तुम्हांला उद्देशून वापरण्यात आला आहे. त्याचा कदाचित तुम्हाला विसर पडलेला दिसतो; "माझ्या मुला अदोनाईच्या शिस्तीचा अनादर करू नको.आणि जेंव्हा तो तुला शुद्धीवर आणतो, तेव्हा तू धीर सोडू नको.

६ कारण ज्याच्यावर अदोनाई प्रीति करतो, त्यांना तो शिस्त लावतो. आणि ज्यांना तो आपले मुले म्हणून स्विकारतो, त्यांना तो शिक्षा करतो." ७ हा कठीण समय आहे म्हणून शिस्त सहन कर. ते असे दर्शविते की, याव्हे एलोहिम तुम्हांला मुलांसारखी वागणूक देत आहे. कारण असा कोणता बेन (मुलगा) आहे, ज्याला अब्बा (वडील) शिस्त लावीत नाहीत? ८ जर तुम्हांला शिस्त लावलेली नाही, तर जसा इतर सर्व मुलांचा अनुभव असतो, तसे तुम्ही दासीचे मुले आहात.आणि तुम्ही खरे मुले नाही.९ याशिवाय आम्हा सर्वांना जगिक अब्बा (वडील) असताना, त्यांनी आम्हाला शिस्त लावली. आणि त्याबद्दल आम्ही त्यांचा आदर राखला. तर मग आम्ही आमच्या आध्यात्मिक वडीलाचा, कितीतरी अधिक प्रमाणात अधिक होऊन जगले पाहिजे वरे? १० आमच्या मानवी वडिलांनी त्यांच्या दृष्टीने, अती उत्तम अशी शिस्त थोडया काळासाठी लावली. पण याव्हे एलोहिम आम्हाला आमच्या चांगल्यासाठी शिस्त लावतो.यासाठी की, त्याच्या पवित्रपणात आपणही वाटेकरी व्हावे. ११ शिक्षेने शिस्त लावण्याच्या वेळेस, कोणतीही शिक्षा चांगली वाटत नाही. तर दुःखाची वाटते. पण नंतर ज्या लोकांना शिस्तीचे धडे शिकायला मिळाले आहेत, त्यांना धार्मिकपणाच्या आणि शांतीच्या जीवनाची फळे चाखण्याची संधी मिळते.

१२ म्हणून तुमचे गळून गेलेले हात उंच करा, आणि तुमचे अशक्त गुडघे बळकट करा! १३ तुमच्या पावलांकरिता सरळ रस्ता तयार करा. यासाठी की, लंगडे पाय निकामी होऊ नयेत, तर उलट ते बरे व्हावेत. १४ सर्व लोकांबरोबर शांतीने राहण्याचा प्रयत्न करा, व पवित्र जीवन जगण्याचा प्रयत्न करा.कारण त्याशिवाय (पवित्रतेशिवाय) कोणालाही अदोनाईला पाहता येणार नाही. १५ कोणीही याव्हे एलोहिमची कृपा चुकवू नये, यासाठी तिकडे लक्ष द्या, आणि इकडे लक्ष द्या की, कोणतेही कडूपणाचे मूळ वाढून त्यापासून समस्या निर्माण होऊ नये, व इतर लोकांची मने कलुषित करू नये, म्हणून जपा.१६ कोणीही व्यभिचारी असू नये, किंवा एका जेवणापायी आपला वडिलकीचा हक्क विकून टाकणा-या, एसावासारखे जगीक विचाराचे असू नये, याकडे लक्ष द्या.१७ नंतर तुम्हांला माहित आहे, जेंव्हा त्याला वारस हक्काने आशिर्वाद अपेक्षीत होता, तेंव्हा तो नाकारण्यात आला. जरी त्याने रडून आशिर्वाद मिळविण्याचा प्रयत्न केला, तरी आपल्या वडिलाचे मन तो बदलू शकला नाही.

१८ ज्या पर्वताला हाताने स्पर्श करता येत नाही, जो अग्नीच्या ज्वालांनी पेटलेला आहे.जो अंधार दुःख व वादळ यांनी भरलेला आहे अशा पर्वताकडे तुम्ही आला नाही.तर एका नवीन ठिकाणी आला आहात. १९ कर्ण्याच्या आवाजाजवळ तुम्ही आला नाहीत किंवा शब्द उच्चारणा-यांच्या वाणी याजवळ तुम्ही आला नाही. असा आवाज ज्यांनी ऐकला त्यानी अशी विनंती केली की, त्यांनी यापुढे आणखी वाणी ऐकवू नये. २० कारण ती जी आज्ञा केली होती, सहन करू शकले नाहीत, “ जर एखाद्या प्राण्याने जरी पर्वताला स्पर्श केला, तरी त्याला दगडमार करण्यात यावा.” २१ खरोखर ते दृश्य इतके भयंकर होते की, मोशे म्हणाला, “ भीतीमुळे मी थरथर कांपत आहे.” २२ परंतु तु तुम्ही सियोन पर्वताजवळ जिवंत याव्हे एलोहिमच्या नगराजवळ आणि शाम्माईम (आकाशां) तील यरूशलेम येथे आलेला आहात. आणि तुम्ही आनंदाने जमा झालेल्या हजारो देवदूतांजवळ आलेले आहात. २३ आणि तुम्ही प्रथम जन्मलेल्या मुलांच्या मंडळीकडे ज्यांची नावे शाम्माईम (आकाशांत) लिहिली आहेत अशांकडे आला आहात. आणि तुम्ही याव्हे एलोहिम जो सर्वांचा न्यायधीश आहे, त्याच्याकडे आला आहात. आणि तुम्ही नीतिमान लोकांच्या आत्म्यांकडे जे पूर्ण आहेत, त्यांच्याकडे आला आहात. २४ आणि तुम्ही जो नव्या कराराचा मध्यस्थ येशूवाह त्याच्याकडे आला आहात.तुम्ही शिंपडण्यात आलेल्या रक्ताकडे आलात की, जे रक्त हाबेलाच्या रक्तापेक्षा अधिक चांगल्या गोष्टी सांगते.२५ जो बोलतो त्याचे ऐकण्यासाठी नकार देऊ नका, याविषयी खात्री असू द्या. ज्याने पृथ्वीवर त्यांना सावध रहाण्याविषयी सांगताना त्याचे ऐकायाचे नाही, असे ज्यांनी ठरविले ते लोक जर सुटू शकले नाहीत. तर मग जो शाम्माईम (आकाशां) तून सावध करतो, त्याच्याकडे दुर्लक्ष केले, तर आम्हाला सुटकेसाठी कोणता मार्ग राहिला बरे?

२६ त्यावेळेस त्याच्या आवाजाने भूमी हादरली पण आता त्याने असे अभिवचन दिले आहे की, “ पुन्हा एकदा मी केवळ ऐरेस्त (पृथ्वीच) नव्हे तर शाम्माईम (आकाशां) देखील हादरवून टाकील.” २७ “पुन्हा एकदा” हे शब्द हेच दर्शवितात की, ज्या गोष्टी उत्पन्न केलेल्या आहेत, त्या काढून टाकण्यात येतील. ज्या गोष्टी हलविता येत नाहीत, त्या तशाच राहतील.२८ म्हणून आम्हांला अढळ असे राज्य देण्यात येत असताना, आपण त्याविषयी कृतज्ञता बाळगू या.आणि आदराने, व भयभीत होऊन याव्हे एलोहिमला मान्य होईल, अशी त्याची उपासना करू. २९ कारण आपला याव्हे एलोहिम भस्म करणारा अग्नी आहे.

**१३** .१ मशीहा मध्ये एकमेकांवर अखंडपणे बंधु व भगिनीसारखी प्रीति करा. २ पाहुणचार करण्याचे विसरू नका. असे करण्याने काहीनी त्यांच्या नकळत देवदूतांचे स्वागत केले आहे. ३ तुम्ही स्वतः त्यांच्याबरोबर बंधनात होता. असे समजून जे बंधनात आहेत, त्यांची आठवण करा. तुम्हीही देहात असल्याने जे दुःख भोगीत आहेत, त्यांची आठवण ठेवा. ४ सर्वांनी विवाहाचा आदर करावा. व वैवाहिक अशुद्धता असू नये. कारण जे व्यभिचारी व विषयवासने बद्दल भ्रष्ट आहेत अशा लोकांचा याव्हे एलोहिम न्याय करील.५ आपले जीवन पैशाच्या लोभापासून दूर ठेवा, व तुमच्याकडे जे आहे, त्यातच समाधान माना. कारण याव्हे एलोहिमने असे म्हंटले आहे, “मी कधीही तुला सेडणार नाही, मी कधीही तुला त्यागणार नाही.” ६ म्हणून आपण खात्रीने म्हणू शकतो, “याव्हे एलोहिम माझा साहाय्यकर्ता आहे, मी भिणार नाही. मनुष्य माझे काय करणार?”

७ जे तुमचे पुढारी आहेत. ज्यांनी याव्हे एलोहिमचे वचने तुम्हांला सांगितले, त्यांची आठवण करा. त्यांच्या वर्तणुकीचा परिणाम लक्षात आणून, त्यांच्या विश्वासाचे अनुकरण करा. ८ येशूवाह मशीहा काल, आज, आणि युगानुयुगे सारखाच आहे. ९ निरनिराळया प्रकारच्या विचित्र शिकवणुकीमुळे बहकून जाऊ नका. खाण्याच्या पदार्थानी नव्हे, तर याव्हे एलोहिमच्या कृपेने आपली हृदय बळकट केलेली फार बरी. कारण खाण्याचे पदार्थाने खाल्याने कोणाचेही हित झालेले नाही.

१० ज्या वेदीवरील अन्न खाण्याचा किंवा सहभागी होण्याचा अधिकार मंडपात सेवा करणा-यांनाही नाही.अशी वेदी आपल्याकडे आहे. ११ यहूदी एलयोवन कोहेन (मुख्य याजक) प्राण्यांचे रक्त परमपवित्रस्थानात पापांचे अर्पण म्हणून घेऊन जातात.परंतु केवळ प्राण्यांची शरीरे छावणीच्या बाहेर नेऊन जाळतात. १२ म्हणून येशूवाहने सुद्धा स्वतःच्या रक्ताने लोकांना शुद्ध करावे, यासाठी नगराच्या वेशी बाहेर दुःख सोसले. १३ म्हणून आपण छावणीच्या बाहेर जाऊ, आणि येशूवाहच्या अपमानाचे वाटेकरी होऊ. १४ कारण कायमस्वरूपी असे नगर आपल्याला येथे नसले, तरी भविष्य काळात येणार जे नगर आहे, त्याच्याकडे आपण पाहत आहोत.१५ तर मग आपण येशूवाह व्दारे स्तुतिचा यज्ञ सातत्याने करू या. म्हणजे त्याचे नाव आपल्या ओठांनी सतत घेऊ या.१६ आणि इतरांसाठी चांगले ते करण्यास, आणि दानधर्म करण्यास विसरू नका. कारण अशा अर्पणाने याव्हे एलोहिमला संतोष होतो. १७ आपल्या पुढा-यांच्या आज्ञा पाळा, आणि त्यांच्या अधिन असा. त्यांना हिशोब द्यावयाचा असतो, त्यांच्याप्रमाणे तुमच्या जीवासंबंधाने, ते जागरूक असतात. त्यांच्या आज्ञा पाळा यासाठी की, त्यांनी त्यांचे काम दुःखाने न करता आनंदाने करावे.

१८ आमच्यासाठी प्रार्थना करा. आमची सदसद्‌विवेक बुद्धि शुद्ध आहे, याविषयी आमची खात्री आहे.आणि सर्व बाबतीत जे नेहमी बरोबर आहे. तेच सतत करीत राहावे, अशी आमची इच्छा आहे. १९ मी तुम्हांला विनंती करतो की, याव्हे एलोहिमने मला लवकरच तुमच्याकडे परत पाठवावे, म्हणून प्रार्थना करा.

२० ज्या शालोम (शांती) च्या याव्हे एलोहिमने आपल्या मेंढरांचा (म्हणजे आपल्या लोकांचा) राअह् (मेंढपाळ) , आपला अदोनाई येशूवाह मशीहा, याला रक्ताच्या युगानुयुगाच्या नव्या कराराव्दावे उठविले.

२१ त्याची इच्छा पूर्ण करायला, तुम्हांला चांगल्या कामांनी सिद्ध करो.आणि येशूवाह मशीहाच्या व्दारे त्याला संतोष देणारे काम आपल्यामध्ये करा, त्याला युगानुयुग गौरव असो. आमेन.

२२ बंधुजनहो हा जो बोधपर संदेश मी थोडक्यात लिहिला आहे. तो धीर धरून ऐका, अशी विनंती तुम्हांला करतो. २३ आपला बंधु तीमथ्य हा तुरूंगातून सुटला आहे. जर तो लवकर माझ्याकडे आला, तर जेंव्हा मी तुम्हांला भेटायला येईन तेंव्हा तो मजकडे येईल.

२४ तुमच्या सर्व पुढा-यांना व याव्हे एलोहिमच्या सर्व पवित्रांस शालोम (सलाम) सांगा. इटली येथील सर्वजण तुम्हांला शालोम (सलाम) सांगतात. २५ याव्हे एलोहिमची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो, आमेन.

......... समाप्त...........

## .याकोबाने लिहिलेले पत्र.

### .प्रस्तावना.

याकोबाने हे पत्र लिहिले आहे, पण कोणत्या याकोबाने हे पत्र लिहिले, हे निश्चित सांगण्यात येणार नाही. पत्राचा लेखक, अदोनाई येशूवाह मशीहाचा दास याकोब असा स्वतःचा उल्लेख करीत आहे. याकोब हे नाव असलेले चार व्यक्तींचा नव्या करारात उल्लेख आहे. ( १) प्रेषित यहूदा इस्कार्योत नव्हे, याचा वडील (लूक ६ः १६) (२) प्रेषित याकोब आल्फीचा मुलगा (मत्तय १०ः३) (३) प्रेषित याकोब जब्दीचा मुलगा योहानान चा भाऊ (मत्तय ४ः२१) (४) आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाचा भाऊ (मत्तय १३ः१५, गलती १ः१९ ) प्रेषित यहूदाचा वडील याकोब याहून त्याच्याविषयी काहीहि माहिती उपलब्ध नाही. एवढे नाते सांगण्यापलीकडे नव्या करारातही त्याचा उल्लेख नाही. तसेच अल्फीचा मुलगा याकोब हा प्रेषित होता. याहून त्याच्याविषयी काहीच जास्त सांगितलेले नाही. तेंव्हा या दोघांतून हे पत्र लिहिले असावे, असा दिसून येत नाही. जब्दीचा मुलगा याकोब याचा इसवी सन ४४ च्या सुमारास वध झाला. (प्रेषित १२ः२) हा देखील ह्या पत्राचा लेखक असणे शक्य नाही. शिवाय या पत्राचा लेखक स्वतःला प्रेषित म्हणत नाही, दास असे म्हणतो. येशूवाह मशीहाचा भाऊ याकोब याने हे पत्र लिहिले असावे, हे अनेक तज्ञाचे मत आहे. पुनरूत्थित मशीहाचे याला दर्शन झाले होते, (१ले करिंथ १५ः७) तसेच यरूशलेम येथील मंडळीतील हा पुढारी होता, (प्रेषित १२ः१७ व गलती १ः१९) पौलाचा पालट झाल्यावर तो दुस-यांदा यरूशलेमला गेला, तेंव्हा तो तेथील मंडळीच्या पुढा-यांना भेटला. हे तीन अधारस्तंभ यात याकोबाचा कम पहिला लावला जातो. (गलती २ः९) या पत्राची वैशिष्टये पाहता हे येशूवाह मशीहाच्या भावाने लिहिले असे जे पारंपरागत मत आहे. इसवी सन ६२ मध्ये अल्बिनस रोमन सुभेदार आला. या घटनांच्या दरम्यान, प्रमुख याजकाने याकोबाचा वध केला. ह्याचे मूळ दस्तावेज उपलब्ध नसल्याने, ह्या पत्राचा लेखन काळ हा देखील अनिश्चित असल्यने त्याबद्दलचा कालावधी सांगता येणार नाही.

* * * * * * * * * * * * * * *

## .याकोबाने लिहिलेले पत्र.

१.१ याव्हे एलोहिमचा, आणि अदोनाई, येशूवाह मशीहाचा सेवक याकोब, याजकडून याव्हे एलोहिमच्या लोकांचे बारा वंश जे जगभर विखुरलेले आहेत, त्यांना शालोम (सलाम).

२ माझ्या बंधूनो, ज्या ज्या वेळी तुमच्यावर निरनिराळया परीक्षा येतील, तेंव्हा तुम्हीं आनंद माना. ३ कारण तुम्हांला माहीत आहे की, तुमच्या विश्वासाच्या परीक्षेमुळे धीर निर्माण होतो. ४ आणि त्या धीराला परिपूर्ण काम करू द्या. यासाठी की, तुम्हीं प्रौढ परिपूर्ण व कोणत्याही बाबतीत कमतरता नसलेले असे व्हावे, ५म्हणून जर तुमच्यातील कोणी ज्ञानाने उणा असेल, तर त्याने ते याव्हे एलोहिम कडे मागावे. जो सर्व लोकांना उदार हस्ते देतो, आणि जो दोष शोधीत नाही, असा याव्हे एलोहिम ते त्याला देईल. ६ पण त्याने विश्वासाने मागितले पाहिजे, व संशय धरू नये. कारण जो संशय धरतो, तो वा-यामुळे इकडेतिकडे हेलकावणा-या समुद्रातील लाटेसारखा आहे. ७ अशा मनुष्यांने असा विचार करू नये की, अदोनाई पासून त्याला काही प्राप्त होईल. ८ कारण तो दुहेरी मनाचा माणूस, आपल्या सर्व मार्गात चंचल आहे.

९ गरीबीत असलेल्या बंधूने, याव्हे एलोहिमने त्याला आध्यात्मिक संपत्ती दिलेली आहे. याविषयी अभिमान बाळगावा. १० आणि श्रीमंत बंधूने, याव्हे एलोहिमने त्याला दीन अवस्थेत आणले याचा अभिमान बाळगावा. कारण तो एखाद्या रानफुलासारखा नाहीसा होतो. ११ सूर्य त्याच्या प्रखर उष्णतेसह वर येतो, आणि झुडपे वाळून जातात. मोहोर गळून पडतो, व त्याच्या रूपाची शोभा नाहीशी होते. त्याच प्रमाणे, श्रीमंत मनुष्य देखील, त्याच्या उद्योगात असताना नाहीसा होईल.

१२ आशिर्वादीत तो पुरूष, जो त्याच्या परीक्षेत टिकतो. कारण जेंव्हा ती परीक्षा तो उत्तीर्ण होईल, तेंव्हा त्याला विजेत्याचा मुगूट मिळेल. तो मुगूट याव्हे एलोहिमने जे त्याच्यावर प्रीति करतात, त्यांना देण्याचे अभिवचन दिले आहे. १३ कोणीही जेंव्हा तो परीक्षेत

पडतो, तेंव्हा असे म्हणू नये की, "हे संकट याव्हे एलोहिमने माझ्यावर आणले." कारण याव्हे एलोहिमला वाईट गोष्टीचा मोह पडणार नाही, आणि तो कोणालाही मोहात पाडत नाही. १४ तर प्रत्येक जण त्याच्या स्वतःच्या इच्छेनुसार ओढलेला व भुलवलेला असता, व मोहाच्या परीक्षेत पडतो. १५ मग मनात वासना निर्माण झाली की, तिच्या पोटी पापाचा जन्म होतो, व पापाची जेंव्हा पूर्ण वाढ होते, तेंव्हा ते मरणाला जन्म देते.

१६ माझ्या प्रिय बंधूंनो, स्वतःची फसवणूक होऊ देऊ नका. १७ प्रत्येक उत्तम व परिपूर्ण देणगी वरून येते. आकाशातील प्रकाश ज्याने निर्माण केला, त्या याव्हे अव्बा पासून ती येते. आणि ज्याच्यावर तारांगणाच्या हालचालीचा काही ही परिणाम होत नाही, अशा याव्हे अव्बा पासून ती देणगी येते. १८ सत्याच्या संदेशाव्दारे आपण त्याची मुले व्हावे, ही त्याची इच्छा पूर्ण होण्यासाठी आपली निवड केली आहे. याव्हे अव्बाने निर्माण केलेल्या सर्व गोष्टीमध्ये, आपण प्रथम फळ व्हावे, यासाठी त्याने असे केले.

१९ माझ्या प्रिय बंधूंने, हे लक्षात ठेवा, प्रत्येक मनुष्य ऐकण्यास तत्पर असावा. बोलण्यात सावकाश असावा, आणि रागावण्यात मंद असावा. २० कारण मनुष्याच्या रागामुळे, याव्हे एलोहिम च्या नीतिमत्वाचे कार्य घडत नाही.२१ म्हणून तुमच्या सभोवतीच्या सर्व अमंगळ गोष्टींपासून पूर्णपणे स्वतःची सुटका करून घ्या. आणि जी तुमच्या आत्म्याचे तारण करण्यास समर्थ आहे, ती याव्हे एलोहिमची शिकवण तुमच्या आत्म्यात मुळावलेली आहे, ती लीनतेने स्विकारा. २२ याव्हे एलोहिमची शिकवण काय सांगते, त्याप्रमाणे नेहमी करा, व फक्त ऐकूच नका, तर त्या प्रमाणे करा. कारण जर तुम्हीं फक्त ऐकता, तर तुम्हीं स्वतःची फसवणूक करता. २३ जो कोणी याव्हे एलोहिमचे वचन ऐकतो, परंतु त्यानुसार वागत नाही, तो आरशामध्ये आपले नैसर्गिक तोंड पाहणा-या सारखा आहे. २४ तो मनुष्य स्वतःकडे लक्षपूर्वक पाहतो, नंतर निघून जातो आणि आपण कसे होतो, ते लगेच विसरून जातो. २५ पण याव्हे एलोहिमचे परिपूर्ण व लोकांना स्वतंत्र बनविणारे जे नियम आहेत, त्यांच्याकडे जो बारकाईने पाहतो. सतत अभ्यास करतो, आणि वचन ऐकून ते विसरून न जाता त्यानुसार चालतो, तो मनुष्य जे काही करतो, त्यामध्ये आशिर्वादीत होईल. २६ जर एखादा मनुष्य स्वतःला धार्मिक समजतो, आणि तरी स्वतःच्या जिभेवर ताबा ठेवीत नाही, तर तो स्वतःला फसवितो. त्या व्यक्तीची धार्मिकता निरर्थक आहे. २७ अनाथ व विधवा यांच्या संकटात जो त्यांची काळजी घेतो, व स्वतःला जगापासून डागविरहीत राखतो, अशा मनुष्याची धार्मिकता याव्हे एलोहिम समोर शुद्ध व निर्दोष ठरते.

२.१ माझ्या बंधूंनो, गौरवी अदोनाई येशूवाह मशीहा वरील विश्वासाची व पक्षपातीपणाची सांगड घालू नका. २ समजा एक मनुष्य सोन्याची अंगठी, व सुंदर कपडे घालून तुमच्या सभेला आला, व एक गरीब मनुष्य अव्यवस्थित कपडे घालून आला. ३ आणि समजा चांगला पोशाख घालून आलेल्या मनुष्याला, तुम्हीं विशेष मानसन्मान दाखवून त्याला म्हणाला, "येथे ज्या चांगल्या खुर्च्या आहेत, त्यापैकी एखाद्या खुर्चीवर बसा." आणि त्या गरीब माणसाला म्हणाला, "तिकडे उभा राहा." किंवा, "माझ्या पायाजवळ खाली बस." ४ तर या बाबतीत तुम्हीं दोघात पक्षपातीपणा दाखविलात की नाही? आणि तुम्ही आपल्या मनात वाईट कल्पना बाळगणारे, न्यायाधीश ठरलात की नाही?

५ माझ्या प्रिय बंधूंनो, ऐका! याव्हे एलोहिमनेच जगाच्या दृष्टीकोनातून गरीब असले, त्यांना विश्वासात श्रीमंत होण्यासाठी निवडले नाही काय? आणि जे त्याच्यावर प्रीति करतात, त्यांना याव्हे एलोहिमच्या राज्याचे वारस म्हणून निवडण्याचे अभिवचन दिले नाही का? ६ पण तुम्हीं तर गरीब मनुष्याला तुच्छ लेखिले! तुमची पिळवणूक करणारे, श्रीमंत लोकच नाहीत काय? आणि तुम्हांला न्यायालयात नेणारे तेच लोक नाहीत काय? ७ मशीहाच्या उत्तम नावाची जे नाव तुम्हांला देण्यात आले, त्याची निंदा हेच श्रीमंत लोक करीत नाहीत का?

८ जर तुम्हीं शास्त्रलेखातील महान आज्ञा, "आपल्या शेजा-यावर आपल्यासारखीच अहेद (प्रीति) करा." पाळतात, तर तुम्हीं योग्य करता. ९ पण जर पक्षपात करता तर तुम्हीं पाप करता, आणि नियम मोडण्याचा दोष तुमच्यावर येतो. १० कारण जर कोणी संपूर्ण

तोराह चे (नियमशास्त्राचे) पालन करतो, पण एका नियमाबाबतीत चुकतो, तर तो संपूर्ण तोराह (नियमशास्त्रा) बाबतीत दोषी ठरतो. ११ कारण व्यभिचार करू नको असे जो म्हणाला, तो असे सुद्धा म्हणाला की, खून करू नका. म्हणून जर तुम्हीं व्यभिचार करीत नाही, पण खून करता, तर तुम्हीं तोराह (नियमशास्त्र) मोडता.१२ अशा लोकांसारखे बोला व वागा की, ज्यांचा न्याय अशा नियमांमुळे होणार आहे की, ज्यामुळे स्वातंत्रा मिळेल. १३ जो दयाळूपणे वागला नसेल, त्याचा न्यायही याव्हे एलोहिम त्याच्यावर दया न दाखविताच करील. पण दया न्यायावर विजय मिळविते!

१४ माझ्या बंधूंनो, जर एखादा म्हणतो की, मी विश्वास धरतो. पण तशी कृती करीत नाही, तर त्याचा काय उपयोग? तो विश्वास त्याला तारू शकेल काय? तो शकणार नाही. १५ जर एखादा बंधु किंवा भगिनी यांना कपडयांची आवश्यकता असेल, व त्यांना रोजचे अन्न सुद्धा मिळत नसेल १६ आणि तुमच्यापैकी एखादा त्यांना म्हणतो, "याव्हे अव्वा तुम्हांला आशिर्वाद देवो! उबदार कपडे घाला आणि चांगले खा." पण तुम्हीं त्यांच्या शरीराला जे आवश्यक ते देत नाही, तर तो काय चांगले करतो? १७ त्याचप्रमाणे विश्वासाबरोबर जर कृतीची जोड नसेल, तर तो केवळ एक मृत असाच विश्वास असेल. १८ पण एखादा म्हणेल, "तुझ्याकडे विश्वास आहे, तर माझ्याकडे काम आहे." कृती शिवाय तुझा विश्वास दाखव, आणि माझा विश्वास मी माझ्या कृतीने दाखवीन. १९ तुम्हीं असा विश्वास धरता का की, फक्त एकच याव्हे एलोहिम आहे? तर ते बरे करतोस! अशुद्ध आत्मे देखील असा विश्वास धरतात, व थरथर कापतात.

२० अरे मूढ माणसा कृती शिवाय विश्वास व्यर्थ आहे, याचा तुला पुरावा पाहिजे काय २१ आपला पूर्वज अब्राहाम याने त्याचा बेन (मुलगा) इसाहाक याला वेदीवर याव्हे एलोहिमला अर्पण करण्याची तयारी दर्शविली. तेंव्हा त्याच्या या कामामुळे तो याव्हे एलोहिमच्या दृष्टीत नीतिमान ठरला नाही काय? २२ तू पाहतोस की, त्याच्या कृतीमध्ये विश्वास सुद्धा बरोबरीने कार्यरत होता, व त्याचा विश्वास त्याच्या कृतीमुळे पूर्ण झाला. २३ आणि अशा रीतीने शास्त्रलेख जे सांगते, ते परिपूर्ण झाले. की, "अब्राहामाने याव्हे एलेहिम वर विश्वास ठेवला, आणि त्याचा विश्वास हा त्याचे नीतिमत्व मोजला गेला." आणि त्या कारणामुळे त्याला याव्हे एलोहिमचा मित्र असे म्हंटले गेले. २४ केवळ विश्वासामुळे नव्हे, तर त्याच्या कृतीमुळे मनुष्य याव्हे एलोहिम समोर नीतिमान ठरविला जातो, हे तुम्हीं पाहता.२५ त्याच प्रमाणे राहाब वेश्येने इस्त्राएल हेरांना आसरा देऊन, काही वेळानंतर निराळया वाटेने तेथून निसटून जाण्यासाठी मदत केली. तेंव्हा ही कृती तिचे नीतिमत्व मानले गेले नाही काय? २६ म्हणून ज्या प्रमाणे शरीर हे रूहुव्वा (आत्म्या) शिवाय मेलेले आहे, त्याच प्रमाणे विश्वास हा कृत्यांवाचून मेलेले असा आहे.

**३**.१ माझ्या बंधूंनो, तुमच्यापैकी पुष्कळ रब्बुनी (शिक्षक) होऊ पाहत नाहीत काय? तुम्हांला माहीत आहे की, जे आपण रब्बुनी (शिक्षक) आहोत, त्या आपला काटेकोरपणे न्याय होईल. २ मी तुम्हांला सावध करीत आहे. कारण आपण पुष्कळ पापे करतो, आणि जर कोणी त्याच्या बोलण्यात चुका करीत नाही, तर तो परिपूर्ण मनुष्य आहे. ३ आपण घोडयांच्या तोंडांना लगाम घालतो यासाठी की, त्यांनी आपल्या आज्ञा पाळाव्यात. आणि अशा प्रकारे आपण त्यांचे संपूर्ण शरीर नियंत्रणात ठेऊ शकतो. ४ किंवा जहाजाचे उदाहरण घ्या, जरी ते खूप मोठे असले व जोरदार वा-यामुळे चालविले जाते. तरी ते लहान सुकाणूव्दारे ताब्यात ठेवता येते. ५ त्याच प्रकारे जीभ ही शरीराचा लहानसा भाग आहे. पण ती मोठमोठया गोष्टी केल्याची बढाई मारते. फक्त विचार करा, किती तरी मोठे जंगल लहानशा आगीने पेट घेते ६ होय, जीभ ही ज्वाला आहे. आपल्या शरीराच्या सर्व अवयवामध्ये वाईट गोष्टींची ती खाणच आहे. जीभ ही आपल्या सर्व शरीराला विटाळविणारी आहे, ती आपल्याला अपवित्र करते. आपल्या सर्व अस्तित्वालाच ती आग लावते. ती नरकाच्या ज्वालांनी जीवन पेटवते. ७ पशू, पक्षी, सरपटणारे जीवजंतू, साप, आणि समुद्रातील निरनिराळया या जातीचे जीव, माणूस पाळू शकतो, आणि प्रत्यक्षात त्याने तसे केले आहे.८ पण कोणताही मनुष्य आपली जीभ ताब्यात ठेवू शकत नाही. ती फार चंचल, भयंकर, हिंस्त्र, दुराचारी, आणि जहाल विषाने भरलेले असते.

९ आपला अदोनाई आणि आकाशातील याव्हे अव्वा याची स्तुति आपण आपल्या जिभेने करतो, आणि जे मानव याव्हे एलोहिमच्या

प्रतिमेचे बनविलेले आहेत, त्यांना जिभेने शापही देतो! १० एकाच तोंडातून आशिर्वाद निघतात, व शापही निघतात. माझ्या बंधूंनो, हे असे असू नये. ११ एकाच झ-यातून गोड व कडू पाणी येऊ शकत नाही. १२ माझ्या बंधूंनो, अंजिराच्या झाडाला जैतूनाची फळे येतील काय? किंवा द्राक्षवेलीला अंजिर लागतील काय? कधीच नाही, तसेच खारट पाण्याच्या झ-यातून गोड पाणी येऊ शकणार नाही. १३ तुमच्यामध्ये कोण शहाणा व ज्ञानाने भरलेला आहे, त्याने त्याचे शहाणपण त्याच्या चांगल्या वागणुकीने दाखवावे, नम्रतेने केल्या जाणा-या कृतीव्दारे त्याने आपले शहाणपण दाखवावे. १४ पण जर तुमच्या हदयात कटूरता, मत्सर, व स्वार्थी उद्देश असतील, तर तुम्हीं तुमच्या शहाणपणाची फुशारकी करू शकणार नाही. कारण तसे करणे म्हणजे, खोटेपणाच्या आड सत्य लपविण्यासारखे आहे. १५ कारण अशा प्रकारचे शहाणपण वरून आकाशातून आलेले नाही, तर ते पृथ्वीवरचे आहे, अधार्मिक आणि सैतान आहे. १६ कारण जेथे मत्सर, व स्वार्थी ध्येये आढळतात, तेथे अव्यवस्थितपणा, व सर्व प्रकारचे वाईट व्यवहारही आढळतात. १७ पण वरून लाभलेले शहाणपण मुळात शुद्ध, शांतिदायक, समजूतदारपणाचे, आणि मनमोकळे असून दयेचे, व चांगली कामे यांना उत्तेजन देणारे असते. तसेच ते पक्षपात न करणारे, व कळकळीचे असते. १८ जे लोक शांततेच्या मार्गाने शांति स्थापन करण्याचा प्रयत्न करतात, त्यांना सरळ नीतिपूर्ण वागण्यामुळे मिळणा-या चांगल्या गोष्टींचा लाभ होतो.

४ .१ तुमच्यामध्ये लढाया व भांडणे कोठून येतात? तुमच्यामध्ये ज्या स्वार्थी भावना संघर्ष करतात, त्यामधून ते येते नाही काय? २ तुम्हांला काही गोष्टी पाहिजे असतात, पण त्या तुम्हांला मिळत नाही. म्हणून तुम्हीं खून करता, व दुस-या लोकांचा मत्सर करता, पण तरी ही तुम्हांला पाहिजे, ते मिळत नाही. म्हणून तुम्हीं लढाया व भांडणे करता, तुम्हांला पाहिजे त्या गोष्टी मिळत नाहीत कारण तुम्हीं याव्हे एलोहिमला मागत नाही. ३ आणि जेंव्हा तुम्हीं मागता तेंव्हा तुम्हांला काही ही मिळत नाही, कारण तुम्हीं चुकीच्या उद्देशाने मागता. यासाठी की, तुम्हांला जे काही मिळेल, ते तुमच्या स्वतःच्या सुखासाठी वापरता.

४ अप्रामाणिक लोकांनो तुम्हांला हे माहीत नाही का की, जगाशी मैत्री हे याव्हे एलोहिम बरोबरचे वैर आहे. जो मनुष्य जगाशी मैत्री करतो, तो याव्हे एलोहिमशी वैर ठरला आहे. ५ शास्त्र व्यर्थ सांगते, असे तुम्हांला वाटते काय? जो याव्हे एलोहिमचा रूहुव्वा (आत्मा) आम्हांमध्ये वस्ती करतो, तो ईर्ष्यावान आहे.६ तो अधिक कृपा देतो म्हणून तो म्हणतो की, याव्हे एलोहिम गर्विष्ठांना विरोध करतो, परंतु नम्र जनांस तो कृपा देतो. ७ यास्तव याव्हे एलोहिमच्या अधीन असा, पण सैतानाला अडवा म्हणजे तो तुम्हांपासून पळेल. ८ याव्हे एलोहिम जवळ या, म्हणजे तो तुम्हांजवळ येईल. अहो पाप्यांनो, तुमचे हात निर्मल करा. अहो व्दिबुद्धीच्या लोकांनो, तुमचे आत्मे शुद्ध करा. ९ कष्टी व्हा, आणि शोक करा, व रडा. तुमचा हसण्याचा शोक होवो, आणि तुमच्या आनंदाचे उदासपण होवो. १० अदोनाई च्या दृष्टीने नम्र व्हा, म्हणजे तो तुम्हांला उंच करील.

११ बंधूंनो, एकमेकाविरूद्ध वाईट बोलू नका. जो त्याच्या भावाविरूद्ध बोलतो, किंवा जो त्याच्या भावाचा न्याय करतो, तो तोराह (नियमशास्त्रा) विरूद्ध बोलतो, आणि तो तोराह चा (नियमशास्त्राचा) न्याय करतो, आणि जर तुम्हीं तोराह (नियमशास्त्रा) चा न्याय करता, तर तुम्हीं जे सांगते ते करीत नाही, व तुम्हीं न्यायाधीश आहात. १२ तोराह (नियमशास्त्र) देणारा, आणि न्यायाधीश फक्त एकच आहे. फक्त याव्हे एलोहिम तारण करण्यास व नाश करण्यास समर्थ आहे. तू जो तुझ्या शेजा-याचा न्याय करतोस, तो तू स्वतःला कोण समजतोस?

१३ ऐक, तू म्हणतोस आज किंवा उद्या, आपण या नगरास किंवा त्या नगरास जाऊ, व तेथे आपण एक वर्ष घालवू, आणि आपण तेथे व्यापार करू, व पैसे कमवू १४ तुला हे देखील माहीत नाही की, उद्या तुझे काय होईल. अखेर तुझे आयुष्य तरी काय आहे? कारण थोडया वेळापर्यंत दिसणारे, आणि मग अदृश्य होणारे, असे धुके तुम्हीं आहात. १५ त्या ऐवजी तुम्हीं नेहमी असे म्हणा, “जर अदोनाईची इच्छा असेल तर आपण जगू, आणि आपण हे किंवा ते करू.” १६ पण तुम्हीं तर घमेंड बाळगता आणि बढाई मारता, आणि अशी बढाई मारणे वाईट आहे. १७ म्हणून जर तुम्हांला चांगले कसे करायचे हे माहीत असूनही, जर ते तुम्हीं करीत नाही तर ते तुम्हीं पाप करता.

**५** .१ श्रीमंत लोकांनो ऐका! तुमच्यावर जी संकटे येत आहेत, त्याबद्दल रडा व आक्रोश करा. २ तुमची संपत्ती नाश पावली आहे, व तुमच्या कपडयांना कसर खाऊन टाकीत आहेत. ३ तुमच्या सोन्याचांदीवर गंज चढला आहे. त्याच्यावर चढलेला गंज तुमच्याविरूद्ध साक्ष देईल, आणि तुमचे शरीर अग्नीसारखे खाऊन टाकील, अशा युगामध्ये तुम्हीं तुमचे धन साठवून वेगळे ठेवले आहे. ज्याचा शेवट जवळ आला आहे! ४ पहा तुमच्या शेतात कापणी करणा-या मजुरांची मजुरी जी तुम्हीं अडवून धरलीत, ती ओरडून दुःख करीत आहे.आणि कापणी करणा-यांचे रडणे सैन्यांच्या याव्हे आदोनाय, अदोनाई च्या कानी पोहोंचले आहे.५ जगात असताना तुम्हीं ऐषारामात जगला, आणि मन मानले तसे वागला. वधावयाच्या दिवसासाठी खाऊनपिऊन तयार केलेल्या पशूसारखे तुम्हीं पुष्ट झालात. ६ जे लोक तुम्हांला काहीही विरोध करीत नाही, अशा निरपराध लोकांना तुम्हीं दोषी ठरविले आहे, आणि त्यांची हत्या केली आहे.

७ यासाठी बंधूंनो, अदोनाईच्या येण्यापर्यंत धीर धरा. लक्षात ठेवा की, शेतकरी आपल्या शेतातील मोलवान पिकाची वाट पाहतो. तो धीराने त्याची वाट पाहतो, पहिला व शेवटच्या पाऊस मिळेपर्यंत वाट पाहतो. ८ तुम्हीं सुद्धा धीराने वाट पाहिली पाहिजे, दुसरे आगमन जवळ आले आहे. ९ बंधूंनो, एकमेकांविरूद्ध कुरकूर करण्याचे थांबवा. यासाठी की, तुम्हीं दोषी ठरू नये. पाहा! न्यायाधीश दाराजवळ आत येण्यासाठी तयारीत उभा आहे. १० बंधूंनो, दुःख सहन करीत याव्हे एलोहिमच्या नावाने लोकांशी धीर धरून बोलणा-या नव्बीईमचे (संदेष्टयांचे) उदाहरण, तुम्हीं आपल्यासमोर ठेवा. ११ त्यांनी दुःख सहन केले, म्हणून आपण त्यांना आशिर्वादीत समजतो, हे लक्षात ठेवा. तुम्हीं ईयोबाच्या धीराविषयी ऐकले आहे. आणि तुम्हांला माहीत आहे की, अदोनाईने ईयोबाच्या वतीने त्याचा शेवट कसा केला. अदोनाई दयाळू आणि खूप कनवाळू आहे. ह्या गोष्टीचे त्याने प्रात्यक्षिक दाखविले. १२ याहीपेक्षा अधिक महत्वाचे म्हणजे बंधूंनो, आकाशांच्या किंवा पृथ्वीच्या नावाने शपथ वहायचे थांबवा, किंवा इतर कोणत्याही प्रकारची शपथ वाहू नका. तुमचे ‘होय’ हे ‘होयच’ असू द्या. तुमचे ‘नाही’ हे ‘नाहीच’ असू द्या. यासाठी की, तुम्हीं याव्हे एलोहिमच्या परीक्षेत येऊ नये.

१३ तुमच्यातील कोणी संकटात आहे काय? त्याने प्रार्थना करावी. कोणी आनंदी आहे काय? त्याने स्तुतिगान करावे.१४ तुमच्यापैकी कोणी आजारी आहे काय? त्याने मंडळीतील वडिलांना बोलवावे, व त्यांना त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगावे. आणि अदोनाईच्या नावाने त्याच्यावर तेल लावावे १५ विश्वासाने केलेली प्रार्थना आजारी मनुष्याला बरे करील, व अदोनाई त्याला उठविल. जर त्याने पापे केली असतील, तर अदोनाई त्याची क्षमा करील. १६ म्हणून एकमेकांकडे आपल्या पापांची कबुली द्या. आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा. यासाठी की, तुम्हीं बरे व्हावे. नीतिमान मनुष्याची प्रार्थना सामर्थ्यायुक्त, व परिणामकारक असते. १७ एलीया हा आपल्यासारखा स्वभावाचा मनुष्य होता. पाऊस पडू नये म्हणून त्याने कळकळीने प्रार्थना केली, आणि नंतरची साडेतीन वर्षे देशात पाऊस पडला नाही. १८ मग त्याने पुन्हा प्रार्थना केली, व आकाशाने पाऊस दिला, आणि पृथ्वीने आपले धान्य उपजविले. १९ माझ्या बंधूंनो, जर तुमच्यापैकी कोणी चुकला, किंवा सत्यापासून दूर भटकला असेल, आणि जर कोणी त्याला परत आणले, तर पापी मनुष्याला चुकीच्या मार्गावरून तो परत आणतो, २० तो त्याचा जीव मरणाच्या दाढेतून सोडवितो, आणि त्याच्या पुष्कळ पापांची क्षमा होते.

...........समाप्ती ...........

## . शिमोन उर्फ केफाने लिहिले पत्रे पहिले, व दुसरे .

### प्रस्तावना

योहानानचा बेन (मुलगा) थालमीद (प्रेषित) शिमोन उर्फ केफाने हे पहिले पत्र पंत, गलतिया, कप्पदुकिया, अशिया, व निथुनिया ह्या पाच विभागामध्ये जे यहूदी पांगलेले होते, त्यांना हे पत्र लिहिलेले आहे, हे दिसून येते. लिखानाचा कालावधी हे पहिले पत्र इसवी सन ६३ ते ६४ च्या दरम्यान लिहिलेले होते. पाच विभागातील यहूदी लोकांना शिमोन उर्फ केफाने निश्चीत हिब्रू भाषेमध्ये पत्र लिहिलेले असणार ह्यामध्ये शंका नाही. शिमोन उर्फ केफाने स्वतः हे पत्र सिल्वान ह्याच्या कडून हे पत्र लिहिले आहे. ह्या पत्रांची मूळ दस्तावेज हे हिब्रू भाषेतील आहे. हे ग्रीक भाषेतील मूळ दस्तावेज नाही. कारण हे जे पाच विभागा मध्ये पांगलेले यहूदी लोक होते, त्यांची मातृभाषा ही हिब्रू होती. आणि शिमोन उर्फ केफाची ही मातृभाषा ही हिब्रू होती. शिमोन उर्फ केफाने लिहिलेल्या लेखामध्ये जुन्या करारातील अनेक वचनांचे संदर्भ उदाहरणार्थस्पद घेतलेला आहे, हे पहावयास मिळतो. अर्थात जुन्या करार, व नवीन करार त्याची मूळ हिब्रू भाषेतून सांगड घालून, त्या मंडळयांच्या सभासदांना बोध, व मार्गदर्शन केलेले असून, ह्यामध्ये काही धोक्याचे इशारे, व सुचना केलेल्या आहे. शिमोन हे त्याचे स्वतःचे नाव असून येशूवाह मशीहाने जेंव्हा त्याला त्याचे थालमीद म्हणजे (शिष्य) होण्याच्या वेळेस केफा हे स्वतः नाव दिलेले ते योहानान शुभवर्तमानमध्ये १ः ४२ वचनामध्ये पहावयास मिळते. शिमोन ही नाव हिब्रू भाषेतील शब्द आहे. तर केफा हे नाव अरामीक भाषेत असून, त्याचा अर्थ खडक हा आहे. येशूवाह मशीहाने शिमोनाला पेत्र हे नाव दिलेले नाही, तर ग्रीक भाषांतर करणा-यांनी केफा ह्या शब्दाचे भाषांतर पेत्र हे केलेले आहे. येथे भाषांतर झालेला शब्द न घेता मूळ जो अरामीक शब्दव ते नाव घेतलेले आहे, शिमोन उर्फ केफा हाच घेतलेला आहे.

### . योहानान चा बेन (मुलगा) शिमोन उर्फ केफाने लिहिलेले पहिले पत्रे.

१. १ यावे्ह एलोहिमचे निवडलेले लोक जे या जगात प्रवासी आहेत, जे पंत, गलतिया, कप्पदुकिया, आशिया, व बिथुनिया प्रांतात
विखरलेले आहेत, त्या यहूदी लोकांना २ यावे्ह एलोहिम अब्वाने फार पूर्वीच केलेल्या योजने प्रमाणे, आत्म्याच्याव्दारे तुम्हीं कादोश
(पवित्र) व्हावे. येशूवाह मशीहाच्या आज्ञेत राहावे, आणि येशूवाहचे रक्त तुमच्यावर शिंपडून तुम्हांला शुद्ध करावे. याकरिता
तुम्हांला निवडले आहे. त्या तुम्हांला यावे्ह एलोहिमची कृपा, व शालोम (शांती) भरपूर प्रमाणात लाभो.

३ आमच्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या अब्वाची यावे्ह एलोहिमची स्तुति असो, त्याच्या महान दयेमुळे, त्याने आमचा नवा जन्म होऊ
दिला. आणि येशूवाहला मेलेल्यातून उठविण्याने जिवंत, व नवीन आशा दिली. ४ आणि ज्याचा कधी नाश होत नाही. ज्याच्यावर
काही दोष नाही, व जे कधी कोमजत नाही. असे वतन शाम्माईम (आकाशांत) आपल्यासाठी राखून ठेवले आहे. ५ आणि शेवटच्या
काळात प्रगट करण्यात येणारे यशाह (तारण) तुम्हांला मिळावे, म्हणून विश्वासाच्या व्दारे यावे्ह एलोहिमच्या सामर्थ्याने तुमचे रक्षण
केले आहे. ६ वेगवेगळया प्रकारच्या परीक्षेमुळे काही काळापर्यंत, तुम्ही दुःखे सोसणे तुम्हांला भाग आहे. तरी यामुळे आनंद करीत
आहा. ७ नाशवंत सोने शुद्ध करण्याकरिता अग्नित टाकले जाते. त्याहून अधिक मौल्यवान अशा तुमच्या विश्वासाची कसोटी व्हावी,
आणि येशूवाह मशीहाच्या परत येण्याच्या वेळी तो खरा ठरावा, आणि तुम्हांला स्तुति, गौरव, व सन्मान मिळावा याची आवश्यकता
आहे. ८ जरी तुम्हीं येशूवाहला पाहिले नाही, तरी तुम्हीं त्याच्यावर अहेद (प्रीति) करता. जरी आता तुम्हीं त्याच्याकडे पाहू शकत
नसला, तरी तुम्हीं त्याच्यावर विश्वास ठेवता, आणि तुम्हांला व्येक्त करता येणार नाही. अशा गौरवयुक्त आनंदाने भरला आहात. ९
तुमच्या विश्वासाचा उद्देश, जे तुमच्या रूहुव्वाचे (आत्म्याचे) यशाह (तारण) ते तुम्हांला प्राप्त होत आहे. १० तुमच्याकडे येणार
असलेल्या कृपेसंबंधी ज्या नबीईमने (संदेष्टयांनी) भविष्य सांगितलेले होते. त्यांनी त्या यशाह (तारणा) बाबत फार मनःपूर्वक शोध
घेतला, व काळजी पूर्वक चौकशी केली. ११ मशीहाचा रूहुव्वा (आत्मा) त्यांच्यामध्ये राहात होता. ते शोध घेत होते की, कोणत्या
वेळी व कोणत्या परिस्थितीत मशीहाच्या दुःखाचा व गौरवाचा शोध घेण्यास आत्मा सुचवीत आहे. १२ आकाशातून पाठविलेल्या
आत्म्याव्दारे ज्यांनी शुभवर्तमान तुमच्याकडे आणले, त्यांनीच तुम्हांस आता या गोष्टी विदित केल्या आहेत. त्याच गोष्टी
कळविण्याची जी सेवा ते करीत होते ती स्वतःसाठी नाही, तर आमच्यासाठी करीत होते. त्या गोष्टी बारकाईने पाहण्यासाठी यावे्ह

एलोहिमचे मालाक (देवदूत) सुद्धा उत्सुक आहेत.

१३ म्हणून मानसिक दृष्टया सावध असा, आणि पूर्णपणे आत्मसंयमन करा. जेंव्हा येशूवाह मशीहा प्रकट होईल, तेंव्हा तुम्हांला जे
आशिर्वाद देण्यात येतील, त्यावर तुमची आशा केंद्रित करा. १४ आज्ञाधारक मुलांप्रमाणे वागा, व तुम्हीं अज्ञानी असताना तुम्हांला
पूर्वी ज्या दुष्ट इच्छा होत्या, त्याप्रमाणे तुमच्या जीवनाला आकार देण्याचे थांबवा. १५ त्या ऐवजी ज्या याव्हे एलोहिमने तुम्हांला
पाचारण केले, तो क्वादोश (पवित्र) आहे. तुम्हीं सुद्धा प्रत्येक गोष्ट जी तुम्ही कराल, त्यात क्वादोश (पवित्र) असा. १६ कारण असे
लिहिले आहे; " क्वादोश (पवित्र) व्हा. कारण मी क्वादोश (पवित्र) आहे." १७ आणि ज्याप्रमाणे याव्हे एलोहिमला तुम्हीं अव्वा
म्हणून हाक मारता, जो लोकांचा निःपक्षपातीपणे प्रत्येकाच्या कृत्यांप्रमाणे न्याय करतो, म्हणून या परक्या भूमीवर तुम्हीं वास्तव्य करीत
असताना, या काळात याव्हे एलोहिम बद्दलच्या आदरयुक्त भीतीमध्ये आपले जीवन जगा.१८ तुम्हांला माहीत आहे की, सोने, किंवा
चांदी अशा कोणत्याही नाश पावणा-या वस्तूंनी निरर्थक जीवनापासून तुमची सुटका करण्यात आली नाही. जी तुम्हांला तुमच्या पूर्वजा
पासून मिळाली आहे. १९ तर कसलेही डाग किंवा दोष नसलेल्या कोक-यासारख्या मशीहाच्या बहुमोल रक्ताने, तुमची सुटका केली
आहे. २० जगाच्या निर्मीत्तीच्या अगोदर मशीहाची निवड करण्यात आली होती. पण तुमच्याकरिता या शेवटच्या दिवसात, त्याला
प्रकट करण्यात आले. २१ ज्या याव्हे एलोहिमने त्याला मेलेल्यातून उठविले, व त्याला गौरव दिले. त्या याव्हे एलोहिम वर तुम्हीं
विश्वास ठेवणारे झाला आहात. म्हणून तुमचा विश्वास आणि आशा याव्हे एलोहिम मध्ये आहे.२२ आता तुम्हीं स्वतःला शुद्ध केले
आहे. सत्याची आज्ञा पाळून शेवटपर्यंत प्रमाणिक बंधु प्रीति करा. एकमेकांवर शुद्ध रूहव्वाने (आत्म्याने) प्रीति करण्याकडे लक्ष
द्या. २३ बीज नाशवंत आहे त्यापासून तुमचा नवा जन्म झाला नाही, तर जे बीज अविनाशी त्यामुळे झाला आहे. तुमचा नवा जन्म
याव्हे एलोहिम च्या वचनाव्दारे जे जिवंत आहे, व टिकते त्यापासून झाला आहे. २४ म्हणून क्वादोश (पवित्र) शास्त्रलेख सांगतो, "
सर्व लोक गवतासारखे आहेत, आणि त्याचे सर्व वैभव गवतातील रानफुलासारखे आहे. गवत सुकते, फूल गळून पडते. २५ परंतु
आमच्या अदोनाईचे वचन अनंतकाळ टिकते." आणि हाच यशाह (तारणाचा) संदेश आहे. जो तुम्हांला सांगितला गेला.

२. १ म्हणून सर्व प्रकारची दुष्टता, तसेच फसवणूक, ढोंगीपणा, हेवा, निंदा यापासून सुटका करून घ्या.२ नुकत्याच जन्मलेल्या
लहान बाळांसारखे तुम्हीं शद्ध आध्यात्मिक दूधाची इच्छा धरा. यासाठी की, त्यापासून तुमची वाढ होईल. व तुमचे यशाह (तारण)
होईल. ३ अदोनाई कृपाळू आहे असा जर तुम्हीं अनुभव घेतला आहे, तर असे करा.४ जिवंत धोंडा जो अदोनाई त्याच्याकडे या.जो
जगातील लोकांकडून नाकारला गेला, पण जो याव्हे एलोहिमला बहुमोल असा आहे. आणि ज्याला याव्हे एलोहिमनेच निवडले
आहे.५ तुम्हीं सुद्धा जिवंत धोंडयाप्रमाणे आध्यात्मिक मंदिर बांधण्यासाठी रचिले जात आहा. क्वादोश कोहेन (पवित्र याजक)
गणांप्रमाणे सेवा करण्यासाठी, ज्यांचे काम म्हणजे आध्यात्मिक अर्पणाचा याव्हे एलोहिम समोर यज्ञ करणे असे आहे. जे याव्हे
एलोहिमला, येशूवाह मशीहा व्दारे मान्य आहे. ६ म्हणून खालील उतारा शास्त्रलेखात नमूद केला आहेः " पाहा तियोनात मी
कोनशिला बसवितो, जी मौल्यवान व निवडलेली आहे. आणि जो कोणी त्यावर विश्वास ठेवतो तो कधीही लज्जित होणार नाही."
७ तुम्हीं जे या धोंडयावर विश्वास ठेवता, त्या तुम्हांला तो मौल्यवान आहे. पण जे विश्वास धरीत नाहीत. त्यांना बांधणा-यांनी
नापसंत केलेला धोंडा, तोच कोनशिला झाला आहे.८ तो असा झाला एक धोंडा जो लोकांना अडखळवितो आणि एक खडक जो
लोकांना पाडतो. ते लोक अडखळतात कारण ते याव्हे एलोहिमची आज्ञा पाळत नाहीत. त्यांना त्याच्यासाठी नेमलेले आहे. ९ पण
तुम्हीं निवडलेले लोक आहात. तुम्हीं राज्याचे कोहेन (याजक) आहात. तुम्हीं क्वादोश (पवित्र) राष्ट्र आहात. तुम्हीं याव्हे
एलोहिमच्या स्वतःचे असलेले लोक आहात. यासाठी की, ज्या याव्हे एलोहिमने तुम्हांला अंधारातून काढून, त्याच्या अद्भुत ओर
(प्रकाशात) आणले. त्याची सामर्थ्यशाली कृत्ये तुम्हीं प्रकट करावी. १० एकवेळ तुम्हीं त्याचे लोक नव्हता, पण आता तुम्हीं याव्हे
एलोहिमचे लोक आहात.तुम्ही त्याची दया पावलेले लोक नव्हता, तर आता तुम्हांला याव्हे एलोहिमची दया मिळालेली आहे.

११ प्रियजनहो, जे तुम्हीं जणू काय प्रवासी आणि या जगात परके असल्यासारखा आहात, मी तुम्हांला बोध करतो की, तुमच्या

रूहुव्वाच्या (आत्म्याच्या) विरूद्ध नेहमी लढत राहणा-या शारीरिक वासनापासून तुम्हीं दूर राहा-१२ जरी विदेशी लोक तुमच्यावर निंदा करतात, आणि अपराध केल्याबद्दल दोष देतात-तरी तुम्हीं आपले वागणे इतके चांगले ठेवा की, तुमची चांगली कामे पाहून विदेशी लोकांनी, याव्हे एलोहिमच्या परत येण्याच्या दिवशी त्याला गौरव द्यावे- १३ अदोनाई करिता प्रत्येक मानवी अधिका-याच्या अधीन असा- १४ मेलेक च्या (राजाच्या) अधीन असा- जो सर्वोच्च अधिकारी आहे, आणि अधिका-यांच्या अधीन असा- कारण अयोग्य करणा-यांना शिक्षा देण्यासाठी आणि चांगली कामे करणा-यांना शाबासकी देण्यासाठी, प्रान्ताधिपतीने त्यांना पाठविले आहे- १५ म्हणून जेंव्हा तुम्हीं चांगले काम करता, तेंव्हा मूर्ख लोकांचे अविचारी बोलणे तुम्हीं बंद करता- आणि हीच याव्हे एलोहिमची इच्छा आहे- १६ स्वतंत्र लोकांसारखे जगा- पण तुमच्या स्वतंत्रपणे जगण्याच्या नावाखाली वाईट गोष्टींना वाव देऊ नका- याव्हे एलोहिमचे सेवक असल्याप्रमाणे जगा-१७ सर्व लोकांचा आदर करा-मशीहा तील तुमच्या बंधूवर्गावर प्रीति करा- याव्हे एलोहिम प्रती भीतीयुक्त आदर असू द्या-मेलेक (राजाला) मान द्या-

१८ घरातील गुलामांनो, संपूर्ण आदराने तुमच्या मालकाच्या अधीन असा-जे चांगले आणि दयाळू आहेत त्यांच्याशीच नव्हे, तर जे कठोरतेने वागतात त्यांच्या सुद्धा अधीन असा- १९ कारण हे प्रशांसनीय आहे- जर एखादा त्याच्या अंतःकरणात असलेल्या याव्हे एलोहिमच्या इच्छेसंबंधाने जागरूक आहे- व अन्यायामुळे त्याला दुःख सोसावे लागते- २० कारण जर तुम्हीं केलेल्या चुकीबद्दल तुम्हांला मार मिळाला- आणि तुम्हांला ते सहन करावा लागतो, तर ते याव्हे एलोहिम समोर मान्य आहे- २१ यासाठी याव्हे एलोहिमने आपल्याला बोलावले आहे; कारण मशीहाने देखील आपल्यासाठी दुःख सहन केले, आणि आपण त्याच्या पावलांवर पाऊल टाकून चालावे- म्हणून स्वतःच्या अशा वागण्याने आपल्यासमोर उदाहरण ठेवले- २२ “त्याने कोणतेही पाप केले नाही- त्याच्या मुखात कपट नव्हते-” २३ जेंव्हा लोकांनी त्याचा अपमान केला, तेंव्हा त्याने उलट अपमान केला नाही- जेंव्हा त्याने दुःख सहन केले, तेंव्हा त्याने धमकी दिली नाही- परंतु जो न्यायाने निवाडा करतो, त्या याव्हे एलोहिमच्या हाती स्वतःला सोपवून दिले- २४ त्याने स्वतः आमची पापे वाहिली, त्याच्या शरीरावर घेऊन वधस्तंभावर वाहिली- यासाठी की, आम्हीं आमच्या पापाला मरावे- आणि नीतीमत्वासाठी जगावे- त्याला झालेल्या जखमांमुळे तुम्हांला आरोग्य मिळाले- २५ तुम्हीं मेंढराप्रमाणे बहकत होता, पण आता तुमच्या जीवनाचा जो मेंढपाळ, व संरक्षक त्याच्याकडे परत आला आहात-

**३**- १ त्याच प्रमाणे पत्नींने आपल्या पतीच्या अधीन असा- यासाठी की, त्यांच्यापैकी काहींनी जर याव्हे एलोहिमची आज्ञा पाळली नाही- तर काही न बोलताही आपल्या सद्वर्तनाने त्यांची मने जिंकता येतील- २ जेंव्हा ते तुमचे शुद्ध, आणि आदरयुक्त वागणे पाहतील- ३ तुमची सुंदरता बाह्यस्वरूपाची नसावी- म्हणजे वेगवेगळया प्रकारे केस सुशोभित करण्याने सोन्याचे दागिने वापरण्याने किंवा चांगले कपडे घातल्याने आलेली नसावी- ४ त्या ऐवजी तुमची सुंदरता रूहुव्वाची (आत्म्याची) जी कधीही नाश पावत नाही, अशी असली पाहिजे- ती सौम्य, शांत स्वभावाची असली पाहिजे- जी याव्हे एलोहिमच्या दृष्टीने अतिमौल्यवान आहे- ५ पूर्वीच्या काळातील ज्या क्वादोश ईशशाह (पवित्र स्त्रिया) होऊन गेल्या, त्यांनी अशाच प्रकारे आपल्या सर्व आशा याव्हे एलोहिम वर केंद्रीत करून आपली स्वतःची सुंदरता वाढीस लावली- त्या ईशशाह (स्त्रिया) आपल्या ईश च्या (पतींच्या) अधीन असत- ६ साराह् ने अब्राहामची आज्ञा पाळली,आणि अब्राहामाला आपला मालक मानले- जर तुम्हीं चांगली कामे करता व कशाचीही भीती मनात बाळगत नाही, तर तुम्हीं तिच्या म्हणजे साराह्च्या मुली आहात- ७ तसेच पतींनो, तुम्हीं आपल्या पत्नींबरोबर समंजसपणाने राहा- त्या जरी नाजूक पात्र असल्या, तरी त्या याव्हे एलोहिमच्या कृपेमध्ये तुमच्या बरोबर वारस आहेत- हे लक्षात घेऊन त्यांच्याविषयी आदर बाळगा- म्हणजे तुम्हीं ज्या प्रार्थना याव्हे एलोहिमला सादर करता, त्यात कसलीही बाधा येणार नाही-

८ शेवटी सारंश हा की, तुम्हीं सर्वजण एकचित्ताचे व समसुखदुःखी आपल्या भाऊ, बहिणींशी प्रीतिने, दयाळूपणे आणि नम्रतेने राहा-९ वाइटाची परत फेड वाइटाने करू नका, किंवा अपमानाची फेड अपमानाने करू नका- उलट त्या व्यक्तीसाठी याव्हे एलोहिम कडे आशिर्वाद मागा- कारण याव्हे एलोहिमने तुम्हांला हे करण्यासाठीच बोलविले होते- यासाठी की, तुम्हांला याव्हे एलोहिमचा आशिर्वादाचा वारसा मिळावा- १० शास्त्रलेख सांगते, “ज्याला जीवनाचा आनंद उपभोगायचा आहे व चांगले दिवस पहावयाचे

आहेत. त्याने आपली जीभ वाईट बोलण्यापासून आवराली पाहिजे. आणि त्याने कपटाने बोलू नये, म्हणून आपले ओठही आवरावे." ११ दुष्टतेपासून त्याने दूर रहावे, व चांगले ते करावे.त्याने शालोम चा (शांतीचा) शोध करून ती मिळविली पाहिजे. १२ जे नीतिमान लोक आहेत, त्यांच्यावर अदोनाईची नजर असते. आणि त्याच्या प्रार्थना तो कान देऊन ऐकतो. पण जे वाईट गोष्टी करतात, त्यांच्याकडे अदोनाई पाठ फिरवितो." १३ जे चांगले ते करण्यास तुम्हीं उत्सुक असाल, तर अशी कोण व्यक्ती आहे.जी तुम्हांला इजा करण्याचा प्रयत्न करील? पण, १४ जे योग्य ते करून सुद्धा जर तुम्हांला दुःख सहन करावे लागते, तर तुम्हीं आशिर्वादीत आहात. म्हणून "त्या लोकांची भीती बाळगू नका किंवा गर्भगळित होऊ नका." १५ पण आपल्या रूहुव्वा (आत्म्यात) मशीहा हा अदोनाई आहे, असा आदर बाळगा. तुमच्यामध्ये जी आशा आहे तिच्याविषयी तुम्हांला कोणी विचारले, तर त्याचे समर्थन करण्यास सदैव तयार राहा. १६ पण हे सौम्यतेने व आदराने करा. मशीहा मध्ये जगत असताना तुमच्या चांगल्या वागणुकीवर जे आरोप करतात, त्यांना लाज वाटेल अशा रीतीने तुम्हीं आपली विवेक बुद्धी शुद्ध राखा. १७ कारण चांगले काम करून देखील आपण दुःख सोसावे, अशी जर याव्हे एलोहिमची इच्छा असेल. तर वाईट करून दुःख भोगण्यापेक्षा, ते अधिक चांगले आहे. १८ मशीहा देखील आपल्या पापांसाठी एकदाच मरण पावला. एक नीतिमान दुस-या अनीतिमानांसाठी मरण पावला. यासाठी की, तुम्हांला याव्हे एलोहिमकडे जाता यावे. त्याच्या शरीरासंबंधी म्हंटले, तर त्याला मारले गेले पण त्याच्या रूहुव्वा (आत्म्या) संबंधी म्हंटले, तर त्याला पुन्हा जीवन दिले गेले. १९ आत्मिक रूपाने देखील मशीहा बंदिवासात असलेल्या आत्म्यांकडे गेला व सुवार्ता सांगितली. २० फार पूर्वी नोहाच्या काळात जेंव्हा तारू बांधले जात होते, आणि याव्हे एलोहिम धीराने वाट पाहत होता. त्यावेळी ज्यांनी याव्हे एलोहिमची आज्ञा पाळली नाही, तेच हे आत्मे होते.फक्त थोडकेच म्हणजे आठ लोकच तारवात गेले, व त्यांचा पाण्यापासून बचाव झाला. २१ ते पाणी आत्मा चिन्हात्मकरिता त्या बाप्तिस्म्याचे ज्यामुळे आता तुमचे यशाह (तारण) होते त्याचे प्रतीक आहे. बाप्तिस्मा म्हणजे शरीरा वरील धूळ काढणे नव्हे, तर तो याव्हे एलोहिम कडे शुद्ध विवेक मिळावा म्हणून केलेला करार आहे. हे सर्व येशूवाह मशीहाच्या मरणातून पुन्हा उठण्यामुळे घडू शकले. २२ तो आकाशात गेलेला आहे, आणि याव्हे एलोहिमच्या उजव्या हाताशी बसला आहे. याव्हे एलोहिमचे मालाक (देवदूत) अधिकार आणि सामर्थ्य हे सर्व त्याच्या अधीन आहेत.

४. १ मशीहाने जसा शारीरिक दुःख सहनाचा अनुभव घेतला.तसेच तुम्हीं सुद्धा मशीहाची जशी चित्तवृत्ति होती तशा प्रकारच्या चित्तवृत्तीने सज्ज व्हा. मी असे म्हणतो, कारण ज्याने शारीरिक दुःख सहनाचा अनुभव घेतला आहे. तो पाप करण्याचे सोडून देतो. २ म्हणून तो या जगात राहत असता, उरलेल्या ऐरेस्त (पृथ्वी) वरील जीवनात मानवी वासनांच्या आहारी जाणार नाही. तर याव्हे एलोहिमची इच्छा पूर्ण करण्याकडे लक्ष देईल. ३ कारण तुम्हीं आज पर्यंत विदेशी लोकांसारखे आयुष्य जगत आला, म्हणजे तुम्हीं कामातुरपणाच्या कृतीत चालला. देहवासना मद्यपान बदफैलीपणा रंगेलपणा आणि अमंगळ मूर्तीपूजा यात बेभान जीवन जगलात. ४ आता तुम्हीं त्यांच्यासारखे वाहवत जात नाही. याचे त्यांना आश्चर्य वाटते, म्हणून तुम्हांला शिव्याशाप देतात.५ ते त्यांच्या वागणुकीचा हिशोब येशूवाह मशीहा जो जिवंतांचा आणि मेलेल्यांचा न्याय करण्यास तयार आहे, त्यास ते देतील.६ कारण जे मेलेले आहेत त्यांना सुद्धा सुवार्ता सांगण्यात आली होती. यासाठी की, मनुष्यांप्रमाणेच शारीरिक दुष्टया त्यांचा न्याय व्हावा. आणि आध्यात्मिक दुष्टया याव्हे एलोहिम समान सार्वकालिक जीवन जगावे.

७ सर्व गोष्टींचा शेवट होण्याची वेळ जवळ आली आहे. म्हणून पूर्णपणे सावधानतेने वागा, आणि प्रार्थना करण्यास सतत तयार राहा. ८ सर्वात महत्वाची गोष्ट ही की, एकमेकांवर सत्याने प्रीति करा. कारण प्रीति पापाच्या राशीवर पांघरूण घालते. ९ कुरकूर न करता एकमेकांचा पाहूणचार करा. १० तुमच्यातील प्रत्येकाने याव्हे एलोहिम कडील कारभारी या नात्याने तुम्हांला प्राप्त झालेल्या विविध दानांचा एकमेकांची सेवा करण्यासाठी काळजीपूर्वक वापर करावा. वेगवेगळी दाने असलेला कारभारी करतो तसा करावा. ११ सर्व बाबतीत येशूवाह मशीहाच्या व्दारे याव्हे एलोहिमला गौरव मिळावे. यासाठी जो संदेश देतो, त्याने याव्हे एलोहिम पासून आपल्याला वचन आले आहे, असे बोलावे. जो सेवक आहे त्याने याव्हे एलोहिमने पुरविलेल्या सामर्थ्यानुसार सेवा करीत राहावे. यासाठी की, सर्व गोष्टीत येशूवाह मशीहा व्दारे याव्हे एलोहिमला गौरव दिले जावे. कारण गौरव व सामर्थ्य अनंतकालासाठी त्याचीच

आहेत. आमेन. १२ प्रिय मित्रांनो, तुमच्यावर मोठे संकट येऊन तुमची परीक्षा होते, तेंव्हा नवल वाटून घेऊ नका. १३ त्या ऐवजी
तुम्हीं मशीहाच्या दुःख सहनाचे भागीदार झाल्याबद्दल आनंद करा. यासाठी की, जेंव्हा त्याचे गौरव प्रकट होईल तेंव्हा तुम्हीं आनंदाने
त्याला हाक मारावी. १४ जर तुम्हीं मशीहाचे अनुयायी आहात, म्हणून कोणी तुमचा अपमान केला. तर तुम्हीं आशिर्वादीत आहात.
कारण याव्हे एलोहिमचा गौरवी आत्मा तुमच्यामध्ये वसतो. १५ म्हणून तुमच्यातील कोणास खुनी, चोरी, भ्रष्टाचारी, किंवा इतरांच्या
खाजगी व्यवहारात लुडबूड करणारा म्हणून दुःख सोसावे लागू नये. १६ पण जर तुम्हीं मशीहा ही म्हणून दुःख सहन केले, तर
तुम्हांला त्याबद्दल लाज वाटण्याचे मुळीच कारण नाही. तर तुम्हांला "मशीहा ही" हे नाव मिळाल्याने याव्हे एलोहिमला गौरव द्यावे. १७
कारण याव्हे एलोहिमच्या घराण्यापासून, न्यायनिवाडयाची सुरूवात व्हावी, अशी वेळ आलेली आहे. आणि त्याचा आरंभ पहिल्यांदा
आपल्यापासून होईल. तर याव्हे एलोहिमच्या सुवार्ता वचनांचा सन्मान करण्याचे जे नाकारतील त्या लोकांचा शेवट कसा होईल बरे?
१८ आणि "जर चांगल्या माणसाचे यशाह (तारण) होणे अवघड आहे, तर मग जो अधार्मिक व पापी मनुष्य आहे त्याचे काय
होईल?" १९ तर मग ज्यांना याव्हे एलोहिमच्या इच्छे नुसार दुःख सोसावे लागते. त्यांनी आपल्या निर्माण कर्त्या याव्हे एलोहिमच्या
हाती आपले जीवन सोपवून द्यावे, आणि त्यांनी कामे करीत राहावे.

**५**. १ आता मी तुमच्यातील वडील जणांना आव्हान करतो. (मी एक वडील आहे आणि मशीहाच्या दुःख सहनाचा साक्षीदार आहे.
तसेच भविष्य काळात प्रकट होणा-या गौरवाचा भागीदार सुद्धा आहे.) २ तुमच्या स्वाधीन असलेल्या याव्हे एलोहिमच्या कळपाचे
संगोपन करा. व त्याचा सर्व प्रकारे काळजीवाहक असल्यासारखे त्या कळपाचे पालनपोषण करा. तुम्हांला बळजबरीने करायला
सांगितले म्हणून नाही, तर याव्हे एलोहिमला पाहिजे म्हणून स्वसंतोषाने कळपाचे पालनपोषण करा. तुम्ही पैशाचे लोभी आहात म्हणून
काम करू नका, तर तुम्हीं सेवा करण्यास बांधलेले आहात म्हणून सेवा करा. ३ आणि ज्यांची काळजी घेण्यास तुमच्यावर कामगिरी
सोपविली आहे, त्यांच्याशी एखाद्या धनीपण करणा-या सारखे वागू नका. तर तुमच्या सर्व कळपापुढे एक उदाहरण होईल असे
वागा. ४ आणि जेंव्हा तुमचा मुख्य मेंढपाळ येईल, तेंव्हा तुम्हांला कधीही नाश न पावणारा गौरवी मुगूट (सार्वकालिक जीवनाचा
अधिकार) देईल. ५ त्याच प्रकारे तरूण बंधुनो वडील जणांच्या अधिन असा. आणि तुम्हीं सर्व जण लीनतेचा पोशाख घालून,
एकमेकांशी सहनशिलतेने वागा. कारण "याव्हे एलोहिम गर्विष्ठ लोकांचा विरोध करतो. पण नम्र लोकास कृपेचे दान देतो." ६
याव्हे एलोहिमने योग्य वेळी तुम्हांला उंच करावे यासाठी याव्हे एलोहिमच्या बलशाली हाताखाली लीनतेने राहा. ७ तुमच्या सर्व चिंता
याव्हे एलोहिम वर टाका. कारण तो तुमची काळजी घेतो. ८ सावध आणि जागरूक असा, तुमचा शत्रू जो सैतान तो गर्जना करीत
फिरणा-या सिंहासारखा कोणाला गिळावे म्हणून सगळीकडे फिरत असतो. ९ त्याचा विरोध करा, आणि तुमच्या विश्वासात खंबीर
राहा. कारण तुम्हांला माहीत आहे की, जगभर असलेल्या बंधूभगिनींना अशाच प्रकारचे दुःख सहन करावे लागले. जसे तुम्हीं सध्या
अनुभवीत आहात.

१० परंतु काही काळ दुःख सहन केल्यानंतर, सर्व कृपेचा उगम जो याव्हे एलोहिम ज्याने येशूवाह मशीहाच्या अनंतकाळच्या गौरवात
भागीदार होण्यासाठी तुम्हांला पाचरण केले. तो स्वतः तुम्हांला पुन्हा खंबीरपणे उभे करील. तुम्हांला सामर्थ्य देईल. तुम्हांला स्थिरता
देईल. ११ त्याचे सामर्थ्य अनंतकाळचे आहे! आमेन.

१२ तुम्हांला याव्हे एलोहिमच्या ख-या कृपेची साक्ष द्यावी व तुम्हांला उत्तेजन द्यावे, म्हणून मी हे पत्र सिल्वानच्या हातून थोडक्यात
लिहीत आहे. कारण सिल्वान हा आपला विश्वासू भाऊ आहे, असे मी समजतो. याव्हे एलोहिमच्या ख-या कृपेत दृढ राहा. १३
तुमच्याबरोबरच याव्हे एलोहिमने निवडलेली बाबेल येथील मंडळी, तुम्हांला शालोम (सलाम) सागते. तसेच मशीहातील माझा मुलगा
मार्क तुम्हांला शालोम (सलाम) सांगतो. १४ तुम्हीं एकमेकांना प्रीतिच्या चुंबनाने शालोम (सलाम) करा. तुम्हीं जे सर्व मशीहामध्ये
आहात, त्या तुम्हांबरोबर शालोम (शांती) असो.

......... समाप्त .........

## .योहानान चा बेन (मुलगा) शिमोन उर्फ केफाने लिहिलेले दुसरे पत्रे.

### .प्रस्तावना.

योहानानचा बेन (मुलगा) थालमीद (प्रेषित) शिमोन उर्फ केफाने हे दुसरे पत्र जे मशीहा ही लोक आहे त्यांना बाबेल (बाबीलोन) मधून लिहिलेले होते. लिखानाचा कालावधी हे दुसरे पत्र इसवी सन ६३ ते ६७ च्या दरम्यान लिहिलेले होते. शिमोन उर्फ केफाने निश्चीत हिब्रू भाषेमध्ये पत्र लिहिलेले असणार ह्यामध्ये शंका नाही.शिमोन उर्फ केफाने स्वतः हे पत्र सिल्वान ह्याच्या कडून त्याने लिहून घेतले होते. शिमोन हे नाव हिब्रू भाषेतील शब्द आहे. तर केफा हे नाव अरामीक भाषेत असून त्याचा अर्थ खडक हा आहे. येशूवाह मशीहाने शिमोनाला पेत्र हे नाव दिलेले नाही, तर ग्रीक भाषांतर करणा-यांनी केफा ह्या शब्दाचे भाषांतर पेत्र हे केलेले आहे. येथे भाषांतर झालेला शब्द न घेता मूळ जो हिब्रू व अरामीक शब्द जे आहे, तेच येथे घेतलेला आहे.

### .योहानान चा बेन (मुलगा) शिमोन उर्फ केफाने लिहिलेले दुसरे पत्रे.

१. १ मशीहा येशूवाहचा दास, व थालमीद (प्रेषित) असलेला शिमोन उर्फ केफा कडून, व याव्हे एलोहिम कडून ज्यांना तारणारा येशूवाह मशीहा याच्याव्दारे, मौलवान विश्वास आमच्या बरोबरीनेच मिळाला आहे.२ अशांना, याव्हे एलोहिम आणि आपला अदोनाई येशूवाह, याच्या ओळखीमुळे तुम्हांला याव्हे एलोहिमची कृपा व शालोम (शांती) विपुल प्रमाणात लाभो. ३ जे काही जीवनासंबंधी, व याव्हे एलोहिमच्या भक्तीसंबंधी आहे.ते सर्व आम्हांला येशूवाह ते याव्हे आदोनाय च्या सामर्थ्याने दिले आहे.कारण ज्याने आम्हांला त्याच्या स्वतःच्या गौरवाने व चांगुलपणाने पाचरण केले आहे, त्याला आम्हीं ओळखतो. ४ या गोष्टीच्या म्हणजे गौरव व सात्विकपणा यांच्याव्दारे याव्हे एलोहिमने आपल्याला फार महान आणि मौल्यवान असे आशिर्वादाचे अभिवचन दिले आहे. यासाठी की त्यांच्याव्दारे आम्हीं याव्हे एलोहिम सारखे व्हावे.आणि जगातील दुष्ट लोकांच्या वा-यामुळे नाशापासून सुटका करून घ्यावी. ५ म्हणून या कारणासाठी आपल्या कडून होता होईल तितके प्रयत्न करून देण्यात उदारपणाची विश्वासात सात्विकपणाची, आणि चांगुलपणात ज्ञानाची, ६ ज्ञानात आत्मसंयमनाची, आणि आत्मसंयमात धीराची, आणि धीरात याव्हे एलोहिमच्या प्रामाणिक सेवेची भर घाला, ७ आणि याव्हे एलोहिमच्या प्रामाणिक सेवेस बंधु प्रीतिची जोड द्या.८ जर या सर्व गोष्टी तुमच्यात असतील, व या गोष्टी वाढत असतील, तर त्या तुम्हांला कियाशील व फळ देणारे लोक करून, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या ज्ञानात परिपूर्ण करतील. ९ पण ज्याच्या अंगी हे गुण नसतील, तो पायापुरते पाहणारा व आंधळा ठरेल. आणि त्याच्या गतकाळातील पापा पासून त्याला शुद्ध केल्याचा विसर त्याला पडला आहे.

१० म्हणून बंधूनो, तुम्हांला याव्हे एलोहिमने खरोखरच पाचारण केले आहे, आणि निवडले आहे. हे दाखविण्यासाठी अधिक उत्सुक असा. कारण जर या गोष्टी करता, तर तुम्हीं कधीही अडखळणार नाही आणि पडणार नाही. ११ आणि अशा प्रकारे आपल्या अदोनाई व तारणारा येशूवाह मशीहा, याच्या अनंतकाळच्या राज्यात उदारपणे तुमचे स्वागत करण्यात येईल.१२ या कारणासाठी, या गोष्टींची मी तुम्हांला सतत आठवण करून देत राहीन. जरी तुम्हांला त्या माहीत असल्या, आणि तुमच्या प्रत आलेल्या सत्यात तुम्हीं चांगले स्थिरावलेले असला, १३ तरी हे सांगणे मी अगदी योग्य समजतो की, जो पर्यंत या शरीराने मी जिवंत आहे. तो पर्यंत तुम्हांला आठवण करून देऊन व जागे ठेवणे योग्य आहे.१४ कारण मला माहीत आहे की, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाने मला हे स्पष्ट केले आहे की, लवकरच मला हे शरीर सोडावे लागणार आहे.१५ म्हणून या जीवनातून गेल्यानंतर, या गोष्टींची आठवण करून देण्यासाठी मी सर्व प्रसंगी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन.१६ कारण आपल्या अदोनाई येशूवाहच्या सामर्थ्ययुक्त आगमना विषयी जेंव्हा आम्हीं तुम्हांला सांगितले, तेंव्हा आम्हीं चतुराईने कल्पिलेल्या कहाण्यांस अनुसरत होतो असे नव्हे, तर आम्हीं त्याच्या मोठया वैभवाचे प्रत्यक्ष पाहणारे होतो.१७ कारण त्याला सन्मान व गौरव, ही याव्हे एलोहिम अव्वा कडून प्राप्त झाली आहेत.तेंव्हा त्याच्या विषयी फार तेजस्वी गौरवा पासून अशी वाणी आली की, हा माझा प्रिय बेन (मुलगा) आहे, याच्या ठायी मी संतुष्ट आहे.१८ आणि त्याच्या बरोबर क्वादोश (पवित्र) डोंगरावर असताना, ही वाणी शाम्माईम (आकाशा,) तून येत असताना आम्हीं स्वतः ऐकली.१९ आम्हीं नव्वीईम (भविष्यवाद्यांचे) भविष्यवचने अती विश्वासनीय असे समजून त्यास मान देतो. त्याकडे लक्ष देऊन तुम्हीं फार चांगले

करता. कारण अगदी होशेक (अंधारात) प्रकाशणा-या दिव्याप्रमाणे ते दिसते. म्हणून दिवस उजाडून प्रभात तारा तुमच्या रूहुव्वात (आत्म्यात) प्रकाशेपर्यंत, तुम्हीं त्याकडे लक्ष देऊन पाहाल तर चांगले होईल.२० प्रथम तुम्हीं हे समजले पाहिजे की, शास्त्रलेखातील कोणते ही भविष्य वचने कोणाही मनुष्याच्या बुद्धीने उकलत नाही. २१ कारण एखाद्या मनुष्याला पाहिजे म्हणून भविष्यवाणी झालेली नाही, तर जे लोक क्वादोश रूहुव्वाने (पवित्र आत्म्याने) प्रेरित झालेले होते. त्यांनीच ती लोकांपर्यंत पोहचविलेली आहे.

२. १ तरीही याव्हे एलोहिमच्या लोकांमध्ये खोटे नव्वीईम (संदेष्टे) होऊन गेले, तसे तुमच्यामध्ये खोटे राव्बी (शिक्षक) असणार. ते लोकांमध्ये विध्वंसक विचार पसरवतील. आणि ज्या अदोनाईने त्यांच्यासाठी स्वतंत्र विकत घेतले, त्याचा ते स्विकार करणार नाही.असे करण्याने ते स्वतःवर तावडतोब नाश ओढवून घेतील. २ तसेच पुष्कळ लोक प्रखर लैंगिक वासनांच्या आहारी जाऊन अनैसर्गिक शरीर व्यवहारात गुरफटतील.त्यांच्यामुळे ख-या मार्गाची निंदा होईल.३ त्यांच्या अधाशीपणामुळे त्यांनी तयार केलेल्या शिकवणुकीने पैशांसाठी तुमची पिळवणूक करतील. फार पूर्वी याव्हे एलोहिमने त्यांना दिलेली शिक्षा ही पोकळ धमकी नाही, तर त्यांचा नाश त्यांची वाट पाहत आहे.४ कारण याव्हे एलोहिमने ज्या मालाक नी (दूतांनी) पाप केले त्यांना देखील सोडले नाही. तर न्यायाच्या दिवस येईपर्यंत त्यांना अबद्दोन (अथांग डोहाच्या) गडद अंधकारात बंधनांमध्ये टाकले.५ याव्हे एलोहिमने प्राचीन काळातील जगाची सुद्धा गय केली नाही. तेंव्हा त्याने नोहाचे ज्याने लोकांना योग्य रीतीने राहण्यासाठी उपदेश केला, व त्याच्याबरोबर इतर सात लोकांचे संरक्षण केले. आणि अधार्मिक लोकांनी भरलेल्या या जगावर पाण्याचा प्रलय आणला. ६ याव्हे एलोहिमने सदोम व गमोरा या शहरांना जाळून भस्म करण्याची शिक्षा दिली, व भविष्यकाळात अनैतिक लोकांचे काय होईल, या उदाहरणाने दाखवून दिले. ७ आपल्या अनीतिच्या वागण्याने ज्या बेबंद लोकांनी लोटासारख्या चांगल्या माणसाला कष्टविले. त्याची याव्हे एलोहिमने सुटका केली. ८ दिवसेदिवस त्या लोकांमध्ये राहत असताना, त्या नियमविरहीत लोकांमुळे जे तो पाहत व ऐकत होता, त्यामुळे त्या चांगल्या मनुष्याला आपले धार्मिक हदय फाटून जाते की काय, असे त्याला वाटत होते.९ अशा प्रकारे अदोनाईला धार्मिक लोकांची त्यांच्या दुःखापासून सुटका कशी करायची हे माहीत आहे, आणि त्याला माहीत आहे की, न्यायाच्या दिवसापर्यंत दुष्ट लोकांना शिक्षेसाठी कसे ठेवायचे.१० विशेषतः जे पापमय वासनांच्या भ्रष्ट मार्गाने गेले आहेत. आणि अदोनाईचा अधिकार असताना देखील, उद्धटपणे व मन मानेल तसे वागणारे ते लोक, गौरवी याव्हे एलोहिमच्या मालाक ची (दुतांची) निंदा करायला भीत नाहीत.११ याउलट याव्हे एलोहिमचे मालाक (दूत) जे या लोकांपेक्षा सामर्थ्याने व बळाने महान आहेत. ते याव्हे एलोहिम समोर या लोकांविरूद्ध आपमानस्पद गैर काही बोलत नाहीत. १२ परंतु हे लोक ज्यांना पकडून मारून टाकावे, अशा देहस्वभावानुसार चालणा-या बुद्धीहीन पशूंसारखे आहेत. ज्या गोष्टीबद्दल ते अज्ञानी आहेत, त्या विरूद्ध हे लोक बोलतात. ज्या प्रमाणे प्राण्यांचा नाश केला जातो, त्याच प्रमाणे खोटया शिक्षकांचाही नाश केला जाईल.१३ आणि त्यांनी इतरांना दुःखावल्याचे आणि अन्यायाचे फळ म्हणून, त्यांनाही दुखाविण्यात येईल. भर दिवसा वाईट गोष्टी करण्यात आनंद आहे, असे ते लोक मानतात. ते डाग व कलंक असे आहेत; ते तुमच्याबरोबर मेजवान्या खात असताना आपल्या कपटाच्या मौजा करतात.१४ त्यांची पापी नजर प्रत्येक स्त्रीकडे कामूकतेने वळते, व असले पाप करायचे ते कधीही सोडत नाहीत. डळमळीत मनाच्या लोकांना ते भुरळ घालून पापात ओढतात. त्यांची मने अधाशीपणात तरबेज झालेली असतात. ते लोक शापित आहेत.१५ सरळ वाट सोडून ते भलतीकडे भरकटत गेले आहेत. वौराचा बेन (मुलगा) बलाम याच्यासारखी वाट त्यांनी धरली आहे.बलामाला अयोग्य गोष्टी करण्याकरिता लाच घेणे आवडत असे. १६ परंतु त्याच्या दोषामुळे त्याची कान उघडणी करण्यात आली. कधीही बोलू न शकणा-या गाढवाने, माणसासारखे बोलून संदेष्टयाच्या वेडगळपणास आवर घातला. १७ हे खोटे शिक्षक माईम (पाणी) नसलेले कोरडे झरे, व वादळाने पांगविलेले ढग आहेत. खोल अंधारात त्यांच्यासाठी जागा राखून ठेवली आहे. १८ ते पोकळ बढाया मारतात, व जे लोक चुकीचे जीवन जगणा-यांच्या संगतीपासून सुटकेचा प्रयत्न करू लागले आहेत.अशांची फसवणूक करून देहवासनांच्या अनैतिकतेचा मोह टाकतात. १९ हे जे खोटे शिक्षक आहेत, ते लोकांना मोकळीक देण्याचे वचन देतात, परंतु ते स्वतःच नाशवंत जीवनाचे दास आहेत.कारण एखाद्या मनुष्यावर ज्या गोष्टीचा पगडा बसलेला असतो, त्याचा तो गुलाम बनतो. २० म्हणून आपला अदोनाई व तारणारा येशूवाह मशीहा यांची ज्या लोकांना ओळख होते, त्यांची जगाच्या मलिनते पासून सुटका होते. परंतु नंतर पुन्हा एकदा जगाच्या मलिनतेने या लोकांवर आपल्या

पगडा बसविते. तर त्यांची शेवटची स्थिती पहिल्या स्थितीहून जास्तच वाईट होते. २१ त्यांना जर न्यायीपणाचा मार्ग जाणल्या नंतर, आपणांस दिलेल्या क्वादोश (पवित्र) शिक्षणापासून परत फिरावे, यापेक्षा तो मार्ग त्यांनी जाणला नसता तर ते त्यांना बरे झाले असते. २२ त्यांच्या बाबतीत जे घडले ते या ख-या म्हणी सांगितलेले आहते. " आपल्याच ओकारीकडे परतणारा कुत्रा, आणि दुसरी म्हण, स्वच्छ केले तरी चिखलात लोळणारे डुक्कर, तिच्याप्रमाणे हे ते झाले आहे.

**३**. १ प्रिय मित्रांनो, हे दुसरे पत्र मी तुम्हांला लिहिले आहे. दोन्ही पत्रांमध्ये या गोष्टींची आठवण करून देण्यासाठी, तुमची शुद्ध रूहुव्या (आत्मे) जागी करण्याचा प्रयत्न केला आहे. २ याव्हे एलोहिमच्या क्वादोश (पवित्र) नव्बीईम नी (संदेष्टयांनी) वापरलेले शब्द, आणि तुमच्या थालमीद (प्रेषितां) कडून आपल्या अदोनाई व तारणा-याने दिलेल्या आज्ञांची, तुम्हीं आठवण करावी, अशी माझी इच्छा आहे. ३ पहिल्यांदा आम्हीं जे तुम्हांला सांगितले, ते तुम्हीं समजून घेतले पाहिजे. ते म्हणजे शेवटच्या दिवसांत थट्टेखोर लोक येतील, जे आपल्या इच्छेप्रमाणे वागतील. ४ आणि म्हणतील, "मशीहाच्या येण्याविषयीच्या अभिवचनाचे काय झाले? आम्हांला ते जाणून घ्यायचे आहे, कारण आमचे पूर्वज मेल्यापासून प्रत्येक गोष्ट जगाच्या निर्मित्तीच्या पासून जशी चालत आली, तशीच ती आज सुद्धा घडत आहे." ५ पण जेंव्हा ते म्हणतात, तेंव्हा ते मुद्दामूनच विसरतात की, फार पूर्वीपासून शाम्माईम (आकाशे) व ऐरेस्त (पृथ्वी) अस्तित्वात होती. जी याव्हे एलोहिमच्या शब्दाने (मशीहाने कडून) पाण्याच्या बाहेर आणि पाण्याच्या आत बरोबर व्यवस्थित केलेली अशी होती. ६ त्यांच्यायोगे तेंव्हाचे जग पाण्याने बुडवले जाऊन नाश पावले. ७ परंतु आता जे शाम्माईम (आकाश) व ऐरेस्त (पृथ्वी) आहेत, ती याच शब्दाने (मशीहाने कडून) अग्निव्दारे नष्ट होण्यासाठी राखून ठेवली आहेत. त्यांना त्याच दिवसासाठी राखून ठेवण्यात आले आहे. तेंव्हा अधर्मिक लोकांचा न्याय होऊन त्यांचा नाश होईल. ८ परंतु प्रिय मित्रांनो, ही एक गोष्ट विसरू नका की, अदोनाईला एक दिवस एक हजार वर्षासारखा. आणि एक हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत. ९ याव्हे एलोहिम त्याच्या अभिवचनाची परिपूर्ती करण्यासाठी उशीर लावणार नाही, जसे काही लोकांना वाटते. परंतु तो आमच्याशी धीराने वागतो. कारण आपल्यापैकी कोणाचा नाश व्हावा, असे त्याला वाटत नाही. वास्तविक सर्व लोकांनी पश्चात्ताप करावा, असे त्याला वाटते. १० परंतु अदोनाईचा दिवस एका चोरासारखा येईल. त्यादिवशी शाम्माईम (आकाश) मोठा आवाजकरीत नाहीसे होईल, आणि मूळद्रव्य अतिउष्णतेने वितळतील, आणि ऐरेस्त (पृथ्वी) व तिच्यावरील कामे जळून जातील. ११ जर अशा प्रकारे सर्व गोष्टीचा नाश होणार आहे, तर तुम्हीं कोणत्या प्रकारचे लोक असायला पाहिजे याचा विचार करा. तुम्हीं आपले जीवन पवित्रतेने जगावे व याव्हे एलोहिमच्या सेवेत तत्पर असावे. १२ तुम्हीं अदोनाईच्या येण्याच्या दिवसाची वाट पहावी यासाठी की, याव्हे एलोहिमच्या येण्याचा दिवस अधिक लवकर यावा. त्या आवाजाने शाम्माईम (आकाश) पेटून विरघळेल, सुष्टितत्वाची मूळद्रव्ये अतिउष्णतेने वितळतील. १३ पण याव्हे एलोहिमच्या वचनाप्रमाणे जेथे न्यायपणाचा वास करते, असे नवे शाम्माईम (आकाश) व नवी ऐरेस्त (पृथ्वी) यांची आपण वाट पाहू. १४ म्हणून प्रिय मित्रांनो ज्याअर्थी तुम्हीं या गोष्टीची वाट पाहात आहात, त्याअर्थी आपणास अदोनाई समोर डागविरहीत, व दोषविरहीत आणि शांतता टिकविण्यांचा आटोक्याने प्रयत्न करा. १५ आणि आपल्या अदोनाईची सहनशिलता, ही तारण आहे असे माना. तसेच आपला प्रिय भाऊ पौल, याला याव्हे एलोहिमने दिलेल्या ज्ञानाव्दारे त्यानेही तुम्हांला लिहिले आहे. १६ त्या पत्रात जसे इतर सर्व पत्रांत त्याप्रमाणे तो या गोष्टीविषयी सांगतो. त्याच्या पत्रामध्ये काही गोष्टी आहेत, ज्या समजण्यास कठीण आहेत. अज्ञानी व चंचल मनाचे लोक पवित्र शास्त्रलेखाचा जसा अर्थ विपरीत करतात. तसाच या गोष्टीचाही अर्थ ओढूनताणून विपरीत करतात, परिणामी आपला स्वतःचा नाश करून घेतात. १७ यासाठी प्रिय मित्रांनो, तुम्हांला या गोष्टी अगोदरच माहीत असल्याने स्वतःचे रक्षण करा. यासाठी की, तोराह (नियमशास्त्र) विरहित लोकांच्या चुकीमुळे तुम्हीं भरकटत जाऊ नये. आणि तुमची जी विश्वासाविषयी अढळ भूमिका आहे, तिच्यापासून विचलित होऊ नये म्हणून संभाळा. १८ परंतु आपला अदोनाई व तारणारा येशूवाह मशीहा याच्या कृपेत, आणि त्याच्याकडून मिळणा-या ज्ञानात वाढत राहा. त्याला आता आणि अनंतकाळपर्यंत गौरव असो, आमेन.

........... समाप्त ...........

## .योहानान ने लिहिलेली पत्र. ( पहिले, दुसरे, आणि तिसरे पत्रे.)

### प्रस्तावना

मूळ हिब्रू भाषेमधील योहानान ने लिहिलेले एकूण तीन पत्रे आहेत.पहिले पत्र हे त्याने इसवी सन ६0 ते ६५ मध्ये लिहिले होते. परंतु हे पत्र कोणाला लिहिले आहे, त्याबाबत तपशिल दिलेला नाही. परंतु शेवटच्या पाचव्या अध्यायातील वचन २१ मध्ये, तो मुलांनो, म्हणजे अनेक जणांना सांगत आहे, हे दिसून येते. योहानान ने स्वतः हे पत्र लिहिले आहे, किंवा दुस-या कडून त्याने लिहूण घेतले आहे, हे निश्चत सांगता येत नाही. मंडळयांना वास्तविक हे पत्रे लिहिलेले आहे. मंडळया छळ भोगत असताना काही मंडळयांची माहिती शत्रूला मिळू नये, म्हणून काही मुख्य शब्द हे सांकेतीक प्रतिक दर्शक शव्दामध्ये त्याने लिहिलेले दिसून येतात. अर्थात हे पत्र मंडळयांनाच लिहिलेले आहे. परंतु मंडळीची माहिती मिळू नये म्हणून जणू काय व्ययक्तीक व्यक्तीला दिलेले आहे, हे दाखवित आहे. हे पत्र मूळ दस्तावेज हिब्रू भाषेतील असून, नंतर कालांतराने हे ग्रीक भाषेमध्ये भाषांतर केलेले आहे.

### .योहानान ने लिहिलेले पहिले पत्र.

१. १ ऐरेस्त (जगाच्या) सुरूवाती पासून हे होते, हे आम्हीं ऐकले आहे. आम्ही आमच्या डोळयांनी ते पाहिले आहे. आम्हीं ते निरखून पाहिले आहे. आम्हीं ते आमच्या हातांनी चाचपले आहे. जो मशीहा यशाह (जीवन) देतो, त्याविषयी आम्ही बोलत आहोत. २ ते यशाह (जीवन) आम्हांस प्रगट करण्यात आले आम्हीं ते पाहिले आहे. त्याविषयी आम्हीं साक्ष देतो. आणि त्या अनंतकाळच्या यशाह (जीवना) विषयी आम्हीं तुम्हांस कळवीत आहोत. ते यशाह (जीवन) याव्हे अव्वा बरोबर होते, ते आम्हांला प्रगट करण्यात आले.३ आम्हीं ते पाहिले आहे, व ऐकले आहे, आणि आम्हीं आता ते तुम्हांलाही कळवीत आहोत. यासाठी की, तुमचीही आमच्यासह सहभागिता असावी. आमची सहभागिता तर याव्हे एलोहिम अव्वा व त्याचा बेन येशूवाह मशीहा याजबरोबर आहे. ४ म्हणून आम्हीं तुम्हांला या गोष्टी विषयी लिहित आहोत.यासाठी की, तुमचा आनंद पूर्ण व्हावा.

५ आणि हा संदेश आहे, जो आम्हीं येशूवाह मशीहा कडून ऐकला आहे. आणि जो आम्हीं तुम्हांस कळवीत आहोत. याव्हे एलोहिम ओर (प्रकाश) आहे आणि त्याच्यामध्ये मुळीच होशेक (अंधार) नाही.६ जर आम्हीं म्हणतो की, आमची याव्हे एलोहिम बरोबर सहभागिता आहे. पण हा-ताअह् (पापाच्या) होशेक (अंधारा) मध्ये आम्हीं राहतो, तर आम्हीं शेक्वेर (खोटे) बोलत आहोत, व आम्हीं सत्याला अनुसरत नाही. ७ पण जर आम्हीं ओर (प्रकाशात) चालतो, जसा याव्हे एलोहिम ओर (प्रकाशात) आहे. तर आमची विश्वासणारे व नात्याने एकमेकांवरोबर सहभागिता आहे. आणि याव्हे एलोहिमचा बेन येशूवाह याचे रक्त, आम्हांला सर्व पापांपासून क्वाडाश (शुद्ध) करते. ८ जर आम्हीं असे म्हणतो की, आमच्या मध्ये कोणतेही पाप नाही, तर आम्हीं स्वतःला फसवीत आहोत. आणि आमच्या मध्ये सत्य नाही. ९ जर आम्हीं आमची पापे कबूल करतो, तर आमच्या हा-ताअह् (पापां) पासून आम्हांला क्षमा करण्यास याव्हे एलोहिम विश्वासू व न्यायी आहे. आणि आमच्या सर्व अनीतीपासून तो आम्हांला क्वाडाश (शुद्ध) करतो. १0 जर आम्हीं म्हणतो की, आम्हीं पाप केले नाही. तर आम्हीं याव्हे एलोहिमला शेक्वेर (लबाड) ठरवितो. आणि त्याचे वचन आमच्या आत्म्यामध्ये नाही.

२. १ माझ्या प्रिय मुलांनो, तुम्हीं पाप करू नये, यासाठी मी तुम्हांला या गोष्टी लिहित आहे. पण जर एखादा पाप करतो, तर अव्वा कडे आमच्या वतीने विनंवणी करणारा मध्यस्थ आमच्याकडे आहे. तो येशूवाह मशीहा आहे, जो नीतीमान आहे, २ तो अर्पण आहे, जो आमचे पाप आमच्यापासून काढून घेतो आणि केवळ आमचेच पाप नव्हे तर सगळया जगाचे पाप काढून घेतो. ३ जर आम्हीं त्याच्या आज्ञा पाळतो, तर हाच मार्ग आहे. ज्याविषयी आम्हांला खात्री आहे की, आम्ही याव्हे एलोहिमला ख-या अर्थाने ओळखले आहे.४ जो असे म्हणतो की, “मी याव्हे एलोहिमला ओळखतो!” आणि त्याच्या आज्ञा पाळत नाही, तर तो लबाड आहे; आणि त्याच्यामध्ये सत्य नाही. ५ पण जर कोणी याव्हे एलोहिमची शिकवण पाळतो, तर याव्हे एलोहिम विषयीचे त्याची प्रीति त्याच्यामध्ये पूर्ण झाली आहे, हाच मार्ग आहे ज्याव्दारे आम्हीं खात्री बाळगू शकतो की, आम्हीं याव्हे एलोहिम मध्ये आहोत. ६ मी

याव्हे एलोहिम मध्ये राहतो असे जो म्हणतो, त्याने जसा येशूवाह जगला तसे जगले पाहिजे. ७ प्रिय मित्रांनो, मी तुम्हांला नवी आज्ञा
लिहित नाही, तर जुनीच आज्ञा लिहित आहे. जी तुम्हांला सुरूवातीपासूनच देण्यात आली होती. ८ ती जुनी आज्ञा म्हणजे जो संदेश
तुम्हीं ऐकला आहे, तीच आज्ञा आहे. शिवाय नवीन आज्ञेप्रमाणे मी तिजविषयी लिहितो. कारण या गोष्टीविषयीचे सत्य मशीहाच्या
जीवनामध्ये, आणि तुमच्या जीवनामध्ये दर्शविण्यात आली. कारण अंधार नाहीसा होत आहे, व खरा प्रकाश अगोदरपासून प्रकाशत
आहे. ९ जो असे म्हणतो की, तो प्रकाशात आहे, आणि तरी ही आपल्या भावाचा व्देष करतो, तो अजून सुद्धा अंधारात आहे.

१० जो आपल्या भावावर प्रीति करतो, तो प्रकाशात राहतो. आणि त्याच्या जीवनामध्ये कोणतीही गोष्ट नसते. जे एखाद्याला पापात
पडण्यास भाग पाडते, ११ पण जो आपल्या भावाचा व्देष करतो, तो अंधारात आहे. तो अंधारात जगत आहे व तो कोठे जात
आहे, हे त्याला कळत नाही. कारण अंधारामुळे तो आंधळा झालेला आहे.१२ प्रिय मुलांनो, मी तुम्हांला लिहित आहे. कारण मशीहा
मुळे पापांची क्षमा झालेली आहे.१३ बापानो मी तुम्हांला लिहितो, कारण जो सुरूवाती पासून अस्तित्वात आहे, त्याला तुम्हीं
ओळखता. तरूणांनो मी तुम्हांला लिहित आहे, कारण दुष्टावर तुम्हीं विजय मिळविला आहे.१४ मुलांनो मी तुम्हांला लिहित आहे,
कारण तुम्हांला याव्हे अव्वा माहीत आहे. बापानो मी तुम्हांला लिहितो , कारण जो सुरूवातीपासून अस्तित्वात आहे. त्याची तुम्हांला
ओळख झाली आहे. तरूणांनो मी तुम्हांला लिहिले, कारण तुम्हीं सशक्त आहात. याव्हे एलोहिमचे वचन तुमच्यामध्ये राहते, कारण
तुम्हीं दुष्टावर मात केली आहे.

१५ जगावर किंवा जगातील गोष्टीवर प्रीति करू नका. जर कोणी जगावर प्रीति करतो, तर याव्हे अव्वा विषयी त्याच्या आत्म्यात
प्रीति नाही. १६ कारण जगात जे सर्व काही आहे, ते म्हणजे देहाला संतोषविणारी लैंगिक वासना, डोळयाची वासना, व
संसाराविषयीची फुशारकी, हे अब्बा पासून नाहीत. तर जगापासून आहेत. १७ जग व जगातील वासना नाहीशा होत आहेत, पण जो
याव्हे एलोहिमच्या इच्छेप्रमाणे करतो, तो अनंतकाळपर्यंत जगेल.

१८ माझ्या मुलांनो, शेवट जवळ आला आहे, आणि तुम्ही ऐकल्या प्रमाणे, मशीहा विरोधी येत आहेत. आणि आताही पुष्कळ
मशीहा विरोधी दिसू लागले आहेत. त्यामुळेच आम्हांला कळते की, शेवट जवळ आला आहे. १९ ते आपल्यातूनच बाहेर निघाले,
पण ते ख-या अर्थाने आपल्यातील नव्हतेच, मी हे म्हणतो. कारण जर ते खरेच आपल्यातील असते, तर ते आपल्यात राहिले
असते. पण ते गेले यासाठी की, त्यांना आम्हांला दाखवयाचे होते की, त्यांच्यातील कोणीही आपला नव्हता. २० पण जो क्वादोश
(पवित्र) असा मशीहा याने, तुमचा रूहुव्वा ला (आत्म्याला) अभिषेक केला आहे. म्हणून तुंम्हा सर्वांना सत्य माहीत आहे.२१ मी
तुम्हांला सत्य माहीत नाही म्हणून लिहित नाही, पण तुम्हांला ते माहीत आहे. कारण सत्यापासून कोणतेच असत्य येत नाही. २२
येशूवाह हा मशीहा नाही, असे म्हणणारा खोटा नाही काय? असा मनुष्य मशीहा विरोधी आहे. तो याव्हे अव्वा, आणि बेन (मुलाला)
या दोघांनाही नाकारतो. २३ जो बेन (मुलाला) नाकारतो, त्याला याव्हे अव्वा ला ही नाकारतो.पण जो बेन (मुलाला) पत्करतो तो
अव्वाला ही पत्करतो. २४ तुमच्या बाबतीत जे तुम्हीं सुरूवातीपासून ऐकले आहे, त्यामध्येच राहा. सुरूवातीपासून जे तुम्हीं ऐकले,
त्यात जर तुम्हीं राहाल, तर बेन मध्ये व अव्वा मध्ये राहाल. २५ आणि याव्हे एलोहिमने आम्हांला जे देण्याचे अभिवचन दिले आहे,
ते म्हणजे अनंतकाळचे यशाह (जीवन) होय. २६ जे तुम्हांला फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांच्यविषयी मी तुम्हांला या गोष्टी
लिहित आहे. २७ पण तुमच्याबाबतीत म्हंटले तर ज्या पवित्र व्यक्तीकडून तुम्हांला अभिषेक करण्यात आला, तो तुमच्यामध्ये
राहतो. म्हणून दुस-या कोणी तुम्हांला शिकवावे याची गरज नाही. त्याऐवजी ज्या आत्म्यासह तुमचा अभिषेक (पवित्र व्यक्तीकडून)
झाला, या सर्व गोष्टीविषयी तो तुम्हांला शिकवितो.आणि लक्षात ठेवा की, तो सत्य आहे. खोटा मुळीच नाही. जसे त्याने तुम्हांला
जे करण्यास शिकविले आहे, तसे तुम्हीं मशीहामध्ये राहा.२८ म्हणून आता प्रिय मुलांनो, मशीहामध्ये राहा यासाठी की, जेंव्हा मशीहा
प्रकट होईल, तेंव्हा आम्हांला दृढविश्वास मिळले. व जेंव्हा तो परत येतो, तेंव्हा त्याच्याव्दारे आम्हीं लज्जित केले जाणार नाही. २९
जर तुम्हांला माहीत आहे की, मशीहा नीतिमान आहे, तर जे लोक चांगले काम करतात ते याव्हे एलोहिमचे बेन (मुले) आहेत हे

देखील तुम्हांला कळेल.

**३.** १ याव्हे अब्वाने आपल्यावर जी महान प्रीति केली आहे, त्याविषयी विचार करा. आम्हांला याव्हे एलोहिमची वेन मुले म्हणण्यापर्यंत त्याने प्रीति केले, आणि आम्हीं खरोखरच याव्हे एलोहिमची मुले आहोत! या कारणामुळे जग आम्हांला ओळखत नाही, कारण जगाने मशीहाला ओळखले नाही. २ प्रिय मित्रांनो, आता आम्हीं याव्हे एलोहिमचे वेन मुले आहोत. परंतु आपण पुढे काय होऊ, हे अजून प्रगट झाले नाही. तरी हे आम्हांला माहीत आहे की, जेंव्हा मशीहा पुन्हा येईल, तेंव्हा आम्ही त्याच्यासारखे होऊ. कारण तो जसा आहे, तसे आम्हीं त्याला पाहु. ३ आणि ज्या प्रत्येकानी ही आशा मशीहा वर ठेवली आहे. तो स्वतःला शुद्ध करतो जसा मशीहा शुद्ध आहे, ४ प्रत्येक जण जो पाप करतो, तो याव्हे एलोहिमचे नियम मोडता. कारण पाप हे नियमभंग आहे. ५ लोकांचे पाप घेऊन जाण्यासाठी मशीहा प्रगट झाला, हे तुम्हांस माहीत आहे. आणि त्याच्यामध्ये कोणतेही पाप नाही. ६ जो कोणी मशीहा मध्ये राहतो, तो पाप करीत राहात नाही.जो कोणी पाप करीत राहतो, त्याने त्याला पाहिले नाही. आणि त्याला तो ओळखत सुद्धा नाही.७ प्रिय मुलांनो, तुम्हांला कोणी फसवू नये.जो योग्य ते करतो, तो जसा मशीहा चांगला आहे, तसा तो चांगला आहे.८ जो पापामय जीवन जगतच राहतो, तो सैतानाचा आहे. करण सैतान सुरूवातीपासून पाप करीत आहे, आणि सैतानाची कामे नष्ट करावी, या उद्देशानेच याव्हे एलोहिमचा वेन (मुलगा) प्रकट झाला. ९ जो याव्हे एलोहिमचा वेन (मुलगा) झाला आहे, तो कोणीही पाप करीत नाही. कारण खुद्द याव्हे एलोहिमचे बीज त्या व्यक्तीमध्ये असते. त्यामुळे तो पापात राहू शकत नाही, कारण तो याव्हे एलोहिमचा वेन (मुलगा) बनला आहे. १० जी याव्हे एलोहिमची मुले आहेत, व जी सैतानाची मुले आहेत, त्यांना तुम्हीं अशा प्रकारे सांगू शकताः प्रत्येक जण जे योग्य करीत नाही, आणि जो त्याच्या भावावर प्रीति करीत नाही तो याव्हे एलोहिमचा नाही.

११ आपण एकमेकांवर प्रीति करावी, ही शिकवण आपण सुरूवातीपासून ऐकली आहे. १२ काईन हा त्या दुष्ट सैतानाचा होता, तसे आम्हीं असू नये. कारण त्याने त्याच्या भावाची हत्या केली, आणि कोणत्या कारणासाठी त्याने त्याला मरले? त्याने तसे केले, कारण त्याची स्वतःची कृत्ये दुष्ट होती. तर त्याच्या भावाची कृत्ये चांगली होती. १३ बंधूनो, जर जग तुमचा व्देष करते, तर आश्चर्य मानू नका. १४ आपल्याला माहीत आहे की, आपण मरणातून जीवनात गेलो आहोत. कारण आपण आपल्या बंधूवर प्रीति करतो. जो प्रीति करीत नाही तो मरणात राहतो. १५ जो कोणी आपल्या भावाचा व्देष करतो, तो खूनी आहे. आणि तुम्हांला माहीत आहे की, खुनी माणसाला त्याच्या ठायी असलेले अनंतकाळचे जीवन मिळत नाही. १६ अशा रीतीने मशीहाने आपल्यासाठी स्वतःचा जीव दिला, त्यामुळे प्रीति काय आहे, ते आपल्याला समजते. म्हणून आपण देखील आपल्या भावासाठी जीव दिला पाहिजे. १७ जर कोणाजवळ जगिक संपत्ती आहे ,आणि त्याचा भाऊ गरजेत आहे. हे पाहतो पण तरी ही त्याच्यावर दया करीत नाही, तर त्याच्यामध्ये याव्हे एलोहिमची प्रीति राहते, असे आपण कसे म्हणू शकता? १८ प्रिय मुलांनो, आपली प्रीति केवळ शब्दांनी बोलण्या एवढीच मर्यादित नसावी, तर ती कृती सहीत व खरीखुरी असावी.१९ आम्ही सत्याचे आहोत, ते यावरून आम्हांस कळेल. आणि अशा प्रकारे, याव्हे एलोहिम समोर आमच्या आत्म्याची खात्री पटेल. २० जेंव्हा जेंव्हा आमचा रूहुव्वा (आत्मा) आम्हांला दोषी ठरवितो, हे यासाठी की, आमच्या आत्म्यापेक्षा याव्हे एलोहिम महान आहे. आणि सर्व काही तो जाणतो.२१ प्रिय मित्रांनो, वाईट करण्यावद्दल जर आमचा रूहुव्वा (आत्मा) आम्हांला दोष देत नाहीत, तर याव्हे एलोहिम कडे जाण्यासाठी आम्हांला खात्री आहे.२२ आणि याव्हे एलोहिम कडे आम्हीं जे मागतो, ते आम्हांला प्राप्त होते. कारण आम्हीं त्याच्या आज्ञा पाळतो. आणि त्याला जे संतोषकारक आहे, ते आम्ही करीत आहोत. २३ तो आम्हांला अशी आज्ञा करतो की, येशूवाह मशीहाच्या नावावर आम्हीं विश्वास ठेवला पाहिजे. आणि एकमेकांवर प्रीति केली पाहिजे. जशी येशूवाहने आम्हांला आज्ञा केली आहे. २४ जो याव्हे एलोहिमची आज्ञा पाळतो, तो त्याच्यामध्ये राहतो. आणि याव्हे एलोहिम त्या व्यक्ती मध्ये राहतो. याव्हे एलोहिम आमच्यामध्ये राहतो, हे आम्हांला यावरून समजते. त्याने दिलेल्या आत्म्यामुळे आम्हांला हे समजते.

**४.** १ प्रिय मित्रांनो, प्रत्येक नव्वीईम (संदेष्टयां) च्या आत्म्यावर विश्वास ठेवण्याची सवय लावून घेऊ नका. त्या ऐवजी नेहमी त्या

आत्म्यांची परीक्षा करा, व तो (खरोखर) याव्हे एलोहिम पासून आहेत का? ते पाहा, मी हे तुम्हांला सांगतो, कारण जगात पुष्कळ खोटे नबी (संदेष्टे) निघाले आहेत.२ अशा प्रकारे तुम्हीं याव्हे एलोहिमचा रूहुव्वा ओळखू शकता. प्रत्येक नव्वीईम (संदेष्टयाचा) आत्मा जो कबूल करतो की, "येशूवाह मशीहा या जगात मानवी देहात आला." तो याव्हे एलोहिम पासून आहे. ३ आणि ज्या ज्या नव्वीईमचा (संदेष्टयाचा) आत्मा येशूवाह विषयी कबुली देत नाही, तो याव्हे एलोहिम पासून नाही. अशी व्यक्ती म्हणजे मशीहाविरोधी होय. ज्याच्या येण्याविषयी तुम्हीं ऐकले आहे. तो अगोदरच जगात आला आहे. ४ माझ्या मुलांनो, तुम्हीं याव्हे एलोहिमचे आहात. म्हणून तुम्हीं मशीहाविरोध्याच्या अनुयायांना जिंकले आहे. कारण जगामध्ये जो सैतान आहे, त्याच्यापेक्षा तो तुमच्यामध्ये आहे तो महान याव्हे एलोहिम आहे.५ ते लोक म्हणजे मशीहाचे शत्रू जगाचे आहेत यासाठी की, ते जगापासूनच्या गोष्टी बोलतात व जग त्यांचे ऐकते. ६ पण आम्हीं याव्हे एलोहिमचे आहोत. जो याव्हे एलोहिमला ओळखतो तो आपले ऐकतो. परंतु जो याव्हे एलोहिमचा नाही, तो आपले ऐकत नाही. अशा रीतीने सत्य प्रकट करणारा आत्मा, आणि लोकांना भ्रांतीत नेणारा आत्मा, कोणता? हे आपण ओळखू शकतो.

७ प्रिय मित्रांनो, आपण एकमेकांवर प्रीति करू या, कारण प्रीति याव्हे एलोहिम कडून येते. आणि प्रत्येक जण ८ जो प्रीति करतो, तो याव्हे एलोहिमचे बेन (मूल) होतो, आणि याव्हे एलोहिमला ओळखतो. जो प्रीति करीत नाही, त्याची याव्हे एलोहिमशी ओळख झालेलीच नाही. कारण याव्हे एलोहिम प्रीति आहे. ९ अशा प्रकारे याव्हे एलोहिमने त्याची आम्हांवरील प्रीति प्रगट केली. त्याने आपला एकुलता एक बेन (मुलगा) या जगात पाठविला यासाठी की, त्याच्याव्दारे आम्हांला जीवन मिळावे. १० आम्हीं याव्हे एलोहिम वर प्रीति केली असे नाही, तर त्याने आम्हांवर प्रीति केली. व आपल्या एकुलत्या एका बेन (मुला) ला, आमच्या पापाकरिता प्रायश्चित म्हणून पाठविले. यामध्ये खरी प्रीति आहे.

११ प्रिय मित्रांनो, जर याव्हे एलोहिमने आमच्यावर अशा प्रकारे प्रीति केली, तर आम्हीं एकमेकांवर प्रीति केलीच पाहिजे. १२ याव्हे एलोहिमला कोणी कधीही पाहिले नाही. पण जर आपण एकमेकांवर प्रीति करीत राहिलो, तर याव्हे एलोहिम आमच्यामध्ये राहतो. व त्याची आम्हांवरील प्रीति पूर्णत्वास आणलेली आहे. १३ अशा प्रकारे आम्हीं समजू शकते की, याव्हे एलोहिम आमच्या मध्ये राहतो. त्याने त्याचा क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) आमच्यात राहू दिला आहे. १४ ही गोष्ट आम्हीं पाहिली आहे, व आम्हीं साक्ष देतो की, जगाचा तारणारा होण्यासाठी अब्बाने बेन (मुला) ला पाठविले आहे.१५ जर कोणी, " येशूवाह हा याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे" हे कबूल करतो, तर याव्हे एलोहिम त्या व्यक्तीमध्ये राहतो. आणि ती व्यक्ती याव्हे एलोहिम मध्ये राहते. १६ आणि म्हणून आम्हीं ओळखतो, आणि त्या प्रीतिवर आम्हीं विश्वास ठेवतो की, जी याव्हे एलोहिमने आमच्यावर प्रीति केली. याव्हे एलोहिम प्रीति आहे. आणि जो प्रीतित राहतो, तो याव्हे एलोहिम मध्ये राहतो. आणि याव्हे एलोहिम त्या व्यक्तीमध्ये राहतो.

१७ अशा प्रकारे आमच्या बाबतीत प्रीति पूर्ण होते. यासाठी की, न्यायाच्या दिवशी आम्हांला दृढ विश्वास प्राप्त व्हावा. अशा प्रकारचा आत्मविश्वास आमचा आहे. कारण या जगामध्ये जे जीवन आम्हीं जगत आहोत, ते मशीहाच्या जीवना सारखे आहे. १८ प्रीतिमध्ये कोणतीही भीती नसते. उलट पूर्ण प्रीति भीतीला घालवून देते. प्रीति शिक्षेशी संबंधित आहे. आणि जो भीतीमय जीवन जगतो, तो प्रीतित पूर्ण झालेला नाही. १९ आम्हीं प्रीति करतो कारण याव्हे एलोहिमने आमच्यावर पहिल्यांदा प्रीति केली. २० जर एखादा म्हणतो, " मी याव्हे एलोहिम वर प्रीति करतो." पण त्याच्या भावाचा व्देष करतो, तर तो खोटे बोलतो. मी हे म्हणतो, कारण ज्याला त्याने पाहिलेले आहे. अशा भावावर जर एखादा प्रीति करीत नाही, तर ज्या याव्हे एलोहिमला त्याने पाहिले नाही, त्याच्यावर तो प्रीति करू शकत नाही. २१ आम्हांला मशीहा कडून ही आज्ञा मिळाली आहे. जो याव्हे एलोहिमवर प्रीति करतो, त्याने त्याच्या भावावर प्रीति केलीच पाहिजे.

**५.** १ प्रत्येक जण जो विश्वास ठेवतो की, येशूवाह हा मशीहा आहे. तो याव्हे एलोहिमचे बेन (मूल) झालेला आहे. आणि प्रत्येक जण जो एलोहिमवर प्रीति करतो, तो त्याच्या बेन (मुला) वरही प्रीति करतो. २ अशा प्रकारे आम्ही ओळखतो की, आम्हीं

याव्हे एलोहिमच्या बेन (मुला) वर प्रीति करतो• याव्हे एलोहिम वर प्रीति करण्याने, व त्याच्या आज्ञा पाळल्याने, ३ याव्हे एलोहिम
प्रति असलेली आमची प्रीति, आम्हीं त्याच्या आज्ञापालना कडून दाखवू शकतो• आणि त्याच्या आज्ञा फार अवघड नाहीत• ४ कारण
प्रत्येक जण जो याव्हे एलोहिमचा बेन (मूल) होतो, तो जगावर विजय मिळवितो• आणि यामुळे आम्हीं जगावर विजय मिळवितो
तो, आमच्या विश्वास हा आहे• ५ येशूवाह, हा याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आहे असा विश्वास धरणा-या शिवाय जगावर विजय
मिळविणारा कोण आहे?

६ येशूवाह मशीहा आमच्याकडे माईम (पाणी) व देम्य (रक्त) यांच्यासह आला•तो केवळ पाण्याव्दारेच आमच्याकडे आला असे
नाही, तर पाणी आणि रक्ताव्दारे आला• व आत्मा ही साक्ष देतो• कारण आत्मा सत्य आहे•७ साक्ष देणारे तीन साक्षीदार आहेत• ८
रूहुव्वा (आत्मा), माईम (पाणी), आणि देम्य (रक्त) तिघेही एकच साक्ष देतात• ९ जर आम्ही मनुष्यांनी दिलेली साक्ष स्विकारतो, तर
याव्हे एलोहिमने दिलेली साक्ष त्यांच्या साक्षीहून अधिक महान आहे, हे आपण ओळखले पाहिजे• याव्हे एलोहिमने आपणास दिलेली
साक्ष ही त्याच्या एकुलत्या एका बेन (मुला) विषयीची आहे•१० जो कोणी याव्हे एलोहिमच्या बेन (मुला)वर विश्वास ठेवतो, त्याच्या
स्वतःमध्ये ही साक्ष आहे• जो याव्हे एलोहिमच्या साक्षीवर विश्वास ठेवीत नाही, त्यांने याव्हे एलोहिमला लबाड ठरविले आहे•कारण
याव्हे एलोहिमने आपल्या स्वतःच्या बेन (मुला) बाबत दिलेल्या साक्षीवर त्याने विश्वास ठेवला नाही•११ आणि याव्हे एलोहिमची जी
साक्ष आहे ती ही आहे की, याव्हे एलोहिमने आपल्याला अनंतकाळचे जीवन दिले आहे•आणि हे जीवन त्याच्या बेन (मुला) मध्ये
आहे• १२ ज्याच्याजवळ बेन (मुलगा) आहे, त्याला खरे जीवन आहे• पण ज्याच्याजवळ बेन (मुलगा) नाही, त्याला खरे जीवन
नाही•

१३ जे याव्हे एलोहिमच्या बेन च्या (मुलाच्या) नावावर विश्वास ठेवतात, त्यांना मी या गोष्टी लिहित आहे• यासाठी की, तुम्हांला
अनंतकाळचे जीवन आहे• याविषयी तुम्हीं निश्चित असावे १४ आणि आम्हांला याव्हे एलोहिम मध्ये खात्री आहे की, जेंव्हा आम्हीं
एखाद्या गोष्टीसाठी त्याच्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करतो, तेंव्हा तो आमचे ऐकतो•१५ आणि आम्हांला हे माहीत आहे की, जर तो आमचे
ऐकतो तर कोणत्याही कारणासाठी जरी आम्हीं प्रार्थना केली, तर आम्हांला माहीत आहे की, जे काही आम्हीं मागितले ते आम्हांला
मिळालेच आहे• १६ जर एकाद्याला त्याचा भाऊ पापांत पडलेला दिसला, आणि त्याचा परिणाम अनंतकाळचे मरण नसेल, तर त्या
भावासाठी त्याने प्रार्थना करावी• आणि याव्हे एलोहिम त्याला जीवन देईल• ज्या गोष्टीचा परिणाम अनंतकाळचे मरण नाही, अशा
पापामध्ये पडणा-यासाठी हे जीवन (याव्हे एलोहिम देतो) त्या जीवना विषयी मी हे बोलत आहे• ज्या पापाचा परिणाम मरण आहे•
अशा प्रकारच्या पापाबाबत तुम्हीं प्रार्थना करावी, असे मी म्हणत नाही•

१७ सर्व अनीति हे पाप आहे• पण असे पाप आहे, ज्याचा परिणाम मरण नाही•१८ आम्हीं जानतो की, जो कोणी याव्हे एलोहिमचे
मुले झाला आहे• तो पाप करीत रहात नाही• जो याव्हे एलोहिम पासून जन्मला आहे, याव्हे एलोहिम स्वतः संरक्षण करतो• आणि
सैतान त्याला हात लावू शकत नाही• १९ आम्हांला माहीत आहे की, आम्हीं याव्हे एलोहिमचे आहोत• जरी संपूर्ण जग हे त्या
सैतानाच्या नियंत्रणाखाली आहे• २० पण आम्हांला माहीत आहे की, याव्हे एलोहिमचा बेन (मुलगा) आला आहे, व त्याने आम्हांला
समज बुद्धी दिलेली आहे• यासाठी की, जो खरा आहे• त्या याव्हे एलोहिमला आम्हीं ओळखावे, आणि आपणास माहीत आहे की,
त्याचा बेन (मुलगा) येशूवाह मशीहा आला आहे• व जो खरा याव्हे एलोहिम, आणि याव्हे एलोहिम चा बेन (मुलगा) येशूवाह मशीहा
याजमध्ये आम्हीं राहात आहोत• याव्हे अव्वा हा खरा याव्हे एलोहिम आहे, आणि तो अनंतकाळचे यशाह (जीवन) आहे• २१
माझ्या मुलांनो, स्वतःला मूर्तिपूजेपासून दूर राखा•

………… समाप्त …………

## .योहानान ने लिहिलेले दुसरे पत्र.

### .प्रस्तावना

योहानान ने लिहिलेले हे दुसरे पत्र आहे. त्याच्या लिखाणाचा कालावधी हा इसवी सन ६0 ते ६५ मधील आहे. हे पत्र एकालाच लिहिलेले आहे हे दिसून येते. निवडलेली स्त्री व मुले हे शब्द रूपक व अलंकाराच्या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. शत्रूला मंडळीबाबत कोणतीही माहिती मिळू नये. आणि नवीन मंडळीच्या सभासदांनी स्थिर रहावे म्हणून सांकेतीक शब्दांचा वापर योहानान ने केला आहे.

### .योहानान ने लिहिलेले दुसरे पत्र.

१.अब्वा कडून, (याचा अर्थ कदाचित योहानान प्रेषित असेल. अब्वा म्हणजे वयस्कर मनुष्य तसेच मंडळीतील खास साहाय्यक असाही अर्थ आहे.) याव्हे एलोहिमने निवडलेल्या ईशशाह (बाईना,), (या ठिकाणी याचा अर्थ मंडळी असा असेल, व तिची मुले म्हणजे मंडळीचे सभासद.) व तिच्या मुलांना सत्यात सहभागी असलेल्या लोकांप्रमाणे ज्यांच्यावर मी प्रीति करतो, आणि तुमच्यावर प्रीति करणारा मी एकटाच नाही. तर ज्यांची सत्याशी ओळख झाली आहे, असे सर्व जण सुद्धा प्रीति करतात.२ या सत्यामुळे जे आमच्यामध्ये असते, ते आमच्यामध्ये अनंतकाळपर्यंत राहील. ३ याव्हे एलोहिम अब्वा पासून, आणि याव्हे अब्वा चा बेन (मुलगा) अदोनाई येशूवाह मशीहा याजपासून कृपा, दया, व शांती ही सत्यात, व प्रीतित आपणाबरोबर राहोत. ४ याव्हे अब्वाने आपल्याला दिलेल्या आज्ञेप्रमाणे, तुमची काही मुले सत्यात चालतात असे मला दिसून आले, म्हणून मला फार आनंद झाला.

५ आणि आता ईशशाह (बाई) कुरिया मी तुला नम्रपणे विनंती करतो की, आपण एकमेकांवर प्रीति करावी. मी ही तुला नवी आज्ञा करतो असे नाही, तर जी प्रारंभापासून तुला देण्यात आलेली होती. ६ आणि त्याच्या आज्ञेत राहणे, म्हणजेच प्रीति करणे होय हीच आज्ञा आहे. जी तुम्हीं सुरूवातीपासून ऐकली आहे की, तुम्हीं प्रीतिचे जीवन जगावे. ७ येशूवाह मानवी देह धारण करून या जगात आला, या गोष्टीवर विश्वास न ठेवणारे, अनेक फसवे भोंदू लोक जगात निघले आहेत. असा फसविणारा भोंदू मनुष्य, हाच मशीहाविरोधी होय.८ सावध असा यासाठी की, ज्यासाठी आम्ही काम केले. ते तुम्हीं हातचे जाऊ देऊ नये, तर त्याचे पूर्ण प्रतिफळ तुम्हांला मिळावे.

९ जो मनुष्य मशीहा विषयीच्या शिकवणुकीप्रमाणे चालत नाही, तर तिचे उल्लंघन करतो. त्याला याव्हे एलोहिम मिळाला नाही. जो कोणी मशीहा विषयीच्या शिकवणुकीप्रमाणे चालतो, त्याला याव्हे एलोहिम अब्वा व बेन (मुलगा) असे दोन्ही मिळाले आहेत.१० तर एखादा मनुष्य तुमच्या घरी आला, आणि मशीहाची शिकवण आचारणात आणीत नसला, तर त्याला आपल्या घरात घेऊ नका. किंवा त्याला शालोम (सलाम) ही करू नका. ११ कारण अशा मनुष्याला जो कोणी शालोम (सलाम) करतो, तो त्याच्या वाईट कामांमध्ये सहभागी होतो.१२ मला जरी अनेक गोष्टी तुम्हांला लिहायच्या आहेत, तरी त्या तुम्हांला मी शाई व लेखणीने लिहू इच्छित नाही. तर त्या ऐवजी तुम्हांला भेटावे, व प्रत्यक्ष सर्व काही बोलावे.अशी आशा मनात बाळगून आहे. म्हणजे आपला आनंद त्यामुळे परिपूर्ण होईल. १३ याव्हे एलोहिमने निवडून घेतलेल्या तुमच्या बहिणीचे मुले तुम्हांला शालोम सांगतात. (बहीण पहिल्या वचनातील बाईची बहीण याचा अर्थ कदाचित दुसरी स्त्री किंवा दुसरी मंडळी होऊ शकेल.)

………… समाप्त …………

## .योहानान ने लिहिलेले तिसरे पत्र.

### .प्रस्तावना.

हे तिसरे पत्र योहानान स्वतः अब्बा म्हणून आपल्या मुलाप्रमाने मानलेल्या गायस हे पत्र लिहिलेले आहे. गायस हा शब्द प्रेषित १९ः२९ व रोम १६ः२३ मध्ये आलेले आहे हे पहावयास मिळतात. ह्या पत्रामध्ये मंडळीचा उल्लेख केलेला नाही परंतु मंडळीतील सर्वांना तो सलाम सांगण्यास सांगत आहे. त्याच्या लिखाणाचा कालावधी हा इसवी सन ६0 ते ६५ दरम्यान मधील आहे.

## .योहानान ने लिहिलेले तिसरे पत्र.

१. वडिलाकडून, (हा योहानान प्रेषित असावा. मंडळीतील खास मदतनीस वडीलधारी व्यक्ती.) माझ्या प्रिय मित्र गायस ज्याच्यावर मी सत्यमध्ये, (सत्य किंवा मशीहा विषयी सुवार्ता जी वार्ता विश्वासणा-यांना एकत्र बांधते.) प्रीति करतो त्यास, २ माझ्या प्रिय मित्रा, जसे आध्यात्मिक जीवनात तुझे चांगले चालले आहे, हे मला माहीत आहे. तसेच इतर बाबतीतही तुझे चांगले चालावे. आणि तुझे आरोग्य चांगले असावे, अशी मी प्रार्थना करतो. ३ जेंव्हा काही बंधु आले, आणि सत्यात तू सातत्याने कसे चालतोस, याविषयी त्यांनी साक्ष दिली. आणि तू सत्याविषयीच्या विश्वासूपणा बद्दल मला सांगितले, तेंव्हा मला फार आनंद झाला. ४ माझी बेनयिम (मुले) सत्यात चालतात. हे ऐकून जितका आनंद मला होतो, तितका कशानेही होत नाही. ५ माझ्या प्रिय मित्रा, आपल्या बंधूंच्या परक्यांच्या कल्याणासाठी जे काही करणे तुला शक्य आहे, ते तू विश्वासूपणे करीत आहेस.

६ जे बंधु आले, व ज्यांनी तू दाखविलेल्या प्रीति विषयी मंडळीसमोर साक्ष दिली, त्यांच्या पुढील वाटचालीकरिता याव्हे एलोहिमला आवडेल अशा प्रकारे, ७ शक्य ते सर्व कर. कारण ते मशीहाच्या सेवेसाठी बाहेर निघाले आहेत व अविश्वासणा-यांकडून त्यांनी काहीही स्विकारले नाही. ८ म्हणून आम्हीं विश्वासणा-यांनी त्यांना मदत केलीच पाहिजे. यासाठी की, आम्हीं सत्यासाठी एकमेकांचे भागीदार होऊ. ९ मी मंडळीला पत्र लिहिले, पण दियत्रेफस ज्याला त्यांचा नेता व्हायचे आहे. व जे सांगतो, ते तो स्विकारीत नाही. १0 या कारणामुळे जेंव्हा मी येतो तेंव्हा तो जे करीत आहे, ते दाखवून देईन. तो वाईट शब्दांनी खोटेपणाने माझ्या विरूद्ध बोलत आहे. व एवढया वरच तो समाधान मानीत नाही. तर त्यात भर म्हणून बंधूचा तो स्विकार करीत नाहीच, उलट मंडळीतील जे लोक त्यांचा स्विकार करू इच्छीतात त्यांना अडथळा करतो. आणि त्यांना मंडळी बाहेर घालवितो.

११ माझ्या प्रिय मित्रा, जे चांगले आहे त्याचे अनुकरण कर. वाइटाचे अनुकरण करू नको. जे चांगले आहे ते जो करतो, तो याव्हे एलोहिमचा आहे. जो वाईट करतो त्याने याव्हे एलोहिमला पाहिले नाही. १२ प्रत्येक जण देमेत्रिया विषयी चांगली साक्ष देतात, व सत्य देखील तसेच सांगते. आणि आम्हीं देखील त्याच्याविषयी तसेच म्हणतो. आणि तुम्हांला माहीत आहे की, आमची साक्ष खरी आहे. १३ मला तुला पुष्कळ गोष्टी लिहावयाच्या आहेत, पण मला शाई व लेखणीने तुला लिहावे असे वाटत नाही. १४ त्या ऐवजी तुला लवकर भेटण्याची मला आशा आहे. मग आपल्याला समोरासमोर बोलता येईल. १५ तुझ्याबरोबर शालोम (शांती) असो. तुझे सर्व मित्र तुला शालोम (सलाम) सांगतात. येथील सर्व मित्रांना नावाने आमचा शालोम (सलाम) सांगा.

......... समाप्त .........

## . यहुदाने लिहिलेले पत्र .

### .प्रस्तावना .

यहुदाचे पत्र हे याकोबाचा भाऊ यहुदा, त्याने हे पत्र लिहिले . हे पत्र जे विश्वासणारे मशीही सेवकांना लिहिले आहे . त्याने हे पत्र इसवी सन ६५ ते ७0 च्या दरम्यान लिहिले आहे, असे तज्ञांचे मत आहे . ह्यामध्ये जुन्या काळात घडून गेलेल्या, काही रहस्यमय गोष्टींचा उल्लेख केलेला आहे . हे देखील पत्र मूळ ग्रीक भाषेतील नसून, हे मूळ हिब्रू भाषेतील लेखकांने हिब्रू भाषेमध्येच लिहिलेले आहे, हे त्यातील वचनातील संदंर्भामधून स्पष्ट प्रकट होते . संपूर्ण जुन्या करारातील भाषा शैली ह्यातील वचनामध्ये पहावयास मिळते .

### .यहुदाने लिहिलेले पत्र .

१ . येशूवाह मशीहाचा सेवक आणि याकोबाचा भाऊ असलेल्या यहूदा कडून, याव्हे एलोहिमने ज्या तुम्हांला पाचारण केले आहे .
त्यास याव्हे एलोहिम अब्बा तुमच्यावर प्रीति करतो, व येशूवाह मशीहा व्दारे तुम्हीं सुरक्षित ठेवले जात आहात . २ याव्हे एलोहिमची
करूणा, शांती, आणि प्रीति तुम्हांला अधिकाधिक लाभो .३ प्रिय मित्रांनो, जरी मला तुम्हांला आपल्या समाईक यशाह (तारणा)
विषयी लिहिण्याची आतुरतेने तयारी करीत होतो .तरी एका गोष्टीविषयी मला लिहिवेसे वाटते . ते म्हणजे याव्हे एलोहिमने आपल्या संतानांना एकदाच दिलेला विश्वास टिकविण्यासाठी लढत राहा . ४ याचे कारण ज्यांच्या विषयी शास्त्रलेखात फार पूर्वीच लिहिले आहे
की, अशी माणसे तुमच्यात चोरून शिरली आहेत . ते अधार्मिक लोक आहेत . अनीतीने वागण्यासाठी याव्हे एलोहिमची दया हे निमित्त आहे, असे ते मानतात . आणि आमचा अदोनाई व एकमेव धनी अशा अदोनाई येशूवाह मशीहाला ते मानत नाहीत . जी शिक्षेसाठी यापूर्वीच नेमलेली होती, अशी ही माणसे आहेत .

५ जरी तुम्हांला या गोष्टी माहीत असल्या तरी मला तुम्हांला आठवण करून द्यावीशी वाटते की, ज्या अदोनाईने आपल्या लोकांना एकदा मिसर (इजिप्त) देशातून सोडवून आणल्यानंतर, ज्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवण्याचे नाकारले, अशांचा त्याने नंतर नाश
केला .६ तसेच ज्या याव्हे एलोहिम मालाक (देवदूतांनी) आपली सार्वभौम सत्ता टिकवली नाही . परंतु आपली रहाण्याची जागा सोडून दिली, त्यांची देखील तुम्हांला आठवण करून द्यायला पाहिजे . याव्हे एलोहिमने त्यांना सर्वकालच्या बंधनांनी जखडून काळोखात ठेवले यासाठी की, शेवटच्या महान दिवशी त्यांचा न्याय करता यावा .

७ त्याच प्रमाणे, या याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) सारखीच सदोम व गमोरा, आणि त्या शहराच्या आसपासच्या नगरांनी लैंगिक अनीतीचे आचरण केले, आणि अस्वभाविक लैंगिक संबधाच्या मागे ती लागली . अनंतकाळच्या अग्नीच्या शिक्षेसाठी ती राखून ठेवली आहेत . एक उदाहरण म्हणून ती आपल्या समोर ठेवली आहेत . ८ अगदी तशाच प्रकारे हे लोक जे तुमच्या गटात आले, ते स्वप्नांनी वहकले, व त्यांनी आपली शरीरे विटाळली आहेत . ते अदोनाईचा अधिकार बाजूला ठेवतात, व ते गौरवी थोरामोठयां विरूद्ध
(देवदूतांविरूद्ध) निंदानालस्तीची भाषा वापरतात .९ मीखाएल जो मुख्य याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) याने, जेंव्हा मोशेच्या शरीराविषयी सैतानावरोबर वाद घातला . तेंव्हा त्याने सुद्धा त्याच्या विरूद्ध अपमानास्पद आरोप करण्याचे धाडस केले नाही . तो फक्त म्हणाला, “अदोनाई तुला धमकावो .”

१० पण हे लोक ज्या गोष्टी त्यांना समजत नाहीत त्यांची हे निंदा करतात . आणि जनावरासारखे केवळ मूळ स्वभावाला अनुसरून जे काही त्यांना समजते . अगदी त्याच गोष्टीमुळे ते नाश पावतात . ११ त्या लोकांची केवढी दुर्दशा होणार आहे! कारण ते काईनाच्या मार्गाने चालले, द्रव्यासाठी बलामाच्या भ्रांतिमार्गाने बेफामपणे घुसले, आणि कोरहा सारखे बंड करून त्यांनी आपला नाश करून घेतला आहे . १२ हे लोक तुम्हांबरोबर निर्भयपणे जेवत असताना तुमच्या प्रीतिभोजनात डाग आहेत . ते आपणास चारतात, असे ते मेंढपाळ

आहेत. ते वा-यांनी वाहून नेलेले असे निर्जल ढग आहेत. ज्यांची फळे सुकून जातात अशी निष्फळ दोनदा मेलेली, समूळ उपटलेली झाडे ते आहेत. १३ ते लोक आपल्या लज्जास्पद कामामुळे फेसाळणा-या समुद्राच्या लाटांप्रमाणे आहेत. ते जणू काळयाकुट्ट अंधारात दडलेले तारे असे आहेत. १४ हनोख आदामापासूनचा सातवा मनुष्य याने सुद्धा, या लोकांविषयी असेच भाकीत केले आहे, "पाहा, हजारो क्वादोश (पवित्र) याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) सह अदोनाई येत आहे. १५ तो अखिल जगातील लोकांचा न्याय करील, आणि सर्व लोकांना त्यांनी केलेल्या अधार्माच्या कामासाठी, आणि याव्हे एलोहिमची भीड न बाळगणा या पापी लोकांनी त्याच्या विरूद्ध जे कठोर वाईट शब्द आपल्या तोंडावाटे काढले, त्याकरिता तो त्यांना दोषी ठरवील." १६ हे लोक कुरकुर करणारे व दोष दाखविणारे आहेत. ते आपल्या वासनांप्रमाणे चालणारे, आणि आपल्या तोंडाने बढाया मारणारे लोक आहेत. ते आपल्या फायद्यासाठी इतरांचा तोंडपूजेपणा करतात.

१७ पण तुम्हीं प्रियजनहो, आपल्या अदोनाई येशूवाह मशीहाच्या प्रेषितांनी पूर्वी सांगितलेले शब्द आठवा. १८ त्यांनी सांगितले काळाच्या शेवटी याव्हे एलोहिम विषयी थट्टेने बोलणारे लोक असतील. ते त्यांच्या स्वतःच्याच अधार्मिक इच्छांच्या मागे जातील." १९ असे लोक फूट पाडतात. ते त्यांच्या मूळ स्वभावा प्रमाणे चालतात, त्यांना क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) नाही. २० पण तुम्हीं प्रिय मित्रांनो, आपल्या परमपवित्र विश्वासात परस्परांना आध्यात्मिक रीतीने बळकट करा. क्वादोश रूहुव्वा (पवित्र आत्मा) ने युक्त होऊन प्रार्थना करा. २१ आणि तुम्हांला अनंतकाळच्या जीवनात घेऊन जाणा-या अदोनाई येशूवाह मशीहाच्या कृपेची वाट पाहत, याव्हे एलोहिमच्या प्रीतित स्वतःला राखा. २२ विश्वासात डळमळीत असलेल्या लोकांवर दया करा. २३ त्यांना अग्नीतून ओढून काढून वाचवा. पण दया दाखविण्याच्या वेळी काळजी घ्या. आणि त्यांच्या दैहिक पापामुळे मळीन झालेल्या कपडयांचा तिरस्कार करा.

२४ आता तुम्हांस पतनापासून राखाण्यास, आणि आपल्या ऐश्वर्ययुक्त सान्निध्यात निर्दोष असे उल्लासाने उभे करण्यास, जो समर्थ आहे, २५ अशा आपल्या उद्धारक एकाच याव्हे एलोहिम ला, येशूवाह मशीहा आपला अदोनाई ह्याच्या व्दारे गौरव, महिमा, पराकम, आणि अधिकार ही युगारंभा पूर्वी, आता, व युगानुयुग आहेत, आमेन.

......... समाप्त .........

## .प्रेषित योहानान ला झालेले प्रकटीकरण.

### . प्रस्तावना.

येशूवाह मशीहाने जे काही योहानानला लिहिण्यास सांगितलेले होते, त्याने ते लिहिलेले आहे. हे पुस्तक इसवी सन ९0 ते १00 च्या दरम्यान लिहिलेले असावे, असे तज्ञांचे मत आहे.जरी यामध्ये सात मंडळयाकरिता उल्लेख आलेला आहे, परंतु ही संदेश वचने जागतीक सर्व मंडळयांना लागू पडतात. या पुस्तकात चार मोठे दृष्टांत आहे, प्रत्येक दृष्टांताच्या सुरूवातीस रूहुव्वाने (आत्म्याने) हे शब्द आहेत. प्रत्येक दृष्टांतातील दृश्य व वेगवेगळया ठिकाणांची आहे. हे पवित्र शास्त्रातील शेवटचे पुस्तक आहे. नव्या करारातील भविष्यसूचक असे एकमेव पुस्तक आहे. यामध्ये दृष्टांत व साक्षात्कार यांच्या साहाय्याने दिव्य संदेश सांगितले आहे. कृपेच्या काळानंतर पुढील दिवसात घडणा-या प्रत्येक घटना, ह्या सर्व क्रमवार देण्यात आलेल्या आहे.आणि त्याच क्रमानेच सर्व घटना पूर्ण होत जाणार आहे. ह्या वचनाव्दारे विषेश आशिर्वाद देण्यात आलेले आहे. ह्या पुस्तकाचा अभ्यास करणा-या अभ्यासकांना जागतीक इतिहास, दानीएल संदेष्टांचे, व इतर संदेष्टयांच्या पुस्तकाचा अभ्यास करणे, व पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यानेच परिपूर्ण होणे, ह्या सर्व बाबी प्रथम पूर्ण केल्याशिवाय अभ्यासकांना ह्यातील वचने समजणार नाही.ह्या पुस्तकाव्दारे पुढे घडणा-या घटना येशूवाह मशीहाचे व्दितीय आगमन, व मंडळयांची सत्य वस्तुस्थिती कशा प्रकारे आहे हे दाखविलेली असून, ह्यामध्ये महासंकट काळाची दोन विभागामध्ये विभागणी केलेली आहेत. त्यामध्ये सात शिक्के, सात कर्णे, सात पिडयांच्या वाटया, त्याच प्रमाणे हर्म गिदोनचे शाररीक युद्ध, मसीहाचे हजार वर्षाचे राज्य, त्यानंतर हर्मगिदोनचे आत्मिक युद्ध, न्याय निवाडा, व वेतन वितरण, जुने आकाश व पृथ्वीचा संपूर्ण नष्ट केली जाणे, आणि पुन्हा नवीन आकाश व नवीन पृथ्वीची निर्मित्ती होऊन, त्यामध्ये सार्वकालिक जीवन सर्व मशीहाच्या पवित्र जणांना उपभोगण्यास मिळेल. त्याच प्रमाणे, धोक्याच्या सूचना ह्या देखील ह्यामध्ये देण्यात आलेल्या आहे. ह्या संदेश वचनाचे पुस्तक सर्व मानवाकरिता देण्यात आलेले आहे.कोणत्याही प्रकारची शंका नाही की, योहानानने हे पुस्तक त्याच्या मातृभाषा हिब्रू भाषेमध्येच लिहिलेले आहे, कारण हे सांगणारा मशीहाची स्वतःची भाषा, व ज्या देवदूताने योहानानला कळविले त्याची भाषा, ही सर्व हिब्रू आहे. पवित्र शास्त्रातील पुस्तकाची सुरूवात जर हिब्रू भाषेने केली आहे, तर त्याचा शेवटचे पुस्तक हे देखील हिब्रू भाषेनेच होणार.

* * * * * * * * * * * * *

१.१ हे येशूवाह मशीहाचे प्रकटीकरण आहे, हे याव्हे एलोहिमने त्याला दिले. ज्या गोष्टी लवकरच घडणे आवश्यक आहे. ते आपल्या सेवकाला दाखविण्यासाठी याव्हे एलोहिमने ते दिले. आणि मशीहाने त्याच्या मालाक ला (दूताला) पाठवून या सर्व गोष्टी योहानानला दाखविण्यास सांगितले. २ योहानानने जे काही पाहिले, त्या सर्व गोष्टींविषयी साक्ष दिली की, येशूवाह मशीहाने हे त्याला सांगितले. याव्हे एलोहिम कडून आलेला हा संदेश आहे. ३ जी व्यक्ती याव्हे एलोहिम कडून आलेला या संदेशाचे शब्द उघडपणे वाचून दाखविते, ती आशिर्वादीत आहे. आणि जे लोक हा संदेश ऐकतात, आणि त्यामध्ये लिहिलेली वचने पाळतात, ते आशिर्वादीत आहेत. कारण आता जास्त वेळ उरला नाही.

४ योहानान कडून, आशिया मायनरातील सात मंडळयांना जो आहे, जो होता, व जो येणार आहे, त्या याव्हे एलोहिम पासून आणि त्याच्या सिंहासना समोरील सात रूहुव्वा (आत्म्यां) कडून तुम्हांस कृपा व शालोम (शांती) असो.५ आणि येशूवाह मशीहा विश्वासू साक्षी आहे. जो मेलेल्यांमधून उठविले गेलेल्यांमध्ये पहिला आहे. ऐरेस्त (पृथ्वी) वरील मेलेक (राजांचा) तो सत्ताधिश आहे. आणि जो येशूवाह आमच्यावर अहेद (प्रीति) करतो. ज्या येशूवाहने आम्हांला आमच्या पापांपासून त्याच्या रक्ताने मुक्त केले, ६ ज्याने आम्हांला राज्य आणि याव्हे एलोहिम अब्बाची सेवा करणारे कोहेन (याजक) बनविले, त्या येशूवाहला गौरव व सामर्थ्य अनंतकाळपर्यंत असोत! आमेन.

७ पाहा, येशूवाह ढगांसह येत आहे! प्रत्येक डोळा त्याला पाहिल, ज्यांनी त्याला भोसकले ते सुद्धा त्याला पाहतील. पृथ्वीवरील सर्व

लोक, वंश त्याच्यामुळे आक्रोश करतील. होय, असेच होईल! आमेन. ८ अदोनाई याव्हे एलोहिम म्हणतो, "मी आलेफ आणि ताव आहे.मी जो आहे, जो होतो, आणि जो येत आहे, मी सर्वसमर्थ आहे." ९ मी योहानान तो तुमचा बंधु आहे. आपण येशूवाह मशीहा मधील संकट, व राज्य, आणि सहनशीलता यामध्ये तुमचा भागीदार, तो मी याव्हे एलोहिमच्या वचनाकरिता, आणि येशूवाह मशीहाच्या साक्षीकरिता पात्मा नावाच्या बेटात होतो.१० मी अदोनाईच्या दिवशी आत्म्यात होतो. आणि मी आपल्यामागे मोठी वाणी कर्ण्याच्या आवाजासारखी ऐकू आली. ११ ती वाणी म्हणाली, "जे तू पाहातोस ते पुस्तकात लिही. आणि इफिस, व स्मुर्णा, व पर्गम, व थुवतीरा, व सार्दीस, व फिलदेल्फिया, व लावदिकीया येथे सात मंडळया आहेत, त्यांच्याकडे पाठीव.

१२ माझ्यावरोबर कोण बोलत आहे हे पहाण्यासाठी मी मागे वळलो, आणि मागे वळल्यावर मी सोन्याच्या सात दीपसमय पाहिल्या. १३ मी कोणाला तरी सात दीपस्तंभाच्या मध्यभागी पाहिले, जो मनुष्याच्या पुत्रासारखा होता. त्याने लांब पायघोळ झगा घातला होता. त्याने सोन्याचा पट्टा छातीवर बांधला होता.१४ त्याचे डोके आणि केस बर्फासारख्या पांढ-या लोकरीप्रमाणे शुभ्र होते. त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे होते. १५ त्याचे पाय भट्टीत जळजळणा-या उजळ पितळेसारखे होते. आणि त्याची वाणी पुष्कळ जलांच्या ध्वनीसारखी होती.१६ आणि त्याच्या उजव्या हातात सात तारे होते.आणि त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तरवार निघाली होती. आणि दिवसाच्या मध्यान्ही अतिशय प्रखर तेजाने प्रकाशणा-या सूर्यासारखे त्याचे मूख दिसत होते. १७ जेंव्हा मी त्याला पाहिले तेंव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो, त्याने त्याचा उजवा हात माझ्यावर ठेवला आणि म्हणाला, "घाबरू नको! मी पहिला आणि शेवटला आहे, मी जिवंत आहे.१८ मी मेलो होतो,. पण पाहा मी सदासर्वकाळ जिवंत आहे! आणि माझ्या जवळ मुथ च्या (मरणाच्या) व शेओल च्या (मृतलोकांच्या) किल्ल्या आहेत. १९ यास्तव ज्या घटना तू पाहिल्या आहेस, त्या लिही. आणि ज्या घटना नंतर घडणार आहेत, त्या ही लिही. २० जे सात तारे तू माझ्या उजव्या हातात पाहिल्यास, आणि त्या सात सोन्याच्या दीपसमया तू पाहिल्यास, त्याचा गूज अर्थ हा आहे. सात सोन्याच्या दीपसमया या सात मंडळया आहेत. आणि सात तारे हे सात मंडळयांचे मालाक (दूत) आहते.

२.१ इफिस येथील मंडळीच्या मालाक (दूताला) लिही. जो आपल्या उजव्या हातात सात तारे धरतो. जो त्या सोन्याच्या सात दीपसमयामध्ये चालतो, तो असे म्हणतो. २ तुझी कामे व तुझे श्रम व तुझी सहनशीलता ही मला माहिती आहे.आणि तू दुष्ट लोकांचा स्विकार करीत नाहीस.आणि जे प्रेषित नसता, आपण प्रेषित आहो असे म्हणतात. त्यांची परीक्षा तू घेतली, आणि ते लगाड आहे, असे तुला दिसून आले.३ आणि तुझ्या अंगी सहनशीलता आहे.व माझ्या नावाकरिता तू दुःख सोसले आहे, आणि तू थकून गेला नाहीस. ४ तरी तू आपली पहिली अहेद (प्रीति) सोडली आहे, ह्याविषयी तुला दोष देणे मला प्राप्त आहे. ५ म्हणून तू कोठून पतन पावला आहे, हे आठीव. आणि पश्चात्ताप करून आपली पहिली कृत्ये कर. तू पश्चात्ताप केला नाहीस, तर मी तुझ्याकडे येईन, आणि तुझी दीपसमई तिच्या ठिकाणावरून काढून टाकील. ६ परंतु हे तुझ्याठायी आहे की, ती निकलइतांच्या कृत्यांचा (चुकीच्या कल्पना अनुसरणारा समूह) व्देष करितो. मी ही त्यांच्या कृत्याचा व्देष करतो.७ आत्मा मंडळयास काय सांगतो, ते ज्याला कान आहे, तो ऐको; जो विजय मिळवितो, त्याला मी याव्हे एलोहिमच्या बागेतील जे जीवनाचे झाड आहे, त्यावरचे फळ मी खायला देईल.

८ आणि स्मुर्णा येथील मंडळीच्या दूतास लिही. जो पहिला आणि शेवटचा, जो मेला होता आणि जीवंत झाला, तो असे सांगतो. ९ तुझे क्लेश, आणि दारिद्रय ही मला माहिती आहे. तरी तू धनवान आहेस. आणि जे आपण यहूदी आहो असे म्हणतात, आणि तसे नाहीत तर सैतानाच्या सभा आहेत. असे लोक जी निंदा करितात, ते मला माहिती आहे. १० जी काही दुःखे तुला सोसायची आहेत, त्याची भीति धरू नकोस. पाहा, तुमची परीक्षा व्हावी, म्हणून सैतान कित्येकांस तुरूंगात टाकणार आहे, आणि तुम्हांला दहा दिवस छळ सहन करावे लागेल. पण तरीही मरेपर्यंत विश्वासू राहा, म्हणजे मी तुला जीवनाचा मुगूट देईन.११ आत्मा मंडळयांस काय सांगतो, हे ज्याला कान आहेत तो ऐको. जो विजय मिळवितो, त्याला दुस-या मरणाची शिक्षा मिळणार नाही.

१२ आणि पर्गम येथील मंडळीच्या दूताला लिही. ज्याच्या जवळ दुहेरी बाजूंनी धार असणारी तीक्ष्ण तरवार आहे, तो असे सांगतो. १३ मला माहीत आहे, जेथे सैतानाचे सिंहासन आहे, तेथे तू राहतो. तरीही तू माझे नाव दृढ धरून राहिला आहेस. आणि माझा साक्षीदार माझा विश्वासू अंतिपा याला, सैतानाचे सिंहासन आहे, तेथे तुम्हीं राहता तेथे तुम्हांमध्ये जिवे मारले, त्या दिवसामध्येही तू माझ्यावरील विश्वास नाकारला नाही. १४ तथापि तुला दोष देणे मला प्राप्त आहे. तुमच्यात असे लोक आहेत की, बलामाची शिकवण आचरणात आणतात. बलामाने बालकाला इस्त्राएल लोकांना पाप करायला कसे लावायला. ते शिकविले की, त्यांनी मूर्तीला अर्पिलेले अन्न खाऊन जारकर्माचे पाप केले. १५ त्याच प्रमाणे, निकलाईताची शिकवण आचरणारे तुमच्या मध्ये सुद्धा काही लोक आहेत. १६ म्हणून पश्चात्ताप करा, नाहीतर मी लवकरच तुमच्याकडे येईल, आणि आपल्या तोंडातील तरवारीने त्यांच्याशी लढेल. १७ आत्मा मंडळयांना काय म्हणतो, हे ज्याला कान आहेत तो ऐको. जो विजय मिळवीतो, त्याला मी गुप्त ठेवलेला मान्ना यातील खायला देईल, आणि त्याला मी पांढरा खडा देईन. आणि त्या खडयावर जे नवे नाव लिहीले आहे, ज्याला तो प्राप्त होईल त्यालाच ते समजेल.

१८ आणि थुवतीरा येथील मंडळीच्या दूताला लिही. ज्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे आणि ज्याचे पाय चमकणा-या पितळासारखे आहेत तो याव्हे एलोहिमचा बेन असे म्हणतो.१९ तुझी कामे, व अहेद (प्रीति), व विश्वास, व सेवा, आणि तुझी सहनशीलता, ही मला माहिती आहेत. आणि तुझी शेवटची कामे, पहिल्यापेक्षा अधिक आहेत. २० तरी तुला दोष देणे मला प्राप्त आहे. जी इजबेल स्त्री स्वतःला भविष्यवादीण म्हणवते, आणि माझ्या दासांना जारकर्म करायला, व मूर्तीला अर्पिलेले अन्न खायला शिकवून भुलवते, तिला तू तसे करू देतोस. २१ आणि तिने पश्चात्ताप करावा म्हणून मी तिला वेळ दिला, परंतु आपल्या जारकर्माचा पश्चात्ताप करावा, अशी तिची इच्छा नाही. २२ पाहा, मी तिला अंथरूणावर खिळून टाकीन, आणि तिच्याबरोबर जे व्यभिचार करतात, ते जर आपल्या पापाबद्दल पश्चात्ताप करणार नाही, तर त्यांना मोठया संकटात टाकीन. २३ आणि मी तिच्या मुलाबाळांस मरीने जिवे मारीन. आणि सर्व मंडळया जाणतील की, जो मने आणि आत्म्ये पारखतो, तो मी आहे. आणि मी तुम्हां प्रत्येकाला तुमच्या कृत्याप्रमाणे देईन. २४ परंतु तुम्हांला म्हणजे थुवतीरा येथील बाकीच्या लोकांना, ज्यांनी ती शिकवण आचरीत नाहीत, आणि सैतानाच्या गहण गुप्त गोष्टी माहिती नाही त्यांना मी सांगतो की, तुम्हांवर दुसरा भार लादणार नाही २५ तरी पण जे तुम्हांजवळ आहे, ते मी येईपर्यंत तुम्हीं दृढ धरून राहा. २६ आणि जो विजय मिळवितो, व शेवटपर्यंत माझी कृत्ये करीत रहातो, त्याला माझ्या याव्हे अव्बा पासून मला मिळाला तसा राष्ट्रांवरचा अधिकार मी देईन. २७ आणि जसा मातीच्या भांडयाचा चुराडा करितात, तसा तो लोहदंडाने त्यांच्यावर अधिकार गाजवील. २८ आणि मी त्याला प्रभात तारा देईन. २९ आत्मा मंडळयांस काय म्हणतो, ते ज्याला कान आहे तो ऐको.

**३**.१ आणि सार्दीस येथील मंडळीच्या दुताला लिही. ज्याच्याजवळ याव्हे एलोहिमचे सात आत्मे, आणि सात तारे आहेत तो असे सांगतो, तुझी कृत्ये मला माहिती आहेत. ती अशी की तू जिवंत आहेस, असे तुझ्या विषयी म्हणतात, परंतु तू मेलेला आहेस.२ तू जागृत हो, आणि जे मरणाच्या मार्गवर आहेत, ते सावरून धर. कारण तुझी कृत्ये माझ्या याव्हे एलोहिमच्या दृष्टीने पूर्ण, अशी माझ्या पाहण्यात आली नाहीत. ३ ह्यास्तव तू कसे स्विकारले, व ऐकले ह्यांची आठवण कर, ते जतन करून ठेव, व पश्चात्ताप कर. कारण तू जागृत झाला नाहीस, तर मी चोरासारखा तुझ्यावर येईन. आणि कोणत्या घटकेस तुझ्यावर येईन, हे तुला कळणारच नाही. ४ तरी सार्दीसमध्ये देखील ज्यांनी आपले वस्त्रे विटाळलेली नाहीत, अशी थोडकी नावे येथे तुझ्याजवळ आहेत. आणि ते शुभ्र वस्त्रे परिधान करून माझ्याबरोबर फिरतील, कारण तशी त्यांची योग्यता आहे. ५ जो विजय मिळवितो, तो अशा रीतीने शुभ्र वस्त्रे परिधान केलेला होईल. आणि मी त्याचे नाव जीवनाच्या पुस्तकातून खोडणारा नाही. आणि माझ्या याव्हे अव्बा समोर, व त्याच्या मालाक (दूतां) समोर मी त्याचे नाव पत्करीन. ६ आत्मा मंडळयास काय म्हणतो, हे ज्याला कान आहेत तो ऐको.

७ फिलदेल्फिया येथील मंडळीच्या दूताला लिही : “जो क्वादोश (पवित्र), सत्य, ज्याच्याजवळ दावीदाची किल्ली आहे, ज्याने उघडल्यावर कोणीही बंद करणार नाही, आणि ज्याने बंद केल्यावर कोणी उघडणार नाही, तो असे सांगतो. ८ मला तुझी कामे

माहीत आहे पाहा, मी तुझ्यापुढे दार उघडून ठेवले आहे, आणि ते कोणीही बंद करू शकणार नाही. कारण तुला शक्ती थोडी आहे, तरी तू माझे वचन पाळिले, व माझे नाव नाकारिले नाही. ९ पाहा जे सैतानाच्या सभेचे असून, आपणांला यहूदी म्हणवितात, पण ते यहूदी नाहीत, ते खोटे बोलतात. त्यांच्यातील कित्येकास मी तुझ्या स्वाधीन करीन. पाहा, ते येऊन तुझ्या पायाजवळ येऊन तुला नमन करतील. आणि त्यांना समजेल की, मी तुझ्यावर अहेद (प्रीति) केली आहे हे त्यांना कळून येईल, असे मी करीन. १० धीराविषयीचे माझे वचन तू पाळले आहे, म्हणून सर्व पृथ्वीवर राहणा-या लोकांची परीक्षा होण्याचा जो परीक्षासमय (महासंकटासमय) संपूर्ण पृथ्वीवर येणार आहे, तिच्यापासून मी ही तुला राखीन ११ मी लवकर येतो. तुझा मुगुट कोणी घेऊ नये, म्हणून जे तुझ्याजवळ आहे, ते दृढ धरून राहा. १२ जो विजय मिळवितो, त्याला मी माझ्या याव्हे एलोहिमच्या मंदिरातील स्तंभ करीन. तो तेथून कधीही बाहेर जाणार नाही. त्याच्यावर माझ्या याव्हे एलोहिमचे नाव, आकाशातून उतरणारे नवे यरूशलेम, म्हणजे माझ्या याव्हे एलोहिमची नगरी हिचे नाव, आणि माझे नवे नाव लिहीन. १३ आत्मा मंडळयास काय सांगतो हे ज्याला कान आहे, तो ऐको.

१४ लावदिकीया येथील मंडळीच्या दूताला लिही : जो आमेन, जे विश्वासनीय, व खरा साक्षी, जो याव्हे एलोहिमच्या सृष्टी निर्मित्तीचा प्रारंभ, तो असे सांगतो. १५ तुझी कृत्ये मला माहीत आहे ती अशी की, तू थंड नाहीस आणि उष्ण नाहीस. तू थंड किंवा उष्ण असता, तर बरे होते. १६ पण तू तसा नाहीस कोमट आहेस, म्हणजे उष्ण नाहीस थंड नाहीस, म्हणून मी तुला आपल्या तोंडातून ओकून टाकणार आहेस. १७ कारण तू म्हणतोस की, मी धनवान आहे, आणि मी धन मिळवले आहे, आणि मला कशाचीही कमतरता नाही. पण तू कष्टी, दीन, दरिद्री, आंधळा, व नग्नवस्थेत आहेस, हे तुला कळत नाही. १८ म्हणून मी तुला मसलत देतो की, तू धनवान होण्यांसाठी अग्नीने शुद्ध केलेले सोने माझ्यापासून विकत घे; तुझी लज्जास्पद नग्नता दिसण्यात येऊ नये, म्हणून नेसावयास शुभ्र झगा विकत घे; आणि तुला दृष्टि यावी, म्हणून डोळयात घालण्यास अंजण विकत घे. १९ कारण जितक्यांवर मी प्रीति करितो, तितक्यांचा निषेध करून, त्यांना शिक्षा देखील करितो. ह्यास्तव आस्था बाळग आणि पश्चात्ताप कर. २० पाहा मी दाराशी उभा आहे, व दार ठोकीत आहे. जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन, व त्याच्याबरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर जेवीन. २१ मी जसा विजय मिळवून आपल्या याव्हे अब्बा बरोबर त्याच्या राजासनावर बसलो. तसा जो विजय मिळवितो, त्याला मी आपल्या राजासनावर आपल्या बरोबर बसू देईन. २२ आत्मा मंडळयांस काय सांगतो हे ज्याला कान आहेत, तो ऐको.

४.१ ह्यानंतर मी पाहिले, तो पाहा शाम्माईम (आकाशात) दार उघडले, आणि जी प्रथम वाणी मी ऐकली होती, ती कर्ण्याच्या ध्वनीसारखी माझ्याशी बोलत होती. ती म्हणाली, इकडे वर ये, म्हणजे ज्या घटनानंतर घडल्या पाहिजेत, त्या तुला दाखवितो. २ आणि लागलेच असे झाले की, मी क्वादोश रूहुव्वात (पवित्र आत्म्यात) होतो. आणि पाहा, शाम्माईम (आकाशात) राजासन मांडलेले होते, आणि राजासनावर कोणी एक बसलेला होता. ३ आणि जो बसलेला होता, तो दिसण्यात यास्फे आणि सार्दी रत्नांसारखा होता, आणि राजासनाभोवती दिसण्यात पाचेसारखे मेघधनुष्य होते. ४ आणि राजासनाभोवती चोवीस सिंहासने होते, आणि त्या सिंहासनावर चोवीस वडील बसलेले मी पाहिले ते शुभ्र झगे परिधान केलेले व त्यांच्या डोक्यांवर सोन्याचे मुगूट घातलेले होते. ५ आणि राजासनाच्या आतून विजा व वाणी निघत होत्या, आणि गडगडाट निघत होते. आणि पेटलेले सात दिप राजासनापुढे जळत होते ते याव्हे एलोहिमचे सात आत्मे आहेत. ६ आणि राजासनापुढे स्फटिकांसारखा काचेचा समुद्र होता आणि राजासनाच्या मध्यभागी आणि राजासनाच्या सभोवती पुढे व मागे डोळयांनी भरलेले चार प्राणी होते. ७ पहिला प्राणी सिंहासारखा होता आणि दुसरा प्राणी वासरासारखा होता आणि तिसरा प्राणी माणसाच्या तोंडासारखा होता. आणि चौथा प्राणी उडत्या गरूडासारखा होता. ८ आणि त्या चार प्राण्यांना प्रत्येकी सहा सहा पंख असून, ते प्राणी सभोवती आणि आतून डोळयांनी भरलेले असे होते, आणि ते "क्वादोश! क्वादोश! क्वादोश! अदोनाई जो याव्हे एलोहिम जो सर्वसत्ताधारी, जो होता, आणि आहे, आणि येणार, असे म्हणत असताना रात्रदिवस थांबत नाहीत." ९ आणि जेंव्हा जेंव्हा ते चार प्राणी राजासनांवर बसलेला, जो सदासर्वकाल जिवंत आहे. त्याचे गौरव, आणि सन्मान, आणि उपकारस्तुति करतात. १० तेंव्हा तेंव्हा ते चोवीस वडील राजासनावर जो बसलेला त्याच्यापुढे उपडे

पडतात, आणि सदासर्वकाल जिवंत आहे त्याला नमन करतात, आणि आपले मुगूट राजासनापुढे ठेऊन म्हणतात. ११ हे अदोनाई गौरव, आणि सन्मान, आणि सामर्थ्य, घ्यायला तू योग्य आहेस. कारण तू सर्व काही अस्तित्वात आणले, आणि तुझ्या इच्छेमुळे ते झाले, आणि अस्तित्वात आणले गेले.

**५**.१ आणि राजासनावर जो बसलेला त्याच्या उजव्या हातात एक गुंडाळी आतून आणि बाहेरून लिहिलेली सात शिक्के मारून बंद केलेली अशी मी पाहिली. २ आणि मी एक बलवान याव्हे एलोहिम मालाक (देवदूत) पाहिला. तो मोठयांने पुकारीत होता की गुंडाळी उघडायला म्हणजे तिचे शिक्के फोडायला कोण योग्य आहे? ३ तेंव्हा आकाशात आणि पृथ्वीत आणि पृथ्वीखाली कोणीही ती गुंडाळी उघडायला किंवा तिच्यात पाहायला समर्थ नव्हता. ४ मग मी फार रडलो कारण ती गुंडाळी उघडायला किंवा तिच्यात पाहायला योग्य असा कोणी आढळला नाही. ५ तेंव्हा वडिलांतील एकजण मला म्हणाला रडू नको. पाहा, जो यहूदा वंशाचा, अरि (सिंह) जो दावीदाचे अंकूर ह्याने जय मिळविला म्हणून तो तिचे सात शिक्के फोडून ती गुंडाळी उघडण्यास योग्य ठरला आहे. ६ तेंव्हा मी पाहिले की राजासन आणि चार प्राणी यांच्यामध्ये आणि त्या वडिलांच्या मध्यभागी केवेस (कोकरा) उभा राहिलेला होता तो वधलेल्यांसारखा होता, त्याला सात शिंगे आणि सात डोळे होते. ते सर्व पृथ्वीवर पाठवलेले याव्हे एलोहिमचे सात आत्मे आहेत. ७ तेंव्हा त्याने येऊन राजासनावर जो बसलेला त्याच्या उजव्या हातातून ती गुंडाळी घेतली. ८ आणि त्याने गुंडाळी घेतली तेंव्हा ते चार प्राणी आणि चोवीस वडील कोक-यापुढे उपडे पडले, त्या सर्वांच्याजवळ वीणा व धूपाने भरलेल्या सोन्याच्या वाटया होत्या, त्या वाटया म्हणजे पवित्र जनांच्या प्रार्थना आहेत. ९ आणि ते नवे गीत गातात ते असे की, तू गुंडाळी घ्यायला आणि तिचे शिक्के फोडायला योग्य आहेत. कारण तू वधला गेला होतास, आणि तू आपल्या रक्ताने प्रत्येक वंश, व भाषा बोलणारे लोक, व राष्ट्र यांच्यांतून माणसे याव्हे एलोहिम साठी विकत घेतली आहेत. १० आणि तू आपल्या याव्हे एलोहिम साठी त्यांना मेलेक (राजे) आणि कोहेन (याजक) केले आहे, आणि ते पृथ्वीवर राज्य करतील. ११ तेंव्हा मी पाहिले तो राजासन, आणि प्राणी, आणि वडील यांच्यासभोवती पुष्कळ याव्हे एलोहिम मालाक ची (देवदूतांची) वाणी ऐकली, आणि त्यांची संख्या अयुतांची अयुते व हजारांचे हजार होती. १२ ते मोठयाने म्हणत होते की, जो केवेस (कोकरा) वधलेला होता तो सामर्थ्य, आणि संपत्ती, आणि ज्ञान, आणि बळ, आणि सन्मान, आणि गौरव, आणि उपकारस्तुति घ्यायला योग्य आहे. १३ आणि जी प्रत्येक उत्पन्न केलेली वस्तूजात शाम्माईम (आकाशात) आणि ऐरेस्त (पृथ्वीत) आणि पृथ्वीच्या खाली आणि याम्मीम (समुद्रात) आहे, आणि त्यांमध्ये जी अवघी आहेत, त्यांना असे म्हणताना मी ऐकले की, राजासनावर जो बसलेला आहे त्याला आणि कोक-याला उपकारस्तुति, आणि मान, आणि गौरव, आणि सामर्थ्य, ही सदासर्वकाल आहेत. १४ आणि ते चार प्राणी म्हणाले, आमेन आणि त्या चोवीस वडिलांनी उपडे पडून नमन केले.

**६**.१ मग कोक-याने त्या सात शिक्क्यांपैकी एक शिक्का फोडला, ते मी पाहिले, आणि त्या चार प्राण्यांपैकी एक मेघगर्जनेसारख्या ध्वानीने ये असे म्हणाला, ते मी ऐकले. २ मग पाहा, पांढरा घोडा, आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला; त्याच्याजवळ धनुष्य होते, मग त्याला मुगूट देण्यात आला; तो विजय मिळवीत आणखी विजयावर विजय मिळविण्यास निघून गेला.

३ त्याने दुसरा शिक्का फोडिला, तेंव्हा दुसरा प्राणी ये असे म्हणाला, ते मी ऐकले.४ तेंव्हा दुसरा घोडा निघाला; तो अग्निवर्ण होता आणि त्याच्यावर बसलेला स्वाराकडे पृथ्वीवरील शांतता नाहीशी करण्याचा अधिकार दिलेला होता.आणि लोकांकडून एकमेकांचा वध करविण्याचे काम सोपविले होते, त्याला मोठी तरवार देण्यात आली होती.

५ त्याने तिसरा शिक्का फोडिला, तेंव्हा तिसरा प्राणी ये असे म्हणाला, ते मी ऐकले. मग मी पाहिले तो काळा घोडा, आणि त्याच्यावर बसलेला कोणीएक माझ्या दृष्टीस पडला; त्याच्या हातात तराजू होते.६ आणि जणू काय चार प्राण्यांच्या मधून निघालेली वाणी मी ऐकली, ती अशी, एक किलो गहू एका दिवसाच्या मजुरीइतका, आणि तीन किलो बार्ली (जव) एका दिवसाच्या मजुरीइतका, मात्र तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करू नका.

७ त्याने चौथा शिक्का फोडिला, तेंव्हा चौथा प्राणी ये असे म्हणाला, ते मी ऐकले. ८ मग मी पाहिले तो फिकट रंगाचा घोडा, आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला. त्याचे नाव मरण होते, आणि शेओल (अधोलोक) त्याच्या पाठीमागून चालला होता. त्यांना तरवारीने दुष्काळाने, मरणाने, व पृथ्वीवरील श्वापदाकडून, माणसांना जिवे मारण्याचा अधिकार पृथ्वीच्या चौथ्या भागावर देण्यात आला.

९ त्याने पाचवा शिक्का फोडिला, तेंव्हा मी मीझबेओह (वेदी) खाली आत्मे पाहिले; ते आत्मे याव्हे एलोहिमच्या वचनामुळे, व त्यांनी जी साक्ष दिली होती, तिच्यामुळे जिवे मारिलेल्या लोकांचे होते. १० ते मोठयाने ओरडून म्हणाले, 'हे अदोनाई,' तू क्वादोश (पवित्र), व सत्य आहेस. तू कोठपर्यंत न्यायनिवाडा करणार नाहीस, आणि पृथ्वीवर राहणा-या लोकांपासून आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस? ११ तेंव्हा त्या प्रत्येकास एकएक शुभ्र झगा देण्यात आला. आणि त्यास असे सांगण्यात आले की, तुमच्या सोबतीचे दास, व तुमचे बंधू तुमच्यासारिखे जिवे मारिले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत तुम्हीं आणखी थोडा वेळ विश्रांती घ्या.

१२ त्याने सहावा शिक्का फोडिला, ते मी पाहिले; तेंव्हा मोठा भुमिकंप झाला, सूर्य केसांच्या बनलेल्या तरटासारखा काळा झाला, आणि संपूर्ण चंद्र रक्तासारखा झाला. १३ अंजिराचे झाड मोठया वा-यांने हालले, म्हणजे त्याची कच्ची फळे जशी खाली पडतात, तसे आकाशांतील तारे पृथ्वीवर पडले. १४ एखादे पुस्तक गुंडाळावे, तसे आकाश गुंडाळले जाऊन निघून गेले, आणि सर्व डोंगर, व बेटे आपआपल्या ठिकाणांवरून ढळली. १५ पृथ्वीवरील राजे, व मोठे अधिकारी, सरदार, श्रीमंत, व बलवान लोक, सर्व दास, व सर्व स्वतंत्र माणसे, गुहांत व डोंगरांतील खडकांतून लपली. १६ आणि ते डोंगरांस व खडकांस म्हणाले, आम्हांवर पडून राजासनावर जो बसलेला आहे त्याच्या दृष्टीपुढून, व कोक-याच्या कोधापासून आम्हांस लपला.१७ कारण त्याच्या कोधांचा मोठा दिवस आला आहे, आणि कोणाच्याने टिकाव धरवेल?

**७**.१ ह्यानंतर मी चार एलोहिमचे मालाक (देवदूत) पृथ्वीच्या चार कोनांवर उभे राहिलेले पाहिले. ते पृथ्वीवरून व समुद्रावरून वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये, म्हणून पृथ्वीचे चार वारे अडवून धरीले होते. २ मी आणखी एक याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) सूर्योदयाच्या दिशेने वर चढतांना पाहिला, त्याच्या जवळ जिवंत याव्हे एलोहिमचा शिक्का होता. ज्या चार देवदूतांकडे पृथ्वीला व समुद्राला उपद्रव करण्याचे काम सोपविले होते, त्यांना तो उच्च स्वराने म्हणाला, ३ "आमच्या याव्हे एलोहिमचे जे दास आहेत, त्यांच्या कपाळांवर आम्हीं शिक्का मारीपर्यंत पृथ्वीला, समुद्राला, व झाडांना उपद्रव करू नका." ४ ज्यांच्यावर शिक्का मारण्यात आला त्यांची संख्या मी ऐकली. इस्त्राएल लोकांच्या सर्व वंशापैकी एक लक्ष चव्वेचाळीस हजारांवर शिक्का मारण्यात आला.

. ५ यहूदा वंशापैकी बारा हजारावर शिक्का मारण्यात आला ;
. रऊबेन वंशापैकी बारा हजारावर ;
. गाद वंशापैकी बारा हजारावर ;
. ६ आशेर वंशापैकी बारा हजारावर ;
. नफताली वंशापैकी बारा हजारावर ;
. मनश्शे वंशापैकी बारा हजारावर ;
. ७ शिमोन वंशापैकी बारा हजारावर ;
. लेवी वंशापैकी बारा हजारावर ;
. इस्साखार वंशापैकी बारा हजारावर ;
. ८ जबुलून वंशापैकी बारा हजारावर ;

योसेफ वंशापैकी बारा हजारावर ;
. बन्यामीन वंशापैकी बारा हजारावर ;

९ ह्यानंतर मी पाहिले, तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक, व निरनिराळया भाषा बोलणारे, ह्यांच्यापैकी कोणाला मोजता आली नाही, असा शुभ्र झगे परिधान केलेला, व हाती झावळया घेतलेला, मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व केवेस (कोक-या) समोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला. १० ते उच्च स्वराने म्हणत होते, राजासनावर बसलेल्या आमच्या याव्हे एलोहिम कडून व केवेस (कोक-या) कडून यशाह (तारण) आहे.

११ तेंव्हा राजासन, व वडीलमंडळ, व चार प्राणी, ह्यांच्या भोवती सर्व देवदूत उभे होते. ते राजासनासमोर उपडे पडून याव्हे एलोहिमला नमन करून म्हणाले, १२ आमेन, धन्यवाद, गौरव, ज्ञान, उपकारस्तुति, सन्मान, सामर्थ्य, व बळ ही युगानुयुग आमच्या याव्हे एलोहिमची आहेत. आमेन.

१३ तेंव्हा वडीलमंडळापैकी एकाने मला म्हंटले, शुभ्र झगे परिधान केलेले हे कोण आहेत, व कोठून आले? १४ मी त्याला म्हंटले, "अदोनाई हे तुला ठाऊक आहे." तो मला म्हणाला, "मोठया संकटातून येतात, ते हे आहेत. ह्यांनी आपले झगे कोक-याच्या रक्तात धुऊन शुभ्र केले आहेत. १५ ह्यामुळे ते याव्हे एलोहिमच्या राजासनासमोर आहेत. ते अहोरात्र त्याच्या मंदिरात त्याची सेवा करितात, आणि राजासनावर बसलेला, त्यांच्यावर आपला मंडप विस्तुत करील. १६ ते ह्यापुढे भुकेले असे होणार नाहीत, व तान्हेलेहि होणार नाहीत. त्यास सूर्य, किंवा कोणतीही उष्णता बाधाणार नाही. १७ कारण राजासनापुढे मध्यभागी असलेला केवेस (कोकरा) त्यांचा राअह् (मेंढपाळ) होईल, व तो त्यांना जीवनाच्या पाण्याच्या झ-याजवळ नेईल, आणि याव्हे एलोहिम त्यांच्या डोळयाचे सर्व अश्रु पुसून टाकील."

८.१ त्याने सातवा शिक्का फोडिल्यावर, आकाशात सुमारे अर्धा तासपर्यंत निवांत झाले. २ तेंव्हा याव्हे एलोहिम समोर उभे राहिलेले सात मालाक (दूत) मी पाहिले, त्यास सात कर्णे देण्यात आले. ३ मग आणखी एक मालाक (दूत) येऊन वेदीपुढे उभा राहिला, त्याच्याजवळ झाहाब (सोन्याचे) धुपाटणे होते. आणि राजासना समोरच्या झाहाब (सोन्याच्या) मीझबेओह (वेदी) वर, सर्व क्वादोश (पवित्र) जनांच्या पालाल (प्रार्थनां) सह क्वेतोरेथ (धूप) ठेवण्याकरिता, त्याच्याजवळ पुष्कळ क्वेतोरेथ (धूप) दिला होता. ४ मालाक (दूता) ने हातातून धुपाचा धूर पवित्र जनांच्या पालाल (प्रार्थनां) सह, याव्हे एलोहिम समोर वर चढला. ५ तेंव्हा मालाक (दूत) धुपाटणे घेऊन वेदीवरचा एश (अग्नि) भरून ऐरेस्त (पृथ्वी) वर टाकिला. आणि मेघांचा गडगडाट, व गर्जना झाल्या, विजा चमकल्या, व भूमिकंप झाला. ६ मग ज्या सात याव्हे एलोहिम मालाक (देवदूतां) जवळ सात हेत्सोत्सराह (कर्णे) होते, ते आपआपले हेत्सोत्सराह (कर्णे) वाजविण्यास सिद्ध झाले.

७ पहिल्या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा रक्तमिश्रित गारा व अग्नि उत्पन्न होऊन त्यांची पृथ्वीवर वृष्टि झाली, आणि पृथ्वीचा तिसरा भाग जळून गेला. एक तृतीयांश झाडे जळून गेली, व सर्व हिरवे गवत जळून गेले.

८ दुस-या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा अग्नीने पेटलेल्या मोठया डोंगरासारखे काही तरी समुद्रात टाकिले गेले, समुद्राच्या एक तृतीयांश पाण्याचे रक्त झाले, ९ आणि समुद्रातील प्राण्यापैकी एक तृतीयांश प्राणी मरण पावले, तसेच एक तृतीयांश तारवांचा नाश झाला.

१० तिस-या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा मशालीसारखा पेटलेला मोठा तारा आकाशांतून खाली पडला, तो नद्यांच्या, व झ-यांच्या एक तृतीयांश पाण्यावर पडला. ११ त्या ता-यांचे नाव कडूदवना, आणि पाण्याच्या एक तृतीयांशाचा कडूदवना झाला. आणि त्या पाण्याने माणसांपैकी पुष्कळ माणसे मेली, कारण ते कडू झाले होते.

१२ चौथ्या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा सूर्याचा एक तृतीयांश, चंद्राचा एक तृतीयांश, व ता-यांचा एक तृतीयांश ह्यावर प्रहार झाला. त्याचा तृतीयांश अंधकारमय व्हावा, आणि दिवसाच्या तसे रात्रीच्याही प्रकाश दिसू नये, म्हणून असे झाले.

१३ मी पाहिले तेंव्हा एक गरूड अंतराळाच्या मध्यभागी उडतांना दृष्टीस पडला. त्यास मोठयाने असे म्हणतांना मी ऐकले, जे तीन देवदूत कर्णा वाजविणार आहेत, त्यांच्या कर्ण्याच्या होणा-या ध्वनीने पृथ्वीवर राहणा-या लोकांवर अनर्थ, अनर्थ, अनर्थ, येणार!

**९** .१ पाचव्या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा एक तारा आकाशांतून पृथ्वीवर पडलेला मला दिसला. त्याच्याजवळ अथांग डोहाची किल्ली देण्यात आली. २ त्याने अथांग डोह उघडिला, तेंव्हा त्यातून मोठया भट्टीच्या धुरासारखा धूर बाहेर येऊन वर चढला. आणि त्या डोहांतल्या धुराने सूर्य, व अंतराळ ही अंधकारमय झाली. ३ त्या धुरातून टोळ निघून पृथ्वीवर उतरले, त्यास पृथ्वीवरील विंचवासारखी शक्ति देण्यात आली. ४ त्यास असे सांगण्यात आले की, पृथ्वीवरील गवताला, कोणत्याही हिरवळीला, व कोणत्याही झाडाला, उपद्रव करू नका. तर ज्या माणसांच्या कपाळावर याव्हे एलोहिमचा शिक्का नाही, त्यांना मात्र उपद्रव करावा. ५ त्यांना जिवे मारण्याचे त्यांच्याकडे सोपविले नव्हते, तर फक्त पांच महिने पीडा देण्याचे सोपविले होते. त्यापासून होणारी पीडा विंचू मांणसाला नांगी मारितो, तेंव्हा त्याला होणा-या पीडेसारखी होती. ६ त्या दिवसात माणसे मरणाची संधि शोधतील, तरी ती त्यांना येणार नाही. मरावयाची उत्कंठा धरितील तरी, मरण त्यांच्यापासून दूर पळेल. ७ त्या टोळांचे स्वरूप लढाईसाठी सज्ज केलेल्या घोडयांसारखे होते. त्यांच्या डोक्यावर सोन्याच्या मुगूटासारखे काहीतरी दिसत होते, त्यांचे तोंडवळे माणसांसारखे होते. ८ त्यांचे केस स्त्रियांच्या केसांसारखे, आणि त्यांचे दात सिंहाच्या दातांसारिखे होते. ९ त्यास उरस्त्राणे होती, ती लोखंडी उरस्त्राणां सारखी दिसत होती. आणि त्यांच्या पंखांचा आवाज लढाईत धावणा-या अनेक घोडयांच्या रथांच्या आवाजासारखा होता. १० त्यास विंचवांसारिखी शेपटी, व नांग्या आहेत. आणि माणसांस पांच महिने उपद्रव करण्याची त्यांची शक्ती त्यांच्या शेपटात आहे. ११ अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे. इब्री भाषेतले त्याचे नाव अवद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतले त्याचे नाव अपल्लूओन आहे.

१२ पहिला अनार्थ होऊन गेला आहे. पाहा, ह्यानंतर आणखी दोन अनार्थ होणार आहेत.

१३ नंतर सहाव्या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा याव्हे एलोहिम समोरील सुवर्णवेदीच्या चार शिंगांमधून झालेली एक वाणी मी ऐकली. १४ कर्णा असलेल्या सहाव्या देवदूताला ती म्हणाली, "फरात महानदीवर बांधून ठेविलेले चार दूत मोकळे कर." १५ तेंव्हा माणसांपैकी एक तृतीयांश माणसे जिवे मारण्याकरिता नेमिलेली घटिका, दिवस, महिना, व वर्षे ह्यांसाठी तयार केलेले हे चार दूत मोकळे झाले. १६ घोडदळीची संख्या वीस कोटी होती, ही त्यांची संख्या मी ऐकली. १७ त्या दृष्टांतात घोडे व त्यावर बसलेले स्वार मला दिसले, ते असे त्यास अग्नि, नीळ, व गंधक, ह्यांच्या रंगाची उरस्त्राने होती. त्या घोडयांची डोकी सिंहाच्या डोक्यांसारखी होती, आणि त्यांच्या तोंडातून अग्नि, धूर, व गंधक, ही निघत होती. १८ त्यांच्या तोंडातून निघणारे अग्नि, धूर, व गंधक ह्या तीन पीडांमुळे, एक तृतीयांश माणसे जिवे मारली गेली. १९ कारण त्या घोडयांची शक्ती, त्यांच्या तोंडात व शेपटात आहे. त्यांची शेपटी सापांसारखी असून, त्यांनाही डोकी आहेत, आणि त्यांनी ते उपद्रव करितात. २० त्या पीडांमुळे जे जिवे मारले गेले नाहीत, अशा बाकीच्या माणसांनी आपल्या हातच्या कृत्यांविषयी, पश्चात्ताप केला नाही. म्हणजे अशुद्ध आत्म्यांची, व ज्यांस पाहता, ऐकता, व चालता येत नाही, असा सोन्याच्या, रूप्यांच्या, पितळेच्या, दगडांच्या, व लाकडाच्या मूर्तीची पूजा करणे, त्यांनी सोडले नाही. २१ आणि त्यांनी केलेल्या नरहत्या, चेटके, जारकर्म, व चो-या ह्यांबद्दलहि पश्चात्ताप केला नाही.

**१०** .१ मी आणखी एक बलवान याव्हे एलोहिमचा मालाक (देवदूत) आकाशातून उतरतांना पाहिला. तो मेघवेष्टित असून, त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते. त्याचे तोंड सूर्यासारखे, व त्याचे पाय अग्निस्तंभासारखे होते.२ त्याच्या हाती एक उघडलेले लहानसे पुस्तक होते. त्याने आपला उजवा पाय समुद्रावर, व डावा पाय भूमीवर ठेविला.३ आणि सिंहगर्जने प्रमाणे तो मोठयाने ओरडला, आणि तो ओरडला, तेंव्हा सात मेघगर्जनांनी आपआपले शब्द काढिले. ४ त्या सात मेघगर्जनांनी जे शब्द काढिले, तेंव्हा मी ते

लिहिणार होतो. इतक्यात आकाशातून झालेली वाणी मी ऐकली. ती म्हणाली, 'सात मेघगर्जनांनी काढिलेले शब्द गुप्त ठेव, ते लिहू नको.'

५ ज्या याव्हे एलोहिमच्या मालाक ला (देवदूताला) समुद्रावर व भुमीवर उभे राहिलेले मी पाहिले. त्याने आपल्या उजव्या हात आकाशाकडे वर केला, ६ आणि जो युगांनुयुग जिवंत आहे, ज्याने आकाशे व त्यात जे आहे ते, पृथ्वी व तिच्यावर जे आहे ते, आणि समुद्र व त्यात जे आहे ते अस्तित्वात आणले , त्याची शपथ वाहून म्हंटले, "आणखी अवकाश लागणार नाही." ७ तर सातव्या याव्हे एलोहिमच्या मालाक ची (देवदूताची) वाणी होईला, त्या दिवसांत म्हणजे तो देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेंव्हा याव्हे एलोहिमने आपले ऐवेद (दास), नव्वीईम (संदेष्टे) ह्यास सुवार्ता सांगितली तदनुसार त्याचे गूज पूर्ण होईल. ८ आकाशातून झालेली जी वाणी मी ऐकली होती, ती माझ्यावरोबर पुन्हा बोलतांना मी ऐकली. ती म्हणाली, जा आणि समुद्रावर व भूमीवर उभे राहिलेल्या याव्हे एलोहिम मालाक च्या (देवदूताच्या) हातांतले उघडलेले पुस्तक जाऊन घे. ९ तेंव्हा मी त्या देवदूताला जाऊन, ते लहानसे पुस्तक मला दे असे म्हंटले. तो मला म्हणाला, हे घे आणि खाऊन टाक. ते तुझे पोट कडू करील, तरी तुझ्या तोंडाला मधासारखे गोड लागेल. १० तेंव्हा मी देवदूताच्या हातांतून ते लहानसे पुस्तक घेतले, व खाऊन टाकले. ते माझ्या तोंडाला मधासारखे गोड लागले, तरी ते खाल्ल्यावर माझे पोट कडू झाले. ११ तेंव्हा ते मला म्हणाले, "अनेक लोक, राष्ट्र, निरनिराळया भाषा बोलणारे, व राजे ह्यांच्याविषयी तू पुन्हा संदेश दिला पाहिजे."

**११**-१ नंतर काठीसारखा एक बोरू कोणी एकाने मला दिला आणि म्हंटले, ऊठ, याव्हे एलोहिमचे हेकाल (मंदिर), मीझबेओह (वेदी), व त्यात उपासना करणारे लोक, ह्यांचे माप घे. २ तरी मंदिराबाहेरचे अंगण सोड त्याचे माप घेऊ नको, कारण ते परराष्ट्रीयांना दिले आहे, आणि ते बेचाळीस महिने क्वादोश (पवित्र) नगरी तुडवितील. ३ माझे दोन साक्षी ह्यांस मी अधिकार देईन, आणि ते तरट पांघरून एक हजार दोनशे साठ दिवस संदेश सांगतील. ४ पृथ्वीच्या अदोनाई समोर उभी असणारी जैतूनाची दोन झाडे, व दोन समया ही ते आहेत. ५ त्यास कोणी उपद्रव करू पाहिल्यास त्यांच्या तोंडातून अग्नि निघून, त्यांच्या वै-यांस खाऊन टाकितो. कोणी त्यास उपद्रव करण्याची इच्छा धरल्यास, त्याला ह्याच प्रमाणे जिवे मारण्यात यावे. ६ त्यांच्या संदेश सांगण्याच्या दिवसात पाऊस पडू नये, म्हणून आकाश बंद करावयाचा त्यास अधिकार दिलेला आहे. पाण्याचे रक्त करण्याचा अधिकार त्यांस पाण्यावर आहे, आणि वाटेल तेंव्हा पृथ्वीला सर्व पीडांनी पीडित करण्याचहि त्यास अधिकार आहे.

७ त्यांनी आपली साक्ष देणे समाप्त केल्यावर, अथांग डोहातून वर येणारे श्वापद त्यांच्याबरोबर लढाई करील, आणि त्यास जिंकून जिवे मारील. ८ आणि आध्यात्मिक दृष्टीने सदोम व मिसर म्हंटलेले असे जे मोठे नगर आणि ज्यात त्यांच्या अदोनाईला वधस्तंभावर खिळण्यात आले होते, त्याच्या रस्त्यावर त्यांची प्रेते पडून राहतील. ९ लोक, वंश, निरनिराळया भाषा बोलणारे, व राष्ट्रे, ह्यांतील लोक ती त्यांची प्रेते साडेतीन दिवस पाहतील, आणि ती कबरेत ठेवू देणार नाहीत. १० आणि त्याच्यावरून पृथ्वीवर राहणारे आनंद व उल्लास करितील, व एकमेकांस भेटी पाठवितील. कारण त्या दोघां नव्वीईम नी पृथ्वीवर राहणा-यांस पीडा दिली होती. ११ पुढे साडेतीन दिवसानंतर जीवनांचा रूहुव्वा याव्हे एलोहिम पासून येऊन त्यांच्यामध्ये शिरला. तेंव्हा ते आपल्या पायांवर उभे राहिले, आणि ज्यांनी त्यांना पाहिले त्यांना मोठे भय वाटले. १२ तेंव्हा आकाशातून निघालेली मोठी वाणी त्यांनी आपणांवरोबर बोलतांना ऐकली. ती म्हणाली, इकडे वर या. मग ते मेघारूढ होऊन त्यांच्या वै-यांच्या देखत आकाशात वर गेले. १३ त्याच घटकेस मोठा भूमिकंप झाला, तेंव्हा त्या नगराचा दहावा भाग पडला. भूमिकंपाने सात हजार माणसे ठार झाली, आणि बाकीची भयभीत होऊन, त्यांनी आकाशातील याव्हे एलोहिमचे गौरव केले.

१४ दुसरा अनर्थ होऊन गेला आहे. पाहा, तिसरा अनर्थ लवकर होणार आहे.

१५ सातव्या देवदूताने कर्णा वाजविला, तेंव्हा आकाशात मोठया वाणी झाल्या. त्या म्हणाल्या, "जगाचे राज्य आमच्या अदोनाईचे व त्यांच्या मशीहाचे झाले आहे, आणि तो युगानुयुग राज्य करील." १६ तेंव्हा याव्हे एलोहिम समोर आपल्या आसनांवर बसलेले चोवीस

वडील उपडे पडून याव्हे एलोहिमला नमन करून म्हणाले,

१७ "हे अदोनाई याव्हे एलोहिम, हे सर्वसमर्था, जो तू आहेस व होतास, तो तू आपले महान सामर्थ्य धारण केले आहे. आणि राज्यारूढ झाला आहेस, म्हणून आम्हीं तुझे आभार मानितो.१८ राष्ट्रे क्रोधाविष्ट झाली, तुझ्या क्रोधाची वेळ आली, मृतांचा न्याय करण्याची वेळ, आणि तुझे ऐवेद (दास), नव्वीईम (संदेष्टे), व तुझे पवित्र जन, व तुझ्या नांवाची भीति बाळगणारे लहानथोर, ह्यास वेतन देण्याची वेळ, आणि पृथ्वीची नासाडी करणा-यांचा नाश करण्याची वेळ आली आहे. १९ तेंव्हा याव्हे एलोहिमचे आकाशातील हेकाल (मंदिर) उघडण्यांत आले. त्याच्या हेकाल (मंदिरात) त्याच्या बेरीथ (करारा) चा अरोन (कोश) दृष्टीस पडला, आणि विजा चमकल्या, गर्जना, व मेघांचे गडगडाट झाले, भूमिकंप झाला, व मोठया गारांची वृष्टीहि झाली.

**१२**.१ नंतर शाम्माईम (आकाशात) एक मोठे चिन्ह दृष्टीस पडले. ते हे, एक ईशशाह (स्त्री ) दिसली. ती सूर्यतेज पांघरलेली होती, आणि तिच्या पायाखाली चंद्र, व तिच्या मस्तकावर बारा ता-यांचा मुगूट होता. २ ती गरोदर होती, आणि वेणा देऊन प्रसूतीच्या कष्टांनी ओरडत होती.

३ आकाशात दुसरे एक चिन्ह दृष्टीस पडले. ते हे पाहा, एक मोठा अग्निवर्ण अजगर दिसला. त्याला सात डोकी, व दहा शिंगे होती, आणि त्याच्या डोक्यांवर सात मुगूट होते. ४ त्याच्या शेपटाने आकाशातील ता-यांपैकी एक तृतीयांश तारे ओढून काढून, ते पृथ्वीवर पाडले. ती स्त्री प्रसूत होईल, तेंव्हा तिचे मूल खाऊन टाकावे, म्हणुन तो अजगर त्या प्रसवणा-या स्त्रीपुढे उभा राहिला होता. ५ सर्व राष्ट्रांवर लोखंडी दंडाने राज्य करील, असा मुलगा, म्हणजे पुसंतान ती प्रसवली, ते तिचे मूल याव्हे एलोहिम कडे, व त्याच्या राजासनाकडे वर नेण्यात आले. ६ ती स्त्री रानांत पळून गेली, तेथे तिचे एक हजार दोनशे साठ दिवस पोषण व्हावे, म्हणून याव्हे एलोहिमने तयार केलेले असे तिचे एक ठिकाण आहे.

७ मग शाम्माईम (आकाशात) लाहेम (युद्ध) सुरू झाले, मीखाएल व त्याचे मालाक (दूत) अजगरांबरोबर युद्ध करण्यास निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले. ८ तरी त्याचे काही चालले नाही, आणि आकाशात त्याचे ठिकाणहि उरले नाही. ९ मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकविणारा जो दियाबल, व सैतान म्हंटलेला आहे, जो जुनाट साप खाली टाकण्यात आला.१० तेंव्हा मी आकाशातून मोठी वाणी ऐकली. ती म्हणाली, "आता आमच्या याव्हे एलोहिमने सिद्ध केलेले यशाह (तारण), त्याचे सामर्थ्य, व त्याचे राज्य, आणि त्याच्या मशीहाचा अधिकार ही प्रगट झाली आहेत. कारण आमच्या बंधूना दोष देणारा, आमच्या याव्हे एलोहिम समोर रात्रंदिवस त्याच्यावर दोषारोप करणारा खाली टाकण्यात आला आहे. ११ त्याला त्यांनी केवेस (कोक-या) च्या देम्ये (रक्ता) मुळे, व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले, आणि त्याच्यावर मरावयाची पाळी आली, तरी त्यानी आपल्या जिवावर अहेद (प्रीति) केली नाही. १२ म्हणून शाम्माईम (आकाशां) नो, व त्यात राहणा-यांनो उल्लास करा. ऐरेस्त (पृथ्वी) व याम्मीम (समुद्र) ह्यावर अनर्थ ओढवला आहे. कारण सैतान आपला काळ थोडा आहे, हे अेळखून अतिशय संतप्त होऊन, खाली तुम्हांकडे आला आहे."

१३ आपण पृथ्वीवर टाकले गेलो आहोत, असे पाहून अजगराने पुसंतान प्रसवलेल्या स्त्रीचा पाठलाग केला. १४ त्या स्त्रीने रानांत आपल्या ठिकाणाकडे उडून जावे म्हणून, तिला मोठया गरूडाचे दोन पंख देण्यात आले होते. तेथे सर्पापासून सुरक्षित राहत असताना एक काळ, दोन काळ, व अर्धाकाळ तिचे पोषण व्हावयाचे होते. १५ मग त्या स्त्रीने वाहून जावे म्हणून, तिच्या मागोमाग त्या सर्पाने आपल्या तोंडातून नदीसारखा पाण्याचा प्रवाह सोडिला. १६ परंतु स्त्रीला भूमीने साहाय्य केले. तिने आपले तोंड उघडून, अजगराने आपल्या तोंडातून सोडिलेली नदी गिळून टाकिली. १७ तेंव्हा अजगर स्त्रीवर रागवला, आणि याव्हे एलोहिमच्या आज्ञा पाळणारे, व येशूवाह विषयी साक्ष देणारे, तिच्या संतानापैकी बाकीचे जे लोक होते, त्यांच्याबरोबर लढाई करण्यास तो निघून गेला १८ आणि तो समुद्राच्या वाळूत उभा राहिला.

**१३** -१ नंतर मी एक श्वापद समुद्रातून वर येताना पाहिले - त्याला दहा शिंगे, व सात डोकी असून त्याच्या शिंगावर दहा मुगूट, आणि त्याच्या डोक्यांवर याव्हे एलोहिम निंदात्माक नांवे होती - २ जे श्वापद मी पाहिले ते चित्त्यासारखे होते, त्याचे पाय अस्वलाच्या पायांसारखे होते, व त्याचे तोंड सिंहाच्या तोंडासारखे होते - त्याला अजगराने आपली शक्ती, आपले आसन, व मोठा अधिकार दिला - ३ त्याच्या एका डोक्यावर प्राणघातक घाव झाल्यासारखे माझ्या दृष्टीस पडले - तरी त्याचा प्राणघातक घाव बरा झाला, तेंव्हा सर्व पृथ्वीवरील लोक आश्चर्य करीत, त्या श्वापदाच्या मागे गेली - ४ अजगरानें त्या श्वापदाला आपला अधिकार दिला, म्हणून त्यानी अजगराला नमन केले - आणि ते श्वापदाला नमन करतांना म्हणाले, 'ह्या श्वापदासारखा कोण आहे? ह्याच्यावरोबर कोणाला लढता येईल?' ५ त्याला मोठमोठया व एलोहिम निंदात्माक गोष्टी बोलणारे तोंड देण्यात आले - व बेचाळीस महिने त्याला आपले काम चालविण्याची मुभा देण्यात आली - ६ त्याने याव्हे एलोहिम विरूद्ध निंदा करण्यास, अर्थात त्याचे नाव, व त्याचा मंडप म्हणजे, आकाशातील निवासी लोक ह्यांची निंदा करण्यास तोंड सोडिले - ७ क्वादोश (पवित्र) जनांबरोबर लढण्याची, व त्यास जिंकण्याची, त्याला मुभा देण्यात आली - आणि सर्व वंश, लोक, निरनिराळया भाषा बोलणारे, व राष्ट्रे ह्यावर त्याला अधिकार देण्यात आला - ८ ज्या कोणाची नावे, जगाच्या स्थापनेपासून वधलेल्या कोक-याजवळील जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेली नाहीत - असे पृथ्वीवर राहणारे सर्व जण, त्या श्वापदाला नमन करितील -

९ ज्या कोणाला कान आहेत, तो ऐको - १० जो कैदेत जावयाचा तो कैदेत जातो, जो तरवारीने जिवे मारील, त्याला तरवारीने मरणे भाग आहे - ह्यावरून पवित्र जनांचा धीर, व विश्वास दिसून येतो -

११ नंतर मी दुसरे एक श्वापद भूमीतून वर येताना पाहिले - त्याला कोकरासारखी दोन शिंगे होती, ते अजगरासारखे बोलत होते - १२ ते पहिल्या श्वापदाचा सर्व अधिकार त्याच्यासमक्ष चालविते, आणि ज्या पहिल्या श्वापदाचा प्राणघातक घाव बरा झाला होता, त्याला पृथ्वीने व तिच्यावर राहणा-या लोकांनी नमन करावे असे करिते - १३ ते मोठी चिन्हे करिते, माणसांसमक्ष आकाशातून पृथ्वीवर अग्नि पडावा, असे देखील करिते - १४ जी चिन्हे त्या श्वापदासमक्ष करण्याचे त्याच्याकडे सोपविले होते, त्यावरून ते पृथ्वीवर राहणा-यांना ठकविते - म्हणजे तरवारीचा घाव लागला असताहि जिवंत राहिलेल्या श्वापदासाठी मूर्ती करण्यास, पृथ्वीवर राहणा-यांना ते सांगते - १५ त्या श्वापदाच्या मूर्तीला प्राण घालण्याची त्याला मुभा देण्यात आली - ह्यासाठी की, श्वापदाच्या मूर्तीने बोलावे, आणि जे कोणी त्या श्वापदाच्या मूर्तीला नमन करणार नाहीत, ते जिवे मारिले जावेत असे त्याने घडवून आणावे - १६ लहानथोर, धनवान, दरिद्री, स्वतंत्र, व दास, ह्या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर, किंवा आपल्या कपाळावर खूण करून घ्यावी - १७ आणि ज्यांच्यावर ती खूण, म्हणजे त्या श्वापदाचे नाव किंवा, नावाने दर्शविलेली संख्या आहे - त्यांच्याशिवाय कोणाला काहीहि विकत घेता येऊ नये, किंवा विकत देता येऊ नये, असे ते श्वापद करिते - १८ येथे अकलेचे काम आहे, ज्याला बुद्धि आहे, त्याने श्वापदाचे नाव त्या संख्येवरून काढावे - त्या संख्येवरून माणसाचा बोध होतो, ती त्याची संख्या सहाशे सहासष्ट होय -

**१४** -१ नंतर मी पाहिले, तो पाहा केबेस (कोकरा) त्सियोन डोंगरावर उभा राहिलेला दृष्टीस पडला - त्याच्यावरोबर त्याचे नाव, व त्याच्या याव्हे अब्बाचे नाव कपाळांवर लिहिलेले, एक लक्ष चव्वेचाळीस हजार इसम होते - २ आणि अनेक जलप्रवाहांच्या ध्वनीसारखी, व प्रचंड मेघगर्जनेच्या ध्वनीसारखी, आकाशातून निघलेली वाणी मी ऐकली - आणि जी वाणी मी ऐकली, ती जसे काय वीणा वाजविणारे आपल्या वीणा वाजवीत आहेत, अशी होती - ३ ते राजासनांसमोर, आणि चार प्राणी, व वडील ह्यांच्यासमोर जसे काय, एक नवे गीत गात होते - ते गीत पृथ्वीवरून विकत घेतलेले, एक लक्ष चव्वेचाळीस हजार लोक ह्यांच्याशिवाय कोणाला शिकता येत नव्हते - ४ स्त्रीसंगाने मलिन न झालेले, ते हे आहेत, ते हेच आहेत - ते शुद्ध आहेत - जेथे काठे केबेस (कोकरा) जातो, तेथे त्याच्यामागे जाणारे ते हे आहेत - ते याव्हे एलोहिम साठी, व केबेस (कोक-यां) साठी प्रथम फळ असे, माणसातून विकत घेतलेले आहेत - ५ त्यांच्या तोंडात असत्य आढळले नाही, ते निष्कलंक आहेत -

६ नंतर मी दुसरा एक एलोहिम मालाक (देवदूत) राक्वीआ (अंतराळाच्या) मध्यभागी उडतांना पाहिला त्याच्याजवळ पृथ्वीवर

राहणा-यांस म्हणजे प्रत्येक राष्ट्र, वंश, निरनिराळया भाषा बोलणारे लोक, ह्यास सांगावयास सार्वकालिक सुवार्ता होती. ७ तो मोठयाने म्हणाला, याव्हे एलोहिमची भीति बाळगा, व त्याचे गौरव करा. कारण न्यायनिवाडा करावयाची त्याची घटिका आली आहे. ज्याने शाम्माईम (आकाश) ऐरेस्त (पृथ्वी) याम्मीम (समुद्र) व माईम नेबेक (पाण्याचे झरे) बारअ् ( निर्माण) केले त्याला नमन करा.

८ त्या एलोहिम मालाक (देवदूतां) मागून, दुसरा देवदूत येऊन म्हणाला, पडली मोठी बाबेल पडली. जिने आपल्या जारकर्माबद्दलचा क्रोधरूपी द्राक्षारस, सर्व राष्ट्रांना पाजिला आहे.९ त्याच्यामागून तिसरा देवदूत येऊन मोठयाने म्हणाला, जो कोणी श्वापदाला, व त्याच्या मूर्तीला नमन करितो. आणि आपल्या कपाळावर, किंवा आपल्या हातावर त्याची खूण करून घेतो. १० तोहि याव्हे एलोहिमच्या क्रोधाच्या प्याल्यांत निरा घातलेला, त्याचा क्रोधरूपी द्राक्षारस पिईल, आणि क्वादोश मालाक (पवित्र देवदूतां) समक्ष व केवेस (कोक-या) समक्ष एश (अग्नि) व गोफरीथ (गंधक) ह्यांपासून पीडा होईल. ११ त्याच्या पीडेचा धूर युगानुयुग वर येतो आणि जे श्वापदाला त्याच्या मूर्तीला नमन करितात, त्यांस आणि जे कोणी त्याच्या नावाची खूण धारण करून घेतो, त्यास रात्रंदिवस विश्रांति मिळत नाही.

१२ याव्हे एलोहिमच्या आज्ञा पाळणारे, व येशूवाह वरील विश्वासाला धरून राहणारे, क्वादोश (पवित्र) जन ह्यांचे धीर धरण्याचे अगत्य ह्यांतच आहे. १३ तेंव्हा आकाशातून झालेली वाणी मी ऐकली. ती म्हणाली लिही, अदोनाई मध्ये मरणारे आतांपासून आशिर्वादीत आहेत. रूहुव्वा (आत्मा) म्हणतो, खरेच आपल्या कष्टांपासून सुटून, त्यांना विसावा मिळेल. त्यांची कृत्ये तर त्यांच्याबरोबर जातात.

१४ नंतर मी पाहिले, तेंव्हा पांढरा मेघ, व त्या मेघावर बसलेला मनुष्याच्या मुलासारखा, कोणी एक दृष्टीस पडला. त्याच्या मस्तकावर सोन्याचा मुगूट, व त्याच्या हाती तीक्ष्ण धारेचा विळा होता. १५ तेंव्हा आणखी एक देवदूत मंदिरांतून निघून, जो मेघांवर बसलेला होता. त्याला उच्च वाणीने म्हणाला, तू आपला विळा चालवून कापणी कर. कारण कापणीची वेळ आली आहे. पृथ्वीचे पीक पिकून गेले आहे. १६ तेंव्हा मेघांवर बसलेल्या पुरूषाने आपला विळा पृथ्वीवर चालविला, आणि पृथ्वीची कापणी झाली.

१७ मग आणखी एक देवदूत आकाशातील मंदिरांतून निघाला, त्याच्याजवळहि तीक्ष्ण धारेचा विळा होता. १८ ज्याला अग्नीवर अधिकार आहे, असा दुसरा एक देवदूत निघाला. त्याने ज्याच्याजवळ तीक्ष्ण धारेचा विळा होता. त्याला उच्च वाणीने म्हंटले, तू आपला तीक्ष्ण धारेचा विळा चालवून, पृथ्वीच्या द्राक्षीचे घड तोडून घे. तिची द्राक्षे पिकली आहेत. १९ तेंव्हा त्या देवदूताने आपला विळा पृथ्वीवर चालविला, आणि पृथ्वीच्या द्राक्षीचे घड तोडून, याव्हे एलोहिमच्या क्रोधाच्या मोठया द्राक्षकुंडात टाकिले. २० ते द्राक्षकुंड नगराबाहेर तुडविले गेले. त्यातून रक्त वाहिले, त्याचा प्रवाह घोडयांच्या लगामांस पोहोचेल इतका असून, तो शंभर कोसा पर्यंत (दोनशे मैलापर्यंत) वाहत गेला.

**१५**.१ नंतर मी अत्यंत आश्चर्यकारक असे दुसरे चिन्ह आकाशात पाहिले. सात पिडा घेतलेले, सात देवदूत दृष्टीस पडले. त्या पीडा शेवटच्या होत्या, कारण त्यांच्यायोगे याव्हे एलोहिमचा क्रोध पूर्ण झाला. २ मग अग्निमिश्रित काचेचा समुद्रासारखे, काही तरी माझ्या दृष्टीस पडले. श्वापदावर, त्याच्या मूर्तीवर, व त्याच्या नामसंख्येवर, जय मिळविलेले लोक, हातांत याव्हे एलोहिमच्या वीणा घेऊन त्या काचेच्या समुद्रांवर उभे राहिलेले माझ्या दृष्टीस पडले. ३ ते याव्हे एलोहिमचा दास मोशे ह्याचे गीत व केवेस चे (कोक-याचे) गीत गाताना म्हणतात,

“हे अदोनाई, याव्हे एलोहिम हे सर्वसमर्थ्या तुझी कृत्ये थोर, व आश्चर्यकारक आहेत. हे राष्ट्राधिपते, तुझे मार्ग नीतिचे व सत्य आहेत.४ हे अदोनाई तुला कोण भिणार नाही? तुझ्या नावाला कोण महिमा देणार नाही? कारण तूच मात्र क्वादोश (पवित्र) आहेस. आणि तुझी न्यायकृत्ये प्रगट झाली आहेत. म्हणून सर्व राष्ट्रे तुझ्यासमोर येऊन तुला नमन करितील.”

५ नंतर मी पाहिले, तेंव्हा साक्षीच्या मंडपाचे आकाशातील मंदिर उघडले. ६ आणि स्वच्छ, व तेजस्वी तागाची झगे परिधान केलेले, व छातीवरून सोन्याचा पट्टा बांधलेले, असे सात पीडा घेतलेले, ते सात देवदूत त्या मंदिरांतून निघाले.७ त्या चार प्राण्यांपैकी एकाने युगानुयुग जिवंत असणा-या याव्हे एलोहिमच्या क्रोधाने भरलेल्या सोन्याच्या सात वाटया, त्या सात देवदूतास दिल्या. ८ तेंव्हा याव्हे एलोहिमचे तेज, व पराक्रम ह्यांपासून निघालेल्या धूराने मंदिर भरून गेले, आणि त्या सात देवदूतांच्या सात पीडा संपेपर्यंत, कोणालाहि मंदिरात जाता आले नाही.

**१६** .१ नंतर मी मंदिरांतून निघालेली एक मोठी वाणी ऐकली. ती त्या सात देवदूतास म्हणाली, "जा, याव्हे एलोहिमच्या क्रोधाच्या सात वाटया पृथ्वीवर ओता."

२ तेंव्हा पहिल्याने जाऊन आपली वाटी पृथ्वीवर ओतली. तेंव्हा त्या श्वापदाची खूण धारण केलेल्या, आणि त्याच्या मूर्तीला नमन करणा-या लोकास वाईट व घाणेरडे फोड आले.

३ दुस-याने आपली वाटी समुद्रात ओतली. तेंव्हा समुद्र मृताच्या रक्तासारखा रक्तमय झाला, आणि त्यातील सर्व प्राणी मरून गेले.

४ तिस-याने आपली वाटी नद्या, व पाण्याचे झरे, ह्यात ओतली, आणि त्याचे रक्त झाले ५ तेंव्हा मी जलाच्या देवदूताला असे बोलतांना ऐकले. "जो तू आहेस व होतास, जो तू क्वादोश (पवित्र) आहेस. त्या तू असा न्यायनिवाडा केला, म्हणून तू न्यायी आहेस. ६ कारण त्यांनी क्वादोश (पवित्र) जनाचे व नव्बीईम चे (संदेष्टयांचे) रक्त पाडिले, आणि तू त्यास रक्त प्यावयास लाविले आहे, ह्यास ते पात्र आहेत."

७ नंतर मी वेदीला असे बोलतांना ऐकले. " हो हे अदोनाई, हे सर्वसमर्थ्या, तुझे न्याय सत्य ही नीतीचे आहेत."

८ चौथ्याने आपली वाटी सूर्यावर ओतली, आणि सूर्याला अग्नीच्या योगे माणसांना, करपवून टाकण्याची मुभा देण्यात आली. ९ माणसे कडक उन्हाने करपून गेली. तेंव्हा त्या पीडांवर ज्याला अधिकार आहे, त्या याव्हे एलोहिमच्या नांवाची निंदा त्यांनी केली. आणि याव्हे एलोहिमचे गौरव करण्यासाठी, त्यांनी पश्चात्ताप केला नाही.

१० पाचव्याने आपली वाटी श्वापदाच्या आसनांवर ओतली. तेंव्हा त्याचे राज्य अंधकारमय झाले, आणि लोकांनी आपल्या जिभा चाविल्या. ११ आपल्या वेदनांमुळे, व आपल्या फोडांमुळे, त्यांनी आकाशातील याव्हे एलोहिमची निंदा केली, आणि आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप केला नाही.

१२ सहाव्याने आपली वाटी फरात महानदीवर ओतली. तेंव्हा सूर्याच्या उगवतीपासून येणा-या राजांची वाट सिद्ध व्हावी, म्हणून त्याचे पाणी आटून गेले.

१३ नंतर बेडकांसारखे असलेले तीन अशुद्ध आत्मे, अजगराच्या तोंडातून, श्वापदाच्या तोंडातून, व खोटया संदेष्टयाच्या तोंडातून निघताना मी पाहिले. १४ ते चिन्हे दाखविणारे अशुद्ध आत्मे आहेत. ते सर्वसमर्थ याव्हे एलोहिमच्या त्या मोठया दिवसाच्या लढाई साठी, संपूर्ण जगांतील राजांस एकत्र करावयास त्यांच्याकडे बाहेर जातात.

१५ पाहा जसा चोर येतो, तसाच मी येईन. आपण नग्न असे चालू नये, व आपली लाज लोकांस दिसू नये, म्हणून जो जागृत राहतो, व आपला झगा राखतो, तो आशिर्वादीत.१६ त्यांनी त्यांना इब्री भाषेत हर्मगिदोन म्हंटलेल्या ठिकाणी एकत्र केले.

१७ सातव्याने आपली वाटी अंतराळांत ओतली. तेंव्हा मोठी वाणी मंदिरातून राजासनांपासून निघाली. ती म्हणाली, 'झाले.' १८ तेंव्हा विजा चमकल्या गर्जना व मेघांचे गडगडाट झाले शिवाय इतका मोठा भूमिकंप झाला की, पृथ्वीवर मानव झाल्यापासून इतका

मोठा भूमिकंप कधी झाला नव्हता. १९ मोठया नगरीचे तीन विभाग झाले, राष्ट्रांची नगरे कोसळली, तेंव्हा याव्हे एलोहिमने आपला तीव्र कोधरूपी द्राक्षारसाचा प्याला मोठया बाबेल नगरीला द्यावा, म्हणून त्याच्या समोर तिचे स्मरण करण्यात आले. २० प्रत्येक बेट पळून गेले, आणि डोंगरांचा ठावठिकाणाहि राहिला नाही. २१ सुमारे एक मण वजनाच्या मोठया गारा आकाशातून माणसांवर पडल्या. तेंव्हा गारांच्या पीडेमुळे लोकांनी याव्हे एलोहिमची निंदा केली, कारण त्या गारांची पीडा अतिभयंकर होती.

**१७** .१ नंतर सात वाटया घेतलेल्या सात देवदूतांपैकी एक जण येऊन माझ्याबरोबर बोलू लागला. तो म्हणाला, “इकडे ये, म्हणजे अनेक जलप्रवाहांवर बसलेल्या मोठया कलावतिणीचा झालेला न्यायनिवाडा तुला दाखवितो.” २ तिच्याबरोबर पृथ्वीवरील राजांनी जारकर्म केले, आणि तिच्या जारकर्मरूपी द्राक्षारसाने पृथ्वीवर राहणारे मस्त झाले. ३ मग त्याने मला आत्म्यात रानामध्ये नेले. तेंव्हा एलोहिम निंदात्मक नावांनी भरलेल्या, आणि सात डोकी, व दहा शिंगे असलेल्या किरमिजी रंगाच्या श्वापदावर बसलेली, एक स्त्री माझ्या दृष्टीस पडली. ४ ती स्त्री जांभळी, व किरमिजी वस्त्रे ल्याली होती. आणि सोने, मूल्यवान रत्न, व मोत्ये ह्यांनी शुंगारलेली होती. तिच्या हातात अमंगळ पदार्थांनी, आणि तिच्या जारकर्मांच्या मळाने भरलेला सोन्याचा प्याला होता. ५ तिच्या कपाळावर मोठी बाबेल, कलावंतिणीची व पृथ्वीवरील अमंगळ पणांची आई, हे गूढ अर्थाचे नांव लिहिलेले होते. ६ ती स्त्री पवित्र जनांच्या रक्ताने, व येशूवाह च्या साक्षीच्या रक्ताने मस्त झालेली, माझ्या दृष्टीस पडली. तिला पाहून मला फार आश्चर्य वाटले.

७ देवदूताने मला म्हंटले, तुला आश्चर्य का वाटले. ती स्त्री, आणि सात डोकी, व दहा शिंगे असलेले तिला वाहून नेणारे श्वापद ह्यांचा गूढ अर्थ मी तुला सांगतो. ८ जे श्वापद तू पाहिले ते होते, आणि नाही. ते अथांग डोहांतून वर येणार आहे, व नाशाप्रत जाणार आहे. पृथ्वीवर राहणारे लोक ज्यांची नांवे जीवनाच्या पुस्तकात पृथ्वीच्या स्थापनेपासून लिहिलेली नाहीत, ते जेंव्हा श्वापदाला पाहतील, तेंव्हा आश्चर्यचकित होतील. कारण तो पूर्वी होता, आता तो नाही, आणि तरी तो येईल. ९ यासाठी ज्ञानपूर्ण असलेल्या बुद्धीची आवश्यकता आहे. ती सात डोकी, म्हणजे सात डोंगरे आहेत. त्यावर ती स्त्री बसली आहे. १० आणि ती सात डोकी, म्हणजे सात राजे आहेत. त्यापैकी पाच पडले आहेत, एक आहे, आणि एक अद्याप आले नाही. तो आल्यावर त्याला थोडा वेळ राहावे लागेल. ११ जे श्वापद होते, आणि नाही, तोच आठवा राजा आहे. तो त्या सातांपासून झालेला आहे, आणि तो नाशाप्रत जाणार आहे. १२ जी दहा शिंगे तू पाहिली, ती दहा राजे आहेत. त्यांना अद्यापि राज्य मिळाले नाही. तरी त्यांना श्वापदाबरोबर एक तास राजांच्या सारखा अधिकार मिळतो. १३ ते एकविचाराचे आहेत, आणि ते आपले सामर्थ्य, व अधिकार श्वापदाला देतात. १४ हे कोक-याबरोबर लढतील, परंतु कोकरा त्यास जिंकील. कारण तो अदोनाईचा अदोनाई, आणि राजांचा राजा आहे. आणि जे त्याच्याबरोबर आहेत, ते पाचारण केलेले, निवडलेले, व विश्वासू आहेत.

१५ आणखी तो मला म्हणाला, जेथे कलावंतीण बसली आहे. तेथे जे जलप्रवाह तू पाहिले, ते लोक, जनसमूह, राष्ट्रे, व निरनिराळया भाषा बोलणारे असे आहेत. १६ जी दहा शिंगे, व जे श्वापद तू पाहिले, ती कलावंतिनीचा व्देष करितील, व तिला ओसाड, व नग्न करितील. तिचे मांस खातील, व तिला अग्नीत जाळून टाकतील. १७ त्यांनी एकविचाराने वागून याव्हे एलोहिमची वचने पूर्ण होईपर्यंत, आपले राज्य श्वापदाला द्यावे, अशा हेतूने कामे करण्याचे, याव्हे एलोहिमने त्यांच्या मनांत घातले. १८ जी स्त्री तू पाहिली, ती पृथ्वीवरच्या राजांवर राज्य करणारी मोठी नगरी होय.

**१८** .१ त्यानंतर मी दुस-या एका देवदूताला आकाशातून उतरताना पाहिले. त्याला मोठा अधिकार होता, आणि त्याच्या तेजाने पृथ्वी प्रकाशित झाली. २ तो जोरदार वाणीने म्हणाला, पडली मोठी बाबेल पडली, ती अशुद्ध आत्म्यांची वस्ती, व सर्व प्रकारच्या अशुद्ध आत्म्यांचा आश्रय, व सर्व प्रकारच्या अशुद्ध, व अमंगळ पाखरांचा आश्रय अशी झाली आहे. ३ कारण तिच्या जारकर्माबद्दलचा कोधरूपी द्राक्षारस सर्व राष्ट्रे प्याली आहेत. पृथ्वीवरील राजांनी तिच्याबरोबर जारकर्म केले, व पृथ्वीवरील व्यापारी, तिने आपल्या विषयभोगास खर्चिलेल्या द्रव्यबळाने धनवान झाले.

४ मग आकाशातून निघालेली दुसरी एक वाणी मी ऐकली. ती म्हणाला, माझ्या लोकांनो तुम्हीं तिच्या पापांचे वाटेकरी होऊ नये,
आणि तुम्हांला तिच्या पीडातील कोणतीहि पीडा होऊ नये, म्हणून तिच्यामधून निघा. ५ कारण तिच्या पापांची रास आकाशापर्यंत
पोहंचली आहे. आणि तिची अनीति याव्हे एलोहिमने लक्षात घेतली आहे. ६ जसे तिने दिले, तसे तिला द्या. तिच्या कर्माप्रमाणे
तिला दुप्पट द्या. तिने प्याल्यांत जितके ओतिले, त्याच्या दुप्पट तुम्हीं त्यात ओता. ७ ज्या मानाने तिने आपले गौरव केले, व
विषयभोग घेतला, त्या मानांने तिला पीडा, व दुःख द्या. कारण ती आपल्या मनांत म्हणते, मी राणी होऊन बसले आहे, मी काही
विधवा नाही, मी दुख पाहणारच नाही.८ ह्यांमुळे तिच्या पीडा म्हणजे मरण, दुःख, व दुष्काळ एका दिवशीच येतील, आणि ती
अग्नीत जाळून टाकली जाईल. कारण तिचा न्यायनिवाडा करणारा अदोनाई, याव्हे एलोहिम सामर्थ्यवान आहे. ९ पृथ्वीवरील ज्या
राजांनी तिच्या बरोबर जारकर्म व विलास केला, ते तिच्या पीडेच्या भयामुळे दूर उभे राहून, तिच्या जळण्याचा धूर पाहतील. तेंव्हा
तिच्याकरिता रडतील, व ऊर बडवून घेतील. १० ते म्हणतील, अरेरे! बाबेल ही मोठी नगरी होती! बलाढय नगरी होती! एका
घटकेस तुला न्यायदंड झाला आहे. ११ पृथ्वीवरील व्यापारी तिच्यासाठी रडतात, व शोक करितात, कारण त्यांचा माल आता कोणी
विकत घेत नाही. १२ सोने, रूपे, मोलवान रत्ने, मोत्ये, तागाची तलम कापड, जांभळया रंगाचे कापड, रेशमी कापड, किरमिजी रंगाचे
कापड, सर्व प्रकारची सुगंधी लाकडे, सर्व प्रकारची हस्तिदंती पात्रे, सर्व प्रकारची अति मोलवान लाकडाची, पितळेची, लोखंडाची, व
संगमरवरी पाषाणाची पात्रे, १३ दालचिनी, सुगंधी उटणी, धूपद्रव्ये, सुगंधी तेल, ऊद, द्राक्षारस, जैतूनाचे तेल, सपीठ, गहू, गुरे, मेंढरे,
घोडे, रथ, गुलाम, व मनुष्याचे जीव, हा त्यांचा माल कोणी घेत नाही. १४ ज्या फळफळावळीची तुझ्या जिवाला चटक लागली आहे,
ती तुझ्यापासून गेली आहे. आणि मिष्टान्ने, व विलासाचे पदार्थ हे सर्व तुझ्यापासून नाहीसे झाले आहेत, ते पुढे कोणाला मिळणारच
नाहीत. १५ तिच्या योगाने धनवान झालेले, त्या पदार्थांचे व्यापारी रडत, व शोक करीत, तिच्या पीडेच्या भयामुळे दूर उभे राहतील,
१६ आणि म्हणतील, अरेरे! पाहा, ही मोठी नगरी तागाची बारीक वस्त्रे, जांभळी, व किरमिजी वस्त्रे पांघरलेली, सोने, मोलवान रत्ने,
व मोत्ये ह्यांनी शृंगारलेली नगरी! १७ एका घटकेस ह्या इतक्या संपत्तीची राखरांगोळी झाली. सर्व तांडेल गलबतांवरून, बंदरोबंदरी
जाणारे सर्व, आणि खलाशी, व समुद्रावर जितके उद्योगधंदा करणारे होते, तितके दूर उभे राहिले. १८ आणि तिच्या जळण्याचा धूर
पाहून ते आक्रोश करीत म्हणाले, ह्या मोठया नगरी सारखी कोणती नगरी आहे? १९ त्यांनी आपल्या डोक्यांत धूळ घातली, आणि
रडत शोक करीत, व अक्रोश करीत म्हंटले, अरेरे, जिच्या धनसंपत्तीने समुद्रातील, गलबतांचे सगळे मालक श्रीमंत झाले, ती मोठी
नगरी! तिची एका घटकेस राखरांगोळी झाली!

२० हे आकाशा, अहो पवित्र जनांनो, प्रेषितांनो, संदेष्टयांनो, तिच्याविषयी आनंद करा. कारण याव्हे एलोहिमने तिला दंड करून,
तुम्हांला न्याय दिला आहे.२१ नंतर एका बलवान देवदूताने जात्याच्या मोठया तळीसारखा धोंडा उचलिला, आणि तो समुद्रात
भिरकावून म्हंटले, अशीच ती मोठी नगरी बाबेल झपाटयाने टाकली जाईल, व ह्यापुढे कधीहि सापडणार नाही. २२ वीणा
वाजविणारे, गवई, पावा वाजविणारे, व कर्णा वाजविणारे, ह्यांचा नाद तुझ्यात ह्यापुढे ऐकूच येणार नाही. कसल्याहि कारागिरीचा,
कोणताहि कारागीर तुझ्यात सापडणारच नाही, आणि जात्यांचा आवाज तुझ्यात, ह्यापुढे ऐकूच येणार नाही. २३ दिव्याचा उजेड
तुझ्यात ह्यापुढे दिसणारच नाही, आणि नवरानवरीचा शब्द तुझ्यात ह्यापुढे ऐकू येणारच नाही, तुझे व्यापारी पृथ्वीवरील थोर लोक
होते. आणि सर्व राष्ट्रे तुझ्या चेटकाने ठकविली गेली. २४ तिच्यामध्ये नव्वीईल चे (संदेष्टयांचे), पवित्र जनांचे, व पृथ्वीवर
वधलेल्या सर्वांचे रक्त सापडले.

१९.१ त्यानंतर आकाशातील मोठया जनसमुदायाची जशी काय एक मोठी वाणी मी ऐकली. ती म्हणाली, "हाललू याह! यशाह
(तारण), गौरव, व सामर्थ्य, ही आमच्या याव्हे एलोहिमची आहेत. २ कारण त्याचे न्यायनिर्बंध सत्याचे, व नीतीचे आहेत. ज्या
मोठया कलावंतिणीने आपल्या जारकर्माने पृथ्वी भ्रष्ट केली, तिचा न्यायनिवाडा त्याने केला आहे, आणि आपल्या दासांच्या रक्ताबद्दल
तिचा सूड घेतला आहे."

३ ते दुस-यांदा म्हणाले, “हाललू याह!” तिचा धूर युगानुयुग वर चढत आहे. ४ तेंव्हा ते चोवीस वडील व ते चार प्राणी उपडे पडून राजासनांवर बसलेल्या याव्हे एलोहिमला नमन करतांना म्हणाले, “आमेन, हाललू याह! ५ इतक्यात राजासनापासून वाणी झाली. ती म्हणाली, “अहो आमच्या याव्हे एलोहिमची भीती बाळगणा-या सर्व लहानथोर दासांनो, त्याचे स्तवन करा.” ६ तेंव्हा जणू काय मोठया समुदयांची वाणी, अनेक जलप्रवाहाचा ध्वनि, व प्रचंड मेघगर्जनांचा ध्वनि, मी ऐकला. तो म्हणाला, “हाललू याह! कारण सर्व समर्थ आमचा अदोनाई, याव्हे एलोहिम ह्याने राज्य हाती घेतले आहे. ७ आपण आनंद व उल्लास करू, व त्याचे गौरव करू. कारण केवेस चे (कोक-याचे) लग्न निघाले आहे. आणि त्याच्या नवरीने स्वतःला सजविले आहे. ८ तिला तेजस्वी व शुद्ध असे तागाचे तलम वस्त्र नेसावयाला दिले आहे. ते तागाचे तलम वस्त्र म्हणजे, क्वादोश (पवित्र) जनांची नीतिकृत्ये आहेत. ९ तेंव्हा तो मला म्हणाला, हे लिही की, केवेस (कोक-या) च्या मेजवानीस बोलविलेले, ते आशिर्वादीत आहे. तो मला असेहि म्हणाला, ही याव्हे एलोहिमची सत्यवचने आहेत.१० तेंव्हा मी त्याच्या पाया पडून नमन करणार होतो. परंतु तो मला म्हणाला, असे करू नये. मी तुझ्या सोबतीचा, आणि जे येशूवाह विषयीची साक्ष देतात, त्या तुझ्या बंधूचा सोबतीचा दास आहे. नमन याव्हे एलोहिमला कर, कारण येशूवाह विषयीची साक्ष, हे संदेशाचे रूहुवा (आत्मा) आहे.

११ नंतर मी आकाश उघडलेला पाहिला. तो पाहा, एक पांढरा घोडा आणि विश्वासनीय, व सत्य असा म्हंटलेला, एक स्वार त्याच्यावर बसलेला मला दिसला. तो नीतीने न्यायनिवाडा करितो, व लढतो. १२ त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे आहेत, व त्याच्या डोक्यावर पुष्कळ मुगूट आहेत. त्याच्यावर एक नांव लिहिलेले आहे, ते त्याच्यावाचून कोणालाहि कळत नाही. १३ रक्तात बुचकळलेले झगा त्याने अंगावर घातलेला होता, आणि याव्हे एलोहिमचा शब्द (मशीहा) हे नाव त्याला देण्यात आले होते. १४ आकाशातील सैन्ये पांढ-या रंगाच्या घोडयांवर बसून, पांढरी व शुद्ध अशी तागाचे तलम झगे, अंगावर घालून त्याच्यामागे चालत होती. १५ त्याने राष्ट्रांस मारावे, म्हणून त्याच्या तोंडातून तीक्ष्ण धारेची तरवार निघते. तो लोखंडी दंडाने अधिकार गाजवील, आणि सर्वसमर्थ याव्हे एलोहिम ह्याच्या तीव्र क्रोधरूपी द्राक्षारसाचे कुंड तो तुडवितो. १६ त्याच्या झग्यावर, व त्याच्या मांडीवर मेलामिक चा मेलेक (राजांचा राजा), आणि अदोनाई चा अदोनाई हे नांव लिहिलेले आहे.

१७ नंतर मी एक एलोहिम मालाक (देवदूतास) सूर्यात उभे राहिलेले पाहिले. तो राक्वीअ् (अंतराळा) तील मध्यभागी उडणा-या सर्व पांखरास उच्च वाणीने म्हणाला, या याव्हे एलोहिमच्या मोठया जेवणावळीसाठी एकत्र व्हा.१८ राजांचे मांस, सरदाराचे मांस, बलवानाचे मांस, घोडयांचे मांस, व त्यावरील स्वारांचे मांस, आणि स्वतंत्र, व दास लहानमोठे अशा सर्वांचे मांस खावयास या. १९ तेंव्हा ते श्वापद पृथ्वीवरील राजे, व त्यांची सैन्ये, ही घोडयावर बसलेल्या स्वाराबरोबर, व त्याच्या सैन्याबरोबर लढाई करावयास एकत्र झालेली, मी पाहिली. २० मग श्वापद धरिले गेले, आणि त्यांच्याबरोबर खोटा संदेष्टाहि धरिला गेला. त्याने श्वापदाची खूण धारण केलेल्या, व त्याच्या मूर्तीला नमन करणा-या लोकांस, त्यांच्यासमोर चिन्हे करून ठकविले होते, ह्या दोघांना जळत्या गंधकाच्या अग्निसरोवरात जिवंत टाकण्यांत आले. २१ बाकीचे लोक घोडयावर बसलेल्या स्वाराच्या तोंडातून निघालेल्या तरवारीने मारिले गेले, आणि त्यांच्या मांसाने सर्व पाखरे तृप्त झाली.

**२०**.१ नंतर मी एक देवदूताला आकाशातून उतरतांना पाहिले. त्याच्याजवळ अथांग डोहाची किल्ली होती, व त्याच्या हाती एक मोठा साखळदंड होता.२ त्याने दियाबल व सैतान म्हंटलेला जुनाट साप, म्हणजे तो अजगर, ह्यास धरिले. आणि एक हजार वर्षे पर्यंत बांधलेल्या अवस्थेत पडून राहावे, म्हणून त्याला त्या अथांग डोहात टाकून दिले. ३ आणि ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत, त्याने राष्ट्रांस आणखी ठकवू नये, म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला. त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे.

४ नंतर मी राजासने पाहिली, त्यावर कोणी बसले होते. त्यांना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार दिला होता. आणि येशूवाह विषयीच्या साक्षीमुळे, व याव्हे एलोहिमच्या वचनामुळे, ज्यांचा शिरच्छेद झाला होता. आणि ज्यांनी श्वापदाला व त्याच्या मूर्तीला नमन केले नव्हते. आणि आपल्या कपाळावर, व आपल्या हातांवर त्याची खूण धारण केलेली नव्हती, त्यांचे रूहुव्वा (आत्मे) हि पाहिले.

ते जिवंत झाले, आणि त्यांनी मशीहा बरोबर एक हजार वर्षे राज्य केले. ५ मृतांपैकी बाकीचे लोक ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत, जिवंत झाले नाहीत. हेच पहिले पुनरूत्थान, ६ पहिल्या पुनरूत्थानांत ज्याला भाग आहे तो आशिर्वादीत, व पवित्र आहे. अशा लोकांवर दुस-या मरणाची सत्ता नाही, तर ते याव्हे एलोहिमचे व मशीहाचे कोहेन (याजक) होतील, आणि त्याच्याबरोबर एक हजार वर्षे राज्य करितील.

७ ती हजार वर्षे संपल्यावर सैतानांला कैदेतून बंधमुक्त करण्यात येईल. ८ आणि तो पृथ्वीच्या चार कोप-यांतील, गोग व मागोग राष्ट्रास ठकवावयास, त्यास लढाईसाठी एकत्र करावयास बाहेर येईल. त्यांची संख्या समुद्राच्या वाळूइतकी आहे.९ त्यांनी पृथ्वीच्या विस्तारावर फिरून पवित्र जनांची छावणी, व प्रिय नगर वेढिले. तेंव्हा आकाशातून अग्नी उतरला, आणि त्याने त्यास खाऊन टाकले. १० त्यास ठकविणा-या सैतानाला अग्नीच्या व गंधकाच्या सरोवरात टाकण्यात आले, त्यात ते श्वापद व तो खोटा संदेष्टा आहे. तेथे त्यास रात्रदिवस युगानुयुग पीडा भोगावी लागेल.

११ नंतर मोठे पांढरे राजासन, व त्यावर बसलेला एक जण माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या तोंडापुढून ऐरेस्त (पृथ्वी) व राक्वीअ् (आकाश) ही पळाली, त्याकरिता ठिकाण उरले नाही. १२ मग मृत झालेल्या लहानथोरांना मी राजासनापुढे उभे राहिलेले पाहिले. त्या वेळी सेफेर (पुस्तके) उघडली गेली, तेंव्हा दुसरे एक पुस्तक उघडले गेले ते जीवनाचे होते, आणि त्या पुस्तकामध्ये जे लिहिले होते, त्यावरून मृतांचा न्याय ज्यांच्या त्यांच्या कृत्याप्रमाणे ठरविण्यांत आला. १३ तेंव्हा याम्मीम (समुद्रा) ने आपल्यामधील मृत मनुष्यास बाहेर सोडले. मुथ (मृत्यू) व शेओल (अधोलोक) ह्यांनी आपल्यातील मृतास बाहेर सोडले. आणि ज्यांच्या त्यांच्या कृत्याप्रमाणे प्रत्येकाचा न्याय ठरविण्यात आला. १४ तेंव्हा मुथ (मरण) व शेओल (अधोलोक) ही अग्नीच्या सरोवरात टाकली गेली, अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. १५ ज्या कोणाचे नांव जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेले सापडले नाही, तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला.

**२१**.१ नंतर मी नवे शाम्माईम (आकाश) व नवी ऐरेस्त (पृथ्वी) ही पाहिली. पहिले आकाश व पहिली पृथ्वी ही निघून गेली होती, आणि याम्मीम (समुद्र) हि राहिला नाही. २ तेंव्हा मी क्वोदेश (पवित्र) नगरी, नवी यरूशलेम, याव्हे एलोहिम पासून आकाशातून उतरताना पाहिली. ती नव-यासाठी शृंगारलेल्या नवरीप्रमाणे, सजविलेली होती. ३ आणि मी राजासनांतून आलेली मोठी वाणी ऐकली. ती अशी, पाहा, याव्हे एलोहिमचा मंडप मनुष्याजवळ आहे. त्यांच्याबरोबर याव्हे एलोहिम आपली वस्ती करील. ते त्याचे लोक होतील, आणि याव्हे एलोहिम स्वतः त्यांच्याबरोबर राहिल.४ तो त्यांच्या डोळयाचे सर्व अश्रु पुसून टाकील. ह्यापुढे मरण नाही, शोक, रडणे, व कष्ट ही नाहीत. कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या, ५ तेंव्हा राजासनांवर बसलेला म्हणाला, पाहा, मी सर्व गोष्टी नवीन करितो. तो म्हणाला, लिही, कारण ही वचने विश्वसनीय व सत्य आहेत. ६ तो मला म्हणाला, झाले! मी आलेफ व ताव, म्हणजे प्रारंभ व शेवट आहे. मी तान्हेल्याला जीवनाच्या झ-याचे पाणी फुकट देईन. ७ जो कोणी विजय मिळवितो, त्याला ह्या गोष्टी वारशाने मिळतील. मी त्यांचा याव्हे एलोहिम होईन, आणि तो माझा बेन (मुलगा) होईल. ८ परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तीपूजक, व सर्व लबाड माणसे, ह्यांच्या वाटयास अग्नीचे, व गंधकाचे सरोवर येईल, हेच ते दुसरे मरण आहे.

९ नंतर शेवटल्या सात पीडांनी भरलेल्या सात वाटया ज्यांनी हाती घेतल्या, अशा सात देवदूतांपैकी एक देवदूत येऊन, माझ्याबरोबर बोलला. तो म्हणाला, ये नवरी, म्हणजे केबेस (कोक-या) ची ईशशाह (स्त्री), मी तुला दाखवितो. १० तेंव्हा त्याने मला रूहुव्वा (आत्म्यात) मोठया व उंच डोंगरावर नेले. आणि पवित्र नगर यरूशलेम याव्हे एलोहिम पासून आकाशातून उतरत असलेले मला दाखविले. ११ तिच्या ठायी याव्हे एलोहिमचे तेज होते. तिची प्रभा अति मोलवान रत्नासारखी होती, ती स्टटिकाप्रमाणे लखलखणा-या यास्फे खडयासारखी होती. १२ तिला मोठा उंच तट होता. त्याला बारा वेशी होत्या, आणि वेशीजवळ बारा देवदूत होते. त्या वेशीवर नांवे लिहिलेली होती. ती इस्त्राएलाच्या संतानाच्या बारा वंशांची होती १३ पूर्वेकडे तीन वेशी, उत्तरेकडे तीन वेशी,

दक्षिणेकडे तीन वेशी, व पश्चिमेकडे तीन वेशी होत्या. १४ नगराच्या तटाला बारा पाये होते, त्यावर कोक-याच्या बारा प्रेषितांची बारा नावे होती.

१५ जो माझ्याबरोबर बोलत होता, त्याच्याजवळ नगरीचे, तिच्या वेशीचे, व तिच्या तटाचे, मोजमाप घेण्यासाठी सोन्याचा बोरू होता. १६ नगरी चौरस होती, तिची लांबी जितकी होती, तितकीच तिची रूंदी होती. त्याने नगरीचे माप बोरूने घेतले, ते सहाशे कोस भरले. तिची लांबी, रूंदी, व उंची समान होती. १७ मग त्याने त्याच्या तटाचे माप घेतले, ते माणसाच्या हाताने एकशे चव्वेचाळीस हात भरले, माणसाचा हात म्हणजे, देवदूताचा हात. १८ तिचा तट यास्फे रत्नाचा होता. आणि नगरी शुद्ध काचेसारखी शुद्ध सोनेच होती. १९ नगरीच्या तटाचे पाये वेगवेगळया मूल्यवान रत्नांनी शुंगारलेले होते. पहिला पाया यास्फे, दुसरा नीळ, तिसरा शिवधातु, चौथा पाच, २० पांचवा गोमेद, सहावा सर्दि, सातवा लसणा, आठवा वैडूर्य, नववा पुष्कराज, दहावा सोनलसणी, अकरावा याकीन, बारावा पद्मराग, अशा रत्नाचे ते होते. २१ बारा वेशी बारा मोत्यांच्या होत्या, एकेक वेस एकेक मोत्याची होती. नगरीतील मार्ग पारदर्शक काचेसारखा शुद्ध सोनेच होता.

२२ त्यात मंदिर माझ्या पाहण्यांत आले नाही, कारण सर्वसमर्थ अदोनाई, याव्हे एलोहिम व केबेस (कोकरा) हेच तिचे मंदिर होते. २३ नगरीला सूर्यचंद्राच्या प्रकाशाची आवश्यकता नाही, कारण याव्हे एलोहिमच्या तेजाने ती प्रकाशित केली आहे. आणि हाच केबेस (कोकरा) तिचा दिप, २४ राष्ट्रे तिच्या प्रकाशाने चालतील, आणि पृथ्वीवरील राजे आपले वैभव त्यात आणितात. २५ तिच्या वेशी दिवसा बंद होणारच नाहीत, रात्र तर तेथे नाहीच. २६ राष्ट्रांचे वैभव व प्रतिष्ठा तिच्यात आणितील. २७ तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी, आणि अमंगळपणा, व असत्य, आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही. तर कोक-याच्या जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेल्या लोकांचा मात्र होईल.

**२२**.१ नंतर त्याने याव्हे एलोहिमच्या व कोक-याच्या राजासनांतून निघालेली, नगरीच्या मार्गावरून वाहणारी जीवनाच्या पाण्याची स्फटिकासारखी, नितळ नदी मला दाखविली. २ नदीच्या दोन्ही बाजूस बारा जातीची फळे देणारे, जीवनाचे झाड होते. ते दर महिन्यास आपली फळे देते, आणि त्या झाडाची पाने राष्ट्रांच्या आरोग्यासाठी उपयोगी पडतात. ३ पुढे काहीहि शापित असणार नाही, तर तिच्यामध्ये याव्हे एलोहिमचे व कोंक-याचे राजासन असेल, आणि त्याचे दास त्याची सेवा करतील. ४ ते त्याचे मुख पाहतील, व त्याचे नांव त्यांच्या कपाळांवर असेल. ५ पुढे रात्र असणार नाही, कारण अदोनाई, याव्हे एलोहिम त्यांच्यावर प्रकाश पाडिल, आणि ते युगानुयुग राज्य करतील.

६ नंतर तो मला म्हणाला, ही वचने विश्‍वासनीय व सत्य आहेत. आणि नव्वीईम च्या रूहुव्वां चा याव्हे एलोहिम, जो अदोनाई त्याने ज्या गोष्टी लवकर घडून आल्या पाहिजेत, त्या गोष्टी आपल्या दासांना कळविण्यासाठी, आपल्या मालाक ला (दूताला) पाठविले आहे. ७ पाहा, मी लवकर येतो, ह्या पुस्तकांतील संदेशवचने पाळणारा, तो आशिर्वादीत आहे. ८ हे ऐकणारा व पाहणारा, मी योहानान आहे. जेंव्हा मी ऐकले व पाहिले, तेंव्हा हे मला दाखविणा-या देवदूताला नमन करण्यासाठी मी त्याच्या पाया पडलो. ९ परंतु तो मला म्हणाला, असे करू नये. मी तुझ्या सोबतीचा तुझे बंधु, नव्वीईम (संदेष्टे), व ह्या पुस्तकांतील वचने पाळणारे लोक ह्यांच्या सोबतीचा दास आहे, नमन याव्हे एलोहिमला कर.

१० पुन्हा तो मला म्हणाला, ह्या पुस्तकांतील संदेशवचने शिक्का मारून बंद करू नको, कारण वेळ जवळ आली आहे. ११ दुराचारी माणूस दुराचार करीत राहो. मलिनतेने वागणारा माणूस स्वतःला मलिन करीत राहो. नीतिमान माणूस नैतिक आचरण करीत राहो. पवित्राचरणी माणूस स्वतःला पवित्र करीत राहो.

१२ पाहा मी लवकर येतो, आणि प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे देण्यास, माझ्याजवळ वेतन आहे. १३ मी आलेफ व ताव, म्हणजे पहिला व शेवटला, अदि व अंत असा आहे. १४ आपल्याला जीवनाच्या झाडावर अधिकार मिळावा, व वेशीतून नगरीत

आपला प्रवेश व्हावा, म्हणून जे आपले झगे धुतात, ते आशिर्वादीत आहे. १५ कुत्रे, चेटकी, जारकर्मी, खून करणारे, मूर्तिपूजक, लबाडीची आवड धरणार, व लबाडी करणारे, सर्व लोक बाहेर राहतील.

१६ ह्या गोष्टीविषयी तुम्हांस साक्ष देण्याकरिता, मी येशूवाहने आपला मालाक ला (दूताला) मंडळयांकरिता पाठविले आहे. मी दाविदाचा अंकुर आहे, व त्याचे संतानहि, मी पहाटचा तेजस्वी तारा आहे.

१७ आत्मा व वधु ही म्हणतात, ये. ऐकणाराहि म्हणो, ये. आणि तान्हेला येवो. ज्याला पाहिजे तो जीवनाचे पाणी फुकट घेवो.

१८ ह्या पुस्तकांतील संदेशवचने ऐकणा-या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो की, जो कोणी ह्यांत भर घालील, त्याच्यावर ह्या पुस्तकांत लिहिलेल्या पीडा याव्हे एलोहिम आणील. १९ आणि जो कोणी, ह्या संदेशाच्या पुस्तकांतील वचनातून काही काढून टाकील, त्याचा वाटा ह्या पुस्तकांत वर्णिलेल्या जीवनाच्या झाडांतून, व पवित्र नगरीतून याव्हे एलोहिम काढून टाकील.

२० ह्या गोष्टीविषयी साक्ष देणारा म्हणतो. होय, मी लवकर येतो. आमेन, हो अदोनाई येशूवाह ये.

२१ अदोनाई येशूवाहची कृपा सर्व क्वोदेश (पवित्र) जनांबरोबर असो. आमेन.

............ समाप्ती ............

हिब्रू शब्दाचे उच्चार मराठी आणि इंग्रजी भाषेमध्ये अर्थ. The pronunciation of the Hebrew word, Meaning in Marathi and English languages.

१. मालाक, Malak, देवदूत, Angels. २.थालमीद, Thalmid, शिष्य, Disciples. ३.शालोम, Shalom. शांती / सलाम, Peace / Hy. ४. अब्बा, Abba. वडील, बाप, Father. ५. हेख्रून, Hekhun. कृपा, Grace. ६. शम्माईम, Shammayim. आकाशे, Heavens. ७. ऐरेस्त, Erest. पृथ्वी, Earth. ८. हा-ताअह् , Ha-taah. पाप, Sins. ९. किस्से, Kisse. सिंहासन, Throne. १0. अहेद, Ahed. प्रीति, Love. ११. देम्ये, Demye. रक्त, Blood. १२.त्साद-दीक्व, Stad-diq. प्रामाणिक, Righteous. १३. येक्वार, Yeqar. वैभव, Glory. १४. इस्त्राएल, Yisrael. इस्त्राएल, Israel. १५. शोलतान, Sholtan. प्रभुत्व, Dominion. १६. हेख्न, Hekhan. कृपा, Grace. १७. हेसेद / हास-दोन, Hesed / Has-daon. दया, कृपाळू , Mercy. १८. हाकेमह, Hakemah. ज्ञान, Wisdom. १९.गेबुराह् , Geburah. सामर्थ्य, Power. २0. यरूशलेम, Yerushalem. यरूशलेम, Jerusalem. २१. मेलेक, Melek. राजा, King. २२. कोहेन, Kohen. याजक , Priest. २३. ऐवेद, Ebed. सेवक, Servant. २४. ऐश, Esh. अग्नी, Fire. २५. ऐजार, Ezer. मदतनीस, Helper. २६. अमान, Aman. विश्वास, Faith. २७. तीक्ववाह, Tiqvah. आशा, Hope. २८. याम्मीम, Yam-mim. समुद्र, Sea. २९. शेओल, Sheol. मृतलोक / अधोलेक, Hell. ३0. शेम, Shem. नांव, Name. ३१. ऐदाह, Edah. मंडळी, Church/ Congregation. ३२. क्वोदेश, Qodesh. पवित्र, Holy. ३३. मओर, Maor. बोळ, Myrrh. ३४.क्वेतोरेथ, Qetoreth. धूप, Incense/Frankincense. ३५.झाहाब, Zahab. सोने, Gold. ३६.गोफ्रीथ, Gophrith. गंधक, Brimstone. ३७.क्वेदेम, Qedem. पूर्व दिशा, East. ३८. सार, Sar. राजकुमार, Prince. ३९. साराह् , Sarah. राजकन्या, Princess. ४0. एलयोवन / हा-गदोल, Elyown / Ha-gadol. अती उंच्च / प्रमुख, High Most / Chief. ४१. कोकाब, Kokab. तारा, Star. ४२. झाक्वेन, Zaqen. वडील वर्ग , Elders. ४३. पॅ-सेह, Pe-sah. वल्हांडण, Passover. ४४. तोराह, Torah. नियमशास्त्र, Law. ४५. आदाम, Adam. मानव, Man. ४६. झायीथ, Zayith. जैतून, Olives. ४७ ईशशाह, Ishshah. स्त्री/ बायको, Woman / Wife. ४८ ईश, Ish. मनुष्य/ पुरूष, Male/ Man. ४९.एलोहिम, Elohim. देव, God. ५0.याव्हे, Yhvh. याव्हे, Yahveh (LORD). ५१.अदोनाय/अदोन, Adonay /Adon. अदोनाय/ अदोन, Adonay /Adon. ५२.अदोनाई, Adonai. अदोनाई, (प्रभु), Adonai, (Lord).